महात्मा गांधी
यांचे
संकलित वाङ्मय



महात्मा गांधी वाङ्मय प्रकाशन समिती

महात्मा गांधींचे संकलित वाङ्मय

२०

(एप्रिल ते ऑगस्ट १९२१)

महात्मा गांधी संकलित वाङ्मय भाषांतर समिती,
महाराष्ट्र राज्य – मुंबई

छपाई : साधना प्रेस, ४३०–३१ शनिवार, पुणे ३०

नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, यांनी कृपापूर्वक दिलेल्या परवानगीने,
म. गांधी वाङ्मय भाषांतर समिती
महाराष्ट्र सरकार, मुंबई–१
तर्फे प्रकाशित

साधी बांधणी रु. १·००] किंमत [कापडी बांधणी रु. १·७५

महात्मा गांधींचे संकलित वाङ्मय

२०

(एप्रिल ते ऑगस्ट १९२१)

प्रस्तावना

ह्या खंडात १९२१ च्या एप्रिल १४ पासून १५ ऑगस्टपर्यंतचा चार महिन्यांचा काळ आलेला आहे. "एका वर्षात स्वराज्य" ह्या घोषणेचे ते साल होते. ह्या काळात गांधीजींनी जे जे म्हटले अगर केले, त्याचा उद्देश त्यांची स्वतःची स्वराज्याची कल्पना स्पष्ट करावी, स्वराज्याकरिता लायकी प्राप्त व्हावी म्हणून लोकांना शिक्षण द्यावे, व ते स्वराज्य लवकर साध्य व्हावे म्हणून लोकांची मानसिक तयारी करावी हा होता. त्यांनी 'यंग इंडिया' व 'नवजीवन'मध्ये जे लेख लिहिले व त्यांच्या ज्या भाषणांचे वृत्तांत त्या पत्रात आले, त्यांत प्रथम मार्च १९२१ च्या बेझवाडा कार्यक्रमावर लक्ष केंद्रित केले होते. त्या कार्यक्रमाने जून ३० पर्यंत टिळक स्वराज्य फंडाची, काँग्रेस सभासदत्वाची, आणि चरख्याच्या प्रसाराची विशिष्ट उद्दिष्टे ठरविली होती.

'एका वर्षात स्वराज्य' हे जे वचन त्यांनी दिले होते, ते वचन बिनशर्त नव्हते, यासंबंधी गांधी स्वतःच्या मनात पूर्णपणे निःशंक होते. ते स्वराज्याकरता पात्रता नुसत्या बेझवाड्याच्या आदेशावरून पारखणार नव्हते; पण, स्वदेशीचा कार्यक्रम पुरा पाडण्यावरून संपूर्ण अहिंसेवरून आणि हिंदु-मुस्लिम ऐक्यावरूनदेखील पारखणार होते. गांधींचा विरोध हा सरकारी पद्धतीला होता. त्यांनी, "हिंदुस्थानातील प्रत्येक इंग्लिश गृहस्था"ला जे आवाहन केले आहे त्यात ते लिहितात... "मनुष्य ज्या पद्धतीचा पुरस्कार करतो त्या पद्धतीपेक्षा तो अधिक श्रेष्ठ असतो. येथे हिंदुस्थानात तुम्ही ज्या पद्धतीचे घटक आहात ती पद्धत इतकी दुष्ट आहे की, तिचे वर्णनही करवत नाही. तुम्ही वाईट आहात असे न समजता मला त्या पद्धतीचा अत्यंत कठोर शब्दांत धिक्कार करणे शक्य आहे....आपले सामुदायीक जीवन परस्परांच्या अविश्वासावर व भीतीवर आधारलेले आहे, ही पौरुषाची गोष्ट नाही हे तुम्ही कबूल कराल. ज्या पद्धतीने तुम्हांला आणि आम्हांला खाली ओढले आहे, ती पद्धत नष्ट करण्याकरिता तुम्ही मला येऊन मिळा." (प्रकरण १७६). गांधींचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे होते : "एक राष्ट्रकुटुंब असावे, ज्यात त्या राष्ट्रांची इच्छा असल्यास त्यांनी जगाला आपल्यात जे सर्वोत्कृष्ट आहे ते देण्याकरिता आणि पाशवी शक्तीने नव्हे पण आत्मक्लेशाने जगातील दुर्बळ राष्ट्रे किंवा वंश यांचे संरक्षण करण्याकरिता एकत्र यावे." (प्रकरण १३७).

हे स्वराज्य कसे स्थापन करावयाचे ? गांधींचे इतिहासवाचन असे होते की, ब्रिटिश लोक शुद्ध व साध्या न्यायापुढे हार खात नाहीत. त्यांच्या व्यवहारज्ञानाला ही गोष्ट अगदीच अमूर्त होती. जेव्हा हिंदी लोक आपल्या उद्देशांसंबंधी पुरेशी शक्ती

दाखवितील आणि पुष्कळसा स्वार्थत्याग करतील तेव्हाच ते त्याला दाद देतील, किंवा बळाची व न्यायाची जेव्हा गाठ घातली जाईल तेव्हाच ते त्याला दाद देतील. ते पाशवी बल आहे का आत्मबल आहे याची ते पर्वा बाळगीत नाहीत.

पण आपण जे बळ वापरावयाचे ते अनत्याचारी असहकारितेचे असावे याबद्दल गांधी निःशंक असत. पळवाटा, गुप्तता आणि अत्याचार या मार्गांना त्यांची तीव्र नापसंती असे. एक जून रोजी झालेल्या गुजरातच्या राजकीय परिषदेत त्यांनी असहकारितेचा पुरस्कार करणारा ठराव मांडला. अत्याचाराचा आश्रय घेण्याचा आपला हेतू नव्हता, किंवा परक्या शत्रूबरोबर आपला संबंध नव्हता असे निवेदन करविण्यास अली बंधूंचे मन वळविण्यात त्यांनी अनेक ठिकाणांहून स्वतःवर टीका ओढवून घेतली. पण त्यांना राजकारणापेक्षा नीतिमत्ता अधिक श्रेष्ठ वाटत होती. त्यांनी त्या माफीची प्रशंसा पुढील-प्रमाणे केली : "जे मार्ग चुकलेले असहकारितावादी आहेत त्यांना ती माफी वाट दाखविणाऱ्या ताऱ्याप्रमाणे वाटेल. शत्रूसमोरसुद्धा त्यांनी स्वतःचे शुद्धीकरण केले पाहिजे, आणि आपल्या कृतीचा चुकीचा अर्थ दुर्बलता असा केला जाईल, हाही धोका त्यांनी पत्करला पाहिजे. न्यायाच्या मार्गावर येण्याकरिता त्यांना किती मोल द्यावे लागेल याचा हिशेब करू नये. सत्य हे सत्याकरिताच आचरावे लागते. याचा अर्थ तोच आहे......" (प्रकरण ११७).

असहकारितेच्या मोहिमेचा उद्देश, "पदव्या, कोर्टे, शाळा व कौन्सिले यांच्या-विषयी असलेला मोह" दूर करणे हा होता (प्रकरण १०). ती चळवळ अंतिम ध्येयाकडे गेल्याशिवाय थांबणार नव्हती किंवा थांबणे शक्य नव्हते. लोकांना तिचा आश्रय केव्हाही घेता आला असता. त्या चळवळीचा उद्देश "इंग्लिश लोकांना आमच्याबरोबर सन्मान्य अटींवर सहकारिता करण्यास बोलाविण्याचा होता, किंवा आमच्या देशातून निघून जा असे सांगण्याचा होता...... तिचा उद्देश आमचे संबंध शुद्ध भूमिकेवर स्थापन करावेत, त्या संबंधांचे विवरण आमच्या स्वाभिमानाला आणि प्रतिष्ठेला साजेल अशा प्रकारे करावे हा होता." (प्रकरण १०).

चळवळीचा मुख्य हेतू आत्मशुद्धी व क्षत्रिय वृत्तीचे पुनरुज्जीवन हा होता. 'आपली प्रार्थना स्वराज्याकरिता असू नये, पण ते जिंकण्याला शक्ती प्राप्त व्हावी याकरिता असावी." (प्रकरण ४७). "आम्ही ब्रिटिशांना बदलण्याचाही प्रयत्न करीत नाही. आम्ही स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करीत आहोत." (प्रकरण ६०). त्यांची 'हिमालयाएवढी' जी चूक झाली, ती चूक 'देशाच्या तयारी'ची त्यांनी चुकीची कल्पना केली ही होती (प्रकरण ३१). टाइम्स ऑफ इंडियाने गांधी बदलले आहेत अशी जी टीका केली तिला उत्तर देताना ते म्हणाले की, नव्या व जुन्या गांधींत खरा फरक झालेला नाही; पण नव्या गांधीला सत्याग्रहाची स्पष्ट कल्पना

आली आहे व ते अहिंसेच्या सिद्धांताला पूर्वीपेक्षा अधिक मौल्यवान मानीत आहेत.

कविवर्य रवींन्द्रनाथ टागोर यांची टीका म्हणजे एक आव्हानच होते. ते गांधींनी मक्कमपणे व स्पष्ट शब्दांत स्वीकारले. त्यांनी धीर धरण्याचा सल्ला दिला आणि चळवळ व तिची बांडगुळे यांत स्पष्ट फरक केला. गांधी लिहितात : "असहकारिता ही योग्य कालापूर्वी आली असेल. पण हिंदुस्थानला अत्याचार व असहकारिता यांत निवड करण्यावाचून गत्यंतरच नाही." ह्या चळवळीच्या उद्देशाविषयी कवींना भिण्याचे काही कारण नाही. तिचा उद्देश हिंदुस्थान आणि पाश्चात्त्य देश यांच्यात चिनी भिंत उभारण्याचा नाही. उलटपक्षी असहकारितेचा उद्देश परस्परांच्या आदरावर व विश्वासावर आधारलेल्या खऱ्याखुऱ्या, सन्माननीय आणि ऐच्छिक सहकार्याचा मार्ग आखावा हा आहे....... पापात अजाणता किंवा अनिच्छेने भागीदार होण्याविरुद्ध असहकारिता म्हणजे एक निषेध आहे." (प्रकरण ७९).

इंग्रजी शिक्षणावर स्फुट लिहिताना गांधीजींनी एक संस्मरणीय घोषणा केली आहे. त्यात त्यांनी ज्या आपल्या स्वतःच्या शक्तीमुळे आपण परकीय प्रभाव आत्मसात करू शकू त्या गोष्टीवर भर दिला आहे. "मला वाटते, मी त्या महान कवींच्या इतकाच मोकळ्या हवेवर विश्वास ठेवणारा आहे. माझ्या घराला चोहोबाजूंनी भिंती असाव्यात आणि माझ्या घराला खिडक्या बंद केलेल्या असाव्यात असे मला वाटत नाही. साऱ्या देशातील संस्कृती माझ्या घराभोवती शक्य तितक्या स्वैरपणे संचरत असावयास मला हव्या आहेत. पण कोणाकडूनही पायासकट मी उडविला जावा हे मला मान्य नाही. दुसऱ्या लोकांच्या घरात आगंतुक म्हणून किंवा भिकारी म्हणून किंवा गुलाम म्हणून माझी राहण्याची तयारी नाही. माझा धर्म हा बंदीगृहातील धर्म नव्हे. ईश्वरी सृष्टीतील क्षुद्र माणसालादेखील तेथे स्थान आहे. पण माझा धर्म उन्मत्तपणा, वर्णाचा, धर्माचा किंवा रंगाचा अभिमान यांना भीक घालणार नाही." (प्रकरण ७८).

असहकारितेच्या वृत्तीचे ताजे दर्शन व्हावे म्हणून जमीन तयार केली जात होती. व्हाइसरॉयांचे सिमल्याचे भाषण हे "ठीक होते." चळवळीच्या अभ्यासाचा तो प्राथमिक प्रयत्न होता. काही दिवसांनंतर गांधींनी असे लिहिले की, व्हाइसरॉयांच्या भाषणात पूर्वकालीन अनेक अपयशांची स्पष्ट कबुली दिलेली आढळत नाही. आणि म्हणून नवे पान उघडण्याची प्रामाणिक इच्छा दिसत नाही (प्रकरण ९०). तथापि जून २४ ला अली बंधूंच्या माफीबद्दल व्हाइसरॉयनी जे पत्रक काढले व भाषण केले त्याबद्दल त्यांना "अत्यंत खेद" झाला. पत्रक व भाषण ही दोन्हीही वास्तवतेच्या दृष्टीने बरोबर नव्हती. २८ जूनला त्यांनी असे लिहिले की, मे महिन्यात ज्या मुलाखती झाल्या त्यांच्या परिस्थितीचा आणि स्वरूपाचा उभयसंमत वृत्तांत प्रसिद्ध केला जावा. त्यांना

अशी भीती वाटली की, व्हाइसरॉय हे अशा एका नोकरशाहीच्या हातात सापडले आहेत की, जी ' हुशार, एकजुटीची आणि उलट्या काळजा 'ची आहे.

त्यानंतर असहकारितावाद्यांचे हे कर्तव्य झाले की, त्यांनी सरकारच्या विद्यमान पद्धतीविषयी अप्रीती शिकवावी व देशाला सविनय कायदेभंगाला तयार करावे. त्यांनी असहकारिता व सविनय कायदेभंग यांच्यातील संबंध स्पष्ट केला "कायदेभंग हा असहकारितेचा अत्यंत तीव्र प्रकार आहे...राज्याची सत्ता पूर्णपणे तो नाकारतो, आणि जेव्हा राज्य दुरुस्त न होण्याच्या भ्रष्टतेपलीकडे गेलेले असते तेव्हाच तो करता येतो." (प्रकरण १०५). गांधीजींनी स्वतः मिलिटरी रिक्वायरमेंट्सपुढे साक्षीदार म्हणून हजर राहण्यास इन्कार केला.

गांधीजी, शौकत अली, डॉ. किश्लू आणि खत्री यांच्या असहकार कमिटीने जुलै १७ ला एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यांत त्यांनी बेझवाडा आणि असहकारितेचा कार्यक्रम पुरा करण्याकरिता अधिक प्रयत्नांची आवश्यकता प्रतिपादन केली. सर्व चळवळीत अत्यंत धार्मिक असलेली ही चळवळ, असे जे या चळवळीचे गांधींनी वर्णन केले, त्या चळवळीकरिता अत्यंत त्याग आणि क्लेश भोगावे लागतील हे त्यांनी ओळखलेः "दुःखितांच्या रक्ताशिवाय स्वातंत्र्यमंदिर उभारता येत नाही." (प्रकरण २१९). वारंवार होणाऱ्या धरपकडी आणि सतत होणाऱ्या शिक्षा ह्या त्याच्या किंमतीचा एक भाग म्हणून लोकांना देणे भाग होते.

सविनय कायदेभंगाचे भयंकर स्वरूप गांधीजी मान्य करीत होते, म्हणून एक पक्षी तो सविनय कायदेभंग जरी सविनय प्रतिकार करणारे, आत्यंतिक हाल सोसण्यास तयार असतील तर दडपला जाणारा नसला तरी, "हजारो मुसलमानांना आणि तसेच हिंदूंनाही कडक रीतीने अनत्याचारी होण्यास व राहण्यास त्यांचे मन वळविणे हा एक भयंकर प्रयोग होता. जरी त्यांच्या अखेरच्या श्रद्धेने त्यांना विशिष्ट परिस्थितीत अत्याचार करण्यास मुभा दिलेली असली तरी हा प्रयोग भयंकरच होता." (प्रकरण २४८). तथापि त्या वेळी किंवा नजीकच्या भविष्यकाळात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याची संभाव्यता ते कमीच मानीत असत. त्याचा विस्तृत प्रमाणावर स्वीकार करण्यास देशाची तयारी नव्हती.

टिळक स्वराज्य फंड जो एक कोटी जमवावयाचा होता तो जूनअखेरीस जमला व ती एक खळबळ उडविणारी गोष्ट साध्य केली गेली. आता स्वदेशीवर आणि परदेशी कापडावरील बहिष्कारावर भर देण्यात आला. त्याचा उद्देश, "असे एक वातावरण निर्माण करावे की, ज्यामुळे आपल्याला सविनय कायदेभंग सुरू करण्याची शक्ती येईल; आणि तो कायदेभंग इतक्या मोठ्या प्रमाणावर असावा की, सरकारला त्याला तोंड देता येऊ नये." (प्रकरण २३४).

१ जुलैला गांधीजींनी परदेशी कापडावरील बहिष्कार १ ऑगस्टला पुरा करावा असे आवाहन केले. कारण ते लिहितात, "स्वराज्याच्या मंदिरांत प्रवेश करण्याकरिता जर आपल्याला कशाची जरूरी असेल तर स्वदेशीची. स्वदेशी म्हणजे परदेशी कापडावरील बहिष्कार" (प्रकरण १६६).

जुलैच्या मध्याला फक्त हाताने विणलेले स्वदेशी कपडे आम्ही वापरू अशी एक प्रतिज्ञा चोहोंकडे गांधींनी पाठविली. ह्याच वेळी परदेशी कापडाची 'होळी' हा त्या दिवसातला 'ज्वलंत' विषय झाला. १ ऑगस्टला आम्ही परदेशी कापडाचा वापर सोडून देऊ अशी प्रतिज्ञा घेण्यास गांधीजींनी सर्व लोकांना सांगितले. लोकांनी मोठमोठ्या जमावांत स्वदेशी व्रत घेतले. परळला जी जाहीर सभा झाली आणि ज्या सभेत परदेशी कापडाची पहिली प्रचंड होळी झाली ती जुलै ३१ ला रात्री. त्याचे वर्णन गांधींनी "मुंबईला साजरा केलेला पवित्र दिवस" असे केले. त्या दिवसाने १९०८ च्या ऑगस्टमध्ये जोहान्सबर्गला जी सभा झाली तिची आठवण करून दिली. त्या सभेत हिंदी लोकांनी आपल्या नोंदणी पत्रकांची होळी केली होती. त्या कृत्याच्या महत्त्वावर त्यांनी जोर दिला: "मी या होळी समारंभाला पवित्र समारंभ समजतो." (प्रकरण २२७). "बाहेरचा अग्नी हा आपल्या दुर्बलतेला जाळणारा आतील अग्नीचा द्योतक मानावा...... आपल्या शुद्ध झालेल्या बुद्धीने स्वदेशीचे खरे अर्थशास्त्र पटवावे." (प्रकरण २३२). "त्या अफाट समुदायात स्वातंत्र्याची दीप्ती चमकून गेली. भव्यतेने केलेले ते भव्य कृत्य होते......" (प्रकरण २४८). ॲन्ड्रूयूज यांना लिहिलेल्या पत्रात ते असे स्पष्टीकरण करतात: "......मी जे आता करण्याचा प्रयत्न करीत आहे ती एक हात न कापता केली जाणारी वैद्यकीय शस्त्रक्रिया...... जीवन हे शिस्त आणि संयमाचे आहे या दृष्टीने मी त्याकडे पाहतो....... लोक स्तब्धपणे व अजाणतेपणाने पातक्यांच्यावरील आपला द्वेष पातकावर वळवीत आहेत." (प्रकरण २५२).

ही तयारी जी चालली होती त्या स्वराज्याचे स्वरूप तरी काय होते? गांधीजींनी शंकेला किंवा संदिग्धपणाला जागाच ठेवली नव्हती. "स्वराज्य म्हणजे व्यक्तींच्या आणि राष्ट्रांच्या अस्तित्वाची एक विशेष अवस्था आहे." (प्रकरण ४७). स्वराज्य म्हणजे मृत्यूच्या भीतीचा त्याग." (प्रकरण २५६). "कष्ट करीत राहण्याची शक्ती म्हणजेच स्वराज्य." (प्रकरण २७०). रामराज्य याचा अर्थ, "स्वराज्य, किंवा धर्मराज्य, किंवा लोकराज्य. असे राज्य तेव्हाच स्थापता येईल की, जेव्हा लोकांना धर्माबद्दल आस्था वाटेल आणि ते शूर होण्याचे शिकतील." (प्रकरण ६०). "...... देवालादेखील स्वराज्य देता येणार नाही. आपल्याला स्वतःलाच ते मिळवावे लागेल." (प्रकरण ६५).

स्वराज्याच्या रचनेसंबंधी गांधीजींनी त्या वेळी विचार करण्याचे नाकारले. म्हणून जेव्हा बिपिनचंद्र पाल यांनी हा प्रश्न काढला तेव्हा गांधीजींना तो अवेळी प्रश्न आहे असे वाटले, आणि त्याची तुलना त्यानी गवंड्याच्या कामाशी केली. असा गवंडी पाया भक्कम घातल्याशिवाय अगदी वरचा मजला बांधण्याचा प्रयत्न करीत असतो." (प्रकरण १०६).

असे स्वराज्य किंवा धर्मराज्य म्हणजे पुण्यवान लोकांचे राज्य, फक्त अनत्याचारी असहकारितेनेच मिळविता येईल. गांधीजींनी जाहीर केले, "न्यायाशिवाय कशाचाही विजय झालेला पाहण्याची मला इच्छा नाही. साध्यामुळे साधने समर्थनीय ठरतात, यावर मी कधीही विश्वास ठेवला नाही आणि आताही ठेवीत नाही. चांगले साध्य तुम्हांला वाईट साधनांनी मिळविता येणार नाही." (प्रकरण २४८). हिंदुस्थान ताठ उभा राहिलेला त्यांना पाहावयाचा होता. स्वतंत्र हिंदुस्थानात शासकवर्गाला जागा नव्हती. आम्ही स्वतःच स्वतःचे शासन करू याचा लोक अधिकाधिक आग्रह धरीत. "जे सुराज्य ते पाहू लागले आहेत, ते स्वराज्याची जागा घेऊ शकणार नाहीत." (प्रकरण ९०). पुढील सिद्धांत त्यांना मान्य नव्हता : "जरी आपले दूरचे ध्येय हिंदी स्वातंत्र्य असले तरी सध्या आपण कोणाचे तरी पालकत्व स्वीकारले पाहिजे....ब्रिटिश राज्य हे जालियनवाला बागेतील लोकांच्या रक्ताने आणि इस्लामच्या विश्वासघाताने लांछित झाले आहे." (प्रकरण ९०). जोपर्यंत ही कारणे दूर होत नाहीत तोपर्यंत हिंदुस्थानातील अशांतता थांबणार नाही. जेव्हा इंग्लंड आपले हात स्वच्छ धुवून टाकील तेव्हा 'साम्राज्यान्तर्गत' स्वराज्याची शक्यता संभवेल. पण काँग्रेसचे ध्येय हे "सहेतुक इतके लवचिक केले आहे की, त्यात स्वातंत्र्याची मागणिसुद्धा बसू शकेल.' (प्रकरण १७४).

गांधीजी या गोष्टीवर भर देत की, अशा स्वातंत्र्याचे काँग्रेस हे एक साधन असावे. काँग्रेसची घटना अशा रीतीने बनविली आहे की, "राष्ट्राच्या स्वराज्य मिळविण्याच्या शक्तीवर ताण पडावा. ते असे म्हणत की, काँग्रेसचा अधिकार जितका जास्त त्यापेक्षा सरकारचा कमी असलाच पाहिजे, आणि अशा रीतीने जेव्हा काँग्रेस संपूर्ण विश्वास संपादन करू शकेल आणि तिच्या आज्ञा स्वेच्छेने पाळावयास लावील तेव्हाच पूर्ण स्वराज्य मिळेल." (प्रकरण १३६). ४ जुलै रोजी त्यांनी न. चिं. केळकर यांना लिहिले : "...... आपण वर्किंग कमिटीला शीघ्रगामी, बलाढ्य व एकसंधी संस्था केली पाहिजे....... आपल्याला जे काय सर्व संपादन करावयाचे आहे ते, काँग्रेस घटना कार्यक्षमतेने चालवून संपादन करू शकू असा माझा विश्वास आहे." (प्रकरण १५३).

अस्पृश्यतेसारख्या सामाजिक दुष्ट गोष्टीकडे गांधीजी सतत लक्ष केंद्रित करीत असत. जेथे जेथे ते बोलत तेथे तेथे त्या रूढीवर हल्ला करीत. त्या रूढीतून सुटका करून

घेणे हे हिंदू समाजाचे कर्तव्य होते. ती रूढी बुद्धिग्राह्य नव्हती. ती सत्य आणि अहिंसेच्या विरोधी होती. म्हणून अधार्मिक होती. या निष्ठुर टीकेमुळे आपण पुष्कळांना दूर केले आहे, शत्रू केले आहे याची त्यांना जाणीव होती. पण ते अस्पृश्यतेच्या बाबतीत तडजोडीला तयार नव्हते. जातीय ऐक्याच्या आवश्यकतेवर ते तसाच जोर देत असत. ते ऐक्य म्हणजे कित्त्यातील वचन नव्हते. "विभक्त झाल्यास आपले पतन झालेच पाहिजे" ह्यांतील सत्य त्यांना स्पष्टपणे दिसत होते (प्रकरण ४२). कामगार आणि भांडवलवाले यांच्या अधिक निकटच्या संबंधाबद्दल त्यांनी विचार केला होता. पण ते कायद्याने होणार नसून व्यवहाराने होईल. लोकमतापूर्वी कायदा केला तर तो पुष्कळ वेळा निरुपयोगी ठरतो. मद्यपान बंदी हीही आवश्यक गरज आहे. त्यांनी घोषित केले : "कोणत्याही राज्यपद्धतीमध्ये संपूर्ण दारूबंदी माझ्या दृष्टीप्रमाणे राष्ट्राने आग्रहाने मागितलीच पाहिजे." (प्रकरण १७६). ह्या खंडातील अत्यंत मोलाची कोणती गोष्ट असेल तर श्रद्धेची कबुली. त्यात त्यांनी गोखले यांना हृदयस्पर्शी श्रद्धांजली अर्पण केली आहे आणि गांधीजींनी गुरुशिष्य-संबंधाच्या पावित्र्यावर भर दिला आहे. त्यांनी आपल्या गुरूची स्तुती अशा शब्दांत केली आहे की, ते शब्द जग आपल्या शिष्यांनाही लावील : "स्फटिकासारखे शुद्ध, कोकरासारखे सौम्य, सिंहासारखे शूर व दोष देता येईल इतके उदार...... राजकीय क्षेत्रात अत्यंत परिपूर्ण गृहस्थ."

आभार

ह्या खंडात जे साहित्य उपयोगात आणले आहे, त्याकरिता आम्ही पुढील संस्थांचे आभारी आहोत. साबरमती आश्रम प्रिझर्व्हेशन ॲन्ड मेमोरिअल ट्रस्ट व संग्रहालय; नवजीवन ट्रस्ट आणि गुजरात विद्यापीठ ग्रंथालय, अहमदाबाद; गांधी स्मारक निधी आणि संग्रहालय आणि नॅशनल आर्काइव्हज् ऑफ इंडिया न्यू दिल्ली; मुंबई सरकार गृहखाते; मुंबई; श्री. छगनलाल गांधी, अहमदाबाद; श्री. नारानदास गांधी, राजकोट; श्री. नारायण देसाई, बारडोली; श्रीमती राधाबेन चौधरी, कलकत्ता; पुढील पुस्तकांचे प्रकाशक : बापूना पत्रो- सरदार वल्लभभाइने, बापूना पत्रो– मणिबेन पटेलने, बापूनी प्रसादी, नरसिंह रावनी रोजनिशी; आणि पुढील वृत्तपत्रे व मासिके : आज, अमृतबझार पत्रिका, बॉबे क्रॉनिकल, गुजराती, दि हिंदू, दि लीडर, नवजीवन, दि सर्च लाइट, आणि यंग इंडिया.

संशोधनाच्या आणि संदर्भाच्या सोयी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही पुढील संस्थांचे आभारी आहोत. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी लायब्ररी; गांधी स्मारक संग्रहालय; इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ग्रंथालय; माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाचा संशोधन व संदर्भ विभाग, नवी दिल्ली; साबरमती संग्रहालय आणि गुजरात विद्यापीठ ग्रंथालय, अहमदाबाद.

वाचकांना सूचना

इंग्लिश साहित्य पुनरुध्दृत करताना मूळाशी शक्य तितका संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. छपाईमध्ये उघड उघड ज्या चुका दिसल्या त्या दुरुस्त केल्या आणि मूळ मजकुरांतील संक्षिप्त शब्दाचा पूर्ण विस्तार केला आहे. मूळात जी नावांची (स्पेलिंग्ज) अक्षरं आहेत ती तशीच ठेवली आहेत.

चौकटी कंसातील मजकूर संपादकांचा आहे. अवतरणातील जी वाक्ये इंग्रजीत असतील ती बाजूला जादा समास सोडून घातली आहेत. जे गांधींचे नसणारे भाषणांचे आणि उताऱ्यांचे अहवाल आहेत, तेही समास सोडून दिले आहेत. भाषणांच्या आणि मुलाखतींच्या अहवालात कोठे कोठे उताऱ्यात थोडासा बदल केला आहे, कारण ते गांधींचे नव्हते.

गुजराती आणि हिंदीतून भाषांतर करताना बिनचुकपणा साधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ते इंग्रजीला साजेल असे केले आहे. जेथे ह्या लेखांची इंग्रजी भाषांतरे उपलब्ध झाली त्यांचाही उपयोग करण्यात आला आहे. आणि मूळाशी जुळण्याकरिता त्यात आवश्यक ते बदल केले आहेत.

प्रत्येक विषयाची उपलब्ध तारीख किंवा अंदाजाने ठरविलेली तारीख उजव्या हाताच्या कोपऱ्यात वर दिली आहे. जेथे मूळ लेखावर तारीख नसेल तेथे अंदाजाने ठरविलेली तारीख चौकटी कंसात आवश्यक तेथे कारणासह दिली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी जी तारीख, ते प्रकरण कोठून घेतले आहे याच्यासह दिली आहे ती प्रसिद्धीची तारीख आहे. लेख हे प्रसिद्धीच्या तारखेचे आहेत. त्याला अपवाद म्हणजे ज्या लेखावर तारीख आहे किंवा लिखाणाच्या तारखेला विशेष महत्त्व आहे व ती ठरविता येण्यासारखी आहे.

आत्मवृत्ताचा जो संदर्भ दिला आहे तो फक्त भाग व प्रकरणाला अनुलक्षून आहे. त्याचे कारण निरनिराळ्या आवृत्तींत पानांचे बदलणारे अनुक्रम.

साधनांच्या बाबतीत एस्. एन्. ही अक्षरे अहमदाबाद येथील साबरमती संग्रहालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची सूचक आहेत. जी. एन्. यांचा संबंध गांधी स्मारक निधी आणि संग्रहालय, नवी दिल्ली, येथे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांशी

आहे. सी. डब्ल्यू. ही अक्षरे महात्मा गांधी संकलन कार्याने संपादित केलेल्या कागद-पत्रांना अनुलक्षून आहेत.

परिशिष्टांमध्ये मूळ लेखाला सुसंबद्ध असणाऱ्या पार्श्वभूमीची साधनसामग्री देण्यात आली आहे. सामग्रींची यादी आणि ह्या खंडातील मुदतीचा कालक्रम हाही शेवटी देण्यात आला आहे.

मराठी आवृत्तीसंबंधी

महात्मा गांधींच्या समग्र वाङ्मयाचे प्रकाशन इंग्रजी आणि हिंदी या भाषांतून करण्याची योजना भारत सरकारने हाती घेतलेली असून, आतापर्यंत ३१ खंड प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. महात्मा गांधींची त्यांच्या लिखाणातून दिसून येणारी विचार-प्रणाली आमजनतेच्या समोर यावी या हेतूने या वाङ्मयाचे भाषांतर प्रादेशिक भाषां-मधून व्हावे अशी सूचना भारत सरकारने राज्य सरकारांच्या विचारार्थ पाठविली. ही सूचना तेव्हाच्या मुंबई सरकारला पसंत पडली. यावर मुंबई सरकारने या वाङ्मयाचे मराठी रूपांतर करण्याचे काम अंगावर घेतले आणि १८ एप्रिल १९५९ रोजी या कामासाठी एका समितीची स्थापना केली. हल्ली समितीत खालील सभासद आहेत.

१. मुख्यमंत्री श्री. **वसंतराव नाईक,** अध्यक्ष

२. श्री. **वि. स. पागे,** सभासद

३. श्री. **शांतीलाल शहा,** सभासद

४. श्री. **देवकीनंदन नारायण,** जळगाव, सभासद

५. श्री. **भ. ग. कुंटे,** चिटणीस

महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे महात्मा गांधींच्या समग्र वाङ्मयापैकी प्रकाशित झालेल्या २० व्या खंडाचा अनुवाद प्रसिद्ध करण्यात येत आहे. या खंडाचा अनुवाद श्री. त्र्यं. र. देवगिरीकर, पुणे, यांनी केला आणि अनुवादाच्या तपासणीचे काम श्री. द. कृ. गोसावी, पुणे, यांनी केले. पुढील खंडाच्या अनुवादाला सुरुवात झालेली असून ते क्रमशः प्रसिद्ध करण्यात येतील.

मुंबई १९६९ }

भ. ग. कुंटे
चिटणीस.

अनुक्रमणिका

परिशिष्टे

१. रासमधील सभेत भाषण[1]

एप्रिल १५, १९२१

एकदा मी लोकांना असा सल्ला दिला होता की, सरकार जेव्हा अडचणीत असेल तेव्हा त्याला मदत करावी, पण ते म्हणताना मी असे म्हटले होते की, सरकारच्या अमलाखाली आपल्याला हक्क संपादन करायचे असतील तर आपण प्रथम आपले कर्तव्य केले पाहिजे. त्याप्रमाणे, खेडा जिल्ह्यातील लढा जेव्हा समाप्त झाला तेव्हा मी लोकांनी सैन्यात[2] दाखल व्हावे म्हणून त्यांचे मन वळविण्याकरता पुढे आलो. मी शिपाईगिरी करण्याकरता सिद्ध झालो. मी जे केले त्याबद्दल मला बिलकूल पश्चात्ताप वाटत नाही. त्यामुळे फायद्याव्यतिरिक्त लोकांच्या पदरात काही पडले नाही असे मला वाटते. आपण सैन्यात दाखल होण्याचा निर्णय घेऊन आपल्या मनाचा थोरपणा दाखवला. आपण तसे केले याबद्दल मला दुःख होत नाही. पण मला याबद्दल दुःख होते की, जेव्हा मी शूर व निधड्या छातीच्या पाटीदार[3] व ठाकूरांकडे[4] गेलो, तेव्हा सैन्यात दाखल होण्याला फारच थोडेजण पुढे आले. त्याचे कारण सरकार त्यांना आवडत नव्हते किंवा सरकारवर त्यांचा विश्वास नव्हता असे नाही; पण त्यांच्यात आवश्यक ते धैर्यच नव्हते. तुम्ही मरायला तयार नव्हता. सरकारकरता किंवा दुसऱ्या कोणाकरता मरणे तुम्हांला आवडत नव्हते; पण आता काळ बदलला आहे. मी आता सरकारला विरोध करीत आहे; सरकारकरता शिपाईगिरी करणे हा मी अधर्म मानतो; सरकारवरील माझा सर्व विश्वास आता नष्ट झाला आहे. त्या वेळी ह्या सरकारला मी सैतानी म्हणत नव्हतो, पण आज मी या राज्यकारभाराला सैतानी-राज्य किंवा रावण-राज्य म्हणत आहे. ज्या अतुल श्रद्धेने मी खेडा जिल्ह्यात पायाने भ्रमण केले आणि जी माझी असलेली शक्ती मी सरकारकरता वापरली, तीच माझी शक्ती, जी माझ्या उदात्त वारशाचा अंश आहे, ती मी सरकारविरुद्ध आता वापरत आहे. कारण सत्याग्रह म्हणजे जे न्याय्य असेल ते करणे.

[गुजरातीवरून]

'नवजीवन', १-५-१९२१

१. गुजरातमधील दौऱ्याचे नवजीवनमध्ये प्रसिद्ध झालेल्या उताऱ्यावरून हे व यापुढील भाषणांचे अहवाल घेतले आहेत.

२. पाहा खंड १४.

३ व ४. गुजरातमधील खेडा जिल्ह्यात बहुसंख्य असलेल्या जातींची नावे.

२. बोरसद सभेतील भाषण

एप्रिल १५, १९२१

मी जेव्हा पूर्वी बोरसदला[1] भेट दिली, तेव्हा माझा उद्देश सफल झाला नव्हता, पण आता येथे जागृती झाली आहे. जागृतीचे पहिले लक्षण असे आहे की, सभा भरविण्याची व मिरवणुकीवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती आपल्यात वाढली पाहिजे. त्याला शिक्षण लागते. ज्याप्रमाणे आगीचा किंवा धबधब्याचा उपयोग कौशल्यपूर्ण नियंत्रणाशिवाय करता येत नाही, त्याप्रमाणे शिस्तीशिवाय जागृती निरुपयोगी ठरते. जागृतीचे पहिले लक्षण म्हणजे आपण कोठेही असलो तरी आपल्याला कर्तव्याची जाणीव झाली पाहिजे.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', १-५-१९२१

३. हालोल तालुका परिषदेतील भाषण[2]

एप्रिल १६, १९२१

माझ्याकरता, फक्त खादीचीच मानचिन्हे, बक्षिसे व पदके असू शकतील. जी वस्तू मला देण्यात आली आहे, ती स्वराज्याची द्योतक नाही. आपल्याला आजच्या आज स्वराज्य का मिळत नाही याचे कारण यात दिसून येते. जो स्वतःला शेतकरी, विणकर व आता भंगी म्हणवितो त्याला तुम्ही अध्यक्ष म्हणून निवडला आहे आणि त्याला तुम्ही ही थैली दिली आहे! या थैलीत कागदाचे [चलनी नोटांचे] किंवा सोन्या-चांदीचे वजन नाही. तुम्ही मला मोकळी थैली दिली आहे; आणि त्याहीपेक्षा

१. १९१८ च्या उन्हाळ्यात खेडा सत्याग्रहाच्या वेळी; पाहा खंड १४.
२. गुजरातच्या पंचमहाल जिल्ह्यात गांधीजी त्या परिषदेचे अध्यक्ष होते.

अधिक गुन्हा म्हणजे ती थैली परदेशी मालाची बनवली आहे.[1] तिचा रंग परदेशी आहे, सूत परदेशी आहे, रेशमी दोरा परदेशी आहे. मग त्यात काय स्वदेशी आहे ? मी स्वदेशी चळवळीचा नेता म्हणून म्हणवितो आणि मला स्वदेशी काय व स्वदेशी काय नाही हे समजले पाहिजे. माझ्या स्वदेशीच्या व्याख्येची गंमत अशी आहे की, त्या स्वदेशीचे अनुकरण आपण केले तर आपल्यावर कोणी मात करणार नाही. जे हालोलमध्ये बनले असेल ते हालोलचे स्वदेशी. हिंदुस्थानात इतरत्र जे काय बनले असेल त्याचा हालोलने स्वीकार करू नये. आपण सर्वजण स्वयंपूर्ण झाले पाहिजे व पहिला दर्जा प्राप्त करण्याकरता चढाओढ केली पाहिजे. या बाबतीत अधिक जोमाने जेव्हा आपण एकमेकांशी स्पर्धा करू त्याच वेळी आपल्याला स्वराज्य मिळेल. स्वराज्याची ही किल्ली आहे.

या गावात केलेली सजावट मला पाहणे सहन होत नाही. त्यात एक इंचसुद्धा विलायती कापड वापरता कामा नये. त्याऐवजी येथे चोहोकडे विलायती कापड टांगले आहे. सारी निशाणे आणि पताका विलायती मालाच्या आहेत. त्यांचे रंगही परदेशी आहेत. म्हणून हे समजून घ्या की, ही सारी सजावट चिंध्यांपेक्षा अधिक चांगली नाही. ज्या अर्थी सजावट ही पाहुण्याकरिता केली जाते, त्या अर्थी मला जे आवडेल ते तुम्ही करावयास पाहिजे होते. निदान माझ्याबद्दल असलेले सौजन्य आणि आदर यामुळे तरी तुम्ही तसे करावयास पाहिजे होते. जर आपण प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक आणि समजूतदारपणाने केली तरच आपण स्वराज्याच्या दिशेने प्रगती करू. जे स्वयंसेवक आपण इकडेतिकडे हालचाल करताना पाहात आहोत, त्यांचे कपडे डक कापडाच्या इंग्रजी पद्धतीच्या कोट व विजारीचे आहेत. स्वराज्याच्या कार्यात असणाऱ्या स्वयंसेवकांनी डक कापड वापरावे हे किती मूर्खपणाचे आहे ! जर तुम्हांला नवी खादी घेण्याची ऐपत नसेल तर मी तुमच्या डक कापडाऐवजी तुम्हांला खादी देण्यास तयार आहे. जर तुम्हांला माझ्याजवळून खादी घेण्यास संकोच वाटत असला तर तुम्ही स्वयंसेवकांचे काम करताना नुसता पंचा गुंडाळा, असा माझा तुम्हांला सल्ला आहे. इंग्लिश माणसासारखे कपडे करूनच सेवा करता येते असे नाही. तुम्ही आपल्या प्रेमाने आणि चांगल्या वर्तणुकीने लोकांवर छाप पाडली पाहिजे. जर तुम्ही तशी छाप इंग्रजी विजारी घालून पाडणार असलात, तर ती कल्पनाच अजिबात सोडून द्या. जे आपण हिंदी लोक स्वराज्य मिळविण्याकरिता बाहेर पडलो आहोत, त्या आपण लोकांनी निदान आपली प्रतिष्ठा राखण्याकरिता हा पोषाख टाकून दिला पाहिजे. स्वयंसेवकांनी दररोज दोन तास सूत काढावे, असा माझा त्यांना व्यक्तिशः सल्ला आहे. जेव्हा तुम्ही स्वतः सूत काताल,

१. सभेतला एकजण गांधींना अडवून म्हणाला, ती स्वदेशी आहे. पुढील वक्तव्य त्याला उत्तरादाखल आहे.

त्या सुताचे कापड विणून घ्याल आणि ते कापड अंगावर घालाल तेव्हाच तुम्ही खरे स्वयंसेवक व्हाल.

आपल्या स्वराज्याच्या सैन्यात लहान मुले व मुली जितके परिणामकारक कार्य करतील तितके मोठी माणसे करणार नाहीत. मोठी माणसे फसवेगिरी, ढोंग आणि गर्व यांत डुंबलेली आहेत. जर ह्या गोष्टी नाहीशा होतील तर आजच आपण स्वराज्य मिळवू. जरी आपण वयाने वाढलो असलो तरी मौलाना शौकत[1] अलीप्रमाणे निरागस असलो पाहिजे. या माणसाचे मन एखाद्या मुलाप्रमाणे शुद्ध व कोवळे आहे. ते कोणाचेही वाईट इच्छीत नाहीत. ते फक्त देवाला भितात. त्यांच्यापासून निरागसता शिका. मी सतत प्रयत्न करून निरागसता वाढविली आहे. मी एका वेळी एकेक गोटा टाकून हा बांध रचला आहे, व थेंबाथेंबाने तळे भरले आहे; तथापि ते अद्याप पुरे भरले नाही. मौलाना शौकत अली यांनी विलासात जीवन घालविले आहे आणि तरी त्यांच्यात या क्षणी वधस्तंभावर चढण्याची ताकद आहे. मला खादीत मौज वाटते आणि रेशमाच्या स्पर्शाने माझ्या शरीराला शिरशिरी येते, उलट शौकत अलींना मलमल व रेशीम यांबद्दल प्रेम वाटते. तथापि जेव्हा ते खादी वापरतात तेव्हा तो एक चमत्कारच समजला पाहिजे. त्यांनी इस्लामकरिता फकीराच्या जीवनातील कष्टांना मिठी मारली आहे.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, १-५-१९२१

४. हालोलच्या[2] शेतकरी सभेत भाषण

एप्रिल १६, १९२१

खास तुम्हांला धान्य पिकविण्याकरिता खत लागते. तर मग तुम्ही भंग्यांचा तिरस्कार का करता ? आपल्याला या जगात सत्ययुग आणावयाचे आहे. ते आकाशातून

१. १८७३ ते १९३८; राष्ट्रीय राजकीय मुसलमान; खिलाफत चळवळीत प्रमुखत्वाने भाग घेतला.

२. तालुका परिषदेला आलेल्या शेतकऱ्यांना गांधींचे भाषण ऐकण्याची संधी मिळाली नाही, म्हणून त्यांच्याकरिता संध्याकाळी स्वतंत्र सभा घेण्यात आली.

पडणार नाही. आपल्या सत्कृत्यांनी आपल्याला त्याला प्रविष्ट करावयाचे आहे. म्हणून सर्व व्यसने आपण सोडून दिली पाहिजेत. ज्या मनुष्याला दारू, ताडी, गांजा, अफू आणि इतर गोष्टींनी उन्माद येतो, त्याला शेतीसारख्या अमूल्य गोष्टीची काळजी कशी घेता येईल? तुम्हीच खरोखर जमिनीचे रक्षणकर्ते आहात, जगाचे अन्न उत्पन्न करणारे आहात. अलीकडे मी सरकारला चोर, राक्षस अशी विशेषणे लावीत असतो. जर तुम्ही शेतकरी लोकांना लुटू लागलात तर कोणत्या शब्दांनी मी तुमचे वर्णन करावे? जर तुम्ही तुमचा परंपरागत चांगुलपणा, तुमचा शूरपणा, तुमची सत्यनिष्ठा टाकून द्याल आणि जर तुम्ही, जगाच्या पितृस्थानी असणाऱ्या तुम्ही, लोकांचा छळ केला तर ते समुद्राला आग लागल्यासारखे होईल. ज्या मला वकिलीचा धंदा आवडेनासा झाला आहे आणि जो मी स्वतःला विणकर आणि भंगी असे म्हणवून घेत आहे, त्या माझ्यासारख्या माणसाने तशा स्थितीत कोणाकडे पाहावे? पण तुम्ही चांगले आहात अशी माझी खात्री आहे आणि म्हणून मी शेतकरी झालो आहे. मृत्यू ही शेतकऱ्याची उशी आहे. तो आपल्या डोक्याखाली मृत्यूला घेऊन झोपतो. त्यांना कोण घाबरविणार? खरोखर तुम्ही राजे आहात. आणि तसेच तुम्ही मला राहावयास लावले पाहिजे आहे. जो राजा आपल्या प्रजेला लुबाडतो तो पाप करतो. म्हणून तुम्ही आपल्या जीवनात चांगले व्हा.

जा आणि या शेतकरी गांधीचा संदेश दुसऱ्या शेतकऱ्यांना द्या की, गांधींनी तुम्ही चोरी करू नका व जुगार खेळू नका असे सांगितले आहे. त्यांचे कर्तव्य धान्य पिकविणे आणि वाजवी दराने विकणे हे आहे. त्यांनी तोट्यात विकू नये; पण शेतकऱ्यांनी एखाद्या चिक्कू व्यापाऱ्याप्रमाणे अवास्तव मोठा नफाही घेणे योग्य नाही. जर शेतकरी यापासून स्वतःचा बचाव करू शकतील, तरच त्यांना हा आपला व्यवसाय योग्य प्रकारचा आहे असे आढळून येईल. सक्तीने कोणाचीही मजुरी करू नका. तुम्ही तुमच्या शेतावर गुलाम म्हणून राबणार आहात किंवा सरकारकरिता आणि त्यांच्या अप्रामाणिक अधिकाऱ्यांच्याकरिता राबणार आहात? त्यांना सांगा की, तुम्ही गुलाम नसून शेतकरी आहात.

तुम्ही व्यसनातून मुक्त व्हा आणि आत्मसंयमन शिका. सकाळी उठताच देवाची प्रार्थना करा आणि नंतर कामावर जा. संध्याकाळी बैल सोडल्यानंतर गलिच्छ भाषा बोलण्याला सुरुवात करणे किंवा अश्लील गाणी गाणे हे चांगले नाही. संध्याकाळी उशीरा भजने म्हणा किंवा देवाच्या स्तुतिपर कीर्तनात सामील व्हा. अलीकडे पाऊस पडत नाही, त्याचे कारण राजा पापी झाला आहे आणि त्याची प्रजाही तशीच झाली आहे. देव आपला समूळ नायनाट करीत नाही, कारण त्याला आपली परीक्षा घ्यावयाची आहे. म्हणून तुम्ही तुमच्या जीवनात सदाचारी व्हा, व्यसने टाका, भजन व कीर्तनामध्ये काळ घालवा; तसे केले तरच तुम्हांला पाहिजे असलेला पाऊस पडेल.

[गुजरातीवरून]

'नवजीवन', १-५-१९२१

५. टिपणे

भाषा व विचार

विचाराचे वाहन म्हणून भाषा ही फार क्वचित यशस्वी ठरते. पुष्कळ वेळा ती विचारांना दडवूनच ठेवते. भाषा ही नेहमी विचारांना वेढून टाकते. म्हणून खास करून जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्याच्या भाषेचे भाषांतर करते तेव्हा भाषांतर करणाऱ्यांना आणि वृत्तपत्रव्यवसाय करणारांना किती अडचणी अनुभवाव्या लागतात व किती हास्यास्पद चुका आपण करतो हे त्यांनाच ठाऊक असते. आम्ही अशा अडचणीत वारंवार सापडलो आहोत. आम्ही वामनराव जोशी यांची कैफियत[१] जाड ठशात मुख पृष्ठावर प्रसिद्ध केली. जेव्हा आम्ही त्याचे छापील भाषांतर वाचले तेव्हा आमची आम्हांलाच लाज वाटली. या वीर पुरुषावर किंवा वाचकांवर आम्ही अन्याय केला असे आम्हांला वाटले. ज्या कल्पना आणि जी पद्धती प्रचारात यावी अशी आमची इच्छा होती त्याच्याविरुद्ध तो त्यांचा संदेश जातो आहे असे वाटले. आम्ही छापलेले भाषांतर इंग्रजीवरून केले. श्री. वामनरावांचा मूळचा संदेश हा अर्थातच मराठीत होता; आमच्या भाषांतरात जो आक्षेपार्ह भाग होता तो मूळात बिलकूल नव्हता. 'आपली अब्रू चव्हाट्यावर आणणे हा आमचा धंदा नाही' असा विचार वामनरावांच्या[२] अंगी चिकटविला. आपली स्वतःची अब्रू उघड करण्यास आपण सतत सिद्ध असणे यातच आपले धैर्य आहे. श्री. वामनराव यांना लोकांची अब्रू स्वतः धैर्य दाखवून झाकून ठेवावयाची आहे. आणि ती अब्रू उघडकीस न आणता तशीच सोडून द्यावयाची नाही. लोकांची अब्रू झाकून ठेवल्यामुळे लोक नामर्द होतात. एखादा रोग लपवून ठेवला म्हणजे तो जसा वाढतो तसे हे आहे. जर एक हिंदी माणूस दुसऱ्या हिंदी माणसाला पकडत असला आणि तिसरा हिंदी माणूस त्याला शिक्षा करीत असला तर त्यात लाज वाटण्यासारखे काही नाही. त्या प्रसंगातच काही तरी लाज वाटण्यासारखे असू शकेल. तथापि

१. 'नवजीवनमध्ये १४-४-१९२१ रोजी, जोशी यांना राजद्रोहाच्या गुन्ह्याकरिता पकडले होते व त्यांनी स्वतःचा बचाव करण्याचे नाकारले.

२. जोशी यांचे मत असे होते की, आपले कर्तव्य म्हणजे परक्याची दुष्कृत्ये उघडकीस आणणे हे असून स्वतःची अब्रू चव्हाट्यावर मांडणे हे नव्हे. त्यावरून त्यांना असे सुचवावयाचे होते की, आपण बचाव केल्याने तसे करणार आहोत. त्यांच्या मताप्रमाणे एका हिंदी माणसाला दुसऱ्या हिंदी माणसाने पकडावे व तिसऱ्या हिंदी माणसाने त्याला शिक्षा करावी यापेक्षा अधिक लाजीरवाणी गोष्ट दुसरी कोणतीही नाही.

जेव्हा स्वराज्य स्थापन होईल तेव्हा हिंदी पोलिस गुन्हा करणाऱ्या हिंदी माणसाला पकडील आणि त्याला हिंदी न्यायाधीश सजा करील. त्यात लाज वाटण्यासारखे काहीही असणार नाही. वास्तविकपणे ती एक मामुली गोष्ट होईल आणि तशीच ती समजली जाईल. श्री. वामनराव यांनी सध्याच्या परिस्थितीला अनुलक्षून आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. अनेक पातकांना कारणीभूत होणारे जे पोट आहे, त्याच्याकरिता सरकारची नोकरी करणारा हिंदी माणूस, दुसऱ्या एका निरपराधी हिंदी माणसाला पकडतो, आणि पकडण्यात आलेल्या पहिल्या हिंदी माणसाच्या परिस्थितीत असलेला न्यायाधीश, त्याला सजा करितो, ही आपली लाजिरवाणी स्थिती त्यांनी दाखविली आहे व उघडकीस आणली आहे. पण आम्हांला हा सर्व अर्थ आमच्या भाषांतरात स्पष्ट करता आला नाही याचे दुःख होते. तथापि अशा चुका अपरिहार्य आहेत या विचाराने आम्ही आपले समाधान करून घेत आहोत. आपले विचार व्यक्त करण्याकरिता भाषा, विशेषतः भाषांतराकरिता योजलेली भाषा ही किती अपुरी होते हे यावरून दिसून येते. वास्तविकपणे खरोखरीचे भाषण हे बोलण्यात नसून कृतीत असते. ज्याप्रमाणे कृतीत विचार व्यक्त होतात, तसे विचार भाषणाच्या द्वारा कसे व्यक्त होऊ शकतील ? आपण सर्वजण श्री. वामनराव हे जशी कृती करीत आहेत तशी करू या. आणि त्यांचा संदेश त्यांच्या त्यागात, त्यांच्या शौर्यात, त्यांच्या निर्भयतेत, त्यांच्या साधेपणात व त्यांच्या नम्रतेत ग्रहण करू या.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १७-४-१९२१

६. नरसिंहराव दिवेटिया[1] यांना पत्र

गोध्रा
सोमवार, एप्रिल १८, १९२१

प्रिय मित्र,

तुमच्या प्रकट पत्राला मी दिलेल्या उत्तरात[2] श्री. दयाराम गिडुमल यांचा जो मी उल्लेख केला त्यामुळे तुम्हांला फार दुःख झाले असे मला महादेवने सांगितले. तुम्हांला दुःख व्हावे म्हणून मी माझे अभिप्राय व्यक्त केले नव्हते. ते अभिप्राय व्यक्त करण्यात माझा हेतू तुमच्याबद्दल आणि ह्या रामजींबद्दल आदर दाखवावा आणि जग काहीही म्हणत असले तरी लोकांना असे सांगावे की, तुम्ही दोघेही शुद्ध अंतःकरणाचे आहात. तथापि जर तुमच्या भावना दुखविल्या असतील तर तुमच्या इच्छेप्रमाणे मी दुरुस्ती करण्यास तयार आहे. तुम्हांला क्लेश देण्याचा माझा हेतू कधी तरी असेल का ?

मला असेही समजले आहे की, मी पटेल[3] यांना भेटू शकलो, पण तुम्हांला अद्याप भेटू शकलो नाही यामुळे तुम्ही रागावला आहात. मी आत्मसमर्थन कसे करू शकेन ? तुमची भेट म्हणजे एक तीर्थयात्राच आहे. मी पटेलांच्याकडे काही कामाकरिता गेलो होतो. त्यानंतर मला वेळ मिळाला तर मी तुमच्याकडे शांतपणे भेटावयास यावे असे मला वाटले. प्रस्तुत उदाहरणाप्रमाणे माझी पुष्कळशी लाडकी स्वप्ने अपुरीच राहिली आहेत. मी तुमचा जाणूनबुजून उपमर्द केला नाही. या माझ्या शब्दांवर विश्वास ठेवून तुम्ही मला क्षमा करणार नाही का ?

मोहनदास यांचा वंदेमातरम्

[गुजरातीवरून]
नरसिंहरावांची रोजनिशी.

१. (१८५९–१९३७); गुजराती कवी व साहित्यिक; मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधील गुजरातीचे प्रोफेसर.

२. पाहा. खंड १९, प्रकरण ९७.

३. बहुतकरून विठ्ठलभाई पटेल.

७. गोध्रा येथील सभेतील भाषण

एप्रिल १८, १९२१

या साम्राज्यांचे, या सरकाराचे, आपण जे भंगी झालो आहोत त्याचे मुख्य कारण म्हणजे, आपल्यातील जे वैष्णव आणि शैव स्वतःला जुने सनातनी म्हणवितात ते भंग्यांशी पशूप्रमाणे वागतात व त्यांचा छळ करतात. भंगी हे आपले रक्तामांसाचे आहेत, आपले सख्खे बंधू आहेत. आपण त्यांची सेवा घेतो आणि त्यांना भरपूर वेतन देत नाही; त्यामुळे त्यांना आपण दिलेल्या आपल्या पानातील उष्टे खावे लागते आणि मृतमांस खाणे त्यांना भाग पडते. सेवेबद्दल म्हणावयाचे म्हणजे, एखादा वकील, डॉक्टर किंवा कलेक्टर हा भंग्यापेक्षा समाजाची यत्किंचित अधिक सेवा करीत आहे असे मला वाटत नाही. या सर्वांपेक्षा भंग्यांची सेवा अधिक श्रेष्ठ प्रतीची आहे. भंग्यांनी आपले काम थांबविले तर समाजाची अवस्था काय होईल? अंत्यजांच्या बाबतीत आपण जे पातक केले आहे त्या पातकाची शिक्षाही आपल्याला संकटरूपाने आज भोगावी लागत आहे. आपल्या पातकाची शिक्षा ही मुसलमानांनाही भोगावी लागते; त्याचे कारण ते आपले शेजारी आहेत. पुष्कळसे हिंदू भंग्याशी संपर्क टाळण्याकरिता शास्त्राचे आधार देत असतात. मी तुम्हांला सांगतो की, जर एखादे शास्त्र, भंग्याला शिवण्यात पाप आहे असे म्हणत असेल तर ते शास्त्र नाही. कोणतेही शास्त्र समजण्याला बुद्धीच्या शक्तीपलीकडे असू शकणार नाही. ते सत्याची उपेक्षा करणार नाही. बाकीच्या बाबतीत शास्त्राचा अर्थ कोणीही आपल्या इच्छेप्रमाणे लावावा. आपण शास्त्राच्या नावाने काय करीत नाही? शास्त्राच्या नावाने भिकारी लोक भांग पितात आणि गांजा ओढतात. शास्त्राच्या नावाखाली काही देवीचे उपासक मांस खातात व दारू पितात. आणि असंख्य लोक अनैतिक वर्तन करतात. शास्त्राच्या नावाने मद्रास प्रांतात कोवळ्या वयाच्या मुलींना वेश्या होण्यास भाग पाडतात. यापेक्षा शास्त्राची आणखी विटंबना कोणती असू शकेल? मी स्वतःला सनातनी वैष्णव म्हणवितो. माझा वर्णाश्रमावर विश्वास आहे. पण मी तुम्हांला सांगतो की, भंग्याला शिवून मनुष्य विटाळतो ही कल्पना म्हणजे हिंदू धर्मावरील बांडगूळ आहे; ती त्या धर्मावर साठलेली एक घाण आहे.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, १-५-१९२१

८. सुरत नगरपालिकेच्या मानपत्राला उत्तर

एप्रिल १९, १९२१.

मला हे सांगितले पाहिजे की, ज्याप्रमाणे प्रत्येक मनुष्य पक्वान्न खाऊ शकत नाही किंवा पचवू शकत नाही त्याचप्रमाणे माझ्यावर अपरंपार स्तुतींचा जो वर्षाव तुम्ही केला आहे तो मला पचविता येईल किंवा नाही हे सांगवत नाही. कदाचित एखाद्या दिवशी मी त्यांना पात्रही होईन. त्या दिशेने मी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. असत्याला सत्याने जिंकावे आणि रागाला रागाने प्रत्युत्तर देऊ नये; याकरिता मी प्रयत्न करीत आहे. आणि त्या प्रयत्नात जीवनही समर्पण करावे अशी माझी इच्छा आहे. पण सध्या जी विशेषणे तुम्ही मला लावली आहेत ती अस्थानी आहेत. पण जर ती विशेषणे ऐकून मी बेदर्वा झालो किंवा उर्मट झालो किंवा लोकांनी ती विशेषणे मला लावली आहेत म्हणून आत्मसंतुष्ट होऊन मी त्यांना पात्र आहेच असे धरून चाललो तर तात्काळ माझ्या अधःपाताला सुरुवात होईल. इतर प्रत्येक गोष्टीपेक्षा माझा प्रयत्न असा असावा की, मी माझी नम्रता टिकवावी आणि शिष्टाचाराच्या मर्यादा मी उल्लंघन करीत नाही ना याकडे लक्ष द्यावे. अशा प्रकारच्या जागरूकतेने काम करीत राहणे यातच माझे व देशाचे कल्याण आहे.

तुम्ही जे मला स्वागतपर मानपत्र दिले आहे त्यावरून देशात किती विलक्षण जागृती झाली आहे याचे प्रत्यंतर येते. त्याचा अर्थ इतकाच की, नगरपालिकेला आपल्या कर्तव्याची जाणीव आहे. मला देशाचे पुष्कळसे काम नगरपालिकांकडून करवून घ्यावयाचे आहे. आणि याच कारणाकरिता काँग्रेसच्या[१] गेल्या दोन अधिवेशनांत जे ठराव झाले त्यांत नगरपालिकांना असहकारितेच्या चळवळीत भाग घेण्यास सांगितले गेले नाही. नगरपालिका जशा आहेत त्यामुळे त्यांना सहकार्याचा काही भाग पत्करावाच लागतो. पण सध्या आपली अशी एकही गोष्ट नाही की, जी सहकार्यापासून मुक्त आहे. गव्हाचा एक दाणा खाण्यातसुद्धा सहकारिता आहे. ज्या असहकारितेचा सांप्रत आपण उपयोग करीत आहोत तिचे वजन इतके हलके आहे की, एखादे मूलसुद्धा तो भार उचलू शकेल. जर आपण तीव्र स्वरूपाची असहकारिता करू शकलो तर तीमध्ये इतकी विलक्षण शक्ती आहे की, आपण एका दिवसात स्वराज्य मिळवू शकू. पण मी देशापुढे अगदी साध्या प्रकारची असहकारिता ठेवण्याची खबरदारी घेतली आहे. देशात ती

१. सप्टेंबर १९२० कलकत्ता काँग्रेस व डिसेंबर १९२० नागपूर काँग्रेस.

असहकारिता अमलात आणण्यास पुरेशी शक्ती आहे आणि प्रत्येक नगरपालिकेला तीमध्ये सामील होता येईल. देशातील नगरपालिकांनी जर हे समजून घेतले आणि करता येईल त्या कामाची संघटना केली तर स्वराज्य संपादन करणे सोपे होईल.

नगरपालिका काय करू शकतील यासंबंधी मला एवढेच म्हणावयाचे आहे की, काँग्रेसच्या सल्ल्याप्रमाणे वागण्याचा आपण प्रयत्न करू असे जे वचन तुम्ही दिले आहे, ते तुम्ही पाळा. अस्पृश्यता निवारण्याकरिता तुम्ही कटिबद्ध व्हा. मी याचा प्रथम उल्लेख केला व चरखा बाजूला ठेवला. चरख्यावर आपण आपले सर्व प्रयत्न एकत्रित केले पाहिजे हे प्रचंड कार्य आपल्यापुढे आहे. याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे काम जे हिंदूंना करावयाचे आहे ते म्हणजे, अस्पृश्यतेचा यत्किंचितही मागमूस राहणार नाही याची दक्षता घेणे हे होय. चरख्याच्या चळवळींत आपल्याला काम करावयाचे आहे. पण त्या कामात आपल्याला मनोवृत्तीत परिवर्तन घडवून आणावयाचे आहे.

काल रात्री मी गोध्र्यातील भंगी वस्तीमध्ये गेलो होतो. तेथील परिस्थितीच्या देखाव्याने मला वेदना झाल्या. हिंदू लोक तीक्ष्ण नजरेचे असताना देखील जे उघड्या डोळ्याला दिसते ते त्यांना का दिसत नाही याचे मला आश्चर्य वाटते. आपल्या पाठीला काळपुळी झाली आहे हे त्यांना का समजत नाही याचेही मला आश्चर्य वाटते.

तुम्हांला जे निवडून दिले आहे ते शहरातला कचरा साफ करावा, लोकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, मुलांच्या शिक्षणाची सोय करावी आणि रोगांना प्रतिबंध करावा याकरिता निवडून दिले आहे. भंग्यांचा दर्जा वाढवूनच तुम्हांला हे करता येईल. इंग्लंडने स्वतःचे हित साधण्याकरता आपण बेल्जमसारख्या लहान राष्ट्रांच्याकरिता युद्ध करीत आहोत, असे ज्याप्रमाणे ढोंग केले त्याचप्रमाणे तुम्ही स्वतःचे खिसे भरण्याकरिता विचार करीत असलात तर स्वराज्याला काहीही अर्थ नाही.

मी या सरकारला सैतानी का म्हणतो ? त्यांनी तलवार जी उपसली आहे, ती दुर्बलांच्या रक्षणाकरिता नसून त्यांच्या भक्षणाकरिता आहे. आपल्या स्वराज्यात, आपल्या धर्मराज्यात एकच उद्देश असेल व तो म्हणजे दुर्बलांची सेवा. ज्या शुद्ध स्वराज्यात सर्वांना शीतल आश्रय मिळेल अशा स्वराज्याकरिता आपण जर तपश्चर्या केली, तरच आपल्याला खरे स्वराज्यवादी म्हणण्यात येईल.

अशा प्रकारे भंग्यांचा उद्धार हे तुमचे पहिले कर्तव्य आहे. त्यांचे रस्ते स्वच्छ असले पाहिजेत, त्यांची घरे नीटनेटकी असली पाहिजेत, त्यांना सोयिस्कर पाणीपुरवठा झाला पाहिजे. मी आता स्वतःला भंगी म्हणवितो. भंग्यांच्या वस्तीत काही काळ घालविल्यास व्यक्तिशः मला आनंद होतो. तीच खरोखर माझी करमणूक आहे. त्यांच्या मुलांना कुरवाळण्यात मला आनंद होतो. माझ्यासारख्या माणसाला जोपर्यंत भंगीवस्ती

अशी झाली नाही की, मला तेथे राहता येईल आणि आरोग्याचे नियम पाळता येतील तोपर्यंत नगरपालिकेने आपले कर्तव्य बजाविले असे म्हणता येणार नाही.

राष्ट्रीय शाळा याचा सध्याचा अर्थ असा की, ती कताईची शाळा असावी. कारण आपल्या शिक्षणाने आपल्याला जीवन धारण करण्यास आवश्यक असणारा पौष्टिक आहार दिला पाहिजे. आणि त्या आहाराने आपण स्वतंत्र व जोमाने ओजस्वी झाले पाहिजे. शिक्षणाबद्दलची माझी चूक मी दुरुस्त करीत आहे. सरकार जे शिक्षण देते, त्यापेक्षा जर अधिक चांगले शिक्षण देण्याचा आपण प्रयत्न केला नाही तर आपण खाली खाली जाऊ. जर आपल्याला आपल्या लोकांच्यात ताकद आणावयाची असेल तर चरखा हाच एक परिणामकारक उपाय आहे. शिक्षणाकरिता तो सोन्यासारख्या योजनेचा पाया आहे. शाळांमधून त्याला सुरुवात करा आणि नंतर त्या शाळा चालविण्याकरिता तुम्हांला भीक मागत हिंडावे लागणार नाही.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ५-५-१९२१

९. टिप्पणे

आकडे व त्यांचा अर्थ

कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाकरिता मी खाली एक तक्ता देत आहे. त्यात प्रत्येक काँग्रेस प्रांताची दशलक्षांत लोकसंख्या दिली आहे आणि टिळक स्मारक स्वराज्य फंडाकरिता[1] त्यांनी किती प्रमाणात पैसा जमा करावयाचा आहे हे हजारांच्या शेकड्यात सांगितले आहे.

१. नागपूरला २६ डिसेंबर १९२० रोजी जे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले त्यात अखिल भारतीय टिळक स्मारक स्वराज्य फंड स्थापन करावा असा ठराव झाला. ३१ मार्च १९२१ रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक बेझवाडा येथे भरली व तीत फंडाचे लक्ष्य १ कोटी रुपये ठरविण्यात आले. पाहा : खंड १९.

क्रमांक	प्रांत	दशलक्षात लोकसंख्या	हजारात वर्गणीचे प्रमाण
१	मद्रास	२०	६५०
२	आंध्र	२१	६८२
३	कर्नाटक	१२	३९०
४	केरळ	७	२२७
५	मुंबई	१	३२.५
६	महाराष्ट्र	१२	३९०
७	गुजरात	११	३५७
८	सिंध	४	१३०
९	संयुक्तप्रांत	४९	१५९२
१०	पंजाब	२७	८७७
११	वायव्य सरहद्दप्रांत	३	९७.५
१२	दिल्ली	१	३२.५
१३	अजमीर–मेरवाडा	१९	६१७
१४	मध्यप्रदेश (हिंदी)	९	२९२
१५	मध्यप्रदेश (मराठी)	३	९७.५
१६	वऱ्हाड	३	९७.५
१७	बिहार	२९	९४२
१८	उत्कल	२५	४८७
१९	बंगाल	४७	१५२७
२०	आसाम	४	१३०
२१	ब्रह्मदेश	१२	३९०

जी स्मृती आपल्याला कायम टिकवावयाची आहे आणि ज्याकरिता ही रक्कम आपल्याला पुरी करावयाची आहे, ती रक्कम साऱ्या हिंदुस्थानच्या दृष्टीने लहान असली, तरी ती रक्कम सतत व सर्वत्र प्रयत्न केल्याशिवाय गोळा होणार नाही. प्रत्येक प्रांताने आपल्याच हिश्श्याचा फक्त विचार केला व त्यात समाधान मानले तर तो पैसा गोळा न करण्याचा खात्रीचा मार्ग ठरेल. रक्कम गोळा करण्याचा अत्यंत खात्रीचा व अत्यंत जलद जर कोणता मार्ग असेल तर प्रत्येक व्यक्तीने व प्रत्येक प्रांताने सर्वच्या सर्व किंवा बहुतेक रक्कम गोळा करणे हा होय. मुंबईचे काही कोट्यधीश जर मनात आणतील तर एका दिवसात एक कोटी रुपये देऊ शकतील. मुंबईने आपला हिस्सा हिंदुस्थानच्या तोंडावर टाकला व ते संतुष्ट राहिले तर ते हास्यास्पद होईल. एकटी मुंबई सारा बोजा उचलू शकेल. मुंबईने साऱ्या हिंदुस्थानाला सतत असे वाटावयास लाविले आहे की आपण सार्वजनिक चळवळींना पैसा पुरवू शकतो. मुंबईने जालियनवालाबाग फंडात

फार मोठा वाटा उचलला. मुंबईने पंजाब काँग्रेस उपसमितीला भरभक्कम देणगी दिली. आर्थिक मदत देण्याच्या बाबतीत मुंबई इतर कोणत्याही प्रांतापेक्षा फार पुढे आहे. गुजरातने आपला साडेतीन लाखांपेक्षा अधिक असलेला हिस्सा देऊन टाकला व समाधान मानले तर ते तितकेच हास्यास्पद ठरेल. गुजरातला त्यापेक्षा अधिक रक्कम सहज गोळा करता येईल. पण संयुक्त प्रांत हा मागील अनुभवावरून भविष्यकाळाला मार्गदर्शन करणार असला तर निराशाच पदरी पडेल. त्यांच्यात श्रीमंत सार्वजनिक कार्यकर्ते नाहीत. जे पंडित नेहरू उदारहस्ताने पैसे देत असत त्यांनी वर्षाचे लक्षावधी[1] रुपये कमाविण्याचे थांबविले आहे. हिंदुस्थानचे सर्वांत मोठे याचक पंडित मालवीय[2] ते अद्याप या चळवळीला उपलब्ध झाले नाहीत. संयुक्त प्रांत आपला १६ लाख रुपयांचा हिस्सा पुरा करील अशी आशा करणे व्यर्थ आहे. तथापि जर या प्रांतातील ४,९०,००,००० लोकांना हालविले, जर मोठाले जमीनदार यात लक्ष घालू लागले तर सोळा लाख म्हणजे काय ! दारूचे पैसे जर वाचविले तर त्यातून सारा हिस्सा पुरा होईल. तेथे हरद्वार आणि वाराणशीतून पैसे गोळा करता येतील. या प्रसिद्ध क्षेत्री येणाऱ्या श्रीमंत यात्रेकरूंना टिळक स्वराज्य फंडाला पैसे द्या असे सांगण्याकरिता कार्यकर्ते सहज उपलब्ध होतील. त्यांच्यात विश्वास पाहिजे आणि त्या विश्वासातून निर्माण होणारे धैर्य पाहिजे. तशीच स्थिती बंगालची आहे. बंगालमध्ये पुष्कळ श्रीमंत माणसे आहेत. पण बंगाल अजूनपर्यंत देशभक्तिपर कार्याला पैसा देण्याकरिता चमकला नाही. श्री. दास[3] यांना नवीन जमीन खणली पाहिजे. मारवाड्यांच्या आणि कलकत्त्यात स्थायिक झालेल्या गुजराथ्यांच्या मदतीने बंगालला काही अडचण भासणार नाही. अजमीर–मेरवाड्याला आपल्या हिश्याची सहा लाख रुपयांवरील रक्कम जमा करताना फार कष्ट पडणार आहेत. त्यांना निरनिराळ्या संस्थानांत काम करावे लागेल. कदाचित त्यांची स्थिती सर्वांत कठीण होणार आहे. अजमीरचे नाव हे मुसलमानांना मोहित करणारे आहे. जे हजारो मुसलमान अजमीर शरीफला भेट देतात त्यांना टिळक स्वराज्य फंडाकरिता सुंदर रक्कम देता येईल. प्रत्येक कार्यकर्त्याला हे समजले पाहिजे की, दवडावयाला एक क्षणही उरला नाही. प्रत्येक प्रांताच्या प्रमुखांना त्यांनी जमविलेल्या रकमांची साप्ताहिक टिपणे प्रसिद्धीकरता पाठवावीत असे मी पाचारण करीत आहे. पद्धतशीरपणे बरोबर वर्गणी गोळा केली पाहिजे. गुजरातने

१. मोतिलाल नेहरूंनी वकिलीचा धंदा सोडला व ते सार्वजनिक कार्यात पडले.

२. मदन मोहन मालवीय (१८६१–१९४६). अध्यक्ष हिंदी राष्ट्रीय काँग्रेस १९०९ व १९१८. १९१६ साली बनारस हिंदू विद्यापीठ स्थापन केले व त्या विद्यापीठाचे कुलगुरू १९१९–१९४० पर्यंत होते; सभासद इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल १९१०-१९२०, लंडनला १९३१-३२ गोलमेज परिषदेला हजर होते.

३. चित्तरंजन दास. (१८७०–१९२५); १९२२ साली काँग्रेसचे अध्यक्ष. १९२३ साली स्वराज्य पक्ष स्थापन केला.

पंजाबचे अनुकरण केले आहे. त्याने रंगीत गुळगुळीत कागदावर पावत्या छापल्या आहेत व त्यावर एका कोपऱ्यात मृतदेशभक्तांचे सुंदर चित्र छापले आहे. उरलेल्या पावतीवर हिंदुस्थानचा नकाशा शोभिवंत दिसत आहे. मागच्या बाजूला स्वराज्याच्या दहा अटी छापल्या आहेत. पावतीची पोच गुजराती, देवनागरी आणि उर्दू लिप्यांत दिली आहे. एक रुपया, पाच रुपये व दहा रुपयांच्या पावत्या त्यांनी काढल्या आहेत. पंजाबने चालू महिन्याच्या १२ तारखेपर्यंत १,८५,००० रुपये जमा केले आहेत. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने जो कार्यक्रम[१] देशापुढे ठेवला आहे तो कार्यक्रम धंदेवाईक लोकांना फारच सोपा आहे. जे स्वप्नसाम्राज्यात वावरतात किंवा व्यासपीठावर व्याख्यान-बाजी करतात अशांना हे काम करणे अशक्यच आहे. जे स्वराज्याचे कार्यकर्ते आहेत त्यांनी धंदेविषयक सवयी वाढविल्याशिवाय हिंदुस्थानला स्वराज्य स्थापन करता येणार नाही.

दुखावलेला डोळा

या अंकाच्या स्तंभात अहमदाबादमध्ये जी मितपानाची चळवळ चालली आहे तिच्याकडे त्या चळवळीतील आत्मसंयमनाकडे लक्ष वेधण्यात आले होते. डॉ. कानुगा यांना एका अज्ञाताने मारलेल्या दगडाने डोळ्याला इतकी गंभीर दुखापत झाली की, त्यामुळे तो डोळा गेलाच असता. त्यांना काही दिवस निजवून ठेवावे लागले. दुखापतीला न जुमानता ते बरे होईपर्यंत चांगले तग धरू शकले. दुसरे निरोधक आपापल्या जागी निरोधन करीत राहिले. कोठेही धास्ती नव्हती. स्वाभाविकपणेच कोठलीही तक्रार आली नाही. विजेसारखा परिणाम झाला. पिणारे लोक हतबुद्ध झाले. प्रतिकाराच्या अभावामुळे दगड मारण्यातील जोर गेला आणि मला असे समजते की, त्या प्रकारा-नंतर दगड मारणेच बंद झाले. जे दारूच्या दुकानात जात होते, त्यांच्यावरही तितकाच मोठा परिणाम झाला. अनत्याचार व त्याचे तात्कालिक परिणाम याच्या उत्तम उदाहरणांपैकी हे एक उदाहरण मी मानतो. जर डॉ. कानुगा यांनी पोलिसांकडे तक्रार केली असती किंवा त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रतिकार केला असता तर मुद्द्यांचा गोंधळच झाला असता. अनेक प्रकारचे गैरलागू मुद्दे उपस्थित करण्यात आले असते आणि नेहमीप्रमाणे पक्षात भावना भडकल्या असत्या आणि सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे, मितपानाच्या कार्याची पीछेहाट झाली असती. डॉ. कानुगांचे शौर्य, त्याग आणि आत्म-संयमन यांनी, त्यांनी ज्याकरिता रक्त सांडले ते कार्य उंचावले आहे. त्यामुळे दारू-

१. टिळक स्वराज्य फंडाकरता रकमा जमविल्याशिवाय काँग्रेसने एक कोटी काँग्रेस सभासद नोंदवावेत आणि खेड्यांतून व शहरांतून वीस लक्ष चरखे सुरू करावेत असे सांगितले होते. ही उद्दिष्टे ज्यात अंतर्भूत केली होती त्याला काँग्रेसचा बेझवाडा कार्यक्रम असे म्हणण्यात आले होते. ती उद्दिष्टे ३० जून १९२१ पर्यंत गाठावयाची होती.

गुत्तेवाले आणि त्यांचे मित्र यांच्या विकार प्रदर्शनाला आळा बसला आहे आणि मितपानाच्या ह्या धर्मयुद्धाला फार वरच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे.

मॅजिस्ट्रेटचा लहरीपणा

हिंदुस्थानात ओड्वायरशाही[1] मेली नाही हे डेहराडूनच्या लष्कर हद्दीतील मॅजिस्ट्रेटने दाखवून दिले आहे. त्याने सत्याग्रहाच्या दिवशी लष्कर हद्दीतील दुकाने उघडलीच पाहिजेत असा हुकूम सोडला. जर आपला हुकूम मानला नाही तर दुकानदारांना तेथून हद्दपार केले जाण्याची शिक्षा भोगावी लागेल असे सांगण्यात आले. लोकांना अगदीच थोडी माहिती आहे की, लष्करी हद्दीतील मॅजिस्ट्रेट्सना जे अधिकार आहेत, ते अधिकार लष्करी कायद्याखाली अन्यत्र जे उपयोगात आणले जातात असेच आहेत. लष्करी हद्दीतील रहिवासी हे मॅजिस्ट्रेट्सच्या कृपेने जगतात. ज्या राज्यपद्धतीत लोकांचे स्वातंत्र्य दडपून टाकले जाते व त्यांना गुलाम केले जाते ती राज्यपद्धत लोकांनी इतका दीर्घकाल आणि धीमेपणाने कशी सहन केली हे आश्चर्य आहे.

संपादकीय बदल

मला वाचकांना कळविण्यास दुःख होते की, साहाय्यक संपादक म्हणून असलेले मि. लालचंद अडवानी यांना सेवामुक्त करण्यात आले असून त्यांचा यंग इंडियाशी कोणत्याही तऱ्हेचा संबंध उरलेला नाही. यंग इंडियाकरिता करावयाच्या पत्रव्यवहारावर यापुढे फक्त संपादक यंग इंडिया असे लिहावे.

'यंग इंडिया', २०-४-१९२१

१०. धुकी

ज्या ज्या वेळी माझे मित्र या चळवळीसंबंधी गैरसमज करतात, त्या त्या वेळी मी स्वतःशी एका प्रसिद्ध श्लोकातील शब्द पुटपुटतो : "जेव्हा धुके दूर होईल तेव्हा आम्ही एकमेकांना चांगले ओळखू." चालू महिन्याच्या १४ तारखेच्या सर्व्हेंट ऑफ

१. हा संदर्भ लष्करी कायद्याच्या १९१९ च्या सर मायकेल ओड्वायर लेफ्टनंट गव्हर्नर पंजाब यांच्या अंमलाला अनुलक्षून आहे. त्या अंमलात जालियनवाला बागेची कत्तल आणि छळाची इतर कृत्ये, सरकारी दडपशाही आणि पाशवी कृत्ये करण्यात आली.

इंडियामध्ये असहकारितेसंबंधी जे परिच्छेद आले आहेत, ते मला एका मित्राने नुकतेच पाठविले आहेत. ठराव आणि उद्देश स्पष्ट करून सांगणे हे एक निष्फळ काम आहे. हे वर्ष लवकरच निघून जाईल आणि आमच्या शब्दापेक्षा आमची कृत्ये असहकारितेचा अर्थ स्पष्ट करतील.

जोपर्यंत सरकार हिंदुस्थानविरुद्ध– मुसलमान आणि पंजाब्यांच्या विरुद्ध केलेल्या गुन्ह्यांचे परिमार्जन करीत नाही आणि जोपर्यंत राष्ट्राच्या इच्छेला अनुसरून राज्यपद्धत बदलत नाही, तोपर्यंत माझ्या दृष्टीने असहकारिता ही स्थगित झाली नाही आणि ती केव्हाही स्थगित होणार नाही. पदव्या, कोर्टे, शाळा आणि कायदेमंडळे यांच्या-संबंधी असलेले भ्रम दूर करणे हे खरोखर आवश्यक होते. या बाबींबद्दल राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनी एकूण औदार्याने प्रतिसाद दिला असे मला वाटते. त्यांच्यात पदव्या धारण करणारे कोणीही नाहीत. ज्या राष्ट्रीय वृत्तीच्या वकिलांनी आपली वकिली थांबविली नाही त्याला असहकारितावाद्यांत कसलाही सार्वजनिक दर्जा नाही. शाळा व कॉलेजातून अशी मुले व मुली पुढे आली आहेत की, जे स्वतःला धन्य म्हणवून घेत आहेत आणि जे मी धाडसाने म्हणतो की, त्यांच्या परीक्षेची वेळ आली म्हणजे आपल्या त्यागाने माणुसकीला प्रचंड हादरा देतील. जे कायदेमंडळात शिरण्या-पासून अलिप्त राहिले ते अशी सेवा करीत आहेत की, तशी सेवा त्यांना कौन्सिलात करता आली नसती. ज्यांना दृष्टी असेल त्यांना हे दिसून येईल. ज्या थोड्या लोकांनी पदव्या सोडल्या त्यांनी इतरांना मार्ग दाखविला. हे सर्वजण समाजामध्ये प्रभावीपणे काम करीत आहेत. आता या खास वर्गात तोंडाने प्रचार करण्याची जरूरी नाही. ज्यांनी पदव्या सोडल्या, शाळा–कोर्टे किंवा कौन्सिले यांचा त्याग केला, त्यांची कृती व त्यांचे चारित्र्य हे भाषणापेक्षा अधिक परिणामकारक व प्रभावी प्रचाराचे कार्य करीत आहे. राष्ट्रीय शाळांची वाढ ही स्वयमेव होत आहे. मुले शाळा–कॉलेजे सोडीत आहेत. या-संबंधी सरकारी आकडे भयंकर चूक आहेत. मला आठवते की, एक कौन्सिल सदस्य असे आकडे सांगत होता की, जवळ जवळ तीन हजार विद्यार्थ्यांनी शिक्षणसंस्था सोडल्या आहेत. ज्या शाळांचे रूपांतर राष्ट्रीय शाळांत झाले, त्यांत शिकत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा यात समावेश केलेला नाही. जे आपली वकिली थांबवीत आहेत अशांची संख्या हळूहळू वाढत आहे.–दुसरीकडे धारवाड व गंतूर येथील वकिली थांबविलेल्यांची यादी पहा. अजून देखील पदव्यांचा त्याग केला जात आहे. जे भित्रे किंवा सावध आहेत ते जसजसे ही चळवळ गंभीर व धार्मिक प्रयत्नाची द्योतक आहे अशी त्यांना जाणीव होईल आणि त्या चळवळीने जनतेत कायमचे मूळ धरले आहे असे त्यांच्या प्रत्ययास येईल, त्या वेळी तेही त्याग करतील.

दक्षिण आफ्रिकेतील इतिहासाची हिंदुस्थानात पुनरावृत्ती झाली तर मला आश्चर्य वाटणार नाही. उलट घडले तर मात्र आश्चर्य वाटेल. दक्षिण आफ्रिकेतील चळवळ

मतैक्याच्या ठरावाने[1] सुरू झाली. जेव्हा पहिल्या भागाला सुरवात झाली तेव्हा बहुसंख्य लोक खचले. फक्त १५० जण तुरुंगवास पत्करावयाला राजी होते. नंतर तडजोड झाली; ती मोडली आणि पुन्हा चळवळ झाली. आमच्यापैकी थोड्या लोकांच्याशिवाय कोणालाही असे वाटले नाही की, योग्य वेळी प्रत्युत्तर मिळेल. अखेरची अवस्था फक्त १६ स्त्री-पुरुषांच्या तुरुंगात जाण्याने सुरू झाली. त्यानंतर चांगलेच वादळ उठले. उसळलेल्या लाटेप्रमाणे सारा समाज उठला. संघटना नव्हती, प्रचार नव्हता, तरी सुमारे ४०,००० लोकांनी तुरुंगात जाण्याची तयारी दर्शविली. सुमारे १०,००० लोकांना प्रत्यक्ष तुरुंगात जावे लागले. त्याचा परिणाम काय झाला हे प्रसिद्ध आहे. त्या वेळी ज्याकरिता समाज लढला ते सर्व त्याला मिळाले.[2] आत्मक्लेशाच्या कठोर तपश्चर्येने रक्तहीन क्रांती घडून आली.

हिंदुस्थान त्यापेक्षा कमी करील असे मला वाटत नाही. लॉर्ड कॅनिंग यांच्या शब्दाची आठवण करून द्यावयाची म्हणजे, हिंदुस्थानच्या निळ्या व प्रशांत आकाशात क्षितिजावर माणसाच्या बोटाएवढा लहानसा एक ढग दिसतो. पण तो अनपेक्षितपणे कोणत्या क्षणी केवढे विशाल स्वरूप धारण करील आणि तो केव्हा कोसळेल हे कोणालाही सांगता येणार नाही. सारा हिंदुस्थान कृतीने उत्तर देईल का नाही हे मला सांगणे शक्य नाही. पण मी एवढेच म्हणतो की, ज्या सुशिक्षित वर्गाला काँग्रेसने विनंती केली आहे तो वर्ग एके दिवशी आणि कदाचित याच वर्षी राष्ट्राला शोभेल अशा रीतीने उत्तर देईल.

पण ते वर्ग उत्तर देवोत वा न देवोत, राष्ट्राची प्रगती कोणाही व्यक्तीकडून किंवा वर्गाकडून कुंठित केली जाणार नाही. अशिक्षित कामगार, स्त्रिया, आणि सामान्य माणसे या चळवळीतील आपला वाटा उचलीत आहेत. सुशिक्षित वर्गाला जी विनंती करण्यात आली त्यामुळे त्यांचा मार्ग सुलभ झाला. बकऱ्या आणि मेंढ्या यांची चाळणी करावयाची होती. सुशिक्षित वर्गाची ती कसोटीच होती. त्यांनी व त्यांच्याचमधून सुरुवात करावयाची होती. परमेश्वराचे उपकार आहेत की, आतापर्यंत असहकारिता ही आपल्या स्वाभाविक रस्त्याने चालली आहे. तीव्र व शुद्ध स्वरूपाचा स्वदेशी प्रचार हा यावयाचा होता आणि तो आपल्या क्रमाने आला. असहकारितेच्या कार्यक्रमांतील तो एक भाग होता व आहे. सर्वांत मोठा, सर्वांत सुरक्षित आणि सर्वांत खात्रीचा असा तो भाग आहे. सध्यांच्या स्वरूपात तो अगोदर घेता आला नसता. देशाला चरख्याचा मार्ग स्पष्टपणे दिसावयास पाहिजे होता. जुन्या समजुती व पूर्वग्रह यांतून देश मुक्त व्हावयास पाहिजे होता. फक्त ब्रिटिश मालावरील आणि तसेच परदेशी मालावरील बहिष्कार निष्फळ आहेत, हे देशाला पटावयास पाहिजे होते. कापडातील स्वदेशीची भावना टाकून दिल्यामुळे आपले स्वातंत्र्य गेले, हे देशाला कळावयाचे होते आणि ते स्वातंत्र्य पुन्हा मिळवावयाचे असेल तर आपण हातसुताच्या व हातविणीच्या कापडाकडे वळले पाहिजे हेही कळावयाचे होते.

१. हाच तो प्रसिद्ध चौथा "ठराव". पहा : खंड ५, प्रकरण ४४१.
२. दक्षिण आफ्रिकेतील लढ्याच्या मागील मूल्यमापनाकरिता पहा : खंड १२, परिशिष्ट २८.

आपण हातांनी कातण्याचे व विणण्याचे मुकाट्याने सोडून दिले तेव्हा आपली कलात्मक अभिरुची व बुद्धी नष्ट झाली, हेही देशाला कळवावयाचे होते. या पुरवणी उद्योगाच्या नाशाने हिंदुस्थानचा जितका जीवनरस शोषला आणि हिंदी जीवनात दुष्काळ ही सालोसाल येणारी घटना घडली, त्या मानाने लष्करावरील झालेल्या खर्चाचे शोषण हे फारसे नव्हते याची त्यांना कल्पना यावयास पाहिजे होती. ज्या लोकांचा चरख्यावर विश्वास होता त्यांना प्रत्येक प्रांतात उठाव करावयाचा होता आणि लोकांना खादीचा उपयोग व खादीचे सौंदर्य हेही ग्रहण करावयाचे होते.

आता या साऱ्या गोष्टी घडल्या आहेत. ह्या राष्ट्रीय धर्माची पुनः स्थापना करण्याकरिता एक कोटी स्त्री-पुरुष आणि एक कोटी रुपये हवे आहेत. काही थोडे चरखे चालू करावेत असा हा प्रश्न नसून, सहा कोटी घरांपैकी प्रत्येक घरात चरखा चालू करण्याचा हा प्रश्न आहे. हिंदुस्थानला लागणारे सर्व कापड तयार करण्याचा व वाटण्याचा हा प्रश्न आहे. तो प्रश्न एक कोटी रुपयांनी सुटणार नाही. पण जर हिंदुस्थान एक कोटी रुपये, एक कोटी स्त्री-पुरुष देईल आणि ३० जूनपूर्वी वीस लक्ष घरांत वीस लक्ष चालू राहाणारे चरखे सुरू करील, तर हिंदुस्थानची स्वराज्याला जवळ जवळ तयारी होईल. ज्यामुळे राष्ट्र चांगले, मोठे, स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होते असे सर्व गुण साऱ्या राष्ट्रात निर्माण करण्याचे प्रयत्न त्यामुळे केलेले असतील. जेव्हा राष्ट्र ऐच्छिक प्रयत्नाने परदेशी कापडावरील बहिष्कार हा पूर्ण करील, त्या वेळी ते राष्ट्र स्वराज्याला तयार होईल. नंतर मी असे आश्वासन देईन की, हिंदी शहरांत असणारे निरनिराळे किल्ले, हे उर्मटपणे हिंदी स्वातंत्र्याला धास्ती घालणारे न राहता, मुलांच्या-करिता खेळण्याच्या जागा होतील. त्याच वेळी इंग्लिश लोक व आपण यांच्यातील संबंध शुद्ध होतील. नंतर लँकेशायरच्या मताचे निर्जंतूकरण होईल आणि जर इंग्लिश माणसाला वाटले तर ते हिंदुस्थानात मित्रत्वाच्या आणि बरोबरीच्या नात्याने राहू शकतील. मात्र त्याचा एकच उद्देश असला पाहिजे, तो म्हणजे हिंदुस्थानचे खरे हित साधणे व मदत करणे. असहकारिकतेच्या चळवळीचा उद्देश इंग्रज लोकांना सन्माननीय अटीवर सहकारिता करावी म्हणून आवाहन आहे किंवा त्यांनी येथून निघून जावे. या चळवळीमुळे आपले संबंध शुद्ध पायावर स्थापित केले जातात, ते संबंध आपल्या स्वाभिमानाला आणि प्रतिष्ठेला साजेल अशा रीतीने त्या चळवळीने स्पष्ट केले जातात.

या चळवळीला कोणतेही नाव द्या. तिला "स्वदेशी आणि मितपानाची चळवळ" म्हणा– असे धरून चाला की, पूर्वीच्या महिन्यातील सारे प्रयत्न व्यर्थ गेले. मी सरकारला आणि नेमस्त मित्रांना आवाहन करतो की, त्यांनी हातकताई सर्वत्र सुरू करण्यास आणि मद्यपान गुन्हा आहे हे ठरविण्यास राष्ट्राबरोबर सहकार्य करावे. ह्या दोन चळवळींचे परिणाम काय होतील याबद्दलची भविष्ये कोणत्याही पक्षाने व्यक्त करू नयेत. झाडाची परीक्षा फळावरून होईल.

'यंग इंडिया', २०-४-१९२१

११. फोडा व झोडा

सर विल्यम व्हिन्सेंट[1] यांचे विधानपरिषदेतील भाषण दुःखदायक आहे. मला अशी आशा आहे की, त्यांना त्यांच्या बातमीदाराने अंधारात ठेवलेले असावे आणि ते भाषण जरी उलट्या काळजाचे म्हणता येत नसले तरी अज्ञानमूलक आहे.

सरकारच्या दडपशाही धोरणाचा लाघवी बचाव करणारे ते भाषण आहे. त्यात सत्य गोष्टी विकृत केल्या आहेत किंवा बनावट केल्या आहेत. आपल्या लोभी वृत्तीला त्यांनी आवाहन केले आहे आणि असहकारितेच्या उद्दिष्टांचा चुकीचा अर्थ केला आहे.

ते म्हणतात की, असहकारितावाद्यांचा घोषित उद्देश, सरकार लुळेपांगळे करून टाकणे आणि " हा उद्देश साधण्याकरिता प्रयत्नांच्या बाबतीत त्यांनी असंतोषाचे कोणतेही कारण उपयोगात आणण्याचे शिल्लक ठेवले नाही. " ही दोन्ही विधाने अर्धसत्ये आहेत. सरकार लुळेपांगळे करून टाकावे असा असहकारितेचा प्राथमिक उद्देश असल्याचे कोठेही म्हणण्यात आले नाही. मूळ उद्देश आत्मशुद्धी हा आहे. जे सरकार आपल्या दुर्गुणावर व दुर्बलतेवर जगते, ते सरकार लुळेपांगळे होण्यातच या चळवळीची प्रत्यक्ष परिणती झालीच पाहिजे. तसेच आम्ही असंतोषाचे कोणतेही कारण उपयोगात आणण्याचे ठेवले नाही, असे म्हणणे हे भयंकर अर्धसत्य आहे. जी कायदेशीर असंतोषाची कारणे आहेत त्यांचा उपयोग करण्यावाचून आम्हांला गत्यंतरच नव्हते. पण असहकारितावाद्यांनी सापडेल तो असंतोष वापरण्याचे कटाक्षाने टाळले आहे. त्याचे कारण आम्ही तसे केल्यास आमचे कार्य दुर्बल होईल. मी जे काय म्हणतो त्याचे उदाहरण, हे सर विल्यम यांनी पुढील वाक्यात आपल्या विधानाच्या समर्थनार्थ जे म्हटले आहे ते खोडून टाकल्यानेच, उत्कृष्ट प्रकारे लक्षात येणार आहे : " जेथे जेथे त्यांना मालक आणि कामगार यांच्यात भांडण दिसते, तेथे तेथे असहकारिता पक्षाचा कोणता तरी प्रतिनिधी किंवा दूत त्यांच्यात असंतोष व दुष्ट भावना वाढविण्याकरिता एकदम जातो. " हे खोटे आहे; एवढेच नव्हे, पण त्या दोघांना असहकारितेला विरोध करण्याकरिता चिथावणी देणारे आहे. कामगार आणि मालक यांच्यातील तंट्यांचा राजकीयदृष्ट्या उपयोग करू नये असे असहकारितेचे स्पष्ट धोरण आहे. त्यांनी दोघांच्या मधील काटा हा

१. व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळातील गृहमंत्री.

समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. जर आम्ही कामगारांना मालकांच्या विरुद्ध बेदरकारपणे चेतविले तर आम्ही मूर्ख ठरू. मालकांना कामगारांच्या विरुद्ध आणि कामगारांना मालकांच्या विरुद्ध चेतवून, जे सरकार देशावरील आपला ताबा हा अधिक मजबूत करील, त्या सरकारच्या हातात जाण्याचा हा मार्ग आहे. उदाहरणार्थ : झारिया-मध्ये एका असहकारितावाद्याने पसरणारा संप टाळला. कलकत्त्यामध्ये जो सौम्यपणाचा प्रभाव पडला तो असहकारितावाद्यांचा. जेथे संपवाल्यांचे गाऱ्हाणे योग्य असेल तेथे असहकारितावादी त्यांचा पक्ष घेण्यास कचरणार नाहीत. त्यांनी अन्याय्य संपाला मदत-देण्याचे सतत नाकारले आहे. सर विल्यम व्हिन्सेंट म्हणतात, " जेथे वर्णविषयक, दुष्ट भावना असतील तेथे हे दूत आपले पापी संदेश घेऊन जातात." हे विधान असत्य आहे एवढे त्यांना कळले पाहिजे. इंग्लिश लोक व हिंदी लोक यांच्यात वर्णविषयक भावना आहेत. जालियनवालाची स्मृती ही सतत ताजी आहे. पण "हे दूत" शांततेचे संदेश घेऊन तेथे गेले होते. अविवेकी लोकांचा क्षोभ त्यांनी चोहोकडेच आटोक्यात ठेवला. आणि मी असे म्हणण्याचे धाडस करतो की, जर अनत्याचाराची वृत्ती अस्तित्वात नसती तर डायरशाही व ओड्वायरशाही यांच्या धमक्यांना न जुमानता अधिक निष्पाप लोकांचे रक्त तेथे सांडले गेले असते. आमचा दोष इतकाच की, ज्या बुटाने आम्हांला लाथ मारली तो आम्ही चाटण्यास नकार दिला; आम्ही निष्कपटपणे पश्चात्ताप व्यक्त करीपर्यंत सहकारिता करण्याचे नाकारले. उपमर्द केला गेलेल्या लोकांचा क्षोभ इंग्लिश माणसाऐवजी, त्यांच्या शासनपद्धतीवर उलटविण्यास कारणीभूत झालेल्या असहकारितावाद्यांना त्याकरिता धन्यवाद दिले पाहिजेत.

पण फोडा आणि झोडा या प्रयत्नांची जर शर्थ केली नाही तर ते कसले सर विल्यम! ते म्हणतात, " आपण संयुक्त प्रांतात पाहिले नाही का, जेथे जमीनदार आणि कुळे यांच्यात भांडणे आहेत तेथे हे पातकी दूत अशांतता फैलावण्याकरिता व दंगल माजविण्याकरिता जातात." सर विल्यम यांना हे ठाऊक असले पाहिजे की, कुळांची चळवळ ही पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नियंत्रणाखाली आहे. त्यांचा कुळासंबं-धींचा एक उद्देश म्हणजे त्यांना धिम्मेपणा व शांतपणा शिकविणे हा आहे. सर विल्यम यांनी जमिनदारांना असहकारितेच्या चळवळीविरुद्ध उठविण्याचा फक्त प्रयत्न केला आहे. सुदैवाने जमिनदार आणि कुळे या दोघांनाही हे ठाऊक आहे की जोपर्यंत आपण न्यायाने वागत आहोत, तोपर्यंत असहकारितावाद्यांपासून आपणाला भिण्याचे कारण नाही.

सर विल्यम म्हणतात, " ही चळवळ निव्वळ विध्वंसक आहे आणि मी समजून घेतले आहे त्याप्रमाणे तीमध्ये विधायक शक्तीचा अंश नाही." ज्याप्रमाणे शस्त्रवैद्य सडलेल्या भागाला चाकू लावतो, त्याला विध्वंसक ज्या अर्थाने म्हणता येईल त्याच अर्थाने ही चळवळ निःसंशय विध्वंसक आहे. शस्त्रवैद्याच्या चाकूत आरोग्याची बीजे

असतात त्याचप्रमाणे आमच्या या विध्वंसक चळवळीत विधायकतेची खात्रीने बीजे आहेत. मितपान हे विध्वंसक आहे काय? चहूकडे निघणाऱ्या राष्ट्रीय शाळा या विध्वंसक आहेत काय? हजारो चरखे राष्ट्राच्या उत्कर्षाचा विध्वंस करणारे आहेत काय? ते चरखे परकीय वर्चस्व नष्ट करणार आहेत. मग ते लँकेशायरमधले असो किंवा जपानमधले असो. सर विल्यम यांनी श्रीमंत वर्ग आणि जनता यांच्यात कलह लावण्याचा प्रयत्न करून असहाय्यतेच्या भावनेने आणि अंतर्गत संघर्षाच्या व बाह्य आक्रमणाच्या भीतीने दोघांनाही लुळे पांगळे करण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदु-मुस्लिम ऐक्य हे इतके फुसके आहे का, की ते ब्रिटिशांचा तोफखाना किनाऱ्यावरून काढून घेतला जाताच आपण एकमेकांबरोबर भांडू? साठ वर्षांपूर्वी आजच्यापेक्षा आपण स्वतःचे रक्षण करण्यास कमी समर्थ होतो का? किंवा हे सत्य नाही का की, पाश्चात्यांच्या मानाने विचार केला असता आजच्याइतके आपण कधीच दुर्बल नव्हतो. मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे स्वराज्यात आत्मसंरक्षणाची शक्ती सूचित केलेली आहे, आणि जो देश स्वतःचे रक्षण करू शकत नाही, तो देश तात्काळ आणि संपूर्ण स्वराज्याला तयार नसतो. या एका वाक्यात सर विल्यम यांनी अजाणतेपणाने ब्रिटिश अमलाचा निषेध केला आहे, आणि ते राज्य सुधारावे किंवा नष्ट करावे याची आवश्यकता सिद्ध केली आहे. माझ्या पद्धतीप्रमाणे म्हणजे आत्मक्लेशाने किंवा आत्मबलाने आज आपला देश आत्मरक्षणाला तयार आहे. सर विल्यम यांच्या परिमाणाप्रमाणे त्या सुधारणांत असे काहीही नाही की, ज्यामुळे हिंदुस्थान एकवटलेल्या जागतिक शक्तींच्या विरुद्ध आत्मरक्षणाकरिता शंभर वर्षांतसुद्धा समर्थ होऊ शकेल. त्या मापाने विचार करू गेल्यास नव्या सुधारणा हिंदुस्थानभोवती जखडलेल्या शृंखला अधिकच मजबूत करतात आणि हिंदुस्थानला आपण दुर्बल आहोत असे वाटावयास लावतात. सदर वक्ते प्रत्येक संस्थापित हितसंबंधाच्या आगामी विध्वंसासंबंधी कडेपणाने बोलतात. त्यांना अशी आठवण करून देणे जरूर आहे की, हिंदुस्थानचे जास्तीत जास्त प्रस्थापित हितसंबंध —म्हणजे हिंदुस्थानची स्वयंपूर्णता, तिचा नाश या परक्या सत्तेने केला आहे, आणि वक्त्यांची योजना ही हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा खड्डा अधिकच खोल करणार आहे.

ज्याप्रमाणे सर विल्यम यांनी असहकारितावाद्यांच्या उद्देशांचा विपर्यास केला आहे त्याचप्रमाणे त्यांच्या पद्धतीबद्दलही चुकीचा अर्थ लावला आहे. सुशिक्षित वर्गासंबंधी करावयाच्या प्रयत्नात आम्ही चुकलो नाही. मी हे कबूल करतो की, त्यांच्याकडून जे उत्तर प्रत्यक्षात यावयास पाहिजे होते ते अधिक प्रमाणात येऊ शकले असते. मी हे म्हणण्याचे धाडस करतो की, त्यांच्यातील बहुसंख्य वर्ग हा मनाने आमच्याबरोबर आहे. पण माणसाचे शरीर दुर्बल असते, म्हणून त्यांच्या दृष्टीने स्वार्थत्याग ज्याला म्हणता येईल तो करावयास ते समर्थ नाहीत. आम्ही सुरुवातीपासून आम जनतेवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. तीच जनता आमचा मुख्य आधार आहे असे

आम्ही मानतो. कारण त्यांनाच स्वराज्य प्राप्त करून घ्यावयाचे आहे. पैसेवाल्यांची किंवा सुशिक्षित वर्गाचीच ती काळजीची बाब नाही. कोठल्याही स्वराज्याच्या योजनेत या दोन्ही वर्गांनी आपल्या हिताला दुय्यम स्थान दिले पाहिजे. आणि जितक्या लवकर आम जनता पुरेसे आत्मनियंत्रण करू शकेल व सामुदायिक शिस्त शिकेल, तितक्या लवकर आम्ही जरूर पडल्यास सरकारला कर देण्याचे थांबवा, असा सल्ला तिला देण्यास कचरणार नाही. त्या सरकारने त्यांच्या कल्याणाकडे खऱ्या दृष्टीने कधीही पाहिले नाही. त्यांचे शोषण केले आहे. आणि त्या शोषणाविरुद्ध उठाव करण्याची यत्किंचित चुणूक जनतेने दाखविली म्हणजे तिला प्रत्येक वेळी दहशत घातली आहे असहकारितेची चळवळ हाताळताना सरकारने योजिलेल्या पद्धतीचे विवरण करताना, कल्पकतेचा फार मोठा अभाव सर विल्यम यांनी दाखविला आहे. ज्यांनी कोणालाही दुखापत केली नाही आणि जे लोकांना अत्याचारापासून परावृत्त करतात त्यांच्याविरुद्ध सर विल्यम भारत संरक्षण कायदा वापरणार नाहीत. असहकारितावादी न्यायालयात त्यांच्या हुकुमाला आव्हान देणार नाहीत, आणि त्यामुळे मिळालेल्या परवान्याखाली ते सामान्य कायदे त्यांच्याविरुद्ध असामान्य रीतीने वापरीत आहेत. स्वराज्य देऊन ते असंतुष्ट लोकांना संतुष्ट करणार नाहीत. कारण त्यामुळे अराजक माजेल. ज्या दोन गोष्टींनी ही सर्व अशांतता निर्माण केली आहे आणि ज्या ह्या दोन गोष्टी हिंदुस्थानच्या शरीरात चरत जाणाऱ्या व तीव्र स्वरूपातील विषाप्रमाणे परिणाम करीत आहेत त्याबद्दल सरविल्यम आपल्या डोक्याला शीण देत नाहीत. त्या म्हणजे खिलाफत[1] आणि पंजाबचे अत्याचार. जर खिलाफतीसंबंधीची वचने पूर्ण केली आणि पंजाबची जखम भरून काढली तर हिंदुस्थानवर काय आपत्ती कोसळणार आहे हे ते सांगत नाहीत.

त्यांनी आपले अद्वितीय भाषण अली बंधूंवर असभ्य व हेतुगर्भसूचित हल्ला करून अलंकृत केले आहे. ते बंधू इस्लाम व हिंदुस्थानकरिता एक भव्य असा लढा देत आहेत. त्यांनी त्याहीपेक्षा एक असभ्य हल्ला "याकूब हसन नाव असलेल्या एका सभ्य गृहस्थावर" केला आहे. आणि त्यांच्या तुर्की पत्नीसंबंधी न शोभणारा असा उल्लेख केला आहे.

१. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी तुर्कस्थानचे तुकडे करावेत आणि खलिफाच्या धार्मिक दर्जा संबंधीचे ब्रिटिशांचे धोरण बदलावे याबद्दल ही चळवळ होती. काँग्रेसने हा प्रश्न हाती घेतला त्याचे कारण हिंदी मुसलमानांच्या मनावर त्याचा गंभीर परिणाम झाला होता.

२. सरकारने केलेली अत्याचाराची कृत्ये आणि १९१९ च्या एप्रिल महिन्यातील लष्करी कायद्याच्या अमलाखालील पंजाबातील दडपशाही यांचा शेवट जालियनवाला बागेच्या कत्तलीत झाला आणि त्यामुळे सर्व देशभर संतापाची लाट उसळली. गांधींचे मत असे होते की, खिलाफत आणि पंजाबच्या अन्यायांचे समर्थन असत्य आणि उर्मटपणाने केले आहे. असहकारितेच्या चळवळीत ते दोन महत्त्वाचे प्रश्न होणार होते.

ते भाषण वाचीत असताना मला दुःख झाले आहे असे मी म्हटले आहे आणि त्यावर टीका करणे हे त्याहीपेक्षा अधिक दुःखदायक आहे. मी वाचकांना अशी ग्वाही देतो की, मी जरी भाषा वापरण्यात अत्यंत संयमी आहे तरी माझ्या संयम-शक्तीवर त्या भाषणाने जबर ताण पडला आहे. सर विल्यम यांच्या पराक्रमाचे अचूक वर्णन मी जी अनेक विशेषणे खोडून काढली त्यामुळे खास झाले असते. याबद्दल मला खेद वाटतो.

'यंग इंडिया', २०-४-१९२१

१२. निषेधावर टीका[1]

मि. वर्मा यांनी जो जोरदार निषेध केला त्याबद्दल मला आनंद होतो. आणि मला आशा आहे की, जबलपूरमधील वकील असहकारितेची चळवळ चालवीत आहेत.

१. हा अभिप्राय जी. सी. वर्मा यांच्या १० एप्रिल १९२१ च्या पुढील पत्राबरोबर प्रसिद्ध केला. "त्या दिवशी जेव्हा तुम्ही जबलपूरहून कटकला गेला, त्या दिवशी कलकत्त्याच्या गुणदा बाबूबरोबर तुमची मुलाखत झाली. मी ती मुलाखत २ तारखेच्या इंडिपेंडंटमध्ये वाचली. ती त्यांनी सर्व्हेंटवरून घेतल्याचे दिसते. त्या लेखात तुमच्यासंबंधी जे विधान केले आहे ते तुम्ही पाहा. ते पुढीलप्रमाणे : 'जबलपूरला जेथून ते (महात्मा गांधी) येत होते तेथे दोन तरुण माणसे (तरुण व्यापाऱ्यांची मुले) साऱ्या वकीलवर्गाच्या विरुद्ध अत्यंत यशस्वी रीतीने चळवळ चालवीत होते. ते धंदेवाईक असल्यामुळे संघटनेचे काम अत्यंत परिणामकारक रीतीने करीत होते.''

"हे विधान चुकीचे आहे. खऱ्या गोष्टी अशा : 'ही तरुण माणसे व्यापारी नाहीत. ते हिंदुस्थानातील ब्रिटिश सरकारच्या पायाचे दगड आहेत. ते मालगुजार आहेत. त्यांचा धंदा गरीब कुळाकडून १०० रुपये काढावयाचे. ५५ रुपये सरकारला द्यावयाचे आणि ४५ रुपये स्वतःला कमिशन म्हणून ठेवून घ्यावयाचे असा आहे. अत्यंत वाईट दिवसांतसुद्धा पैसे वसूल करण्याची हमी ते देतात. सरकारशी कसली ही असहकारिता !' जर हे मालगुजार सहकार करणारे नसले, तर दुसरे कोणीही सहकार करणारे नाहीत. मालगुजारी पद्धत ही तोडरमलने शोधून काढली. या पद्धतीने सत्ताधारी भाडोत्री लोकांच्यामार्फत पद्धतशीरपणे आपले वर्चस्व लोकांवर बसवीत असत. हे भाडोत्री म्हणजेच मालगुजार; ते ही चळवळ चालवीत, असे तुमच्या तोंडी घातले आहे. ज्या वकिलाने आपली वकिली थांबविली नाही तो जर पदाधिकारी व्हावयास लायक नसेल तर माल-गुजारसुद्धा पदाधिकारी होता कामा नये. वकिलापेक्षा मालगुजार हा सरकारला अधिक बांधलेला आहे. जबलपूरमध्ये ही तरुण मालगुजार मंडळी चळवळ चालवीत नाहीत. जबलपूरमधील ही चळवळ वकील चालवितात आणि तिला सर्वजण पाठिंबा देतात.

[पुढील पान पहा]

मी ज्या दिवशी जबलपूरला भेट दिली त्या दिवशी वकील गैरहजर होते आणि मी ज्या दोन तरुण माणसांचा उल्लेख केला, ते सर्व व्यवस्था पाहात होते, हे माझे विधान मी सोडू शकत नाही. ते जमीनदारांचे मुलगे होते हे खरे आहे. त्यांचे आजचे सहकार्य जरूरीमुळे आहे. अजूनपर्यंत काँग्रेसने जमीनदारांना आपल्या जमिनी सरकारच्या हवाली करा असे सांगितले नाही; व ती तसे सांगण्याची कधीही शक्यता नाही. ही तरुण माणसे इतर ठिकाणच्या जमीनदारांच्या मुलांप्रमाणे राष्ट्रीय उत्थापनात सन्मानाची कामगिरी करीत आहेत. आणि वकिलांकडून उत्तेजन मिळण्यास ते लायक आहेत. श्रीमंती-पेक्षा बुद्धी नेतृत्व करील याबद्दल दुमत नाही. पत्रलेखक हे तितकेच कबूल करील की, बुद्धीपेक्षा अंतःकरण हेच परिणामी नेतृत्व करील. ऐन मोक्याच्या प्रसंगी मेंदूपेक्षा चारित्र्य मातबर ठरते. आणि माझ्या कल्पनेप्रमाणे ही तरुण माणसे चारित्र्याचे दर्शन घडवीत होती. यापेक्षा निराळे आढळल्यास मला दुःख होईल.

'यंग इंडिया', २०-४-१९२१

१३. सुरतेच्या सभेतील भाषण

एप्रिल २०, १९२१

महात्माजींनी टिळक मैदानावर पंधरा ते वीस हजार लोकांसमोर भाषण केले. सुरतेच्या लोकांनी त्या दिवशीच्या सभेची जी उत्तम शिस्त आणि इतर व्यवस्था ठेवली त्याबद्दल गांधींनी त्यांचे अभिनंदन केले. अव्यव-स्थितपणाबद्दल आपण जे शेरे मारले होते त्याची पुनरुक्ती आपल्याला करावी लागत नाही याचा आपल्याला आनंद होतो असे ते म्हणाले. सुरत आणि त्या जिल्ह्यांमध्ये जे प्रशंसनीय कार्य झाले ते ऐकून त्यांना संतोष वाटला.

ज्या जिल्ह्याने, शहराने, किंवा खेड्याने आपली कर्तव्ये पूर्ण केली असतील त्यांनी स्वराज्य मिळविले असे म्हणता येईल. आपल्याला असे स्वराज्य पाहिजे की, ज्यात

[मागील पानावरून]

"तुम्ही जबलपूरला पुरेसा वेळ दिला नाहीत. नाही तर वकील मंडळी तुम्हांला आनंदाने भेटली असती आणि त्यांनी तुमच्याबरोबर आनंदाने चर्चा केली असती. माझी पुरी खात्री आहे की, पैशाने केव्हाही चळवळी चालणार नाहीत. चळवळ चालविण्यास बुद्धीच लागते. मला आशा आहे की, मुलाखतीमुळे झालेली चुकीची समज तुम्ही दुरुस्त कराल. मी गेल्या नोव्हेंबरमध्ये वकिली थांबविली."

भंग्यासह सर्व लोकांना समान हक्क असतील. तुम्ही दुर्बल, दुर्दैवी आणि गरजू लोकांना मदत करण्यास तयार आहात असे जेव्हा दिसेल तेव्हा स्वराज्य जवळ येत चालले आहे, असा निष्कर्ष काढता येईल. स्वराज्य हे शक्य आहे. कारण हिंदू मुसलमान एक झाले आहेत. आपल्या दुर्बलतेमुळे मूठभर युरोपियन आपल्यावर राज्य करीत आहेत. आपल्या कल्पनाच पुष्कळशा बदलल्या पाहिजेत आणि स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, हे आपल्याला पटले पाहिजे. इंग्लिश माणसेसुद्धा हे कबूल करतात की, हिंदुस्थानातील त्यांचे साम्राज्य आपल्या दुर्बलतेवर आधारलेले आहे. सर आर. क्रॅडॉक हे एकदा असे म्हणाले होते की, जोपर्यंत हिंदी लोक आम्हांला राज्य करू देतात तोपर्यंत इंग्लिश लोक हिंदुस्थानवर राज्य करतील.

गांधीजी पुढे असे म्हणाले की, ज्या वकिलांनी वकिली थांबविली आहे आणि ज्या विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा सोडल्या आहेत, त्यांनी दुसऱ्यांना चांगले उदाहरण घालून दिले पाहिजे. त्यांचे चारित्र्य हे दुसऱ्यांना त्यांच्याकडे ओढण्यास समर्थ झाले पाहिजे. पंडित मोतिलाल नेहरू आणि श्री. सी. आर. दास यांच्या उज्ज्वल उदाहरणांची त्यांनी प्रशंसा केली. स्वातंत्र्याची लढाई लढण्याकरिता तयार असलेले दहा हजार सैनिक हिंदुस्थानला पाहिजे आहेत.

शहरातील सजावटीबद्दल बोलताना ते म्हणाले की, आपण संतुष्ट आहोत; पण त्या सजावटीत परदेशी कापड वापरल्यामुळे त्यांना अत्यंत दुःख झाले. त्याऐवजी खादी वापरावयास पाहिजे होती.

काँग्रेस कमिटीच्या शिफारशींकडे वळून ते म्हणाले, दर वर्षी दारूवर आपण १७ कोटी रुपये व्यर्थ दवडीत असताना, आपण एक कोटी रुपये जमा करणे कठीण आहे काय ?"

चरख्याबद्दल ते म्हणाले, "ती स्वराज्याची निशाणी आहे. अर्थिकदृष्ट्या ते अत्यंत चांगले शस्त्र आहे. प्रत्येक माणसाला कताई आणि विणाई करून दररोज दोन रुपये प्रामाणिकपणे मिळविता येतील. म्हणून त्यांनी सर्व कुटुंबात चरखे चालविण्याचा सल्ला दिला." आणखी त्यांनी पुढे असे सांगितले की, स्वयंसेवकांनी आपली मितपानाची चळवळ चालू ठेवावी, आणि दारूच्या व्यसनातून देश मुक्त करावा.

टिळक स्वराज्य फंडाला आपल्या वाट्याचे पैसे श्रोत्यांनी द्यावेत अशी विनंती करून त्यांनी आपले भाषण संपविले.

'मुंबई क्रॉनिकल', २३-४-१९२१

१४. बलसाडच्या सभेतील भाषण

एप्रिल २०, १९२१.

या पार्शी[1] मित्राने गोड गुजरातीत जे सांगितले ते लक्षात ठेवण्यासारखे आहे. हिंदू मुस्लिम ऐक्याचा थोडक्यात अर्थ असा की, या देशातील प्रत्येक लहान मोठ्या जमातीला आपला धर्म आचरता यावा आणि स्वातंत्र्यात तिने राहावे. या ऐक्यात तीस कोटी मानव समाजाची शक्ती साठविलेली आहे. लहान राष्ट्रांच्या संरक्षणाच्या नावाखाली मोठी राष्ट्रे जशी त्यांना युरोपप्रमाणे गिळून टाकणार असतील व तसा जर हिंदू मुस्लिम ऐक्याचा अर्थ असेल, तर मी वयाच्या ५२ व्या वर्षी जागोजागी असा धावत सुटणार नाही. मला राज्य नको व संपत्तीही नको. मी सर्व गोष्टी उपभोगून तृप्त झालो आहे. माझी सदसद्विवेकबुद्धी मला असे सांगते की, माझ्या या चळवळीत देशातील अत्यंत लहान जमातीला देखील निर्भयतेने राहाता येईल. पार्शी, शीख, ज्यू किंवा खिश्चन यांना छळणे शक्य होणार नाही आणि असाहाय्य स्त्रीवर पापी नजर टाकता येणार नाही हा स्वराज्याचा अर्थ आहे. असे स्वराज्य कोणाकडूनही देणगी म्हणून मिळणार नाही. ते वरून पडणार नाही किंवा खालून वर फेकले जाणार नाही; आपल्याला ते स्थापन करावयाचे आहे. पार्शी मित्रांना निर्णय करण्यास वेळ घेण्याचा हक्क आहे. या दोन जमाती काय करीत आहेत हे त्यांनी निरीक्षण करावे. पण त्यांना धोका नाही अशी माझी खात्री आहे. म्हणूनच त्यांना आम्ही या स्वराज्याच्या यज्ञात आहुती टाकण्यास आमंत्रण देत आहो.

[गुजरातीवरून]

‘नवजीवन’, ५-५-१९२१

१. पार्शी समाजातर्फे बोलताना ते म्हणाले, “या स्वातंत्र्याच्या लढ्यात पार्शी हे हिंदू व मुसलमानांच्या बरोबर आहेत. पण स्वराज्यात आपल्या समाजाचे हितरक्षण केले जाईल की नाही या शंकेने पार्शी लोक या चळवळीत सामील होण्यास काकू करीत आहेत.”

१५. सिसोद्रा येथील सभेत भाषण

एप्रिल २१, १९२१

तुम्ही आज आपल्यामध्ये आपल्या अंत्यज बंधूंना जागा देऊन स्वतःला पवित्र केले आहे, पण ते पावित्र्य कायम टिकवा. तुम्हांला त्यांच्यापासून काही लाभ होईल किंवा तुम्ही मला खूष कराल या बुद्धीने तसे करू नका. दुभत्या गाईला लाथ मारणे शहाणपणाचे नसते म्हणून काम करू नका. कर्तव्य म्हणून काम करा. मी जी काय सेवा करतो, ती माझा धर्म म्हणून करतो. त्या सेवेबद्दल मला तुमच्याकडून मोबदला नको आहे. धर्माचा पारितोषिकाशी संबंध नसतो; त्याचा संबंध देवाशी असतो. लोकांकडून मला पगार नको आहे. परमेश्वर मला माझा पगार आणि पारितोषिक देईल. हिंदूधर्माची अशी शिकवणूक आहे की, मनुष्य जे जे करतो ते परमेश्वराला अर्पण केले पाहिजे आणि तसे केल्यानेच फळ मिळते. म्हणून जर तुम्ही आजही अंत्यजांशी संपर्क साधण्याची पवित्र गोष्ट माझ्या सेवेचा मोबदला म्हणून केली असेल, तर तीमुळे तुमचा किंवा माझा फायदा होणार नाही. पण जर ती गोष्ट तुमचा विश्वास आहे म्हणून तुम्ही केली असेल तर तिचे श्रेय तुम्हांला मिळेल.

[गुजरातीवरून]

' नवजीवन ', ५-५-१९२१

१६. नवसारीच्या सभेतील भाषण

एप्रिल २१, १९२१

बंधू भगिनींनो,

नवसारीला ही माझी पहिली भेट नाही. १९१५ साली मी हिंडत असताना एक दिवस येथे आलो होतो. पण काळ बदलला आहे. त्या वेळच्या आणि आजच्या स्थितीत

फार मोठा बदल झाला आहे. आज आपण नव्या युगात आहोत. हे युग काय आणील आणि जगापुढे आपली कशी परीक्षा होईल हे परमेश्वरच जाणे. आपण आपल्या आवडीप्रमाणे कसेही बेत केले तरी ते बेत सिद्धीस नेणे ईश्वराच्या स्वाधीन आहे. मनुष्य एक विचार करतो आणि परमेश्वर दुसरा.

लोकांच्या वरवरच्या उत्साहाने आणि त्यांनी घेतलेल्या व्रतांनी चुकीचा समज करून घेतलेला माझ्यासारखा माणूस एका वर्षात स्वराज्य स्थापन होईल आणि धर्मराज्य नांदू लागेल अशी आशा बाळगू शकेल, पण कोणाला ठाऊक जी गोष्ट आपण स्थापन करणार आहोत ती ईश्वरी राज्याची असेल का सैतानाच्या राज्याची असेल? आपले स्वराज्य हे सैतान राज्य होईल किंवा रामराज्य होईल हे आता कोणाला ठाऊक? माझी सदसद्विवेक बुद्धी निदान असे सांगते की, आपण धर्माच्या दिशेने चालली आहोत. आतापर्यंत केलेल्या प्रगतीचा विचार करता आपल्याला असे दिसते की, गेल्या पाच किंवा सहा महिन्यांत ज्या गतीने आपण काम केले त्यावरून उरलेल्या सहा महिन्यांत आपण धर्मराज्य स्थापण्यात खात्रीने यशस्वी होऊ.

मी आता ब्रिटिश मुलुखात नाही, हे मला ठाऊक आहे. मी गायकवाड महाराजांच्या मुलुखात बोलत आहे. म्हणून माझे म्हणणे सर्वसामान्य स्वरूपाचे असेल. माझ्या कार्याचा हेतू ब्रिटिश हिंदुस्थान आणि हिंदी संस्थाने यांत सारखेच काम करावे असा आहे. या दोन्ही मुलुखातील लोकांच्यात धार्मिक वृत्ती बिंबवावी आणि त्यांच्यातील दुष्टपणा काढून टाकावा असे करणे खरोखरच इष्ट आहे.

पण मला हे ठाऊक आहे की, ब्रिटिश हिंदुस्थानात जी टीका करणे आवश्यक आहे आणि तेथील लोकांना जो सल्ला मी देईन तो येथे सुसंगत असणार नाही. म्हणून मी काही सर्वसामान्य विचारच तुमच्यापुढे मांडणार आहे.

नवसारीला येण्यात माझा खास उद्देश असा होता की, या पार्शी वस्तीतील पार्शी बंधू भगिनींना मी भेटावे आणि त्यांना चार शब्द सांगावे. नवसारी हे पारशांचे मोठे केंद्र आहे. मुंबईसुद्धा तसेच केंद्र आहे. पण ते सर्वस्वी त्यांचेच आहे असे म्हणता येत नाही. इंग्रजीत ज्याला "कॉस्मॉपॉलिटन सिटी" म्हणतात, तशी मुंबई आहे. मुंबई जगन्नाथपुरीसारखी आहे. आणि ती जर पवित्र असती तर तिला तसे म्हणता आले असते. आणि मुंबई तशी आहे असे म्हणण्यास मी तयार नाही. म्हणून पारशांची खरी मातृभूमी नवसारी ही आहे.

परलोकवासी दादाभाई नौरोजी[1] यांची ही जन्मभूमी आहे. मी त्यांच्या घरी गेलो होतो. मला ते तीर्थस्थान वाटते. पण त्यांच्याशी माझे असलेले संबंध बाजूला

१. १८२५ ते १९१७; आघाडीचे हिंदी मुत्सद्दी. त्यांना हिंदुस्थानचे पितामह म्हणत. १८८६, १८९३ व १९०६ साली हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.

ठेवले तरी पार्शी स्त्री-पुरुषांशी माझा निकटचा संबंध किती आहे, ते मी पारशांना[1] लिहिलेल्या प्रकट पत्रात थोड्याफार प्रमाणात व्यक्त केले आहे. त्याही पत्रांत माझ्या साऱ्या सुखद स्मृती मी दिल्या नाहीत. त्या देण्याकरिता जागा नव्हती. त्यांच्याविषयीच्या माझ्या आठवणी इतक्या सुखदायक आहेत आणि त्यांचे–माझे संबंध इतके निकटचे आहेत की, मी त्यांचा ऋणी आहे. ते पत्र माझे ऋण फेडण्याकरिता लिहिले. हिंदुस्थान, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, झांझीबार आणि एडनमध्ये पारशांनी माझ्यावर केलेला प्रेमाचा वर्षाव मी विसरू शकत नाही. स्वतःबद्दल मी एवढेच म्हणेन की, मी अकृतज्ञ नाही. सत्कृत्याचे मोल मला समजू शकते; आणि म्हणून जी प्रचंड चळवळ सध्या चालू आहे त्या चळवळीत पारशी दूर राहिले किंवा तटस्थ राहिले तर मला दुःख होईल. मला पारशांच्याबद्दल प्रेम आहे आणि त्यांच्या कर्तबगारीबद्दल आदर आहे. अनुभवावरून मला ते किती बुद्धिवान व कार्यक्षम आहेत हे ठाऊक आहे. या सर्व गोष्टींवरुन ते या चळवळीपासून दूर राहू शकतील असे मला वाटत नाही. ते जर दूर राहिले व असहकारितेत सामील होण्याचे त्यांनी नाकारले तर मला खरोखर दुःख होईल.

पारशांना धंदेविषयक देणगी आहे. धंद्याच्या चढाओढीत जगातल्या कोणालाही ते प्रथमस्थान मिळवू देणार नाहीत. त्या समाजात फार दांडगी धाडसी वृत्ती आहे. यामुळेच ऐंशी हजार किंवा एक लाख लोकसंख्या असलेल्या तुमच्या समाजाची कीर्ती जगभर पसरली आहे. जेथे जेथे तुम्ही गेलात तेथे तेथे तुम्ही आपली विलक्षण बुद्धिमत्ता व कार्यक्षमता दाखविली आहे. औदार्यात पारशांची बरोबरी कोणी करू शकणार नाही. पारशांनी परोपकाराच्या कृत्याकरिता जितक्या देणग्या दिल्या आहेत, तितक्या दुसऱ्या कोणत्याही समाजाने दिलेल्या नाहीत. अँन्ड्र्यूलँग यांनी जगातील सर्व समाजांनी दिलेल्या धर्मादाय रकमांचा हिशोब केला आहे. आणि लोकसंख्येच्या प्रमाणात पारशांच्या देणग्या सर्वांपेक्षा अधिक ठरल्या आहेत. हिंदूंनी पुष्कळ दान केले आहे, पण तो समाज एखाद्या सागरासारखा आहे आणि अशा विस्ताराच्या समाजाच्या देणग्या सागरात थेंबाप्रमाणे आहेत. मुसलमानांनीसुद्धा देणग्या दिल्या आहेत आणि ख्रिश्चनांनी दिलेल्या देणग्याही सुप्रसिद्ध आहेत. तथापी जर तुलना शक्य असेल तर ती ज्यूंच्या धर्मादायाशी केली पाहिजे; आणि तीतही पारशांनी त्यांना मागे टाकले आहे. त्याशिवाय पारशांचा धर्मादाय हा सर्वांकरिता असतो. जर असा समाज आपली शक्ती चांगल्या कामाला लावील तर त्यामुळे जगाचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही.

पण त्यांचे हिंदुस्थानशी विशेष संबंध आहेत. त्यांच्या आणीबाणीच्या वेळी हिंदुस्थानने त्यांना आसरा दिला. त्यामुळे हिंदुस्थानचे काही नुकसान झाले नाही.

१. पहा. खंड १९. प्रकरण २४०.

त्यांचा स्वीकार करून, हिंदूंचा आणि साऱ्या हिंदुस्थानचा फायदाच झाला. पारशांचा-सुद्धा फायदा झाला आहे. आपण हिंदी आहोत असे म्हणवून त्यांना हिंदुस्थानबद्दल अभिमान बाळगता येईल. येथे येऊन पारशांनी काही घेतले व काही दिले. मी त्यांच्या-बद्दल फार मोठ्या आशा बाळगून आहे. त्यांच्या उदारतेमुळे ते या युगातील नव्या कार्याला यत्किंचित कमी दान करतील असे मला वाटत नाही. मला पैशाच्या किंवा बौद्धिक मदतीच्या दानाची त्यांच्यापासून अपेक्षा करावयाची नाही. ते दान ते खात्रीनेच देतील. मला त्यांच्यापासून अंतःकरणाच्या तळमळीच्या भावना म्हणजेच धार्मिक भावना दान केल्या जावयास पाहिजे आहेत. ज्या देवदूतावर तुमचा विश्वास आहे त्याच्या आज्ञांचे तुम्ही स्मरण करा. मला मिळतील तितके मी तुमचे गुजरातीतले व इंग्रजीतले धर्मग्रंथ वाचले आहेत. मला आपण वेद किंवा उपनिषदे किंवा गीता वाचीत आहो असे तेव्हा वाटले. काही पारशांनी झरथुष्ट्राच्या वचनांची तुलना उपनिषदांशी केली आहे. झरथुष्ट्राच्या आज्ञा यांचे साम्य इतर धर्मांशी आहे. म्हणून माझी खात्री आहे की, पारशी बंधू धार्मिक भावनेच्या रूपाने आपले दान देतील.

विश्वाची धारणा बुद्धीवर नसून अंतःकरणावर आहे. त्या जगावर बुद्धी राज्य करणार नसून आत्मा राज्य करील. याचाच अर्थ पुण्यप्रद वर्तन हेच राज्य करील. सध्याच्या काळी पुण्यप्रद वर्तनाची माणसे नाहीत असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाही. पण मी "पुण्यप्रद वर्तन" हा शब्द विशिष्ट अर्थाने वापरतो. "पुण्यप्रद वर्तन" याचा अर्थ धर्माप्रमाणे राहणे हा आहे.

इराण हा पौर्वात्य देश आहे. सध्या पूर्व आणि पश्चिम यांच्यात झगडा चालू आहे. पश्चिमेकडील झंझावाताने आपल्याला ग्रासून टाकले आहे. एक तर आपण त्या झंझावाताने वाहून जाऊ किंवा आपण कणखरपणे प्रतिकार करून तो वारा मागे परतवू. त्या झंझावाताचे नाव "भौतिक वाद" किंवा "पैशाला देव मानणारा वाद" असे म्हणता येईल. जर आपण त्याचा प्रतिकार केला नाही, पण त्या मार्गाची नक्कल करण्याच्या फंदात सापडलो तर आपण भौतिकवादी बनू, पैसा हा देव आहे असे मानू, आणि त्यामुळे नष्ट होऊ.

तुमची इतकी स्तुती केल्यानंतर चार सावधगिरीचे शब्द सांगणे हे माझे कर्तव्य आहे. इंग्रजी शिक्षणाने मोहित झाल्यामुळे पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्याने तुमचा समाज वाहून जाणे अशक्य नाही. पारशांची मातृभाषा गुजराती आहे. त्यातले पुष्कळजण गुजरातमध्ये राहतात. त्यामुळे पारशी हे खरोखरच गुजराती आहेत. आणि तथापि एका पारशी भगिनीने काही दिवसांपूर्वी मला लिहिल्याप्रमाणे तिचे पारशी बंधू आपल्याला गुजराती येत नाही, ते ती भाषा विसरले आहेत असे म्हणण्यात अभिमान बाळगतात. इतकेच काय पण ते इंग्रजी पद्धतीचे कटाक्षाने अनुकरण करण्यात आपला वेळ घालवितात. ती म्हणाली, ज्या काही पारशी स्त्रियांनी या कामात मला मदत केली,

त्यांना मी गुजरातीत लिहिल्याबद्दल माझी लाज वाटली. आणि आपल्याला गुजराती येत नाही असे त्या म्हणाल्या. यावरून समाजाची दुर्दैवी परिस्थिती दिसते.

आजकाल इंग्रजी भाषेचे वेडच लागले आहे. माझा त्या भाषेशी हेवादावा नाही. पण ती भाषा शिकणे ही एक गोष्ट आहे आणि तिला मातृभाषा बनविणे ही दुसरी गोष्ट. शासनाची आणि उद्योगधंद्याची भाषा यापलीकडे इंग्रजीला येथे स्थान नाही. पण जर पारशांनी तिला मातृभाषा बनविली तर ते त्यांचे व देशाचे दुर्दैव आहे. जर तुम्ही तिला कवटाळलेत तर पाश्चात्यांचे गुलाम म्हणून तुमचा शेवट होईल आणि तुम्ही तुमच्या प्राचीन देवदूताची विलक्षण शिकवणूक विसराल.

युरोपमधील राष्ट्रांना ख्रिश्चन म्हणतात. पण ते ख्रिस्ताची शिकवणूक विसरले आहेत. त्यांनी बायबल वाचले किंवा हिब्रू भाषेचा अभ्यास केला तरी ते बायबलच्या शिकवणुकीप्रमाणे वागत नाहीत. पश्चिमेकडून वाहाणारा वारा येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीविरुद्ध आहे. ते येशू ख्रिस्तालाच विसरले आहेत.

पारशी बंधूंना माझा हा संदेश आहे. जरी येथे असलेले पारशी फार नसले तरी जे येथे आले आहेत त्यांनी माझा संदेश उद्या घरोघर पोहोचवावा. तुम्ही मूठभर आहात म्हणून काळजी करण्याचे कारण नाही. संख्येला महत्त्व नाही. सद्‌गुण हा संख्येत नसतो पण माणसांनी शौर्याने आणि धैर्याने वागण्यात तो सद्गुण असतो. जरी पन्नास हजार खोटी नाणी असली तरी त्यांची किंमत नसते; पण खोट्या नाण्यांच्या केवढ्याही संख्येपेक्षा एका खऱ्या नाण्याची किंमत जास्त असते. म्हणून जर पारशी हे खरी नाणी असतील तर ते जगाला आपली किंमत पटवितील. मला आशा आहे की ते आपण खरी नाणी आहोत असे सिद्ध करतील.

पण जर तुम्ही स्वतःला पश्चिमेच्या वाऱ्याने वाहून जाऊ दिलेत, जर तुम्ही सुखाच्या आणि चैनीच्या मागे लागलात, जर तुम्ही आळशीपणाने स्वास्थ्य मिळविण्यात गुंतून पडलात आणि द्रव्याचे पुजारी बनलात तर तुम्ही तुमच्यातील दैवी शक्ती गमावून बसाल; आणि जर तुम्ही झरथुष्ट्राची शिकवणूक विसरलात, तर ज्याकरिता तुम्ही कीर्ती संपादन केलीत तो खजिना तुम्ही गमावाल आणि मोत्याऐवजी गारगोटी पदरी पाडून घ्याल.

पारशांच्यात पुष्कळ कोट्याधीश होते. जरी त्यांनी प्रचंड संपत्ती मिळविली तरी त्यांनी साधेपणा टाकला नाही. आपली अंतःकरणे शुद्ध ठेवली आणि ते देवाला विसरले नाहीत. पण मला आधुनिक युगातील पारशी बंधुभगिनींबद्दल काहीशी शंका वाटते. पाश्चात्य आमिषाने मोहित झालेले ते आपला प्राचीन वारसा गमावतील की काय अशी मला भीती आहे. मी तुमच्याशी बरेच बोललो. जर तुमचा कल नसेल तर तुम्ही असहकारितेच्या साऱ्या कार्यक्रमांत तूर्त सामील होऊ नका. पण एका गोष्टीबद्दल मी

खास तुमच्या मदतीची याचना करीन. जर तुम्ही दारू-गुत्त्यातून पैसे मिळविण्याची कल्पना अजिबात टाकून द्याल तर तुम्ही आमच्यावर फार मोठे उपकार कराल. हे गुत्ते चालविणारे फक्त पारशीच नाहीत. हिंदूही गुत्ते चालवितात. त्यांत अनाविल ब्राह्मण आहेत आणि मुसलमानही त्या धंद्यात आहेत. पंजाबमध्ये शीखांच्या हातात दारूभट्ट्या आहेत व ते त्या शूर गुरू गोविंदसिंगाचे अनुयायी आहेत. मी त्या सर्वांना विनंती करीत आहे. तथापि पारशी जमात लहान असल्यामुळे ही गोष्ट करणे त्यांना सोपे जाईल. साऱ्या हिंदुस्थानात पारशांच्या हातात दारू दुकाने आहेत. स्वराज्यात पहिली गोष्ट कोणती करावयाची असेल तर देशात दारूगुत्ते नसणे हे होय. औषधी कामाकरिता मद्यार्क निर्माण करण्याकरिता दारूभट्ट्या राहू शकतील. पण हा मद्यार्क अफू किंवा सोमल याप्रमाणे मानला जाईल. हा पदार्थ मिळविणे कठीण आहे. तो केमिस्टच्या दुकानात मिळू शकतो. त्याचप्रमाणे दारू मिळविणे हेही कठीण झाले पाहिजे.

मी स्वदेशीच्या महान चळवळीत पारशांच्या मदतीची अपेक्षा करतो. एका पारशी भगिनीने शुद्ध स्वदेशीच्या ४० साड्यांची मागणी केली आहे हे ऐकून तुम्हांला आनंद वाटेल. हातसुताच्या तलम साड्या मद्रासमध्ये निघू शकतात. जर पारशी भगिनींना अभिरुचीचे चोजले पुरवावयाचे असतील तर बेझवाडा येथे पैशाच्या मानाने त्यांच्याकरिता साड्या तयार करता येतील.

काही भगिनींनी खरोखरच स्वदेशीची दीक्षा घेतली आहे. पण तुम्हांला ठाऊक आहे, मी एक अधाशी माणूस आहे. चिक्कू माणूस आहे. म्हणून जोपर्यंत हा लहानसा समाज तेजाने चमकत नाही तोपर्यंत मला बरे वाटणार नाही. तुम्हांला रेशमी कपड्यात सौंदर्य दिसते; पण खादी वापरूनच खरोखर तुम्ही स्वतःला आणि हिंदुस्थानला सुशोभित कराल. अजून पुष्कळ हिंदू खादी वापरत नाहीत. तसेच मुसलमानही वापरीत नाहीत. पण तुम्ही दुसऱ्यांच्या उदाहरणांचे अनुकरण करू नका. जर दुसरे लोक चुकीच्या मार्गाने गेले, तर आपण त्या मार्गाने जाता कामा नये. तुमची जमात कोट्यवधी हिंदू मुसलमानांना उदाहरण घालून देऊ शकेल. सुरतेला मी हातमागाच्या कारखान्यात गेलो असता एक पारशी बंधू स्वदेशीकरता थोडेफार करीत आहे असे पाहून मला आनंद वाटला. पण त्या थोड्या गोष्टीवर संतुष्ट होणारा मी माणूस नाही. तुमच्या प्रत्येक घरात चरखे सुरू करा. तुम्ही पारशी भगिनी फार तलम सूत कातू शकाल. तुम्ही तुमच्या वस्तीकरता चांगले लोकरीचे सूत कातता, ही तुमची देणगी राष्ट्राला अर्पण[1] करा

१. यानंतरचे भाषण हिंदू श्रोत्यांना उद्देशून होते. आणि गांधींच्या दौऱ्याची हकीगत, ज्या नवजीवनच्या त्याच अंकात प्रसिद्ध केली त्यात ते आले आहे.

हाच एक देश तुमचा आहे. त्याच्याबाहेर तुमची म्हणविता येईल अशी एक इंचही जमीन तुमची नाही. आमच्या शास्त्रात असे म्हटले आहे की, भारतवर्षाबाहेर अशी भूमी नाही की, जेथे हिंदू राहतील आणि मोक्ष मिळवतील. हीच भूमी तुमच्या-करिता अशी आहे की, जेथे तुम्ही सद्गुणांचे संवर्धन कराल आणि असलेले गुण प्रकट कराल. हिंदुस्थान विख्यात करा आणि शूरांची भूमी बनवा. जगाच्या इतिहासात हिंदूंनी जी आपली कामगिरी बजावली आहे, त्यासंबंधी मी काय म्हणू ? आपला भूतकाळ वैभवशाली होता. तथापि जर आपण केवळ आपल्या पुरातन वारशाच्या बळावर लढू लागलो तर आपण लढाई हरू, आपण आपल्या वाड-वडिलांप्रमाणे मोठे आहोत हे दाखविले पाहिजे, धर्मरक्षणाकरिता आपल्या ऋषींनी आपल्या शरीराचे तुकडे करू दिले. टॉडने[1] असे सांगितले आहे की युरोपमध्ये एकच 'थर्मापिली' होती. पण हिंदुस्थानात प्रत्येक रस्त्यात आणि गल्लीत थर्मापिली दिसतात. हिंदुस्थानने केवढे मोठे वीर पुरुष निर्माण केले त्या इतिहासात मी शिरू इच्छित नाही. मी एवढेच म्हणतो : आपल्या हृदयावर आपले हात ठेवू या, आणि आज आपल्यात ते शौर्य आहे का असे स्वतःला विचारू या.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ५-५-१९२१

१७. सुरत जिल्ह्यातील भाषणे

एप्रिल २२, १९२१

निरनिराळ्या ठिकाणी त्यांच्या संदेशाचा भर चार मुख्य गोष्टींवर होता. ३० जूनपर्यंत एक कोटी रुपये जमविणे, कॉंग्रेससाठी एक कोटी सभासद मिळविणे, वीस लक्ष चरखे चालविणे, आणि शक्य तितक्या लवकर अस्पृश्यतेच्या शापातून मुक्त होणे. हिंदुस्थानची स्वराज्याकरिता लायकी ह्या गोष्टी संपादन करण्यात जे यश मिळेल त्यावरून मोजावी लागेल; आणि जर त्या आज संपादन केल्या तर उद्या स्वराज्य येईल...

१. राजस्थानच्या बखरीच्या इतिहासाचा ग्रंथकार.

२. एप्रिल १९ आणि २२ च्या दरम्यान गांधीजी सुरत जिल्ह्यातील मुख्य तालुक्याच्या गावात व महत्त्वाच्या खेडेगावांना गेले होते. त्यांनी पुष्कळ सभांत भाषणे केली. त्या भाषणांचा सारांश येथे दिला आहे.

महात्माजींनी येथे आणखी असा उपदेश केला की, ज्या वकिलांना वकिली थांबविता येत नाही आणि जे विद्यार्थी सरकारी शाळा सोडण्याचे नाकारीत आहेत त्यांच्या वाटेस जाऊ नका. जशी सरकारची प्रतिष्ठा गेली आहे, तशीच या वकिलांची आणि विद्यार्थ्यांचीही गेली आहे. असहकारितावाद्यांनी आपल्या वर्तनाने आपण कोणते काम करीत आहो ते आता दाखवावे आणि जे डळमळत आहेत त्यांना आणि विरोधकांना जिंकावे. ते म्हणाले की, जर फक्त सुरत जिल्हा किंवा एक खेडे, इतर प्रांत किंवा इतर लोक यांची वाट न पाहता स्वतःला स्वराज्य मिळविण्याच्या एका उद्दिष्टावर आपली शक्ती एकवटेल तर जगात कोणीही त्यांना तसे करण्यास अटकावू शकणार नाही. आणि त्याच वृत्तीने सध्याचा कार्यक्रम अंमलात आणावयाचा आहे. जर एका जिल्ह्याने किंवा प्रांताने स्वराज्य मिळविले तर बाकीचा सारा हिंदुस्थान ते उद्या मिळवील. स्वराज्य ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. ती इंग्लंडहून तयार केलेली आयात करावयाची कृत्रिम गोष्ट नाही, किंवा ती कोणीही द्यावयाची गोष्ट नाही. मग ते महात्मा गांधी असोत, किंवा महंमद[1] अली असोत, किंवा शौकत अली असोत. या अलीबंधूंनी स्वतःकरिता स्वराज्य मिळविले आहे आणि स्थापिले आहे असे ते म्हणाले. जे पाहिजे आहे ते गांधीराज्य किंवा महंमद अली राज्य किंवा शौकत अली राज्य नसून स्वराज्य किंवा साम्राज्य पाहिजे आहे. त्या स्वराज्यात दलित वर्गाच्या हलक्यातल्या हलक्या माणसाला आणि देशातील अत्यंत दुर्बल स्त्रीला सारखेच स्वातंत्र्य आणि संरक्षण मिळाले पाहिजे.

'मुंबई क्रॉनिकल', २६-४-१९२१

१८. काही शंका

पारशांसंबंधी मी लिहिलेल्या पत्रासंबंधी पुष्कळसे वादविवाद सुरू झाले आहेत. मि. जी. के. नरिमन यांनी एक प्रकट पत्र लिहिले असून ते दुसऱ्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले आहे. जे त्या चर्चेत लक्ष घालीत आहेत त्यांनी ते वाचले असेल आणि म्हणून

१. १८७८ ते १९३१. वक्ते, पत्रकार व राजकारणी; इंग्लंडला १९२० मध्ये खिलाफत शिष्टमंडळ नेले. काँग्रेस अध्यक्ष १९२३.

मी ते प्रसिद्ध करीत नाही. मि. नरिमन यांनी प्रकट केलेले विचार आदरपूर्वक लक्षात घेण्याच्या योग्यतेचे आहेत आणि त्या पत्रात काढलेल्या शंका कदाचित दुसऱ्याही पारशांना आल्या असतील. म्हणून मी त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करतो.

मि. नरिमन यांनी पारशी लोक असहकारितेच्या चळवळीत का सामील होत नाहीत याची कारणे पुढीलप्रमाणे दिली आहेत :

(१) आम्ही आणखी कित्येक वर्षे इंग्लिशांच्या नोकरीशिवाय राहू शकणार नाही. (२) पारशांनी या चळवळीत येण्यापूर्वी आणखी हिंदू मी ह्या चळवळीत आणण्याचा प्रयत्न करावा. (३) चरख्याने स्वराज्य मिळविण्याची आशा बाळगणे हे मृगजळामागे धावत जाण्यासारखे आहे. (४) पंडित मदनमोहन मालवीय, शास्त्री[1] आणि सर दिनशा वाच्छा[2] यांच्यासारखी मंडळी असहकारितेच्या चळवळीला विरोध करीत असता सामान्य पारशी काय करू शकतील? (५) एक तर मला खिलाफत चळवळ समजत नाही, किंवा मी हिंदू धर्म आणि इस्लाम यांच्यातील न मिटणारा लढा झाकून टाकीत आहे. (६) पंजाबबद्दल माझ्या विचारात अतिशयोक्तीचा अंश आहे. उदाहरणार्थ, लाला हरकिसनलाल यांचे प्रकरण घ्या. (७) मी शिकवीत असलेला अहिंसेचा सिद्धांत हास्यास्पद आहे; तो फक्त जैनच स्वीकारू शकतील. आणि जे त्याच्या मागे जातील ते फक्त आत्महत्या करू शकतील. याशिवाय माझ्या चळवळीत संप वगैरेच्या स्वरूपात अत्याचारच आहेत. (८) दारू पिण्याचे बंद करणे हे ठीक आहे. पण प्रथम लोकांना अफू वगैरेपासून मुक्त करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे गोहत्याबंदी. त्याकरिता मी काय केले आहे?

पहिल्या शंकेला उत्तर

आपण अद्याप काही काळ इंग्रजांशिवाय काढू शकणार नाही, याच कल्पनेत आपला अधःपात आहे. आणि त्या कल्पनेतून मुक्त होण्याकरिता स्वराज्य पाहिजे आहे. ब्रिटिश येण्यापूर्वी आपण कोणत्या अर्थाने शोचनीय स्थितीत होतो? ज्या क्षणी ते सोडून जातील त्या क्षणी आपण आपसात भांडू असा विचार करणे ही अपमानकारक कल्पना आहे. तथापि ती भीती समर्थनीय आहे असे समजू; तरीही यादवी युद्धाचा धोका पत्करून ब्रिटिशांच्या रक्षणातून आपण मुक्त झाले पाहिजे.

१. व्ही. एस्. श्रीनिवासशास्त्री. (१८६९–१९४६). शिक्षणतज्ज्ञ आणि वक्ते; अध्यक्ष सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, १९१५–१९२७; व्हाइसरॉयच्या कायदे कौन्सिलचे आणि कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद. दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्थान सरकारचे एजंट–जनरल.

२. दिनशा एदलजी वाच्छा; प्रमुख हिंदी राजकारणी; हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, १९०१; पहा खंड २, पान ३६२.

दुसऱ्या शंकेला उत्तर

पारशी लोकांनी या चळवळीत सामील व्हावे अशी अपेक्षा करण्यापूर्वी मी प्रथम पुष्कळशा हिंदूंना याच चळवळींत सामील होण्याकरिता प्रथम वळवावे, या विधानात आपली दुर्बलता व्यक्त होते. पारशी व हिंदू हे दोघेही हिंदी आहेत. या दोन्ही जमातींतील विचारवंत लोकांचे हिंदुस्थानविषयक एकच कर्तव्य आहे. याशिवाय पुष्कळसे हिंदू ह्या चळवळीत आधीच सामील झाले आहेत. आणि दुसऱ्यांनी या चळवळीत यावे म्हणून त्यांना वळविण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. पारशांनी एकही हिंदू या चळवळीत आला नाही तरी त्यांनी तीमध्ये सामील व्हावे किंवा दुसऱ्यांची खात्री पटण्यापूर्वी त्यांनी स्वतःची खात्री पटवून घ्यावी. ज्या माणसाची स्वतः खात्री पटली आहे त्यांनी इतर लोक सामील होण्याची वाट पाहू नये.

तिसऱ्या शंकेला उत्तर

ज्याला असे वाटते की, चरख्यातून स्वराज्य मिळेल हे मृगजळामागे धावण्यासारखे आहे. त्याला असहकारितेची चळवळ कधीही पटणार नाही हे मी कबूल करतो. हिंदुस्थानला हळूहळू सत्य समजू लागले आहे. आणि मला विश्वास आहे की, ते त्याला अधिक चांगल्या रीतीने समजेल. जो धर्म आपण सोडला आहे, आणि जो सोडल्यामुळे आपण दरिद्री झालो आहोत, त्या धर्माकडे परत वळल्यामुळे आपण वैभवशाली होऊ असा विश्वास बाळगणे म्हणजे मृगजळामागे धावण्यासारखे आहे असे मी समजत नाही. चरखा हा आपला स्वाभाविक धर्म आहे, ही गोष्ट अनुभवाने दररोज दृढ होत आहे. दोनशे वर्षांपूर्वी किंवा दोन हजार वर्षांपूर्वी असलेल्या परिस्थितीत परत जाणे यात पातक आहे असे मला वाटत नाही. ज्या हितकर चालीरीती होत्या, त्या आपण अज्ञानाने किंवा सक्तीने किंवा कालांतराने सोडून दिल्या असल्या तरी त्या पुन्हा सुरू करण्याने आपण आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला याचा तो पुरावा आहे.

चौथ्या शंकेला उत्तर

पंडितजी आणि इतर मोठे पुढारी या चळवळीत सामील झाले नाहीत ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. तथापि जेव्हा पुढाऱ्यांमध्येच मतभेद होतात तेव्हा लोकांनी आपली निवड केली पाहिजे. सर्वजण एकमताचे होईपर्यंत काहीही करू नये असे त्यांना वाटत असेल, तर त्यांची प्रगती कधीच होणार नाही. स्वराज्यात प्रत्येकाला आपली निवड करावी लागेल.

पाचव्या शंकेला उत्तर

जरी माझ्या शक्तीप्रमाणे मी खिलाफतीच्या प्रश्नाचा खरोखर अभ्यास केला असला, तरी तो मला न समजणे शक्य आहे. इस्लाम व हिंदू धर्मात न मिटणारा संघर्ष

आहे असे मला वाटत नाही. जर तो असलाच तरी हिंदू आणि मुसलमान हे कायमचे शत्रू राहिले पाहिजेत. मनुष्यमात्रांच्या दोन गटांत परस्परांत कायमचे शत्रुत्व असणे, बरोबर आहे असे मला वाटत नाही. खलीफाने धर्माकरिता दहा वर्षांत कमीतकमी एकदा युद्ध केले पाहिजे, अशा प्रकारचा असलेला नियम मला ठाऊक नाही. क्रूसेड्स् (धर्मयुद्ध) नंतरकोठेही धार्मिक युद्धे झाल्याचे मला ठाऊक नाही. जझीरत-उल्-अरबवर[1] मुसलमानांचा ताबा असू नये असे सूचित करणारे मला आफ्रिकेत काही दिसले नाहीत.

सहाव्या शंकेला उत्तर

पंजाबसंबंधी माझ्या विचारात अतिशयोक्ती नाही हे मला ठाऊक आहे. जर लाला हरकिसनलाल हे स्वतः सरकारच्या बाजूला गेले असले तर असहकारितेला आणखी अधिक एक कारण मिळाले. पंजाबच्या अपमानामुळे जर लाला हरकिसनलालसारख्यांनाही यत्किंचित दुःख होत नसेल तर त्याची भरपाई करण्याकरिता असहकारिता करणे जरूरीचे आहे.

सातव्या शंकेला उत्तर

मी सांगत असलेला अहिंसेचा सिद्धांत कदाचित हास्यास्पद वाटत असेल. तो हिंदू धर्माचा प्रतीक आहे. त्याचा लहान किंवा मोठ्या प्रमाणात केलेल्या वापरात सर्व धर्मांची शक्ती सामावलेली आहे. ज्या प्रमाणात दयाबुद्धी असेल त्याप्रमाणातच धर्म असतो. ह्या बुद्धीला मर्यादा नाहीत आणि मला त्या घालावयाच्या नाहीत. प्रत्येकजण आपल्यापुरत्या मर्यादा ठरवितो. वैष्णवपंथात अहिंसा सर्वश्रेष्ठ मानली जाते. जैनधर्म-ग्रंथात विशेष भर देऊन ही कल्पना व्यापक केली आहे, हे मी मानतो. पण जैन किंवा दुसऱ्या कोणत्याही सिद्धांताला अहिंसेची कुलमुखत्यारी दिलेली नाही. तो विश्वव्यापी व अपरिवर्तनीय असा धर्म आहे. जैन तत्त्वज्ञानात उपवास वगैरेसंबंधीचे नियम आहेत ते आत्महत्येला पोषक आहेत, असे त्याचे वर्णन करणे म्हणजे ते तत्त्वज्ञान न समजण्यासारखे आहे असे मला वाटते. अहिंसेच्या आत्यंतिक स्वरूपाच्या अर्थाची येथे चर्चा करण्याची जरूरी नाही; त्या स्वरूपात जरी अहिंसा स्वीकारली नाही, तरी सध्याच्या परिस्थितीत शांततेने लढा देणे म्हणजे स्वेच्छेने क्लेश भोगणे हे आपले कर्तव्य आहे, हे पुन्हा सांगण्याची जरूरी नाही.

मि. नरिमन यांनी अहिंसेच्या अतिरेकी अर्थाची हेटाळणी केली आहे आणि त्याच वेळी माझ्या चळवळी अत्याचाराला पोषक आहेत असा शिक्का मारला आहे,

१. शब्दशः, "अरेबियाचे बेट" याचे विवरण मुसलमान धार्मिक अधिकाऱ्यांनी केल्याप्रमाणे त्यात सीरिया, पॅलेस्टाइन व मेसोपोटेमिया हे येतात.

यावरून त्यांना अहिंसेचे तत्त्व समजले नाही असे सिद्ध होते. त्यांना असे सुचवा-वयाचे दिसते की, असहकारितेच्या उपदेशाने द्वेष पसरतो आणि संपामुळे लोकांचे जे नुकसान होते, तो अत्याचाराचा प्रकार आहे. अहिंसेतील महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, ज्यांनी अत्याचार केला असेल, त्यांनी काय केले आहे हे ठाऊक असतानासुद्धा त्याच्याबद्दल द्वेष बाळगू नये. पंजाबचे जुल्म किंवा खिलाफतचे अन्याय हे लोकांच्यापासून दडवून ठेवून, त्यांच्या अंतःकरणातील अत्याचारी वृत्तीही मी घालवू शकत नाही. माझे कर्तव्य त्यांना कत्तलीची हकिगत सांगत असताना त्यांना शांत राहण्यास शिकविणे हे आहे. संपामुळे कोणाला क्लेश भोगावे लागले तर तो अत्याचार नाही. आपले कर्तव्य करीत असताना जर त्यामुळे कोणाला दुःख भोगावे लागले तर त्याला कोणीही जबाबदार नसतो. जर लोक अफूच्या दुकानावर जाणार नाहीत आणि त्यामुळे दुकानाच्या मालकाचा तोटा झाला तर मी दोषी नाही. त्याचाही त्याला भोगाव्या लागणाऱ्या दुःखामुळे फायदाच होतो. असहकारितेचा अर्थ असा आहे की, पापी माणसाला त्याच्या पातकात मदत नाकारणे आणि त्याला पश्चात्ताप होत नाही तोपर्यंत त्याच्याकडून कोणतीही मदत किंवा देणगी स्वीकारण्यास नकार देणे हा आहे.

आठव्या शंकेला उत्तर

मि. नरिमन यांना असे वाटते की, अफू वगैरे विरुद्ध काहीच प्रचार केला जात नाही. लोकांनी सर्व व्यसने सोडावीत म्हणून चळवळ केली जात आहे. ज्या अर्थी त्या दुकानावर निरोधन करणे हे समर्थनीय आहे, आणि ज्या अर्थी काही पारशी मित्र दारूचा धंदा करतात त्याअर्थी त्यांनी तो धंदा सोडावा अशी मी विनंती करीत आहे. मी अफू विकणारांना तशीच विनंती करीत असतो. पण माझे म्हणणे असे, अफूबाजांनी आपले व्यसन सोडले काय किंवा न सोडले, काय लोकांनी शक्य असल्यास दारू सोडावी.

मि. नरिमन यांनी पुष्कळ मुद्दे काढले आहेत. माझी त्यांना प्रार्थना अशी आहे की, जरी खिलाफतीच्या किंवा पंजाबच्या आणि इतर प्रश्नांबाबतीत त्यांनी मला विरोध केला तरी जर स्वतंत्रपणे विचार करून त्यांना मद्यपान थांबविले पाहिजे असे वाटत असेल तर त्यांनी पारशांना हे घडवून आणण्यास मदत करण्यास सांगावे. या आत्म-शुद्धीच्या झगड्यात ज्याला कार्यक्रमापैकी एखादा मुद्दा पटत असेल, त्यात त्याने मदत केली तर लोकांचा तितका फायदा होईल.

मी मद्यपान थांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. मी गोहत्येबद्दल काय करीत आहे आणि त्याकरिता किती वेळ दिला आहे? नरिमन यांची ही शेवटची शंका आहेही बंदुकीच्या फैरीतील शेवटच्या माझ्या जिव्हारी लागली. माझ्यासारख्या सनातन हिंदूला गोहत्येमुळे किती यातना होत

असतील याची नरिमन यांना काय कल्पना आहे ? जोपर्यंत गोहत्या चालू आहे तोपर्यंत माझीच हत्या चालू आहे असे मला वाटते. मी गाईला वाचविण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. मी इस्लामला वाचविण्याकरिता माझे प्राण पणाला लाविले असले तर गाईला वाचविणे क्रमप्राप्तच आहे. मी मुसलमानांच्या बरोबर सौदा करीत नाही. आणि म्हणून मी गोहत्येचा प्रश्न काढीत नाही. मी देवाला प्रार्थना करतो. त्यालाच माझे अंतःकरण माहीत आहे. औदार्याची फेड औदार्याने कशी होईल याची तो काळजी घेईल. खिलाफतीकरिता माझे प्राण अर्पण करून मी गाईला वाचवीत आहे, अशी माझी खात्री आहे. कारण इस्लामला मी वाचविले तर गाईला वाचविण्यात मला यश मिळेल. मी मुसलमानांचे प्रेम संपादन केल्याशिवाय ब्रिटिशांच्या हातातून मला गाय वाचविता येणार नाही. माझे सर्व प्रयत्न गोहत्या थांबविण्याकरिता आहेत, या माझ्या शब्दांवर नरिमन यांनी विश्वास ठेवावा, अशी माझी विनंती आहे. जो गाईला वाचविण्याकरिता आपले प्राण देण्यास तयार नाही तो हिंदू नाही. जोपर्यंत हिंदू, मुसलमान आणि खिश्चन्स हे एकत्र येऊन हिंदुस्थानच्या बचावाकरिता प्रयत्न करणार नाहीत तोपर्यंत हिंदू हे नावाचे हिंदू राहतील. पण जो अहिंसेचा मार्ग मी पत्करला आहे तो मला असे सांगतो की, गाईला वाचविण्याकरिता मी मुसलमान किंवा खिश्चन्स यांना ठार मारू नये. उलटपक्षी तिला वाचविण्याकरिता मी माझे प्राण द्यावेत. ईश्वर अत्यंत शुद्ध अशा त्यागाचा स्वीकार करतो. या आत्मशुद्धीच्या चळवळीत इतर हिंदूंनी आणि हिंदुस्थानच्या इतर संतानांनी मला येऊन मिळावे म्हणून मी धडपडत आहे. आणि त्यांची विनवणी करीत आहे. मि. नरिमन यांनाही गोहत्येमुळे यातना होतात. या आत्मशुद्धीच्या यज्ञात सहभागी होण्यास मी त्यांना आमंत्रण देतो.

[गुजरातीवरून]

' नवजीवन ', २४-४-१९२१

१९. गुजरातमधील अनुभव

मला इतके अनुभव येत आहेत की, ते सर्व लिहून काढावयाला मला वेळ नाही; आणि त्यातील मला पुष्कळसे गाळावे लागतात. मी कार्यकर्त्यांच्यामध्ये जो काय थोडा वेळ असतो त्या वेळात ते माझ्याकडून जास्तीत जास्त काढून घेण्याला उत्सुक असतात. आणि मला लिहिण्याकरिता एकांत किंवा स्वास्थ्य देत नाहीत. त्यांच्या अधाशीपणाला

मर्यादा नाही. मीही सेवा करावयाला फाजील उत्सुक असतो. मला शक्य तितके काम करावयाचे असते. आणि शक्य तितक्या गोष्टी समजावून सांगावयाच्या असतात; म्हणून माझे सर्व अनुभव वाचकांपुढे ठेवू शकत नाही.

हा लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंत मी आनंद, रास, बोरसद, हलोल, कलोळ, वेजालपूर, गोध्रा, सुरत, ओलपाड आणि रांदेर इतक्या ठिकाणांना भेटी दिल्या आहेत. चोहोकडे लोकांच्या उत्साहाला अंतच उरला नाही. प्रत्येक ठिकाणी मोठ्या संख्येने स्त्री-पुरुष सभांना येत. सर्व ठिकाणी चरख्याची चळवळ वाढत असलेली मी पाहिली आहे. जवळजवळ प्रत्येक गावात किंवा खेड्यात लोकांनी टिळक स्वराज्य फंडाला देणग्या दिल्या आहेत.

एका विधवेची देणगी

आनंदमध्ये एका विधवेने तिच्याजवळ असलेली सुमारे २५ तोळे वजनाची एक सोन्याची लगड देऊन टाकली. विधवेकडून आलेली ही लगड म्हणजे खरोखर देणगीच आहे. मी तिला तिचे नाव विचारले. तिने सांगण्यास नकार दिला. पवित्र कार्याला अर्पण केलेल्या पैशाकरिता नाव आणि पत्ता देण्याची काय जरूरी? तिला अधिक प्रश्न विचारण्याचे धैर्य मला झाले नाही.

सशर्त देणगी

श्रीमती कोठावाला या नेहमीच्या सवयीप्रमाणे गोध्र्याच्या सभेला आल्या. त्या म्हणाल्या, असहकारितेच्या चळवळीशिवाय माझ्या सर्व चळवळी त्यांना आवडतात. आणि त्यांनी मला लॉर्ड रीडिंग यांना एक संधी द्या असे सांगितले.

मी म्हणालो, "मला खरोखरच सर्वांनाच संधी देण्याची इच्छा आहे. लॉर्ड रीडिंग यांनी सहकारिता मिळविण्याकरिता फक्त न्याय द्यावा. तुम्ही स्वतः त्यांनी पश्चात्ताप व्यक्त करावा म्हणून केलेल्या गुन्ह्याबद्दल देशाची क्षमा मागावी आणि न्याय द्यावा म्हणून त्यांचे मन वळवा. मग भांडणच शिल्लक उरणार नाही."

"तुम्ही त्यांना संधी द्याल का नाही हे मला सांगा. तुम्ही लिहून कळवाल का की, त्यांनी न्याय दिला तर तुम्ही असहकारिता मागे घ्याल."

मी म्हणलो, "संधी मिळाली म्हणजे मी त्यांना खास तसे सांगेन. पण लॉर्ड रीडिंग यांना हे माहीत आहे."

या अटीवर त्या चांगल्या स्त्रीने मला ५० रुपये दिले. अशा अटीवर जर सर्व स्त्रिया इतके पैसे देतील तर एक कोटी रुपये ताबडतोब जमा होतील.

व्यवस्थितपणा

मी चोहोकडेच व्यवस्थितपणा वाढत चालला हे पाहतो, पण सुरतेत तो जास्त आहे. जेथे जेथे आम्ही गेलो तेथे तेथे लोकांना पूर्वसूचना दिल्याप्रमाणे आमचे सर्व कार्यक्रम कमितकमी आवाज आणि गडबड यामुळे पार पाडता आले. लोकांना आगाऊ सूचना दिल्यामुळे सभेला सुरुवात होण्यापूर्वीच वर्गण्या जमा होत. सुरतेच्या स्त्रियांनी आपल्या हिऱ्याच्याही अंगठ्या दिल्या.

रांदेरचा अनुभव

सुरत नगरपालिकेने मला स्वागतपर मानपत्र दिले, पण रांदेर नगरपालिका ते द्यावयास कबूल झाली नाही असे मला समजले. तथापि हिंदू व मुस्लिम तरुणांनी धैर्य दाखविले आणि मानपत्रे दिली. एक नागरिकातर्फे आणि दुसरे खिलाफत कमिटीतर्फे. रस्तेही शृंगारले होते. तरी पण पुढारी बाजूला राहिले आहेत असे मला दिसले. मुलांनी जितकी उत्सुकता दाखवावी तितकीच त्यांनी दाखविली. मी खूप प्रयत्न केला, पण तशा त्या वातावरणात रांदेरला मला फार थोडी रक्कम जमविता आली. एका मुस्लिम मित्राने माझ्या हातात पाच रुपयांची नोट ठेवली. आणि एका स्त्रीने पाच रुपये दिले व तिने रोज दोन तास चरखा चालविण्याचे वचन दिले. आणि इतःपर परदेशी कापड वापरणार नाही असे सांगितले. मला रांदेरइतका निःसत्त्व अनुभव माझ्या दौऱ्यात इतरत्र कोठेही आला नाही.

रांदेरच्या तरुणांनी निरुत्साही होऊ नये असे मी त्यांना सांगेन. त्यांनी स्वागत-पर मानपत्रे देण्यासंबंधी लोकांना वळविण्याचे प्रयत्न सोडून द्यावेत. पण निधी जमा करण्याकरिता शिकस्त करावी. चांगली, कष्टाळू व विनम्र तरुण माणसे पुष्कळच काम करू शकतील. मध्यम वर्गाकडून त्यांनी पैसे जमवावेत. जे संशयात्मे आहेत ते श्रद्धावान बनतील. हिंदू आणि मुसलमान तरुण एकत्र येऊन व पूर्ण जाणिवेने कष्ट करीत आहेत हे अत्यंत आशादायक लक्षण आहे.

दोन उणीवा

मला असे दिसते की, लोकांना एक तर स्वदेशी अद्याप पूर्णपणे समजत नाही. किंवा त्याबद्दल ते फारशी फिकीर करीत नाहीत. सजावटीकरिता परदेशी कापड आणि परदेशी कागद अजून वापरला जात आहे. जर आपल्याला याच वर्षी परदेशी कापडा-वरील बहिष्कार यशस्वी करावयाचा असेल, तर जी प्रत्येक गोष्ट आपण करतो ती-संबंधी आपण विचार केला पाहिजे. अगदी लहान सहान तपशिलाकडे आपल्याला लक्ष दिले पाहिजे. कर्तव्य म्हणूनच जर आपण परदेशी कापड टाकले तरच आपण हे मोठे पण साधे काम सिद्धीस नेऊ. आणि त्याला विलंबही लावता कामा नये. ज्यांना

समज आहे त्यांना हिंदी गिरण्यांतून तयार झालेले कापड हेही परदेशी कापड आहे असे वाटेल. परदेशी कापड आणि हिंदी गिरण्यांत तयार झालेले कापड यांतील फरक आपल्याला नेहमी सांगता येणार नाही. ज्यांना स्वदेशीचा संदेश मिळाला नाही अशा गरीबांकरिता हिंदी गिरण्यांचे कापड आपण ठेवून द्यावे. एकाच खेड्यातून किंवा गावातून जेथे कापसाच्या सर्व प्रक्रिया होतात त्यालाच खरी स्वदेशी म्हणता येते. ज्या गावात हे सर्व केले जाते त्याची भरभराट होईल आणि ते गाव आपले स्वातंत्र्य मिळवील. हे घडवून आणण्याकरिता परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याच्या बाबतीत लोकांनी अत्यंत जागरूक राहिले पाहिजे.

दुसरी उणीव अशी आहे की, फुलांचे हार अर्पण करण्याची आपली दुर्बलता आपण घालवू शकत नाही. या पद्धतीत मला काहीही फायदा दिसत नाही. असंख्य फुले चांगल्या कामाकरिता वापरली जात नाहीत. अशा प्रकारे फेकून द्यावयास सध्या आपल्याजवळ पैसे नाहीत. हार हे सुताचेच असले पाहिजेत. सुताची अनेक कलापूर्ण रीतीने रचना करून त्यांच्या माळा कराव्यात; त्याची गुंफण अनेक प्रकारे करता येते. साखळ्यासारखा त्यांना आकार देता येतो. स्वतः विणलेल्या सुंदर तलम कापडाच्या साध्या गुंड्या हार म्हणून अर्पण करण्यात प्रेम व विचारपूर्णता आहे. सुताचा हार ज्याला दिला जातो तो त्याचा चांगला उपयोग करू शकतो. अशी एक वेळ येत आहे की जेव्हा सुताचे हार गरिबांना देणगीदाखल दिले तर त्यांचा त्यांना चांगला उपयोग होईल. फुलांच्या हाराचा कोणालाही उपयोग होत नाही, आणि फुलांची जरूरी नसताना त्यांचा वापर करणे म्हणजे तितकी खराबी होय.

काम करा, काम करा, काम करा

जर आपल्याला याच वर्षात स्वराज्य मिळवावयाचे असेल तर आपण कामात पूर्णपणे गुंतून राहिलो पाहिजे. लोकांची जागृती होते या दृष्टीने सभा, मिरवणुकी आणि तशाच गोष्टी ठीक आहेत. पण जेथे लोक आधीच जागे केले गेले आहेत, तेथे आपण निमूटपणे काम करीत राहावे. दररोज आपण पैसे गोळा करीत हिंडावे आणि लोकांना सूत कातण्यास प्रवृत्त करावे, आपण नवे चरखे बनवून घ्यावेत, आणि ज्या घरात ते नसतील तेथे ते सुरू करावेत. खादीचा साठा करण्याची दक्षता घ्यावी, ज्यांनी खादी वापरावयास सुरुवात केली नसेल त्यांची समजूत पटवावी, आणि जे उत्साही लोक असतील त्यांना मद्यपान थांबविण्याकरिता काम करण्यास सांगावे. याच मार्गाने प्रत्येकाने स्वराज्याकरिता कोणत्या तरी कामात स्वतःला गुंतवावे आणि इतरांची मने त्याकरिताच वळवावीत.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', २४-४-१९२१

२०. टिप्पणे

नवजीवनची भाषा

एक पारशी भगिनी, एक पारशी बंधू आणि इतर काही जणांनी ' नवजीवन 'च्या भाषेबद्दल आपले अभिप्राय धाडले आहेत. ' नवजीवन 'ची भाषा सोपी करण्याकरिता सतत प्रयत्न चालू आहे. भाषा सुधारणे किंवा कठीण शब्द सुरू करणे हे ' नवजीवन 'च्या प्रयत्नांच्या कक्षेत येत नाही. त्याचे प्रयत्न अगदी सोप्या भाषेत कल्पनांचा प्रचार करणे, एवढीच त्यांच्या प्रयत्नाची मर्यादा आहे. ती सोपी भाषा जास्तीत जास्त लोकांना समजेल अशी पाहिजे. तथापी सर्व लेखक हा हेतू नजरेसमोर ठेवीत नाहीत. प्रत्येक जण आपापल्या शैलीप्रमाणे शब्दप्रयोग करतो. त्याचा परिणाम असा होतो की, नवजीवनची भाषा नेहमीच सोपी असत नाही असे मला आढळून येते. मी या टीकाकारांना असे आश्वासन देऊ इच्छितो की, भाषा कठीण करण्याचा आमचा बुद्धिपुरःसर प्रयत्न नसतो. आमचा उद्देश ती सोपी असावी असाच आहे. मी लेखकांचे त्यांच्या टीकेबद्दल आभार मानतो. कमीत कमी संस्कृत शब्द वापरण्याची दक्षता घेईन. नवजीवन वाचणारे हिंदू व मुसलमान मित्र फार मोठ्या संख्येने आहेत हे मला ठाऊक आहे. आणि ज्यांना कठीण शब्द समजत नाहीत अशाही पुष्कळ स्त्रीवाचक आहेत. नवजीवन हे वाचावयाला सोपे करणे हे माझे कर्तव्य आहे असे मी समजतो.

[गुजरातीवरून]

' नवजीवन ' २४-४-१९२१

२१. सी. एफ्. अॅन्ड्रयूज यांना पत्र

हैद्राबाद (सिंध)
एप्रिल २५, १९२१

परमप्रिय चार्ली[१] यांस,

तुमचे पत्र पोहोचले. मी तुमच्या प्रश्नाला 'यंग इंडियात उत्तर दिले आहे. उत्तर पुरेसे नसल्यास मला विचारा. त्या प्रश्नाबद्दल माझी ठाम मते आहेत. माझ्या अलीकडच्या अनुभवांवरून माझे मत अधिकच दृढ झाले आहे.

पतिपत्नीतील पावित्र्याबद्दल मी कसलाही प्रचार करीत नाही. तो विषय इतका पवित्र आहे की, तो सांगता येणार नाही. पण मला ती गोष्ट धार्मिक इच्छेच्यापेक्षाही अधिक मोठी वाटते. जर मला सभ्य रीतीने आणि स्वेच्छेने प्रजोत्पत्ती थांबविण्याचा मार्ग सापडला आणि जोपर्यंत हिंदुस्थान सध्याच्या दुर्दैवी परिस्थितीत आहे, तोपर्यंत प्रजोत्पादन बंद करता आले तर ते मी आजही करीन. पण ते अशक्य आहे हे मी जाणतो. तथापि त्याच वेळी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या लेखाचा परिणाम अगदीच कमी झाला नाही. माझ्या माहितीप्रमाणे पुष्कळ तरुणांनी संयमामुळे स्वतःचा आणि त्यांच्या बायकांचा फायदा केला आहे. जी उघड गोष्ट आहे ती तुम्हांला पटत नाही याचे मला आश्चर्य वाटते. पण मी युक्तिवाद करता कामा नये. ते मूलभूत सत्य आहे आणि योग्य वेळी त्या सत्याची उमज तुम्हांला पडेलच. तुमची प्रकृती अधिक सुधारलेली असेल अशी मला आशा आहे.

तुमचा
मोहन

[ता. क.] लालचंद हा अप्रामाणिक ठरला एवढेच नव्हे तर तो बदमाष आणि उद्धट ठरला असे मी तुम्हांला सांगितले ना. त्याने केलेल्या पैशाच्या अफरातफरी अगदी उघड आहेत. त्याने आणखी खोटे बोलून त्या लपविण्याचा प्रयत्न केला.

गांधींच्या हस्ताक्षरातील मूळच्या पत्राच्या फोटोस्टॅटवरून जी. एन. ९६५.

१. चार्लस् फ्रीअर अॅन्ड्र्यूज (१८७१–१९४०); इंग्लिश मिशनरी, ग्रंथकार, शिक्षणतज्ज्ञ, आणि गांधींचा निकटचा सहकारी.

२२. 'मुंबई क्रॉनिकल'ला संदेश[1]

मि. हॉर्निमनबद्दल मी इतकेच म्हणतो की, जितकी त्यांची मला जास्त ओळख झाली, तितके तितके ते मला अधिक आवडू लागले. मि. हॉर्निमन यांनी जितक्या निर्भयतेने आणि दृढविश्वासाच्या शक्तीने वृत्तपत्रविषयक सेवा केली, आणि त्या देणगीच्याद्वारा हिंदुस्थानची सेवा केली, तितकी फारच थोड्या इंग्लिश लोकांनी केली असेल. मला जरी त्यांची कडक भाषा आवडत नसे आणि जरी मला त्यांनी प्रभुत्व मिळविलेली शिवराळ भाषा पसंत नसे, तरीही मी हे म्हणत आहे.

एम्. के. गांधी

'मुंबई क्रॉनिकल;' २६-४-१९२१

२३. टिप्पणे

मुळशी सत्याग्रह

माझे अंतःकरण या गरीब लोकांच्याकडे[2] धाव घेत आहे. माझी अशी इच्छा आहे की, टाटांच्या मोठ्या घराण्याने कायदेशीर हक्कांचा आधार न घेता लोकांची समजूत पटवावी व त्यांच्या सल्ल्याने जे काय करावयाचे ते करावे. मला जमीन संपादण्याच्या कायद्यांचा काहीसा अनुभव आहे. मी जवळ जवळ तसले ऐंशी खटले चालविले आहेत. ते येथे जमीन संपादन करण्याचे कारण औद्योगिक विकास नव्हता पण

१. २६ एप्रिल १९१९ रोजी बी. जी. हॉर्निमन, संपादक मुंबई क्रॉनिकल, यांना खटल्याशिवाय हद्दपार केले. वरील संदेश त्यांच्या हद्दपारीच्या दुसऱ्या वार्षिक दिनाला प्रसिद्ध केला. पाहा. खंड १५, प्रकरणे २३४, ३१८, ३४७, आणि ३४८.

२. आपली गाऱ्हाणी दूर झाली नाहीत तर आपण सत्याग्रह करू असा मुळशीच्या शेतकऱ्यांनी धाक घातला होता. पहा, "महाराष्ट्र प्रदेश परिषद, वसई भाषण" ५-५-१९२१.

गलिच्छपणा होता. ज्या लोकांची जमीन काढून घेतली जाते, त्यांना तितकाच बरोबर मोबदला कधीच मिळत नाही. टाटा योजनांमुळे आपण हिंदुस्थानला अमुक अमुक वर देणार आहोत असे सांगणारे जर त्याकरिता एकही गरीब माणसाचे अनिच्छेने नुकसान करणार असतील तर त्याची किंमत काय? जर तीन कोटी अर्धउपाशी स्त्री-पुरुष आणि लक्षावधी लुळींपांगळी माणसे जर गोळ्या घालून ठार मारली आणि त्यांच्या शरीराचे खत केले किंवा त्यांच्या हाडांचा उपयोग सुऱ्यांच्या मुठी करण्याकरिता केला तर रोगराई आणि दारिद्र्य यांचा प्रश्न सहज सोडविता येईल आणि जे मागे जिवंत राहतील ते चैनीत राहतील. तथापि वेड्या माणसाशिवाय कोणीही ही सूचना मांडणार नाही. ज्या मौल्यवान जमिनीबद्दल भावना, अद्‌भुतपणा, आणि ज्यामुळे जीवन जगावेसे वाटते अशा सर्व गोष्टी वृद्धिंगत झाल्या असता, स्त्री-पुरुषांना गोळ्या घालून ठार मारण्याऐवजी त्यांच्या जमिनी बळजबरीने हिरावून घेणे ह्या गोष्टींमुळे बाजू कमी कमजोर ठरते का? त्या विख्यात नावाचे जे प्रतिपालन करतात त्यांना मी असे सुचवितो की, जर त्यांनी आपल्या दुर्बल आणि असहाय्य देशबांधवांच्या इच्छांना मान दिला तर ते हिंदुस्थानचे हित अधिक खऱ्या रीतीने वाढवू शकतील. सत्याग्रहींचे कर्तव्य सुवर्णाक्षरात लिहिलेले आहे. अन्याय्य कारणाकरिता सत्याग्रह होऊ शकत नाही. सत्याग्रहाचा पुरस्कार करणारे लोक जर दृढनिश्चयी नसतील आणि अखेरपर्यंत लढण्याला व क्लेश सहन करण्याल असमर्थ असतीला तर न्याय्य कारणाकरिता केलेला सत्याग्रह हाही वाया जातो. न्याय्य कारणाचा यत्किंचितही अत्याचार न्याय्य कामाचा नेहमी घात करतो. सत्याग्रहात कोणत्याही प्रकारचा किंवा स्वरूपाचा अत्याचार अंतर्भूत होऊ शकत नाही. मग तो अत्याचार विचारात, वाणीत किंवा कृतीत असो. कारण न्याय्य असावे, अनंत यातना भोगण्याची शक्ती असावी, अत्याचार टाळावा म्हणजे खात्रीने विजय होतो.

अदृश्य होणारी अस्पृश्यता

माझ्या गुजरातच्या दौऱ्यात जे मला गोड अनुभव आले, त्यांत सर्वांत अधिक गोड अनुभव ज्या सहानुभूतीच्या पद्धतीने इतर हिंदूंनी दलित वर्गाचे स्वागत केले त्यात होता. प्रत्येक ठिकाणी श्रोत्यांनी त्याबद्दलचे माझे अभिप्राय न रागावता ऐकून घेतले. कलोलला मला एक अस्पृश्यांच्या सभेत भाषण करावयाचे होते. मी महाजनांना विनंती केली की, त्यांनी मला जाहीर सभेकरिता उभारलेल्या मंडपात अस्पृश्यांसमोर भाषण करू द्यावे. थोडे आढेवेढे घेतल्यानंतर ते कबूल झाले. या जातिबाह्य लोकांना त्यांच्या वस्तीतून आणण्याकरिता मला जावयाचे होते. ज्या मांडवात त्यांना आणावयाचे होते तो मांडव त्यांच्या घरापासून फार दूर होता. म्हणून मी इस्पितळाजवळ त्यांच्याकरिता भाषण केले. जे सनातनी हिंदू माझ्याबरोबर आले होते ते अस्पृश्य वस्तीतून माझ्याभोवती जमा झालेल्या स्त्री-पुरुषांच्याबरोबर निःसंकोचपणे मिसळले हे पाहून मला आनंद झाला. पण जेव्हा मी सिसोद्रा म्हणजे नवसारीजवळील एका खेड्यात

एका मोठ्या सभेत भाषण करीत होतो, त्या सभेपासून दूर अंतरावर उभे राहिलेल्या अनेक धेडांना त्या खेड्यातील प्रतिष्ठित लोकांकरिता राखून ठेवलेल्या जागी जाणून बुजून येऊ दिले, त्या वेळी माझे समाधान कळसाला पोहोचले. त्यांना तेथे येऊ देत असताना एकही स्त्री किंवा पुरुष जागेवरून हालला नाही किंवा त्यांनी हरकत घेतली नाही. खेड्यातील जवळ जवळ प्रत्येक माणूस त्या सभेला हजर होता. सभोवतालच्या खेड्यांतील लोकही सभेला आले होते. या अस्पृश्य वर्गातील शेकडो स्त्री-पुरुषांना वरीलसारख्या मोठ्या जमावाच्या केंद्रस्थानी जाणून बुजून आणि गंभीरपणे येऊ दिले, ही गोष्ट या चळवळीच्या शुद्ध धार्मिक स्वरूपाची द्योतक आहे. हे आश्वासन अधिक भक्कम करावे म्हणून श्री. वल्लभभाई पटेल[1] यांनी ज्यांना ही गोष्ट आवडली, त्यांनी हात वर करावेत असे सांगितले आणि असंख्य हात वर झाले. हा प्रयोग पुन्हा बार्डोलीत केला गेला. सभेला तितकाच मोठा जमाव होता. आणि तितकाच समाधानकारक परिणाम झाला. अस्पृश्यता ही खात्रीने कमी कमी होत आहे आणि तिच्या निर्गमनाबरोबरच स्वराज्याचा मार्ग सुरक्षित व सोपा होत आहे.

सुताच्या गुंड्यांचा डोंगर

ज्या सिसोद्रामध्ये वर्षापूर्वी हातसूत काढले जात नव्हते, त्या सिसोद्रामध्ये एका घरात सुंदर रीतीने रचलेले पन्नास मण हातसूत दिसून आले. या व शेजारच्या खेड्यात शेकडो चरखे चालू झाले आहेत. पंजाबप्रमाणे आता गुजरातमध्येही स्त्रियांनी आणि मुलांनी माझ्याकडे सुताच्या देणग्या आणण्याचे दृश्य नित्याचेच झाले आहे. गुजरातमधील विद्यार्थी हे सूतकताईच्या बाबतीत पंजाबपेक्षा अधिक गुण मिळवू शकतील. हे विद्यार्थी विश्वास बसणार नाहीत इतक्या अल्पावधीत सूतकाम शिकले आणि ते आता कताईकरिता खेडी संघटित करीत आहेत. पंजाबच्या लोकांनी आता सावध राहावे. या शर्यतीत जर पंजाबचा पराभव झाला तर मला दुःख होईल. त्यांना आंध्र, कर्नाटक आणि गुजरातमध्ये कणखर प्रतिस्पर्धी आहेत. ज्या ठिकाणी संघटित रीत्या कताईकाम चालले आहे अशा केंद्रांना संशयग्रस्त लोकांनी भेटी द्याव्यात आणि त्यांना असे आर्थिक नियम दिसून येतील की जे पाठ्यपुस्तकांतील अर्थशास्त्राचे पाठ खोटे ठरवितील.

एका विधवेची देणगी

स्त्री-पुरुषांनी मुक्तहस्ताने पैसे आणि दागिने दिले. पण आनंदच्या एका विधवेने सातशे रुपयांची सोन्याची एक लगड देऊन आम्हांला थक्क केले. मी तिला

१. १८७५–१९५०; काँग्रेसचे अध्यक्ष १९३१, भारताचे उपपंतप्रधान, १९४७ ते १९५०.

नाव विचारले. देवाच्या सेवेकरिता सोने दिले असे म्हणून नाव सांगण्यास तिने नकार दिला.

इंग्रजी शिक्षण

एका मित्राने मला इंग्रजी शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल माझे विचारपूर्वक बनलेले मत काय आहे असे विचारले आहे. आणि कटकच्या[1] वाळवंटातील माझ्या बोलण्याचा अर्थ सांगण्यास सांगितले आहे. मी त्या भाषणाचा वृत्तांत वाचला नाही. पण माझ्या मित्राची इच्छा मी आनंदाने पुरी करतो. माझे विचारपूर्वक असे मत बनले आहे की, ज्या रीतीने इंग्रजी शिक्षण दिले जाते, त्या शिक्षणाने इंग्रजी शिकलेले हिंदी लोक हे पौरुषहीन झाले आहेत. हिंदी विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तीवर त्यामुळे भयंकर ताण पडला आहे आणि त्यांना अनुकरणप्रिय केले आहे. ब्रिटिशांच्या संबंधामुळे मातृभाषांचे जे उच्चाटन झाले ती सर्व प्रकरणे अत्यंत दुःखदायक आहेत. राममोहन रॉय[2] आणि लोकमान्य टिळक[3] यांना जर इंग्रजीतून विचार करण्याच्या अडथळ्यापासून सुरुवात करावी लागली नसती आणि त्यांना आपले विचार मुख्यत्वे इंग्रजीतून प्रस्तुत करावे लागले नसते तर ते अनुक्रमे अधिक मोठे सुधारक आणि अधिक मोठे विद्वान झाले असते. त्यांचा प्रभाव त्यांच्या लोकांवर विलक्षण होता हे तर खरेच, पण जर ते कमी कृत्रिम पद्धतीत वाढले असते तर तो अधिकच मोठा झाला असता. इंग्रजी साहित्याच्या संपन्न भांडाराच्या ज्ञानातून त्यांना पुष्कळ लाभ झाला यात वाद नाही. पण त्यांना स्वतःच्या भाषेतून हा लाभ उपलब्ध होऊ शकला असता. भाषांतर करणारांचा वर्ग निर्माण करून कोणत्याही देशाचे राष्ट्र निर्माण होत नाही. जर इंग्लिश लोकांना बायबलचे अधिकृत भाषांतर उपलब्ध झाले नसते तर त्यांचे काय झाले असते याचा विचार करा. चैतन्य, कबीर, नानक, गुरु गोविंदसिंग, शिवाजी आणि प्रताप हे राममोहन रॉय आणि टिळकांच्यापेक्षा मोठे होते असे मी मानतो. मला हे ठाऊक आहे की, तुलना करणे, हे घाणेरडे असते. सर्व जण आपापल्या प्रकारे सारखेच मोठे आहेत. पण परिणामाच्या दृष्टीने विचार करता राममोहन आणि टिळक यांचा आमजनतेवर पडलेला प्रभाव हा जे इतर अधिक भाग्यशाली अवस्थेत जन्माला आले, त्यांच्याइतका शाश्वत किंवा दूरगामी नाही. जे अडथळे त्यांना उल्लंघन करावयाचे होते, त्याचा विचार करता ते महापुरुषच होते. पण जर, ज्या पद्धतीत त्यांना शिक्षण मिळाले त्या पद्धतीचा अडथळा नसता तर दोघेजण

१. पाहा, खंड १९, प्रकरण २४६.

२. राजा राममोहन रॉय (१७७४–१८३३). विद्वान, समाजसुधारक आणि ब्राह्म समाजाचे संस्थापक; सतीची चाल बंद करण्याकरिता प्रयत्न केले.

३. बाळ गंगाधर टिळक (१८५६–१९२०). देशभक्त, राजकीय पुढारी, विद्वान आणि ग्रंथकर्ते; पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक; आणि केसरी व मराठा पत्रांचे एक संस्थापक. पहा, खंड २, पान ३६०.

यश संपादनाच्या दृष्टीने अधिक मोठे झाले असते. इंग्रजी भाषेचे ज्ञान नसते तर जे विचार राजा आणि लोकमान्य यांनी व्यक्त केले, ते त्यांना करता आले नसते यावर माझा विश्वास बसू शकत नाही. ज्या सर्व भोळसट समजुतींनी हिंदुस्थानला ग्रासले आहे, त्यांतील सर्वांत मोठी भोळसट समज अशी आहे की, स्वातंत्र्याच्या कल्पना मनात बिंबण्यास आणि विचाराची अचूकता वाढविण्यास इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे की, गेल्या पन्नास वर्षांत देशापुढे शिक्षणाची एकच पद्धत ठेवण्यात आली आहे. आणि देशावर एकच विचारप्रदर्शनाचे साधन लादण्यात आले आहे. म्हणून आपल्यापुढे असा पुरावा नाही की, ज्यामुळे सध्याच्या शाळा-कॉलेजांतून मिळणारे शिक्षण मिळाले नसते तर आपण कोण झालो असतो. तथापि आपल्याला इतके ठाऊक आहे की, आजचा हिंदुस्थान पन्नास वर्षांच्या पूर्वीच्या हिंदुस्थानपेक्षा अधिक दरिद्री झाला आहे, कमी संरक्षणक्षम झाला आहे, आणि हिंदी मुलांत कमी जोम आहे. सरकारच्या पद्धतीत उणीव आहे म्हणून हे घडले आहे हे मला सांगण्याची जरूरी नाही. त्या सर्वांत शिक्षणपद्धत ही अत्यंत सदोष आहे. त्या पद्धतीची धारणा आणि जन्म हा चुकीचा आहे. कारण इंग्रजी राज्यकर्त्यांची अशी प्रामाणिक समजूत होती की, देशी पद्धत ही अगदीच कुचकामाची आहे. त्या पद्धतीचे संगोपन पातकामध्ये झाले आहे. कारण त्या पद्धतीची प्रवृत्ती हिंदी लोकांचे शरीर, मन आणि आत्मा हा खुजा करण्याकडे आहे.

दुसरा गुप्त तह

"खुनाला वाचा फुटेल." ज्यांनी गेल्या अपवित्र युद्धात गुप्त तह घडवून आणले त्यांना ते तह शेवटी बाहेर येतील अशी कल्पना होती किंवा नाही हे सांगवत नाही. ते बाहेर येतील हे त्यांना ठाऊक असणे संभवनीय आहे आणि जे त्या तहांचे जनक आहेत, त्यांना टीकांचा भडिमार सहन करावा लागेल हेही कदाचित त्यांना ठाऊक असेल. हेही शक्य आहे की, ज्या वेळी हे तह घडवून आणले, त्या वेळी ते गुप्त राखले जातील, आणि ज्याकरिता ते केले गेले त्यांचा कार्यभाग झाला अशा प्रकारचे एक लुच्चेगिरीचे समाधान त्यांना झाले असले पाहिजे. मुंबई क्रॉनिकलने असाच एक तह बाहेर काढला आहे असे दिसते. आणि तो तह ब्रिटिश सरकार आणि मक्केचा शरीफ यांच्यामध्ये झाला असल्याचे सांगण्यात येते. जर हे खरे असेल तर ब्रिटिश मंत्री आपले उद्दिष्ट साध्य करण्याकरिता किती खालच्या थराला गेले हे दिसून येते. आणि आता उद्दिष्ट साध्य झाल्यामुळे ते आपल्याच लेखी शब्दांना रद्दी कागदाइतके महत्त्व देत आहेत. ग्रेट ब्रिटनवरील कोट्यवधी हिंदी लोकांचा विश्वास आता उडाला आहे आणि जोपर्यंत ग्रेट ब्रिटन आपली पावले मागे घेणार नाही व त्यांच्या नैतिक जीवनाचा नाश ज्या भ्रष्टाचारामुळे होतो त्यापासून स्वतःला ते शुद्ध करून घेणार नाहीत तोपर्यंत त्यांच्याशी सहकार्य करण्यास हिंदी लोक नकार देत असतील तर त्यात आश्चर्य काय ?

फार उशीर।

एका पारशी मित्राने टिळक स्वराज्य फंडाला दहा रुपये पाठविले आहेत आणि मुंबईहून एक पत्र पाठविले आहे त्यात ते लिहितात :

> तुम्ही पारशांना जी प्रार्थना केली आहेत तिला फार उशीर झाला. तुम्ही चळवळ कराल या भीतीने मुंबई सरकारने या वेळी २३ लाख रुपये आगाऊच उचल म्हणून खिशात घातले आहेत. जर पारशांना असे आश्वासन मिळाले की, दुसरी कोणतीही जमात त्यांच्या जागी येणार नाही आणि तुम्ही या पातकाचे कायमचे उच्चाटन कराल तर सुबुद्ध पारशी जमातीकडून तुम्हांला हार्दिक पाठिंबा मिळेल असे मी आश्वासन देतो.

जर सरकारने पूर्ण वार्षिक रक्कम आगाऊच घेतली असेल तर जे लोक मितपानाचे कार्य वाढावे याकरिता आपली दुकाने बंद करतील त्यांना अधिक अनुकूल काल आल्यानंतर आपले पैसे परत मिळालेच पाहिजेत. दारूचा व्यापार करणारे हे असहकारिता करणारे नाहीत हे उघड आहे. त्यांनी सरकारकडे आपले पैसे परत मिळावेत म्हणून अर्ज न करण्याचे काहीच कारण नाही. त्या मित्राने मागितलेल्या आश्वासनाबद्दल मला एवढेच म्हणावयाचे आहे की, अजूनपर्यंत कोणतीही सुधारणा त्यांच्या अटीवर अमलात आलेली नाही. त्यांच्या युक्तिवादाचा अर्थ इतकाच की, सर्व जण सद्‌गुणी झाल्याशिवाय कोणीही सद्‌गुणी होऊ नये. तथापि जे सुधारणा करणारे आहेत ते बाजूला उभे राहून उदाहरण घालून देत असतात. माझी पारशांना अशी प्रार्थना आहे की, इतर कोणी या चळवळीत येवो वा न येवो त्यांनी या मितपानाच्या चळवळीत सामील व्हावे. खरी गोष्ट अशी आहे की, बिगर पारशी लोकांपैकी कित्येकांनी हा दारूचा धंदा सोडून दिला आहे.

मेसोपोटेमियाचा आक्रोश

मेसोपोटेमियामधून आणि जे तेथून परत आले त्यांच्याकडून वाईट वर्तणुकीबद्दल तक्रारी येतात. प्रत्येक पत्रलेखकाने त्यांना मिळालेल्या अमानुष वागवणुकीबद्दल लिहिले आहे. मला अगदी ताजे पत्र मिळाले नाही. पण तसे पत्र मिळालेल्यांमध्ये शौकत अली हे एक होते. त्यांनी आपले पत्र माझ्याकडे पाठविले आहे. अशी पत्रे प्रसिद्ध न करण्याचे मला थांबविता येत नाही. त्यांच्या दुःखाला प्रसिद्धी मिळाल्यामुळे त्यांना दुःख हलके झाले असे वाटून घेण्याचा हक्क आहे. बाहेर देशांतील आपल्या देशबांधवांकरिता असहाय्य हिंदुस्थान यापेक्षा अधिक काही करू शकणार नाही. त्या पत्रावर तिघांच्या सह्या आहेत. मी मुद्दाम त्यांची नावे प्रसिद्ध करीत नाही. त्यात माझा उद्देश त्यांच्या अधिकाऱ्यांकडून त्यांच्या होणाऱ्या छळापासून त्यांचे संरक्षण करावे हा आहे. ज्यांनी पत्रे लिहिली आहेत ती अशांना लिहिली आहेत की, ज्यांची नावे ते वर्तमानपत्रात

वाचतात. अरबांच्याकडून आपल्याला वाईट रीतीने वागविण्यात येते अशी त्यांची तक्रार– ह्यात मला आश्चर्य वाटत नाही. अरब लोक स्वतः असहाय्य आहेत आणि ते आपला राग हिंदी शिपाई आणि कारकून यांच्यावर अशा आशेने काढतात की, मेसोपोटेमियामध्ये नोकरीकरिता येण्याचे धाडस त्यांनी करू नये. मी या पत्राला जी प्रसिद्धी देत आहे ती या आशेने की, ज्यांना तेथे आकर्षक नोकऱ्यांचे आमिष दाखविण्यात येते अशांनी या मोहात सापडू नये. शूर अरब लोकांच्या दुर्दैवाचा फायदा स्वाभिमानी हिंदी लोकांनी जीवनाचे साधन मिळविण्याकरिता बिलकूल घेऊ नये. मी ते पत्र हाती आले तसे शब्दशः[1] देत आहे. आणि त्यात बळी पडलेल्या लोकांच्या नावानंतर जो सैन्याच्या पलटणीचा उल्लेख आहे तो मी गाळीत आहे.

'यंग इंडिया', २७-४-१९२१

२४. जुगारीचा शाप

शर्यतीवर जे पैसे लावले जातात ते थांबविण्यात जर तुम्हांला यश आले तर तुम्ही हजारो युरोपियन व हिंदी पत्नींचे आभार व उपकार संपादन कराल. माझा नवरा शर्यतीत जोपर्यंत पैसे लावीत नव्हता तोपर्यंत तो एक आदर्श पती होता. आम्ही आता कर्जात आहोत. आणि जरी तो चांगला पगार मिळवितो आणि दारू पीत नाही, तरी आम्ही मोठ्या अडचणीत आहोत. आणि हाच अनुभव अनेक पत्नींचा असला पाहिजे अशी माझी खात्री आहे. मी वारंवार गुडघे टेकून त्यांची विनवणी केली आहे की, त्यांनी शर्यतीला जाऊ नये. आपले नवरे शर्यतीला जाण्यापासून आणि पैसे गमाविण्यापासून परावृत्त होत नाहीत, म्हणून त्यांच्या बायकामुलांनी दुःख भोगावे हे अत्यंत कष्टप्रद नाही काय ?

दारूमुळे हजारो लोकांचे वाटोळे होत आहे हे खरे आहे. पण शर्यतीत पैसे लावण्यामुळे लक्षावधी लोकांचे वाटोळे होत आहे.

लोकांच्या जवळजवळ चोऱ्या करून वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब, आपल्या युरोपियन नोकरांना चांगले पगार देऊ शकतो. टर्फ क्लब हा

१. पत्र येथे उद्धृत केले नाही.

हातचलाखीच्या युक्त्या करतो. या माझ्या म्हणण्याशी तुम्ही खात्रीने जर तुम्हांला सारा प्रकार कळला तर सहमत व्हाल. आणि अशा प्रकारे जनता फसविली जाते व त्यांचे पुष्कळसे पैसे चोरले जातात. तेव्हा कृपा करा, प्रयत्न करा. आणि या गोष्टी नीट मार्गावर आणा. ज्या वेळी बुक्-मेकर्सना शर्यतीच्या मैदानावर पैसे लावून घेण्यास परवानगी होती. त्या वेळी परिस्थिती खरोखरच चांगली होती.

महाशय, नव्या कायदेमंडळातील पुष्कळसे सभासद तुमच्या ओळखीचे असतील हे मला ठाऊक आहे; आणि त्यांच्या मदतीने तुम्ही शर्यतीमध्ये पैसे लावण्याचे बंद करण्यास यशस्वी व्हाल अशी मला खात्री आहे. जर सरकारने टोट्स् घेतले आणि त्यांची व्यवस्था केली तर माझी खात्री आहे की, सर्व प्रकार अधिक न्यायाचे आणि सरळ होतील. न चुकता लोक पैसे घालवितात आणि जे घोड्यांचे मालक असतात, जे घोडी शिकवितात, आणि जे जॉकी असतात ते मात्र पैसे कमावितात. आणि ही निर्लज्जपणाची कमाल नाही का, की सरकारने त्यांच्यातले काही मोठे अधिकारी घोड्यांच्या शर्यतीत हितसंबंधी असतात; म्हणून त्याकडे दुर्लक्ष करावे ?

माझा नवरा सरकारी नोकरीत आहे म्हणून मी या पत्रावर सही न करणे चांगले. पण माझी प्रार्थना अशी आहे की, मी जे काय लिहिले आहे, त्यात तुम्ही लक्ष घालावे आणि शर्यतीत पैसे लावणे बंद करण्यात यशस्वी व्हावे.

हे पत्र माझ्याबरोबर काही काळ भटकत आहे. ते पत्र हृदयद्रावक आहे, या माझ्या भावनांशी वाचक सहमत होतील. निनावी पत्रे ही क्वचितच मोलाची असतात. पण हे पत्र जरी पत्रलेखिका आपले नाव प्रगट करू इच्छित नसली तरी त्याला अपवाद आहे.

मला घोड्यांच्या शर्यतीची काही माहिती नाही. त्या शर्यतीशी संबद्ध असलेल्या गोष्टींमुळे मी भयग्रस्ततेने त्याकडे पाहतो. शर्यतीच्या मैदानावर पुष्कळ लोकांचे वाटोळे झाले आहे हे मला ठाऊक आहे.

पण मला त्याविरुद्ध लिहिण्याचे धाडस झाले नाही हे मी कबूल करतो. एखादे आगाखान, धर्मगुरू, व्हाइसरॉय आणि ज्यांना देशात सर्वश्रेष्ठ मानले जाते असे लोक जेव्हा या शर्यतींना उघडपणे आश्रय देतात आणि त्यावर हजारो रुपये खर्च करतात तेव्हा त्यासंबंधी मी लिहिणे निरर्थक आहे असे मला वाटले. पत्रकार आणि सुधारक या नात्याने या दुर्गुणाकडे लोकांचे लक्ष वेधावे एवढेच माझे काम आहे. त्यामुळे जनमत

निर्माण होईल अशी शक्यता मला वाटते. मला देवी टोचणे पसंत नाही. तथापि वाईट गोष्टींकडे लोकांचे लक्ष वेधणे हा मी निरर्थक प्रयत्न समजतो. शुद्धीकरणाच्या लढ्यात मद्यव्यवसाय आणण्यास मला धैर्य झाले नाही हे मी कबूल करतो. आपोआपच तो त्या लढ्यात आला. लोकांनी तो प्रश्न स्वेच्छेने घेतला.

असहकारिता ही शुद्धीकरणाची चळवळ आहे. त्याचे खात्रीचे गमक म्हणजे लोकांनी कोणाच्या तरी सांगण्याने किंवा शिकविण्याने पुष्कळसे दोष घालविण्याला आपणच सुरुवात केली आहे आणि अशाच आशेने पैसे लावण्यासंबंधीचे मी वरील पत्र प्रसिद्ध केले आहे.

थोडेसे फेरफार झाल्यास पत्रलेखिका संतुष्ट होईल हे मला ठाऊक आहे. पण ही कीड पूर्णपणे नष्ट व्हावयास पाहिजे आहे. शर्यतीत पैसे लावणे हा जुगारीच्या वेडाचा एक प्रकार आहे. जर फक्त लोकांनी असहकारिता केली तर हे पाप आपोआपच मरेल. जे हजारो लोक शर्यतीच्या मैदानावर जातात ते गमतीखातर जातात. घोडी धापा टाकीत कशी पळतात हे पाहण्याकरिता किंवा एक फॅशन म्हणून ते तेथे जातात. तथापि त्यांच्या जाण्याने ते पुष्कळ जुगार खेळणाऱ्यांच्या नाशाला साहाय्य आणि उत्तेजन देत असतात.

दारूपेक्षा जुगार हा हाताळण्याला अधिक कठीण प्रश्न आहे हे मी जाणतो. जेव्हा दुर्गुण हा फॅशन आणि सद्‌गुणही होतो तेव्हा त्याचा समाचार घेण्यास प्रदीर्घ काळ लागतो. शर्यतीत पैसे लावणे हे नुसते सभ्यपणाचे मानले जाते एवढेच नव्हे तर तो एक दुर्गुण आहे असे क्वचितच समजले जाते. दारू पिण्याचे तसे नाही. दारू पिणे हा जरी निश्चितपणे दुर्गुण मानला जात नसला तरी ती दुर्बलता आहे असे समजण्याची एक फॅशन झाली आहे. प्रत्येक धर्माने कमीअधिक त्वेषाने त्याचा धिक्कारच केला आहे. पण पैसे लावणे हे अशा प्रकारच्या खास टीकेतून निसटले आहे. शर्यतीच्या मैदानावर जाण्यापेक्षा अधिक निरुपद्रवी करमणूक जागृत जनतेला आढळेल, आणि ती जनता शर्यतीतल्या जुगाराबद्दल अशा प्रकारे आपली नापसंती व्यक्त करील अशी आशा बाळगू या.

'यंग इंडिया', २७-४-१९२१

२५. एका ब्राह्मणेतराची तक्रार

संपादक,
‘ यंग इंडिया ’ यांस,
महाशय,

गेल्या शुक्रवारी मद्रासच्या समुद्रकिनाऱ्यावर गांधींनी भाषण करताना ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यासंबंधी काही शेरे मारले. त्यांच्या भाषणामुळे मद्रासच्या राष्ट्रीय वृत्तीच्या ब्राह्मणेतरांना फार दुःख झाले आहे. जर या मुद्द्याला मि. गांधी यांनी स्पर्श केला नसता तर फार चांगले झाले असते; कारण त्यांच्या भाषणावरून असे स्पष्ट झाले की, द्रविडी सुधारणा, धर्म, संस्कृती आणि सध्याच्या ब्राह्मणेतर चळवळीची कारणे व त्यांतील आतला अर्थ याबद्दल त्यांना पूर्ण अज्ञान आहे. ज्या द्रविडी सुधारणांमुळे दक्षिण हिंदुस्थान हा बाकीच्या हिंदुस्थानापासून फार अलग वाटतो त्याची खास वैशिष्ट्ये त्यांना समजली आहेत असे वाटत नाही. हिंदुस्थानच्या (बहुतकरून उत्तर हिंदुस्थानच्या) धर्मात व सुधारणेत ब्राह्मणांनी जी भर घातली आहे त्याची स्तुती करताना त्यांनी न कळत ब्राह्मणेतरांना कलंक लावला आहे. या ब्राह्मणेतरांच्या पूर्वजांनी जरी अधिक नसली तरी ब्राह्मणांइतकीच भर दक्षिण हिंदुस्थानच्या वैभवात घातली आहे. ती गोष्ट त्यांच्या साहित्य, धर्म आणि तत्त्वज्ञानावरून दिसून येते.

वरील प्रकारासारखा दोषारोप साऱ्या समाजावर लादल्यामुळे त्यापेक्षा अधिक अपमानकारक त्यांना काही वाटणार नाही हे सांगण्याची जरूरी नाही. ज्याचे अंतःकरण प्रेमाने ओथंबलेले आहे, आणि ज्याच्याविषयी समाजात अत्यादर आहे अशा व्यक्तीने, अज्ञानाने जरी ही गोष्ट केली असली तरी मने दुखावली आहेत हे उघड आहे. याशिवाय गांधींच्या नुकत्याच झालेल्या भेटीचा उद्देश आणि पुढील महिन्याच्या मध्याला दक्षिणेत आखलेला त्यांचा प्रदीर्घ दौरा हा आपले कार्य बळकट करण्याकरिता आणि असहकारितेची चळवळ फैलाविण्याकरिता आहे असे आम्ही गृहीत धरतो.

अत्यंत तापदायक प्रश्नासंबंधी अविचारी आणि उथळ अभिप्राय व्यक्त केल्यामुळे, ते ज्या कार्याचा पुरस्कार करतात, ते कार्य कमजोर

होण्याची शक्यता आहे. आणि या गोष्टीबद्दल जनतेतील बहुसंख्य लोकांच्या तीव्र भावना आहेत. त्यांचीही सहानुभूती दुरावेल.

दक्षिण हिंदुस्थानात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यातील जे अंतर दुर्दैवाने रुंदावत आहे, ते जर संकुचित करावयाचे असेल तर गांधींनी हा प्रश्न मोकळ्या आणि साफ मनाने अत्यंत कळकळीने हाती घ्यावा. आणि तसे केल्यास त्यांना कदाचित काळजीपूर्वक अभ्यास केल्यानंतर हा प्रश्न सोडविता येईल. तसे करावयाचे नसल्यास त्यांनी असहकारितेच्या चळवळीच्या हिताच्या दृष्टीने दक्षिण हिंदुस्थानातील आपल्या प्रदीर्घ दौऱ्यात ब्राह्मण आणि ब्राह्मणेतरवाद हा पूर्णपणे बाजूला सारावा.

मद्रास, ११ एप्रिल १९२१ — सी. कंदास्वामी

अशाच प्रकारची आणखी काही पत्रे माझ्याकडे आली आहेत. पत्र-लेखकांनी माझ्याबद्दल स्पष्टपणे गैरसमज करून घेतला आहे. माझ्या भाषणाचा अहवाल मी पाहिला नाही, त्यामुळे तो अहवाल गैरसमजुतीला कारणीभूत होईल किंवा नाही हे सांगता येत नाही. पण ज्या द्रविडी संस्कृती कोणी नाकारीत नाही व कोणी त्या विवाद्यही मानीत नाहीत, त्या संस्कृतीच्या यशामुळे ब्राह्मणांनी हिंदुधर्माकरिता किंवा मानवतेकरिता जी सेवा केली आहे तिला बाधा येत नाही किंवा ती कमी प्रतीची ठरत नाही, असे मी म्हणतो. द्रविडांची दक्षिण आणि आर्यांची उत्तर अशा विभागणीच्या विरुद्ध मी पत्र-लेखकांना इषारा देऊ इच्छितो. आजचा हिंदुस्थान हा दोनच काय, पण इतर अनेक संस्कृतींच्या मिश्रणाने बनलेला आहे.

'यंग इंडिया', २७-४-१९२१

२६. गुजराती लोकांना

पहाटेची वेळ आहे आणि मी या बलाढ्य सिंधू नदीच्या किनाऱ्यावर एकटाच बसलो आहे. झाडांतून पक्षी किलबिल करीत आहेत. दोघातिघा स्वयंसेवकांपलीकडे येथे कोणीही नाही. दूर अंतरावर एका बाजूला कोटरीचा पूल दिसतो आहे आणि दुसऱ्या बाजूला पाणीच पाणी. दुसऱ्या किनाऱ्यावर झाडे आहेत आणि थोडीशी विखुरलेली

बरे आहेत. दोन-तीन लहानशा होड्या सुस्तपणे पाण्यात नांगर टाकून उभ्या आहेत. झुळझुळ वारा वाहात आहे आणि त्यामुळे पाणी तरंगाच्यारूपाने नाचत आहे व सुस्वर गान गात आहे. सूर्यप्रकाशात पाणी आणि वाळू सोन्यासारखी चकाकत आहे. माझ्या सिंधी बांधवांनी प्रेमाच्या रेशमी रज्जूंनी मला चहूकडून घट्ट बांधून ठेवले आहे.

आज सोमवार आहे. म्हणून त्यांनी माझ्याकरिता एक एकांताची व थंड जागा निवडून मला तेथे राहावयास सांगितले आहे. जेव्हा लोक मला म्हणतात, माझा त्याग मोठा, तेव्हा मी हसतो. जे माझे सुख, शांती आणि आनंद आहे ते एखाद्या बादशाहालासुद्धा मिळणार नाहीत. मला तर असे वाटते की, अशी शांती बादशाहाला-सुद्धा मिळणे अशक्य आहे. राज्याच्या जबाबदाऱ्यांमुळे तो चिरडून टाकला जातो. बंध किंवा मोक्ष याला मनच कारण आहे हे सत्य माझ्या अनुभवाने दृढ होते.

जेव्हा मी येथील माझ्या प्रेमाची गुजरातमध्ये मला नुकत्याच मिळालेल्या प्रेमाशी तुलना करतो, तेव्हा मला दोन्ही सारखीच वाटतात. मी जेथे जेथे जातो तेथे तेथे मला गुजरातसारखेच प्रेम मिळत आहे असे वाटते. त्याचे कारण असे आहे की, सिंधला मी माझीच भूमी समजतो आणि सिंधी लोकांची जी सुखदुःखे आहेत, ती मला गुजराती लोकांच्यासारखीच वाटतात. सिंधी लोकांच्या नुकसानीने गुजरातचा फायदा व्हावा अशी माझी स्वप्नातसुद्धा इच्छा नाही. पण माझी देशभक्ती आणि माझा धर्म मला जागृत ठेवीत आहेत. तसे न केल्यास सिंधला गुजरातचे व्यंग दिसून येईल. ज्याप्रमाणे सिंधचे गुजरातच्या फायद्याकरिता कधीही नुकसान होऊ नये असे मला वाटते, त्याचप्रमाणे मला परदेशांबद्दलही वाटते. परदेशाचे नुकसान होऊन हिंदुस्थानचा लाभ करण्याचा गुन्हा मी केलेला नाही. अशाच वृत्तीला मी खरी देशभक्ती म्हणतो.

पण माझी देशभक्ती जितकी संकुचित आहे तितकीच ती विशालही आहे. साऱ्या जगाच्या कल्याणाकरिता झटण्यात मला रस नाही. मी फक्त माझ्या देशाच्या कल्याणाकरिता रस घेत आहे. माझ्या देशाच्या फायद्यात मी जगाचा फायदा पाहतो. माझा वर्णाश्रमधर्म मला असे सांगतो की, युरोपमध्ये जन्माला येण्याऐवजी मी हिंदुस्थानात जन्माला आलो यात काही तरी अर्थ असावा. प्रत्येक मनुष्य हा जन्मतः ऋणी असतो. जर दुसरे लोक त्याचे ऋण लागत असतील तर तो त्याचा कधीही विचार करीत नाही व त्याने करूही नये. जो व्यापारी आपल्या देण्याची बाजू तपासतो त्याला घेण्याच्या हिशेबाबद्दल डोके शिण-विण्याचे कारण नाही. जो माणूस आपले कर्तव्य बजाविण्यास शिकतो त्याला आपले हक्क आपोआपच प्राप्त होतात.

जी कर्तव्ये माझ्या देशाला करावयाची आहेत त्यांच्याकडे माझे लक्ष, माझा देशा-भिमान वळवितो. गुजराती म्हणून मला जो अभिमान आहे, तो अभिमान गुजराती लोकांचे हिंदुस्थानसंबंधी कर्तव्य काय एवढेच मला सांगतो. जर माझी ही विचारसरणी

बरोबर असेल आणि ती विचारसरणी गुजराती बंधुभगिनी स्वीकारीत असतील तर त्यांना कोणते कर्तव्य बजावावयाचे आहे, हे निःसंशयपणे कळून येईल.

गुजरात हा स्वतः हे वर्ष संपण्यापूर्वी स्वराज्य मिळवू शकेल. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे स्वराज्य मिळविता येईल, प्रत्येक खेड्याला आपले स्वराज्य मिळविता येईल; आणि प्रत्येकजण स्वतःचे स्वराज्य मिळविताना हिंदुस्थानच्या स्वराज्य मिळविण्याला मदत करील.

स्वतःचा हिस्सा उचलून आणि अधिक प्रयत्न न करून जे संतुष्ट राहतील ते आपण कृपण आहोत असे दाखवितील. स्वराज्य मिळविण्याकरिता जी अट पुरी करावयाची आहे ती प्रत्येकाने आपला हिस्सा पुरा करून भागणार नाही. सर्वांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. जेव्हा प्रत्येक व्यक्ती सर्वांनी मिळून जो बोजा उचलावयाचा आहे, त्याचा भार वाहाण्यास तयार होईल त्याच वेळी त्या ओझ्याची परिणामकारक रीतीने वाटणी होईल. कारण प्रत्येकाची शक्ती सारखी नसते. शिवाय अशा परिस्थितीत प्रत्येकजण आपल्यापुरतेच काम करू लागला आणि अधिक काम नाकारू लागला तर गरिबांना श्रीमंत लोक चिरडून टाकतील.

हिंदुस्थानची लोकसंख्या ३२ कोटी आहे. एक कोटी देणे किंवा जमा करणे याचा अर्थ प्रत्येक माणसाने दोन पैसे देणे आहे. जर लक्षाधीश माणसे दोन पैशांपेक्षआम्ही अधिक देणार नाही असे म्हणू लागली, तर जे निराश्रित आहेत, जी मुले आहेत, जे पंगू आहेत आणि जे निर्लज्ज आहेत त्यांच्याकरिता कोण देणार? खरी गोष्ट अशी की, जो लक्षाधीश आहे त्याने सारा बोजा उचलण्यास तयार असले पाहिजे. ज्याला विपुल संपत्ती दिली गेली आहे त्याने विपुल दान करावे.

गुजरातने या पद्धतीच्या गणिताप्रमाणे आपल्या वाट्याचा हिशेब करावा. गुजरातकडून १० लक्ष रुपयांची अपेक्षा करणे ही खरोखर चूक नाही. ही दहा लाखांची रक्कम ठरविताना मी गुजरातबाहेरील गुजरात्यांचा विचार करीत नाही. बंगालमध्ये राहणाऱ्या गुजरात्यांनी वाटल्यास गुजरातला आपली वर्गणी पाठवावी, पण बंगालमध्ये त्यांनी आपला हिस्सा दिलाच पाहिजे. मद्रासमध्ये राहणाऱ्या गुजरात्यांनी मद्रासची सेवा केलीच पाहिजे. जर गुजराती आपल्या संपत्तीचा मोठा विनियोग, ज्या ठिकाणी ते संपत्ती मिळवितात त्याच ठिकाणी केला तर, त्यात त्यांची व हिंदुस्थानची संस्कृती दिसून येईल. हे सर्व विचार मनात बाळगून मी गुजरातचा वाटा दहा लाख रुपये ठरविला आहे.

हा आकडा ठरविताना मी मुंबई शहर वगळले आहे. मुंबई शहरात राहणाऱ्या गुजराती बांधवांनी योग्य ती रक्कम तेथेच दिली पाहिजे. मुंबई शहरातून किती रकमेची

अपेक्षा करावयाची त्याबाबत मी पुढे लिहिणारच आहे. सध्या गुजरातमध्ये राहणाऱ्या गुजरात्यांनी १० लाख रुपये जमविले पाहिजेत एवढीच माझी अपेक्षा आहे.

ही रक्कम किंवा दुसरी लहानमोठी रक्कम जमविण्याचा व्यावहारिक मार्ग म्हणजे, प्रत्येक जिल्ह्यातील आणि हिंदी संस्थानांतील कार्यकर्त्यांनी आपल्याला जी शक्य असेल ती रक्कम जमविण्याची जबाबदारी घेणे हा होय.

हा नियम काँग्रेस सभासद नोंदविण्यालाही लागू पडतो. जेथे जागृती अधिक झाली असेल तेथे अधिक सभासद नोंदविण्याची आशा बाळगावी. सुरत आणि नडियाद-सारख्या ज्या गावांत पुष्कळ जागृती झाली आहे, ती गावे आपल्या वाट्याचे सभासद नोंदवून संतोष मानतील तर जी लढाई आपण जिंकण्याच्या बेतात आहो, ती लढाई आपण हरू. ज्या ठिकाणी पुष्कळ जागृती झाली आहे त्या ठिकाणी २१ वर्षांवरील प्रत्येक प्रौढ काँग्रेस सभासद म्हणून नोंदविला गेला पाहिजे. मग ती स्त्री असो, पुरुष असो, धेड असो, भंगी असो, हिंदू असो किंवा मुसलमान असो. जर एखाद्या माणसाला चार आणेही देण्याची ऐपत नसेल तर त्याच्या शेजाऱ्याने ही रक्कम द्यावी आणि त्याला सभासद म्हणून नोंदवावे.

सभासद नोंदणी आणि निधी जमविणे याबद्दल जी ही विचारसरणी आहे, ती चरख्यांनाही लागू आहे. ज्या ठिकाणी काम करण्याची अधिक शक्ती असेल आणि जेथे अधिक जागृती झाली असेल तेथे अधिक चरखे सुरू करण्यात आपल्याला यश मिळाले पाहिजे. अशाच प्रकारे एकमेकांना मदत करून आपला नेमस्त, साधा आणि समजण्याला सोपा असा कार्यक्रम अमलात आणण्यात आपण यशस्वी होऊ.

जरी कार्यक्रम सोपा असला तरी आपण सुस्त राहिलो तर तो कधीच पार पाडला जाणार नाही. जर सर्व कार्यकर्ते प्रामाणिकपणे खटपट करतील आणि आपले काम सतत शक्तिसर्वस्व खर्चून करीत राहतील तरच तो कार्यक्रम अंमलात येईल. या कार्यक्रमाने आपली परीक्षा होणार आहे, आपली परीक्षा घेतली जाणार आहे आणि स्वराज्याच्या शिक्षणाचा तो श्रीगणेशा आहे आणि या प्राथमिक अवस्थेत आपण इतके दूरवर जाणार आहोत की, जर त्या चाचणीत आपण यशस्वी होऊन बाहेर पडलो तर बाकीच्या शिक्षणाला तीन महिनेही लागणार नाहीत. कारण त्या चाचणीमुळे आपल्याला आत्मविश्वास, धैर्य आणि शक्ती प्राप्त होणार आहे.

गुजरात आपले कर्तव्य पूर्णपणे पार पाडील अशी मला आशा आहे.

गुजरातच्या स्त्रियांमध्ये झालेली जागृती पाहून मला आश्चर्यच वाटले. त्यांच्या हातात फार मोठी शक्ती आहे. स्वराज्याकरिता करावयाच्या कार्यक्रमात बायकांचा वाटा पुरुषाइतकाच काय पण त्याहीपेक्षा मोठा आहे. गुजरातच्या स्त्रियांनी आपला हिस्सा पूर्ण

करावा आणि स्वतःला आणि गुजरातच्या आणि हिंदुस्थानच्या नावाला वैभव प्राप्त करवून द्यावे अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १-५-१९२१

२७. माझी टिप्पणे

हरताळ सवंग करणे

हरताळाची साथच उठली आहे असे दिसते. विशेषतः कराचीने मर्यादा उल्लंघिल्या आहेत. एका महिन्यात पाच हरताळ! कोणाला पकडले की हरताळ, कोणाला सोडले की हरताळ आणि गव्हर्नर आला की हरताळ. अशा हरताळांमुळे त्याची किंमत जाते. मला हरताळ म्हणजे एक पवित्र व जोरदार शस्त्र वाटते. एखाद्या मोठ्या धार्मिक महत्त्वाच्या प्रसंगी हरताळ योग्य असतो, किंवा ज्या वेळी लोकांच्या भावना फार प्रबळ होतात त्या वेळी त्या व्यक्त करण्याकरिता हरताळ पाडणे हे योग्य असते. जर आपण कोठल्याही प्रत्येक प्रसंगाकडे धार्मिक महत्त्वाच्या दृष्टीने पाहू लागलो, आणि केव्हाही काही तरी घडले म्हणजे प्रबळ भावनांनी उचंबळून जाऊ लागलो व हरताळाचा पुकारा केला तर ज्या आपल्या साधनाला आपण धार्मिक महत्त्व देतो किंवा त्यात भावनांची शक्ती आहे असे समजतो, ते साधन आपण सवंग करतो. सत्याग्रहसप्ताहात हरताळाशिवाय आपले चालणार नाही असे जर मला वाटले नसते तर, मी या सवंग हरताळाच्या मोसमात हरताळाची किंमत आणखी खाली उतरविण्यास खात्रीने साधनीभूत झालो नसतो. यानंतर क्वचित प्रसंगीच हरताळ पाडला जाईल अशी मला आशा आहे. कॉंग्रेस आणि खिलाफत कमिटीने या प्रश्नाची चर्चा केल्याशिवाय आणि त्यासंबंधी पत्रक काढल्याशिवाय कोणीही हरताळ पाडू नये हा सर्वोत्तम मार्ग.

तुरुंग – राजवाडा

कोणीही पकडला गेला असता हरताळ पाडणे हे आपल्या दुर्बलतेचे लक्षण आहे. आपल्याला प्रत्यक्षच तुरुंग भरावयाचे आहेत. जेव्हा हजारो लोक तुरुंगात जातील तेव्हाच आपण दास्यातून मुक्त होणे शक्य होईल. जुलमी सरकारच्या राज्यात सज्जन माणसांना तुरुंग ही तीर्थस्थाने असतात. आपल्या स्वातंत्र्याचे

वसतिस्थान तुरुंग हेच आहे. जेव्हा संपूर्ण निरपराधी माणसे मोठ्या संख्येने तुरुंगात असतात तेव्हा स्वराज्य जवळ आले आहे असे मानावे. जर या सरकारच्या अंमलाखाली तुरुंग हे नैसर्गिक घर करावयाचे असेल तर, जर एखाद्याला पकडले तर हरताळ पाडण्यात काही अर्थ नाही. जर आपली तुरुंगाची भीती खरोखर नाहीशी झाली असेल तर सरकार आपल्याला तुरुंगात टाकणारच नाही. पोटावर सरपटण्याऐवजी जर आपण अत्यंत निष्ठुर असे अत्याचार हसतमुखाने सहन केले, बळजबरीने युनियन जॅकला सलाम करण्याचे नाकारले आणि जमिनीवर नाके घासली नाहीत, डायरशाहीला तोंड देण्याकरिता सामोरे गेलो आणि पाठीवर गोळ्या खाण्याऐवजी छातीवर गोळ्या झेलल्या तर त्याच दिवशी आपल्या हातात स्वराज्य येईल; कारण शौर्य, खरी क्षत्रिय वृत्ती यांतच आहे. ही वृत्ती संपादन करण्याकरिता सुदृढ शरीराची जरूरी नसून सुदृढ अंतःकरणाची जरूरी आहे. क्षत्रिय वृत्तिची लक्षणे, क्रूरता आणि अंतःकरणाची निष्ठुरता ही नाहीत.[1] सोशिकपणा, क्षमा, दयालुत्व, औदार्य, अपलायन[2] आणि गोळ्यांचा वर्षाव होत असता अविचलित व निर्भयपणे उभे राहण्याची शक्ती असणे यात खरे क्षत्रियत्व आहे. खरा क्षत्रिय हा कोणाला ठार मारीत नाही, पण स्वतःवर प्रहार करून घेतो. नानकानासाहेबचा महंत क्षत्रिय नव्हता. तो खुनी[3] होता. लछमनसिंग आणि दुलीपसिंग[4] हे खरे क्षत्रिय होते. ही क्षत्रियवृत्ती एखाद्या दुर्बल आणि अपंग मुलातही दिसून येते. हे क्षत्रियाचे गुण संपादन करण्याकरिता अनत्याचारी असहकारिता हे एक साधन आहे. इमाम हुसेन आणि हसन हे क्षत्रिय होते. त्यांचा छळ करणारा जुलमी होता. प्रल्हाद बाळ हा क्षत्रिय होता आणि हिरण्यकश्यपू हा राक्षस होता. वर्णाश्रमाचा अर्थ असा नाही की, दुसऱ्या जातीच्या लोकांमध्ये क्षत्रिय वृत्ती असू शकत नाही. चारही वर्णांच्या लोकांत क्षत्रियांचे गुण असावेत. पण क्षत्रियांमध्ये ते प्रामुख्याने असावेत. क्षत्रियाने त्या गुणांची वाढ आपल्या आयुष्यात करावी. पण जो कोणी क्षत्रिय म्हणून जन्मला असेल आणि आपली पाशवी शक्ती दुर्बलाविरुद्ध उपयोगात आणीत असेल, तो क्षत्रिय नसून त्याच्याविरुद्ध म्हणजे राक्षस आहे. हिंदुस्थानातून ही क्षत्रियवृत्ती समूळ नष्ट झाली आहे. आणि अनत्याचारी असहकारितेचा उद्देश तिचे पुनरुज्जीवन करावे असा आहे.

संस्कृतिहीनता

नेकनामदार गव्हर्नर साहेबांच्या कराचीच्या भेटीच्या वेळी प्रसिद्ध झालेल्या चोपड्याची प्रत माझ्या हाती आली आहे. तीत पुढील वाक्ये आहेत.

१. एप्रिल १९१९ मध्ये पंजाबात लष्करी कायद्याच्या वेळी हे अपमान लोकांच्यावर लादले. पहा, १७.

२. रणांगणातून भीतीने पळून जाणे.

३ व ४. या हकिकतींकरिता पाहा, खंड १९, प्रकरण २२४.

आज सकाळी गव्हर्नर येत आहे. त्याच्या सन्मानाकरिता निघणाऱ्या मिरवणुकीत सामील होऊ नका. कोणाही हिंदी माणसाने सध्याच्या सरकारबरोबर कोणत्याही प्रकारे सामील होऊ नये, असे आपल्या काँग्रेसने फर्माविले आहे. सोमवार २१ रोजी हरताळ पाडा आणि सरकारला असे दाखवा की आम्हांला स्वराज्य हवे आहे. सर्व कामे थांबवा आणि एका वर्षात स्वराज्याकरिता देवाची प्रार्थना करा.

असहकरितावाद्याने असभ्य होऊ नये. अधिकारावर जे लोक असतील त्यांना आदराने संबोधण्यास आपण चुकू नये. कारण यानंतरदेखील तसा आदर दर्शविण्याचा आपला हेतू आहे. आपली असहकारिता मुंबईचा गव्हर्नर या व्यक्तीविरुद्ध किंवा तो ज्या पदावर आहे त्याच्याविरुद्ध नाही. ती राजकीय पद्धतीविरुद्ध आहे. जेव्हा गव्हर्नर त्याच्या इलाख्यातील एखाद्या भागाला भेट देतो, तेव्हा त्याच्याविरुद्ध खास गाऱ्हाणे असल्याशिवाय हरताळ पाडण्यात अर्थ नाही. असभ्य भाषेत त्याचा उल्लेख करणे हे संस्कृतिहीनतेचे आहे. जालियनवाला बागेतील कत्तल करणाऱ्या माणसासंबंधी आपण त्याचे पूर्ण नाव उच्चारतो. जनरल डायर असा उल्लेख करताना आपल्याला पश्चात्ताप वाटत नाही व वाटण्याची जरूरी नाही. जो असकारितावादी ही औपचारिक आदराची भाषा उपेक्षितो, तो स्वतःवर लादून घेतलेल्या शांततेच्या नियमांचा भंग करतो.

निदर्शन – पण कोणाला ?

प्रत्येक प्रसंगी हरताळ पाडावा असा काँग्रेसचा आदेश नाही. पण वरील विनंतिपत्रात तसा आदेश आहे असे दिसते. हरताळातून आपण सरकारला काय दाखविण्याची जरूरी आहे ? आपण आपल्या शक्तीतून स्वराज्य कमाविणार आहोत. हरताळातून जर आपणाला शक्ती मिळणार असेल तर अवश्य हरताळ पाडू या. तथापि या प्रसंगी ती विनंती असे स्पष्ट करते की, सरकारला काही तरी दाखविण्याकरिता हरताळ पाडावयाचा उद्देश होता. सरकारला काहीसुद्धा दाखविण्याची जरूरी नाही; किंवा उलट आपण भरभक्कम कामगिरी दाखविण्याची आवश्यकता आहे. ते काम कोणते हे काँग्रेसने दिग्दर्शित केले आहे.

माझी प्रार्थना

अंत्यज परिषदेच्या[१] वेळी मी जी प्रार्थना केली त्यासंबंधी एक सद्गृहस्थ लिहितात की, त्यांना त्यातला मुद्दाच कळला नाही. माझ्या भाषणाचा बिनचूक अहवाल प्रसिद्ध झाला किंवा नाही हे मला ठाऊक नाही. माझी प्रार्थना अशी : मला एकच गोष्ट प्रिय

१. पाहा खंड १९, प्रकरण २८४.

आहे आणि ती मोक्ष. ह्याच जन्माच्या शेवटी मोक्ष मिळावा याकरिता माझे सर्व प्रयत्न आहेत. असहकारितेसारखी गंभीर चळवळ मी याच हेतूने हाती घेतली आहे. तथापि ह्याच जन्माच्या अखेरीस माझी आकांक्षा पुरी झाली नाही आणि तोपर्यंत अस्पृश्यतेचे पाप नष्ट झाले नाही, तर मी परमेश्वराला अशी प्रार्थना करीन की, मला पुढील जन्म अंत्यज कुटुंबात दे. म्हणजे ते जी सर्व दुःखे भोगतात, ती मला भोगता येतील. आणि त्यांची दुःखे हलकी करण्याकरिता उग्र तपश्चर्या करता येईल. वैष्णव म्हणून दयालुत्वाला जी किंमत द्यावी असे मी शिकलो आहे आणि जिचे आकंठपान मी तुळसीदासांच्या रामायणातून केले आहे, ते मला याशिवाय दुसऱ्या कशाचीही प्रार्थना करू नकोस असे शिकविते. हिंदुधर्माच्या नावाखाली अंत्यजांचा जो छळ होतो तो मला सहन होत नाही आणि तसे प्रत्येक हिंदूला वाटले पाहिजे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १-५-१९२१

२८. टिप्पणे

एक पीछेहाट

जर वृत्तपत्रात आलेल्या गोष्टी प्रामुख्याने खऱ्या असतील तर मालेगावच्या असहकारितावाद्यांनी आपल्या ध्येयाची, श्रद्धेची आणि देशाची प्रतारणा केली आहे. त्यांनी प्रगतीच्या घड्याळाचे काटे मागे सारले आहेत. असहकारितेची सारी इमारत अनत्याचाराच्या खडकावर बांधली आहे. तो काढून घ्या, आणि प्रत्येक त्यागाची कृती शून्य ठरेल. जसे कृत्रिम फळांत दिखाऊपणाशिवाय काही नसते तसे हे होईल. जी माणसे आपली कर्तव्ये करीत होती त्यांचे खून, जर अहवाल बरोबर असेल तर, बुद्धिपुरःसर करण्यात आले. तो भेकडपणाचा हल्ला होता. काही लोकांनी आपल्या इच्छेनुसार कायदा मोडला आणि शिक्षा ओढवून घेतली.

अशा तुरुंगवासाबद्दल रागावण्याला काहीही कारण नव्हते. जे मालेगावसारखे[1]

१. खिलाफत कार्यकर्त्यांच्या खटल्यामुळे क्षुब्ध होऊन जमावाने केलेल्या अत्याचारात एप्रिल १९२१ मध्ये एक फौजदार आणि चार शिपाई ठार मारले गेले.

अत्याचार करतात ते सरकारचे खरे सहकारी आहेत. जर सरकारला काही अधिकारी गमावून असहकारितेची चळवळ नष्ट करता आली तर ते तसे आनंदाने करतील आणखी थोडे खून होऊ द्या, म्हणजे आपण जनतेची सहानुभूती घालवून बसू. आपल्याकडून झालेले अत्याचार जनता सहन करणार नाही अशी माझी खात्री आहे. लोक हे स्वभावतःच शांतताप्रिय असतात. आणि त्यांनी असहकारितेचे जे स्वागत केले आहे त्याचे कारण ती विचारपूर्वक अनत्याचारी आहे म्हणून.

तर मग आपण काय करू या ? आपण सतत अत्याचाराविरुद्ध जाहीर आणि खाजगीरीत्या उपदेश करीत राहिले पाहिजे. जे दुष्कृत्ये करतात त्यांना सहानुभूती दाखविता कामा नये. या खुनांत ज्यांनी भाग घेतला असेल त्यांना जर खरोखर पश्चात्ताप झाला असला तर त्यांनी सरकारच्या स्वाधीन व्हावे, असा सल्ला त्यांना दिलाच पाहिजे. जे कार्यकर्ते आहेत त्यांनी आपल्या बोलण्यात दुप्पट खबरदारी घेतली पाहिजे. सरकार आणि अधिकारी यांच्या दुष्कृत्याबद्दल बोलण्याचे त्यांनी थांबविले पाहिजे. मग ते अधिकारी युरोपियन असोत किंवा हिंदी असोत. शिरा ताणून बोलण्याऐवजी काँग्रेसने राष्ट्रापुढे राष्ट्र उभारणीचे काम ठेवले आहे ते केले पाहिजे. पैसे, माणसे आणि साधने यांच्या मागणीला जरी काहीही उत्तर मिळाले नाही तरीही आपण शांत राहिले पाहिजे. पोलिसांचे सर्व हुकूम कटाक्षाने पाळले पाहिजेत सुप्रसिद्ध कार्यकर्त्यांवर खटले भरले किंवा त्यांना तुरुंगात टाकले तरी हरताळ किंवा मिरवणुका काढू नयेत. जर आपण निरपराधी माणसांचा तुरुंगवास स्वागतार्ह मानीत असलो आणि तो तसाच मानला पाहिजे तर मग आपण आपल्या निरपराधित्वाची वाढ केली पाहिजे; आणि विशिष्ट मते धारण करण्याबद्दल शिक्षा झाल्यास किंवा ज्या कताईसारख्या किंवा निधी गोळा करण्यासारख्या किंवा काँग्रेस सभासद नोंदण्यासारखी जी आपली कर्तव्ये असतील ती करीत राहिल्याबद्दल आपण स्वतःचे अभिनंदन करून घेतले पाहिजे. सविनय कायदेभंग करता कामा नये. अत्यंत गंभीर अशा प्रक्षोभालाही आम्ही तोंड देऊ व अनत्याचारी राहू, अशी आपण प्रतिज्ञा केली आहे. आपल्या विजयाचा जो क्षण असेल तो आपण आपल्या मूर्खपणाने आपल्या पराभवाचा आणि अपमानाचा क्षण ठरणार नाही अशी दक्षता घेऊ या. टाइम्स ऑफ इंडियाने जी चांचणी सुचविली आहे ती आपण संपूर्णपणे पाळू या. जी चळवळ प्रकटपणे आत्मशक्तीवर आधारलेली आहे, त्या चळवळीच्या किंमतीची एकच परीक्षा असू शकेल आणि ती म्हणजे, ती चळवळ करणाराचा आत्यंतिक प्रामाणिकपणा ही होय हे आपण मान्य केले पाहिजे. एकदा का प्रामाणिकपणाबद्दल खरे वाटण्याइतका संशय निर्माण झाला म्हणजे अशा काही शक्ती आत घुसतील की ज्या त्या प्रामाणिकपणाचा नैतिक नाश हा अपरिहार्यपणे घडवून आणतील.

सिंधबद्दल विचार

सिंधमध्ये भरगच्च कार्यक्रम होता. २४ आणि ३० तारखांच्या दरम्यान हैद्राबाद, कराची, लारखाना, शिकारपूर, सक्कर, रोहरी, कोट्री, मिरपुरखास असा हा दौरा म्हणजे मोठाच घास होता. आणि सक्करच्या मूळचंदने[1] यथायोग्य म्हटल्याप्रमाणे "काम अर्धेच होऊ शकले." दुसरा मित्र म्हणाला, "भाकरी नसण्यापेक्षा अर्धी भाकरी बरी." सिंधमध्ये खरोखरच इतर प्रांताइतकी सुंदर सामुग्री आहे. तेथे माणसे, पैसा आणि कर्तबगारी आहे. सिंधने मनात आणले तर तो नेतृत्व करील. पण वर सांगितलेल्या अनुकूल गोष्टी असतानादेखील तो आज तसे करू शकत नाही. "यंग सिंध" या पत्राला २५ तारखेला जे मी पत्र पाठविले, ते नंतरच्या अनुभवानेही बदलणार नाही.

सर्वांत कराची अत्यंत वाईट आहे. जिल्हावार पक्षांनी सिंध विभागला आहे. त्यांना मार्गदर्शक मध्यवर्ती संघटना नाही. पण कराचीत एक पक्ष नसून अनेक गट आहेत. कराचीबद्दलच मी पैशाच्या घोटाळ्यांच्या तक्रारी ऐकल्या. तेथील राष्ट्रीय सार्वजनिक शाळा आपले हिशेबच प्रसिद्ध करीत नाही असे मला सांगण्यात आले. कराची एक पुढारी मानीत नाही. पैशाच्या अफरातफरीचे आरोपही मी ऐकले. ते आरोप किती खरे आहेत हे मला ठाऊक नाही. पण ते आरोप माझ्याकडे इतक्या सातत्याने आणि इतक्या लोकांच्याकडून आणले गेले की, मला जनतेचे लक्ष त्याकडे वेधले गेले पाहिजे असे वाटले. लोक जे पैसे आपल्याला देतात, त्याच्या पै न् पैचा खरा हिशेब आपण देण्याला बांधलेले आहोत. मी राष्ट्रीय शाळांच्या चालकांना त्यांनी आपल्या व्यवहाराचे हिशेब द्यावेत, एवढेच सांगत नसून त्यांनी आपल्या शाळा सार्वजनिक व्यवस्थेखाली आणाव्यात असेही सांगतो. माझ्या मताप्रमाणे फक्त दोनच फंड असावेत. एक टिळक स्वराज्य फंड आणि दुसरा खिलाफत फंड. साऱ्या चळवळी एका किंवा दुसऱ्या संघटनेखाली चालाव्या. या दोनच संस्थांनी साऱ्या शाळांना पैसे पुरवावेत. निरनिराळ्या कार्यांकरिता निरनिराळे पैसे जमवू नयेत. आपण आपली शक्ती आणि साधने एकत्र आणि संघटित करावीत. पुष्कळ संस्था काढून ती शक्ती व साधने उधळून टाकू नयेत. स्वराज्याकरिता आपली लायकी आपण पुढील गोष्टी करून सिद्ध करावी. आपसातील मतभेद मिटविणे, मत्सर टाळणे आणि मध्यवर्ती संघटनेच्या नियंत्रणाला मान्यता देणे, मोठाल्या रकमा जमविणे आणि प्रामाणिकपणे खर्च करण्याची शक्ती आपल्यात आणणे, आपल्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे आणि आपली भांडणे मिटविणे, अन्न-वस्त्राच्या बाबतीत प्रत्येक खेडे स्वावलंबी करणे, आणि मद्यपान व अस्पृश्यता यांसारख्या राष्ट्रीय दुर्गुणांचे उच्चाटन करणे.

१. या वकिलाने गांधींच्या दौऱ्यात वकिली सोडली.

सिंधमध्ये चोहोकडे राष्ट्रीय शाळा निघत आहेत. या शाळांच्या चालकांनी मोठाली अंदाजपत्रके तयार करू नयेत, असा मी त्यांना इषारा देतो. माझ्या मताने यंदा तरी प्रत्येक शाळा व कॉलेज ही मुख्यत्वे पिंजण व कताईची संस्था बनली पाहिजे. शाळांत येणाऱ्या मुलांमुलींच्या श्रमातून त्यांचा मासिक खर्च भागला पाहिजे. भांडवली खर्चात फक्त थोडेफार सामान आणि चरखे यांचा समावेश व्हावा. इंग्रजी अभ्यासावर वेळ खर्चून आपण राष्ट्रीय वेळेचा दुरुपयोग करू नये. जर एक वर्षात स्वराज्य मिळवावयाचे असेल आणि जर आपला असहकारितेच्या कार्यक्रमावर आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ठरावावर विश्वास असेल, तर आपण काही मूलभूत तत्त्वे मानली पाहिजेत अशी आपल्याकडे कळकळीची मागणी आहे.

आता टीका पुरे. तेथे आशा वाटण्यासारखे पुष्कळ होते. उसळणारा आणि जवळजवळ गोंधळात टाकणारा उत्साहाचा देखावा अंतःकरण उचंबळून टाकणारा होता. सिंधी स्त्रियांनी टिळक स्वराज्य फंडाला मुक्तहस्ताने पैसा दिला. पंचवीस हजारांची थैली देऊन कराचीने आघाडी गाठली. ती थैली माझ्याकरिता आहे व तिचा उपयोग माझ्या आवडीप्रमाणे करावयाचा आहे. टिळक स्वराज्य फंडालाच मी थैली देऊ शकतो.

खाली जमा झालेल्या रकमांचा ढोबळ अंदाज आहे.

कराची	रु. ३०,०००
लारखाना	" १,०००
शिकारपूर	" १५,०००
सक्कर	" १०,०००
रोहरी	" १,०००
नवाबशहा	" ५,०००
हैद्राबाद	" १५,०००
मिरपुरखास	" १,०००
किरकोळ	" १,०००

सिंधमध्ये असहकारिता करणारे विद्यार्थी अत्यंत मौल्यवान काम करीत आहेत. शिकारपुरीमध्ये आपसात एक भयंकर भांडण झाले व त्याचा परिणाम अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींना तुरुंगात जाण्यात झाला. पण साधु वास्वानी[1] यांच्या प्रयत्नामुळे त्यांनी आपले मतभेद मिटविले ही अत्यंत उत्तेजनपर गोष्ट आहे.

१. टी. एल. वास्वानी (१८७९-१९६६); सिंधचे सत्पुरुष; गीता मेडिटेशन्स, दि फेस ऑफ बुद्ध आणि इतर ग्रंथांचे लेखक; पुण्याच्या मीरा शिक्षणसंस्थेचे संस्थापक.

त्यामुळे पकडलेल्या सर्व लोकांना सोडून देण्यात आले. जर आपण कधीच भांडलो नाहीतर आपण अतिमानुष होऊ; पण जेव्हा आपण उदार होतो आणि आपले मतभेद सलोख्याने मिटवितो तेव्हा आपण माणसे आहो असे सिद्ध करतो.

हरताळाचा दुरुपयोग

कराचीचा एक पत्रलेखक मला पत्र लिहिताना त्या शहरात वारंवार पडणाऱ्या हरताळांबद्दल खेद प्रकट करतो. इंडियन सोशल रिफॉर्मरमध्ये याच विषयावर आलेले एक कात्रण मी पाहिले आहे. अलीकडे हरताळ फार सवंग झाले आहेत, ह्या त्या पत्राच्या टीकेशी मी सहमत आहे. हरताळांची किंमत झपाट्याने उतरत आहे. जर ६ आणि १३[1] एप्रिल या तारखांना पावित्र्य नसते तर त्या दोन दिवशीही हरताळ पाडू नयेत असे मी म्हटले असते. हरताळ हे एक तर कसल्या तरी अवटित घटनेच्या निषेधासाठी असतात किंवा धार्मिक निदर्शनाकरिता असतात. जेव्हा नामदार गव्हर्नर-साहेब कराचीला आले तेव्हा हरताळ पाडण्याला काहीच कारण नव्हते. जर तो हरताळ व्यक्तिशः त्यांच्याविरुद्ध निदर्शन करावे म्हणून असला तर ते सदभिरुचीचे लक्षण नव्हते. कारण माझ्या मताने ते एक अत्यंत शहाणे अधिकारी आहेत. आणि जर त्यांना या दुष्ट पद्धतीत शासनाकरिता बोलाविले नसते तर ते लोकप्रिय गव्हर्नर झाले असते. तुरुंगवास किंवा सुटकेकरिता पाडलेले हरताळ हे तितकेच हीन अभिरुचीचे आहेत. तुरुंगवासामुळे आपल्यात भीती निर्माण होता कामा नये. घाणेरड्या जागी रोग होणे, ही जशी स्वाभाविक अवस्था आहे त्याचप्रमाणे अन्यायी सरकारात निरपराधी लोकांच्या नशिबी तुरुंगवास येणे ही सामान्य गोष्ट मानली पाहिजे. जेव्हा आपण तुरुंगवासाला भिणार नाही, तेव्हा सरकार आपल्याला तुरुंगात टाकणार नाही. जेव्हा सरकारच्या भयानक शिक्षा, डायरशाहीदेखील भीतीने आपल्याला भयग्रस्त करू शकणार नाहीत तेव्हा सरकारच अस्तित्वात राहणार नाही किंवा ते सुधारेल (त्याचा अर्थ तोच). तुरुंगवासासंबंधी हरताळ पाडणे हे घाबरटपणाचे लक्षण आहे आणि म्हणून ते हरताळ निषिद्ध मानले पाहिजेत. 'स्थानिक पुढाऱ्यांनी मध्यवर्ती कचेरीच्या संमतीशिवाय हरताळ पाडू नयेत हे इंडियन सोशल रिफॉर्मरचे म्हणणे मला मान्य आहे. ६ आणि १३ एप्रिलशिवाय प्रत्येक हरताळ हा ऑल इंडिया काँग्रेस कमिटी आणि मध्यवर्ती खिलाफत कमिटी यांनी संयुक्तपणे जाहीर करावा असा एक नियम असावा. हरताळ सवंग करणे हे दुर्दैवाचे ठरेल.

'यंग इंडिया', ४-५-१९२१

१. एप्रिल १९१९ या जालियनवाला बागेतील घटनेपासून या तारखांना राष्ट्रीय आठवडा म्हणून मानण्यात आले; पहा, खंड १९, प्रकरण २३९.

२९. प्रश्नमालिका[१]

मी पहिल्या प्रश्नाचा समाचार निराळ्या लेखात[२] घेतला आहे. दुसऱ्या प्रश्नासंबंधी मला वाटते की, जे देवाला भितात तेच खरे असहकारितावादी होऊ शकतात. असहकारितेच्या कार्यक्रमात माणसाने आपली श्रद्धा जाहीर करण्याची जरूरी नाही. ज्या व्यक्तीचा अनत्याचारावर विश्वास असेल आणि जी व्यक्ती असहकारितेचा कार्यक्रम स्वीकारीत असेल तिला खात्रीने असहकारवादी होता येईल. तिसऱ्या प्रश्नासंबंधी, पत्र-लेखकाने परिस्थितीबद्दल गैरसमज करून घेतला आहे. राष्ट्राने संपूर्ण असहकारितेचा कार्यक्रम हाती घेतला नाही त्याचे कारण श्रद्धा किंवा इच्छेचा अभाव नसून कर्तृत्वशक्तीचा अभाव आहे. म्हणून राष्ट्राने सरकारी नोकरांना अद्याप आपल्या नोकऱ्या सोडण्यास सांगितले नाही; पण अशा कोणत्याही नोकराला त्याला वाटेल तेव्हा आपली नोकरी सोडण्यास मोकळीक आहे. पण जोपर्यंत अत्याचार उद्भवणार नाही अशासंबंधी सर्व योग्य सावधगिऱ्या घेतल्या नाहीत तोपर्यंत त्यांना तसे आवाहन करता येणार नाही. जोपर्यंत अशा लोकांना व्यवसाय देण्याची स्थिती राष्ट्राला प्राप्त झालेली नाही, तोपर्यंत असे आवाहन देता येणार नाही. म्हणून येथे सर्वसामान्यपणे समजले जाते त्याप्रमाणे युक्तिप्रयुक्तीचा प्रश्न नाही. अत्यंत शुद्ध धर्म म्हणजेच सर्वांत श्रेष्ठ उपयुक्तता. पुष्कळशा गोष्टी कायदेशीर असतात; पण त्या सर्व उपयुक्त नसतात. असहकारितेचे ध्येय म्हणजेच धर्म, हा सध्या देशासमोरील कार्यक्रम आहे.

चौथ्या प्रश्नासंबंधी, माझ्या स्वराज्याचा अर्थ असा आहे की, हिंदुस्थानला बाहेरील नियंत्रणाखेरीज स्वतःचे जीवन नियमित करता आले पाहिजे. हिंदुस्थानला आपला लष्करी खर्च व कर व वसुली करण्याची रीत नियमित करता आली पाहिजे. तिला वाटेल त्या ठिकाणाहून आपला प्रत्येक शिपाई काढून घेता आला पाहिजे. हे कसे करता येईल किंवा करणे शक्य होईल ते राष्ट्रावर अवलंबून राहील. लोकांनी स्वतंत्रपणे निवडलेल्या हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनी अंमलबजावणीची पद्धत ठरविली पाहिजे. जर एका वर्षात स्वराज्य स्थापन करता आले नाही, तर ज्यांनी शाळा सोडली असेल अशा एकाही विद्यार्थ्याला परत शाळेत जाता येणार नाही, किंवा वकिली सोडलेल्या वकिलाला ती परत सुरू करता येणार नाही.

' यंग इंडिया ', ४-५-१९२१

१. बरेलीच्या असफह हुसेन यांनी १५ एप्रिलला गांधींना पत्र लिहून चार प्रश्न विचारले होते. पहा. परिशिष्ट १.

२. पुढील प्रकरण पाहा.

३०. अफगाणिस्तानचा बागुलबुवा

एका पत्रलेखकाने विचारलेल्या प्रश्नांची मालिका वाचकांना इतरत्र पहावयास सापडेल. त्यांतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न, मौलाना महंमद अली यांनी अफगाण स्वारीच्या भीतीसंबंधी जे भाषण केले त्याला अनुलक्षून आहे. मी ते भाषण वाचले नाही. पण तो स्वारी करो किंवा न करो, एका अर्थाने मी खात्रीने अफगाणिस्तानच्या अमिराने ब्रिटिश सरकारविरुद्ध युद्ध पुकारले तर त्याला मदत करीन. याचा अर्थ असा, मी माझ्या देशबांधवांना उघडपणे सांगेन की, ज्या सरकारने सत्तेवर राहावे यासंबंधी राष्ट्राचा विश्वास उडाला आहे त्याला मदत करणे हा गुन्हा आहे. उलटपक्षी अमिराकरिता करांचा पैसा उभारा असेही मी हिंदी लोकांना सांगणार नाही. खिलाफतीकरिता, पंजाबकरिता आणि स्वराज्याकरिता जी हिंदू आणि मुसलमानांनी अनत्याचाराची श्रद्धा स्वीकारली आहे तिच्याविरुद्ध हे होईल आणि मला असे वाटते की, मौलाना महंमदअली यांच्या भाषणाचा अर्थ मी जो सूचित केला आहे त्यापेक्षा निराळा नसावा. जोपर्यंत हिंदू-मुस्लिम ऐक्याची प्रतिज्ञा कायम आहे तोपर्यंत त्यांना दुसरे काही सांगता येणार नाही. ती मोडण्यास मुसलमान मोकळे आहेत; पण जर या प्रकरणाची तपासणी केली तर ती प्रतिज्ञा तोडता येण्यासारखी नाही असे दिसून येईल. प्रतिज्ञाभंग म्हणजे हिंदुस्थानच्या उद्दिष्टांचा नाश. सध्या हिंदू व मुसलमान एकत्र येऊन सशस्त्र बंड करतील अशी मला शक्यता वाटत नाही. आणि मुसल्मानांना तर सशस्त्र बंडाची योजना करून यशस्वी होण्याची बिलकूल आशा नाही.

तथापि अफगाण स्वारीच्या बागुलबोवावर विश्वास ठेवण्याविरुद्ध मी वाचकांना इषारा देत आहे. त्यांच्या स्वतःच्या लष्करी लेखकाने आपल्याला त्यांचे गुप्त रहस्य पुष्कळ वेळा सांगितले आहे. ते रहस्य असे की, ज्या पुष्कळशा शिक्षेदाखल स्वाऱ्या केल्या जात, त्या शिपायांना शिक्षण देण्याकरिता मुद्दाम घडवून आणीत किंवा निरुद्योगी सशस्त्र लोकांना गुंतवून ठेवण्यासाठी केल्या जात. दुर्बल, निःशस्त्र, असाहाय्य, भोळसट हिंदुस्थानला ह्या सरकारने आपल्याला मोहजालात कसे अडकवून ठेवले हे समजत नाही. आपल्यातील सर्वश्रेष्ठ अशा लोकांना आजही खरोखर असे वाटते की, लष्करी अंदाजपत्रक जे फुगत चालले आहे, ते हिंदुस्थानचे रक्षण परक्या देशांच्या स्वारीपासून करावे याकरिता आहे. माझे म्हणणे असे की, ही जी वाढ होत आहे त्याचे कारण शीख, गुरखे, पठाण आणि रजपूत यांच्यावर विश्वास नसल्यामुळे होत आहे. याचा अर्थ आपल्यावर त्यांचा विश्वास नाही आणि ती वाढ आपल्याला सक्तीने गुलामगिरीत ठेवण्याकरिता केली जात

आहे. माझा असा विश्वास आहे (कदाचित मी चुकत असेन) की, सरकारला अमीराबरोबर तह करण्याची जी सतत चिंता लागून राहिली आहे, तिचे कारण रशियाच्या स्वारीच्या भीतीचे नसून हिंदी शिपायांचा विश्वास आपण गमावू ही भीती त्यांना वाटते म्हणून होय. आज रशियाच्या स्वारीची बिलकूल भीती नाही. माझा बोल्शेव्हिकांच्या संकटावर कधीच विश्वास नव्हता. पूर्वीच्या बंगालच्या लाडक्या व्यक्तीच्या आवडत्या म्हणीत सांगावयाचे म्हणजे जे सरकार "लोकांच्या प्रेमावर औरसचौरस उभे आहे" अशा कोणत्याही हिंदी सरकारने रशियन बोल्शेव्हिक किंवा दुसऱ्या संकटाची भीती का बाळगावी ? संतुष्ट आणि बलाढ्य हिंदुस्थान ब्रिटिशांच्या दोस्तीने आपल्यावरील स्वारीला कोणत्याही वेळी तोंड देऊ शकेल. पण या सरकारने आम्हांला जाणून बुजून पौरुषहीन बनविले आहे, आमच्या शेजाऱ्याकडून किंवा जगाकडून होणाऱ्या सतत भीतीत आम्हांला ठेवले आहे; आमची वैभवशाली साधनसामुग्री त्यांनी लुटून नेल्यामुळे हिंदुस्थानचा स्वतःच्या संरक्षणावर किंवा वाढणाऱ्या दारिद्र्याचा साधा प्रश्न सोडविण्यावर आमचा स्वतःचा विश्वासच उरलेला नाही. म्हणून अमीर या सरकारबरोबर कसलाही तह करणार नाही अशी मला खात्री वाटते. असा कोणताही तह केला तर त्याचा अर्थ इस्लाम व हिंदुस्थान यांच्याविरुद्ध केलेला अपवित्र सौदा असाच केला जाईल. हे "सरकार आणीबाणी"चा उपाय म्हणून सुरू केलेली ओडवायरशाही टाकून द्यावयास तयार नाही. हे सरकार मुसलमानांशी विश्वासाने वागावयास तयार नाही. (मी हिंदुस्थानसरकार हे साम्राज्यसरकारपेक्षा निराळे मानीत नाही.) आणि हिंदुस्थानला आपल्या कमाल उंचीइतके वाढू देण्यास तयार नाही, अशा हिंदुस्थान सरकारला अफगाणिस्तानने हिंदुस्थानविरुद्ध गुन्हेगारीचा तह करावयास पाहिजे आहे. असहकारितावाद्यांच्यापुरतेच म्हणावयाचे म्हणजे, याबाबतीत फक्त एकच मत आहे. आम्ही स्वतः नाखूष असता दुसऱ्यांनी या सरकारबरोबर सहकार्य करावे अशी आम्ही इच्छा करणार नाही.

'यंग इंडिया', ४–५–१९२१

३१. गांधी, जुने व नवे

टाइम्स ऑफ इंडियाने पुन्हा एकदा अप्रामाणिकपणाचा आरोप केला आहे. त्या आरोपाचे अनुमान त्यांच्यापूर्वीच्या लेखावरून काढता येण्यासारखे होते. आणि त्याचा परामर्ष मी या पत्रातील लेखात[1] नुकताच घेतला आहे. तो लेख सौम्यपणाचा आहे व त्याला हरकत घेता येण्यासारखी नाही. मला जी प्रामाणिकपणाची कीर्ती लाभली आहे आणि जिच्यावर मी हक्क सांगतो ती कायम ठेवण्यास मी उत्सुक आहे. "धुके[2]" या शीर्षकाचा माझा लेख माझ्या टीकाकारांना अखेरचे उत्तर म्हणून समजण्यात यावा. शेवटच्या स्पष्टीकरणाकरिता मी माझ्या कृतीवर अवलंबून राहिले पाहिजे. कोणत्याही माणसाला त्याच्या मृत्यूपूर्वी न्यायी, प्रामाणिक किंवा चांगला म्हणता येत नाही. पण टाइम्स ऑफ इंडियाच्या लेखकाने जी काही चुकीची विधाने केली आहेत, ती मी दुरुस्त करू इच्छितो. जेव्हा मी सत्याग्रह पुकारला तेव्हा मी माझ्या मूळच्या बिगर राजकीय अवस्थेतून आणि अलिप्ततेच्या अवस्थेतून खाली घसरलो असा आरोप करण्यात आला होता. दक्षिण आफ्रिकेतदेखील माझे टीकाकार माझ्या भूतकालाकडे बोट दाखवीत. ज्या ज्या लढ्याशी माझा संबंध होता, त्याचे टीकाकार होते व ते टीकाकार माझ्या त्या वेळच्या परिस्थितीतील वर्तनाला नाव ठेवून भूतकाळातल्या वर्तनाबद्दल स्तुती करीत असत. मी ही गोष्ट प्रस्तुतचा आरोप खोटा ठरविण्याकरिता सांगत नसून अजाणता अप्रामाणिकपणा आणि आत्मवंचना या आरोपावर कोणी विश्वास ठेवू नये म्हणून, स्वतःचे अंतःकरण मजबूत करण्याकरिता हे सांगत आहे. मी सत्याग्रह कधी थांबविला नाही; आणि मी खाजगी जीवनात कधीही प्रवेश केला नाही. मी सविनय कायदेभंग थांबविला आणि तो अजूनही थांबविलेलाच आहे. पण त्याचे कारण देश त्याला तयार नाही असे मला तेव्हा वाटले व आजही वाटत आहे. माझी हिमालयाएवढी चूक जी झाली ती देशाच्या तयारीचा मी केलेला चुकीचा अंदाज. ज्या प्रकारची असहकारिता आम्ही हाती घेतली आहे त्या असहकारितेत सविनय कायदेभंगासारखी संकटे नाहीत. सविनय कायदेभंग हे सततचे कर्तव्य नसते पण असहकारितेचा शेवट जरी अराजकतेत झाला तरी मी तोच सल्ला देत राहीन. मी काय माझी परत केलेली पदके पुन्हा मागवावीत, का मित्रांना त्यांची पदके परत मागावयास सांगावे का वकिलांना परत वकिली सुरू करण्याचा सल्ला द्यावा ? तसे करण्याचे कारण समजा अराजक प्रबळ होऊ लागले आहेत हे असू शकेल का ? ज्या सरकारचा डायरशाहीवर विश्वास आहे, अशा अप्रामाणिक सरकार बरोबर मी

१. पहा खंड १९, प्रकरण २८०.
२. पहा "धुके" २०-४-१९२१.

अराजकतेच्या भीतीने सहभागी व्हावे काय? अराजकता हा सांप्रदाय म्हणून राक्षसी असतो हे मला ठाऊक आहे, पण डायरशाही ही त्याहीपेक्षा अधिक वाईट आहे. कारण ती संस्थापित अधिकाराचा मुखवटा चढविलेली अराजकताच आहे. सुसंघटित अराजकता ही उघड अराजकतेपेक्षा अनेक पटीनी वाईट असते. जसा मी सरकारच्या अराजकतेपासून स्वतः अलिप्त राहिलो तसा मी उघड अराजकतेत जमावाच्या अराजकतेपासून अलिप्त राहीन. मला या दोन्ही अनिष्ट गोष्टी वाटतात आणि त्या टाळल्या पाहिजेत. जालियनवाला बागेच्या कत्तलीचा जो जनक होता, त्याच्यावर सूड घेण्याची मागणी मी केली नाही. जे गुन्हेगार आहेत त्यांची पेन्शने बंद करावी आणि जे अजून नोकरीवर आहेत त्यांना नोकरीतून काढून टाकावे, या पलीकडे काही मागितले नाही. महंत नारायणदास याला पेन्शन द्यावे किंवा नोकरीवर ठेवावे, यासंबंधी मी कसलाच सल्ला शीखांना दिला नाही. पंजाबमधील सरकारी खुनी लोकांच्यावरील खटले हे काढून घ्यावेत, हा जसा सल्ला मी राष्ट्राला दिला तसाच सल्ला शीखांनी खुनी लोकांवरील खटले काढून घ्यावे असा सल्ला त्यांना दिला. अमृतसर आणि नानकाना यासंबंधी माझे वर्तन सुसंगत होते. असा माझा दावा आहे. मी वारंवार असे म्हणत आलो आहे की, मी माझ्या जिव्हाळ्याच्या नातेवाईकांशी जसा वागत आलो तसा मी सरकारबरोबर वागत आहे. घरगुती बाबतीत जसे आपण वागतो त्या सिद्धांताचा विस्तार असहकारितेत राजकीय क्षेत्रात केला जातो. वकील वगैरे लोकांशी माझ्या संबंध जो उल्लेख करण्यात आला आहे तो शोभण्यासारखा नाही. वास्तविकपणे काँग्रेससंस्थेचा वकीली करीत असलेले फारच थोडे वकील आज अधिकारावर आहेत.

माझे मत असे आहे की, जेथे असहकारितावाद्यांचे बहुमत असेल तेथे ज्याने पूर्णपणे असहकारिता केली आहे, त्याच्याशिवाय इतर कोणीही पदाधिकारी असू नयेत. माझी ही सूचना काँग्रेस कमिटीने नाकारली नाही. सुरतेत वकिली करणाऱ्या वकिलांनी मला मानपत्र दिल्याचे माहीत नाही. पण जोपर्यंत त्यांना त्यांच्या चुकीच्या मागणीवरून परावृत्त करण्याचे स्वातंत्र्य मला आहे तोपर्यंत अशाही लोकांकडून मानपत्र स्वीकारण्यास मी कचरणार नाही. अलीबंधूच्या माझ्या संबंधाविषयी मला इतकेच म्हणावयाचे आहे की, ती अभिमानास्पद गोष्ट आहे असे मी मानतो. पण दक्षिण आफ्रिकेत माझे जे सहकारी होते ते खुनी आणि चोर होते, त्यांनी खुनाच्या किंवा चोरीच्या प्रयत्नाबद्दल शिक्षाही भोगल्या होत्या. ते फक्त इतर सत्याग्रहींप्रमाणे अनत्याचाराची प्रतिज्ञा सन्मानपूर्वक अंमलात आणीत असत. मला जुन्या आणि नव्या गांधीत फरक दिसत नाही. फक्त नव्या गांधीला सत्याग्रहाची अधिक स्पष्ट कल्पना आली आहे आणि तो पूर्वी कधीही नव्हता इतका अहिंसेच्या सिद्धांताला मानीत आहे. मी टाइम्स ऑफ इंडियाच्या लेखकाला माझ्या ह्या विश्वासात आत्मवंचना नाही असे आश्वासन देतो; पण कोण बरोबर हे काळच ठरवील, पूर्वीचा दाखला माझ्या बाजूचा आहे.

'यंगइंडिया', ४–५–१९२१

३२. कपडवंजच्या जाहीर सभेतील भाषण

मे ४, १९२१

बोहरा[१] समाजालाही स्वराज्याकरिता काम करावयाचे आहे आणि हिंदुस्थानची सेवा करावयाची आहे. बोहरा लोकांनी खिलाफत चळवळीला आपला वाटा द्यावयाचा आहे; स्वराज्याच्या कामात मला श्रीमंतांची सेवा पूर्णपणे मिळवावयाची आहे. हे बोहरा लोक बाहेरून खूप पैसा मिळवून येथे परत येतात. त्यांच्या वाट्याला येणारी पूर्ण रक्कम त्यांनी टिळक स्वराज्य फंडाला देणगी म्हणून दिलीच पाहिजे. मी देणगी हा शब्द वहिवाट पडली आहे म्हणून वापरतो. पण तो शब्द बरोबर नाही. कारण टिळक स्वराज्य फंडाला पैसे देणे म्हणजे एक धंदा करणे आहे. स्वराज्याकरिता सौदा करणे आहे, आणि ते टिळक महाराजांच्याकरिता कर्तव्य करणे आहे. जे धंद्याकरिता दिले जाते किंवा कर्तव्यपूर्तीकरिता केले जाते, त्याला देणगी म्हणता येत नाही.

* * *

ज्याप्रमाणे आपले लोक गोऱ्या लोकांना भितात तसेच भंगी आपल्याला भितात. जोपर्यंत त्यांच्या दृष्टीने आपण गोरे आहोत तोपर्यंत स्वराज्याची आशा आपण बाळगू नये. जर आपण त्यांना भंगी म्हटले आणि दूर अंतरावर ठेवले तर सारे जग भंगी या दृष्टीने आपल्याकडे पाहते आणि आपला संपर्क टाळते. आफ्रिकेत राहिलेल्या कोणाही माणसाला विचारा की, हे सत्य नाही का, की कोणत्याही गोऱ्या माणसाला मग तो दारूबाज असो किंवा वेश्याव्यवसायी असो, किंवा जुगारी असो, त्याला हिंदी लोकांचा स्पर्श झाला म्हणजे आपण विटाळलो असे जे वाटते ते खरे की खोटे. ज्या डब्यातून गोरे लोक प्रवास करतात अशा आगगाडीच्या डब्यातून आम्हांला प्रवास करता येत नाही. एकाच ट्रॅमगाडीत बसता येत नाही. एकाच फूटपाथवरून चालता येत नाही. गोरे लोक ज्या वस्तीत व्यापार करतात त्या वस्तीत आम्हांला व्यापार करता येत नाही. जेथे ते पाव विकत घेतात तेथे आम्हांला पाव विकत घेता येत नाहीत. सगळीकडेच असे घडते असे नाही. मी इंग्लिशांना अन्याय करणार नाही. मी त्यांचा शत्रू नाही; पण मी असे पुष्कळ ठिकाणी पाहिले आहे की, ज्या ठिकाणी गोरे लोक राहतात अशा ठिकाणी आम्हांला प्रवेश नाकारला जातो. आणि ज्या खोल्या ते विश्रांतीकरिता किंवा उपाहाराकरिता वापरतात त्या आम्हांला नाकारण्यात येतात. गोरे लोक आम्हांला जे दूर ठेवतात,

१. मुसलमान व्यापारी समाज; कपडवंजमध्ये त्यांची मोठी वस्ती. पण ते सभेला आले नाहीत.

त्याचे कारण आरोग्य हे आहे. त्यांना अशी भीती वाटते की, आपली शरीरे विटाळतील आपले आत्मे विटाळतील यावर त्यांचा विश्वास नाही. पण आपला असा विश्वास आहे की जर अंत्यजाला आपण स्पर्श केला तर आपला आत्मा विटाळेल आणि देव आपल्याला शिक्षा करील! खरोखरच देव आपल्याला आता शिक्षा करीत आहे. दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, कॉलरा, प्लेग आणि सरकारचा दुष्टपणा यापेक्षा अधिक मोठे दुर्दैव कोणते? म्हणून मी हिंदुसमाजाला नम्रपणे असे निवेदन करतो की, हिंदुधर्म हा अस्पृश्यतेला बिलगण्यात साठलेला नाही, पण त्या पापातून मुक्त होण्यात आहे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ८–५–१९२१

३३. कठाल येथील स्त्रियांच्या सभेतील भाषण

मे ४,१९२१

धर्माचे पालन हे ब्राह्मणांच्या किंवा पुरुषांच्या हातांत नाही. ते पालन सर्वस्वी स्त्रियांच्या हाती आहे. ज्या पायावर समाज आधारलेला आहे त्याचा पाया घर आहे; आणि धर्म हा घरात जोपासावयाचा असतो. घरातला सुगंध साऱ्या समाजात पसरतो. एखाद्या शहरात व्यापार जोरात चालत असेल आणि तेथे वस्तीही मोठी असेल, पण तेथील घरे चांगली सांभाळली जात नसतील तर ते शहर चांगले नाही, असे मी न कचरता म्हणू शकेन. स्त्रिया ह्या गृहदेवता आहेत. त्यांनी जर धर्म सोडला तर लोकांचा संपूर्ण नाश होईल. यादव स्त्रियांनी जेव्हा अनीतीचा मार्ग पत्करला आणि धर्म सोडला त्यामुळेच श्रीकृष्णांनी यदुवंशाचा नाश केला. म्हणून मी तुम्हांला आग्रहाने सांगतो की, तुम्ही शुद्ध व्हा आणि धर्माचरण करा. माझी अशी प्रार्थना आहे की, तुम्ही स्वतःला शुद्ध करून घेतल्यानंतर मला आणि मौलाना शौकत अलींना म्हणजेच हिंदु-मुसलमानांना असा आशीर्वाद द्या की, ह्या स्वराज्याच्या लढ्यात, ह्या धर्मयुद्धात आम्हांला यश प्राप्ती व्हावी.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ८-५-१९२१

३४. मला पारशांबद्दल का आशा वाटते ?

हिंदुस्थानात पारशी स्थायिक झाल्यापासून त्यांनी हिंदूंना दिलेला शब्द सन्मान-पूर्वक आणि विश्वासाने पाळला आहे. मुंबईमध्ये सर्व लोकांची वाचा जेव्हा बसली होती, तेव्हा पारशी लोकांच्या धैर्याने इतरांनाही वाचा फुटली. पारशांनी गुजरातची केलेली सेवा सतत स्मरणात राहील. गुजराती भाषेची सेवादेखील मलबारी[1], खबरदार[2] आणि इतरांनी कमी महत्त्वाची केलेली नाही. पारशी धार्मिक बाबतीत कधीही लढले नाहीत. पण आपल्याला आपला धर्म पाळता येतो यात त्यांचे पूर्ण समाधान आहे. साऱ्या जगात पारशांच्याइतके दानशूर कोणीही नाहीत. दुसऱ्यात काय चांगले आहे हे पाहाण्याची व ते आत्मसात करण्याची पारशांना विलक्षण शक्ति प्राप्त झाली आहे.

जगात कोणत्याही पारशाइतक्या लहान जमातीने, त्यांच्याइतकी प्रतिष्ठा मिळविली नाही. यातून मी असा निष्कर्ष काढतो की, त्यांचे धर्मग्रंथ हे आध्यात्मिक दृष्ट्या फार मौल्यवान असले पाहिजेत; ते साधे आहेत आणि मुलांनादेखील समजतील इतके सोपे आहेत.

पण जर पारशी समाज आपल्या अस्तित्वाकरिता आणि आपले सर्वस्व सांभाळून ठेवण्याकरिता भूतकाळातील मोठेपणाच्या भांडवलावर अवलंबून राहू इच्छित असला तर ती त्यांची भयंकर चूक होईल.

इतरांच्याप्रमाणे पारशी हेदेखील पश्चिमेकडून येणाऱ्या विषारी वायूत सापडले आहेत. ते आपल्या साध्या राहणीची परंपरा सोडू लागले आहेत. त्यांच्यात चैन वाढत आहे. या समाजाजवळ विपुल पैसा असल्यामुळे त्यांच्यात स्वास्थ्यप्रियता शिरली आहे. सद्गुणाच्या मार्गाने जाणारा लहान समाज जसा उत्कर्ष पावतो तसाच तो अनैतिक मार्गाने जाऊ लागला तर तितक्याच लवकर पतन पावेल; आणि जर पतनाला सुरुवात झाली तर नाशाला विलंब लागणार नाही.

एक पारशी गृहस्थ माझ्या वडिलांकडे येत असत. दोघांची दाट मैत्री होती. तेव्हा मी एक मूल होतो. मी एदलजी शेठना कसा विसरेन ? ज्या ज्या वेळी ते माझ्या वडिलांकडे येत, त्या त्या वेळी त्यांच्या भाषणाचा विषय साधेपणा हा होता. ते स्वतः विलक्षण साधे होते. राजकोटच्या ठाकोरसाहेबांशी त्यांचे नातेही होते. एदलजी शेठ

१. बेहरामजी मेरवानजी मलबारी (१८५४–१९१२); कवी, पत्रकार व समाजसुधारक.
२. अर्देसर फ्रामजी खबरदार (१८८१–१९५४).

त्यांच्यासमोर सुद्धा वायफट खर्च किंवा डामडौल याबद्दल आपले विचार मांडावयास कचरत नसत. त्यांचे धैर्य त्यांच्या साधेपणाइतकेच भव्य होते, आणि या दोन्ही गोष्टी त्यांच्या उदार वर्तनाइतक्याच मोठ्या होत्या. त्या वेळेपासून मला असे वाटत आले आहे की, पारशी समाज जर मनात आणील तर पुष्कळ कामगिरी करील व पुष्कळ देऊ शकेल. माझी खात्री आहे की, तो समाज पश्चिमेकडून येणाऱ्या विषारी वायूपासून स्वतःचा बचाव करील, आणि त्यांचा धाडसी स्वभाव व धर्माबद्दलचा आदर त्यांचा बचाव करतील. माझी अशी श्रद्धा आहे की, पूर्वीप्रमाणे पारशी लोक या देशाचे नागरिक म्हणून हिंदुस्थानची सेवा करीत राहतील. परमेश्वर त्यांना बरेवाईटातील भेदाभेद ओळखण्याची, योग्य विचार करण्याची आणि धाडसाची शक्ती देवो. या पवित्र लढ्यात पारशी लोक, काही का वाटा देईनात हिंदुस्थानला त्यांच्या औदार्याचे व संस्कृतीचे कधीही विस्मरण होणार नाही.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, ५-५-१९२१

३५. एका पारशी भगिनीकडून जाहीर झालेले बक्षीस

मेहेरबाई भेसानिया नावाच्या एका भगिनीने जपानची राजधानी योकोहामा येथून एक प्रेमळ पत्र लिहिले आहे. काही दिवस उत्तर न देता ते पत्र मजजवळ तसेच राहिले याबद्दल मी त्यांची क्षमा मागतो. काही दिवसांनंतर मी पुन्हा ते वाचले. ते पत्र प्रसिद्ध करावे की नाही याच्या मी विचारात होतो आणि दुसऱ्याही गोष्टीत मी गुंतलो होतो, म्हणून मला निर्णय करता आला नाही.

बक्षीस जाहीर करून आपल्याला चांगली राष्ट्रीय गाणी मिळतील किंवा नाही याची मला शंका होती. शेवटी मी या निर्णयाला आलो की, अत्यंत कळकळीने लिहिलेले त्या भगिनीचे पत्र प्रसिद्ध न करणे किंवा तिने देऊ केलेले बक्षीस जाहीर न करणे हे योग्य ठरणार नाही. म्हणून मी ते पत्र खाली देत आहे. त्यातील माझ्या-संबंधीचा भाग मी वगळला आहे. इकडे तिकडे चार दोन शब्द दुरुस्त केले आहेत आणि इंग्रजी परिच्छेद गुजरातीत भाषांतरित केले आहेत. बाकीचे पत्र आहे तसेच मी देत आहे. इतक्या दूर देशात राहणारी एक भगिनी आपल्या ह्या पवित्र लढ्यात रस घेत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

जर देवी सरस्वती गुजरातच्या एखाद्या कवीला स्फूर्ती देईल व ते प्रयत्न करतील तर मी आभारी होईन. त्यांनी हा प्रयत्न बक्षिसाच्या आशेने करू नये; पण दूरच्या एका भगिनीच्या इच्छेला मान देण्याकरिता करावा. सर्व कविता उशीरात उशीरा ३० जूनपर्यंत याव्यात. जर दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर असामान्य चांगली कविता आली, तर बक्षिसाची सारी रक्कम त्याला देण्यात येईल. पण जर कविता काही विशिष्ट दर्जाच्या नसतील तर कोणालाच बक्षीस मिळणार नाही. परीक्षकाचे नाव मी मागाहून जाहीर करीन.[1]

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ५-५-१९२१

३६. देवचंद पारेख यांना पत्र

सुरत,
मे ५, १९२१

भाई श्री. देवचंदभाई,[2]

तुमची तार मिळाली. तिकडे यावयास मला अशक्य झाले आहे. तुम्हांला वाटले तर कोठवाडमधील कोणतेही घर चरख्याशिवाय राहिलेले नाही हे तुम्ही पाहा. पण कोणताही माणूस मेल्याशिवाय[3] स्वर्गात जाऊ शकतो का? तुम्ही स्वतः कातता का? घरी आणि बाहेर तुम्ही फक्त खादीच वापरता का?

मोहनदासचा वंदेमातरम्

मूळ गुजरातीवरून : जी. एन्. ५७२८.

१. यानंतर मेहेरबाईंचे पत्र आहे. ते येथे दिले नाही. त्या पत्रात ७५ रुपयांची तीन बक्षिसे असामान्य गाण्याला दिली होती. पहिले बक्षीस, देवाची प्रार्थना. त्या प्रार्थनेत निरनिराळ्या धर्मांचे लोक आपल्या देवांना ज्या नावाने आळवितात त्यांचा उल्लेख असावा. दुसरे बक्षीस लोकमान्य टिळकांच्या जीवनापासून कोणता धडा घ्यावा याबद्दल असावे; तिसरे बक्षीस भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेत जसा अर्जुनाला उपदेश केलेला आहे, तसा असहकारितावाद्यांची तुलना अर्जुनाबरोबर करून, त्यांना आपली दुर्बलता टाकण्यास सांगणारे असावे.

२. वर्गबंधू व गांधींचे आजन्म मित्र.

३. एक गुजराती म्हण. तिचा अर्थ, "प्रयत्नाशिवाय फळ मिळते काय?"

३७. वसईच्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेपुढील भाषण

मे ७, १९२१

तुमच्या प्रेमाने मी येथे ओढला गेलो. तुमच्यात मला फार वेळ राहता येत नाही याबद्दल फार वाईट वाटते. अध्यक्षांच्या परवानगीने मी माझे म्हणणे थोडक्यात मांडतो.

प्रथम मला मुळशीपेट्याबद्दल बोलले पाहिजे. तेथे मला जाता आले नाही आणि तेथील बांधवांची दुःखे प्रत्यक्ष समजून घेता आली नाहीत याचे मला दुःख होते. त्या लढ्याच्या तपशिलाची माझी माहिती तुटपुंजी आहे. मला वर्तमानपत्रे वाचावयाची संधी क्वचितच मिळते म्हणून मला ज्या गोष्टीबद्दल फारशी माहिती नसते, याबद्दल बोलावयाला किंवा लिहावयाला मी कचरतो. तथापि तपशिलात न जाता त्या बाबतीतले माझे विचार[1] मी प्रदर्शित केले आहेत. मुळशी पेट्यातल्या सत्याग्रहींचे प्रतिनिधी म्हणून जे या सभेला आले आहेत त्यांच्याबद्दल मी माझी सहानुभूती व्यक्त करतो. जे लोक आपल्या हक्काकरिता लढतात, त्यांच्याबद्दल मला नेहमीच सहानुभूती वाटते. आपल्या शेतांच्या मालकीचे रक्षण करण्याकरिता मुळशी पेट्यातील लोक झगडत आहेत असे मला समजते. त्यांच्या हक्कांचे मी समर्थन करतो. जे आपल्या प्राणांचे बलिदान करून आपल्या मालमत्तेचे रक्षण करतात अशा लोकांना मी नेहमीच पाठिंबा देतो. पण सत्याकरिता का असेना जे लोक दुसऱ्यांना ठार मारण्यास तयार असतात त्यांच्याशी मी कधीच हातमिळवणी करू शकत नाही. आपण सत्याकरिता किंवा असत्याकरिता झगडत आहोत हे ठरविण्याकरिता या लोकांना माझी मदत मिळू शकेल. जेव्हा मला मुळशी पेट्यातील लोकांनी सत्याग्रह करावा किंवा नाही असा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा मी उत्तर दिले की, लोकांच्यात पुरेशी शक्ती असेल तर हा प्रयोग खात्रीने करण्यासारखा आहे. आपल्यात ही शक्ती आहे हे त्यांनी सिद्ध केले आहे. असलेल्या परिस्थितीत त्यांनी जे काय संपादन केले आहे ते चांगले आहे. पण जेव्हा त्यांच्या हक्कांबद्दल कायमचे आश्वासन मिळेल त्याच वेळी त्यांना पूर्ण शांती लाभेल. जर एखाद्या जमिनीच्या तुकड्यावरील हक्क माणूस सोडावयास तयार नसला तर कायद्याचा आश्रय घेऊन त्याचा ताबा मिळविणे हे आपल्या देशाच्या परंपरेला साजेसे नाही. मला एका लहान खटल्यात वकीलपत्र मिळाले. त्या माणसाच्या मालकीचा एक साधा जमिनीचा तुकडा होता. पण तो त्याला मिळवून द्यावा म्हणून एखाद्या वेड्याप्रमाणे तो माझ्या मागे

१. पहा, "टिप्पणें", २७-४-१९२१.

लागला होता. ज्याप्रमाणे बाप आपला मुलगा विकावयास तयार नसतो त्याप्रमाणे मनुष्य, आपल्या हातातील जमीन घालवावयास तयार नसतो. फार पुरातन काळापासून हा आपला स्वभाव बनला आहे. मुळशी पेट्यातील सत्याग्रहींच्याविरुद्ध आपली टाटा कंपनी काही कारवाई करणार नाही अशी मला आशा आहे. लोकांच्या सदिच्छेने पैसे न देता जमीन संपादन करणे हे चांगले, पण ती कंपनी जोपर्यंत एकही माणूस आपली जमीन सोडावयास तयार नाही, तोपर्यंत काही कारवाई करणार नाही अशी मला आशा आहे. जमीन संपादनाच्या कायद्याचा आधार घेऊन जमीन संपादन करणे ही युरोपियन संस्कृती आहे. पण जी संस्कृती सैतानी आहे असा माझा विश्वास आहे तिच्याशी मला काही एक कर्तव्य नाही. म्हणून मुळशी पेट्यातील लोक जोपर्यंत आपला लढा शांततेच्या मार्गांनी चालवितील तोपर्यंत साऱ्या हिंदुस्थानने त्यांच्या पाठीशी राहिले पाहिजे.

मला मुळशी पेट्यात लछमनसिंग आणि दुलीपसिंग यांच्यासारखे शौर्य पाहण्याची इच्छा आहे. नानकानासाहेबचा महंत नारायणदास याच्या हल्ल्याविरुद्ध हे दोघे वीर पुरुष न डगमगता व आपले एक बोट न उचलता उभे राहिले. आणि आपला वध होऊ दिला. त्यांच्या मित्रांनी त्यांना त्या दिवशी गुरुद्वारात जाऊ नका असे सांगितले होते. महंत नारायणदास याने त्यांना ठार मारण्याची तयारी केली होती हे सर्वांना ठाऊक होते. पण ते म्हणाले, आम्ही आमची मस्तके गुरुग्रंथसाहेबासमोर नमवू, आणि अशी मस्तके नमविली गेली तर आपण भाग्यशाली होऊ. त्यांचे शब्द अक्षरशः खरे ठरले. लछमनसिंग थेट गुरुद्वारात गेला आणि त्याने आपले मस्तक ग्रंथसाहेबापुढे नमविले असता त्याला ठार मारण्यात आले. दुलीपसिंग बाहेर होता. नारायणदास त्याला ठार करण्याकरिता बाहेर आला. दुलीपसिंग त्याला म्हणाला, "तुला वेड लागले आहे." त्याच्याजवळ कृपाण होते पण त्याने ते म्यानातच ठेवले. शीख जसे सुदृढ बांध्याचे असतात तसा हाही होता. जर त्याने मनांत आणले असते तर त्याने दोघातिघा मारेकऱ्यांना तेथल्यातेथेच खलास केले असते. पण ते त्याच्या तत्त्वाविरुद्ध झाले असते. काँग्रेसच्या अनत्याचाराच्या प्रतिज्ञेने तो बांधला गेला होता. तो नारायणदासशी बोलत असताना त्याने त्याला ठार मारले. ३३ कोटी लोकांत एवढी दोन माणसे पुरेशी नाहीत. आपल्याला असे वीर पुरुष फक्त शीखांतच नको असून, हिंदू आणि मुसलमानांच्यातही पाहिजे आहेत. लछमनसिंग आणि दुलीपसिंग हे शारीरिक शक्तीत कमी नव्हते. त्यांनी कोणाविरुद्धही तरवार उपसावयाची नाही असा निश्चय केला होता. मी मुळशी पेटा येथेच संपवितो.

नानकानासाहेब येथे या दोन बंधूंनी जसे विलक्षण तेज दाखविले, तितकाच नीचपणा मालेगावच्या नागरिकांनी दाखविला आहे. फौजदाराने कितीही घाणेरडी भाषा वापरली असो किंवा त्याने कितीही प्रक्षुब्ध वर्तन केले असो, तरी ज्याला काँग्रेसबद्दल आदर आहे त्याला, त्या फौजदाराला ठार मारण्याचे भ्याडपणाचे कृत्य करता

येत नाही. काँग्रेसच्या अनुयायांनी अशी गंभीर प्रतिज्ञा केली आहे की, देशाचे स्वातंत्र्य मिळविण्याकरिता आम्ही कोणाला ठार मारणार नाही. पण आमचे प्राण खाली ठेवू. पंजाबचा नारायणदास हा शिव्या देण्यात काय कमी होता ? मालेगावात आपल्या बांधवांनी माणुसकी सोडली. या मार्गाने खासच स्वराज्य मिळणार नाही. मी वकील म्हणून बोलत नसून हिंदी माणूस म्हणून बोलत आहे. जेव्हा आपण अशा कृत्यांपासून सर्वस्वी परावृत्त होऊ, त्याच वेळी आपण शांततवादी आहोत असे शाबीत करू, स्वराज्य मिळवू, पंजाबला न्याय मिळवून देऊ, खिलाफतीच्या प्रश्नात यशस्वी होऊ आणि न्यायाच्या नावाखाली जे सध्या गुन्हे केले जातात ते थांबविण्यात यश मिळवू. त्याच वेळी जगाला असे दिसेल की, आपल्या शांततेच्या शक्तीने भाग पाडल्यामुळे बलाढ्य मंत्र्यांना आपले शब्द परत घ्यावे लागतात आणि डायर व ओडवा-यर यांची पेन्शन्स थांबवावी लागतात. त्या वेळी जगाला असे आढळून येईल की, आयर्लंड किंवा रशिया किंवा इजिप्त यांच्यात नसलेली शक्ती आमच्यात आहे. त्यांच्यात आणि आमच्यात तुलनाच होऊ शकणार नाही. त्यांच्या असहकारितेच्या चळवळीत निरनिराळ्या गोष्टींची भेसळ झाली आहे. कावेबाजपणा आणि दोषारोप यांवर आम्ही अवलंबून नसून सत्यावर अवलंबून आहोत. ताबडतोब कर देण्याचे आम्ही का थांबवीत नाही ? कारण देशाच्या इतर भागांत अजूनही मालेगावसारखे माथेफिरू लोक आहेत. ज्या लोकांना आपल्याजवळ शांततेपेक्षा अधिक परिणामकारक शस्त्र आहे असे वाटते, त्यांनी बाजूला सरावे अशी माझी विनंती आहे. ह्या चळवळीच्या प्रगतीला अडथळा आणण्याचे कमीत कमी त्यांनी थांबवावे.

ही परिषद महाराष्ट्रात भरली आहे. महाराष्ट्रापासून मी कशाची अपेक्षा करतो हे पूर्वीच जाहीर रीतीने मी सांगितले आहे. महाराष्ट्राबद्दलची माझी श्रद्धा कायम आहे. ह्या चळवळीवर महाराष्ट्राचा जेव्हा संपूर्ण विश्वास बसेल त्याच वेळी माझे काम पुरे होईल. महाराष्ट्रासारखी स्वार्थत्यागाची शक्ती आणि ज्ञान मला दुसरीकडे कोठेही पहावयास सापडले नाही. जेव्हा ज्ञानाचा संयोग स्वार्थत्यागाशी होतो तेव्हा यज्ञ पुरा होतो. जेव्हा महाराष्ट्र खऱ्याखुऱ्या उत्साहाने अशा पूर्ण प्रकारच्या त्यागाला सुरुवात करील त्या वेळी देशाला किंवा या चळवळीला माझ्यासारख्या सामान्य माणसाची गरज लागणार नाही. जोपर्यंत महाराष्ट्र जागा होत नाही तोपर्यंत माझ्यासारख्या माणसाला काम करावे लागते. पुष्कळ पण मला सांगतात महाराष्ट्र इतरांच्या मागे आहे. सध्या तरी हे खरे आहे. जेव्हा महाराष्ट्रात थोडीशी अधिक श्रद्धा निर्माण होईल, तेव्हा त्याची शक्ती आपोआप प्रगट होईल. सूर्य उगवला हे ज्याप्रमाणे दवंडी पिटून सांगावे लागत नाही, त्याप्रमाणे महाराष्ट्राची जागृती सर्वांच्या अनुभवाला येईल. या यज्ञात महाराष्ट्राने आपला पुरा भाग द्यावा म्हणून परमेश्वराने त्याला शक्ती द्यावी, अशी माझी ईश्वराला प्रार्थना आहे. लोकमान्यांना तुम्ही जितके मानता तितके दुसरे कोणीही मानीत नाही.

ते स्वराज्याकरिताच फक्त जिवंत राहिले, त्याकरिता तुरुंगात गेले आणि स्वराज्या-करिता खटपट करताना मरण पावले. जर तुम्ही त्यांचे लायक वारसदार आहात असे सिद्ध कराल तर याच वर्षात आपण स्वराज्य मिळवू किंवा त्या प्रयत्नात मरून जाऊ. जर तुम्ही हे केलेत तर टिळकमहाराज तुमच्यात जन्माला आले, याला तुम्ही लायक होतात असे मी म्हणेन. जर तुम्ही तसे केले नाहीत तर मला हे सांगण्याची परवानगी द्या की, तुम्ही त्यांना शोभणारे नाही असे सिद्ध कराल.

जर तुमची अंतःकरणात अशी खात्री पटली असेल की, पूर्वीच्या कालापेक्षा या पाच-सहा महिन्यांत हिंदुस्थानने अधिक प्रगती केली आहे तर तुम्ही याच वर्षात स्वराज्य मिळवू शकाल. त्याचमुळे तुम्ही टिळक महाराजांच्या आत्म्याला शांती द्याल. आपल्या तपश्चर्येने महाराष्ट्र हिंदुस्थानला वाचवू शकेल या श्रद्धेचा अभाव महाराष्ट्रात का आहे, या विचाराने व्यथित झालेला त्यांचा आत्मा सध्या वेदना सहन करीत असेल.

अशा तपश्चर्येची प्रतिज्ञा केल्याशिवाय, एकही मनुष्य येथून घरी जाणार नाही असा माझा विश्वास आहे. या ठरावाच्या बाजूने हात वर करण्याने मी फसणार नाही. मी मूर्तिपूजक आहे. मला तुमच्याकडून भरभक्कम कामाची पूर्ती हवी आहे. कै. टिळक महाराजांची मूर्ती नको आहे. आपण स्वराज्य मिळविण्याकरिता बाहेर पडलो आहोत! जेव्हा मला काही सिंधी बांधवांनी विचारले की, जर एक कोटी रुपये जमविण्याच्या प्रयत्नात आपण अयशी ठरलो तर आपण काय करावे त्या वेळी मी त्यांना म्हणालो की, तुम्ही आणि मी मिळून सिंधू नदीत बुडून मरू. महा-राष्ट्राजवळ फारसा पैसा नाही हे मला ठाऊक आहे. पण त्यांच्याजवळ अपार शक्ती आहे. त्या शक्तीच्या जोरावर तुम्ही मनात आणाल तर पैशाचा पाऊस पाडाल. या क्षणी या या मंडपात तुम्ही काय करू शकणार नाही? यातील कशावरच तुमचा विश्वास नसला तर कृपा करून जगाला सांगा की, आम्ही बेन्थॅम् आणि मिल यांच्या तत्त्वज्ञानाचे अखंड पान केलेले महाराष्ट्रातील सुशिक्षित लोक असे जाहीर करतो की, जे काय गांधी म्हणतात तो सारा पागलपणा आहे. असहकारिता ही ग्रहण करण्याला बौद्धिक शक्तीपलीकडे आहे. याचे मला दुःख होईल. पण ती श्रद्धेच्या क्षेत्रापलीकडे खासच नाही. तथापि आपण काय करावे हे तुम्हीच ठरवा. मला येवढेच म्हणावयाचे आहे की, जे तुम्ही स्वीकाराल ते प्रामाणिकपणे स्वीकारा.

[गुजरातीवरून].
‘ नवजीवन ’

३८. मालेगावचा गुन्हा

मालेगावच्या असहकारितावाद्यांनी जो दुष्टपणा केला असे दिसते त्याबद्दल प्रत्येक असहकारितावाद्याला शरम वाटली पाहिजे.[१] मालेगावच्या लोकांनी धर्म सोडला, ते आपले कर्तव्य विसरले आणि त्यांनी देशाचे व राष्ट्रीय लढ्याचे फार नुकसान केले. आपण सुधारलेले आणि सुसंस्कृत आहोत असा दावा न सांगता गुन्हे करणे ही एक गोष्ट आहे पण आम्ही सुसंस्कृत आहोत असा दावा सांगून गुन्हे करणे ही निराळी गोष्ट आहे. अंधाऱ्या जागी काळा ठिपका दिसत नाही पण दुधात काळा कण असला तर तो ताबडतोब डोळ्याला दिसतो. त्याचप्रमाणे आम्ही शुद्ध आणि शुभ्र आहोत असे म्हणून घाणेरडे झालो तर जग आपल्यावर थुंकेल. "आमचा लढा पवित्र आहे", "आम्ही शांततामय मार्गावर जोर देतो" "आम्ही आमचे प्राण देऊ पण दुसऱ्याचे घेणार नाही" अशा शपथा घेऊन जर आपण कोणाला ठार मारले तर आपण स्वतःला आणि ईश्वराला फसवू. मालेगावच्या लोकांनी नेमके हेच केले आहे असे दिसते.

या गलिच्छ कृत्याने आपल्या लढ्याची हानी केली आहे. त्यामुळे येणारे स्वराज्य खासच लांबेल. कोणाला ठाऊक, आपण महिन्याभरातदेखील स्वराज्य मिळवू. या चळवळीच्या सुरुवातीला जी गती होती तीपेक्षा अधिक गतीने आपण पुढे सरसावत आहोत– त्यामुळे गेलेले स्वराज्य मिळविण्यास आपल्याला किती जलद शक्ती प्राप्त होईल याचा अंदाज करणे कोणालाही शक्य नाही. पण जर आपण चुका करीत राहिलो तर स्वराज्य खात्रीने लांबणीवर पडेल लहान मुलालाही कळून येईल. अंकगणित करणाऱ्याला जेथे त्याची बेरीज चुकली असेल तेथून त्याला परत मागे जावे लागते. आपल्यालाही तेच करावे लागेल.

आपली प्रतिज्ञा अशी आहे की, कोणत्याही अधिकाऱ्याने आपल्याला कितीही प्रक्षुब्ध केले तरी आपण त्याचा बदला घेणार नाही. आपण मार सहन करू, पण बदला घेणार नाही किंवा शरण जाणार नाही. असे असताही मालेगावच्या असहकारितावाद्यांनी एका फौजदाराला आणि इतरांना क्रूरपणे ठार मारले आहे असे दिसते.

काही असहकारितावाद्यांनी कायदा मोडला आणि त्यांना त्याकरिता शिक्षा झाली. त्यांनी ती शिक्षा स्वेच्छेने पत्करली असताही लोकांनी त्यांना बळजबरीने सोडविले. खिलाफत रक्षणाचा किंवा स्वराज्य मिळविण्याचा हा मार्ग नाही.

१. पाहा टिप्पणे ४–५–१९२१

शांतता आणि अत्याचार ही असहकारितेची अत्यंत महत्त्वाची दोन स्वरूपे आहेत. जे शांततेचा भंग करतात तेच लोक खरोखर सहकारितावादी आहेत. नेमस्तां-पेक्षा शांतताभंग करणारे सरकारला अधिक मदत करतात. जर दोन किंवा तीन अधि-काऱ्यांच्या मरणाने असहकारितेची चळवळ दडपता आली तर सरकार त्यांना सहज गमावू शकेल.

मी पूर्वीच्या माझ्या लेखांतून असे वारंवार सांगत आलो आहे की, शांतता राखल्याशिवाय खिलाफतीचा प्रश्न सुटणार नाही आणि स्वराज्य मिळणार नाही. जर वकिलांनी वकिली सोडली नाही, विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजे सोडली नाहीत आणि इतरांनी आपापल्या क्षेत्रांत असहकारिता केली नाही तर गोष्टी अडून राहणार नाहीत पण कार्याची हानी केल्याशिवाय कोणालाही शांतताभंग करता येणार नाही. हिंदू मुस्लीम ऐक्य, शांतता संरक्षण आणि स्वदेशी म्हणजेच चरखा या तीन आवश्यक अटी आहेत. आणि त्यांत शांतता रक्षण ही अत्यंत महत्त्वाची आहे. जर बहुतेक लोक खादी वापरू लागले तर इकडल्या तिकडल्या चार लोकांनी खादी वापरली नाही तरी चालेल. आणि हिंदू व मुसलमान आपसांत लढत राहिले तरी त्याची फिकीर बाळगण्याचे कारण नाही. पण जर एक माणूस शांतताभंग करू लागला आणि खून पाडू लागला तर ते खपणार नाही. कारण त्यात देशाची मोठी हानी होणार आहे. अशी ही शांततेची अत्यावश्यक गरज आहे.

साऱ्या देशातल्या शांततेची जबाबदारी कोण घेऊ शकेल ? ह्या प्रश्नातच आपली दुर्बलता व्यक्त होते. जर कोठेही लोकांनी लुटालुटीला सुरुवात केली तर सरकारजवळ त्यांना दडपून टाकण्याची शक्ती आहे. आणि जेव्हा लोकांना शांतताभंग करण्यापासून आवरण्याची तशीच शक्ती आपल्यात येईल तेव्हा आपण स्वराज्य जिंकू शकू. लोकांनी शांतता पाळावी याकरिता त्यांचे मन वळविण्याचे पुरेसे वजन आपण त्यांच्यावर पाडू शकलो नाही तर स्वराज्याची कल्पनाच आपण सोडली पाहिजे. लोकांच्यावर आपले वजन आहे ह्याच विश्वासावर आपल्या लढ्याची सारी इमारत उभारली आहे. लोकांना जर आपण शांतता पाळण्यास शिकवू शकलो नाही तर आपण अद्याप स्वराज्याला लायक झालो नाही ही गोष्ट कबूल केली पाहिजे. म्हणून प्रत्येक स्वयंसेवकाने या गोष्टीला जास्तीत जास्त महत्त्व देणे आवश्यक आहे.

दारूबाजाने दारू सोडण्याचे नाकारू द्या आणि पदवीवाल्यांना पदव्यांना चिकटून राहू द्या. अधिकाऱ्यांना उर्मट रीतीने वागू द्या आणि पोलिसांना आपल्याला मारू द्या. आपण हे सर्व निमूटपणे सहन केले पाहिजे आणि प्रक्षुब्ध न होण्याचे ठरविले पाहिजे.

तर मग आपण काय करावे ? मालेगावच्या प्रकाराबद्दल आपण काय प्रायश्चित्त घेणार आहोत ? प्रथम आपण गुन्हेगार शोधून काढले पाहिजेत. आणि त्यांना आपला

गुन्हा कबूल करण्यास सांगितले पाहिजे. व त्यांनी खुषीने फासावर चढले पाहिजे. आपल्यापैकी प्रत्येकाने स्वतःची जीभ आवरण्यास शिकले पाहिजे आणि दुसऱ्यांना तसे करण्यास सांगितले पाहिजे. भडक भाषणे करण्याचे आपण थांबविले पाहिजे आणि सभा भरविण्याची व प्रत्येक प्रसंगी हरताळ पाडण्याची सवय टाकली पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारचे दोष सतत दाखविण्याऐवजी आपण आपल्या दोषांचा विचार केला पाहिजे. आपली कमजोरी तपासली पाहिजे व ती दूर करण्याचे उपाय योजले पाहिजेत. जेव्हा पंडित अर्जुनलाल सेठी यांना पकडले तेव्हा खूप मोठी गर्दी जमा झाली आणि त्यांनी पुंडाईला सुरुवात केली. मी हे भ्याडपणाचे लक्षण समजतो. लोकांना स्वतः तुरुंगात जावयाचे नाही आणि सेठीजींना जाऊ द्यावयाचे नाही. यामुळेच जेव्हा कोणी पकडला जातो,त्यामुळेच अशा लोकांना खळबळ उडवावीशी वाटते. जर लोकांच्यात सेठीजींच्या तुरुंगवासामुळे खरे शौर्य निर्माण झाले असेल तर त्यांना आपल्या कर्तव्याची अधिक चांगली जाणीव होईल. आणि स्वतःला अनुलक्षून ज्या असहकारितेच्या बाबी आहेत त्या पूर्णपणे अमलात आणतील आणि स्वराज्याची ग्वाही देतील. ते अपायकारक व्यसने टाकून देतील, जर त्यांच्याजवळ विलायती कापड असेल तर ते कापड फेकून देतील आणि जर ते चरखा चालवीत नसतील तर ताबडतोब चालवू लागतील. सेठीजींच्या अटकेच्या वेळी ज्यांनी पुंडाई केली त्यांतील किती लोक दारूबाज होते, किती परदेशी कापड वापरीत होते आणि किती लोक सूत कातीत होते हे समजून घेणे मोठे बोधप्रद होईल. आपला बाप जिवंत असताना ज्यांनी बापाचे गुण आत्मसात करण्याची फिकीर केली नसली तरी जो निदान बापाच्या मृत्यूनंतर प्रत्येक गुण आचरणात आणील तो त्या बापाचा लायक मुलगा समजला जाईल. पण जो मोठमोठ्याने रडेल किंवा बापाच्या दिवसाच्या निमित्ताने जातिभोजने घालण्याची चैनबाजी करील तो तसा समजला जाणार नाही. दंगे करणे आणि सेठीजींना सोडविणे ह्यांची आपल्याला स्वराज्य मिळविण्याला मदत होणार नाही. तसे केल्यास ती घडणारी गोष्ट फक्त लांबणीवर पडेल. तथापि जर आपले कर्तव्य अधिक तत्परतेने करण्यास आपल्याला त्यामुळे उत्तेजन मिळाले, तर आपण खात्रीने स्वराज्य अधिक लवकर मिळवू शकू आणि आपण अशीही शक्ती कमाऊ की जीमुळे सेठीजी यांना आपण फार काळ न लावता आपल्यामध्ये परत आणू. म्हणून मालेगावच्या घटनेकरिता जर एकच योग्य कोणते प्रायश्चित्त असेल तर आपल्या मनावर आणि क्रोधावर अधिक ताबा मिळविणे, व्यसन टाकून देणे व चरखा चालविण्यास व संपूर्ण खादी वापरण्यास सुरुवात करणे हे होय.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ८-५-१९२१.

३९. माझी टिपणे

आश्चर्यकारक हुकूम

बडोदा सरकारने खालील गोष्टीबद्दल एक जाहीर हुकूम काढला आहे : " परवाना असलेल्या दारूगुत्त्याकडे जाताना किंवा दारूगुत्त्यात शिरताना लोकांना होणारा छळ टाळण्याकरिता " तो जाहीर हुकूम आहे. त्या जाहीरनाम्याचे दृश्य दुःखदायक आहे. त्यात असे म्हटले[1] आहे.

हे 'मद्यपानाचे स्वातंत्र्य' कशा प्रकारचे स्वातंत्र्य आहे ? चोराला चोरी करण्याचा हक्क आहे हे निर्विवाद. पण प्रामाणिक माणसालादेखील चोरी टाळण्याचा हक्क नाही काय ? चोराच्याविरुद्ध शक्ती वापरण्याचा व त्याला हाकून लावण्याचा हक्क लोकांना कायद्याने दिलेला आहे. तर मग चोरी करण्याचे स्वातंत्र्य हे कशा रीतीने संरक्षिले जाते ? उलटपक्षी जे मद्यपानबंदीचे पुरस्कर्ते आहेत ते अशा माणसाला दारू पिऊ नको अशी विनंती करीत असतात. त्यामुळे कोणाच्या स्वातंत्र्यावर गदा येते ? बडोदा सरकारच्या नोटिशीचा असा स्पष्ट अर्थ दिसतो की, दारू पिणे हा एक सद्‌गुण आहे. आणि दारूगुत्त्यांचे अस्तित्व ही एक लोकांना दिलेली लाभदायक गोष्ट आहे. जर एखाद्या दारूबाजाला किंवा गुत्तेवाल्याला शिव्या दिल्या किंवा त्याला मारले किंवा दुसरी जबरदस्ती त्याच्यावर केली आणि जर बडोदा सरकारने त्या गुन्हेगाराला शिक्षा केली व त्याच्याविरुद्ध मनाई हुकूम काढला तर त्यांचे कृत्य समर्थनीय ठरेल. 'पण जर एखादा माणूस गुत्त्याजवळ उभा राहील आणि दारू पिणाऱ्याला दारूच्या आगीत उडी घेऊ नकोस असा सल्ला देईल आणि त्याच्या श्रेष्ठ मनोवृत्तीला आवाहन करील तर अशा माणसाला गुन्हेगार समजणे म्हणजे दारू पिण्याला उत्तेजन देणे आहे असाच त्याचा अर्थ होतो. बडोदा सरकारचे धोरण इतके लाजिरवाणे असेल असे मला कधीही वाटले नाही. मला अजूनही आशा आहे की, ही नोटीस विचारपूर्वक काढलेली नाही. पण ती कोणा तरी हुकूमशहा अधिकाऱ्याने आपल्या जबाबदारीवर काढलेली असावी. माझा जर हा निष्कर्ष बरोबर असेल तर बडोदा सरकार ती नोटीस मागे घेणारा हुकूम काढील.

१. ती नोटीस येथे दिली नाही. त्या नोटिशीत लोकांना सर्वसामान्यपणे आणि विद्यार्थ्यांना विशेषतः अशी ताकीद दिली होती की, या गिऱ्हाइकांच्या स्वातंत्र्याआड त्यांनी येऊ नये.

दारूचे उत्पन्न

दारू, अफू वगैरेंच्या विक्रीतून जे उत्पन्न येते, त्या उत्पन्नातून आपल्या मुलांना शिक्षण मिळते ही गोष्ट लोकांनी ध्यानात ठेवावी. जर आपली नैतिक आणि धार्मिक मूल्ये घसरली नसतील तर आपण या प्रश्नाचा विचार करावा आणि या लांछित उत्पन्नातून आपली मुले शिकविण्याचे थांबवावे. पण ते काहीही असो. आपल्याला स्वराज्य मिळताच हे उत्पन्न पूर्णपणे सोडून देण्याचा आपण निश्चय केला आहे. दारू आणि तशाच इतर वस्तूंचा व्यापार आपण खास करणार नाही. लोकांना नव्या कराचा बोजा सहन होत नाही हे आपण जाणतो. खरोखरच आपल्याला कर कमी करावे लागतील आणि तरीही सध्या जितकी मुले शिकतात त्यापेक्षा अधिक मुलांना शिक्षण द्यावे लागेल. मी सुचविलेल्या मार्गानेच हे घडू शकेल. फी असता कामा नये. कर वाढता कामा नये आणि तरीही उत्तमातले उत्तम शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे. अशा प्रकारे शाळा-शाळांतून कताई व्यवसाय सुरू करून प्रचलित म्हणीप्रमाणे एका दगडाने दोन पक्षी आपण मारू शकू.

एका पारशी मित्राचा बचाव

श्री. फिरोज शहा तेमुलजी मिस्त्री जळगावहून लिहितात की, आपण एक दारूगुत्ता चालवितो; लहानपणापासून हा धंदा करतो. आपणाला फार मोठे कुटुंब पोसावयाचे आहे आणि आपण ५१ वर्षांचे आहोत. ते म्हणतात, जर मी हा धंदा सोडला तर चार हिंदू लोक हा गुत्ता घेण्यास टपलेले आहेत. ‘या परिस्थितीत मी माझा धंदा सोडणे आणि कुटुंबाला पोसण्याचे साधन नष्ट करणे यात काय अर्थ आहे’ असे ते विचारतात. मी दारूगुत्ता सोडला म्हणजे दारूचा व्यापार बंद होईल काय? त्या मित्राने आपली बाजू अशी मांडली आहे. माझी त्यांना सहानुभूती आहे. त्यांच्या अडचणी एखाद्याला समजू शकतील. पण अशा नैतिक समस्यांवर विजय मिळवूनच आपण माणसे आहोत हे सिद्ध करीत असतो. जर त्या मित्राला दारू पिणे किंवा विकणे यात पातक आहे असे वाटत असेल तर त्यांच्या युक्तिवादाला जागाच नाही. इतर हजारो लोक पातके करतात म्हणून कोणालाही पातक करण्याचा हक्क मिळत नाही. जर आपण आपले कुटुंब पातकावर पोषीत असलो तर भीक मागून जगणे अधिक चांगले.

त्या मित्राने आपल्या पत्रात काही नमूद करण्यालायक माहिती दिली आहे. ती-मुळे आपल्याला वेदना होतील. तो म्हणतो की, मी गावठी दारूचा धंदा करतो आणि स्वयंसेवक मला छळतात. पण परदेशी दारूच्या दुकानात जाणाऱ्या माणसाला थांब-विण्यासच काय पण त्याच्याकडे जाण्यास व बोलण्यास त्यांना धैर्य नाही. तो म्हणतो की, स्वयंसेवक मनधरणी करण्यावरच थांबत नाहीत. ते गुत्त्याला गराडा घालतात,

लोकांना शिव्या देतात, गुत्त्यातल्या जुन्या नोकरांना दम देतात आणि दम देऊन भागले नाही तर त्यांना मारतात. गुत्त्याच्या मालकाच्या हातातून दारूच्या बाटल्या ते हिसकावून घेतात. जर एखाद्याच्या घरी दारूच्या बाटल्या आहेत असा संशय आला तर ते त्याच्या घराची प्रत्यक्ष झडती घेतात. लोक त्याला वस्तू विकत देत नाहीत. दारू-गुत्त्यातून येताना एखादा मनुष्य दिसला तर ते त्याच्या तोंडाला डांबर फासतात, आणि गाढवावर बसवून त्याची गावातून धिंड काढतात.

पत्रावरून असे दिसते की, या तक्रारी खऱ्या आहेत. त्या जर खऱ्या असतील तर पत्रात लिहिलेल्या गोष्टी, या स्वयंसेवकांना लज्जास्पद आहेत. दारूबाजाने दारू पिऊ नये म्हणून त्याचे मन वळविणे हे जसे आपले कर्तव्य आहे तसेच त्याची विटंबना न करणे हेही आपले कर्तव्य आहे. दारूबाजांनी दारू सोडावी म्हणून जर आपण त्यांना मारहाण करू लागलो तर आपला उद्देश सफल होणार नाही, एवढेच नव्हे तर आपल्या चळवळीला हानी पोहोचेल. कोणावरही शारीरीक बळ वापरण्याचा आपल्याला बिलकूल हक्क नाही, ही गोष्ट देशातल्या साऱ्या स्वयंसेवकांनी समजून घ्यावी. त्यांनी रास्त व आदरयुक्त अशाच साधनांचा वापर केला पाहिजे. याचा अर्थ असा की, त्यांनी गुत्त्याजवळ उभे राहावे, दारू पिण्याचा उद्देश असणाऱ्या माणसाला नम्रपणे दारू न पिण्याची विनंती करावी, त्याच्या कुटुंबातील मंडळींना भेटावे व त्याच्या जातीतल्या इतर लोकांनाही बोलावे. यापेक्षा अधिक दडपण आणण्याचा आपल्याला हक्क नाही. बळाचा उपयोग करून तुम्हांला कोणतेही राष्ट्र कधीही सद्गुणी बनविता येणार नाही. ज्यांना पातकी व्हावयाचे असेल त्यांना खात्रीने तो हक्क आहे. स्वातंत्र्य असूनही जो पातक करीत नाही, अशालाच सद्गुणी म्हणता येते, आणि अशाच लोकांमुळे देशाचा फायदा होतो. पातकाचे निर्मूलन करण्याकरिता जर आपल्या प्रयत्नात आपण शारीरिक बळाचा अंतर्भाव केला तर, ज्या दुष्कृत्याबद्दल सरकारचा आपण सैतानी म्हणून धिक्कार करतो त्यांचा संसर्ग आपल्याला होईल आणि आपणही सैतानी बनू.

राष्ट्रीय शाळा – चरखा शाळा

जर आपला असा विश्वास असेल की, हातसुतानेच स्वराज्य मिळेल, जर आपली चरख्याच्या शक्तीवर पूर्ण श्रद्धा असेल, जर दुसऱ्या कोणत्याही साधनांनी हिंदुस्थानची आर्थिक उन्नती होणे अशक्य आहे अशी आपली खात्री असेल, जर दुय्यम धंद्याच्या अभावी लोकांची उत्पन्ने कमी असल्यामुळे कोट्यवधी लोक कायमचे कर्जबाजारी आहेत ह्या विचाराशी आपण सहमत असू, तर आपल्याला तात्काळ असे पटेल की, आपल्या मुलांना पहिला धडा आपण कताईचा दिला पाहिजे. याचे दोन परिणाम होतील. पहिल्यांदा ती मुले स्वावलंबी होण्याचे शिकतील; आणि दुसरे, शाळेत असताना-देखील मुलांना कताई शिकविली तर ती सर्व देशभर पसरेल. जे पूर्णपणे हताश झाले

आहेत किंवा ज्यांना जगण्याकरिता भीक मागण्याची सवय झाली आहे, अशा लोकांना चरखा चालवा असे सांगणे दुर्घट काम आहे. आपण जर कताई अशाच लोकांच्याकरिता राखून ठेवली आणि कंगालांचा तो व्यवसाय केला तर त्याचा प्रसार कधीही होणार नाही. पण जर एक धर्माचा भाग म्हणून प्रतिष्ठित लोकांनी कताई सुरू केली तर सामान्य माणूस तत्परतेने त्यांचे अनुकरण करील. अशा प्रकारे मुले व प्रौढ या दोघांनाही फक्त कताईचेच शिक्षण सध्या देता येईल हे लक्षात येणे सोपे आहे.

साधी विचारसरणी

विचारसरणी साधी आहे. जे काम लवकरात लवकर स्वराज्य मिळविण्यास मदत करील तेवढ्याच कामाला आपण सर्वांनी पूर्णपणे लागले पाहिजे. या प्रकारची चळवळ म्हणजे कताई आहे. त्याच्यापासून आपण ह्याच वर्षात परदेशी कापडावरचा बहिष्कार यशस्वी करू आणि परदेशी कापडावरचा बहिष्कार म्हणजे स्वराज्य. इंग्रजीचे ज्ञान वाढवून आपण एका वर्षात स्वराज्य मिळवू शकणार नाही. आणि त्याकरिता करावयाचे श्रम निदान तात्पुरते तरी आपण थांबविले पाहिजेत. त्याचप्रमाणे मोठे गणितज्ञ होऊन किंवा मोठे शास्त्रीय शोध लावून आपण एका वर्षात स्वराज्य मिळवू शकत नसल्यामुळे तेही प्रयत्न आपण स्थगित केले पाहिजेत. त्याचप्रमाणे कागद, टाचण्या वगैरे तयार करण्याकरिता कारखाने काढून एका वर्षात आपण स्वराज्य मिळवू शकणार नाही. म्हणून त्याचेही प्रयत्न आपण पुढे ढकलले पाहिजेत. याच पद्धतीने आपण स्वतःला दुसऱ्या व्यवसायाबद्दल प्रश्न विचारावेत म्हणजे त्यांची तीच उत्तरे मिळतील आपल्या शिक्षण संस्थांत, कॉलेजांत, हायस्कूलसमध्ये, प्राथमिक शाळांत आणि शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजांत एकाच चळवळीला जागा आहे, असे आपल्याला दिसून येईल. जेव्हा हाताला विश्रांती पाहिजे असते आणि जेव्हा सुटीचा वेळ असतो त्या वेळी जे वाङ्मयाचे शिक्षण अवश्य वाटेल ते दिले जावे. सुशिक्षित इंग्लिश माणसाला फक्त कामात बदल करून ताजेतवाने होता येत असे. कॉमन्स सभेतून दमून, थकून बाहेर आल्यावर तो मुंग्या आणि माशा यांच्या हालचाली पाहात असे. याचाही कंटाळा आला म्हणजे तो पुस्तके वाची. अशा प्रकारे ह्या विविधतेत त्याला विश्रांती मिळे व तो ताजातवाना होई. आपल्या विद्यार्थ्यांना आपण ही सवय का लावू नये ? कातण्याचा कंटाळा आला म्हणजे त्यांनी हिंदीचा अभ्यास सुरू करावा. त्याचाही कंटाळा आला म्हणजे कताईकडे पुन्हा वळावे. जर त्यांच्यात तेवढे धैर्य उरले नसेल तर त्यांनी संगीत शिकावे. त्याचीही गोडी वाटेनाशी झाली म्हणजे त्यांनी पुन्हा चरखा हातात घेण्याचा विचार करावा. इतका वेळ लोटल्यानंतर त्यांना कातावेसे वाटले नाही तर त्यांनी ड्रिल आणि व्यायाम करावा. त्यानंतर त्यांनी पुन्हा कताईचा विचार करावा. अशा प्रकारे हळूहळू त्यांना कताईचे व्यसन लागेल. आज जर राष्ट्राला कोणत्या व्यसनाची जरूरी असेल तर ती कताईच्या व्यसनाची. जे पक्के दारूबाज आहेत त्यांच्या व्यसनावर

मी हा अत्यंत परिणामकारक तोडगा सुचवितो. दारूच्या नशेपेक्षा चरख्याची नशा ही कमी शक्तीशाली नाही. ज्याने अनुभव घेतला असेल त्यालाच त्याचा परिणाम ठाऊक आहे. दोहोंत फरक इतकाच, एक प्राण घेते– व दुसरे प्राण देते.

कामात कौशल्य

कौशल्याशिवाय चरखा चालवितां येत नाही. ती एक लहानशी योजना आहे. ती फिरवावयाला सोपी व किंमतीला क्षुल्लक अशी आहे. पण त्यात माणसाच्या चिकाटीची, त्याच्या निश्चयाची, त्याच्या प्रामाणिकपणाची आणि त्याच्या सोशिकपणाची चांगलीच कठीण कसोटी लागते. कातणे याचा अर्थ कापसापासून धागा कसातरी ओढून काढणे हा नाही. त्याचा अर्थ सर्व प्राथमिक प्रक्रिया परिचयाच्या असणे असा आहे. ज्यांनी "रामानुजां"चा लेख वाचला असेल त्याला हा मुद्दा समजेल. आंध्र-मधील ज्या स्त्रिया १२० नंबरचे तसू कातताल त्यांना कापसाचे गुणधर्म कोणते असावेत याची परीक्षा असते. त्या आपल्या हातांनी बोंडांतून कापूस काढतात, सरकी काढून टाकतात, स्वतः तो पिंजतात आणि नंतर स्वतःच पांढरे शुभ्र आणि समुद्राच्या फेसा-सारखे मऊ व तकतकीत पेळू तयार करतात. त्यांची सारी कला मुख्यत्वे याच प्रक्रियेत आणली जाते. यानंतर १२० नंबरचे सूत कातणे हा त्यांना पोरखेळ वाटतो. कताईला वेळ लागतो. प्राथमिक प्रक्रिया शिकावयाला फार सोप्या असतात, आणि कमी वेळ घेतात. आपल्यापैकी प्रत्येकाने या आदर्श स्त्रियांइतके प्राविण्य मिळवावे असे नाही. पण प्रत्येकाला पिंजण आणि पेळू करणे ही कला खात्रीने आत्मसात करणे ही खरोखर आवश्यक गोष्ट आहे. एका दिवसात पेळू करता येण्याचे शिक्षण घेता येते. पिंजण शिकावयाला एक आठवडा लागतो असे आपण समजू या. तथापि प्रत्येक कताई करणाराने एवढा वेळ दिलाच पाहिजे आणि पिंजण शिकले पाहिजे. गिरण्यांचे पेळू वापरले तर आपला हेतू सिद्धीस जाणार नाही. शिवाय सर्व ठिकाणी असे पेळू पुरविणे अशक्य आहे.

वाचकांनी हेही लक्षात ठेवावे की, पूर्वीच्या काळी पिंजण हा एक धंदा होता. ते सामाजिक कर्तव्य नव्हते आणि म्हणून इतर कसबी लोकांप्रमाणे पिंजारी आपला दररोजचा रोजगार मिळवीत असे. पिंजारी महिन्याला ४५ रुपये सहज मिळवितात. निदान ३० रुपयांपेक्षा कमी मिळवीत नाहीत. मुंबईत काही पिंजारी दररोज २॥ रुपये मिळवितात. पिंजणाकडे स्वतः लक्ष द्यावयास कातणाऱ्याला इतका कमी वेळ लागेल की, जर त्याला पैसेच मिळवावयाचे असतील तर प्रत्येक पौंडामागे २ आणे अधिक कमाविता येतील. दिवसभरात कताईकरिता जेवढा कापूस लागतो तेवढा थोडक्या वेळात सहज पिंजून होतो.

माझे चुकीचे हिशेब

चार तासांत शाळेतील मुलगा कताई करून १ आणा मिळवू शकेल, असा जो हिशेब मी मांडला होता तो अनुभवाने चुकीचा ठरला. सुदैवाने माझी चूक सावधगिरीच्या बाजूला झाली. मला माझ्या अज्ञानाची जाणीव असल्यामुळे मी फाजील सावधगिरी घेतली. ८ तास कताई केली तर २ आण्यांपेक्षा जास्त मजुरी मिळणार नाही असा मी हिशेब धरला होता. आता मला असे दिसते की, एखादा कातणार ८ तासांत २० तोळे सुताऐवजी ४० तोळे सूत काढू शकेल. ४० तोळे सूत काढण्याची सरासरी मजुरी जर आपण ४ आणे धरली तर ८ तास सूत कातल्याने कामगाराला ४ आणे मिळतील. सत्याग्रह सप्ताहात सत्याग्रह आश्रमातील मुले फक्त कताईच करीत असत. त्यांतील काहीजण १० तास कातीत असत आणि काही पहाटे ४॥ वाजता कताई सुरू करीत. त्याचा परिणाम असा दिसला की एक विद्यार्थी १० तासांत ७० तोळे सूत कातू शकला. त्याचा अर्थ तासाला ७ तोळे सूत. त्यातले काही जण तासाला ५ तोळे सूत कातीत. त्यांच्यापैकी कोणालाही पाच महिन्यापेक्षा अधिक पूर्वीचे शिक्षण नव्हते आणि तेही शिक्षण दररोज ४ तासही मिळत नव्हते. या मुलांच्या शक्तीवरून माझे डोळे उघडले आणि मला कळून चुकले की कोणताही दक्ष मुलगा तासाला ५ तोळे सूत खात्रीने देऊ शकेल. त्या दराने आपल्या शाळेकरिता ४ तास काम करणारा मुलगा तासाला २ पैशांची कमाई म्हणजे महिन्याला रु. ३–२ आणे–० पै इतकी कमाई पंचवीस दिवसांत दररोज ४ तासांप्रमाणे करू शकेल. मी हे उत्पन्नाचे जास्तीत जास्त प्रमाण धरतो. पण आपण असे धरू या की, शाळेला दरमहा सरासरी दोन रुपये मिळतात; तर २० मुलांच्या वर्गातून महिन्याला ४० रुपये मिळू शकतील. कार्यक्षम शिक्षकाला उत्साही मुले महिना ६० रुपये सहज देऊ शकतील. ही एक चूक होती.

अधिक अनुभवावरून असे लक्षात आले की, मुलांनी स्वतःच कापूस पिंजावा आणि पेळू करावेत. त्यामुळे प्रत्येक अर्धा पौंड कापसामागे १ आणा अधिक उत्पन्न वाढेल. मी पिंजण आणि पेळू करणे याचा पौंडाला २ आणे दर धरतो. या कामाला काही काळ लागणार असल्यामुळे ४ तासाचे अधिक उत्पन्न ४ पैशांऐवजी २ पैसे धरावे. त्यामुळे २५ दिवसांत ५० पैशांची भर पडेल. याचा अर्थ चांगला मुलगा रु. ३–२–० अधिक रु. ०–१२–६ म्हणजे रु. ३–१४–६ देऊं शकेल. माझा पूर्वीचा अंदाज फक्त रु. १–९–० इतका होता. ही जी दुसरी चूक मी केली त्याचे कारण असे होते की, मी पिंजण हे स्वतंत्र काम धरले आणि ते धंदेवाईक पिंजाऱ्यावर सोपविले पाहिजे असा ग्रह केला.

जेव्हा शाळांतून कताई आणि विणकाम सुरू होईल तेव्हा तेथे कापसाचा वगैरे साठा केला जाईल, आणि जेव्हा सुताची बाजारची[1] किंमत आपण लक्षात घेऊ तेव्हा

१. शाळेला पडणाऱ्या किंमतीशी तुलना करता.

त्यात थोडीशी अधिक रक्कम धरली पाहिजे. एक पौंड सुतामागे आपण २ पैसे जर अधिक धरले तर तो अंदाज फारसा जास्त होईल असे मला वाटत नाही. जेव्हा आपण या साऱ्या आकड्यांचा बिनचूक हिशेब करू, तेव्हा आपल्याला असे दिसेल की, प्रत्येक दृष्टिकोणातून राष्ट्राचा फारच मोठा फायदा आपण करीत आहो. तो फायदा किती मोठा होईल हे जर कारखान्यांच्या व्यवस्थापकांना विचारले तर आपल्याला ते समजून येईल. जर शाळेत जाणाऱ्या लक्षावधी मुलांना हा व्यवसाय शिकविला आणि त्यांच्या कामाच्या किंमतीचा अंदाज केला व या प्रकारे सुताच्या बाजारावर लोक ताबा मिळवू शकतील ही-ही गोष्ट लक्षात घेतली, म्हणजे देशाचा किती मोठा फायदा होईल याचा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा मला अशी खात्री वाटते की, देशाने ही साधी व सरळ गोष्ट समजून घेतली तर देशाची भूक फार थोड्या काळात भागेल.

अद्याप एक गोष्ट शिल्लक राहिली. ज्या वेळी आपण शाळांतून विणकामही सुरू करू त्या वेळी त्यांची प्राप्ती अधिकच वाढेल. जर आपण दर तासाला कताईचे २ पैसे धरले तर दर तासाला विणाईचा १ आणा धरण्यास काहीही धोका नाही. पण जरी सध्या आपण विणाईचा हिशेब बाजूला ठेवला तरी ज्या शाळेत प्रत्येक मुलगा दरमहा शाळेकरिता ४ रुपये मिळवितो, म्हणजे शाळेला ४ रुपये फी देतो, त्या शाळेला अनुदान किंवा देणगी लागणार नाही. ती शाळा स्वावलंबी होईल आणि विद्यार्थ्यांना रोख फी द्यावी लागणार नाही.

मी सुरत नगरपालिकेला ह्या प्रकारचे शिक्षण द्यावयास सांगितले आहे. ती नगरपालिका आपले १ लक्ष १० हजार रुपयांचे अनुदान सोडावयास तयार आहे. जर हे करणे शक्य होईल तर अधिक कर बसवावे लागणार नाहीत. मुलांना मोफत शिक्षण देता येईल आणि स्वराज्याच्या चळवळीला फार मोठी मदत होईल. मी सुचविलेला उपाय हा असा अत्यंत प्रभावी आहे.

माझे अडचणींकडे दुर्लक्ष नाही. सर्वांत मोठी अडजण जागेची. पण जेथे नागरिक उपकारी बुद्धीचे असतात, तेथे अशा अडचणी दूर करणे सोपे असते. चरखे ठेवण्याकरिता जातिसंस्थांच्या व इतर संस्थांच्या इमारती, तशीच देवळे आणि मशिदी यांचा उपयोग करता येईल. जी मुले सामान्यतः सध्यांच्या शाळांतून कोंडली जातात अशा सर्व मुलांना कताईचे शिक्षण देता येणार नाही. सुदैवाने चरख्याला थोडीशी जागा लागते पण तो श्वासोच्छ्वास करीत नाही आणि म्हणून त्यांनी जरी जागा व्यापली तरी तो हवा दूषित न करता हवा शुद्ध करील, आणि हवेमध्ये सापेक्षतः कमी अशुद्धता असल्यामुळे मुलांची शारीरिक परिस्थिती मनाच्या बरोबरच सुधारेल.

चरख्यातून स्वराज्य

एका सद्गृहस्थाने अत्यंत नम्रपणे व कारणे देऊन चरख्याच्या स्वराज्य देण्याच्या सामर्थ्याबद्दल शंका उपस्थित केल्या आहेत. जरी ते सारे पत्र उद्धृत करण्यालायक असले तरी जागेच्या अभावी मी त्याच्या म्हणण्याचा सारांश देतो. तो म्हणतो, चरखा हा आपल्याला कदाचित स्वावलंबी बनवील, तो आपल्याला सुखाने जगण्याइतका पैसा मिळविण्यास मदतही करू शकेल पण तो राजकीय सत्ता मिळविण्यास कशी मदत करील हे मला समजत नाही. क्लाइव्हच्या वेळेला चरखा होता आणि तरीही आपले स्वातंत्र्य गेले, याचा अर्थ असा की, जरी लँकेशायरचे हितसंबंध नष्ट झाले तरी इंग्लंडचे हित-संबंध नष्ट होतात असे नाही. म्हणून परदेशी कापड आयात करण्याचे थांबविले तरी इंग्लंडचे हिंदुस्थानांत पुष्कळच संस्थापित हितसंबंध कायम राहतील." या शंका अर्थातच निरर्थक नाहीत पण नवजीवनच्या वाचकांना त्यांची उत्तरे देणे सोपे असले पाहिजे. त्या शंका नवजीवनच्या सततच्या व काळजीपूर्वक वाचक असू शकणाऱ्या एका मित्राने काढल्या असल्यामुळे माझ्या स्पष्टीकरणाची शक्ती अपुरी पडते असे मला वाटते. जर मी या गोष्टीचे स्पष्टीकरण सावकाश व निरनिराळ्या प्रकारे करण्याची चिकाटी दाखविली तर वाचकांची हळूहळू खात्री पटेल. माझ्या विचारसरणीत दोष नाहीत याची मला पुरी खात्री आहे. पण माझी स्पष्टीकरणाची शक्ती ही कमी असली पाहिजे. पत्रलेखक निदान एवढे तरी कबूल करीत असल्याचे दिसते की, चरख्याच्या मदतीने आपण परदेशी कापडावर बहिष्कार घालू शकू. तसे असल्यास माझे म्हणणे असे की, ज्या शक्तीमुळे असंख्ये अडचणींना तोंड देऊन आणि सरकारी छळाची पर्वा न करून परदेशी कापडावरचा बहिष्कार आपण यशस्वी करू शकतो, तीच शक्ती आपल्याला राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यास उपयुक्त ठरली पाहिजे.

आता आकडे तपासू. आपण साठ कोटी रुपये परदेशी कापडावर खर्च करतो. नंतर साखर. ती तेवीस कोटी रुपये घेऊन जाते. नंतर पोलाद सोळा कोटी नेते. नंतर महत्त्वाची बाब म्हणजे यंत्रसामुग्री. ती साडेनऊ कोटी रुपये खाऊन टाकते. तितकाच पैसा खनिज तेल नेते. बाकीच्या वस्तू तुलनेने कमी महत्त्वाच्या आहेत. साठ कोटी रुपये वाचविण्याचे जे महान कार्य आपण हाती घेतले आहे, ते जर आपण यशस्वी केले, तर बाकीच्या रकमांत बचत करणे हा पोरखेळ होईल. याचा अर्थ असा की, इंग्लंडच्या शोषणाच्या धोरणातील जो सर्वांत मोठा घटक आहे तो जर आपण काढून टाकला तर उरलेल्या गोष्टी काढून टाकणे फारसे कठीण जाणार नाही. माझी खात्री आहे की, जेव्हा ही आदर्श स्थिती आपण प्राप्त करून घेऊ तेव्हा इंग्लंडला आमच्यापासून आर्थिक लाभ होणार नसल्यामुळे ते आपले सैन्य येथे ठेवणार नाहीत आणि बळ-जबरीने आपली दुसरी कोठलीही सत्ता टिकविणार नाहीत.

दुसऱ्या दृष्टिकोणातून आपण ही बाब तपासू. स्वराज्य मिळविण्याकरिता आपल्याला प्रामाणिकपणा, ऐक्य, खंबीरपणा, संघटनाशक्ती, राष्ट्रीय धंदे उभारण्याची ताकद, देशव्यापी स्वदेशभक्तीची वृत्ती, दुर्दम्य धैर्य आणि स्वार्थत्यागाची वृत्ती हवी आहे. जेव्हा आपण हे सर्व गुण प्रकट करू तेव्हा साऱ्या देशात त्याच वेळी चरख्याचे पुनरुज्जीवन होईल. जे राष्ट्र हे गुण प्रकट करील त्या राष्ट्राला जगातील कोणतीही शक्ती गुलामगिरीत ठेवू शकणार नाही.

ज्या दिवशी देश धार्मिक कर्तव्य म्हणून परदेशी कापडावरील बहिष्कार अंमलात आणील त्याच दिवशी आपण ब्रिटिश सरकारला निर्वाणीचा खलिता पाठवू शकू. त्या वेळेपर्यंत आपण इतकी शक्ती कमाविलेली असेल की, जर सरकारने आपल्या निर्वाणीच्या खलित्याला दाद दिली नाही, आपल्या इच्छांना मान दिला नाही, तर शेतसारा देण्याचे थांबविण्याइतके आपण बलाढ्य झालेले असू.

क्लाइव्हच्या वेळी चरखे होते हे खरे आहे. त्या वेळी आपण गुलाम केले गेलो नव्हतो. पण ती क्रिया सुरू झाली होती. जसजसा चरखा अधिक अधिक अडगळीत पडला तसतसे आपण अधिक अधिक गुलाम बनत गेलो. किंवा ईस्ट इंडिया कंपनी ही आपल्याला लुळेपांगळे करण्यात अधिक अधिक लक्ष घालू लागली.

जडजवाहिर वगैरेंचे काय केले ?

सदर सद्गृहस्थ दुसऱ्या पत्रात म्हणतात की, मी रोकड, जवाहिर वगैरे गोळा करीत आहे आणि लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. पण ते विचारतात, ज्या वेळी प्रत्येकावरील माझा ताबा सुटेल किंवा जर माझा स्वराज्याच्या चळवळीशी असलेला संबंध हा समाप्त होईल तेव्हा या सर्व जमा केलेल्या रकमांचे काय होईल? हाही प्रश्न पूर्वीच्या प्रश्नाइतकाच महत्त्वाचा आहे. माझ्या दौऱ्यात मला रोकड किंवा जवाहिर मिळते ते मी जेथे विभागीय प्रांतिक काँग्रेस कमिट्या आधीच स्थापन झाल्या असतील त्यांच्या हवाली करतो; आणि संबंधित प्रांत त्यांचे हिशेब ठेवतात ही माझी खात्री आहे. अगदी अचूक सांगावयाचे म्हणजे बंगालमधील जमा श्री. चित्तरंजन दास यांच्या स्वाधीन केली आहे. बिहारमधील जमा तेथील सेक्रेटरी बाबू राजेंद्रप्रसाद[1], संयुक्त प्रांतात पंडित जवाहरलाल नेहरू, मध्यप्रांतात शेठ जमनालालजी[2], दिल्लीत डॉ. अन्सारी[3],

१. डॉ. राजेंद्रप्रसाद (१८८४-१९६३). काँग्रेस पुढारी; वकील व विद्वान; घटना परिषदेचे अध्यक्ष १९४६ ते १९५०; भारताचे पहिले राष्ट्रपती १९५० ते १९६२.

२. जमनालाल बजाज (१८८९-१९४२); व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व दानशूर; काँग्रेसचे अनेक वर्षे खजिनदार व गांधींचे निकटचे सहकारी.

३. डॉ. मुखतार अहमद अन्सारी; (१८८०-१९३६) राष्ट्रीय मुसलमान पुढारी, मुस्लिम लीगचे अध्यक्ष १९२०; भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष १९२७-१९२८.

पंजाबात लाला लजपतराय,[१] उत्कलमध्ये श्री. गोपबंधु दास, आंध्रात श्री. वेंकटअप्पय्या, मद्रासमध्ये श्री. राजगोपालाचारी[२], कर्नाटकात श्री. गंगाधरराव देशपांडे, महाराष्ट्रात श्री. नरसोपंत केळकर, मुंबईत शंकरलाल[३] बॅन्कर, गुजरातेत श्री. वल्लभभाई पटेल. साऱ्या सिंध प्रांताकरिता नवीन प्रांतिक कमिटी बनविण्यात आली नाही आणि तेथे निरनिराळ्या जिल्ह्यांत सहकार्य नाही. म्हणून तेथे जमा झालेल्या रकमा मी माझ्याबरोबर नेल्या आणि मी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीमार्फत त्यांची व्यवस्था ठेवण्याची तजवीज करीत आहे. ज्या ठिकाणी रोकड व जवाहिर दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आले, ती सर्व मंडळी अत्यंत आदरणीय आहेत. ते स्थानिक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किंवा सेक्रेटरी आहेत. आणि ते माझ्या विश्वासातील आहेत. देणगीदारांना त्यांच्या देणग्यांची व्यवस्था मी काय करू इच्छितो हे मी त्यांना सांगितले आहे. प्रत्येक प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने सर्व निधींचे हिशेब ठेवलेच पाहिजेत आणि ते प्रसिद्ध केले पाहिजेत. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचा त्याच्यावर ताबाही आहे. म्हणून ह्या निधीच्या अफरातफरीचे संभव फारच थोडे आहेत. यापेक्षा अधिक काय करता येईल? मी हे मान्य करतो की, जो पुष्कळसा पैसा मिळतो तो सध्या लोकांना माझ्याबद्दल आदर वाटतो म्हणून मिळतो. पण त्या निधीचा ज्या कामात उपयोग करावयाचा आहे त्यावर लोकांची श्रद्धा आहे. आणि याचबरोबर तितकाच ज्या व्यक्तीची स्मृती आपण कायम ठेवणार आहोत त्या व्यक्तीचा मोठेपणा हाही त्या देणग्यांना कारणीभूत झाला आहे. पैसा योग्य रीतीने खर्च केला जाईल याबद्दल सर्व खबरदारी घेण्यात आली आहे. गुजरात-मधील जमा झालेल्या रकमांचे हिशेब लवकरच प्रसिद्ध केले जातील. आणि वेळोवेळी ते हिशेब तसेच प्रसिद्ध होत राहतील. गुजरातमधील बंधुभगिनींना माझा सल्ला आणि विनंती अशी आहे की, त्यांनी सर्व संस्था जागृत ठेवाव्या आणि स्वतः जागृत राहावे. आपला भविष्यकाळ एक कोटी रुपये जमा करण्याच्या यशावर आणि ती रक्कम खर्च करण्याच्या संपूर्ण प्रामाणिकपणावर अवलंबून आहे.

एक अंत्यजाचे प्रकट पत्र

श्री. जुठाभाई शिवाजी नावाच्या एका गृहस्थाने मला प्रकट पत्र पाठविले आहे. हा त्याचा गोषवारा तो म्हणतो की, हिंदू लोक अंत्यजाबद्दल माझी भाषणे ऐकत

१. लाला लजपतराय (१८६५–१९२८;) देशभक्त, त्यांना पंजाबचे सिंह म्हणत; ब्रिटिश सरकारने त्यांना १९०७ मध्ये हद्दपार केले. ते काही वर्षे अमेरिकेत राहिले. कॉंग्रेसचे अध्यक्ष १९२०.

२. चक्रवर्ती राजगोपालाचारी; (१८७९). वकील, पत्रकार, ग्रंथकार व मुत्सद्दी; हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल १९४८–१९५०.

३. शंकरलाल बॅन्कर; समाजसेवक; पुढारी, यंग इंडियाचे मुद्रक व प्रकाशक. १९२२ साली गांधींजींच्याबरोबर त्यांना पकडले व शिक्षा झाली.

असतील तर ती मला फक्त खूष करण्याकरिता. अंत्यजांच्या गैरहजेरीबद्दल मला दुःख[1] झाले, यावर विश्वास ठेऊन तो असे म्हणतो की, अंत्यज जे गैरहजर राहिले ते खोट्या अफवांच्या भीतीने गैरहजर राहिले नाहीत, परंतु विश्वासाच्या अभावामुळे. श्री. जुठाभाई-प्रमाणेच ज्यांना वाटते त्यांना मला असे सांगू द्या की, जो खेद मला झाला तो स्वतःला सनातनी म्हणविणाऱ्या हिंदूंच्या गैरहजेरीमुळे. माझ्या भाषणात हिंदूंना मी विनंती केली होती आणि म्हणून त्यांनी हजर असावे अशी माझी इच्छा होती. तथापि अंत्यज हे मोठ्या संख्येने हजर नव्हते. कारण त्यांना विश्वास वाटत नव्हता हे खरे आहे. पण तीही खेदाची गोष्ट आहे. त्यांनी फक्त स्वतःवरच विश्वास ठेवण्याची जरूरी आहे. अंत्यज परिषद भरविण्याचा उद्देश साऱ्या हिंदू समाजावर प्रभाव पाडण्याऐवजी अंत्यजावरच अधिक प्रभाव पाडणे हा होता. जे पुष्कळसे ठराव पास झाले ते अंतर्गत सुधारणांबद्दल होते. अंत्यज मित्रांनी असा गैरसमज करून यापुढे परिषदांपासून दूर राहू नये असे मला वाटते.

जुठाभाई पुढे म्हणतात की, स्वराज्याकरिता चळवळ सुरू करण्यापूर्वी आम्ही प्रथम अस्पृश्यतेच्याविरुद्ध लढा सुरु केला पाहिजे. सवर्ण हिंदूंकडून अंत्यजांचा सैतानी छळ संपविल्यानंतर ब्रिटिश सत्तेचा धिक्कार करणे समर्थनीय होईल. श्री. जुठाभाईंच्या या म्हणण्याशी मी सहमत आहे; तथापि त्यांत एक भयंकर दोष आहे. स्वराज्याचा लढा हा आपल्या पातकापासून मुक्त होण्याचे एक आंदोलन आहे. आत्मशुद्धी म्हणजे पातकातून मुक्ती. जोपर्यंत अंत्यजांची अस्पृश्यता समाप्त होत नाही तोपर्यंत हिंदूंचीही समाप्त होणार नाही. एकीचा दुसरीशी निकटचा संबंध आहे. अंत्यजांना अस्पृश्य म्हणून मानण्याची पापी रूढी ही सोडून दिली जात नाहीं तोपर्यंत स्वराज्य कसे जिंकता येईल ? म्हणून जुठाभाईंच्या विचारसरणीचे जे कोणी असतील त्यांनी धीर धरावा आणि स्वराज्याच्या ह्या चळवळीत पूर्णपणे भाग घ्यावा. अंत्यजांना स्वराज्य देणारे इतर हिंदू नाहीत. ते स्वतःच स्वराज्य मिळवितील. ज्याला स्वराज्याची कल्पना करता येते त्याला असहकारितेची जरूरी पटल्याशिवाय राहणार नाही.

कलोलचे हिंदू

गुजरातच्या माझ्या अनुभवांचे वर्णन करताना मी कलोल महाजनांना[2] अंत्यजा-बद्दल वाटत असलेल्या आदराविषयी बोललो. नंतर मला असे कळले की, मी अंत्यज वस्तीला भेट दिल्यामुळे ते इतके क्रुद्ध झाले की, त्या भेटीबद्दल ते कठोरपणे बोलले; आणि पुष्कळांनी प्रायश्चित म्हणून स्नानही केले. हे सर्व ऐकून मला दुःख झाले. त्यांच्या क्रोधाचे एक कारण मला असे सांगण्यात आले की, मी निघून गेल्यानंतर काही

१. पाहा खंड १९ प्रकरण २८४.

२. स्थानिक व्यापारी जमात किंवा त्यांची प्रातिनिधिक संस्था.

लोकांनी जबरदस्तीने अंत्यजांना मंडपात घुसविले. जर कोणी असे केले असेल तर ती माझ्या दृष्टीने चूक आहे. एकमेकांचे विचार बरोबर असोत वा चूक असोत, ते सहन करण्यानेच आपली प्रगती होणार आहे. ज्यांनी स्नान केले आणि जे माझ्याबद्दल कठोर शब्द बोलले, त्यांत त्यांनी आपल्या हक्कांचे अतिक्रमण केले नाही. अंत्यजांना शिवणे हे ज्यांना पाप वाटते त्यांची बळजबरीने चूक दूर होणार नाही. अस्पृश्यतेचे पातक हे जर स्वच्छ धुऊन टाकावयाचे असेल तर आपण सोशिक बनले पाहिजे व धर्माचा अर्थ त्यांना समजावून सांगितला पाहिजे. ह्या घटनेपासून मला एकच बोध घ्यावयाचा आहे आणि तो म्हणजे, स्वराज्यप्राप्तीच्या आशेने मोहित होऊन किंवा मला खूष करण्याचा प्रयत्न करून आपली मते मागे सारू नयेत किंवा स्वतःच्या भावना दडपून टाकू नयेत आणि अंत्यजांना शिवू नये. जर एखाद्या गोष्टीपासून आपल्याला फायदा करून घ्यावयाचा असेल तर ती गोष्ट विचारपूर्वक आणि पूर्ण समजूत पटवून करावी. दुसऱ्यांच्याबद्दल अस्थानी आदर, भीती व इतर अशाच गोष्टी स्वराज्याला अडथळा करतात.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ८-५-१९२१.

४०. अलाहाबाद परिषदेतील मानपत्राला उत्तर[1]

मे १०-१९२१

महात्माजींनी थोडक्यात भाषण करून अलाहाबादच्या जनतेच्या उत्साहपूर्ण स्वागताबद्दल आभार मानले. आणि ते म्हणाले, मी अलाहाबादला इतके वेळा आलो आहे की मला घरीच आल्यासारखे वाटते. आपल्या अलीकडच्या दौऱ्यांत निरनिराळ्या नगरपालिकांनी स्वागतपर मानपत्रे देणे ही एक वहिवाटच झाली आहे. मानपत्र देणे म्हणजे असहकारितेच्या कार्यक्रमाशी आपण सहमत आहो असे प्रदर्शित करणे आहे;

१. अलाहाबाद जिल्हा परिषदेत, नागरिकांतर्फे स्वागतपर मानपत्र मोतीलाल नेहरू यांनी वाचून दाखविले. महंमद अली अध्यक्ष होते. प्रतिनिधी व शेतकऱ्याशिवाय पुढील मंडळी हजर होती. कस्तुरबा, लाला लजपतराय, शौकत अली, रामभुज दत्त चौधरी, हजरत मोहानी, डॉ. किचलू, स्वामी श्रद्धानंद, पुरुषोत्तमदास टंडन, सरोजिनी नायडू आणि जवाहरलाल नेहरू.

आणि जे मानपत्र देतात ते सध्याच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्याबरोबर आहेत असे सांगत असतात. अलाहाबादला तेथील म्युनिसिपल कमिशनर्सना असे वाटले की, गांधीजी हे राजकारणी असल्यामुळे त्यांना मानपत्र देणे उचित होणार नाही. एका दृष्टीने त्यांचे म्हणणे बरोबर आहे. पण ही वृत्ती आमूलाग्र बदलली पाहिजे. नगरपालिकांना आपल्या शक्तीची जाणीव व्हावयास पाहिजे. दररोजचे तेच तेच काम चालवित बसणे ठीक नाही. आपल्याबरोबर काही वैर आहे म्हणून मानपत्र दिले गेले नाही असे त्यांनी वाटून घेऊ नये. आतापर्यंत त्यांना आणि त्यांचे बंधू मौलाना शौकत अली यांना जी मानपत्रे मिळाली ती लहान नगरपालिकांकडून मिळाली. मोठाल्या नगरपालिकांची विचारसरणी इतक्या तातडीने बदलणे कठीण आहे.

तथापि त्यांनी ही घडलेली गोष्ट विसरून जावी आणि काँग्रेसने सांगितलेले गाम करीत राहावे. आपल्याला याच वर्षात स्वराज्य मिळवावयाचे आहे, आणि खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर करावयाचे आहेत. नुसत्या परिषदा आणि व्याख्याने, काव्ये आणि मानपत्रे यांनी ते साध्य होणार नाही. आपला उद्देश ह्याच मार्गाने साध्य होण्यासारखा असता तर त्यांना काँग्रेसतर्फे तसे सहज करता आले असते. एकदा अशी वेळ होती की, काँग्रेस आणि इतर परिषदा सरकारपासून काही गोष्टी मागत असत, आणि जेव्हा ते पुढील वर्षी एकत्र येत आणि सरकारने त्यांच्या मागण्या पुऱ्या केलेल्या नसत तेव्हा ते निषेधाचा ठराव करीत आणि तेथेच हे प्रकरण संपे. आता ती वेळ बदलली आहे आणि आपले उद्दिष्ट आपल्याच प्रयत्नाने साध्य करून घ्यावयाचे आहे. काँग्रेसने एक व्यावहारिक योजना लोकांच्यापुढे ठेवली आहे आणि लोकांना आपले उद्दिष्ट प्राप्त करून घेण्याकरिता ती राबवावयाची आहे. लोकांनी जर परिषदा, काव्ये, मानपत्रे सोडली तर काहीही हानी होणार नाही. पण काँग्रेसने जे त्यांना करावयास सांगितले आहे, ते जर त्यांनी केले नाही तर त्यांना स्वराज्य कधीच मिळणार नाही.

मानपत्रात असे म्हटले आहे की, अलाहाबाद शहराला दुसरे एक नाव होते, ते फकिराबाद. आणि या शब्दाच्या पूर्ण अर्थाला सोजेसे ते शहर असावे अशी आपली इच्छा असल्याचे गांधी म्हणाले. सध्याच्या आपल्या चळवळीला फकिरांची किंवा आध्यात्मिक व्यक्तींची जरूरी आहे आणि त्या बाबतीत हे शहर हिंदुस्थानला मार्ग दाखवील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

काँग्रेसला लोकांपासून तीन गोष्टी पाहिजे आहेत त्या अशा : एक कोटी काँग्रेस सभासद नोंदविणे, एक कोटी रुपये टिळक स्वराज्य फंडाला जमविणे, आणि हिंदी घरांतून वीस लक्ष चरखे सुरू करणे. यांतील प्रत्येक बाबीबद्दल लोकांनी काय केले हे त्यांना जाणून घ्यावयाचे होते. पहिल्या बाबीबद्दल ते म्हणाले, माझ्यासमोर असलेले

सर्वजण काँग्रेस सभासद आहेत याचे मला स्मरण करून दिल्याबद्दल आनंद वाटतो; पण लोकांनी अधिक काम करावे आणि लोकसंख्येच्या[१] प्रमाणात लोकांनी आपल्या हिश्याचे पैसे जमवावेत अशी त्यांची इच्छा होती.

अलाहाबादहून टिळक स्वराज्य फंडाला फारसे पैसे जमा झाले नाहीत हे ऐकून त्यांना दुःख झाले. जर अलाहाबाद गरीब असेल तर त्यांनी रुपयात देणग्या देऊ नयेत. पण प्रांतातील हर एक मनुष्य प्रत्येकी २ पैसे देईल तर त्यांच्या वाट्याचे बरेचसे पैसे जमा होतील. अलाहाबाद ही एक यात्रेची जागा आहे. यात्रेकरूंना मदत करण्याकरिता त्यांनी सेवा समित्या बनवाव्या व त्यांनी लोकांजवळ फंडाकरिता पैसे मागावेत आणि जर या मार्गाने त्यांनी जोरदार काम केले तर त्यांना आपल्या वाट्यापेक्षा जास्त नसली तरी वाट्याइतकी रक्कम सहज गोळा करता येईल.

पुढचा प्रश्न वीस लाख चरख्यांचा. हे चरखे लोकांनी विकत घ्यावे. आणि त्यांची पूजा करण्याकरिता ते नको असून महंमद अलींनी आपल्या एका भाषणात म्हटल्याप्रमाणे ब्रिटिश सरकारने जसे मशीनगन्सपासून काम करून घेतले तसे काम करून घेण्याकरिता पाहिजे आहेत. जर वीस लाख चरखे दररोज ४ तास चालतील तर फार थोड्या वेळात कोणत्याही हिंदी माणसाला आपल्या देशात तयार झालेला कपड वापरण्यास लाज वाटणार नाही. मौलाना शौकत अलींच्याबरोबर गांधीजींनी जो नुकताचा दौरा केला होता त्यात त्या दोघांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याची देशाला अत्यंत निकडीची गरज आहे हे समजावून सांगितले आणि देशाला अजूनही गोष्ट पटत नसेल तर कितीही प्रचार केला तरीही ती पटणार नाही. त्यांनी आपण पूर्णपणे अनत्याचारी आहो असेही दाखवून दिले होते. ह्या बाबतीत काही किसानांनी काटेकोरपणे अनत्याचार पाळला नाही म्हणून गांधींना दुःख झाले. आणि गांधींनी त्यांच्या वर्तनाबद्दल जोरदार नापसंती व्यक्त केली. आपल्या शत्रूकरिताही अत्याचारी भाषा वापरता कामा नये हे त्यांनी समजून घ्यावे आणि अत्याचारी बनण्याऐवजी क्लेशाची व त्यागाची वृत्ती त्यांनी निर्माण करावी. आपल्यातील काही लोकांना जरी तुरुंगात पाठविले तरी लोकांनी संताप व्यक्त करणारी निदर्शने करू नयेत. कारण तुरुंगांत जाण्याच्या तयारीने ते स्वराज्या-कडील आपला मार्ग लवकर आक्रमण करू शकतील. मालेगावच्या लोकांच्या कृतीबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली; व या घटनेपासून धडा घ्या आणि त्याची पुनरावृत्ती करू नका असे त्यांना बजाविले. गांधीजी म्हणाले, जर मला किंवा शौकत अलींना किंवा मौलाना महमंद अलींना किंवा या कार्यातील एखाद्या कार्यकर्त्याला तुरुगांत पाठविले तरी त्यांनी जरी फौजदाराने आपली माणसे मारली असली तरी आपण त्याला ठार मारू नये.

१. १२-५-१९२१ पायोनियरचा अहवाल म्हणतो, "अलाहाबाद जिल्हा आणि शहरात किती काँग्रेस सभासद झाले, हे त्यांना कळून घ्यावयाचे होते आणि त्यांनी परिषद संपण्यापूर्वी श्रोत्यांनी आपली नावे पाठवावी असे त्यांना बजाविले."

जेव्हा ही वृत्ती लोकांच्यात आम्ही निर्माण करू आणि जेव्हा लोकांना तुरुंगाची भीती वाटेनाशी होईल त्या वेळी स्वराज्य दूर राहणार नाही. गांधीजी म्हणाले, माझ्या-सारख्या कार्यकर्त्याला तुरुंग ही विश्रांतीची व सुखसोयीची जागा वाटते.

मौलाना महंमद अली जे शब्द उच्चारतात, तेच शब्द मी उच्चारत असता सरकार त्यांना अडकवून टाकण्यास का उत्सुक आहे, असे गांधींनी विचारले. मौलाना महंमद-अलींचा गुन्हा असा असल्याचे सांगतात की, ते म्हणाले होते की अफगाण हिंदुस्थाना-वर जेव्हा स्वारी करील, तेव्हा ब्रिटिश सरकारला त्या मोहिमेविरुद्ध पैशाची किंवा माणसांची मदत करू नये असा संदेश आपण हिंदी लोकांना देऊ. त्यातील प्रत्येक शब्दाचा मी पाठपुरावा करतो. त्यांनी हिंदूंना सांगितले की, अफगाणच्या संभाव्य संकटाला तुम्ही भिऊ नका. कारण कोणताही धर्म आपल्या अनुयायांना भेकड झालेले पाहू इच्छित नाही. पठाण हे फार बलाढ्य आहेत असे मला ठाऊक आहे. पण पठाण कितीही बलाढ्य असला तरी तो मला गोमांस खाण्यास किंवा माझ्या धर्माविरुद्ध वर्तन करण्यास भाग पाडणार नाही. सध्याच्या सरकारने आपला विश्वास गमावला आहे. आणि जोपर्यंत हे सरकार खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर करणार नाही तोपर्यंत त्यांनी अफगाण किंवा इतर राज्याने हिंदुस्थानवर स्वारी केली तर हिंदुस्थानपासून मदतीची अपेक्षा करू नये. तथापि कोणत्याही परिस्थितीत आपण अनत्याचारी राहिले पाहिजे आणि अत्यंत प्रक्षुब्ध परिस्थितीतसुद्धा कोणालाही ठार मारता कामा नये. कारण तसे त्यांनी केल्यास स्वराज्यावरचा आपला हक्क ते गमावतील.

शेवटी गांधींनी एका गोष्टीवर भर दिला. आज हिंदू व मुसलमान या दोघांचा एकच धर्म आहे आणि तो म्हणजे खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर करवून घेणे आणि देश गुलामगिरीतून वाचविणे. जर तुम्हांला ह्या देशाकरिता काम करावयाचे असेल तर तुम्ही काँग्रेसचे पुढारीपण माना आणि काँग्रेसच्या आज्ञा ह्या आपल्या महान ध्येयाच्या दृष्टीने कितीही क्षुल्लक वाटल्या तरीही त्या अमलात आणा.

काँग्रेसच्या नेतृत्वाचे अनुयायित्व करण्यास परमेश्वर तुम्हांला भरपूर शक्ती देवो, अशी त्यांनी शेवटी परमेश्वराची प्रार्थना केली.

'अमृतबझार पत्रिका', १३-५-१९२१.

४१. टिप्पणे

स्वामी गोविंदानंद

अशा प्रकारे स्वामी गोविंदानंदांना पाच वर्षे हद्दपारी मिळाली. त्यांची पाठ टणक आहे. त्यांनी पूर्वी खटल्याशिवाय शिक्षा भोगल्या आहेत. ज्या निरनिराळ्या तुरुंगात त्यांना ठेवण्यात आले तेथील छळांचे अनुभव त्यांनी दप्तरी दाखल केले. आहेत. आता त्यांच्या चौकशीचा फार्स झाला आणि योग्य मार्गाने त्यांना शिक्षा झाली. हद्दपारीच्या शिक्षेला त्यामुळे काही महत्त्व प्राप्त होते का, किंवा या साऱ्या प्रकारातील ढोंगीपणा त्यामुळे दिसून येत नाही का ? स्वरूप बदलले पण वृत्ती तीच आहे. जर कशाची जरूरी असेल तर ती वृत्तीतील बदलाची होय. "जो गौरवास्पद कृत्ये करतो तो गौरवास्पद होतो." मी स्वामींच्या भाषणाचा संपूर्ण वृत्तांत वाचला आहे. त्यात काही कटू व अपमानास्पद भाषा आहे, यापलीकडे विशेष त्यात नाही. त्यात अत्याचाराला प्रोत्साहन नाही. अप्रीती खास आहे. पण अप्रीतीचा उच्चार करण्याकरिता ते खटल्याला पात्र असतील तर मी त्यांच्याइतकाच अपराधी आहे. सध्याच्या सरकारी राज्यपद्धतीबद्दल माझ्याइतकी अप्रीती क्वचितच कोणाला वाटत असेल. कारण या पद्धतीबद्दल जितकी भयानकता मला वाटते तितकी दुसऱ्या कोणाला वाटत नसेल. हिंदुस्थानात अप्रीती ही सर्वसामान्यपणे स्थापित गोष्ट झाली आहे असे कोणीही म्हणेल. आणि जोपर्यंत वक्ते हे अत्याचाराला चिथावणी देत नाहीत तोपर्यंत पोलिसांच्या नजरेतून ते सुटले पाहिजेत ! ह्या सरकारला सुसंगत धोरण नाही हीच सर्वांत वाईट गोष्ट आहे. प. वा. चेंबरलेन[1] असे वारंवार अभिमानाने सांगत की, ब्रिटिश अधिकाऱ्याचा शब्द हा दस्तऐवजाइतका खरा असतो. तथापि आज आपल्याला दुःखदायक अनुभवावरून असे प्रत्ययास येते की, ब्रिटिश सरकारचा दस्तऐवज हा रद्दीच्या कागदाइतकाच आहे. जेव्हा सर विल्यम व्हिन्सेंट यांनी हिंदी लोकांच्या कानापर्यंत पोहोचणारे आश्वासन मोठ्या तोऱ्याच्या शब्दांत दिले की, जोपर्यंत असहकारितावादी अत्याचाराला चिथावणी देणार नाहीत तोपर्यंत त्यांच्या वाटेला कोणी जाणार नाहीत. त्या वेळी सुदैवाने हिंदी लोकांना सर व्हिन्सेंट यांच्याबद्दलचा भ्रमनिरास झालेला होता. त्या आश्वासनाचा अर्थ असा की, जोपर्यंत असहकारितावाद्यांच्या प्रचाराचा परिणाम प्रभावी कृतीत होत नाही तोपर्यंत त्यांना हात लावू नये. आपण आता नुसत्या निदर्शनांच्या अवस्थेपलीकडे गेलो आहोत. आणि म्हणून

१. जोसेफ चेंबरलेन (१८३६–१९१४); वसाहतींचे सचीव १८९५ ते १९०३.

तुरुंगवासातून किंवा त्याहीपेक्षा अधिक वाईट स्थितीतून सुटण्याची आशा आपण बाळगू नये. जितकी जितकी चळवळ परिणामकारक होत जाईल, तितकी तितकी दडपशाही वाढेल. पाच वर्षांच्या हद्दपारीचा स्पष्ट उद्देश नाट्यपूर्ण परिणाम घडवून आणावा असा आहे. आजच्या हिंदी जीवनात पाच वर्षे म्हणजे किती युगे हे मला सांगता येत नाही. जर हिंदुस्थान आपल्या शब्दाइतकाच खरा असेल तर अन्यायाने स्थानबद्ध केलेल्या सर्व कैद्यांची मुदत संपण्यापूर्वी त्याला एक शक्ती प्राप्त झाली असेल. पण ती घटना जवळ असो वा दूर असलो, आपले कर्तव्य स्पष्ट आहे. आपण प्रत्येक तुरुंगवासाला मालेगावाप्रमाणे क्रोधाने उत्तर देऊ नये. पण शांततापूर्ण धैर्याने आणि निश्चयाने ते उत्तर द्यावे. आपल्या ध्येयाला जर आपण प्रामाणिक असलो तर ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा साक्षात विधायक कार्यक्रम पूर्णावस्थेला पोहोचेपर्यंत अधिक जोमदारपणे तो आपण करीत राहिले पाहिजे. प्रत्येक अटकेच्या वेळी पोकळ किंवा प्रक्षोभक निदर्शने आपण करू नयेत. आपण फुशारकी मारू नये. भरीव काम करण्याकरिता आपण तुरुंगवास ओढवून घेतला पाहिजे.

मालेगावचे दुर्वर्तन

मालेगावच्या असहकारितावाद्यांचा गुन्हा हा कमी दाखवावा अशी मी एक प्रवृत्ती पाहात आहे. फौजदाराने कितीही प्रक्षुब्ध वर्तन केले असले तरी असहकारितावाद्यांचा प्रतिकार समर्थनीय ठरत नाही. कायद्याच्या आधारावर या प्रश्नाची तपासणी मी करीत नाही. मी असहकारितावाद्यांशी संबंधित आहे. तो स्वतः घेतलेल्या शपथेप्रमाणे, अत्यंत प्रक्षुब्ध परिस्थितीतही प्रतिकार न करण्याला बांधलेला आहे. आपल्यापुढे सरदार लछमनसिंग व दुलिपसिंग यांची तेजस्वी उदाहरणे आहेत. जर आपण खरे असहकारितावादी असू तर ते जसे मेले तसे आपण मरण्याची शक्ती कमावली पाहिजे. जर मालेगावच्या असहकारितावाद्यांनी शूरत्वाने आणि समर्थनपर पुरावा नसता बलिदान केले असते, तर मी आनंदाने त्यांचे स्वागत केले असते. त्यामुळे हिंदी स्वातंत्र्याचा दिवस जवळ आला असता. असहकारितावाद्यांच्या दृष्टिकोणातून पहिल्या प्रथम चिथावणी कोणी दिली ? पोलिसांना धमकावणी देण्याचा प्रयत्न त्यांनी केला का नाही ? जेव्हा आपल्यापैकी एखाद्याला पकडण्यात येते तेव्हा ही बेहोषपणे केलेली निदर्शने मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे तुरुंगवास टाळण्याची ओंगळ प्रदर्शने आहेत. आपण एक स्वतः-करिता न्यायदंड निवडला आहे आणि आपण त्याला चिकटून राहिले पाहिजे. आता-पर्यंत उघडकीस आलेल्या गोष्टींवरून असहकारितावाद्यांनी अनत्याचारी असहकारितेच्या संहितेचा गंभीरपणे भंग केला आहे हे माझे मत कायम आहे. ज्या लोकांना खिलाफत किंवा स्वराज्य याबद्दल आस्था आहे, त्यांना मी कोणाच्याही अटकेमुळे किंवा तुरुंगवासामुळे कोणतीही निदर्शने करावयाची नाहीत अशा धार्मिक बुद्धीने त्यांनी अलिप्त राहावे असे सांगतो. मग ते पुढरी अत्यंत प्रिय असले तरी हरकत नाही !

जर मला किंवा शौकत अलींना अटक झाली तर हरताळ जाहीर करणे किंवा सभा-भरविणे हा आमचा मान आहे असे मी समजत नाही. अशा वेळी मी पुढील गोष्टींचे स्वागत करीन व अपेक्षा बाळगीन : साऱ्या परदेशी कापडावर ताबडतोब संपूर्ण बहिष्कार; अधिक उत्साहाने चरख्याचा स्वीकार करणे; टिळक स्वराज्य फंडाकरिता अधिक जोमाने वर्गणी गोळा करणे; आणि सभासद म्हणून नोंदणीकरिता कॉंग्रेस कचेऱ्यांत गर्दी करून सोडणे. सरकारी शाळा आणि कॉलेजे ओस पाडणे आणि अधिक वकिलांनी वकिल्या सोडणे याची तर मी खासच अपेक्षा बाळगीन. अधिकाऱ्यांना ठार मारणे व इमारती जाळणे यामुळे स्वराज्य लांबणीवर पडेल व खिलाफत आणि पंजाबचे अन्याय दूर होण्याला विलंब लागेल, एवढेच नव्हे तर त्यामुळे राष्ट्राची संपूर्ण नैतिक अधोगती होईल. म्हणून ज्यामुळे जनसमुदायाच्या भावना उफाळतील आणि त्यांना अनिष्ट किंवा गुन्हेगारी वर्तन करण्यास उत्तेजन मिळेल असे सर्व प्रसंग आपण कटाक्षाने टाळले पाहिजेत.

बारीकसारीक दोषांची टीका

कधी कधी तरुण लोक निष्कारण पुढाऱ्यांच्या वर्तनावर टीका करतात. नुकतेच जे एक उदाहरण माझ्या नजरेस आले ते जरा ठसठशीत आहे. माझ्या सिंधच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यात हैद्राबादहून मिरपूरखासला एक खास आगगाडी योजण्यात आली होती. बातमीदाराला ते सहन झाले नाही. त्याला वाटले की, राष्ट्रीय निधीची ही उधळपट्टी आहे. खास गाडी का काढली याची चौकशी करण्याकरिता मी थांबलो नव्हतो. त्यांनी मला खास गाडी रद्द करण्याचा, सिंधला एक दिवस अधिक देण्याचा आणि पैसे वाचविण्याचा सल्ला दिला. त्या मित्राने जर चौकशी केली असती तर त्याला असे आढळले असते की, खास गाडीशिवाय मला मिरपूरखासला नेणे शक्यच नव्हते. बाकीचा कार्यक्रम विस्कळित केल्याशिवाय मी सिंधला एक दिवस जादा देऊ शकलो नसतो; मला मिरपूरखासला जावयाचेच होते, आणि त्यामानाने खर्च फार लहान होता. सार्वजनिक जागृतीचे लक्षण म्हणून सार्वजनिक कार्यकर्त्यावर टीका करणे ही अपेक्षा करू नये. तथापि कोणत्याही परिस्थितीत आपण अनत्याचारी राहिलो पाहिजे चांगले लक्षण आहे. टीकेमुळे कार्यकर्ते जागरूक राहतात. जे पैसे देतात त्यांना काटकसर केली जात आहे हे पाहण्याचा हक्क आहे. लोकांच्याकडून केल्या जात असलेल्या निदर्शनांत उधळपट्टी ही खासच नेहमी दिसून येते. बेगडी थाटामाटात पुष्कळसा पैसा खर्च केला जातो. तो खर्च पुष्कळ वेळा अविचाराचा असतो. सार्वजनिक खर्चावर निर्भयपणे टीका केल्याने किंवा सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या वर्तनावर सर्वसाधारण टीका केल्याने फायदाच होण्याची शक्यता असते. पण ही सर्व टीका माहितीपूर्ण आणि विचारपूर्वक केलेला असावी. बारीकसारीक टीका टाळावी.

रेल्वे प्रवासाच्या प्रश्नाबद्दल मला हे म्हटले पाहिजे की, तिसऱ्या वर्गाने प्रवास टाळण्याची इच्छा ही अद्यापही दिसून येते. तिसऱ्या वर्गाने प्रवास करण्याइतकी माझी प्रकृती चांगली नसल्यामुळे तिसऱ्या वर्गाच्या रेल्वे प्रवासातील अमोल अनुभव मला प्राप्त होत नाहीत. त्या प्रवासामुळे राष्ट्रीय मनोवृत्तीशी संपर्क साधण्याची संधी मिळते, आणि अशी संधी दुसरी कशात मिळत नाही. अशा प्रवासात सेवा करण्याची जी संधी मिळते ती अन्य प्रसंगी मिळत नाही. क्वचित प्रसंग सोडून सर्व कार्यकर्त्यांनी दुसऱ्या वर्गाचा प्रवास टाळावा असे मी आग्रहाने सांगेन. तिसऱ्या वर्गाने रेल्वे प्रवास करणे हे किती गैरसोयीचे आहे हे माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला अधिक चांगल्या रीतीने ठाऊक असणार नाही. त्याचे कारण एक तर रेल्वेची व्यवस्था ही कठोरपणाची आहे, आणि दुसरे, आपल्या राष्ट्रीय संवयी फार वाईट आहेत. त्या सवयींमुळे आपण शेजाऱ्यांच्या सोयीचा विचारच करीत नाही. जे दक्ष कार्यकर्ते आहेत त्यांना, तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत असताना रेल्वे व्यवस्थेच्या आणि उतारूंच्या उपेक्षेचा चांगला परामर्ष घेता येईल. दुसऱ्या वर्गाचा प्रवास हा आमजनतेच्या आटोक्यातला नाही, हे तर निःसंशय आहे. ज्या सवलती लोकांना उपभोगता येत नाहीत त्यांवर राष्ट्रीय सेवकांनी हक्क सांगू नये.

'यंग इंडिया', ११-५-१९२१

४२. हिंदू-मुस्लिम ऐक्य

ऐक्य ही शक्ती आहे. ती केवळ कित्त्यातली म्हण नाही. पण तो जीवनाचा धर्म असून हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नांत त्याचे जितके स्पष्ट दर्शन होते तितके अन्यत्र होत नाही. आपल्यात फाटाफूट झाली तर आपले पतन झालेच पाहिजे. जोपर्यंत हिंदू व मुसलमान एकमेकांचे गळे कापण्यास तयार आहेत, तोपर्यंत तिसरी कोणतीही सत्ता हिंदुस्थानला सहज गुलाम करू शकेल. हिंदू-मुस्लिम ऐक्य याचा अर्थ फक्त हिंदू आणि मुसलमानांतील एकी नव्हे; पण जे हिंदुस्थानला आपली मातृभूमी समजतात, मग त्यांचा धर्म कोणताही असो, त्यांच्यातील एकी.

ती एकी ताण सहन करण्याइतकी आपण अद्याप प्राप्त केली असे मला वाटत नाही. ते एक दररोज वाढणारे रोपटे आहे. ते नाजूक, बाल्यावस्थेत आहे, व त्याल

खास काळजीची व दक्षतेची जरूरी आहे. नेलोरमध्ये[1] जेव्हा हा प्रश्न माझ्यापुढे साक्षात स्वरूपात उभा राहिला, तेव्हा ती गोष्ट स्पष्ट झाली. दोघांमधील संबंध फारसे चांगले नव्हते. सुमारे दोन वर्षांपूर्वीच ते एका क्षुल्लक गोष्टीकरता लढले होते. मशिदीवरून जाताना वाद्ये वाजविण्याचा तो नित्याचाच प्रश्न होता. माझे असे मत आहे की, प्रत्येक क्षुल्लक गोष्टीला आपण गूढ धार्मिक महत्त्व देण्याची प्रतिष्ठा देऊ नये. म्हणून हिंदूने मशिदीवरून जाताना वाद्ये वाजविण्याचा आग्रह धरू नये. वाद्ये वाजविण्याकरिता स्वतःच्या गावी किंवा दुसऱ्या गावी असलेले पूर्वीचे दाखले त्यांनी देऊ नयेत. मशिदीवरून जाताना वाद्ये वाजविणे हा जिव्हाळ्याच्या महत्त्वाचा प्रश्न नाही. चोवीस तासपर्यंत मशिदीजवळ गंभीर स्तब्धता असावी ही मुसलमानांची भावना कोणालाही पटू शकेल. जी गोष्ट हिंदूंना अनावश्यक वाटते ती गोष्ट मुसलमानांना आवश्यक वाटेल. आणि सर्व अनावश्यक बाबींत हिंदूंनी ताबडतोब पडते घ्यावे. क्षुल्लक गोष्टीत भांडणे हा गुन्हेगारी स्वरूपाचा मूर्खपणा आहे. जर आपण एकमेकांच्याकडे उदार दृष्टीची आणि पडते घेण्याची जोपासना केली तरच आपल्याला हवी असलेली एकी टिकू शकेल. हिंदूला आपल्या प्राणाइतकी गाय प्रिय आहे, म्हणून मुसलमानांनी आपण होऊन हिंदू बांधवांच्या भावनांना मान दिला पाहिजे. मुसलमानाला रात्रीच्या वेळी शांतता ही मोलाची वाटते. प्रत्येक हिंदूने आपल्या मुसलमान बांधवांच्या भावनांना मान दिला पाहिजे. पण हा परिपूर्ण अवस्थेला गेलेला सल्ला आहे. काहीही कारण नसता भांडण उकरून काढणारे जसे घाणेरडे हिंदू आहेत, तसे घाणेरडे मुसलमानही आहेत. अशा लोकांच्याकरिता आपण पंचायतीची सोय केली पाहिजे. त्या पंचायतीत संशयातीत प्रामाणिकपणा असणारे आणि संतप्त न होणारे लोक असावेत. त्यांचे निकाल दोघांवरही बंधनकारक असावेत. अशा पंचायतीच्या निकालाबद्दल लोकमत अनुकूल करवून घ्यावे म्हणजे कोणीही त्याच्याबद्दल प्रश्न काढणार नाही.

अद्यापपर्यंत एकमेकांबद्दल पुष्कळच काय पण फारच पुष्कळ अविश्वास आहे हे मी जाणतो. पुष्कळ हिंदूंचा मुसलमानांच्या प्रामाणिकपणावर विश्वास नाही. त्यांना असे वाटते की, स्वराज्य म्हणजे मुसलमानांचे राज्य. कारण ते म्हणतात, ब्रिटिश गेले म्हणजे हिंदुस्थानातील मुसलमान, मुसलमान राज्यांना हिंदुस्थानांत मुसलमान साम्राज्य स्थापन करण्यासाठी मदत करतील. उलटपक्षी मुसलमानांना अशी भीती वाटते की, हिंदूंची प्रचंड बहुसंख्या असल्यामुळे ते आपल्याला गुदमरून टाकतील. अशा प्रकारची मनोवृत्ती उभयपक्षी असणे हे दुर्बलतेचे लक्षण आहे. जरी औदार्याने नसले तरी, शांततेने राहण्याच्या त्यांच्या इच्छेने त्यांना परस्परांवरील विश्वासाचे आणि परस्परांबद्दल सहिष्णुतेचे धोरण त्यांनी पत्करावे. दोघांच्याही धर्मांत दोघांनी निराळे राहावे असे काहीही नाही. सक्तीच्या धर्मांतराचे दिवस संपले आहेत. जर गोवधाचा प्रश्न सोडला तर हिंदूंना मुसल-

१. पाहा. खंड १९, प्रकरण २७५.

मानांच्या बरोबर भांडण्याला जागा नाही. मुसलमानांनी गोहत्या केलीच पाहिजे असे बंधन त्यांच्यावर नाही. खरी गोष्ट अशी आहे की आपल्यातील मतभेद मिटविण्याकरिता आपण यावर्षी एकत्र येण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. आणि आपल्याला एकाच पवित्र भूमीचे संतान म्हणून एकमेकांशी स्नेहबद्ध होऊन एकत्र राहावयाचे आहे, असाही प्रयत्न केला नाही. आपणा दोघांनाही आता जीवनातील चांगली संधी मिळाली आहे. खिलाफतीचा प्रश्न आणखी शंभर वर्षे पुन्हा निर्माण होणार नाही. जर हिंदूंना मुसलमानांशी कायमची मैत्री जोडावयाची असेल तर त्यांनी इस्लामचा मान राखण्याच्या प्रयत्नांत स्वतः त्यांच्याबरोबर मरावयास तयार असले पाहिजे.

'यंग इंडिया', ११-५-१९२१

४३. दुष्काळनिवारणार्थ कताई

श्रीमती जाईजी पेटिट यांनी अहमदनगरजवळील मिरी या गावी दुष्काळग्रस्त लोकांच्यात जो सूतकताईचा प्रयोग केला, त्यासंबंधीची खालील टिपणे[1] पाठविली आहेत. एका इंग्लिश स्त्रीच्या देखरेखीखाली हा प्रयोग होत असल्यामुळे मी आनंदाने ती टिपणे प्रसिद्ध करीत आहे. किती सुव्यवस्थितपणे हे काम चालले आहे हे वाचकांच्या नजरेतून सुटणार नाही. सर्व अडचणींची सोडवणूक केली गेली आणि त्यांची तरतूदही झाली. दुष्काळनिवारण्याकरिता चरखा हे किती प्रभावी साधन आहे याचा प्रत्यय या लहानशा प्रयोगावरून येतो. जर त्याची योग्य व्यवस्था झाली तर त्यातून आश्चर्यकारक परिणाम दिसून येतील.

'यंग इंडिया', ११-५-१९२१

१. पाहा, परिशिष्ट २.

४४. हातमागांचा अधिक उपयोग

संपादक, यंग इंडिया, यास

महाशय,

हिंदुस्थान हा कापडाच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावा म्हणजेच हिंदुस्थानने परदेशाहून सूत किंवा कापड आयात करू नये ही गोष्ट सर्व स्वदेशाभिमानी लोक मान्य करतात. पण ते उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सगळ्यात चांगला व जलदीचा मार्ग कोणता हा प्रश्न आहे. चरखा हे ते साधन आहे असे सांगितले जाते. पण आम्हांला असे वाटते की, हा उद्देश साध्य करण्याकरिता अधिक सोपे, अधिक जलद आणि प्रत्येक बाबतीत चांगले उपाय आहेत. ते कोणते ? ते पुढीलप्रमाणे आहेत असे आपण एकदम घोषित करू या : (१) हिंदुस्थानात हातमागांची संख्या वाढविणे; (२) असा प्रचार करणे की, तूर्त हिंदी लोकांनी हिंदुस्थानात तयार झालेल्या सुतापासून जरासे जाडेभरडे कापड वापरणे यात समाधान मानणे, हे प्रत्येक हिंदी माणसाचे आद्य कर्तव्य आहे. आणि त्यांनी आयात कापड किंवा आयात सुतापासून (मुख्यत्वे तलम) हिंदुस्थानात तयार केलेले कापड वापरण्याचे टाळावे, मग ते कापड वापरण्याला कितीही सुखकारक असो. याचे थोडेसे स्पष्टीकरण करणे जरूर आहे. त्यासंबंधी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयाची म्हणजे चरख्याचा वापर न करता हिंदुस्थानात जे एकूण पिळाचे आणि सुताचे उत्पादन होते त्या सर्वांचे कापड केले तर हिंदुस्थानला आपल्याच निर्मितीतून आपल्या वस्त्राची गरज भागविता येईल. मात्र लोकांनी जाडे-भरडे कापडच वापरण्यास तयार असले पाहिजे. वास्तविकपणे चौदा कोटी तीस लक्ष पौंडांचे हिंदुस्थानात तयार झालेले सूत दर वर्षी निर्यात केले जाते. या सुताचे हिंदुस्थानात कापड करा आणि अशा प्रकारे तयार झालेले जाडेभरडे कापड तूर्त वापरण्यात संतोष मानण्याचा अल्पसा त्याग करण्यास देशाला तयार करा, म्हणजे हिंदुस्थानला अल्पावधीत वस्त्रस्वावलंबी करण्याचा मोठा प्रश्न सुटेल. येथे पहिला प्रश्न जो मनात येतो तो असा, सध्याचे हिंदुस्थानातील हातमाग आणि यंत्रमाग हे या प्रचंड सुताच्या साठ्याचे कापड विणू शकतील का ? त्याचे नकारार्थी उत्तर आहे. तर मग काय करावे ? त्याचे

उघड उत्तर म्हणजे मागांची संख्या वाढवा. यंत्रमागांची संख्या एकदम वाढविणे कठीण आहे. परदेशातून आपल्याला त्याकरिता पुष्कळ विणण्याची यंत्रसामुग्री आयात करावी लागेल. याचा अर्थ दोन तीन वर्षांचा खोळंबा. आपण त्यात हुंडणावळीच्या प्रतिकूल दरापासून निर्माण होणाऱ्या अडचणी ह्या या वेळी तूर्त बाजूला ठेवू आणि अशा प्रकार या यंत्रावर जो भारी आयात कर आता बसविला आहे तोही बाजूला ठेवू हातमागांची संख्या वाढविणे हे कठीण नाही. हिंदुस्थानात ते माग थोडक्या वेळात आणि थोड्या किंमतीत तयार करता येतील. १९१९ सालचे जे आकडे डायरेक्टर जनरल ऑफ् स्टॅटिस्टिक्स यांनी प्रसिद्ध केले आहेत, त्या आकड्यांच्या आधारावर आपण जर गणित करू लागलो तर असे सहज दाखविता येईल की, जर आपण सध्याच्या दुप्पट हातमाग तयार केले, तर आपली गरज तूर्त भागेल. मी ते आकडे तुमच्या वाचकांच्या डोक्यावर लादू इच्छित नाही. या प्रश्नाला जे महत्त्व आहे त्याचा विचार अत्यंत कळकळीने तुमच्या वाचकांनी करावा आणि त्यांनी या कार्याला आपला शक्तिशाली हातभार लावावा अशी माझी विनंती आहे.

कलकत्ता — तुमचा विश्वासू,

१९ एप्रिल — **एस्. बी. मित्रा**

पत्रलेखकाने एका गोष्टीकडे दुर्लक्ष केले असावे असे वाटते, आणि ती म्हणजे, हातकताईच्या प्रचारात हातविणाईचा अंतर्भाव होतो ही होय. जर हातसुताचे हात मागावर विणकाम केले नाही तर हिंदुस्थान वस्त्राच्या दृष्टीने स्वयंपूर्ण होणार नाही. नुसते हात–माग वाढवून प्रश्न सुटणार नाही. हातविणाईची कला मेली नाही. हिंदुस्थानात यंत्रमागापेक्षा हातमाग अधिक चालू आहेत. पण त्यांवर बहुतेक परदेशी सुताचे विणकाम करतात. आपण फक्त जाडेभरडे कापड वापरावे आणि विणकरांना फक्त हिंदी सूत विणण्यास उद्युक्त करावे हा सिद्धांत मला अंतःकरणापासून मान्य आहे. गिरणी मालकांनी सूत बिलकूल निर्यात करू नये, असा पुढाऱ्यांना पत्रलेखकाने उपदेश करावयास पाहिजे होता. गिरणी मालक जे सूत निर्यात करून प्रचंड नफे मिळवितात ते सोडून देण्यास त्यांना उद्युक्त करणे जवळ जवळ अशक्य आहे. जर गिरणी मालक आणि इतर भांडवलदार मनात आणतील तर चालू वर्षातच त्यांना परदेशी कापडाचा संपूर्ण बहिष्कार घडवून आणता येईल. तथापि हातकताईचा प्रश्न हा शिल्लकच उरतो. परदेशी कापडाचा बहिष्कार घडवून आणणे एवढेच पुरेसे नाही. लक्षावधी शेतकऱ्यांना पूरक उद्योग उपलब्ध करून देणे हेही अत्यावश्यक आहे. पूर्वी ज्याप्रमाणे ते आपला फुरसतीचा वेळ कोठल्या तरी शेतीच्या पूरक व्यवसायात घालवीत असत तसा त्यांनी

घालविला पाहिजे. जे लक्षावधी लोक धंद्याच्या अभावी अर्धपोटी राहतात, त्यांना बर-बसल्या सोपा उद्योग मिळाला पाहिजे. तो धंदा म्हणजे हातकताईचा. ज्या गोष्टीचे प्रतिपादन पत्रलेखक आग्रहाने करीत आहेत ती चालूच आहे. हातमाग वाढत आहेत आणि लोक जाडेभरडे कापड वापरू लागले आहेत. पण सर्वत्र हातकताई सुरू झाली तरच त्याने जनतेच्या वाढत्या दारिद्र्याचा प्रश्न ताबडतोब सुटू शकेल. माझी पटलेली खात्री मला अधिक जोरदारपणे मांडू द्या. हातकताईशिवाय हिंदुस्थान हा समाधानी, निर्भय आणि स्वाश्रयी बनणार नाही. म्हणूनच मच्छलीपट्टमच्या कृष्णराव यांनी हातकताईचा धर्म हा एक धार्मिक विधी आहे, असे आत्मजाणीवेने ओळखले. लोकांनी सुद्धा आपल्या सुस्पष्ट कल्पनेने ती गोष्ट तशीच ओळखली आहे. डॉ. मित्रा यांच्याप्रमाणे जे विचार करीत असतील त्यांना माझे सांगणे असे की, त्यांनी मध्यवर्ती गोष्टीपासून राष्ट्राचे मन दुसरीकडे वळवू नये. पत्रलेखकाला ज्या गोष्टी सुचवावयाच्या आहेत त्या सर्व हातकताईत येतात. पण त्याहीपेक्षा अधिक गोष्टी त्यांत अंतर्भूत होतात. महासागरात नद्या जे आणून सोडतात, त्यात सर्वांचा अंतर्भाव होतो.

'यंग इंडिया', ११-५-१९२१

४५. अली बंधूंच्या माफीचा[१] मसुदा

[१४ मे १९२१ रोजी किंवा नंतर]

मित्रांनी आमचे लक्ष आमच्या काही भाषणांकडे वळविले आहे. त्यांच्या मता-प्रमाणे त्या भाषणात अत्याचाराला चिथावणी मिळण्याची शक्यता आहे. आम्ही असे सांगू इच्छितो की, अत्याचाराला चिथावणी देण्याचा आमचा कधीही हेतू नव्हता. पण आमच्या भाषणांतील काही उताऱ्यांचा जो अर्थ लावला आहे, तो लावणे शक्य आहे

१. १४ मे रोजी सिमल्याला झालेल्या मुलाखतीत व्हाइसरॉयनी गांधींचे लक्ष अली बंधूंच्या भाषणातील काही आक्षेपार्ह स्वरूपाकडे वळविले आणि असेही सूचित केले की, सरकार कदाचित त्यांच्यावर खटला भरील. गांधीजींनी व्हाइसरॉयना खटला भरण्याचे थांबविण्यास सांगितले. गांधीजी म्हणाले की, मी माफीपत्र तयार करीन व अली बंधूंना माफीपत्र द्यावयास सांगेन. प्रसिद्धीपूर्वी व्हाइसरॉयना ते पत्र आपण दाखवू असे गांधी म्हणाले. तसे करण्यात आले आणि व्हाइसरॉयनी सुचविलेले काही बदल त्यात अंतर्भूत केले. अली बंधूंनी काही शाब्दिक बदल करून मे २९ रोजी अखेरचे पत्रक काढले. पाहा. परिशिष्ट ३.

हे आम्ही मान्य करतो.[१] या भाषणातील काही उताऱ्यांत जी अनावश्यक प्रक्षुब्धता आहे, त्याबद्दल आम्हांला मनापासून खेद वाटतो व आम्ही पश्चात्ताप व्यक्त करतो. आम्ही जाहीर रीतीने आश्वासन देतो आणि ज्यांना हवे असेल त्यांना वचन देतो की, जोपर्यंत आम्ही असहकारितेच्या चळवळीशी संबंधित आहोत, तोपर्यंत सध्या किंवा पुढे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या अत्याचाराचा पुरस्कार करणार नाही. किंवा अत्याचाराच्या तयारीचे वातावरण निर्माण करणार नाही. खरे सांगावयाचे म्हणजे ज्या अनत्याचारी असहकारितेची प्रतिज्ञा आम्ही घेतली आहे, तिच्या वृत्तीशी असे करणे विरोधी आहे.

'मुंबई क्रॉनिकल', २०-५-१९२१

४६. गुंतागुंतीचा व्यवहार

"स्वदेशी" या टोपण नावाखाली लिहिताना एका मित्राने पुष्कळ मनमोकळे प्रश्न विचारले आहेत. माझ्या माहितीकरिता त्यांनी आपले नावही दिले आहे. तो एक सुशिक्षित गृहस्थ आहे आणि त्याचे प्रश्न लक्ष देण्यालायक आहेत. तो विचारतो :

प्रश्न : असहकारितेचा ठराव एकमताने पास करण्यात जे सामील झाले अशा प्रत्येक प्रतिनिधीवर तो ठराव अमलात आणण्याचे बंधन क्रमशः नव्हे पण ताबडतोब आहे का नाही ?

उत्तर : अर्थातच तो बांधलेला आहे.

प्रश्न : जर तो बांधलेला असेल आणि तसे वर्तन करीत नसेल तर तसला प्रतिनिधी असहकारिता म्हणजे एक खेळणे आहे असे मानीत नसेल का ? असे लोक स्वतःची आणि दुसऱ्यांची फसवणूक करीत नाहीत का ?

उत्तर : अर्थातच ते करतात. एवढेच नव्हे तर ते असहकारितेच्या चळवळीची हानीही करतात. ते आपल्या शिपाईगिरीची अट पाळीत नाहीत. लष्करभरतीकरिता

१. तथापि अली बंधूंनी काढलेल्या पत्रकात येथे असा मजकूर आहे : "आम्ही असे सांगू इच्छितो की, आमच्या भाषणातील कोणत्याही उताऱ्याचा जो अर्थ लावला गेला, तो लावणे शक्य आहे अशी आमची कधीही कल्पना नव्हती, पण आम्ही आमच्या मित्रांच्या युक्तिवादातील व अर्थ लावण्यातील जोर मान्य करतो."

कमीत कमी ५ फुटांची उंची जेथे सांगितली आहे तेथे ४ फूट उंचीचा मनुष्य चालणार नाही. त्याचप्रमाणे जे असहकारितेच्या सैन्यात शिपाई म्हणून राहात आहेत, पण त्या अटी पाळीत नाहीत, ते तिच्या कायद्याचा अशिष्टपणे भंग करीत आहेत आणि गुन्हेगार म्हणून दोषी आहेत.

प्रश्न : जर बहुसंख्याक असहकारितावादी अशाच प्रकारचे असतील तर तुमची निराशा होणार नाही का ? तुमच्या विलक्षण आशावादाला त्यामुळे ओहोटी लागणार नाही का ?

उत्तर : अजून लोकांची परीक्षा संपली नाही. पण जर ३० जूननंतर बहुसंख्य असहकारितावादी होते तसेच राहिले तर मला दुःख होईल. पण माझा आशावाद ओसरणार नाही. जोपर्यंत माझी स्वतःबद्दल खात्री आहे तोपर्यंत माझा आशावाद संपणार नाही. शिवाय माझ्यासारखेच इतर लोक आहेत, असे समजून मी, ते सर्व लोक सरळ व स्वाभाविक जो मार्ग दिसतो त्याचा स्वीकार करतील असे मला वाटते ! जे भोंदू लोक आहेत ते आपणहूनच चळवळ सोडून देतील.

प्रश्न : अशा प्रतिनिधींची जाहीर निर्भर्त्सना करणे आवश्यक नाही काय ?

उत्तर : जेथे मी अशी वागणूक जनरल डायरलाही देणार नाही, तेथे मी तशी वागणूक दुबळ्या प्रतिनिधींना कशी देईन ? हा लढा आत्मशुद्धीचा असल्यामुळे कोणाही माणसाची जाहीर निर्भर्त्सना करण्याला तेथे वावच नाही. पण अशा लोकांच्यावर बहिष्कार घातला पाहिजे; म्हणजे त्यांना प्रतिनिधी, स्वयंसेवक किंवा पदाधिकारी होण्यास बंदी केली पाहिजे. मला वाटते, दिवसेंदिवस वातावरण स्वच्छ होत चालले आहे. अशा सध्या थोड्याच कमिट्या असतील की ज्या कमिट्यांत वकिली न सोडलेले वकील पदाधिकारी आहेत. सरकारी शाळांत जाणारे आणि स्वयंसेवक म्हणून काम करणारे क्वचितच विद्यार्थी सापडतील. प्रत्येकाला स्वतःच्या मर्यादा समजू लागल्या आहेत असे दिसते.

प्रश्न : काँग्रेस प्रतिनिधींना जो न्याय लागू होतो, तोच न्याय तुमच्या अनुयायांना किंवा तुमच्या तत्त्वांची तारीफ करतात त्यांना लागू होत नाही काय ?

उत्तर : मला कोणीही अनुयायी नाहीत. किंवा, तो माझा अनुयायी आहे की जो माझी तत्त्वे स्वीकारतो एवढेच नव्हे तर आचरणातही आणतो. म्हणून माझ्या तत्त्वाप्रमाणे न चालणाऱ्या कोणालाही माझा अनुयायी म्हणण्यात अर्थ नाही. माझ्या ‘अनुयाया’ला शिफारसपत्राची जरूरी नाही. कोणीही त्याला ओळखील. जो सत्य बोलत नाही आणि सत्याप्रमाणे चालत नाही, जो वाचेने, विचाराने आणि कृतीने दयाळू होण्याचा प्रयत्न करीत नाही, जो खादी वापरीत नाही आणि परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार घालीत नाही, जो भंग्याला स्वतःच्या रक्ताचा भाऊ मानीत नाही, जो आपल्या पत्नीखेरीज इतर स्त्रियांना माता व भगिनी समजत नाही, जो देशाकरिता,

धर्माकरिता, किंवा सत्याकरिता आपले प्राण द्यावयास तयार नाही, आणि शेवटी ज्याला स्वतःचा लहानपणा समजत नाही व जो नम्रतेने वागत नाही तो माझा अनुयायी नाही. जे माझ्या तत्त्वांची प्रशंसा करतात त्यांनासुद्धा मी हेच नियम लागू करीन. उक्ती आणि कृती यांत तफावत ठेवण्याची आणि असे वर्तन सहन करण्याची सवय इतकी खोलवर गेली आहे की, ती सवय एखाद्या रोगासारखी झाली आहे. जे लोक उक्तीप्रमाणे कृती करण्यास तयार नसतात, ते लोक बोलणे बंद करतील तर माझी खात्री आहे की, जगाची वितंडवाद आणि पुष्कळ भाषणे व संघर्ष यांपासून सुटका होईल.

प्रश्न : अशा प्रतिनिधी आणि प्रशंसकांच्याकडून जर स्वराज्य मिळाले तर ते तुम्ही स्वीकाराल काय? असे लोक स्वतः आचरण न करता दुसऱ्याला शिकविण्यात वक्तृत्वाचा पाऊस पाडतात. अशा लोकांच्या मार्फत मिळालेले स्वराज्य तुम्ही स्वीकारले तर तसे स्वराज्य किती काळ राखता येईल?

उत्तर : माझा स्वराज्य स्वीकारण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. लोकांनी ते स्वीकारावयाचे आहे. लोकांचा प्रतिनिधी म्हणून मला एवढेच समजते की, अशा ढोंगी लोकांच्या मार्फत केव्हाही स्वराज्य मिळणार नाही. म्हणून ते स्वराज्य टिकेल किंवा नाही हा प्रश्नच निर्माण होत नाही.

ह्या मित्राने हे सारे प्रश्न अत्यंत दुःखाने विचारले आहेत, असे आपणास दिसते. इतर पुष्कळ प्रामाणिक स्त्री-पुरुषांना अशा शंका खासच येत असतील. प्रत्येक असहकारितावाद्याने आपल्या वर्तनाने त्यांच्या या शंका दूर करण्याचा प्रयत्न करावा. आपल्याला स्वराज्य मिळण्याला उशीर का लागतो याचे कारण आपल्यामध्येच सापडते.

या पत्राच्या प्रास्ताविक भागात त्या मित्राने आणखी काही शंका काढल्या आहेत त्या शंका लक्ष देण्यालायक असल्यामुळे प्रश्नाच्या रूपाने मी त्या येथे मांडतो.

प्रश्न : तुमच्या काही तत्त्वांत अशा त्यागाची मागणी आहे का की, जो त्याग करणे मानवी स्वभावाविरुद्ध आहे?

उत्तर : असहकारितेची कोणतीही बाब अशा कठीण त्यागाची मागणी करीत नाही. असकारितेत अंतर्भूत झालेले त्याग करावयास सोपे आहेत व सामान्य मानवी स्वभावाला अशक्य नाहीत. आणि त्यामुळेच लोकांनी या चळवळीचे स्वागत केले आहे. मुख्य तत्त्वे पुढीलप्रमाणे : हिंदू-मुस्लिम ऐक्य, प्रक्षुब्धतेतसुद्धा शांततापालन, परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार, दररोज ठराविक वेळ सूत कातणे, आपापल्या शक्ती-प्रमाणे पैसे देणे, भंग्याला आपला भाऊ म्हणून वागविणे, व्यसने, अनीती वगैरेचा त्याग करणे, या कशातही मला संन्यास दिसत नाही. इतर राष्ट्रांनी आपली शक्ती ज्यांत दाखविली नाही असे मी काहीही मागितले नाही. शांततेची गरजही काहीशी नवी वाटेल. पण शीखांनी मर्यादित क्षेत्रात ती भागविण्यात यश मिळविले आहे. जर आपण अधिक खोल विचार केला तर आपल्याला असे दिसेल की, ब्रिटिशांनीसुद्धा

जेव्हा जेव्हा जरूरी भासली आहे तेव्हा तेव्हा शांतता राखली आहे. मी इतक्याही मर्यादेपर्यंत जाण्याला कबुली दिली आहे की, जर शांतता राखण्याची जरूरी धोरण म्हणून किंवा एक उपयुक्त शस्त्र म्हणून आपण स्वीकारली तरी आपण स्वराज्य हस्तगत करू. माझ्या कल्पनेतला जो अनत्याचार आहे. ते सबलांचे, खऱ्या क्षत्रियांचे शस्त्र आहे, तथापि ते दुर्बलांचे शस्त्र आहे असे आपण समजू या. तसे असले तरी जर लोकांना शस्त्रांचा वापर सध्या करणे अशक्य आहे असे पटले, स्वतःचा प्राण समर्पण करण्याचे तत्त्व ते शिकले, आणि दुसऱ्यांना ठार मारण्याचा विचार सोडून दिला तर त्यांना आजच स्वराज्य मिळेल.

प्रश्न : जर तुम्ही राज्यकर्त्यांच्या बरोबर असहकारिता करावी असे प्रतिपादन करीत असाल, तर मग जे सहकारिता करतात त्यांची भंग्यांनी व इतरांनी सेवा करू नये अशी जे असहकारितेची सूचना करतात, त्यांना तुम्ही निरुत्साही का करता?

उत्तर : आपण असहकारितेचा वापर राज्यकर्त्यांच्याविरुद्ध करीत नसून ते, जे धोरण अवलंबितात त्या धोरणाविरुद्ध आम्ही असहकारितेचा वापर करतो. आमची असहकारिता व्यक्तीविरुद्ध नाही. आम्ही कोणाही भंग्याला किंवा कुंभाराला अधिकाऱ्यांची सेवा करण्यापासून कधीही थांबविले नाही. शिवाय तसे करणे मला इष्टही वाटत नाही. जे आपले बांधव आपल्या विचारापेक्षा निराळे विचार करतात, ते जर कौन्सिलात जाऊ लागले तर त्यांची सेवा भंग्यांनी व इतरांनी करू नये, अशापासून त्याना परावृत्त कसे करता येईल? आपल्याला प्रत्येकाला प्रेमाने जिंकावयाचे आहे. जर तुम्हांला तो मार्ग पसंत नसेल तर निदान आपण कोणालाही बळजबरीने आपल्या बाजूला खेचून आणू इच्छित नाही. पण आम्हांला लोकांची विचार शक्ति जागृत करून व त्यांची विनवणी करून आमच्या विचारांच्या प्रचार करावा. असहकारितेचा उद्गम-द्वेषातून होत नसून प्रेमातून होतो, दुर्बलतेतून होत नसून सबलतेतून होतो. खोटेपणातून नसून खरेपणातून होतो. अंधश्रद्धेतून होत नसून ज्ञानयुक्त श्रद्धेतून होतो. सुबुद्ध विचारशक्ती आणि शहाणपणा यातून तो होतो. तो उद्गम अधर्मातून न होता धर्मातून होतो, स्वतःवरील श्रद्धेतून होतो.

प्रश्न : तुम्ही फक्त महात्मा आहात का मुत्सद्दीदेखील आहात?

उत्तर : माझ्या दृष्टीने जो महात्मा आहे तो मुत्सद्दी असलाच पाहिजे. मुत्सद्दी त्याला म्हणतात की जो राज्याचे–लोकांचे रक्षण आणि सेवा करू शकतो. एखादी व्यक्ती मानवतेची सेवक ज्या प्रमाणांत झाली असेल, त्याच प्रमाणांत आत्मा महान होतो.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', १५-५-१९२१

४७. माझी टिपणे

हिंदी संस्थानात आपण काय काम करू शकतो ?

काठेवाडचे एक मित्र विचारतात, हिंदी संस्थानातील लोकांनी काय करावे ? काठेवाडमध्ये भरलेल्या संस्थानी प्रजापरिषदेनंतर हा प्रश्न अधिक वारंवार विचारला जात आहे.

हिंदी संस्थानातील आपण प्रजाजनांनी ब्रिटिश साम्राज्याबद्दल काहीही टीका करू नये आणि त्यांना अवघड परिस्थितीत टाकू नये. सरकार किती सैतानी आहे ते येथे सांगण्याची बिलकूल जरूरी नाही. पण हिंदी संस्थानातदेखील आपण मद्यपानाविरुद्ध चळवळ करू शकतो. स्वतः दारू सोडू शकतो आणि इतरांचे मन त्याकरिता वळवू शकतो. आपण तेथे चरखे व सूत-कताई सुरू करू शकतो. तेथेही आपल्याला परदेशी कापड टाकून देता येईल व खादी वापरता येईल; तसेच आपण जुगार अनीती वगैरे टाकू शकू; आपल्याला कॉंग्रेसचे सभासद होता येईल आणि टिळक स्वराज्य फंडाला चांगल्या देणग्या देता येतील. संस्थानी प्रजाजनांनी मनात आणले तर तेच सारी रक्कम जमवू शकतील. जो कोणी या गोष्टी करवून घेण्याचे कष्ट करील तो स्वराज्याकरिता पुष्कळच काम करील. ज्यांना असहकारिता म्हणजे आत्मशुद्धीचा यज्ञ आहे असे वाटते, त्यांच्या पुढे प्रश्नच नाही. हिंदी संस्थानचे रहिवासी जर भंग्याना भाऊ म्हणून भेटले तर त्यांनी संस्थानाला अराजनिष्ट असण्याचा गुन्हा केला असे होत नाही.

हिंदी संस्थाने ही हिंदुस्थानच्या बाहेर खास नाहींत. धर्मयुद्धात सामील होण्याकरिता सर्वांना पाचारण केले आहे. सर्वांनी सत्य, निर्भयता आणि शांती यांचे धडे शिकणे आवश्यक आहे. ब्रिटिश हिंदुस्थानात ब्रिटिश सत्तेचा धिःकार करणे आवश्यक असेल पण हिंदी संस्थानांत त्याची जरूरी नाही.

टीका अनावश्यक

तथापि ब्रिटिश हिंदुस्थानात सुद्धा ब्रिटिश राज्यावर टीका करीत राहणे जरूर आहे का ? मला वाटते, सारी टीका टाळून आपण आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवू. जी जी टीका आवश्यक असेल ती टीका मी स्वतःच करीन. 'नवजीवन'च्या वाचकांना मी असे आश्वासन देऊ इच्छितो की, जेव्हा जेव्हा टीकेची आवश्यकता

असेल तेव्हा तेव्हा मी सरकारवर टीका केल्याशिवाय राहात नाही. साम्राज्याचा धिःकार करून आपण ते साम्राज्य सुधारू शकत नाही किंवा संपवू शकत नाही. आपले कर्तव्य करून आणि आपल्याला सुधारूनच आपण आपले ध्येय गाठण्यात यशस्वी होऊ. आपल्यापुढे कताईचे, काँग्रेस सभासद नोंदविण्याचे आणि टिळक स्वराज्य फंड जमविण्याचे इतके काम पडले आहे की, आपल्याला दुसऱ्या गोष्टी करण्यास फुरसत नाही. आपण जे मूठभर लोक काम करीत आहोत त्यांनी जर वर सांगितलेल्या कामाकरिता आपल्या वेळेचा क्षणन् क्षण खर्च केला तरच जूनमध्ये आपला कार्यक्रम आपण पुरा करू शकू. असे असल्यामुळे सरकारवर टीका करण्यात वेळेचा अपव्यय कसा करता येईल ?

रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर जमणारी गर्दी आणि तिच्या आरोळ्या यांचा मला कंटाळा आला आहे. या गोष्टी आपल्याला स्वराज्य देणार नाहीत. अशा गोष्टींचे दिवस संपले आहेत. जेव्हा लोकांत जागृती नव्हती तेव्हा या गोष्टी आवश्यक असतील. पण आता जागृतीला कमतरता नाही. नायगाराचा धबधबा आता आपल्या कबजात आला आहे. त्याचा उपयोग कसा करावा हेही आपण शोधून काढले आहे; म्हणून आता आपल्याला त्या ध्येयाकरिता फक्त शांतपणे काम करायचे आहे.

जर सरकारवर टीका करणे आवश्यक नसेल, तर सहकार करणाऱ्यावर टीका करणे हेही आवश्यक नाही. आपली टीका आपल्या कामातच आहे. जगात सगळीकडे असा अनुभव आहे की, कणभर आचार केला तर मणभर उपदेशापेक्षा अधिक प्राप्ती होते. आचारात असलेल्या आपल्या उणीवा व्याख्यानद्वारा स्पष्ट दिसतात. जो माणूस फार बोलतो तो बोलल्याप्रमाणे फार क्वचितच कृती करतो. जो आपला शब्द पाळण्याची दक्षता घेतो तो उच्चारले जाणारे प्रत्येक वाक्य तोलून मापून उच्चारतो. शिवाय आपण आपल्या मागण्या सरकारपुढे न ठेवता स्वतःपुढे ठेवीत असल्यामुळे जी काय टीका आपण करतो किंवा असंतोष आपल्याला वाटतो, तो आपल्या स्वतःविरुद्धच असला पाहिजे.

अत्याचारी असहकारितावादी

भावनगरच्या एका गृहस्थाने आपल्या नावासह तेथील जैन मुलींच्या शाळेत ज्या दुःखदायक गोष्टी घडल्या त्याची हकीगत पाठविली आहे. ते पत्र काही दिवस माझ्याजवळ पडून आहे. पण मी सतत प्रवासात असल्यामुळे मला माझा पत्रव्यवहार इच्छा असूनही लवकर संपविता येत नाही. जरी त्याने आपले नाव प्रसिद्ध करण्यास मला परवानगी दिली आहे तरी मी तसे करणार नाही. कारण भावनगरमध्ये त्याच्यावर निष्कारण टीकेचा भडिमार होऊ नये असे मला वाटते. सद्धेतूने केलेली टीकासुद्धा सहन करण्याची शक्ती आपण अद्याप कमाविली नाही हे मला ठाऊक आहे. स्वराज्यवाद्यांनी उलटपक्षी दुष्ट बुद्धीने केलेली टीका सोसण्यास शिकले पाहिजे. हा मित्र म्हणतो

की, एप्रिल ६ सारख्या पवित्र दिवशीदेखील असहकारितावाद्यांची झुंड एका मुलींच्या शाळेत ती शाळा बंद करण्याकरिता घुसली. जर त्यांच्यापैकी एखादा अधिकाऱ्यांच्याकडे नम्र विनंती करण्यास गेला असता तर त्याविरुद्ध बोलण्यासारखे काहीही नसते. पण बातमीदार म्हणतात त्याप्रमाणे साऱ्या जमावाने त्या जागेवर चाल केली आणि त्यांच्या पुढाऱ्याने शाळा बंद करावी अशी ताबडतोब मागणी केली. मुख्याध्यापक वादविवाद करू लागले आणि त्याला विटांच्या वर्षावाने उत्तर मिळाले. एका मुलीच्या डोक्याला इजा झाली आणि दुसरीला थोडेसे खरचटले. इतक्यात सुदैवाने एक असहकारितावादी तेथे आले. त्यांना शांतता राखण्याची आवश्यकता समजली होती. त्यांनी विटांचा वर्षाव आणि बळजबरीने शाळा बंद पाडण्याचा प्रयत्न थांबविला. मी या मित्राचे अभिनंदन करतो. दुसऱ्याबद्दल मी काय लिहू ? जर वरील हकीकत खरी असेल तर त्यांनी ६ तारखेला लांछन लावले, आपली प्रतिज्ञा मोडली आणि स्वतःला पूर्णपणे विसरले. जे आपण बळाने लोकांना सद्‌गुणी करण्याच्या धोरणापासून वाचवावे म्हणून इच्छा करतो, ते आपण कोणावर बळजबरी कशी करू शकू ?

ज्या पत्रलेखकाने ही घटना कळविली आहे तो म्हणतो की, तसा छळ झाला असताही शाळेच्या अधिकाऱ्यांनी मदतीकरिता पोलिसांना बोलाविण्याचे दक्षतापूर्वक टाळले. मी या संयमाबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. जे शांतताभंग करतात ते इतर अटी पाळीत असले तरी असहकारितावादी नाहीत. आणि जो सहकारितावादी असहकारितावाद्यांच्याकडून हल्ले होत असतानादेखील शांततेचे पालन करतो, तो आपण असहकारितावादी आहोत हे न जाणताही असहकारितावादी असतो.

“ देवही स्वराज्याची देणगी देऊ शकणार नाही ”

सत्याग्रह सप्ताहाकरिता जो संदेश मी दिला आहे त्यात वरील विधान आहे. श्री. रजबअली झीनाभाई यांनी अशी हरकत घेतली आहे की, पुष्कळशा लोकांना ह्या म्हणण्याचा अर्थ समजणार नाही. मी परमेश्वराची शक्तीदेखील मर्यादित करतो अशी छाप त्या विधानामुळे पडते. आणि त्यामुळे धार्मिक वृत्तीच्या लोकांची मने दुखावली असतील. मी स्वतःची गणना धार्मिक वृत्तीचा माणूस म्हणून करतो. माझा ईश्वराच्या सत्यत्वावर विश्वास आहे. मी फक्त साधी गोष्ट साध्या शब्दांत सांगितली आणि ईश्वरी नियमाकडे लक्ष वेधले. पापी माणसाला स्वर्गात जागा देण्याचे स्वातंत्र्य खुद्द परमेश्वराने आपल्याकडे राखून ठेवले नाही. कोणी असे म्हणतील की, आपले नियम घालून दिल्यानंतर परमेश्वराने साऱ्या गोष्टी आपापल्या मार्गाने जाण्याकरिता सोडून दिल्या. तो सर्वशक्तिमान असल्यामुळे त्याने असे कायदे केले की, ज्यांना अपवाद असू शकणार नाहीत. स्वराज्य ही व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्या अस्तित्वाची अवस्था आहे. ज्याप्रमाणे अन्न खाणाऱ्या माणसाचीच भूक भागते, त्याप्रमाणे जो गुलामगिरी टाकून देतो तो स्वतंत्र होतो. जर आपण दारू सोडली नाही

आणि परदेशी कापड टाकले नाही, जर हिंदू आणि मुसलमान एकमेकांशी लढत राहिले तर परमेश्वर आपल्याला स्वराज्याची देणगी देईल काय ? तो देऊ शकेल काय ? उलटपक्षी जर लोकमताच्या दाबाने आपण परदेशी कापडावर यशस्वीपणे बहिष्कार घातला, मद्यपान थांबविले तर स्वराज्य मिळविण्यात आपला पराभव होईल काय ? जो कोणी सतत ईश्वरी कायद्यांचे उल्लंघन करीत असेल त्याला परमेश्वर आपल्याला स्वर्गात जागा देईल अशी अशा आहे का ? खात्रीने नाही. म्हणून आपली प्रार्थना स्वराज्याकरिता नसावी पण स्वराज्य मिळविण्याच्या शक्तीकरिता असावी. प्रार्थनेचा अर्थच असा आहे की, विशिष्ट ध्येय किंवा अवस्था याची तीव्र तळमळ ज्यात व्यक्त होते तिला प्रार्थना म्हणतात.

[गुजरातीवरून]

'नवजीवन', १५-५-१९२१

४८. सिमल्याच्या जाहीर सभेत भाषण[१]

मे १५, १९२१.

गांधीजींनी उत्तर[२] देताना आपल्या भेटीशी संबंधित असलेल्या गोष्टींचा उल्लेख केला आणि ते म्हणाले, पंडित मालवीय यांनी मला तारेने सिमल्याला बोलाविले. ते म्हणाले, मी जर आलो नसतो तर पंडितजींची प्रकृती वाईट असतानाही त्यांना मला सिमल्यास नेण्याकरिता येणे भाग पडले असते. तारेनंतर पंडितजींचे पत्र आले. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, जर गांधींना असहकारिता पक्षाची बाजू व्हाईसरॉयपुढे मांडावयाची असेल व त्याकरिता व्हॉइसरॉयना भेटावयाचे असेल तर

१. इदगा मैदानावर सुमारे १५,००० लोकांच्या सभेत गांधीजींनी भाषण केले. सिमला भेटीचा उद्देश आणि व्हाइसरॉयच्या भेटीचा निष्कर्ष यांविषयी त्यांना बोलण्यास विनंती केली गेली. गांधींचे भाषण मुंबई क्रॉनिकल मे १७ व १९ तारखांना प्रसिद्ध झाले. येथील मजकुरात दोन्ही अहवाल पडताळून पाहण्यात आले आहेत.

२. अगोदर वाचलेल्या मानपत्राला.

लॉर्ड रीडिंग हे त्यांना भेटतील. आपली बाजू अधिकाऱ्यापुढे मांडण्यास काही चूक नाही असे त्यांना वाटले.

त्याप्रमाणे सिमल्याला पोहोचल्यावर त्यांनी व्हाइसरॉयना पत्र पाठवून मुलाखत मागितली व ती त्यांना ताबडतोब देण्यात आली. व्हाइसरॉयनी फार वेळ, धिमेपणाने आणि सहृदयतेने त्यांचे म्हणणें ऐकून घेतले असे गांधी म्हणाले. पण मुलाखतीच्या यशाबद्दल अनुकूल किंवा प्रतिकूल काहीही सांगू शकले नाहीत.[१] त्यांनी व्हाइसरॉयपुढे आपल्या पक्षाचे हेतू सांगितले आणि व्हॉइसरॉयने आपल्या बाजूने शासनासमोर असलेल्या अडचणींचा पाढा वाचला ती मुलाखत यशस्वी झाली आणि अयशस्वी झाली असे दोन्ही म्हणता येईल[२].

ते म्हणाले, कॉंग्रेस, शीख लीग आणि खिलाफत परिषद यांमध्ये जो प्रतिज्ञापूर्वक निश्चय लोकांनी केला आहे तो अमलात आणण्यावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत.

ते म्हणाले, मी आता एवढेच सांगू शकतो की, जोपर्यंत तुम्ही अनत्याचाराने वागाल आणि आपल्या देशाला न्याय मिळावा म्हणून त्यागाची वृत्ती बाळगाल तोपर्यंत जगातील कोणतीही शक्ती एक वर्षाच्या आत स्वराज्य मिळविण्यापासून तुम्हांला अटकावू शकणार नाही. आम्ही न्यायासाठी झगडतो आहोत असे जगाला दाखवावयाचे आहे. आणि हिंदुस्थानला न्याय मिळाल्याशिवाय तुमचा प्रश्न सुटणार नाही. गांधींनी लोकांना सांगितले की, नानकाना येथे जसे लोक मेले तसे तुम्ही वागा. तेथील लोकांनी आपल्या पवित्र कार्याकरिता मुक्तपणे स्वतःचे रक्त दिले. ते लोक दुसऱ्याचे रक्त घेऊ इच्छिणाऱ्या महंत नारायणदासाप्रमाणे वागले नाहीत. जेव्हा ही अनत्याचार आणि त्यागाची वृत्ती तुमच्यात येईल तेव्हा युद्धातील कोणतीही शस्त्रे तुमच्या स्वातंत्र्याआड येऊ शकणार नाहीत.

जर ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडला तर अफगाण स्वारी करील या वारंवार दिल्या जाणाऱ्या धमकीविषयी गांधीजी म्हणाले, " जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत माझ्या देशाचा कोणताही भाग परक्या अमलाखाली गेलेला मी सहन करणार नाही. हिंदुस्थानातील प्रत्येक मुसलमानाचा हाच दृष्टिकोण आहे असा कांहींचा विश्वास होता. या मुद्याबद्दल मुसलमानांच्या

१. पाहा. " सिमला भेट. " ता. २५-५-१९२१.
२. पुढील परिच्छेद १९ मेच्या क्रॉनिकलच्या रिपोर्टातील आहे.

भावना काय आहेत याविषयी हिंदूंनी शंका बाळगू नये." असे ते म्हणाले. कोणत्याही धर्माच्या प्रत्येक माणसाने या स्वातंत्र्याच्या लढ्यात हातमिळवणी करावी अशी त्यांची इच्छा होती[1].

यशाला आवश्यक असलेल्या तीन गोष्टींबद्दल ते विस्ताराने बोलले. पहिली गोष्ट भीती टाकणे. हिंदूंनी मुसलमान व पठाण यांची भीती बाळगू नये. आणि मुसलमानांनी हिंदूंच्याबद्दल भीती व अविश्वास बाळगू नये. अफगाणचे संकट म्हणजे बुजगावणे आहे असे ते म्हणाले. आपल्याला अफगाण स्वभावाचा दीर्घकाळ परिचय आहे असे त्यांनी सांगितले. त्यांच्यात काहीही कमकुवतपणा असला तरी ते देवाला खास भितात. आक्रमक युद्धाचा विचार ते कधीही करणार नाहीत असा गांधींचा विश्वास होता. उलटपक्षी आपण आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात मदतीकरिता अफगाणांना कधीही बोलाविणार नाही. जर अफगाण आक्रमक कार्याकरिता आले तर आपण त्यांच्याविरुद्ध जोरदार असहकरिता करू, आणि मातृभूमीचा एक इंच तुकडा सोडण्यापूर्वी आपले प्राण खाली ठेवू असे ते म्हणाले.

हिंदू आणि मुसलमानांनी आपल्या अंतःकरणातून अविश्वास टाकून देण्याची आवश्यकता किती आहे याकडे ते पुन्हा वळले व हिंदू, मुसलमान व दुसऱ्या आवश्यक गोष्टींबद्दल बोलले. दोघांतील ऐक्य हे देवाण-घेवाण वृत्तीने घडलेले नाही. हिंदूंनी मुसलमानांच्या गाऱ्हाण्यांचा जो पुरस्कार केला त्याचे कारण तसे करणे आपले कर्तव्य आहे असे त्यांना वाटले आणि दुसरे कारण असे की, औदार्याला प्रत्युत्तर औदार्याने मिळेल हे त्यांना ठाऊक होते. म्हणून मुसलमानांना गोहत्या सोडून देण्याची सक्ती करणे हे भयानक होते. तेच तेवढे या बाबतीत गुन्हेगार नव्हते आणि गोरक्षणाचा प्रश्न हा केव्हाही सक्तीच्या निर्णयाने निकालात निघणार नव्हता. मुसलमानांच्या बरोबर हार्दिक सहकार्य आणि अढळ विश्वास ठेवला तर शेवटी सर्व काही प्राप्त होईल. इस्लामची उभारणी औदार्याच्या व्यापक तत्त्वावर आहे आणि औदार्य सोडले तर इस्लाम टिकणार नाही.

तिसरी आवश्यक आणि सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे अनत्याचार. या बाबतीत शीखांना थरारून सोडणारी विनंती केली. लछमनसिंग आणि

१. यापुढील ४ परिच्छेद क्रॉनिकलच्या १९ मेच्या अंकावरून घेतले आहेत.

दुलीपसिंग यांचे अनुकरण करण्यास त्यांना सांगितले. त्या दोघांच्याही अंगात महंत नारायणदासबरोबर लढण्याची ताकद होती. पण त्यांनी अत्याचार करण्याचे नाकारले.

शेवटी त्यांनी स्वदेशीचा उल्लेख केला. ते म्हणाले, "जरी मी वकिलांना आणि विद्यार्थ्यांना कोर्टे आणि शाळा सोडण्याची विनंती करण्याचे थांबविणार नसलो तरी जर ते परदेशी कापडाचा बहिष्कार अंमलात आणतील तर त्यांच्या तसे न करण्याने प्रश्नाला बाधा पोहोचणार नाही, संपूर्ण स्वदेशी म्हणजेच स्वराज्य."

शेवटी गांधी म्हणाले, स्वराज्य प्राप्ती ही, निर्भय वृत्ती "त्याग, अनत्याचार, हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि चरख्याचा उपयोग यावर अवलंबून आहे.[1]

आमच्या भाषणातून काही निघेल का ? अगर निघणारही नाही. दोन्ही शक्यता सारख्याच आहेत. आपली इच्छा सिद्धीस जावी म्हणून आपल्याला परमेश्वराच्या मदतीची प्रार्थना केली पाहिजे. मी व्हॉइसरॉयना माझे म्हणणे समजावून सांगितले आणि त्यांनी माझे म्हणणे पुष्कळ तासपर्यंत धिमेपणाने व प्रेमळपणाने ऐकून घेतले. त्यांचेही म्हणणे मी ऐकले. ब्रिटिश सरकारच्या अडचणी ते समजावून सांगत असताना मी ऐकत होतो. मी एवढेच म्हणतो की, जर आपण काँग्रेसची बैठक, शीख लीग आणि खिलाफत परिषदा यांमध्ये परमेश्वराला साक्ष ठेवून जी गंभीर प्रतिज्ञा केली आहे तिला चिकटून राहिलो तर याच वर्षी आपण आपले इच्छित ध्येय खास गाठू शकू. व्हाइसरॉयच्या हाती काहीही नाही. इंग्लंडहून तारा काय बातम्या आणतात हे विचारत बसू नका. आपला लढा सन्मान आणि न्याय याकरिता आहे. आणि आपल्याला जगाला असे दाखवावयाचे आहे की, न्यायप्राप्तीकरता आम्ही मरण्यास तयार आहोत. परमेश्वर आपली परीक्षा घेतल्याशिवाय काहीही देत नाही; आणि आपल्याला काही मिळण्यापूर्वी आपण त्या परीक्षेत उत्तीर्ण झालो पाहिजे. अत्यंत वाईट असा बदमाषसुद्धा त्याला हवी असलेली गोष्ट मिळविण्याकरिता वाटेल ती गोष्ट करावयास तयार असतो. तर मग तुम्हा सहा फूट उंचीच्या पंजाबी लोकांना पुनः पोटावर सरपटावयाचे नसेल, जर तुमच्यापैकी एकाचीही इच्छा जमिनीवर नाक घासावयाची नसेल तर आपल्या शीख बांधवांनी शिकविलेला धडा तुम्ही शिका. त्यांच्याप्रमाणे तुम्ही पवित्र कार्याकरिता आपले प्राण पणास लावा. महंत नारायणदाससारखे खुनी बनू नका. कोणालाही मारून तुम्ही स्वराज्य मिळवू शकणार नाही. पंजाब आणि खिलाफतीचे प्रश्न त्या मार्गाने तुम्हांला सोडविता येणार नाहीत.

१. मुंबई क्रॉनिकलचा वृत्तांत येथे संपला. याच्यापुढील अहवाल नवजीवनमध्ये महादेव देसाई यांनी गांधींच्या सिमला भेटीचा जो वृत्तांत दिला आहे त्यावरून घेतला आहे.

कोणाचेही रक्त न देता स्वतःचे रक्त देऊन आणि लछमनसिंगासारखी शक्ती कमावून तुम्ही या गोष्टीत यश मिळवा.

*　　　*　　　*

मी तुम्हांला सांगतो की जोपर्यंत तुम्हांला आपली पवित्र क्षेत्रे पठाणांकडून भ्रष्ट केली जातील किंवा त्यांची अप्रतिष्ठा होईल अशी भीती वाटते तोपर्यंत तुम्ही तुमचे हरद्वार गाडून टाकणे आणि चितेवर तुमच्या बायकांना जाळून टाकणे हेच श्रेयस्कर आहे. पठाणांबरोबर तुम्ही लढू शकणार नाही. पण पळून जाण्याऐवजी त्यांच्याविरुद्ध उभे राहण्याची आणि मरण्याची तुमच्यात शक्ती असली पाहिजे. अफगाणांची किंवा मुसलमानांची भीती बाळगू नका. फक्त देवालाच भीत जा. प्रेषिताच्या काळातसुद्धा आपल्याविरुद्ध येत असलेल्या झुंडीच्या झुंडी पाहून त्याला काही भित्र्यांनी सांगितले की, आम्ही थोडेजण आहोत, आणि भीत भीत विचारले आम्ही त्यांच्याविरुद्ध लढणार कसे ? प्रेषिताने उत्तर दिले, "तुही एकटे नाही, देव तुमच्याबरोबर आहे." मीही तुम्हांला सांगतो, स्वतःला कमजोर समजू नका. जर तुम्ही शूर असाल तर अफगाणही तुमच्याशी चांगले वागतील. मी अफगाणांना ओळखतो. दक्षिण आफ्रिकेत पुष्कळ अफगाण माझे अशील होते. मला त्यांच्या सन्मानाच्या जाणिवेचा अनुभव होता. त्यांच्यातील वाईट लोकदेखील देवाला भितात. जर तुम्ही मुसलमानांना बंधू मानीत असाल, जर त्यांच्यावर तुमचा विश्वास असेल तर पठाणांची बिलकूल भीती बाळगू नका. जर ते आमच्यावर हल्ला करावयास आले तर त्यांच्याशी असहकारिता करावयास मी तुमच्याबरोबर राहीन. मी त्यांना हिंदुस्थानचा एक तुकडाही बळकावून घेऊ देणार नाही. ते एखादा तुकडा बळकाविण्यापूर्वी, परमेश्वर मला त्या वेळी आपला प्राण देण्याची शक्ती देईल. आपला परस्परांवर अविश्वास आहे म्हणूनच आपण गुलाम झालो. जर मुसलमानांनी इस्लामला कालिमा लावला, जर त्यांच्यातील कोट्यवधी लोक दगाबाज बनले तर इस्लाम नष्ट होईल. त्यांच्यातले व आपल्यातले संबंध हे स्वार्थावर आधारलेले नसून इमानावर आधारलेले आहेत.

मी सर्व धर्मांच्या लोकांना सांगतो की, अंतःकरणाच्या एकीने आपण बांधले जावे अशी माझी इच्छा आहे. ख्रिश्चन लोकांच्याबरोबर असेच आपण बांधले गेलो नाहीत काय ? अँड्र्यूज आणि स्टोक्स[1] यांच्यासारख्या मंडळीकडून मिळणारी मदत आपण घेत नाही का ? कोणालाही शत्रू करण्याची आमची इच्छा नाही. तसे करण्याएवजी आम्ही आमचे रक्त देऊ. जर ब्रिटिश लोकसेवक म्हणून, बांधव म्हणून राहावयास तयार असतील आणि जर ते आपली सत्ता सोडण्यास कबूल असतील व राहतील तर आम्ही त्यांचे स्वागत करू. अन्यथा त्यांनी निघून जावे.

१ ख्रिश्चन मिशनरी; सामाजिक कार्यकर्ते व अँन्ड्रयूजचे सहकारी.

काहीही असले तरी आपण शांतता पाळल्याशिवाय आपल्याला काही मिळणार नाही. जर तुम्ही स्वतःला प्रक्षुब्ध होऊ दिले तर हा लढा हराल. जनरल डायर किंवा मायकेल ओडवायर यांना शिक्षा व्हावी अशी माझी इच्छा नाही. आणि आज येथे या पवित्र जागी एका पवित्र माणसाच्या थडग्याशेजारी उभा राहून मी परमेश्वराची अशी प्रार्थना करतो की, त्यांनी त्यांची अंतःकरणे शुद्ध करावीत.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', २९–५–१९२१

४९. सिल्हेट काँग्रेस कमिटीच्या सेक्रेटरीला तार

सिमला
मे १७–१९२१

सेक्रेटरी,

काँग्रेस कमिटी
सिल्हेट

दुःख झाले. दासांच्या ताब्यात. त्यांना कळवितो. तपशील पाठवा.

गांधी

फोटोस्टॅटवरून, एस्. एन्. ७५२६

५०. सी. आर. दास यांना तार

सिमला
मे १७–१९२१

सी. आर. दास.
रूसा रोड,
कलकत्ता.

पाहिजे असलेली रक्कम व तिचा हेतू तारेने कळवा.

गांधी

फोटोस्टॅटवरून. एस्. एन्. ७५२५

५१. टिप्पणे

हॉर्निमन व मंडळी

मित्रांनी मला मि. हॉर्निमन यांच्याबद्दल अनास्था दाखवितो म्हणून दोष दिला आहे. आणि काही लोकांना मी सावरकर[1] बंधूंबद्दल क्वचितच का लिहितो याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. वकिलांच्यात अशी एक आवडती म्हण आहे व ती म्हण प्रतिष्ठाही पावली आहे की, अत्यंत कठीण असे खटले कायदा बिघडवितात. ती म्हण किती खरी आहे याचा मला पुरेपूर अनुभव आहे. पुष्कळशा न्यायाधिशांना उघड उघड अन्यायाचा पण कायद्याच्या दृष्टीने भरभक्कम असलेला असा निकाल देणे भाग पडते. त्याचप्रमाणे कठीण प्रकरणामुळे असहकारितेत बिघाड होतो. काटकसर करणारा पत्रकार या नात्याने माझा धंदा एवढाच आहे की, अशा गोष्टी जर हाताळावयाच्या असतील तर जो देशापुढे एकच प्रश्न आहे त्याच्याशी त्या संबद्ध असाव्यात. जर मी हॉर्निमनच्या प्रकरणाचा किंवा सावरकर बंधूंच्या प्रकरणाचा उल्लेख केला, तर तो मी सरकारच्या निकालावर वजन पाडण्याकरिता करणार नसून जनतेला असहकारितेच्या बाजूने उत्तेजित करण्याकरिता करू शकेन. मि. हॉर्निमन हे एक लायक व शूर साथी म्हणून परत आले तर मला आनंद होईल. त्यांना अन्यायाने हद्दपार केले हे मी जाणतो. सावरकर बंधूंच्या बुद्धीचा उपयोग लोकांच्या कल्याणाकरिता केला जावा. पण परिस्थिती अशी आहे की, हिंदुस्थान वेळेवर जागा झाला नाही तर हिंदुस्थानचे हे दोन विश्वासू पुत्र गमाविण्याचा धोका आहे. त्यातील एक माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. लंडनमध्ये[2] त्यांना भेटण्याचा मला सुयोग प्राप्त झाला होता. ते शूर आहेत. ते हुशार आहेत. ते देशभक्त आहेत. ते उघडउघड क्रांतिकारक आहेत. सध्याच्या सरकारी पद्धतीतील भयंकर स्वरूपाचे पाप त्यांनी माझ्या अगोदर पाहिले होते. हिंदुस्थानवर फार प्रेम केल्यामुळे ते अंदमानात आहेत. न्यायी सरकारात ते मोठ्या हुद्द्यावर असते. म्हणून मला त्यांच्याबद्दल व त्यांच्या बंधूंबद्दल वाईट वाटते. असहकारितेची चळवळ नसती तर हॉर्निमन परत

१. त्यांना जन्मठेपीची शिक्षा झाली आणि क्रांतिकारक चळवळीबद्दल हद्दपार केले. अखेरीस त्यांना १९३७ मध्ये सोडले.

१. १९०९ साली विजयादशमीच्या सणानिमित्त गांधीजी वि. दा. सावरकरांना भेटले होते. पाहा, खंड ९, पान

आले असते आणि हे दोघे बंधू यापूर्वीच परत आले असते. असहकारितेने मार्ग अडविला आहे. या बधूंची आणि जे तुरुंगवास भोगत आहेत अशा इतरांची सुटका व्हावी आणि हॉर्निमन यांनी परत यावे असे ज्यांना खरोखर वाटत असेल त्यांनी असहकारतेचा कार्यक्रम लवकर पुरा केला पाहिजे आणि स्वराज्य लवकर आणले पाहिजे दरम्यान आपण सध्याच्या त्या शिक्षा सहन केल्या पाहिजेत, एवढेच नव्हे तर आपण सरकारला सर्व योग्य, कायदेशीर आणि शांततामय मार्गाने दुखवून स्वतःच तुरुंगवास ओढवून घेतला पाहिजे.

ते कोण आहेत ?

मी ही टिपणे आनंद भवनातून[1] लिहीत आहे. किसानांत वाटण्याकरिता छापलेले एक पत्रक मला आताच दाखविण्यात आले. मला ते संतापजनक वाटते. कारण चालू वर्षात बिनशर्त स्वराज्य मिळेल, असे मी म्हटल्याचे त्यात म्हटले आहे. पण त्यात अपमानास्पद असे काही नाही. उलट पक्षी त्यात किसानांना असे बजाविले आहे की, प्रक्षुब्ध परिस्थितीतसुद्धा त्यांनी शांत राहिले पाहिजे. ही पत्रके वाटण्याकरिता पाच तरुण तुरुंगात गेले आहेत. ही पत्रके राजद्रोही आहेत असे मॅजिस्ट्रेटचे मत झाले आणि त्यांनी या तरुणांना आपण ही पत्रके वाटणार नाही, अशाबद्दल जामीन देण्यास सांगितले. जामीन देण्याऐवजी त्यांनी तुरुंग पत्करला. सरकारचा अपमान करण्याचा हा एक स्वच्छ मार्ग आहे.

सरकारी नोकरांनी गांधी टोप्या घालता कामा नयेत, अशी अलाहाबाद जिल्ह्याच्या कलेक्टरने काढलेली नोटीस मी वाचली. मी प्रत्येक सरकारी नोकराला असा सल्ला देईन की, त्यांनी या सुंदर, हलक्या, व निरुपद्रवी टोप्या घालाव्यात आणि नोकरीतून हकालपट्टी आणि तुरुंगवास यांनाही तोंड द्यावे. मी अलाहाबादमध्ये असताना मला असे सांगण्यात आले की, जे फाजील उत्साही सरकारी नोकर आहेत ते गरीब लोकांना असेही सांगतात की, जर तुम्ही घरात चरखा आणलात तर तुमच्यावर खटला होईल. जर चरखा ही एक राजद्रोहात्मक वस्तू ठरविण्याची शक्यता असेल तर चरखा जवळ बाळगणे हे एक तुरुंगवास ओढवून घेण्याचे दुसरे एक सन्माननीय साधन ठरेल.

जमीनदार व रयत

संयुक्त प्रांतातील सरकार सभ्यतेच्या मर्यादा ओलांडीत असता आणि लोकांना धाकदपटशा दाखवीत असता किसान हेदेखील आपल्या नव्याने सापडलेल्या शक्तीचा शहाणपणाने उपयोग करीत नाहीत यात शंकेला जागा नाही. कित्येक जमीनदारी विभागात किसान हे आपल्या मर्यादा उल्लंघीत आहेत. त्यांनी कायदा आपल्या हातात

१. अलाहाबादमधील नेहरूंचे घर.

घेतला आहे. जे कोणी त्यांच्या इच्छेप्रमाणे वागत नाहीत त्यांची गय करीत नाहीत. सामाजिक बहिष्काराचा ते दुरुपयोग करतात, आणि अत्याचाराचे साधन म्हणून त्याचा वापर करतात. काही काही ठिकाणी त्यांनी आपल्या जमीनदारांचा पाणी पुरवठा, न्हावी आणि इतर पगारी नोकऱ्या करू देण्याचे बंद पाडले आहे असे कानी येते. आणि काहींनी आपले खंड देण्याचेही स्थगित केले आहे. किसान चळवळीला असहकारितेपासून जोर चढला आहे. पण ती चळवळ त्यापूर्वीची आणि अगदी स्वतंत्र आहे. जेव्हा योग्य क्षण येईल तेव्हा किसानांनी सरकारला कर देऊ नये, असा सल्ला देण्यास आम्ही मागेपुढे पाहणार नसलो तरी असहकारितेच्या कोणत्याही अवस्थेत जमीनदारांना मिळणारा खंड त्यांच्यापासून हिरावून घ्यावा असा विचारच आम्ही करीत नाही. किसानांची चळवळ किसानांचा दर्जा सुधारण्यापुरतीच मर्यादित असावी. किसानांचे आणि जमीनदारांचे संबंध सुधारण्याचा हेतूही त्यात असावा. जमीनदारांबरोबर केलेल्या करारातील अटी त्यांनी काटेकोरपणे पाळाव्या असा सल्ला त्यांना दिला पाहिजे. मग ते करार लेखी असोत किंवा वहिवाटीने चालत आलेले असोत. जेथे वहिवाट किंवा लेखी करार हा देखील सदोष असेल तेथेही तो त्यांनी अत्याचारांनी किंवा जमीनदाराला आगाऊ कळविल्याशिवाय उखडून टाकण्याचा प्रयत्न करू नये. प्रत्येक बाबतीत जमीनदारांच्याबरोबर मित्रत्वाने चर्चा करावी आणि तडजोड करण्याचा प्रयत्न करावा. आपल्यासारख्या अत्यंत पुरातन व अत्यंत मोठ्या अशा राष्ट्राच्या कारभारात सर्व प्रकारचे आणि गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवणारच. ते प्रश्न आपण सरकारकडे न जाता किंवा सरकारच्या मध्यस्थीशिवाय सोडविण्याची जी आपल्यात शक्ती असेल ती शक्ती दाखवण्यावर आपले स्वराज्य अवलंबून राहील.

शिस्त

स्वतःला शिस्त लावून घेण्याची वेळ आली आहे. रेल्वे स्टेशनवर जी निदर्शने होतात ती प्रवास करणाऱ्या लोकांच्या सुखांना भयप्रद होत आहेत. मला असे सांगण्यात आले आहे की, जे रेल्वे प्रवासी स्टेशनवरील निदर्शनापूर्वी माझी स्तुती करीत होते ते मधल्या एकदोन स्टेशनांच्या निदर्शनांनंतर शाप देऊ लागल्याचे ऐकण्यात आले. मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. अलाहाबादच्या प्रवासात माझ्याबरोबर एक जण प्रवास करीत होता. स्टेशनला लोकांनी जो गराडा घातला होता त्या गर्दीमुळे त्याला कपभर चहा मिळाला नाही किंवा खाण्याचे पदार्थ घेण्याकरिता बाहेर जाता आले नाही. मी प्लेग आहे असे त्याला वाटले असल्यास मला आश्चर्य वाटणार नाही. अलाहाबादहून परत जाताना कानपूर प्लॅटफॉर्मवर बेसुमार गर्दी झाली होती. ते राष्ट्रीय घोषणा किंचाळत होते. माझ्या डब्याकडे रेटारेटी करीत होते आणि प्रत्येकाला त्रास देत होते. सर्ववेळ हा आक्रोश चालला होता. पुढाऱ्यांनी मोठ्या कष्टाने जमावाला खाली बसविले, पण ते पुढारी त्यांचा आरडा ओरडा किंवा किंचाळ्या थांबवू शकले नाहीत. दर्शन

देण्याकरिता मला दारात उभे राहा असे सांगण्यात आले. मी लोक पूर्णपणे स्तब्ध झाल्याशिवाय माझी जागा सोडणार नाही असे आग्रह करणाऱ्या मित्रांना सांगून त्यांना निराश केले.

हा सारा गोंगाट, आवाज आणि गडबडही संघटना, व्यवस्था आणि पूर्वविचार यांच्या अभावामुळे होती. स्टेशनवरील निदर्शने टाळणे हे आता चांगले. आपण आता उतारूंच्या सोयी गैरसोयींचा विचार केला पाहिजे. जर निदर्शन करावयालाच पाहिजे असेल तर राष्ट्रीय घोषणा नियमित केल्या पाहिजेत, आणि उतारूंच्या सहज जाण्यायेण्याच्या सोयींची व्यवस्था केली पाहिजे. जमावाच्या हालचाली व्यवस्थितपणे व संयमितपणे कशा हाताळता येतील याबद्दल राष्ट्राला शिस्त लावली पाहिजे. याचा अर्थ स्वयंसेवकांना अगोदर शिक्षण दिले पाहिजे व जनतेला शिस्त लावली पाहिजे. थोडक्या दिवसांत यासंबंधी प्राथमिक शिक्षण देणे अशक्य नाही. जेथे जेथे लोकांना पूर्वसूचना देण्यात आल्या होत्या, तेथे तेथेलोक आश्चर्य वाटण्याइतके चांगले वागले. हे शिक्षण नसेल तर अपघात केव्हा होईल हे सांगता येणार नाही. आतापर्यंत अनिष्ट प्रकार घडले नसले तर त्याचे कारण लोकांचा उपजत असलेला चांगला स्वभाव योग्य शिक्षण मिळाल्यास आपल्याला मोठ्यातल्या मोठ्या निदर्शनामध्येसुद्धा पूर्णपणे निर्भयता आणि आराम वाटेल. आपल्याला उन्माद येता कामा नये किंवा आपण वेडे बनता कामा नये.

शीखांचा रंग

माझ्या एका मित्राने आताच माझे लक्ष शीख संघाने पास केलेल्या एका ठरावाकडे वेधले आहे. त्या ठरावात त्यांनी मला शीखांचा काळा रंग राष्ट्रीय निशाणात घालण्यास सांगितले आहे. पांढऱ्या पट्टीत इतर सारे रंग समाविष्ट झाले आहेत हे ते मित्र विसरतात. आपण संकुचित, प्रांतिक किंवा वांशिक बनता कामा नये. हिंदू आणि मुसलमानांचे रंग हे मुद्दाम घालण्यात आले, त्याचे कारण त्यांची लोकसंख्या नसून ते इतके दिवस अलग राहिले आणि त्यांचा परस्परांवरील अविश्वास हा राष्ट्रीय आकांक्षा पूर्ण होण्याच्या बाबतीत परिणामकारक अडथळा ठरला हे होय. शीखांचे हिंदूबरोबर कधीही भांडण नव्हते. आणि जर शीखांना निराळा रंग द्यावयाचा तर मग पारशी, ख्रिश्चन, ज्यू यांना का द्यावयाचा नाही? शीख संघाचे लोक आपल्या सूचनेतील अव्यावहारिकपणा समजून घेतील अशी मला आशा आहे.

नियोजित राष्ट्रीय निशाणात बदल सुचविणाऱ्या पत्रांचा माझ्यावर पूर लोटला आहे. हा प्रचंड पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्यास मी असमर्थ आहे. कोणत्याही पत्रात विशेष उल्लेखनीय असे काही नाही. काहींना निशाणात कलात्मक सौंदर्याच्या अभावामुळे खेद वाटतो. तर दुसऱ्यांना हिंदू–मुस्लिम चिन्हांत काही भर हवी आहे. टीका-

कारांच्या नजरेतून मध्यवर्ती कल्पना निसटली आहे. आपल्याला धार्मिक चिन्हे कोणतीच नको आहेत. आणि आपण एक स्पष्ट व कायमचे एकत्र येण्याची वस्तू शोधली पाहिजे. ज्या असंख्य लोकांना माझ्याप्रमाणे वाटते की आपण चरखा गमावला म्हणून स्वातंत्र्य गमाविले, आणि ते स्वातंत्र्य चरख्याचे पुनरुज्जीवन केल्याने व परदेशी कापड टाकल्याने पुन्हा प्राप्त होईल; त्यांना चरखा हीच ती वस्तू असली पाहिजे असे वाटेल.

बातमीदारांना

पुष्कळसे स्नेही मला तातडीच्या तारा पाठवितात; त्यांना माझ्या तारांची उत्तरे मिळत नाहीत म्हणून ते मला उद्धट मानीत असतील. खरी गोष्ट अशी आहे की, अहमदाबादच्या तारखात्याला माझ्या तारा उशीरा पोहोचवाव्यात अशा सूचना मिळालेल्या असाव्यात. माझ्या वाटेत असे अडथळे आणण्याचा अधिकाऱ्यांना त्यांच्या मर्जीनुरूप हक्क आहे. सरकारच्या ताब्यात असलेल्या सरकारी खात्याचा उपयोग न करता आपल्या चळवळी चालू ठेवण्यास त्या समर्थ असल्या पाहिजेत. मी पत्रलेखकांना असा सल्ला देईन की, त्यांनी तारा पाठविण्यात पैसा फुकट दवडू नये. जोपर्यंत सरकार पोस्टाचा नियमित बटवडा चालू ठेवील तोपर्यंत बातमीदारांनी माझ्याबरोबरचा सर्व व्यवहार पोस्टाने करावा.

'यंग इंडिया', १८-५-१९२१

५२. आपले शेजारी

अफगाण[१] बागुलबोवाबद्दल मी जो लेख लिहिला आहे तो अफगाणांना हिंदी सरहद्दीवर आक्रमण करण्यास आमंत्रण देणारा नाही का, आणि अशा प्रकारे मी अत्याचारात प्रत्यक्ष भागीदार होत नाही का, असा प्रश्न मि. अँड्र्यूज विचारतात. माझा लेख हिंदी लोकांकरिता आणि सरकारकरिता होता. माझ्या लेखाच्या जोरावर हिंदुस्थान-वर चाल करून येण्याइतके अफगाण लोक मूर्ख असतील असे मला वाटत नाही. पण मि. अँड्र्यूज यांनी जो माझ्या लेखाचा अर्थ लावला आहे तसा अर्थ लावणे शक्य आहे हे मी जाणतो. म्हणून मी सर्व संबंधित लोकांना त्वरेने कळवू इच्छितो की, अफगाणांना किंवा दुसऱ्या कोणाला आमच्या मदतीकरता बोलाविण्याची मला इच्छा

१. पाहा, प्रकरण ३०.

नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी आमच्या मदतीला येऊ नये असे मला उत्कंठेने वाटते. बाहेरच्या मदतीशिवाय हिंदुस्थान आपले गाऱ्हाणे सरकारबरोबर मिटविण्यास समर्थ आहे असा माझा पूर्ण विश्वास आहे. त्याशिवाय फक्त अनत्याचारी मार्गाने आम्ही आमचे ध्येय गाठण्याची पूर्ण शक्यता आहे हे मला दाखवून द्यावयाचे आहे. म्हणून मी अफगाणांना हिंदी सरहद्दीपासून दूर ठेवण्याकरिता जिवाचा आटापिटा करीन. पण हिंदी सरहद्दीपासून त्यांना दूर ठेवण्याची माझी तळमळ सरकारला माणसांची किंवा पैशाची मदत करण्याइतक्या थराला जाणार नाही.

माझ्या लेखात मी माझी भूमिका शक्य तितकी स्पष्ट केली आहे. माझ्या दृष्टीने सध्याचे सरकार हे अत्यंत असह्य आहे; ते हिंदुस्थानच्या पौरुषावरील सर्वांत मोठे संकट आहे. आणि वाटेल ती किंमत त्याची पुनर्घटना करण्याकरिता मला द्यावयास पाहिजे आहे. सरकार ईश्वरशून्य आहे अशी माझी ठाम समजूत आहे. या सरकारशी चांगले इंग्लिश लोक व चांगले हिंदी लोक संबंधित आहेत, त्यामुळेच हे सरकार हिंदुस्थानला अत्यंत भयप्रद आहे. अशा लोकांच्यामुळेच त्या सरकारात जो जन्मजात दुष्टपणा आहे त्यावरून राष्ट्राची नजर दुसरीकडे वळते. माझा हल्ला व्यक्तीवर नाही, तो पद्धतीवर आहे, ज्याला सरकार म्हणतात त्या समूहावर आहे. चांगल्यातल्या चांगले व्हाइसरॉयदेखील या पद्धतीतील विष नष्ट करण्यात दुर्बल ठरले आहेत. विष हा त्याचा पाया आहे. सध्याच्या पद्धतीऐवजी हिंदुस्थानवर केवढ्याही मोठ्या आपत्ती आल्या तरी त्या सहन करण्यास मी तयार होईन.

तथापि मी जे काय करीन ते मी काय करू शकेन यापासून अगदीच निराळे आहे. मला हे कबूल करण्यास वाईट वाटते की, ह्या चळवळीने अद्यापपर्यंत लष्करी वर्गावर असा ताबा मिळविला नाही की, ज्यामुळे तो वर्ग सरकारच्या अडचणींच्या वेळीं मदत नाकारण्याचे धैर्य दाखवील. जेव्हा लष्करी वर्गाला असे वाटेल की, आपला वर्ग राष्ट्राकरिता जगत आहे, आणि जेव्हा तो हुकुमाप्रमाणे ठार मारण्याचे काम अंगावर घेतो, तेव्हा ते काम लष्करी बाण्याची थट्टा आहे असे जेव्हा त्याला पटेल, तेव्हा हिंदुस्थानच्या ऐहिक स्वातंत्र्याची लढाई अधिक लढाई न करता जिंकली जाईल. वस्तुस्थिती अशी आहे की, हिंदी शिपाई हा सामान्य माणसाइतकाच भित्रा आहे. तो लष्करात स्वतःची भरती करून घेतो तेव्हा त्याला जगण्याचे दुसरे साधनच नाही असे वाटते. सरकारने खास पारितोषिकांच्या पद्धतीने ठार मारण्याचा धंदा आकर्षक बनविला आहे. त्यांनी कौशल्यपूर्ण शोधलेल्या शिक्षांच्या पद्धतीमुळे जो शिपाई एकदा आत जातो त्याला अडथळ्याशिवाय बाहेर पडणे जवळ जवळ अशक्य होते. अशा स्थितीत जर तात्काळ अफगाणची स्वारी झाली तर ब्रिटिश सरकारला हिंदी मदत मिळणार नाही, अशा विश्वासाच्या भ्रमात मी नाही. पण जेव्हा मला खास आव्हान देण्यात आले तेव्हा असहकारितेपासून उद्‌भवणारी तर्कशुद्ध भूमिका कोणती, ती राष्ट्रापुढे ठेवणे हे

माझें कर्तव्य होते. अफगाण बागुलबोवामुळे राष्ट्राने घाबरून जाऊ नये असा इषारा देणेही जरूर होते.

या प्रश्नातल्या दुसऱ्या भागात अनत्याचारासंबंधी गैरसमज भरलेला आहे. दुसऱ्यांनी पुकारलेल्या युद्धात सरकारली मदत करणे हे अनत्याचारी असहकारितावाद्याच्या कर्तव्यक्षेत्रातील भाग होऊ शकत नाही. अनत्याचारी असहकारितावादी हा गुप्तपणे किंवा उघडपणे अशा युद्धाला उत्तेजन किंवा मदत देणार नाही. तो त्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भागही घेणार नाही. पण युद्ध संपविण्याकरिता सरकारला मदत करणे हे त्याच्या कर्तव्यात येत नाही. उलटपक्षी त्याची प्रार्थना अशी असेल आणि ती असलीच पाहिजे की, ज्या सत्तेचा तो नाश करू इच्छितो तिचा पराभव व्हावा. म्हणून मी माझ्या अनत्याचाराच्या श्रद्धेपुरते सांगावयाचे म्हणजे, मी अफगाण स्वारीचा पूर्ण समतोलपणे विचार करू शकतो, आणि हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या बाबतीत त्यासारखाच विचार करू शकतो. अफगाणांचे हिंदुस्थानबरोबर वैर नाही. ते ईश्वराला भिणारे लोक आहेत. आपण जे मुंबई किंवा कलकत्त्याला थोडेसे रानटी नमुने पाहतो त्यावरून अफगाणांची परीक्षा करू नये असा मी असहकारितावाद्यांना इषारा देतो. जर ब्रिटिशांनी आपले सरहद्दीवरील ठाणे उठविले तर ते हिंदुस्थान पादाक्रांत करतील अशी समज करून घेणे भोळसटपणाचे आहे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, त्यांची इच्छा असेल तर त्यांना आजही हिंदुस्थान पादाक्रांत करण्यापासून कशाचाही अटकाव होणार नाही. पण आपल्याला आपला देश आवडतो हा जसा आपला दावा आहे, तसाच त्यांनाही त्यांचा देश आवडतो. सरहद्दीनजीकच्या रहिवाशांच्यासमोर जो हा कठीण प्रश्न उभा आहे त्याची तपासणी करण्याकरिता मला स्वतंत्र लेख लिहिला पाहिजे.

'यंग इंडिया', १८-५-१९२१.

५३. हिंदूंनी सावध राहावे

बिहारची भूमी असहकारितावाद्यांना आशास्थान आहे. बिहारमधील हिंदू-मुस्लिम ऐक्य हे लोकप्रसिद्ध आहे. या ऐक्यावर ताण पडला व तो जवळजवळ असह्य ठरेल असे ऐकून मला दुःख झाले. भेदरट नसणाऱ्या व जबाबदार हिंदू-मुस्लिम पुढाऱ्यांनी मला असे सांगितले की, हिंदू-मुस्लिम दंगे टाळण्याकरिता त्यांची शक्ती अतोनात खर्ची पडत आहे. त्यांनी मला असे कळविले की, काही हिंदू, उदाहरणार्थ गंगाराम शर्मा,

भूतनाथ आणि विद्यानंद यांनी लोकांना असे सांगितले आहे की, मी हिंदू अगर मुसलमानांना मांस खाण्यास बंदी केली आहे, आणि फाजील शाकाहारी लोकांनी बळजबरीने मांस व मासे लोकांच्यापासून हिसकावून घेतले आहेत. अनेक ठिकाणी माझ्या नावाचा बेकायदेशीरपणे उपयोग केला जातो हे मला ठाऊक आहे; पण माझ्या नावाचा गैरवापर करण्याची ही अत्यंत अभिनव पद्धत आहे. मी कट्टा शाकाहारी आणि अन्न-सुधारक आहे हे सर्वांना ठाऊक आहे. पण तशीच ही गोष्ट सर्वांना ठाऊक नाही की, अहिंसेची व्याप्ती मानवी प्राण्यापर्यंत जशी आहे, तितकीच ती खालच्या जनावरा-पर्यंतही आहे; आणि मी मांसाहाऱ्यांबरोबर मोकळेपणाने मिसळत असतो.

गाईच्या रक्षणाकरिता मी माणसाला ठार मारणार नाही. त्याचप्रमाणे माणसाला वाचविण्याकरिता मी गाईला मारणार नाही. मग तो माणसाचा जीव कितीही मौल्यवान असो. असहकारितेचा एक भाग म्हणून शाकाहाराचा उपदेश करण्याचा अधिकार मी कोणालाही दिलेला नाही हे सांगण्याची जरूरी नाही. वरील नावाच्या व्यक्ती मला माहीत नाहीत. जर कोणत्याही प्रकारचा प्रचार अत्याचारासह केला गेला तर आपला हेतू साध्य होणार नाही याची मला खात्री आहे. हिंदूंनी मुसलमानांना मांसाशनापासून किंवा गोमांस भक्षणापासून निवृत्त राहण्याची सक्ती करू नये. शाकाहारी हिंदूंनी दुसऱ्या हिंदूंना मासे, मांस किंवा कोंबडी यांपासून निवृत्त होण्याची सक्ती करू नये. तरवारीच्या धारेवर धरून मी हिंदुस्थानला संयमी करू शकणार नाही. अत्याचाराने या राष्ट्राचे नीतिधैर्य जितके खचले आहे तितके दुसरे कशानेही खचले नाही. भीती हा राष्ट्रीय स्वभावाचा भाग झाला आहे. जर असहकारितावादी अत्याचाराने आपल्या पंथात लोक खेचू लागतील तर ते फार गंभीर चूक करतील. आपल्या प्रचारात जर त्यांनी कोणाहीविरुद्ध यत्किंचित सक्ती केली तर ते सरकारला मदतच करतील.

गाईचा प्रश्न मोठा प्रश्न आहे. हिंदूंना तर तो अत्यंत मोठा आहे. माझ्या गाईच्या श्रद्धेत मी कोणालाही हार जाणार नाही. गाईच्या रक्षणाची शक्ती जोपर्यंत हिंदूत येत नाही, तोपर्यंत ते त्यांच्याबद्दल असणारा विश्वास पुरा करू शकत नाहीत. ती शक्ती एक तर शरीरबळाने अगर आत्मबळाने प्राप्त करून घेता येईल. गोरक्षण अत्याचाराने करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे हिंदू धर्माला सैतानी बनविण्यासारखे आहे. आणि गोरक्षणात जो एक उदात्त अर्थ भरला आहे त्याला निकृष्ट स्वरूप देणे आहे. एक मुसलमान मित्र लिहितात त्याप्रमाणे गोमांस भक्षणाला इस्लामने फक्त परवानगी दिली आहे. आणि जर हिंदूंनी सक्ती केली तर गोमांस भक्षण हे आमचे एक कर्तव्यच होऊन बसेल. मरण्याची किंवा क्लेश सहन करण्याची शक्ती वाढवूनच हिंदूंना गाईचे रक्षण करता येईल. कसायाच्या सुऱ्यापासून गायींना वाचविण्याची एकच संधी आहे आणि ती म्हणजे येऊ घातलेल्या संकटापासून इस्लामला वाचविण्याचा प्रयत्न करणे, व मुसलमान बांधव आपली उदारता पुन्हा प्राप्त करून घेतील असा विश्वास बाळगणे. उदारता याचा अर्थ त्यांनी

आपल्या हिंदू बांधवांच्याबद्दल आदर बाळगून आपणहून गाईचे रक्षण करणे हा होय. हिंदूंनी मुसलमानांच्याविरुद्ध अत्याचार करण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे, क्लेश सहन करणे आणि विश्वास संपादन करणे हे दोन आत्मबलाचे गुण आहेत. मी असे ऐकले आहे की, मोठाल्या यात्रेत गाई किंवा बकऱ्याही असल्या तरी त्या बळजबरीने हिसकावल्या जातात. जे स्वतःला हिंदू म्हणवितात व असे अत्याचार करतात ते गाईचे आणि हिंदू धर्माचे शत्रू आहेत. गाईला वाचविण्याचा सर्वांत चांगला आणि एकच एक मार्ग असेल तर तो खिलाफत वाचविणे हा आहे. म्हणून प्रत्येक असहकारितावाद्याने कोणत्याही स्वरूपाचा किंवा प्रकारचा अत्याचाराकडे होणारा यत्किंचित कल टाळण्याकरिता आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे मग तो कल गाईच्या रक्षणाकरिता किंवा दुसऱ्या जनावरांच्या रक्षणाकरिता किंवा आणखी हेतू साध्य करण्याकरिता असो.

'यंग इंडिया', १८-५-१९२१

५४. भित्ति पत्रिका[1]

मे १९, १९२१

पत्रक नंबर १ : स्वराज्य मिळविणे याचा अर्थ प्रत्येक घरात चरखा नेणे आणि त्यावर सूत कातणे. आजच्या आज घरात चरखे न्या. प्रिन्सेस स्ट्रीटवरील राष्ट्रीय शाळेत चरखे व कापूस मिळू शकेल.[2] पत्रक नंबर २ : सुताच्या साधनाने स्वराज्य. स्वराज्याच्या लढाईत तुमचा हिस्सा असावयास पाहिजे असेल तर शक्य तितके सूत काता ...... पत्रक नंबर ३ : सामान्यतः सूतकताई हा धंदा नाही पण कर्तव्य आहे. जोपर्यंत सूतकताई होती तोपर्यंत हिंदुस्थान वैभवशाली होता. हिंदुस्थानला पुन्हा वैभवशाली करण्याकरिता कताईचे काम हाती घ्या. ...... पत्रक नंबर ४ : सुताचा दुष्काळ नाहीसा केल्याशिवाय हिंदुस्थानची वाढ करण्याचा दुसरा मार्ग नाही.......

'बॉम्बे सीक्रेट ॲबस्ट्रॅक्ट्स', १९२१

१. या पत्रिका मराठीत काढल्या होत्या. व त्यांचे शीर्षक "महात्मा गांधींचा संदेश" असे होते. मुंबई सरकारच्या दप्तराने केलेल्या सरकारी भाषांतरावरून हा मजकूर घेतलेला आहे.

२. प्रत्येक पत्रिकेच्या शेवटी हा मजकूर असे.

५५. जमनालाल बजाज यांना तार

मे २०, १९२१[1]
वर्धा

जमनालालजी,

सुंदरलालजींचे[2] अभिनंदन. बहुतकरुन भुसावळला उद्या निघतो. पुन्हा तार करतो.

गांधी.

एका मसुद्यावरुन : एस्. एन. ७५२३

५६. रेल्वे स्टेशनवर भाषण

मे २१, १९२१[3]

स्टेशनावर येणाऱ्या लोकांनी बरोबर पैसे आणावेत. आपल्याला तीन कठीण कामे पुरी करावयाची आहेत व ती या वर्षी हातावेगळी करावयाची आहेत. त्यांच्या साधनांच्या योजना बेझवाड्याला[4] ठरल्या. जर आपण जून ३० च्या आत एक कोटी रुपये जमविले नाहीत तर आपली बेअब्रू होईल; आणि या वर्षी आपण स्वराज्य मिळविणार नाही असे मी खात्रीने सांगेन. स्वदेशीची प्रगती होत आहे पण त्यातदेखील मी असे पाहतो की, पुष्कळ लोक स्वदेशी टोपी घालतात व तिच्या जोरावर आपण स्वदेशीचे अनुयायी म्हणवून घेऊ इच्छितात. मी आता स्पष्टपणे सांगतो की, जे लोक परदेशी वापरण्याचे टाकणार नाहीत त्यांना मी भेटू इच्छिणार नाही. जोपर्यंत

१. २१ मे रोजी गांधींचे सभेत भाषण झाले. पुढील प्रकरण पाहा. ही तार एक दिवस अगोदर पाठविली असण्याची शक्यता आहे.

२. त्यांना १२४ अ कलमाखाली पकडले व वर्ध्याला एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली.

३. गांधीजी खांडव्याहून भुसावळला या तारखेला प्रवास करीत होते. आणि वाटेतल्या एका रेल्वे स्टेशनवर त्यांनी भाषण केले.

४. हा संदर्भ बेझवाडा काँग्रेसच्या संदर्भाला आहे. पाहा, खंड १९, प्रकरण २५६ .

आपण खादी हा संस्कृतीचा पोषाख करीत नाही. तोपर्यंत आपल्याला स्वराज्य मिळणार नाही. ही चळवळ जर आत्मशुद्धीकरता असेल तर खादी वापरण्याशिवाय तुम्ही दारू सोडा. अनीतिमत्ता टाकून द्या. प्रामाणिक होण्याचे शिका. मालेगावच्या लोकांप्रमाणे डोकी फिरवू नका. भंगी व चांभारांना अस्पृश्य मानू नका. त्यांची व ब्राह्मणांची सारखीच सेवा करा. फुले आणू नका; पण त्याऐवजी स्वराज्याकरिता पैसा आणा.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ९-६-१९२१

५७. भुसावळचे भाषण

मे २१, १९२१

गांधींनी आपल्या स्वागताबद्दल लोकांचे आभार मानले आणि नंतर व्हाइसरॉयबरोबर झालेल्या मुलाखतीची हकीगत सांगितली. ते म्हणाले,

आम्ही दोघांनी परस्परांची मते स्पष्टपणे बैठकीत मांडली. पण आपण त्यांच्यापासून फारशी काहीच अपेक्षा करू नये. मला आशा नव्हती म्हणून माझी निराशाही झाली नाही. स्वराज्य जे मिळवावयाचे ते लोकांनी; कोणतीही व्यक्ती–मग ती व्हाइसरॉय असली तरी स्वराज्य देऊ शकणार नाही. स्वराज्य हे धर्मराज्य आहे, आणि ते स्वराज्य मी सुचविलेल्या साधनांनी लवकरच मिळविता येईल. तुम्ही धर्मप्रवण आणि शुद्ध अंतःकरणाचे असले पाहिजे. तुम्ही दारू सोडली पाहिजे, आणि शुद्ध स्वदेशी कापड वापरण्याचा दृढनिश्चय केला पाहिजे. नंतर तुम्हांला धर्मराज्य मिळेल. जो दुष्ट आहे आणि अपवित्र अंतःकरणाचा आहे त्याला असहकारितेच्या लढ्यात यश मिळणार नाही हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे.[1] लोकमान्यांच्याकडे पाहा. तुम्ही लोकमान्यांची पूजा केली पाहिजे. पण त्या महान देशभक्ताची पूजा फक्त एक कोटी रुपये जमवून करता येणार नाही. ते सहज करता येईल. तुम्ही एक कोटी रुपये जमा करून ज्या स्वराज्याकरिता लोकमान्यांनी आपले जीवन समर्पण केले होते, ते मिळविण्याकरिता खर्च[2] केले पाहिजे.

१. या वेळी गांधींनी लोकमान्यांच्या हार घातलेल्या पुतळ्याकडे बोट दाखविले.

२. यापुढील मजकूर महादेव देसाईंच्या नवजीवन ९–६–१९२१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या वृत्तांतावरून घेतला आहे.

ते स्वराज्य चळवळीचे प्राण होते. आणि त्यांनी स्वराज्य हे जीवितकार्य मानले होते. तुम्ही स्वराज्याकरिता काय करण्यास तयार आहा असे त्यांचा आत्मा तुम्हांला विचारीत आहे. त्यांची स्मृती कायम टिकविण्याकरिता, तुम्ही एक कोटी रुपये जमवू शकणार नाही का ? तुम्ही परदेशी कापड टाकून दिल्याशिवाय स्वराज्य दृष्टिगोचरही होणार नाही. जर एखादा माणूस खादी वापरीत नसेल, त्याचे मलमलीशिवाय चालत नसेल तर त्याच्या घरात मी पाऊलही टाकणार नाही. आतापर्यंत मी सरकारला हे करा किंवा ते करा असे सांगत आलो. आता मी लोकांना त्यांचे कर्तव्य सांगणार आहे. मी त्यांचा दास आहे. पण काही अटींवरच त्यांना मी दास म्हणून मिळू शकेन. मी त्यांच्यापुढे ज्या अटी ठेवल्या आहेत त्यांचे त्यांनी पालन केले तरच माझी सेवा त्यांना मिळू शकेल. माझ्या पायाला स्पर्श करून तुमचा अधःपातच होईल.

अनत्याचारी असहकारितेच्या तत्त्वांना तुम्ही घट्ट चिकटून राहिले पाहिजे. कोणत्याही अत्याचारी कृत्याने तुमच्या प्रतिज्ञेचा भंग होईल आणि मालेगाच्या पाशवी कृत्याप्रमाणे त्यांचा तुम्ही तिरस्कार केला पाहिजे. हिंदु-मुस्लिम ऐक्याचे महत्त्व तुम्ही कधीही विसरता कामा नये. माझ्या हिंदू बांधवांनी या वेळी गोरक्षणाचा प्रश्न मुसलमान बांधवांच्या सदिच्छेवर सोपविला पाहिजे. आणि मला आशा आहे की, गोमांस भक्षण करणे ही मुसलमानांची धार्मिक बाब नसल्यामुळे हा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविला जाईल.

भगिनींनी तलम कापड वापरण्याचे सोडले पाहिजे आणि खादी परिधान केली पाहिजे. ज्या जगन्माता सीतेने तिच्यापुढे रावणाने ठेवलेली मिष्टान्ने नाकारली आणि फलाहारावर राहण्याचे पत्करले, तिचे तुम्ही अनुकरण केले पाहिजे.

अस्पृश्यतेबद्दल मला असे सांगावयाचे आहे की, वेदांच्या शिकवणुकीला अनुसरून ती गोष्ट नाही. आणि हिंदू धर्माच्या तत्त्वाना ती सोडून आहे. पण या पद्धतीत सुधारणा करणे याचा अर्थ रोटीबेटी व्यवहार सुरू करणे असा नाही.

शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, माझे हे भाषणांचे दौरे जून अखेरीस संपतील. आणि उरलेल्या मुदतीत मी अपेक्षित रक्कम जमा[1] करू शकेन.

[हिंदीवरून]
'आज', २९-[illegible]-१९२१

१. भाषणाच्या शेवटी सुमारे चार हजार रुपये जागच्या जागी जमले. स्त्रियांनी दागदागिने दिले.

५८. संगमनेर[1] सभेतील भाषण

मे २२, १९२१.

प्रसिद्ध अशा बलाढ्य साम्राज्याशी आज आपण लढत आहो. आपल्याला तीन मोठी कामे पुरी करावयाची आहेत. पण आपल्या वागण्यावरून आपण कशातच गंभीर आहोत असे वाटत नाही. आजच्या या दृश्यावरून मला असे वाटले की, देशात चोहोकडे आपण असेच काम करीत असू तर हिंदुस्थान स्वराज्याला लायक ठरणार नाही. देशात चोहोकडे मी प्रेमसागरात डुबतो आहे. पण प्रेमाच्या अग्नीतून शक्ती निर्माण झाल्याशिवाय प्रेम निरुपयोगी आहे. माझी पूजा केलेली मला आवडत नाही. आणि आदराने माझ्या पायाला केलेला स्पर्श मला सहन होत नाही; असला रिवाज मला तिरस्करणीय वाटतो. त्यामुळे हिंदुस्थानचा अधःपात होईल. पदस्पर्शाने देश स्वराज्य मिळवू शकणार नाही. मला हिंदुस्थान ताठ उभा राहिलेला पाहावयाचा आहे. जगातील सर्व देशांपुढे तो तसा उभा राहिलेला पाहण्याची माझी इच्छा आहे. मला गांधी राज्य नको, किंवा कोणा व्यक्तीचे राज्य नको. मला फक्त स्वराज्य पाहिजे. म्हणून लोकांनी आदराने माझ्या पायाला स्पर्श करावयास नको आहे.

× × ×

आपण पाश्चात्य सुधारणातील अतिरेकांचे अनुकरण केले आहे. जर आपण त्यातील सौंदर्य ग्रहण केले असते तर अधिक बरे झाले असते. अशा प्रकारच्या फिती फक्त बायका वापरतात. जर तुम्हाला एखाद्या गोष्टीचा उपयोग केव्हा करावा हे ठाऊक नसेल तर तुम्ही त्या वापरताच का ? तुम्हांला वाटले फुलांच्याबरोबर फिती असल्या तर सौंदर्यात भर पडेल. यावरून हिंदुस्थानात आपण जे प्रकार करतो ते विलक्षण मिश्रणाचे असतात. यातून बाहेर कसे पडावे हे कॉंग्रेस दाखवीत आहे. तुम्ही जे करता त्यात औचित्य किंवा विचारांची खोली नाही. तुम्ही टिळक महाराजांना पूज्य मानता ना ? त्यांनी आपल्याला एक पवित्र शब्द दिला व एकच दिला,—आणि तो शब्द पुटपुटत ते निघून गेले. टिळक महाराजांनी ठेवलेला वारसा साऱ्या हिंदुस्थानाकरिता आहे हे खरे आहे. पण देशातील इतर भागांच्या लोकांपेक्षा तुमची जबाबदारी अधिक आहे. त्यांच्या आत्म्याला तुम्ही १ ऑगस्टला काय उत्तर देणार ? जरी तुम्ही काही केले नाहीत तरी

१. नवजीवनमध्ये गांधींच्या दौऱ्यांचा महादेव देसाईंनी प्रसिद्ध केलेल्या वृत्तांतावरून.

निदान पूर्ण स्वदेशी घ्या. आणि देवळातून परदेशी वस्तू वापरण्याचे सोडून द्या. मी देवळातील भिक्षुकांना सांगू इच्छितो की, जेव्हा ते मला परदेशी कापडांनी शृंगारलेल्या देवळात घेऊन जातात तेव्हा मला दुःख होते.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ९-६-१९२१

५९. पाचशेवा मजला

मी सिमल्याबद्दल ऐकले होते. ती जागा मी पाहिली नव्हती. मला वारंवार तेथे जावेसे वाटे. पण जाण्यास भीती वाटत असे. मला वाटे की, तेथे मी चुकेन आणि इतरांच्यात एक रानटी माणूस ठरेन.

आता ती जागा मी पाहिली आहे. मी भारतभूषण पंडित मालवीय यांना भेटण्याकरिता येथे आलो आहे. त्यांनी मला आपल्या पंखाखाली घेतले आहे. घराचे नाव "शांतकुटी" आहे. आणि मी येथे सहकाऱ्यांमध्ये आहे. हवा मोहक आहे. निसर्गाने आपल्या संपत्तीपैकी काहीही स्वतःजवळ ठेवले नाही. या टेकड्या हिमालयाचा भाग आहेत. पण मला माझ्या बाहेर कसलीच शांतता मिळत नाही. जर माझी शांती बाह्य परिसरावर संपूर्णतः अवलंबून असती तर मला येथून पळून जावे लागले असते, किंवा मी वेडा झालो असतो.

मुंबई ही जशी मुंबादेवीपासून किंवा कलकत्ता कालीपासून निघाली आहे त्याप्रमाणे सिमला हे नाव शिमला मातेपासून निघाले आहे. या तिन्ही देवी अविश्वासू ठरल्या किंवा भक्तगण त्यांना विसरले. काली देवळाचा नुसता विचार आला म्हणजे मला भय वाटू लागते. त्या जागेला देऊळ कसे म्हणता येईल ? तेथे दररोज रक्ताच्या नद्या वाहतात हे अक्षरशः सत्य आहे. धर्माच्या नावाने मारली जाणारी हजारो बकरी देवाच्या दरबारात काय म्हणतील कोण जाणे. काली मातेची सहिष्णुता किती अपार आहे! तिला खरोखरच ही निष्ठुर हत्या पाहिजे आहे काय ? जे लोक तिच्यापुढे बळी देतात ते तिच्या पवित्र नावाला कलंक लावतात.

मुंबईमध्ये कमी दुष्टपणाचे गुन्हे लोक करीत नाहीत असे नाही. पण धर्माच्या नावाने हे पाप दररोज केले जात नाही. जे लोक शेअर बाजारात नेहमी जातात किंवा

घोड्यांच्या शर्यतीवर पागलपणाने पैसे उधळतात ते हे पातक आहे असे मानतात व आपली दुर्बलता कबूल करतात. तेथील कत्तलखान्यात धर्माकरिता नव्हे, पण पोटाकरिता जनावरे मारली जातात. पण या कत्तलीची माहिती असूनसुद्धा मुंबईत राहणे अगदीच अशक्य नसते.

पण सिमल्याबद्दल काय? दिल्ली ही खरोखर हिंदुस्थानच्या गुलामगिरीचे चिन्ह नाही. राज्यकर्त्यांचे खरे मुख्य ठाणे सिमला आहे. सिमला नगरपालिकेने व्हाइसरॉयना सांगितले की, दर वर्षी सरकारी अधिकारी आपली धोरणे सिमल्याच्या थंड व शांत टेकड्यात बनवीत असतात. ही धोरणे काय आहेत याचा १९१९ च्या उन्हाळ्यात आपल्याला पूर्ण अनुभव आला. देशातील अत्यंत उष्ण अशा प्रदेशांना सुद्धा या धोरणांचे तपमान काय आहे याची कल्पना देता येणार नाही.

सिमला पाहिल्यानंतर माझे विचार बदलले नाहीत. या जागेवर किती पैसा खर्च झाला याला सुमारच नाही. माझ्यासारख्या गर्विष्ठ माणसालादेखील येथे शरणागती पत्करावी लागली. तेथे वाहतुकीचे साधन म्हणजे घोडा किंवा रिक्षा. मी दक्षिण आफ्रिकेत रिक्षा कधीही वापरला नाही. पण माझ्या दुर्बलतेमुळे येथे तो मी वापरला. वयोवृद्ध किंवा तरुण, स्त्रिया किंवा पुरुष तो येथे वापरतात. येथे मोटरीला बंदी आहे व ती वाजवी आहे. व्हाइसरॉय आणि एक दोन इतर अधिकारी यांना घोड्याची गाडी वापरता येते आणि तेही योग्य आहे. येथील रस्ते अरुंद आहेत आणि चढाच्या टेकड्या तोडून केलेले रस्ते तसेच होणार. अशा रस्त्यांवर घोडा, गाड्या चालविणे हे सक्तीने बंदच केले पाहिजे.

आश्चर्याची गोष्ट अशी की, रिक्षा हे अगदी साधे वाहन झाले आहे. जणू काय वाहनाला आपणापैकी कोणाला जुंपणे ही एक स्वाभाविक गोष्ट आहे! मी ज्या रिक्षात बसलो होतो ती रिक्षा ओढणाऱ्या माणसांना विचारले, तुम्ही हे काम का करता? त्यांनी मला उलट प्रश्न विचारला, आम्हांला पोटे नाहीत का? हे उत्तर समाधानकारक नाही हे मला ठाऊक आहे. तथापि भारवाहक जनावरे होण्यात त्यांना आनंद वाटतो असे म्हणता येत नाही. उलटपक्षी माझा आरोप असा आहे की, आपणच त्यांना जनावरे बनवितो. आपण साम्राज्याचे बैल झालो आहोत याचे आश्चर्य का वाटावे?

फक्त ब्रिटिशच रिक्षा वापरतात असे नाही. आम्हीही बिनदिक्कत वापरतो. माणसांना बैल बनविण्याच्या कामी आम्ही त्यांना जाऊन मिळतो, आणि म्हणून आम्ही स्वतःच बैल बनतो.

प्रत्येक रिक्षाला चार माणसे लागतात. त्यांतील तिघांना प्रत्येकी १८ रुपये दरमहा मिळतात. आणि चौथा जो त्यांचा म्होरक्या असतो त्याला २० रुपये मिळतात. रस्त्याच्या बाजूच्या खालवर चढणी इतक्या निमुळत्या असतात की, जरी चार माणसे

असली तरी त्यांची दमछाट होते. एका वेळी एकच मनुष्य रिक्षात बसतो, हेही सुदैवच. सिमला हे ७५०० फूट उंचीवर आहे. इतक्या उंचीवरून राज्य चालविले जाते या गोष्टीचा अर्थ लोकांना कळला तर साम्राज्य म्हणजे काय हे त्यांच्या लक्षात येईल. जर मुंबईत सर्व दुकानदारांची दुकाने चाळीच्या शेवटच्या मजल्यावर असती तर गिऱ्हाइकांचे काय हाल होतील ? चौथा मजला हा जवळजवळ ६० फुटांवर असतो. देशाचे दुकानदार जे आपले सरकार आहे, त्यांच्या ३० कोटी गिऱ्हाइकांना ६० फूट नव्हे तर ७५०० फूट वर चढावे लागेल ! मुंबईला चवथ्या मजल्यावरून दुकानदारी करता येणार नाही. हिंदुस्थानचा व्यापार पाचशेव्या मजल्यावरून प्रत्यक्ष चाललेला आहे ! देश उपाशी मरत असला तर आश्चर्य काय ? सिमल्याच्या पायथ्याशी अन्नाच्या अभावी ३ कोटी निरपराधी मुले उपाशी मरत असतील तर ते चमत्कारिक आहे असे वाटण्याचे कारण नाही. जोपर्यंत साम्राज्य हे आपल्यापासून पाचशे मजल्याच्या उंचीइतक्या अंतराने विभक्त केले गेले आहे तोपर्यंत ते अंतर सांभाळण्यास डायरशाहीचा वापर केलाच पाहिजे.

स्वराज्य जर इतक्या उंचीवरून चालविले जात असेल तर ते स्वराज्य नाही.

एखादा विचारी मनुष्य मला विरोध करून म्हणेल की, ही तुलना योग्य नाही. मालक ७५०० फुटांच्या उंचीवर राहात असेल, पण तो आपले नोकर तलाठी, पाटील आणि मामलतदार यांना तळमजल्यावर ठेवीत असतो. जर मालक पाचशेव्या मजल्यावर आपल्या खर्चाने राहात असता तर या म्हणण्यात काही अर्थ असता. खरे म्हणजे तो गिऱ्हाइकांच्या खर्चाने तेथे राहतो. तेथे राहण्याचा खर्च वसूल करतोच, पण आपला नेहमीचा नफाही आकारतो. अशा व्यापाऱ्याची गिऱ्हाइके जर दिवाळखोर बनली, भिकारी बनली तर नवल काय ?

गंगेचे पाणी कावडीने वाहून नेण्याच्या पद्धतीपेक्षा ही व्यवस्था अधिक खर्चाची आहे. कावडीवरून ते पाणी रामेश्वरपर्यंत नेले जात असे. गंगेचे पाणी स्वस्त का महाग हे ज्याने लग्न आकाराच्या गंगेच्या पाण्याच्या भांड्याला पैसे दिले असतील त्याला ठाऊक आहे.

सिमल्याला गर्दीच गर्दी. प्रत्येक घर भरलेले. वस्तू महागच असणार. पाणीसुद्धा दोन हजार फूट खालून वर आणले जाते. पाण्याचा एक खुजा वापरतानासुद्धा माणसाची कुचंबणा होते. ज्या इमारतीत आम्ही राहतो तेथे पाणी मिळते; पण कावडीवाल्यांना लांब अंतरावरून आमच्यापुरते पाणी आणण्याकरिता सबंध दिवस लागतो. सिमल्याच्या आसपास ओढे नाहीत. स्वराज्य मिळविणे म्हणजे हिंदी सरकार असो किंवा ब्रिटिश सरकार असो पाचशेव्या मजल्यावरून तळमजल्यावर उतरण्यास भाग पाडणे आहे; आणि त्यांच्या आमच्या संबंधात स्वाभाविकपणा आणणे आहे. हा भेदाभेद

काळ्या-गोऱ्यातला नसून उच्च व नीच यांच्यातील आहे. जो भंग्यांची सेवा करतो तो खरा ब्राह्मण. पण जो त्यांच्या खांद्यावर चढतो तो खरा ब्राह्मण नव्हे. जो स्वतःमध्ये आणि प्रजेमध्ये पाचशे मजल्यांच्या उंचीचे अंतर राखतो तो राजा नाही. राजा किंवा भिकारी हा सुखाकरिता किंवा दुःखाकरिता जन्माला येणे हे मागील जन्मांच्या कर्मांच्या गुणावर अवलंबून असते. जो सुखी मनुष्य आहे तो दुसऱ्यांची दुःखे नाहीशी करण्याकरिता झटतो, आणि राजा हा भिकाऱ्यांना आपल्या पातळीवर आणण्याकरिता झटत असतो. याचा अर्थ तो स्वखुषीने भिकारी होतो. सर्व सत्ताधीश जो परमेश्वर हा स्वतःला दासांचे दास बनवून सत्ता चालविण्याचा अधिकार प्राप्त करून घेतो. तो पातक्यांना शुद्ध करून, स्वतःची पूजा करून घेण्यास पात्र होतो. सिमल्यामध्ये मी याच्या उलट पाहिले आणि माझे अंतःकरण व्यथित झाले.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, २२-५-१९२१.

६०. माझी टिप्पणे

नवे व्हाइसरॉय

पंडितजींच्या विनंतीवरून मी त्यांना सिमल्यास भेटावयास गेलो. त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांनी माझ्या मुक्कामी भेटावयास येण्याऐवजी मलाच भेटीस बोलाविले. मी त्यांना तसे कसे करू देईन ? मी स्वतः सिमल्याला गेलो. पंडितजींनी मला सांगितले की, व्हाइसरॉयना मला भेटण्याची इच्छा आहे. मी नेक नामदार साहेबांना पत्र लिहिले आणि सांगितले की, जर तुम्हांला मला भेटण्याची इच्छा असेल तर मी आनंदाने तुमच्या भेटीस येईन, आणि मला जे काय सांगावयाचे ते सांगेन. त्यांनी मला वेळ दिली. आम्ही पुष्कळ वेळ एकत्र होतो. मी जे काय म्हणालो ते सर्व त्यांनी मोठ्या शांतपणे, आदराने आणि लक्ष देऊन ऐकले. मीही त्यांचे म्हणणे सन्मानपूर्वक ऐकून घेतले. त्याचा परिणाम असा झाला की, आम्ही थोडेफार एकमेकांना समजू शकलो.

त्यातून काय निष्पन्न होईल हे मला थोडेफार ठाऊक आहे, आणि थोडेफार ठाऊक नाही. आपल्याला जे पाहिजे आहे ते देणे व्हाइसरॉयच्या हातात नाही. जर ते सज्जन आणि कळकळीचे गृहस्थ असतील आणि आपले म्हणणे त्यांना पटले असेल

तर मित्र या नात्याने ते आपल्याला मदत करू शकतील. पण अन्यथा आपल्याला जे पाहिजे ते आपणच मिळविले पाहिजे. आपल्यात ते मिळविण्याची ताकद असली पाहिजे. जर एखाद्या माणसाला इच्छित वस्तू कशी घ्यावी हे ठाऊक असेल तर जो मनुष्य तो ती देईल त्याची वाण पडणार नाही. जो मनुष्य आपल्याबरोबर वाडगा घेऊन जातो आणि हंडाभर पाणी आपल्याला समुद्राने दिले नाही म्हणून तक्रार करतो, अशा माणसाला काही ज्ञान असते का ?

म्हणून आपण स्वराज्य मिळविण्याची ताकद कमावू या आणि पंजाब व खिलाफतीच्या प्रश्नावर न्याय संपादन करून घेऊ या. आपण ती ताकद अद्याप मिळविली नाही पण ती मिळवीत आहोत. मालेगावसारख्या घटना आपल्या वाटेत अडथळे म्हणून आहेत. आपले ध्येय गाठण्यात जे अपयश येते ते आपल्या आळसामुळे असले तरी आपण आपला राग इतरांच्या वर काढतो. असहकारितेचे एक आवश्यक वैशिष्ट्य असे आहे की, प्रत्येकाने आपला राग आपल्यावरच काढला पाहिजे.

सहकाऱ्यांना

व्हाइसरॉयांच्या बरोबर झालेल्या मुलाखतीचा परिणाम म्हणून मी माझ्या सहकाऱ्यांना निदान एवढे सांगू शकेन की, त्यांनी आपला सुस्तपणा झटकून टाकावा. वायफळ बडबड, निदर्शने आणि भाषणे सोडून द्यावीत आणि सतत काम करीत राहावे.

आपल्यापुढे पाच कामे आहेत : (१) अस्पृश्यतेचे उच्चाटन. (२) दारू पिण्याचे थांबविणे. (३) काँग्रेस सभासद नोंदविणे. (४) टिळक स्वराज्य फंडाला देणग्या जमविणे. (५) प्रत्येक घरात चरखा सुरू करणे.

यातील कोणत्याही कामाला भाषणाची जरूरी नाही.

अस्पृश्यतेच्या उच्चाटनाकरिता आपण भंगी आणि त्यांच्यासारखे जे इतर लोक असतील त्यांची सेवा करावी; त्यांच्या घरी जावे व त्यांची स्थिती सुधारावी.

दारू पिण्याचे थांबविण्याकरिता आपण गुत्त्याजवळ उभे राहावे. पिणाऱ्या गिऱ्हाइकांना नम्रपणे सुबुद्ध करावे आणि जर त्यांनी दारू पिण्याचा आग्रह धरलाच तर त्यांना आतमध्ये जाऊ द्यावे. प्रत्येक जमातीने दारू पिण्याला मनाई करणारा ठराव पास करावा, आणि जे तो ठराव मोडतील त्यांच्यावर बहिष्कार घालावा.

बहिष्कार याचा अर्थ न्हावी, धोबी वगैरे त्यांना मिळू देऊ नयेत असा नाही. त्याचा अर्थ इतकाच की अशा माणसाच्या घरी अन्न किंवा पाणी घेऊ नये आणि त्याच्या कुटुंबाशी वैवाहिक संबंध जोडू नये. बहिष्कार दोन प्रकारचा असतो. एक सविनय आणि दुसरा अविनय. सविनय बहिष्कारात प्रेमाची मुळे असतात, व अविनय

बहिष्काराचे दुसरे नाव द्वेष असे आहे. अशा बहिष्काराला शांततामय असहकारितेत जागा नाही, व तिचा त्याग केला पाहिजे. सविनय बहिष्कारात जी मुळात कल्पना आहे ती म्हणजे संबंधित व्यक्तीकडून कोणतीही सेवा घ्यावयाची नाही किंवा सामाजिक संबंध ठेवावयाचा नाही. दुसऱ्या प्रकारच्या बहिष्कारामागे जी कल्पना आहे ती शिक्षा आणि दुःख देण्याची आहे. आम्हांला दारूबाजांना शिक्षा करावयाची नाही. त्याची संगत टाळून आम्हांला आमचे दुःख व्यक्त करावयाचे आहे. याचा अर्थ त्यांच्याबरोबर आम्ही पाणी पिणार नाही, किंवा अन्न घेणार नाही. आणि त्यांच्या कुटुंबाशी लग्न-व्यवहार करणार नाही. पण अशा लोकांची कामे करण्यास इतरांना बंदी करणे हा केवळ निष्ठूर पणा आहे. विहिरी आणि तलाव हे सर्वांच्या उपयोगाकरिता आहेत. न्हावी, धोबी आणि वाहतूक ही- लोक चांगले असोत किंवा वाईट असोत सर्वांना उपलब्ध झाली पाहिजेत. न्हावी, धोबी आणि पाणी वाहणारे यांचा संबंध कुटुंबात काम केल्याशिवाय येत नाही. खुनी माणसालासुद्धा पाणी पिण्यास परवानगी मिळणे हा त्याचा हक्क आहे. ज्या प्रमाणात आपण बरोबर काय आणि चूक काय यात भेदाभेद करण्याचे शिकू तितक्या प्रमाणात स्वराज्य लवकर येईल. मद्यपानाला उत्तेजन मिळू नये म्हणून बहिष्कार घालण्याची जरूरी मला वाटते म्हणून या विषयाची मी इतकी लांबवर चर्चा केली. अविनय बहिष्कारामुळे पुष्कळ ठिकाणी कटू फळे आली आहेत. अविनय पूर्णपणे टाकण्यानेच आपली ताकद वाढते. एकदा मनुष्य दारूबाज बनला म्हणजे तो त्या दुर्गुणाच्या पूर्णपणे आहारी जातो. आणि म्हणून तो आपल्या दयेला पात्र होतो. आणि त्या दयेमुळेच आपण अशी माणसे सुधारू शकतो.

दारू-गुत्त्याच्या मालकाचासुद्धा आपण द्वेष करू नये. व्यवस्थितपणे चालू असलेला धंदा सोडून देणे ही कोणालाही सोपी गोष्ट नाही. दुसरा कोणता धंदा आपण करू शकू याचा विचार त्याला करता आला पहिजे. मी जर त्यांचे मन यशस्वी रीत्या अनुकूल करू शकलो तर मी सर्व गुत्तेवाल्यांना पिंजणकाम, सूतकाम आणि वीणकाम करण्यास सांगेन. अशा कामापासून जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तू मिळविता येतील यात शंकाच नाही. गुत्ता चालविण्याकरिता स्त्रिया आणि मुले कसलीही मदत करू शकत नाहीत, पण कताईत आणि विणाईत प्रत्येकाला मदत करता येते. आणि कुणी कुणाला पोसण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रत्येक जण त्याचा किंवा तिचा हिस्सा देऊ शकतो. मग तो हिस्सा लहान असो वा मोठा असो.

काँग्रेस सभासद नोंदण्याकरिता, टिळक स्वराज्य फंडाला पैसे जमविण्याकरिता किंवा घरोघर चरखे चालविण्याकरिता सभांची जरूरी नाही. घरोघर जाण्यासाठी खूप मोठ्या स्वयंसेवकांची संख्या पाहिजे आहे. अशा प्रकारे लोकांनी काम सुरू केल्याशिवाय जून संपण्यापूर्वी ठरलेला कार्यक्रम पुरा करता येणार नाही.

आपल्याला बोलावयासदेखील फुरसत नाही. माझ्या अनुभवावरून मला हे ठाऊक आहे की, निष्कारण बडबडण्यात खर्च केलेले प्रत्येक मिनिट किंवा दर्शन देणे किंवा स्वस्थ बसणे म्हणजे ते मिनिट कायमचे वाया दवडणे आहे. आपल्याला गमावण्याला वेळच नाही. ज्यांनी खास काम करण्यातील आनंद चाखला आहे त्यांना मी अशी खासच सूचना करीन की, त्यांनी एकही क्षण वाया जाऊ देऊ नये. आपल्या वेळेतील कोणताही क्षण आपला नाही. आपण प्रत्येक क्षण देशाला वाहिलेला आहे.

चरख्याचा अर्थ

चरखे सुरू करणे याचा अर्थ प्रत्येक कुटुंबाला चरखा पुरविणे आणि नंतर काही न करणे असा नाही. त्याचा खरा अर्थ असा आहे आहे की, ते ते कुटुंब प्रामाणिकपणे चरखे चालवितात का नाही आणि खादी वापरतात किंवा नाही हे आपण पाहावे असा आहे. प्रत्येक चरखा दररोज चार तासांपेक्षा कमी चालता कामा नये. दर तासाला कमीत कमी तीन तोळे सूत निघाले पाहिजे असे आपण ठरवावे. आणि प्रत्येक गावाने किंवा खेड्याने या प्रमाणात सूत काढावे. असे झाले तरच लोकांनी चरखा सुरू केला असे म्हणता येईल. लोकांनी आळस टाकून देण्याचे शिकण्याचा, प्रत्येक कार्यकर्त्याने लोकास तसे करण्यास मदत करण्याचा हा प्रश्न आहे. हे काम चरखे तयार करून होणार नाही.

अशा प्रकारे नियमित काम केले तरच आपल्याला स्वराज्य मिळेल.

मी एके दिवशी एका मित्राशी बोलत होतो. मी त्याला विचारले, तू चरख्याला पहिले महत्त्व का देतोस ? त्याचे उत्तर असे की, जरी चरख्यामुळे आर्थिक स्वातंत्र्य आपल्याला मिळाले व लोक स्वावलंबी झाले तरी चरख्याची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे तो स्त्री-पुरुषांना शांतपणे विचार करण्यास आणि लोकांना स्थिर व पवित्र राहण्यास फुरसत मिळवून देईल. जे नियमितपणे चरखा चालवितील त्यांच्यावर त्याचा जो परिणाम होईल तो दुसरा कशानेही होणार नाही.

कोणाला सभासद होता येईल ?

सहकारितावाद्यांनासुद्धा काँग्रेस सभासद होता येईल का असा प्रश्न एक मित्र विचारतात. जे काँग्रेस घटना मान्य करतात ते जरी सहकार करणारे असले तरी त्यांना काँग्रेस सभासद होता येईल. तथापि माझे मत असे आहे की, त्यांना प्रतिनिधी होता येणार नाही.

राष्ट्रीय ध्वज

तोच मित्र म्हणतो की, साऱ्या हिंदी लोकांचा चरख्यावर विश्वास नाही. आणि त्यातून काही प्राप्त होईल असे वाटत नाही. तर मग आपल्या राष्ट्रीय निशाणावर दुसरे

काही चिन्ह असावे का? ते ॐ हे अक्षर सुचवितात. खरे सांगावयाचे म्हणजे चिन्ह कोणतेही असले तरी त्या चिन्हाला कोणी ना कोणी खास विरोध करील. चरखा ही अशी एकच गोष्ट आहे की, जी शक्तीची द्योतक असून कोट्यवधी हिंदू व मुसलमान मान्य करतील. ॐमध्ये अर्धचंद्र असला तरी सर्व मुसलमान त्याचा स्वीकार करणार नाहीत हे खास. राष्ट्रीय निशाणावर कोणतेही धार्मिक चिन्ह नसावे याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

खिलाफत "नोट"

खिलाफतीकरिता ज्या रुपयाच्या नोटा काढल्या आहेत, त्या नोटांचा चलनाकरिता उपयोग का करू नये याविषयी मी अभिप्राय व्यक्त न केल्यामुळे मला दुसरे एक मित्र दोष देतात. मी त्यासंबंधी काही बोललो नाही. याचे कारण खिलाफत कमिटीनेच परिणामकारक उपाय योजले आहेत. या बाबतीत आलेली ही पहिलीच तक्रार आहे. आतापर्यंत एक रुपयाच्या हजारो पावत्या विकल्या गेल्या आहेत. पण त्या चलनी नोटा म्हणून अद्याप वापरणारे फारच थोडे लोक असतील. सुरुवातीला ही चुकीची कल्पना बाहेर पसरली. त्यामुळे खुद्द कमिटीचाच तोटा झाला, आणि म्हणून तिने स्वतःच त्या थांबविण्याचे सक्त उपाय योजले.

"रामराज्या"चा चुकीचा अर्थ

तेच मित्र रामराज्याचा शब्दशः अर्थ करीत असताना असा प्रश्न विचारतात की, जोपर्यंत आपल्यात दशरथ आणि रामासारखे पुरुष नाहीत तोपर्यंत रामराज्य स्थापणे कधी तरी शक्य होईल का? रामराज्याचा आमचा अर्थ स्वराज्य, किंवा धर्मराज्य, किंवा लोकराज्य असा आहे. असे राज्य त्याच वेळी स्थापता येईल की जेव्हा लोकांना धर्माबद्दल आस्था वाटेल आणि ते शूर होण्यास शिकतील. सर्व लोक अशा वृत्तीचे बनतील याचा प्रयत्न काँग्रेसने व सर्व असहकारितावाद्यांनी केला पाहिजे. जर लोकांची मुक्तता राजानेच करावयाची असेल तर तो राजा कितीही सद्गुणी असला तरी ते त्याचे गुलाम बनतील. तथापि आपण जे मिळविण्याची धडपड करीत आहो ती म्हणजे राज्यपद्धतीत बदल आणि सरकारच्या धोरणात व रीतीत बदल. एकदा तसे झाले म्हणजे आपले नोकर इंग्लिश आहेत का हिंदी आहेत याची फिकीर करण्याचे कारण नाही. आपण ब्रिटिशांनासुद्धा बदलण्याचा प्रयत्न करीत नाही. आपण स्वतःलाच सुधारण्याचा प्रयत्न करीत आहो.

दक्षिण आफ्रिका

तेच गृहस्थ दक्षिण आफ्रिकेचे उदाहरण सांगतात आणि विचारतात, दक्षिण आफ्रिकेत जशी हिंदी लोकांची स्थिती आहे तशी हिंदुस्थानात आपली होणार नाही

का ? आम्ही तेथे लढलो व जिंकलो पण आज आमची अवस्था पूर्ववत आहे. पण परिस्थितीचा हा गैरसमज आहे. जे कायदे दुरुस्त व्हावेत म्हणून आम्ही लढलो ते खासच दुरुस्त झाले. दक्षिण आफ्रिकेतील लढा हा राज्यपद्धत बदलण्याकरिता नव्हता. विशिष्ट कायद्याविरुद्धच तो लढा होता. रौलेट ॲक्टाच्या विरुद्ध केलेला सत्याग्रह हा जर तो कायदा रद्द केला गेला असता आणि दुसरी गाऱ्हाणी तशीच राहिली असती तरी पूर्णपणे यशस्वी झाला असे म्हटले गेले असते. खरे सांगावयाचे म्हणजे त्या कायद्याचा उपयोग कधीही केला गेला नाही. पण ज्या अर्थी तो कायदेपुस्तकातून काढून टाकला गेला नाही आणि दुसऱ्याच मुद्यांचा लढा आपल्यावर लादला गेला, त्या अर्थी आपण पंजाब आणि खिलाफतीच्या प्रश्नावर न्याय मिळविला आणि सरकारच्या धोरणात आणि पद्धतीत बदल घडवून आणला तर निदान इतके तरी आपण मिळविले असे होईल. त्यानंतर नवे आणि अकल्पित अडथळे उद्भवतील हे अगदी शक्य आहे. पण त्याची फिकीर कशाला ? शूरांना लढण्याचे नेहमीच प्रसंग येतात. जेव्हा प्रश्न उभे राहतील तेव्हा सत्याग्रहीच्या शस्त्रागारात अनेक शस्त्रे हाताशी असतील. ती शस्त्रे म्हणजे सत्याग्रहाचे विविध प्रकार. जो सत्याग्रही असेल त्याला कोणत्या वेळी कोणते शस्त्र वापरावे हे सहज शोधून काढता येईल.

पांढरी टोपी

पांढऱ्या टोपीला गांधी टोपी म्हणून संयुक्त प्रांताच्या एका कलेक्टरने सरकारी नोकरांना ती वापरण्यस मनाई केली आहे. सिमल्याला जे अनेक लोक भेटावयाला आले त्यांना मी सांगितले की, जरी ते सरकारी नोकरीत असले तरी त्यांना टिळक स्वराज्य फंडाला पैसे देता येतील, त्यांना खादी वापरता येईल, व परदेशी टोप्यांऐवजी खादीच्या टोप्या घालता येतील. पण ते म्हणाले जर आम्ही खादीचे कपडे वापरले व खादी टोप्या घातल्या तर आम्हांला नोकरीतून काढून टाकतील. हे दुबळे शब्द ऐकताना मला दुःख झाले. जर खादी टोपी वापरणे हा गुन्हा असेल तर योग्य मार्ग म्हणजे तो गुन्हा करणे आणि नोकरीतून घालविले जाणे हा होय. शिवाय जर सरकारी नोकरांची खादी टोप्या वापरणारांची संख्या फार मोठी असेल तर कोणीही त्या सर्वांना नोकरीतून काढू शकणार नाही. आणि जरी नोकरी गेली तरी त्यांनी त्याची पर्वा करू नये. आपल्याला जे वाटते ते वापरण्याच्या स्वातंत्र्याचा हक्क बजावण्याइतकी शक्ती लोकांनी अद्याप कमावली नाही का ? सर्व लोकांनी– मग ते सरकारी नोकर असोत अगर दुसरे कोणी असोत, त्यांनी खादी पोषाखाची प्रतिष्ठाही समजून घेतली पाहिजे, आणि निदान खादी टोपी वापरली पाहिजे अशी मला आशा आहे.

कायमचे स्वरूप

असहकारितेला दोन स्वरूपे आहेत. एक तात्पुरते व दुसरे कायमचे. कायम स्वरूपाशी सर्वांचा संबंध आहे. स्वराज्य मिळविल्यानंतर आपण खादी टाकणार नाही,

आणि परदेशी कापड वापरण्यास पुन्हा सुरुवात करणार नाही, आपण खात्रीने दारू पिणे सुरू करणार नाही, आणि शिक्षणपद्धतीत जे बदल करीत आहोत ते सोडून देणार नाही. तथापि आपण कोर्टात जाणे किंवा शाळेत जाणे म्हणजे अधर्म आहे असे मानणार नाही, आणि सरकारी मानमरातब स्वीकारण्यात आपली मानहानी होते असेही वाटून घेणार नाही.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', २२-५-१९२१

६१. एन्. सी. केळकर[1] यांना पत्र

येवले
मे २३, १९२१

प्रिय मित्र,

बेझवाडा कार्यक्रम पुरा करण्याबाबत मी अत्यंत अस्वस्थ होत आहे. तुमच्या प्रांताने तुमचे पत्र अगर तार येण्याच्या तारखेपर्यंत टिळक स्मारक फंडाला किती पैसे जमविले आणि हिश्यापैकी ३० जूनच्या पूर्वी किती पैसे निश्चितपणे जमवाल याचे आकडे पत्राने अगर तारेने रविवार ता. २९ रोजी लॅबरनम रोड येथे मला पोहोचतील अशा रीतीने पाठवाल का ? मला आशा आहे की, तुम्ही तुमचा हिस्सा ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडे पाठविला असेलच.

मी मुंबईला २९ रोजी पोहोचेन. ३० रोजी संध्याकाळी मुंबईहून भडोचला जाईन. चार दिवस तेथे घालवीन, चार दिवस अहमदाबादमध्ये किंवा आजूबाजूला घालवीन, आणि उरलेले जूनचे दिवस मुंबईत शक्य तितके पैसे जमविण्याकरिता काढीन. माझ्या कार्यक्रमाबद्दल तुमच्या काही सूचना असतील तर त्याही तारेने कळवा.

तुमचा स्नेहांकित
एम्. के. गांधी

फोटोस्टॅटवरून सी. डब्ल्यू. ३११३.

१ नरसिंह चिंतामण केळकर, केसरी व मराठ्याचे संपादक, टिळकांचे निकट सहकारी, एकदा राष्ट्रीय सभेचे चिटणीस, १९२० साली कॉंग्रेस घटनेची फेर तपासणी करण्यास गांधीजींना मदत केली.

६२. बार्शी[1] सभेतील भाषण

मे २४,१९२१

आपल्या मित्राने बार्शी जिल्ह्या[2]त आमच्या कामाचा भाग सहज पुरा करू असे मोठ्या हर्षाने सांगितले. श्रीयुत सुलाखे यांच्या पैसे जमविण्याच्या पद्धतीबद्दल मी त्यांचे अभिनंदन करू शकत नाही. त्यांच्या पद्धतीचे अनुकरण जर प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका, आणि प्रत्येक फिरका करू लागले तर देशातील प्रत्येक माणूस फक्त दोन पैसे देऊन आपल्या जबाबदारीतून सुटेल. पण देशातील ३० कोटी लोकांपैकी ३ कोटी लोकांना एकही पोटभर जेवण मिळत नाही. या ३ कोटी लोकांकडून दोन दोन पैसे कोण जमा करणार? आणि जे पंगू व अपंग आहेत त्यांचे काय? जर मुंबईचे लोक आम्ही आमचा हिस्सा दिला व अधिक देणार नाही असे सांगू लागले तर आपल्या कामात आपल्याला कधीच यश येणार नाही. असा हिशेब करण्याचे आपण थांबविले पाहिजे. देशात एकूण एक कोटी रक्कम जमा करण्याकरिता प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपण स्वतः किती पैसे दिलेच पाहिजेत हे स्वतःला विचारावे. तुमच्या जिल्ह्यातील लोकांची शक्ती किती आहे असा माझा प्रश्न आहे. ज्या टिळक महाराजांच्याबद्दल आपण पूज्यभाव दाखवितो त्यांच्या जीवनापासून तरी आपण काही शिकू या. प्रत्येक हिंदी माणूस देशाकरिता कमीत कमी जे करू शकेल, तितके करून मी संतुष्ट व्हावे असे त्यांना कधी वाटले का? उलट त्यांनी सर्वस्व दिले. असे करणारे किती लोक उरले आहेत हे मी तुम्हांला विचारतो. सर्वस्व देण्याचे राहो, तुम्ही आपल्या शक्तीप्रमाणे तरी दिले आहे काय?

परमेश्वर कधीही कोणाला स्वतःच्या शक्तीपेक्षा जास्त देण्यास सांगत नाही. जो आपल्या शक्तीपेक्षा कमी देतो तो देशाचा आणि गावाचा विश्वासघात करतो. तुम्ही तुमचा विश्वासघात करू नका. तुम्ही स्वतःला फसवावे असे मला वाटत नाही आपल्याला एका बलाढ्य साम्राज्याशी लढावयाचे आहे. त्या साम्राज्याने आपल्याला फसविले, आपल्याशी खोटे वर्तन केले, आणि आपल्याला पोटावर सरपटण्यास लावले. आपण त्या साम्राज्याचा अंत फसवणुकीने आणि सैतानशाहीने करू शकत नाही. फसवणुकीला औदार्याने आणि सैतानशाहीला ईश्वरी प्रेमाने आपण यशस्वीरीत्या तोंड देऊ शकू. स्वतः भ्रमात राहू नका. जर तुम्हांला खरोखर टिळक महाराजांची स्मृती कायम टिकवावयाची

१. महादेव देसाईंनी नवजीवनमध्ये गांधींच्या दौऱ्याची जी हकिकत प्रसिद्ध केली तीवरून.
२. हा सोलापूर जिल्ह्यातील तालुका आहे. जिल्हा नाही.

असेल तर आज जी हिशेबाची पद्धत मी सांगितली तिचा स्वीकार करा. आणि टिळक महाराजांची पहिली पुण्यतिथी येण्यापूर्वी तुमचा जो जन्मसिद्ध हक्क आहे तो तुम्ही प्राप्त करून घ्या.

जेव्हा येथे असे सांगण्यात आले की, २५ चरखे चालू आहेत, आणि त्यातून निघालेली खादी मुंबई पुण्याला पाठविण्यात येते, तेव्हा ते ऐकून मला फार दुःख झाले. खादी येथून पाठविली जाते याचा अर्थ तुम्हांला तलम कापड पाहिजे व तुम्हांला खादी वापरावयाची नाही असा होतो. म्हणूनच तुम्ही इतर ठिकाणी खादी पाठविता. स्वदेशीचा तुमच्या दृष्टीने अर्थ असा की, तुम्ही तुमच्या गरजा पाहिल्या पाहिजेत. मुंबईचा विचार करू नका. माझी देशभक्ती मला असे सांगते की, प्रथम मी माझे घर स्वतंत्र केले पाहिजे. नंतर माझे गाव, आणि नंतर माझा प्रांत. तुमच्या ह्या २५ चरख्यांवर तुम्ही या बलाढ्य साम्राज्याच्या विरुद्धच्या लढ्यात आपण काही कामगिरी केली असे म्हणू शकणार नाही. जर आपला काँग्रेसवर खरोखर विश्वास असेल तर आपण स्वदेशीची तत्त्वे पूर्णपणे समजून घेतली पाहिजेत. वकिलांनी वकिली सोडली नाही यामुळे मला दुःख झाले. तथापि वकील निर्भय आणि धार्मिक वृत्तीचे बनले तरी ते साऱ्या देशाला तसे बनवू शकणार नाहीत. काही प्रमुख वकिलांनी खरोखरच मोठे त्याग केले आहेत आणि मोठे औदार्य दाखविले आहे. ज्या दुसऱ्या वकिलांत श्रद्धेचा अभाव आहे आणि ज्यांना मागाहून आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करता येईल किंवा नाही या भीतीने मागे खेचले आहे तेही हळूहळू वकिली सोडतील. पण स्वदेशाबद्दलची परिस्थिती अशी आहे की, जोपर्यंत सारा देश तिचा स्वीकार करीत नाही तोपर्यंत परदेशी कापडाची आयात थांबणार नाही. मी स्वतःची फसवणूक करू शकत नाही. दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीपेक्षा मी फार कमी मोठ्या हिंदी लोकांना भेटतो. पण माझा आवाज साऱ्या ३० कोटी लोकांपर्यंत अद्याप पोहोचला नाही. गिरणीचे कापड गरिबांच्याकरिता आहे व त्यांच्यापर्यंत माझा संदेश जाणार नाही. जर त्यांच्याकरिताच सर्वस्वी ते कापड राखून ठेवले तर गिरणीमालक साजेसे वर्तन करतील का? अशा लोकांना गिरणीचे कापड वापरण्याशिवाय गत्यंतरच नाही. अर्थातच स्थानिक उत्पादन त्यांनी केले तर गोष्ट वेगळी. याकरिता पैसा नको, स्वार्थत्याग नको, किंवा बुद्धिमत्ता नको. त्याकरिता तळमळ पाहिजे.

मौलाना महंमद अली म्हणाले की, जेव्हा आपण चरखा सोडला त्याच वेळी आपल्या गुलामगिरीचा पाया घातला. जर तुम्हांला गुलामगिरी फेकून द्यावयाची असेल तर पुन्हा चरखा घ्या. चरख्याशिवाय देशाचा छळ आणि देशाचे भयंकर दारिद्र्य संपविणे अशक्य आहे. म्हणून मी तुम्हांला सांगतो की, स्वतःची पाठ थोपटून घेऊ नका, आणि २५ चरख्यांवर आम्ही विजय मिळविला असे म्हणून नका. येथे कोणीही खादी वापरणारा दिसत नाही. फक्त खादी टोप्या वापरून आपण ५० कोटींची आयात थांबवू शकणार नाही. खादीचा बोजा वाहण्याची तुम्ही कबुली दिली पाहिजे.

जर तुम्हांला तलम कापड पाहिजे असेल तर तुम्ही तुमच्या बायकांना, मुलांना व मुलींना चांगले सूत काढण्यास शिकवा. सुमारे ३० वर्षांपूर्वी आपल्या वडीलधारी माणसांना तलम कापड वापरण्याची लाज वाटे. माझ्या आईची पवित्र स्मृती माझ्या मनात अद्याप ताजी आहे. आपल्या सुनांकरिता तलम कापडाचे कपडे राखून ठेवण्याचा तिने निश्चय केला होता. आणि असे कपडे स्वतः वापरताना तिला बुजल्यासारखे होई. जर तुम्ही हिंदुस्थानचा पारंपारिक साधेपणा स्वीकारला नाहीत तर तुम्ही चांगल्या मलमलीचे पुनरुज्जीवन करू शकणार नाही. जर तुम्ही ४,२०० काँग्रेस सभासद नोंदवून समाधान मानणार असलात तर बिहारच्या उपाशी मरणाऱ्या जमावाला सभासद करण्यास कोण पुढे येईल ? जर १,२०,००० लोकसंख्येपैकी पन्नास हजार सभासद म्हणून नोंदविले तर या कार्यात यश येण्याची काही आशा आहे. गणित करण्याची चुकीची पद्धत सोडून द्या आणि बरोबर पद्धत घेत जा.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ९-६-१९२१

६३. टिप्पणे

मौलाना महंमदअली

मौ. महंमदअलींच्या मद्रासमधील भाषणावर मी काही न म्हटल्याबद्दल आणि लाला लजपतराय यांच्या मुंबईच्या भाषणाबद्दल टीका न केल्याबद्दल इंडियन सोशल रिफॉर्मरने मला खडसावले आहे. त्यात काढलेल्या निष्कर्षांना आणि वक्रोक्तींना मी उत्तर देता कामा नये. टीकाकारांना यंग इंडियाचे संपादन मी किती अडचणीत करतो हे ठाऊक नाही. मी वृत्तपत्रे क्वचितच वाचतो. माझ्या सततच्या प्रवासात मला ती मिळतही नाहीत. पण ही टीका वाचल्यावर मौलानांच्या भाषणाची प्रत सिमल्याला मी मुद्दाम आणवली. मी ते आत्ताच वाचले आहे. ज्यावर टीका केली आहे तो भाग मी दोनदा वाचला, आणि त्यात मला आक्षेपार्ह काही वाटले नाही. ते भाषण अलाहाबादच्या मुलाखतीशी विसंगत नाही. मद्रासच्या भाषणात त्यांनी फक्त मुसलमानांची बाजू मांडली आहे. अलाहाबादच्या मुलाखतीत त्यांनी आदर्श मुसलमानांच्याबद्दल मी लावलेली कसोटी आणि नियंत्रण मान्य केले आहे. जर मुसलमान शस्त्रे घेऊ शकले तर ते इस्लामच्या रक्षणाकरताच घेतील यात शंका नाही. अफगाण लोक जर ब्रिटिशांच्या

पराभवाकरिता चालून आले तर ते हिंदुस्थान व्यापण्याची इच्छा बाळगणार नाहीत ही गोष्ट अशक्य आहे, अशा आपल्या समजुतीतून ही अडचण निर्माण झाली आहे. जरी मुसलमानांत शक्ती असली तरी, ते हिंदुस्थानला एकनिष्ठ असतील तर अफगाणांना न मिळण्यास हे एक कारण आणि चांगले कारण होईल. पण मुसलमानांचा सिद्धांतिक धार्मिक हक्क आपली यथायोग्य परिस्थिती निवेदन करण्याचा आहे याबद्दल आपण तंटा करू नये. आपण त्याबद्दल त्यांना मान दिला पाहिजे. शौर्य आणि प्रामाणिकपणा हे अली बंधूंचे दोन मोठे गुण आहेत. मद्रासच्या भाषणात हेच दोन गुण मला वाचावयास मिळतात.

लाला लजपतराय

माझ्या पद्धतीतील रहस्याकडे मी इंडियन सोशल रिफॉर्मरला घेऊन जातो. माझ्या साहाय्यकाने लालाजींच्या भाषणातील विरोधी टीकेकडे माझे लक्ष वेधले आणि विचारले, यावर तुम्हांला काही म्हणावयाचे आहे काय ? माझ्यासमोर त्यांच्या भाषणाचा मजकूर नव्हता व मी त्यावरील टीकाही पाहिली नव्हती. म्हणून मी लालाजींना लिहिले व त्यांना म्हटले की, तुम्ही ह्या बाबतीत मला अधिक स्पष्ट सांगा. आणि त्यांना असेही सुचविले की, एखादा शब्द गडबडीने उच्चारला असला तर त्यांनी माफी मागावी. माझ्या दाट परिचयामुळे ते मला उदार, क्षमाशील आणि निष्कपटी आहेत असे पाहण्याचे भाग्य लाभले आहे. त्यांनी पत्राने मला कळविले की, आपल्या मुंबईच्या भाषणात आपण खास विचारपूर्वक उद्गार काढले होते व त्यात कोणावरही हल्ला केला नव्हता. पक्ष म्हणून आपण नेमस्तांच्या कृतीचा परामर्ष घेतला होता. माझ्या अभिप्रायाकरिता त्यांनी कात्रणही पाठविले आहे. हे मी सिंधमध्ये असताना घडले. मी ते वाचू शकलो नाही आणि सारेच विसरून गेलो. पण रिफॉर्मरच्या धमकावणीमुळे मला त्याची आठवण झाली. मी ते भाषण आता वाचले आहे आणि मला सांगायला आनंद वाटतो की, त्या भाषणात उपमर्दकारक किंवा अनादराचे काही नाही. लालाजींच्या लढाऊ धाटणीचे ते भाषण आहे. पक्षाभिनिवेशाचे ते भाषण आहे. पश्चिमेकडे फार काळ राहिल्यामुळे त्यांनी टीकेची पाश्चात्य पद्धत उचलली आहे. पण तो पाश्चात्य धर्तीचा उत्कृष्ट नमुना आहे. त्यात गलिच्छ काही नाही. नेमस्त मंत्र्यांच्या वर्तनावरून त्यांचे आरोप असमर्थनीय ठरत नाहीत. त्यांचा सर्वांत वाईट आरोप असा आहे की, ते नोकरशाहीत विलीन झाले आहेत. तो आरोप गंभीर आहे. पण त्यांनी दिलेली उदाहरणे तो आरोप सिद्ध करतात. नेमस्तांना वाटल्यास ते असा उलट जबाब देऊ शकतील की, बाहेरच्या लोकांना मंत्र्यांच्या अडचणी समजू शकणार नाहीत. जे मोठे पुढारी सरकारचे दोस्त बनले आहेत त्यातच त्यांची चूक सिद्ध होते. आपल्या नशिबी हे येणार आहे हे त्यांना अगोदर कळावयास पाहिजे होते. किंवा त्यांना आता अनुभवाने असे कळावयास पाहिजे आहे की, जोपर्यंत आपला सरकारी धोरणावर परिणामकारक ताबा नाही तोपर्यंत मंत्री होण्याचा

उपयोग नाही. सध्या जी दडपशाही चालू आहे ती पूर्वीइतकीच जवळजवळ वाईट आहे. आता खटल्याचा फार्स होतो यामुळे फारसे अंतर पडत नाही. पीनल कोडमधील बहुतेक राजकीय कलमे अशी आहेत की, प्रत्येक असहकारितेवरील व्याख्यान त्याखाली येऊ शकेल. मला वाटते, जर माझ्यावर आरोप ठेवला असता तर मला राजद्रोहाचा गुन्हा मी केला आहे असे कबूल करावे लागले असते. असहकारितावाद्यांचे कर्तव्य विद्यमान परिस्थितीबद्दल अप्रीती शिकविणे हे आहे. राष्ट्राच्या छिन्नविछिन्न केलेल्या भावना, असहकारितावादी शिस्तशीर रीतीने व्यक्त करीत असतात. लाला लजपतराय यांच्यावर जो जोरदार आरोप लादण्यात आला आहे त्याला विचारपूर्वक उत्तर दिलेले मला हवे आहे. माझ्या नम्र मताप्रमाणे लाला लजपतराय यांच्या भाषणात त्यांचा तोल सुटल्याचे दिसत नाही, आणि त्यांनी आपल्या भाषणाच्या शेवटच्या परिच्छेदात देशातल्या तरुणांना जो उपदेश केला आहे त्याच्याशी ते भाषण सुसंबद्ध आहे.

'देवदूत'

माझ्याकडे एक कात्रण आले आहे. त्यात मी देवदूत आहे असे म्हटले आहे. आणि मला विचारले आहे की, देवाचा काही साक्षात्कार घडल्याचे मी सांगत आहे काय ? मला चिकटविण्यात आलेल्या चमत्काराबद्दल मी पूर्वीच लिहिले आहे. माझ्यावर नुकताच जो आरोप करण्यात आला आहे तो पूर्णपणे मी अमान्य करतो. मी एखाद्या सज्जन हिंदूप्रमाणे प्रार्थना करतो. जर आपण माणसाला भिण्याचे टाकून देऊ आणि ईश्वरी सत्याचा शोध करू तर आपण सर्व जण देवदूत होऊ. मी फक्त ईश्वरी सत्याचा शोध करीत आहे, आणि माझी माणसाची सर्व भीती नष्ट झाली आहे. म्हणून मला वाटते की, असहकारितेच्या चळवळीत ईश्वर आपल्याबरोबर आहे. ईश्वरी इच्छेचा खास साक्षात्कार मला झालेला नाही. माझी अशी दृढ श्रद्धा आहे की, परमेश्वर दररोज प्रत्येक मानवी प्राण्यात स्वतःचा आविष्कार करीत असतो. पण आपण आपले कान त्या शांत व सूक्ष्म आवाजाला बंद करीत असतो. आपण आपले डोळे आपल्यासमोरील अग्नि-स्तंभाला मिटून घेत असतो. त्याचे सर्वगामी अस्तित्व माझ्या प्रत्ययास येते, आणि तोच प्रत्यय या पत्रलेखकाला, येऊ शकेल.

सिंधचा टीकाकार

सिंधकडून आलेली टीका मला नेहमीच वाचावयाला आवडते. ती टीका नेहमीच भेदक आणि विनयशील असते. सिंधला पाश्चात्य शिक्षणाचे अजीर्ण झाले आहे. आणि म्हणून सिंधच्या तरुणांबद्दल मला नेहमी सहानुभूती वाटते. पाश्चात्य तर्कशास्त्राच्या चक्रव्यूहात ते गुरफटले आहेत. म्हणून श्री. जेठमलच्या प्रकट पत्राला मी धीमेपणाने उत्तर देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी त्यांना सत्याग्रहातील एक अगदी सुरुवातीचे साथी म्हणून मानतो व त्यांना दीनदुबळ्यांच्या गाऱ्हाण्यांचे पुढारी म्हणून जाणतो. माझा

स्वयंनिर्णयावर विश्वास आहे. मुसलमान हे तुर्कांच्याकरिता पॅलेस्टाइनवर हक्क सांगत आहेत, तो अरबांच्या विरुद्ध सांगितलेला हक्क नाही, हे जेठमल यांना माहीत नाही. त्यांना जझीरत अल अरब यावर मुसलमानांचा ताबा जो सांगावयाचा आहे त्यातला पॅलेस्टाइन हा एक भाग आहे. बाहेरच्या हस्तक्षेपाशिवाय जर अरबांना तो दिला तर त्यांची हरकत नाही. श्री. जेठमल यांना हे ठाऊक असावयास पाहिजे की, पॅलेस्टाईन-मध्ये सध्या मुसलमानांची प्रचंड लोकसंख्या आहे. त्यांना हेही ठाऊक असावयास पाहिजे की, अरबांचा तीव्र विरोध असताना पॅलेस्टाइन आणि मेसोपोटामियावर ब्रिटिशांची अखत्यारी आज लादली जात आहे.

निरनिराळ्या धर्मांच्या वैशिष्टयपूर्ण स्वरूपावर श्री. जेठमल यांचा विश्वास नसला तरी माझा आहे. जेथे विचारशक्ती आणि न्याय यांचा संघर्ष नसेल अशा मुसलमानांच्या धर्मग्रंथावरील निष्ठेवर, ताण टाकण्यास मी पक्षपाती होऊ शकणार नाही.

ईश्वरसत्ताक भिक्षुकशाही आणि प्रसंगांना साजेसे तिचे लावलेले अर्थ, यासंबंधी श्री. जेठमल यांना जशी भीती वाटते तशीच मलाही वाटते. मुसलमानांचा हक्क हा फतव्यांवर[१] आधारलेला नसून तो कुराणाच्या आज्ञेवर आधारलेला आहे हे लहान मुलालाही कळू शकेल. धर्मग्रंथाच्या अधिकाराशिवायदेखील मुसलमानांच्या मागण्या न्यायावर आधारलेल्या आहेत. युद्धापूर्वी जझीरत अल अरब हे मुसलमानांच्या ताब्यात होते. जगातील सर्वसामान्य मुसलमानांच्या विरुद्ध आणि खास हिंदी मुसलमानांच्या विरुद्ध ख्रिश्चन किंवा ज्यू यांना त्यावर कोणताही हक्क प्राप्त झाला नाही. ब्रिटिश अखत्यारी हे हिंदी मुसलमानांच्या बाबतीत विश्वासघाताचे कृत्य आहे, आणि जगातील मुसलमानांची ती लुबाडणूक आहे.

मी अत्याचाराच्या बाबतीत श्रीकृष्णांच्यापेक्षा निराळ्या मताचा आहे असे म्हणताना मी धैर्य दाखविले ही जी प्रशंसा श्री. जेठमल यांनी केली आहे तिचा मला स्वीकार करता येत नाही. कृष्णांनी गीतेमध्ये अत्याचार कधीच शिकविला नाही असे म्हणण्याचे धैर्य मी दाखविले. मी गीतेचा असा अर्थ करितो की, गीतेने एका ऐतिहासिक घडामोडीवर धार्मिक शिक्षण नेऊन ठेवले. आणि गीतेमध्ये पृथ्वीवरील युद्धाचा परामर्ष घेतला नसून तीमध्ये मानवी कुरुक्षेत्रात जे आध्यात्मिक युद्ध सतत चालू आहे त्याचा विचार केला आहे. मला निर्द्वंद्व शिकवणुकीचा दुसऱ्या कोणत्याही अनुमानावर बोध होत नाही. जो माणूस परस्पर विरोधी द्वंद्वांच्या कृतीतून मुक्त असतो, तो बायबलमधील परिपूर्ण माणसाप्रमाणे पृथ्वीवरील कोणाही सजीव वस्तूला इजा करण्यास असमर्थ असतो. तो स्वतःची हत्या इतक्या खरेपणाने करतो की त्याला पुनर्जन्मच नाही.

१. मुस्लिम धर्मगुरूंनी काढलेले हुकूम.

पण माझ्या या वैयक्तिक श्रद्धेच्या भागाशी असहकारितावाद्यांचा काही संबंध नाही. हिंदुस्थानला त्रिविध तापातून मुक्त करण्याकरिता त्याने एक सच्चे धोरण म्हणून अनत्याचारावर विश्वास ठेवलाच पाहिजे.

माझा संपूर्ण अहिंसेवर म्हणजेच निरापराधित्वावर दृढ विश्वास असला तरी मी खेडा जिल्ह्यातील लष्करभरतीशी[1] मिळते जुळते घेऊ शकलो. माझी अहिंसा मला असे सांगते की, शस्त्रबळाने मी जगाला माझ्याबरोबर नेऊ शकणार नाही. माझी मुले दुसऱ्यांना इजा करतील या भीतीने मी त्यांचा हात कापणार नाही. दुखापत करण्यास समर्थ असलेला मनुष्य जेव्हा माघार घेतो तेव्हा तो निरपराधी असतो. जोपर्यंत हिंदी शिपायांचा विश्वास अत्याचारावर आहे तोपर्यंत त्यांच्याजवळ शस्त्रे असलीच पाहिजेत. माझ्या लष्करभरतीच्या मोहिमेत ज्यांचा अत्याचारावर विश्वास होता, त्यांना लढाईत सामील होण्यास सांगितले. त्यांचे सरकारविरुद्ध गाऱ्हाणे आहे. याकरिता त्यांनी त्यांचा कल दिसत होता त्याप्रमाणे बाजूला राहू नये असे मी त्यांना म्हणालो. मी सरकारबरोबर सौदा करण्याच्या विरुद्ध होतो. आणि नेहमीच मी तशा सौद्याविरुद्ध असतो.[2] हिंदुस्थानात किंवा जगात सर्व जण अहिंसेचे अनुयायी होतील, अशा वेळेची मी अपेक्षा करीत नाही. सत्ययुगातसुद्धा पोलिस लागतील. पण आपण अशा वेळेचा खास विचार करतो की, जेव्हा हिंदुस्थानात आपण पाशवी शक्तीवर कमी आणि आत्मशक्तीवर अधिक अवलंबून राहू त्या वेळी माणसातील ब्रह्म हे सर्वशक्तिमान असेल.

आता श्री. जेठमल यांना माझी अलीबंधूंची असलेली मैत्री पटणे कठीण जाणार नाही. ते शब्दाला जाणणारे आहेत असा माझा विश्वास आहे. आणि ते मला ज्यांना ज्यांना भेटण्याची सुसंधी प्राप्त झाली अशा लोकांइतकेच माननीय आहेत. ते असहकारितेच्या चळवळीत जोपर्यंत आहेत तोपर्यंत ते अनत्याचार पाळतात एवढे समजले म्हणजे मला पुरे आहे. श्री. जेठमल यांना ब्रिटिश अंमलापेक्षा अफगाण अंमल जसा नको आहे तसा त्यांनाही नको आहे. हिंदुस्थान हा कधीही निदान या पिढीत अत्याचाराने स्वतंत्र होणार नाही, हे त्यांना समजण्यास काळच समर्थ करील. या पत्राच्या पानात वेळोवेळ जे साधे कार्यक्रम आखून दिले आहेत, ते जर हिंदुस्थानने अमलात आणले तर हिंदुस्थान आणि खिलाफत याच वर्षात स्वतंत्र होईल.

१. एप्रिल २९-१९१८ रोजी युद्धपरिषदेत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे गांधीजी गुजरातमधील खेडा जिल्ह्यात ब्रिटिशांना युद्धात मदत करण्याकरिता लष्करभरती करावी म्हणून हिंडले; पाहा, खंड १४.

२. पाहा, खंड १४, प्रकरण २५७.

संन्यास

एका वकिली थांबविलेल्या वकिलाने असे विचारले आहे की, प्रत्येक असहकारितावाद्याने संन्यासी व्हावे आणि जगाचा त्याग करावा का ? मी संन्यासी जीवन घालवितो आहे असे दिसल्यावरून हा प्रश्न विचारला गेला असावा. पण असहकारितेच्या कार्यक्रमात, बोअर युद्धात ज्या हजारो स्त्रियांनी व मुलांनी त्याग केला, आणि गेल्या युद्धात ज्या हजारो इंग्रजांनी, फ्रेंचांनी आणि जर्मनांनी त्याग केला त्या मानाने हा त्याग अत्यंत अल्प आहे. आपला कार्यक्रम अनत्याचारी आहे, आपले मागणे पूर्णपणे न्याय्य आहे, आणि आपण इतके पुष्कळ आहोत त्यामुळेच अल्पशा त्यागाने मोठे यश मिळणे शक्य आहे.

परावलंबी माणसाची दुर्दशा

एका मित्राने आणखी असे विचारले आहे की, जर कोणावर खोटी फिर्याद केली तर त्याने काय करावे ? सरकारने ज्यांच्यावर खोटे खटले भरले आहेत ते अर्थातच तुरुंगात गेले आहेत. ज्यांच्यावर खोट्या फिर्यादी होतील त्यांनी जर वादी खाजगी लवाद मान्य करीत नसेल तर त्याने जबानी द्यावी आणि वकील न देता साक्षीदार हजर करावे. त्याच्या बाजूने निकाल होण्याची शक्यता आहे. जास्तीत जास्त बदमाष माणसाला पैसे देण्याचा धोका पत्करावा लागेल. अत्यंत चांगल्या वकिलांची मदत असतानासुद्धा चुकीचे निकाल यापूर्वी दिले गेले आहेत.

राष्ट्रीय सामर्थ्याविषयी शंका

तिसरा प्रश्न असा, "राष्ट्रीय सरकार असल्याशिवाय असहकारितेच्या कार्यक्रमातील विधायक भागाला यश प्राप्त होईल असे तुम्हांला वाटते का ?" या प्रश्नात असहाय्यता दृष्टीस पडते. ह्या असहाय्यतेच्या भावनेमुळेच आपल्याला आपले ध्येय गाठण्यास विलंब होत आहे. जेव्हा आपणास स्वावलंबनाची खात्री पटेल तेव्हाच आपण स्वराज्य मिळवू. राष्ट्रीय सरकार हेसुद्धा राष्ट्रानेच निर्माण करावयाचे आहे. सरकार ते निर्माण करू शकणार नाही. सरकारच्या मदतीशिवाय आपण दारू पिण्याचे का थांबवू नये आणि सरकारच्या मदतीशिवाय परदेशी कापडावर बहिष्कार घालण्यास आपण समर्थ का होऊ नये ? असहकारिता प्रत्येक महत्त्वाच्या बाबतीत आपल्याला असे सिद्ध करण्यास समर्थ करते की, आपण सरकारशिवाय या गोष्टी करू शकू. सरकार ही लोकांनी स्थापलेली एक साधनसंस्था आहे. त्या संस्थेचा जो प्रमुख असेल तिला जेव्हा तो दलाल अविश्वासू ठरतो तेव्हा त्याला असहकारिता करण्याचा हक्क आहे. उलट जेव्हा प्रमुखाला आपण असाहाय्य आहो असे वाटते तेव्हा तो दलालाचा गुलाम बनतो. सध्याची आपली स्थिती तशीच आहे. आणि काही झाले तरी आपण त्या स्थितीतून मुक्त झाले पाहिजे.

कालावधीवर टाकण्याचा विचार

त्या मित्राचा शेवटचा प्रश्न असा, " जर काँग्रेसच्या हाकेला पुरेसे उत्तर मिळाले नाही तर स्वराज्य मिळणे हे त्या प्रमाणात लांबणीवर पडेल का ? " मला लांबणीवर पडण्याचा विचार भयप्रद वाटतो. कारण त्यात राष्ट्रावरील अविश्वास प्रकट होतो. कशाना कशामुळे मला वाटते की, राष्ट्र योग्य वेळी ओ देईल. पण या प्रश्नाला तर्कशुद्ध निःसंशय उत्तर म्हणजे जर राष्ट्राने कार्यक्रमाला पुरेशी साथ दिली नाही तर आपले ध्येय गाठणे लांबणीवर पडेल.

जुगारीचा शाप

काशीच्या राष्ट्रीय विद्यापीठाचे विद्वान कुलपती बाबू भगवानदास यांनी जुगारीतील पातकासंबंधी मनुस्मृतीतील उतारे पाठविले आहेत. ते खाली देत आहे.

द्यूत खेळणारे व समाव्हय खेळणारे लोक राजाने हद्दपार करावे. कारण या व्यसनापासून त्याचा नाश होत असतो. (२२१).

हा दोन प्रकारचा जुगार म्हणजे प्रत्यक्ष चोरीच होय. याकरिता राजाने नेहमी त्यांच्या प्रसारास वाव न देण्याचा प्रयत्न करावा (२२२).

पैसे लावून खेळावयाच्या जुगारास द्यूत आणि सजीव प्राणी पैजेस लावून खेळावयाच्या जुगारास समाव्हय असे म्हणतात. (२२३).

हे दोन्ही प्रकारचे जुगार जो मनुष्य खेळतो किंवा खेळण्याला उत्तेजन देतो त्या दोघांस आणि यज्ञोपवितादी द्विजचिन्हे धारण करणाऱ्या शूद्रास राजाने देहान्त शासन द्यावे. (२२४).

जुगारी, नाच तमाशावर पोटे भरणारे, क्रूर कर्मे करणारे, वेदद्वेष्टे, आपत्काल नसता हलक्या प्रकारचे धंदे करणारे, आणि दारू विकणारे व पिणारे लोक यांस राजाने त्वरित हद्दपार करावे. (२२५)

हे लोक म्हणजे गुप्त चोरी करणारे चोरच आहेत असे समजावे. त्यांच्या दुष्टाचरणाने राष्ट्रातील सदाचारी प्रजा ऱ्हास पावत असतात. (२२६).

अनादिकालापासून द्यूत हे व्यसन अतिशय वैरोत्पादक आहे असे समजले जाते, म्हणून शहाण्या माणसाने विनोदाकरिताही त्याचा अवलंब करू नये. (२२७).

गुप्त रीतीने किंवा उघडपणाने द्यूत खेळणाऱ्या मनुष्यास राजाने आपल्या इच्छेप्रमाणे शिक्षा द्यावी. (२२८).

सिंधची दुरुस्त जमा

सिंधमधील असहकारितेच्या माझ्या टिपणात मी दौऱ्यात जमा झालेले आकडे दिले होते. पण ते जवळ जवळ अंदाजी आकडे होते. श्री. जयरामदास[1] यांनी आता तपशीलवार हिशेब दिला आहे तो खाली देत आहे.

कराची (ढोबळ)	रु.	३०,०००
लारखाना	,,	१,३८७
शिकारपूर	,,	१७,२४५
जाकोबाबाद	,,	१,००१
सक्कर	,,	३,६००
रोहरी	,,	१,००२
हैदराबाद	,,	७,४३३
मिरपूरखास	,,	४५२
ठठ्ठा	,,	५००
दादू	,,	५००
तंटो अलाबयार	,,	६१५
शहादादपूर	,,	७५
किरकोळ	,,	४६५
	रु.	६४,२७५

' यंग इंडिया ', २५-५-१९२१

१. जयरामदास दौलतराम (१८९२). चिटणीस सिंध प्रदेश काँग्रेस कमिटी, काही काळ हिंदुस्थान सरकारचे अन्न व शेतकी खात्याचे मंत्री, व बिहार आणि आसामचे राज्यपाल.

६४. जुगारीचा परिणाम

एका स्त्रीचे भविष्य खरे ठरेल अशी मला आशा आहे. आणि जे हिंदुस्थानच्या कल्याणाला किंमत देतात व आपल्या घरांची शुद्धता राखू इच्छितात ते शर्यतीच्या मैदानावर जाणे टाकून देतील.[1]

'यंग इंडिया,' २५-५-१९२१

६५. सिमला भेट[2]

पुष्कळ जण मला विचारतात मी व्हाइसरॉयना का भेटलो, काही जण विचारतात असहकारितेच्या प्रवर्तकाने व्हाइसरॉयच्या भेटीचा प्रयत्न का करावा, सर्वांना मुलाखतीचा निकाल समजावयास पाहिजे आहे. सीझरच्या पत्नीपेक्षाही जे अधिक संशयातीत असावयास पाहिजे अशी असहकारितावाद्यांची कडक तपासणी मला आवडते.

१. एका स्त्रीकडून आलेल्या पुढील पत्राला हे उत्तर आहे: डेक्कन हेरल्डमध्ये अशी बातमी आहे की, बहिष्काराची चळवळ आता शर्यतीपर्यंत जाऊन भिडणार आहे. आणि हिंदी लोकांना शर्यतीच्या दिवशी शर्यतीला जाण्यास परवानगी मिळणार नाही. जर तुम्ही हे खरोखरच करणार असाल तर परमेश्वर तुमचे कल्याण करो. माझा नवरा हा त्याच्या मालकाकडून स्वतःबरोबर शर्यतीला बोलाविला जाईपर्यंत एक आदर्श पती होता. दुर्दैवाने तो तेथे गेला. त्याने बरोबर १० रुपये नेले होते, त्याचे दैव फळफळले आणि त्याने घरी ३०० रुपये आणले. पण त्यानंतर दोन वेळा काही रुपये मिळविण्यापलीकडे कधीही शर्यत जिंकली नाही आणि तो अनेक वेळा दारू पिऊन घरी आला.

परमेश्वर तुमच्या प्रयत्नांना यश देवो.

ज्या पत्नींना खरे सांगण्याचे धैर्य असेल त्या माझ्या म्हणण्याला दुजोरा देतील अशी माझी खात्री आहे.

२. गांधीजी सिमल्याला व्हाइसरॉयना भेटले; पाहा, "सिमल्याच्या जाहीर सभेत भाषण." १५-५-१९२१.

असहकारिता म्हणजे स्वावलंबन. आम्हांला स्वराज्य स्थापावयाचे आहे, दुसऱ्याकडून मिळवावयाचे नाही, असे आहे तर व्हाइसरॉयकडे का जाता ? येथपर्यंत हे सर्व ठीक आहे. जर मी कोणाकडे स्वराज्य मागावयाला गेलो तर मी आपल्या कार्याचा वाईट प्रतिनिधी ठरेन. देवापुढेही;– असे म्हणण्याचा कणखरपणा माझ्यात आहे. ते आपल्याला स्वतःच मिळवावे लागेल. स्वराज्य देण्याचे कोणाच्या हातात नाही, हे त्याच्या स्वरूपावरूनच सिद्ध होते.

आपल्याला आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात जग आपल्याबरोबर असावयास पाहिजे. प्रत्येकाची सदिच्छा पाहिजे. आमचे उद्दिष्ट शुद्ध न्यायावर आधारलेले आहे असा आमचा दावा आहे. इंग्लिश लोकांनी काही गोष्टी आमच्या हवाली करावयास पाहिजे आहेत. या सर्व गोष्टींकरिता परस्परांत चर्चा आणि परस्परांत काही संकेत असावे लागतात. आपल्या बाजूला जगाचे मत वळविण्यास असहकारिता हे अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. जोपर्यंत आपण निषेध करीत होतो व सहकार्य करीत होतो तोपर्यंत जगाला आपण समजलो नाही. एके काळचे बंगालचे सिंह आपल्या सुरुवातीच्या काळात इंग्लिश लोकांची एक गोष्ट सांगत असत. तो इंग्लिश गृहस्थ विचारी, जर हिंदुस्थानात तुम्ही सांगता त्याप्रमाणे इतक्या वाईट गोष्टी असतील तर किती डोकी फुटली ते सांगा. त्याच पद्धतीने जॉन बुलला चांगल्या प्रकारे गोष्टी कळत. दुसरा प्रश्न जो जग विचारी तो असा :

जर साऱ्या गोष्टी खरोखर इतक्या वाईट असतील तर तुम्ही भिकारड्यासारखे व अपमानकारक रीतीने सरकारबरोबर सहकार्य का करता ? आता जगाला आपली वृत्ती कळली आहे. मग कितीही दुर्बळपणे आपण ती वृत्ती व्यवहारात दाखवीत असू. आपल्याला कशाचा त्रास होतो हे जाणावयास जग उत्सुक आहे. व्हाइसरॉय हे मोठ्या जगाचे प्रतिनिधी आहेत. ज्या मला सहकारिता हा श्रद्धेचा विषय वाटे तो मी असहकारितावादी का बनलो हे व्हाइसरॉयना समजून घ्यावयाचे होते. सरकारचे किंवा माझे काही तरी चुकत असले पाहिजे.

आणि म्हणून व्हाइसरॉयनी पंडित मालवीयजी आणि मि. अॅन्ड्रूज यांना असे सूचित केले की, त्यांना मला भेटण्याची व माझे विचार समजून घेण्याची इच्छा आहे. पंडितजी मला भेटण्यास उत्सुक असल्यामुळे मी त्यांच्याकडे गेलो. पंडितजींच्याबद्दल मला इतका आदर आहे की, ते जरी चांगले असले आणि जर मला शक्य झाले तर त्यांना माझ्याकडे येऊ देण्याचा विचारही मी करणार नाही. पण ते इतके अशक्त होते की, ते माझ्याकडे येऊ शकत नव्हते. त्यांच्याकडे जाणे माझे कर्तव्य होते आणि जेव्हा मी व्हाइसरॉयांच्याबरोबर झालेल्या संभाषणाचा हेतू ऐकला, तेव्हा जर व्हाइसरॉयना माझे विचार ऐकण्याची इच्छा असेल तर त्यांनी वेळ द्यावा हे सांगण्यास

कोणाच्याही मनधरणीची मला जरूर नव्हती. मी मुलाखत का मागितली याची कारणे सांगण्याकरिता इतकी जागा व्यापली आहे. कारण मला असहकारितेच्या मर्यादा व अर्थ स्पष्ट करून सांगायचा होता.

असहकारिता ही व्यक्तीविरुद्ध नसून उपायाविरुद्ध आहे. ती राज्यपालांच्या विरुद्ध नसून शासनपद्धतीविरुद्ध आहे.

असहकारितेची मुळे ही द्वेषात रुजलेली नसून प्रेमात नसली तरी न्यायात रुजलेली आहेत. ग्लॅडस्टन[1] हे वाईट कृत्ये आणि वाईट माणसे यांच्यात प्रखर भेदाभेद करीत असत. आपल्या विरोधकांच्या कृत्यांबद्दल जोरदार शब्दप्रयोग वापरतात म्हणून त्यांच्यावर अनादराचा आरोप केला जात असे. त्यावर त्यांचा बचाव असा की, जर आपण विरोधकांच्या कृत्यांचे यथायोग्य वर्णन केले नसते, तर कर्तव्यात चूक केली असती. पण ते म्हणत की, जी विशेषणे मी विरोधकांच्या कृत्यांना लावतो, त्या विशेषणांना विरोधक पात्र आहेत असे म्हणण्याचा माझा हेतू नाही. तरुणपणी जेव्हा मी हा बचाव ऐकला तेव्हा तो पटला नाही. पण आता अनेक वर्षांच्या अनुभवाने आणि उपयोगाने त्यांतील सत्य मला समजते. माझे काही अत्यंत सच्चे मित्र असे आहेत की, जे अशी असमर्थनीय कृत्ये करू शकतील. व्ही. एस्. श्रीनिवासशास्त्री ह्यांच्यापेक्षा अधिक सचोटीचे फारच थोडे लोक असतील. पण त्यांच्याही कृत्याने मी गोंधळून जातो. मी हिंदुस्थानला अंधकारमय दरीत लोटत आहे असे वाटल्यावरून ते माझ्यावर कमी प्रेम करतात असे मला वाटत नाही.

आणि या असहकारितेच्या प्रचंड मोहिमेने माझ्याचप्रमाणे हजारो लोकांना असे स्पष्ट केले आहे की, जरी आपण पद्धती आणि उपाय यांच्यावर हल्ले केले तरी व्यक्तींवर आपण हल्ले करू नयेत, करता कामा नयेत. आपण स्वतःच अपूर्ण आहोत, म्हणून इतरांना कोमलपणाने वागविले पाहिजे आणि हेतूंचे आरोप करताना उतावळे-पणा करू नये.

म्हणून मी व्हाइसरॉयना भेटण्याची संधी आनंदाने साधली आणि त्यांना असे आश्वासन दिले की, आमची चळवळ धार्मिक असून तिचा उद्देश हिंदी राजकीय जीवनातील भ्रष्टाचार, ढोंगीपणा, दहशतवाद आणि गोऱ्यांच्या श्रेष्ठत्वाचे दडपण घालवून टाकण्याचा आहे.

वाचकांनी फाजील चौकस असू नये. त्यांनी वृत्रपत्रांतील तथाकथित अहवालावर विश्वास ठेवू नये. व्हाइसरॉय आणि माझ्यामध्ये जे संभाषण झाले त्याच्या तपशिला-

१. १८०९ ते १८९८; इंग्लंडचे लिबरल पक्षाचे पंतप्रधान; १८६८-७४, १८८०-८५, १८८६ व १८९२ ते ९४.

वरील बुरखा आहे तसाच राहू द्यावा. पण मी वाचकांना असे आश्वासन देतो की, मी त्यांना आमचे जे तीन हक्क आहेत—खिलाफत, पंजाब आणि स्वराज्य, याविषयी मला जेवढी माहिती होती, तेवढी त्यांना पूर्णपणे समजावून सांगितली. असहकारितेच्या चळवळीचा उगम कसा झाला हेही त्यांना सांगितले. व्हाइसरॉयनी माझे म्हणणे धीमेपणाने, आदराने आणि लक्षपूर्वक ऐकले. जी योग्य गोष्ट आहे ती करावयास ते मला उत्सुक दिसले. समोरासमोर आम्ही ज्वलंत विषयांची पूर्ण चर्चा केली. आम्ही अनत्याचाराचा प्रश्न चर्चिला आणि मला असे वाटले की, आम्हा दोघांमध्ये तो समान विषय होता. त्यासंबंधी मला अधिक तपशीलवार नंतर लिहावे लागेल.

पण आम्ही एकमेकाला समजू शकलो यापलीकडे त्या मुलाखतीत अधिक काही होते असे मला म्हणता येत नाही. एकमेकांनी एकमेकाला समजून घेतले हा लहान फायदा नव्हता, असे माझ्याप्रमाणे काही जणांना वाटेल. त्या अर्थाने मुलाखत निःसंशय यशस्वी झाली.

पण या प्रदीर्घ चर्चेच्या शेवटी आपली मुक्ती आपल्या स्वतःच्या प्रयत्नावरच अवलंबून आहे याची मला पूर्वीपेक्षा अधिक खात्री पटली. व्हाइसरॉय हे मदत करतील किंवा अडथळा तरी करतील; ते आपल्याला मदत करतील असे वाटण्याइतका मी आशावादी आहे.

आपण आपला कार्यक्रम अमलात आणण्याकरिता द्विगुणित प्रयत्न केले पाहिजेत. तो कार्यक्रम खालीलप्रमाणे स्पष्ट आहे : (१) अस्पृश्यता निवारण. (२) मद्यपानाच्या शापापासून सुटका. (३) चरख्याचा अविश्रांत प्रसार आणि सतत खादी उत्पादन; ते उत्पादन परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार पडण्याइतके असावे. (४) काँग्रेस सभासद नोंदणी. (५) टिळक स्वराज्य फंड जमविणे.

हिंदू-मुस्लिम ऐक्य दृढ करण्याकरिता आणि आजच्यापेक्षा अधिक अनत्याचारी वातावरण निर्माण करण्याकरिता जोरदार प्रचार आवश्यक आहे.

मी अस्पृश्यतेला अग्रस्थान दिले, याचे कारण मला त्यात काही निष्काळजीपणा दिसून येतो. हिंदू असहकारितावाद्यांनी त्याबद्दल अनास्था बाळगू नये. आपण खिलाफतीचा अन्याय दूर करू शकू पण जोपर्यंत राष्ट्रीय शरीरातील हिंदू भाग हा अस्पृश्यतेच्या विषाने कुरतडला जात आहे, तोपर्यंत आपण स्वराज्य गाठू शकणार नाही. हिंदुस्थानातील एक पंचमांश भाग जर आपण कायम गुलामगिरीत ठेवणार असलो आणि राष्ट्रीय संस्कृतीची फळे त्यांना बुद्धिपुरःसर नाकारणार असलो तर स्वराज्य शब्दाला अर्थ नाही. आपण या महान शुद्धीकरणाच्या चळवळीत ईश्वराची मदत मागत आहोत पण त्याच्या निर्मितीतील अत्यंत लायक अशा लोकांना माणुसकीचे हक्क

नाकारीत आहोत. आपण स्वतःच अमानुष असून, आपण इतरांच्या अमानुषतेपासून आमची मुक्तता करा, असे कोणत्या तोंडाने देवाच्या दरबारात सांगणार ?

मी मद्यपानाला दुसरे स्थान दिले. कारण ईश्वराने आम्ही न मागता ती चळवळ आमच्याकडे पाठवून दिली. त्या चळवळीभोवती भयंकर वादळ उठले आहे. मद्यपान-बंदीच्या चळवळीत अत्याचाराचे भयंकर धोके आहेत. पण जोपर्यंत हे सरकार दारूगुत्ते उघडे ठेवण्याचा हट्ट धरणार आहे तोपर्यंत आपण आपल्या चुकलेल्या बांधवांना तुमचे ओठ दारूने भ्रष्ट होऊ देऊ नका, असा इशारा सतत जागे राहून देत राहिले पाहिजे.

जरी मला पहिल्या दोन गोष्टींइतकेच महत्त्व चरख्याबद्दल वाटते, तरी मी त्याला तिसरे स्थान दिले आहे. जर आपण या वर्षी परदेशी कापडावर परिणामकारक बहिष्कार घातला तर आपण आपली एकजूट, प्रयत्न, एकाग्रता, कळकळ व राष्ट्रीय वृत्ती दाखवू शकू. त्यामुळे, आपल्याला स्वराज्य स्थापण्याची शक्ती मिळालीच पाहिजे.

काँग्रेस सभासदत्व आपल्याला जे आवश्यक आहे ते देशात जागोजागी चरखे चालविण्याकरिता प्रचंड संघटना लागेल आणि खादी निर्मिती व खादी वितरण याकरिता ते आवश्यक आहे. याशिवाय सरकार काँग्रेस सभासद होणे हा गुन्हा समजेल ही जी भीती आहे, ती घालविण्याकरिता काँग्रेस सभासदत्व आवश्यक आहे.

पांचवी बाब टिळक स्वराज्य फंडाची. तीमुळे आपण स्वराज्याचा जो आत्मा, त्याची स्मृती कायम टिकवितो आणि आपल्याला युद्धाकरिता लागणारी जी शक्ती लागते ती मिळवितो.

आपण स्वतःशी असे वचनबद्ध झालो आहोत की, आम्ही एक कोटी रुपये जमा करू, एक कोटी सभासद नोंदवू आणि आमच्या घरांतून वीस लाख चरखे सुरू करू. या तिन्ही गोष्टी ३० जूनच्या आत करावयाच्या आहेत. जो हा कार्यक्रम ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या प्रचंड सभेत आखला गेला व पूर्ण विचार आणि चर्चा होऊन ठरला, तो जर आपण अमलात आणण्यास चुकलो तर आपले ध्येय गाठणे लांबणी-वर पडेल.

'यंग इंडिया', २५-५-१९२१

६६. सरहद्दीवरचे मित्र

जे पंजाबी लोक सरहद्दीवर[1] राहतात ते साऱ्या हिंदुस्थानच्या सहानुभूतीला पात्र आहेत. ह्या पंजाबी लोकांवर शेजारच्या टोळीवाल्यांकडून हल्ले होण्याची शक्यता असते. त्यांना संरक्षणाची साधने नसतात आणि माझ्याकडे ज्या बातम्या आल्या आहेत त्यांवरून सरकार त्यांना अत्यल्प किंवा मुळीच संरक्षण देत नाही. अलीकडे सरकारी अधिकाऱ्यांनी असा नियम केला आहे की, जर कोणी त्यांच्याकडे फिर्याद केली, तर ते त्या फिर्यादीला अलीबंधूंकडे किंवा माझ्याकडे जावयास सांगतात. जर सरहद्दीवर आमचा ताबा असता तर आम्ही काय केले असते हे मला ठाऊक आहे. त्या जिल्ह्यातील निःशस्त्र लोकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत असता, आम्ही खासच मरून गेलो असतो. जरूर तर आम्ही आत्मरक्षणाकरिता तेथील लोकांना शस्त्रे दिली असती. पण त्याहीपेक्षा आम्ही अधिक एक गोष्ट केली असती. आम्ही त्या टोळीवाल्यांना आमच्या बाजूला वळविले असते. आणि त्यांना खुनी टोळ्यांतून काढून विश्वासू शेजारी बनविले असते. पण प्राप्त परिस्थिती आपण मानलीच पाहिजे. मी असे धरून चालतो की, हिंदू व मुसलमान एकमेकांशी मित्रत्वाने वागतात आणि कोणताही मुसलमान हिंदू बांधवाविरुद्ध टोळीवाल्यांना मदत करीत नाही. सरहद्दीच्या आपल्या बाजूला जे मुसलमान राहतात, त्यांची परिस्थिती मदत करण्याच्या दृष्टीने निरपवाद जोरदार आहे. टोळीवाल्यांबद्दल आपण निराश होता कामा नये. पुष्कळ वेळा आपण त्यांना निरुपयोगी मानतो. माझ्या दृष्टीने बुद्धिवादाने ते बदलतील. ते देवाला भितात. ते फक्त चैनीकरिता लूट करीत नाहीत. मला असे वाटते की, आत्मशुद्धीची लाट जी आता पसरत आहे तिचा प्रभाव त्यांच्यावर पडत आहे.

टोळीवाल्यांना सुधारण्याची प्रक्रिया ही सावकाशीची आणि कंटाळवाणी आहे. ज्यांची स्वतःची किंवा ज्यांच्या जिव्हाळ्याच्या लोकांची मालमत्ता लुबाडली जाते त्यांना यात समाधान वाटणार नाही.

त्यातील अडचणीचे कारण समान आहे. आपण इंग्लिशांना भितो आणि आपण गुलाम झालो. आपण टोळीवाल्यांना भितो व आपल्या गुलामगिरीत समाधान मानतो. टोळीवाल्यांच्यापासून इंग्लिश लोक आपले संरक्षण करतात याबद्दल आपण त्यांचे

१. वायव्य सरहद्द.

आभारी आहोत. स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या सुरक्षिततेकरिता जे त्याला खावयाला टपलेले आहेत, अशी त्याची समजूत आहे, त्याच्यावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वाभिमानी माणसाला अधिक अपमानास्पद असणारी दुसरी कोणती गोष्ट असेल याची मला कल्पनाही करवत नाही. मी स्वतःचा आणि माझ्या सर्वस्वाचा संपूर्ण नाश झालेला पसंत करीन, पण माझ्या पौरुषाची किंमत देऊन मी सुरक्षितता विकत घेणार नाही. आपल्या साध्या व्यवहारातून बुद्धिपुरःसर देवाची हकालपट्टी केली म्हणूनच ही असहाय्यतेची भावना आपल्यात उद्भवली. साऱ्या व्यावहारिक बाबतीतही आपण निरीश्वरवादी बनलो आहोत. आणि म्हणून आपल्याला असे वाटते की, आपल्या रक्षणाकरिता आपण अखेरीस शारीरिक बळावरच अवलंबून राहिले पाहिजे. शारीरिक संकटाच्या वेळी आपण आपले तत्त्वज्ञान वाऱ्यावर फेकून देतो. त्या वेळी जर आपला देवावर म्हणजे स्वतःवर यत्किंचित विश्वास असेल तर टोळीवाल्यांची अडचण आपल्याला वाटणार नाही. त्या बाबतीत कधी कधी आपण आपली संपत्ती सोडून देण्यास तयार असले पाहिजे आणि काही प्रसंगी आपल्या मानापेक्षा प्राण देण्यास आपण तयार असले पाहिजे. माणसामध्ये ज्या सूक्ष्म उपजत प्रवृत्ती आहेत, त्यांना साद देण्याइतके आपले शेजारी रानटी आहेत यावर विश्वास ठेवण्याचे आपण नाकारले पाहिजे.

अशा प्रकारे आपल्या स्वाभिमानाला साजेसे असे दोनच मार्ग आपल्यापुढे आहेत. एक म्हणजे चोरी आणि दरोडेखोरी यांच्याविरुद्ध किती का कमजोरपणाने असेना आपण आपले रक्षण करू इच्छित असलो तर तशी तयारी करणे आणि दुसरी म्हणजे माणसामध्ये ज्या उदात्त प्रेरणा आहेत त्यांना साद देण्याइतकी आपल्या शेजाऱ्यांच्यात शक्ती आहे यावर विश्वास ठेवणे व टोळीवाल्यांना सुधारण्याचा प्रयत्न करणे. या दोन्ही प्रक्रिया बरोबरच झाल्या पाहिजेत असे माझे मत आहे. काही झाले तरी तिसरी गोष्ट आपण टाळली पाहिजे व ती म्हणजे इजेपासून आपले रक्षण होण्याकरिता ब्रिटिशांच्या गोळीवर अवलंबून राहणे. राष्ट्रीय आत्महत्येचा तो खात्रीचा मार्ग आहे.

जर माझे लिखाण टोळीवाल्यांपर्यंत पोहोचू शकले तर मी त्यांना लुटारूपणा सोडून देण्याचा आग्रह करीन. त्यांनी एकाही स्त्रीला किंवा पुरुषाला लुटले तर ते प्रेषिताच्या शिकवणुकीला खोटेपणा आणतात असे होईल. त्या प्रेषिताचे नाव ते सर्व नावांपेक्षा अधिक मोलाचे मानतात आणि तो दयाळू व न्यायी ईश्वराचा प्रेषित आहे असे समजतात. या साध्या-भोळ्या माणसावर जर मुसलमान किंवा उलेमांचे काही वजन असेल तर त्यांना त्यांनी असे सांगितले पाहिजे की, जर त्यांना येणाऱ्या संकटापासून इस्लामला बचाविण्यात स्वतःची काही कामगिरी करावयाची असेल, तर त्यांनी कमीत कमी आपल्या शेजाऱ्यांचा छळ करू नये. ह्या शेजाऱ्यांनी त्यांचे काही नुकसान केले नाही, एवढेच नाही तर ते हिंदू असोत किंवा मुसलमान असोत; इस्लामची प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्याकरिता आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत.

'यंग इंडिया', २५-५-१९२१

६७. मध्यप्रदेशमधील दडपशाही[1]

प्रत्येक प्रांतात दडपशाहीला स्वतःचे खास वळण लागत आहे. संयुक्त प्रदेशामध्ये[2] चळवळीच्या पुढाऱ्यांना सामान्यपणे मोकळे सोडले आहे. ज्या पंडित मोतीलाल नेहरूंनी किसानांच्याकरिता पत्रक काढले त्यांना सरकार हात लावीत नाही. पण ज्या तरुणांनी ती पत्रके वाटली त्यांना तुरुंगात टाकले आहे. सी. पी. मध्ये उलट प्रकार आहे. एकामागून एक मान्यवर नेते उचलले जात आहेत आणि त्यांना मेहेरबान मॅजिस्ट्रेट्सकडून शिक्षा दिल्या जात आहेत. अगदी ताजे उदाहरण मि. सुंदरलाल यांचे आहे. सी. पी. मध्ये विद्यार्थीवर्गावर त्यांच्याइतके दुसरे कोणाचे वजन नाही. अत्याचाराच्या बाबतीत ते संयमी आहेत. पण ते धाडसी आणि प्रभावी वक्ते आहेत. आणि म्हणून सी. पी. गव्हर्नमेंटच्या मताप्रमाणे त्यांना वाटेतून दूर सारावयास पाहिजे होते. सुंदरलाल यांच्याविरुद्ध असलेले आरोपपत्र पुढीलप्रमाणे :

> तुम्ही २ मार्च १९२१ रोजी किंवा त्या सुमारास खरनगामा येथे (सुमारे पाच हजार लोकांपुढे) एक भाषण केले. त्या भाषणाचा सारांश असा : हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्य चालू आहे ते देशाचे शोषण करण्याकरिता आणि देशाला संपूर्णपणे दरिद्री व असहाय्य करण्याकरिता जाणून बुजून व अप्रामाणिकपणाने चालविले जात आहे. ब्रिटिश सरकार हे साथी, दुष्काळ, व्यापार, उद्योगधंद्यांचा नाश आणि देशातील सर्व दुर्दैवांना जबाबदार आहे. हा देश विनाशाकडे इतक्या पद्धतशीरपणे नेण्यात येत आहे की, मुसलमानांना सरकारने दिलेली वचने मोडली आहेत. पंजाबमध्ये भयंकर प्रकारचे जुलूम व भीषण कृत्ये करण्यात आली आहेत. त्यामुळे लोकांचा विश्वास पूर्णपणे नष्ट झाला आहे. या परिस्थितीवर एकच उपाय आहे, तो म्हणजे ब्रिटिश सत्तेचे पूर्ण निर्मूलन. ते निर्मूलन अनत्याचारी असहकारितेच्या शस्त्राने घडवून आणावयाचे आहे.
>
> या तुमच्या भाषणामुळे ब्रिटिश हिंदुस्थानात कायद्याने प्रस्थापित झालेल्या सरकारविरुद्ध द्वेष किंवा तिरस्कार निर्माण केला आहे किंवा सरकारविरुद्ध अप्रीती निर्माण केली आहे किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न

१. पूर्वीचा मध्यप्रांत; यातील बहुतेक भाग आता मध्यप्रदेश राज्यामध्ये गेला आहे.
२. पूर्वीचा आग्रा व औधचा संयुक्त प्रांत. आताचा उत्तर प्रदेश.

केला आहे आणि त्यामुळे इंडियन पीनल कोडाच्या १२४ अ कलमाखाली तुम्ही गुन्हा केला आहे व तो शिक्षेला पात्र आहे आणि तो माझ्या दखल घेण्याच्या अधिकारात बसतो.

आरोप स्पष्ट आहे. केलेल्या किंवा उद्देश असलेल्या अत्याचाराचा आरोप नाही. अप्रीती फैलावण्याबद्दलचाच तो आरोप आहे. गेल्या १२ महिन्यांत हजारो ठिकाणांहून न उच्चारले गेलेले असे आरोपात जवळ जवळ काहीच नाही. सरकारविरुद्ध लोकांची जी अप्रीती आहे तिचा उच्चार करणे आणि ती पसरविणे हा असहकारितावाद्यांचा धर्मच आहे असे म्हणता येईल. अप्रीती हा असहकारितेचा गाभाच आहे. सरकार म्हणजे सरकारी राज्यपद्धत, ही दुष्ट आहे; ती हिंदुस्थानचे शोषण करणारी आहे. तिने अभूतपूर्व असे दारिद्र्य आणले आहे. आणि त्यातून दुष्काळ व रोगराई आली आहे असा प्रत्येक असहकारितावाद्याचा विश्वास आहे. हिंदुस्थानच्या असहाय्यतेला राज्यपद्धत जबाबदार आहे. ब्रिटिश मंत्र्यांनी मुसलमानांना दिलेली वचने मोडली आहेत हे निःसंशय. ह्यावर आणि याहीपेक्षा अधिक गोष्टींवर प्रत्येक असहकारितावाद्याचा विश्वास आहे आणि म्हणून तो असहकारितेने हे पाप नष्ट करू इच्छितो. मी श्री. सुंदरलाल यांचे त्यांच्यावरील खटल्याकरिता अभिनंदन करतो. त्यांना जी जागा मिळाली आहे तिचा खरोखर मी हेवा करतो. मध्यप्रदेश सरकारला ह्या चळवळीचे पुढारी दूर सारू द्या आणि तरीही त्यांना असे आढळेल की, जी अप्रीती त्यांना चिरडून टाकावयाची आहे, ती त्यांच्या वेडगळ आणि अविचारी दडपशाहीला न जुमानता अधिक खोल आणि अधिक तीव्र होत चालली आहे. लोकांचे कर्तव्य स्पष्ट आहे. त्यांनी आपला रचनात्मक कार्यक्रम चालू ठेवला पाहिजे आणि शेवटच्या विजयाकरिता तयारी केली पाहिजे. सरकार वेडे झाले म्हणून आपण आपला शहाणपणा सोडता कामा नये.

'यंग इंडिया', २५-५-१९२१.

६८. कराचीची हरकत

संपादक, यंग इंडिया,

महाशय,

४ तारखेच्या[१] यंग इंडियामध्ये आपण कराचीवर जे ताशेरे उडविलेत, त्यामुळे पुष्कळशा कराचीच्या रहिवाशांना दुःख झाले आहे. आमच्यापैकी पुष्कळांना वाटते की, तुम्ही अजाणतेपणाने आमच्या शहरावर अन्याय केला आहे. एका राष्ट्रीय शाळेच्या (तुम्ही म्हटल्याप्रमाणे राष्ट्रीय शाळांच्या नव्हे) हिशोबासंबंधी जी स्थानिक भांडणे होती त्यावरचे तुमचे म्हणणे अत्यंत दुःखदायक होते. ती जी भांडणे होती ती केवळ गैरसमजामुळे होती. एक प्रामाणिक कार्यकर्त्यांचा गट दुसऱ्या तितक्याच प्रामाणिक परंतु कमी उदार असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गटाबरोबर गैरसमजाने भांडत होता. दोघेही राष्ट्राचे सेवक होते. तुमच्या लिखाणामुळे काही प्रामाणिक आणि निःस्वार्थी लोकांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका निर्माण झाली आहे. या लोकांनी मातृभूमीच्या स्थंडिलावर आपल्या सर्वस्वाचा होम केला आहे आणि ते अलीबंधूंसारख्या पुढाऱ्यांच्याइतकेच संशयातीत आहेत. या अलीबंधूंवरदेखील काही दिवसांपूर्वी दुष्ट बुद्धीने हल्ले केले होते. प्रस्तुत प्रकरणी बेअब्रू केली गेलेल्या सभ्य गृहस्थांनी दोन मोठाल्या जाहीर सभांत आपले हिशोब सादर केले. त्यांनी असेही सांगितले की, ज्यांना आणखी समाधान करून घ्यावयाचे असेल त्यांनी आमच्या कचेरीत यावे आणि हिशोबाच्या वह्या तपासाव्यात. ते प्रकरण मेले आणि गाडले असे वाटत होते. पण तुम्ही तुमच्या पत्रात त्याचा उल्लेख करून त्याला पुन्हा जिवंत केलेत. मला वाटते की, आमचे जे प्रतिस्पर्धी आहेत, त्यांना आता चळवळीत बोट शिरकाविण्यास पूर्वीपेक्षा अधिक स्वैरपणे आणि अधिक आनंदाने संधी मिळेल. महाशय, आपल्याला ठाऊक नाही की, आमचे शत्रू हे सरकार किंवा अँग्लोइंडियन्स नसून नेमस्त पक्षातील आमच्याच रक्तामांसाचे लोक आहेत. ते

१. पाहा, 'टिप्पणे' ४-५-१९२१.

सध्या दुष्ट माणसापेक्षा अधिक दुष्ट कृत्ये करण्यात गुंतले आहेत. ते तुमची वाक्ये व तुमचे लेख व भाषणे (आणि तुम्ही तुमच्या अनुयायांना जे वारंवार इषारे देता आणि दाबता) याचा अनर्थ करतात आणि संदर्भापासून काही उतारे बाजूला करतात व असहकारितावाद्यांची थट्टा व हेटाळणी करतात, हे सर्व तुम्हांला माहीत नसेल. हिंद स्वराज्यातील उतारे लैंगिक बाबतीत आत्मसंयम, खालसाजीला तुमचे पत्र, आणि लोक जर अत्याचारी झाले तर मी हिमालयात निघून जाईन ही तुमची धमकी, हे सर्व त्यांचे आवडते विषय असून त्या विषयांच्या साहाय्याने ते चळवळीची व चळवळीच्या अनुयायांची हेटाळणी करीत असतात. तुमचे कराचीविषयीचे म्हणणे त्यात भर घाली.

गव्हर्नरसाहेब जेव्हा कराचीला आले तेव्हा योजलेला हरताळ तुम्ही नापसंत केलात. आणि तुम्ही त्यांचा एक चांगले गव्हर्नर असाही उल्लेख केलात. त्यासंबंधी माझे म्हणणे असे की, त्यांनी मुंबईत किंवा गुजरातमध्ये किंवा इलाख्यात दुसऱ्या ठिकाणी जे काय केले असेल किंवा नसेल त्याबद्दल ते ते विभाग त्यांचे आभारी असतील. पण सिंधमध्ये त्यांनी काहीही केले नसले तरीहि सिंधी लोक तुम्ही त्यांची जी औदार्याने स्तुती केलीत, तीमध्ये कदाचित सहभागी होतील. सिंधमध्ये आज जितका छळ, जितका जुलूम आणि जितका भयप्रदपणा आहे तितका पूर्वी कधीही नव्हता. जर तुम्ही सिंधमधील आपल्या छोट्या मुक्कामात संज होरो, नवाबाद आणि थर येथे गेला असतात आणि तुमच्या स्वतःच्या कानांनी तेथील लोकांकडून पोलिस व इतर सरकारी नोकरांनी त्यांच्यावर लादलेल्या क्लेशांचे रक्त गोठविणारे वृत्तांत ऐकले असतेत, तर तुम्ही संपूर्ण संयमी असलात तरी तुमचा नित्याचा संयम हादरला असता ! त्यानंतर गव्हर्नरसंबंधी तुमचे मत बदलले असते अशी माझी खात्री आहे. त्यांनीच कानाडोळा केल्यामुळे या सर्व भयंकर गोष्टी घडत आहेत. ह्याच गव्हर्नरला इतकी विस्मृती झाली की, त्यांनी लोकांची तुलना नोकरांबरोबर आणि सरकारची तुलना धन्याबरोबर केली. त्यांनी असहकारितावाद्यांना असे सांगितले की, नोकरीच्या अटीत तुमचे समाधान नसेल तर नोकरांनी " निघून जावे ",– देशातून निघून जावे. सिंधमधील सहकारिता करणाऱ्या धेंडांच्या जमावाला त्यांनी हे सांगितल्याचे वृत्त आहे. त्यांचे चांगुलपणाचे ताजे कृत्य म्हणजे स्वामी गोविंदानंदांच्या खटल्याला मंजुरी. त्यांना नंतर ५ वर्षे हद्दपारीची शिक्षा झाली. म्हणून महाशय, आम्ही नम्रतापूर्वक आपल्याला विचारू नये का की, जेव्हा ते कराचीला आले तेव्हा आम्ही सिंधमधील लोक,

म्हातारी कोणाकडूनही हाकलली जाणारी मुकी जनावरे राहिलो नाही, हे दाखविण्याकरिता जर आम्ही हरताळ पाडला असला तर त्यात घोर अपराध काय केला ! पूर्वी या सिंधमध्ये एखाद्या विलिंग्डनच्या लाडाच्या संमतीने, एखादा लॉरेन्स त्यांना भीती दाखवून मग्रूरीने शरण आणीत असे. त्या निदर्शनात लोकांचे पूर्ण अंतःकरण होते, ही गोष्ट कडकडीत हरताळाने सिद्ध झाली आहे. ६ व १३ तारखेच्या मोठ्या राष्ट्रीय हरताळापेक्षा हा हरताळ अधिक कडकडीत होता.

मी तुमचा इत्यादी
गिरधारीलाल खुबचंदानी

कराची,
८ मे, १९२१

मी वरील लेख आनंदाने प्रसिद्ध करीत आहे. मी त्यातले अलंकार काढून टाकले आहेत. जर एखाद्या शाळेला मी अन्याय केला असला तर त्याबद्दल मला दुःख होते. सार्वजनिक संस्थांबद्दल साधार तक्रारी आल्या तर त्या प्रसिद्ध करणे माझे कर्तव्य आहे. प्रामाणिक राष्ट्रीय कार्याबद्दल कितीही गैरसमज केला तरीही त्यांची हानी होणार नाही. मुंबई सरकारबद्दल मला जे वाटले ते मी सांगितले. मला अजूनही असे वाटते की, गव्हर्नरला सिंधच्या अधिकाऱ्यांच्या कृत्यातील जुलूमजबरदस्तीची कल्पना नसावी. पण सरकारविरोधी आरोप शाबीत झाले तरी लोकांना अप्रिय असणारा एखादा अधिकारी भेटीला आला म्हणजे हरताळ पाडावा याच्याशी मी सहमत नाही. जे अभिप्राय गव्हर्नरचे म्हणून सांगण्यात आले आहेत, ते जर त्यांनी व्यक्त केले असतील तर मला खरोखर दुःख होते. मुंबईचे गव्हर्नर हे नेमस्त आणि व्यवहारचतुर आहेत असा माझा विश्वास होता. आणि जर त्यांनी असे उतावळेपणाचे व बिनचतुरतेचे अभिप्राय व्यक्त केले असतील तर त्यांनी मला जबरदस्त धक्का बसेल.

'यंग इंडिया', २५-५-१९२१

६९. सोलापूर[१] नगरपालिकेच्या मानपत्राला उत्तर

२६ मे, १९२१

गांधींनी प्रथम, उभे राहून भाषण न करण्याबद्दल निवेदन केले आणि इंग्रजीत मानपत्र दिल्याबद्दल काही टीका केली. अशा चुका दाखविणे हे आपल्या नम्रतेला अनुसरून आपले कर्तव्य आहे असे ते म्हणाले. जर मानपत्र मराठीत किंवा हिंदीत दिले असते, तर हिंदुस्थानच्या सध्याच्या वृत्तीला ते साजेसे झाले असते असे ते म्हणाले. आता अशी वेळ आली आहे की, नगरपालिकांनी आपली पूर्वीची बंधने ओलांडली आहेत आणि त्या मला मानपत्र देऊ लागल्या आहेत. बरेली नगरपालिकेने या बाबतीत पुढाकार घेतला. रौप्यकरंडकाबद्दल ते म्हणाले, जर कोणी सोलापुरातील श्रीमंत मनुष्य तो विकत घेण्यास पुढे येईल तर ते पैसे आपण टिळक स्वराज्य फंडाला देऊ. सोलापूर नगरपालिका आपले कर्तव्य करीत आहे हे पाहून त्यांना समाधान वाटले. नगरपालिका या रस्ते झाडण्याकरिता आहेत ही कल्पना गेली पाहिजे. आणि राजकारणात त्यांनी आपला योग्य वाटा उचलला पाहिजे. सोलापूर नगरपालिकेला आपले कर्तव्य करण्यास परमेश्वराने शक्ती व धैर्य द्यावे असे म्हणून त्यांनी आपले भाषण संपविले.

'मुंबई क्रॉनिकल', २७-५-१९२१

१. पंढरपूरहून सोलापूराला गांधी पहाटे ३-३० वाजता पोहोचले. गावात मिरवणूक काढली, आणि हरताळ पाळला. नगरपालिकेने सकाळी ९ वाजता रिपन हॉलमध्ये त्यांना मानपत्र दिले.

७०. महादेव देसाई यांना तार[1]

बागलकोट
मे २७, १९२१

महादेवमार्फत मथुरादास,
९३ बझार गेट फोर्ट मुंबई,

सुचविलेला अधिक मजकूर अगोदर घालावा. पण नंतरचा उतारा तसाच राहू द्यावा. "कबूल करतो" यापूर्वी "आता" हे शब्द घालावेत. "प्रामाणिकपणाने" याच्या पूर्वी नवा शब्द 'तथापि' राहू द्यावा. मी सुचविल्याप्रमाणे वर्तमानपत्रांना हे पाठवा आणि सिमल्याला अशी तार करा की, अधिक घातलेल्या शब्दावर सेक्रेटरी म्हणून तुम्ही आपली सही केली आहे. आणि त्यात असेही म्हणा की, अधिक शब्दांसह असलेल्या निवेदनावर सही केली आणि ते प्रसिद्धीला पाठविले आहे. विजापूरला मोटरीने जातो. ठरल्याप्रमाणे विजापूर उद्या सोडतो. विजापूरला निकाल कळवा.

गांधी

मूळच्या फोटोस्टॅटवरून, एस. एन्. ७५३२.

१. महादेव देसाईंच्या २६-२७ मे च्या तारखेला हे उत्तर होते. तारेत मजकूर. मसुद्यावर सही केली. फेरफार असा. "पण आम्ही आमच्या भाषणातील काही उताऱ्यांचा असा अर्थ होऊ शकेल हे कबूल करतो." ह्या शब्दांऐवजी, "आमच्या भाषणातील काही उताऱ्यांचा असा अर्थ होऊ शकेल ही आम्हांला कल्पना नव्हती." हे शब्द घालावेत. आणि नंतर पुढील वाक्य सुरू होते: "तथापि आम्ही प्रामाणिकपणे–" मथुरादास यांच्या पत्त्यावर त्वरित तारेने सूचना पाठवाव्यात. याच्याशी संबंधित असलेल्या अलीबंधूंच्या माफीचा मसुदा. प्रकरण ४५ पाहा.

७१. विजापूरच्या मानपत्रांना उत्तर[1]

मे २७, १९२१

गुंडाप्पाला[2] बोलू दिले हे चांगले झाले. आपल्या विरोधकांचे विचार शांतपणे ऐकणे हे आपले कर्तव्य आहे. मला ब्राह्मणेतरांच्या भावना आणि त्यांचे गाऱ्हाणे ठाऊक आहेत. ब्राह्मण बिलकूल दोषी नाहीत असे मी म्हणत नाही. ब्राह्मणसुद्धा आपण निर्दोषी आहोत असे म्हणत नाहीत. ब्राह्मणांनी आपल्या धर्मातील भावनांकडे दुर्लक्ष केले आहे, व शुद्ध जीवन त्यांनी गमाविले आहे. ज्या एका उच्च स्थानावर ते पूर्वी होते तेथून ते घसरले आहेत, आणि त्यांच्या अधःपातापासून हिंदुस्थानची अवनती सुरू झाली आहे. मीही ब्राह्मणेतर आहे आणि मी माझ्या ब्राह्मणेतर मित्रांना अशी विनंती करतो की, सध्याच्या ब्राह्मणांचा ऱ्हास झाला असला तरी ब्राह्मणेतरांनी आपला धर्म आणि आपली जीवनध्येये विसरू नयेत. पण तुम्हांला आश्चर्य वाटेल की, ब्राह्मणांमुळेच ब्राह्मणेतरांना आपल्या उणीवांची जाणीव झाली, व ते आपल्या हक्का-करिता झगडू लागले. ब्राह्मणांचे कितीही पतन झाले असले तरी ते राजकीय व सामाजिक चळवळीत अद्याप आघाडीवर आहेत. दलित वर्गाच्या उन्नतीकरिता ब्राह्मण हे कोणाही इतरांच्यापेक्षा अधिक प्रयत्न करीत आहेत. लोकमान्य टिळकांनी देशाची जी सेवा केली त्याकरिता त्यांना सर्व वर्गांचे लोक मान देतात. आंध्रातील एका ब्राह्मणाने आपले सारे जीवन अस्पृश्यांच्याकरिता समर्पित केले आहे. परलोकवासी गोखले[3], रानडे[4] आणि नामदार शास्त्री यांनी मागसलेल्या वर्गांच्याकरिता कौतुकास्पद काम केले आहे. हे सर्व जण ब्राह्मण आहेत. सर्वकाळीच ब्राह्मण स्वार्थत्यागाकरिता प्रसिद्ध होते अशी माझी खातरजमा आहे. तुम्ही ब्राह्मण नोकरशाहीबद्दल तक्रार करता

१. बागलकोटहून विजापूरला गांधी संध्याकाळी पोहोचले. त्यांनी स्त्रियांच्या सभेत भाषण केले आणि नंतर थानबावडी मैदानावर बारा हजार लोकांसमोर जाहीर सभेत भाषण केले. नगर-पालिका व स्थानिक व्यापारी संघांनी त्यांना मानपत्रे दिली.

२. गुंडाप्पा शाबाद्री या लिंगायत किंवा ब्राह्मणेतराने आपल्या जातीची गाऱ्हाणी मांडली होती.

३. गोपाळ कृष्ण गोखले. (१८६६–१९१५); देशभक्त, शिक्षणतज्ज्ञ व राजकारणी. कॉंग्रेस अध्यक्ष १९०५. हिंदसेवक समाजाचे संस्थापक.

४. महादेव गोविंद रानडे. (१८४२–१९०१); समाजसुधारक व ग्रंथकार; मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश. त्याचप्रमाणे पाहा, खंड २, पान, ३६२.

पण आपण ब्रिटिश नोकरशाहीबरोबर त्यांची तुलना करू या. ब्रिटिश नोकरशाही फोडा व झोडा हे धोरण पाळते व आपली सत्ता तलवारीच्या जोरावर राखते. ब्राह्मणांनी शस्त्र-बळाचा आधार कधीही घेतला नाही. त्यांनी आपले श्रेष्ठत्व, बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग व तपश्चर्या यांच्या जोरावर स्थापले आहे. त्यांच्या श्रेष्ठत्वाचा कोणी मत्सर करू नये. माझी ब्राह्मणेतर बंधूंना अशी विनंती आहे की, त्यांनी ब्राह्मणांचा द्वेष करू नये व नोकर-शाहीच्या जाळ्यात सापडू नये.

ब्राह्मणेतर श्रीमंत आहेत. शेतकी त्यांच्या ताब्यात आहे आणि व्यापारही. जर त्यांना सार्वजनिक सेवा करण्याची असक्ती असेल तर असहकारितेच्या चळवळीने तो रस्ता मोकळा केला आहे. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर या दोघांच्या कल्याणाकरिता असह-कारिता आहे. ब्राह्मण शिकलेले असल्यामुळे शाळा-कॉलेजांवर घालावयाच्या बहिष्काराचा उपदेश त्यांना मान्य होईल, पण जे ब्राह्मणेतर अद्याप अशिक्षित आहेत त्यांना तो उपदेश निःसंशय हानिकारक ठरेल. तुम्ही असेही म्हणता की, आधुनिक शिक्षणातूनच माझ्यावरील सर्व चांगले संस्कार झाले आहेत. पण मला हे सांगितले पाहिजे की, आधुनिक शिक्षणाने आपल्या सर्वांना भेकड बनविले. या शिक्षणामुळेच आपण असहाय्य झालो आहोत, आणि परस्परांचा मत्सर करीत आहोत. त्या शिक्षणाने आपल्यात गुलामी मनोवृत्ती वाढविली आहे. जे गुण तुम्ही मला लावता ते खासच ह्या शिक्षणामुळे नाहीत. या शिक्षणाच्या मोहिनीपासून मी स्वतःला फार पूर्वीपासून सोडवून घेतले आहे. मी जो सध्या आहे तो मी, जीवनाची धार्मिक व शाश्वत तत्त्वे शिकलो, आणि भगवद्गीता, महाभारत, रामरक्षा अशांसारख्या धार्मिक व तात्त्विक ग्रंथांच्या अभ्यासाने तयार झालेलो आहे. हे सारे ग्रंथ ब्राह्मणांनीच लिहिले. ब्राह्मणेतर मित्रांनी या साऱ्या गोष्टींचा शांतपणे विचार करावा. आणि माझी खात्री आहे, मी म्हणतो त्यातील सत्य त्यांना पटेल.

मी आणि अलीबंधू भाऊभाऊ म्हणून राहतो. आणि मी हिंदू व मुसलमान जमातींना भाऊ भाऊ म्हणून राहण्याची विनंती करतो. असहकारितेची चळवळ ही आत्मशुद्धीची चळवळ आहे. आपल्या समाजाचा प्राण खाणारे दुर्गुण आपण टाकले पाहिजेत. देशाच्या वेशीवर स्वतःच्या प्राणांचे बलिदान करण्यास आपण तयार असले पाहिजे. वाटेल ती किंमत देऊन आपण अनत्याचारांचे पालन केले पाहिजे. पंजाबच्या लछमन सिंगाने आणि दुलीपसिंगाने जे भव्य उदाहरण घालून दिले आहे ते आपण अनुसरले पाहिजे. जरी त्यांच्यात महंत नारायणदास याला ठार मारण्याची शक्ती होती, तरी स्वतःच्या रक्षणाकरिता त्यांनी बोटही उचलले नाही.

हा जिल्हा दुष्काळग्रस्त आहे याचे मला दुःख होते. म्हणून तुम्ही टिळक स्वराज्य फंडाला मुक्तहस्ताने पैसा देऊ शकला नाहीत. पण या साऱ्या जिल्ह्यात फक्त १४०० चरखे चालले आहेत हे ऐकून मला खेद वाटला. दुष्काळाविरुद्ध चरखा

हे प्रभावी साधन आहे. ८७ टक्के शेतीवर जगणाऱ्या लोकांना तुटीच्या काळात जगण्याचे दुसरे साधन नाही. म्हणून आपण प्रत्येक घरात चरखा चालू केला पाहिजे. त्यामुळे आपण एका दगडाने दोन पक्षी मारू. त्यामुळे स्वदेशी उद्योगाची भरभराट होईल आणि परदेशी कापडाचा बहिष्कार पूर्ण होईल. जर आपण अनत्याचाराच्या मार्गाने जाण्याचा निश्चय करू, ब्राह्मण, ब्राह्मणेतर वाद मिटवू आणि जर हिंदू मुसलमान परस्परांशी बंधुत्वाच्या प्रेमाने वागू, आणि जर प्रत्येक घरात चरखा नेऊ तर याच वर्षात स्वराज्याची स्थापना होईल असे मी आश्वासन देतो.

लोकमान्य टिळकांनी स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे, असे आपल्याला शिकविले आहे. ह्या मंत्राच्या आचरणाकरिता आपल्याला शाळांत किंवा कौन्सिलात जाण्याची जरूरी नाही. आपल्याला हवे असलेले स्वराज्य चरखा देईल. आपल्याला ३० जूनपूर्वी एक कोटी रुपये जमा करावयाचे आहेत. लोकमान्य टिळकांच्या नावाने एक कोटी रुपये जमा करणे कठीण नाही.

नगरपालिका आणि विजापूरचे व्यापारी यांनी मला स्वागतपर मानपत्र दिल्या-बद्दल व माझा गौरव केल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. जेव्हा नगरपालिका आणि व्यापारी आपल्या कर्तव्याला जागृत होतील तेव्हा ते आपल्याला स्वराज्य मिळवून देण्याकरिता आर्थिक मदत करू शकतील आणि खिलाफत व पंजाबसंबंधी न्याय मिळवून देण्यास साहाय्यकर्ते होतील.

'दि हिंदु', ३-६-१९२१

७२. हसन इमाम यांना पत्र

[२७ मे १९२१ नंतर]

प्रिय मित्र,

तुमच्या पत्राबद्दल[1] आणि संलग्न मजकुराबद्दल[2] मी आभारी आहे. प्रक्षोभ शमविण्याकरिता आणि त्रास टाळण्याकरिता मी सर्व काही करीन याबद्दल माझ्यावर अवलंबून राहा. निदान या महिन्यात तरी हिंदुस्थानचा हा भाग सोडणे मला कठीण दिसते.

तुमचा स्नेहांकित.

गांधींच्या हस्ताक्षरातील पत्राच्या फोटोस्टॅटवरून : एस. एन्. ७५३७.

१. हसन इमाम यांनी आपल्या २७ मे च्या पत्रात बकरीदपूर्वी गयेतील तंग वातावरण आणि त्रास टाळण्याकरिता तेथे येण्यास आग्रहाने गांधींना बोलाविले होते.

२. सापडत नाही.

७३. गयेच्या[1] लोकांना सल्ला

मुसलमानांनी मांस आणि मासे खाऊ नयेत म्हणून माझ्या नावाचा उपयोग हिंदू करीत आहेत, अशा बातम्या माझ्याकडे आल्या आहेत. असहकारितेच्या लढ्यात लोकांना शाकाहारी अन्न घेण्यास वळवावे अशी सूचनाही नाही. मग त्याकरिता बळजबरीचा वापर करावा हा प्रश्नच नाही.

माणसाला जे अन्न आवडते ते खाण्यास सक्तीने प्रतिबंध करावा हा अनत्याचार नसून अत्याचार आहे. मद्यपानापासून परावृत्त करण्याकरिता लोकांना भाग पाडावे हीही माझी इच्छा नाही. शांततामय असहकारितेत सक्तीला मनाई आहे. जे कोणी लोकांना जे आवडते ते खाण्याच्या आड येतील ते लोकांच्या समोर गुन्हेगार ठरतील. अशा प्रकारची बळजबरी आपल्या कार्याला फार विघातक ठरणार आहे. म्हणून कोणीही माझ्या नावाने किंवा अहिंसेच्या नावाने लोकांना जे खावयाचे असेल किंवा प्यावयाचे असेल त्याला अडथळा आणू नये. किंवा लोकांचे मांस व मासे हिरावून घेण्यास सांगू नये.

जत्रेच्या ठिकाणी बळजबरीने जनावरे पकडणे याला मनाई आहे.

मोहनदास गांधी

[हिंदीवरून]
' आज ', २९-५-१९२१

१. हसन इमामच्या पत्रावरूनच हे पत्र गया जिल्हा कॉंग्रेस कमिटीला पाठविले होते. मागील प्रकरण पाहा.

७४. गुजरातमधील धनिक वर्गाला

३० जून झपाट्याने जवळ येत आहे. गुजरातमध्ये टिळक स्वराज्य फंडाला आपण दोन लाख रुपयेही जमविले नाहीत. आणि ह्याही रकमेत खऱ्या धनिक वर्गाची देणगी फार थोडी आहे.

श्रीमंत लोकांना आपले कर्तव्य करण्याचे प्रेम नाही का? हिंदुस्थानाने ताठ उभे राहण्यास आणि जगाला तोंड देण्यास समर्थ व्हावे हे पाहण्याची त्यांना इच्छा नाही का? या देशात तीन कोटींवर भुकेली असलेली पोटे भरण्याकरिता आपण आपली रक्कम द्यावी असे त्यांना वाटत नाही का? हिंदुस्थानची कीर्ती त्यांना प्रिय नाही का? हिंदुस्थानने आपली गुलामगिरी फेकून द्यावी हे त्यांना आवडत नाही का? त्यांची इच्छा असल्यास गुजरातचे ओझे एका दिवसात अंगावर घेण्याइतकी त्यांची परिस्थिती नाही का? अहमदाबादच्या गिरणी मालकांना एका दिवसात त्यांनी ठरविले तर दहा लाख रुपये उभे करणे शक्य नाही का?

त्यांची इच्छा असेल तर ते पुष्कळ गोष्टी करू शकतील. जी चळवळ देशात क्रमशः प्रगत होत आहे, त्या चळवळीला ते आपली रक्कम देतील अशी मला आशा आहे.

" जर आम्ही मदत केली तर सरकार आमचे जीवन कठीण करील." श्रीमंत-वर्गाने ही भीती आपल्या मनातून काढून टाकावी अशी माझी इच्छा आहे. अशा भीतीचे दिवस संपले आहेत. आणि पुन्हा जर एका श्रीमंत माणसाला पैसे द्यावयाचे असते तर त्याला धाकदपटशा दाखविणे शक्य झाले असते; पण जर सर्वांनीच पैसे देण्याचे ठरविले तर त्यांच्यापैकी कोणाला दटावले जाईल?

तथापि भय ही अशी गोष्ट आहे की, माणसाला देण्याची इच्छा असूनही ते पैसे देण्याकरिता आपण पुढे व्हावे असे धैर्य कोणाला नसते. अशा प्रकारची भीती टाकून देणे हाही ह्या मोठ्या लढ्याचा परिणाम समजला जावा. मला अशी आशा आहे की, धनिकवर्ग शूर होईल आणि राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या कामात आपला पुरेपूर हिस्सा देईल.

तथापि जर श्रीमंत वर्गातील काही लोकांना निर्भयतेचा धर्म अनुसरणे कठीण वाटत असले तरी ते दयेचा धर्म सोडणार नाहीत अशी मला आशा आहे. दुष्काळ-

ग्रस्तांना शक्य ती मदत ते खास करतील. जेव्हा प्लेग भयंकर स्वरूपात उद्भवला आणि जेव्हा काही दिवसांपूर्वी दुष्काळ पडला तेव्हा श्रीमंतवर्ग कमजोर ठरला नाही. त्यांनी जर काही केले नाही किंवा त्याला जर करणे शक्य झाले नाही तर निदान त्यांनी दुष्काळ निवारणाचे ओझे उचलावे अशी मी त्यांना प्रार्थना करतो.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', २९-५-१९२१.

७५. गुजरातबाहेरील गुजरात्यांना

बेझवाड्याला जी जी मागणी केली त्यातील वाटा गुजरातने तर उचललाच पाहिजे पण जे दुर्बळ प्रांत आहेत त्यांच्या मदतीला धावून गेले पाहिजे. याच कारणाकरिता मी त्यांचा हिस्सा दहा लाख रुपये धरला. जर गुजरातने हे ओझे उचलले नाही तर ३० जूनपूर्वी एक कोटी रुपये जमा करणे खात्रीने अशक्य होईल.

तथापि गुजरातला एक तिसरे ओझे उचलावयाचे आहे. गुजरातच्या काही भागात अवर्षण आहे आणि तेथेही मदत हवी आहे. गुजरातबाहेर राहणारे जे गुजराती आहेत, त्यांचे लक्ष मी या तीनही गोष्टींकडे वेधू इच्छितो. ते कोठेही स्थायिक झालेले असोत, त्यांनी त्या विभागासंबंधी आपले कर्तव्य केलेच पाहिजे. त्यासंबंधी युक्तिवादाला जागा नाही. पण गुजरातविषयीसुद्धा त्यांना तसेच कर्तव्य करावयाचे आहे. अन्यत्र राहणारे सर्व गुजराती लोक जर गुजरातची आठवण ठेवतील तरच त्यांना दहा लाख रुपये देणे शक्य होईल. त्यांनी जर ही आठवण ठेवली तर गुजरात सारीच्या सारी दहा लाख रुपयांची रक्कम देईल एवढेच नव्हे तर अधिकही देईल.

जर मी पारशी व मुसलमान गुजरात्यांना त्यांचे कर्तव्य करण्यास वळवू शकलो तर ते एकटेच एक कोटी रुपयांची भरपाई करू शकतील.

गुजरातमधील दुष्काळावर मला अधिक जोर द्यावयाचा आहे. ओरिसा दुष्काळाच्या वेळी गुजरात्यांनी फार चांगल्या देणग्या[1] दिल्या होत्या. त्या वेळी दुष्काळ निवारण करण्याकरिता ज्या ज्या जरूरी होत्या त्या गुजरातने भागविल्या असे आपण

१. पाहा, खंड १७.

म्हटले तर ते चूक नाही. ते जर खरे असेल तर गुजरातने आपल्या घराजवळील लोकांच्या गरजा भागविल्या तर गुजरात खास विशेष काय करणार आहे?

इतर बाबतीत जे वारे वाहतात ते ज्यांना पसंत नसतील त्यांनासुद्धा ही माझी विनंती आहे. ते दुष्काळ निवारण फंडाला दोन प्रकारे मदत करू शकतील. एक म्हणजे, टिळक स्वराज्य फंडाला पैसे देणे किंवा ह्याला त्यांची हरकत असेल तर फक्त दुष्काळ निवारण फंडासाठीच पैसे पाठविणे. खरोखर, त्यांना तीन निरनिराळ्या देणग्या देण्याच्या प्रकारांतील एक प्रकार स्वीकारता येईल : (१) बिनशर्त पैसे देता येतील.— अशा सर्व रकमा टिळक स्वराज्य फंडात जमा होतील; (२). टिळक स्वराज्य फंडाला पैसे देऊन ते दुष्काळ निवारणाला अंकित निधी म्हणून देता येतील— या रकमा टिळक स्वराज्य फंडात धरल्या जातील, पण दुष्काळ निवारणासाठीच त्यांचा उपयोग केला जाईल; (३) त्या रकमा दुष्काळ निवारणासाठी फक्त देता येतील आणि अशीही स्पष्ट अट घालता येईल की, ती रक्कम टिळक स्वराज्य फंडात जमा करू नये.

जे सरकारी नोकर असतील आणि जे असहकारितेला विरोधी असतील, त्यांनाही तिसऱ्या पर्यायात जी तजवीज केली आहे तिला अनुसरून रकमा देता येतील व त्यांनी त्या द्याव्यात. मिळालेल्या सर्व रकमांचे हिशेब प्रसिद्ध केले जातात. हे सर्व काम तत्पर अशा सेक्रेटरी व खजिनदार यांच्याकडे सोपविले आहे. म्हणून मी गुजरात्यांना अशी कळकळीची विनंती करतो की, त्यांनी भय टाकावे व आपल्या रकमा पाठवाव्यात.

पूर्व आफ्रिका, जपान, इंग्लंड आणि इतर ठिकाणी हिंदी लोकांच्या हातांत हे पत्र पडण्यास काही दिवस लागतील. म्हणून मी गुजरातमध्ये राहणाऱ्या आणि वर निर्दिष्ट केलेल्या देशांत राहणाऱ्या त्यांच्या नातेवाइकांना तारा पाठवाव्यात अशी विनंती करतो.

[गुजरातीवरून]

' नवजीवन ', २९-५-१९२१

७६. माझी टिप्पणे

महाराष्ट्राची यात्रा

ज्या प्रांतात लोकमान्य टिळक महाराज जन्मले, ज्या प्रांताने आधुनिक युगात शूर पुरुष निर्माण केले, ज्याने शिवाजी दिला आणि जेथे रामदास आणि तुकाराम विख्यात झाले, तो प्रांत मला तीर्थक्षेत्रापेक्षा कमी वाटत नाही. मी नेहमी असा विश्वास बाळगत आलो आहे की, महाराष्ट्राने जर मनावर घेतले तर तो वाटेल ते करील. तथापि महाराष्ट्राची संशयी वृत्ती माझ्या दुःखाला सतत कारणीभूत झाली आहे. ज्या प्रांताने सर्वांत जास्त काम करावयास पाहिजे त्याने सर्वांत कमी काम केले आहे. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचे हेच मत आहे असे मला समजते. सिमला सोडल्यावर मी कालक्याला गेलो आणि तेथून अंबाल्याला. तेथून मी मध्यप्रांतातील खांडव्याला गेलो आणि तेथून मी भुसावळ, संगमनेर आणि येवला येथे गेलो. कुर्डुवाडीच्या रस्त्यावर मी ही टिप्पणे लिहीत आहे. तेथे जाण्याकरिता येवल्याहून दौंडाला जावे लागते आणि तेथे गाड्या बदलाव्या लागतात. आमची गाडी दौंडाला उशीरा पोहोचली आणि तिला जोडणारी गाडी अगोदरच निघून गेल्यामुळे मला दौंडचाही थोडासा अनुभव मिळाला. मला असे वाटले की, सगळीकडील जनतेत एकच विश्वास आहे पण पुरेसे कार्यकर्ते नाहीत. लोकांच्यात संघटना शक्तीचा अभाव आहे. आरडाओरड आणि गोंधळ याला तर सुमारच नाही. स्टेशनवरील प्लॅटफॉर्मवर ते लोकांची गर्दी करण्याकरिता त्यांना जमवितात. भुसावळ, संगमनेर आणि येवला येथे तरी निदान मला अगदीच भिकार परिणाम दिसला. ज्यांनी मला या ठिकाणी बोलाविले होते ते लायक कार्यकर्ते असूनही अशी परिस्थिती होती.

या गोंधळाला, जयजयकाराला आणि माझ्या पायाला स्पर्श करण्याकरिता वाकण्याला आता वेळ कोठे आहे ? जर तुम्हांला स्टेशनवर जावयाला रिकामा वेळ आहे, तर तो वेळ तुम्ही चरखा चालविण्यात का खर्च करीत नाही ? त्या वेळेचा उपयोग तुम्ही राष्ट्रीय निधी जमविण्यात का करीत नाही ? आपल्याला पुष्कळ कॉंग्रेस सभासद नोंदवावयाचे नाहीत का ? सध्याची परिस्थिती अशी आहे की जूनअखेरी पूर्वी ठरलेला कार्यक्रम जर आपल्याला पार पाडावयाचा असेल तर चोवीस तास काम केले पाहिजे. दोन महिने निघून गेले पण आपण दोनतृतीयांशच काय पण निम्मेसुद्धा काम केले नाही.

जर जूनपूर्वी आपण कार्यक्रम पुरा करण्यास चुकलो तर त्याचा अर्थ स्वराज्य मिळविण्याची इच्छा आणि शक्ती फारशी प्रबळ नाही.

भुसावळ आणि संगमनेर येथे एकंदरीत समाधानकारक निधी जमला. पण येवल्याला जवळजवळ काहीच जमले नाही. येवला हे सधन गाव आहे. तेथे गुजराती व्यापारी गेली दोनशे वर्षे स्थायिक झाले आहेत आणि तरीही तेथे टिळक स्वराज्य फंडाला जमलेली रक्कम सर्वांत लहान होती. येवल्यातील एकट्याच माणसाने राष्ट्रीय शाळेकरिता वीस हजार रुपये दिले हे खरे आहे. पण या देणगीकरिता फार दिवस वाटाघाटी चालल्या होत्या. त्याशिवाय तो देणगीदार हा धर्मादाय करण्याच्या वृत्तीचा आहे हे सर्वांना ठाऊक आहे. तथापि टिळक फंडाकरिता साऱ्या लोकांकडून रकमा गोळा करावयाच्या होत्या. स्त्रिया आणि पुरुष सर्व मिळून एकूण रक्कम रुपये ३०० सुद्धा झाली नाही. याच्या उलट येवल्याजवळील एका लहान खेड्यावरून आम्ही जात असता तेथल्या लोकांनी तितकीच रक्कम दिली.

एका शृंगापत्तीत

येवल्याला मी एका गंभीर शृंगापत्तीत सापडलो. वर निर्दिष्ट केलेले वीस हजार रुपये स्वीकारण्याकरिता मला बोलाविले आणि राष्ट्रीय शाळा मला उघडण्यास सांगितले. आम्ही येवल्याला रात्री दहा वाजता पोहोचलो. मरारात्री एक वाजता जाहीर सभा भरली. मी इतका दमलो होतो की, शब्दाने त्याचे वर्णन करता येत नाही. सर्व दिवस मोटरीने प्रवास केल्यानंतरही मला जागे राहावे लागले. सभेत मी राष्ट्रीय शाळेबद्दल बोललो. तेथे मी असे ऐकले की, अगदी या वर्षीसुद्धा ते शाळेत इंग्रजी शिकविणार आहेत. खरोखर सांगावयाचे म्हणजे अशी शाळा उघडण्याला मला बरे वाटत नव्हते. पण इंग्रजी शिकविण्यासंबंधी माझे विचार सांगितल्यानंतर शाळा सुरू करण्याविषयी चार शब्द सांगितले. हा कडू घोट मी घशाखाली घातला. दुसरा दिवस हा माझ्या मौनाचा पवित्र दिवस होता. तथापि न बोलता मी तेथे जाईन व शाळा उघडीन असे कबूल केले होते आणि आता मला असे कळले की, त्या शाळेत अस्पृश्यांना प्रवेश मिळणार नव्हता. मी पुष्कळ शाळा उघडल्या आहेत पण निदान ह्या वर्षी तरी अशी एकही शाळा उघडली नव्हती. शाळेच्या चालकांना मला असा निरोप पाठवावा लागला की, अशा प्रकारची शाळा उघडण्याला मी येऊ शकत नाही आणि शेवटी मी गेलोही नाही. कराचीमध्ये माझ्यावर स्वदेशी भांडार उघडण्याचा असाच प्रसंग आला होता. त्या भांडारात सर्व प्रकारचा माल भरला होता आणि म्हणून मी ही शाळा उघडण्याचे ज्याप्रमाणे नाकारले, त्याप्रमाणे त्याच्या उद्घाटनालाही नकार दिला. ज्या चळवळीमुळे

असहकारितेच्या कार्यक्रमाला अडथळा येतो किंवा ज्यासंबंधी माझे विचार ठाम आहेत, अशा कोणत्याही चळवळीत भाग घेण्यास मला बोलावू नये.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', २९-५-१९२१

७७. मुंबईच्या[१] जाहीर सभेत भाषण

मे २९, १९२१

सुरवातीला गांधीजींनी लोकांना ४ वाजल्यापासून बसून राहावे, लागले याबद्दल खेद प्रकट केला. पण ते म्हणाले, या उशिराबद्दल मी दोषी नाही. कारण सभा संध्याकाळी ७॥ वाजता सुरू होईल असे सांगण्यात आले. माझा सर्व वेळ तुमच्याकरिताच होता, व तो माझ्याकरिता ठेवला नव्हता असे त्यांनी सांगितले.

ह्या देशात सध्याचा काळ सभांच्यासाठी नाही. तो काळ भरीव कामगिरीकरिताच आहे. मी सुमारे ६ दिवस सिमल्याला होतो, हे तुम्हांला कदाचित ठाऊक असेल आणि व्हाइसरॉयना भेटावयास मी जो गेलो, तो त्यांच्याकडून काही मिळावे ह्या हेतूने गेलो नव्हतो, हे मी तुम्हांस एकदम सांगून टाकतो असे ते म्हणाले. पंडित मालवीयांनी मला सिमल्याला बोलाविले, आणि माझे मित्र मि. ॲन्ड्र्यूज यांनी मला सांगितले की, व्हाइसरॉय तुम्हांला भेटू इच्छितात. म्हणून मी व्हाइसरॉयना भेटावयास गेलो आणि तेथे जे घडले ते असे : मी व्हाइसरॉयना जे काय सांगावयाचे होते ते सर्व काही सांगितले, आणि लार्ड रीडिंगनी माझे म्हणणे मोठ्या धीमेपणाने, सदयतेने व मोठ्या थंडपणाने ऐकून घेतले.

१. एफ्. वॉर्ड काँग्रेस कमिटी आणि माटुंगा रहिवाशांची संस्था यांच्या विद्यमाने सुमारे ७॥ वाजता सायंकाळी माटुंग्यास एक मोठी सभा भरली होती.

तेथे जे काही घडले ते आपण यंग इंडियात लिहिले आहे असे गांधीजींनी सांगितले. मी व व्हाइसरॉय एकमेकांना चांगले समजू शकलो आहोत. मुलाखतीनंतर मला असहकारितेच्या मार्गाने काय मिळवावयाचे आहे ते व्हाइसरॉयना समजून आले असे गांधीजी म्हणाले.[1]

हिंदुस्थानचे भाग्य आपल्याच हातात आहे. आपले कर्तव्य साधे व सरळ आहे व ते म्हणजे आपण अनत्याचारी असणे. मुसलमान व हिंदूंनी एकीने वागले पाहिजे. लोकांनी वीस लाख चरखे सुरू केले पाहिजेत. लोकांनी काँग्रेसचे एक कोटी सभासद नोंदविले पाहिजेत. व टिळक स्वराज्य फंडाला एक कोटी रुपये जमविले पाहिजेत. ह्या साऱ्या गोष्टी जून संपण्यापूर्वी पुऱ्या करावयाच्या आहेत. गेल्या दोन महिन्यांत जी अपेक्षा लोकांकडून होती ती अद्याप पुरी झाली नाही याबद्दल त्यांना अत्यंत दुःख झाले. त्याकरिता लोकच दोषी आहेत. आपल्या कार्यक्रमात लोकांनी जर प्रगती केली नसेल तर त्याचे कारण प्रयत्नात कसूर हे होय. जर काँग्रेसने तुमच्यासमोर ठेवलेले काम तुम्ही पुरेही करू शकला नाहीत तर स्वराज्य मिळणे कसे शक्य आहे व खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर करणे हेही कसे शक्य आहे ? लोक आपल्या कर्तव्यात चुकणार नाहीत अशी मला आशा होती. आणि मी देवाला अशी कळकळीची प्रार्थना करीत होतो की, त्याने लोकांना मातृभूमीची सेवा करण्याकरिता पुरेशी शक्ती द्यावी.

तुमच्यापैकी प्रत्येक बंधु-भगिनीने मला काँग्रेसचे सभासद व्हावयास पाहिजे आहे. जर भीतीमुळे किंवा स्वार्थी हेतूमुळे तुम्ही काँग्रेसचे सभासद झाला नाही तर तुम्ही स्वराज्याला कधीच लायक ठरणार नाही.

जर तुम्ही स्वराज्याकरिता एक कोटी रुपये जमविणार नसला तर कधी काळी तुम्हांस स्वराज्य मिळेल का ? जर तुम्ही स्वराज्याकरिता सर्व मिळून एक कोटी रुपये जमविण्यास असमर्थ असला तर तुम्ही स्वराज्याला कसे लायक व्हाल ? जर तुम्हांला सर्व मिळून ही रक्कम जमा करता आली नाही तर स्वराज्याला तुम्ही नालायक आहात म्हणून ते तुम्हांला मिळणार नाही व मिळू नये. या शहरात तुम्ही नाटके, सिनेमा व इतर चैनी यावर किती पैसा वाया घालविता याचा आणि साऱ्या देशात दारूवर किती

१. सिमला भेट ता. २५-५-२१ चा लेख पाहा.

पैसा खर्च करता याचा विचार करा. ह्याच वर्षात सुमारे ७० कोटी रुपये दारूवर खर्च झाले. अशा व्यसनाकरिता इतका पैसा जर तुम्ही खर्च करू शकता तर स्वराज्याकरिता तुम्हांला एक कोटी रुपये देता येणार नाहीत काय ? हिंदुस्थानात प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला सुमारे दोन पैसे येतात यात माझे समाधान नाही. तुम्हांला एक कोटी रुपये जमवावयाचे आहेत व ते जमविणे तुमचे कर्तव्य आहे. गांधीजी म्हणाले, एकटे मुंबई शहर ती मोठी रक्कम या फंडाला देऊ शकेल.

गांधीजी म्हणाले, माझ्याकडे आताच २३१ रुपये मॉरिशसच्या व्यापाऱ्याकडून आले आहेत. यावरून असे सिद्ध होते की, दूरच्या देशातील आपले बांधव स्वराज्य मिळविण्याच्या आपल्या इच्छेबरोबर आहेत. गांधी म्हणाले, आजच मला रुस्तमजी घोरकोडू यांच्याकडून या देशात चरखे सुरू करावेत म्हणून बारा हजार रुपये आले आहेत. हे उज्ज्वल उदाहरण अनुकरणीय आहे. या देशासंबंधीचे कर्तव्य करण्यास आता तुमच्यापुढे फक्त एकच महिना उरला आहे. ह्या देशात नेहमी सर्व चळवळींच्या अग्रभागी असलेल्या मुंबई शहराला मी विनंती करीत आहे. मुंबईने जालियनवाला बाग फंडाला सर्वांत मोठी रक्कम दिली आणि मुंबईत टिळक फंडाला मोठी रक्कम देण्याची शक्ती आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, असे सांगितले आणि ते आपण मिळविले पाहिजे. जर तीस कोटी लोकांनी स्वराज्य मिळविण्याचा निश्चय केला तर त्यांच्या एकमुखी मागणीआड कोण येऊ शकेल ? तुम्हांला एक कोटी रुपये जमविणे अशक्य नाही असे गांधी म्हणाले.

माटुंग्याने स्वराज्य फंडाला फक्त पाच हजार रुपये जमविले हे पाहून गांधींना अत्यंत दुःख झाले. इतकी लहान रक्कम जमवून आपण आपले कर्तव्य केले अशी तुम्ही स्वतःची फसवणूक करणार आहात काय ? किंवा तुम्ही तेवढ्याने आपले कर्तव्य केले अशी देशाची फसवणूक करणार आहात काय ? जूनअखेर तुमची परीक्षा होणार आहे व त्या दिवशी तुम्ही यशस्वी व्हाल अशी मला आशा आहे. माटुंग्याच्या रहिवाशांनी स्वराज्य फंडाला जास्तीत जास्त रक्कम द्यावी अशी त्यांनी विनंती केली.

आमच्याजवळ पैसा नाही असे तुम्ही खास म्हणू शकणार नाही. जेव्हा तुमच्या मुलांची किंवा मुलींची लग्ने करावयाची असतात, तेव्हा तुम्ही शक्य तितका पैसा अगदी मुक्तहस्ताने उधळत नसता का ? किंवा स्वतःला लागणाऱ्या कोणत्याही गोष्टीकरिता तुम्ही पैशाची काटकसर करता का ?

सध्या हिंदुस्थानच्या विवाहाची वेळ आली आहे आणि तुम्ही त्याकरिता शक्य तितका सर्व पैसा दिला पाहिजे. किती पैसा जमवावयाचा आहे याचा विचार करू नका. स्वराज्याकरता प्रत्येकाने आपले सर्वस्व दिले पाहिजे. धर्माव्यतिरिक्त कोणताही दागिना अंगावर घालण्याचा सध्या कोणत्याही स्त्रीला अधिकार नाही.जी सीता रामचंद्राच्या मागे गेली तिचे बायकांनी अनुकरण करावे. तिने सर्व दागिन्यांचा त्याग केला आणि तिचेच अनुकरण हिंदी स्त्रियांनी करावे. जर तुम्हांला रामराज्य हवे असेल तर फंडाला तुमचे दागिने द्या. अशा चळवळींना स्त्रिया ह्या विशेष लायक असतात. त्या पुरुषांपेक्षा अधिक प्रयत्न करू शकतात म्हणून गांधींनी त्यांना विनंती केली. जर स्त्रियांना परदेशी कपडे, दागदागिने, फ्रेंच व जपानी रेशमी कपडे, मँचेस्टरची मलमल पाहिजे असेल तर त्यांना स्वराज्य कसे मिळेल ? तुम्ही स्त्रिया, देशाकरिता ह्या गोष्टी टाकणार नाही का ? आणि साधी खादी वापरणार नाही का ? आपल्या देशातील पुष्कळ जणांना धड कपडेही नसतात. आणि प्रत्येकाच्या अंगावर नीटनेटके कपडे असावेत असे मला वाटते; म्हणून लोकांनी खादी सर्वोत्तम आणि अत्यंत पवित्र मानली पाहिजे. प्रत्येक घरात सुताची गिरणी काढली पाहिजे व चरख्याशिवाय ती कशी काढता येईल ? स्त्री–पुरुषांना भरडून टाकण्याकरिता मला मोठ्या गिरण्या नकोत, असे गांधी म्हणाले. परदेशी कापड वापरणे हे पातक आहे. व ते अयोग्य आहे असे हिंदी लोकाना वाटले पाहिजे. जोपर्यंत खादी हे पवित्र वस्त्र आहे असे वाटत नाही, तोपर्यंत लोकांना स्वराज्य कधीही मिळणार नाही. जोपर्यंत आपण तलम कापड निर्माण करू शकत नाही तोपर्यंत आपण खादीवर संतुष्ट राहिले पाहिजे. आपल्या बंधुभगिनींनी कातलेल्या सुताच्या खादीपेक्षा अधिक चांगले, अधिक पवित्र आणि अधिक सुंदर वस्त्र नाही. खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर व्हावेत म्हणून ह्या सर्व गोष्टी करणे आवश्यक आहे.

ह्या शहरातून धर्माचे पूर्ण उच्चाटन झाले आहे असे मी मानीत नाही, असे गांधीजी म्हणाले. मुंबईच्या लोकांना विलासी वस्तूंची आवड आहे. त्यांना स्वास्थ्य व चांगल्या गोष्टी पाहिजेत, आणि जगातील चांगल्या गोष्टीही पाहिजे आहेत असे गांधींना वाटत होते. पण मुंबईचे लोक पापी नाहीत. स्वराज्याकरिता त्यांना या सर्व गोष्टी सोडाव्या लागतील. त्यांना सिनेमा, नाट्यगृहे आणि दारूची दुकाने सोडावी लागतील. त्यांनी सर्व दुर्गुण व व्यभिचार सोडले पाहिजेत. प्रत्येकाने आपल्या पत्नीशिवाय इतर स्त्रिया मातेप्रमाणे किंवा बहिणीप्रमाणे आहेत असे मानले पाहिजे.

राष्ट्राच्या ह्या संकटकाळी लोकांना आपले कर्तव्य करण्यास परमेश्वराने भरपूर शक्ती व धैर्य द्यावे, अशी त्यांनी परमेश्वराची प्रार्थना केली. श्रीमती नायडू यांचे भाषण ऐकण्यापूर्वी गांधींनी त्यांना टिळक स्वराज्य फंडाला भरपूर मदत करा अशी मागणी केली.[1]

सिमल्याला झालेल्या माझ्या भेटीचा निष्कर्ष ऐकण्यास तुम्ही उत्सुक असाल. मी तेथे काहीही मिळविण्याकरिता गेलो नव्हतो. नामदार मालवीय यांच्या बोलावण्यावरून मी तेथे गेलो आणि माझा दृष्टिकोण मी व्हाइसरॉयना समजावून सांगितला. त्यांनी माझे सर्व म्हणणे शांतपणाने, धीमेपणाने व आदराने ऐकून घेतले. त्याचा परिणाम एवढाच झाला की, आम्ही एकमेकांना समजू शकलो आणि मी असहकारितेतून कशाची इच्छा करीत आहे हे त्यांना समजावून सांगू शकलो. तथापि जे काय मिळवावयाचे आहे ते आपल्याच हाती आहे.

आपल्याला आपले कर्तव्य करावयाचे आहे. ३० जूनच्या आत आपल्याला एक कोटी रुपये जमवावयाचे आहेत व वीस लाख चरखे सुरू करावयाचे आहेत.

तुम्ही काय केले असे विचारण्याचा मला हक्क आहे व तो मी बजावतो. जर आपण आपल्या कर्तव्यपूर्तीचे आश्वासन देऊ शकलो नाही तर आपण स्वराज्याला लायक कसे ठरू ? हिंदुस्थानच्या लोकांवर आणि परमेश्वराच्या कृपेवर माझा पुरेपूर विश्वास आहे. आणि त्यामुळेच मला अंगीकृत कार्यात यश मिळेल अशी खात्री वाटते. तुम्ही किती काम कराल हे पाहण्याची मला इच्छा आहे. पहिल्यांदा निर्भय व्हा. टिळक महाराजांच्या स्मृतिकरिता एक कोटी रुपयांचा त्याग करण्यास आपण तयार नसू, जर ही रक्कम जमविण्याकरिता आपल्याजवळ पुरेशी प्रामाणिक माणसे नसतील तर स्वराज्याला आपण कसे लायक होऊ ? नाटके, सिनेमा वगैरेंवर वाटेल तेवढा पैसा वाया दवडला जात आहे. मुंबईने ठरविले तर तीच एक कोटी रुपये देऊ शकेल. देशाकरिता जास्तीत जास्त किती पैसा देता येईल याचा प्रत्येकाने विचार करावा. मॉरिशसच्या व्यापारी पेढीने माझ्याकडे २५१ रुपये पाठविले. मि. रुस्तुमजी घोरखोडू यांनी आफ्रिकेतून १२,००० रुपयांचा चेक पाठविला. पैसे देण्याच्या बाबतीत मुंबईचा क्रमांक पहिला आहे. जालियनवाला बाग फंडाच्या बाबतीतही सर्वांत मोठी रक्कम मुंबईची होती. मुंबईकडे संपत्ती येते; आणि लोकांना मुक्तहस्ताने ती देण्याची शक्ती आहे.

१. हे वृत्त मुंबई क्रॉनिकलवरून घेतले आहे. याचा पुढील भाग गुजराती पत्रात प्रसिद्ध झालेल्या गुजराती भाषणावरून घेतला आहे.

सत्तेचे लगाम आपल्या हातात घेणे ही गोष्ट ३० कोटी लोकांना फारशी मोठी नाही. पण त्या प्रश्नात मी आता शिरू इच्छित नाही. माटुंग्याने ५००० रुपये जमविले पण तेवढ्याने माझे समाधान झाले नाही. तुम्ही आपल्या मुलामुलींच्या लग्नात अत्यंत उदारतेने पैसा खर्च करता. आता तुम्हांला हिंदुस्थानच्या डोक्यावर मुगुट चढविण्या-करिता पाचारण केले आहे. ही वेळच अशी आहे की जेव्हा देशच विवाहित होणार आहे. अजून ८० लाख जमवावयाचे आहेत. स्त्रियांनी विवाहचिन्हाचे दागिने ठेवून बाकीचे सर्व देऊन टाकावेत. जर स्त्रियांनी धर्माचरण केले तर देशाची भरभराट होईल. जर त्यांना परदेशी कापड हवे असेल तर आपला उत्कर्ष कसा होईल ?

स्वराज्याचा अर्थ अन्नवस्त्राच्या बाबतीत स्वतःची गरज भागविण्याची शक्ती. आपल्या गिरणीत पुरेसे कापड निघत नाही. जे नागडे उघडे आहेत त्यांच्याकरिता गिरणीचे कापड ठेवून द्यावे. स्वराज्याचा खरा अर्थ म्हणजे देशातील प्रत्येक गरीब माणसाला अन्नवस्त्र मिळालेच पाहिजे हा होय. आणि त्याकरिता आपल्याला खादीची भव्यता पटली पाहिजे. आपण प्रत्येक घरात चरखा सुरू केला पाहिजे आणि खादी-शिवाय दुसरे कापड वापरणे हा अधर्म आहे हे स्वतःला सांगितले पाहिजे. जेव्हा खादीचा सर्वत्र प्रसार होईल तेव्हा देशात सत्य धर्माची स्थापना होईल. आपल्या भगिनींनी कातलेल्या सुतापासून विणलेले कापड जरी बोजासारखे वाटले तरी ते वापरण्यात आपण सुख मानले पाहिजे. मी सांगितलेला उपदेश हा जर तुम्ही पाळलात तर स्वराज्य दूर नाही.

जरी मुंबई ही विलास आणि सुखाच्या आहारी गेली असली तरी तिचे अंतःकरण मृदू आहे. आणि कठीण प्रसंगी मुंबई दुःखितांच्या मदतीला धावून जाण्यास तयार असते. एक वेळ अशी येईल की, दारू– इतर चैनी नाहीशा होतील आणि मुंबईतील लोक शुद्ध व पवित्र जीवनावर प्रेम करू लागतील. शेवटी माझे एवढेच म्हणणे आहे, तुम्ही मुंबईच्या लोकांनी शक्य तितके पैसे[1] द्यावेत.

'मुंबई क्रॉनिकल', ३०-५-१९२१ व 'गुजराती', ५-६-१९२१

१. सभेच्या शेवटी सरोजिनी नायडू स्वयंसेवकांसह चोहोकडे हिंडल्या व त्यांनी पैसे व स्त्रियांपासून दागिने गोळा केले.

७८. टिप्पणे

अफगाणची भयसूचना

काही हितसंबंधी विभागांतून उठलेली अफगाणसंबंधीची गर्जना ही श्री. बिपिनचंद्र पाल[1] यांना भयभीत करीत आहे याचे इतर लोकांप्रमाणे मलाही आश्चर्य वाटते. ते संपूर्ण स्वराज्यावर विश्वास ठेवणारे आहेत आणि मी श्री. पाल यांना असे सुचवू इच्छितो की, जोपर्यंत आपण असहाय्यतेच्या भावनेतून स्वतःची सुटका करून घेत नाही तोपर्यंत आपण हिंदुस्थानात स्वराज्य स्थापन करू शकणार नाही. स्वराज्य याचा अर्थ अफगाणांचा आणि आपल्या देशातील इतर धोक्यांचा समाचार घेण्याची तयारी हा होय. असहकारितेची सारी योजना दुसऱ्या लोकांवर विश्वास ठेवण्यावर आणि जर ते अविश्वासू ठरले तर आत्मक्लेशाने त्यांच्या फसवणुकीला तोंड देण्याची आपली तयारी असण्यावर आधारलेली आहे. डॉ. सप्रू[2] यांना उत्तर देताना अलाहाबादच्या हिंदू-मुस्लिम परिषदेमध्ये श्री. पाल यांनी जे सत्य प्रतिपादन केले, त्याची मी त्यांना आठवण करून देऊ इच्छितो. ते म्हणाले, ज्या ऐक्याच्या, हिकमतीच्या आणि क्लेशाच्या शक्तीने सध्याची गुलामगिरी पद्धत संपणार आहे, तीच शक्ती तशाच प्रकारच्या इतर पद्धतींचा समाचार घेण्यास आपल्याला समर्थ करणार आहे.

श्री. पाल यांना ज्या विश्वव्यापी इस्लाम धर्माची भीती वाटते, तो सिद्धांत मुसलमानांना मुस्लिम राष्ट्रांचे दृढ ऐक्य व्हावे ह्या इच्छेपुरता कौतुकास्पद आहे. पण जर त्याचा अर्थ जगाच्या शोषणाकरिता किंवा सक्तीने जगाला इस्लामची दीक्षा देण्याकरिता साऱ्या इस्लामी सत्तांचे एकीकरण करावे हा असेल तर तो सिद्धांत भयंकर ठरेल. माझ्या ओळखीच्या कोणाही डोके ताळ्यावर असलेल्या मुसलमानाने ही धर्मांतराची कल्पना मनात बाळगलेली नाही. पाशवी शक्तीच्या वर्चस्वाला जग आता कंटाळत चालले आहे.

मी श्री. पाल यांना असे आश्वासन देतो की, मी कोणत्याही भावनांशी केलेल्या चाळ्यांवर विश्वास ठेवीत नाही. ज्या भावना वाईट आहेत त्या मी टाकून देतो व चांगल्या आहेत त्यांना कवटाळतो. गंभीर प्रकृतीचे हिंदू हे जितके अफगाण सत्तेचे

१. १८५८ ते १९३२; शिक्षणतज्ज्ञ, वृत्तपत्रकार, वक्ते आणि बंगालचे राजकीय पुढारी.

२. सर तेजबहाद्दूर सप्रू (१८७५ ते १९४९), कायदेपंडित व नेमस्त पुढारी. हिंदुस्थान सरकारतर्फे गोलमेज परिषदांना १९३०–३१–३२ साली प्रतिनिधी.

स्वागत करणार नाहीत तितकेच गंभीर प्रकृतीचे मुसलमानही करणार नाहीत असा माझा विश्वास आहे. "अफगाण बागुलबोवा" यावर लेख लिहिताना माझे लक्ष एका साथीदाराच्या अचूक परिस्थितीचा बचाव करावा आणि हितसंबंधी लोकांकडून उठविलेल्या आरोळ्यांमुळे घाबरून जाऊ नये असा इषारा हिंदुस्थानला द्यावा एवढाच होता.

अफगाण आक्रमण झाले किंवा अशा आक्रमणाची नुसती हूल उटली तरी त्यामुळे आपल्या देशातील बहुसंख्याक मुसलमान लोक जरी उघड बंडाला प्रवृत्त झाले नाहीत तरी अराजक माजवितील या श्री. पाल यांच्या मताशी मी संपूर्णपणे विरोधी आहे. उलटपक्षी माझा असा ठाम विश्वास आहे की, मुसलमानांचे सर्वस्व आज पणाला लागले आहे. त्यांच्या धर्माचा मान पणाला लागल्यामुळे ते असे वेडगळपणाचे कृत्य करणार नाहीत. मौलाना शौकतअली यांनी वारंवार म्हटल्याप्रमाणे मुसलमान हे अत्याचार आणि अनत्याचार यांच्यात संमिश्रण न करण्याइतके चाणाक्ष आहेत. "हिंदूतील फार मोठ्या वर्गाला मुसलमानांचा सूड घेऊन आपले वैर उगवून घ्यावयाचे आहे." असा जो आरोप श्री. पाल यांनी हिंदूंवर केला आहे त्या आरोपामुळे त्यांनी हिंदूंवर गंभीर अन्याय केला आहे. त्यांना हिंदूंचे मन पूर्णपणे चुकीचे समजले आहे अशी खात्री देण्याचे मी धाडस करतो. जशी मुसलमानांना खिलाफतीबद्दल तळमळ आहे तशीच हिंदूंना गाईबद्दल आहे. आणि हिंदूंना हे ठाऊक आहे की, प्रत्येक हिंदूने उराशी बाळगलेले गोरक्षणाचे जे स्वप्न आहे ते मुसलमानांच्या सदिच्छेशिवाय साकार होणार नाही. मला हे ठाऊक आहे की, प्रत्येक मुसलमान हा हिंदूंच्या ऐच्छिक मदतीने इस्लामची प्रतिष्ठा आपण राखू शकलो, यामुळे हिंदूंचा कायमचा ऋणी राहील त्याचप्रमाणे जेव्हा मुसलमान गाईंचे प्राण राखण्यास मदत करतील, तेव्हा भूतकाळात प्रत्येक मुसलमानाने केलेले अपकृत्य हिंदू विसरतील असे मी अभिवचन देतो.

मुसलमान व हिंदू अफगाण स्वारीचे स्वागत करतील हा जो सिद्धांत श्री. पाल यांनी मांडला आहे त्यातील सत्य मी पूर्णपणे अमान्य करतो. मौलाना महंमदअली यांच्या गृहीत धरलेल्या हेतूविरुद्ध जी निषेधाची लाट उटली त्यावरून हिंदुस्थान अफगाण आक्रमण सहन करणार नाही याबद्दल कोणाचीही खात्री पटेल.

श्री. पाल असे सूचित करतात की जर अमिरांनी स्वारी केली आणि जर आपण सरकारला मदत केली नाही तर क्रांतीच होणे शक्य आहे. मी दुसरा पर्याय सुचवू इच्छितो. जर असहकारितावादी हिंदुस्थानने मदत केली नाही तर सरकार लोकांशी तडजोड करील. ब्रिटिश लोक इतके व्यवहारशून्य असतील किंवा ते हिकमती लढविणार नाहीत असे मला वाटत नाही. ते हिंदुस्थान सोडण्याऐवजी आमच्याशी तडजोड करतील व खिलाफत व पंजाबच्या जखमा भरून काढतील. हिंदुस्थानला अद्याप लक्ष

वेधून घेण्याइतकी शक्ती प्राप्त झालेली नाही हे मला चांगले ठाऊक आहे. म्हणून मी फक्त एक संभाव्य पर्याय सुचविला आहे.

श्री. पाल यांना लालाजींच्या[1] आणि सिमल्यास मी केलेल्या जाहीर घोषणेत फरक दिसतो आणि तसाच आमच्या पूर्वीच्या घोषणांतही दिसतो. लाला लजपतराय किंवा मी यांपैकी कोणीही अफगाण स्वारीचे स्वागत कधीही केले नाही. पण मी स्पष्ट शब्दांत माझी स्वतःची भूमिका आनंदाने मांडीत आहे.

(१) अफगाणांना हिंदुस्थानवर स्वारी करावयाची आहे या गोष्टीवर माझा विश्वास नाही.

(२) अफगाण आक्रमणाचा समाचार घेण्यास सरकार पूर्ण सुसज्ज आहे असा माझा विश्वास आहे.

(३) मला हे कबूल करण्यात दुःख वाटते की, जर अफगाण स्वारी झाली तर प्रत्येक राजा व महाराजा सरकारला बिनशर्त मदत करील.

(४) माझा असाही विश्वास आहे की, आपण लोक हे इतके नीतिभ्रष्ट, स्वतःवर विश्वास नसणारे आणि अफगाणच्या हेतूविषयी अविश्वास बाळगणारे व हिंदू आणि मुसलमान हे एकमेकांवर विश्वास न ठेवणारे आहोत की नुसत्या घाबरटपणामुळे आपण सरकारला मदत करण्याकरिता धावत सुटू. आणि अशा प्रकारे हिंदुस्थानच्या भोवती जखडलेली शृंखला अधिक बळकट करू.

(५) हिंदुस्थानवरील स्वारी आणि ब्रिटिश सरकारची खिलाफतीकरिता होणारी स्वारी यात सैद्धांतिक दृष्टया भेदाभेद करणे शक्य आहे. प्रत्यक्ष व्यवहारात अफगाण लोक सरकारला अडचणीत टाकण्याकरिता हिंदुस्थानवर स्वारी करतील असे मला वाटत नाही, आणि यशस्वी झाल्यास हिंदुस्थानात राज्य स्थापण्याचा मोह टाळण्यास ते समर्थ होतील असे मला वाटत नाही.

(६) पण हा विश्वास वाटत असला तरी ज्या सरकारला ते संपवू इच्छितात किंवा सुधारू इच्छितात त्या सरकारला बिनशर्त मदत करणे हे असहकारितावाद्यांच्या श्रद्धेविरुद्ध आहे असें मी समजतो.

(७) त्या वेळी प्रचलित असलेल्या घटनांवर मूठभर सदसद्विवेकबुद्धीच्या विरोधकांना काहीही प्रभाव पाडता येणार नाही. पण ते शूर हिंदुस्थान निर्माण करण्याचे बी पेरतील.

(८) स्वतःच्या मानाचे मोल देऊन अफगाण स्वारीपासून आपले स्वातंत्र्य खरेदी करण्याऐवजी अफगाणांच्या हातून हिंदुस्थान नष्ट झालेला पाहणे मला पसंत

१. लाला लजपतराय.

आहे. जे सरकार खिलाफत आणि पंजाबच्या जखमा चिघळत ठेवीत आहे, अशा पश्चात्ताप न होणाऱ्या सरकारकडून हिंदुस्थान रक्षिला जाणे याचाच अर्थ हिंदुस्थानचा मान विकून टाकणे हा आहे.

(९) तथापि ब्रिटिश राष्ट्रावर माझा असा विश्वास आहे की, जेव्हा आपण आपल्या उद्दिष्टाविषयी पुरेशी शक्ती दाखवू आणि पुरेसा स्वार्थत्याग करू त्या वेळी ब्रिटिश सरकार पूर्णपणे वठणीवर येईल. माझे इतिहासाचे वाचन असे आहे की, ब्रिटिश लोक शुद्ध व सरळ न्यायाला कधीही शरण जात नाहीत. त्यांच्या 'व्यवहार-ज्ञाना'ला ही गोष्ट फारच कठीण वाटते. पण ते इतके दूरदर्शी आहेत की, जेव्हा न्यायाची सांगड शक्तीशी घातली जाते त्या वेळी ते आपली मान तुकवितात. ती शक्ती पाशवी आहे का आत्मिक आहे याची ते फिकीर करीत नाहीत.

(१०) प्रत्येक असहकारितावाद्याचे हे कर्तव्य आहे की, त्याने अफगाण लोकांना असे समजावून दिले पाहिजे की, खिलाफतीला युद्धपूर्व स्थान प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य असहकारितेत आहे, असा आमचा विश्वास आहे. तसेच त्यांना हेही पटविले पाहिजे की, हिंदुस्थानला त्यांच्या सशस्त्र मध्यस्थीचीही जरूरी नाही. हिंदुस्थानला पारतंत्र्यात ठेवण्याकरिता ब्रिटिश सरकारबरोबर कोणताही सौदा करण्यास अफगाणांनी नकार दिला तर असहकारितावादी त्यांच्याबद्दल आपले चांगले मत बनवतील आणि हिंदुस्थानच्या आपल्या शेजाऱ्याविषयीच्या भावना अत्यंत मित्रत्वाच्या पलीकडे कोणत्याही नाहीत असेही त्यांना कळविले पाहिजे.

इंग्रजी शिक्षण

डॉ. टागोर[1] यांनी असहकारितेवर जी टीका केली आहे तिला उत्तर[2] देण्याचा माझा नम्र प्रयत्न वाचकांना दुसरीकडे पाहावयास सापडेल. त्यानंतर त्यांनी शांतिनिकेतनच्या व्यवस्थापकांना पाठविलेले पत्र मी वाचले. ते पत्र रागाने व वस्तुस्थितीच्या अज्ञानाने लिहिले आहे हे पाहून मला दुःख होते. मि. पियर्सन[3] यांचे भाषण लंडनमधील काही विद्यार्थ्यांनी ऐकण्याचे नाकारल्यामुळे ते स्वाभाविकपणेच संतप्त झाले. मि. पियर्सन हे एक सच्चे इंग्लिश गृहस्थ आहेत. डॉ. टागोर हे आणखी एका गोष्टीकरता तितकेच संतप्त झाले त्याचे कारण मी आमच्या स्त्रियांना इंग्लिशचा अभ्यास थांबविण्यास सांगितले हे होय. मी जो सल्ला दिला त्याची कारणे कवींनी स्वतःच अनुमानाने शोधून काढली.

१. रवीन्द्रनाथ टागोर (१८६१–१९४१). कवी व ग्रंथकार. १९१३ साली साहित्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळाले; शांतिनिकेतनचे संस्थापक. आता विद्यापीठ.

२. पुढील प्रकरण पाहा.

३. डब्ल्यू. डब्ल्यू. पियर्सन; बंगालमध्ये मिशनरी म्हणून काम करीत होते; सी. एफ ॲन्ड्यूजचे सहकारी; काही काळ शांतिनिकेतनमध्ये शिक्षक.

जर त्यांनी विद्यार्थ्यांचा उद्धटपणा हा असहकारितेशी जोडला नसता तर किती बरे झाले असते. आणि जर त्यांनी पुढील गोष्टी लक्षात ठेवल्या असत्या तर किती चांगले झाले असते. त्या गोष्टी अशा. असहकारितावादी ॲन्ड्र्यूज यांची पूजा करतात, स्टोक्स यांना मान देतात, आणि नागपूर येथे त्यांनी मेसर्स बेजवूड बेनस्पूर, आणि हॉलफर्ड नाइट यांची भाषणे अत्यंत नम्रतापूर्वक ऐकली. मौलाना महंमदअल्लींना एका इंग्लिश अधिकाऱ्याने मित्राच्या नात्याने चहाला बोलाविले तेव्हा त्यांनी ते आमंत्रण स्वीकारले आणि हकीम-अजमलखानसारख्या[1] एका कट्टर असहकारितावाद्याने आपल्या टीबिया कॉलेजमध्ये लॉर्ड व लेडी हार्डिंग्ज यांच्या तैलचित्रांचे अनावरण करविले व तो समारंभ पाहण्यास अनेक इंग्रजी मित्रांना निमंत्रण दिले. या गोष्टी कवींनी लक्षात ठेवावयास पाहिजे होत्या. सध्याच्या चळवळीच्या खऱ्या व धार्मिक स्वरूपाविषयी त्यांनी जर एक क्षणभरसुद्धा संशयपिशाच्चयाने स्वतःला झपाटून दिले नसते तर किती चांगले झाले असते. तसेच ही चळवळ राष्ट्रीयत्व, देशभक्ती अशा जुन्या शब्दांचे अर्थ बदलत आहे व त्यांची व्याप्ती वाढवीत आहे. यावर त्यांनी विश्वास ठेवला असता तर किती बरे झाले असते.

जर त्यांनी आपल्या कवित्व शक्तीने असे पाहिले असते की, मी हिंदी स्त्रियांची मने संकुचित व्हावी अशी इच्छा करण्यास असमर्थ आहे, आणि इंग्रजी शिक्षणाला असा मी विरोध करू शकत नाही. आणि जर त्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवली असती की मी माझ्या साऱ्या जीवनात स्त्रियांच्या संपूर्ण स्वातंत्र्याकरिता झगडत आलो आहे, तर त्यांनी जो माझ्यावर अन्याय केला त्यापासून त्यांनी स्वतःला वाचविले असते. तसा अन्याय ते जाणून सवरून आपल्या उघड शत्रूवरही करणार नाहीत हे मला ठाऊक आहे. कदाचित कवींना हे ठाऊक नसेल की, आज जो इंग्रजीचा अभ्यास केला जातो तो व्यापारविषयक व तथाकथित राजकीय मूल्याकरिता केला जातो. आपल्या मुलांना सध्याच्या परिस्थितीत योग्य रीतीने असे वाटते की, इंग्रजीशिवाय आपल्याला सरकारी नोकरी मिळणार नाही. लग्नाचा परवाना म्हणून मुलींना इंग्रजी शिकविले जाते. इंग्लिश माणसाशी इंग्रजीत बोलता यावे म्हणून इंग्रजी शिकू इच्छिणाऱ्या पुष्कळ स्त्रियांची उदाहरणे मला माहीत आहेत. आपल्याबरोबर किंवा आपल्या मित्राबरोबर आपल्या बायका इंग्रजीत बोलू शकत नाहीत म्हणून दुःखी होणारे नवरे मला माहीत आहेत. मला पुष्कळ कुटुंबे अशी माहीत आहेत की, जेथे इंग्रजीला मातृभाषा बनविली जात आहे. शेकडो तरुणांना असे वाटते की, इंग्रजीच्या ज्ञानाशिवाय हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणे जवळजवळ अशक्य आहे. हा चरणारा व्रण समाजाला इतका पोखरत आहे की पुष्कळ बाबतींत शिक्षणाचा एकच अर्थ म्हणजे इंग्रजीचे ज्ञान. या साऱ्या गोष्टी

१. १८६५ ते १९२७. विख्यात मुस्लिम हकीम व राजकारणी. त्यांनी खिलाफत चळवळीत महत्त्वाचा भाग घेतला; काँग्रेसचे अध्यक्ष १९२१–२२.

मला गुलामगिरीची आणि अधःपाताची लक्षणे वाटतात. देशी भाषांचा चुराडा व्हावा आणि आजच्यासारखी त्यांची उपासमार व्हावी ही गोष्ट मला असह्य होते. आईबाप आपल्या मुलांना किंवा नवरे आपल्या बायकांना मातृभाषेत पत्र न लिहिता इंग्रजीत पत्रे लिहितात ही कल्पना मला सहन होत नाही. महाकवी यांचा जितका विमुक्त वातावरणावर विश्वास आहे तितकाच माझाही आहे. माझ्या घराला चोहोकडून भिंती असाव्यात आणि माझ्या खिडक्या बंद करून टाकाव्यात असे मला वाटत नाही. माझ्या घराभोवती शक्य तितक्या मुक्तपणाने जगातील साऱ्या संस्कृतींचे वारे वाहात राहावे असे मलाही पाहिजे आहे. पण कोणीही मला आपल्या वाऱ्याने पायासकट उखडून टाकावयास नको आहे. दुसऱ्यांच्या घरात अनधिकाराने घुसणारा, किंवा भिकारी अथवा गुलाम म्हणून मला राहावयाचे नाही. खोट्या अभिमानाकरिता किंवा संशयित सामाजिक लाभाकरिता माझ्या भगिनींवर इंग्रजी शिकण्याचा अनावश्यक बोजा टाकण्यास माझा साफ नकार आहे. साहित्याची गोडी असणाऱ्या आपल्या तरुणतरुणींना वाटेल तितके इंग्रजीचे व जगातील भाषांचे ज्ञान संपादन करू द्या. आणि नंतर त्यांच्यापासून त्यांच्या ज्ञानाचा फायदा हिंदुस्थानला व जगाला मिळावा अशी अपेक्षा आपण बाळगू या. तसे पुरुष एखादा बोस, एखादा रॉय किंवा स्वतः कवी हे आहेत. पण एकाही हिंदी माणसाने आपली मातृभाषा विसरता कामा नये, तिची उपेक्षा करता कामा नये, किंवा तिच्याबद्दल लाज वाटू देता कामा नये, किंवा त्याला किंवा तिला आपल्या मातृभाषेत उत्तम विचार करता येत नाहीत, किंवा ते विचार प्रकट करता येत नाहीत, असे वाटता कामा नये. माझा धर्म हा बंदीगृहातील धर्म नाही. ईश्वराच्या सृष्टीतील जो अत्यंत क्षुद्र असेल त्यालाही तेथे जागा आहे. पण त्या धर्मात उर्मटपणा, वर्णाभिमान, धर्म किंवा रंग याला बिलकूल थारा नाही. ही सुधारणेची, शुद्धीची आणि माणुसकीचे विवरण करणाऱ्या देशभक्तीची महान चळवळ कवींना समजली नाही याबद्दल मला अत्यंत दुःख होते. जर ते धीर धरतील तर त्यांना आपल्या देशबांधवांच्याकरिता दुःखी होण्याचे किंवा लज्जित होण्याचे काही कारण नाही असे आढळेल. मी त्यांना नम्रतापूर्वक असा इषारा देतो की, त्यांनी चळवळीवर चढलेली बांडगुळे म्हणजे ती चळवळ आहे असा चुकीचा समज करून घेऊ नये. ज्याप्रमाणे डायर किंवा ओडवायर यांच्यासारख्या लोकांच्यावरून इंग्रज माणसांबद्दल मत देणे हे जसे चूक आहे, तसेच लंडनमधील विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीवरून किंवा हिंदुस्थानातल्या मालेगाववरून असहकारितेसंबंधी मत देणे हे चुकीचे होणार आहे.

बंधूंची माफी

अलीबंधूंनी आपल्या काही भाषणाच्याबद्दल जे त्रोटक निवेदन केले त्यामुळे त्यांच्यावर उघड टीका झाली नाही तरी विरोधी टीकेची कुजबूज सुरू होईल हे मला माहीत आहे. म्हणून ती माफी समजून घेणे चांगले. त्या माफीच्या साऱ्या उपपत्तीत

सध्या मला शिरणे शक्य नाही; पण मी लोकांना बिनधोकपणे कळवू इच्छितो की, जेव्हा काही मित्रांनी त्यांच्या भाषणातील काही उतारे माझ्या नजरेस आणले तेव्हा मला असे वाटले की, ते जरा कडक आहेत आणि त्याचा अर्थ अत्याचाराला उत्तेजन असा होऊ शकेल. त्यांना अटक होणार या बातमीने हवा दुमदुमली होती. कोणत्याही असहकारितावाद्याला खोट्या कारणाकरिता तुरुंगात जाता येत नाही आणि आपली निष्ठा नाकारून खासच जाता येत नाही. मला तात्काळ असे वाटले की, मी त्यांचे लक्ष या उताऱ्याकडे वेधावे आणि त्यांना आपली भूमिका स्पष्ट करण्याकरिता एक पत्रक काढण्याचा सल्ला द्यावा. क्षणिक भावनेच्या भरात एखादा माणूस अशी भाषा वापरणे शक्य आहे, की जिचा अर्थ त्याच्या मनात नसलेला सुद्धा लावता येईल. जेव्हा एखादा माणूस कायद्याच्या भीतीबद्दल पर्वा बाळगत नाही, आणि स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीलाच फक्त भीत असतो, तेव्हा त्याने दुप्पट काळजी बाळगली पाहिजे. पण जगातली सारी सावधगिरी जरी बाळगली तरी त्याच्याकडून एखादा प्रमाद त्याला टाळणे कधीकधी अशक्य होते. अलीबंधूंच्या खांद्यावर फार मोठे ओझे आहे. ते इस्लामबद्दल ज्या मर्यादेपर्यंत जबाबदार आहेत, त्या इस्लामची प्रतिष्ठा, सत्य आणि प्रामाणिकपणाच्या व्यवहारातील त्यांचा जो कटाक्षाने आदर असेल त्यातून त्यांनी प्राप्त करून घेतलेले जे श्रेय असेल त्यावरून व त्यांच्या वागण्या-सवरण्यात अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे धैर्य व नम्रता यावरून मोजता येईल. आमच्या मैत्रीला ज्या ‘ दोस्ती ’ या शब्दाने संबोधिले जाते ती दोस्ती त्यांच्या अत्यंत प्रामाणिकपणावर, निष्कपटीपणावर, निर्भयतेवर, धैर्यावर आणि विनम्रतेच्या विश्वासावर आधारलेली आहे. मला हे ठाऊक आहे की, हिंदुस्थानात ज्यांची अत्यंत नालस्ती केली जाते त्यांपैकी ते आहेत. त्यांना सर्व प्रकारचे हेतू लावण्यात येतात. ते मला हातातले बाहुले बनवीत आहेत असेही म्हटले जाते. हे सर्व आरोप काळच खोटे ठरवील अशी माझी खात्री आहे. पण त्यांनी घाईघाईने व्यक्त केलेल्या विधानाचा उपयोग त्यांच्या चारित्र्याला किंवा सदिच्छेला बाधा आणणारा न करणे जरूरीचे होते. कोणाही सन्मान्य व्यक्तीवर त्याची श्रद्धा खोटी होती असा आरोप करण्याइतके दुसरे अपायकारक काहीही नसते. त्यांचे अशा हेत्वारोपापासून संरक्षण करावे म्हणून त्यांच्या शक्तीनुसार आता प्रसिद्ध झालेले पत्रक काढावे असा मी सल्ला दिला. माझ्या मताने ते पत्रक काढून ज्या खिलाफत चळवळीचा ते पुढाकार घेत आहेत त्या चळवळीचा दर्जा व प्रतिष्ठा त्यांनी वाढविली आहे. त्यांनी इतर कार्यकर्त्यांना उदाहरण घालून दिले आहे. खोटया फुशारक्या मारून आपल्याला तुरुंगात जावयाचे नाही. जेव्हा निरपराधी माणसे तुरुंगात बसतात, तेव्हा तुरुंग हे स्वातंत्र्याचे व सन्मानाचे प्रवेशद्वार बनते. जे आपण सर्व जण स्वातंत्र्याची व सत्याची लढाई लढत आहोत त्या सर्वांनी भाषा वापरताना अत्यंत बिनचूक असले पाहिजे, हाच इषारा या पत्रकाने आपल्याला दिला आहे. आपली भाषणे वाचून दाखविणे किंवा भाषणेच न करणे ही प्रथा वाईट नाही. एका अत्यंत उदार अशा मुसलमानाने हे बंधन स्वतःवर लादून घेतले

आहे. मौलाना अब्दुलबारी[1] हे अत्यंत संवेदनाक्षम आहेत आणि ते प्रक्षुब्ध परिस्थितीत अशी भाषा वापरण्याच्या फंदात सापडतात की, जी भाषा शांत वेळी वापरण्यात त्यांचा हेतूही नसतो तशी भाषा ते वापरतात. आपल्या मित्रांच्या सूचनेवरून त्यांनी याकरिता जाहीर सभेत भाषण करावयाचे नाही असा स्वतःवर निर्बंध घालून घेतला आहे. हे मोठे उदाहरण मी सर्वांनी अनुसरावे म्हणून दिले आहे. अलीबंधूंनी आपल्या स्पष्ट निवेदनाने मार्गदर्शन केले आहे. आपण भाषणेच करू नयेत. पण जर भाग पडले तर शब्द तोलून वापरावेत. तसे न केल्यास अविचाराने मनात नसलेल्या गोष्टी आपण बोलून जातो व त्याने आपल्या कार्याची हानी करतो.

अधिक पारशी औदार्य

दक्षिण आफ्रिकेच्या मि. रुस्तुमजी जीवनजी घोरखोडू यांनी गुजरातच्या दुष्काळ-ग्रस्त लोकांना चरखे वाटावेत म्हणून १२,००० रुपये तारेने पाठविले आहेत. त्यांची शाळेकरिता जी चाळीस हजार रुपयांची उदार देणगी आली ती वाचकांना आठवत असेल. दुष्काळ कमिटी गरज भागविण्याच्या कठीण परिस्थितीत सापडली असता ही देणगी ऐन वेळेवर आली. ज्यांना टिळक स्वराज्य फंड हा राजकीय कार्याकरिता आहे, या कारणामुळे वर्गणी देण्याची इच्छा नसेल त्यांनी मि. रुस्तुमजीचे उदार उदाहरण अनुसरण्यास व दुष्काळ फंडास मदत करण्यास मागेपुढे पाहू नये.

'यंग इंडिया', १–६–१९२१

७९. कवींची चिंता

लॉर्ड हार्डिंज यांनी डॉ. टागोर यांना आशियाचे कवी म्हटले आहे. ते जरी अद्याप जगाचे कवी बनले नसले तरी झपाट्याने बनत आहेत. वाढत्या प्रतिष्ठेने त्यांच्यावर वाढती जबाबदारी आली आहे. जगाला हिंदुस्थानच्या संदेशाचे काव्यात्मक अर्थप्रतिपादन करणे ही त्यांची हिंदुस्थानची सर्वांत मोठी सेवा झाली पाहिजे. हिंदु-स्थानने खोटा किंवा कमजोर संदेश आपल्या नावाने देऊ नये याबद्दल कवी हे कळ-कळीने चिंता बाळगीत आहेत. स्वाभाविकपणेच ते आपल्या देशाच्या लौकिकाला

१. १८३८ ते १९३६; लखनौचे राष्ट्रीय मुस्लिम धर्मगुरू. त्यांनी खिलाफत चळवळीत जोरदार भाग घेतला व आपल्या अनुयायांना गोहत्येपासून परावृत्त केले.

काळजीपूर्वक जपतात. ते म्हणतात, मी या चळवळीच्या सुरात सूर मिसळावा म्हणून प्रयत्नांची पराकाष्टा केली आहे. आपण गोंधळून गेलो आहोत हीही कबुली ते देतात. असहकारितेच्या गडबड-गोंधळात आपल्या वीणेवर वाजविण्यासारखे त्यांना काहीच सापडत नाही. त्यांनी आपल्या तीन जोरदार पत्रात[१] आपला संदेश व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे आणि ते अशा निर्णयाला आले आहेत की, असहकारिता ही आपल्या स्वप्नाला साजेल अशी प्रतिष्ठित नाही. तो सिद्धांत अकरणात्मक आणि निराशेचा आहे. त्यांची भीती अशी आहे की, तो सिद्धांत माणसांना विभक्त करणारा, सर्वांचा अंतर्भाव न करणारा, संकुचितपणाचा आणि नकारात्मक आहे.

हिंदुस्थानच्या सन्मानाविषयी त्यांना जी अत्यंत दक्षता घ्यावीशी वाटते, त्याबद्दल कोणत्याही हिंदी माणसाला अभिमानच वाटेल. त्यांनी आपले संदेह सुंदर आणि स्पष्ट भाषेत आमच्याकडे पाठविले हे चांगले आहे.

मी कवींच्या शंकांना नम्रपणे उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. मी कदाचित त्यांची किंवा त्यांच्या वक्तृत्वांनी मारावलेल्या वाचकांची खात्री पटवू शकणार नाही. पण मी त्यांना आणि हिंदुस्थानला असे आश्वासन देतो की, असहकारितेची कल्पना ही त्यांना वाटत असलेल्या भयाने भरलेली नाही. आणि त्यांना देशाने असहकारितेचा स्वीकार केला म्हणून देशाबद्दल लाज वाटण्याचेही कारण नाही. असहकारितेच्या प्रयोगात जरी ती अखेरीस अपयशी झाल्यासारखी दिसली तरी, तो सिद्धांताचा दोष आहे असे म्हणता येणार नाही. ज्याप्रमाणे सत्याचा व्यवहारात उपयोग करण्याचा दावा सांगणारे यशस्वी झाल्यासारखे दिसत नाहीत, एवढ्यावरून सत्य हे जसे दोषी ठरत नाही तसे ह्या सिद्धांताचे आहे. कदाचित असहकारिता आपल्या योग्य समयापूर्वी अवतरली असेल. तशा परिस्थितीत हिंदुस्थानला आणि जगाला योग्य काळाची वाट पाहात बसावे लागेल. पण हिंदुस्थानला अत्याचार आणि असहकारिता यांमध्ये स्वतःची निवड करण्यावाचून गत्यंतरच नाही.

असहकारिता ही हिंदुस्थानात आणि पाश्चात्य जगात चिनी भिंत उभारण्यासाठी सुरू केली आहे अशी भीती कवींना वाटण्याचे कारण नाही. उलटपक्षी असहकारितेचा उद्देश, परस्परांमधील आदर व विश्वास यांच्या पायावर खरा, सन्मानाचा व स्वेच्छेच्या सहकारितेचा रस्ता तयार करावा असा आहे. सक्तीची सहकारिता, एकपक्षीय एकीकरण व सुधारणेच्या नावाच्या बुरख्याखाली ज्या शोषणाच्या आधुनिक पद्धती शस्त्रबळावर लादल्या जात आहेत त्या सर्वांविरुद्ध सांप्रतचा लढा सुरू करण्यात आला आहे.

पापात अजाणतेपणाणे किंवा अनिच्छेने भागीदार होण्याविरुद्ध असहकारिता निषेध दर्शविते.

१. पाहा. परिशिष्ट ४.

कवींना मुख्यतः विद्यार्थ्यांची चिंता आहे. त्यांचे मत असे की, विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळा उघडण्यापूर्वी सरकारी शाळा सोडून द्यावयास सांगण्यास नको होते. येथे त्यांचा व माझा मतभेदच आहे. वाङ्मयीन शिक्षणाचे स्तोम मी कधीच माजवू शकलो नाही. वाङ्मयीन शिक्षण हे स्वतः माणसाची नैतिक उंची एक तसूभरही वाढवू शकत नाही आणि वाङ्मयीन शिक्षणाचा आणि चारित्र्यसंवर्धनाचा काही संबंध नाही, असे माझ्या अनुभवाने मला पूर्णपणे पटले आहे. माझे हे ठाम मत आहे की, सरकारी शाळांनी आपल्याला भेकड बनविले. आणि आपल्याला असाहाय्य निरीश्वरवादी बनविले त्या शाळांनी आपल्यात असंतोष आणला आणि असंतोष घालविण्याला उपाय न योजल्यामुळे आपल्याला त्यांनी हताश केले. आपण कारकून व दुभाषे बनावेत असा जो त्यात हेतू होता तो सिद्ध झाला. सरकार शासितांच्या वरच्यावर येणाऱ्या ऐच्छिक संबंधामुळे आपली प्रतिष्ठा वाढवीत असते. आणि जर सरकारने आपल्याला गुलाम म्हणून ठेवले याकरिता त्यांच्याशी सहकार्य करणे हे जर चूक असेल तर आपण अशा संस्थांना सुरुवात करण्यास बांधलेलेच होतो की, ज्या संस्थांत आपला संबंध हा अत्यंत खुषीचा असा वाटेल. राष्ट्रातील तरुण ही राष्ट्राची आशा आहे. मी असे धरून चाललो आहे की, ज्या क्षणी सरकारी राज्य-पद्धत ही संपूर्णपणे किंवा मुख्यत्वे दुष्ट आहे असे आढळले, त्या क्षणी त्या पद्धतीशी आपल्या मुलांचा संबंध घडवून आणणे हे पातक ठरले.

विद्यार्थ्यांची फार मोठी संख्या उत्साहाचा पहिला जोर ओसरल्यावर परत शाळेत गेली, हा युक्तिवाद मी मांडलेल्या सिद्धांताच्या निर्दोषीपणाविरुद्ध करता येत नाही. त्यांची माघार ही त्यांनी उचललेले पाऊल हे चुकीचे होते असे सिद्ध करीत नसून आपला अधःपात किती झाला आहे हे सिद्ध करते. राष्ट्रीय शाळांच्या स्थापनेमुळे अधिक विद्यार्थी बाहेर आणता आले नाहीत असे अनुभवाने दाखविले आहे. त्यांच्यातील जे विद्यार्थी अत्यंत बलिष्ट व अत्यंत सच्चे होते; ते राष्ट्रीय शाळांचा आधार नसताही बाहेर पडले आणि माझी खात्री आहे की, हे प्रथम बाहेर पडलेले विद्यार्थी श्रेष्ठ प्रतीची सेवा करीत आहेत.

परंतु कवींचा जो मुलांना बाहेर काढण्याविरुद्ध विरोध आहे, तो असहकारितेच्या मूळ सिद्धांतालाच त्यांची जी हरकत आहे, त्या सिद्धांताला खरोखर उपसिद्धांतासारखा आहे. प्रत्येक नकारात्मक गोष्टीचे त्यांना भय वाटते. धर्मात जे निषेधात्मक आदेश आहेत त्यांच्याविरुद्ध जणू काय त्यांचा सारा आत्मा बंड करून उठला आहे असे दिसते. त्यांचा विरोध मी त्यांच्या अनुकरण न करता येणाऱ्यासारख्या भाषेत देत आहे : " आर. याने सध्याच्या चळवळीला पाठिंबा देताना मला वारंवार असे सांगितले आहे की, एखाद्या ध्येयाचा स्वीकार करण्यापेक्षा, कोणत्याही गोष्टीला नकार देण्याची भावना ही सुरुवातीला एक अधिक बलवान शक्ती असते. जरी मला ती गोष्ट खरी म्हणून ठाऊक असली तरी सत्य म्हणून मी ती स्वीकारू शकत नाही... हिंदुस्थानात ब्रह्मविद्येचे ध्येय मुक्ती हे आहे

आणि बुद्ध धर्मात निर्वाण हे आहे. सत्याच्या भावात्मक स्वरूपाकडे मुक्ती आपले लक्ष वेधून घेते आणि निर्वाण हे त्याच्या अभावात्मक स्वरूपाकडे लक्ष वेधते. म्हणून त्याने (बुद्धाने) दुःखाच्या गोष्टीवर भर दिला व यात दुःख टाळावयाचा त्याचा हेतू होता आणि ब्रह्मविद्येने आनंदावर भर दिला व तो मिळवावा असा हेतू होता.'' ह्या व अशासारख्या उताऱ्यावरून वाचकांना कवींच्या मनोवृत्तीची किल्ली सापडेल. माझ्या नम्र मताप्रमाणे एखाद्या गोष्टीचा स्वीकार करणे हे जसे ध्येय होऊ शकते तसा तिला नाकारणे हेही ध्येय होऊ शकते. सत्याचा स्वीकार करणे हे जसे आवश्यक असते तसेच असत्याचा त्याग करणे आवश्यक असते. सर्व धर्म असे शिकवितात की, दोन विरोधी शक्ती आपल्यावर परिणाम करीत असतात आणि मानवी प्रयत्न जो असतो तो सतत स्वीकार आणि नकार यांच्याकरिता असतो. दुष्ट गोष्टींशी असहकारिता करणे, हे चांगल्या गोष्टींशी सहकार्य करण्याइतकेच आपले कर्तव्य असते. निर्वाण म्हणजे एक फक्त नकारात्मक अवस्था आहे, असे विवरण करून कवींनी अजाणता बुद्धधर्मावर अन्याय केला आहे, असे मला सुचवावयाचे आहे. मी असे सांगण्याचे धाडस करितो की, निर्वाण ही जितकी अभावात्मक अवस्था आहे तितकीच मुक्तीही अभावात्मक अवस्था आहे. शरीरापासून मुक्ती मिळविणे किंवा शरीराची बंधने नष्ट करणे यामुळे आनंद प्राप्त होतो (शाश्वत सुख). मला माझ्या युक्तिवादातील हा भाग पुढील गोष्टीकडे लक्ष वेधून संपवावयाचा आहे आणि ती म्हणजे उपनिषदांचा (ब्रह्मविद्येचा) अखेरचा शब्द **नेति** असा आहे. उपनिषत्कारांना ब्रह्माचे अत्युत्कृष्ट वर्णन करण्याकरिता **नेति** असा शब्द सापडला.

म्हणून मला असे वाटते की, असहकारितेच्या अभावात्मक स्वरूपामुळे कवी निष्कारण भयभीत झाले आहेत. आपण आपली नकार देण्याची शक्तीच गमावली आहे. सरकारला नाही म्हणणे, म्हणजे आपण सरकारला अराजनिष्ठ आहोत; जवळजवळ धर्मभ्रष्ट आहोत असे झाले आहे. सहकरिता करण्यास जाणून बुजून नकार देणे हे ज्याप्रमाणे एखादा शेतकरी पेरणीपूर्वी तण काढून टाकतो त्यासारखे आवश्यक आहे. पेरणीइतकीच खुरपणीही शेतीला आवश्यक आहे. पिके वाढत असतानादेखील तण काढण्याकरिता कोळपे जवळजवळ रोज वापरावे लागते याची प्रत्येक शेतकऱ्याला माहिती असते. राष्ट्राची असहकारिता म्हणजे सरकारला राष्ट्र सांगेल त्या अटीवर सहकारिता करण्याचे आवाहन आहे. तो प्रत्येक राष्ट्राचा हक्क असतो आणि ते प्रत्येक चांगल्या सरकारचे कर्तव्य असते. असहकारिता म्हणजे, राष्ट्र हे दुसऱ्याच्या पालकत्वाखाली संतुष्ट नाही असे सांगणारी नोटीसच आहे. त्याकरिता राष्ट्राने निरुपद्रवी असा मार्ग स्वीकारला आहे. तो म्हणजे असहकारितेचा स्वाभाविक आणि धार्मिक सिद्धांत हा होय. राष्ट्राने त्याऐवजी अत्याचाराचा अस्वाभाविक आणि अधार्मिक सिद्धांत मान्य केलेला नाही. कवींच्या स्वप्नातील स्वराज्य जर हिंदुस्थानला कधी काळी मिळणार असेल तर ते अनत्याचारी असहकारितेनेच मिळेल. कवींना आपला शांति-संदेश जगाला

देऊ द्या आणि त्यांना अशी खात्री वाटू द्या की, हिंदुस्थान असहकारितेच्या द्वारा, जर तो आपल्या प्रतिज्ञेला प्रामाणिक राहिला तर त्या संदेशाचे साक्षात उदाहरण घालून देईल. ज्या देशभक्तीच्या अर्थाकरिता कवी तळमळत आहेत, तो देशभक्तीला अर्थ द्यावा असा असहकारितेचा उद्देश आहे. युरोपच्या पायाशी शरण येऊन पडलेला हिंदुस्थान मानवतेला कोणतीही आशा दाखवू शकणार नाही. जागृत झालेला व स्वतंत्र हिंदुस्थान विव्हळणाऱ्या जगाला शांतीचा व सदिच्छेचा संदेश देऊ शकेल. ज्या व्यासपीठावरून हिंदुस्थानला हा संदेश शिकविता येईल, असे व्यासपीठ निर्माण करण्याकरिता असहकारितेची योजना आहे.

'यंग इंडिया', १-६-१९२१

८०. खिलाफत व अनत्याचार

सर्व्हंट्स ऑफ इंडियाचे श्री. वझे यांनी त्यांच्या ५ मेच्या साप्ताहिकात मि. झकेरियस यांनी जो लेख लिहिला आहे त्याकडे माझे लक्ष वेधले आहे. त्या लेखकाच्या दृष्टिकोणातून मी विचार करावा असे म्हटले आहे. झकेरियस हे आपल्या लांबलचक लेखात असा प्रश्न मांडतात :

> " जे अहिंसा तत्त्वाचे पुरस्कर्ते आहेत ते त्याच्याविरुद्ध असलेले खिलाफतीचे तत्त्व कसे उचलून धरतात ! खिलाफत किंवा अहिंसा तत्त्वाच्या सत्य मूल्याशी मला कर्तव्य नाही. मी आग्रहाने म्हणतो की, एक तत्त्व दुसऱ्या तत्त्वाला सर्वस्वी वगळणारे आहे. ज्या एका गोष्टीचा मी अत्यंत प्रामाणिकपणे पुरस्कार करतो ती म्हणजे या प्रश्नाच्या दोन्ही बाजूंसंबंधी स्पष्टपणे विचार करणे ही होय. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा मनुष्यमात्राच्या आधुनिक इतिहासात जर त्याच्या विनाशाकरिता कोणी जबाबदार असेल तर सदोष पद्धतीने विचार करणे आणि त्यामुळे तडजोडीकरिता खाली घसरत जाणे हे होय. "

माजी अध्यक्ष विल्सन यांच्या पतनाचे उदाहरण देऊन लेखक पुढे म्हणतात :

"हे पौर्वात्य महान सत्याग्रही त्या इशाऱ्याकडे लक्ष देतील काय? ते आपल्या साऱ्या जीवनाशी एकनिष्ठ राहतील काय? खिलाफतीचे जे तत्त्व त्यांच्या तत्त्वाशी सर्वस्वी विरोधी आहे, ते स्वीकारून हिंदू-मुस्लिम मैत्रीसारख्या अत्यंत मौल्यवान गोष्टीकरितादेखील स्वतः तडजोड करण्याऐवजी ते स्वतःशी सत्यनिष्ठ राहणार नाहीत काय?"

या कळकळीच्या विनंतीमुळे मला माझी खिलाफतीसंबंधी भूमिका पुन्हा मांडावी लागत आहे. मी ज्या अनत्याचाराच्या तत्त्वाचा पुरस्कर्ता आहे, तो मी जर हिंदू-मुस्लिम ऐक्य घडवून आणण्याकरिता त्या तत्त्वाशी तडजोड करीन तर मी माझ्या जीवनाशीच प्रतारणा करणारा ठरेन. जेव्हा मला मुसलमानांचा दावा हा प्रत्येक दृष्टीने न्यायाचा वाटला तेव्हाच मी त्यात उडी घेतली. माझ्या दृष्टीने साऱ्या जीवनात आलेली ती एक संधी होती. मला असे वाटले की, जर मी माझ्या मुसलमान बांधवांच्या संकटाच्या वेळी त्यांना माझी निष्ठा दाखवू शकलो तर या दोन जमातींमध्ये मी कायमची मैत्री घडवून आणू शकेन. ते कसेही असले तरी मला वाटले की, हा प्रयत्न करण्यालायक आहे. दोन जमातींमध्ये खरी मैत्री असल्याशिवाय स्वतंत्र हिंदुस्थानची शक्यता माझ्या कल्पनेतही येऊ शकणार नाही.

पण झकेरियस म्हणतात, खिलाफत ही अत्याचारावर आधारलेली आहे. खिलाफत ही इस्लामची पृथ्वीवरील प्रतिनिधी आहे व तिने इस्लामचे संरक्षण तलवारीनेदेखील करण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. इस्लामच्या रक्षणाकरिता शारीरिक बळाचा आश्रय घेण्याची ज्या संस्थेला परवानगी आहे, त्या संस्थेच्या रक्षणाकरिता अहिंसेवर श्रद्धा असणारा माझ्यासारखा माणूस कसा लढू शकेल?

खिलाफतीचे वर्णन करताना झकेरियस यांनी म्हटले आहे ते बरोबर आहे. पण अनत्याचाराच्या उपासकाच्या कार्याचे जे मूल्यमापन त्यांनी केले आहे त्यात ते चुकले आहेत. ज्याची अनत्याचारावर श्रद्धा आहे तो अत्याचाराचा किंवा शारीरिक बळाचा आश्रय न घेण्यास प्रतिज्ञाबद्ध आहे. मग तो आश्रय कोणत्याही गोष्टीच्या रक्षणाकरिता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असो. तथापि जे लोक किंवा संस्था अनत्याचारावर उभारलेल्या नाहीत, त्यांना मदत करण्यास त्याला प्रतिबंध नाही. पण जर परिस्थिती उलट असती तर उदाहरणार्थ, मला हिंदुस्थानला स्वराज्य मिळविण्यास मदत करण्यास बंदी झाली असती. कारण स्वराज्यामध्ये जी भविष्यकालीन भारताची संसद होणार आहे ती मला खात्रीने ठाऊक आहे की, लष्कर व पोलिस दल ठेवणार आहे. किंवा घरगुती उदाहरण घ्यावयाचे म्हणजे माझा मुलगा अनत्याचारावर विश्वास ठेवणारा नाही हे ठाऊक असल्यामुळे त्याला मी न्याय मिळवून देता कामा नये.

मि. झकेरियस यांच्या सिद्धांतामुळे अनत्याचारावर विश्वास असणाऱ्यांचा सारा व्यापार अशक्यच होणार आहे; आणि अशा माणसांचा तुटवडा नाही की, जे संपूर्ण अनत्याचार याचा अर्थ सारे व्यवहार थांबविणे असा करतात.

तथापि माझा अहिंसेचा सिद्धांत तसा नाही. माझे काम एवढेच आहे की, मी स्वतः अत्याचारापासून परावृत्त होणे, आणि जे ईश्वराचे प्राणी आहेत त्यांच्यापैकी शक्य तितक्या लोकांना मने वळवून व सेवा करून माझ्या या श्रद्धेत व आचरणात समाविष्ट करून घेणे हे काम आहे. पण जर कोणाही व्यक्तींना किंवा कोणत्याही बाबतीत त्यांच्या न्याय्य गोष्टीत मदत करण्याचे केवळ ते अनत्याचाराच्या तत्त्वाशी संपूर्ण एकरूप होऊ शकत नाहीत म्हणून नाकारले तर मी माझ्या श्रद्धेशी एकनिष्ठ राहणार नाही. मुसलमानांचा पक्ष हा न्याय्य आहे असे आढळून आल्यानंतर ज्यांनी इस्लामच्या प्रतिष्ठेचा विद्ध्वंस करावा म्हणून दगाबाजीने व्यूह रचले, त्यांच्याविरुद्ध कडक अनत्याचारी मार्गाने त्यांना जर मी मदत केली नाही तर मी अत्याचाराला प्रोत्साहनच देईन. जेव्हा दोन्ही पक्षसुद्धा अत्याचारावर विश्वास ठेवणारे असतात, त्याही वेळी न्याय हा एका किंवा दुसऱ्या बाजूला असतोच. ज्या माणसाची चोरी होते त्याच्या बाजूला न्याय असतो. मग तो आपली गमावलेली मालमत्ता शारिरिक बळाने परत मिळवण्याची तयारी करीत असला तरीही आणि जर दुखावला गेलेला पक्ष हा उघड उघड लढ्याने आपली गेलेली मालमत्ता परत मिळविण्याऐवजी सत्याग्रहाच्या पद्धतीचा म्हणजेच प्रेम किंवा आत्मबलाचा उपयोग करण्यास वळविला जाईल, तर तो अनत्याचाराचा विजय झाला असे म्हणता येईल.

मी ज्या या मर्यादा सांगितल्या त्या विचारात घेऊन मी अनत्याचाराच्या उपासकत्वावर माझा हक्क सांगतो, तो हक्क मि. झकेरियस यांना खासच नाकारता येईल. मी त्यांना एवढेच सुचवू शकतो की, जीवन ही एक गुंतागुंतीची गोष्ट आहे, आणि सत्य व अनत्याचार असे प्रश्न निर्माण करतात की, जे विश्लेषण आणि निर्णय यांना दाद देत नाहीत. सतत परिश्रमाने आणि मूक प्रार्थनेने माणसाला सत्याचा शोध लागतो, आणि त्या सत्याच्या प्रतिष्ठापनेकरिता जो सत्याग्रहाचा किंवा आत्मबलाचा एकमेव न्याय्य मार्ग आहे, त्याचा वापर करण्याची पद्धत शोधता येते. माझ्या मित्रांना मी एवढेच आश्वासन देतो की, न्यायाकडे जाण्याचा मार्ग चाचपडण्यास मी प्रयत्नांची कसूर करीत नाही, आणि माझा नम्र पण सतत प्रयत्न व मूक प्रार्थना हे माझे त्या कंटाळवाण्या पण सुंदर रस्त्याने जाताना विश्वासू साथीदार आहेत. तो मार्ग सर्व संशोधकांना आक्रमावा लागतो.

'यंग इंडिया', १-६-१९२१

८१. भडोच येथील[1] गुजरात राजकीय परिषदेत भाषण

१ जून १९२१

हा एक साधा, सरळ ठराव आहे, व तो लहान मुलालाही समजेल. तो कार्यक्रम अमलात आणण्यात जे आपल्याला यश मिळेल त्यावर देशाला स्वराज्य मिळावयाचे का नाही, खिलाफतीचा प्रश्न सुटावयाचा का नाही, आणि पंजाबबद्दल आपल्याला न्याय मिळावयाचा का नाही हे अवलंबून राहील. गुजरातच्या बंधु-भगिनींनी गेले वर्ष आठवावे अशी मी विनंती करतो. त्या वेळी आपण काँग्रेसपूर्वीच असहकारितेचा ठराव पास केला होता. पंजाबच्या न्यायाबद्दल किंवा स्वराज्याबद्दल प्रश्न उपस्थित होण्यापूर्वीच आपण गुजरातच्या हिंदू-मुसलमानांनी खिलाफतीचा प्रश्न आत्मबलाने सोडवू असा निश्चय केला होता. खिलाफतीचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटणे याचा अर्थ पंजाबसंबंधीचेही प्रश्न सुटणे, आणि स्वराज्याच्या मागणीचा प्रश्न सुटणे असा होतो, हे जरी साऱ्या देशाला कळले नव्हते तरीही आपण असे ठरविले होते की, आम्ही गुजराती लोक खिलाफतीचा प्रश्न सोडविण्याकरिता सर्वस्व पणाला लावू. त्या वेळी गुजरातने जो विश्वास दाखविला, त्याची मी आठवण करून देऊ इच्छितो. आपला वाटा पूर्ण न करण्यात जी आपली कर्तव्यच्युती झाली त्याबद्दल श्री. विठ्ठलभाईंनी आम्हांला टोमणा मारला आहे. जर आपण आपले कर्तव्य करणार नाही तर त्या टोमण्याला आपण लायक होऊ. तथापि जर आपण निश्चय केला तर आपण ते कर्तव्य करू शकू, आणि ३० दिवसांत त्या आरोपातून आपण मुक्त होऊ. ह्या परिषदेला प्रतिनिधी म्हणून हजर असणाऱ्या बंधु-भगिनी बाकीच्या देशांत काय चालले आहे याकडे लक्ष देणार नाहीत, पण दिवसातील प्रत्येक क्षणी गुजरातमधील आपल्या कर्तव्याचा विचार करतील तर आपण खात्रीने १० लाख रुपये जमविण्यात, एक लाख चरखे सुरू करण्यात आणि ३ लाख सभासद नोंदविण्यात यशस्वी होऊ.

चरख्यामुळे सरकार कसे निघून जाईल असा प्रश्न विचारण्यात येतो. त्याचे उत्तर असे : नुसत्या चरख्याच्या दर्शनाने सरकार निघून जाणार नसून, जेव्हा तुम्ही ठराविक मुदतीत २० लाख चरखे सुरू करून जगाला तुमच्यात असलेला आत्मविश्वास दाखवून द्याल, त्या वेळी ते सरकार तुमच्यापुढे गुडघे टेकील. असे करण्यात जे आपल्याला

१. हे भाषण परिषदेतला दुसरा ठराव मांडताना त्यांनी केले. त्यात त्यांनी बेझवाडा काँग्रेसने ठरविलेला कार्यक्रम ३० जूनपूर्वी पुरा करण्याकरिता नेटाचे प्रयत्न करावेत असे सांगितले.

यश मिळेल ते आपल्या शक्तीचे निदर्शक ठरेल. जेव्हा तुम्ही असे कराल त्या वेळी जगाला आणि सरकारलाही असे कळून येईल की, तुमच्यात आत्मविश्वास आहे आणि तुम्ही खरोखरच स्वराज्य मिळविणार आहात. त्या परिस्थितीत लष्करालां शस्त्रे खाली ठेवून देण्यास आणि लोकांना कर देण्याचे नाकारण्यास सांगण्याची जरूरी पडणार नाही. जोपर्यंत देशाने हा विश्वास स्वतःमध्ये निर्माण केला नाही तोपर्यंत चरख्याचा कार्यक्रम हा सोपा दिसत असला तरी तो अंमलात आणावयास कठीण आहे हे कळून येईल. जेव्हा हा कार्यक्रम आपण पूर्णपणे अंमलात आणू तेव्हा देशात कोणीही भुकेला राहणार नाही आणि कोणत्याही स्त्रीला काम मिळविण्याकरिता आपली अब्रू विकावी लागणार नाही. त्या वेळी हिंदुस्थान **धर्मराज्य, रामराज्य** किंवा **खुदाराज्य** याचा उपभोग घेईल. एक लाख चरखे सुरू करण्यात, ३ लाख सभासद नोंदविण्यात आणि १० लाख रुपये जमविण्यात गुजरातला यश मिळते का नाही, ही त्याच्या शक्तीची परीक्षा आहे. गुजरातचा वाटा ३ लाखांपेक्षा जास्त नसताना त्याच्यावर इतके पैसे उभारण्याची जबाबदारी का टाकण्यात आली असाही प्रश्न विचारण्यात येत आहे. हा लढा ज्यावर आधारला जात आहे, त्याचा पाया आपण गुजरातला घातला आहे. आणि पायावर जास्तीत जास्त वजन असते हे कोणाला ठाऊक नाही? आणि म्हणूनच गुजरातचा वाटा हा इतका अधिक ठरविला आहे. जर आपणा सर्वांचा स्वतःवर विश्वास असेल तर १० लाख रुपये जमविणे कठीण काम नाही. जर गुजरातमधल्या आपण लोकांनी हा विश्वास दाखविला नाही तर मी कोणत्या तोंडाने मुंबईच्या व्यापारी लोकांकडे जाऊ शकेन? बेझवाड्याला जो कार्यक्रम ठरविला तो पुरा करण्याकरिता आपण आपले प्राणही आर्पण केले पाहिजेत. ३० जूनपूर्वी हे काम पुरे झाले नाही तर आपण मरणे हे खात्रीने चांगले. ही स्वराज्याची किल्ली आहे. या साम्राज्याला हिंदुस्थानने ही किल्ली हस्तगत केली आहे असे जेव्हा आढळून येईल तेव्हा एक तर ते येथून निघून जातील किंवा हिंदुस्थानच्या लोकांचे सेवक म्हणून येथे राहतील.

कोणी तरी मौलाना महंमदअली यांना कलकत्याला सांगितले की, चरख्याच्या कार्यक्रमाच्या मदतीने स्वराज्य मिळविण्याची कल्पनाही चमत्कार घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यासारखी आहे असे लोक म्हणतात. मौलाना म्हणाले, कदाचित ती तशी असेल. पण त्यांनी विचारले, यातला मोठा चमत्कार कोणता, हा? का सहा हजार मैलांवरून येणाऱ्या मूठभर गोऱ्या लोकांनी ३३ कोटी लोकांवर राज्य करावे हा आहे? स्वराज्य मिळविण्याकरिता आपल्याला आत्मविश्वास पाहिजे आणि आपण एकी केली पाहिजे. जर आपल्याला गुजराती लोकांसारखे भिक्षुक मिळाले व त्यांनी हिंदुस्थान हे एक मोठे देऊळ आहे आणि त्यात पूजा करण्याच्या हक्काकरिता १० लाख रुपये दिले, तर त्याचा अर्थ आपण स्वराज्याला लायक आहो असा होईल. त्या महान देवळात मुसलमानांच्याकरिता मशिदी, शीखांच्याकरिता गुरुद्वारे आणि हिंदू व

पारश्यांच्याकरिता देवळे आहेत. कोणाचीही मदत न घेता जर एकटा गुजरात लढाई-करिता पुढे येईल तरीदेखील आपले काम होईल. जर आपण ही संघटनाशक्ती दाखवू शकलो नाही, जर आपण ह्या त्यागाला तयार नसलो, तर आपण स्वराज्याविषयी न बोललेले बरे. यात असे काहीही नाही की, ज्याचा अर्थ हा दारिद्र्याला कवटाळणे असा होतो. जर तुम्ही गुजरातच्या भगिनी या प्रश्नात लक्ष घालण्याचे ठरवाल तर उद्या तुम्ही गुजरातमधून १० लक्ष रुपये उभे कराल. आज हिंदुस्थान ही एक असाहाय्य विधवा असताना अंगावर दागिने घालण्याचा किंवा सुंदर सुंदर कपडे वापरण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? हजारो लोक उपाशी मरत असताना आपण आपली शरीरे सोन्या-रुप्यांनी कशी मढवू शकतो ? विवाहित स्त्रियांना रूढीप्रमाणे जितके दागिने आवश्यक असतील तितके ठेवून जर तुम्ही स्त्रिया बाकीचे देऊन टाकाल तर एका तासात १० लाखांची रक्कम जमेल. ज्या दिवशी गुजरातमधील स्त्रिया ही वृत्ती दाखवतील त्याच दिवशी स्वर्गातील देवता खाली उतरतील आणि तुमच्याकडे पाहात राहतील स्वराज्याचे, स्वधर्माचे हे पवित्र रहस्य स्त्रियांनीही शिकावे. ते रहस्य म्हणजे सध्याच्या काळी त्या आपली प्रतिष्ठा दागिने काढून टाकून रक्षण करू शकतात हे होय.

आपला स्वतःवर विश्वास नाही. काही जण माझ्यावर फाजील विश्वास ठेवतात. यांना वाटते, ३० जूनपूर्वी गांधी काही ना काही करून एक कोटी रुपये जमवितील. हा विश्वास अगदी निराधार आहे हे मी तुम्हांला सांगतो. आणि जरी गांधींमध्ये ही शक्ती असेल तरीही त्याच्या शक्तीने मिळविलेले राज्य गांधीराज्य होईल, स्वराज्य होणार नाही. आणि गांधीराज्य हे राक्षसी राज्यापेक्षा अधिक चांगले असणार नाही याची खात्री बाळगा. गांधींची जी इच्छा आहे ती अशी की, प्रत्येकामध्ये गांधींची शक्ती आणि गांधींची श्रद्धा असावी आणि त्यांनी आपल्या उणीवांतून व दुर्बलतेतून मुक्त व्हावे. मला माझ्या राज्याची इच्छा नाही. मला स्वराज्य पाहिजे आहे. आम्हा तिघांत[1] जे धैर्य आहे ते तुमच्यात यावे आणि अंतःकरणाच्या एकीने आम्ही बांधलो आहोत तशीच एकी तुमच्यात असावी.

मला असेही लोक ठाऊक आहेत की, ज्यांनी आपल्या बायकांशी हळुवारपणे युक्तिवाद केला आणि त्यांचे दागिने देशाकरिता काढून घेतले. तुम्ही सर्व पुरुषांनी याचा विचार केला पाहिजे. आम्ही आमच्या बहिणी आणि बायका यांची विनवणी करू व त्यांनी आपले दागिने सोडून देण्याकरिता त्यांचे मन वळवू, असा तुम्ही निश्चय करा. प्रत्येकानें आपल्या घरापासून सुरुवात करावी. कोणत्याही चांगल्या कार्याचा आरंभ घरापासून करावा. जोपर्यंत आपण घराला वाचवितो आणि अशा गोष्टी घरापासून बाजूला ठेवतो तोपर्यंत आपण काहीही मिळवू शकणार नाही. येथे हजर असलेल्या सर्व प्रति-

१. गांधी स्वतः, आणि दोघे अली बंधू, मिळून तिघे.

निधींना मी असे सुचवितो की, त्यांनी फकीरासारखे राहावे, एका लंगोटीवर भागवावे आणि रात्रंदिवस १० लाख रुपये जमविण्याकरिता खपावे आणि नंतर येऊन सांगावे की, आम्हांला यश मिळाले नाही. त्या वेळी जर असा प्रसंग आलाच तर स्वतःच श्रीमंत लोकांना लाज वाटेल. फकिरात जी श्रद्धा असते तिचीच आपल्याला जरूरी आहे.

मी तुम्हांला नेहमी फकीरासारखे राहण्यास सांगत नाही. गेल्या युद्धात ब्रिटिश स्त्री-पुरुषांनी जो त्याग केला किंवा ज्या बोअरांना सामान्यतः रानटी म्हणून समजण्यात येते त्यांनी दक्षिण आफ्रिकेत जे त्याग केले, किंवा अरबांनी जे त्याग केले त्यापेक्षा मी तुम्हांला करावयास सांगणारे त्याग हे किती तरी हलके आहेत. त्यांनी आपले प्रिय प्राण मातृभूमीकरिता दिले. त्यांनी ब्रिटिशांना सांगितले की, तुम्ही वचन दिलेल्या ट्रॅमगाड्या, मोटरी व रेल्वे आम्हांला नको आहेत आणि आमची भूमी आम्हांला प्रिय आहे. अरबांनी ज्या वृत्तीने आत्मत्याग केला, त्याच वृत्तीने तुम्ही मी जे काय थोडे मागत आहे ते दिले पाहिजे.

जेव्हा आपण स्वराज्य मिळवू तेव्हा तुम्ही हिरे, मोती आणि इतर वस्तू भूषण म्हणून अंगावर घाला. त्या वेळी मी या वस्तूंना हरकत घेणार नाही. आता घेतो. जरी मी पुष्कळ मोठ्या प्रमाणात अनुदार विचार सोडून दिले आहेत तरी जेव्हा देश सध्याच्या पतितावस्थेत आहे, तेव्हा कोणी चांगले कपडे किंवा दागदागिने वापरताना दिसला म्हणजे हे विचार माझ्या मनात येतात. मी स्वतःला विचारतो, ह्या लोकांना न समजण्याचे कारण काय असावे ? आजच आत्ताच हे काम हाती घ्या. जर तुम्ही या नर्मदेच्या पवित्र तीरावरून या वृत्तीने परत जाल तर तेवढे पुरेसे होईल. काय वाटेल ते होवो, पण हिंदू-मुसलमानांच्या कल्याणाच्या वृद्धीकरिता काम करण्याचे थांबवू नका. धर्मरक्षणाचे काम टाकून देऊ नका. जर ह्या मोठ्या देवळाच्या इमारतीकरिता तुम्ही पैसा खर्च केला, लग्नापेक्षाही अधिक पवित्र असलेल्या या कार्यात तुम्ही दुसरी देवळे बांधण्याकरिता आणि मुलामुलींच्या लग्नाकरिता जितका पैसा खर्च करता, तितकाच पैसा खर्च केलात तर १० लाख रुपये जमविणे कठीण काम नाही. जर एखाद्या गरीब माणसाजवळ पैसा नसेल तर त्याच्यातर्फे चार आणे द्या आणि त्यांची नावे काँग्रेस नोंदणी बुकात नोंदवा. जर आपण सुतार लोहाराकडून चरखे करण्याकरिता कामे करवून घेतली तर चरख्याचा कार्यक्रम हाही मुलांचा खेळ होईल. मला असे आग्रहाने प्रतिपादन करावयाचे आहे की, जर फक्त स्त्रियाच बाहेर पडल्या आणि त्यांनी या महिन्यात ३० दिवस काम केले तर त्या हसत खेळत १० लाख रुपये जमवू शकतील. मला भाषणांचा कंटाळा आला आहे. तथापि माझा गुजरातच्या स्त्रियांवरील विश्वास नाहीसा झाला नाही. त्या इतका शुद्ध आहेत, त्यांच्यात इतकी श्रद्धा आहे की, कोणी धर्म-

राज्याचे नाव काढले की त्या सद्गदित होतात. त्यांनी माझ्यावर दागदागिन्यांचा जो पाऊस पाडला त्यावरून त्यांच्यावरील माझा हा विश्वास निर्माण झाला आहे.

माझ्या या विश्वासाला कारण स्त्रिया व भंगी हे आहेत. थोड्या दिवसांपूर्वी एका पारशी मित्राने माझ्याकडे १२,००० रुपये पाठविले. हा मित्र दुसरा तिसरा कोणी नसून श्री. रुस्तुमजी हा आहे. त्याच्याजवळ टाटापेक्षा कमी पैसे आहेत, पण त्याचे अंतःकरण मोठे आहे. त्याच्या देणगीची पोच देण्यासही मला वेळ मिळाला नाही. माझ्यामध्ये जी श्रद्धा आहे ती अशाच लोकांनी माझ्यात निर्माण केली आहे.

आपल्याला आपले स्वराज्य सिमल्याहून मिळणार नाही. जो झेंडा येथे फडकत आहे, ज्याच्यावर केशरी, हिरवा आणि पांढरे पट्टे आहेत आणि ज्यात चरख्याची खूण आहे त्या झेंड्याकरिता प्राण देण्यास आपण जेव्हा तयार होऊ त्याच दिवशी आपल्याला स्वराज्य मिळेल. जर एखाद्या इंग्रज गृहस्थाने तुम्हांला बोलाविले तर त्याच्याशी बोला व तुमचा दृष्टिकोण त्याला समजावून सांगा. पण हे नीट ध्यानात ठेवा की, तुम्हांला जे स्वराज्य मिळणार आहे ते तुमच्या शक्तीनेच. ही मोठी मंगल घटका आहे. तिच्याकडे जर तुम्ही दुर्लक्ष केले तर जसा एक मानुष्य लक्ष्मी त्याच्या कपाळावर टिळा लावण्यास आली असता तोंड धुण्यास जातो, तसा हिंदुस्थान मूर्ख ठरणार आहे.

ही परिषद मंगल घटका आहे असे माना आणि तसा तिचा उपयोग करा. जर आपण निश्चयपूर्वक प्रतिज्ञा केली आणि कामाला लागलो, प्राण समर्पणाला तयार झालो तर पंजाबकरिता न्याय, खिलाफत प्रश्नाची तडजोड आणि स्वराज्य ह्या तीनही गोष्टी आपण जवळजवळ मिळविल्या असे समजा.

[गुजरातीवरून]

'नवजीवन', ५-६-१९२१

८२. अनत्याचाराच्या ठरावावर भाषण, भडोच[1]

जून १, १९२१

जसजसे आपण पुढे जाऊ तसतसे आपल्याला आपले अर्ज सरकारकडे पाठविण्याची जरूरी लागणार नाही. ते अर्ज आपण स्वतःलाच करू. त्या बाबतीत जर आपण कमी पडलो तर स्वराज्याची आपली भाकरी अर्धी-कच्ची राहील. जर आपले अर्ज आपल्यालाच चांगल्या रीतीने केले जातील तर ती भाकरी पक्की भाजली जाईल. पैसा, चरखे आणि सभासद या दृश्य गोष्टी आहेत. पण अनत्याचार ही अंतःकरणाची गोष्ट आहे. ती डोळ्याला दिसणारी नाही. ज्याप्रमाणे श्वासोच्छ्वास हा जगण्याकरिता आहे, त्याप्रमाणे अनत्याचार ह्या चळवळीला आवश्यक आहे हे देशाला समजले पाहिजे. दगडाच्या अनत्याचाराचा आपल्याला उपयोग नाही. पण ज्याला लाथ मारली असता तो विचलित होणार नाही, असा अनत्याचार आपल्याला पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्याला पशूच्या, कुत्र्याच्या अनत्याचाराचा उपयोग नाही. कुत्र्याला कोणी मारले म्हणजे तो भुंकतो किंवा त्या माणसाला चावण्याकरिता धावतो. लछमनसिंग आणि दिलीपसिंग यांनी जसा अनत्याचार दाखविला तसा आपल्याला हवा आहे. शौकत अलींच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे आपल्याला थंड शक्ती हवी आहे. जोपर्यंत आपण ती शक्ती कमाविली नाही तोपर्यंत आपण स्वराज्याला लायक समजले जाणार नाही. वैमानिक शक्तीने जर आपण स्वराज्य कमाविणार असलो तर शंभर वर्षांतही आपण यशस्वी होणार नाही. मालेगावच्या हकीकतीने स्वराज्याच्या घड्याळाचे काटे मागे सारले आहेत. त्या हकीकतीमुळे स्वराज्य मिळणे अगदीच शक्य होणार नाही असे नाही, पण त्यामुळे आपली पीछेहाट खासच झाली आहे. आपला अनत्याचार हा सरकार अनत्याचारी राहील अशा अटीवर पत्करलेला नाही. खरे सांगावयाचे म्हणजे ती सरकारच्याबरोबर सहकारिता होईल. आपल्याला अनत्याचारी असहकारिता करावयाची आहे. जर आपण बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव होत असताना किंवा विमानातून बॉम्ब्स् पडत असताना शांततेने काम करीत राहिलो आणि कलेक्टरला ठार मारण्याकरिता किंवा पोस्ट ऑफिसे जाळण्याकरिता धावत सुटलो नाही तरच आपला अनत्याचार हा खरा अनत्याचार ठरेल. जेव्हा आपण अशा प्रकारचा अनत्याचार वाढवू तेव्हाच या सरकारमागून पठाण येणार आहेत अशी भीती आपल्याला वाटणार नाही. जोपर्यंत

१. गुजरात राजकीय परिषदेत भाषण, मागील प्रकरण पाहा.

आपल्यात अनत्याचाराची शक्ती आहे तोपर्यंत आपण कोणाकडूनही जिंकले जाणार नाही.

या अनत्याचाराच्या पाठाशिवाय आपल्याला हिंदू–मुस्लिम ऐक्याचा धडा शिकावयाचा आहे. जर आपण आपसात लढत राहिलो तर आपली चळवळ लवकरच समाप्त होईल. आपल्याला दुर्बलांचा अनत्याचार नको असून सबलांचा पाहिजे आहे. तो अनत्याचर धैर्यातून निर्माण झाला पाहिजे. असला अनत्याचार माझ्यासारख्या अशक्त माणसाकडूनही आचरला जाईल किंवा माझ्यासारख्या पाच माणसांच्या तोडीचा असेल त्याच्याकडून आचरला जाईल. मी जेव्हा दहा बारा वर्षांचा मुलगा होतो तेव्हा मला भुतांची भीती वाटत असे. त्या वेळी आमची मोलकरीण रंभा मला म्हणे की, भुताचा विचार मनात आला म्हणजे मी रामाचे नाव घ्यावे. त्याप्रमाणे मी रामरक्षा म्हणे. आणि घरातून भुतेखेते घालवून लावी. ज्या अरब मुलाने शरणागतीपेक्षा मरण पत्करले, किंवा प्रल्हादाने जशी अहिंसा दाखविली तशा अहिंसेची हिंदुस्थानला जरूरी आहे. मी मुसलमानांना त्या अरब मुलाची आणि हिंदूंना प्रल्हादाची आठवण ठेवा आणि त्यांच्याप्रमाणे तुमच्यात आहिंसा, मनोधैर्य व शौर्य येऊ द्या असे सांगत असतो.

ठरावामध्ये मालेगावचा जो अंतर्भाव केला आहे, तो आपण मालेगाव विसरावे आणि त्याऐवजी लछमनसिंग व दिलीपसिंगांची अहिंसा व त्यांचा आत्मत्याग यांचे स्मरण ठेवावे म्हणूनच त्याचा उल्लेख केला आहे. अशा अहिंसेला पाठिंबा देण्याकरिता तुम्ही हात वर केलेत म्हणजे त्याचा अर्थ आजपासून तुम्ही माणसाची भीती टाकून दिलीत व देवाला भिण्याचे शिकलात असा होतो. जोपर्यंत आपण हे करीत नाही तोपर्यंत जग हे पूर्वीप्रमाणेच तुम्हांला दटावीत राहील. अशा प्रकारची शक्ती संपादन करावी म्हणून आपण हिंदुस्थानला गुजरातच्या द्वारा मदत करणार आहो. गुजरातमधूनच करबंदी आपल्याला शक्य करावयाची आहे. यात आपल्याला यश यावयाचे असेल तर आपण अहिंसेची शक्ती कमाविली पाहिजे. परमेश्वर अशी शक्ती प्रत्येकाला देवो.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ५-६-१९२१

८३. ठराव[1]

(१) राष्ट्रीय सभेच्या नागपूर अधिवेशनात अनत्याचारी असहकारितेचा जो ठराव पास झाला, त्याला ही परिषद हार्दिक पाठिंबा देत आहे. आणि सर्व वर्गांच्या लोकांना अधिक जोमाने व अधिक संघटित रीतीने तो ठराव पुरा करण्यास आवाहन करीत आहे. विशेषेकरून या परिषदेला असे वाटते की, ज्या प्रमाणात त्या ठरावाची गुजरातमध्ये अंमलबजावणी होत आहे ते प्रमाण चालू वर्षात स्वराज्याची हमी देण्यास पुरेसे नाही.

(२) ह्या परिषदेला गुजरातवर असे बंधन आहे. असे वाटते की, गुजरातने ३ लाख काँग्रेस कमिटीचे सभासद नोंदवावे. टिळक स्वराज्य फंडाकरिता १० लाख रुपये जमवावे आणि एक लाख चरखे सुरू करावेत. बेझवाड्याच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीत जो कार्यक्रम ठरला त्याला अनुसरून ही अपेक्षा आहे. ही परिषद खेड्यातील, तालुक्यातील आणि जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना ३० जूनपूर्वी आपली जास्तीत जास्त रक्कम देण्यास पाचारण करीत आहे.

(३) विचार, उच्चार आणि आचार यांत अहिंसा असणे ही असहकारितेच्या योजनेतील अत्यावश्यक बाब आहे. आणि त्या योजनेची परिपूर्णता ही मुख्यत्वेकरून अहिंसाव्रताच्या पालनावर अवलंबून आहे. आणि म्हणून ही परिषद सर्वांना आग्रहाने सांगते की, सरकारी नोकरांनी प्रक्षुब्ध केले किंवा छळ केला तरी संपूर्ण शांती राखावी. त्यांनी दुष्ट भाषणे करण्याचे टाळावे आणि काँग्रेसने सुचविलेल्या कार्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करावे. आणि गुजरात प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या खास आदेशाशिवाय हरताळ पाळू नयेत आणि सरकारने पुढाऱ्यांना पकडले असता विरोधी निदर्शने करू नयेत.

(अ) सरकारच्या दडपशाही धोरणाची फिकीर न करता साऱ्या देशभर जी शांतता पाळण्यात आली त्याबद्दल ही परिषद समाधान व्यक्त करते. आणि मालेगाव येथे प्रमुख सहकारितावाद्यांवर आणि सरकारी अधिकाऱ्यांवर जी अत्याचारी कृत्ये करण्यात आली त्याबद्दल तीव्र पश्चात्ताप व निराशा व्यक्त करते.

' मुंबई क्रॉनिकल ', ६-६-१९२१

१. भडोचच्या गुजरात राजकीय परिषदेत पास झालेले. ते गांधींनी लिहिलेले असावेत.

८४. वेजालपूर[१] येथील अंत्यज परिषदेच्या मानपत्राला उत्तर

जून १, १९२१

जे अंत्यज नाहीत अशा येथे हजर असलेल्या मित्रांचे मी अभिनंदन करतो. कारण मी त्यांच्यामुळे हिंदू शुद्ध झाले आहेत असे समजतो. मला मानपत्र देण्याची काही जरूरी नाही. सध्या कोणी मला विचारले तर मी अंत्यज आहे असे त्याला सांगतो. अंत्यजाचा धंदा हा पवित्र आहे. आणि त्याच्या सेवेतून आपण त्याला मुक्त करू शकत नाही. जर कोणी संडास-सफाईचे काम केले नाही तर आपण कॉलऱ्याने मरून जाऊ. मला मानपत्र देण्याची कल्पना विसरून जा आणि काही जोरदार काम करण्याचा विचार करा. तुमची स्थिती सुधारा, दारू सोडा आणि कातड्याकरिता जनावरे मारण्याचे थांबवा. मृत जनावरांचे कातडे तुम्ही काढा. काम केल्यावर स्नान करा आणि बाहेर पडण्यापूर्वी स्वच्छ व्हा. उष्ट्याकरिता भीक मागू नका. कोणाकडूनही अशा वस्तू घेऊ नका. नम्रपणे त्यांना नकार द्या. जे आदरपूर्वक दिले जाईल त्याचाच फक्त स्वीकार करा.

परदेशी काचेच्या पेटीत मला मानपत्र देऊन तुम्ही माझा अपमान केला आहे. हातमागाच्या तुमच्या कौशल्याच्या नमुन्याशिवाय दुसऱ्या कशावरही तुम्ही मानपत्र द्यावयास नको होते. तुम्हांला परदेशी वस्तूंचा उपयोगच असता कामा नये.

अहमदाबादचे कॅलिको कापड हे अत्यंत गरीब लोकांकरिता आहे. संस्कृतीचा छाप असलेली खादी तुम्ही वापरावी. तुम्ही स्वतः कापड तयार करा आणि ते वापरा किंवा विका. दारू सोडणे आणि विणकाम करणे हीच तुमच्या उद्धाराची साधने आहेत.

[गुजरातीवरून]
'गुजराती', १२-६-१९२१

१. गुजरातमधील भडोच जिल्ह्यात.

८५. खिलाफत परिषदेत भाषण, भडोच

जून २, १९२१

सातवा ठराव मांडताना गांधी म्हणाले की, तुम्ही घरी जावयाला उत्सुक आहात हे मला ठाऊक आहे, म्हणून मी लांबलचक भाषण करणार नाही. बन्नू कोठे आहे हे तुम्हांला ठाऊक आहे? सरहद्दीच्या प्रश्नासंबंधी माझी मते अध्यक्षांना चांगली माहीत आहेत आणि म्हणून मला हा ठराव मांडण्यास सांगितले. बन्नूच्या मुसलमानांजवळ लाठ्या व दुसरी शस्त्रे आहेत. ते देवाला भितात आणि त्यांना खिलाफत प्रश्न ठाऊक आहे. बन्नूच्या मुसलमानांचा जसा छळ झाला तसा आपला झाला असता तर तुम्ही येथून ताबडतोब खास पळून गेला असता. त्यांतील काही जण बॅरिस्टर्स आहेत आणि विख्यात व्यक्ती आहेत. सत्याच्या पायावर तुम्ही आपला लढा चालवा, असा संदेश त्यांना आता पाठविण्यात आला आहे.

सरकारची प्रक्षोभक कृत्ये ते किती दिवस सहन करतील याची परमेश्वर परीक्षाच करीत आहे. त्यांना आश्रयाकरिता तीन मार्ग आहेत. पण ठराव मांडणाऱ्यांच्यापुढे एकच मार्ग आहे आणि तो जिहादचा. जर मुसलमानांनी अत्याचार केले तर आपण तो मार्ग स्वीकारू. ते तरवारीचा वापर करू शकतील पण मी करणार नाही असे गांधी म्हणाले. जर एखाद्या मुसलमानाने म्यानातून तरवार काढली तर तो मोठी मूर्खपणाची गोष्ट करील. मी ह्या वेळी मुख्यत्वेकरून खिलाफतीवर बोलत आहे, स्वराज्यावर नव्हे. सरकारने लोकांना चिथवू नये व छळू नये, असा इषारा सरकारला अगोदरच देण्यात आला आहे, असे ते म्हणाले. अली बंधू हे सरकारचा वाटेल तो छळ सोसण्यास तयार आहेत, पण ते अनत्याचारी असहकारितेचा मार्ग सोडणार नाहीत. तुम्ही सरकारला कर देऊ नका आणि असहकारितेच्या चळवळीला मदत करण्याची शिकस्त करा. रामादान येथे राष्ट्रीय कार्य मुसलमानांनी करीत राहिलेच पाहिजे. काल काही हिंदू मला असे सांगत होते की, मुसलमान त्याला [चूक] गाई मारण्यास सांगत होते आणि जर त्यांनी तसे केले नाही तर ते मोठा गुन्हा करतील. ज्याप्रमाणे मक्काशरीफ हे मुसलमानांचे पवित्र ठिकाण आहे तशीच गाय

ही मला पवित्र व पूज्य वाटते. ते कृत्य करण्यापूर्वी तुम्ही अलीबंधूंचा सल्ला घ्या. मुसलमान ते कृत्य करणार नाहीत अशी गांधींची खात्री होती. मुसलमान हे नेहमीच हिंदूंच्या बरोबरचे समजले जातील आणि त्यांना हिंदू जे हक्क उपभोगतात ते दिले जातील. तुमचा माझ्यावर आणि या मोठ्या चळवळीवर विश्वास व श्रद्धा असली पाहिजे. शेवटी त्यांनी परमेश्वराची अशी प्रार्थना केली की, परमेश्वराने त्यांना हे राष्ट्रीय काम यशस्वी रीतीने व शांततेने करण्यास भरपूर शक्ती[१] द्यावी.

'मुंबई क्रॉनिकल', ६-६-१९२१

८६. व्हाइसरॉय बोलले

मी नामदार व्हाइसरॉयसाहेबांचे भाषण वाचले. ते भाषण ठीक आहे, पण त्यात सिमल्याचा वास आहे. तथापि आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतो. "बोले तैसा चाले" ह्या फूटपट्टीने जर त्यांची कारकीर्द मोजावयाची असेल तर त्यांनी शब्दाप्रमाणे कृती केली पाहिजे.

भोजनोत्तर भाषणे करणे ही अगदी वाईट चाल आहे. जेवणानंतर मनुष्य हा जरा विश्रांती घेतो, जेवणानंतर लगेच मनुष्य कोणत्याही गोष्टीकडे गंभीरपणे लक्ष देऊ शकत नाही. विशेषतः ज्या भपकेबाज आणि वैभवशाली जेवणांची खास वर्णने वृत्तपत्रात दिली जातात, अशा जेवणांनंतर गंभीर भाषणे करण्यात लक्षच लागत नाही. याचाच अर्थ असा की, व्हाइसरॉयची भाषणे असावी तितकी अभ्यासपूर्ण नसतात.

या वेळी हिंदुस्थानला गंभीरतेची जरूरी आहे. हिंदुस्थान जखमी केला गेला आहे आणि ती जखम भरली नाही एवढेच नव्हे तर खोल खोल जात आहे. जखमेतून रक्तही येत आहे. त्या जखमेवर पट्टी बांधता येणे शक्य नाही. तिच्याकरिता कुशल शस्त्र वैद्याची जरूरी आहे. तो शस्त्रवैद्य कुशल व धीमा असला पाहिजे. मला असे चांगले शस्त्रवैद्य माहीत आहेत की, जे धोक्याची शस्त्रक्रिया करताना अन्नही घेत नाहीत. मला असेही निष्ठावंत वैद्य माहीत आहेत की, ते त्या वेळी देवाच्या नावाचा जप करतात.

१. ह्यात साहेब यांनी ठरावाला दुजोरा दिला व फैजुल्लाखान यांनी पाठिंबा दिला. ठराव मताला टाकला व पास झाला.

व्हाइसरॉय साहेबांनी अलीबंधूंच्या पत्राला तुच्छ लेखू नये. ते त्यांच्याकरिता लिहिले नव्हते, पण मित्रांकरिता. अलीबंधूंच्या भाषणाकडे त्यांनी लक्ष वेधल्याबद्दल कोणीही हरकत घेण्याचे कारण नाही. शत्रूनेही दाखविलेली चूक कबूल करणे, हे मोठेपणाचे लक्षण आहे. अलीबंधूंच्या भाषणात असे काही संदिग्ध शेरे होते. अलीबंधूंच्या पत्राचा एवढाच अर्थ आहे की, जो कोणी आपल्या देशाचे आणि धर्माचे रक्षण करण्याकरिता झगडत असेल त्याने जाणून किंवा न जाणून संदिग्धपणे बोलू नये. आपल्या मनाचा मोठेपणा दाखविण्याकरिता त्यांनी माझ्यासारख्या मित्रांनी दिलेला सल्ला मानला आणि त्यांनी भाषण करताना स्वतःवर अधिक नियंत्रण ठेवू असे प्रामाणिक व गंभीर वचन दिले आहे.

व्हाइसरॉयांना अद्यापि पुरेसा अनुभव यावयाचा आहे. ज्या चळवळीला तुलना नाही, अशा चळवळीचा अभ्यास त्यांना करावयाचा आहे. त्यांच्या भाषणावरून त्यांनी प्राथमिक अभ्यास केला आहे असे वाटते. त्यांनी आपल्या भाषणात सावधगिरी बाळगण्याचा प्रयत्न केला आहे. पण तो प्रयत्न पूर्णपणे यशस्वी झाला नाही. त्यांनी असहकारितावाद्यांना आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला आहे, पण भाषणांनी ते वळणार नाहीत. ते भाषणाचा चुकीचा अर्थ लावणार नाहीत हे खरे. पण फक्त कृतीवरून ते निर्णय देतील.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', ५-६-१९२१

८७. गुजरातचा निर्णय

भडोचला भरलेल्या परिषदेबद्दल मला पुष्कळ लिहावेसे वाटते. पण मध्यरात्र झाली असल्याने आणि मी पूर्णपणे थकलो असल्याने मी थोडक्यातच लिहिणार आहे.

या महिन्याच्या अखेरीस १० लाख रुपये जमवावयाचे, ३ लाख सभासद नोंदवावयाचे आहेत आणि एक लाख चरखे सुरू करावयाचे आहेत, हे गुजरातला सोपेही आहे आणि कठीणही आहे. कार्यकर्त्यांच्या उणीवेमुळे हे कठीण दिसते. जर असंख्य स्त्रीपुरुष कार्यकर्ते पुढे आले तर ते काम सोपे आहे. या तीन गोष्टींत जे संपूर्ण

असहकारितावादी नाहीत व ज्यांचा असहकारितेवर विश्वास नाही त्यांनाही मदत करता येणार नाही. एका हाताच्या बोटांपेक्षाही अशांची संख्या कमी आहे ही माझी खात्री आहे.

ही रक्कम कशी जमेल? हे शक्य होण्यास (१) जर बायका आपले दागिने देतील, (२) जर श्रीमंत लोक आपल्या प्राप्तीचे काही टक्के देतील, (३) जर सर्व लोक आपल्या प्राप्तीचा काही हिस्सा देतील, (४) जे दारू पितात ते दारूवर जो खर्च करतात त्यातील काही हिस्सा देतील, आणि (५) काही श्रीमंत लोक आपले सर्वस्व देतील. असे अनेक जर त्यात आहेत. हे अनेक जर काढून टाकून आपल्याला यश मिळवावयाचे आहे. भडोच परिषदेत घेतलेली प्रतिज्ञा जर पुरी केली नाही तर गुजरातची अब्रू जाईल आणि हे वर्ष संपण्यापूर्वी स्वराज्य मिळविणे कठीण जाईल. ज्यांना पैसे देता येत नसतील त्यांनी चरखे चालवावेत. ज्यांना हे करता येत नसेल त्यांनी सभासद नोंदवावेत. प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे.

परमेश्वर गुजरातचा मान राखो!

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ५-६-१९२१

८८. माझी टिप्पणे

सभासदांचे कर्तव्य

पुढील प्रश्न मला विचारण्यात आला आहे :

कोणत्या प्रकारच्या लोकांना प्रतिनिधी निवडावेत याबद्दल तुम्ही लिहिलेत; तसेच तुम्ही सभासद कोणाला होता येईल हे सांगितले तर बरे. ज्यांना असहकारितेचा ठराव मान्य आहे ते अशाच लोकांना प्रतिनिधी म्हणून निवडतील की, जे त्या ठरावाला पाठिंबा देतील. म्हणून प्रतिनिधी हा वकिली करणारा किंवा पदवी धारण करणारा नसावा, तो खादीधारी असावा; आणि त्याने अंत्यजांना तुच्छ लेखू नये वगैरे. सभासदाकरिता खालील अटीच फक्त आहेत :

(१) त्याचे वय २१ वर्षांचे किंवा अधिक असावे.

(२) त्याने दर वर्षी सभासदत्वाची वर्गणी म्हणून ४ आणे द्यावेत.

(३) स्वराज्य हे देशाचे ध्येय आहे हे त्यांनी मान्य करावे.

(४) स्वराज्य मिळविण्याची शांतता आणि सत्य हीच दोन साधने आहेत. यावर त्याचा विश्वास असावा.

जो या अटी पुऱ्या करील त्यालाच काँग्रेसचे सभासद होता येईल; मग तो सरकारशी सहकारिता करणारा असो, पदवी धारण करणारा असो, किंवा वकिली करणारा असो, किंवा परदेशी कापड वापरो. काँग्रेस ही एकाच पक्षाची संस्था नाही. आणि म्हणून तिचे सभासद होण्याकरिता कमीत कमी निर्बंध असावेत. ज्या सर्वांना मान्य होतील अशाच अटी घातल्या आहेत. काँग्रेसच्या नियमांचा हाच अर्थ आहे.

व्यक्तिशः मला असे वाटते की, ज्या अर्थी असहकारिता ही सर्वव्यापी झाल्याचे आपल्याला ठाऊक आहे त्या अर्थी प्रत्येक जण असहकारितावादी झाला पाहिजे. अशीही शक्यता आहे की, राष्ट्राची मनःस्थिती मी जशी समजतो तशी नसेल. किंवा देशाचा ज्यावर विश्वास आहे ते करावयास देश तयार नसेल. जो स्वतःला असहकारितावादी म्हणवीत असेल, त्याने जरूर त्या अटी पाळल्या पाहिजेत. पण जर काँग्रेस सभासद मोठ्या संख्येने असहकारितावादी झाले तर काँग्रेसच्या पुढील बैठकीत ते तिची मते बदलू शकतील. दिवसेंदिवस लढा हा जास्त जास्त शुद्ध होत आहे, व ध्येय आणि साधने अधिक स्पष्ट होत आहेत. अशी एक म्हण आहे, " जो संकटकाळी न कचरता ठाम उभा राहतो त्याला शूर म्हणावे. " त्या म्हणीप्रमाणे आम्ही देशात शूरांच्या शोधात आहोत. त्यांना शोधून काढणारी काँग्रेस ही एक साधन आहे.

अलीबंधूंची प्रतिज्ञा

मौलाना शौकतअली व मौलाना महंमदअली यांनी आपल्या सहीने पुढील स्पष्टीकरण[1] प्रसिद्ध केले आहे.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', ५-६-१९२१

१. पाहा; अलीबंधूंच्या माफीचा मसुदा. प्रकरण ४५.

८९. टिप्पणे

या वेळेची गरज

जर आपण हा महिना संपण्यापूर्वी बेझवाडा कार्यक्रम पुरा केला नाही, तर ती एक मोठी दुःखद घटना होईल. ही टिप्पणे बाहेर पडण्यापूर्वी महिन्यातले सात दिवस निघून गेलेले असतील. आपल्याजवळ वाया दवडावयाला एक क्षणही नाही. आतापर्यंत वीस लाख रुपयेही जमविले नाहीत. पुढील ३ आठवड्यांत ८० लाख रुपये जमविणे हे अशक्य वाटेल. पण जर आपण पैसे जमविण्याच्या मागे चिकाटीने लागलो तर उघड दिसणारी अशक्यता आपण सहज शक्य करू शकू. जर २१ प्रांतांनी आपल्या शक्तीप्रमाणे काम पुरे केले तर उरलेली रक्कम सहज पुरी करता येईल. बेझवाड्याचा कार्यक्रम राष्ट्रापुढे यापूर्वी ठेवलेल्या सर्व कार्यक्रमापेक्षा अधिक स्पष्ट आहे. जर लोक आपल्याबरोबर असतील आणि जर आपल्याजवळ पुरेसे कार्यकर्ते असतील तर स्वराज्यासारख्या मोठ्या कार्याला आणि लोकमान्यांसारख्यांची महान स्मृती कायम टिकविण्याला ३० कोटी लोकांना १ कोटी रुपये जमविणे म्हणजे काहीच नाही. जर स्त्रियांनी मनात आणले तर त्या आपल्या दागदागिन्यांतून हे पैसे देऊ शकतील. तसेच दारू पिणाऱ्यांना दारूचे पैसे वाचवून ते पैसे देता येतील. गिरणीमालकांना स्वदेशी चळवळीतून जास्तीत जास्त नफा झाला आहे. त्यांना एका दिवसात ८० लाख रुपये देता येतील. मारवाड्यांना आपल्या संपत्तीवर फार ताण पडू न देता ही रक्कम देता येईल. तसेच भाटियांना, मेमन्सना, पारश्यांना किंवा बनियांना करता येईल. ते सर्वजण समृद्ध जमातींतील आहेत. आणि त्यांनी पूर्वी कमीअधिक प्रमाणात सार्वजनिक चळवळींना मदत केली आहे. सिंधी लोकांची इच्छा असेल तर तेही ही रक्कम देऊ शकतील. जर हिंदुस्थानातील कामगारांनी आपल्या प्राप्तीचा बारावा हिस्सा दिला तर तेही सारी रक्कम देऊ शकतील. मी निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या वर्गांकडून सहज रीतीने किती रक्कम मिळू शकेल याबद्दल पुष्कळ मित्रांना विचारले आहे. खाली दिलेले प्रमाण हे त्याकरिता उपयोगी ठरेल :

(१) पगारदारांनी आपल्या महिन्याच्या पगाराचा एक दशांश द्यावा.

(२) वकील, डॉक्टर, व्यापारी आणि तसेच इतर लोक यांनी गेल्या मे महिन्याअखेर त्यांचे जे निव्वळ उत्पन्न असेल त्याचा एक बारांश द्यावा.

(३) ज्यांची मालमत्ता असेल अशांनी आपल्या मालमत्तेच्या किंमतीचे अडीच टक्के द्यावे.

(४) इतर सर्वांनी ४ आण्यांपेक्षा कमी देऊ नयेत.

या प्रमाणात जर सर्वांनी पैसे दिले तर कित्येक कोटी रुपये जमा होतील. पण आपल्याला ठाऊक आहे की, असहकारितावादी आणि सहानुभूती दर्शविणारे हे सर्व वर्गांत लोक आहेत. कोणताही एक वर्ग संपूर्ण असहकारितावादी नाही. म्हणून त्यांनी पैशाची वैयक्तिक जबाबदारी आपल्यावर आहे असे वाटू देऊ नये. आपला प्रामाणिकपणा, कळकळ व शक्ती ही पैसे देण्याच्या प्रश्नाची एक अग्निपरीक्षाच आहे. येत्या ३० तारखेला आपण कमी पडणार नाही अशी आशा करू या.

इतकी मोठी रक्कम कशाला पाहिजे असे प्रश्न सतत विचारले जातात. उत्तर सोपे आहे. ती एक फायदेशीर गुंतवणूक आहे. पण ती केवळ व्यक्तीकरिता नसून सार्वजनिक हिताकरिता आहे. ती रक्कम मुख्यत्वेकरून चरखे वाटण्याकरिता, राष्ट्रीय शाळा चालविण्याकरिता वापरली जाईल. आपल्याजवळ समजा, सहा कोटी घरे आहेत. जर हे घरांचे गोड नाव मोडक्या तोडक्या कुटुंबांनाही लागू असेल तर तितकी घरे आज येथे आहेत. या कुटुंबांना आपण चरखे दिले पाहिजेत व ती घरे खरीच घरे करण्याकरिता कुटुंबांना समर्थ केले पाहिजे. स्वतः वाढीस लागण्याकरिता अशा पायावर घरगुती कताई सुरू व्हावी म्हणून एक कोटी रुपयांची रक्कम ही अगदी कमीत कमी रक्कम आहे. त्याचप्रमाणे जर आपल्याला शिक्षणपद्धतीची पुनर्रचना करावयाची असेल तर त्याकरिता एक कोटीपेक्षा जास्त रुपये लागतील.

दुसरा प्रश्न जो विचारला जातो तो असाः चोख हिशेबाची शाश्वती काय ? एक तर आपल्याजवळ छोटानी[1] आणि जमनालाल यांच्यासारखे निष्कलंक सचोटीचे खजिनदार आहेत. तितक्याच निष्कलंक सचोटीचे, अनुभवाचे आणि अत्यंत लायकीचे पंडित मोतीलाल नेहरू हे चिटणीस आहेत ही दुसरी गोष्ट. तिसरी गोष्ट, आपली वर्किंग कमिटी ही अत्यंत जागरूक आहे. तिच्यात पंधरा हिंदी प्रतिनिधी आहेत. ते महिन्यातून निदान एकदा तरी काँग्रेस कार्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता एकत्र जमतात. अखिल भारतीय निधीकरिता इतकाच खुलासा. ऑल इंडिया काँग्रेस कमिटी ही एकूण फंडाच्या एक-चतुर्थांश खर्चाला प्रत्यक्ष जबाबदार आहे. उरलेली तीन-चतुर्थांश रक्कम ही प्रांतिक कमिट्यांनी आपल्याजवळ स्थानिक गरजांकरिता ठेवावयाची आहे. प्रत्येक प्रांताने आपल्या पैशावर कडक पहारा ठेवावा अशी अपेक्षा आहे. शेवटचा मुद्दा असा : प्रांताचा आणि मध्यवर्तीचा जमाखर्च हा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने नेमलेल्या हिशेब तपासनिसांकडून तपासला जातो.

१. मिया महंमद हाजी जान महंमद छोटानी– मुंबईचे एक राष्ट्रीय पुढारी.

जसे पैशाचे आहे, तसेच सभासद नोंदणीचे आणि चरखे तयार करण्याचे, व सुरू करण्याचे आहे. ह्या तीन साध्या आणि परिणामकारक कसोट्या आपली विधायक शक्ती पारखणाऱ्या आहेत.

माझी काँग्रेस आणि खिलाफत कार्यकर्त्यांना अशी सूचना आहे की, त्यांनी शेवटचे १० दिवस खास काँग्रेसचे दिवस म्हणून बाजूला काढून ठेवावेत आणि ते दिवस त्यांनी बेझवाडयाचा कार्यक्रम पूर्ण करण्याकरिता खर्च करावेत. सभांची आणि भाषणांची जरूरी नाही. ज्या प्रकारचे काम आपल्यापुढे आहे, त्या कामांना सभांपेक्षा निमूटपणे घरोघर जाणे आणि वैयक्तिक बोलणी करणे हे जास्त परिणामकारक होईल.

गुजरातचा निर्धार

गुजरातने आपली प्रांतिक परिषद व खिलाफत परिषद भडोच या ऐतिहासिक गावी भरविली. सौंदर्यसंपन्न नर्मदेच्या तीरावर ह्या परिषदा भरल्या. तेथे खादी व चरख्याचेही प्रदर्शन होते. तेथे जे निरनिराळ्या प्रकारचे चरखे आले त्यावरून हिंदुस्थानची संशोधकबुद्धी किफायतशीर कामाला लागत आहे, असे दिसले; पण वाचकांनी अशी कल्पना करू नये की, तेथील या नमुन्यांत अधिक चात्यांचे चरखे होते व ते अधिक सुताचे उत्पादन करीत होते. स्वागत समितीच्या अध्यक्षांचे भाषण आणि परिषदेच्या अध्यक्षांचे भाषण ही दोन्हीही थोडक्यात आणि मुद्देसूद होती. स्वागताध्यक्ष श्री. हरिभाई अमीन यांनी आपले साधे भाषण वाचण्यास पंधरा मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेतला नाही. परिषदेचे अध्यक्ष श्री. वल्लभभाई पटेल यांनी आपले सारे भाषण वाचण्यास तीस मिनिटांपेक्षा अधिक वेळ घेतला नाही. साधेपणा, मुद्देसूदपणा, सुसंगती आणि नम्रता याकरिता वाचकांनी ते भाषण वाचावे अशी मी शिफारस करतो. त्या भाषणात असहकारितेच्या विरोधकांबद्दल एकही कटू शब्द नव्हता. सरकारवरील त्यातील टीका अत्यंत संयमपूर्वक होती. त्यातील बहुतेक भाग असहकारितेच्या विधायक गोष्टीसंबंधी होता.

पण परिषदेचे महत्त्व त्यातील ठरावात होते. त्या ठरावात बेझवाड्याच्या कार्यक्रमातील गुजरातचा वाटा निर्दिष्ट करण्यात आला. त्या परिषदेने गुजरातला आपापल्या हिश्याच्या तिप्पटीपेक्षा जास्त रक्कम म्हणजे १० लाख रुपये टिळक स्वराज्य फंडाला आणि ३ लाख सभासदांचा आपल्या जवळजवळ संख्ये इतका वाटा पुरा करावा आणि एक लाख म्हणजे त्यांच्या वाट्याच्या दुपटीपेक्षा थोडे कमी चरखे सुरू करावेत असे ठरले. जर हा कार्यक्रम पुरा झाला तर गुजरातला गर्व बाळगण्यासारखी गोष्ट होईल असे मला वाटत नाही. ३० जून पूर्वी हा कार्यक्रम पुरा केला तर ते वाईट होणार नाही. पैसे जमा करण्याला व्यवस्थितपणा यावा म्हणून १० लाख रुपयांची रक्कम ही निरनिराळ्या जिल्ह्यांना वाटून देण्यात आली आहे. गुजरातमध्ये काँग्रेस सभासद

संख्या ४०,५१४ आहे. फंडाची जमा रक्कम १,४०,१४९ रुपये आहे. त्यापैकी ३५,००० रुपये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडे पाठविले आहेत. चरख्यांची एकूण संख्या २०,०५८ आहे. गुजरात हा शिक्षणाच्या राष्ट्रीयकरणाबद्दल अत्यंत जागरूक आहे. पण सहा वकिलांपेक्षा अधिकांनी वकिली थांबविली नसल्यामुळे सर्व प्रांतांत तो वकिली सोडण्याचे बाबत मागासलेला आहे. राष्ट्रीय शिक्षणातील प्रगतीबद्दल मी माझ्यासमोरचा अहवालच वाचून दाखवितो.

> गुजरातमधील राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थांची एकूण संख्या २४५ आहे, व त्यांत ३२,१०२ विद्यार्थी शिकत आहेत. अहमदाबाद-मधील म्युनिसिपालिटीच्या शाळा त्यांत धरल्यामुळे वाढीला हे अंशतः कारण आहे.
>
> गुजरात विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षांत उमेदवारांची संख्या पुढील-प्रमाणेः ४६ बी. ए. ला, ४ बी. एस्सीला, ९६ इंटरमीजिएट आर्टसला, ४६ इंटरमीजिएट सायन्सला आणि ५४८ मॅट्रिक परीक्षेला. पास झालेल्यांची संख्या अनुक्रमे पुढीलप्रमाणे होतीः ३९, २, ६५, ९, आणि ३७४.

पंजाब पुढे चालला

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सरचिटणिसांनी पंजाबमधील असहकारितेच्या कामाचा जो अहवाल सादर केला आहे तो मी आताच पाहिला. त्यावरून मी लक्ष वेधणारे पुढील आकडे काढीत आहेः हा अहवाल लिहिण्याच्या वेळेपर्यंत म्हणजे एप्रिलअखेर एकूण जमा रक्कम रु. २,०९,०८१–१३–० इतकी होती. या जमेच्या नीट-नेटक्या स्वरूपाबद्दल मी आताच अभिप्राय व्यक्त केला आहे. सर्व प्रांतांत जास्त रक्कम जमविल्याबद्दल पंजाबचे अभिनंदन केले पाहिजे. आजपर्यंत कोणत्याही प्रांताने दोन लक्षांहून अधिक रक्कम जमविल्याचे मला माहीत नाही. पण जो पुष्कळ देतो त्याच्या-कडून अधिक अपेक्षा केली जाते. या तत्त्वानुसार या शेवटच्या खास कामाच्या महिन्यात पंजाब याहूनही अधिक प्रयत्न करील आणि शक्य तर आपला उच्चांक मागे टाकून पहिला नंबर टिकवील अशी मला आशा आहे. मी शक्य तर असे म्हटले याचे कारण मुंबई जरी अद्याप जवळजवळ झोपली असली तरी मुंबईला हरविणारा एखादा प्रांत निघेल, असे मला वाटत नाही. पण पंजाबमध्ये शक्ती आहे आणि शक्तीत जर इच्छेची भर पडली तर तिचा पहिला आला नाही तरी दुसरा नंबर जवळजवळ येईल. पंडित मालवीयजींच्या खालोखाल देणग्या मिळविण्यात लालाजींच्या इतका दुसरा कोणी तज्ज्ञ असेल असे मला वाटत नाही. आर्य समाजाच्या चळवळीने मध्यमवर्गाला राजकीय चळवळींना पैसे देण्यास शिकविले आहे. अमृतसरचे व्यापारीच नुसते येणारी तूट

भरून काढतील. अमृतसरने ही तूट का भरून काढावी याला खास कारण आहे. पण जलंधर, ल्यालपूर, रावळपिंडी, मुलतान, गुजराणवाला, सियालकोट, हफीजाबाद ही सर्व ठिकाणे चांगला पैसा देऊ शकतील. लाहोरमध्ये पुष्कळ श्रीमंत व्यापारी आहेत आणि आपल्यात विश्वास नाही ही दुर्दैवी गोष्ट नसती तर पंजाबला तूट भरून काढण्याकरिता मुंबईइतकाच मान मिळाला असता. निदान तो पंजाबला मिळेल अशी आशा करू या.

शिक्षणाच्या बाबतीत पंजाबची नोंद वाईट नाही. तेथील कॉलेज-विद्यार्थ्यांना आणि शाळांतील मुलांना लष्करी अमलाखालून जर जावे लागले नसते तर त्यांची नोंद अधिक चांगली झाली असती. कॉलेजांतील ३५० विद्यार्थ्यांनी कायमची कॉलेजे सोडली असे समजते. त्यांतील ८५ अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी हिंदी राष्ट्रीय कामात येऊन मिळाले आहेत. राष्ट्रीय शिक्षण मंडळ स्थापन झाले आहे. गुजराणवाल्याच्या गुरु नानक खालसा कॉलेजने विद्यापीठाचा संबंध सोडला आहे. प्रांतिक कमिटीने लाहोरला राष्ट्रीय कॉलेज काढले आहे. काही श्रेष्ठ दर्जाच्या शाळा मिळून एकूण ८ जुन्या राष्ट्रीय झाल्या आहेत आणि १५ नव्या राष्ट्रीय शाळा निघाल्या आहेत. ह्या राष्ट्रीय संस्थांतून किती विद्यार्थी शिकतात याचे बिनचूक आकडे जर मि. संतानम् सेक्रेटरी यांनी दिले असते तर बरे झाले असते. यांतील काही शाळांची मला जी माहिती आहे तीवरून तो आकडा पाच हजारांपेक्षा कमी नसावा. सुमारे २५ शिक्षकांनी सरकारी संस्था सोडल्या. ४१ वकीलांनी वकीली थांबविली. त्यांतील फक्त १३ जणांना प्रांतिक कमिटीकडून निर्वाहभत्ता मिळतो. सुमारे ८० जागी पंचायती स्थापन झाल्या आहेत. एप्रिलअखेर पंजाबात २५८ काँग्रेस कमिट्या होत्या. सभासद संख्या प्रत्येक कमिटीची सरासरी ७५. रोहटक जिल्ह्याचा नंबर पहिला, कमिट्या ४७.

चरख्याच्या बाबतीत कोणीही पंजाबला हरविणार नाही. अहवालात असे अभिमानाने म्हटले आहे की, चरखा नसणारी पंजाबी घरे फारच थोडी. "आतापर्यंत ते आळशी राहिले. पण गेल्या दोन महिन्यांत प्रत्येकजण पूर्वीच्या सूतकताईच्या कामाला लागला." पण पंजाबात चोहोकडे सूतकताई चालू असताना एक खेदाची गोष्ट अशी आहे की, पंजाबी लोक खळीचे भपकेबाज कापड वापरू लागले आहेत. ते कापड हिंदुस्थानच्या हवेत अंगावर वापरण्यास अत्यंत बेचैन करणारे आहे. त्याऐवजी खादी किती तरी सुंदर, मऊ, टिकाऊ आणि घाम शोषून घेणारी असते. "सुस्थितीतल्या लोकांमध्ये खादीचे कपडे वापरण्याची सवय दररोज वाढत आहे" हे जेव्हा मी वाचले तेव्हा मला आनंद झाला. पंजाबात विणकरांची तूट भासत आहे. उलट्या काळजाच्या लष्करी भरती करणाऱ्या दलालांच्या मोहाला बळी पडणारे विणकर आपला मानाचा विणण्याचा धंदा सोडून माणसे मारण्याचा धंदा पत्करीत आहेत, हे पुष्कळांना ठाऊक नसेल. हिंदुस्थानात लोकसंख्येच्या प्रमाणात पंजाबात एके वेळी सर्वांत अधिक विणकर होते. आता त्या अर्थी विणकाम हे दररोज अधिक प्रतिष्ठित आणि किफायतशीर

होऊ लागले आहे, ज्या अर्थी निदान सध्या तरी पंजाबी लोक ज्याला शिपाईगिरीचा अप्रतिष्ठित धंदा म्हणतात तो पत्करणार नाहीत.

अशा प्रकारे पंजाबचे असहकारितेतील काम कमी प्रतीचे नाही.

आसाममधील मजूर

जरी मी मि. ॲन्ड्र्यूज आणि इतरांच्याबरोबर संबंध ठेवीत आहे, तरी मी जाणूनबुजून त्या संघर्षांत लक्ष घालण्याचे टाळले. ती मंडळी तेथे जागेवर आहेत व तो प्रश्न हाताळीत आहेत. मी या संघर्षाचा एवढ्याचकरिता उल्लेख केला की, तो संघर्ष उद्‌भवत आहे, याची मला माहिती नव्हती. या लोकांनी आपल्या मालकांना सोडून जावे म्हणून कोणी माझ्या नावाचा उपयोग केला तर मला दुःख होईल. हा निव्वळ कामगारांचा तंटा आहे, हे स्पष्ट आहे, मालकांनी रोजंदारी कमी केली हे कबूल करण्यात आले आहे. मि. दास आणि मि. ॲन्ड्र्यूज हे दोघेही लिहितात की, ती कटकट शुद्ध आर्थिक स्वरूपाची आहे आणि मजुरांची गाऱ्हाणी खरी आहेत. सुधारलेल्या सरकारला ती गाऱ्हाणी दूर करण्यात यश आले नाही, हे उघड आहे. हिंदुस्थानात जे व्यापारी हितसंबंध असलेले इंग्लिश लोक आहेत त्यांच्याबद्दल आम्हांला शत्रुत्व वाटते, असा या तंट्याचा अत्यंत अन्याय्य उपयोग टाइम्स ऑफ इंडियाने केला आहे हे माझ्या पाहण्यात आले. असहकारितावादी हे द्वेष करतात असे म्हणण्याची एक फॅशनच पडली आहे. मी असे निर्धाराने म्हणतो की, फक्त असहकारितेमुळेच वर्णीय तंटे आणि दंगली ह्या टळल्या आहेत आणि लोकांच्या क्रोधाला योग्य वळण मिळाले आहे. कोणताही हितसंबंध तो एका विशिष्ट वर्णाचा आहे, याकरिता त्याला अपाय करावा असा असहकारितेचा हेतू नाही. तिचा हेतू प्रत्येक हितसंबंधात जे अपायकारक किंवा अशुद्ध स्वरूप असते ते नाहीसे करावे असा आहे. जे जे इंग्लिश किंवा हिंदी हितसंबंध अन्याय किंवा पाशवी बलावर आधारलेले आहेत, किंवा साऱ्या हिंदुस्थानच्या वाढीला ते सर्व निःसंशय संकटात आहेत ज्या हितसंबंधाला पाशवी शक्तीचा आधार आहे, पण जनतेच्या सदिच्छेचा नाही असा हितसंबंध असहकारितेच्या आगीतून बहुधा बचावणार नाही. जर आसामचे मळेवाले हिंदी श्रमिकांच्या शोषणावर जगत नसले तर त्यांना भिण्याचे काही कारण नाही. एक वेळ अशी खात्रीने येत आहे की, जेव्हा अन्यायाने लाभांशाचा हिस्सा मिळणार नाही. मोठाल्या धंद्यांच्या नफ्याचे संबंध कामगारांच्या नफ्याशी असलेच पाहिजेत. मी हे स्पष्ट सिद्धांत मांडत आहे. कारण मला ठाऊक आहे की, असहकारिता ही संगिनीच्या टप्प्याच्या पलीकडे आहे. हिंदी लोकांच्या अंतःकरणात तिला एक शाश्वत स्थान प्राप्त झाले आहे. माझ्यासारखे कार्यकर्ते घंटा वाजली की निघून जातील, पण असहकारिता मागे राहील. हिंदुस्थानातील श्रमिक वर्ग हा अद्याप इतका सुबुद्ध झाला नाही की, त्याला न्याय्य पायावर भांडवलदार आणि

मजूर यांच्यातील संबंध नियमित करण्याची लायकी प्राप्त झाली नाही हे मला ठाऊक आहे. पण ती वेळ लवकर येत आहे. आपल्या कल्पनेपेक्षाही जलद येत आहे. मला अशी आशा वाटते की, भांडवलदार– मग ते युरोपियन असोत की हिंदी असोत ही नवी जागृती आणि आपल्यामध्ये निर्माण झालेली नवी शक्ती आकलन करू शकतील.

अस्वीकारणीय

तुरुंगातील दगदगीचे जीवन टाळण्याकरिता अलीबंधूंसारख्या दुर्बल माणसांनी माफी मागितली अशी चुकीची समज करून काही वृत्तपत्रांनी असे सुचविले आहे की, सरकारने, जे लोक राजकीय गुन्ह्याकरिता शिक्षा भोगीत आहेत, त्यांच्यापासून तशीच हमी घेऊन त्यांना सोडून द्यावे. आपल्या श्रद्धेला जागणारा कोणताही असहकारितावादी सरकारला कसलीही हमी देऊन आपली सुटका विकत घेणार नाही. त्यांच्यापैकी प्रत्येकाने आपण अत्याचारी हेतूबद्दल निरपराधी आहोत असे बजाविले आहे. अलीबंधूंच्यावर जर खटला झाला असता तर त्यांनी आता जसे पत्रक काढले तसेच पत्रक काढले असते त्यामुळे त्यांचा तुरुंगवास टळला नसता. ज्यांनी ही अस्वीकारणीय सूचना केली त्यांनाही हे ठाऊक आहे की, पुष्कळांना अप्रीती फैलावल्याबद्दल शिक्षा झाल्या, किंवा आपण भाषण करणार नाही, असा जामीन देण्यास नकार दिल्याबद्दल शिक्षा झाल्या. सध्याच्या राज्यपद्धतीविरुद्ध अप्रीतीचा फैलाव करणे, सविनय कायदेभंगाला देशाची तयारी करणे आणि आताच उल्लेखिलेल्या जामिनासारखे जामीन देण्यास नकार देणे हे असहकारितावाद्यांचे कर्तव्य आहे. अलीबंधूंनी पहिल्या दोन गोष्टी करणार नाही अशी हमी दिलेली नाही. म्हणून जर सरकारला अत्याचाराला चिथावणी देण्याबद्दल शिक्षा करावयाची असेल तर नुकत्याच शिक्षा झालेल्या सर्व लोकांना त्यांनी त्यांच्याकडून हमी न घेता सोडून दिले पाहिजे. असहकारितावाद्यांच्या बाबतीत ते पूर्णपणे उदासीन आहेत किंवा असले पाहिजेत. त्यातील बहुसंख्य लोकांना तुरुंगाचे जीवन हे रोजचे जीवन झाले पाहिजे. आपले स्वातंत्र्य विकत घेण्याकरिता हमी देणे, याऐवजी जे आनंदाने तुरुंगवास पत्करतात अशांची नावे वाचताना मला हर्ष होतो. स्वतःच्या निष्ठेशी कोणत्याही प्रकारचा भंग होऊ न देण्याची काळजी घेतल्यानंतर असहकारितावाद्यांनी कोणत्याही प्रकारचे कसलेही वचन कोणालाही देण्याचे कारण नाही.

विध्वंसक भाग

या कार्यक्रमाबद्दल माझी न साजेशी प्रशंसा करून मला ‘ लीडर ’ने आशीर्वचन दिले आहे. आणि असहकारितेचा विध्वंसक भाग देशाने पत्करावा म्हणून मी सल्ला दिल्याबद्दल माझी थट्टा केली आहे. त्या पत्राच्या बातमीदाराने उरलेला कार्यक्रम मी निश्चितपणे मागे घ्यावा अशी मला विनंती केली आहे. लीडर आणि त्यांचा बातमीदार यांना मी ताबडतोब कळवितो की, माझी इच्छा असली तरी ते शक्य नाही. तो अधिकार

काँग्रेस व मध्यवर्ती खिलाफत कमिटीला आहे. आणि जरी काँग्रेस व मध्यवर्ती खिलाफत कमिटीने तो भाग वगळला तरी त्या विध्वंसक भागावर माझी जिवंत श्रद्धा असल्यामुळे मी तो टाकून देऊ शकत नाही. त्या संस्थांना अनत्याचार ही अखेरची श्रद्धा वाटत नसेल आणि दोहोंपैकी एका संस्थेला ती वाटत नाही. या साऱ्या दुष्ट गोष्टींवर माझ्याजवळ अनत्याचाराशिवाय दुसरा तोडगा नाही. म्हणून मी वकिलांना पुन्हा कोर्टांत जाण्यास किंवा विद्यार्थ्यांना सरकारी शाळांत परत जाण्यास सांगू शकणार नाही. वकील आणि सरकारी शाळेतील आणि कॉलेजातील मुले यांनी काँग्रेसचे जोपर्यंत असहकारितावादी धोरण कायम आहे तोपर्यंत तिचे पदाधिकारी व्हावे असेही मी म्हणणार नाही.

असहकारितेतील पहिली पायरी जी– विध्वंसक भागाचा तोंडाने प्रचार करावा अशी होती, ती आता संपली आहे. पदव्यांबद्दल, कोर्टाबद्दल, शाळांबद्दल आणि कौन्सिलाबद्दल आपण निश्चितपणे कोठे आहोत हे आपल्याला ठाऊक आहे. या संस्थांची पूर्वीची प्रतिष्ठा गमावली आहे याबद्दल असहकारितावादी समाधान पावले आहेत असे मला वाटते. संख्येच्या दृष्टीने मिळालेले उत्तर हे ठसठशीत वाटण्याइतके मोठे नव्हते याबद्दल विरोधकांना आपले समाधान करून घेण्याचा हक्क आहे. ज्यांनी आमच्या हाकेला ओ दिली त्यांनी अत्यंत परिणामकारक पण बिनबोलका असा त्या दिशेने प्रचार केला. पण एक गोष्ट स्पष्ट आहे : जोपर्यंत काँग्रेसने घातलेल्या तीन अटी पुऱ्या होणार नाहीत, तोपर्यंत सहकारितेचे युग पुन्हा सुरू होणार नाही.

बेझवाड्याचा कार्यक्रम हा स्वराज्य स्थापण्याला पुरेसा नाही हे मी कबूल करतो. पण स्वराज्याकडे टाकलेले ते एक भरभक्कम पाऊल आहे असे मी मानतो. तो कार्यक्रम पुरा केला तर राष्ट्रात आत्मविश्वास निर्माण होईल आणि जरूर पडल्यास राष्ट्राला पुढील पावले टाकण्यास शक्ती येईल. काँग्रेस सभासद होणे याचा अर्थ निरनिराळ्या संस्थांकरिता राष्ट्रीय प्रतिनिधित्वाचे मतदार होणे असा असल्यामुळे, एक कोटी मतदार सापडणे म्हणजे स्वराज्यातील खऱ्या मतदार संघाचा गाभा सापडण्यासारखे आहे. चालू स्थितीत वीस लाख चरखे असणे याचा अर्थ हिंदुस्थानने दारिद्र्याचे उच्चाटन करण्याचा निश्चय केला आहे, स्वावलंबी होण्याचे ठरविले आहे व हिंदुस्थान आर्थिक स्वातंत्र्य कमाविणार आहे असा त्याचा अर्थ आहे. एक कोटी रुपये जमविणे याचा अर्थ हिंदुस्थान आपले भाग्य गाठण्याचा निश्चय करीत आहे याचे प्रत्यक्ष द्योतक आहे.

इतर राष्ट्रांच्या इतिहासाचे आपल्याला इतके अजीर्ण झाले आहे की, तीस वर्षांच्या किंवा शंभर वर्षांच्या युद्धांची पुनरावृत्ती केल्याशिवाय आणि म्हणून लष्करी शिक्षण घेतल्याशिवाय आणि प्रचंड शस्त्रास्त्रे असल्याशिवाय आपण आपले ध्येय गाठू शकू यावर विश्वास ठेवणे अशक्य झाले आहे. आपण आपला इतिहास वाचण्याची कधी पर्वा करीत नाही आणि राजे आले व गेले व राजघराणी निर्माण झाली व नष्ट झाली, तरीही हिंदुस्थान अविचलित आणि अबाधित राहिला याची आपल्याला

आठवण होत नाही. आपण गेल्या युद्धापासून धडाही घेणार नाही. तो धडा असा की, आपल्याला लष्करी तयारी नको असून हिंदुस्थानच्या भवितव्यासंबंधी आपल्या दृष्टि-कोणात बदल हवा आहे हा होय. सत्रयीने आपल्याला अशी खात्री वाटत आहे की, आपण जे कोट्यवधी लोक आहोत ते एक लक्ष इंग्रजांपुढे कःपदार्थ आहोत. ते सर्व इंग्रज शास्तेही नाहीत. ब्रिटिश अंमलाबद्दलचा दरारा जेव्हा आपण टाकून देऊ व आपण कस्पटासमान आहोत असे मानण्याचे थांबवू त्याच वेळी आपण स्वतंत्र होऊ. ही वैचारिक क्रांती ह्याच वर्षी होणे शक्य आहे आणि एवढ्या वेळात हिंदुस्थान त्याला तयार होईल अशी मला आशा आहे. आतापर्यंत आपण स्वतःला पुष्कळ गोष्टींची वचने दिली व त्यांतील फार थोडी पुरी केली. काँग्रेसच्या गेल्या दोन वर्षांतले ठराव जरी आपण काढले तरी आपल्याला असे आढळेल की, जे अर्ज पाठविण्याचे ठरविले होते तेही अर्ज आपण पाठविले नाहीत. आतापर्यंत आपण सरकारकडे प्रत्येक गोष्टी-करिता पाहात आलो आणि आपल्याला असे आढळले की, महत्त्वाच्या कोणत्याही गोष्टीला ते दाद देत नाहीत. म्हणून आपली घोर निराशा झाली. आपला स्वतःवर किंवा सरकारवर विश्वास उरला नाही. सध्याच्या चळवळीचा उद्देश आपल्या निराशेच्या हिवाळ्याचे परिवर्तन, आशेच्या व विश्वासाच्या वसंत ऋतूत करावे असा आहे. जेव्हा आपण स्वतःवर विश्वास ठेवू, तेव्हा इंग्लिश लोकही आपल्यावर विश्वास ठेवतील असे मी वचन देतो. तोपर्यंत सरकार व आपल्यामध्ये सहकाराची आशा नाही. सध्याची सरकारची पद्धत ही आपल्या दुर्बलतेच्या शास्त्रीय अभ्यासावर आधारलेली आहे असे विश्लेषण केल्यास आढळून येईल. ती दुर्बलता त्या पद्धतीने कमी करण्याऐवजी वाढविली आहे. असहकारिता हा आपल्या स्वतःच्या दुर्बलतेविरुद्ध जितका निषेध आहे, तितकाच विद्यमान पद्धतीत उपजत असलेल्या भ्रष्टाचाराविरुद्धही निषेध आहे. त्या पद्धतीत राहिल्यामुळे आपण हिंदी व ब्रिटिश हे दोघेही अशुद्ध होतो. त्या पद्धती-तून एक पक्ष बाहेर पडला तर दोघेही शुद्ध होतात. जे संशयी आहेत त्यांनाही असह-कारितेचा कार्यक्रम स्वीकारण्यास आवाहन केले आहे आणि मी त्यांना असे वचन देतो की, जर तो कार्यक्रम पूर्णपणे पार पडला तर हिंदुस्थानात या वर्षी स्वराज्य येईल.

स्वराज्य म्हणजे स्वावलंबन

व्हाइसरॉयच्या मुलाखतीबद्दल एक आदरणीय मित्र लिहितात :—

माझ्या नम्र मताप्रमाणे असहकारितेच्या पुढाऱ्यांच्या मुलाखती ह्या सध्याच्या परिस्थितीत राजकीयदृष्ट्या चूक आहेत; व त्यांची चळवळीवर प्रतिक्रिया होईल. पंजाब व खिलाफत अत्याचार यांच्यामागे स्वराज्याचा प्रश्न आहे आणि हिंदुस्थानचे स्वराज्य म्हणजे साम्राज्याचा अंत. चांगल्या परिस्थितीत अशा अंताचा अर्थ, साम्राज्याचा राष्ट्रकुटुंबात पुनर्जन्म. पण

आज असा जागतिक राजकारणाकडे स्वतंत्र आणि उदारदृष्टीने पाहणारा मुत्सद्दी कुठे आहे की, जो ब्रिटिश हितसंबंधापलीकडे जाऊन अधिक खोल अशा मानवी मूल्याकडे पाहील? स्वावलंबनाच्या मापाने मी स्वराज्याच्या चळवळीचे यश मोजतो. लॉर्ड रीडिंगकडून काही सवलती उपटाव्यात हा त्याचा हेतू नाही. अधिक घोटाळ्यातून सुटावयाची आशा असेल तर ती सरकारशी वाटाघाटी करण्यापासून स्वतःची सुटका करून घेण्यात आहे आणि दुःख भोगण्याची प्रबल शक्ती निर्माण होणारे राष्ट्र होण्यात आहे. ज्या हिंदुस्थानचे बलिदान होईल तोच हिंदुस्थान पारतंत्र्यातून मुक्त होईल.

मुलाखती घेणे राजकीयदृष्ट्या चूक आहे हे लेखकाचे म्हणणे मला मान्य नसले तरी आपल्या वृत्तीबद्दलचे त्यांचे निवेदन हे तंतोतंत बरोबर आहे. ब्रिटिश मुत्सद्दी काय करतील किंवा काय करणार नाहीत याची आपल्याला चिंता नाही. बरोबर मार्गाने चालण्याचा प्रयत्न करणे एवढेच आपले काम. आपली अलिप्तता ही आपल्या उद्धटपणाचे लक्षण असता कामा नये, किंवा आमच्या विरोधकांना आमचा दृष्टिकोण समजावून सांगण्यास आमची तयारी नाही असाही असू नये. जर आपण आपल्या कामात ठाम असलो तर जगाकडे जाण्याला आपण तयार असले पाहिजे. या मुलाखतीत धोका आहे, या हरकतीत काही जोर आहे हे मला समजते. ज्या कमीतकमी गोष्टींचा संग्रह आपल्याजवळ सतत असावयास पाहिजे आणि ज्यात आपण केव्हाही माघार घेणार नाही, अशी आपल्याला सवय नसल्यामुळे आपण सहज घसरून पडू.

काँग्रेस सभासद कोणाला होता येईल ?

एक मित्र विचारतात, वेश्यांना काँग्रेस सभासद होता येईल का आणि ज्यांना ध्येय मान्य नाही ते फक्त चार आणे देऊन सभासद होऊ शकतील का? ह्या दुर्दैवी भगिनी जर काँग्रेसची घटना मान्य करीत असतील तर त्यांना सभासद होण्यास कसलीही आडकाठी नाही. सभासदत्वाच्या अटी मान्य करून चोरांनादेखील काँग्रेसमध्ये प्रवेश मागता येईल. समाजातील सर्वस्व गमावलेल्यांना काँग्रेसमध्ये येण्याची जर प्रेरणा झाली तर ते आगामी सुधारणांचे चिन्ह आहे, अशी आशा करू या. पण संख्या फुगविण्याकरिता अशा लोकांना आपण सभासद होण्यास सांगू नये. जे काँग्रेसचे ध्येय प्रतिज्ञापूर्वक स्वीकारणार नाहीत व सही करणार नाहीत ते काँग्रेसचे सभासद होऊ शकणार नाहीत हीही गोष्ट स्पष्ट आहे. चाचणी साधी आहे पण अत्यंत आवश्यक आहे :

(१) एकवीस वर्षांचे वय असणे.

(२) शांततापूर्ण आणि न्याय्य मार्गाने स्वराज्य मिळविण्याची इच्छा असणे व प्रयत्न करणे.

(३) वार्षिक चार आणे देणे.

जो कोणताही पुरुष किंवा स्त्री सहकारितावादी किंवा असहकारितावादी ही साधी चाचणी पुरी करील त्याला सभासद होण्याचा हक्क आहे.

'यंग इंडिया', ८-६-१९२१

९०. व्हाइसरॉय बोलतात

व्हाइसरॉयसाहेब हे शफींच्या भाषणाबद्दल जे बोलले ते तितकेच त्यांच्याही भाषणाला लागू आहे. नामदारसाहेबांनी शफींचे भाषण हे भोजनोत्तर वक्तृत्व आहे, असे त्याचे वर्णन केले आहे. मी माझ्या सुरुवातीच्या दिवसांत ज्यांना ऐतिहासिक भाषणे म्हणतात व जी निरनिराळ्या पंतप्रधानांनी मॅन्शन हौसमध्ये केली आहेत, त्यांचा एक कमीअधिक बिनचूक श्रोता विद्यार्थी होतो. त्या भाषणात मला नेहमी अवास्तवतेचा डौल होता असे वाटत असे. आणि नामदार व्हाइसरॉयसाहेबांचे भाषण अभ्यासल्यानंतर याही भाषणात अवास्तवतेचा डौल आहे असे म्हणावे लागते, याबद्दल दुःख होते. लॉर्ड रीडिंग यांचा उद्देश आपल्या भाषणावर डौलदार आवरण चढवावे असा नव्हता. उलटपक्षी त्या भाषणात उत्सुक हिंदुस्थानला खरा संदेश द्यावा म्हणून त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे उघड उघड पुरावे सापडतात. पण माझ्या नम्र मताप्रमाणे तसे करण्यात त्यांचे भाषण फसले आहे असे मला वाटते, कारण व्हाइसरॉयच्या हुद्द्याबरोबर जी अनेक बंधने असतात त्याचा तो परिणाम. उदाहरणार्थ, ब्रिटिश सत्तेत कधीही चूक असत नाही, असा जो परंपरेचा हक्क सांगितला जातो त्यावर ते मात करू शकले नाहीत. सिद्धांत म्हणून त्यांनी असे प्रतिपादन केले की, "येथे हिंदुस्थानात वर्णविषयक विषमतेचा अंशसुद्धा सापडणार नाही व सापडता कामा नये. याबद्दल शंकेला जागाच नाही." हिंदी माणसाच्या कानाला यापेक्षा अधिक असत्य सिद्धांत ऐकू आलेला नाही. कारण त्याच्या अनुभवाने तो खोटा ठरला आहे. मग तो किती का मोठा असेना. वर्णविषयक श्रेष्ठत्व हे एक वेड आहे आणि ते सामान्य इंग्लिश माणसाला जवळजवळ धर्मासारखेच वाटत आहे व तो इंग्लिश मनुष्य लोकांच्या नजरेपासून ते लपवावे म्हणून प्रयत्नही करीत नाही. वसाहतीप्रमाणे हिंदुस्थानातदेखील ते श्रेष्ठत्व तुमच्यावर आदळले जाते. कायदेपुस्तकात तसे लिहिलेले आहे. व्हाइसरॉयांच्या भाषणात मागील पुष्कळ चुकांची

प्रांजल कबूली नाही आणि म्हणून नवीन पान उघडण्याची त्यांची कळकळींची इच्छा दिसत नाही.

नामदार व्हाइसरॉयसाहेब आपल्या निवेदनात ' ब्रिटिश राज्याचे मूलभूत तत्त्व, सांगताना बिलकूल समाधानी नव्हते; पण त्यांनी मौलाना शौकत अली व महंमद अली यांचा उल्लेख करताना त्यांना त्याहीपेक्षा कमी समाधान वाटले असावे असे माझे नम्र मत आहे. ते आपल्या भाषणात अत्यंत सावधगिरीने बोलत होते हे मी जाणतो. त्यांनी सूक्ष्म भावना न दुखविण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविकपणे त्या भावना दुखविण्याचा प्रश्नच नव्हता. दोघे मौलाना जेथे चुकले असतील तेथे त्यांच्यावर दया दाखविण्याचे कारण नव्हते. अलीबंधूंनी जे पत्रक काढले त्याचा प्रेरक मी आणि मीच एकटा होतो. त्यांनी माफी जी मागितली ती मित्रांची, सरकारची नव्हे. ते निवेदन खटला टाळण्याकरिता केलेले नव्हते, पण स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला व मित्रांना प्रामाणिक राहावे म्हणून केले होते. म्हणून जोपर्यंत ते आपण दिलेल्या हमीला चिकटून राहतील तोपर्यंत त्यांच्यावर खटला केला जाणार नाही असे त्यांना दिलेले आश्वासन हे जरी अपमानकारक नसले तरी फुकटाफुकटी दिले आहे. लॉर्ड रीडिंग यांच्या सरकारला त्या बंधूंच्या विरुद्ध खटला भरण्यास वाटेल तेव्हा मोकळीक आहे.

ह्या असहकारितेच्या लढ्यात उघड किंवा गुप्त मुत्सद्देगिरीचा संपर्कही नाही. त्यात एकाच मुत्सद्देगिरीला परवानगी आहे, आणि ती म्हणजे निवेदन करणे आणि वाटेल ती किंमत देऊन सत्याचा पाठपुरावा करणे. व्हाइसरॉयनी मला ती भाषणे दाखविली; मला वाटते, त्यातील काही उतारे मला चांगले वाटले नाहीत. त्यांचा अर्थ अत्याचाराला उत्तेजन देण्यासारखा होणे शक्य आहे. आणि मला वाटले, खटला होवो अगर न होवो, मी अलीबंधूंना काय सल्ला द्यावा याच्याबद्दल मनात निःशंक होतो. मी नामदारसाहेबांना अशी सूचना करतो की, जर त्यांची इच्छा असहकारितावाद्यांना निष्प्रभ करण्याची असेल तर त्यांनी मुत्सद्देगिरी टाकावी व अत्यंत प्रांजल बनावे. असहकारितावाद्यांना कोणताही आश्रय किंवा संरक्षण नको आहे व ते मागतही नाहीत. आणि मी नामदारसाहेबांना त्या वृत्तीची परतफेड जे अपराधी आहेत त्यांना सत्ताधारी वर्गाच्यामध्ये आश्रय न देऊन करावयास पाचारण करतो.

आजच्या व उद्याच्या हिंदुस्थानात सत्ताधारी वर्गाला जागा नाही. हिंदी लोक "जो न्याय्य अंमल आम्ही (ब्रिटिश) चालवू इच्छितो त्याला अंतःकरणपूर्वक पाठिंबा देतील", या विश्वासाला जर नामदारसाहेब चिकटून राहिले तर त्यांना आपली चूक कळून येईल. मी असे भविष्य करण्याचे धाडस करतो की, हिंदुस्थानच्या भावी भाग्याबद्दल ब्रिटिशांचा काय हेतू आहे याला किंमत नसून खुद्द हिंदी लोकांचा काय हेतू आहे याला महत्त्व आहे. आणि ते अधिक अधिक स्वतःचे शासन स्वतःच

करावे असा दावा करीत आहेत. सुराज्य हे स्वराज्याची जागा घेऊ शकत नाही असे त्यांच्या प्रत्ययास येत आहे.

नामदारसाहेबांचे हेतू चांगले आहेत याबद्दल शंका नाही. पण ज्या ध्येयाकरिता ते खटपट करीत आहेत त्याची भीती वाटते. कुठल्या तरी अनिश्चित काळी हिंदुस्थानला उज्ज्वल भवितव्य प्राप्त होणार आहे असे त्यांना वाटते. पण निदान असहकारितावाद्यांचे असे मत आहे की, हिंदुस्थानच्या उज्ज्वल भवितव्याचा नाश विद्यमान राज्यपद्धतीकडून सध्याही केला जात आहे. ती पद्धत आपल्या शाश्वत पारतंत्र्याकरिता नसली तरी दीर्घकालीन पारतंत्र्याकरिता शोधून काढली आहे असे त्यांना वाटते. कधी कधी प्रमाणातले अंतर हेच ध्येयातले अंतर बनते. जेव्हा एखाद्याला असे वाटते की, हिंदुस्थानचे दूरचे ध्येय स्वातंत्र्यच असले पाहिजे, तरी त्याची सध्याची अवस्थाही परावलंबनाची असली पाहिजे तेव्हा ते ध्येय हिंदुस्थानच्या ध्येयापासून पूर्णपणे निराळे आहे असे मी समजतो. स्वराज्य हा भारताचा जन्मसिद्ध हक्क आहे हे लोकमान्य टिळकांचे उद्गार खरे आहेत. आणि हिंदुस्थान या प्रदीर्घ काळात आपल्या जन्मसिद्ध हक्कापासून अडथळ्यांनी ग्रासलेला आहे. हिंदुस्थान अधीर झाला आहे यात आश्चर्य नाही. सरकारचे जे कृत्य संपूर्ण नुकसानभरपाईला कमी पडत असेल– मग ते कितीही चांगले दिसत असो– त्यावर असहकारितावादी तरी दुष्ट हेतूचा आणि आपल्या गुलामगिरीच्या अवस्थेतील वेदना लांबवीत ठेवण्याचा आरोप करतील, हा सिद्धांत जो लॉर्ड रीडिंगसाहेबांनी अभ्यासला व ऐकला आहे त्यातील सत्य त्यांना कदाचित आता चांगल्या रीतीने ग्रहण करता येईल. आज ब्रिटिशांच्या अमलाविषयी लोकांत संशयाचे आवरण आले आहे. त्या अमलाला जालियनवाला बागेतील निरपराधी लोकांच्या रक्ताचे डाग पडले आहेत व इस्लामच्या विश्वासघाताचे लांछन लागले आहे. आणि ज्याप्रमाणे अत्यंत शुद्ध दूध विषारी पेल्यात ओतले असताना ते विष आहे असे प्रत्येक शहाणा मनुष्य म्हणेल, त्याचप्रमाणे ब्रिटिश सरकारच्या प्रत्येक कृतीचा अर्थ हा निकटच्या भूतकालातील त्यांच्या वृत्तीवरून लावला जाईल. हिंदुस्थानातील अशांतता जर घालवावयाची असेल, तर त्या अशांततेला कारणीभूत झालेल्या गोष्टी दूर केल्या पाहिजेत. त्यातील कटुतेवर अधिकाराची साखर पेरून किंवा दुसऱ्या सवलती देऊन भागणार नाही. तो अधिकार किंवा त्या सवलती कितीही आवश्यक असल्या तरी मूळ कारणांचा परिणामकारक रीतीने परिहार करण्याची शक्ती त्यात नसेल तर ते सारे व्यर्थ आहे.

‘ यंग इंडिया ’, ८-६-१९२१

९१. नेमस्तांना

प्रिय बंधूनो,

जरी मी शिकवणुकीने आणि संगतीने ज्यांना नेमस्त असे म्हणतात, त्यांच्या सोबत वाढलो असलो तरी विचारात तुमच्यापासून दुरावला जात आहे, ही काही लहान-सहान दुःखदायक गोष्ट नाही. काही अंशी परिस्थितीमुळे आणि काही अशी मनो-रचनेमुळे हिंदुस्थानातील कोणत्याही मोठ्या पक्षात मी नाही. तथापि माझे जीवन हे जहाल पक्षापेक्षा नेमस्त पक्षातील व्यक्तींकडून घडविले गेले आहे. दादाभाई नौरोजी, गोखले, बद्रुद्दिन तैय्यबजी[1], फिरोजशहा मेहता ही नावे स्फूर्ती देणारी आहेत. त्यांची देशसेवा कधीही विसरली जाणार नाही. देशातील माझ्यासारख्या अनेक लोकांच्या जीवनाला त्यांच्यापासून स्फूर्ती मिळाली आहे. तुमच्यातील विद्यमान मंडळींबरोबर मी अत्यंत सुखदायक काळ घालविला आहे. असे काय घडले की ज्यामुळे मी तुमच्या-पासून दूर फेकला गेलो आणि राष्ट्रीय पक्षाच्या गटात जाऊन पडलो ? तुमच्यापेक्षा राष्ट्रीय पक्षात अधिक समान विचार का वाटतात ? राष्ट्रीय पक्षापेक्षा देशावरील तुमचे प्रेम कमी आहे असे मला वाटत नाही. देशाच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय पक्षापेक्षा तुम्ही कमी त्याग करावयास तयार आहात, यावर माझा विश्वास नाही. राष्ट्रीय पक्षात जितकी बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा आणि शक्ती आहे, त्यापेक्षा अधिक नसली तरी तितकीच शक्ती नेमस्त पक्षात आहे. म्हणून फरक जो आहे तो ध्येयात.

निरनिराळ्या ध्येयांची चर्चा करून मी तुम्हांला शिणविणार नाही. असहकारितेच्या चळवळीत विधायक कार्याच्या ज्या बाबी आहेत त्यांच्याकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो तुम्हांला तो शब्दच आवडणार नाही. त्या कार्यक्रमातील पुष्कळ बाबींबद्दल तुमची तीव्र नापसंती आहे हे मला ठाऊक आहे. पण देशाच्या प्रेमाबद्दल जे श्रेय तुम्ही स्वतःकडे घेता, तेच जर असहकारितावाद्यांना दिलेत तर कार्यक्रमातील ज्या भागाविषयी दुमत नाही त्याकडे तुम्ही अनुकूल दृष्टीने पाहणार नाही का ? मी दारूच्या व्यसनाबद्दल म्हणतो. संबंध देशाला दारूच्या शापाचा तिटकारा आला आहे, हा माझा पुरावा तुम्ही ग्रहण करावा. जी दुर्दैवी माणसे ह्या व्यसनाची गुलाम बनली आहेत, त्यांना त्यांच्या स्वतःविरुद्ध मदत हवी आहे. काही लोक ही मदत मागतातही. दारूच्या व्यसना-

१. १८४४–१९०६; न्यायाधीश, कायदे मंडळातील सभासद, राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष १८८७. पाहा, खंड १, पान ३३१.

विरुद्ध जी भावनेची लाट उसळली आहे तिचा फायदा घेण्यास मी तुम्हांला बोलावीत आहे. ती चळवळ आपोआपच उठली. या लढ्यात सरकारला मिळणारा दारूचा पैसा हा हिरावून घ्यावा ही अत्यंत कमी महत्त्वाची गोष्ट आहे. ह्या व्यसनाबद्दल देश अगदी अधीर झाला आहे. सध्या ज्या प्रकारचा लोकांकडून संयुक्तरीत्या आणि सुबुद्धपणे विरोध होत आहे, तसा विरोध झाला असता तर जगातील कोणत्याही देशात हा व्यवसाय चालविणे शक्य झाले नसते. नागपूरमध्ये जनसमुदायाने कोणत्याही प्रकारच्या चुका किंवा अतिप्रसंग केले असले तरी ते काम न्यायाचे आहे. ज्या मद्याच्या शापाने लोकांमधील जोम शोषला जात होता, तो शाप नष्ट करून टाकण्याचा लोकांचा निश्चय होता. हिंदुस्थानला सक्तीने मद्यपानापासून परावृत्त करता येणार नाही, आणि ज्यांना मद्यपान करावयाचे असेल त्यांची सोय केलीच पाहिजे या अघळपघळ युक्तिवादाने तुम्ही फसले जाणार नाही. कोणतेही राज्य लोकांच्या दुर्व्यसनाची सोय करीत नाही. आणि वेश्यागृहांचे नियंत्रण करीत नाही, किंवा त्यांना परवाने देत नाही. चोरांनी चोऱ्या कराव्यात म्हणून आपण त्यांना सवलती देत नाही. चोऱ्या करणे किंवा वेश्यागमन करणे याहीपेक्षा मी मद्यपान हे अधिक निंद्य मानतो. दारू ही या दोन्ही व्यसनांची जननी आहे. दारूच्या उत्पन्नाचे अस्तित्व नष्ट करणे आणि दारूचे गुत्ते बंद करणे याकरिता तुम्ही देशाबरोबर सहकार्य करा. जर गुत्तेवाल्यांनी दिलेले पैसे परत केले जात असतील तर पुष्कळ गुत्तेवाले आपली दुकाने आनंदाने बंद करतील.

मुलांच्या शिक्षणाचे काय ? असा प्रश्न विचारला जाईल. दारूच्या उत्पन्नातून मुले शिकविली जावीत ही गोष्ट देशाला अत्यंत लाजिरवाणी आहे, असे मी सांगू इच्छितो. जरी आपल्याला आपल्या मुलांच्या शिक्षणाचा त्याग करावा लागला, तरी आपण हे दारूचे व्यसन शहाणपणाने बंद करण्याचे ठरविले नाही तर भावी पिढ्यांच्या शापाला आपण पात्र ठरू. पण तसे आपण ठरण्याची जरूरी नाही. आपल्या शाळा-कॉलेजांत कताई सुरू करून शिक्षण स्वावलंबी करण्याच्या कल्पनेला तुमच्यापैकी पुष्कळ-जण हसतात हे मला ठाऊक आहे. दुसऱ्या कशानेही न सुटणारा शिक्षणाचा प्रश्न ह्याने सुटेल, अशी मी खात्री देतो. देशाला नवे कर सहन करण्याची शक्ती नाही. सध्याचेच कर असह्य झाले आहेत. आपण अफू आणि दारूचे उत्पन्न सोडून दिले पाहिजे, एवढेच नव्हे तर दिवसेंदिवस लोकांच्या वाढत जाणाऱ्या दारिद्र्याशी आपल्याला नजिकच्या काळात लढावयाचे असेल तर इतर करांचे उत्पन्नसुद्धा फार मोठ्या प्रमाणात कमी करावे लागेल.

आणि यातूनच सध्याच्या राज्यव्यवस्थेकडे मी येतो. सुधारणांमुळे देश अधिक दरिद्री होत आहे. वार्षिक खर्च वाढला आहे. या राज्यपद्धतीचा खोल अभ्यास केल्या-मुळे माझी अशी खात्री पटली आहे की, तिची डागडुजी करून चालणार नाही. संपूर्ण क्रांती हीच काळाची अत्यंत मोठी गरज आहे. क्रांती शब्द तुम्हांला आवडत नाही.

तथापि मी रक्तमय क्रांतीबद्दल बोलत नाही. मला विचाराच्या विश्वात क्रांती हवी आहे. देशाची अधिक उच्च सेवा करण्याकरिता जीवनमानात आमूलाग्र बदल करण्यास भाग पाडणारी क्रांती मला हवी आहे. मला हे तुमच्याजवळ स्पष्टपणे कबूल केले पाहिजे की, सिव्हिल सर्व्हिसच्या वरच्या शाखांत जो सतत वाढणारा पगार आहे तो मला बराचसा घाबरवितो आणि तुम्हांलाही घाबरवीत असेल असे मला वाटते. गव्हर्नरच्या जीवनात आणि त्यांच्या टाचांखाली चिरडल्या जाणाऱ्या लक्षावधी शासितांच्या जीवनात काही साम्य आहे का ? शासितांची पिचलेली शरीरे हा माझ्या विधानातील सत्यतेचा प्रत्यक्ष पुरावा आहे. तुम्ही आता शासनकर्त्यांच्या वर्गात आहात. तुमच्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांपेक्षा किंवा सहकाऱ्यांपेक्षा तुमच्या टाचा अधिक मऊ आहीत असे कोणी म्हणू नये. तुम्ही सिमल्याला बसून राज्य करावे का ? ज्या धोरणावर वर्षापूर्वी तुम्ही विरुद्ध टीका केली होती तेच धोरण तुम्ही चालवावे का ? तुमच्याच कारकीर्दीत एका माणसाला विशिष्ट मते असल्याबद्दल जन्मठेपेची शिक्षा झाली. तो माणूस अत्याचाराला उत्तेजन देत होता असे तुम्हांला म्हणता येणार नाही. कारण अगदी अलीकडे तुम्ही हे म्हणणे अमान्य केले आहे. अलीबंधूंच्या भाषणात अत्याचाराचा संशय येतो. एवढ्या-करिता त्यांनी माफीही मागितली. खटल्याच्या भीतीने ते माफी मागण्याला तयार झाले यावर तुम्ही विश्वास ठेवू लागलात तर देशावर तुम्ही निष्ठुर अन्याय कराल. देशात नवे तेज निर्माण झाले आहे. बाहेरील न्यायाधिशांपेक्षा अंतःकरणातील न्यायाधिशाची भीती अधिक भयानक आहे. गेल्या सहा महिन्यांत कित्येक उदार आत्म्यांच्या तरुणांनी, तुमच्या देशबांधवांनी तुरुंगवास पत्करला, हे तुम्हांला ठाऊक आहे का ? त्याचे कारण जे जामीन त्यांच्याकडून मागितले ते देणे त्यांना अपमान-कारक वाटले म्हणून ते त्या खालच्या थराला गेले नाहीत हे तुम्हांला ठाऊक आहे का ? तुमच्याच कारकीर्दीत अगदी निरुपद्रवी मोपल्यांच्या[1] सहनशक्तीची कठोर परीक्षा झाली आणि अद्याप ते त्या परीक्षेत कमी कसाला उतरले नाहीत. शांतता आणि न्यायाच्या नावाने सध्या जे क्रूर अत्याचार चालले आहेत, त्याला तुम्ही जबाबदार नाही हे मी कबूल करतो व त्यावर माझा विश्वास आहे. पण जेथे तुम्हांला फसविले जात नसेल तेथे तुम्ही— असाहाय्य असे तुम्ही जनतेला किंवा मला वाटू देणार नाही. तथापि येथेच आपल्या ध्येयाच्या चर्चेचा प्रसंग येतो आणि त्या चर्चेत मी सध्या शिरता कामा नये. जर देशाला हा दारूचा व्यवसाय थांबविण्यास तुमची मदत मिळाली तर तुमच्या मागील सेवेत ही एक चांगली भर पडेल आणि कदाचित या एका पावला-मुळे दुसऱ्या अनेक गोष्टी साध्य होण्याकरिता तुमचे डोळे उघडतील.

आपला

एम्. के. गांधी

'यंग इंडिया', ८-६-१९२१

१. मलबार भागातील मुसलमान.

९२. गाय वाचवा !

प्रोफेसर वास्वानी यांनी गायीच्या मुक्ततेचा ध्वज फडकविला आहे. ते संकट माझ्या अपेक्षेपेक्षा लवकर आले. जेव्हा हिंदुस्थान मनाच्या समतोलपणाने त्याकडे पाहू शकेल तेव्हा ते संकट येईल असे मला वाटले होते. माझ्या नम्र मताप्रमाणे प्रो. वास्वानी यांना ही चळवळ अधिक चांगल्या परिस्थितीत सुरू करता आली असती. मुसलमानांच्या अंतःकरणपूर्वक सहकार्याशिवाय गायीला वाचविण्याची हिंदूंनी सुरू केलेली कोणतीही चळवळ अयशस्वीच होणार आहे.

खिलाफतीत हिंदूंनी सामील होणे ही गोरक्षणाची सर्वांत मोठी व सर्वांत चांगली चळवळ आहे. म्हणून मी खिलाफतीला आपली कामधेनू म्हणतो.

हिंदूंना जीवनमरणाच्या वाटणाऱ्या या बाबीत हिंदूंच्या भावनांना मान द्यावा म्हणून मुसलमान प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. मुस्लिम लीगने हकीम अजमलखान यांच्या अध्यक्षतेखाली दोन वर्षांपूर्वी अमृतसरला गोरक्षणाचा ठराव पास केला. मौलाना अब्दुल बारींनी त्याबद्दल लिहिले. अलीबंधूंनी हिंदू बांधवांकरिता आपल्या घरात गोमांस-भक्षण वर्ज्य केले. छोटानीमिया यांनी गेल्या बकरीदमध्ये मुंबईत शेकडो गाई एकट्याने वाचविल्या. या बाबतीत आपण, आपले मुसलमान बांधव उदासीन आहेत असा आरोप त्यांच्यावर करू शकत नाही.

आपला उद्देश विफल करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मुसलमानांवर खापर फोडणे. मुसलमानांनी आपल्या शब्दाला कमीपणा आणल्याचे मला ठाऊक नाही. इतरां-प्रमाणे त्यांचेही पूर्वग्रह मरता मरत नाहीत. सुशिक्षित मुसलमानाचे मत आपल्या बाजूला आहे. मुसलमान जनतेवर त्याचा प्रभाव पडण्यास काळ लागेल. म्हणून हिंदूंनी उतावीळ होऊ नये.

शिकारपूरच्या हिंदूंनी एकमताने गोहत्याबंदीला पाठिंबा दिला असेल तर त्यात नवल नाही. कोणता हिंदू त्याला मत देणार नाही ? त्या एकमताचा उपयोग मुसल-मानांच्या विरोधावर जर दडपण आणण्याचा असेल तर तो विरोध अधिकच ताठर होईल. हिंदू सभासदांना मुसलमानांच्या भावना ठाऊक असल्या पाहिजेत किंवा त्या ठाऊक करून घेतल्या पाहिजेत. जोपर्यंत मुसलमानांचे मत त्यांच्याविरुद्ध होते, तोपर्यंत त्यांनी मतविभागणी टाळावयास पाहिजे होती.

आपण हिंदू–मुसलमानांना विभक्त ठेवण्याकरिता काही हितसंबंधी लोक जोरदार प्रयत्न करीत आहेत हे आपण ओळखू या. तेच हितसंबंधी लोक या बाबतीत हिंदूंच्या

भावनांचा आदर वादविवादास समर्थ आहेत. मी त्यापासून सावध राहिले पाहिजे आणि त्यावर विश्वास ठेवता कामा नये. शिकारपूरच्या मित्रांना माझा असा आग्रहाचा सल्ला आहे की, त्यांनी मुसलमान बांधवांची वाट पाहावी.

हिंदूंनी सर्वच मांस वर्ज्य करावे म्हणजे इतर मांस गोमांसापेक्षा मुसलमानांना स्वस्तात मिळेल. एकही गाय किंवा तिचे वासरू दुःखात असणे किंवा हिंदूंच्याच हातांनी तिला वाईट वर्तणूक मिळणे, ही शरमेची गोष्ट आहे असे त्यांना वाटू द्या. त्यांनी गोशाळा सुधाराव्यात. त्या आदर्श दुग्धालये बनवाव्यात आणि त्यांत म्हाताऱ्या व दुबळ्या जनावरांना आश्रय द्यावा. त्यांनी आपल्या गोशाळेत सर्वोत्कृष्ट जनावरांची निपज करावी. तीच गोमातेची खरी सेवा. साऱ्याच्या साऱ्या शिकारपुरींनी खरे असहकारितावादी बनावे आणि खिलाफतीचा अन्याय त्वरित दूर करावा. जेव्हा ते खिलाफत वाचविण्याकरिता आपली पराकाष्ठा करतील, तेव्हा ते गाय वाचवितील असे मी वचन देतो.

मुसलमानांच्या मैत्रीनेच गाय वाचेल हे हिंदूंनी श्रद्धेचे वाक्य मानावे. मुसलमानांच्या सदिच्छेवरच गायींचे संपूर्ण रक्षण अवलंबून आहे हे आपण प्रांजळपणे कबूल करू या.

ज्याप्रमाणे आपण मुसलमानांच्या इच्छेला मान तुकविणार नाही, त्याप्रमाणेच मुसलमान आपल्या इच्छेला मान तुकविणे अशक्य आहे. आपण समान व स्वतंत्र भागीदारीचा सिद्धांत विकसित करीत आहोत. आपण डायरशाहीच्या विरुद्ध म्हणजे दहशतवादाच्या विरुद्ध लढा देत आहोत.

गोरक्षण ही हिंदूंच्या हृदयातली अत्यंत पवित्र भावना आहे. हीच एक हिंदूंमध्ये प्रत्यक्ष समान श्रद्धा आहे. ज्याची गोरक्षणावर श्रद्धा नाही त्याला हिंदूच होता येणार नाही. ती श्रद्धा उदात्त आहे. प्रो. वास्वानी यांनी गाईच्या स्तुतीपर जे उद्गार काढले त्यांतील शब्दन् शब्द मला मान्य आहे. गोपूजा म्हणजे निरपराधित्वाची पूजाच आहे. मला गाय ही प्रत्यक्ष निरपराधित्वाची मूर्तीच वाटते. गोरक्षण म्हणजेच दुर्बल व असहाय्यांचे रक्षण. गोरक्षण याचा अर्थ मनुष्य व जनावर यांच्यातील भ्रातृभाव आहे हे प्रो. वास्वानी यांचे म्हणणे खरे आहे. ती एक उदात्त भावना असून तिची वाढ सतत परिश्रमाने व तपस्येने झाली पाहिजे. ती कोणावर लादता येत नाही. तरवारीने गोरक्षण करणे म्हणजे शब्दाचा विपर्यास करणे आहे. पूर्वीच्या ऋषींनी गायींकरिता तपश्चर्या केल्याचे ऐकिवात आहे. ऋषींच्या पावलावर पावले टाकू या आणि आपणही तपश्चर्या करू या. त्यामुळे गायींचे रक्षण करण्याकरिता आपण पवित्र होऊ आणि त्या सिद्धांताचा जो अर्थ आणि आशय आहे त्याकरिताही पवित्र होऊ.

'यंग इंडिया', ८-६-१९२१

९३. हातकताई विरुद्ध हातविणाई

संपादक,

यंग इंडिया यांस,

मी डॉ. एस्. बी. मित्र यांचे पत्र आणि त्यावरील तुमची टीका ११ मेच्या[१] अंकात मोठ्या उत्सुकतेने वाचली. तुम्ही म्हणता, "हातकताईत पत्रलेखक म्हणतात त्या सर्व गोष्टी येतात; पण आणखीही काही गोष्टी त्यात आहेत." अशा प्रकारे तुमच्या म्हणण्याचा अर्थ हातकताईत हातविणाई येते व इतर काही गोष्टी येतात, असा होतो.

मला वाटते, बहुतेक लोकांना कताई म्हणजे कताईच वाटते. आणि ज्या अर्थी तुम्ही आपला सारा जोर चरख्यावर लावीत आहा, आणि विणाईवर लावीत नाही, आणि विशेषतः हातमागावर लावीत नाही त्या अर्थी हातमाग हा लोकांच्या कल्पनेतून अजिबात नाहीसा झाला आहे. आम्ही चरख्याच्या वर्गाबद्दल व चढाओढीबद्दल ऐकतो. पण कोठेही नवे माग सुरू करण्याबद्दल ऐकत नाही. पण त्याहीपेक्षा अत्यंत प्रचलित असलेल्या हजारो माग तयार करण्याबद्दल शब्दही ऐकू येत नाहीत. प्रत्येक दहा चरखे सुरू केले म्हणजे एक अधिक हातमागाचा खळगा किंवा धावता धोटा त्याचा वेळ न दवडता सुरू केला पाहिजे. तसे न केल्यास सध्या असलेल्या हातमागावर फार मोठा बोजा पडेल आणि शेकडो खंडी हाताने कातलेल्या सुतांचा ढीग विणकरांवर पडेल. तो विणकर गिरणीचे सूत विणण्यास अधिक सोपे असल्यामुळे ते तो विणण्यास अधिक स्वाभाविकपणे पसंत करतो. गेल्या वर्षापर्यंत देशातील हातमागांची संख्या आणि देशात राहणारे परदेशी किंवा हिंदी गिरण्यांत कातलेले सूत यात समतोलपणा होता. देशात हाताने कातलेल्या सुताची फार मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे हा समतोल बिघडला आहे. आणि ही परिस्थिती सुधारावयाची असेल तर हातमागांची संख्या त्या प्रमाणात वाढविली पाहिजे. दहा चरख्यांमागे एक माग हे ढोबळ प्रमाण असावे. काठेवाडमध्ये खादी-

१. पाहा, "हातमागाचा अधिक उपयोग", ११-५-१९२१.

निर्मितीच्या क्षेत्रात एक नम्र कार्यकर्ता या नात्याने मला असे म्हणणे भाग पडते की, हजारो नवे चरखे चालू करण्यात येत असताना नवे माग काही डझनावरही तयार केले जात नाहीत. त्याचा परिणाम असा झाला आहे की, जे गिरणीच्या सुताचे कापड विणतात आणि जे हातसुताचे कापड विणतात त्यांच्यात भयंकर चढाओढ लागली आहे आणि त्यामुळे विणाईचे दर वाढले आहेत.

काही महिन्यापूर्वी चरख्याच्या शक्यतेबद्दल मी साशंक होतो असे सांगण्याची संधी मी येथे घेतो. मला खेड्यांतील अर्थशास्त्र बिलकूल ठाऊक नसल्यामुळे, आज ज्याप्रमाणे पुस्तकी अर्थशास्त्रज्ञ शंका घेतात त्याचप्रमाणे मलाही एका माणसाच्या उपजीविकेकरिता दोन किंवा तीन आणे पुरतील किंवा नाही अशी शंका वाटे आणि म्हणून हातकताई हा व्यवहार्य सिद्धांत आहे किंवा नाही याची मला शंका असे. पण आता प्रत्येक खादी-उत्पत्ती-केंद्रात अनेक स्त्रियांना दररोज घरी पाठविण्यात येते हे मी पाहतो. कारण त्या विभागात विणकरांची उणीव असल्यामुळे मला माझी सुताची उत्पत्ती नियंत्रित करावी लागते. मोठ्या प्रमाणावर हातकताई सुरू केल्यामुळे तुम्ही सांगितलेले सर्व फायदे माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत. पण तुम्ही हातकताईवर जितका भर देता, तितकाच नसला तरी काही भर विणकामाच्या महत्त्वावर दिला पाहिजे. हिंदुस्थानला कपडे पुरविण्याकरिता चरख्यापेक्षा माग हा कमी महत्त्वाचा नाही. अपल्या अर्धपोटी असणाऱ्या शेतकऱ्यांना हा पूरक धंदा आहे, हे सिद्ध करण्याकरिता त्याची जरूरी आहे.

ए. व्ही. ठक्कर.

अमरेली, काठियावाड, २०-५-१९२१

हातमाग हे हातसुताच्या गतीने चालत नसले तर त्यात मला धोका वाटत नाही शिवाय सध्याचे माग जे परदेशी सूत विणतात, त्यातून त्यांची सुटका करावयाची आहे. खरी गोष्ट अशी आहे की, अजूनपर्यंत आपल्या हाताने कातलेल्या सुताला जरूर ती बळकटी आलेली नाही. सध्याचा प्रश्न हाताने कातलेल्या सुताचा दर्जा सुधारण्याचा आहे. तसे केल्यास साधे विणकर ते सहज विणू शकतील. अधिक निर्माण झालेले सूत दोर, नवार, पट्टे आणि इतर सहज करता येण्यासारख्या असंख्य गोष्टीकरता वापरता येईल. हातकताई जितकी लवकर शिकता येते तितकी हातविणाई शिकता येत नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की हातविणाईकरिता खास प्रयत्न करू नयेत. माझा मुद्दा इतकाच की, विणाई शक्य तितक्या

अधिक गतीने चालली आहे. विणकराचा रोज जो वाढला आहे त्याला कारण स्वदेशी वस्तू वापरण्याची वाढ. तो वाढावयालाच पाहिजे. सुताराइतकेच पैसे विणकराला मिळावयाला पाहिजेत. सुताराची प्राप्ती अधिक आहे.

'यंग इंडिया', ८-६-१९२१

९४. पत्र[1] लेखकांना

अनेक प्रकारच्या चौकशी करणारी पत्रे आमच्याकडे इतकी येतात की, टपालाने व्यक्तिशः त्यांना उत्तरे देणे हे अधिकाधिक कठीण होत आहे. म्हणून आम्ही शक्य तोवर वृत्तपत्रद्वारा उत्तरे देण्याचे योजीत आहो.

के. एस्. सुबियाहियार— शंभर नंबरी सूत कातण्यास फार काळजी, फार लक्ष द्यावे लागते. तुम्हांला जर ह्या कलेची आवड असेल तर तुम्ही गंजम जिल्ह्यात जा आणि कातणाऱ्यांना कातताना पाहा. अशा तलम सुताची धोतरे इतक्या प्रमाणात उपलब्ध नाहीत की ज्याकरिता खास दलाल नेमावेत.

के. एस्. व्यंकटरामन्— मि. रेवाशंकर जव्हेरी, बक्षिसांच्या अटी पुरा करणारा चरखा जर तुम्ही शोधून काढला असला तर तुम्ही व्यवस्थापक, सत्याग्रहाश्रम यांना लिहा व त्याबरोबर आकृत्या आणि दर ताशी किती सूत निघते हे कळवा.

महंमद अन्वरउद्दीन पानिपत— आडकित्ता सापडत नाही. पावतीची नक्कल असल्यास पाठवा म्हणजे अधिक चौकशी करता येईल. आम्ही वस्तूंवर अभिप्राय देत नाही व जाहिराती घेत नाही.

'यंग इंडिया', ८-६-१९२१

१. बहुधा हा लेख गांधींचा असावा.

९५. आमची परीक्षा

दोन महिन्यांपूर्वी अत्यंत कळकळीने आपल्या सन्मान्य प्रतिनिधींच्याद्वारा या गोष्टीची चर्चा करून आपण बेझवाड्याला अशी प्रतिज्ञा केली की, ३० जून पूर्वी :

१. आम्ही टिळकमहाराजांची स्मृती कायम टिकविण्याकरिता एक कोटीच्यापेक्षा कमी पैसे जमविणार नाही, आणि ते पैसे स्वराज्य मिळविण्यासाठी खर्च करू.

२. काँग्रेस सभासद म्हणून २१ किंवा अधिक वर्षांच्या स्त्री-पुरुषांची नावे एक कोटीपेक्षा कमी नोंदविणार नाही.

३. हिंदुस्थानात वीस लाखांपेक्षा कमी चरखे चालू करणार नाहीत.

यातील एकही काम जर आपण अपुरे ठेवले तर राष्ट्राची, वाचकांची आणि माझी अब्रू जाईल. मला येथे पैशाबद्दल म्हणावयाचे आहे. माझा मान राखण्याकरिता मजजवळ पैसे असले तर मी एक कोटी रुपये देऊन टाकले पाहिजेत. त्यामुळे मी भिकारी राहिलो तरी हरकत नाही. वाचकांनीसुद्धा याच रीतीने वागले पाहिजे. माणसाचा मान हा लाख रुपयांपेक्षादेखील अधिक प्रिय असला पाहिजे. स्वराज्याकरिता झटणे याचा अर्थ देशाचा तो माझा मान असे मानणे आणि देशाची जी दुःखे असतील ती आपली आहेत असे समजणे हा होय.

आतापर्यंत आपण साऱ्या देशात वीस लाखांपेक्षा अधिक रक्कम जमविली नाही अजून ऐंशी लाख जमवावयाचे आहेत. त्याकरिता चोवीस दिवस उरले आहेत. ज्या गतीने आपण आतापर्यंत काम केले त्याच गतीने ते काम करीत राहिलो, तर हे चोवीस दिवस हिशेबातच धरता कामा नयेत. आपण जर जोमाने प्रयत्न केले तर चोवीस दिवसही नको आहेत.

गुजरातने मनात आणल्यास तो स्वतःची ही रक्कम या महिनाअखेर जमवू शकेल. पण गुजरातचा स्वतःवर विश्वास नाही. आणि म्हणून त्याने एखाद्या कृपणा-प्रमाणे दहा लाखांची मर्यादा स्वतःवर घातली आहे. भडोचच्या परिषदेत गुजरातच्या प्रतिनिधींनी पूर्ण विचार करून अशी प्रतिज्ञा केली की, देशावरील बोजापैकी गुजरातचा वाटा म्हणून :

१. दहा लाख रुपये द्यावेत.

२. तीन लख सभासद नोंदवावेत. आणि

३. एक लाख चरखे सुरू करावेत.

या पत्रकाचा मुख्य उद्देश लोकांना दहा लाख रुपये जमविण्याच्या कर्तव्याची जाणीव करून द्यावी आणि ते पैसे कसे जमा होतील हे दाखवावे हा आहे.

मी आपण जास्तीत जास्त पैसे किती देऊ शकतो हे सांगितले पण इतके पैसे देणारे फारसे सापडणार नाहीत. पुष्कळ लोकांना हिशेब करण्याकरिता काही प्रमाण किंवा आधार हवा आहे. मित्रांबरोबर यासंबंधीची चर्चा करून मी पुढील आधार सुचवीत आहे—

१. पगारदारांनी महिन्याच्या पगाराचा कमीत कमी एक दशांश द्यावा.

२. व्यापारी, वकील, डॉक्टर आणि स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या इतरांनी पूर्वीच्या बारा महिन्यांतील नक्त मिळकतीचा एक बारांश हिस्सा द्यावा.

३. ज्यांना स्थावर मिळकतीतून भाडे मिळते किंवा ज्यांना रोख रकमेवरील व्याज मिळते त्यांनी जर आपली मिळकत गहाण टाकली असेल तर मिळकतीच्या किंमतीतून गहाणाची रक्कम वजा घालावी आणि उरलेल्या रकमेच्या अडीच टक्के या हिशेबाने कमीत कमी द्यावेत.

जर प्रत्येक जण या प्रमाणात पैसे देईल तर आपल्याला एक कोटी रुपये सहज जमा करता येतील.

वाचकहो, तुम्ही हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी किंवा ज्यू असा, स्त्री असा की पुरुष असा, गिरणीमालक असा किंवा कामगार असा, नोकर असा किंवा स्वतंत्र व्यापारी असा, पैशाकरिता कोणी तुमच्याकडे येईल याची वाट पाहू नका. पण आजच्या-आज जेथे देणग्या घेतल्या जातात अशा ठराविक केंद्रांवर जा आणि दुसऱ्यांचा विचार न करता किंवा कोणाशीही तुलना न करता तुम्हांला जे देता येईल ते तरी निदान द्या, आणि आपले कर्तव्य पार पाडा.

जेथे पैसे द्याल तेथल्या केंद्राकडून पावती घ्या.

तुमच्या नातेवाइकांना आणि मित्रांना हे पत्रक वाचू द्या, आणि त्यांच्याकडून पैसे गोळा करा व ते देऊन टाका.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, ९-६-१९२१

९६. वढवाण[1] जाहीर सभेत भाषण

जून ९,१९२१

काही जण म्हणतात मी काठेवाडला विसरलो. पुष्कळ गोष्टी अशा असतात की-या विसरलेल्याच बऱ्या. मी काठेवाडपासून दूर राहतो हे अधिक चांगले. मी काठेवाडची सेवा ब्रिटिश हिंदुस्थानात राहून करतो. आता मी टिळक स्वराज्य फंडाकरिता पैसे मागावयाला येथे आलो आहे. मी दररोज अर्धा लाख रुपये जमविलेच पाहिजेत. जर हिंदुस्थानने आपली प्रतिज्ञा ३० जूनपर्यंत पुरी केली नाही तर आपले ध्येय गाठणे शक्य नाही. माझा देवावर विश्वास आहे. मी प्रत्येक क्षणी त्याचे चमत्कार अनुभवितो, आणि माझी खात्री आहे– आपली प्रतिज्ञा पुरी होईल.

अमृतसरच्या काँग्रेस अधिवेशनात मी बादशाहांच्या जाहीर घोषणेवर विश्वास ठेवला होता म्हणून मी सरकारशी सहकारिता करण्याचे कबूल केले होते. त्या जाहीरनाम्यात जे घडले त्याबद्दल सरकारला पश्चात्ताप झाला असे मला वाटले. मी लॉर्ड सिन्हा[2] यांच्याही भाषेकडे लक्ष पुरविले. माँटेग्यू यांची उत्कंठा आपण सुधारणा स्वीकाराव्यात अशी स्पष्ट होती. पण नंतर अनुभवाने असे सिद्ध झाले की, सरकारशी सहकारिता करणे म्हणणे पापात वाटेकरी होणे होय. असहकारिता करणे याचा अर्थ पातकाशी संबंध न ठेवणे, देशद्रोही होण्यास नकार देणे, आणि अन्यायाला नकार देणे असा आहे. या सरकारात सर्वांना समान न्याय मिळत नाही. अगदी क्वचित प्रसंगी हिंदी माणसाला न्याय मिळतो. काळा आणि गोरा यांच्यात फार मोठ्या प्रमाणावर भेदाभेद केला जातो.

आपण आपल्या देशात परदेशी कापड आणले म्हणून आपल्या भगिनींचा अपमान झाला व पंजाबमधील लोकांना पोटावर सरपटावे लागले. तीन कोटी लोकांची अन्नान्नदशा झाली. जगन्नाथाच्या देवळासारख्या गावी लोकांच्या बरगड्या दिसतात. परमेश्वरानेही आमच्यावर अवकृपा केली आहे. विलायती व्यापारामुळे आपण भिकारी झालो आहोत. हिंदुस्थान सत्याचा प्रेमी आहे. लोक म्हणतात, काठेवाडमध्ये ढोंगीपणा

१. ही सभा महाराज लिमडी यांच्या घरी भरली होती.

२. सत्येंद्रप्रसन्न सिंह. (१८६४ ते १९२८); पहिले बॅरन ऑफ रायपूर, वकील आणि मुत्सद्दी; उपभारत सचिव १९१९-२०; बिहार व ओरिसाचे राज्यपाल १९२०-२१; व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे पहिले हिंदी सभासद.

फार आहे. नवलरामाने[1] म्हटले आहे की, काठेवाडी लोक हे "मधापेक्षा अधिक गोड आहेत." जेव्हा आपण सदाचार हा जीवनाचा धर्म मानू त्याच वेळी आपण असहकारिता आचरणात आणू.

काठेवाड देशात विश्वास निर्माण करू शकेल व आपली भीती टाकून द्यावयास लावील. काठेवाड ही भिकाऱ्यांची भूमी आहे असे मला वाटत नाही. काठी व मिया-सारखे लढवय्ये ज्या भूमीत आहेत ती तशी असू शकणार नाही. जो विभाग निसर्गाच्या विपुलतेमुळे विपुल आहे व जी आश्चर्यकारक भूमी आहे तेथे दारिद्र्य व भित्रेपणा असणार नाही. काठेवाडने मनात आणले तर तो साऱ्या हिंदुस्थानात विश्वास व धैर्य निर्माण करू शकेल. जेव्हा तुम्ही श्रद्धावान व्हाल त्या वेळी तुम्ही सर्वस्व समर्पणाला समर्थ व्हाल. जर स्त्रिया दागिन्याइतकाच ईश्वरी श्रद्धेचा संचय करतील तर त्या आजच्याप्रमाणे दुःखे भोगणार नाहीत. सुदामा व श्रीकृष्णाच्या भूमीतील संताने दुर्बल आहेत यावर कसा विश्वास ठेवावा? चरखा हा लोकांचे पोषण करील आणि विधवांना आधार देईल. पण तो मुलीच्या लग्नाच्या वेळी उधळपट्टी करण्यास साधने पुरविणार नाही. काठेवाडने मला असे आश्वासन द्यावे की, मला वाटेल त्या वेळी हुंड्या लिहिता येतील व हजर करता येतील. काठेवाडने मनात आणले तर एका वर्षात तो परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार घालू शकेल. खादी हा संन्याशाचा वेश नाही. मी संन्यासी नाही. मला मुले आहेत, बहिणी आहेत, बायको आहे, आणि अनेक नातेवाईक आहेत. मी त्यांच्यावर प्रेम करतो. मी त्यांच्याकडून सेवा घेतो. मी एक आवडता गृहस्थाश्रमी आहे, व संन्यासी आहे अशी ऐट मारीत नाही. खादी हे उदारतेचे लक्षण आहे. मी वेश्यांना खादी वापरावयास सांगत आहे आणि पतिव्रतां-नाही सांगत आहे. शरीरावर जर खादी नसेल तर ते शरीर घाणेरडे आहे असे मी मानतो. ज्याप्रमाणे सीतेने रावणाने पाठविलेली सुंदर वस्त्रे झाडाच्या पानांपेक्षादेखील भिकार मानली त्याचप्रमाणे विलायती कापड खादीपेक्षा कमी प्रतीचे आहे असे आपण मानले पाहिजे.

बायकांना गळ्यात सोन्याचे हार कसे घालता येतील? आजच्यासारख्या वेळी फक्त सुताचे हार किंवा तुळशीचे मणी घालणे योग्य आहे. एके जागी एका मुलीने आपले सर्व दागिने मला दिले. मी म्हणालो, "तुझे आईबाप तुला रागे भरतील." ती म्हणाली, "स्वराज्य मिळविल्याशिवाय मी नवे दागिने मागणार नाही." मी म्हणालो, "अजून तुझे लग्न व्हावयाचे आहे." तिने उत्तर दिले, "जोपर्यंत हिंदुस्थान एक अनाथ विधवा आहे तोपर्यंत मी लग्नाचा विचार कसा करू व गृहस्वामिनी कशी होऊ?" हे सत्ययुगाचे ओझरते दर्शन नाही काय?

[गुजरातीवरून]
'गुजराती', १९-६-१९२१

१. १९ व्या शतकातील गुजराती लेखक.

९७. गुजरातचे कर्तव्य

कार्याचा अनारंभ हा बुद्धीचे पहिले लक्षण असेल, पण एकदा कार्याला आरंभ केला म्हणजे त्याच्या शेवटाला गेलेच पाहिजे. नर्मदेच्या पवित्र तीरावर गुजरातच्या राजकीय परिषदेने असा ठराव केला की, आम्ही ह्या महिनाअखेर टिळक स्वराज्य फंडाला दहा लाख रुपये जमवू, काँग्रेसचे तीन लाख सभासद नोंदवू, व एक लाख चरखे सुरू करू. जर परिषदेला हे सर्व आपण करू शकू अशी स्वतःच्या सामर्थ्याबद्दल शंका असती तर तिने तो ठराव फेटाळला असता. पण तिने त्या ठरावाला मोठ्या उत्सुकतेने उचलून धरले. परिषद याचा अर्थ गुजरात व काठेवाडचे प्रतिनिधी. अत्यंत गांभीर्याने ही तीनही कामे आपण ३० जूनपूर्वी पुरी करू अशी त्यांनी प्रतिज्ञा केली. ही प्रतिज्ञा जर आपण पुरी केली नाही तर आपण स्वराज्याला नालायक ठरू, आणि त्याकरिता चळवळ करणे गुजरातला कठीण जाईल. मी परिषदेत असे म्हणालो की, जर देशातील एक प्रांत संपूर्ण असहकारिता स्वीकारण्यास पुढे येईल तर आपण स्वराज्य मिळवू. स्वभावतःच अशा कृत्याला सरळपणाची प्रतिष्ठा आहे. समान बाजू असलेल्या चतुष्कोणाप्रमाणे जर एक कोन काटकोन असेल तर बाकीचे तीनही काटकोन असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे जर एक प्रांत पुढे आला तर दुसरे प्रांतही तसेच पुढे येतील. लोकांना भय सोडण्याकरिता मदत करणे एवढेच जरूर आहे. जर काही लोकांना वाघ म्हणून प्रसिद्ध असलेल्या जनावराबद्दलचे सत्य शोधून काढता येईल आणि जर ते भीती टाकून देऊन त्याबरोबर खेळू लागतील तर इतर लोक ताबडतोब त्याला येऊन मिळतील. एका माणसाचा अनुभव दुसऱ्यांना शिकवण्यास उपयोगी पडतो. स्वराज्याबद्दल असेच आहे. एका मोठ्या समुदायाने आपली शक्ती दाखवावी एवढेच जरूर आहे.

पण जर गुजरात मुळाक्षरे शिकण्याच्या प्रयत्नात अपयशी झाला तर तो शेवटची परीक्षा कशी पास होईल? परिषदेने मांडलेला कार्यक्रम हा फक्त आपल्याला अक्षरे लिहिता येतात किंवा नाही याची चाचणी आहे. आपण या प्राथमिक चाचणीत जर अपयशी झालो तर स्वतःवरील विश्वास गमावू.

हा लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी अर्धा महिना निघून गेला असेल. परिषदेतील प्रतिज्ञा पुरी करावयाची असेल तर प्रत्येकाने आपले कर्तव्य कोणते हे ओळखले पाहिजे, आणि कामातील आपला वाटा उचलला पाहिजे. जर आपल्याला आपले उद्दिष्ट गाठावयाचे असेल तर फार मोठ्या संख्येने आपल्या शक्तीनुसार लहान रकमा द्याव्यात किंवा थोड्या

लोकांनी परिणामांची पर्वा न करता सर्वस्व देऊन टाकावे. जर प्रत्येकाने आपले कर्तव्य केले तर आपला कार्यक्रम पार पाडण्यास अडचण येणार नाही.

पैसे देण्याच्या शक्तीचा विचार करता गुजरातचा वाटा दहा लाखच असू शकणार नाही. पूर्वी जर त्याने सार्वजनिक कामाला पैसे दिले नसतील तर त्याचे कारण त्यांना देण्याची इच्छा नव्हती हे होय. गुजरातचे डोळे नेहमी मुंबईकडे लागलेले होते, आणि म्हणून त्याचा स्वतःवर विश्वास नाही. १२००० रुपये देऊन विरमगावचे कसे समाधान होईल? आणि वढवाणला ६ किंवा ७ हजार रुपये देऊन कसे भागणार? हे आकडे सार्वजनिक कामासंबंधी आपली अनास्था किती आहे याचे द्योतक आहे. एके काळी याही रकमा विरमगाव किंवा वढवाण येथून जमा करणे कठीण होते. जर ह्या रकमा जमविणे ह्या दोन ठिकाणी शक्य झाले तर इतरही गावांत अधिक रकमा जमा होऊ शकतील. प्रत्येक मोठाल्या शहराने आपल्या शक्तीचा अंदाज घ्यावा आणि आपल्या वाट्याची रक्कम जमवावी. काही असले तरी मित्रांना विचारून जे जमेचे दंडक लोकांना घालून दिले आहेत ते लावलेच[1] पाहिजेत. ठराविक पगार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपल्या महिन्याच्या पगारातील दहा टक्क्यांपेक्षा कमी रक्कम देता कामा नये. मोठाल्या पगारदारांनी अधिक रकमा द्याव्यात, आणि कमी पगारदारांची तूट भरून काढावी. व्यापारी, वकील, डॉक्टर्स आणि त्यांच्यासारख्या इतरांनी १२ टक्क्यांपेक्ष कमी देऊ नये. वकील आणि डॉक्टर्स यांच्यातील मोठाल्या माणसांना ठराविक टक्केवारी कशी लावता येईल?

जो वकील वर्षाला ६०,००० रुपये मिळवितो, त्याने काय पाच हजार रुपयेच द्यावेत आणि समाधान मानावे? श्री. दास यांना आपल्या प्राप्तीतील निम्मे पैसे सार्वजनिक कामाला खर्च करताना काहीच वाटत नसे. जेव्हा वकिलांनी आपली वकिली सोडावी अशी कल्पना निघाली तेव्हा त्यांनी आपली निम्मी प्राप्ती देण्याचे तावडतोब कबूल केले. अशा प्रकारे त्यांच्या दर्जाच्या वकिलांनी उदारतेने पैसे द्यावेत आणि दुर्बल मनाच्या वकिलांना झाकून टाकावे. ज्या माणसाजवळ मालमत्ता आहे व जो व्याजावर जगतो त्याने आपल्या मालमत्तेच्या किमतीचे अडीच टक्के द्यावेत हे काय फार आहे? एक लाख रुपये किमतीची घरे असणाऱ्या मालकाने पंचवीसशे रुपये दिले तर काय विशेष केले? प्रत्येक शंभर रुपयांमागे अडीच रुपये देणे याचा अर्थ सहा महिन्यांच्या व्याजापेक्षा अधिक रक्कम न देणे असा होतो. पुष्कळसे लोक आपल्या मालमत्तेच्या किमतीवर पाच टक्के नव्हे पण बारा टक्के भाडे किंवा व्याज आकारतात. अशा लोकांना अडीच रुपये देणे म्हणजे अडीच महिन्यांचे व्याज देणे आहे. ह्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहिल्यास गुजरातमधील गावांतून ३० जून पूर्वी दहा लाख रुपये

१. पाहा, "टिप्पणे", ८-६-१९२१.

आपण सहज जमवू शकू. जर आपल्यामध्ये शक्ती, इच्छा आणि क्षमता ही त्रिवेणी असेल तर गुजरातला आपली प्रतिज्ञा सहज पुरी करता येईल. परमेश्वर गुजरातला मदत करो.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', १२-६-१९२१

९८. माझी टिप्पणे

गंजणाऱ्या तोफा

मला दक्षिणेत माझ्या दौऱ्याबद्दल पुष्कळच लिहावयाचे होते. पण अलीकडच्या अनुभवासंबंधी मला इतके लिहावयाचे आहे की, त्यातील महत्त्वाच्या आठवणींचे संक्षेपाने कथन करून मला समाधान मानले पाहिजे. मी असे पाहिले की, जेथे जेथे थोडासा विश्वास आहे, जेथे जेथे कार्यकर्ते आहेत तेथे तेथे लोक उदार अंतःकरणाने पैसे देतात. या दौऱ्यात माझ्या अनुभवातील विशिष्ट उदाहरणे सांगावयास मला वेळ नाही. मी जे बार्शी, कुर्डुवाडी, पंढरपूर आणि सोलापूरला पाहिले त्यावरून मला त्यातील सत्य कळून आले. बार्शीला एकच गिरणी आहे. त्या गिरणीचा मालक श्री. यशवंतप्रसाद हरिप्रसाद हा भावनगरच्या देसाई कुटुंबातला आहे. तो जरी गिरणीमालक असला तरी तो गावातल्या सार्वजनिक कामात भाग घेतो व आपली देणगी देतो. त्याचा आयुष्यक्रम इतर गिरणीवाल्यांनी अनुसरण्यासारखा आहे. ज्या झोपड्यात कामगार राहतात तशी एक लहान झोपडी त्याने स्वतःकरिता बांधली आहे. त्याने, गिरणीकामगारांनी आणि अधिकाऱ्यांनी मिळून टिळक स्वराज्य फंडाला पैसे दिले. त्याचे कामगार संतुष्ट दिसले. यशवंतप्रसादची चरख्यावर नितांत श्रद्धा आहे. आणि तो स्वतः चरख्याचा वापर अधिक व्हावा म्हणून स्वतः मेहनत करतो. गिरणी कामगारांच्या मुलांना सूत कसे कातावे हेही तो शिकवतो. तो स्वतः खादी वापरतो आणि इतरांना खादी वापरण्यास बजावतो. बार्शीत इतर पुष्कळ व्यापारी लोक आहेत. पण त्यांनी आपल्या हिश्याइतके पुरे पैसे दिले नाहीत. त्यामुळे अपेक्षेपेक्षा कमी पैसे जमले.

कुर्डुवाडी हे फक्त रेल्वे जंक्शन आहे. त्याची लोकसंख्या २,००० आहे. तरीही तेथे जवळजवळ २,००० रुपये जमले. पण हे सेठ रायमल या कच्छच्या एका मित्राच्या

उत्साहाने घडू शकले. पंढरपूर ही दक्षिणेतील काशी आहे. पण तेथील अनुभव निराशाजनक आला. तथापि त्यावर एक निराळे प्रकरण लिहिले पाहिजे. महाराष्ट्रातील पुष्कळ साधुसंत जुन्या काळी तेथे राहण्यास जात. सोलापूरवरही एक स्वतंत्र प्रकरण लिहिले पाहिजे. महाराष्ट्रातील ते एक मोठे व्यापारी केंद्र आहे. तेथे एक सुंदर देऊळ आहे. ते एका मोठ्या तलावाच्या मध्यभागी बांधले आहे. त्याला सिद्धेश्वर म्हणतात व ते लिंगायतांचे पवित्र स्थान आहे. सोलापुरात काही गिरण्या आहेत व इतर काही धंदे आहेत. तेथे दहा हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे जमले, पण तेथील भरभराटीचा व्यापार लक्षात घेता ही रक्कम फारशी नाही.

सोलापुराहून आम्ही कर्नाटकात गेलो. आम्ही बागलकोट व विजापूरला भेटी दिल्या. दोन्ही ठिकाणी प्रचंड उत्साह होता. तेथे दुष्काळी परिस्थिती असतानादेखील रकमा चांगल्या जमल्या. श्री. कौजलगी[1] यांचे या भागात चांगले वजन आहे. नुकतीच स्थानिक मॅजिस्ट्रेटने त्यांच्यावर नोटीस बजावण्याची कृपा दाखविली आहे. विजापूर हे मुस्लिम अंमलाकरिता प्रसिद्ध आहे. तेथे ऐतिहासिक इमारती, मशिदी, दर्गे पुष्कळ आहेत. मी सुलतान महंमदाचे थडगे व जुम्मा मसजीद पहिली. मुसलमान राज्यकर्त्यांनी थडग्यावर जितका पैसा खर्च केला आहे तितका पैसा जगात कोणीही खर्च करणार नाही. ताजमहल हे रत्नजडित थडगेच आहे. तेथील घुमट जगप्रसिद्ध आहे. घुमटाची उंची २०० फूट आहे; घुमटाच्या सभोवार सज्जा आहे. तेथे पोहोचावयास १५० पायऱ्या चढाव्या लागतात. घुमटाचा व्यास १२५ फूट असला पाहिजे. विरुद्ध दिशांना उभे राहिलेली दोन माणसे भिंतीकडे तोंड करून जर गुणगुणली तर त्यांचे बोलणे एकमेकांना ऐकू येते. विजापूरची जुम्मा मसजीद ही एक प्रचंड इमारत आहे. मी तेथे कुराण-इ-शरीफचे हस्तलिखित पाहिले. त्याची पाने वेलींच्या चित्रांनी सुंदर व सुशोभित केली होती. पण मला गंजलेल्या तोफा आणि पडलेल्या किल्ल्यांचे वर्णन करावयाचे आहे. ह्या तोफा एके काळी साम्राज्याच्या वैभवाचे लक्षण आणि लोकांना दहशत घालणाऱ्या वस्तू म्हणून समजल्या जात असत. त्याच आता गंजून गेल्या आहेत. त्यावर हिंदू-मुसलमान मुले बसतात आणि घोडाघोडा खेळतात. त्याच्या भोवतालचा तट हाही एक पडका ढिगारा झाला आहे आणि कुलाब्याच्या तोफांबद्दल मी जे काय म्हटले त्याची आठवण झाली. मला असे वाटते की, जर हिंदुस्थानने अनत्याचारी असहकारितेचा कार्यक्रम पूर्णपणे अमलात आणला तर ब्रिटिश तोफाही गंजून जातील. जेथे त्या पुरलेल्या अवस्थेत असतील त्यावर रानटी गवत उगवेल आणि त्या जागी व ब्रिटिश सरकारने साऱ्या देशात जे किल्ले बांधले आहेत तेथेही मुले विटीदांडू खेळतील. मी जे म्हणालो त्यावर फारच थोड्या लोकांनी विश्वास ठेवला. काहींनी त्याची थट्टा

१. हणमंतराव कौजलगी कर्नाटकचे कॉंग्रेस पुढारी.

केली आणि काहींनी माझ्या भोळेपणाबद्दल माझी कीव केली. पण दिवसेंदिवस त्यातील सत्याबद्दल माझी खात्री पटत चालली आहे. दिल्लीच्या किल्ल्याकडे पाहणाऱ्या कोणाला असे म्हणता आले असते की मोगलांचे साम्राज्य हे एक दिवशी नष्ट होणार आहे, ही कल्पना मला आली होती. त्या साम्राज्याच्या काळात असे लोक असलेच पाहिजेत की, जे असा विचार करतात म्हणून लोक त्यांची थट्टा करीत. पण ते काहीही असले तरी मला वाटते की, मोगल साम्राज्य कोसळणार आहे असे वाटण्याच्या शक्यतेपेक्षा हे ब्रिटिश साम्राज्य कोसळण्याची अधिक शक्यता आहे. लोकांच्या अकृत्रिम संतप्ततेपुढे कोणतेही साम्राज्य टिकणार नाही. जे नामर्द असतात त्यांनाच इतर लोक भिववितात. या देशात अपंग लोक सार्वजनिक रस्त्यावर ताणून पडलेले नेहमी दृष्टीस पडतात. त्यांना कोणीही धमकावीत नाही. कारण तेथे पडतानाच त्यांनी मनातली सारी भीती घालविलेली असते. आपल्याला कोणीही छळणार नाही ही त्यांची खात्री असते. हजारो वाटसरूंना त्यांच्यापासून त्रास होतो; पण तो त्रास ते सहन करतात. त्याचप्रमाणे जर आपण या अपंग लोकांसारखे निर्भय बनू तर कुलाब्यातल्या आणि किल्ल्यातल्या तोफा आपल्याकडे क्रूर श्वापदाप्रमाणे गुरगुरत आहेत असे आपल्याला वाटणार नाही. त्या तोफा निरुपद्रवी सापाप्रमाणे वाटतील.

निरुपद्रवी टोपी

मी ही टिप्पणे लिहीत असता वृत्तपत्रांत असे वाचले की, श्री. कौजलगी हे कोर्टात पांढरी टोपी घालून गेले व त्यांना ती काढण्यास सांगण्यात आले. त्यांनी नकार दिला म्हणून त्यांना २०० रुपये दंड व कोर्टाबाहेर एक तास घालविले. तासानंतर ते पुन्हा कोर्टात आले आणि तीच टोपी त्यांच्या डोक्यावर होती. म्हणून त्यांना पुन्हा ती काढण्यास सांगितले पुन्हा त्यांनी नकार दिला, आणि दुसऱ्यांदा त्यांना २०० रुपये दंड केला. नंतर मॅजिस्ट्रेटने त्यांना दुसऱ्या मॅजिस्ट्रेटपुढे हजर करण्याचा हुकूम दिला. ज्या कोर्टात असा बेकायदेशीरपणा चालतो तेथे वकिलांना वकिली करण्यास दिक्कत वाटत नाही. वकिलांना काय वाटेल ते करू द्या; पण जर हे ऐकून लोक विदेशी टोप्यांना चिकटून राहिले तर त्यापेक्षा अधिक निर्लज्जपणा कोणता ? जेव्हा निरपराधी लोकांना गुन्हेगार म्हणून वागविले जाते, तेव्हा स्वराज्य लवकर येत आहे अशा तुताऱ्या वाजतील याची खात्री बाळगावी. निरपराधी लोकांना अपराधी म्हणून शिक्षा झाल्या व कायदेशीर गोष्टी करण्यास लोक भिऊ लागले तर गुलामगिरीच्या बेड्या अधिक चकचकीत रीतीने चमकू लागतील. लांब मुदतीचे कैदी आपल्या शृंखला चकचकीत करीत असलेले व त्या चकाकीने खूष झालेले मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहेत. असहकारितावाद्यांचा जितका अधिकाधिक छळ होईल, तितके तितके लोक जर आपल्या असहकारितेचा अधिक निश्चय करतील तरच आपल्या गुलामगिरीच्या बेड्या तुटतील. विजापूरच्या

साऱ्या कोर्टात पांढऱ्याच पांढऱ्या टोप्या दिसू लागल्या तर मॅजिस्ट्रेटसाहेब किती लोकांना शिक्षा करतील, आणि दंड भरण्याची सक्ती कशी करतील ?

गुजरात परिषद

या परिषदेचा माझ्या मनावर झालेला परिणाम सांगताना मला थोडक्यात आवरले पाहिजे. ही परिषद म्हणजे येत्या काँग्रेस अधिवेशनाची पूर्वतयारी होती, आणि त्या दृष्टीने तिने प्रशंसनीय काम केले असे म्हटले पाहिजे.

परिषदेतील सजावट अगदी साधी होती, आणि त्याकरिता स्वदेशी सामुग्री वापरली होती. सर्वांची बसण्याची व्यवस्था जमिनीवर केलेली होती. पण अध्यक्ष व इतर काही लोक गाद्यांवर बसले होते. पताका खादीच्याच होत्या. मंडपाच्या प्रवेशद्वारी स्वराज्याचे निशाण फडकत होते. लोक गलबला करीत नव्हते, आणि जागेची दाटी नव्हती. बायकांची बसण्याची व्यवस्था फार चांगली होती असे म्हणावे लागते. स्वागताध्यक्षांचे भाषण आटोपशीर व उत्तम गुजरातीत झाले. ते वाचावयास त्यांनी १९ मिनिटे घेतली. अध्यक्षांचे भाषणदेखील छोटे, साधे व विनम्र भाषेतले होते. त्यात जितकी नम्रता होती तितकेच धैर्य होते. आपण नेहमी असे समजतो की, सडेतोड व जहाल भाषा ही धीटपणा व लढाऊ वृत्ती यांपासून अलग नसते. श्री. वल्लभभाई पटेल यांनी असे दाखविले की, निर्भेळ शक्ती आणि अत्यंत विनम्रता ही एकत्र असू शकतात. त्यांनी आपले भाषण वाचावयाला बरोबर ३० मिनिटे घेतली. या दोन भाषणांतला संक्षिप्तपणा लोकांचा पुष्कळ वेळ वाचवू शकला. कोणावरही ताण पडला नाही. आणि दोन दिवसांत पुष्कळसे काम त्यामुळे उरकले. सकाळ-संध्याकाळच्या बैठका घेतल्या-मुळे लोकांना ऊन लागले नाही. अगदी सकाळी सभा भरविण्याची ही कल्पना लोकप्रिय करणे जरूर आहे. विशेषतः उन्हाळ्यात सर्व सभा अगदी सकाळी घ्याव्यात. माझ्यासारख्या आजारी माणसाला त्यांनी खुर्ची दिली होती. आपण ही सवय टाकली पाहिजे, आणि खुर्चीच्याऐवजी जुन्या पद्धतीच्या बैठ्या बाजा सुरू केल्या पाहिजेत. दुसरे लोक जमिनीवर बसले असता एकानेच खुर्चीवर किंवा उच्च पीठावर बसावे हे दृश्य चांगले नाही. माणसाला आदर दाखविण्याकरिता खुर्ची आवश्यक नाही अशी आपण लोकांची खात्री पटविली पाहिजे. एका सभेत खुर्च्यांमुळे मोठी अवघड परिस्थिती निर्माण झाली. तेथे दोनच खुर्च्या ठेवल्या होत्या. एक माझ्याकरिता बसून बोलण्याला व दुसरी अध्यक्षाला. सभा सुरू झाल्यावर एक परके गृहस्थ तेथे आले. जरी सर्वजण खाली बसले होते तरी त्या गृहस्थांना वाटले की, आपण खाली बसलो तर आपला मान जाईल. माझ्या ते लक्षात आले. त्यात काही अपमान आहे असे सांगणे मला बरे वाटले नाही. म्हणून मी खुर्ची सोडली आणि अध्यक्षांच्या टेबलावर जाऊन बसलो माझ्याकरिता जर बाजले असते तर ही अवघड परिस्थिती निर्माण झाली नसती. त्या गोष्टीला तसे महत्त्व नव्हते. पण त्यात एक उपयुक्त पाठ आहे.

स्वयंसेवकांनी चांगले काम केल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजे. श्री. पुराणी यांनी दिलेल्या शिक्षणाचे परिणाम उघड दिसत होते. तथापि कार्यक्षमतेला अधिक वाव आहे असे मला वाटले. लोकांनी गलबला करू नये म्हणून काय करावे हे त्यांना बिलकूल ठाऊक नव्हते, असे मी पाहिले. लोकांना लहान लहान गटांनी बसण्याची सवय होती. लहान मुलांना प्रेमाने कसे वागवावे हे त्यांना ठाऊक नव्हते. जे राष्ट्र मुलांना, स्त्रियांना व घरगुती नोकरांना मान देत नाही त्याची संस्कृती नष्ट होते. ज्यांना लोकांची सेवा करावयाची आहे त्यांनी विशेषतः दुर्बलांचे संरक्षण आपल्या कर्तव्याचा भाग म्हणून केले पाहिजे. त्यांना आदराने संबोधिले पाहिजे, आणि त्यांच्याकरिता साऱ्या गोष्टी सोप्या केल्या पाहिजेत.

निदान स्वयंसेवकांनी खादीशिवाय काही वापरू नये. परिषदेला आलेले बहुतेक प्रतिनिधी परदेशी कपड्यांत होते. ते दृश्य दुःखदायक होते. स्वदेशीची प्रतिज्ञा घेऊन आता ९ महिने झाले आणि जर प्रतिनिधी हेसुद्धा परदेशी कपड्यावरील प्रेम दूर सारीत नसतील, खादी कपड्यांच्या ओझ्याला भीत असतील, किंवा अशा कपड्याला लाजत असतील तर समुद्राला आग लागण्यासारखेच ते आहे. अशी आग विझवणारा माणूस आपणाला कोठे आढळेल ? रुमाल व धोतरांची फार अडचण आहे हे मला ठाऊक आहे. पण या दोन्ही बाबतींत जर आपण प्रयत्न केला तर आपल्याला बदल सुचेल व तो करता येईल. चांगल्या सुताच्या धोतराला पाच वार कापड लागते. पण जाडे कापड साडेतीन वारच पुरेल. तलम धोतराला ५४ इंची पन्हा लागत असला तर जाड्या कपड्याला ४५ इंच पन्हा पुरेल. पांढऱ्या खादीचा तुकडा रंगवून घेण्यास, त्याचा रुमाल करण्यास काही अडचण पडणार नाही. जर अशा प्रकारचा रुमाल फार जड वाटला तर तलम खादी निर्माण होईपर्यंत त्यांनी खादीची टोपी वापरली पाहिजे.

येत्या काँग्रेस अधिवेशनात जर आपण लोकांना गुजरातमध्ये खादीशिवाय काही दिसू दिले नाही तर ते फार चांगले होईल. त्यात गुजरातचे काही नुकसान होईल का ? उलटपक्षी काही गरीब लोकांची घरे समृद्ध होतील. जो एक वार खादी घेतो तो गरीब माणसाच्या उत्पन्नात तीन आण्यांपेक्षा कमी भर टाकीत नाही. जर खादीच्या एका वारात इतकी शक्ती असेल तर ती कोण वापरणार नाही ? जो माणूस स्पष्ट उद्देश जाणून खादी वापरतो त्यालाच ती किती उत्कट देशभक्तीचे लक्षण आहे हे समजू शकते.

स्त्रियांचे त्याग

मी जेव्हा पैशाकरिता लोकांना विनंती केली तेव्हा स्त्रियांनी जो उत्साह दाखविला तो अविस्मरणीय आहे. स्त्रियांचा सतत प्रवाहच सुरू झाला होता. एक दुसरीमागून येत होती. त्यांनी दागदागिन्यांचा आणि नाण्यांचा वर्षावच केला. पुरुषांतसुद्धा ही साथ पसरली आणि त्यांनीही चांगल्या देणग्या दिल्या. एकीकडे स्त्रीपुरुषांनी इतकी उदारता

दाखविली असताना दुसरीकडे मी असे ऐकले की, दोन बायकांनी दागिने दिल्याबद्दल त्यांचे नवरे त्यांच्यावर रागावले. दागिने हे स्त्रीधन आहे, आणि नवऱ्याचा त्यावर काहीही हक्क नाही. चांगल्या कार्याकरिता स्त्रियांनी दागिने दिले तर पुरुषांनी हरकत घेऊ नये असे माझे नम्र मत आहे.

त्यांच्या औदार्यावर मी जितका खूष झालो, तितकाच त्यांच्या कपड्यांवर मी नाराज झालो हे मी सांगितले पाहिजे. गुजरातमध्ये सर्वत्र इंग्लिश, जपानी व फ्रेंच साड्या पसरल्या आहेत, तितक्या हिंदुस्थानच्या दुसऱ्या कोणत्याही भागात नसतील.

या गोष्टींकडे स्त्रियांनी गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. हिंदुस्थानकरिता आणि या देशातील अधिक गरीब वर्गातील स्त्रियांची अब्रू राखण्याकरिता गुजरातच्या स्त्रियांनी खादी साड्यांचा जडपणा स्वखुषीने सहन केला पाहिजे. परिषदेचा एक भाग म्हणून खादी प्रदर्शन, चरखे आणि हातपिंजणाचे साहित्य तेथे ठेवले होते. चरख्यांत विशेष नाविन्य नव्हते, पण त्यात अनेक कल्पक गोष्टी होत्या. काही चरखे प्रवासात बरोबर नेता यावेत म्हणून हलके व सहज हाताने नेण्यासारखे होते तर काही दिसावयाला आकर्षक किंवा मजबुतीकरिता वाखाणण्यासारखे होते. सध्या चरख्यावर अनेक ठिकाणी कलाकार जे आपले कौशल्य वापरीत आहेत, तितके अन्यत्र कोणी वापरीत नसेल. येते काँग्रेसचे अधिवेशन आणि त्यासोबतचे प्रदर्शन हे आदर्श करण्यात आपण यशस्वी व्हावे अशी माझी प्रार्थना आहे.

सारखेज आणि सानंद

या दोन ठिकाणांमध्ये असलेला फरक असा आहे. एका जागी प्रारंभीचे काम केले गेले आहे आणि त्या ठिकाणी निदान काही थोडे प्रामाणिक कार्यकर्ते आहेत. तर दुसऱ्या ठिकाणी असे काहीच काम झालेले नाही. सारखेज आणि सानंद या त्या दोन जागा आहेत. सारखेजची लोकवस्ती सुमारे दोन हजार आहे, आणि तेथे एक तासात १२०० रुपये जमा झाले. पण सानंदला पाच हजार वस्ती असून व चांगला व्यापार असून फक्त ५०० रुपयेच जमा झाले. सारखेजला राष्ट्रीय शाळा आहे. सारखेजला स्त्री-पुरुषांची मिळून एकच सभा झाली. दोघांचीही उपस्थिती सारखीच होती व सभेत संपूर्ण शांतता आणि शिस्त दिसत होती. सानंदला स्त्री-पुरुषांच्या निरनिराळ्या सभा झाल्या आणि दोन्ही ठिकाणी गडबड आणि गोंधळ याला सुमारच नव्हता. सारखेजच्या सभेत अंत्यजांनाही परवानगी होती. तेथील अंत्यजांच्या वीस कुटुंबांनी टिळक स्वराज्य फंडाकरिता ३२ रुपये जमविले. सानंदला आम्हांला स्वतंत्रपणे अंत्यजांच्या घरी जावे लागले आणि फक्त ७ च रुपये मिळाले.

ही टीका करून मला सानंदला निरुत्साही करावयाचे नाही. माझी खात्री आहे की, जर सानंदमध्ये काही चारित्र्यवान माणसे स्वयंसेवक म्हणून काम करतील आणि

आपल्या कामात स्थानिक माणसांना रस घ्यावयास लावतील तर सानंद हे सारखेजच्या तोडीचे होईल. काही स्वयंसेवकांनी व इतरांनी सानंदला जावे व तेथे राहावे, म्हणजे तेथे जागृती होईल अशी मला आशा आहे. सानंदच्या लोकांनी उशीर न लावता तेथील सार्वजनिक काम संघटित पायावर सुरू करावे आणि त्या जागेला योग्य ते श्रेय मिळवून द्यावे अशी माझी सूचना आहे.

दुसऱ्या देशांची हानी

मी असे एक विधान केले की, मला हिंदुस्थानचे कल्याण दुसऱ्या राष्ट्राचे अकल्याण करून, साधल्याचा गुन्हा कधीही करावयाचा नाही. त्या विधानाला अनुसरून एक तरुण गृहस्थ विचारतात की, चरख्याच्या चळवळीपासून व असहकारितेपासून जे इंग्लंडचे नुकसान होणार आहे, त्यासंबंधी माझे म्हणणे काय आहे. असे प्रश्न वारंवार विचारले जातात. ज्या प्रश्नांची फार बारकाईने छाननी होते ते कानाला गोड लागतात. पण जर प्रश्न विचारणारे आपल्या मनाने कताई सोडून देतील आणि चरख्यावर कताई करू लागतील तर त्यांच्या मनातल्या गाठी आपोआप सुटू लागतील. चरख्याच्या चळवळीपासून किंवा असहकारितेपासून इंग्लंडचे काही नुकसान होईल असे मला बिलकूल वाटत नाही. ती दोन्ही आत्मशुद्धीची साधने आहेत. ती साधने आम्हांला शुद्ध करतील तशीच इंग्लंडलाही करतील. ज्याप्रमाणे दारूचे गुत्ते बंद झाल्यामुळे मालक व गिऱ्हाईक या दोघांचेही नुकसान होईल त्याचप्रमाणे असहकारिता आणि चरखा यासंबंधीही आपण तसाच विचार करू. शिवाय मला तीर्थयात्रेला जाता यावे म्हणून माझ्या घराला आग लावावी असे मला वाटत नाही. परक्या देशाला नुकसान पोचविण्याचा जसा मी विचार करणार नाही, तसाच माझ्या देशालाही मी नुकसान पोहोचू देणार नाही. ज्याप्रमाणे मँचेस्टरबरोबरचा व्यापार हिंदुस्थानला हानी पोहोचवितो आणि म्हणून तो सोडून देण्यालायकीचा आहे, त्याचप्रमाणे हिंदुस्थानचा अफूचा चीनबरोबरचा व्यापार हा चीनला हानी पोहोचविणारा आहे, म्हणून तो सोडून दिला पाहिजे असे मी म्हणतो. जर कोणी आपली नागवणूक करीत असेल आणि जर आपण अनत्याचाराच्या मार्गाने ही नागवणूक थांबविणार असलो तर दुसऱ्या पक्षाची हानी होणार नाही.

हिंदू-मुस्लिम ऐक्य

त्याच मित्रांना अद्याप मुस्लिम ऐक्याची साशंकता वाटते. ते लिहितात, "जोपर्यंत मुसलमान, देशातील एकाही मुक्या जनावराला मारीत असतील किंवा आपल्या ताबुतात सरडे टांगण्याची प्रथा चालू ठेवीत असतील तोपर्यंत ऐक्य अशक्य आहे." या विचारात मला फक्त अज्ञान दिसते. कोट्यवधी हिंदू लोक दुसरी जनावरे ठार मारतात, आणि मुसलमान ज्याप्रमाणे सरडे टांगतात त्याप्रमाणे धर्माच्या नावाने प्राणी टांगत असतात. तरी पण आपण त्यांच्याबरोबर लढत नाही. तर मग आपण मुसल-

मानांच्या नावाने का मांडावे ? इतर धर्माप्रमाणे सहनशीलता हा एक हिंदू धर्माचा सद्‌गुण आहे. हिंदूंच्या आदराकरिता व प्रेमाकरिता मुसलमान लोक हल्ली गायी मारीत नाहीत. मी त्यांना याकरिता धन्यवाद देतो, आणि प्रत्येकाने द्यावेत असे मला वाटते.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १२-६-१९२१

९९. अहमदाबादच्या जाहीर सभेत भाषण[1]

जून १२,१९२१

मौलाना महंमद अलींची ही अहमदाबादला पहिली भेट आहे. तुम्ही त्यांचे हार्दिक स्वागत केलेत आणि त्यांचे भाषण ऐकावयाला साहजिकच उत्सुक आहात. मी तुमच्या आणि त्यांच्यामध्ये फार वेळ उभा राहणार नव्हतो. पण मी येथे आलो व मला खंजीर खुपसल्यासारखे वाटले. आता मी थोडक्यात आवरू शकत नाही. मौलाना-साहेब येऊन पोहोचले आहेत, हे जेव्हा मला साबरमतीला कळले तेव्हा मला आनंद झाला व मी तात्काळ येथे आलो. पण मी येथे आल्यावर कोणती गोष्ट प्रथम ऐकली ? कामगार आज कामावर गेले नाहीत. ते गिरण्यात गेले आणि बाहेर आले. अशा रीतीने वागून त्यांनी स्वतःला, अनसूयाबेनना व बॅन्करना लज्जित केले आहे. त्या दोघांना तुम्ही कसे लज्जित केलेत याचा स्वतःच विचार करा. काही असले तरी तुम्ही खात्रीने मला मान खाली घालावयास लाविले आहे.

माझ्या नावाचा दुरुपयोग करून गिरणी कामगार यशस्वी होणार नाहीत. खरे सांगावयाचे म्हणजे देशात माझा कोणीही दुरुपयोग करू शकणार नाही. मी जो देशाच्या स्वातंत्र्याकरिता झगडत आहे, तो मी कामगारांचा गुलाम बनणार नाही. तुम्हांला असे वाटत असेल की, अनसूयाबेन ही काय एक स्त्री आहे आणि तिला सहज फसविता येईल; आणि गांधी काय एक म्हातारा माणूस आहे. सुकलेले पान आहे. तो देशभर सतत फिरत आहे, आणि त्यालाही मूर्ख बनविता येईल. पण त्यात तुमची फत्ते होणार नाही. तुम्ही आताच आपले मित्र अख्तार यांनी म्हटलेली एका जुलमी माणसाची

१. या सभेत मौ. महंमद अलींचे भाषण झाले. गांधी अध्यक्ष होते.

कविता ऐकली. जो माणूस छळ करणाऱ्याच्या जुलमातून सुटू इच्छित असतो तो दुसऱ्यांना गुलाम बनवीत नाही. तुम्ही जर गिरण्यांत काम करीत राहिला असता तर तुम्ही मौलाना शौकत अली व महंमद अली यांचा चांगला मान राखला असता. तुम्ही ईद साजरी करण्याकरिता तीन सुट्ट्या घेतल्यात. असे असूनही काल मी तो कडू घोट घशाखाली लोटला[1]. पण आज तो घोट गिळणे मला अशक्य आहे.

तुम्हांला असे वाटते की, गांधींना खरोखर अत्याचार उद्भवावयास पाहिजे आहे. पण ते मोठे गृहस्थ असल्यामुळे उघडपणे ते तसे बोलत नाहीत, आणि म्हणून जेव्हा ते तुम्हांला अत्याचार टाळावयास सांगतात तेव्हा ते तुम्ही अत्याचार करा, असे सांगत असतात हे तुम्ही समजले पाहिजे. असा चुकीचा निष्कर्ष काढणे हे तुम्हांला शोभत नाही. एप्रिल १९१९ मध्ये तुम्ही तसे केलेत आणि दोन निरपराधी माणसे ठार मारलीत. तुम्ही अशी समज करून घेऊ नका की, गांधी हा मोठा माणूस आहे, आणि म्हणून जेव्हा तो तुम्हांला घरे जाळू नका व तरवार उपसू नका असे सांगतो तेव्हा त्याविरुद्ध वागणे आपले कर्तव्य आहे. मी तुम्हांला ताकीद देतो की, अशी चूक तुम्ही पुन्हा केलीत तर गांधींचा गळा आपल्या सुऱ्याने कापलात असे होईल. जर तुम्हांला असे वाटत असेल की, जो गांधी तुमच्यावर नातेवाइकासारखे प्रेम करतो, तो जे उघड बोलतो त्याच्याविरुद्ध त्याचा अर्थ असतो, तर तुम्ही तुमच्या सुऱ्याने त्याचा गळा कापाल. अशा चुका तुम्ही करता या विचारानेच माझा थरकाप होतो. मी तुम्हांला विचारतो की, गिरण्यांतून बाहेर पडण्याइतके तुमचे काय काम अडले होते ? काही लोक तुमच्यावर ओरडले आणि तुम्ही बाहेर आलात ! अशा प्रकारे पळून येण्यात तुम्ही शौर्य दाखविले नाही. जर मुसलमानांना खिलाफत, हिंदूंना हिंदू धर्म आणि दोघांना मातृभूमी वाचवावयाची असेल तर त्यांनी सिंहासारखे शूर झाले पाहिजे. कोकरे होऊन भागणार नाही. आपल्याला गुंडांच्यासारखे वागावयाचे नाही. त्या मार्गाने जाऊन आपल्याला इस्लाम व हिंदू धर्म वाचवावयाचा नाही. आपण शूर आहोत हे सिद्ध करण्याकरिता बाहेर पडलो आहोत. लबाडीला लबाडीने आम्हांला उत्तर द्यावयाचे नाही. जो माणूस आम्हांला ठार मारावयाला येतो त्याला आम्ही ठार मारणार नाही; पण त्याकरिता आम्ही आमचे प्राण अर्पण करू हे नीट समजून घ्या. कामगारांनी आपल्या आजच्या वर्तनाने मला काळिमा लावला आहे. मौलानासाहेबांचा अपमान केला आहे. व स्वराज्य, खिलाफत व हिंदुस्थान यांच्या कार्यात अडथळा आणला आहे. त्यांनी स्वराज्याच्या उगविणाऱ्या चंद्राला थोपविले आहे व ग्रहण लाविले आहे. जो मी सर्वस्वी एकाच कार्यात व्यग्र आहे, त्या मला एखादे कृत्य करून धीर सोडावयाला कसे लावाल ? माझा कामगारांवर जबरदस्त विश्वास होता. मला वाटले तुमच्यासारखे उमदे कामगार जे

१. कामगारांनी शौकत अलींच्या भाषण-सभेत हजर राहण्याकरिता सुट्टी घेतली.

२३ दिवस[1] झाडाखालीबसून व ईश्वराला साक्षी ठेवून शपथ घेते झाले ते देवाला कधी विसरणार नाहीत. पण आज तुम्हांला खिलाफतीची हिंदू धर्मांची आणि हिंदुस्थानची आठवणच राहिली नाही.

म्हणून तुम्ही प्रायश्चित घेण्याकरिता गिरणीमालकांची क्षमा मागा आणि जितका वेळ काम बुडविलेत, तितके तास अधिक काम करून ते भरून काढा. असे करण्यात औदार्य आहे. तुम्हांला भीती वाटते की, गिरणीमालक आपल्याला पायाखाली तुडवितील. अशी भीती कोकरांना शोभते. जे बलशाली आहेत ते अशा रीतीने भीत नसतात. ते पायाखाली चिरडले जात नाहीत. पण ज्या माणसात अशी शक्ती नसते त्याला जगातील प्रत्येकजण तुडवीत असतो. असहकारितेचा अर्थ आपण स्वतः मनुष्य होण्याचे शिकणे व इतरांना तसे शिकविणे हा आहे.

जर आम्ही तुमच्याकरिता काम करावयास पाहिजे असेल तर, आम्ही जे म्हणतो त्याचा उलट अर्थ करू नका. स्वराज्य आणि खिलाफतीकरिता मदत द्या, असे मी कोणत्या तोंडाने गिरणीमालकांना सांगेन ? ते मला निक्षून सांगतील की, माझ्या कार्याने हिंदुस्थानचा नाश होणार आहे. जर आम्ही लक्षावधी रुपये मिळविले असले तर आम्ही कामगारांनाही काही दिले आहेत असे ते म्हणतील. म्हणून कामगारांनी त्याची फेड करण्याकरिता पैशाचा सदुपयोग केला पाहिजे. सध्याप्रमाणे जर कामगार पैसे उधळीत राहतील तर हे गिरणी मालक मला सांगतील की, हिंदुस्थान स्वतःवरील ताबा घालवील. असे घडावे ही माझी इच्छा नाही पण तोच मार्ग तुम्ही स्वीकारला आहात असे दिसते. जर मी गिरणीमालक म्हणून जन्माला आलो असतो तर तुम्ही मला गुलाम करण्यात यशस्वी होणार नाही, हे मी तुम्हांला दाखविले असते. आज ते तुमच्यापुढे कोकरे बनले आहेत. गिरणीमालक आणि तुम्ही, दोघेही एकमेकाला चिरडण्याकरिता टपलेले आहात आणि प्रत्येक जण दुसऱ्याला भीत आहे. आणि म्हणून तुम्ही जर त्यांची क्षमा मागितली तर त्यांचे पारडे जड होईल असे तुम्हांला वाटते.

अलीबंधूंनी प्रदर्शित केलेल्या पश्चात्तापाबद्दल मी तुम्हांला सांगू इच्छितो. तुरुंगवास टाळण्याकरिता त्यांनी तसे केले असे तुम्हांला वाटते का ? त्यांना त्याची बिलकुल भीती नाही. आम्ही तिघेही अशा रीतीने काम करीत आहोत की, आम्हांला याच वर्षी फाशी दिले जावे. मग काय त्यांनी तुमच्याकरिता माफी मागितली ? बिलकूल नाही. जे खिलाफतीच्या प्रश्नावर न्याय मिळावा म्हणून प्रामाणिकपणे झटत आहेत अशांच्याकरिता त्यांनी माफी मागितली. मी त्यांना सांगितले की, तुमची भाषणे फार

१. हा संदर्भ अहमदाबादला बाभळीच्या झाडाखाली ज्या सभा झाल्या व जेथे गांधीजींनी संपावर भाषणे केली त्याला आहे. पाहा, खंड १४, प्रकरण १३२.

आवेशयुक्त आहेत. आणि काही जणांना त्यावरून असे वाटेल की, तुमची इच्छा लोकांना अत्याचाराला प्रवृत्त करण्याची आहे. त्यांनी माझा नम्र सल्ला मानला आणि साऱ्या देशाला स्पष्टपणे असे कळविले की, आम्हांला अत्याचार नको आहे. शांतता व तरवार हे एकमेकांचे मित्र नाहीत याची जाणीव अलीबंधूंना आहे. त्यांनी असे जाहीर केले आहे की, जर असहकारितेने खिलाफतीचा प्रश्न सुटला नाही, तर आपण हातात तरवार घेऊ व शत्रूला मारू किंवा स्वतः मरून जाऊ. आणि अशा प्रकारे हा प्रश्न सोडविण्यास भाग पाडू. माझा स्वतःचा धर्म मला शस्त्रग्रहणास मनाई करतो. मी कोणालाही ठार मारणार नाही. हिंदू धर्म वाचविण्याकरिता दुसऱ्यांना मारण्याऐवजी मी माझे प्राण अर्पण करीन. अलीबंधूंत आणि माझ्यात हे मतभेद असतानादेखील मी त्यांना असे पटवू शकलो आहे की, सध्याच्या काळी शस्त्र न घेणे श्रेयस्कर आहे. तुरुंगवासातून स्वतःला बचाविण्याकरिता त्यांनी माफी मागितली नाही. आपल्या भावनांवरील ताबा गमावून तुरुंगवास ओढवून घेणे ही चूक आहे. जर आपण आत्मशुद्धीचा प्रयत्न करू लागलो व त्याग करू लागलो आणि जर त्याकरिता एखादा जुलमी सत्ताधीश आपल्याला पकडू लागला तर जग त्यावर थुंकेल. जर एखाद्या तळमळीच्या पवित्र माणसाला फाशी दिले तर तसा छळ करणाऱ्यांचा सारे जग धिक्कार करील. सरकारने आम्हांला पकडावे व फाशी द्यावे अशी आमची इच्छा आहे. जर अहमदाबाद किंवा हिंदुस्थान अलीबंधूंच्या माफीचा अर्थ निराळा लावीत असेल तर ते चूक आहे. दिवसेंदिवस आपले औदार्य बलिष्ठ होत आहे. तुम्ही शिस्त वाढवा आणि उदार माणसे व्हा. जर एखादी गोष्ट तुम्हांला आवडली नाही व तुमची नापसंती व्यक्त करून तुम्ही तिला प्रतिकार केला तर ते समजण्यासारखे आहे. पण तुम्ही हातात कायदा घेणे हे कसे सहन केले जाईल ? जर तुम्हांला हे सत्य समजले तर पंजाब आणि खिलाफतीच्या प्रश्नावर न्याय मिळविणे व स्वराज्य संपादन करणे ही तुमच्या हातातली गोष्ट आहे.

आजच कामगारांना उद्देशून हस्तपत्रके वाटण्यात आली आहेत. टिळक स्वराज्य फंडाला पैसे देणे, काँग्रेसचे सभासद होणे, आणि आपल्या घरी चरखे सुरू करणे, हे तुमचे कर्तव्य आहे. जर तुम्ही तसे केलेत तर दुष्काळ तुमचे काही करू शकणार नाही याची खात्री बाळगा. गिरणी कामगारांनी गिरणीतले कापड वापरू नये. ते कापड फार गरिबांकरिता आहे हे त्यांनी लक्षात ठेवावे.

मला चार-दोन शब्द अलीबंधूंशी माझे जे नाते आहे, त्याबद्दल सांगावयाचे आहेत. एकाच आईच्या पोटी जन्माला आलेल्या भावापेक्षा आमचे संबंध फारसे दूरचे नाहीत. मी १९१५ साली दिल्लीला गेलो तेव्हापासून त्यांना मी ओळखतो. त्या दिवसापासून त्यांनी मला किंवा मी त्यांना सोडले नाही. ते सनातनी मुस्लिम आहेत आणि मी कट्टर हिंदू आहे. माझ्या धर्मात मी तडजोड करावी अशी त्यांची इच्छा नाही. तशीच त्यांच्या धर्मात त्यांनी तडजोड करावी अशी माझीही इच्छा नाही. जरी

आम्ही आपापल्या धर्माला चिकटून असलो तरी आमचे नाते असे जडले आहे की, आम्ही एकत्र फासावर चढण्यास व राख होण्यास तयार आहोत. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही धर्मांत हे औदार्य आहे.

आणि आता मी मौलानासाहेबांना भाषण करण्यास व तुम्हांला संदेश देण्यास विनंती करतो.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १६-६-१९२१

१००. रणछोडदास पटवारी यांना पत्र

जून १३, १९२१

सन्माननीय भाई रणछोडदास[1]

अंत्यजांच्या प्रश्नाबाबतीत माझ्यापेक्षा तुमची मते भिन्न असतील; पण टिळक स्वराज्य फंडाला पैसे देण्याकरिता, चरख्याच्या चळवळीला मदत करण्याकरिता आणि शिक्षणाच्या कामाकरिता तुम्ही स्वतः पैसे देऊ शकाल आणि इतरांना सांगाल असे वाटते. माझी तुमच्यापासून फार मोठी अपेक्षा आहे. तुम्ही लिहिलेला लेख छगनलालने मला दाखविला तथापि तो मी वाचला नाही. वेळ मिळाला म्हणजे वाचीन.

सादर प्रणाम.
मोहनदास

मूळ गुजरातीतील फोटोस्टॅटवरून सी. डब्ल्यू. २७९७;
तसेच जी. एन्. ४११९. पटवारी कुटुंबाच्या कृपेने.

१. गोंडळचे दिवाण.

१०१. प्रभाशंकर पट्टणी[1] यांना पत्र

अहमदाबाद.
जून १३, १९२१

प्रिय मित्र,

भावनगरचे पत्रलेखक मला कळवितात की, तुम्ही माझ्या सर्व चळवळींच्या विरुद्ध नाही. चरख्याच्या चळवळीकरिता आणि शिक्षणाच्या कामाकरिता मी तुमच्यापासून आणि प्रत्येकापासून मदतीची अपेक्षा करतो. तुम्ही स्वराज्यफंडाला पैसे द्यावेत व इतरांनाही तसे करावयास सांगावे अशी माझी इच्छा आहे. त्याच कामाकरिता हे पैसे खास वापरले जातील.

मोहनदासचा वंदेमातरम्.

गुजराती फोटोस्टॅटवरून: सी. डब्ल्यू. ३१७७;
तसेच एस्. एन्. २७७६९; आणि जी. एन्. ५८६४.

१०२. स्त्रियांना

सत्याग्रहाश्रम,
ज्येष्ठ शु. ९ संवत. १९७७.
[जून १४, १९२१].

हे माझे शेवटचे पत्रक आहे. या पत्रकाने आतापर्यंत काय परिणाम केला हे मला सांगता येत नाही. ज्या लोकांना उद्देशून ही पत्रके काढली, त्यांतील एखाद्या-वर्गाने जरी आमच्या विनंतीला पूर्णपणे मान दिला तर आपण जूनअखेर दहा लाख

१. सौराष्ट्रातील जुन्या भावनगर संस्थानचे दिवाण.

रुपये जमविण्यात खात्रीने यश मिळवू. स्त्रियांनी जितक्या जागृतीची खूण पटविली तितकी देशातल्या इतर कोणत्याही वर्गाने पटविली नाही. पूर्वीच्या काळी स्त्रिया राष्ट्रीय सभांना कधीही मोठ्या संख्येने हजर राहात नसत. पण आता चोहोकडच्या सभांना हजारो स्त्रिया लोटतात. माझ्यासारख्या श्रद्धाळू माणसाला हीच गोष्ट एक सुचिन्ह वाटते. धर्मराज्याचा दिवस जवळ येत चालला असे ते चिन्ह मला सांगत असते.

देशातल्या इतर कोणत्याही वर्गातल्या लोकांना देशाची प्रतिष्ठा उचलून धरली नाही तरी स्त्रियांना ती उचलून धरता येईल. स्त्रियांनी सर्वकाळी धर्म राखला आहे. व त्याकरिता प्राणही दिले आहेत. सीता व दमयंतीसारख्या स्त्रियांनी धर्माचरणाकरिता अवर्णनीय हालअपेष्टा भोगल्या आहेत.

स्त्रिया आपल्या उदार अंतःकरणामुळे शेकडो धर्मभोळ्या समजुती आणि मूर्ख-पणाचे आचारदेखील जिवंत ठेवतात. जर ह्या स्त्रियांना राष्ट्रीय कार्याचे महत्त्व पटले तर त्या काय करू शकणार नाहीत ? त्यानंतर राष्ट्रीय खजिना रिता राहणार नाही.

लोकमान्य टिळकांचे नाव स्त्रियांना अपरिचित नाही किंवा त्यांची स्मृती त्यांना कमी प्रिय नाही. त्यांच्या चारित्र्याच्या शक्तीने हिंदुस्थानला तेजस्वी बनविले आहे. आणि त्यांचा स्वार्थत्याग हा देशाचे कायमचे स्मारक होणार आहे. त्यांची स्मृती कायम टिकविण्याकरिता आणि स्वराज्य स्थापण्याकरिता जो निधी उभारला आहे त्याकरिता गुजरातकडे दहा लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. या निधीला स्त्रिया रोख रक्कम व दागदागिने देऊ शकतील. ह्या दिवसांत स्त्रियांना दागदागिने काय करावयाचे आहेत ? कोट्यवधी हिंदी लोक उपाशी मरत असता व जुलमजबरदस्ती धिंगाणा घालीत असता स्त्रियांना दागिने घालण्याचे धाडस कसे होते ? अशोकवनातील सीतादेवी दागिन्यांनी नटली होती काय ? जेव्हा दमयंती रानावनात दुःखाने विव्हळून आक्रोश करीत होती, तेव्हा तिच्या अंगावर दागिने होते काय ? हरिश्चंद्राबरोबर भटकणाऱ्या तारामतीच्या गळ्यात हिऱ्यामोत्यांचे हार लोंबत होते काय ? अधर्म धुमाकूळ घालीत असता दागदागिने मला निदान न शोभण्यासारखे वाटतात.

ज्या स्त्रियांना संकटकाळाकरिता दागदागिन्यांची तरतूद करून ठेवावी असे वाटते, त्यांना मी म्हणेन, " जर देवावर तुमचा विश्वास असेल तर दागदागिन्यांपेक्षा तो विश्वासच अधिक मदत करील. हिंदुस्थानात कोट्यवधी स्त्रिया अशा आहेत की, ज्यांच्याजवळ गुंजभर सोन्याची लहान आंगठीसुद्धा नाही आणि ज्यांना डोके टेका-वयास जागासुद्धा नाही. अशांनासुद्धा देव अन्न देतो. जर तुम्हांला शारीरिक श्रम करण्याची लाज वाटत नसेल तर तुमचे पवित्र हात-पाय तुमच्या दागदागिन्यांपेक्षा अधिक उपयोगी पडतील. ज्या देवांनी तुम्हांला हात दिले आहेत तो तुम्हांला खात्रीने अन्न देईल. काम करावयास तयार असलेल्या कोणत्याही माणसाला कधीही उपाशी

राहावे लागत नाही. जे आळशी असतात त्यांनाच दागदागिन्यांवर अवलंबून राहाणे भाग पडते. आळस टाका आणि हिरे-माणकेही टाकून द्या. स्त्रिया जो पैसा ह्या निधीला देतील त्याचाही उपयोग दागदागिन्यासारखाच केला जाईल. त्या पैशातून गरीब स्त्रियांच्याकरिता चरखे पुरविता येतील आणि आपल्या मुलांना योग्य प्रकारचे शिक्षण देता येईल. दुसऱ्या शब्दात जो पैसा व जे दागिने स्त्रिया देणगी म्हणून देतील त्याचा फायदा स्त्रियाशिवाय दुसऱ्या कोणाला होणार नाही. जो मनुष्य आपली मिळकत राखून ठेवतो आणि स्वतःच्या चैनीकरिता खर्च करतो त्याला स्वार्थी व कुटुंबद्रोही म्हणतात. पण जो माणूस आपली मिळकत कुटुंबाच्या तिजोरीत ठेवतो, त्याला त्या पैशाच्या उपयोगापासून स्वार्थी माणसाइतकाच फायदा होतो. पण त्याला निःस्वार्थी माणूस व कुटुंबाचा सेवक असे म्हणतात. देशाची सेवा करणे याचा अर्थ देशाला आपले कुटुंब मानणे असा आहे. जे पैसे आपण राष्ट्रीय खजिन्यात देणगी म्हणून देतो, त्याचाही आपल्याला पुरा फायदा मिळतो. ज्याप्रमाणे आपण ह्या खजिन्यात ठेवलेल्या पैशांचा उपयोग आपल्या देशबांधवांना होतो त्याचप्रमाणे ते जो पैसा ह्या खजिन्यात ठेवतात त्याचा उपयोग आपल्याला होतो. अशा प्रकारे ज्या स्त्रिया पैसा किंवा दागिने राष्ट्रीय फंडाला देतील त्यांचे काही नुकसान होणार नाही.

स्त्रियांना आपल्या नवऱ्याची किंवा कुटुंबातील इतर मंडळींची मते या बाबतीत मदत करण्याकरिता वळविता येतील. कधी कधी असे घडते की, स्त्रियांच्या खर्चिक स्वभावामुळे पुरुषांना आपल्या इच्छेप्रमाणे राष्ट्रीय कार्याला पैसे देता येत नाहीत. कधी कधी बायकाच पुरुषांना पैसे देऊ देत नाहीत. स्त्रियांनी असे करू नये व पुरुषांना काही तरी देण्यास उत्तेजन द्यावे अशी माझी विनंती आहे. मला हेही ठाऊक आहे की, काही स्त्रिया आपल्या पुरुषांना पैसे देण्याऐवजी जास्त पैसे देण्याचा आग्रह धरतात व आपल्या प्रयत्नात यशस्वी होतात. दुसऱ्या स्त्रियांनी ह्यांचे अनुकरण करावे.

ज्या स्त्रिया हे पत्रक वाचतील, त्यांनी इतर स्त्रियांनाही वाचावयास लावावे अशी माझी प्रार्थना आहे. स्त्रियांनी स्वतः काही तरी देऊन समाधान मानू नये. आपल्या मित्रांनाही द्यावयास लावावे.

जेथे तुम्ही पैसे द्याल तेथून पावती घ्या.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', १६-६-१९२१

१०३. टिप्पणे

ती माफी

अलीबंधूंची माफी अद्यापही लोकांना शीण देत आहे. मी व्हाइसरॉयकडे का गेलो याबद्दल माझी कानउघाडणी करणारी पत्रे सारखी येत आहेत. काहींना वाटते की, मी साऱ्या गोष्टींचा सावळागोंधळ केला आणि अलीबंधू हे माझ्या आग्रहामुळे एकदा तरी दुर्बल झाले याबद्दल त्यांना दोष दिला जातो. थोडक्या दिवसात हे वादळ निघून जाईल हे मला ठाऊक आहे. कारण मी जे काय ऐकले आणि वाचले त्याचा विचार न करता मला असे वाटते की, माझे विचार समजावून घेण्याकरिता व्हाइसरॉयनी जी इच्छा प्रकट केली ती इच्छा पुरी करण्याकरिता मी त्यांना भेटलो ही बरोबर गोष्ट केली. नामदार व्हाइसरॉयकडून मी जर औपचारिक आमंत्रण येण्याची वाट पाहात राहिलो असतो तर मी चूक केली असती. अलीबंधूंनी काढलेल्या पत्रकाविषयी त्यांना मी जो सल्ला दिला, तो इस्लाम आणि हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट होता असेही मला वाटते. ते पत्रक काढण्यात अलीबंधूंनी श्रेष्ठ प्रतीची नम्रता व धैर्य दाखविले आहे. आपल्या देशाकरिता व श्रद्धेकरिता आपला अभिमान आणि सर्वस्व यांचा त्याग करण्यास आपण समर्थ आहोत हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्या पत्रकामुळे त्यांनी कार्याची सेवा केली आहे. पण जर पत्रक काढले नसते तर त्यांनी कार्याची हानी केली असती.

कानउघाडणी

माझी ही खात्री पटली असली तरी माझी जी कानउघाडणी केली जात आहे, त्याबद्दल मला आश्चर्य वाटत नाही. त्यावरून एवढेच सिद्ध होते की, सध्याच्या अनुसरल्या जाणाऱ्या पद्धती नव्या आहेत, देश आपल्या न्याय्य मागण्या यत्किंचितही सोडणार नाही, आणि त्या पुऱ्या होण्याकरिता देश निव्वळ आपल्या सामर्थ्यावर अवलंबून राहू इच्छितो.

मी दिलेल्या आणि अलीबंधूंनी स्वीकारलेल्या सल्ल्याचा निषेध करणारे जे जोरदार युक्तिवाद आहेत त्यातील समर्पक भाग मी खाली देत आहे. ते पत्र एका मोठ्या असहकारितावाद्याने लिहिले आहे. ते प्रसिद्धीकरिता बिलकूल नाही. पण वाचकांना त्यात सहभागी केले तर लेखक मनावर घेणार नाहीत हे मला ठाऊक आहे.

ते अनेक विचारी असहकारितावाद्यांच्या भावनांचे प्रतिनिधी आहेत याबद्दल मला शंका नाही. त्या हकीकतीतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची आणि असहकारितेच्या ध्वन्यार्थाची चर्चा करणे हे माझे नम्र कर्तव्य आहे. सतत युक्तिवाद करूनच मी असहकारितेच्या सत्याची, सौंदर्याची आणि सयुक्तिकपणाची खात्री पटवू शकेन. हे उतारे पुढीलप्रमाणे :

> मागे अगर पुढे घडलेल्या गोष्टींचा विचार न करता अलीबंधूंचे पत्रक जर स्वतंत्रपणे वाचले तर तो एक मोठा धाडसी दस्तऐवज आहे असे वाटते. जर त्यांनी रागाच्या भरात काही गोष्टी म्हटल्या असल्या व जर त्यांना आता त्या सयुक्तिकपणे अत्याचाराला उत्तेजन देणाऱ्या वाटत असल्या तर त्यांनी आपली माफी प्रसिद्ध करून त्यांच्या दर्जाच्या सार्वजनिक कार्यकर्त्यांना जो एकच सन्मानाचा मार्ग मोकळा असतो तो त्यांनी पत्करला आहे. त्यांनी पुढील काळाकरिता जी हमी दिली आहे ती समर्थनीय आहे असेही मी म्हटले असते. पण ती हमी त्यांनी आपल्या अशा सहकाऱ्यांना द्यावयास पाहिजे होती की, जे कोठल्याही परिस्थितीत अत्याचाराच्या सांप्रदायावर विश्वास ठेवणारे नाहीत व जे त्यांच्यापेक्षा निराळ्या मताचे आहेत. "ज्यांना हवे असेल अशा सर्वांना जाहीर आश्वासन व वचन" हे जे सर्वसामान्य शब्द आहेत ते शब्द कोणाच्याही मनात अशी शंका ठेवणार नाहीत की, ज्या विशिष्ट पक्षाला त्या 'आश्वासन आणि वचन' यांची जरूरी होती आणि ज्यांच्या मागणीवरून ते देण्यात आले, तो पक्ष कोणता? व्हाइसरॉयच्या भाषणाने ती गोष्ट आता पूर्णपणे स्पष्ट झाली आहे आणि आता आपल्याजवळ असा एक निखालस पुरावा आहे की, असहकारितेच्या चळवळीचे पुढारी सरकार-बरोबर बोलणी करीत होते आणि त्यांनी अलीबंधूंचे मन वळवून त्यांनी जाहीर माफी व हमी देण्यास लावून त्यांच्यावरील खटला स्थगित करवून घेतला आहे.
>
> या प्रकरणाचा या दृष्टीने विचार करता ह्या साऱ्याच चळवळीबद्दल विचार करण्यासारखे गंभीर प्रश्न निर्माण होतात. दुसऱ्या दृष्टीने त्याचा विचार करणे शक्य नाही. खरोखर मला वाटते की, असहकारितेचे सारे तत्त्व सोडून देण्यात आले आहे. सरकारचे नाव उच्चारताच त्यापासून दूर पळून जाणारा मी नाही. किंवा आपल्या अन्यायाची दाद लावून घेण्या-करिता व स्वराज्य स्थापण्याकरिता सरकारबरोबर तात्पुरती तडजोड करणे हाच एक उपाय आहे, असे मी मानणारा नाही. तुम्ही जे आम्हांला वारंवार शिकविले आहे की, स्वराज्याची प्राप्ती ही सर्वस्वी आणि मुख्यत्वे आपल्यावरच अवलंबून आहे यावर मी विश्वास ठेवणारा आहे. पण त्याच

वेळीं मी किंवा माझ्या माहितीप्रमाणे तुम्ही योग्य परिस्थितीत सरकार-बरोबर तडजोड करण्याची शक्यता वगळू शकत नाही. अशा प्रकारची तडजोड ही फक्त तत्त्वावरच होऊ शकेल, आणि त्या तडजोडीचा व्यक्तीच्या सोयीशी किंवा सुरक्षिततेशी संबंध असणार नाही. सहकाऱ्यांच्या वर्गात, माणसामाणसात तुम्हांला भेदाभेद करता येणार नाही आणि त्यांतील जो अत्यंत गरीब असेल त्याला अत्यंत विख्यात सहकाऱ्याइतकाच पुढाऱ्या-कडून संरक्षण मिळण्याचा हक्क आहे. शेकडो नसले तरी कित्येक लोक आतापर्यंत अलीबंधूंनी वापरलेल्या भाषेपेक्षा कमी कडक भाषा वापरल्या-बद्दल स्वखुषीने तुरुंगात गेले आहेत. त्यांतील काही लोक अशी माफी व हमी देऊन सहज वाचविता आले असते. पण त्यांना तसा सल्ला द्यावा ही गोष्ट कोणालाही सुचली नाही. उलटपक्षी त्यांच्या कृत्याची पुढाऱ्यांनी आणि साऱ्या असहकारितावादी पत्रांनी वाहवाच केली. माझ्या मनात ह्या क्षणी जोरदारपणे जर कोणता खटला येत असेल तर तो हमीद अहमदचा आहे. त्याला नुकतीच अलाहाबादला जन्मठेपेची व मालमत्ता जप्तीची शिक्षा झाली. या माणसाला न वाचविण्यास कारण आहे का? मौलाना महंमद अलींनी त्याला मुंबईस ३० मेच्या आपल्या भाषणात धन्यवाद दिले. ज्या माणसाने त्याच परिस्थितीत माफी मागून व हमी देऊन स्वतःला वाचविले, अशा माणसाच्या धन्यवादामुळे हमीद अहमदला काय समाधान लाभेल मी सांगू शकत नाही. असे कित्येक लोक तुरुंगात कुजत पडले आहेत की, ज्यांनी काहीही गुन्हा केलेला नाही. आणि असे कित्येक लोक आहेत की ज्यांना तशाच शिक्षा देण्याकरिता पकडून ठेवले आहे. सुरक्षित जागी आरामात बसून आपल्या सदिच्छा त्यांना पाठविणे हे पुरेसे आहे काय?

व्हाइसरॉयनी आपल्या भाषणात असे स्पष्ट केले आहे की, तुमच्या ज्या कित्येक मुलाखती प्रसिद्ध झाल्या त्याचा निश्चित परिणाम म्हणजे अली बंधूंकडून घेवविलेली माफी व हमी. तुम्ही तुमच्या भाषणात असे स्पष्ट केले आहे की, आमचा लढा हा न थांबता चालू राहणार आहे. त्या मुलाखतीत कोणतेही तत्त्व अंतर्भूत केलेला मुद्दा हा निकालात निघाला नाही. मात्र अत्याचाराला उत्तेजन देऊ नये एवढेच ठरले. पण त्याची उभयपक्षी वाटाघाट होणे आवश्यक नव्हते. मी असे म्हणत नाही की, अशा अवस्थेत सरकारबरोबर बोलणीच करावयाला नको होती. पण या बाबतीत त्या दृष्टिकोणासंबंधी पुष्कळसे समर्थनपर सांगता येईल. जेव्हा असे आढळून आले असते की, खेळ हा खेळूनच

टाकला पाहिजे, तेव्हा तुमच्यासारख्या आणि लॉर्ड रीडिंगसारख्या सन्माननीय प्रतिस्पर्ध्यांत खेळाचे काही नियम ठरविणे हे उभयपक्षी खेळ खराब होऊ नये म्हणून ठरविणे अगदी योग्य झाले असते. हे नियम जे त्या खेळात भाग घेतील त्यांना लागू होतील. पण ते विशिष्ट मर्जीतल्या व्यक्तींना फक्त लागू होता कामा नयेत. जर सर्वांत आवश्यक गोष्ट कोणती हवी असेल तर शस्त्रे कोणती वापरावीत याबद्दल एकमत होणे ही होय. जेव्हा काही स्थानिक सरकारे प्रचाराला प्रचाराने उत्तर देण्याची बढाई मारतात तेव्हा ते अत्यंत वाईट तऱ्हेची दडपशाही करीत असतात. मूळच्या मुद्यावर एकमत होणे अशक्य असताना देखील तसेच पुष्कळ मुद्देच चर्चेला योग्य झाले असते.

माझ्यासंबंधी आपण गैरसमज करणार नाही असे मला वाटते. अलीबंधूंनी केलेल्या त्यागाबद्दल त्यांची स्तुती करण्यात मी कोणालाही हार जाणार नाही आणि त्यांची वैयक्तिक मैत्री असणे हे मी महत्भाग्य समजतो. गेले काही दिवस माझ्या मनाला जी रुखरुख लागली आहे ती अशी : आपले पुष्कळसे कार्यकर्ते तुरुंगात जाण्यास व हालअपेष्टा भोगण्यास आपण प्रत्यक्ष जबाबदार असताना आम्ही जवळजवळ त्यातून मुक्त आहोत. उदाहरणार्थ, पत्रके वाटण्याबद्दल निरपराधी मुलांना तुरुंगात पाठविले जाते व पत्रके लिहिणारा मोकळा राहतो, त्याकरिता अधिक दुःख व मानसिक क्लेश देण्यापलीकडे सरकारला शिक्षेचा दुसरा कोणताही प्रकार शोधून काढता आलाच नसता. मला वाटते अशी एक वेळ आली आहे की, जेव्हा पुढाऱ्यांनी दुःख भोगण्याच्या संधीचे स्वागत करावे आणि निसटून जाण्याची सर्व प्रलोभने ठामपणे नाकारावीत. अलीबंधूंच्या कृत्यावर जो मी आक्षेप घेतला तो याच दृष्टीने. मी व्यक्तिशः त्यांच्यावर प्रेम करतो.

गैरसमज

त्या पत्रात औदार्य आणि धैर्य भरलेले आहे. आणि याच दोन गुणांमुळे परिस्थितीबद्दल गैरसमज झालेला आहे. या गैरसमजाला जर कोणी जबाबदार असेल तर व्हाइसरॉयचे दुर्दैवी उद्गार.

अलीबंधूंची माफी सरकारला उद्देशून नाही. ती मित्रांना उद्देशून व मित्रांना दिलेली आहे. त्या मित्रांनी त्यांचे लक्ष त्यांच्या भाषणाकडे वेधले. ' व्हाइसरॉयच्या हुकुमावरून ती माफी दिलेली नव्हती. त्यांनी ती सूचितही केलेली नव्हती असे म्हणण्यात मी विचारभंग करीत नाही. ज्या क्षणी मी ती भाषणे पाहिली त्या क्षणी अलीबंधूंच

प्रामाणिकपणा सिद्ध करण्याकरिता आणि चळवळीचे सर्वस्वी अनत्याचारी स्वरूप दाखविण्याकरिता मी असे म्हटले की, मी त्यांना निवेदन करण्यास सांगेन. तुरुंगवासातून वाचण्यासाठी (व्हाइसरॉय यांच्याशी) सौदा करण्याचा हा प्रश्नच नव्हता. त्यांच्या भाषणाकडे माझे लक्ष वेधण्यात आल्यामुळे अत्याचाराला उत्तेजन देण्याच्या सिद्ध झालेल्या भूमिकेवरून (मला टाळता आले असते तर) मी त्यांना तुरुंगात जाऊ दिले नसते. मी सर्व आरोपींना हाच सल्ला दिला आहे; आणि त्यांना सांगितले आहे की, जर तुमची भाषणे अत्याचारी असली तर तुम्ही माफी मागा. असहकारितावाद्याला याशिवाय दुसरे काही करता येत नाही. या बंधूंवर जर कोर्टात खटला भरला असता, तर त्यांच्या भाषणातील काही उताऱ्यांबद्दल, जे उतारे अत्याचाराला उत्तेजन देणारे, माझ्यामताने समजले जातील, त्याबद्दल तुम्ही कोर्टाची माफी मागा असा मी सल्ला दिला असता. असहकारितावाद्यांचा अत्याचारी वृत्ती नसणे हा एवढाच उद्देश नसून त्यांच्या भाषणाचा उलट अर्थ समंजस माणसाने लावता कामा नये. आपण संशयातीत असले पाहिजे. चळवळीचे यश तिची अत्यंत शुद्धता राखण्यावर अवलंबून आहे, म्हणून मी पत्रलेखकाला आणि त्याच्याच विचाराच्या लोकांना असे सांगतो की, असहकारितेचे सारे तत्त्व लेखक म्हणतात त्याप्रमाणे सोडून दिले नाही एवढेच नव्हे पण तिचे अनत्याचारी स्वरूप हे अलीबंधूंच्या माफीने पूर्णपणे शाबीत झाले आहे आणि म्हणून आमची बाजू पुष्कळच भक्कम झाली आहे.

मोकळा कोण आहे ?

लेखकाला जे डाचत आहे ते असे. अलीबंधू मोकळे राहिले आहेत आणि त्यांच्यापेक्षा कमी कडक बोललेले, कमी दर्जाचे लोक तुरुंगात आहेत.

ह्याच गोष्टीमुळे असहकारितेचे खरे स्वरूप व्यक्त होते. असहकारितावाद्यांनी वैयक्तिक सुरक्षिततेकरिता सौदा करू नये. इतरांच्या मुक्ततेकरिता सौदा करण्याचा माझा मार्ग मोकळा होता. तसे मी केले असते तर असहकारितेचा सारा डावच हरलो असतो. बंधूंच्या सुटकेकरितादेखील मी सौदा केला नाही. सरकार काय करील याचा विचार न करता माझी अलीबंधूंशी भेट झाल्यावर त्यांनी आपला मान राखण्याकरिता निवेदन करावे, असा सल्ला देण्याचे माझे कर्तव्य आहे हे मी स्पष्ट शब्दात सांगितले होते.

बिनशर्त प्रामाणिकपणा

सरकार आपल्याबरोबर खेळ खेळो वा न खेळो, आम्ही खेळ खेळलाच पाहिजे. सरकार खेळ खेळेल अशी मला आशा वाटत नाही. सरकारला मानाची चाड नाही या निर्णयाला जेव्हा मी आलो त्याच वेळी मी असहकारितावादी बनलो. लॉर्ड रीडिंग यांची इच्छा योग्य आणि न्यायाची गोष्ट करावी अशी असेल व तशी त्यांची इच्छाही आहे,

पण त्यांना परवानगी मिळणार नाही. सरकारला जर मानाची चाड असतीतर त्यांनी अलीबंधूंवर खटला न करण्याचे ठरविले त्याच वेळी त्यांनी सर्व कैद्यांना मुक्त केले असते. जर सरकारला मानाची चाड असती तर त्यांनी पंडित मोतिलाल नेहरू या मुख्य गुन्हेगाराला मोकळे सोडून तरुणांना पकडून तुरुंगात टाकले नसते. जर सरकारला मानाची चाड असती तर त्यांनी बनावट राष्ट्रसंघाला पाठिंबा दिला नसता. जर सरकारला मानाची चाड असती तर त्यांनी पूर्वीच आपल्या हीन कृत्यांबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला असता. आम्ही अमृतसर, कासूर, विरमगाव, अहमदाबाद आणि नुकत्याच मालेगाव येथे आमच्या लोकांनी केलेल्या प्रत्येक गुन्ह्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त केला आहे. सरकारबद्दल मी खोट्या आशा बाळगीत नाही किंवा गैरसमज करून घेत नाही. उद्या जरी सरकारने अलीबंधूंना पकडले तरी मी माफीचे समर्थन करीन. ते योग्य प्रकारे वागले आहेत आणि आपणही तसेच केले पाहिजे. वास्तविकपणे ज्या अर्थी सरकार अप्रीती निर्माण करण्याकरता लोकांना पकडीत आहे, त्या अर्थी ते अलीबंधूंनाही पकडीत आहे. जे असहकारितावादी तुरुंगात आहेत ते आम्हा बाहेरील लोकांपेक्षा कमी भाग्यशाली लोक आहेत, असे वाटणे याचा अर्थ लेखकमहाशय असहकारितेचा बिनचूक अर्थ करीत नाहीत, असा होतो. माझ्यापुरते बोलायचे म्हणजे मला तुरुंगातल्या कोठडीत एकट्याला बंद करून ठेवले. व मी असहकारितेच्या कार्यपद्धतीचा बिलकूल भंग केला नसताना किंवा वैयक्तिक अथवा सार्वजनिक नीतिमत्तेचाही भंग केला नसताना जर मला तुरुंगात एकांतवासाची शिक्षा दिली तर ते माझ्या दृष्टीचे स्वातंत्र्यच आहे. गुलामाला-ज्याप्रमाणे धन्याचे घर असते त्याप्रमाणे मला सारा हिंदुस्थान तुरुंग वाटतो. जो गुलाम असतो त्याला मुक्त व्हावयाचे असेल तर त्याने आपल्या गुलामीविरुद्ध सतत उठाव केला पाहिजे आणि त्याच्या बंडखोरीबद्दल त्याला धन्याच्या कोठडीत बंद करून ठेवले पाहिजे. कोठडीचे दार हे स्वातंत्र्याचे दार आहे. सरकारच्या तुरुंगात जे यातना भोगीत आहेत त्यांच्याबद्दल मला कीव वाटत नाही. दुष्ट सरकारात निरपराधी लोकांनी फासावर जाण्यात नेहमी आनंद मानला पाहिजे. माझा उपदेश न मानणे ही बंधूंना सर्वांत सोपी गोष्ट होती, आणि तसे करून ते आपल्या तुरुंगातील बांधवांत जाऊन सामील होण्याची संधी सहज साधू शकले असते. मी वाचकांना कळवू इच्छितो की, जेव्हा दक्षिण आफ्रिकेतील लढ्याच्या शेवटच्या अवस्थेत मला पकडण्यात[१] आले तेव्हा माझी बायको व इतर मित्र यांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. दक्षिण आफ्रिकेच्या तुरुंगात मला दगदग व संघर्ष यापासून विश्रांती व शांती मिळाली.

असहकारितावादी कैद्यांनी तुरुंगातून सुटण्याकरिता निवेदन का करू नये हे यावरून कदाचित स्पष्ट होईल.

१. हे नोव्हेंबर १९१३ मध्ये घडले. पाहा, खंड १२. प्रकरण १९०.

सरकारविरुद्ध अप्रीती एक सद्गुण

सरकारच्या सध्याच्या पद्धतीचे मानहानिकारक स्वरूप दाखविण्याकरिता माझ्याजवळ दोन परिणामकारक उदाहरणे आहेत. गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू प्रि. गिडवानी यांना मद्रासहून एक समन्स आले आहे. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी बेझवाडा येथे केलेल्या भाषणांबद्दल अप्रीतीचा आरोप त्यांच्यावर ठेवला आहे व त्या आरोपाला उत्तर देण्याकरिता हे समन्स आहे. अत्याचाराला उत्तेजन देण्याचा प्रश्नच नाही असे आरोपावरून दिसते. ज्या १२४ अ कलमाखाली गिडवानींवर आरोप ठेवला ते कलम असे : "जो कोणी बादशाहा किंवा ब्रिटिश हिंदुस्थानात संस्थापित झालेल्या सरकारविषयी अप्रीती निर्माण करील किंवा निर्माण करण्याचा प्रयत्न करील किंवा त्या सरकारविषयी द्वेष अगर तिरस्कार निर्माण करण्याचा प्रयत्न करील त्याला शिक्षा होईल."... कोणीही राजाविरुद्ध अप्रीती किंवा द्वेषाचा प्रचार करीत नाही. जी अप्रीती श्री. गिडवानी यांनी निर्माण केली असेल ती अलीबंधू सतत निर्माण करीत आहेत. सरकारविषयी अधिक अप्रीती बाळगणारा व वाढविणारा माझ्याइतका दुसरा कोणीही नाही. ज्याप्रमाणे असहकारितावाद्यांना हे सरकार पाप आहे असे वाटते, त्याचप्रमाणे जर दुसऱ्या माणसाला तसे वाटत असेल तर विद्यमान सरकारविषयी अप्रीती बाळगणे हे प्रत्येक सज्जन माणसाचे कर्तव्य आहे, असे माझे मत आहे. अली बंधूंवर खटला न भरण्याचे ठरविल्यावर सरकारने अत्याचाराशिवायचे सारे खटले थांबवावयास पाहिजे होते. पण विद्यमान राज्यपद्धतीत इंग्लंडच्या माजी लॉर्ड चीफ् जस्टिस यालाही उक्ती व कृती यांतील ताटातूट टाळता येणार नाही. पण जर तो आपल्या भोवतालच्या परिस्थितीतून बाहेर पडेल आणि भ्रष्ट पद्धतीच्या भ्रष्ट परंपरा दूर सारील तरच हे शक्य होईल.

दुःखी सिंध

सिंधमधील दडपशाहीच्या वास्तवतेचे रसभरित पुढील वर्णन एका मित्राने माझ्याकडे पाठविले आहे :

> सिंधच्या कमिशनरने एक गुप्त पत्रक पाठविले आहे व त्यात मुखत्यारकारांना असहकारितेच्याविरुद्ध प्रति-आंदोलन सुरू करण्यास सांगितले आहे. काही ठिकाणचे मुखत्यारकार असहकारिता दाबण्याकरिता विचित्र उपाय योजीत आहेत. त्यांनी असहकारिताविरोधी कमिट्या स्थापन करण्याची जी स्पष्ट व उघड पद्धत अवलंबिली आहे व जिला कोणी हरकत घेणार नाही, त्या पद्धतीशिवाय त्यांनी काही जागी लोकांना असे सांगितले आहे की, जे असहकारितेचा प्रचार करीत असतील त्यांना आपल्या घरी राहण्यास जागा देऊ नये. त्यांनी पंचायतींना असेही सांगितले आहे की, अशांच्या व्याख्यानांना जाण्यास लोकांना प्रतिबंध

करावा. अशा गोष्टी खरोखरच घडल्या. एके ठिकाणी (बादीन) प्रचारक राहिले होते. पण त्यांना मालकांनी निघून जाण्यास सांगितले. थरपारकर जिल्ह्यातील खिप्रू गावी एक व्याख्याता गावापासून दूर अंतरावर असताना त्याच्यावर एका बुरखा घातलेल्या माणसाने हल्ला केला. तो त्याच्या पैशाला शिवला नाही पण त्याने त्याला उंटावरून खाली खेचले आणि एका लठ्ठ काठीने बडविले. त्याने त्याच्याजवळचे स्वराज्याचे निशाण व शाल हिसकावून घेतली पण घड्याळ व पैशाला हात लावला नाही. एका प्रसिद्ध अधिकाऱ्याच्या चिथावणीने हा हल्ला करण्यात आला. ही गोष्ट सर्व जिल्हाभर माहीत आहे. पण तेथील पोलिसांच्या दहशतीमुळे लोक निवेदने देण्यास पुढे येत नाहीत. सक्कर जिल्ह्यात अधिकच वाईट परिस्थिती आहे. सुमारे तीन आठवड्यांपूर्वी रेल्वेस्टेशन-पासून दहा मैल दूर असलेल्या उबावरो या गावी सक्कर जिल्हा परिषद भरली होती. त्या विभागातल्या डेप्युटी कलेक्टरने गाडीवाल्यांना सांगितले की, तुम्ही आपल्या गाड्या गांधी टोपीवाल्यांना देऊ नका. गाडीवाल्यांना डेप्युटी कलेक्टरचा रोष ओढवून घेण्याचे धैर्य नव्हते, आणि भीतीने त्यांनी ते कबूल केले. जेव्हा अध्यक्ष बिरुमल बेगराज, व सक्करचे असहकार केलेले मूळचंद वकील आणि इतर लोक सक्करहून स्टेशनवर पोहोचले, तेव्हा तेथे गाड्याच नव्हत्या. एका बैल-गाडीवाल्याने शेवटी त्यांना नेण्याचे कबूल केले. पण पोलिस जमादाराने त्याला ठोकल्यामुळे तोही त्यांना घेऊन जाईना. अध्यक्ष व इतरांना एक मैलावर असलेल्या शेजारच्या खेड्यात उन्हातून पायी जावे लागले. तेथे पंचायतीने त्यांच्या वाहनाची सोय केली व ते भर उन्हात उबावरो येथे पोहोचले. त्या गावी लोक सभेलाच येईनात. कारण त्यांना असे सांगितले की, तुमच्या गैरहजेरीत तुमची घरे फोडली जातील. म्हणून जेव्हा लोक परिषदेला येतील तेव्हा त्यांच्या घरांवर गस्त घालण्याची व्यवस्था स्वयंसेवकांकडून करण्यात आली. परिषदेच्या वेळी गुप्त पोलिस खात्याच्या अधिकाऱ्यांच्या जोरावर एक मुसलमान सभेत बोलण्याचा हट्ट धरू लागला. पण कोणत्या ठरावावर आपण बोलणार हे तो सांगेना. सरते शेवटी जेव्हा त्याला बोलू दिले, तेव्हा तो तेथे हजर असलेल्या एका कार्यकर्त्याला शिव्या देऊ लागला. पण लोकांनी ते निमूटपणे सहन केले. थोड्या वेळानंतर दुसरा एकजण त्याला चिडविले नसतानाही दोन स्वयंसेवकांवर चालून गेला, व त्यांना आणि दोन शेजाऱ्यांना त्याने लाथाबुक्क्या व जोडे मारले. ज्यांच्यावर हल्ला केला त्यांनी प्रतिकार केला नाही. सारी परिषद चालू असताना सभेचे चालक

अत्याचार होईल की काय, अशा भयग्रस्त मनस्थितींत होते. पण सरकारी अधिकाऱ्यांच्या हस्तकांनी सतत प्रयत्न करूनदेखील अत्याचाराला चिथावणी देण्याचे त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. गाडीवाल्यांनी परिषदेच्या प्रतिनिधींना परत नेण्याचेही नाकारले. मिरपूरमथेलो या गावी वाटेत ही मंडळी उतरली असता मौलवी ताजमहंमद यांचा सभेत हजर असलेल्या अधिकाऱ्यांनी उघड अपमान केला. पण त्यांनी किंवा सभेतल्या लोकांनी शब्दांनी किंवा कृतींनी प्रतिकार न करता हे अपमान सहन केले. परिषदेनंतर जिल्ह्यातील परिस्थिती जास्त जास्त बिघडत आहे. तिकडचे मुखत्यारकार मुसलमानांच्या सभा भरवीत आहेत आणि त्यांना सांगत आहेत की, हे हिंदू लोक तुम्हाला फसवीत व ठकवीत आहेत. त्यामुळे मुसलमान हे हिंदूंना उघड सांगतात की, जर तुम्ही असहकारितावाद्यांना आश्रय दिलात तर आम्ही हिंदूंच्या घरी चोऱ्या करू. एका खेड्यात काँग्रेसचे लोक स्थानिक देवळात उतरले. त्यानंतर लवकरच लाठी घेतलेले ३० मुसलमान त्या देवळाभोवती जमले व म्हणू लागले की, आम्ही भाषण करणाऱ्यांना मारावे म्हणून थांबलो आहोत. शेवटी देवळाच्या रखवालदाराने काँग्रेसच्या लोकांना दुसऱ्या दाराने जा अशी विनवणी केली. घोटकी येथे सक्कर काँग्रेस कमिटीचे तरुण सेक्रेटरी मि. चोइतराम वालेचा यांना ३० ते ४० लाठीधारी मुसलमानांनी घेरले. ते शांतपणे मार बसण्याची वाट पहात उभे राहिले. त्या वेळी पुष्कळ तरुण हिंदू वालेचाकडे आणि त्यांच्याभोवती शांतपणे बसले. स्थानिक हिंदू पंचायतीने ही परिस्थिती समजून आल्यावर वालेचा व त्यांच्याबरोबरच्या दोघा तिघा काँग्रेसवाल्यांना आणण्याकरिता लोक पाठविले. जेव्हा ते पंचायतीच्या जागी गेले तेव्हा हे ३०–४० लाठीधारी मुसलमान त्यांच्या मागोमाग गेले आणि पंचायतीच्या सभेत जाऊन बसले. ते म्हणाले, वालेचाला आम्ही मारणार आहोत. पंचायतीने वालेचाला गाव सोडून जाण्यास विनंती केली. वालेचाने उत्तर दिले, माझे काम संपल्याशिवाय मी गाव सोडणार नाही. पंचायतीने त्याचा दृढनिश्चय पाहून मुसलमानांना तेथून निघून जाण्यास सांगितले. तुम्ही गेलात म्हणजे आमचे काम सुरू होईल असे ते म्हणाले. मुसलमान यावर नुसते हसले व सभेतून निघून जाण्यास त्यांनी नकार दिला. एक तास फुकट वाट पाहिल्यावर पंचायतीपुढे वालेचा यांना निघून जाण्यास सांगण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाही. त्यांनी वालेचाबरोबर ४० हिंदू दिले व त्यांना स्टेशनवर नेऊन सोडले. ज्यांनी या धमकीच्या, बळजबरीच्या, प्रत्यक्ष अत्याचाराच्या आणि अत्याचाराच्या धमकीच्या मार्गांचा अवलंब केला त्यांच्यापैकी कोणाविरुद्धही मोठ्यातल्या

मोठ्या अधिकाऱ्याने काहीही इलाज योजला नाही. त्या सर्व मार्गांचा उद्देश काँग्रेसचा संदेश खेड्यापर्यंत पोहोचू नये हा होता. लॉर्ड रीडिंग किंवा सर जॉर्ज लॉइड[1] यांची इच्छा या चळवळीच्या विरुद्ध याच पद्धतीने लढण्याची आहे काय ?

शेवटचे वाक्य म्हणजे मला एक मित्रत्वाची कोपरखळी मारण्याकरिता आहे. मी लॉर्ड रीडिंग व सर जॉर्ज लॉइड यांच्याबद्दल काही स्तुतिपर उद्गार काढले, त्याची आठवण करून देण्याकरिता हे वाक्य आहे. या गोष्टी उघडकीस आल्या असल्या तरी माझी स्तुती कायम आहे. अत्यंत चांगले शासक हेसुद्धा चांगल्या गोष्टी करण्याकरिता दुर्बल ठरतात हा जो माझा या पद्धतीवर आरोप आहे तो याने खरा ठरतो. रस्त्यातल्या व्रात्य पोरावर सर जॉर्ज यांचा जितका ताबा आहे, तितकाच सिंधच्या कमिशनरवरही आहे. सर जॉर्ज यांना कमिशनरला भ्यावे लागते आणि ते कमिशनरसाहेब गव्हर्नरला भीती घालू शकतात. लॉर्ड रीडिंग यांचा जर कोणता मोठा पराक्रम ठरणार असेल, तर त्यांनी पंजाबच्या कुप्रसिद्ध मि. टॉमसन यांना वरची जागा स्वीकारण्यास आमंत्रण द्यावे व ती जागा पत्करण्याचा हलकेपणा टॉमसन यांनी दाखवावा, याबद्दल त्यांचे मन वळविण्यात यशस्वी होणे हा आहे. ज्या ठिकाणी सर जॉर्ज लॉइड हे व्यक्तिशः देखरेख करू शकतात त्या ठिकाणी ते आपण युक्तिबाज आहोत आणि शरण जात आहोत असे दाखवीत असतात. लॉर्ड रीडिंग यांना वर सांगितलेल्या गोष्टीप्रमाणे उपशामक वस्तू संपादन करता येतील. पण सर जॉर्ज हे राजिनामा देणार नाहीत. कारण सिंधचे कमिशनर म्हणतात की, ते गव्हर्नर लॉईडइतकेच चांगले आहेत. तसेच लॉर्ड रीडिंग हेही राजिनामा देणार नाहीत. कारण राज्यातील मैदानी भागावरचे अधिकारी त्यांच्या न्याय देण्याच्या हेतूबद्दल हसतात. दोघेही प्रामाणिकपणे असा विश्वास बाळगतात की, आपण नसतो तर परिस्थिती अधिकच बिघडली असती. पापाबरोबर प्रणयचेष्टा न करणे आणि सत्कार्य करण्याची इच्छा बाळगणे हे जमणार नाही, येवढेच सिद्ध करण्याकरिता असहकारितेचा अवतार आहे. जेव्हा पाया पापाचा असतो तेव्हा त्यावरील चांगुलपणाची इमारत ही पापाच्या शक्तीची वाढ करीत असते. असे राज्यकर्ते अपयशी होतात याबद्दल दोष देणे चुकीचे आहे. कारण ते स्वतःची इच्छा नसताही अपयशी होत असतात. जर आपण राज्यपद्धती आणि राज्यकर्ते यांच्यात तारतम्य करू लागलो तर त्या राज्यपद्धतीत जो खोलवर गेलेला दुष्टपणा आहे तो दुष्टपणा पाहण्यास आपल्या असहकारितेमुळे त्यांचे डोळे उघडतील. सर्वच राज्यकर्ते वाईट असतात असे तर खासच नाही.

पण राज्यकर्त्यांच्या गुणावगुणाबद्दल जी आपण बौद्धिक चर्चा करीत आहोत, तीमुळे सिंधी दुःखितांचे समाधान होणार नाही. अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांनी जे

१. मुंबई व सिंधचे गव्हर्नर. त्या वेळी सिंध व मुंबई एक प्रांत होता.

धैर्य व सोशिकपणा दाखविला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. जर ते अशाच प्रकारे सोशिकपणे व शौर्याने कष्ट सोशीत राहतील तर या बेलगाम व खऱ्याखोट्याची चाड नसणाऱ्या दडपशाहीचा शेवट जवळ आणला जाईल. तत्त्वशून्य अधिकाऱ्यांच्या हातातील जे सहजासहजी खेळणी होतात अशा आपल्या वाट चुकलेल्या देशभक्तांना आपल्या बाजूला वळविण्याकरिता सहनशीलतेने प्रयत्न करीत राहिले पाहिजे. हिंदुस्थानातील इतर भागांप्रमाणेच सिंधमध्येसुद्धा हळूहळू खेड्यांतील लोक अधिकाऱ्यां-विषयीची भीती टाकून देतील आणि काँग्रेस व खिलाफतच्या लोकांचे आपले खरे मित्र व मुक्तिदाते म्हणून स्वागत करतील अशी आशा आहे. मुसलमानांना हिंदूंच्याविरुद्ध व हिंदूंना मुसलमानांच्याविरुद्ध खेळविणे, जर आपल्यात श्रद्धा असेल तर लवकरच अशक्य होईल.

देवळात खादी

विलायती कापडाने आपल्या जीवनावर इतके आक्रमण केले आहे की, आपण ते कापड पवित्र कामासाठीसुद्धा वापरतो. पुरी आणि अयोध्या व ज्या ज्या देवळांत मी गेलो त्या त्या देवळांतील मूर्तींना सजविण्याकरिता परदेशी कापड वापरतात असे मी पाहिले. पवित्र यज्ञोपवीतसुद्धा हातसुताचे नसते. सिंधमधल्या एका बातमीदाराने जेव्हा पुढील बातमी पाठविली तेव्हा मी प्रफुल्लित झालो. ती बातमी अशी : गुजरात विद्यापीठाचे आचार्य गिडवानी हे जेव्हा नुकतेच सिंधला गेले तेव्हा त्यांनी पहिल्यांदाच नेहमीच्या परदेशी रेशमाऐवजी खादीचे वस्त्र ग्रंथसाहेबांना अर्पण केले. हे चांगले उदाहरण सर्व भक्तजन गिरवितील आणि साऱ्या देवळांतून परदेशी कापडाऐवजी खादी प्रचारात आणतील अशी मला आशा आहे.

आई-बापांचे कर्तव्य

यंदा माझा २१ वर्षांचा तिसरा मुलगा बी. ए.ची परीक्षा सन्मान-पूर्वक अतोनात खर्च करून पास झाला. सरकारी नोकरी करण्याची त्याची इच्छा नाही. त्याला राष्ट्रसेवा करावयाची आहे. माझ्या कुटुंबात बारा जण आहेत. मला अद्याप पाच मुलांचे शिक्षण करावयाचे आहे. माझी इस्टेट होती पण ती दोन हजार रुपये कर्ज फेडण्याकरिता विकली. मी तीन मुलांच्या शिक्षणाकरिता माझी सर्व मिळकत खर्च केली. मला वाटत होते की, माझा तिसरा मुलगा विद्यापीठाची सर्वांत वरची पदवी मिळवील आणि नंतर माझी उद्ध्वस्त झालेली परिस्थिती सुधारील. त्याने कुटुंबाचा सारा बोजा घेण्यास समर्थ व्हावे असे मला वाटत होते. पण आता साऱ्या कुटुंबाचा नाश होणार अशी चिन्हे दिसत आहेत. एका बाजूला कर्तव्य व दुसऱ्या बाजूला अपेक्षा असा हा झगडा आहे. तुम्ही काळजीपूर्वक विचार करावा आणि सल्ला द्यावा अशी माझी विनंती आहे.

हे एक नमुनेदार पत्र आहे. कित्येक वर्षांपूर्वी मी सध्याच्या शिक्षणपद्धती-विरुद्ध झालो त्याला सर्वत्र दिसून येत असलेली वृत्ती कारणीभूत झाली; आणि त्यामुळे माझ्या मुलांचे व इतरांचे शिक्षण बदलण्यास भाग पाडले. आणि माझ्या मताप्रमाणे त्याचे परिणाम चांगले दिसून आले. अधिकाराचा व दर्जाचा पाठलाग हा अनेक कुटुंबांच्या नाशाला कारणीभूत झाला आहे, आणि पुष्कळ जण सन्मार्गापासून त्या-करिता चळले आहेत. आपल्या मुलांच्या शिक्षणाकरिता पैशाची गरज असलेल्या कुटुंबा-तील प्रमुखांनी, किती घाणेरड्या मार्गांचा अवलंब करणे हे आपले कर्तव्य आहे असे मानल्याचे कोणाला ठाऊक नाही? माझी खात्री आहे की, आपण जर आपल्या शिक्षणाची सारी पद्धती बदलली नाही तर आपण अधिकाधिक आपत्ती ओढवून घेणार आहोत. मुलांच्या सागराच्या फक्त काठाला आपण स्पर्श केला आहे. केवढा तरी मुलांचा वर्ग अशिक्षित राहतो! त्याचे कारण इच्छेचा अभाव नसून त्यांच्या आई-बापांना शक्ती व ज्ञान नसते हे आहे. आपल्यासारख्या अत्यंत गरीब राष्ट्रात काही तरी मुळातच चुकत आहे. येथील आई-बापांना इतक्या वाढलेल्या मुलांना पोसावे लागते व मुलांनी काहीही तात्काळ प्राप्ती न करता त्यांना फार महाग शिक्षण द्यावे लागते. शिक्षणाच्या उंबरठ्यावर मुले चढताच कामाच्या रूपाने जर ती शिक्षणखर्च भागवू शकली तर मुलांया दृष्टीने त्यात काही चूक आहे असे मला वाटत नाही. साऱ्या हिंदुस्थानला जरूर असणारा सोयीस्कर व अत्यंत साधा हस्तव्यवसाय जर कोणता असला तर तो निःसंशय सूतकताई व त्याच्या पूर्वीच्या प्रक्रिया हा होय. जर आपण हा व्यवसाय आपल्या शिक्षण संस्थांत सुरू केला तर तीन हेतू आपण साध्य करू. आपण शिक्षण स्वावलंबी करू, मुलांच्या शरीराला व मनाला शिक्षण देऊ, व परदेशी सूत व कापड यावर पूर्ण बहिष्कार घालण्याचा मार्ग तयार करू. अशा प्रकारे सुसज्ज झालेली मुले स्वावलंबी व स्वतंत्र होतील. माझी पत्रलेखकाला अशी सूचना आहे की, त्यांनी आपले कुटुंब चालविण्याकरिता कताई किंवा विणाई करण्याचे कुटुंबातील सर्व मंडळींना सांगावे. माझ्या योजनेप्रमाणे जे मूल कमीत कमी परिमाणाचे सूत कातणार नाही, त्याला शिक्षण मिळण्याचा हक्क नाही. पूर्वी स्वप्नात नव्हता असा स्वाभिमान व स्वातंत्र्य अशा कुटुंबांना लाभेल, व ती प्रतिष्ठित होतील. माझ्या योजनेत उदार शिक्षणाला वगळले नाही, उलटपक्षी प्रत्येक मुलामुलीच्या ते सहज आटोक्यात येते. ते शिक्षण मुख्यत्वेकरून मानसिक व नैतिक विकासाचे साधन होते, आणि दुय्यम व अप्रत्यक्षपणे ते जीवनाचे साधन बनते. त्यामुळे वाङ्मयीन शिक्षणाची जी मूळ प्रतिष्ठा आहे ती त्याला प्राप्त होते.

'यंग इंडिया', १५-६-१९२१

१०४. आसामचा धडा

माणुसकीच्या नावाने बंगाल सरकारवर माझा असा आरोप आहे की, त्यांनी गरिबांना छळले आहे. जेथे दया पाहिजे होती तेथे त्यांनी अत्याचार केला; जेथे मार्दव पाहिजे होते तेथे त्यांनी गुरखा शिपाई आणले; जेथे मानवीस्वभाव सहानुभूती आणि दयेकरिता आक्रोश करीत होता तेथे दयाळू सरकारच्या चांगल्या नावाला त्यांनी सोडचिठ्ठी दिली. हा पाशवी अत्याचार केल्यानंतर त्यांनी त्या जखमेवर मीठ चोळले. त्यांनी आपल्या माहितीखात्याच्या चालकाला बोलावून आणले व दैनिक पत्रातून त्याचे समर्थन जनतेपुढे केले.

* * *

साऱ्या हिंदुस्थानपुढे जर आज कोणता प्रश्न असेल व फक्त बंगालपुढेच नसेल तर तो हा आहे. बंगाल सरकारच नव्हे तर हिंदुस्थान सरकार हेही आपल्या कृतीने दिवसेंदिवस गरिबांच्या व दलितांच्या विरुद्ध हितसंबंधी लोकांच्या बाजूला जात आहे, व भांडवलवाले श्रीमंत आणि बलाढ्य यांचा पक्ष घेत आहे. हा आरोप फार भयंकर आहे. यामुळेच जे गरीब आहेत ते आपल्या दुःखासह महात्मा गांधींच्या निशाणाखाली गोळा होत आहेत. महात्मा गांधी हे स्वतः गरिबातले गरीब आहेत व त्यांना आपल्या स्वतःच्या गरिबीची जाणीव आहे. त्यामुळेच हे गरीब लोक सरकार जी मदत खुषीने देऊ इच्छिते तीही नाकारू लागले आहेत. नैहाटी येथे एका गृहस्थाने प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेली जी हकीकत मला सांगितली तीवरून आपण किती कष्टप्रद काळात राहात आहोत याची दुर्दैवी चिन्हे दिसतात. आसामहून परत आलेले गरीब मजूर प्रत्यक्ष उपाशी मरत होते. त्यांच्यापुढे शिजविलेला, वाफा निघणारा भात ठेवला होता. पण जेव्हा तो सरकारने दिला आहे असे कळले तेव्हा त्यांनी त्याला हातही लावला नाही. मळ्यावर परत नेण्याकरिता हे कारस्थान असावे अशी त्यांना भीती वाटली. पण जेव्हा सेवा समितीच्या कार्यकर्त्यांनी लोकांकडून कच्चा तांदूळ आणला तेव्हा त्यांनी अधाशाप्रमाणे तो कच्चाच खाऊन टाकला.

हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याच्या इतिहासात ही एक नवी व सूचक घटना आहे. आपल्या डोळ्यांसमोर चाललेल्या क्रांतीत जे सापडले नाहीत व जे आपल्या फायलीमध्ये डोके खुपसून बसले आहेत त्यांनी जर वेळेवर इशारा घेतला तर ते शहाणपणाचे ठरेल. सर्वांच्याच न्यायदानाचा (चित्रगुप्त चौकशीचा) दिवस सुरू झाला आहे. सरकारला आता एकाच महत्त्वाच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागेल. " तुम्ही गरिबांच्या बाजूचे आहात का श्रीमंतांच्या ? तुम्ही धनदेवतेच्या बाजूला आहात का देवाच्या ? "

जी आसामची दुर्घटना अद्याप संपली नाही तेथील दृश्य पाहून परतल्यावर मि. ॲन्ड्रूज यांनी जे भाषण विचारपूर्वक लिहिले व कलकत्त्याला केले, ते ज्यांनी वाचले असेल व जे रडले असतील त्यांनाच वरील उतारे ग्रहण करता येतील. मि. ॲन्ड्रूज हे त्यांना जे वाटते तेच लिहितात व म्हणतात. ते स्वतःपासून किंवा इतरांपासून सत्य लपवून ठेवीत नाहीत. माणुसकीची सतत सेवा करून ते स्वतःला झिजवीत आहेत. ते ज्याप्रमाणे देशातील अत्यंत वरिष्ठ अशा सत्तेविरुद्ध सत्य आरोप करतात तसेच ते आपल्या चुकाही कबूल करण्यास तयार असतात. ते सत्यनिष्ठ, कट्टर आणि ईश्वराला भिणारे असल्यामुळे काही वृत्तपत्रे त्यांना शिव्या देता आल्या नाहीत तर त्यांना तुच्छतेने बाजूला सारतात. तथापि त्यांनी फिजी, दक्षिण आफ्रिका, पूर्व आफ्रिका, सीलोन, पंजाब या देशांविषयी जी विधाने केली, ती त्या वेळी जशी खरी होती तशी आजही खरी आहेत. त्यातील बहुतेक संबंधित सत्ताधाऱ्यांनी कबूलही केली आहेत. यांपैकी प्रत्येक प्रकरणात त्यांनी गरीब व गरजू लोकांना साहाय्य करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या कीर्तीवर आणखी कितीही हल्ले केले तरी ते त्यातून बचावतील.

या ओळी लिहिण्याचा उद्देश ॲन्ड्रूज यांचा बचाव करावा असा नाही. आसामच्या दुःखद गोष्टीचा उल्लेख करण्याचा माझा उद्देश माझ्या स्वतःच्या सद्-सद्विवेकबुद्धीला स्मरावे व काही निष्कर्ष काढावे असा आहे. ज्या वेळी मजुरांनी काम थांबविले, त्या वेळी मला एक तार आली. ज्या ठिकाणचे दृश्य म्हणजे एक राष्ट्रीय आपत्ती म्हणून जी वाढत गेली त्या ठिकाणी मला बोलाविण्यात आले. पण मी तार केली आणि मला वाटले त्यांना पत्रे लिहिली. मला हातातले काम सोडता येईना जे काम करावयास माणसाला सांगितले आहे ते कितीही हलके असले तरी त्याला ते सोडता येत नाही. दुसरे काम कितीही उच्च दर्जाचे असले तरीही त्या कामाचा मार्ग स्पष्ट नसला तर त्याला ते दुसरे स्वीकारता येत नाही. मला मार्ग सापडला नाही. हातातले काम मला सोडता येईना. मी चुकलो असलो तर मुके कामगार आणि परमेश्वर मला क्षमा करो. वेझवाडयाचा कार्यक्रम सतत अंमलात आणण्याच्या कामात मी गुंतलो असता मी मजुरांची सेवा करीत आहे असेच मला वाटते. माझ्या असाहाय्यते-

बद्दल मला अधिक दुःख अशाकरिता होते की, कोणत्या ना कोणत्या कारणाने मजुरांना असे वाटते की, जेथे जेथे आणि जेव्हा जेव्हा ते संकटात सापडतील तेव्हा मी त्यांच्या बाजूला असेन. असंख्य बाबतींत माझी त्यांना अंतःकरणपूर्वक प्रार्थना आणि सहानुभूती याशिवाय मी दुसरे काही पाठवू शकत नाही, हे समजण्याइतका मी नम्र आहे. माझा आत्मा हा खरोखरच कामाकरता राजी आहे. पण शरीर हे असमर्थ आहे. मदत करण्याची जी निराशाजनक असमर्थता माझ्यात आहे ती मला ऐकू येते, जाणवते व मी धुसफुसतो.

मनुष्य जितका दुर्बल आहे तितकाच देव शक्तिमान आहे. तो आपल्या अमर्याद साधनद्वारा काम करीत असतो. त्याच्या हाकेला ओ देण्याकरिता अनेक ॲन्ड्रयूज व दास आहेत. परमेश्वर कोणत्याही दुःखाकडे दुर्लक्ष करीत नाही या विश्वासाने मी सुखी आहे. आपण फक्त आपल्या वाट्याचे काम प्रार्थनायुक्त नम्रतेने आणि शक्य तितक्या जागरूकपणाने करू शकतो.

आसामच्या दुःखद घटनेने मि. ॲन्ड्रयूज यांना हिंदुस्थान सरकारवर गंभीर आरोप करण्यास समर्थ केले आहे. निःपक्षपातीपणाच्या नावाखाली जी निष्ठुर अनास्था कामगारांच्या ताबडतोबींच्या गरजांविषयी दाखविली गेली, गुरख्यांचा हल्ला आणि अत्यंत असाहाय्य अशा लोकांच्याविरुद्ध वापरावयास लागलेल्या बलाच्या जरूरीचे ठराविक समर्थन, या साऱ्या गोष्टी सरकार किती रानटी आहे व आदराला पात्र नाही हे स्पष्टपणे दाखवितात. गुरख्यांना मजुरांवर मोकाट का सोडले? सैन्यात असे काही लोक असतात की, ज्यांना पाशवी वृत्तीचे व अमानुषतेचे शिक्षण दिले जाते, हे सर्वजण जाणतात. निःशस्त्र नागरिक लोकांवर जेव्हा लष्कर सोडले जाते तेव्हा त्याचा अर्थ लोकांना कळतो. सैन्याकरिता लागणाऱ्या लष्करभरतीत काहीजण माणुसकीचे अत्यंत हीन नमुने असतात हे सर्वांना ठाऊक आहे. ते युद्धाला चांगले असतील, पण संपावर गेलेल्या मजुरांचा समाचार घेण्याकरिता त्यांचा वापर करणे म्हणजे श्रीमंत व बलाढ्य लोकांची बाजू घेणे. प्रत्येक महत्त्वाच्या बाबतीत सुधारणा ह्या कोसळत आहेत. पुढील काही महिन्यांत सरकारच्या राज्यपद्धतीत असा बदल घडून येईल की, हलक्यातला हलका माणूस हा उच्चातल्या उच्च माणसाच्या तोडीचा होईल, किंवा त्यांच्यातील संघर्ष जगात अभूतपूर्व ठरेल. सरकारच्या नावाने दिलेला भात नाकारणे, याचा अर्थ जो आपली अप्रतिष्ठा करतो त्याच्या साहाय्याने जगण्यास नकार देणे हा होय. जेव्हा अशी शांततामय धैर्याची आणि परित्यागाची वृत्ती हिंदुस्थानात संचरेल तेव्हा सरकारचे भाग्य हे निश्चित ठरल्यासारखे होईल. आपल्याला अत्याचार कला शिकण्याची जरूरी नाही. पण अत्याचार सहन करण्याची, मरण्याची कला शिकण्याची जरूरी आहे. अत्याचाराच्या मार्गाने मिळालेले यश एका राक्षसी सरकारच्या जागी दुसरे आणील आणि जे गरीब व निरपराधी आहेत ते आजच्यासारखेच भरडले जातील.

जहाजावरील कामगारांनी जो सहानुभूतीपर संप केला त्याचे ॲन्ड्रूज यांना वाईट वाटले. ज्या कोणी त्या संपाला चिथावणी दिली, त्याने मजुरांचे नुकसानच केले. हिंदुस्थानात आपल्याला राजकीय संप नकोत. आपल्याला त्याचे पुरेसे शिक्षण मिळाले नाही. राजकीय संप न करणे म्हणजे स्वातंत्र्याचे काम पुढे नेणे हा होय. आपल्याला अस्थिर अस्वास्थ्याच्या वातावरणाची जरूरी नाही. आपल्या कार्यक्रमाच्या शेवटच्या टप्प्याकडे जी आपल्याला प्रगती करावयाची आहे तिला त्याने अडथळा येतो. जो शिपाई पिसाटासारखा धावत सुटतो तो सैन्यात राहावयाला नालायक असतो. आपण एक तर या कह्यात न राहणाऱ्या व गडबड उडविणाऱ्या लोकांवर ताबा मिळविला पाहिजे किंवा सरकारप्रमाणे त्यांना बाजूला टाकले पाहिजे. जेव्हा कामगार लोक आपल्या खऱ्याखुऱ्या गाऱ्हाण्यांकरिता संप करतील तेव्हा त्यांना मदत आणि दिलासा देणे एवढाच त्यांना साहाय्य करण्याचा मार्ग असतो. आपल्याला भांडवल किंवा भांडवलवाले नष्ट करावयाचे नसतात, पण त्यांच्यातील व मजुरांतील संबंध नियमित करावयाचे असतात. आपल्याला आपल्या बाजूला भांडवलवाले वळवावयाचे आहेत. सहानुभूतीच्या संपांना उत्तेजन देणे हा मूर्खपणा होईल. आपल्या गरीब मजुरांना त्यांच्या झोपड्यांतून वसविण्याकरिता मि. ॲन्ड्रूज यांनी पैसे मागितले आहेत. जे भुकेलेले आणि उघडे नागडे आहेत त्यांच्याकरिता म्हणजे स्वराज्याकरिता आपल्या भावनांची शक्ती किती आहे तिची कसोटी या विनंतीवरून लागणार आहे. मला वाटते कलकत्त्याने त्या दीनबंधुनी[1] केलेल्या विनंतीला मागितल्यापेक्षा अधिकच पैसे देऊन टाकले आहेत.

'यंग इंडिया', १५-६-१९२१

१०५. मॅजिस्ट्रेटची अरेरावी

लाहोरचे जिल्हा मॅजिस्ट्रेट, लाहोर शहर काँग्रेस कमिटीच्या सभेला मनाई करीत आहेत. राजद्रोही सभांच्या कायद्याप्रमाणे सार्वजनिक सभांचा अर्थ असा की, कोणत्याही नागरिकाला प्रवेशासंबंधाचे नियम मान्य करून सभेत प्रवेश मागता येतो. इतर सर्व सभा खाजगी असतात. लाहोर कमिटीची सभा ही फक्त कमिटीच्या सभासदांकरिता आहे असे जाहीर केले होते. पण मॅजिस्ट्रेटचे समाधान झाले नाही. त्यांनी सेक्रेटरीला भेटावयास

१. दीनबंधु ॲन्ड्रूज यांचे विशेषण.

व आपली खात्री पटवावयास सांगितले. लाला अमीरचंद यांनी मॅजिस्ट्रेटला भेटण्यास स्वाभाविकपणेच नकार दिला, आणि त्यांना नम्रपणे कळविले की, सभा खाजगी आहे व तिचा उद्देश निश्चित आहे. तथापि मॅजिस्ट्रेटनी सभेला मनाई केली. हा हुकूम बेकायदा आहे, अशी हरकत सेक्रेटरींनी नोंदविली. पण मॅजिस्ट्रेटला कळविले की, आपण तूर्त तो हुकूम पाळू. अधिकारी असहकारितावाद्यांनी सविनय कायदेभंग करावा म्हणून त्यांना प्रक्षुब्ध करीत आहेत व आव्हान देत आहेत, हे अगदी उघड आहे. असे आणखी हुकूम निघू द्या, आणि मी वचन देतो की, हे आव्हान अंतःकरणपूर्वक स्वीकारले जाईल. आतापर्यंत आम्ही असले हुकूम आमच्या दुर्बलतेमुळे पाळले. आता आम्ही ते आमच्या दररोज वाढणाऱ्या शक्तीमुळे पाळणार आहोत. जेथे जेथे असे हुकूम काढले जातात, तेथे तेथे सर्व देशभर सविनय कायदेभंग करण्याची तीव्र इच्छा आहे. ज्यांना असे हुकूम मिळतात ते जर विनयपूर्वक ते हुकूम मोडत नसतील तर त्याला कारण आदर्श आत्मसंयमन व स्वतःवर लादलेली शिस्त ही होय. जर देशाने अशीच आणखी शिस्त पाळली व अधिक आत्मसंयमन केले तर देशाचा फायदाच होईल. कायदेभंगाचा विशेष अधिकार बजाविण्याकरिता आपण लायक आहोत असे स्वतःला मानण्यापूर्वी ह्या दोन्ही गुणांची आपल्याला अधिकच जरूरी लागेल. कायदेभंग हा जर नम्रतापूर्वक करावयाचा असेल तर त्यात दमदाटी व अत्याचार नसला पाहिजे. बेकायदेशीरपणाला त्यात मज्जाव आहे. सविनय प्रतिकार करणारा तुरुंगवास ओढवून घेतो म्हणून त्याच्या अटकेविरुद्ध निदर्शन करणे हे चूक आहे. जेव्हा आपल्या अंतःकरणातील इच्छा तृप्त होते, तेव्हा जसा खरा आनंद होतो तसाच आनंद झाला पाहिजे. जर आपण कायदेभंग हा पसंत केलेल्या कायदे व हुकुमापुरताच कटाक्षाने मर्यादित करू शकू, जर प्रमुख पुढाऱ्यांच्या अटकेमुळे लोक अत्याचार करणार नाहीत अशी आपली खात्री पटली तर उद्यासुद्धा कायदेभंग सुरू करता येईल. अनत्याचाराचा असहकारितेशी जो संबंध आहे तोच नम्रतेचा कायदेभंगाशी आहे. कायदेभंग हे असहकारितेचे अत्यंत तीव्र स्वरूप आहे व ते कर नाकारण्यापेक्षाही अधिक आहे. सविनय प्रतिकारक हा स्वतःच कायदा बनतो. सविनय कायदेभंगाच्या गुणाचा वापर करण्यास अत्यंत श्रेष्ठप्रतीचे धैर्य व तारतम्य पाहण्याची शक्ती लागते. कायदेभंग याचा अर्थ राज्याची सत्ता पूर्णपणे नाकारणे असा आहे, आणि तशा नकाराला तेव्हा क्षम्य मानता येईल की, जेव्हा राज्यसत्ता न सुधारण्याइतकी भ्रष्ट झाल्याचे ती स्वतःच सिद्ध करील. मी मूर्ख असेन पण आपल्या सरकारात मला पश्चात्तापाचे कोणतेही लक्षण दिसत नाही, एवढेच नव्हे, पण सरकारने लोकांना अत्याचाराला प्रवृत्त करण्याचा निश्चय केल्याचे आणि नंतर त्यांना डायरशाहीच्या पुनरावृत्तीचे समर्थन करावयाचे आहे असे दिसते पंजाबचे अन्याय दूर करण्याचा तो एकच मार्ग आहे त्याला नकार देणे म्हणजे अमृतसरप्रमाणे लोक वेडे झाले म्हणजे त्यांच्या पातकांचा समाचार निरपराधी व अपराधी लोकांवर सारखाच घेतला जाणे हा होय. आणि अमृतसरच्या एका अधिकाऱ्याच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे सध्याच्या

पिढीच्या पातकाकरिता पुढील पिढ्यांना त्यांची निष्कृती करण्यास भाग पडणे असा होतो.

ब्रिटिशांचे जू बळजबरीने लादले जाणे हे असह्य व अपमानकारक आहे. ज्या राष्ट्राची स्वाभिमानाची जाणीव जागृत झाली आहे त्या राष्ट्राला क्लेशाच्या अग्नीतून जावे लागेल व गेलेच पाहिजे. ह्या राष्ट्राला आपले जू झुगारून देण्याकरिता ज्या यातना भोगाव्या लागतील त्या भोगल्याच पाहिजेत. इंग्लिश लोक हिंदुस्थानात मित्र व बरोबरीच्या नात्यानेच राहू शकतील आणि जर त्यांना नोकरी करावयाची असेल तर ते खरे नोकर झाले पाहिजेत व त्यांनी आपल्या धन्यांच्या इच्छा कटाक्षाने अमलात आणल्या पाहिजेत. हिंदी मजुराचे शोषण होता कामा नये, आणि ब्रिटिश भांडवलवाल्यांना सवलती मिळता कामा नयेत. आमच्यातील जो हलक्यातला हलका असेल त्याला समान भूमिकेवरून स्पर्धा करता आली पाहिजे. त्यांचे संघटनाचातुर्य, त्यांची उद्योगप्रियता, त्यांचे युक्तिकौशल्य हे उघड्या मैदानात प्रभावी ठरले पाहिजे. याबद्दल कोणी हरकत घेणार नाही. पण त्यांच्या बंदुकीची भीती आणि त्यांचा चाबूक हा कायमचा थांबला पाहिजे. पंजाबचा अन्याय दूर करण्यास नकार, मुसलमानांची मते अनुकूल करण्यास नकार याचा अर्थ ते भय संपणार नाही असा होतो. आमच्याकडून आम्ही त्या वृत्तीशी कधीच तडजोड करणार नाही. आम्ही सबल असू किंवा दुर्बल असू, शेवटपर्यंत लढलेच पाहिजे; मग त्यात काय होणार असेल ते होवो. म्हणून कायदेभंग करण्यास जेव्हा एक वाजवी सुरक्षित वातावरण आपण संपादन करून घेऊ त्याच वेळी आपण त्यात उडी घेऊ शकू. दरम्यानच्या काळात लाहोरच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटने जसे मूर्खपणाचे हुकूम काढले आहेत ते आपण पाळू या. आजच्या खुषीच्या कायदेपालनातून, उद्याची हक्काची कायदे मोडण्याची शक्ती आपल्यात येणार आहे.

'यंग इंडिया', १५-६-१९२१

१०६. पुनः श्री. पाल

वृत्तपत्रात पुनः उद्धृत केलेल्या मि. पाल[१] यांच्या "इंग्लिशमनला" पाठविलेल्या पत्राला पूर्ण उत्तर दिले पाहिजे. मि. पाल यांना पुष्कळशा गोष्टींविषयी चुकीची माहिती

१. बिपिनचंद्र पाल यांना उद्देशून हे आहे; पाहा 'टिप्पणे' १-६-१९२१.

मिळाली आहे असे उघड दिसते; आणि म्हणून त्यांना सूचना करण्याचा मोह झाला आहे. पण जर त्यांना अधिक बरोबर माहिती मिळाली असती तर त्यांनी या सूचना केल्या नसत्या.

सरकारी पत्रक, व्हाइसरॉयचे भाषण आणि वृत्तपत्राच्या बातमीदारांनी सिमला भेटीची केलेली काल्पनिक वर्णने, ही त्या भेटीसंबंधी व अलीबंधूसंबंधी ज्या भयंकर गैरसमजुती झाल्या आहेत त्याला जबाबदार आहे.

मी जेव्हा सिमल्याला गेलो तेव्हा मला व्हाइसरॉयसाहेबांना भेटावे लागेल अशी कल्पना नव्हती. मी लॉर्ड रीडिंग यांना भेटावे अशी उत्कंठा पंडित मालवीयजी व मि. ॲन्ड्र्यूज या दोघांनाही होती हे मला ठाऊक होते. पंडित मालवीयजी हे मला माझ्या प्रवासात गाठण्यास फार अशक्त झाले होते, त्यामुळे मी त्यांनाच फक्त भेटण्यास सिमल्याला गेलो. पंडितजींचे म्हणणे ऐकल्यानंतर मी व्हाइसरॉयच्या सेक्रेटरीला पत्र[1] लिहिण्याचे ठरविले. मी पत्रात असे लिहिले की, जर नामदारांना लढ्याबद्दल माझे विचार समजून घ्यावयाचे असतील तर मी त्यांना आनंदाने भेटेन. मी त्यांना जो भेटलो तो त्यांनी अलीबंधूंना पकडण्याचा घेतलेला निर्णय उलटवावा याकरिता भेटलो नाही; पण मी असहकारितावादी का झालो हे व्हाइसरॉयना सांगण्याकरिता भेटलो पहिल्या आणि त्या दीर्घकालीन मुलाखतीत अलीबंधूंवर येऊन ठेपलेल्या खटल्याचा उल्लेखच केला गेला नव्हता. अलीबंधूंचा प्रश्न हा अगदी स्वाभाविकरीत्या आला आणि तो आमच्या अनत्याचाराच्या चर्चेतून उद्भवला. आम्ही तो अनत्याचार आचरणात किती आणतो याचीही चर्चा झाली. जेव्हा व्हाइसरॉयसाहेबांनी त्या भाषणातील काही उतारे मला दाखविले, तेव्हा मला वाटले की त्यांचा अर्थ जसा लावला जात आहे तसा अर्थ लावला जाणे शक्य आहे. म्हणून मी नेक नामदार साहेबांना सांगितले की, माझी व अलीबंधूंची गाठ पडताच मी त्यांना एक स्पष्ट खुलासा करणारे पत्रक काढण्याचा सल्ला देईन. सरकार जो त्यांच्यावर खटला भरणार आहे त्यासंबंधी त्यांनी वाटेल तो निर्णय घ्यावा. सरकारच्या निर्णयाची फेरतपासणी करावी या अटीवर ते पत्रक निघणार नव्हते. त्या पत्रकाच्या आधाराने सरकारने आपला निर्णय बदलला ही गोष्ट स्वाभाविक शहाणपणाची होती. त्यामुळे माझा भार हलका झाला आहे हे मी कबूल करतो. अलीबंधूंच्या अटकेमुळे रक्तपात झाला असता ह्या श्री. पाल यांच्या म्हणण्यावर माझा विश्वास नाही. ते बंधू माझ्याप्रमाणेच जाणून-बुजून राजद्रोहाचा कायदा मोडत आहेत आणि म्हणून आपल्यावर अटक ओढवून घेत आहेत. लवकर असो किंवा उशीरा असो; पण ह्याच वर्षात जर आपण देश आपल्या-बरोबर नेऊ शकलो तर आपण अशीच परिस्थिती निर्माण केली पाहिजे की, एक तर

१. पत्र सापडत नाही.

सरकारने आम्हांला पकडावे किंवा लोकांच्या मागण्या पूर्ण कराव्यात. ज्या मुद्द्याचे समर्थन करता येत नाही, अशा एका खोट्या मुद्द्यावर अलीबंधूंचे पत्रक अटक टाळीत आहे.

म्हणून मी अलीबंधूंचा खटला हा अत्याचाराला उत्तेजन देण्याच्या भूमिकेवरून टाळला जाण्यास उत्सुक होतो तरी कायद्याने प्रस्थापित झालेल्या सरकारविषयी अप्रीती फैलाविण्याकरिता त्यांच्यावर व माझ्यावर जर खटला झाला तर मी त्याचे स्वागत करीन. आम्हांला सर्वांना असे वाटले की जे काय घडत आहे ते ठाऊक असताना पत्रक न काढणे, हे कार्याच्या दृष्टीने चूक आहे व शत्रूच्या हातात जाऊन पडण्यासारखे आहे.

ज्या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत अशा गोष्टीत चर्चा व तडजोड करून समेटाची मी अपेक्षा करीत आहे, हे मि. पाल यांचे म्हणणे बरोबर आहे. जे लोकांचे विश्वासू प्रतिनिधी असतात त्यांना तसे करावेच लागते. लोकांना बाजूला सारून कोणताही समेट माझ्याकडून केला जाईल अशी भीती नाही असे मी आश्वासन मि. पाल यांना देतो. जर कधी काळी समेटाच्या अटींची चर्चा झालीच तर कसलाही विश्वास ठेवला जाणार नाही. जेव्हा दोन अपरिचित लोक मैत्रीच्या संभाषणाकरिता व एकमेकांना जाणून घेण्याकरिता भेटतात तेव्हा परस्परात विश्वास असलाच पाहिजे. आम्ही परस्परांना फक्त जाणून घेण्याकरिताच भेटलो. लोक जर अद्यापपर्यंत समेटाला पुरेसे तयार नसतील तर आमच्या मुलाखतीतून त्यांनी काही समेट लवकर घडून येईल अशी अपेक्षा बाळगू नये. हे सांगून मला वाचकांचे मन निश्चित करावयाचे आहे; आणि व्हाइसरॉयसाहेबांचा प्रयत्न, जो दुराराध्य आहे त्याला संतुष्ट करावे असा दिसतो. त्यांना जुन्याच पद्धतीने नवीन धोरण चालविता येणार नाही. खिलाफत व पंजाबचे व्रण त्यांना चिघळत ठेवता येणार नाहीत व तसे करूनही हिंदुस्थानला संतुष्ट व सुखी करता येणार नाही.

मि. पाल यांचे हे म्हणणे खरे आहे की, जर पंजाब व खिलाफतीचे अन्याय दूर होतील तर मी स्वराज्याची चळवळ इतर पुढाऱ्यांवर सोपवावी. त्याचे साधे कारण असे आहे की, जेव्हा हिंदुस्थान या दोन प्रश्नांबद्दल आपल्या शक्तीची पुरेशी जाणीव करून देईल तेव्हा हिंदुस्थानला स्वराज्य मागताच मिळेल. माझ्या दृष्टीने स्वराज्य हे प्रत्येक अन्याय दूर करण्याची लोकांची जी शक्ती असते, त्याच्यापेक्षा निराळे नाही. ती शक्ती ओडवायरशाही आणि लॉइड जॉर्जशाही यांनाही प्रतिबंधक असते. सर मायकेल ओडवायर यांचा सांप्रदाय दहशतवादाचा आणि लॉईड जॉर्ज यांचा सांप्रदाय विश्वास घाताचा द्योतक आहे. जेव्हा आम्ही ह्या दोन राक्षसांचा समाचार घेऊ तेव्हा आम्ही स्वयंशासनाला तयार झालो आहोत असे सिद्ध होईल हे मला मि. पाल यांना सांगावयाचे आहे. जर बंगालमधील माझे अनुयायी माझ्या व्हॉइसरॉय यांच्याबरोबर झालेल्या मुलाखतीबद्दल संतप्त झाले नसतील तर, त्याचे कारण ह्या दोन अन्यायांचा निकाल लागेपर्यंत मला दुसरा कोणताही समेट मान्य होणार नाही हे त्यांना ठाऊक आहे.

म...१८-१९

तसेच त्यांना हेही ठाऊक आहे की, समेटाच्या कोणत्याही योजनेत हे दोन अडथळे दूर झाल्याशिवाय स्वराज्याच्या योजनांच्या चर्चेची वेळ येणारच नाही. ते अडथळे जर दूर झाले नाहीत तर हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याशिवाय गत्यंतरच नाही. बारिसालच्या परिषदेत जे बंगाली हजर होते त्यांना पाल यांच्या चर्चेचा राग आला. कारण मला वाटते त्यांना ती चर्चा अवेळी आहे असे वाटले असावे; आणि त्या चर्चेमुळे जी स्वराज्याची योग्य वृत्ती वाढावयास पाहिजे आहे तिला अडथळा येणार आहे असे वाटले असावे. मि. पाल यांचा प्रयोग हा भक्कम पाया घातल्याशिवाय शेवटचा मजला बांधणाऱ्या गवंड्यासारखा होता. मी मि. पाल यांना नम्रपणे सांगू इच्छितो की त्यांनी स्वराज्य योजनांच्या चर्चेत देशाला अकाली खेचू नये, आणि त्यांना मी अशी विनंती करतो की त्यांनी माझे पुढील आश्वासन स्वीकारावे. ते आश्वासन असे. माझ्यापुरते सांगावयाचे झाल्यास कोणत्याही स्वराज्याच्या योजनेसंबंधी लोकांच्या प्रतिनिधींबरोबर उघड विचारविनिमय केल्याशिवाय मी एकही गोष्ट करणार नाही. खिलाफत व पंजाबच्या सल्ल्याबद्दल प्रश्नच नाही. कारण कमीत कमी अटी कोणत्या हे जवळ जवळ चांगले समजले आहे.

'यंग इंडिया', १५-६-१९२१

१०७. घाटकोपरचे भाषण

जून १५, १९२१.

घाटकोपरच्या[१] नागरिकांचे आभार मानल्यावर गांधीजींनी चाळीस हजार रुपये स्वीकारले. ते त्यांनी टिळक स्वराज्य फंडाकरिता जमविले होते. गांधीजींनी एका अटीवर हे पैसे स्वीकारले. जर ही त्यांनी जमविलेली रक्कम मुंबईत व्यापार करणाऱ्या बड्या व्यापाऱ्यांच्या आत्यंतिक

१. मुंबईच्या घाटकोपर या उपनगरातील लोकांनी गांधींचे मोठे स्वागत केले. हजर असलेल्या लोकांत पुढील व्यक्ती होत्या. व्ही. जे. पटेल, हकीम अजमलखान, सरोजिनी नायडू, डॉ. एम्. ए. अन्सारी, डॉ. बी. एस्. मुंजे, एन्. सी. केळकर, अलीबंधू, मौलाना अबदुल बारी, मौलाना अबुल कलाम आझाद, जमनालाल बजाज, व शंकरलाल बँकर ही मंडळी मुंबईस ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेकरिता जमली होती. गांधीजींचे भाषण शौकत अलींच्या भाषणानंतर झाले. गांधींच्या भाषणाचा तसाच वृत्तान्त 'दि हिंदू 'मध्ये २०–६–१९२१ रोजी प्रसिद्ध झाला होता.

परिश्रमाने जमली असेल तर गांधी म्हणाले यंदा स्वराज्य बिलकूल मिळणार नाही. जर तुम्ही यत्किंचित त्याग केला असता तर मला समाधान झाले असते. पण तुम्ही तो केला नाहीत. मी माझ्या बंधु–भगिनींना पुन्हा सांगणार आहे की, तुम्ही आपल्या शक्तीनुसार निधीला पैसे द्या. मुंबईचे श्रीमंत हिंदी व्यापारी घाटकोपरमध्ये राहतात हे तुम्ही कबूल केल्यानंतर तुम्ही अगदी लहान रक्कम जमविली; त्यामुळे मी निराश झालो. मी एकटाच या निधीकरिता पैसा जमवीत नाही. व्यासपीठावर अलीबंधू बसले आहेत. ते मला हाताला धरून पुढे खेचतात असे म्हणण्यात आले आहे ते खरे नाही. अलीबंधू आपल्या धर्मावर प्रेम करतात व मी माझ्या धर्मावर प्रेम करतो. ते आपला धर्म सोडणार नाहीत. प्रत्येकाचा स्वतःचा धर्म असतो, आणि तो त्याला काही झाले तरी निष्ठेने पाळावा लागतो. आणखी येथे हकीम अजमलखान हे बडे गृहस्थ आहेत. घाटकोपरला सहज येण्यासारखे ते सामान्य गृहस्थ नाहीत. त्यांची फी फार जबर आहे; व ते अशा भेटीकरिता दररोज एक हजार रुपये आकारतात. पाश्चात्य वैद्यकाच्या पद्धतीत तज्ज्ञ असलेले असे ते डॉक्टर नाहीत. त्यांच्या जवळ काही गुप्त औषधे आहेत व ती फार परिणामकारक आहेत. नंतर येथे डॉ. अन्सारी बसले आहेत. ते पाश्चात्य वैद्यकात फार निष्णात आहेत. त्यांनी लोकांना ठार मारण्याची सनद मिळविली आहे (हशा). कारण जर डॉक्टरनी एखाद्याला मारले तर तो त्याच्याविरुद्ध फिर्याद करू शकत नाही (हशा). नंतर येथे मौलाना अबुल कलाम आझाद हे बडे गृहस्थ बसले आहेत. ते इस्लाम धर्म व कायदा यांचे मोठे अधिकारी मानले जातात. ही सारी मोठी माणसे घाटकोपरला का आली ? तुमच्यापुढे भाषणे करण्याकरिता खास आली नाहीत. कारण सध्याची वेळ भाषणे करण्याची नाही. पण ही वेळ देशाकरिता काम करण्याची– भरीव काम करण्याची आहे.

घाटकोपरच्या लोकांनी मला स्वतःला चाळीस हजार रुपये दिले आहेत. पण तुमचे हकीम व डॉ. अन्सारींसारखे दुसरे जे पाहुणे आहेत त्यांना तुम्ही काय देणार आहात ? येथे शेट जमनालाल बजाज, शंकरलाल आणि इतर कार्यकर्ते आहेत त्यांनाही तुम्ही काही दिले पाहिजे. या देशाची प्रतिष्ठा खरीखुरी अजमाविण्याची हीच वेळ आहे हे तुम्हांला पुरेसे नीट समजले नाही. अशा कठीण प्रसंगी राष्ट्राची प्रतिष्ठा सांभाळण्याची उपेक्षा या देशाचे लोक करतील हे अशक्य आहे. अजूनपर्यंत आम्हांला चाळीस लाख रुपयेही मिळाले नाहीत. आम्ही फक्त वीस लाख रुपयेच जमविले. उरलेले साठ लाख रुपये देणे हे मुंबई

शहराचे कर्तव्य आहे. गांधी म्हणाले, त्यांच्या शक्तीबद्दल मला बिलकूल शंका नाही. मुंबई शहर, काँग्रेसला ही रक्कम देईल असा माझा पूर्ण विश्वास आहे. ह्या शहरातील चार मोठ्या जमातींवर मी विश्वास टाकला आहे. भाटिया, मेमन, मारवाडी व पारशी. पारशी काय देतील याची मला कल्पना नाही व मी त्यांच्यापासून काय अपेक्षा करावी हेही मला ठाऊक नाही. मि. बमनजी आणि मि. घोरखोडू या दोघांनी १,५२,००० रुपये दिले आहेत. म्हणून माझा भरंवसा मारवाडी व भाटिया या जमातींवर आहे. ते प्रत्येक सभेत दिसतात. स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे ते मानीत असतील तर त्याचा ताबा घेण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. यासंबंधी मी तुम्हांला असे सांगतो की, जोपर्यंत खिलाफतीचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटला नाही, तोपर्यंत गोरक्षणाचा प्रश्न समाधानकारक रीतीने तुम्हांला सोडविता येणार नाही.

गांधींना जे मानपत्र देण्यात आले, त्यात असे म्हटले होते की, घाटकोपरला मुंबईचे बडे व्यापारी राहतात. त्या बड्या व्यापाऱ्यांनी मनात आणले असते तर तुम्हांला आम्ही कमीतकमी चाळीस लाख रुपये देऊ असे वचन देऊन गांधींना जावयास सांगितले असते. स्वतःच्या पुढे जे उद्देश तुम्ही ठेवले आहेत, त्यांत तुम्ही इतके निश्चयी असावयास पाहिजे की, कोणत्याही प्रकारच्या त्यागाला आम्ही तयार आहोत. मातृभूमीच्या भाग्यात ही जी कसोटीची वेळ आली आहे, अशा वेळीं मातृभूमीला हाक न देणे हे योग्य नाही. सध्याची वेळ ही मोठ्या रकमा जमा करण्याची आहे आणि अधिक भाषणे करण्याची नाही. गांधीजी म्हणाले, शहरातल्या दुसऱ्या जमातींनी आपले कर्तव्य पार पाडले नाही तरी भाटिया व मारवाडी या दोन मोठ्या जमाती जरूर त्या रकमेची भरपाई करू शकतील. पण त्याकरिता त्यांनी असा निश्चय केला पाहिजे की, आम्ही ब्रिटिशांचे गुलाम राहणार नाही. याकरिताच त्यांनी आपल्या संपत्तीचा त्याग औदार्याने केला पाहिजे. येत्या काही महिन्यांत आपल्याला स्वराज्य स्थापावयाचे आहे व त्याकरिता आपल्याला मोठे त्याग करावयाचे आहेत. तुम्हांला आपल्या भारी परदेशी चैनीच्या वस्तूंचा त्याग करावा लागेल. या शहरात बायकांची सभा भरवावी म्हणून आटियाबेगम गांधींच्याकडे गेल्या. पण त्यांच्याबरोबरच्या स्त्रियांच्या अंगावर भपकेबाज विलायती कपडे होते. गांधी म्हणाले, जर मुंबईच्या स्त्रिया फक्त खादी वापरतील तर मी तुमचा स्वखुषीने गुलाम होईन. सध्याची वेळ भारी किंमतीचे दागिने किंवा उंची कपडे वापरण्याची नाही. या साऱ्या चैनी तुम्ही सोडल्या पाहिजेत. तुम्ही चरख्यावर लक्ष केन्द्रित करा आणि फक्त

खादीच वापरा. असे तुम्ही केले नाहीत तर स्त्रियांच्या सभेला येऊन काय करणार ? आपले कोट्यवधी देशबांधव व देशभगिनी अन्नाच्या अभावी उपाशी मरत आहेत आणि कपड्याच्या अभावी अर्धनग्न आहेत हे तुम्हांला ठाऊक आहे का ? ज्या चैनीच्या वस्तू आपल्याला इतकी बाधा पोचवीत आहेत, त्या वापरण्याला तुमचे मन कसे धजते ? आपले इतके देशबांधव दुःख भोगीत असताना तुम्हांला विलासी जीवन कसे जगता येईल ? खादी वापरणे हे प्रत्येक स्त्रीचे पवित्र कर्तव्य आहे.

ज्या लोकांनी मला घाटकोपरला बोलाविले त्यांना स्वतःचा धर्म नीट समजला पाहिजे. मलाच काय पण अलीबंधूंनादेखील तुम्हांला स्वराज्य देणे शक्य होणार नाही. ते स्वराज्य लोकांनीच घेतले पाहिजे, लोकांनीच जिंकले पाहिजे. तुमच्याकडे येणाऱ्या प्रत्येक काबुली व प्रत्येक ब्रिटिश माणसाला तुम्ही भिऊ लागलात तर तुम्ही स्वराज्य कसे मिळविणार ? हिंदी लोकांनी काबुली किंवा युरोपियन्स यांना का भ्यावे हे निदान मला तरी समजत नाही. ते हिंदी लोकांचे बांधवच आहेत. हिंदी लोक स्वतःचे रक्षण करण्यास पूर्ण समर्थ आहेत; तसेच ते जरूर पडल्यास त्यांच्याशी असहकारिता करण्यासही समर्थ आहेत. हिंदूंनी मुसलमानांना आणि मुसलमानांनी हिंदूंना का भ्यावे ? जर ते देवाला भीत असतील आणि जर ते एकत्र उभे राहिले तर एकमेकांना भिण्यासारखे काय आहे ? हिंदी लोकांत जर आवश्यक ते चैतन्य, सामर्थ्य व शक्ती नसेल तर ते स्वराज्य कसे मिळवणार व कसे राखणार ? पार्लमेंट किंवा कायदेमंडळे यांच्याशी स्वराज्याची गल्लत त्यांनी करू नये. जोपर्यंत हिंदी लोक आपले हक्क राखू शकणार नाहीत तोपर्यंत त्यांना ते हक्क मिळणार नाहीत.

पुष्कळ हिंदू लोकांनी धर्म सोडला असे मला वाटते. मी वैष्णव कुटुंबात वाढलो आणि अहिंसा माझ्या रक्तात आहे. माझ्यामध्ये दया आणि अहिंसा आहे व त्या मी कधीही सोडू शकणार नाही. दलित वर्गाशी माझा संबंध असल्यामुळे वैष्णवांकडून मला पुष्कळ धमकीची पत्रे आली आहेत. मी अंत्यजांच्याबरोबर मित्रत्व जोडल्यामुळे त्यांनी मला असे लिहिले आहे की, महिन्या- दोन महिन्यांत तुमच्यावर काही तरी महान संकट येईल. त्यांना मी असे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, जर वैष्णवांना अस्पृश्यांबद्दल काही करावयाचे नसेल तर ते खरे वैष्णव नसून नास्तिक व पापी लोक आहेत. खऱ्या वैष्णवाचे ते ध्येय नाही. ज्यांना अस्पृश्यांचा उद्धार करावयाचा नसेल त्यांना नास्तिकच म्हटले पाहिजे. वैष्णव धर्मात कोणालाही ठार मारण्याची किंवा इजा करण्याची शिकवण

नाही. त्या धर्मात दुसऱ्या लोकांच्याबद्दल पूर्ण सहानुभूती आणि प्रेम आहे. श्रावकांच्याबद्दल असेच म्हणता येईल. हे लोक मुक्या जनावरांना पोसण्याकरिता अगदी तयार असतात. पण जे दुर्दैवामुळे उपाशी मरतात त्यांना पोसण्यास ते तयार नसतात. या श्रावकांना जनावरांचा अत्यंत कळवळा येतो पण माणसांचा येत नाही. काय ते त्याला धर्म म्हणतात ! जर वैष्णव धर्माने त्यांना आपल्याच बांधवांचा तिरस्कार करण्यास शिकविले असले तर मी त्याला धर्म म्हणणार नसून धर्माची राक्षसी विकृती आहे असे म्हणेन. गांधींनी वैष्णवांना कळकळीने विनंती केली की, तुम्ही अस्पृश्यांचा द्वेष सोडून द्या. मी तुम्हांला धेड किंवा भंग्यांच्या हातचे अन्न घ्या असे सांगत नाही. वर्णाश्रम धर्माचे सार जर कोणते असेल तर ते गरीब, तुडविलेल्या आणि दलित लोकांबद्दल बंधुत्वाची भावना असणे हे होय, याचे तुम्हांला आकलन झाले पाहिजे. आपला पवित्र भागवत ग्रंथ जो आहे, त्यात आपला खरा धर्म काय हे सांगितले आहे. खरा धर्म अस्पृश्यता पाळणे नव्हे. गरिबांच्याबद्दल प्रेम व भावना बाळगणे हे अत्यावश्यक आहे; आणि हे गुण विपुलतेने असल्याशिवाय तुम्ही स्वतःला खरे वैष्णव म्हणवू शकणार नाही. जे रंजलेले आणि गांजलेले आहेत त्यांच्याविषयी प्रेम नसेल तर तो धर्म कसला ? तो निरीश्वरवादी आणि विपर्यस्त असाच धर्म असू शकेल.

चरख्याबद्दल बोलताना महात्मा गांधी म्हणाले, चरख्यामुळे साऱ्या हिंदुस्थानात नवजीवनाचे स्पंदन सुरू झाले आहे. चरखा हे खिलाफतीचे अन्याय दूर करण्याचे एक साधनही आहे. मी तुम्हांला अस्पृश्यांच्या हातचे अन्न खा असे सांगत नाही. तुम्ही तो मुद्दा सोडून द्या आणि तुम्ही घाटकोपरचे लोक स्वराज्याला नेणाऱ्या दुसऱ्या मार्गाचा अवलंब करा. चरखा हे अत्यंत शक्तिशाली साधन आहे. ते साधन खिलाफतीचे व पंजाबचे अन्याय दूर करील आणि तुम्हांला त्याच वेळी स्वराज्य देईल. गांधींनी घाटकोपरच्या नागरिकांना आपले लक्ष काँग्रेस कार्यक्रमावर केंद्रित करण्यास सांगितले. तो कार्यक्रम सर्वांना ठाऊक आहे. त्यांनी ईश्वराची अशी प्रार्थना केली की, त्यांनी त्यांना देशाविषयीचे आपले कर्तव्य करण्यास भरपूर शक्ती द्यावी आणि योग्य मार्गाने स्वराज्याचे ध्येय गाठण्यास त्यांना समर्थ करावे (प्रचंड टाळ्या).

नंतर गांधींनी स्त्रीपुरुषांच्या समुदायाला टिळक स्वराज्य फंडाकरिता स्वयंसेवकांच्या जवळ पैसे देण्यास सांगितले. पण हे दान तुम्ही श्रद्धेने करा असे ते म्हणाले. देशाला काहीही नाखुषीने देऊ नका. ज्या

श्रावकांनी आणि वैष्णवांनी निधीला पैसे दिले असतील त्यांना ते परतही घेता येतील. कारण मला नाखुषीने दिलेली देणगी नको आहे, असे गांधी म्हणाले. गांधींना श्रद्धेने दिलेला पैसा हवा होता. ज्यांना पैसा परत घ्यावयाचा असेल त्यांना ती मोकळीक होती.

'मुंबई क्रॉनिकल,' १६-६-१९२१

१०८. मणिबहेन पटेलला पत्र

मुंबई.
गुरुवार [जून १६-१९२१][1]

चि. मणि,[2]

तुझे पत्र पोहोचले. तुझे पत्र येण्यापूर्वीच मी विठ्ठलभाई[3] काकांना आपण भेटले पाहिजे असे सांगितले. ते पुण्याला चालले आहेत. आपण खात्रीने भेटू. काय घडेल त्याबद्दल मी तुला मागाहून लिहिन. मुंबईत चाललेल्या कोणत्या गोष्टी भ्रष्ट आहेत असे तुला वाटले ते कळव. त्रास होतो आहे, असे वाटून घेऊ नकोस. काकाबरोबर मी पूर्ण आणि स्पष्ट बोलणी करणार आहे.

तुम्ही दोघा बहीणभावांनी[4] राष्ट्रीय कामात पूर्णपणे गढून जावे. याचा अर्थ असा की, तुम्ही कताई व तुणाईमध्ये इतके तज्ज्ञ व्हावे की, तुमच्यापेक्षा कोणी वरचढ होऊ नये. दुसऱ्या आपल्या साऱ्या चळवळी तात्पुरत्या आहेत. यावर विश्वास ठेव. पण ही चळवळ कायम टिकवावयाची आहे. त्यातून आपल्याला सारी शक्ती मिळेल.

१. ही तारीख १५ जून रोजी घाटकोपर येथे गांधींना जी थैली दिली, तिच्या तारखेवरून अनुमानाने काढली आहे.

२. वल्लभभाई पटेल यांची मुलगी.

३. विठ्ठलभाई जे. पटेल (१८७३-१९३३); सरदार वल्लभभाई पटेल यांचे थोरले बंधु; व मोठे धूर्त घटनात्मक लढवय्ये; मुंबई कायदे कौन्सिलचे सभासद आणि नंतर इंपीरियल कायदे मंडळाचे सभासद. ते दिल्लीच्या मध्यवर्ती कायदे मंडळाचे निवडलेले पहिले अध्यक्ष.

४. डाह्याभाई पटेल.

भाई महादेव काल मुंबईस पोहोचला. त्यांनी मोठी रक्कम जमविली आहे असे म्हटले पाहिजे.

येथे चांगला पाऊस पडत आहे. काल घाटकोपरला ५५,००० रुपये आम्हांला मिळाले.

मी लिहो वा न लिहो, तू मात्र सतत लिहीत जा.

बापूचे आशीर्वाद

मणिबेन
द्वारा, श्री. वल्लभभाई पटेल
भद्र अहमदाबाद,
[गुजरातीवरून]

बापूना पत्रो- मणिबेन पटेलने.

१०९. सी. आर्. दास यांना तार

साबरमती
[१७ जून १९२१ रोजी किंवा नंतर][1]

मोतीलालजींना तार पाठवितो

फोटोस्टॅटवरून एस्. एन्. ७५७३.

१. १७ जून १९२१ रोजी सी. आर्. दास यांनी पाठविलेल्या तारेला हे उत्तर आहे. त्या तारेतला मजकूर, " पूर्व बंगालमधील मजुरांच्या परिस्थितीमुळे १५ जुलैपूर्वी बंगालचे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीवरील प्रतिनिधी निवडणे अशक्य आहे. काँग्रेस घटनेतील १९ व्या कलमाप्रमाणे जर आणखी मंजुरी आवश्यक असेल तर वर्किंग कमिटीचा सभासद म्हणून तशी व्यवस्था करीत आहे. ती मंजुरी पत्राने मिळवा, किंवा दुसऱ्या रीतीने मिळवा. स्वराज्य फंड सुमारे तीन लाख. कलकत्त्याला नक्की आकड्याबद्दल तार करीत आहे. मद्रासपूरला तार पाठवा. कृपया मोतीलाल नेहरूंना कळवा. " रेल्वे व जहाजांवरील कामगारांचे संप चालले होते आणि पूर्व बंगालमध्ये बरीच अशांतता होती सी. एफ. ॲन्ड्रूयुजच्या विनंतीवरून गांधी तेथे गेले.

११०. असहकारितेवर भाषण, मुंबई[1]

जून १८, १९२१

महात्मा गांधी म्हणाले, पारशी व हिंदू जमातींत नेहमीच मोठी मैत्री दिसून आली आहे. पारशांनी मानलेल्या आपल्या देशाकरिता प्रेम व मैत्री दाखविलेली आहे. व्यक्तिशः मी बालपणापासून पारशांच्याबरोबर राहात आलो आहे, आणि सर्व जन्मभर माझा त्यांचा दाट संबंध आहे. मी त्यांच्या गुणांचा चाहता आहे. पारशी जमातीची खुशामत करण्याकरिता मी येथे आलो नाही, हे एकदमच सांगून टाकतो. माझ्या खोल अंतःकरणाला जे सत्य वाटते, तेच मी सांगत आहे. त्यांच्या दोषांवर जरूर पडल्यास टीका करण्यास मी माघार घेणार नाही. मला पारशांच्याबद्दल अत्यंत प्रेम आणि आदर आहे. मी माझ्या सर्व चळवळींत त्यांच्या सान्निध्यात आलो आहे. जगात अशी कोणतीही लहान जमात नसेल की जिने आपल्या धर्मादायात व धर्मात इतके यश मिळविले असेल. हिंदू आणि पारशी धर्मात फारसा फरक नाही. कारण दोन्हीही सत्याला पहिले व अत्युच्च स्थान देतात. सध्या जी चळवळ चालू आहे, त्या चळवळीत जोपर्यंत त्यांचे अंतःकरण भाग घेण्यास सांगत नाही, तोपर्यंत ते बाजूला राहिले तरी ते योग्य आहे, असे मी कबूल करतो. जर थोडेसे पारशी आपल्या मनाची तयारी करून आणि या कार्याच्या रास्तपणाची खात्री पटवून घेऊन जर या चळवळीत आले तर माझे पुरेसे समाधान होईल. म्हणून मी पारशांना अशी विनंती करतो की, खऱ्या परिस्थितीचा विचार करा, मनाची तयारी करा, व चळवळीत या. पारशांच्यात जितका विश्वासाचा अभाव आहे तितकाच हिंदू व मुसलमानांच्यात होता. म्हणून मला अशी प्रार्थना करावयाची आहे की, साऱ्या परिस्थितीचा चोहो बाजूंनी विचार करावा आणि नंतर लढ्यात भाग घ्यावा. जेव्हा काठेवाडच्या पोलिटिकल एजंटाबरोबर माझा तंटा झाला व मला त्याच्याविरुद्ध कारवाई करावयाची होती तेव्हा सर फेरोजशहा मेहता या पारशी गृहस्थाने मला असे

१. पारशी मध्यवर्ती संस्थेच्या मंडळापुढे गांधींनी शनिवारी दुपारी भाषण केले. होर्मसजी एडनवाला अध्यक्षस्थानी होते.

सांगितले की, अशा बाबतीत न्यायाची अपेक्षा करणे व्यर्थ आहे.[१] मी पारशांकडून हाच पहिलाच धडा शिकलो, आणि त्या वेळेपासून इतकी अप्रतिष्ठा माझ्या आयुष्यात सहन केली आहे की, त्याची हकिकत या सभेत सांगण्याने काही उपयोग होणार नाही.

असहकारितेची चळवळ ही आध्यात्मिक चळवळ आहे. तुमच्या आयुष्यात ही आध्यात्मिक अवस्था आहे. साऱ्या धर्मांनी असे शिकविले आहे की, आपण पापापासून दूर पळावे व त्यापासून दूर राहावे. मी डायरबरोबर जुळते घेण्यास तयार होतो. पण डायरशाहीसाठी नाही. ब्रिटिश अंमलामध्ये पुष्कळशा हिंदी व पारशी लोकांचे फायदे झाले आहेत, व ते लक्षाधीश झाले आहेत आणि सर्व विलास भोगत आहेत, हे मी कबूल करतो; पण तो अंमल सर्वसामान्य जनतेला उपकारक ठरला नाही. ब्रिटिशांचा संबंध हा जनतेला उपकारक[२] ठरला नाही, आणि त्याचा उत्तम पुरावा दादाभाई नौरोजींच्या लेखात आणि गोखल्यांच्या पुराव्यात सापडतो. मणिपूर प्रकरणाच्या चर्चेत सर जॉन गॉर्स्ट असे म्हणाले की, ब्रिटिश सरकारचे धोरण सर्व उंच पॉपीज कापून टाकणे हे आहे. दुर्दैवाने आता-पर्यंत माझे डोळे उघडले नव्हते. माझे म्हणणे असे: ब्रिटिश अमलात काही जणांचे फायदे झाले असतील, पण आम जनता व बहुसंख्य लोक यांचा बिल्कूल फायदा झाला नाही. मग त्या गोष्टीचा तुम्ही कोणत्याही दृष्टिकोणातून विचार करा. आर्थिक, किंवा नैतिक, किंवा भौतिक दृष्टीने विचार केल्यास हेच दिसून येईल. हिंदुस्थान आज जितक्या निकृष्टा-वस्थेत आहे तितका पूर्वी कधीही नव्हता. हिंदू, पारशी व मेमन मला खाजगीरीत्या सांगत आहेत की, आम्ही या चळवळीला गुप्त रीतीने मदत करू, पण उघडपणे करणार नाही. त्याचे कारण ते म्हणतात, आमचे हित-संबंध गुंतलेले आहेत व आम्ही व्यापारात व इतर व्यवसायात पडलेले आहोत.

मोगलांच्या अमलात छळ व जुलूमजबरदस्ती होती हे कबूल करण्यात मला यत्किंचितही संकोच वाटत नाही. पण हिंदी लोकांचा आजच्याइतका अधःपात कधीच झाला नव्हता. कौन्सिले वगैरेंची वाढ झाल्यापासून आमची राजकीय परिस्थिती फारशी सुधारली आहे हे मी

१. गांधींनी आपला भाऊ लक्ष्मीदास याच्यासंबंधी एका बाबतीत एजंटांनी मध्यस्थी करावी असा प्रयत्न केला व त्यांना एजंटांच्या खोलीतून बाहेर हाकलण्यात आले. पाहा, आत्मवृत्त भाग २, प्रकरण ४.

२. त्यांत पॉव्हर्टी व अन् ब्रिटिश रूल इन इंडिया याचा समावेश आहे.

कबूल करीत नाही. सुधारणांमुळे हिंदी लोकांना काही हक्क मिळाले आहेत हे मला मान्य नाही. जर कोणी याविरुद्ध माझी खात्री पटविली तर मी नेमस्तांना लिहिलेले पत्र मागे घेईन. जर सुधारणा खऱ्या व शक्तिशाली असत्या तर ब्रिटिश सरकार लोकांसंबंधी कोणतीही बेकायदा गोष्ट करू शकले नसते. पण तशी वस्तुस्थिती नाही. परवाच मला एका गृहस्थाचे पत्र आले आहे. त्यात तो म्हणतो की, माझ्यावर पोलिस लाइनला आग लावल्याचा आरोप लादला आहे व या बाबतीत मी पूर्ण निर्दोषी आहे. अशाच गोष्टी हिंदुस्थानातसुद्धा घडत आहेत. लाला हरकिसनलाल[1] इतका पंजाबात दुसरा नेमस्त मनुष्य नव्हता. ते राजकीय चळवळीपासून अलिप्त राहात. पण त्यांना लष्करी कायद्याच्या दिवसांत पकडले आणि शिक्षा केली तीच हकिकत लाला दुनीचंद आणि इतरांची होती. आतासुद्धा ज्या बिहार प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड सिंह आहेत, त्या प्रांताइतकी दडपशाही साऱ्या हिंदुस्थानात कोठेही नाही. लॉर्ड सिंह हे अशा गोष्टी सहन करणारे गृहस्थ नाहीत, पण ते आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना आवरू शकत नाहीत. कारण ते हिंदी आहेत आणि अधिकारी इंग्लिश आहेत. सर एडवर्ड गेट[2] हे जर सिंहांच्या जागी असते तर जसे ते त्यांना फैलावर घेऊ शकले असते तसे हे घेऊ शकत नाहीत. लॉर्ड सिंह यांनी जरी आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांना आवरण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना त्यात यश येणार नाही ही माझी खात्री आहे. त्या प्रांतात मझरूल हकसारखे मोठे पुढारी आहेत. मि. ॲन्ड्रूज हे गुरख्यांच्या छळा-बद्दल बनावट गोष्टी लिहिणारे गृहस्थ नाहीत. पण त्यांनी या मजुरांचे चांदपूर येथे काय केले, हे आम्हांला पूर्णपणे ठाऊक आहे. तथापि सरकारने लोकांना कळविले की, लष्करी शिपायांनी जरूर तितकेच बळ वापरले. जास्त नाही किंवा कमी नाही. जनरल डायर असेच म्हणत असे. गांधी म्हणाले की, माझे अंतःकरण जी गोष्ट खरी आहे असे सांगत आहे, तेच मी तुम्हांला सांगत आहे; दुसरे काही सांगत नाही. जेव्हा अली-बंधूंनी चूक केली तेव्हा त्यांचे लक्ष त्या गोष्टीकडे वळविले आणि त्यांनी आपण कसे आहोत हे बिनचूकपणे दाखविले.

असहकारिता चळवळीच्या यशाबद्दल गांधी म्हणाले, ती चळवळ लोकांच्या अपेक्षेपेक्षा फारच यशस्वी झाली. ते म्हणाले, त्या चळवळीने लोकांच्या मनांतून अधिकाऱ्यांची, क्लेशाची, त्यागाची आणि देशाकरिता

१. पाहा, खंड १५, प्रकरण ४१७.

२. बिहार ओरिसाचे हे १९१७ मध्ये चंपारण सत्याग्रहाच्या वेळी ले. गव्हर्नर होते.

काम करण्याची वाटत असलेली भीती घालवून टाकली. लोक देशाकरिता कोणतेही काम करावयास तयार आहेत. जरी पारशी ही लहान जमात असली तरी त्या जमातीत दादाभाई व मेहता निर्माण झाले आहेत व त्यांनी देशाची महान सेवा केली आहे. श्रद्धा, औदार्य आणि त्याग या गुणांमुळे पारशी हिंदुस्थानची अमोल सेवा करू शकले. मेहतांना मुंबईचे सिंह म्हणत; आणि पारशांनी अशा रीतीने सेवा करावी की, जीमुळे त्यांना हिंदुस्थानचे सिंह म्हटले जाईल. ते उदार लोक आहेत. त्यांना बुद्धिमत्ता आहे व त्यांच्याजवळ पैसा आहे. पारशांत मोठे व्यापारी आहेत व देशाकरिता स्वार्थत्याग करण्यास तयार आहेत. जर तुम्ही अवश्य तो त्याग करून हिंदुस्थानची सेवा केलीत तर तुम्ही हिंदुस्थानचे सहज पुढारी व्हाल असे गांधी त्यांना म्हणाले. पारशांच्याकडून माझ्या मोठ्या अपेक्षा आहेत असे गांधींनी सांगितले.

मि. एच्. पी. मोदी यांच्या प्रश्नाला उत्तर देताना गांधी म्हणाले, आपल्यापुढे स्वराज्य मिळविण्यास कामाकरिता तीनच महिने आहेत. मला स्वराज्य मिळण्याची खात्री वाटते व वाटतही नाही. ती खात्री न वाटण्याचे कारण देशापुढे ठेवलेला बेझवाडा कार्यक्रम आपण अद्याप पुरा केला नाही. पण माझी देवावर मोठी श्रद्धा आहे, आणि म्हणून मला हिंदुस्थानला स्वराज्य मिळण्याची खात्री वाटते. असहकारिता लोकांची सारी मनोवृत्ती बदलविणारी चळवळ आहे. दुर्दैवाने जनतेने अद्याप बेझवाडा कार्यक्रम पूर्ण केला नाही. आणि म्हणून कधी कधी माझ्या मनात सप्टेंबर[1] महिन्यात स्वराज्य मिळण्यासंबंधी शंकांचे काहूर उठते.

चरख्याच्या उपयुक्ततेबद्दल बोलताना गांधी म्हणाले, माझा चरख्यावर फार विश्वास आहे; आणि देशाकरिता फार मोठ्या गोष्टी करण्याची शक्ती त्यात आहे असे मला वाटते. अन्नाच्या खालोखाल लोकांना वस्त्रे पुरविण्याचा प्रश्न आहे. आपण आता त्यांना जपान, इंग्लंड आणि इतर देशांच्या मदतीशिवाय वस्त्रे पुरवू शकत नाही. हिंदुस्थानने परक्या देशांची मदत घेतल्याशिवाय कपड्यांची गरज स्वतः भागवावी अशी आपली इच्छा असल्याचे गांधी म्हणाले. जरी गिरण्यांनी एक औंस किंवा एक वार कापड निर्यात केले नाही तरीही लोकांना आपण कापड पुरवू शकणार नाही. या देशात सुमारे तीन कोटी लोक असे आहेत की,

१. १९२० च्या सप्टेंबरमध्ये गांधींना स्वराज्य मिळण्याची आशा वाटत होती. पाहा, खंड १८, प्रकरण १५५.

ज्यांना पुरेसे अन्न किंवा वस्त्र मिळत नाही, हे मी माझ्या या देशातील स्वतःच्या अनुभवावरून सांगतो. ओरिसा व इतर प्रांतांत मी स्वतः पाहिले आहे की, तेथील लोक अर्धनग्न व उपाशी असतात. त्यावरून हे मी सांगत आहे. श्रीमंत लोक मला असे सांगतील की, तेथे आपण सदावर्ते उघडावीत. पण माझा अशा संस्थांवर विश्वास नाही हे मी सांगू इच्छितो. प्रत्येक मनुष्य स्वतंत्र असावा, स्वतःच्या श्रमावर अवलंबिणारा असावा. असे मला व्हावयास पाहिजे आहे. मी भंगी म्हणून काम केले असल्यामुळे मला ह्या गोष्टीतील काहीसे ठाऊक आहे. आणि मला हेही ठाऊक आहे की, रोजगारीत लहानशी भर पडली म्हणजे काय होते. अमृतलाल ठक्कर यांनी काठेवाडमधील लोकांना कताईची किंमत किती वाटते यासंबंधी एक मोठा मनोवेधक लेख 'सर्व्हंट ऑफ इंडिया' पत्रात लिहिला आहे.

त्यांनी काठेवाडातील खेडयांच्यात चरखा सुरू केला आणि तो लोकांचे अत्यंत हित करण्यास समर्थ ठरला. हिंदुस्थानच्या चमत्कारिक हवेत वापरण्याकरिता सुंदर खादीची जरूरी आहे. आणि मी तुम्हांला तिचा सर्वत्र उपयोग करा अशी विनंती करतो. जेव्हा हिंदी लोक देशभर चरख्याचा उपयोग करू लागतील तेव्हा ते पूर्णपणे स्वतंत्र, निर्भय व स्वावलंबी होतील. हिंदी लोकांच्या दारिद्र्यामुळे पुष्कळ स्त्रियांना दगड फोडण्याचे काम करावे लागते; आणि माझ्या अनुभवाप्रमाणे गरीब स्त्रियांचे पावित्र्य आणि विनय हा नष्ट झालेला आहे. पण चरख्याच्या उपयोगामुळे त्यांना घरी बसून उपजीविकेकरिता पैसे मिळविता येतील. म्हणून मी चरख्यात स्वातंत्र्य आणि पावित्र्य हे दोन्ही आहेत असे म्हणतो.

सरकारी आकडयाप्रमाणे हिंदी माणसाचे दरमहा सरासरी उत्पन्न रु. २ रु. ४ आणे आहे. त्यातून लक्षाधीशांचे उत्पन्न वजा केले पाहिजे. ते वजा केल्यावर दरमहा दर माणशी ते उत्पन्न सुमारे २ रुपये होते. अशा सरासरी उत्पन्नावर माणसाला कसे जगता येईल? म्हणून कुटुंबाच्या रोजात किंवा उत्पन्नात थोडीशी भर पडली तर ती चांगली व आपत्ती निवारण करणारी आहे.

शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी बोलताना गांधी म्हणाले, हिंदुस्थानात सक्तीचे शिक्षण अवाढव्य खर्चामुळे देणे जवळ जवळ अशक्य आहे. पण जर चरख्याचा उपयोग केला तर लोकांना आपली मुले शिकविता येतील. चरखा हे अशा प्रकारे आर्थिक पुनरुज्जीवन, संपत्ती आणि स्वातंत्र्य यांचे साधन आहे. वास्तविक आपली मुक्ती चरख्याच्या उपयोगात

आहे. एक कोटी रुपयांच्या प्रश्नासंबंधी गांधी म्हणाले, अजून आम्ही एक कोटी रुपये जमविले नाहीत हे खरे आहे. पण मला ती आशा आहे. हातांनी केलेल्या वस्तूंकडे पुन्हा वळून गांधी म्हणाले, ज्या इंग्लंडमध्ये चोहोकडे यंत्रे वापरली जातात, तेथेसुद्धा हाताने केलेल्या वस्तू यंत्राने केलेल्या वस्तूंपेक्षा जास्त चांगल्या व श्रेष्ठ मानल्या जातात. नवसारीमध्ये पारशी लोक असाच विचार करतात. आणि हिंदी लोकांनी आपल्या हातांनी केलेल्या वस्तूंना श्रेष्ठ मानावे. इंग्लंडमध्ये त्या लोकांना अशा वस्तू आवडतात. कारण त्या चांगल्या असतात असे त्यांना वाटते; आणि हिंदी लोकांनी तसा विचार का करू नये हे आपल्याला समजत नसल्याचे गांधी म्हणाले. पारशांनी किंवा मेमन्सनी मला फारसे पैसे दिले नाहीत. आपला मित्र पारशी रुस्तमजी यांनी मला मोठ्या रकमा दिल्या आहेत आणि माझा त्यांच्यावर इतका विश्वास आहे की, जर मी तशी इच्छा प्रकट केली तर रुस्तमजी आपली सारी मालमत्ता मला देऊन टाकतील. जमा केलेले पैसे हे अत्यंत चांगल्या आणि प्रामाणिकपणे उपयोगात आणले जातील याबद्दल सभेने खात्री बाळगावी असे गांधी म्हणाले. कारण अशा कामाकरिता मोतीलाल नेहरू, जमनालाल बजाज, शंकरलाल बॅन्कर, उमर सोभानी आणि छोटानी यांच्यापेक्षा अधिक चांगली माणसे कोठे मिळतील ?

> गांधींना एक पारशी गृहस्थ म्हणाला : मला खादीवरच आपली शक्ती आपण का खर्च करावी व रेशीम आणि इतर वस्तूंवर का खर्चू नये, हे जाणून घ्यावयाचे आहे. तो गृहस्थ म्हणाला, मी जपानमध्ये असताना झोपडीत राहणारे लोक लहान लहान वस्तू तयार करीत व त्यावर चांगली उपजीविका करीत. ते हातमागावर अत्यंत तलम रेशीम काढीत. आपल्याकडे आपल्या लोकांना सोसायटीज व समित्या प्रत्येक गावी स्थापन करून एकत्र आणता येणे शक्य नाही काय ? व संस्थांनी नुकसानभरपाई करणे व अशा रीतीने नव्याने उदयास येणाऱ्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे शक्य नाही काय ?

गांधी म्हणाले, जपान हे लहान बेट आहे व हिंदुस्थान मोठे खंड आहे. आपल्याला हिंदुस्थानातील तीस कोटी लोकांचा प्रश्न सोडवावयाचा आहे आणि म्हणून ज्या सर्वसामान्य वस्तू सर्वत्र वापरल्या जातात त्या तयार करणे शक्य आहे. हिंदुस्थानात लोक सूतकताईला सरावलेले आहेत व त्यांना घरच्या घरी खादी तयार करता येईल. गांधी म्हणाले, अनंत काळपर्यंत खादीच वापरली पाहिजे असे मी प्रतिपादन करीत नाही.

ज्या मलमलीकरिता डाक्का प्रसिद्ध आहे, ती व तलम रेशीम येथे तयार करण्याची मला आशा आहे. सध्या दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, आपल्याला तलम कापड करण्याकरिता बारीक सूत आणावे लागते. बारीक सूत तयार करण्यास आपण समर्थ होण्याला फक्त काही काळ लागेल आणि तोपर्यंत आपण खादीवर संतुष्ट असले पाहिजे.

श्री. विमदलाल आणि दुमासिया यांनी गांधींना विचारले, तुम्हांला कसले स्वराज्य पाहिजे व त्या स्वराज्यात सध्याच्या राज्यकर्त्यांना त्यात स्थान राहील का नाही ?

गांधी म्हणाले, मला सैन्य, पोलिस, कायदा व वसुली यांवर जनतेचा पूर्ण ताबा पाहिजे; आणि जनतेला आपला स्वतःचा पैसा खर्च करण्यास पूर्ण मोकळीक पाहिजे. सध्या आपल्याला सरसेनापती नेमता येत नाही; किंवा एकाही शिपायाला हिंदुस्थानबाहेर पाठविण्यास बंदी करता येत नाही. मी मतासारख्या गोष्टींची येथे चर्चा करीत नाही. जर लोकांना या गोष्टीवर आता नियंत्रण ठेवता आले तर हिंदी लोक हळूहळू पुढे सरकू शकतील. जर जरूर असलेले कापड आपण तयार करू शकलो तर हिंदुस्थान स्वावलंबी देश होईल. पण सध्या आपण दुसऱ्यावर अवलंबून आहोत. जोपर्यंत आपल्याला सरकारकडून मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल आभार मानावे लागतात, तोपर्यंत आपण फारसे कमाऊ शकणार नाही. आपण अशी परिस्थिती प्राप्त करून घेतली पाहिजे की, दुसऱ्या लोकांच्या मदतीशिवाय आपल्याला साऱ्या गोष्टी प्राप्त करून घेता येतील. असहकारितेच्या चळवळीमुळे लोकांच्या मनोवृत्तीत फार मोठा बदल झाला आहे. उदाहरणार्थ, मलबारमधील जे मोपले फार शूर होते ते या चळवळीच्या प्रभावामुळे शिस्तबद्ध झाले आहेत.

दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना गांधी म्हणाले, वसाहतीच्या स्वराज्यावर मी संतुष्ट होईन. व्हाइसरॉयचे मत असे आहे की, आम्हांला ते हळूहळू मिळावे. पण माझ्या मताने ते ताबडतोब मिळाले पाहिजे. आम्ही अद्याप स्वतःचे राज्य चालविण्यास लायक नाही असे जे म्हणतात, त्यांना मी सांगेन, त्याचे कारण आम्हांला आमच्या न्याय्य हक्कापासून दूर ठेवण्यात आले होते. गांधी म्हणाले, हिंदी लोक स्वराज्य चालविण्यास लायक नाहीत असे मी कबूल करीत नाही. आमचे मंत्री हिंदी असोत किंवा इंग्लिश लोक असोत मला त्याची चिंता नाही. मला त्यांची नेमणूक व बडतर्फी केव्हाही करता येईल अशी सत्ता हवी आहे. एखाद्या माणसाच्या रंगाकरिता मी त्याला बडतर्फ करणार नाही; पण त्याच्या

नालायकीकरिता करीन. मंत्र्यांना कमिशनर व कलेक्टर्सवर सत्ता मिळाली पाहिजे. लष्करी खाते चालविण्यास हिंदी लोक नालायक आहेत असे मी कधीच म्हटले नाही.

एक गृहस्थ म्हणाले, तुम्ही हिंदू-मुस्लिम ऐक्यासंबंधी बोलत आहात. पण त्यात पारशी कोठे येतात हे मला कळत नाही. हिंदू व मुसलमान आपापली माणसे नेमतील व पारशांचा पत्ताच असणार नाही.

मि. एन्. एम्. दुमासिया म्हणाले की, श्री. कृष्णगुप्तांनी आम्हांला असे सांगितले आहे की, जोपर्यंत आपण स्वतःचे रक्षण करू शकत नाही तोपर्यंत स्वराज्य मिळण्यात काही अर्थ नाही. पहिल्यांदा आपण परक्या सरकारविरुद्ध स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ असले पाहिजे.

एच्. पी. मोदी म्हणाले की, आम्ही इतकी वर्षे कारकुनी करीत आहोत व आम्हांला लष्करी कामाचा आणि परराष्ट्रीय संबंधाचा परामर्ष घेण्याचा सराव नाही. आम्ही ब्रिटिश नियंत्रणाखाली या गोष्टी चालवीत आहोत आणि म्हणून हिंदी लोकांना स्वतंत्रपणे त्या गोष्टी करण्याची सवय नाही.

गांधी म्हणाले की, माझ्या मताने इंग्लिश लोक अद्याप हिंदुस्थान सोडावयास तयार नाहीत. पण त्यांनी त्यांच्या अटीवर नव्हे पण आमच्या अटींवर हिंदुस्थानात राहिले पाहिजे. इंग्लिश लोक आताच हिंदुस्थान सोडावयास शरमतील. दुसरी गोष्ट अशी की, जर आपल्याला उद्या स्वराज्य मिळाले तर एकदम सर्व परकीय सरकारशी आम्हांला लढावे लागेल, असे मला वाटत नाही. आणि जरी एखाद्या परक्या सरकारबरोबर लढावे लागले तर जय मिळेपर्यंत हिंदी लोक लढत राहतील. तुम्हांला हे समजले पाहिजे की, हिंदी लोक आपल्याच शक्तीने आपले ध्येय गाठू शकतील. त्यांना ते ध्येय दुसऱ्यांच्या मदतीने किंवा हिकमतीने किंवा डावपेचाने गाठता येणार नाही. तुम्ही आपल्या शक्तीने आपले हक्क राखू शकलात तरच ते हक्क शाबूत ठेवाल. याकरिता संसद किंवा विधानसभांचा उपयोग होणार नाही.

दुमासिया म्हणाले, लहान राष्ट्रे मोठ्या राष्ट्रांकडून जिंकली जातात असा नियमच आहे. या जगात कोणतीही महत्त्वाची गोष्ट युद्ध किंवा लढाईशिवाय झाली नाही. राष्ट्रात योग्य वृत्ती येण्यास

पुष्कळ वर्षे लागतील आणि राष्ट्राच्या जीवनात वर्षेही तितक्या क्षणासारखी असतात. म्हणून आम्हांला सावकाश प्रगती करा असे सांगण्यात आले आहे. इतरांप्रमाणे पारशी लोक डायरशाही व ओडवायरशाहीचा तिरस्कार करतात. पारशी जमात ही नेहमी आपल्या राज्यकर्त्यांना एकनिष्ठ राहिली आहे. मग ते हिंदू असोत वा इंग्लिश असोत. आम्ही इंग्लिशांना बाडबिस्तान्यासह येथून निघून जा असे सांगावयास तयार नाही आणि ज्या साम्राज्यावर जॉर्ज बादशहाचे राज्य आहे त्यातून आम्हांला बाहेर पडावयाचे नाही. ज्या चळवळीत या गोष्टी वगळलेल्या नसतील त्या चळवळीला आमचा पूर्ण पाठिंबा मिळेल. जर गांधी सनदशीर मार्गाने पुढे जाऊ इच्छित असतील तरच आम्ही त्यांच्याबरोबर राहू, अन्यथा नाही. आम्ही आमच्या राजाकरिता व देशाकरिता त्याग करावयास व सर्व काही करावयास तयार आहोत.

आणखी काही प्रश्नांना उत्तरे देताना गांधी म्हणाले, माझी चळवळ ही बोल्शेविझमविरुद्ध तटबंदीसारखी आहे. हिंदी लोकांना या देशात गोंधळ व दहशत नको आहे. असहकारितेच्या चळवळीमुळे लोकांची मने पुष्कळ शुद्ध झाली आहेत. उदाहरणार्थ, सिंध हैद्राबाद आणि खेडा या ठिकाणचे लोक नैतिकदृष्ट्या पुष्कळ सुधारले आहेत. या चळवळीने द्वेष घालविला आहे. जर दुसऱ्या जातींबद्दलचा द्वेष वाढला असता तर मी या असहकारितेच्या चळवळीपासून अलिप्त राहिलो असतो.

डॉ. एन्. एम्. सुखिया म्हणाले, माझ्या अनुभवावरून मला असेही दिसले की, ग्रामीण भागात हिंदू व मुसलमानांनी पारशांना दडपूनच टाकले आहे. मी हीच गोष्ट १८८६ साली मालेगावात पाहिली. या चळवळीपासून आपला फायदा होईल असे दिसले तरच ते ह्या चळवळीत सामील होतील, अन्यथा नाही.

गांधी म्हणाले, ब्रिटिश लोक हिंदुस्थानात येऊन फक्त दीडशे वर्षे झाली. त्यापूर्वी पारशी हे मुसलमान व हिंदूंच्या बरोबर राहात होते. तुम्ही अधिक चांगले होता का अधिक वाईट होता हे तुमचे तुम्हीच ठरवू शकता. आम्ही हिंदू-मुस्लिम ऐक्याविषयी बोलत आहो. कारण पूर्वी ते ऐक्य नव्हते आणि त्या ऐक्यात साऱ्या लहान जमातींचे ऐक्य अंतर्भूत होते. उदाहरणार्थ, ज्यू, खिश्चन व पारशी वगैरे. या ऐक्याचा अर्थ असा नाही की, इतर जमातींना त्यांच्या मैत्रीपासून वगळावे व फक्त हिंदू आणि मुसलमानांनीच मित्र व्हावे. पारशांचे कॉंग्रेसवर पुष्कळ वर्षे प्रभुत्व होते;

आणि त्यांनी अनेक महत्त्वाच्या जागा भूषविल्या होत्या. काँग्रेस ही सर्व जातींच्या हक्कांकडे सारख्याच दृष्टीने पाहते व हिंदू आणि मुस्लिम या दोन मोठ्या जमातींच्यामध्ये भविष्यकाळी पारशी चिरडले जातील असे मला वाटत नाही. जर पारशांना असहकारितेच्या चळवळीत आल्याने आपला फायदा होणार नाही, असे वाटत असेल तर ते त्या चळवळी-पासून दूर राहाण्यास मोकळे आहेत. जर या चळवळीत येणे आपल्या हिताचे आहे अशा निर्णयाला तुम्ही आलात तरच आमच्याशी हात मिळवा नाही तर मिळवू नका.

'मुंबई क्रॉनिकल', १९-६-१९२१

१११. सी. विजयराघवाचारियर याना पत्र

[जून १८, १९२१ रोजी किंवा नंतर]

प्रिय श्री. आचारिअर,

तुमची तार[1] मिळाली. कमिटीने पंजाबच्या मित्रांना असे कळविले आहे की, ऑल इंडिया काँग्रेस कमिटी निर्णय देईपर्यंत त्यांनी आज्ञापालन करीत राहावे. ए. आय्. सी. सी. २२ जुलैला सकाळी लखनौ येथे भरत आहे. योजना तयार करण्याचा प्रश्न त्याच वेळी विचारात घेतला जाईल. माझ्या मताने ती वेळ अद्याप आली नाही.

तुमचा स्नेहांकित.

फोटोस्टॅटवरून. एस्. एन्. ७५४८

१. विजयराघवाचारियर यांनी १८ जून रोजी कोडाईकॅनॉल येथून तार पाठविली : "सध्याच्या तीव्र परिस्थितीसंबंधी पंजाबला वर्किंग कमिटी विचारपूर्वक सूचना पाठवील अशी आशा आहे. मालवीयजींची इच्छा तावडतोब व्हाइसरॉयपुढे व्यवहार्य योजना ठेवावी अशी आहे.

११२. स्वराज्यावर भाषण, मुंबई[1]

जून १९, १९२१

गांधी म्हणाले, येथे लोक मंडपात तासाच्यावर बसलेले आहेत. हा मंडप उभारल्याबद्दल गांधींनी त्यांचे आभार मानले. या कामात येथील श्रीमंत व गरिबांनी भाग घेतला आणि त्यात आपल्याला स्वराज्याचा पाया दिसतो असे ते म्हणाले. त्यांनी केलेल्या स्वागताबद्दल गांधींनी कृतज्ञता व्यक्त केली. निधी जमविण्याच्या कामात सर्व वर्गांच्या व जातींच्या लोकांनी हिंदू–मुसलमान व पारशी यानी भाग घेतला याबद्दल त्यांनी संतोष व्यक्त केला. त्यातच स्वराज्याचे रहस्य आहे. तथापि गांधींनी बंधू–भगिनींना अशी विनंती केली की, तुमच्याजवळ जे सर्व काही आहे ते निधीला देऊन टाका. हिंदुस्थान हा धर्मराज्य आणि नीतिराज्याकरिता झटत आहे आणि हिंदी लोक हे योग्य, सरळ व प्रामाणिक मार्गाने जाणारे आहेत. सभेला येण्याला आपल्याला फार उशीर झाला याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. पण ते म्हणाले, माझी मोटर रस्त्यात मोडली. श्री. वेलजी लखमसी नप्पू यांच्याकडून मांडवी वॉर्डातून ६०,००० रुपये गोळा करावयाचे होते. विलेपारल्याचे लोक तितकीच रक्कम टिळक फंडाला देतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

महात्मा गांधींनी नंतर पारश्यांच्या सभेचा उल्लेख केला व तेथे त्यांना विचारलेल्या प्रश्नांची माहिती दिली. ते म्हणाले, आता मी अधिक विस्ताराने निरनिराळ्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण करतो. गांधींना असे सांगण्यात आले की, २३ कोटी हिंदू व ७ कोटी मुसलमान यांच्या ऐक्यात ८०,००० पारशी भरडले जातील. ज्या जमाती बहुसंख्य आहेत त्यांचे कर्तव्य अल्पसंख्याकांचे हितरक्षण करणे व त्यांची काळजी घेणे हे आहे. स्वराज्याचे हे पहिले तत्त्व लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे. बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांच्या हिताकडे दुर्लक्ष करू नये. एका बोहरी गृहस्थाने गांधींना असे पत्र लिहिले की, ते फक्त मेमन्सचे नाव घेतात व बोहऱ्यांचे घेत

१. हे भाषण विलेपारले येथे झाले. तेथे गांधींना टिळक स्वराज्य फंडासाठी थैली देण्यात आली.

नाहीत. बोहऱ्यांच्याबद्दल तुम्हांला शंका आहे का असे त्यांना विचारण्यात आले. गांधींनी उत्तर दिले, माझा तसा बिलकूल उद्देश नव्हता. आपण मेमन हा शब्द साऱ्या मुसलमान जमातीकरिता वापरला व एका विशिष्ट पंथाकरिता वापरला नाही. त्या संबंधात गांधींनी एका बोहरी गृहस्थाची गोष्ट सांगितली. तो गृहस्थ त्यांना घरी घेऊन गेला व निधीला त्याने १,००० रुपये दिले. तथापि एकमेकांबद्दल अशा शंका व संशय असणे याबद्दल त्यांनी तीव्र नापसंती दाखविली आणि ते म्हणाले, जोपर्यंत आपण एकमेकांच्या जमातींबद्दल अशा भावना बाळगू तोपर्यंत स्वराज्य मिळणार नाही.

आदल्या दिवशीच्या सभेत गांधींना विचारले होते की, आम्ही गिरण्यांचे कापड वापरावे किंवा नाही. त्याला त्यांनी असे उत्तर दिले की, गिरणीचे कापड अत्यंत गरीब लोकांकरिता आहे. श्रीमंत व सुखवस्तू लोकांनी खादी वापरावी. तुम्ही तसे केले नाही तर स्वराज्य मिळणार नाही. दुसऱ्या पारशी गृहस्थांनी विचारले की, जर जपान किंवा दुसऱ्या राष्ट्रांनी हल्ला केला तर तुम्ही काय कराल ? त्यावर गांधी म्हणाले, माणूस हा स्वार्थी आहे आणि जर जपान्यांना असे दिसले की, हिंदी लोकांकडे आपण आपला माल पाठवू शकत नाही, व ते त्याचा बिलकूल उपयोग करीत नाहीत तर हिंदुस्थानचा त्यांना काही उपयोग होणार नाही. जर हिंदी लोकांनी परदेशी वस्तू वापरल्या नाहीत तर जपान्यांना हिंदुस्थानचा उपयोग काय ?

नंतर त्यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा परिचय करून दिला. मुसलमानांतील ते एक थोर गृहस्थ आहेत व त्यांचे मुसलमानांवर फार वजन आहे, असे गांधींनी सांगितले. ते उभय जमातींचे अत्यंत कल्याण करण्यास समर्थ आहेत, व पैसा जमा झाल्यानंतर तुम्ही त्यांचे भाषण ऐका असे ते म्हणाले.

‘ दि बॉम्बे क्रॉनिकल ’, २०-६-१९२१

११३. जितेंद्रलाल बानर्जींना तार[१]

[जून १९, १९२१ रोजी किंवा नंतर]

बेझवाडा कार्यक्रम पुरा करण्यात गुंतलो आहे. दुरून सल्ला अशक्य. पत्र लिहीत आहे.[२]

फोटोस्टॅटवरून. एस्. एन्. ७५४७

११४. पत्र-प्रतिनिधींना निवेदन

एका पत्र प्रतिनिधीने विचारले की, तुम्हांला मिलिटरी रिक्वायर-मेंट्स् कमिटीकडून जे आमंत्रण आले आहे त्याप्रमाणे तुम्ही कमिटीपुढे साक्ष देण्यास जाणार आहात काय? गांधी म्हणाले, मी असहकारितावादी आहे, त्यांच्या कामकाजात भाग घेऊ शकणार नाही, असे पूर्वीच लेखी कळविले आहे.

'मुंबई क्रॉनिकल,' २०-६-१९२१

१. जितेंद्रलाल बानर्जी हे कलकत्त्याचे कॉंग्रेसमन होते. त्यांनी १९ जूनला एक तार पाठविली, तिला हे उत्तर आहे. ती तार अशी : "बंगालची परिस्थिती तुमच्या सल्ल्याची व उपस्थितीची तातडीने मागणी करीत आहे. श्री. दास यांना संप विस्तृत व दीर्घकाळ चालवावयाचा आहे. पण माझी व येथील अनेक असहकारितावाद्यांची अशी दृढ खात्री आहे की, हे संप असहकारितेच्या तत्त्वाविरुद्ध आहेत व बेझवाडा कार्यक्रमाच्या यशाला धोका आणीत आहेत. जर येणे अशक्य असेल तर परिस्थितीचा पूर्ण विचार करून तारेने सल्ला द्या."

२. गांधींचे पत्र सापडत नाही.

११५. कुंवरजी आनंदजी यांना पत्र

मुंबई
जून २१, १९२१

भाईश्री कुंवरजी आनंदजी,

भावनगरने आतापर्यंत टिळक स्वराज्य फंडाकरिता काही केले नाही, याचा अर्थ तुम्ही काही केले नाही. तुमच्या ढिलाईचे मला दुःख होत आहे. तुम्हांला प्रत्येक गोष्ट कळते व तुमच्याजवळ पैसा आहे. या कामाचे महत्त्व तुम्हांला कळते. त्याचा राष्ट्रीय पुनरुज्जीवनावर होणारा परिणामही कळतो. आणि तरीही तुम्ही निधीला आपला पूर्ण वाटा देण्यास नकार देत आहात. मला तुमची बुद्धी, तुमचे अंतःकरण, तुमचा वेळ आणि तुमचा पैसा, या चारही गोष्टी हव्या आहेत. अशी संधी पुन्हा येणार नाही. तुम्ही मदत करा.

मोहनदासचा वंदेमातरम्.

[गुजरातीवरून]
महादेव देसाईच्या डायरीतील हस्तलिखितावरून;
नारायण देसाईच्या सौजन्याने.

११६. मंगलदास पारेख यांना पत्र

मुंबई
जून २१, १९२१

प्रिय मित्र,

श्री. वल्लभभाईकडून मी असे ऐकतो की, गिरण्यांकडून अपेक्षिलेली रक्कम अद्याप पोहोचलेली नाही. या रीतीने आपण राष्ट्रीय कार्य कसे करणार ? एक तर ही

चळवळ चांगली आहे, तेव्हा तिला मदत केली पाहिजे. किंवा ती वाईट आहे म्हणून ती हाणून पाडली पाहिजे. पण तुम्ही फक्त गोष्टींची चालढकल करता. गिरणीवाल्यांना गुजरातचा मान हाही प्रिय नाही काय? त्याकरिता अत्यंत कष्ट घेतल्याशिवाय गुजरातच्या वाट्याला जी काय मर्यादित रक्कम आली आहे, ती जमविण्याकरिता गुजरातने मदत करू नये काय? तुम्ही अधिक विलंब लावणार नाही असे मला वाटते. तुम्हांला जे काय वाटेल ते द्या; पण तुम्ही निश्चित आकडा सांगितला पाहिजे. सारी रक्कम एकदम दिली नाहीत तरी हरकत नाही. पण गिरण्यांनी आपल्या वह्यांत सारी रक्कम कमिटीच्या नावावर जमा केली पाहिजे. त्याचप्रमाणे त्या रकमेवर होणारे व्याज प्रांतिक कॉंग्रेस कमिटीकडे जमा केले पाहिजे. कमिटीला जरूर, तेव्हा चेक्स् काढण्याचाही अधिकार असावा. मला पाच लाखांपेक्षा कमी रक्कम अपेक्षित नाही. चोहोकडे मला असे विचारतात की, ज्या गिरण्यांनी ह्या चळवळीत इतका पैसा मिळविला, त्यांनी काय केले आहे?

मोहनदास गांधींचा जयश्रीकृष्ण.[1]

[गुजरातीवरून]
महादेव देसाईंच्या डायरीतील हस्तलिखितावरून;
नारायण देसाईंच्या सौजन्याने.

११७. टिप्पणे

स्वल्प कृती

सर्व्हंट ऑफ इंडियामध्ये अलीबंधूंच्या माफीविषयी जे शेरे मारले आहेत, त्यावरून लहानशी कृती ही मणभर व्याख्यानापेक्षा अधिक असते, या म्हणण्यातील सत्य मला कशापेक्षाही अधिक जोरदारपणे प्रत्ययास येते. सर्व्हंट ऑफ् इंडिया हा जाणून बुजून माफीचा चुकीचा अर्थ करील किंवा गैरसमज करील ही कल्पनाच मला करवत नाही. तथापि त्या पत्राने तीन परिच्छेद त्या माफीकरिता खर्ची घातले आहेत व त्यावरून त्यांचा किती गैरसमज झाला आहे हे दिसून येते. माझ्या दृष्टीने असहकारितेच्या आचरणात तो एक आदर्श पाठ होता आणि त्या प्रश्नाभोवती जी भयंकर वादळे उठली

१. वैष्णवांमधील अभिवादनाचा प्रकार.

तीही लक्षात घेता तो आदर्श पाठच होऊन राहिला आहे. वाट चुकलेल्या असहकारितावाद्याला तेच एक कृत्य ध्रुवताऱ्याप्रमाणे वाटेल. त्यांनी आपल्या विरोधकांच्यासमोर सुद्धा सतत स्वतःला शुद्ध करीत राहिले पाहिजे आणि आपले कृत्य हे दुर्बलतेचे लक्षण आहे असा गैरसमज होईल, हा धोका पत्करूनसुद्धा स्वतःला शुद्ध करीत राहिले पाहिजे. योग्य मार्गावर येण्याच्या कृतीत त्यांनी द्याव्या लागणाऱ्या किंमतीचे गणित करू नये. सत्याकरिता सत्याचरण करणे हाच त्याचा अर्थ आहे. नजीकचा संभव हा काळाकुट्ट दिसला तरी जो शोधक आहे. त्यांनी त्याना जे सत्य वाटते त्याचा निष्ठुरपणे पाठलाग केला पाहिजे. जर इस्लाम धर्म प्रवर्तकाने सत्य हा आपला सर्वस्वी व अखेरचा संकटकालीन आधारस्तंभ असे मानले नसते तर त्याची पकड अनेक वेळा नष्ट झाली असती. आपण असे समजू या की, मी अलीबंधूंना जो सल्ला दिला तो माझ्या सबलतेतून दिला आणि त्यांनी आपल्या सबलतेमुळे तो समजून मानला तर, त्या माफीने इस्लामच्या आणि देशाच्या कार्यावर उपकारच केले आहेत असे दिसून येईल. मलाही तसेच वाटते. म्हणून जरी यंग इंडियाने गेल्या अंकात साऱ्या शंकांना[1] उत्तरे दिली नसली तरी ती उत्तरे देणे मी काळावर सोपवितो.

स्पष्टीकरणाचे दारिद्र्य

मी नेमस्तांना जे पत्र[2] लिहिले त्या संबंधी असाच पण कमी गैरसमज निर्माण झाला आहे. मी कित्येक वेळा अर्थ स्पष्ट करण्यात दारिद्र्य दाखवितो, त्याचे मला आश्चर्य वाटते. मी बेपर्वाईने लिहिणारा नाही. बिनचूक व स्पष्ट लिहावे याकरिता मी फार मेहनत घेतो. तथापि सर्व्हंट ऑफ् इंडियामधील जो 'एक टीकाकार' आहे, त्याच्या मनावर नेमस्तांनी निरोधनामध्ये असहकारितावाद्यांच्याबरोबर सामील व्हावे, ही माझी अपेक्षा आहे, अशी छाप पाडण्यात मी यशस्वी झालो आहे. तसे मी काही करू इच्छित नाही. जे सहकारितावादी आहेत त्यांना निरोधन हे न पटण्याइतके बोजड व अपुरे वाटण्यासारखे आहे. पण मला वाटले की, ते दारूबंदी कार्याला स्वतःच्या पद्धतीने म्हणजे दारूचे गुत्ते ताबडतोब नष्ट करून मदत करू शकतील. इतके तरी कमीत कमी राष्ट्राचे ऋण ते लागतात. जसजशी निरोधनाची उष्णता वाढत आहे तसतसे दररोज निरोधन करणारे हे गुत्तेवाल्यांच्या आणि गिऱ्हाइकांच्या डोळ्यांत खुपू लागले आहेत. मला असे समजते की, अहमदाबाद येथे दोघा निरोधकांना गुंडांनी मारले व त्यांची डोकी फोडली. हे शूर लोक आता डोक्याला पट्ट्या बांधून आपल्या जागी हजर होतात. मुंबईत एका जमावाच्या देखत स्वयंसेवकाच्या थोबाडीत मारली व तो प्रतिकार न करता आपल्या जागी भक्कमपणे उभा राहिला. मादक दारू विकणाऱ्यांना निरोधनाचे जसजसे परिणाम अनुभवास येतील

१. पाहा, टिप्पणे १५-६-१९२१.
२. पाहा, "नेमस्तांना", ८-६-१९२१.

तसतशी ही उदाहरणे वाढत जातील. आपले कर्तव्य बजावीत असताना निरोधकांचे प्राण जरी गेले तरी ही सुधारणा थांबविणे अशक्य आहे. जोपर्यंत निरोधन करण्याकरिता तरुण स्त्रीपुरुष तयार असतील आणि प्रतिकार न करता ते आपला प्राण धोक्यात घालतील तोपर्यंत हे काम चालू राहिलेच पाहिजे. मला या संकटाची जाणीव असल्यामुळे मी नेमस्तांच्या देशभक्तीला आवाहन केले. त्यांनी एका फटकाऱ्यासरशी सारी दारू दुकाने बंद करावीत आणि तरुण स्त्री-पुरुषांच्या शरीराला किंवा जिवाला धोका पोहोचू देऊ नये या दृष्टीने मी हे आवाहन केले. माझ्या पत्रात हा मुद्दा मी त्यांना पटवू शकलो नाही याचे मला दुःख होते. दारूबंदीची सुधारणा केव्हा तरी येणार आहे याची मला जाणीव आहे. एखाद्या माणसाचे घर आगीने पेटले असता अग्नि-शामक उपकरणे तयार केली जात आहेत, या गोष्टीमुळे त्याला काय समाधान वाटणार ? टाइम्स ऑफ इंडियामधील ' ऑब्झर्व्हर ' ब्रिटिश विरुद्ध इतर सरकारे या चळवळीसंबंधी मला काही प्रश्न विचारीत आहे. यापूर्वीच मी त्याचे उत्तर दिले नाही याबद्दल मला खेद वाटतो. एका मित्राने जर माझ्याकडे कात्रण पाठविले नसते तर ते प्रश्न माझ्या नजरेतून सुटले असते. ' ऑब्झर्व्हर ' विचारतो, ' ब्रिटिशांचे राज्य हे मोगल व मराठ्यांच्या राज्यापेक्षा अधिक चांगले नाही काय ? मला असे सांगितले पाहिजे की, मोगल व मराठ्यांचे राज्य ब्रिटिशांच्यापेक्षा अधिक चांगले होते; कारण त्या वेळी हे राष्ट्र आजच्याइतके पौरुषहीन किंवा दरिद्री नव्हते. मोगल किंवा मराठी राज्यात आम्ही अतिशूद्र नव्हतो. पण आम्ही ब्रिटिश साम्राज्यात अतिशूद्र आहोत.

पारशांनी काय करावे ?

ऑब्झर्व्हर पुढे विचारतो,

पारशांच्या खास गरजा भागविण्याकरिता राष्ट्रीय शाळांची तजवीज केली नसताना पारशांनी आपल्या मुलांना सरकारी व सरकारी मदतीच्या शाळा सोडाव्या असे सांगावे काय ? पारशी वकिलांनी कोर्टावर बहिष्कार घालून आपली कुटुंबे उपाशी मारावीत काय ? पारशांनी आपले खूप पैसे मिळणारे व्यवसाय सोडावेत काय ? आणि दररोज तीन आणे मिळविण्या-करिता सूत कातावे काय ? दररोजचे तीन आणे त्यांना नुसत्या सोडावॉटरला पुरणार नाहीत, मग व्हिस्की आणि सोड्याची गोष्ट कशाला ? किंवा पारशांनी आशियातील रहिवाशांपेक्षा अधिक युरोपियन पद्धतीचा असलेला सध्याचा पोषाख टाकून द्यावा आणि पूर्वजांच्या काळात जावे काय ? ते पूर्वज जे पायजमे घालीत असत, त्यांच्या तंगड्या इतक्या रुंद असत की, त्यात डझनभर कोंबड्या मावू शकत असत. अशा रीतीने काळाचे काटे मागे सारता येतील काय ? या प्रश्नांना मि. गांधी पटण्या-सारखी उत्तरे देण्याची कृपा करतील काय ?

पारशी शैक्षणिक बाबतीत अग्रेसर आहेत. त्यांनी सध्याच्या शाळातून एकही मुलगा बाहेर काढण्याची जरूरी नाही. त्यांनी पदव्यांचा मोह मात्र सोडून दिला पाहिजे, आणि त्यांना आजही आपल्या साऱ्या शाळांची मान्यता झुगारून देता येईल. आपल्या खास शिक्षणाचा खर्च भागविण्याकरिता त्यांच्याजवळ पुरेसा पैसा आहे. पारशी वकिलांनी जर कोर्टावर बहिष्कार घातला तर ते व्यापाराकडे लक्ष वळविण्याइतके समर्थ आहेत. पारश्यांचे, व्यापार हे वैशिष्ट्य आहे. जर त्यांना खरोखर राष्ट्रीय सेवेत पडावयाचे नसेल तर त्यांना व्यापार करता येईल. जे चांगले पारशी वकील आहेत त्यांनी जर आपल्या वकिलीचा त्याग केला तर त्यांचे व राष्ट्राचे कल्याण होईल. ज्यामुळे सरकारची प्रतिष्ठा वाढणार नाही असा कोणताही भरभराटीचा व्यवसाय कोणीही आणि विशेषतः पारशांनी सोडून द्यावा व त्याऐवजी सूत कातावे अशी अपेक्षा नाही. पण रिकामा वेळ असलेल्या प्रत्येक पारशाने त्याचा अगर तिचा तो वेळ राष्ट्राकरिता कताईत खर्च करावा अशी मात्र अपेक्षा आहे. म्हणून पारश्यांनी सोडा टाकून देण्याचा प्रश्नच नाही. पण जे मादक पेये घेतात, त्यांनी जर मद्यपानाचा संपूर्ण त्याग केला तर त्यांचा व देशाचा फायदा होईल. जोपर्यंत हातसुताचे व हातविणीचे कापड पारशी वापरतील तोपर्यंत सध्याच्या पोषाखाची पद्धती पारशांनी सोडून देण्याची जरूरी नाही. आपल्या वाडवडिलांचा पुरातन साधेपणा जर त्यांनी पत्करला तर त्यांचे काही नुकसान होणार नाही. जुना पारशी पोषाख हा हिंदी हवामानाला मानवणारा होता. युरोपियन पद्धतीचा पोषाख हा ओंगळ व हिंदी परिस्थितीला पूर्णपणे न साजेसा आहे. केवळ त्यांच्या तुटकपणाच्या आणि कल्पनेच्या अभावाच्या वृत्तीमुळे इंग्लिश हिंदुस्थानात इंग्लिश पद्धतीचे कपडे वापरतात. पण ते हे कबूल करतात की, ह्या हवेला तो पोषाख सुखदायक नाही. अविचाराचे अनुकरण हे प्रगतीचे लक्षण नव्हे असे मला वाटते आणि जुन्या सवयीकडे पुन्हा वळण्याची प्रत्येक गोष्ट "काळाचे काटे मागे ओढणारी नसते." गर्दीगर्दीने किंवा चुकीने टाकलेले पाऊल मागे घेणे हे प्रगतीचे खासच लक्षण आहे. गेल्या शंभर वर्षांत आपण चुकीची पावले टाकली आहेत असे म्हटले जाते. म्हणून आपण पुढे जाण्यापूर्वी बरोबर मार्गावर येण्याकरिता काही पावले मागे गेले पाहिजे. आपला रस्ता चुकला आहे. मी ऑब्झर्व्हर आणि इतर पारश्यांना असे सांगतो की, योग्य मार्गापासून जेथून आपण चळलो त्या ठिकाणाला परत जाण्याची आपण गर्दी केली पाहिजे.

'यंग इंडिया', २२-६-१९२१

११८. जुगारीचा शाप

संपादक,
यंग इंडिया यांस,

महाशय,

जुगारीच्या दुष्परिणामाचा प्रश्न यंग इंडिया व त्याच्या संपादकांनी हाती घेतला आहे याबद्दल मला आनंद वाटतो. पण मला असे वाटते की, यंग इंडियामध्ये एखाद दुसरा लेख, पाश्चात्य राष्ट्रातून आयात केलेले हे पाप समूळ नष्ट करण्यास पुरेसा पडणार नाही. हे पाप निरुद्योगी श्रीमंत लोकांच्यापासून व्यापारी वर्गापर्यंत, मध्यम वर्गापर्यंत, कारखान्यांतील मजुरापर्यंत आणि शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत पसरले आहे. दर आठवड्याला नियमितपणे हजारो लोक शर्यतीला जातात, पण त्याशिवाय हजारो लोक असे आहेत की, ज्यांच्याकडे जुगारीचा हा मोह, बकेट शॉप्सच्या (जुगारीचे अड्डे) रूपाने येतो. हे अड्डे शहराच्या मध्यभागी उघडपणे हा धंदा करतात हे अड्डे बंद करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता सरकारने एक कमिटी नेमली आहे. पुढील बैठकीत एखादा कायदा त्यासंबंधी केला जाईल. पण तेवढ्याने भागणार नाही. त्याकरिता जनमत निर्माण केले पाहिजे आणि असे स्पष्टपणे दाखविले पाहिजे की, शर्यतीला जाणे आणि जुगार खेळणे, हे दारू पिणे व वेश्यांकडे जाणे यांच्याइतकेच वाईट आहे. याकरिता जोरदार चळवळ केली पाहिजे आणि मला आशा आहे की, यंग इंडियाचे वाचक त्याला साद देतील.

मुंबई, २६-५-१९२१

तुमचा
सत्य

मी पूर्वीच म्हटले आहे की शर्यती व जुगार ही एक फॅशन झाली आहे. दारूमुळे शरम वाटते तशी यामुळे वाटत नाही. म्हणून दारूपेक्षा शर्यतीचा प्रश्न हा हाताळण्याला अधिक कठीण आहे. ‘सत्य’ यांना शर्यतीच्या दुष्परिणामांची खास माहिती आहे. मी त्यांना उघडपणे

पुढे येण्यास आणि हा जो दुर्गुण समाजाच्या नीतिमत्तेचा हळूहळू पण न चुकता नाश करीत आहे, तो प्रश्न व्यक्तिशः हाती घेण्यास सांगतो.

'यंग इंडिया', २२-६-१९२१

११९. टिळक स्मारक निधी

एखाद्या व्यक्तीच्या स्मृतीबद्दल आदर दाखविणे म्हणजे त्या व्यक्तीचे जीवनकार्य सिद्धीस नेणे होय. ज्या बाळ गंगाधर टिळकांना लोकमान्य म्हणण्यात हिंदुस्थानला आनंद होत होता व अद्यापही होत आहे, त्यांच्या स्मृतीला आदर दाखविणे म्हणजे स्वराज्य स्थापणे आणि अशा रीतीने त्यांची स्मृती निरंतर जागृत ठेवणे हे होय. आपण जर त्यांच्या पुण्यतिथीला स्वराज्य स्थापन करू शकलो तर किती छान होईल, किती भव्य होईल! आणि जे ४० दिवस आता शिल्लक राहिले आहेत त्यात हे करणे अशक्य नाही. पण माझी आशावादी मनोवृत्ती येत्या एक ऑगस्टला आपण स्वराज्य स्थापन करू असे सांगत नाही. येत्या ऑक्टोबरच्या पहिल्या तारखेला स्वराज्य स्थापणे हे खरोखर शक्य होईल. पण त्याकरिता सक्त मेहनत केली पाहिजे. पुढील ३१ डिसेंबर रोजी किंवा पूर्वी जर आपण स्वराज्य स्थापू शकलो नाही तर ते काँग्रेसचे मरणच आहे. बेझवाड्याला एक कोटी रुपये जमविण्याची जी हमी आपण घेतली आहे ती जर पुरी केली नाही तर ते मरण टळणार नाही. हा लेख चालू २२ तारखेला प्रसिद्ध होईल. म्हणून वाचकांनी आठ दिवसांत हे एक कोटी कसे पुरे करता येतील याचा विचार केला पाहिजे.

परिस्थिती काय आहे ती पाहू. जर सर्व सुरळीत चालले तर त्या तारखेपूर्वी मुंबईबाहेर चाळीस लाख रुपये जमतील असे धरून चालावयाला हरकत नाही. याचा अर्थ कमीत कमी ३ लाख बंगालमधून, ४ लाख पंजाबमधून, ३ सिंधमधून, ३ मध्य-प्रांतातून, ३ आंध्र प्रांतामधून, ४ बिहारमधून आणि १० गुजरातमधून जमा होतील. असे ३० लाख झाले. उरलेल्या प्रांतांतून १० लाखांचा अंदाज करणे हा फारसा जास्त नाही. तेव्हा आपण मुंबईशिवाय सर्व प्रांतांतून ४० लाख रुपये जमा होतील असे धरू या.

मुंबई आणि मुंबईमार्फत ६० लाख कसे जमा होतील हा प्रश्न आहे. जर आपल्याला ३० जूनपूर्वी एकूण एक कोटीचा आकडा गाठावयाचा असेल तर, ती रक्कम

मुख्यत्वेकरून मुंबई व कलकत्त्याच्या श्रीमंत लोकांकडून, म्हणजे ज्यांना चळवळीबद्दल आपलेपणा वाटतो आणि ज्यांचा चळवळीवर विश्वास आहे त्यांच्याकडून जमविली पाहिजे.

एक कोटी रुपये जमविण्याबद्दल कोणतीही अडचण असता कामा नये. एवढेच नव्हे तर एका महिन्यात स्वराज्य मिळविण्याची खात्री असली पाहिजे. त्याकरिता हिंदुस्थानातील श्रीमंत लोकांना हे पटले पाहिजे की, आपली सुरक्षितता विद्यमान सरकारला भिण्यात नसून चळवळीला निर्भयपणे मदत करण्यात आहे. आज जर ते कोट्यवधी रुपये मिळवीत असतील तर ते अब्जावधी रुपये देशाबाहेर पाठवीत असतात. याचा अर्थ असा की, ते कोट्यवधी रुपये घेतात आणि गरिबांच्या तोंडातून व कित्येक प्रसंगी उपाशी मरणाऱ्या देशबांधवांच्या तोंडातून अब्जावधी रुपये काढून घेण्यास मदत करीत असतात. आज इतर वर्गाच्यापेक्षा हा वर्ग डोईजड झालेल्या राज्यकारभाराला उचलून धरीत आहे. तो राज्यकारभार विनाशक लष्करी खर्च चालू ठेवीत आहे व त्याचा उद्देश डायरशाही व ओडवायरशाही यांचा अखेरचा आश्रय घेऊन हिंदुस्थान आपल्या ताब्यात ठेवावा असा आहे.

पण आपण वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. जे अत्यंत श्रीमंत आहेत, ते कलेक्टर्स व कमिशनर्स यांचा रोष ओढवून घेण्यास भितात. त्यातील काही जणांना असहकारितेच्या यशाची प्रामाणिकपणे भीती वाटते. त्यांना असे वाटते की, असहकारितेचे यश म्हणजे अराजक आणि जीवित व वित्ताचा निदान काही काळ नाश. या लोकांना आपण आपल्या बाजूला वळविण्याकरिता विचार, उच्चार व आचार यात अहिंसेची वृत्ती आणून, सारे वातावरण त्या वृत्तीने भारून टाकण्याचा सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे. दरम्यान आपण असे धरून चालू की, जे आपल्यामध्ये थोडेसे श्रीमंत लोक आहेत व सुस्थितीत असलेले पुष्कळ स्त्री-पुरुष आहेत, त्यांना जर आपल्याला ही रक्कम पुरी करावयाची असेल तर नेहमीपेक्षा अधिक त्याग करावा लागेल. मुंबईमध्ये एक चांगली सुरुवात अगोदरच झाली आहे. स्वतः श्रीमंत असलेले कळकळीचे कार्यकर्ते रात्रंदिवस मोठाल्या रकमा जमा करण्याच्या कार्याला लागले आहेत. त्यांना चढउतारांना तोंड द्यावे लागत आहे. पण ते निर्भयपणे आपल्या धोपटमार्गाने चालले आहेत.

कोणी तरी आपली मनधरणी करील याची वाट पाहण्याची सवय आपण टाकली पाहिजे. मुंबईच्या पैसेवाल्यांनी स्वखुषीने आपली मदत का देऊ नये व आपल्या देणग्या का पाठवू नयेत ? दुसरा कोणी सुरुवात करील याची वाट त्यांनी का पाहावी ?

जे लाखांनी किंवा हजारांनी देऊ शकत नाहीत त्यांचे काय ! त्यांनाही थोड्याशा श्रीमंत लोकांचे ओझे हलके करण्याकरिता पुष्कळ काम करता येईल. कोणत्या तरी

समाजाकडून आपल्याला बोलाविणे येईल याची वाट त्यांनी पाहू नये. प्रत्येक गटाने, जातीने, व्यापार मंडळाने आपणहून पैसे जमविण्यास सुरुवात करावी व ते प्रांतिक केंद्राकडे पाठवून द्यावे. ज्यांना पैसे मिळविण्याची शक्ती असेल त्यांनी उरलेले दिवस याच कामात खर्च करावे.

प्रांतातून ४० लाख रुपयांवर एकूण रक्कम जमा होऊ शकत नाही, ही शरमेची गोष्ट आहे. हा कमीपणा पुसून टाकण्याकरिता अद्याप वेळ आहे. प्रत्येक प्रांताने या कृपेच्या व हक्काच्या आठवड्यात निःस्वार्थी कार्यकर्ते पुढे आणावे व त्यांना पैसे जमा करण्याकरिता आपली सारी शक्ती केंद्रित करण्यास लावावे.

पुष्कळसे पैसेवाले लोक दूर राहात आहेत आणि जनतेमध्ये पैसे जमा करण्याकरिता संघटना निर्माण करण्यात आपल्याला यश मिळाले नाही यावरून असा निष्कर्ष निघतो की, काही लोकांनी आपले सर्वस्व देऊन टाकले पाहिजे. मला चार प्रतिष्ठित व सामर्थ्यशाली गुजराती कार्यकर्ते माहीत आहेत की, ज्यांनी आपले सर्वस्व दिले आहे. त्यांतील एक जण मरण पावला व त्याने आपली सारी पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक बचत स्वराज्य फंडाला ठेवून दिली. मला वाटते, या चौघांचे वारे इतरांना लागेल. स्वातंत्र्याच्या कामाला पैसे देऊन कोणाचेही नुकसान होणार नाही.

याच वर्षात जर स्वराज्य मिळवावयाचे असेल तर कमीत कमी आपल्याला बेझवाडा कार्यक्रम ठराविक वेळात पुरा केला पाहिजे. एक कोटी जमा करणे हे त्या कार्यक्रमपूर्तीचे दृश्य लक्षण समजले जाईल.

सभासदसंख्या व चरखा यांना कमी महत्त्व नाही. मी त्याकरिता रविवार ता. २६ रोजी एक सभा व दुसरी ३० जून रोजी प्रत्येक खेड्यात किंवा केंद्रात घ्यावी असे सुचवितो. त्या सभेत काँग्रेसचे ध्येय समजावून सांगावे आणि जे २१ व त्यावरच्या वयाचे स्त्री-पुरुष असतील, त्यांना एखाद्या प्राथमिक काँग्रेस कमिटीचे सभासद होण्यास सांगावे. त्या सभांतून सभासद नोंदविणे आणि सभासदांकडून वर्गणी गोळा करणे याशिवाय दुसरे काम करू नये. ज्या ठिकाणी जबाबदार माणसे हे भेटीगाठीचे काम हाती घेतील अशा सर्व ठिकाणी या दिवसांत अर्जाचे नमुने ठेवून द्यावेत.

जरी आपल्याजवळ चरख्यांची मोजदाद नाही तरी माझ्याकडे आलेल्या सर्व वृत्तांतावरून असे दिसते की, चरख्याने आतापर्यंत जनतेमध्ये प्रवेश मिळविला आहे; आणि त्यावरून साऱ्या हिंदुस्थानात वीस लाख चरखे चालू झालेले असावेत.

'यंग इंडिया', २२-६-१९२१

१२०. युद्धमार्गावर डॉ. पोलन

मला डॉ. जॉन पोलनचे प्रकट पत्र मिळाले. ते इतरत्र प्रसिद्ध झाल्यामुळे मी येथे छापीत नाही. ते त्यांच्या स्वभावाला अनुसरून आहे. असहकारितेच्या चळवळीचा अभ्यास करण्याचा त्यांनी बिलकूल त्रास घेतला नाही. आणि तरीही त्यांना जे ठाऊक नाही, त्याचा धिक्कार करण्यास त्यांना अपाय वाटत नाही. माझ्या स्वतःच्या अनुभवाऐवजी आपल्या विधानावर विश्वास ठेवण्यास त्यांनी मला सांगितले आहे. त्यात कीव करण्यासारखी गोष्ट अशी की, डॉ. पोलन यांच्या पत्रात सर्वसामान्य इंग्लिश वृत्तीचे चित्रण आहे. त्या वृत्तीत दुसऱ्या बाजूचा विचार करण्यास आळशीपणा असतो आणि सर्वज्ञतेचा उर्मटपणा असतो. व त्यातूनच त्यांना आत्मसमाधान लाभत असते. अशा प्रकारच्या लोकांना एक तर असहकारिता किंवा अत्याचार हाच एक उत्तर देऊ शकतो. जर तुम्ही खून केलात तर त्यांना धक्का पोहोचतो, व ते कृती करू लागतात. जर तुम्ही त्यांच्याबरोबर बोलणे थांबविलेत तर चौकशी करू लागतात. खुनाने बसलेल्या धक्क्यामुळे त्यांच्यात कृतीचा संचार होतो. पण सुसंस्कृतपणा क्वचितच येतो. त्यामुळे वाईट विकार निर्माण होतात व त्यांतून दहशतवाद हा वगळला जात नाही. त्यांना अंशतः समाधान मिळते आणि ते कधीकधी रोगापेक्षाही भयंकर असते. उलट पक्षी पण बोलण्यास नकार देणे, पापात सहभागी न होणे, स्वतःच्या अधःपाताला मदत न करणे, अन्याय करणाराच्या बरोबर सहकार्य न करणे या गोष्टींमुळे शक्ती येते, आणि अन्याय करणाऱ्यात जागृती निर्माण होऊन त्याचे शुद्धीकरण होते. मला वाटते, हिंदुस्थानने चोखाळलेला मार्ग हा नेहमीकरता अधिक चांगला आहे. असहकारिता ही अत्याचाराविरुद्ध एक खात्रीलायक योजना असल्यामुळे तीमध्ये अत्याचाराची शक्यता अवश्यमेव असतेच हे आळशीपणामुळे डॉ. पोलन यांना समजू शकत नाही. असहकारिता हा अत्याचार उखडून टाकण्याचा प्रयत्न आहे. असहकारितेने जर कमीत कमी काही केले असले तर अत्याचार हा तिने लांबणीवर टाकला आहे; आणि जर असहकारितेचा दीर्घकाल उपयोग केला तर लोकांना इतकी शक्ती येईल की, अत्याचार पूर्णपणे अनावश्यक आहे हे त्यांना पटेल. असहकारिता ही एक जंतुघ्न उपचारपद्धती आहे. ती ठार न मारता जखम बरी करते.

डॉ. पोलन यांना ठाऊक असावयास पाहिजे होते की, मी नेहमीइतकाच ब्रिटिश वस्तूंच्या बहिष्काराला विरोधी आहे. मी परदेशी कापडावरील बहिष्कार कायमचा घालावा, आणि ज्या दुसऱ्या परदेशी वस्तू हिंदुस्थान किफायतशीरपणे निर्माण करू

शकेल, त्यावर बहिष्कार घालावा असे नेहमीच प्रतिपादन करीत आलो आहे व आजही करीत आहे. माझ्या कल्पनेतील स्वदेशीत शिक्षा किंवा सूड या विचारांचा अंतर्भाव नाही. स्वदेशीचा अर्थ स्वावलंबन, आणि या स्वाभाविक धर्माला मान्यता की, मनुष्यमात्रांची सर्वोत्कृष्ट सेवा म्हणजे, जे लोक तुमच्या अगदी जवळ असतील त्यांना मदत करणे ही होय. स्वावलंबी हिंदुस्थान साऱ्या जगाला मदत करील. पण असाहाय्य आणि मँचेस्टर व जपानकडून कापडांनी झाकला गेलेला हिंदुस्थान स्वतःची आणि त्याही देशांची हानी करील.

डॉ. पोलन यांच्या तारखा चुकल्या आहेत. ते म्हणतात त्याप्रमाणे मी असहकारितेनंतर व्हाइसरॉयला लिहिले नाही पण त्याच्या फार पूर्वी[1] लिहिले. त्या वेळी माझा ब्रिटिश सरकारवर विश्वास होता. व्हाइसरॉयना प्रकट पत्र लिहिल्यानंतर दोन वर्षांनी मी ब्रिटिश शासनाची निर्भर्त्सना करू लागलो.

मी डॉ. पोलन यांना आणखी कळवू इच्छितो की, ज्या राज्यपद्धतीबद्दल मला अज्ञानामुळे मित्रत्व वाटत होते त्या पद्धतीचा मी जरी कट्टा वैरी असलो तरी ब्रिटिश-लोकांना मी मित्र म्हणून समजतो. माझा धर्म मित्र आणि शत्रू असण्यास मनाई करीत आहे. म्हणून मी डॉ. पोलन यांना असे आश्वासन देतो की, बंधूंच्याबद्दल माझ्या ज्या भावना आहेत त्याच भावना ब्रिटिश लोकांबद्दल कायमच्या राहतील. आणि त्यांच्याशी सध्या मी जे वर्तन करीत आहे तसेच वर्तन मी माझ्या सख्ख्या भावांशी केले आहे.

या पद्धतीबद्दल जी विशेषणे मी लावली व जी लावणे मला कर्तव्य वाटले, ती मी सोडू इच्छित नाही. माझे काम एवढेच आहे की, एखाद्या दुष्ट गोष्टीला दुष्ट म्हणत असताना जे अन्याय करतात त्यांच्याविरुद्ध दुष्ट विकारांचा उद्रेक हा दाबून टाकणे. एखादा रोगी घाबरल्याने वेडा होऊन पळत सुटेल ह्या भीतीने रोगाकडे दुर्लक्ष करणे किंवा तो लपविणे हे मूर्खपणाचे आहे. त्याला रोगाचा इषारा दिलाच पाहिजे व जे इलाज अपायकारक होणार नाहीत त्यांची योजना केली पाहिजे.

डॉ. पोलन यांच्या अज्ञानमूलक उपोद्घाताच्या मागोमाग सर्व सिद्धांतांना आधाराशिवाय दिलेला नकार आढळतो. पण साऱ्या हिंदुस्थानातच ही गोष्ट समान आहे असे मला वाटते. ते असे :

(१) भारतीय राज्यकारभार हा जगात अत्यंत खर्चाचा आहे.

(२) हिंदुस्थान हा आज पूर्वीपेक्षा अधिक गरीब आहे.

१. पाहा, खंड १४, प्रकरण २५७.

(३) आज दारूचे व्यसन जितके अतिरेकाला गेलेले आहे तितके पूर्वी कधीही नव्हते. (कोणीही असे म्हणाले नाही की, हिंदुस्थानात ब्रिटिश येण्यापूर्वी दारूचे व्यसन नव्हते.)

(४) हिंदुस्थान हा निर्वाणीचा उपाय म्हणून दहशतीच्या पद्धतीने हातात ठेवला गेला आहे.

डॉ. पोलन हे सर्वांना ठाऊक असलेली सत्ये नाकबूल करीत आहेत, एवढेच नव्हे तर असे म्हणतात की, इतर ठिकाणच्यापेक्षा येथील राज्यकारभार स्वस्त आहे. ते ही गोष्ट विसरतात की, हिंदी सिव्हिल सर्व्हिस ही जगात जास्तीत जास्त पगार मिळणारी संस्था आहे. आणि जमेचा एक तृतीयांश लष्करी खर्चाने शोषला जात आहे. ज्या कुटुंबात आपल्या उत्पन्नाचा एक तृतीयांश पहारेकऱ्याला द्यावा लागत असेल, त्याची अवस्था काय होईल याची कल्पना करा.

डॉ. पोलन म्हणतात की, हिंदुस्थान हा 'आश्चर्य करण्याइतका श्रीमंत देश आहे व त्या देशातील बहुतेक भाग सापेक्षतः गरीब व बेफिकीर शेतकरीवर्गाकडून बसविला गेला आहे.' नंतर ते मला असे सांगतात की, जे सरासरी २७ रुपये वार्षिक उत्पन्न आहे, त्याला पाचांनी गुणा; आणि असे प्रतिपादन करतात की, पाच जणांच्या कुटुंबाला १३५ रुपये निर्वाहाकरिता पुरतील. मी त्यांना असे सांगतो की, दरमाणशी दरमहा २-४-० गरिबातल्या गरीब माणसाला अन्न, वस्त्र आणि घर देऊ शकणार नाही. आणि मला जी गरीब प्रचंड जनता आहे, तिचे सरासरी उत्पन्न आणखीही कमी आहे असे सांगावयाचे आहे. कारण त्या सरासरीमध्ये कोट्याधीशांचे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न धरलेले आहे. म्हणून गरीब माणसाचे सरासरी उत्पन्न हा दारिद्र्याचाच नव्हे पण हिंदुस्थानच्या अर्धवट उपासमारीचा निखालस पुरावा आहे.

डॉ. पोलन हे मद्यपानापासून सतत उत्पन्न वाढत असताही असे सांगण्याचा उद्धटपणा करतात की, सध्याची राज्यपद्धती अमर्याद मद्यपानाला उत्तेजन देणारी नाही.

शेवटी डॉ. पोलन हे येथे दहशतवादाचे अस्तित्व आहे ही गोष्ट नाकबूल करतात, एवढेच नव्हे पण 'सर्व बाबतीत हिंदुस्थानात (आम्ही) हिंदी लोक स्कॉट्स्, वेल्श, वसाहतीतील लोक आणि खुद्द इंग्लिशांच्या इतकेच स्वतंत्र आहो.' असे ते म्हणतात.

असले भयंकर अज्ञान फक्त असहकारिताच घालवू शकेल.

'यंग इंडिया', २२-६-१९२१

१२१. आपल्या उणीवा

डॉ. पोलन यांची टीका ही अज्ञानमूलक व उद्धट समजुतीवर आधारलेली असून, त्या टीकेमुळे मदत न होता संताप येतो. पण दुसरे एक मद्रासचे इंग्लिश गृहस्थ ' जॉन बुल ' या सहीने खालील स्पष्ट व उपयुक्त असा अभिप्राय पाठवीत आहेत :

> मी एक इंग्लिश गृहस्थ आपल्या कार्याचा व आयुष्यक्रमाचा गौरव करण्याकरिता थोडेसे लिहून आपल्याकडे पाठवीत आहे व काही स्पष्टीकरण करीत आहे. तुम्ही यंग इंडियामध्ये लॉर्ड रीडिंग यांच्या भाषणावर[1] जो अभिप्राय व्यक्त केला त्यामुळे मी हे लिहिण्यास प्रवृत्त झालो. मला वाटते की, तुमच्यात साधे व सत्य सांगण्याची एक विलक्षण शक्ती फार मोठ्या प्रमाणात आहे. तशी शक्ती कोणाही विद्यमान राजकारणी माणसात नाही. हिंदुस्थानातील कटकटींचे मूळ तुम्हांला हिंदुस्थानात जे युरोपियन आहेत, ते हिंदी लोकांकडे तुच्छतेने पाहतात या गोष्टीत आढळते. मलाही तसेच वाटते. पण तुम्ही दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. पहिली गोष्ट, " हा दोष कोणाचा ? " आणि दुसरी, " त्यात सुधारणा कशी होऊ शकेल.
>
> हिंदुस्थानातील इंग्लिश माणसाला आम जनतेतील हिंदी माणसे स्वतःच्या लोकांपेक्षा कमी प्रतीची आहेत असे का वाटू नये ? आमच्यातील जे काही लोक वास्तवतेतून या गोष्टीकडे पाहण्याचा प्रयत्न करतात त्या आम्हांला काय दिसते ? एक चाकर किंवा नोकर म्हणून हिंदी मनुष्य हा इंग्लिश माणसापेक्षा आम्हांला कमी प्रतीचा वाटतो. तो कमी सदसद्विवेकबुद्धीचा असतो, तो अधिक सुट्ट्या घेतो, व त्याच्यावर देखरेख ठेवावी लागते. एक धनी किंवा मालक या दृष्टीने त्याच्यात कमी न्यायबुद्धी व कमी औदार्य असल्यामुळे तो इंग्लिश माणसापेक्षा कमी प्रतीचा वाटतो. तो आम्हांला जनावराइतकाच निकृष्ट वाटतो. तो रोगाला बळी पडतो. तो (वरच्या वर्गाचा असल्यास) व्यायाम घेण्याचे टाळतो. आणि तो ऐन

१. पाहा, " व्हाइसरॉय बोलतात ", ता. ८–६–१९२१.

तारुण्यात असावयास पाहिजे असताना एखाद्या म्हाताऱ्या माणसाप्रमाणे जीर्ण झालेला नेहमी दिसतो. त्याची मुले फार मोठ्या संख्येने मरतात. येथे मद्रासमध्ये पाच वर्षांच्या आतील मुलांचे मृत्यू जननाच्या निमपट इतके भयंकर असतात. नागरिक म्हणूनसुद्धा तो कमी दर्जाचा असतो. लाच देण्याच्या दडपणाचा तो प्रतिकार करीत नाही. जनावरांना आपण ठार मारीत नाही, म्हणून तो आपल्या माणुसकीची प्रौढी मिरवितो. पण तो गाईंनाही उपाशी मरू देतो. कोणत्याही सुधारलेल्या देशात घोडे व बैल हिंदुस्थानइतके वाईट रीतीने वागविले जात नसतील. वैवाहिक जीवनाची शुद्धता राखण्याकरिता ऋतुप्राप्तीपूर्वी विवाहाच्या व कायमच्या वैधव्याच्या संस्था त्यांनी स्थापन केल्या आहेत. आणि तरीही इंग्लंडपेक्षा हिंदुस्थानात गुप्त रोग अधिक धुमाकूळ घालीत आहेत. धर्माच्या नावाने लहान मुलींना येथे वेश्या बनविल्या जातात. ब्रिटिश स्त्री-पुरुष जे काम सध्या युद्धामध्ये शत्रू होते त्या राष्ट्रामध्ये करीत आहेत, असे कोणते बिगर हिंदी लोकांमध्ये काम करण्याकरिता, जीवन समर्पण करणारे लोक हिंदुस्थानात आहेत ? जर हिंदुस्थानला संपूर्ण स्वराज्य मिळाले आणि तो संकटात सापडला तर प्रत्येक साडेचार कोटी लोकांपैकी पन्नास लाख लोक स्वखुषीने सैन्यात दाखल होतील का ?

हिंदुस्थानच्या अफाट लोकसंख्येमध्ये ज्यांना मोठे म्हणता येईल असे किती थोडे हिंदी लोक निर्माण झाले आहेत फक्त तिघेच जिवंत आहेत. टागोर, बोस व गांधी. काय हे विलक्षण भरघोस पीक ! एलिझाबेथ राणीच्या वेळी इंग्लंडची लोकसंख्या आजच्या म्हैसूरपेक्षा अधिक नव्हती.

हा सारा विचार तुम्हांला एकतर्फी व चुकीचा वाटेल. कदाचित तसा तो असेलही; पण इंग्लिश माणसाला अशा दृष्टीने इंग्लिश व हिंदी माणूस यांच्यात तुलना करण्याकरिता दुसरे साधनच नसते. तसे असेल तर त्यावरील उपाय हिंदी लोकांच्या हातात आहे, आमच्या नाही. तुम्ही मार्गदर्शनाला सुरुवात केलीच आहे. मला असहकारिता हा तुमचा शब्द आवडत नाही. आणि त्या शब्दाने तुमचा अर्थ स्पष्ट होतो असे मला वाटत नाही. त्याऐवजी "स्वतंत्र कृती" हा शब्द मी पसंत करीन. हिंदी लोकांना अस्पृश्यता घालवू द्या, वैवाहिक जीवनात संयम वापरू द्या व अकाली मरणाऱ्या कोट्यवधी मुलांना जन्म देण्याचे थांबू द्या, ब्राह्मणांना शाळेत कताई व विणाई शिकू द्या व शरीरश्रमाचा तिरस्कार करण्याचे थांबू द्या. हिंदुस्थानात काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत बोलली व समजली

जाणारी एकच समान भाषा असू द्या, मग स्थानिक देशी भाषा ज्या राहावयाच्या असतील त्या राहतील. जेव्हा काही करावयाचे असेल तेव्हा हिंदी लोकांनी, " सरकारनेच हे केले पाहिजे " असे न म्हणता स्वतःच कामाला हात घालावा. या गोष्टी तुम्ही शिकविल्या आहेत. आणि जर जे " गांधीजी की जय " असे म्हणतात त्यांना या गोष्टी करू द्या; नंतर इंग्लिश लोकांना हिंदी लोकांबद्दल आज जितका आदर वाटतो त्यापेक्षा जास्त वाटू लागेल. या गोष्टी केल्यानंतर आणखी पुष्कळ गोष्टी करण्यासारख्या उरतील. त्यांतील सर्वांत महत्त्वाची म्हणजे, जुन्या चालीरीतींच्या छळाविरुद्ध बंड पुकारण्याची ती चालरीत बरोबर किंवा आवश्यक वाटत नसल्यामुळे बंड पुकारलेच पाहिजे. तुम्ही एकामागून दुसरे काम निःसंशय दाखवीत राहाल. तूर्त आम्ही थांबावे व काय होते ते पाहावे. ते एक कोटी रुपये खरोखरच जमा होतील काय ? वीस लाख चरखे मिळतील आणि मिळाले तर उपयोगात आणले जातील का ? असहकारितावादी स्वतः शिस्त पाळण्यास शिकतील का आणि दंगली पासून दूर राहतील का ? जे लोक सरासरीने हिंदुस्थानच्या सेवेकरिता सरासरी हिंदी माणसापेक्षा अधिक त्याग करावयास तयार असतील, अशा माणसांचे सरकार बनले तर त्या सरकारला सैतानी म्हणण्याचे गांधीजी थांबवितील काय ? दारूबंदीच्या युद्धातून बेलगामी बेकायदा दारू पिण्याच्या परिणामापेक्षा दुसरे काय निर्माण होणार आहे ?

जर ह्या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी मिळाली— पण ती मिळतील काय ?

तुम्ही आदराला पात्र झालात म्हणजे इंग्लिश लोक तुम्हांला आदर दाखवितील. इंग्लिश लोक हिंदी लोकांना आदर दाखवीत नाहीत अशी तक्रार करू नका. त्याऐवजी अशी तक्रार करा की, हिंदी लोक अद्याप आदराला पात्र झाले नाहीत.

माझ्यापुरते सांगावयाचे म्हणजे, मला असे वाटते की, तुम्ही फार मोठ्या गोष्टी प्राप्त करीत आहात व प्राप्त करून घेणार आहात. " मनुष्य प्रशंसा, आशा व प्रेम यावर जगतो. " याच गोष्टींवर मोठाल्या राष्ट्रांची उभारणी होते. हिंदुस्थान तसे एक मोठे राष्ट्र होवो.

जॉन बुलचे पत्र असे दाखविते की, लेखकाने चळवळ समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या टीकेतील बहुतांश हा अस्थानी नाही. जॉन बुलने सामान्य इंग्लिश माणसाचा अनुभव सांगितला आहे. पण त्यांनी काढलेले सर्वसामान्य निष्कर्ष हे मला

वाटते टिकू शकणार नाहीत. त्यांचा अनुभव अत्यल्प हिंदी लोकांपुरताच मर्यादित आहे. हे हिंदी लोक लष्करी छावणीमध्ये महत्त्वाकांक्षेच्या उद्दिष्टाने ओढले गेले आहेत व ते आम जनतेचे प्रतिनिधी खासच नाहीत. दोन्ही वर्णांच्या विशाल अनुभवावरून मला असे वाटते की, हिंदी मनुष्य हा व्यक्तिशः जगातील कोणत्याही वर्णाच्या माणसापेक्षा कमी प्रतीचा नाही. प्राणी या दृष्टीने आपण इंग्लिशांपेक्षा कमी आहोत हे कबूल केले पाहिजे. पण त्याचे कारण मुख्यत्वे हवा पाणी हेच आहे. जनावरांच्या कल्याणाबद्दल आपण अनास्था दाखवितो हा आरोप सहज शाबित होण्यासारखा आहे. मोठाली शहरे सोडली तर आमच्यात दुसऱ्या वर्णांच्या लोकांपेक्षा उपदंशाचे विकार अधिक आहेत असे मला वाटत नाही. वेश्याव्यवसायाकरिता मुली समर्पण करणे मोठा कलंक आहे. जर हिंदी लोकांना इंग्लिशांच्यासारखे शिक्षण मिळेल आणि जर हिंदुस्थानची इंग्लंड-सारखी स्थिती असेल तर हिंदी जनता अधिक चांगल्या रीतीने वागेल. पण आमची संस्कृती भिन्न आहे आणि ती आम्ही अखेरपर्यंत टिकविणार आहोत अशी मला आशा आहे. हिंदुस्थानची वृत्ती युयुत्सू नाही. आपल्याच चुकत असलेल्या बांधवांना ठार मारण्याकरिता खंदकात कोट्यवधी लोक पाठविणे यात आम्हांला मोठेपणा वाटत नाही. मुसलमानांसह हिंदुस्थानची जनता दुसऱ्यावर क्लेश लादण्याऐवजी स्वतःवर क्लेश लादून घेण्यास अधिक लायक आहे असे मला वाटते. याच विश्वासाने मी हिंदुस्थानच्या अनेक व्याधींवर असहकारितेचा इलाज सुचविण्याचे धाडस केले आहे. तो इलाज हिंदुस्थानला लागू पडेल किंवा नाही हे पाहावयाचे आहे. केवळ सूडाच्या बुद्धीने तो इलाज स्वीकारला असेल तर तो अपयशी होईल पण जर तो आत्मशुद्धी व स्वार्थत्याग याकरिता घेतला असेल तर तो खात्रीने यशस्वी होईल. मला तो त्याकरिताच घेतला आहे असे वाटते. हिंदुस्थान भित्र्या लोकांचे राष्ट्र नाही, ही गोष्ट येथील लष्करी जातीच्या लोकांच्या वैयक्तिक शौर्याने व धाडसाने सिद्ध झाली आहे. मग त्या जाती हिंदू, मुसलमान, शीख किंवा गुरखा असोत. माझा मुद्दा असा की, लढाऊ वृत्ती ही हिंदुस्थानच्या भूमीला परकी आहे. आणि कदाचित जगाच्या विकासात हिंदुस्थानला अधिक मोठी कामगिरी बजवावयाची असेल. तिच्या दैवात काय आहे, हे काळच दाखवील !

पण जॉन बुल यांना उत्तर म्हणून मी जे काय लिहिले आहे ते सर्व खास तरफ-दारी करणारे आहे, असे समजण्याचा त्यांना अधिकार आहे. माझी इच्छा अशी आहे की, अशा प्रकारची टीका ही मित्रत्वाचा इशारा म्हणून आपण मानावी आणि आपण सर्व अशुद्धी काढून टाकण्यास सुरुवात करावी. आदराला पात्र होणे हे अनादरा-बद्दल कुरकूर करण्यापेक्षा अधिक चांगले हे जॉन बुलचे म्हणणे मला मान्य आहे. आणि नेमक्या त्याच कारणाकरिता हिंदुस्थानात असहकारिता स्वीकारली आहे. लेख-कला तो शब्द आवडत नाही. मला जर अधिक चांगला शब्द आढळला तर मी आजच हा शब्द टाकून देईन. पण सध्याच्या बाबतीत तोच शब्द योग्य ती गरज पुरविणारा

आहे. आम्ही स्वतःची मानहानी करून घेत असता दीर्घकालपर्यंत सहकारिता केली. यापुढे तसे करण्यास नकार देणे हे आमचे कर्तव्य आहे. त्याकरता दोषाची वाटणी करण्याचीही जरूरी नाही. जॉन बुल यांनी यथायोग्य मान्य केल्याप्रमाणे सामान्य इंग्लिश माणसाला आमच्याबद्दल फार कमी आदर आहे ही गोष्ट खरीच आहे. म्हणून जोपर्यंत आम्हांला व त्यांना आपण बरोबरीचे आहोत असे वाटत नाही तोपर्यंत आम्ही बाजूलाच राहिले पाहिजे.

'जॉन बुल' याच्या युक्तिवादाला पण दुसरी बाजू आहे. त्याच्या वृत्तीवरून आमच्या वंशाबद्दल त्यांना तिटकारा आहे असे उघडकीस येते. लेखकाने वर्णन केल्याप्रमाणे आमच्यात उणीवा आहेत ही गोष्ट गृहीत धरली तरी त्याकरिता हिंदी लोकांना कमी दर्जाची माणसे मानून त्यांच्याकडे तुच्छतेने पाहणे हे योग्य आहे काय? समानतेच्या सिद्धांताला सारखे गुणधर्म लागतात हे विचारात न घेता परस्पराविषयी आदर असावा लागत नाही काय? ज्याप्रमाणे पुष्कळ हिंदू लोक अस्पृश्यांबद्दल चुका करतात तीच चूक जॉन बुल करीत नाहीत काय? जर मी अस्पृश्यतेच्या वृत्तीला सैतानी म्हणण्यात बरोबर ठरत असेन, तर इंग्रजी श्रेष्ठत्वाच्या संप्रदायाला त्याच नावाने संबोधण्यात कमी बरोबर ठरेन काय? ज्याप्रमाणे इंग्लिश लोक हिंदी लोकांच्या बरोबर वर्तन करतात, तसेच वर्तन ते आपल्या कमी दैवशाली बांधवाबरोबर करतात काय? ज्याप्रमाणे हिंदू धर्माने अस्पृश्यांना कायमच्या गुलामगिरीत टाकले आहे असे म्हणतात त्याचप्रमाणे इंग्लिश लोक आपण राज्य करण्याकरिता जन्माला आलो आणि हिंदी लोक आज्ञा मानण्याकरिता जन्माला आले आहेत असे समजत नाहीत काय? माझे सारे अंतःकरण सध्याच्या सरकारी पद्धतीविरुद्ध बंड करून उठले आहे. कारण जर इंग्लिश लोक आपल्या पूर्वनियतीच्या वर्चस्वाचे थोतांड टाकून देणार नसतील तर ब्रिटिशांच्या संबधामध्ये हिंदुस्थानला खरे स्वातंत्र्य मिळणार नाही असे मला वाटते. इंग्लिश लोकांच्या या वृत्तीने सर्वात श्रेष्ठ अशा हिंदी माणसाचीदेखील संपूर्ण मोठेपणाला पोहोचण्याची संधी हिरावून घेतली आहे. आणि म्हणून इंग्लिश राज्यकर्त्यांचे व्यक्तिशः कितीही चांगले हेतू असोत, आमचा स्वतःच्या योग्यतेविषयीचा विश्वास नष्ट झाला आहे ती गोष्ट इतक्या थराला गेली आहे की, आमच्यातील पुष्कळांना असे वाटते की, आपण इंग्रजांच्या हाताखाली दीर्घकालपर्यंत शिक्षण घेतले पाहिजे. उलटपक्षी माझी अशी खात्री आहे की, आज सुद्धा आम्ही स्वतःवर राज्य चालविण्यास पूर्णपणे लायक आहो. म्हणून ज्या सुधारणा संपूर्ण स्वराज्यापेक्षाही कमी प्रतीच्या आहेत. त्यांच्याद्वारा कारभार चालविण्याकरिता आम्ही इंग्रजांबरोबर सहकार्य करण्याचे निश्चयपूर्वक नाकारले पाहिजे. खरोखरच आम्ही चुका करू. आजच्यापेक्षा कदाचित जास्त करू. आम्ही चुका करता करता शिकू. पण आम्हांला सक्तीने चुका करण्यास प्रतिबंध करून आम्ही कधीही शहाणे होणार नाही.

'यंग इंडिया', २२-६-१९२१

१२२. पत्रलेखकांना[1]

आर्. शर्मा: जेथे जरूरी असेल तेथे असहकारी कैद्यांच्या कुटुंबांची काळजी स्थानिक कार्यकर्ते घेत आहेत.

एल्. एन्. दास : बक्षिसाकरिता जे चरखे पाठवावयाचे ते स्वतःच्या खर्चाने सत्याग्रहाश्रम, साबरमती येथे पाठवावेत. ज्या चरख्यावर कमीत कमी तीन पौंड सारखे व चांगल्या पिळाचे सूत आठ तासांत निघेल, असाच चरखा शोधून काढणाराला पाच हजार रुपये बक्षीस मिळेल. ज्या चरख्याचे भाग हिंदुस्थानात तयार होऊ शकतील अशा भागांचा तो चरखा असावा व त्याची किंमत पन्नास रुपयांपेक्षा जास्त असता कामा नये.

बी. नारायण : जर वकिली थांबविलेल्या वकिलांनी असहकारितेच्या इतर अटी पुऱ्या केल्या नाहीत किंवा त्यांचा चळवळीवर विश्वास नसेल तर केवळ वकीली थांबविली म्हणून त्यांना असहकारितावादी म्हणता येणार नाही. एखादा वकील आपला वेळ ही चळवळ नष्ट करण्याकरिता खर्च करण्याची शक्यता आहे. एखाद्या कृत्याचे गुणधर्म हेतूवरून ठरविता येतात.

व्ही. व्ही. साठे : तुमचे पत्र प्रसिद्ध करणे आवश्यक नाही. जे अज्ञान, दुष्ट हेतू किंवा अविश्वास यामुळे असहकारितेला विरोध करीत असतील त्यांनादेखील आपण ज्ञान, प्रेम आणि विश्वास यांनी अनुक्रमे जिंकले पाहिजे.

टी. एम् : राष्ट्रीय कार्याकरिता कर्ज काढण्याची कल्पना वाईट नाही. पण तुम्ही निधीचा मुख्य उद्देश विसरत आहात. तो म्हणजे लोकमान्यांची स्मृती चिरायु करणे. हाती घेतलेले काम आपण शेवटास नेले पाहिजे. अधिक पैसा लागला तर आपण कर्जाचा विचार करू. कर्ज हे स्मारकनिधीची जागा घेऊ शकत नाही. ती स्वच्छेची देणगी असली पाहिजे.

आर्. सी. माथुर : जेव्हा अस्पृश्यता पूर्णपणे नाहीशी होईल तेव्हा भंगी लोकांना जर योग्य रीतीने पैसा दिला व चांगली वागणूक दिली तर ते सफाईचे काम

१. बहुधा हा लेख गांधीजींचा असावा.

करण्यास नकार देतील अशी भीती नाही. जगातील इतर भागात अधिक चांगले नसले तरी बरेचसे सफाईचे काम केले जाते. पण भंग्यांच्या वरील हा दुष्ट अडसर काढून टाकला व त्यांनी भंगीकाम करण्याचे नाकारले तर ते आपण स्वतः केले पाहिजे. अस्पृश्यता निवारण्याचा अर्थच असा आहे की, दुसऱ्यांच्याकरिता सफाई करण्यातच काही पाप किंवा लाज नाही. ज्याप्रमाणे आईला आपल्या मुलाची घाण काढण्यात पाप वाटत नाही किंवा पगारी परिचारिकेला आपल्या रोग्याची सफाई करण्यात पाप वाटत नाही, तसेच हे आहे.

'यंग इंडिया', २२-६-१९२१

१२३. शाळेच्या उद्घाटन प्रसंगीचे भाषण, मुंबई[1]

जून २२, १९२१.

महात्मा गांधींनी आपल्या भाषणात श्रोत्यांच्या मनावर असे बिंबवले की, त्यांनी आपल्यापुढे नेहमी स्वराज्याचे ध्येय ठेवावे आणि त्या ध्येयाकरिता आपली सारी शक्ती लावावी. ज्या शिक्षणामुळे मुले मातृभूमीवर प्रेम करतील, त्यांना देशप्रेमी बनवतील, स्वतःचे प्राण समर्पण करण्याच्या कर्तव्याची जाणीव करून देतील आणि वर्ष संपण्यापूर्वी स्वराज्य मिळेल असे शिक्षण त्यांनी आपल्या संस्थांतून द्यावे, व तेवढेच शिक्षण उपयुक्त असते. आपल्याला कताई करावयाची आहे आणि खादी वापरावयाची आहे. तसेच खिलाफत पंजाबचे अन्याय दूर करावयाचे आहेत. कुमारी कृष्णाबाई व कुमारी जसलक्ष्मी या येथे पैशाकरिता आल्या नाहीत पण देशासंबंधी कर्तव्य करावयाला आल्या आहेत.

महात्मा गांधी म्हणाले, मला शाळा उघडण्याकरिता बोलाविले पण माझा सध्या कोणतीही शाळा उघडण्याचा उद्देश नाही. मी पुष्कळ शाळा

१. गांधींनी लोकमान्य राष्ट्रीय कन्याशाळा गांधर्व महाविद्यालय, मुंबई, येथे उघडली. ती पहिली मुलींची राष्ट्रीय शाळा होती.

उघडल्या आहेत आणि लोकांना माझे यासंबंधीचे विचार माहीतही आहेत. त्याची पुनरुक्ती करण्याची जरूरी नाही.

हिंदुस्थानच्या दैवातील सध्यांच्या कठीण काळात अशा शाळा उघडण्यात एकच उद्देश असावा आणि तो म्हणजे स्वराज्य मिळविणे. प्रश्न, फक्त स्वराज्य मिळविण्याचा नसून ह्या वर्षात ते मिळविण्याचा आहे. नंतर आपणाला पंजाबचा अन्याय आणि खिलाफतीचा प्रश्न नीट रीतीने सोडवावयाचा आहे. हे दोन प्रश्न मनातून काढून टाकता येणे शक्य नाही. याच वर्षी जर स्वराज्य मिळविण्याचा तुमचा निश्चय असेल तर त्याकरिता काय करावे याचा तुम्ही विचार केला पाहिजे. तुम्ही स्वराज्य मिळविण्याच्या प्रश्नावर आपले सारे लक्ष केंद्रित केले पाहिजे व त्या दिशेने पावले टाकली पाहिजेत. जर आपली मुले शिक्षण न मिळता राहिली तर त्यांचे फारसे नुकसान होईल असे मला वाटत नाही. हिंदुस्थान सध्या अनेक आपत्ती भोगीत आहे व त्या दूर करण्याकरिता स्वराज्य हवे आहे. आपल्या मुलांचे रक्षण करण्याला आपण पुरेशी शक्ती प्रथम मिळविली पाहिजे. आणि हिंदी लोकांत त्यांच्या रक्षणाची पुरेशी शक्ती नाही असेच मी म्हणतो. त्याकरिता तुम्ही आपली उपजत शक्ती कमावली पाहिजे. कोणतेही काम करण्याकरिता आपल्या शक्तीची जाणीव हिंदी लोकांना झालेली नाही. आपण कोणत्या गोष्टी करू शकतो हेही अद्याप त्यांना समजले नाही. जेव्हा लोक आपले कर्तव्य करीत असताना मरावयाला तयार होतात, तेव्हा ते अत्यंत मोठे योद्धे व अत्यंत थोर लोक होतात.

ज्या देशाने आपल्याला जन्म दिला, त्या देशासंबंधी आपले कर्तव्य करणे, यापेक्षा जगात अधिक मोठी गोष्ट नाही. या कठीण काळात आपले कर्तव्य करण्यास हिंदी लोकांनी मुलांना शिकविले पाहिजे. हे देशासंबंधी कर्तव्य करीत असता मरणदेखील पत्करा असे मी सांगेन. ही कन्याशाळा उघडताना हाच मुख्य उद्देश तुमच्यापुढे आहे. आणि जर ते ध्येय सतत डोळ्यांपुढे ठेवलेत तर तुम्ही स्तुतीलाच पात्र व्हाल. पण जर तुम्ही ह्या शाळेत, सरकारी किंवा म्युनिसिपल शाळेत जे विषय शिकवितात, तेच विषय येथे शिकविले तर ह्या वर्षात त्या मार्गाने स्वराज्य मिळविणे अशक्य आहे असे मी सांगेन. याच वर्षात स्वराज्य मिळविणे हे पहिले ध्येय आहे. आणि ते ध्येय पुढे ठेवून शिक्षकांनी मुलांना शिक्षण द्यावे. देशाकरिता स्वराज्य किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी मुलांना पटवून द्यावे. आणि देशाच्या गरजांविषयी त्यांनी मुलांना जागृत करावे.

याचकरिता त्यांनी शाळेत कताई-शिक्षण द्यावे. तुमच्यापैकी प्रत्येकाने खादी वापरली नाही तर स्वराज्य मिळेल असे मला वाटत नाही. जर तुम्ही हे वर्ष संपण्याच्या आत सर्व परदेशी कापडावर बहिष्कार घातलात तर स्वराज्य मिळविण्यात यत्किंचितही अडचण येणार नाही. आणि राखण्यातही येणार नाही. त्या उद्देशाने तुम्ही पुरुष, स्त्रिया व मुले यांची सहानुभूती संपादन करा व त्यांच्या शक्ती कामाला लावा. जे उद्दिष्ट आपल्याला गाठावयाचे आहे त्याचा मोठेपणा आपण सर्वांना पटविला पाहिजे. हिंदी लोकांनी आपल्या मुलांना देशाबद्दल प्रेम वाटावयास लावले पाहिजे. मी जी शाळा आज उघडणार आहे, ती जर या साऱ्या गोष्टी करणार असेल तर मी सर्व आईबापांना त्यांची मुले या शाळेत पाठविण्यास सांगेन. कारण तसे केल्याने ते स्वतःचीच नव्हे तर त्याबरोबर देशाचीही महान सेवा करणार आहेत. तुम्ही तुमच्या मुलांना देशप्रेम शिकवू शकाल व स्वराज्य मिळविण्याचा मार्ग दाखवू शकाल. पण जर आईबापांनाच देशासंबंधीचे कर्तव्य समजले नसेल तर मुलांच्याकडून त्या कर्तव्याची अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे. आपल्या मुलांमुलींना या शाळेत आईबापांनी पाठवावे असे सांगण्यात माझा उद्देश असा आहे की, मुला-मुलींनी खादी वापरावी व आपल्या आईबापांना खादी वापरण्यास लावावे. काही जण असे म्हणतील की, त्यांना खादी वापरण्यास सांगणारा गांधी हा मूर्ख मनुष्य आहे. प्रत्येकाने आता देशाविषयी आपले कर्तव्य केले पाहिजे. त्यांच्यापैकी प्रत्येकाने खादी वापरली पाहिजे. गांधी म्हणाले की, मी अशी देवाची प्रार्थना करतो की, जी नवी संस्था आज सकाळी मी उघडली आहे, तीवर त्याने कृपेची वृष्टी करावी आणि तिची भरभराट करावी व तिला यशस्वी करावे.[१]

महात्मा गांधी म्हणाले, मी एक गोष्ट सांगावयाला विसरलो, आणि त्या गोष्टीची आठवण बॅन्कर यांनी करून दिली. जरूर असलेले शिक्षक मिळाल्याशिवाय अशा शाळा सुरू करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. आता त्यांना श्रीमती कृष्णाबाई व श्रीमती जयलक्ष्मी या शिक्षिका मिळविण्यात यश आले आहे. श्रीमती कृष्णाबाई या अलाहाबादच्या क्रॉस्थवेट मुलींच्या शाळेच्या प्रिन्सिपॉल होत्या व तेथे गेलो असता त्यांची गाठ पडली होती. त्या वेळी माझे त्यांच्याशी असहकारितेसंबंधाने

१. सरोजिनी नायडूंच्या भाषणानंतर गांधीजी पुन्हा चार शब्द बोलले.

बोलणे झाले व इतर शिक्षिकांच्याबरोबरही बोलणे झाले. कुमारी कृष्णाबाई यांनी माझ्या कामात शक्य ती मदत करण्याकरिता मुंबईस येण्याचे कबूल केले होते. त्या महाराष्ट्राच्या आहेत आणि त्यांना अलाहाबादला राहणे आवडत नव्हते. त्या अमेरिकेत शिक्षणाकरिता होत्या व त्या चांगल्या सुशिक्षित आहेत. त्या मुंबईस देशसेवेकरिता आल्या असून पैशाकरिता आलेल्या नाहीत. कुमारी कृष्णाबाई यांना हे काम एकट्याने करणे शक्य नव्हते. त्या महाराष्ट्रीय होत्या व तेथे कोणी तरी गुजराती मुलींच्याकडे लक्ष देण्यास हवे होते. त्याकरिता त्यांना कुमारी जसलक्ष्मी दलपतराम कवी या मिळाल्या. त्या अहमदाबादच्या महालक्ष्मी ट्रेनिंग कॉलेजात पहिल्या मदतनीस होत्या. ही शाळा सुरू होण्यापूर्वीच त्यांनी नोकरी सोडली होती. व त्या अहमदाबादला आश्रमात राहात होत्या. जरी त्यांना मुंबईसारख्या मोठ्या शहरात राहण्याचा तिरस्कार वाटतो तरी त्या देशाविषयीच्या कर्तव्याने मुंबईस आल्या आहेत. पण त्यांना काही काम करावयाचे आहे आणि ते म्हणजे गुजराती मुलींच्याकडे लक्ष देणे. हिंदी लोकांनी आपली मुले विश्वासाने येथे पाठवावी, व त्यांना या दोन कर्तबगार स्त्रियांच्या स्वाधीन करावे.

नंतर टिळक स्वराज्य फंडाकरिता पैसे जमविण्यात आले. काहींनी दागिने दिले व बराच पैसा जमला. एका पारशी मुलीने आपली सोन्याची बांगडी दिली व एका पारशी गृहस्थाने चेक दिला.

गांधी म्हणाले, लोक म्हणतात की, पारशी लोक फंडाला पैसे देणार नाहीत. पण ते खरे नसल्याचे त्यांनी सांगितले. मला त्यांच्याकडून पूर्वी पैसा मिळाला. आताही मिळत आहे आणि पुढे मिळेल असा विश्वास आहे.

‘दि बॉम्बे क्रॉनिकल’, २३-६-१९२१

१२४. मुंबईच्या[1] स्त्रियांच्या सभेला संदेश

जून २२, १९२१

महात्मा गांधींनी सभेला एक संदेश पाठविला व सभेस आपण येऊ शकत नाही याबद्दल क्षमा मागितली. मिसेस मोतीवाला यांनी तो संदेश वाचला. संदेशात गांधी म्हणाले की, मुंबईच्या भगिनींना पुष्कळ वेळा भेटलो आहे. मी नेहमी त्यांना काय सांगणार? मी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या करिता भुकेलेला आहे देवाला माझी अशी प्रार्थना आहे की, हिंदी स्त्रिया पवित्र, निर्भय व साध्या असाव्यात. स्त्रियांच्या आशीर्वादाशिवाय या देशात धर्मराज्य स्थापन होणार नाही. त्यांनी ह्याच वर्षात विलायती कपडे वापरण्याचे टाकून दिले पाहिजे. व त्याकरिता मला तुम्हा भगिनींच्या मदतीची जरूरी आहे. चरखा चालविणे व खादी वापरणे हे स्त्रियांनी आपले धार्मिक कर्तव्य मानले पाहिजे. व त्याकरिता पुष्कळ गैरसोयी सोसाव्या लागल्या तरी त्या सोसल्या पाहिजेत. स्वतःच्या हातांनी तयार केलेले कपडे त्यांनी वापरावे, परदेशी कापड वापरणे त्यांनी पाप मानावे. फक्त गरिबांनी गिरणीचे कापड वापरावे, मला या कामाकरिता पुष्कळ पैसा हवा आहे. व त्याकरिता स्त्रियांच्या मदतीची जरूरी आहे. जर स्त्रिया फक्त टिळक स्वराज्य फंडाकरिताच काम करतील तर त्या सहज मोठी रक्कम जमा करू शकतील यात मला शंका वाटत नाही. तो उद्देश सफल करण्याकरिता पारशी, हिंदू व मुसलमान स्त्रिया काम करीत आहेत हे सुचिन्ह आहे.

'मुंबई क्रॉनिकल', २३-६-१९२१

१. ही सभा राष्ट्रीय स्त्री समाजातर्फे मारवाडी विद्यालयाच्या हॉलमध्ये भरली होती. हर-हायनेस नझदी बेगम रिफया सुलताना अध्यक्ष होत्या. वक्त्यांत अलीबंधू होते. सरोजिनी नायडू व इतरांनी स्वराज्य फंडाला पैसे जमविले.

१२५. श्री. एस्. आर्. हिग्नेल यांना पत्र

लॅबरनम रोड,
गावदेवी, मुंबई
जून २४, १९२१.

प्रिय मि. हिग्नेल,

व्हाइसरॉयांचे भाषण व अलीबंधूंविषयींचे पत्रक यांविषयी लिहिण्याचा पुष्कळ वेळ विचार आला. पण मी घाईने पाऊल टाकू नये किंवा अविचाराचा शब्द लिहू नये म्हणून पत्र लिहिण्याला मुद्दाम विलंब केला. व्हाइसरॉयसाहेबांना मला सांगावयाचे आहे की, पत्रक व भाषण यांमुळे मला अत्यंत दुःख झाले असे व्हाइसरॉयना मला कळवावयाचे आहे. मी जेव्हा सिमला सोडला तेव्हा मला जी परिस्थिती समजली तिचे बिनचूक चित्रण दोहोतही नाही. मुलाखतीबद्दल चौकशीच्या पुरात मी सापडलो आहे. माझी अशी सूचना आहे की, एक तर मुलाखतीचा सारांश देणारे उभयसंमत निवेदन प्रसिद्ध करावे किंवा मुलाखतीबद्दल पाळावयाच्या गुप्ततेच्या बंधनातून मला मुक्त करावे. माझ्यासंबंधी सांगावयाचे म्हणजे मी व्हाइसरॉयना जे म्हणालो त्यातील काहीही गुप्त राखावे अशी माझी इच्छा नाही.

बहुधा तुम्ही व्हाइसरॉयचा निर्णय तारेने मला कळवाल. ३० जूनपर्यंत माझा पत्ता लॅबरनम रोड हा आहे.

गांधींच्या हस्ताक्षरातील मसुद्याच्या फोटो स्टॅटवरून एस. एन्. ७५५९

१२६. शिक्षकांच्या कार्यावरील भाषण, मुंबई[1]

जून २५, १९२१

गांधी म्हणाले, जेव्हा शिक्षकांनी मला बोलाविले तेव्हा शिक्षक फारसे काही देऊ शकणार नाहीत ही माझी खात्री होती. तथापि मी त्यांचे आमंत्रण मोठ्या आनंदाने स्वीकारले. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची किल्ली शिक्षकांच्या हातात आहे असे मला एक अनुभवी शिक्षक म्हणून वाटते. मी देशभर हिंडत असताना लोकांना असे सांगत आलो आहे की, स्वातंत्र्याची किल्ली आणि खिलाफतीचा अन्याय व पंजाबची गाऱ्हाणी दूर करण्याची साधने स्त्रीपुरुष शिक्षकांच्या हाती आहेत. हिंदी स्त्रियांनी योग्य रीतीने देशासंबंधी कर्तव्य बजाविले हे गांधींनी मान्य केले. जर हिंदी लोक गरीब असले आणि जगात इतक्या खालच्या दर्जाचे असले तर त्याची राज्यकर्त्याइतकीच त्यांच्यावरही जबाबदारी आहे. जसा राजा असतो तशी प्रजा असते हे जसे खरे आहे तशीच जशी प्रजा असते तसे राजे असतात हेही खरे आहे. मी त्याच वेळी असे म्हणतो की, लोकांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे शिक्षक मिळतात. भगवत्गीतेत असे म्हटले आहे की, श्रेष्ठ माणसे जसे वर्तन करतात तसे इतरेजन वर्तन करतात. आपली विद्वान माणसे आणि राज्यकर्ते जसे वर्तन करतात तसे इतर लोक करतात. कॉंग्रेसने असा एक ठराव पास केला आहे की, वकिलांनी जसे देशासंबंधी आपले कर्तव्य करावे तसेच शिक्षकांनीही करावे. माझी खात्री आहे की, ज्या शिक्षकाला देशसेवा करावयाची असेल त्याला कधीच उपाशी राहावे लागणार नाही.

गांधी म्हणाले, जेव्हा मी फार मोठ्या संख्येने विद्यार्थी शिकविले जात असलेले पाहिले आणि अध्यापन महाविद्यालयात कित्येक शिक्षक अध्यापनाकरिता शिकविले जात असलेले पाहिले तेव्हा मला देशाबद्दल दुःख झाले. कारण मला खात्रीपूर्वक असे वाटले की, या महाविद्या-

१. मुंबईतील प्राथमिक शाळांतील शिक्षकांची व विद्यार्थ्यांची सभा मांडवीला भरली होती गांधींना टिळक स्वराज्य फंडाकरिता थैली द्यावयाची होती.

लयांतून जे शिक्षक बाहेर सोडले जातील, ते शिक्षक या देशातील तरुण पिढीला शिकविण्याकरिता व त्यांना वळण लावण्याकरिता योग्य आहेत असे मला वाटत नाही. या महाविद्यालयात इतकी गुलामगिरी आहे की, मला या देशाच्या भवितव्याबद्दल निराशा वाटते. सरकारी महाविद्यालयात अध्यापनाचे शिक्षण मिळविलेल्या व सध्या मुंबईच्या राष्ट्रीय कन्याशाळेत शिक्षक असलेल्या श्रीमती जसलक्ष्मीने मला आपले अनुभव सांगितले. त्या सरकारी महाविद्यालयात जोपर्यंत आपण नोकरी करीत आहोत तोपर्यंत स्वतःचा मान व स्वातंत्र्य राखणे अशक्य आहे, असे वाटल्यावरून त्यांना ते महाविद्यालय सोडणे भाग पडले. जेव्हा एक सुशिक्षित व प्रतिष्ठित स्त्री असे सांगते तेव्हा सरकारी शाळांतून नोकरी करणे म्हणजे खरोखर काय आहे हे कळून येईल. अन्य राष्ट्रांच्या दृष्टीने हिंदुस्थान जो इतका खालावला आहे त्याचे हे एक कारण आहे. मला सांगण्यास दिक्कत वाटत नाही की, शिक्षकांनी इतर लोकांप्रमाणे शिक्षकाचा जो धंदा पत्करला आहे, तो पोटाला कमविण्याकरिता. तो धंदा चांगला व श्रेष्ठ आहे व आपण त्यामुळे देशाचे कल्याण करीत आहोत याकरिता तो पत्करलेला नाही. ज्याप्रमाणे डॉक्टर व वकील आपला व्यवसाय धंदा म्हणून करतात त्याचप्रमाणे शिक्षकांनी हा धंदा दुसऱ्या कशाकरिता पत्करला नसून पैशाकरिता पत्करला आहे. गांधी म्हणाले, मी वकील झालो व हिंदुस्थान बाहेर गेलो कारण माझ्या लोकांना वाटले की त्यामुळे मी अधिक पैसा मिळवीन. त्या वेळी देशसेवा करावी हा माझा हेतू नव्हता. पण नंतर मला पटले की, देशसेवा करणे ही उत्तम गोष्ट आहे. म्हणून मी त्या साऱ्या गोष्टी सोडून दिल्या. माझी शिक्षकांना अशी विनंती आहे की, देशात जो महान यज्ञ चालला आहे, त्या यज्ञात आपला हविर्भाग द्यावा.

चांगले असणे व इमानी असणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. त्यांनी मुलांना सद्गुणी निर्भय व सत्यनिष्ठ होण्यास शिकवावे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी ब्रह्मचर्य पाळावे. हिंदुस्थानात प्रचलित असलेल्या व्यभिचारामुळे आपण घाबरून गेलो आहोत आणि जर याच पद्धतीने सतत गोष्टी घडत राहिल्या तर तुम्ही स्वराज्याला कधीच पात्र होणार नाही असे मला भय वाटते. अशा बाबतीत दुसऱ्या देशांचे अनुकरण करणे हे आपले काम नाही. मुलांना शूर व सत्यनिष्ठ होण्यास शिकविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. जे स्वराज्य आपण स्थापणार आहोत, ते सदाचाराच्या पायावर, असदाचाराच्या पायावर नाही. आम्ही धर्मराज्य स्थापण्याकरिता बाहेर पडलो आहोत व ते राज्य बलात्काराने व दुसऱ्या मार्गाने आम्ही

स्थापणार नाही. जेव्हा हजारो मुसलमान मारण्याकरिता नव्हे पण मरण्याकरिता तयार होतील, जेव्हा हजारो हिंदू दुसऱ्यांचे प्राण न घेता आपले प्राण देण्यास तयार होतील तेव्हाच स्वराज्य हस्तगत झाले अशी खात्री बाळगता येईल खिलाफतीचा प्रश्न सुटण्याबरोबरच गोरक्षणाचाही प्रश्न सुटेल.

त्यांनी विद्यार्थ्यांना पुन्हा ब्रह्मचर्य पाळण्यास सांगितले, कारण हिंदू धर्माइतका त्या प्रश्नावर इतर धर्मांनी जोर दिलेला नाही. हिंदी लोकांनी व्यभिचारसुद्धा टाकला पाहिजे. त्यांनी स्वतःच्या पत्नीशिवाय प्रत्येक स्त्रीला आपली आई, किंवा बहीण किंवा मुलगी मानले पाहिजे. ह्या देशात इतके पाप होत असलेले पाहून धर्मावर अधिष्ठित झालेले स्वराज्य मिळण्याबद्दल मी मनात निराश झालो आहे. जर धर्मराज्याबद्दल तुमचा निश्चय झाला असेल तर शिक्षकांना हे पटले पाहिजे की, त्यांनी मुलांना योग्य वृत्तीचे शिक्षण दिले पाहिजे. जेव्हा ते आपल्या मुलांमुलींच्यामध्ये चांगली तत्त्वे बिंबविण्यात यशस्वी होतील तेव्हाच देशाला चांगले नागरिक मिळतील. आपल्या धर्मराज्याकरिता सद्गुणी स्त्रीपुरुषांची गरज आहे. आपले विद्यार्थी सत्यनिष्ठ व्हावेत अशी अपेक्षा बाळगीत असताना जर शिक्षकच वरिष्ठ अधिकाऱ्यांना खोटे सांगू लागले तर विद्यार्थी आपल्या शिक्षकांपासून तसलेच धडे घेतील; म्हणून स्वतःच्या उदाहरणावरून त्यांना शिकविले पाहिजे. आपण आपली पातके धुवून टाकली पाहिजेत. या गोष्टीतून आपण मुक्त झाले पाहिजे व दुर्गुणांचे गुलाम होता कामा नये.

जोपर्यंत स्त्रीपुरुषांना देशासंबंधीच्या कर्तव्याची जाणीव होणार नाही व खादीऐवजी चांगले परदेशी कापड वापरावे असे वाटत राहील तोपर्यंत आपल्याला कधीही स्वराज्य मिळणार नाही. जर त्यांनी याच वर्षी परदेशी कापड पूर्णपणे टाकून दिले नाही तर त्यांना या वर्षी स्वराज्य मिळणार नाही. आम्ही एक कोटी रुपये जमवू शकू, एवढ्यावरून आपल्याला सहज स्वराज्य मिळेल अशा भ्रमात त्यांनी राहू नये. स्वराज्य पदरात पडण्यापूर्वी त्यांना पुष्कळ गोष्टी कराव्या लागतील. जे पैसे तुम्ही जमवाल त्याचा उपयोग शाळा-कॉलेजे काढण्याकरिता व इतर अनेक गोष्टींकरिता करावा लागेल. इतके करूनही पुष्कळ गोष्टी करावयाच्या राहतील. म्हणून मी स्त्रीपुरुष शिक्षकांना असे सांगतो की, तुम्ही आपल्या शरिराचे रक्षण करा व ती शरीरे शुद्ध व लांछनरहित ठेवा, आणि हे सर्व मनाच्याकरिता जितक्या काळजीने कराल तितक्याच काळजीने करा. तुम्ही आपली शरीरे व आत्मा शुद्ध ठेवला पाहिजे. तसे करणे तुमचे

कर्तव्य आहे. परदेशी कापड टाकून दिले पाहिजे आणि मुलांना अंगावर फक्त खादी वापरण्यास व परदेशी कापडाचा तुकडादेखील न वापरण्यास शिकविले पाहिजे. हिंदी लोकांनी हे केल्याशिवाय देशाचे दारिद्र्य नष्ट होणार नाही. हिंदी लोकांनी हे करणे आवश्यक आहे, कारण त्यामुळे आपल्या स्त्रियांना आपल्या घराबाहेर रस्त्यावर दगड फोडण्यास जावे लागणार नाही व त्यामुळे त्यांचे पावित्र्य राखले जाईल. लोकांनी प्रत्येक घरात चरखा सुरू केला पाहिजे आणि त्यावर गरीब स्त्रियांप्रमाणे श्रीमंत स्त्रियांनीही काम केले पाहिजे. श्रीमंत स्त्रिया गोष्टींची पुस्तके वगैरे वाचण्यात आपला वेळ दवडून देशाचे काय कल्याण करणार आहेत? हिंदुस्थानात जर आज कशाची गरज असेल तर सर्वत्र स्वदेशी कपड्याच्या वापराची. आणि फक्त ते चरख्यांनीच करता येईल.

जर प्रत्येकजण आपले कर्तव्य करील तर याच वर्षी आपणास स्वराज्य मिळेल अशी माझी खात्री आहे. स्वदेशी, असहकारिता आणि मद्यपान बंदी या तीन गोष्टींना आपल्या ध्येयाकडे प्रगती करण्यास सारखेच महत्त्व आहे. आपल्याला मद्यपानाचा दुर्गुण नाहीसा करावयाचा आहे. आणि त्याकरिता तुम्ही दारू-गुत्त्यांवर गेले पाहिजे. आपल्या देश-बांधवांनी दारू पिऊ नये म्हणून त्यांचे मन वळविण्याचे कर्तव्य करीत असताना आपण ठार मारले गेले जाण्याचा निश्चय केला पाहिजे. अशा ठिकाणी तुम्ही जेव्हा जाल तेव्हा मरणालाही तयार असा. जे पोलिस दारू-गुत्त्यांचे रक्षण करीत असतील त्यांच्या हातून व गुत्त्यांच्या मालकांच्या हातून काही माणसे मारली गेली तर आपल्याला सहज स्वराज्य मिळेल. दारू व्यापाऱ्यांच्या हिताचे रक्षण करणारे जे लोक असतील त्यांच्या हातून मारले जाण्याला लोकांनी तयार असले पाहिजे. नुकतेच मी ऑर्थर रोड येथे झालेल्या दंगलीबद्दल ऐकले. तेथील हल्ला माझ्यावर ओढवून घेण्यास मी हजर नव्हतो याबद्दल मला वाईट वाटते.

शिक्षकांच्या मनावर मी आणखी एक गोष्ट बिंबवू इच्छितो ती अशी : त्यांनी आपल्या हिंदू–मुस्लिम मुलांना परस्परांबद्दल संपूर्ण मित्रत्वाच्या भावना बाळगण्यास शिकविले पाहिजे. दोन्ही जातींच्या लोकांत संपूर्ण ऐक्य स्थापण्याचे त्यांना शिकविले पाहिजे. जर दोघेजण आपापल्या धर्मांचे योग्य पालन करतील व धर्मावर प्रेम करतील तरच त्यांच्यात संपूर्ण ऐक्य होईल, अन्यथा होणार नाही. स्वतःचा धर्म सोडून हिंदूंनी मुसलमान व्हावे किंवा मुसलमानांनी हिंदू व्हावे असा बिलकूल उद्देश नाही.

आपल्यात जे धेड किंवा भंगी आहेत अशा दलित वर्गांचा उद्धार करणे ही एक आणखी महत्त्वाची गोष्ट आहे. जर आपण या लोकांना दाबून टाकले तर वरच्या वर्गांचे लोक धेड व भंगी होतील. कारण त्यांना खाली ठेवल्यामुळे वरचे वर्ग हे स्वतःलाच त्यांच्या पातळीपर्यंत खाली खेचून नेतील. भंग्यांशी तुमच्या मुलांची लग्ने लावा किंवा त्यांच्याबरोबर जेवा असे आपले म्हणणे नसल्याचे गांधींनी सांगितले. या लोकांना आपल्या भावाप्रमाणे व मनुष्यप्राण्याप्रमाणे वागवावे एवढेच हवे आहे. जोपर्यंत हे लोक पायाखाली तुडविले जात आहेत तोपर्यंत स्वराज्य मिळणे अशक्य आहे.

'मुंबई क्रॉनिकल', २७-६-१९२१

१२७. अंत्यजांच्या सत्कार समारंभात भाषण[1]

मुंबई
[जून २६, १९२१ पूर्वी

जर मला पैसा मिळणार नसेल तर मी कोणत्याही जागी जात नाही. पण येथे येण्यात माझी ती अपेक्षा नाही. मी तुमचे आमंत्रण ताबडतोब स्वीकारले, कारण मला अस्पृश्य बांधवांचे हाल माहीत आहेत. मला तुमच्या कठीण स्थितीची माहिती आहे. मी या वर्षी हिंदु धर्मातून अस्पृश्यांचा विटाळ घालवून लावावा याकरिता कसोशीचे प्रयत्न करीत आहे. स्वराज्य हे सर्व शक्तिमान आहे. जर अस्पृश्यता नाहीशी झाली नाही तर ते धर्मराज्य किंवा स्वराज्य असणार नाही. स्वराज्यातदेखील जर हिंदू धर्मात डायरशाही राहणार असेल तर ते खरे स्वराज्य असणार नाही. जरी अस्पृश्य हा घाणेरडा, गलिच्छ व दुराचारी असला तरी जर आपल्याला धर्माच्या खऱ्या तत्त्वाची आस्था असेल व दयाळूत्वाच्या तत्त्वाबद्दल आदर असेल तर कोणताही माणूस खात्रीनेच अस्पृश्य समजला जाता कामा नयेच. दुसऱ्याच्या स्पर्शाने आपण विटाळतो ही कल्पना हिंदु

१. अंत्यज समाजाने गांधीजींना मानपत्र दिले.

धर्माचा एक भाग आहे असे मी मानीत नाही. ज्यात सत्य व अहिंसा नसेल तो धर्मच नाही. तुम्हांला हिंदूंनी बिनशर्त स्पृश्य मानावे म्हणून तुम्ही काय करावे? कोणी म्हटले की, तुम्ही प्रायश्चितविधी करावेत पण तुमच्यात अशुद्धता नसणे शक्य आहे. जो कोणी दारू पितो व मांस खातो, एवढ्याचकरिता त्याला कोणी अस्पृश्य मानीत नाही. असे असले तरी तुम्ही त्या गोष्टी सोडल्या पाहिजेत. जर दारू पिणारा व मांस खाणारा ब्राह्मण असेल तर मी त्याच्या घरात जाणार नाही आणि तितकीच शुद्धता तुमच्यात असली पाहिजे. माझ्याकरिता नव्हे पण तुमच्याकरितादेखील तुम्ही शुद्ध राहिले पाहिजे.

ब्राह्मण कसे वागतात याच्याशी तुम्हांला काय करावयाचे आहे? स्वतःची स्थिती सुधारण्याकडे लक्ष द्या. एका गृहस्थाने मला विचारले, तुम्हांला असहकारिता शिकवीत नाही. पण जोपर्यंत आमच्यात पाप आहे तोपर्यंत त्या पापासह आम्ही सरकार कसे बदलणार? असहकारितेच्या नावाने आम्ही लोकांना फसवू नये. जर माझा सहकारी फसवा असेल तर मी त्याला सोडून देईन. जोपर्यंत तुमच्यात पुष्कळ सद्‌गुणी माणसे असणार नाहीत तोपर्यंत तुम्हांला असहकारिता करता येणार नाही. मी तुमच्यामध्ये एक मध्यस्थ झालो आहे, हे मी तुम्हांला एक सच्चा हिंदू म्हणून सांगतो. गांधी हा तुमच्यात केव्हाही येण्यास व असहकारितेला लायक करण्यास तयार होईल. तुम्ही स्वतःला शुद्ध करण्याचे कार्य करीत राहा. कारण आपल्याला शुद्ध यज्ञ करावयाचा आहे. मी माझे काम करीन.

भगिनींनो, तुमच्या हाती चरखा व माग पाहण्याची माझी इच्छा आहे. प्रत्येकाला वस्त्र मिळते का नाही हे पाहण्याचे तुमचे खास कर्तव्य आहे. दातदुखीमुळे शंकरलालभाई येथे येऊ शकले नाहीत. आम्ही येथे आलेले लोक घरी गेल्यावर स्नान करणार नाही याची खात्री बाळगा. दलपतराम डायाभाई[1] यांची नात जसलक्ष्मी येथे आहे. तिची तुम्हांला मदत होईल.

[गुजरातीवरून]
'गुजराती', २६-६-१९२१

१. १८२० ते १८९२

१२८. गुजरातमधील स्वार्थत्याग

सार्वजनिक कार्याकरिता गुजरातने केलेल्या स्वार्थत्यागाची मला माहिती नाही. भडोच परिषदेच्या वेळचा त्याग हा गुजरात्यांचा त्याग मी मानीत नाही. तो फक्त गुजरातमध्ये केलेला त्याग होता. ज्या वेळी पुष्कळ गुजराती स्त्री–पुरुष देशाच्या कार्याकरिता आपले सर्वस्व देतील तेव्हा त्याला गुजरातचा त्याग म्हणता येईल.

तथापि भडोच परिषदेच्या वेळी ज्या मित्रांनी आपले सर्वस्व देण्याच्या त्यागाची वृत्ती दाखविली त्यामुळे गुजरातला आपली प्रतिज्ञा पुरी करण्यास किती मदत झाली हे आपल्याला कधीही कळणार नाही. पण माझ्यासारखा श्रद्धा असलेला मनुष्य गुजरात ३० जून रोजी कसोटीला उतरला तर असे म्हणेल की, त्याचे मुख्य कारण म्हणजे भडोचला केलेला त्याग.

पण ते कसेही असो. जर गुजरातला ह्याच वर्षी स्वराज्य मिळविण्याकरिता कसो-शीचे प्रयत्न करावयाचे असतील तर त्याकरिता सर्वस्व समर्पण करणाऱ्या स्वयंसेवकांची निकडीची गरज आहे. देशातील कोठल्याही दुसऱ्या प्रांताकडे पाहा आणि आपल्याला असे दिसेल की, गुजरातने त्या प्रांतापेक्षा कमी त्याग केलेले आहेत. महाराष्ट्र सर्वांत उच्च स्थानी आहे. बंगालच्या त्यागांना मी अविचारी म्हणेन. पण कोणताही त्याग करण्यात त्यांनी कच खाल्ली नाही. पंजाबातदेखील लोकांचे त्याग कमी प्रतीचे नव्हते. आर्य-समाजाची धारणाच मुळीं स्वार्थत्यागाच्या वृत्तीने स्फुरलेली आहे. शीखांचे त्यागही कमी नव्हते.

पण गुजरातकरिता आपण असा दावा सांगू शकणार नाही. जेव्हा गुजरातचे दोन तरुण सर्व्हन्टस् ऑफ् इंडिया सोसायटीला जाऊन मिळाले तेव्हा लोकांना आश्चर्य वाटले. जेव्हा सुरतेच्या दोन गृहस्थांनी पैसे मिळविण्याचे थांबविले आणि आश्रम चालविण्यास सुरुवात केली तेव्हा ते आम्हांला स्वार्थत्यागाचे महान कृत्य वाटले. जेव्हा ह्या त्यागाची गोष्ट मी एका पंजाबी प्रोफेसरला सांगितली तेव्हा तो फक्त हसला आणि म्हणाला, "मी त्याला त्यागच म्हणत नाही. त्यांनी सर्वस्व अर्पण केले आहे काय? त्यांनी कसले कष्ट भोगले आहेत. त्यांना उद्याच्या जेवणाची चिंता आहे का?"

या संभाषणाला पुष्कळ वर्षे लोटली आणि दरम्यान ते प्रोफेसर तुरुंगयात्रेला सुद्धा गेले. त्यांच्याजवळ पैही नव्हती.

ज्या वेळी पुष्कळ तरुण माणसे सर्वस्वत्यागाला पुढे येतील, त्या वेळी गुजरात आपले डोके वर उचलील. त्याच वेळी स्वराज्याच्या कार्याला आपला हिस्सा देण्यास तो लायक होईल. स्वराज्य मिळविण्याकरिता सर्व शक्ती खर्च करणे हे प्रत्येक प्रांताचे कर्तव्य आहे. पण या वर्षाअखेरपर्यंत जर आपण स्वराज्य मिळवू शकलो नाही, तर प्रत्येक प्रांताची तितकीच बेअब्रू होईल. एक प्रांत दुसऱ्याला दोष देऊ शकणार नाही. जो प्रांत पहिल्या प्रथम स्वराज्य मिळविण्याकरिता पूर्ण लायकी संपादन करील तो प्रांत स्वतःकरिता स्वराज्य मिळवील आणि ताबडतोब इतरांना त्याकरिता लायक करील. स्वराज्य मिळविणे याचा अर्थ देशाला स्वतःमधील विश्वासाचा अभाव घालविण्यास मदत करणे आणि देशात आत्मविश्वास निर्माण करणे हा आहे. जर आपण स्वतः कोकरे आहोत असे वाटणाऱ्या काही सिंहांमधील एखाद्या सिंहाला स्वतःसंबंधीचे सत्य अनुभवास आले तर लवकरच इतरांना सुद्धा आपण सिंह आहोत असे कळून येईल. जर एकाही प्रांताने असहकारितेचे संपूर्ण यश प्रत्ययास आणून दिले तर इतर प्रांत त्याच्यामागे जाण्यास दिरंगाई करणार नाहीत. ज्या वेळी एका माणसाने देखील आवश्यक ती शक्ती कमावलेली असेल त्या वेळी पंजाब व खिलाफतचे प्रश्न हे आपोआप सुटतील अशी खात्री बाळगावी ती शक्ती कशात आहे हे मी दुसऱ्या एखाद्या प्रसंगी सांगेन.सध्या मला एवढेच सुचवावयाचे आहे की, असहकारितेसाठी जरूर असलेली शक्ती मिळविण्यासाठी अनेक तरुण स्त्री-पुरुषांना जास्तीत जास्त त्याग करावे लागतील.

जर माणसाने सर्वच देऊन टाकले तर त्याने जगावे कसे? स्वतःचे स्वतःच्या कुटुंबाचे रक्षण करण्याकरिता सेवेची कल्पना सोडून देऊन कोणता तरी धंदा करणे हे भिकेवर जगण्यापेक्षा आणि देशसेवा करण्यापेक्षा अधिक चांगले.दुसऱ्यांची सेवा करण्याकरिता आपण मोकळे असावे म्हणून आपल्याला भिकेवर जगावे लागेल, ही जर त्यात कल्पना असेल तर वरील प्रश्नात दर्शविलेली भीतीही खासच समर्थनीय ठरेल. पण प्रत्येक कार्यकर्त्याला त्याच्या श्रमाइतके मोल मिळाले पाहिजे. माझ्या कल्पनेत जो सेवेचा प्रकार आहे तो, दुसऱ्यांचे नेतृत्व करण्याचा नसून लोकांच्याकरिता श्रम करण्याचा आहे. त्यालाच खरा स्वयंसेवक म्हणता येईल की, जो पगारी नोकरापेक्षा अधिक कष्ट करतो, अधिक प्रामाणिक असतो, अधिक कार्यक्षम असतो, अधिक नम्र असतो व त्याला शिस्तीची जाणीव असते. अशा ऐच्छिक कार्यकर्त्याला जगण्यापुरते दिले जाते. म्हणून तो भिकेवर जगत नाही. पण देशाची खरी सेवा करतो. त्याला मिळते त्यापेक्षा तो अधिक देतो. जो माणूस आपले सर्वस्व देऊन टाकतो त्याच्यापेक्षा जो स्वतःकरिता काही राखून ठेवतो आणि नंतर मी देशाची विनामूल्य सेवा करतो असे सांगतो त्याची योग्यता कमी असते. जर सामान्य अनुभव यापेक्षा वेगळा असेल तर त्याचा अर्थ जो सर्वस्व देऊन टाकतो असे म्हणतो तो प्रत्यक्षात काही चोरून ठेवतो असा आहे. त्याचाच अर्थ त्यांनी सर्व संपत्ती दिली असली तरी आपले मन व शरीर दिलेले नाही. एवढ्यानेच हे संपत

नाही. आपण सर्वस्व दिले, अशी बढाई मारीत असताना त्यांनी जितके दिलेले असते त्यापेक्षा तो जास्त घेत असतो. मजजवळ असलेले एक लाख रुपये देऊन मी जर देशाला लाखो रुपयांच्या खर्चात पाडले व मी स्वतःला काम करण्यास अर्पण केले नाही व माझा सर्व वेळ देण्याचे नाकारले तर मी भिक्षेवर जगणारा भिक्षेकरी होईन, एवढेच नव्हे तर भिक्षेकऱ्यापेक्षाही अधिक तिरस्करणीय होईन. अशा त्यागाबद्दल मी बोलत नाही. ज्या त्यागाची मी अपेक्षा करतो त्यात भिकाऱ्यासारखे वर्तन करावयाला जागाच नाही. तुम्ही काहीही केले तरी असा त्याग लपून राहाणार नाही. जोपर्यंत अशी परिस्थिती देशात निर्माण होत नाही, तोपर्यंत स्वराज्याचा विचार व्यर्थ आहे. जेव्हा काही स्त्रीपुरुष सर्वस्व त्यागाला तयार होतील तेव्हाच स्वराज्याची सेना स्थापन होईल. त्याच वेळी इतर पुष्कळ लोक लहान सहान त्यागाला पुढे येतील आणि त्यांच्या त्यागांचा चांगला परिणाम होईल.

अशा त्यागांची वेळ आली आहे. गुजरात प्रांतिक काँग्रेस कमिटीने स्वयंसेवकां-करिता विनंतीपत्रक काढले आहे. जे नालायक आहेत आणि ज्यांना कामधंदा करावा हे ठाऊक नाही असे लोक इच्छा असेल तर पुढे येतील. पण मला जे अर्जदार पाहिजे आहेत ते सर्वस्व देण्यात तयार असलेले, देश देऊ शकेल त्यावर जगणारे आणि असे करण्यात मोठेपणा मानणारे हवे आहेत. दुसरे काही करण्यासारखे सुचत नाही याकरता स्वराज्याचे कार्यकर्ते म्हणून जे पुढे येतील अशांच्या मदतीने या धर्म-कार्याकरिता करावे लागणारे महायुद्ध आपण कधीही जिंकणार नाही. म्हणून ज्या मित्रांनी भडोचला स्वार्थत्याग केला त्यांचा संसर्ग इतरांना लागेल आणि मला गुजरातमध्ये केलेल्या त्यागापेक्षा गुजरातचा त्याग विशिष्ट आहे, असे सांगण्याचे सद्भाग्य लाभेल अशी आशा आहे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', २६-६-१९२१

१२९. माधुरी व पुष्पा

माधुरी व पुष्पा सहा सात वर्षांच्या मुली आहेत. मी टिळक स्वराज्य फंडा-करिता देणग्या मिळाव्यात म्हणून अधाशीपणाने पाठलाग करीत असता मी त्यांच्या कुटुंबात ओढला गेलो.

त्या कुटुंबातील माझ्याबद्दल प्रेम असलेल्या सर्व स्त्री-पुरुषांकडून वेढला गेलेला मी बसलो असता तेथे माधुरी आली. ती सावकाश दबकत पावले टाकीत येत होती. दुर्दैवाने त्यांनी मला खुर्ची दिली. त्या कुटुंबात टेबल, खुर्ची सामान्य गोष्ट होती. खुर्चीवर बसल्यामुळे मी माधुरीला कसा उचलून घेऊ शकलो असतो; म्हणून मी तिला माझ्याकडे ओढले व तिचे डोके माझ्या मांडीवर टेकविले.

" मी तुम्हांला फसविले आहे. "

" मोठी माणसे मला फसवितील; पण मुले फसविणार नाहीत. तू मला फसविणे शक्यच नाही. " मी हसत हसत उत्तर देत होतो व तिच्या तोंडाकडे पाहात होतो.

" पण खरंच तुम्हांला मी फसविले आहे. मी तुम्हांला फक्त दीडच रुपया दिला " असे ती धिटाईने म्हणाली.

" तर मग तू मला खरंच फसविलेस. तुझ्या अंगावर इतके दागिने असता तू मला फक्त दीडच रुपया दिलास ? " असे म्हणून मी माधुरीचा लहानसा हात माझ्या हातांत घेतला. तिची बांगडी माझ्या तळव्यावर नाचू लागली. मी पुढे म्हणालो.

" तर मग तू प्रायश्चित्त घे. लहान मुले अगदी निष्पाप असली पाहिजेत. ती कोणाला फसवीत नाहीत. प्रायश्चित्त घेणे याचा अर्थ आपले पाप धुवून टाकणे. स्वतःला शुद्ध करणे. आता तू तसे केले पाहिजे. "

" आता शुद्ध होणे कसे शक्य आहे ? मी तुम्हांला फसविले, ही गोष्ट कायम राहिली. "

" मार्ग सोपा आहे. तू मला आपले दागिने द्यावयास पाहिजे होते, हे तुला समजले. त्यामुळेच तू मला म्हणालीस की, तू मला फसविलेस. आता तू मला तुझे सगळे दागिने देऊन टाक म्हजे तुझे पाप धुवून निघेल. "

आतापर्यंत तजेलेदार दिसणारा माधुरीचा चेहरा थोडासा उतरला. मी ते पाहिले आणि पुढे म्हटले.

" मुलांना दागिने काय करावयाचे आहेत ? आपल्या कृतीने आपण छानदार दिसतो. शिवाय दागिने हरवितातही. चांगल्या कामाला मदत करण्याकरिता ते देऊन टाकणे बरे आणि तू चांगली मुलगी दिसतेस. तुझी चूकही तू कबूल केलीस. तू खुषीने दागिने देऊन टाक. मी त्या दागिन्यांचा उपयोग गरिबांच्या घरात चरखे पुरविण्याकरिता आणि तुझ्यासारख्या मुलांना शिकविण्यकरिता करीन. तुझ्यासारख्या दुसऱ्या लहान मुलींनी देखील आपले दागिने दिले आहेत. "

मी वाट पाहात राहिलो.

माधुरीच्या कानात दोन लहान माणकांचे लोलक होते. आणि तिच्या हातात सोनेरी कडा असलेली बांगड्यांची जोडी होती. त्याशिवाय काचेच्या बांगड्या तिच्या हातात होत्या. ती पुटपुटली.

" मी या काचेच्या बांगड्या दिल्या तर चालेल का ? "

या पोरीला काय उत्तर द्यावे हे मला कळेना. हिला बरोबर नेऊन मी दत्तक घेऊ का ? पण मला वाटले हिच्यासारख्या किती तरी मुली माझ्याजवळ आहेत. पण तूर्त तरी मी एक बनिया आहे व त्याला फक्त लुबाडणे ठाऊक आहे. म्हणून मी म्हणालो.

" तुझ्या बांगड्यांचेही पैसे मिळतील. पण मला तुझे सर्व दागिने हवे आहेत. आणि खरोखर ते देणे तुला फारसे कठीण नाही. एक तर त्याने तुझे पाप धुतले जाईल आणि दुसरे ते मला उपयोगी पडतील. स्वराज्य मिळविण्यात आम्हांला त्यांची मदत होईल. तू नाही का सारे देणार ? "

" मी काही झाले तरी या सोन्याच्या बांगड्या देणार नाही. पण हे लोलक तुम्ही घ्याल का ? "

" हं. हे आता काही तरी ठीक. पण या तुझ्या बांगड्या देऊन टाकल्यास तर किती छान होईल ? "

माधुरी थोडीशी कष्टी झाली. मी तिचा मुका घेऊन म्हटले, " हे तुझे लोलक. "

ती पळत सुटली आणि लवकर परत आली. तो लोलक काढीत असता मी तिला म्हणालो, " पण आईची परवानगी घेतलीस का ? "

" होय, तिने परवानगी दिली. तिने मला सारे देऊन टाकण्यास सांगितले. पण मला बांगड्या सोडवत नाहीत. "

माधुरीने लोलक काढले व माझ्या हातात टाकले. एक लहानशी सोन्याची साखळी जमिनीवर पडली होती. ती साखळी माधुरी बारकाईने शोधीत होती, तिला ती सापडली आणि मला तिने ती दिली.

मी पुष्कळ प्रयत्न केला पण माझा अधाशीपणा सुटेना. माझे डोळे बांगड्यांवरून परत फिरेचनात. मला तिचे नाव अद्याप ठाऊक नव्हते. तसेच ती कोणाची मुलगी हेही ठाऊक नव्हते. मी तिला विचारले व मला तिचे नाव कळले. तिच्या थोर बापाला मी ओळखले आणि म्हणालो :

" खरंच माधुरी या दागिन्यांत प्रेम करण्यासारखे तू काय पाहिलेस ? तुझ्यासारख्या निष्पाप मुलीला हे दागिने काय करावयाचे आहेत ? नाही का देणार तुझ्या बांगड्या ?

माधुरी मऊ झाली. तिने आपल्या हाताने बांगडी काढली व माझ्या हातावर ठेवली. मला वाटले तो माझा जय झाला.

पण तो जय माधुरीचा होता. त्या लहान मुलीने माझे अंतःकरण चोरले मी तिच्या आईबापांचा हेवा करू लागलो. मी अंतःकरणापासून प्रार्थना केली की, सर्वच आईबापांची अशी मुले असावीत. आमच्या स्वराज्याच्या लढ्यातील यशाबद्दलचा विश्वास अधिक बळावला. मी माधुरीला म्हणालो.

" तू फार विलक्षण मुलगी आहेस. तू दुसरी बांगडी दिलीस तरी मी घेणार नाही. पण जे तू दिलंस ते खुषीनं ना ? तुझी इच्छा असेल तर ते तू परत घे. "

असे म्हणून मी तिच्यापुढे दागिने धरले.

" मी अगदी खुषीने दिले व मी परत घेणार नाही. "

त्या उत्तराने माझ्यात नवे रक्त आले.

मी दुसऱ्या खोलीत त्या कुटुंबातील दुसऱ्या स्त्रियांना भेटण्याकरिता गेलो. माझ्यात व माधुरीत चाललेले संभाषण काही दुसरी मुले लक्ष लावून ऐकत होती.

पुष्पा नावाच्या शेजाऱ्याच्या मुलीने आपली बांगडी काढली व माझ्या हातावर ठेवली.

" तू आईची परवानगी घेतलीस का ? "

" हो. तिच्याच परवानगीने मी तुम्हांला बांगडी दिली. "

" आणि ह्या वस्तू घेण्याच्या माझ्या अटी तुला ठाऊक आहेत का ? लहान मुलींनी आपल्या आईबापांच्याजवळ दिलेल्या दागिन्यांऐवजी स्वराज्य मिळण्यापूर्वी दुसरे दागिने मागू नयेत. दुसरे काही दागिने असले तर ते अंगावर घाला; पण काही काळ तरी नवे दागिने करण्यास सांगताच कामा नयेत. "

" मजजवळ दुसरी बांगडी आहे. मी नवी मागणार नाही. मी माझी बांगडी तुम्हाला अगदी खुषीने दिली. "

माधुरी हे सर्व पाहात होती. तीही आपल्या आईबरोबर कसली तरी चर्चा करीत होती. तिने आपल्या काचेच्या बांगड्या व उरलेली सोन्याची बांगडी काढली व माझ्या हातावर ठेवली !

" मी काचेची बांगडी घेतो. पण मी तुला सांगितले ना तू दिलीस तरी मी सोन्याची बांगडी घेणार नाही. म्हणून तू ती देऊ नकोस. "

" मी तर ती तुम्हांला देऊनच टाकली आहे. मला ती बिलकूल नको आहे. मी ती खुषीने दिली आहे. ठेवा ती तुमच्याजवळ. "

माधुरीने माझ्यावर जय मिळविला. मी माझा शब्द मोडला व दुसरी बांगडी घेतली. तिचे हात आणि कान भुंडे दिसत असताही ती निदान मला अधिक सुंदर दिसू लागली. मी तिला छातीशी कवटाळले.

आनंदाने मी भारावून गेलो आणि देवाचे आभार मानले.

माधुरी आता दुसऱ्याच कामाला लागली. दुसऱ्या मुलींचे हात कसे भुंडे होतील या उद्योगाला ती लागली. पण तिला फारसे यश आले नाही.

पण परमेश्वर तिच्या प्रयत्नाच्या परिणामावरून तिची परीक्षा करील का? त्याने म्हटले आहे, " तुम्ही आपले काम करा व फलप्राप्ती माझ्यावर सोपवा. "

माधुरीने आपले कर्तव्य देखाव्याकरिता केले नाही. पण तिच्या लहान शरिरात जो मोठा आत्मा वास करीत होता त्याच्या संतोषाकरिता केले. माधुरी व पुष्पा यांना खादी वापरण्यास आणि चरखा चालविण्यास बजावून आणि घरातल्या स्त्रियांकडून दोन्ही गोष्टींबद्दल वचन घेऊन मी तेथून निघालो. माधुरी व पुष्पा यांच्याबद्दल माझे मन कौतुकाने भरले होते.

अशा निष्पाप मुलींनी केलेल्या त्यागामुळेदेखील जर अपल्याला याच वर्षी स्वराज्य मिळाले नाही तर आपण जी वडील माणसे आहोत त्यांनी किती मोठ्या पापाचा संचय केला असेल!

परमेश्वरा, या जगात माधुरी आणि पुष्पा यांच्यासारखी मुले पाठव. आम्ही स्त्रीपुरुषांनी अशा निष्कलंक आत्म्यांना वंदन करावे व त्यांच्यापासून धडे घ्यावे अशी देवाजवळ प्रार्थना आहे.

मी हे संभाषण झाल्यानंतर तीस तासांनी लिहून काढले. मला आठवले तसे मी ते उतरले. मुले प्रत्यक्ष बोलली तसे त्यांचे शब्द मी दिले. त्यात साफसफाई केली नाही. त्या अगदी निर्दोषपणे बोलत, हे मी पाहात होतो.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', २६-६-१९२१

१३०. चार दिवसांतील आपले कर्तव्य

गुरुवार ३० जून जवळ आला आहे. रविवारी वाचकांच्या हातांत नवजीवन पडेल. गुरुवारी हिंदुस्थानची व गुजरातची परीक्षा संपेल.

१. गुजरातने लोकमान्य टिळकांच्या स्मृतीकरता व स्वराज्य मिळविण्याकरिता दहा लाख रुपये जमवावेत.

२. तीन लाख सभासदांनी काँग्रेसमध्ये यावे.

३. गुजरातने चालणाऱ्या चरख्यांची संख्या एक लाखपर्यंत न्यावी.

जर आपण निश्चय केला तर अपुरे काम आपण पुरे करू.

'नवजीवन'च्या प्रत्येक वाचकाने कोणाच्याही येण्याची वाट न पाहता आपल्याला जे द्यावयाचे असेल ते जवळच्या केंद्रावर द्यावे आणि पावती घ्यावी.

प्रत्येक वाचकाने आपल्या मित्रांचे मन देणगी देण्यासाठी वळवावे. २१ वर्षांचा प्रत्येक वाचक जर अजून काँग्रेस सभासद झाला नसला तर त्याने ताबडतोब सभासद व्हावे आणि इतरांना सभासद होण्यास सांगावे. प्रत्येक वाचकाने जर अद्याप चरखा पैदा केला नसला तर तो पैदा करावा आणि कताईकाम शिकावे.

हे चार दिवस अत्यंत अमोल आहेत असे समजून व ते पुन्हा येणार नाहीत हे लक्षात ठेवून, प्रत्येक वाचकाने आपला शक्य तितका वेळ फक्त याच तीन कामांवर खर्च करावा.

प्रत्येक वाचकाने हे राष्ट्राचे काम म्हणजे आपलेच काम आहे असे मानावे व त्याकडे त्वरेने लक्ष द्यावे.

उरलेल्या चार दिवसांत काही काम होणार नाही असे कोणी समजू नये.

या चार दिवसांत हजारो जन्मतील व हजारो मरतील.

फक्त एकाच रात्रीत रामचंद्रासारख्यांचे दैव बदलले; फक्त एकाच दिवसात हरिश्चंद्राने सत्याकरिता सर्वस्व देऊन टाकले, आणि युधिष्ठिराने द्यूतात राज्य गमाविले. माणसाच्या किंवा राष्ट्राच्या जीवनात एक दिवस कमी मोलाचा नसतो. तर मग चार दिवसांत काय करता येणार नाही? जर गुजरातला आपल्या प्रयत्नाने स्वराज्य म्हणजे धर्मराज्य जिंकावयाचे असेल तर ह्या पहिल्या परीक्षेत त्याने पूर्ण गुण मिळविले पाहिजेत.

[गुजरातीवरून]

'नवजीवन', २६-६-१९२१

११३. काठेवाडीयांना

जसजसा जून संपत येत आहे तसतसे माझे डोळे काठेवाडकडे सारखे वळत आहेत. सध्या फक्त मी देणग्यांच्या बाबतीत काठेवाड कोठे आहे एवढीच चर्चा करणार आहे. दुसऱ्या प्रश्नांची चर्चा मागाहून करण्याचा माझा विचार आहे.

स्वराज्याकरिता करावयाच्या कामाचा संबंध साऱ्या हिंदुस्थानशी आहे. स्वराज्यामुळे हिंदी संस्थानांना थोडे थोडके मिळणार नाही. स्वराज्याच्या चळवळीमुळे आपली शक्ती वाढली हे हिंदी संस्थानिकांना माहीत आहे; आणि प्रजाजनांनाही आपल्या वाढलेल्या शक्तीची जाणीव आहे.

ही चळवळ राजशाही, सत्ता किंवा संपत्ती खलास करण्याकरिता नसून त्यांच्या शुद्धीकरणाकरिता आहे. ज्या अंशापर्यंत आपल्यातला दुटप्पीपणा नाहीसा होईल, त्या अंशापर्यंत स्वराज्याचे उष्णतामापक यंत्र पारा चढल्याची नोंद करील. ही चळवळ दुटप्पीपणा, दुष्टपणा आणि अधार्मिकपणा संपविण्याकरिता आहे.

काठेवाडच्या राजांनी व त्यांच्या प्रजेने ह्या चळवळीला काय दिले आहे? आतापर्यंत काही दिले नाही. काठेवाडने मनात आणले तर एक कोटीचा आकडा पुरा करण्याकरिता बाकीची रक्कम तो उभी करू शकेल. काठेवाडचे धाडसी लोक व्यापाराकरिता अनेक ठिकाणी गेले आहेत. जेथे जेथे ते राहतात तेथे तेथे स्थानिक फंडाला ते खासच रकमा देत असतील. पण ते देतात त्यापेक्षा अधिक द्यावे असे मला वाटते. पण ह्या त्यांच्या देणग्या हिंदी म्हणून आहेत. पण काठेवाडी गुजराती म्हणून ते काठेवाडहून काय पाठविणार आहेत? गुजरातच्या दहा लाख रुपयांच्या हिश्शात त्यांची देणगी किती? किंवा त्यांना प्रयत्न करून गुजरातचा हिस्सा त्या आकड्याच्या दुप्पटीइतका वाढविता येणार नाही का?

पोरबंदर, रानावाव, कुटिआना, जेतपूर आणि धोराजी येथील मेमन्सनी जर ठरविले तर तेच आपसात एक कोटी रुपये जमवू शकतील. जामनगरच्या एका मेमनला त्याने मनात आणले तर ही साठ लाखांची तूट भरून काढता येईल.

काठेवाडमधील एका राजाला जर चरख्याचा प्रसार करण्याचे पवित्र कर्तव्य समजले तर तो स्वराज्य फंडाला एक कोटी रुपये देऊन ते रुपये फक्त चरख्यावर खर्च करावे असे सांगू शकेल.

पण अशी आशा मी बाळगू नये हे मला ठाऊक आहे. अद्याप अशी श्रद्धा राजे किंवा मेमन्स यांच्यात निर्माण झाली नाही. सध्याचा निधी हा प्रत्येकाच्या श्रद्धेची कसोटी पाहणारा आहे. ज्या रोगाने आपण ग्रस्त झालेले असतो तो रोग बरा करण्या-करिता आपण काय कमी खर्च करू ? हिंदू, मुस्लिम, पारशी, ख्रिश्चन व ज्यू यांतील किती लोकांना हिंदुस्थानचा रोग हा आपला रोग आहे असे वाटते ? राजांत किंवा रंकांत असे वाटणारे लोक किती आहेत ? ज्या भयंकर क्षयरोगाने हिंदुस्थानला ग्रासले आहे, तो रोग बरा करण्याकरिता आपल्यातील प्रत्येकजण किती खर्च करण्यास तयार आहे ? आपल्या सर्वांची ही परीक्षा आहे. प्रत्येक हिंदी माणसाने ३० जून पूर्वी उत्तर दिले पाहिजे. प्रत्येक काठेवाड्याने आपले कर्तव्य केलेच पाहिजे.

ज्यांना असे वाटत असेल की, हिंदुस्थानला क्षय रोग झाला नाही किंवा ज्यांना असे वाटत असेल की, चालू चळवळीतील कोणत्याही बाबीने तो रोगमुक्त होणार नाही त्याने काहीही देऊ नये. असे संशय असलेले क्वचितच काठेवाडी मला भेटले आणि म्हणून काठेवाडपासून मला मोठी आशा आहे.

वढवान व विरमगाव येथील लोकांनी माझ्या आशा वाढविल्या. दारिद्र्य व संकुचित मनोवृत्ती यांमुळे झालावाड बदनाम झाले होते. त्याच झालावाडने मला आश्चर्य-चकित केले. जर एकटा झालावाड २५,००० रुपयांपेक्षा अधिक रक्कम देऊ शकतो तर हालार आणि सोरठ आणि गोहिलवाड यांनी किती दिले पाहिजेत ? आणि भावनगरने किती ? सध्या भावनगर हे काठेवाडातील सर्वांत मोठे बंदर आहे, व तेथील धंदा जोरात आहे. तेथील लोक सापेक्षतः बरे आहेत. त्यांनी द्यावयाच्या आपल्या रकमेपैकी किती हिस्सा दिला ?

झालावाडच्या स्त्रियांनी मला निराश केले. सभेत तेथील पुष्कळ स्त्रिया होत्या. पण वढवान येथे झालेल्या दोन सभांत ज्या स्त्रिया हजर होत्या त्यांनी दिलेल्या देणग्या साऱ्या हिंदुस्थानात अगदी कमितकमी होत्या हे पाहून मला अत्यंत दुःख झाले. त्यांनी स्वराज्याबद्दल म्हणजेच धर्मराज्याबद्दल ऐकले नसणे शक्य आहे काय ? का हा पुरुषांचा दोष होता ? पुरुषांनी या पवित्र कार्यासंबंधी स्त्रियांना काहीच शिक्षण दिले नाही काय ? काय वाटेल ते कारण असो. मला स्वतःला काठेवाडी भगिनींबद्दल फारआशा आहे. त्यांनी चरख्याचे काम चांगले चालविले आहे. त्यांच्यातील शेकडो गरीब स्त्रिया चरखे चालवून पोटाला मिळवीत आहेत व हिंदमातेची सेवा करीत आहेत. सुसंपन्न स्त्रिया आपले दागिने किंवा रोख रक्कम देणार नाहीत काय ?

काठेवाडी लोक मी त्यांच्यातलाच आहे असा हक्क सांगतात. त्यांच्या त्या प्रेमाची आता कसोटीच आहे. जर त्यांचे माझ्यावर प्रेम असताही मी त्यांची खात्री पटविली नाही तर इतर हिंदी लोकांना मी कसा जिंकू शकेन ? जर काठेवाडला माझा संदेश

समजला असेल तर त्याने सर्वांत मोठी रक्कम दिली पाहिजे, अशी मी खास अपेक्षा बाळगीन.

परमेश्वर माझी आशा पुरी करो.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', २६-६-१९२१

१३२. मुंबई सभेत भाषण[1]

जून २६, १९२१.

महात्मा गांधी म्हणाले की, मी सांताक्रूजच्या लोकांनी ३०,००० रुपयांहून अधिक रक्कम जमा केल्याबद्दल आभारी आहे. त्यांचा हिस्सा फक्त १५,००० रुपये होता. मला त्याबद्दल संतोष वाटतो. मला सांताक्रूजचा अभिमान आहे, कारण मी पूर्वी येथे पुष्कळ वेळा राहिलो आहे[2]; आणि सांताक्रूजचे लोक मला अद्याप विसरले नाहीत, याबद्दल मला आनंद होतो. मुंबईचे व हिंदुस्थानचे लोक जितके अधिक प्रेम व जितका अधिक विश्वास माझ्यावर दाखवितील तितकी लोकांविषयीची माझी जबाबदारी अधिक वाढेल आणि माझ्या खांद्यावर अधिक ओझे पडेल. वर्षाअखेर मी तुम्हांला काय सांगू शकेन ? पण तुमच्या प्रयत्नाला काहीही फळ मिळो तुमचे श्रम वाया जाणार नाहीत, अशी माझी खात्री आहे, आणि तुमचा पुष्कळसा फायदा होईल हीही माझी खात्री आहे. पण अंतःकरणात असे खात्रीपूर्वक वाटते की, या वर्षाअखेर तुम्हांला स्वराज्य मिळेल. सांताक्रूजच्या स्त्रियांनी व मुलांनी असे समजू नये की, स्वराज्याकरिता आपणच फार मोलाचे काम केले आहे. हिंदुस्थानातील स्त्रियांनी व मुलांनी असेच काम केले आहे, हे तुम्ही लक्षात ठेवा. साऱ्या हिंदुस्था-

१. ती सभा गांधींना टिळक स्वराज्य फंडाकरिता थैली देण्यास भरली होती.
२. १९०१–१९०२ साली ते मुंबईत वकिली करीत असताना तेथे राहात होते.

नात पुरुष, स्त्रिया आणि गरीब माणसे यांनी स्वराज्य फंडाला आपला वाटा दिला आहे. गरिबांनी जे केले आहे त्याची तुलना करता श्रीमंतांनी आपल्या वाट्याचे कर्तव्य केले आहे, असे मला वाटत नाही. तुलनेने गरिबांनी श्रीमंतांपेक्षा अधिक दिले आहे, आणि त्यांनी देशासंबंधीचे कर्तव्य केले आहे. बोहरा, पारशी आणि खिश्चन यांनीही तसेच केले आहे. पारशी जमातीबद्दल माझ्या मनात कधीच शंका नव्हती; आणि लोकसंख्येच्या मानाने त्यांनी देशाकरिता दिलेली रक्कम इतर जमातींच्यापेक्षा अधिक आहे. आजसुद्धा इतर जमातींपेक्षा मला पारशांच्याकडून अधिक पैसा मिळण्याची खात्री आहे. तो पैसा आज मिळाला नाही तर उद्या मिळेल. पारशी हे तुमच्याबरोबर आहेत, तुमच्या विरुद्ध नाहीत ही माझी खात्री आहे. ते इतर जमातींपासून अलग राहणार नाहीत.

दुसरे लोक तुम्हांला कधीही स्वराज्य देऊ शकणार नाहीत. तुम्हांलाच ते मिळवावे लागेल. जोपर्यंत तुम्ही खिलाफतीचा प्रश्न सोडविला नाही, आणि पंजाबचा अन्याय दूर केला नाही तोपर्यंत तुम्हांला स्वराज्य मिळणार नाही असे मी मित्रांना सांगू इच्छितो. स्वराज्यापेक्षाही या दोन गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. तुमच्या कार्यक्रमाच्या अग्रभागी तुम्ही हे प्रश्न ठेवले पाहिजेत. आपल्या राज्यकर्त्यांनी कोणत्याही इतर सवलती दिल्या तरी लोकांचे समाधान होणार नाही. या दोन गोष्टी आपल्या राजकीय शरीरात विषासारख्या आहेत व आपल्याला ते विष बाहेर टाकायचे आहे. जोपर्यंत आपल्याला स्वराज्य मिळाले यामुळे लोक संतुष्ट होणार नाहीत तोपर्यंत ते आपल्याला मिळाले नाही असे समजावे. जेव्हा श्रीमंत किंवा गरीब, उच्च आणि नीच यांच्यातील प्रत्येकाला स्वराज्याचा आत्मप्रत्यय होईल त्याच वेळी स्वराज्य खात्रीने मिळालेले असेल. मी तुम्हांला आताच स्वराज्याची व्याख्या देणार नाही. पण जर ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरच्या अखेरीस सारा हिंदुस्थान आम्हांला काही मिळाले नाही असे म्हणेल, तर मीही त्यांच्याबरोबर तसेच म्हणेन. जी गोष्ट वाटण्यास किंवा अनुभवण्यास किंवा पटण्यास लोक स्वतःच असमर्थ असतात तेव्हा मी त्यांना तसे वाटू किंवा पटवू किंवा अनुभवू शकणार नाही. एक कोटी रुपये एकत्र केले म्हणून स्वराज्य हस्तगत झाले असे त्यांनी समजता कामा नये. त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, ही युद्धाची शक्तिसाधने आहेत; आणि लोकांना या वर्षाअखेर स्वराज्य हवे होते, त्याचे हे लक्षण आहे.

सांताक्रूझच्या नागरिकांनी आपल्या शक्तीबाहेर पसा दिला आहे असे मला वाटत नाही. जेव्हा मी एक कोटी रुपये जमविण्याचे काम हाती घेतले तेव्हा मला देशातील इतर भागांनी आपले कर्तव्य केले नाही तरी मुंबई शहर ती रक्कम देईल असा मला त्या शहरासंबंधी विश्वास होता. सांताक्रूजच्या स्त्रियांनी व मुलांनी आपला योग्य वाटा दिला आहे, असे मला वाटत नाही. मी जरी वाणी असलो तरी लोकांनी वणिकवृत्तीने या गोष्टीचा विचार करू नये (हंशा). स्त्रियांची घरात मोठी सत्ता असते, आणि त्यांना कोणत्याही अडीअडचणीशिवाय वाटेल तितका पैसा देता येतो. तुम्ही आपल्या साऱ्या मालमत्तेचा अडीच टक्का तरी दिला आहे काय? असे मी विचारतो. जर तुमची इच्छा असती तर तुम्ही उरलेले साठ लाख सहज देऊ शकला असता. येत्या चार दिवसांत तुम्हांला ही भरपाई करावयाची आहे. तुम्ही या गोष्टीचा विचार वणिकवृत्तीने करू नका. तुम्ही देशासंबंधी कर्तव्य केलेच पाहिजे. श्री. जे. के. मेहेता यांनी मला मोठ्या अभिमानाने सांगितले, सांताक्रूजमध्ये ४० चरखे आहेत. पण माझ्यासमोर चारशेहून अधिक स्त्रिया आहेत, आणि त्या चरखे वापरीत नाहीत याचे मला आश्चर्य वाटते.

नंतर गांधी देशातून दारिद्र्य घालविण्याकरिता चरख्याचा कसा उपयोग होईल यासंबंधी विस्ताराने बोलले. श्रीमंत व गरीब स्त्रियांनी चरखा वापरावा; आणि गांधी म्हणाले, ज्या स्त्रिया आपल्या हातांनी कातलेल्या व विणलेल्या सुताची खादी वापरतात त्यांचे आशीर्वाद मला हवे आहेत. त्यांच्या आशीर्वादाने माझ्यासमोर मी ठेवलेले ध्येय मी गाठू शकेन अशी मला खात्री आहे. जे स्वराज्य तुम्हा सर्वांना हवे आहे त्याकरिता तीन महिन्यांचा काळ हाही दीर्घकाळ आहे. साऱ्या हिंदुस्थानची मनोवृत्ती पूर्णपणे बदलून आम्हांला स्वराज्य मिळवावयाचे आहे. तुम्ही जे केले आहे त्यात समाधान मानू नका. पण मला अधिकाधिक पैसे देण्याकरिता पराकाष्ठा करा. मला अधिक पैसे देणे हे मुंबईचे कर्तव्य आहे; कारण मुंबईमधूनच साऱ्या हिंदुस्थानात, प्रत्येक गावात व खेड्यात विलायती कापडाचा पूर लोटतो. सध्या जी साठ लाखांची कमतरता आहे ती भरून काढून मुंबईने आपल्या पापाचे प्रायश्चित घेतले पाहिजे. जेथे सत्य असते तेथे जय असतो, हे तुम्हांला ठाऊक आहे.

तुमची कमिटी मुंबई प्रदेश कमिटीला जोडावी अशी जी त्यांची तक्रार होती, त्याबद्दल गांधी म्हणाले, मुंबईला जोडण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्हांला कोणीही बाहेर ठेवू शकणार नाही. तुमची इच्छा

असेल त्याप्रमाणे तुमचा पैसा महाराष्ट्र किंवा मुंबई कमिटीकडे जमा होईल. मुंबई कमिटीचे खजिनदार श्री. तेरसी व मोतीवाला हे आहेत. त्या खजिनदारांना या निधीतून एकही पै खर्च करण्याची सत्ता नाही. कमिटीचे सेक्रेटरी श्री. उमर सोभानी, बॅन्कर व डॉ. वेलकर हे आहेत. आणि लोकांनी ते एक पैसाही वाया घालविणार नाहीत यावर विसंबून राहावे. माझ्या एकट्यावर विश्वास ठेवण्यात लोकांनी चूक केली आहे. कारण हिंदुस्थानात जमलेल्या पैशांवर नजर ठेवणे अशक्य आहे. या फंडाची व्यवस्था चांगल्या माणसांच्या हाती ठेवावी म्हणून मी शिकस्त केली आहे. कारण हिंदुस्थानच्या हवेने पुष्कळच शुद्धता आणलेली आहे. ज्यांच्या हातात निधी आहे त्यांच्यापैकी एकही अधिकारी स्वतःकरिता एकही पैसा खर्च करणार नाही अशी मी खात्री देतो. आणि त्यातील प्रत्येकावर माझा संपूर्ण विश्वास आहे. मला मुंबई कमिटीच्या सभासदांची नावे माहीत नाहीत. पण खजिनदार व मंत्री माहीत आहेत. आणि त्यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकता येईल. मी त्यांच्या हातातील पैसे मिसेस नायडूंना देऊन टाका असे सांगितले नाही. कारण तिला चांगले हिशेब ठेवता येत नाहीत. सरोजिनी तुम्हांला चुचकारील आणि स्वराज्यफंडाला अधिक पैसा देण्याकरिता आपल्या गोड आवाजाने धाकही घालील (हंशा). म्हणून तुम्ही आपला पैसा पूर्ण विश्वासाने द्या. या पैशाचा उपयोग नव्या शाळा आणि कॉलेजे काढण्याकरिता व चरखे सुरू करण्याकरिता केला जाईल. कमिटीचा हेतू फक्त व्याजावर निर्वाह करावा असा नाही. हिंदुस्थानच्या पुनरुज्जीवनाकरिता आम्ही सारे भांडवल खर्च करणार आहोत.

वैष्णव व श्रावकांना उद्देशून गांधी म्हणाले, जोपर्यंत तुम्ही दलित वर्गाला बांधवाप्रमाणे वागविणार नाही तोपर्यंत तुम्हाला स्वराज्य मिळणार नाही. जोपर्यंत एक मनुष्य दुसऱ्या मानवी प्राण्याला तुच्छतेने आणि द्वेषाने वागवील तोपर्यंत तुम्हांला स्वराज्य मिळणार नाही; कारण तुम्ही त्याला लायक असणार नाही. गांधींनी श्रावक व वैष्णव या हिंदूंना आपल्यातील अस्पृश्यता कायमची नष्ट करण्यास विनंती केली– अस्पृश्यतेची भावना ही सैतानी आहे. ज्याप्रमाणे आपल्याला सैतानी सरकार घालवावयाचे आहे त्याचप्रमाणे आपल्यातील सैतानी पद्धत कायमची घालविण्यास तुम्ही तयार झाले पाहिजे. ज्या परिस्थितीत आपल्या गरीब बांधवाला आपण विहिरीतून पाणी काढू देत नाही, किंवा तो आजारी पडला असता त्याला इस्पितळात येऊ देत नाही, त्या परिस्थितीला काय म्हणावे ? हा

अस्पृश्यतेचा जो अडसर गरिबांना पायाखाली तुडविलेल्या परिस्थितीत ठेवतो, तो अडसर कायम ठेवून आपण स्वराज्याला लायक आहो असे कसे म्हणू शकू ?

'मुंबई क्रॉनिकल'वरून, २७-६-१९२१

१३३. मदनमोहन मालवीय यांना तार

मुंबई जून २८,१९२१

पंडित मदनमोहन मालवीय

सिमला सरकारची माफी[1] मागण्याचा उद्देश कधीच नव्हता. तसा माझा उद्देश असता तर मी स्पष्ट म्हटले असते. गेल्या आठवड्यात मी व्हाइसरॉयांना पत्र लिहिले आहे की, मुलाखतीचा संमत वृत्तांत प्रसिद्ध करावा किंवा गुप्ततेतून माझी सुटका करावी.

'मुंबई सीक्रेट ॲबस्ट्रॅक्ट्स', १९२१

१३४. टिप्पणे

अधिकारी आणि अधिकारी वर्ग

अहमदिया जमातीला दिलेले व्हाइसरॉयचे उत्तर असे दाखविते की, ते हुषार, संघटित व संपूर्ण उलट्या काळजाच्या अशा नोकरशाहीच्या हातात गेले आहे. त्यांनी अधिकारी व अधिकारी वर्गाचा बचाव केला आहे, त्यातच वर्णीय समानतेचा अर्थ

१. पाहा, "टिप्पणे", १५-६-१९२१ आणि २९-६-१९२१.

दिसून येतो. युरोपियन लोक हिंदी लोकांच्याविरुद्ध जे निर्धास्तपणे गुन्हे करतात त्यात व्हाइसरॉयांना विषमता दिसत नाही. मला पंजाबात एका मॅजिस्ट्रेटच्या विलक्षण निवाड्याची आठवण होते. तो मॅजिस्ट्रेट आपल्या कल्पनेने गुन्ह्याला झालेली कारणे सौम्य करीत जातो, आणि म्हणतो की, मी योग्य न्यायदान केले आहे; आणि तो, एका तरुण आयरिश शिपायाला त्याने एका निष्पाप हिंदी स्त्रीच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप केला म्हणून पन्नास रुपये दंड करतो.

व्हाइसरॉयसाहेब दररोजची वर्तमानपत्रे वाचण्याची तसदी घेत नाहीत. ती पत्रे युरोपियन्सनी हिंदी लोकांच्यावर लादलेल्या अपमानांच्या उदाहरणांनी ओतप्रोत भरलेली आहेत. ब्रिटिश अधिकाऱ्यांना आपल्या रेल्वेच्या डब्यात हिंदी न्यायाधिशांचे अस्तित्व सहन होत नाही, या गोष्टीची माहिती त्यांना नसावी असे वाटते. व्हाइसरॉय म्हणतात, "ब्रिटिश अधिकाऱ्याला ज्या हिंदी माणसाच्या संपर्कात तो येतो त्याच्यावर आपले वर्णीय श्रेष्ठत्व लादावे, या सूचक विधानाला काही पाया नाही असे मला खात्रीने वाटते." मी लॉर्ड रीडिंग यांना असे खात्रीने सांगतो की, त्यांचे हे अवलोकन सामान्य हिंदी माणसाच्या दररोजच्या अनुभवाविरुद्ध इतके आहे की, एक तर त्यामुळे त्यांच्या गाढ विचारशक्तीबद्दल लोकांचे ग्रह दूषित होतील किंवा त्यांच्या प्रामाणिक हेतूबद्दल शंकाही घेतली जाईल. ते आपल्या अधिकाऱ्यांना व अधिकारी वर्गाला जी चांगल्या वर्तनाची शिफारसपत्रे देतात त्यावरून लोक असे म्हणतील की, त्यांना मुद्दाम सत्य पाहावयाचे नाही आणि न्याय द्यावयाचा नाही. व्हाइसरॉयसाहेब हे बुद्धिपुरस्सर आंधळे आहेत असे नाही, पण नोकरशाही जे काय पाहण्याची परवानगी त्यांना देईल त्यापेक्षा अधिक पाहण्याची परवानगी त्यांना नाही, असे माझ्याप्रमाणे लोक म्हणणार नाहीत व त्यांना संशयाचा फायदा देणार नाहीत.

पाचशेव्या मजल्यावरून

खरी गोष्ट अशी आहे की, कोणत्याही व्हाइसरॉयला सत्य कळणे अशक्यच आहे. कारण एक तर तो वर्षातून सात महिने डोंगराच्या शिखरावर राहतो, आणि जेव्हा तो सपाटीवर राहात असतो त्या वेळेला तो लोकांपासून अगदी तुटक पडतो. अशी कल्पना करा की, एक मुंबईचा व्यापारी अगदी शेवटच्या मजल्यावरून व्यापार चालवीत आहे; आणि तो व त्याचे कारकून व विक्रेते यांच्यात फक्त टेलिफोन्स व लिफ्ट्स् आहेत. वरच्या आणि तळमजल्यामध्ये माणसे असलेले सलग मजले आहेत असे असूनही मुंबईचे लोक या प्रकारावर कधीच संतुष्ट होणार नाहीत. पण सिमल्याला एक मोठी व्यापारी पेढी आहे आणि सपाटीवर कोट्यावधी विव्हळणारे लोक आहेत आणि त्या दोघांच्यामध्ये एक निर्जीव व भक्कम असा खडक आहे. त्यामुळे सपाटीवरील लक्षावधी दुर्बल लोकांच्या उठलेल्या किंचाळ्या हवेत विरून जातात. राजपुत्र सिद्धार्थ

ह्याला इतका लोकांपासून अलग ठेवला होता की, त्याला दुःख, दारिद्र्य आणि मृत्यू हे ठाऊकच नव्हते. तो प्रामाणिक मुलगा होता. जर एक आकस्मिक घटना घडली नसती तर जग त्याला मुकले असते. पण तोही आपल्या लोकांच्यापेक्षा फार वर राहात नव्हता. त्याच्या बापाच्या प्रजेसारखाच त्याचाही रंग होता. सिद्धार्थ हा लोकांच्यापेक्षा तीस फूट अधिक उंचीवर राहात होता. पण व्हाइसरॉय ७,५००[1] फूट उंच लोकांच्यावर राहात आहेत. लोकांच्या आशा व भीती त्यांना समजू शकत नाहीत. जर त्यांनी लोकांपासून स्वतःला आपल्या खुबीने तोडून टाकले नसते तर तो त्यांचा दोष झाला नसता. जोपर्यंत व्हाइसरॉय शरीराने आणि मनाने सिमल्यात राहातात तोपर्यंत त्यांना सत्य कळू दिले जाणार नाही. सिद्धार्थाचेही असेच झाले. ज्याची बुद्ध म्हणून जग पूजा करते त्या विख्यात तरुण राजपुत्राच्या आयुष्यात एक आकस्मिक गोष्ट घडली, तशीच व्हाइसरॉयच्या बाबतीतही एक आकस्मिक गोष्ट घडू पाहात आहे. ती आकस्मिक गोष्ट म्हणजे; असहकारिता आणि जर लॉर्ड रीडिंग यांनी डोळे व कान उघडे ठेवले तर त्यांना लवकरच सत्य दिसेल व सत्य ऐकू येईल.

सावरकर बंधू

कॅपिटल पत्रात ' डिचर ' या लेखकाने या शूर बंधूंवर चिखल उडविला आहे. त्याने एका बंधूवर असा आरोप केला आहे की, तुरुंगवासाच्या काळात त्याने बिनतारीचा (वायरलेस) दुरुपयोग केला व शत्रूबरोबर व्यूह रचला. त्यांनी तपशीलही दिला आहे. जणू काय लेखकाला तो परिच्छेद लिहिण्याकरिता सरकारीरीत्या उद्युक्त करण्यात आले. जर आरोप खरा असेल तर सरकारने खऱ्या गोष्टी उजेडात आणाव्यात-आहे त्या परिस्थितीत लोकांच्या दृष्टीने त्या बंधूंची बे-अब्रू झाली आहे. ते असहकारितावादी नाहीत. आपण पूर्णपणे निरपराधी आहोत असा त्यांचा दावा आहे. आणि त्यांना त्या पत्राविरुद्ध सहज इलाज करता येतील. ते काहीही असो, डॉक्टर सावरकर मला कळवितात की, गणेश दामोदर याने माफी धरून १४ वर्षे व २ महिने शिक्षा भोगली आहे. आणि कायद्याप्रमाणे त्यांची सुटका व्हावयास पाहिजे आहे. इंडियन पीनल कोडचे ५५ वे कलम म्हणते :

> ज्या प्रत्येक खटल्यात जन्मठेपेची शिक्षा दिली असेल त्या बाबतीत हिंदुस्थान सरकारला किंवा जेथे आरोपीला शिक्षा झाली असेल तेथील सरकारला गुन्हेगाराच्या संमतीशिवाय कोणत्याही प्रकारची शिक्षा कमी करता येईल. पण ती चौदा वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

१. सिमला येथे समुद्रसपाटीपासून उंचावर.

या कलमाप्रमाणे हे स्पष्ट होते की, गणेश दामोदर सावरकर यांना दोन महिन्यांपूर्वीच सोडावयास पाहिजे होते. त्या बंधूंना अंदमानमधून हालविल्यामुळे, मी जे कलम उद्धृत केले ते त्यांच्या बाजूने अमलात आणावयास पाहिजे. आणि त्यांना चौदा वर्षांपेक्षा अधिक काळ अटकेंत ठेवता कामा नये. चौदा वर्षांचा काळ कमी करताना त्यांना मिळालेल्या माफ्या हिशेबात धरल्या पाहिजेत. हे उदाहरण उजेडात आणण्याचे कार्य एका प्रेमळ बंधूच्या परिश्रमामुळे झाले. पण ते एकटेच उदाहरण असू शकणार नाही. कायद्याच्या नावाने किती गैरकायदा गोष्टी केल्या जातात हे जगाला कधीच कळणार नाही. श्री. सावरकर यांना जाणूनबुजून व दुष्टपणाने अटकेत ठेवले आहे असे म्हणण्यास माझी तयारी नाही. पण ज्याला जखम होते त्याला यापासून काय समाधान ?

स्वातंत्र्याचे प्रवेशद्वार

वरच्या वर्गातसुद्धा असे लोक आहेत की, ज्यांना हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळविण्याकरिता तुरुंगवासाची परिणामक्षमता पटत नाही. त्यांना वाटते की, तुरुंगवासामुळे शूर लोकांच्या सेवेला लोक मुकतात. याचा अर्थ असा की, जे अत्यंत शूर शिपाई असतील त्यांनी आपल्या कार्याकरिता कराव्या लागणाऱ्या मार्गदर्शनाला मुकण्याची भीती आहे म्हणून, त्यांनी कोणतेच धाडस करू नये. असे संशयात्मे ही गोष्ट विसरतात की, लोकमान्यांना जी प्रचंड लोकप्रियता व वजन लाभले, त्याचे कारण त्यांचा तुरुंगवास. कॅल्व्हारीवरील येशूचा मृत्यू हा त्याच्या यशाचा मुकुट होता. करबालाच्या भूमीवर इमाम हसन यांची उत्कटता हीच इस्लामला जगात प्रभावी शक्ती होण्यास कारणीभूत झाली. अनंत यातनांबद्दल हरिश्चंद्राचे स्मरण होते. जोपर्यंत लक्षावधी लोक निर्भय झाले नाहीत, व कोणताही अपराध न करता तुरुंगात जावयास तयार होणार नाहीत तोपर्यंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाही. आणि जरी लाखो लोक तयार नसले तरी स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वी हजारो लोक तुरुंगात जाऊन पडले पाहिजेत. असहकारितेचा हेतू राष्ट्राचे खरे शौर्य जागृत करणे हा आहे. जर आम्ही स्वतंत्र होणार असलो तर मृत्यूपर्यंतच्या यातनाही सहन करण्याची आम्ही पर्वा करता कामा नये. जो स्वतःला वाचवील तो नष्ट होईल.

आपण बचाव करावा का ?

या सरकारच्या इच्छेला न्याय्य रीतीने विरोध करण्याकरिता तुरुंग भरणे ही गोष्ट खरी असेल तर आपण ब्रिटिश कोर्टात स्वतःचा बचाव करता कामा नये, आणि त्याहीपेक्षा वकील देता कामा नये. मला ठाऊक आहे की, सावरकर बंधूंच्याप्रमाणे काही खटले भानगडीचे असतात अशी कल्पना करणे शक्य आहे. मला जर ते खात्री पटलेले असहकारितावादी आहेत असे ठाऊक असते तर, त्यांनी आपला छळ

करणारांच्या विरुद्ध नुकसानभरपाईचे इलाज करू नयेत असा सल्ला, त्यांचे म्हणणे सर्वस्वी बरोबर असले तरी, मी दिला असता. अशा खटल्यात भाग न घेणे हे जरी ब्रिटिश कोर्टावर बहिष्कार घालण्याच्या निश्चयाप्रमाणे अधिक योग्य असले, तरी क्लेश सहन करण्याच्या धर्माप्रमाणे ते तितकेच आवश्यक आहे.

पुन्हा माफी

सिमल्याची मुलाखत आणि माफी याच्याइतका काळ दुसऱ्या कशानेही वाया दवडला नाही. माझ्यासमोर असलेल्या अनेक पत्रांपैकी मी एकाच पत्राचा परामर्श घेतो. माझे एक सन्मान्य[1] मित्र आहेत. त्यांना माझ्या प्रामाणिकपणाच्या व न्याय्य वर्तनाच्या कीर्तीबद्दल काळजी वाटते. ते म्हणतात, सिमल्यातली बोलणी ही मी व्हाइसरॉयना अन्याय केला असे दर्शवितात. मी जवळ जवळ त्यांच्यावर सत्यापलापाचा आरोप केला आहे, आणि ती माफी सरकारला उद्देशून नाही असे म्हणण्यात मी कदाचित अजाणतेपणाने सत्यापासून दुरावलो आहे. माझे अद्यापही मत आहे की, ती माफी सरकारला दिली नव्हती. जर ती तशी असती तर शब्दातच तसे स्पष्ट करण्यास मी कचरलो नसतो. त्या माफीमध्ये संदिग्धता ठेवण्याचा हेतूच नव्हता. अलीबंधूंची अब्रू बचाविण्याकरिता काही तरी लपवून ठेवावे असा तो प्रसंगच नव्हता. मी प्रत्येकाला व नामदार व्हाइसरॉयसाहेबांनाही असे आश्वासन देतो की, जर मी सत्यापासून रेसभर चळलो आहे असे मला आढळले तर मी त्यांची आणि जगाची माफी मागेन. देशातील किंवा अन्य ठिकाणच्या माझ्या वचनापेक्षा मी सत्याला श्रेष्ठ समजतो. लॉर्ड रीडिंग यांनी मानभंग केला असा आरोप मी केला आहे याची मला जाणीव नाही. पटापट बोलत जाणे हा एक मानसिक सिनेमा आहे. मन हे शाब्दिक चित्रे जसजशी येतात तसतशी झटझट ग्रहण करते; पण सारी चित्रे तेथे स्मरणात कायम राहात नाहीत, किंवा त्यांचा क्रम बिनचूक असत नाही. विविध मुलाखतींचे निरनिराळे छाप आम्ही दोघांनी मनावर पाडून घेतले असतील हे शक्य आहे. मी शक्य तितक्या बिनचूकपणे माझ्यावर पडलेली छाप निवेदन केली आहे, आणि असे करताना शक्य तोवर विश्वासभंगाचा गुन्हा केला नाही. पण मला असे स्पष्ट दिसते की, लोक धुक्यात सापडले आहेत त्या मुलाखतींचा जवळ जवळ पूर्ण वृत्तांत आल्याशिवाय लोकांचे पूर्ण समाधान होणार नाही. मी त्यांची जिज्ञासा तृप्त करण्यास उत्सुक आहे. त्याकरिता मी व्हाइसरॉय साहेबांशी पत्रव्यवहार करीत आहे, आणि त्यांना म्हटले आहे की, एक तर मुलाखतीचा उभयसंमत वृत्तांत प्रसिद्ध करावा किंवा गुप्ततेच्या वचनातून माझी मुक्तता करावी. माझ्यापुरते म्हणावयाचे म्हणजे ज्याचा आदर करावा अशी गुप्तता मजजवळ नाही. पण मला हे ठाऊक

१. उघड उघड हे मालवीय आहेत. पाहा, " मदन मोहन मालवीय यांना तार. " २८-६-१९२१.

आहे की, माझ्यासारख्या सार्वजनिक कार्यकर्त्यापेक्षा व्हॉइसरॉयचे स्थान हे सर्वस्वी निराळे आहे. ज्यांना सर्व हकीकत जाणण्याची उतावीळ असेल त्यांनी थोडा धीर धरावा. दरम्यान मी जी एक गंभीर चूक केली असे मला वाटते तिची कबुली मला दिली पाहिजे. जे पत्रक काढले जाणार होते ते मला दाखवा असे मी म्हणावयास पाहिजे होते. मी परत सिमल्याला जावयाला उत्सुक नव्हतो आणि माझ्या दौऱ्यात अडथळे यावेत अशी माझी इच्छा नव्हती. शिवाय माझी अशी खात्री होती की, सारे काही नीटनेटके व उभय पक्षांना श्रेयस्कर घडून येईल. प्रामाणिक गैरसमजच काय, पण त्याही-पेक्षा वाईट गोष्टी घडतात हा सारा अनुभव असून देखील मी अधिक सावध असावयास पाहिजे होते. पण तसे घडणार नव्हते. तथापि या वादविवादामुळे बरीच कटुता निर्माण झाल्याचे दुर्दैवाने घडले असले तरी राष्ट्राच्या हिताला बाधा येण्याऐवजी ते हित अधिकच साधले आहे, अशी माझी खात्री आहे. तूर्त मी मौलाना अब्दुल बारी या सज्जन गृहस्थांचा निर्णय मानला पाहिजे. ते म्हणतात की, असहकारितावाद्यांची वृत्ती जी विगलित झाली आहे तिच्यामुळे झालेली हानी उघड दिसते. पण लाभ हा भविष्य-काळाच्या उदरात आहे. थांबू या, आणि पाहू या.

पारशांचे औदार्य

तिजोऱ्यांचे प्रसिद्ध व्यापारी श्री. गोदरेज यांनी टिळक स्वराज्य फंडाला तीन लाख रुपयांची देणगी देऊन सर्व देणग्यांत आघाडी मारली आहे. सार्वजनिक कार्या-करिता त्यांनी दिलेल्या देणग्या अद्यापपर्यंत अज्ञात होत्या. पण ह्या वेळीं तुमची देणगी जाहीर करा अशी जरूरी असल्याबद्दल त्यांचे मत वळविण्यात आले. मी श्री. गोदरेज व साऱ्या पारशी समाजाला त्याबद्दल धन्यवाद देतो. मला आणखीही असे सांगावयाचे आहे की, मुंबईत जो निधी गोळा करण्याचा सप्ताह पाळण्यात आला, त्यात एकही दिवस पारशांची देणगी नाही असा गेला नाही. पारशी स्त्री–पुरुष दारोदार हिंडून पैसे जमा करीत आहेत. पारशी हे निरोधनही करीत आहेत. सारीच पारशी वृत्तपत्रे चळवळीविरोधी नाहीत. पण गोदरेज यांच्या औदार्याने सारा पारशी समाज हिंदु-स्थानात पहिला ठरला आहे. पारशी रस्तुमजी यांनी जे बावन्न हजार रुपये दिले, त्यानेही पारशांना मानाचे स्थान मिळाले असते. पण गोदरेज यांनी पहिली जागा पटकाविली आहे.

संकट पुढेच

दारू दुकानांवरील निरोधनाचा पारशांशी निकटचा संबंध आहे. आपल्याला आपल्या पारशी बांधवांबद्दल अत्यंत सोशिकपणा दाखविला पाहिजे. जरी आपण निरोधन सर्वस्वी थांबवू शकलो नाही, तरी आपण दारू व्यापाऱ्यांची परिषद घेतली पाहिजे, त्यांना भेटले पाहिजे, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत, व आपल्या

अडचणी त्यांना समजावून सांगितल्या पाहिजेत. श्री. गोदरेज यांनी आपली देणगी दारूबंदीकरता व दलित वर्गाच्या खास उद्धाराकरिता दिलेली आहे. म्हणून सारे पारशी दारूबंदीच्या चळवळीविरुद्ध आहेत असे समजता कामा नये. जर नेमस्त मंत्र्यांनी सारे धैर्य एकवटून लिलावांचा पैसा परत केला नाही व दारू दुकाने बंद केली नाहीत तर दारूबंदीच्या लढ्यापासून अत्याचार होण्याची सध्या अत्यंत भीती आहे. मी त्यांना आश्वासन देतो की, ही चळवळ नियंत्रित करता येईल पण दाबून टाकता येणार नाही. लोकांनी आता दारू दुकाने बंद करण्याचेच ठरविले आहे; आणि दारूची विक्री हा एक औषध म्हणून विक्रीशिवाय गुन्हा आहे असे ते मानू लागले आहेत. या गोष्टीला दिरंगाई चालणार नाही.

ते शुद्ध कसे करते

प्रत्येकाला मि. आब्बास तय्यबजी हे माहीत आहेत. त्यांनी काँग्रेस कमिटीचा पंजाब अहवाल[१] अत्यंत परिश्रमाने संपविल्यानंतर, ते देशाची कोणती ना कोणती सेवा करीत आहेत. पण असहकारितेने त्यांच्या जीवनात क्रांती केली. तशी तिला अनेक जीवने आहेत. मि. आब्बासभाई हे जरी वृद्ध असले तरी बेझवाडा कार्यक्रमातील खेडा जिल्ह्याने आपला भाग पूर्ण करावा म्हणून ते तेथे रात्रंदिवस काम करीत आहेत. शेतकऱ्याच्या कष्टप्रद जीवनाची त्यांना सवय नाही. तथापि ते सध्या खेडा जिल्ह्यातील साध्या शेतकऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांच्यात मिळून मिसळून वागत आहेत. त्यांच्या-बरोबर काम करीत असलेले तरुण मित्र मला सांगतात की, उत्साह आणि उद्योगमग्नता यांत ते सर्वांना मागे सारीत आहेत. मी त्यांच्या प्रकृतीबद्दल काळजी व्यक्त करणारे पत्र त्यांना लिहिले असता त्याचे जे उत्तर त्यांनी पाठविले आहे, त्यातील भावना वाचक ग्रहण करतील अशी माझी खात्री आहे. ते लिहितात :

> माझ्या प्रकृतीबद्दल बिलकूल चिंता करू नका. कित्येक वर्षांत माझी प्रकृती इतकी चांगली नव्हती. बेझवाड्याला स्वीकारलेल्या खादीने मला वीस वर्षांनी तरुण केले आहे. किती चांगले अनुभव येतात! जेथे जेथे मी जातो, तेथे तेथे खेड्यांतील स्त्रियांकडूनही मला प्रेमाने व जिव्हाळ्याने वागविले जाते. मी गेलेल्या बहुतेक ठिकाणांनी आपल्या हिश्श्यापेक्षा दुप्पट किंवा तिप्पट मला दिले आहे. आनंद आणि नडियादसारखी शहरे मागे पडली आहेत. पण नडियादला मी आताच चार दिवस घालविले आहेत. ते शहर वर येत आहे, आणि जरी त्याने आपल्या हिश्श्यापेक्षा जास्त दिले नाही तरी तो आपला हिस्सा पुरा करील. मी आज कपड-

१. पंजाबच्या दंग्याबद्दल चौकशी करण्याकरिता जी राष्ट्रीय सभेने अहवालाकरिता उपसमिती नेमली होती, तिला उद्देशून हे आहे. पाहा. खंड. १७. प्रकरण ८३.

वंजला जात आहे, आणि माझ्या रात्री मी नडियादलाच घालविणार आहे. तसे न केल्यास आमचे सन्मित्र झोपा घेऊ लागतील... आपल्या काही कार्यकर्त्यांत जोमाचा अभाव आहे. मला वाटते की, ज्या वर्गाचा मी प्रतिनिधी उरलो नाही अशा प्रतिष्ठित वर्गातले ते आहेत. देवा ! काय हा अनुभव ! मला सामान्य लोकांकडून इतकी ममता आणि प्रेम मिळते की, त्या वर्गाचा म्हणविणे हा केवढा मान आहे ! ह्या फकिराच्या वेषामुळे सारे अडसर मोडून पडले आणि आता माझी इच्छा होती त्याप्रमाणे स्त्रीपुरुष मला भेटत आहेत. फेटा, साफा, अंगरखा, बूट व स्टॉकिंग्ज् यांमुळे एखाद्या माणसाची गरीब बांधवापासून ताटातूट कशी होते हे मला पुष्कळ वर्षांपूर्वीच कळते तर ! असा पोषाख केल्यामुळे त्यांच्यापैकी कोणालाही आपल्यावर विश्वास ठेवणे कसे शक्य नसे हे आता मला समजले. जे काय मी माझ्या आयुष्यात गमावले ते आता उदय पावत आहे... या चळवळीने माझ्या जीवनाच्या प्रवाहावर जो काय परिणाम केला तो मला अंधुकपणेच दिसत आहे. पण मला तो दिसत आहे हेच महत्त्वाचे आहे. दान देण्यात किती आनंद आहे हे पटणे, हाही एक ताजा अनुभव आहे.

चरख्याची वाखाणणी

एक खिश्चन स्त्री लिहिते :

चरख्याच्या द्वारा स्वराज्य मिळविण्याकरिता मी काम करण्याची शिकस्त करीन. मी निघण्यापूर्वी चांगले चरखे करवून घेण्यात यशस्वी झाले. ‘ रठीनूम्स ’ असे आम्ही त्यांना तामीळमध्ये म्हणतो. गरीब स्त्रिया आल्या, त्यांनी माझ्याकडे चरखा मागितला आणि पोटाला थोडेसे अधिक मिळविण्याकरिता कताई आम्हांला शिकवा असे म्हणू लागल्या. मला खिस्ताचे शब्द आठवले : “ मी नागवा होतो आणि तुम्ही मला कपडे दिले नाहीत ”, “ मी भुकेला होतो आणि तुम्ही मला खावयाला दिले नाही. ” “अखेरच्या न्यायाच्या दिवशी माझा प्रभू मला तरी ते कठोर शब्द लावणार नाही.” हिंदुस्थान नग्न व उपाशी आहे. हिंदुस्थानच्या गरीब स्त्रियांची मुले भाकरीकरिता रडत आहेत आणि त्या आपल्या मुलांना पोसण्याकरिता आपली अब्रू विकीत आहेत. हिंदुस्थानच्या हद्दीत नैसर्गिक संपत्ती विपुल असताही अशी केविलवाणी स्थिती आहे हे विशेष. हिंदुस्थानची शेती ही एखाद्या रस्त्याच्या कडेला बसलेल्या, कापूस, तांदूळ व गव्हाची शेती सभोवती असलेल्या, नग्न व उपाशी स्त्रीसारखी झाली आहे. हिंदुस्थानच्या उत्पादनावर परके लोक लठ्ठ बनत असता हिंदी स्त्रिया आळसात का बसतात ? कारण जे काम हिंदी स्त्रियांनी करावयास पाहिजे, ते काम परके

> लोक हिरावून घेतात. चरखा हिंदुस्थानला काम देईल आणि जी लहान मुले अन्नाकरिता रडत आहेत त्यांच्या तोंडात अन्नाचा घासही घालील. चरख्याच्या संगीताबरोबर स्त्रिया आपली सुंदर गाणी गातील, जुन्या गोष्टी सांगतील, आणि साध्या गृहजीवनातील सौंदर्य व संतोष हा पुन्हा निर्माण होईल. जर माझ्यात कवित्वशक्ती असती तर मी चरख्याचे गाणे गायिले असते. त्याचे सौंदर्य आणि उपयुक्तता, त्यातील काव्य व धार्मिक मूल्य हेही गायिले असते. आमच्या गरजेच्या वेळी परमेश्वर मदतीला धावून आला म्हणून त्याचेही स्तुतिपर गान गायिले असते. मी माझ्या हिंदुस्थानातील भगिनींना चरखा घ्यावयास सांगेन. तो चरखा भूक, उपासमार आणि बेअब्रूरूपी लांडग्याला घराबाहेर हाकलून लावतो.... पण मला ती देणगी नाही. ते गाणे माझ्या अंतःकरणातच गायिले जात आहे. तर मग मी काय करू ? मी काम करीत असता आणि लोकांना काम करण्यास शिकवीत असता चरख्याला स्वतःचे गाणे गाऊ द्या.

ही स्त्री कताई कामात चांगली वाकबगार झाली आहे. आणि ती कताई जेथे खास करून शिकविली जाईल अशी मुलींची शाळा काढण्याकरिता आपली सारी संपत्ती खर्च करणार आहे.

खरी वृत्ती

गुजरात प्रदेश काँग्रेस कमिटीने अखिल भारतीय काँग्रेस कमिटीवर जे सभासद निवडून पाठवावयाचे आहेत त्यांची निवडणूक पुरी केली आहे. मी त्यांची नावे गुणानुक्रमे देतो. अब्बास तैय्यबजी. इमाम ए. के. बवासीर, सी. एफ. अँड्रयुज, अनसूयाबेन साराभाई, एम्. के. गांधी, वल्लभभाई पटेल, महादेव देसाई, इंदुलाल के. याज्ञिक, डॉ. दीक्षित, डॉ. चंदूलाल देसाई, मोहनलाल पंड्या आणि वामनराव मुकादम. निवणूक अर्थातच क्रमदेय एक मतदान पद्धतीने झाली. मी वाचकांना नावाची तसदी दिली नसती. पण निवडणुकीपासून धडा शिकता येतो. वाचकांना असे आढळेल की, तीन मुसलमान आणि तेही यादीत पाहिले आहेत. याचा अर्थ मतदारांना त्यांच्या निवडणुका निश्चित करावयाच्या होत्या. संख्येच्या दृष्टीने दोहोंपेक्षा अधिक मुसलमान निवडण्याची जरूरी नव्हती. पण मतदारांनी शहाणपणाने तिघाही मुसलमानांना निवडून दिले. नंतर त्यांना एका स्त्रीची निवडणुक निश्चित करावयाची होती. म्हणून श्रीमती अनसूयाबेन ह्या त्यांच्यामागून आल्या. या निवडणूकीचे जर सर्वांत वैशिष्ट्य असेल तर हे की, जरी सर्व चांगले कार्यकर्ते निवडून आले तरी तितकेच चांगले व लायक कार्यकर्ते बाजूला सरले. ते निवडणुकीला उभे राहिले नाहीत. ज्या कोणाचा संबंध असेल त्या सर्वांच्या आत्मविसर्जनाच्या वृत्तीची मी प्रशंसा करतो. मानाच्या जागेकरिता कार्यकर्त्यांत चुरस असू नये. सर्वांचा उद्देश अत्यंत कार्यक्षम कार्यकर्ते होण्याचा असावा;

पण जर ते आपल्या डोक्यावर जागेच्या जबाबदाऱ्या घेणार असतील तर, त्यांना मानाच्या जागांवर कदाचित निवडून जाता येणार नाही. सर्वात उत्तम मार्ग म्हणजे प्रत्येकाने बाजूला राहण्यास तयार होणे हा होय; आणि त्यांनी इतरांना निवडून येऊ द्यावे. अशामुळेच कटुता, रोगट स्पर्धा व अंतःकरणाची जळजळ टाळणे शक्य आहे. एखादा माणूस कधीही अधिकारावर नसला तरीही त्याला सर्वांत चांगली सेवा करता येणे शक्य आहे. साऱ्या जगातील उत्तम कार्यकर्ते हे बहुतकरून मूकच असतात.

मुस्लिम प्रतिनिधित्व

लखनौ करारासंबंधी वर्किंग कमिटीने जो सल्ला देणारा ठराव केला आहे, त्याविषयी अनेक तक्रारी आल्या आहेत. नव्या घटनेत मुसलमान प्रतिनिधित्वासंबंधी जे एकच कलम आहे ते अल्पसंख्याकांच्या हक्कांबद्दल. मुसलमान हे आपल्या प्रतिनिधित्वाबद्दल घाबरत आहेत, व त्यांना काँग्रेसमध्ये लखनौ करार पाळला जावा अशी इच्छा आहे. ही गोष्ट वर्किंग कमिटीच्या नजरेस आणल्यामुळे त्यासंबंधी मार्गदर्शन करणे हितकर होईल असे वाटले. आपल्यात फूट पाडण्याचे निश्चितच प्रयत्न चालले आहेत. मुसलमान आताच आत येऊ लागले आहेत. त्यांनी काँग्रेसमध्ये यावे म्हणून प्रत्येक कायदेशीर प्रलोभन दाखविणे हे हिंदूंचे कर्तव्य आहे. साऱ्या धर्मांच्या व वर्णांच्या लोकांना एकत्र येण्याची ती समान भूमी झाली पाहिजे. जेथे विनंती करूनही मुसलमान पुढे येणार नाहीत तेथे त्या जागा उमेदवारांच्या अभावी मोकळ्या सोडाव्यात किंवा योग्य मुसलमान उमेदवार पुढे येईपर्यंत त्या जागा दुसऱ्यांनी भरून काढाव्यात. काही मित्रांचा आग्रह आहे की, आपण सध्याच विशिष्ट हक्कांचा विचार करू नये पण लायकीचा करावा. लायकी ही खरोखरच प्रशंसनीय असते. पण आपल्या इंग्लिश मित्रांनी जसे तिचे थोतांड केले आहे तसे आपल्याला सहज करता येईल. लायकीपेक्षा एकी अधिक महत्त्वाची आहे. आपल्या दृष्टीने एकी म्हणजेच लायकी. एकीकरिता ज्या एका गोष्टीचा आपण त्याग करू नये, ती म्हणजे तत्त्व किंवा सदसद्विवेकबुद्धी किंवा दुसऱ्या शब्दांत म्हणजे सत्य.

गोरक्षण

हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या अनुषंगाने मी पुन्हा एकदा गोरक्षणाकडे वळतो. माझ्याइतके दुसऱ्या कोणाही हिंदूच्या अंतःकरणामध्ये गोरक्षण नाही. पण मी उतावळा होणार नाही. गोहत्या थांबवावी म्हणून आपल्या मुसलमान बांधवांची दाणादाण करावी यात आपल्याला कधीही यश येणार नाही. आपणा हिंदूंना गाईबद्दल ज्या भावना आहेत तशा भावना तितक्या प्रमाणात मुसलमानांना कधीच वाटणार नाहीत. आपण स्वतः सन्मानाने वागून त्यांचा मान कसोटीला लावू शकू. बिहार हे अद्याप वादळाचे केंद्र आहे. मी हिंदू व मुसलमान या दोघांही पुढाऱ्यांना असे आग्रहाने सांगेन की,

त्यांनी काळाचा फायदा घ्यावा आणि ही गोष्ट मुळातच खुडून टाकावी. बिहारच्या हिंदूंनी शाकाहाराची गोहत्येबरोबर गल्लत करू नये. या दोन्ही गोष्टी निरनिराळ्या पायावर आधारलेल्या आहेत. गोसंरक्षण हा वीस कोटी हिंदूंचा धर्म आहे, आणि शाकाहार हा एका लहान अल्पसंख्याकांचा धर्म आहे. शाकाहारी लोकांना आपले विचार दुसऱ्यांवर सक्तीने लादण्यास परवानगी देऊ नये.

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी

वाढविलेल्या व नव्याने निवडलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक २२ जुलैला लखनौ येथे भरणार आहे. ती महत्त्वपूर्ण होईल. त्या बैठकीत असा कार्यक्रम ठरवावयाचा आहे की, ज्यामुळे स्वराज्याची स्थापना ही निश्चयपूर्वक होऊ शकेल, आणि चालू वर्षात खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर होतील. त्या कमिटीला एक तर नवीन वर्किंग कमिटी निवडावी लागेल किंवा जुनी कायम करावी लागेल. पण ती वर्किंग कमिटी कायम करावयाची असेल तर नव्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीत जुन्या वर्किंग कमिटीचे सर्व सभासद पुन्हा निवडून आलेले असले पाहिजेत. कदाचित त्या कमिटीला वर्किंग कमिटीचे काही निकाल पुन्हा चर्चेला घ्यावे लागतील. त्या विचारातून या वर्षात स्वराज्य प्राप्तीच्या प्रश्नाचा तिला निर्णय करावा लागेल. म्हणून ह्या कमिटीपुढे जे प्रश्न येतील अशा अनेक प्रश्नावर विचार करण्याकरितां संपूर्ण सभागृहाला सवड मिळेल, अशी आशा करण्यास हरकत नाही.

जूननंतर

काहीजणांची अशी समज आहे की, ३० जूननंतर बेझवाडा कार्यक्रमाकरिता आणखी प्रयत्न करण्याची जरूरी उरणार नाही. ही मूर्ख, भोळी समजूत आहे. जरी आपण एक कोट सभासद केले असतील व वीस लाख चरखे चालू केले असले तरी तरी दोहोंत वाढ केली पाहिजे. कमीत कमी पैसा गोळा केल्यानंतर आपण टिळक स्वराज्य फंड हवा तर थांबवावा; पण अधिक पैसा गोळा करण्यात नुकसान नाही. असे दिसते की, ३० जूनपर्यंत पुष्कळसे प्रांत आपला हिस्सा पुरा करू शकणार नाहीत. म्हणून त्यांनी पैसे गोळा करण्याचे चालू ठेवावे. निदान ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेपर्यंत तरी ते काम चालू ठेवावे.

'यंग इंडिया', २९-६-१९२१

१३५. तुर्कस्थानचा प्रश्न

जर आपली खरोखर मुसलमान बांधवांचे कल्याण व्हावे अशी इच्छा असेल तर युरोपमध्ये तुर्की राष्ट्रीयत्व नष्ट करण्याची जी चळवळ चालू आहे, तिच्याविरुद्ध आपण मुसलमानांना सहानुभूती दाखविली पाहिजे. ब्रिटिश सरकार ही चळवळ उघडपणे किंवा गुप्तपणे चालवीत आहे याबद्दल अत्यंत कीव येते. हिंदूंनी पॅनइस्लामच्या (विश्वव्यापी इस्लाम धर्माच्या) चळवळीने घाबरू नये. ती चळवळ हिंदी विरोधी किंवा हिंदू विरोधी नाही किंवा असण्याची जरुरी नाही. मुसलमानांनी प्रत्येक मुसलमान राज्याबद्दल सदिच्छा दाखविली पाहिजे आणि जर ते राज्य निष्कारण संकटात असेल तर त्याला मदतही केली पाहिजे, आणि जर हिंदू हे मुसलमानांचे खरे मित्र असतील तर त्यांना मुसलमानांच्या भावनांशी सहभागी झालेच पाहिजे. युरोपमधून तुर्की साम्राज्य नष्ट होण्याचे वाचविण्याकरिता जे मुसलमान बांधव प्रयत्न करीत आहेत त्या प्रयत्नांत हिंदूंनी मुसलमानांच्याबरोबर सहकार्य केले पाहिजे. ब्रिटिश सरकार अंगोराच्या तुर्की सरकार विरुद्ध ग्रीकांना उघड उघड मदत करतील, अशा यत्किंचित सूचक गोष्टींनी जेव्हा मुसलमान घाबरतात तेव्हा हिंदूंची चलबिचल होता कामा नये. जर ब्रिटनला इतके वेड लागले तर हिंदुस्थान ब्रिटिश सरकारच्या अशा तुर्काविरुद्धच्या कारस्थानाला त्यांना मदत करू शकणार नाही. त्याचा अर्थ इस्लामविरुद्ध युद्ध पुकारण्यासारखाच होईल. इंग्लंडला आपली निवड करता येईल. जागृत झालेल्या हिंदू व मुसलमानांना ते यापुढे गुलामगिरीत ठेवू शकणार नाहीत. जर हिंदुस्थानला साम्राज्यातील इतर सभासदांइतक्या समान भागीदाराच्या दर्जाने राहावयाचे असेल तर हिंदुस्थानच्या मतदानाची एकूण संख्या दुसऱ्या कोणत्याही सभासद राष्ट्रापेक्षा निश्चितच श्रेष्ठ असली पाहिजे. स्वतंत्र राष्ट्रकुटुंबात जोपर्यंत बाकीचे सभासद काही समान तत्त्वांना एकनिष्ठ राहतात, तोपर्यंत त्या कुटुंबात राहणे हे जसे त्याचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे बाकीचे सभासद वाकड्या मार्गाने जाऊ लागले तर प्रत्येक भागीदाराला त्यातून फुटून निघण्याचा तितकाच हक्क आहे. जर हिंदुस्थानने चुकीचे मतदान केले तर इंग्लंडला इतर भागीदारांप्रमाणे भागीदारीतून अंग काढून घेता येईल. म्हणून जेव्हा हिंदुस्थान हा स्वतंत्र होईल तेव्हा समतोलपणाचा काटा, हा इंग्लंडकडे न झुकता हिंदुस्थानकडे झुकला पाहिजे. साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा माझा हाच अर्थ आहे. कोणत्याही विचारविनिमयात पाशवी शक्तीला स्थान मिळता कामा नये. समजूतदारपणाला शरण गेले पाहिजे, पण तलवारीला कधीही हात घालता कामा नये.

जसे इंग्लंडचे तसेच हिंदुस्थानचे. हिंदुस्थानलाही आपली निवड करता येईल. आज आपण साम्राज्यांतर्गत स्वराज्याकरिता झगडत आहोत. कारण इंग्लंड हा शेवटी सच्चा ठरेल अशी आपल्याला आशा आहे. पण इंग्लंडने फसविलेच तर आपण स्वातंत्र्याकरिता झगडू. पण जेव्हा ब्रिटन हा तुर्कांचा नायनाट करण्याकरिता प्रयत्न करीत आहे असे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे, तेव्हा हिंदुस्थानला स्वातंत्र्याशिवाय गत्यंतरच नाही. तुर्कांचे अस्तित्वच धोक्यात असताना मुसलमानांना मागे पाहाता येणार नाही. त्यांना शक्य असल्यास त्यांनी तलवारीला हात घालावा आणि नष्ट व्हावे किंवा शूर तुर्कांच्याबरोबर विजयी व्हावे. परंतु जर ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध त्यांना युद्ध पुकारता येत नसेल तर जे सरकार तुर्कांच्याविरुद्ध दुष्टपणाने युद्ध करते, त्या सरकारची निष्ठा त्यांना झुगारून देता येईल. हिंदूंचे कर्तव्य तितकेच स्पष्ट आहे. जर आपण अद्याप मुसलमानांना भीत असू व त्यांच्याबद्दल अविश्वास दाखवीत असू, तर आपण ब्रिटिशांची बाजू घेतली पाहिजे आणि आपली गुलामगिरी लांबविली पाहिजे. जर आपण जे आपले देशबांधव मुसलमान आहेत त्यांना न भिण्याइतके शूर व धार्मिक असू आणि जर त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचा शहाणपणा आपल्यात असेल तर हिंदी स्वातंत्र्य मिळविण्याकरिता आपण प्रत्येक शांततामय व सत्यपूर्ण अशा पद्धतीमध्ये मुसलमानांशी सहकार्य केले पाहिजे. मी जसा हिंदू धर्म समजतो त्याप्रमाणे कोणाही हिंदूला स्वातंत्र्याकरिता असो किंवा साम्राज्यांतर्गत स्वराज्याकरिता असो; अनत्याचारी असहकारितेशिवाय दुसरा मार्ग नाही. जर हिंदुस्थान अहिंसेची अजिंक्य शक्ती व रहस्य शिकला व ते आत्मसात केले तर हिंदुस्थानला आजसुद्धा वसाहतीचा किंवा स्वतंत्रतेचा दर्जा मिळू शकेल. जेव्हा हिंदुस्थान हा धडा शिकेल तेव्हा करबंदीसह असहकारितेच्या सर्व अवस्थांतून जाण्यास तो तयार होईल. आज हिंदुस्थान त्याला तयार नाही. पण जर तुर्कांच्या विनाशाकरिता रचले जाणारे सर्व कट हाणून पाडण्यास आपली तयारी असेल किंवा आपली गुलामगिरी लांबविण्याचे कट हाणून पाडण्यास जर आपण तयार असू तर आपण शक्य तितक्या लवकर अहिंसेचे सुबुद्ध वातावरण निर्माण केले पाहिजे. ती अहिंसा दुर्बलांची असू नये; पण सबलांची असावी. त्या सबलांनी दुसऱ्याला ठार मारण्याचा तिरस्कार करावा पण सत्याच्या प्रतिष्ठापनेकरता मरण्यास आनंदाने तयार व्हावे.

'यंग इंडिया', २९-६-१९२१

१३६. वर्किंग कमिटी व तिचे कार्य

वर्किंग कमिटीच्या ठरावावर विरोधी टीका होऊ लागली आहे. असहकारिता करणाऱ्या वकिलांनी कोर्टात हजर राहण्याच्या प्रयोजनासंबंधी उपस्थित केलेले प्रश्न आणि असहकारिता करणाऱ्या आरोपींनी कोर्टात केलेला आपला बचाव, यासंबंधी वर्किंग कमिटीने दिलेले निर्णय, याबद्दल गंभीरपणे प्रश्न विचारले जात आहेत. आणि असेही सुचविले जात आहे की, त्या निर्णयाची उपेक्षा करावी; म्हणून वर्किंग कमिटीचे कार्य कोणते याची तपासणी करणे जरूर झाले आहे. पण हे समजण्यापूर्वी काँग्रेस घटना आपल्याला समजली पाहिजे.

काँग्रेसचे ध्येय शांततामय व न्याय्य मार्गाने स्वराज्य मिळविणे हे आहे. हिंदुस्थानच्या इच्छित ध्येयाकडे जलद प्रगती करण्याकरिता काँग्रेस राबविली पाहिजे. घटना अशा रीतीने बनविली आहे की, राष्ट्राची स्वराज्याकरिता असलेली पात्रताही सिद्ध होईल व तिच्यावर भार टाकला जाईल. त्या घटनेत ऐच्छिक सरकारची एक पद्धत स्थापित केली आहे. जी कोणती उपलब्ध शक्ती असेल तर ती फक्त जनमताची व जनतेच्या सदिच्छेची. आणि ज्या अर्थी आज काँग्रेस विद्यमान पद्धतीला विरोध करीत आहे आणि जरूर पडली तर ती नष्ट करणार आहे, त्या अर्थी काँग्रेसची जितकी सत्ता अधिक तितकीच सरकारची कमी असली पाहिजे. जेव्हा काँग्रेस संपूर्ण विश्वास पैदा करू शकेल व तिच्या सूचनांना खुषीने मान्यता मिळवू शकेल त्याच वेळी पूर्ण स्वराज्य होईल. कारण त्या वेळी सरकारला काँग्रेसच्या मार्फत व्यक्त झालेल्या लोकमताला मान द्यावा लागेल किंवा आत्महत्या करावी लागेल. म्हणून काँग्रेस ही अत्यंत संघटित, अत्यंत बलिष्ठ स्वरूपाची आणि देशात सर्वांत मोठी संस्था झाली पाहिजे. म्हणून काँग्रेसच्या धोरणाला ताबडतोब मान्यता मिळाली पाहिजे.

काँग्रेस वर्षातून एकदाच भरते. धोरणे आखून देते. ठरावात अंतर्भूत झालेले काँग्रेसचे धोरण अंमलात आणण्याकरिता ऑल इंडिया काँग्रेस कमिटी स्थापन झाली आहे. काँग्रेसला जितका अधिकार, तितक्याच अधिकाराने सर्व ठरावांचे विवरण केले पाहिजे व सर्व नव्या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. निरनिराळ्या सूचनांवर व अर्थांवर सभासदांनी वाटेल तितकी चर्चा करावी. पण महत्त्वाच्या तात्त्विक बाबी सोडून ज्यांची मते भिन्न असतील त्यांनी बहुमताचे ठराव मान्य केले पाहिजेत व ते प्रामाणिकपणे अमलात आणले पाहिजेत. कमिटीतील चर्चा ही जनतेत पुन्हा चर्चेला घेता येत नाही. ऑल

इंडिया कॉंग्रेस कमिटी ही कार्यक्षम करावी म्हणून घटनेने पंधरा जणांच्या वर्किंग कमिटीची योजना केली आहे. ती कमिटी वारंवार भरली पाहिजे आणि तिने ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीने सोपविलेल्या सर्व गोष्टींचा निकाल लावला पाहिजे. जेव्हा ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरलेली नसेल तेव्हा तिची सर्व कार्ये करण्याकरिता वर्किंग कमिटीची योजना केली आहे. तिने जनमताकडे लक्ष दिले पाहिजे व मार्गदर्शन केले पाहिजे. त्याचा अर्थ लावला पाहिजे, सर्व दुय्यम संस्थांना तिने कार्यान्वित केले पाहिजे, अखिल भारतीय वित्तविषयक गोष्टीकडे तिने लक्ष दिले पाहिजे, त्याचे वितरण केले पाहिजे, आणि जेव्हा महत्त्वाच्या गोष्टींसंबंधी निकाल घ्यावयाचे असतील, तेव्हा तिने ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा मार्गदर्शनासाठी बोलाविली पाहिजे. पार्लमेंट व मंत्रिमंडळ यांचा जो संबंध तोच कॉंग्रेस व कॉंग्रेस वर्किंग कमिटी यांचा आहे. जर आपल्याला याच वर्षात सनदशीर राज्य निर्माण करावयाचे असेल तर तिच्या नि यिाला मान दिलाच पाहिजे. साहजिकपणेच जे वर्किंग कमिटीचे सभासद असतील ते ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी व राष्ट्र यांच्या आदराला अत्यंत पात्र असले पाहिजेत. तिला गर्दीगर्दीने निकाल घेण्याचे धाडस होता कामा नये; आणि ती एकजिनसी संस्था असावी तिच्यातच दोन धोरणे किंवा दोन पक्ष असता कामा नयेत. जरी कॉंग्रेस साऱ्या राष्ट्राची प्रतिनिधी असली आणि तिच्यामध्ये अनेक प्रकारचे व सर्व पक्षांचे लोक असले तरी, वर्किंग कमिटीमध्ये असे लोक असावेत की, जे बहुसंख्याक प्रतिनिधींचा विश्वास असलेल्या पक्षाचे आणि त्यांच्या धोरणाचे प्रतिनिधित्व करणारे असावेत. म्हणून वर्किंग कमिटीचे निर्णय मुख्यत्वाने एकमताचे असावेत. जेव्हा एखाद्या सभासदाचे इतरांशी जमत नाही तेव्हा त्याला राजीनामा देता येतो, पण त्याला वर्तमानपत्रात त्यांच्या विचारविनिमयाची उघड चर्चा करून कमिटीच्या विचारविनिमयाला अडथळा किंवा बाधा आणता येत नाही. वर्किंग कमिटीचे निर्णय कॉंग्रेसजनांनी अमलात आणले पाहिजेत. कारण ती बेजबाबदार समिती नाही. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी अविश्वासाचा ठराव आणून कमिटीला घालवू शकते. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला तिच्या निर्णयाची फेर पाहणी करता येते, व ते निर्णय गंभीर कारणाकरिता बाजूलाही सारता येतात. माझ्या मताने वर्किंग कमिटीचे लोकांवर वजन नसेल तर यंदा स्वराज्य मिळविणे जवळ जवळ अशक्य आहे. म्हणून आपल्यापैकी प्रत्येकाने तिचे ठराव तपशिलासह अंमलात आणून कॉंग्रेस ही सर्व शक्तिमान संस्था बनविली पाहिजे. सरकार जे निर्वाणीला शस्त्रबलाने करते तेच कॉंग्रेस प्रेमबलाने करण्याची अपेक्षा बाळगते. सरकारने लोकांच्या अंतःकरणात भय निर्माण करून स्वतःला प्रबळ बनविले आहे. कॉंग्रेसने आपल्या सिद्धातांना व धोरणांना लोकांच्याकडून स्वच्छेने मान्यता मिळवून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली पाहिजे. लोकांच्या कार्यक्रमाशी संबंधित असलेल्या प्रत्येक गोष्टीत अहिंसा निगडित झाली आहे. पण प्रत्येक संस्थेला लोकांच्या सहकारितेने यश मिळविण्याची अपेक्षा असते. या वर्षी स्वराज्य मिळविण्यचा

नागपूरला जो निश्चय केला तो यशस्वी व्हावयाचा असेल तर काँग्रेसच्या निर्णयाशी एकनिष्ठ राहणे, याशिवाय भागणार नाही.

'यंग इंडिया', २९-६-१९२१

१३७. चरख्याचा संदेश

'इंडियन सोशल रिफॉर्मर'ने चरख्याची स्तुती करणारे एका वाचकाचे पत्र प्रसिद्ध केले आहे. तो वाचक आपल्या अभिप्रायात अशी आशा बाळगतो की, ही चळवळ अशा रीतीने संघटित केली जावी की, कातणाऱ्यांना कंटाळा येऊ नये. मि. अमृतलाल ठक्कर यांनी काठेवाडमध्ये चालविलेल्या प्रयोगासंबंधी सर्व्हंट ऑफ इंडिया-मध्ये जे महत्त्वाचे पत्र प्रसिद्ध केले आहे त्यात ते म्हणतात, शेतकरी स्त्रियांनी हातांत चरखा घेतला आहे. त्यांना त्याचा कंटाळा येणार नाही, कारण पूर्वी त्यांना त्याची सवय होती व तो जीवनाचे एक साधन झाला आहे. चरखा अडगळीत पडला होता कारण सुताला मागणी नव्हती. शहरातल्या लोकांनी चरखा हा एक वेड किंवा फॅशन म्हणून घेतला असेल तर त्याला ते कंटाळतील. जे देशाला आज अत्यंत उपयुक्त काम आहे, ते काम करण्यात फुरसतीचा वेळ खर्च करणे हे ज्यांना कर्तव्य वाटते तेच हे काम प्रामाणिकपणे करतील. शाळेत जाणाऱ्या मुलांचा कातणारांमध्ये तिसरा वर्ग आहे. राष्ट्रीय शाळांत चरखा सुरू करण्याचा प्रयोग सुरू करून सर्वांत अधिक फलनिष्पत्ती होईल अशी मला अशा आहे. ज्या शिक्षकांचा चरखा हा हिंदुस्थानातील साडेसात लाख खेड्यांतल्या मुलांना शिक्षण उपलब्ध करून देण्याचा अत्यंत प्रभावी मार्ग आहे, असा विश्वास असेल त्यांनी जर हे काम शास्त्रीय पद्धतीने चालविले तर त्यात कंटाळा येण्याचे संकट नाही, एवढेच नव्हे तर जादा कर न बसविता आणि करांच्या अनैतिक साधनांचा आधार न घेता सार्वत्रिक शिक्षणाला पैसे पुरविण्याचा प्रश्न राष्ट्राला सोडविता येण्याची शक्यता आहे. इंडियन सोशल रिफॉर्मरमधील लेखक अशी सूचना करतात की, चरख्यावर अधिक बारीक सूत काढण्याचा प्रयत्न करावा. मी त्यांना एवढेच सांगतो की, हा प्रयत्न आधीच सुरू झाला आहे. पण डाक्क्याच्या मलमलीइतके तलम किंवा वीस नंबरचे सूत कातण्यालासुद्धा काही काळ लागेल. गेल्या सप्टेंबरमध्ये चरख्याचे पुनरुज्जीवन केले गेले आणि डिसेंबरमध्ये हिंदुस्थानचा त्यावर विश्वास बसू लागला. या गोष्टी लक्षात घेता चरख्याने केलेली प्रगती अत्यंत आश्चर्यकारक आहे.

लेखकाची जी तक्रार आहे की, हाताने कातलेले सूत हे जितक्या लवकर काढले जाते, तितक्या जलद विणले जात नाही, ही गोष्ट अंशतः खरी आहे. पण त्यावर इलाज म्हणजे मागांची संख्या वाढविणे हा नसून सध्याच्या विणकरांना हात-सूत वापरण्यास लावणे हा होय. कातण्यापेक्षा विणकाम हे अधिक गुंतागुंतीचे असते. कताईप्रमाणे तो एक पूरक धंदा नसून जीवनाचे संपूर्ण साधन आहे. म्हणून तो कधी मेला नाही. परदेशाहून आयात होणाऱ्या साऱ्या कापडाची जागा घेण्यास हिंदुस्थानात पुरेसे विणकर व पुरेसे माग आहेत. जपान व मँचेस्टरहून आयात केलेले तलम सूत विणण्यात आपले माग गुंतले आहेत ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. तसे हजारो माग महाराष्ट्र, मद्रास व बंगालमध्ये आहेत. आपण हे माग हातसुताकरिता वापरले पाहिजेत आणि त्याकरिता राष्ट्राने आपली पातळ, भपकेबाज व निरुपयोगी मलमलीची आवड सोडून दिली पाहिजे. जी मलमल शरीर झाकण्याऐवजी शरीर उघडे टाकते, तिच्या विणकामात मला कला दिसत नाही. आपल्या कलेसंबंधी कल्पना बदलल्या पाहिजेत. पण जरी मामुली परिस्थितीत तलम कापड सर्वत्र विणले जाणे हे इष्ट वाटत असले तरी सध्याच्या वेळी आपण स्वतंत्र व स्वावलंबी होण्याचा प्रचंड प्रयत्न करीत असता हातसुताच्या खादी-वरच आपण समाधान मानले पाहिजे. म्हणून एकीकडे आपण फॅशनेबल लोकांना ओबड-धोबड कापडावर समाधान मानण्यास सांगितले पाहिजे; आणि त्याचबरोबर दुसरीकडे कातणाऱ्यांना अधिक बारीक व अधिक सारखे सूत काढण्यास शिकविले पाहिजे. लेखकाने गिरणी मालकांना आपल्या मालावर कमी किंमती आकारण्यास सांगितले आहे. जेव्हा स्वदेशीचे प्रेमी खादी वापरणे हे कर्तव्य समजू लागतील, जेव्हा जरूर तितके चरखे चालू होतील आणि विणकर हातसुताचे कापड विणतील, तेव्हा गिरणी मालकांना किंमती उतरवाव्याच लागतील. ज्यांचा मुख्य उद्देश स्वतःचे फायदे वाढविणे हाच असतो, त्यांच्या देशभक्तीला आवाहन करणे अगदीच व्यर्थ असते. सार्वजनिक प्रसंगी खादी वापरणे व दुसऱ्या प्रसंगी भारी भपकेबाज इंग्रजी पद्धतीचे पोषाख करणे, आणि खादी वापरणारांनी अत्यंत महाग सिगार्स ओढणे यात जी लेखकाने विसंगती दाखविली आहे, ती नवी फॅशन जसजसा जोर धरील तसतशी नाहीशी झालीच पाहिजे. माझे तर असे म्हणणे आहे की, आपण परदेशी कापडावरील बहिष्कार पूर्ण करताच आपण इतके विकसित झालेले असू की, सध्याच्या मूर्ख चाली आपण अवश्य टाकून देऊ; आणि राष्ट्रीय जीवन असे घडवू की, जे साधेपणाच्या व घरगुतीपणाच्या ध्येयाशी सुसंबद्ध असेल व जे ध्येय आम जनतेच्या अंतःकरणात पूर्वीच रोवले गेलेले असेल. ज्या साम्राज्यशाहीची उभारणी जगातील दुर्बल लोकांच्या शोषणावर केलेली आहे, तिच्यात आपण खेचले जाणार नाही. आणि ज्या आरमारी व हवाई दलांनी शांततामय जीवन जवळजवळ अशक्य केले आहे, अशा दलाकडून संरक्षिलेल्या घेरी आणणाऱ्या आधिभौतिक सुधारणांच्या मान्यतेला आपण वश होणार नाही. उलटपक्षी आपण त्या साम्राज्यशाहीला अशा रीतीने सुधारू की, ती एक राष्ट्राची विश्व-कुटुंबसंस्था होईल आणि

ती राष्ट्रे जगाला आपल्यातील उत्तमातले उत्तम देण्यास एकत्र येतील. आणि त्यांचे एकत्रीकरण जगातील जी दुर्बळ राष्ट्रे व वर्ग असतील, त्यांचे संरक्षण पाशवी शक्तीने नव्हे, पण आत्मक्लेशाने करण्याकरिता होईल. विचारी जगात अशी क्रांती करावी यापेक्षा असहकारितेचा दुसरा कोणताही हेतू नाही. हा बदल चरख्याच्या संपूर्ण यशानेच होऊ शकेल. जेव्हा हिंदुस्थान मोहाला बळी पडणार नाही, आणि म्हणून बाहेरील हल्ल्याला दाद देणार नाही, त्याच वेळी हा संदेश देण्यास तो लायक होईल. पण त्याकरिता हिंदुस्थानने दोन मुख्य गरजांमध्ये स्वावलंबी बनले पाहिजे, एक अन्न व दुसरे वस्त्र.

‘ यंग इंडिया ’, २९-६-१९२१

१३८. एका मळेवाल्याचे पत्र

मि. गांधी व असहकारितेच्या चळवळीशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांस,

सभ्य गृहस्थहो, तुमची असहकारितेची चळवळ हिंदुस्थानला कोठे नेणार आहे, याचा तुम्ही कधी विचार केला आहेत काय? परवानगी असल्यास मी आसामबद्दल बोलतो. ज्या उघड उघड वाईट गोष्टी आहेत त्या सुधारण्यास किंवा त्यातून रोगमुक्त होण्यास असहकारिता हा इलाज नसून कायदा हा इलाज आहे. कायदा व सक्तीचे शिक्षण ह्याच गोष्टी अनुक्रमे व्हावयास पाहिजेत. युरोपियन लोकांच्या ताब्यातील चहाच्या मळ्यात युरोपियन लोक आसामातील मजुरांची फार उत्तम काळजी घेत आहेत पण मला अशाही मळ्यांत तुमच्या देशबांधवांच्या कडून गरीब मजुरांच्यापासून अश्लाध्य मार्गाने पैसे उकळण्याची जी इच्छा दिसते, ती जरूरीपेक्षा जास्त अस्तित्वात आहे. असे सांगण्यास खेद होतो. चहाच्या मळ्यांतील रोजंदारी ही निःसंशय चांगली आहे, माझे मजूर सरासरीने पुरुष रु. १०–३–८, बायका रु. ६–१२–८ व मुले रु. ४–१५–९ मिळवितात. (सरकारी आकडे सप्टेंबर १९२०) याशिवाय त्यांना मोफत जळण, मोफत औषध, मोफत वैद्यकीय मदत, मोफत घरे, मोफत गुरे चराईरान, मोफत शेत जमीन, जेथे दुष्काळ असेल तेथे बाजारभावा-

पेक्षा स्वस्तात स्वस्त तांदूळ—या सर्व सुखसोयी आसाममधील सर्व चहाच्या मळ्यांतील मजुरांना मिळतात. आणि इतके असूनही तुम्ही हे कबूल कराल की, "घोड्याला पाणवठ्यावर नेता येते; पण पाणी पिण्यास भाग पाडता येत नाही." त्याच म्हणीप्रमाणे मजुराला कामावर नेता येते पण त्याला काम करण्यास भाग पाडता. येत नाही. जगातल्या कोणत्याही धंद्यात माणसाने काम केलेच पाहिजे. चहाच्या मळ्यात उक्ते काम देण्यात येते आणि हंगामात पुरुषाला ८ ते १० आणे रोज व बाईला ४ ते ६ आणे रोज सहज मिळतात. वर सांगितलेल्या सर्व सुखसोयी पुरवल्या असताना जर ते काम करीत असतील तर तुम्ही असहकारितावादी असे सत्यतेने म्हणाल का, की, चहाचे मळेवाले मजुरांविषयी आपले कर्तव्य करीत नाहीत ? नाही. तुमच्या देशबांधवांना आता असे कळू लागले आहे की, तो गरीब मजूर पूर्वीइतका मूर्ख राहिलेला नाही; आणि आता त्याच्याकडून तितके पैसे उकळता येत नाहीत. आणि ज्या अर्थी पैसा हा कोठून तरी आलाच पाहिजे त्या अर्थी तुम्ही तो मजुरांच्याकडून मिळविण्याचा प्रयत्न करीत आहात. तुम्ही त्याला अशा खोट्या गोष्टी सांगता की, तुझी मजुरी कमी आहे. तुला घाम गाळावा लागतो, तुला वाईट वागविले जाते वगैरे वगैरे. तुमची सुधारलेली कौन्सिले व तुमची कायदेमंडळे कोठे आहेत ? निदान तुम्ही लोक प्रवास करीत आहात आणि लवकरच विश्रांती मिळण्याची वाट पहात आहात. तर मग काय पाहिजे ? आसाममध्ये हिंदी नोकरांचा पगार शंभर टक्के वाढवावा. त्यामुळे बाबू कारकुनांच्यातील सध्याचा असंतोष थांबेल. यातील पुष्कळ बाबूंना अपुऱ्या पगारावर मोठाली कुटुंबे पोसावी लागतात. आणि जगण्याकरिता कोठून तरी पैसा मिळवावा लागतो; म्हणून ते दुर्बलांकडून पैसा उकळतात. कारण त्यांना बलवानांकडून तो उकळता येत नाही. माझ्या नोकरवर्गात एक हेडक्लार्क व दोन दुय्यम कारकून आहेत. त्यांचे पगार लाज वाटण्याइतके कमी आहेत. ते चोऱ्या करीत नाहीत. कारण मी फार बस्ताद आहे. मला त्यांच्याबद्दल फार दुःख होते. पण मीही जगण्याची धडपड करीत असल्यामुळे माझ्या पगारातून मी त्यांना मदत करू शकत नाही. आणि मी का करावी ? माझे मालक त्यांना अधिक पगार देऊ देत नाहीत. पण तो पगार आज ना उद्या चळवळीने व सहकारितेने द्यावाच लागेल. असहकारितेने नाही. तुमच्या अनुयायांच्या सध्याच्या प्रवृत्तीत बोल्शेविक प्रवृत्ती आहे. त्यांना दूध आणि मध यांनी वाहणाऱ्या या देशात गोंधळ माजवावयाचा आहे आणि संपूर्ण विघटना करावयाची आहे. चळवळ करा, चळवळ करा, चळवळ करा. सहकार करा, सहकार करा, सहकार करा. कायदा करा,

कायदा करा, कायदा करा. असहकारितेला मनातून हद्दपार करा असे मी सांगतो. ती निरुपयोगी आहे.

मला आसाममध्ये पुढील गोष्टी व्हावयास पाहिजे आहेत.—

१. मजुरांना स्वातंत्र्य. स्वातंत्र्य म्हणजेच संपत्ती.

२. कोणत्याही हिंदी माणसाला हिंदुस्थानातल्या कोणत्याही भागात प्रवास करता यावा. दुष्काळी भागातून सुसंपन्न भागात अनिर्बंध जाता यावे.

३. गरीब, श्रीमंत, हिंदी, युरोपियन यांना एकच कायदा असावा.

४. हिंदी स्त्रियांच्या युरेशियन मुलांच्या रक्षणाकरिता कायदा असावा.

५. प्रत्येक चहाच्या मळयात कायदेशीर सत्ता असलेली पंचायत असावी. मळयाचा मॅनेजर अध्यक्ष असावा. पंचायतीला हिंदी माणसाविरुद्ध तसाच युरोपियन माणसाविरुद्ध खटला चालविता यावा. (माझ्या मजुरांना माझ्यावरील खटला चालविण्यास परवानगी आहे.)

६. मजुरांना आजारीपणाचा भत्ता देणे सक्तीचे असावे.

७. मजुरांच्या लग्नांवरील बंधने काढून टाकावीत.

८. गरोदर स्त्रियांना सहा महिने सक्तीने भत्ता द्यावा.

या साऱ्या सूचना कायदे करणारांच्याकरिता आहेत. असहकारितावाद्यांच्याकरिता नाहीत हे तुम्ही मान्य कराल. म्हणून चळवळ करा. सहकारिता करा, कायदे करा आणि प्रेम करा. "मोहब्बत", दयाल "मियाँ" बरचार.

तुमच्या कौन्सिलचे सभासद काय करीत आहेत? त्यांना काम करावयाला लावा. त्यांना योग्य कायदे पास करावयाला भाग पाडा. त्यांना लोकांचे म्हणणे ऐकण्यास सांगा. माझी शक्ती म्हणजे माझ्या लोकांचे प्रेम (मजूर); त्यांची शक्ती म्हणजे त्यांच्या लोकांचे प्रेम. ते हिंदी लोक असहकारितावादी आहेत, सहकारितावादी आहेत, चळवळे आहेत, कायदे करणारे आहेत, किंवा ते आपसात भांडणारांचे घर होईल व ते उभे राहू शकणार नाहीत. म्हणून सहकारिता करा. मी मला जे भेटतात किंवा माझा ज्यांच्याशी व्यवहार असतो अशा सर्व लोकांशी सहकार्य करतो. मग तो चांभार असो, ब्राह्मण असो, मजूर असो किंवा राजा असो. सर्व देवाचे आहेत, सर्व माणसे आहेत आणि सर्वांना मी भाऊ समजतो,

जेथे मला मदत करता येते तेथे मी मदत करतो; जेथे मला दुःख हलके करता येते तेथे मी दुःख हलके करतो. जेथे मला शिकविता येते तेथे मी शिकवतो. बंधुत्वाचे प्रेम चालू राहू द्या. ते असहकारितेने मिळणार नाही. बंधुप्रेम म्हणजेच सहकारिता.

मला सांगण्याला आनंद वाटतो की, चहामध्ये असलेल्या एका अत्यंत संतुष्ट व अत्यंत चांगले पगार मिळणाऱ्या मजूर दलाचा मी व्यवस्थापक आहे. आणि मी सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, मी हिंदुस्थानात आल्यापासून माझ्या मजुरांची दुःखे कमी करण्याचा निश्चयच केलेला आहे. अर्थात मी सर्वांना खूष करू शकत नाही. मी हे सर्व सहकारितेने केले. माझ्या मळ्यात संप झाला नाही व होणारही नाही, हे मी विश्वासाने सांगतो. म्हणून तुम्हांला, म्हणजे मि. गांधींना सांगतो की, तुम्ही आपला आणि आपल्या सहानुभूती वाल्यांचा हात आवरा आणि आसाममधून बाहेर जाण्याचा जो हा वेडेपणा चालला आहे तो थांबवा. या चेंगरा-चेंगरीमुळे हजारो मृत्यू होत आहेत याचा विचार करा. दोन चुकांच्यामुळे एक बरोबर गोष्ट होत नाही.

माझ्या स्वतःच्या आणि इतर काही मळे सोडले तर प्रत्येक मळ्यात ज्या पद्धती वापरल्या जात आहेत, त्यांच्या मी व्यक्तिशः विरुद्ध आहे. त्या पद्धती चहाच्या उद्योगाला म्हणजे बाबूंच्या मार्फत चालविलेल्या मळ्यांना शरम आणणाऱ्या आहेत. पण त्याकरिता सहकारिता चळवळ, कायदे यांची जरूरी आहे. तुमच्या ज्या पद्धती म्हणजे असहकारितेची प्रवृत्ती असणारा बोल्शेविझम हा नको आहे. सत्य हे कोणाला दुखापत करीत नाही.

माझ्या पत्रातील सुराबद्दल माफी मागतो. ते पत्र माझे मन बोलत आहे.

आपला

" ची टासे कॉन्फेसा "

" जो मौन पाळतो, तो कबुली देतो. "

मी हे पत्र जसेच्या तसे छापत आहे. लेखकाने आपले नाव मला कळविले आहे, पण ते त्याला गुप्त राखावयाचे आहे. मी नाताळ आणि चंपारणमध्ये ह्या लेखकासारखे नमुने पाहिले आहेत. त्याचा हेतू चांगला आहे. पण त्याला हे कळत नाही की, आपण एखाद्या दयाळू गुराख्यापेक्षा निराळे नाही. माणसांना गुरासारखे

वागावे, हे एकदा कबूल केले म्हणजे पुष्कळसे युरोपियन मॅनेजर प्राणिक्लेश निवारण संस्थेकडून चांगली शिफारसपत्रे मिळवू शकतील. मला हे अनुभवावरून माहीत आहे की, मोफत औषध, मोफत औषधोपचार, मोफत घरे आणि मोफत गुरे चारण्याच्या जमिनी या त्या धंद्यातील युक्त्या आहेत. त्यांचा उद्देश मजुरांना कायम गुलाम ठेवण्याचा असतो. जर मजुराला पूर्ण वेतन दिले आणि घराकरिता आणि औषधाकरिता पैसे आकारले तर तो अधिक स्वतंत्र मनुष्य होईल. मोफत गुरे चारण्याच्या जमिनी या त्याला श्वासोच्छ्वासाइतक्याच आवश्यक आहेत. प्रत्येक मळ्यातील युरेशियन मुले ही स्त्री-पुरुषांच्या बेशरमपणाची कथानके निवेदन करतात. जर माझ्या हातात सत्ता असती तर युरेशियन मुलांच्या साक्षात अस्तित्वामुळे, हिंदी स्त्रियांच्या विरुद्ध गुन्हा शाबीत झाला आहे असे समजून मी ते मळे बंद केले असते. प्रश्न कठीण आहे हे मी जाणतो. पण जर युरोपियन लोकांना हिंदी स्त्रियांचे पातिव्रत्य आपल्या बहिणीच्या पातिव्रत्याप्रमाणे राखले पाहिजे, एवढे जर शिकता आले तर विवाहबाह्य युरेशियन मुले जन्मणारच नाहीत. मी स्वैरसंभोग मानणारा नाही. हा विषय इतका दुःखदायक आहे. स्त्रीपुरुषांचे मला इतके पावित्र्य वाटते की, मला त्यासंबंधी संयमाने लिहिताच येत नाही. कारण मी हे प्रकार अशा मळ्यात पाहिले आहेत आणि त्यासंबंधी ऐकले आहे. मला क्षणभरही असे सुचवावयाचे नाही की, जे गुन्हे युरोपियन मॅनेजर्स करतात ते गुन्हे हिंदी मॅनेजर्स करीत नाहीत. त्यांच्या गुन्ह्यांतून निर्माण झालेले चेहरे त्यांच्या रंगामुळे शरम लपवितात हे मला ठाऊक आहे. पण मी असे खात्रीपूर्वक सांगतो की, ज्या गोष्टी करण्यास हिंदी मनुष्य धजणार नाही, त्या गोष्टी युरोपियन मॅनेजर निर्धास्तपणे करतो. पण हे प्रकरण येथेच थांबविले पाहिजे. मॅनेजर हा पंचायतीचा अध्यक्ष असावा अशी जी लबाडीची सूचना केली आहे, त्यामुळे मळेवाल्यांची बाजू घसरली आहे. असहकारितेसंबंधी पत्रलेखकाचा सल्ला हा अज्ञानमूलक आहे. मी त्याला खात्रीपूर्वक सांगतो की, आसाम-मधील एकाही मजुराला संप करण्याचा सल्ला मी कधीही दिला नाही. मला तेथील मजुरांचा प्रश्न ठाऊक आहे असे मी म्हणत नाही. याशिवाय त्याला हेही ठाऊक असावयास पाहिजे की, असहकारिता ही भांडवल किंवा भांडवलदार यांच्याविरुद्ध नाही. असहकारिता ही सध्याच्या सरकारी पद्धतीविरुद्ध चालू आहे. पण एखाद्याची इच्छा असो वा नसो जेथे जेथे दुष्टपणा, छळ आणि अन्याय असेल, तेथे तेथे असहकारिता ही झाल्याशिवाय राहणार नाही. लोकांना इलाज सापडला म्हणजे ते त्याचा उपयोग करणारच. पण जर त्यांनी तो इलाज मूर्खपणाने किंवा निष्कारण केला तर खरा तोटा त्यांचाच होईल. कायदा किंवा कौन्सिलातील चर्चा यामुळे फारसे कल्याण होईल असे मला वाटत नाही. जोपर्यंत मालक हे कामगारांना आपल्या कुटुंबातले घटक मानीत नाहीत किंवा जोपर्यंत कामगार हे स्वतःचे हक्क आणि ते हक्क मिळवून घेण्याचे मार्ग समजून घेण्याइतके शिक्षित केले जात नाहीत, तोपर्यंत कामगारांना आपली परिस्थिती सुधारता येणार नाही. जनमत तयार होण्यापूर्वी केलेला कायदा हा नेहमीच अगदी

निरुपयोगी असतो. जनमत तयार करण्याची सर्वांत जलद पद्धती म्हणजे असहकारिता आहे. प्रस्तुत प्रकरणी वर्तनातला बदल किंवा मी नेहमी म्हणतो त्याप्रमाणे हृदयपालट असहकारितेनेच होईल.

'यंग इंडिया' २९-६-१९२१.

१३९. लजपतराय यांना पत्र

[जून ३०-१९२१ पूर्वी]

प्रिय लालाजी,

या महिन्यापूर्वी गुजरातला पैसे जमविण्याची जितकी आशा आहे, तितकेच पैसे पंजाब देईल अशी आशा मी बाळगतो. मी हे म्हणण्याचे कारण अमृतसर माझ्या चांगले परिचयाचे आहे. आणि अमृतसरने आतापर्यंत पैसे जमविण्याच्या बाबतीत अगदीच कुचराई केली आहे. पैशांच्या बाबतीत अहमदाबादचा जो गुजरातशी संबंध आहे तोच अमृतसरचा पंजाबशी आहे. हिंदुस्थानातील कोणत्याही ठिकाणापेक्षा अमृतसरने अत्यंत कठीण प्रहार सहन केले आहेत. आणि म्हणून अमानुष अपमान अशक्य करण्याच्या लढ्यात अमृतसरने पुढाकार घेतला पाहिजे. अमृतसरच्या धनिक लोकांना आपल्यावरील मोठी जबाबदारी तुम्हांला पटविता यावी अशी माझी इच्छा आहे.

तुमचा स्नेहांकित

गांधीजींच्या हस्ताक्षरातील मजकुराच्या फोटोस्टॅटवरून :
एस्. एन्. ७५५६.

१४०. माझी टिप्पणे

[३० जून, १९२१ पूर्वी[1]]

भांडे का डबडे

आपल्या परीक्षेच्या आदल्या दिवशी मी ही टिप्पणे लिहीत आहे. आपण निर्माण केलेली वस्तू ही चांगले पूर्ण आकाराचे भांडे होणार का डबडे होणार हे फक्त कामगारांना आणि देवालाच ठाऊक. प्रयत्नामागे जो प्रामाणिकपणा असतो तशीच फलनिष्पत्ती होते. जर पैसे गोळा करण्याच्या कामात गुंतलेले लोक प्रामाणिक असतील तर परिणाम चांगलाच होईल. गुजरातमधून सुमारे दहा लाख रुपये जमा होत आहेत याबद्दल आता शंका नाही. उलटपक्षी अशी अपेक्षा आहे की, प्रत्यक्ष जमा त्याहीपेक्षा अधिक होईल. आणि का होऊ नये ? सापेक्षतः आपल्याजवळ पुष्कळ आहे. गुजरातमधील नुसत्या गिरण्याच आपली अपेक्षा पुरी करतील, गुजरातबाहेर उद्योगधंदे करणारे धाडसी व्यापारी खासच काही तरी देतील. राजेलोकांनी भीती टाकली तर तेही देऊ शकतील. आपण अशी कामे जनता म्हणून पूर्वी कधीही करण्याचा प्रयत्न केला नव्हता व आपली शक्तीही कधी कसोटीला लावली नव्हती. म्हणून भीतभीतच इतका कमी आकडा आपण धरला. जसजशी आपण आपली भीती सोडू, तसतसे आपण पुढे जाऊ.

तथापि आपल्याला तीन लाख सभासद व एक लाख चरखे पाहिजे आहेत. ह्या प्रयत्नाच्या यशावर आपले भविष्य अवलंबून आहे. परमेश्वर गुजरातची व हिंदुस्थानची अब्रू राखो.

आपले ओझे[2]

तथापि अधिक पैसा, अधिक सभासद आणि अधिक चरखे यांमुळे आपली जबाबदारी अधिक वाढत आहे.[3] एक कोटी जमविले हे पुरेसे नाही. स्वच्छ आणि पूर्ण हिशेब ठेवण्यास आपण शिकले पाहिजे. एक कोटी रुपये आपण व्याजी लावणार

१. ही टिप्पणे ३० जूनपूर्वी लिहिलेली आहेत. त्या दिवशी बेझवाडा काँग्रेसने ठरविलेला कार्यक्रम संपवायचा होता.

२. ता. ६-७-१९२१ च्या यंग इंडियाच्या अंकावरून या भागाचे भाषांतर, घेतले आहे.

३. मूळ गुजरातीवरून हे वाक्य घेतले आहे.

नाही. ते पैसे निकडीच्या गरजांकरिता आपण जमविले आहेत. त्या पैशाच्या साधनाने आपल्याला राष्ट्रीय जीवन उन्नत करावयाचे आहे. परदेशी कापडावर आपण बहिष्कार घातलाच पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणाची पद्धत आपण सुरू केलीच पाहिजे. दडपलेल्या वर्गांची भयंकर स्थिती आपण सुधारलीच पाहिजे. दारूच्या मगरमिठीतून राष्ट्राला आपण सोडविलेच पाहिजे. आपल्या देशातून दुष्काळाचे भूत आपण हद्‌पार केलेच पाहिजे. या साऱ्या गोष्टींकरिता एक कोटी रुपयांचा खर्च केला जाईल. याकरिता आपल्याला प्रामाणिक कार्यकर्ते लागतील. आपले हिशेब मुलालादेखील पाहता आले पाहिजेत. सध्याचा विश्वस्त निधी योग्य प्रकारे वापरला तर पुढील मदतीची आशा स्वाभाविकपणेच बाळगता येईल. आपल्या संग्रहात निष्कलंक भगिनींचे अमोल दागिने आहेत. पुष्कळ मुलींनी त्यांना अत्यंत प्रिय असणारे सारे जवाहीर देऊन टाकले आहे. मला काहींची नावे ठाऊक आहेत पण ती प्रसिद्ध करण्याची जरूरी नाही. त्यांनाही प्रसिद्धीची हौस नाही मी त्यांना इतके पवित्र मानतो की, मी त्यांची नावे निष्कारण उच्चारणार नाही. त्यांनी दानाच्या आनंदाकरिता दान केले आहे. एका विधवा भगिनीने आपल्याजवळील शिल्लक राहिलेले सारे माणिकमोती मला देऊन टाकले. ते घेताना माझे अंतःकरण आतल्या आत रडत होते. अशा देणग्या स्वीकारण्यास आपण पात्र आहो का ? कोणत्याही विधवेला आपल्याजवळील दागिने देऊन टाकलेले आवडत नाही. ती त्यांना अधिक चिकटपणे धरून बसते. मी तिला सावध केले. मी म्हणालो हे दागिने देताना जर तुला यत्किंचित घुटमळल्यासारखे वाटत असेल किंवा लाजल्यासारखे वाटत असेल तर ते तू परत घे. तिने ते परत घेतले नाहीत. तिने पूर्ण विचारान्तीच ही गोष्ट केली होती. अशा प्रकारे मिळालेला पैसा जर आपण निष्काळजीपणाने, मूर्खपणाने किंवा अप्रामाणिकपणाने वापरला तर काय ? आपली स्वराज्य मिळविण्याची आशा बाजूलाच राहील, पण आपण कायमचे रौरव नरकात जाऊन पडू. या भगिनींचे पावित्र्य, त्यांची धार्मिक कळकळ ही आपल्याला सरळ मार्गावर ठेवील, आपल्या अब्रूला कालिमा लावणार नाही आणि आपल्या साऱ्या आशा-आकांक्षा पुऱ्या करण्यास साहाय्य करतील असा माझा विश्वास आहे.

पारशांच्या देणग्या

जेव्हा जेव्हा मी असे ऐकतो की, पारशी लोक या चळवळीत नाहीत तेव्हा तेव्हा मी फक्त हसतो. या देशात पारशांची लोकसंख्या एक लाख आहे. त्या प्रमाणात त्यांनी ४,१२० रुपये दिले म्हणजे त्यांचा हिस्सा पुरा होईल. मात्र त्यांच्यातील तितकेच सभासद झाले पाहिजेत व ८२४ चरख्यांचा हिशेब दिला पाहिजे. वास्तविकपणे ४,१२० रुपये हे त्यांच्या किरकोळ वर्गणीतून जमले आहेत. पारशी मित्रांनी बिननावाने ज्या रकमा पाठविल्या त्यांची बेरीज तितकी भरेल. मी या निधीत पारशी रुस्तमजीचे ५२,००० रुपये धरतो. ४,१२० पारशी सभासद झाले असतील असे मला वाटते. काही पारशी

स्वयंसेवक काँग्रेस सभासद नोंदवीत आहेत आणि मुंबईत अत्यंत प्रशंसनीय काम करीत आहेत. एका पारशी वकिलाने वकिलीही सोडली आहे. एका सद्गृहस्थाने आपल्या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग लोकांच्या सेवेकरिता करण्याचे ठरविले आहे. त्यांच्यात चरख्यांची संख्या लहान आहे हे खरे आहे. असे असूनही काही पारशी स्त्री पुरुषांनी हे काम सुरू केले आहे. काही पारशी गुत्त्यांवर निरोधनालाही जातात. या साऱ्या गोष्टी उघड असता पारशांनी इतरांच्यापेक्षा कमी काम केले आहे असे कसे म्हणता येईल ? त्यांची सारीच वृत्तपत्रे चळवळविरोधी नाहीत. सांज वर्तमान पत्राची कामगिरी सर्वांनाच ठाऊक आहे. श्री. भरूचा यांच्या कठीण कामगिरीबद्दल कोणी ऐकले नाही ? काही पारशी स्त्रिया जे काम करतात त्यासंबंधीचे माझे अनुभव मी पुन्हा केव्हा तरी सांगेन. पण मला एक नाव सांगितलेच पाहिजे. हिंदुस्थानच्या पितामहाची नात निरलसपणे काम करीत आहे. तिने संपूर्ण खादी पोषाख प्रत्यक्षपणे परिधान केला आहे. पारशी जमातीने जे केले आहे त्यापेक्षा अधिक केले नसले तरी आपण त्यांच्याबद्दल कृतज्ञ असले पाहिजे. त्यांच्याकडे बोट दाखविण्यास कारण नाही.

श्री. गोदरेज यांनी असे काही केले आहे की, जे इतर कोणत्याही कृतीपेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. त्यांनी तीन लाख रुपये दिले. इतर कोणाही एका व्यक्तीने इतके पैसे दिले नाहीत. हे खरे आहे की, ती सारी रक्कम आज रोकड म्हणून उपलब्ध नाही. पण ती रक्कम सोन्याइतकी खात्रीची आहे. त्यांनी ती रक्कम अंकित म्हणून आपल्या दोन पवित्र कार्यक्रमांना दिली आहे. दारूचे उच्चाटन आणि अंत्यजोद्धार. त्यांच्याच आग्रहावरून अंत्यजोद्धाराकरिता हा पैसा राखून ठेवला. मला विचारले असते तर मी फक्त हिंदूंचाच पैसा या कामाला लावावा असे म्हटले असते. ही विशिष्ट सुधारणा त्यांनीच केली पाहिजे. पण ज्या ह्या मित्रांनी ती देणगी अंतःकरणाच्या कळकळीने दिली, तिच्या आड मी कसा येऊ ? ही रक्कम जमेस धरता पारशांची एकूण रक्कम चार लाखांपेक्षा कमी भरणार नाही असे मला वाटते. त्यात काही जणांनी जी देणग्यांची आश्वासने दिली आहेत त्याची किंमत धरली नाही. श्री. गोदरेज आणि पारशी जमातीचे आभार आपण किती मानणार ?

दक्षिण आफ्रिकेतूनही देणग्या आल्या आहेत. पाटीदार मंडळ आणि खत्री मंडळ यांनी तारेने ८,२७५ रुपये व ९६० रुपये अनुक्रमे पाठविले आहेत. मी अधिक अपेक्षा बाळगतो[1]. दक्षिण आफ्रिकेतील पाटीदार हे नेहमीच उदार असतात असे मला आढळून आले आहे.

१. मुळातील तळटीपेत असा मजकूर आहे. "हे लिहिल्यानंतर स्टँगरच्या इंडियन असोसिएशनकडून सुमारे १०० पौंड आणि नैरोबीहून १,२७४ रुपये पाठविल्याच्या तारा आल्या."

काही लोकांची अशी समज झालेली दिसते की,जूननंतर परवानगीशिवाय पैसे जमा करू नयेत किंवा देणग्या पाठवू नयेत. हे सर्वस्वी चूक आहे. या साऱ्या दिवसांत बेझ-वाड्याला ठरविलेल्या उद्देशावर आपण आपले लक्ष केंद्रित केले होते. याचा अर्थ असा नाही की, जूननंतर आपण नवे सभासद नोंदवू नयेत किंवा नवे चरखे करवून घेऊ नयेत किंवा आणखी पैसे गोळा करू नयेत. एक कोटीची रक्कम पुरी केल्यानंतर वाटल्यास आपण टिळक स्वराज्य फंड जमविणे बंद करावे. पण त्या वेळेपर्यंत आपण पैसे जमा करीत राहिलेच पाहिजे. आपल्या प्रतिज्ञेला दोन बाजू आहेत. पहिली एक कोटी रुपये जमा करणे व ते ३० जूनपूर्वी जमा करणे ही दुसरी बाजू त्या तारखेपूर्वी अपेक्षित रक्कम जरी आपण जमा करू शकलो नाही तरी आपले प्रयत्न चालू ठेवून जर आपल्याला मागाहून यश मिळाले तरी आपण आपले कर्तव्य केले असे होईल. वेळेच्या मुदतीत हे कार्य न झाल्यास आपल्याला कमीपणा वाटेल. परंतु मुदत टळून गेल्यानंतर देणग्या अजिबात नाकारणे किंवा कमी पैसे देणे यामुळे आपण निर्लज्ज नाही असे खासच सिद्ध होईल. म्हणून ज्यांना आपल्या देणग्या या फंडाला अजूनही द्यावयाच्या असतील त्यांना मागाहूनही देता येतील. गुजरातने स्वतःवर लादलेली जबाबदारी पार पाडल्यामुळे त्याला असे प्रयत्न करण्याची जरूरी नाही.

हे झाले टिळक स्वराज्य फंडाबद्दल. सभासद आणि चरख्याबद्दल काय? गुजरातने ३० जूनपूर्वी तीन लाखांपेक्षा कमी सभासद नोंदविता कामा नये. व एक लाखापेक्षा कमी चरखे सुरू करून चालणार नाही. आपले कर्तव्य एवढेच आहे की, गुजरात २१ वर्षांच्या व त्यावरील प्रत्येक-स्त्री पुरुषाला सभासद नोंदवितो किंवा नाही हे पाहणे आणि प्रत्येक घरात चरखा आहे का नाही याची पाहणी करणे. म्हाताऱ्यांपासून मुलांपर्यंत प्रत्येकाला सूत कातण्यास शिकविणे. जर गुजरातची लोकसंख्या ९० लाख धरली आणि प्रत्येक पाच माणसांचे एक घर होते असा हिशोब केला, तर गुजरातमध्ये १८ लाख घरे आहेत. म्हणून आपण १८ लाख चरखे सुरू झाल्याशिवाय विश्रांती घेऊ नये. सभासद नोंदणीला आणि चरख्याच्या प्रसाराला वरची मर्यादा नाही. या गोष्टी जितक्या जास्त होतील तितकी आपली शक्ती वाढेल, स्वराज्याचे निशाण अधिक तेजस्वी होईल. स्वराज्याच्या जहाजाच्या शिडातील भरणारा वारा अधिक जोरदार होईल. जून संपण्या-पूर्वी जितक्या चरख्यांची संख्या होईल त्यावरून आपल्याला आपली गती मोजता येईल, आपली शक्ती वाढली आहे का घटली आहे हे ठरविता येईल. आणि आपली श्रद्धा दृढ झाली आहे का ढसरली आहे. याचाही निर्णय करता येईल. या दोन्ही बाबतींत अविश्रांत श्रम करण्यावर आपले स्वराज्य मिळविणे अवलंबून राहील.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', ३-७-१९२१

१४१. बोरिवली सभेतील भाषण[१]

जून ३०, १९२१

गांधीजी म्हणाले, गुरुवार हा शेवटचा आणि सर्वांत मोठा दिवस आहे. हिंदुस्थानची परीक्षा होत आहे. आणि तो कमी पडणार नाही अशी मला आशा आहे. वेळ फार मोलाचा आहे व मी फार लांब भाषण करणार नाही. आजच एक कोटी जमा झाले पाहिजेत, आणि लोकांनी कर्तव्यात चूक करू नये. ही रक्कम जमविण्यात मी कसा यशस्वी होईन हे मला समजत नाही. पण माझा हिंदी लोकांच्या शक्तीवर व देशभक्तीवर दृढ विश्वास आहे, आणि मला अंतःकरणातून अशी खात्री आहे, आणि लोक आवश्यक रक्कम जमविण्यात यशस्वी होतील यात शंका वाटत नाही. मी अहमदाबादला असल्यामुळे मुंबईत किती पैसा जमा झाला हे मला माहीत नाही. तसेच ज्या गुजरातने १० लाख रुपये जमविण्याचे ठरविले होते त्याने किती जमविले हेही मला ठाऊक नाही. त्यांनी प्रत्यक्ष १२ लाख रुपये जमविले आहेत आणि १५ लाखांची मजल त्यांना गाठावयाची आशा वाटते. मी अहमदाबादहून येत असताना काही लोकांनी १ लाखाचा चेक मला दिला आणि मुंबईजवळील एका मौल्यवान जमिनीच्या तुकड्याची त्यांनी देणगी जाहीर केली. मंडपाच्या दाराशी मला एक २५ हजार रुपयांचा चेक देण्यात आला. जोहान्सबर्गहून ९,००० रुपये माझ्याकडे आले आणि खत्री जमातीने १,००० रुपये दिले.

मुंबईचे लोक मला जरूर ती रक्कम देतील अशी आशा आहे. कारण फंड जमविण्याचा मोठा बोजा मुंबईवरच पडणार आहे. मी जेव्हा मुंबईहून निघालो तेव्हा लोकानी १५ ते २० लाख रुपये जमविले होते. आणि मला मोठी आशा आहे की, ज्या हिंदुस्थानची परीक्षा होत आहे तो त्या कसोटीत कमी पडणार नाही. मी फक्त असे ऐकले आहे की, बोरिवलीमध्ये पुष्कळ श्रीमंत व्यापारी आहेत. आणि म्हणून मी देवाची प्रार्थना केली की, त्यांनी उदार वृत्तीने निधीला मोठी मदत करावी.

१. बोरीवलीच्या लोकांनी गांधींना गुरुवारी सकाळी टिळक स्वराज्य फंडाला थैली दिली. स्त्री-पुरुषांची मोठी सभा झाली. विठ्ठलभाई पटेल, अलीबंधू व सरोजिनी नायडू हजर होत्या.

मी अहमदाबाद आणि मुंबईमध्ये असे ऐकले की, वैष्णव या चळवळीबद्दल फार साशंक आहेत. मी त्यांना पूर्वीचे पत्र[१] लिहिले आहे आणि त्या सर्वांनी ते वाचले असेल असे मला वाटते. सध्या स्वराज्य मिळविण्याच्या एका प्रयत्नात हिंदुस्थानला सर्व जमातींनी एकत्रित होण्याची जरूरी आहे. याचा अर्थ असा नाही की, त्यांनी आपापले धर्म सोडून द्यावेत. जोपर्यंत जग आहे तोपर्यंत मतवैचित्र्य आणि मतभिन्नता राहणारच. आणि निरनिराळे धर्म हेही राहणारच. पण स्वराज्य मिळविण्याच्या कामात सर्वांनी एकजूट केली पाहिजे. खालच्या वर्गातील लोकांना दडपून ठेवून स्वराज्य मिळणे शक्य नाही. त्यांना खाली ठेवणे, त्यांचा तिरस्कार करणे, त्यांचा द्वेष करणे, त्यांना शिव्या देणे, त्यांना विहिरीवर येऊ न देणे आपल्या खेड्याबाहेर त्यांना घालविणे हा खास वैष्णव धर्म नाही. तो धर्म ईश्वररहित आहे. आणि वैष्णव धर्म हा अगदी निराळा आहे. वल्लभाचार्यांनी[२] आपल्या अनुयायांना द्वेषाचा धर्म आचरण्यास आणि असहिष्णुता पाळण्यास कधीही शिकविले नव्हते. जे लोक अज्ञान आणि दारिद्र्यात खितपत पडलेले आहेत अशा दलित वर्गाचा उद्धार करावा अशी त्यांची शिकवणूक होती. वल्लभाचार्यांनी आपल्या बांधवांना खाली ठेवा असे सांगितले नव्हते. मी या गोष्टीचा जितका जितका अधिक विचार करतो, तितके तितके मला अधिक दृढपणे वाटते की, या प्रश्नासंबंधीची वैष्णवांची वृत्ती चुकीची आहे.

मी हे तुम्हांला एक व्यवहारी मनुष्य, एक वृद्ध मनुष्य व एक अनुभवी मनुष्य म्हणून सांगत आहे. दलित वर्गाचा मनुष्य असणे म्हणजे काय, याचा मला दक्षिण आफ्रिकेत चांगला अनुभव आला. दक्षिण आफ्रिकेत मला दलित वर्गाचा माणूस म्हणून वागविण्यात आले होते. ज्यांस "लोकेशन" म्हणतात अशा जागी गोऱ्या लोकांपासून दूर मला राहावे लागले. त्या लोकेशन्स म्हणजे घेडवाडेच होते. तेथे पायखाने नव्हते, दिवे नव्हते, रस्ते नव्हते, किंवा सुधारलेल्या शहरांच्या सोयी नव्हत्या; अंत्यज होणे म्हणजे काय हे मला तेथे समजले. आणि हिंदुस्थानात माझे बांधव ज्या गोष्टींमुळे विव्हळत पडले आहेत त्यांची दुःखे मला भोगावी लागली. जर तुम्ही आपल्या बांधवांना

१. पाहा, "वैष्णवांना" ३०-७-१९२१.
२. पंधराव्या शतकातील तत्त्वज्ञ.

आदराने वागविले नाही तर ते हिंदी असण्याचा उपयोग काय? आणि ते हिंदुस्थानात जन्मले तरी कशाला?

इंग्लिश लोकांच्या हातून जो निष्ठुरपणा आणि अपमान सहन करावा लागतो त्याकरिता आपण आपल्या सरकारला सैतानी म्हणतो. म्हणूनच आपण त्यांच्याशी सहकारिता न करण्याचे ठरविले आहे; आणि आपण हिंदी लोक जसे गोरे लोक आपल्याला वागवितात, तसेच आपण आपल्या बांधवांना वागविणार आहोत काय? आपण काय करीत आहोत याचा आढावा घेणे योग्य नाही काय? आपण जे काय करतो त्याकडे जरा थांबून आणि विचार करून पाहणे योग्य नाही काय? मी वैष्णवांना दलित वर्गाच्या हातचे अन्न खा असे सांगत नाही, पण त्यांना बांधवासारखे वागवा एवढेच सांगत आहे. जर आपण सर्वजण एकच निश्चय करू शकलो तर स्वराज्य आताच मिळेल. पण आपल्यात अनेक जाती आहेत. जर हिंदू म्हणू लागले की, मुसलमान आपले जन्मजात शत्रू आहेत आणि म्हणून त्यांचा द्वेष करणे हे आपले कर्तव्य आहे, तर आपल्याला स्वराज्य कधीच मिळणार नाही. नुसत्या भीतीमुळे हिंदी लोक अस्पृश्यतेचा अडसर नष्ट करण्यास नाखूष आहेत. आणि मी तुम्हांला जूनच्या या शेवटच्या दिवशी, जो दिवस मोठ्या निर्धाराचा आणि महत्त्वाचा आहे त्या दिवशी असे सांगतो की, या भीतीनेच त्यांना आपल्या बांधवांना खाली ठेवण्यास भाग पाडले आहे व त्यांच्यापासून निराळे जीवन घालविण्यास लावले आहे. जर तुमची अंतःकरणे दयेने भरलेली नसतील, गरिबांच्या करुणेने भरलेली नसतील व बंधुप्रेमाने भरलेली नसतील तर हिंदी लोक स्वराज्य मिळविण्यास कधीच लायक होणार नाहीत. मला एक कोटी रुपये जमविण्याची भीती नव्हती व चिंताही नव्हती. कारण तुम्ही काहीही करून ते पैसे जमवाल असे मला वाटत होते. पण तुम्ही मला काय करावयास पाहिजे असेल तर दलित बांधवांवर प्रेम. द्वेष आणि भीतीवर आधारलेले स्वराज्य मला नको आहे. माझे स्वराज्य हे सदाचरणी लोकांचे स्वराज्य आहे.– माझे हे धर्मराज्य आहे.

उद्यापासून तुम्ही माझ्याकडून पैशाकरिता बोलताना किंवा भीक मागताना ऐकणार नाही. अगदी काही तरी निराळेच तुम्ही ऐकाल. उद्यापासून तुम्ही परदेशी वस्तूंचा व्यापार करण्याचे सोडले पाहिजे. जे परदेशी कापडाचा व्यापार करतात त्यांनी तो थांबविला पाहिजे. जे इंग्रजी कापडाचा व्यापार करतात त्यांनी तो थांबविला पाहिजे. माझ्या भगिनींनी

विलायती कापड सोडावे, आणि फक्त खादी वापरावी अशी मी विनंती करतो. जर तुम्हांला देशासंबंधी कर्तव्य करावयाचे असेल तर परदेशी कपडे टाका व खादी वापरा. जर माझ्या भगिनींचे व मुलींचे माझ्यावर प्रेम असेल, व जर त्यांना माझ्याबद्दल आदर असेल तर त्यांनी परदेशी कपडे टाकून द्यावेत, व या चैनीच्या वस्तू सोडण्याचा एकदाच निश्चय करावा.

मी आता तुम्हांला एक माझी स्वतःची हकीकत सांगतो. नुकतीच माझी बायको म्हणाली की, असली जाड खादी घालून मी तुमचा स्वयंपाक आणि घरकाम करू शकणार नाही. तिला काही तरी हलके, काही तरी पातळ वापरण्यास परवानगी हवी होती. मी माझ्या बायकोला साऱ्या गोष्टींत पूर्ण मोकळीक दिली होती. आणि म्हणून मी तिला अमूक गोष्ट कर असे सांगण्यास तयार नव्हतो. मी नव्हतो का मला वाटेल तसे वागण्यास पुरा स्वतंत्र! पण मला बायकोला असे सांगावे लागले की, माझा स्वयंपाक तुला खादी वापरून करता येत नसेल तर तू स्वयंपाकच करू नकोस. कारण अपवित्र परदेशी वस्तू वापरून केलेला स्वयंपाक मला चालणार नाही. माझ्या बायकोने परदेशी कपडे वापरून शिजविलेल्या स्वयंपाकाला मी स्पर्शही करणार नव्हतो. जर हिंदी स्त्रिया इतका त्याग करण्यास व इतके कष्ट सोसण्यास तयार नसतील तर त्यांना आणखी जालियनवाला बाग भोगावे लागतील. या महिन्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी आतापर्यंत जितके कष्ट भोगले त्यापेक्षा अधिक त्यांच्या वाट्याला येणार आहेत, या माझ्या शब्दांकडे पुरे लक्ष द्या. हिंदू आणि मुसलमानांनी परदेशी वस्तू वापरण्याचे सोडून द्यावे व स्वदेशीच वस्तू वापराव्यात अशी मी त्यांना कळकळीची विनंती करतो.

'मुंबई क्रॉनिकल,' १-७-१९२१

१४२. पारशांच्या सभेत भाषण[1] मुंबई

जून ३०–१९२१

गांधींनी आपल्या लांबलचक भाषणात श्रोत्यांना सांगितले की, माझ्या भाषणात अडथळे आणू नका आणि टाळ्या वाजवू नका. पारशी मला पूर्ण ओळखीत नाहीत व ते माझ्याबरोबर नाहीत असे मी कधी म्हटले नाही. लहानपणापासून मी पारशांना ओळखतो व पारशी मला ओळखतात. माझे सर्वांत चांगले आणि अत्यंत निकटचे स्नेही पारशी होते आणि पारशांच्याबरोबरचे माझे संबंध फार जिव्हाळ्याचे होते. दादाभाई हे माझ्या वडिलांसारखे किंवा माझ्या आजोबांसारखे होते. जर आपल्याला कधी स्वराज्य मिळाले तर ते दादाभाईंच्या प्रयत्नांमुळे व देशाकरिता त्यांनी केलेल्या अलौकिक कामामुळे मिळेल. त्यांनीच मला तरुणपणी स्वराज्याचा धडा दिला. मी जेव्हा इंग्लंडला दक्षिण आफ्रिकेचे शिष्टमंडळ घेऊन गेलो, तेव्हा दादाभाई नौरोजी आणि फेरोजशहा मेहता हे जसे सांगत, तसा मी बोले आणि वागे. पारशी माझ्याविरूद्ध आहेत असे मला कधीच वाटले नाही. या चळवळीत ते मला येऊन मिळतील अशी पूर्ण आशा आहे. त्यांच्या मनात असलेल्या शंकांबद्दल मला कधीच वाईट वाटले नाही. तीस कोटी हिंदी लोकांत शेकडो वर्षे राहिलेले फक्त पारशीच आहेत आणि तरीही त्यांनी आपले प्रभुत्व गाजविले आहे आणि देशाच्या कारभारात प्रमुख स्थान मिळविले आहे. मला तुमची खुशामत करावयाची नाही व तो माझा हेतूही नाही. माझ्या मनात जे खरोखर वाटते ते मी सांगत आहे. पारशांपेक्षा संख्येने लहान असलेल्या अनेक जमाती जगात आहेत; पण त्या आपल्या देशाबाहेर कोणाला ठाऊक नाहीत. साऱ्या जगाला ठाऊक नाहीत. पण पारशांची

१. टिळक स्वराज्य फंडाला ३०,००१ रुपयांची थैली गांधींना देण्याकरिता एक्सेलशिअर थिएटरमध्ये पारशांची सभा झाली. विठ्ठलभाई पटेल, सरोजिनी नायडू, श्री. व सौ. मॉर्मड्यूक पिकथॉल, अलीबंधू व डॉ. किश्लू सभेला हजर होते.

संख्या ८०,००० असताही जगात असा कोणता भाग आहे की, जेथे पारशी जमात माहीत नाही ? जर मुंबई सुंदर असेल, जर मुंबई नेतृत्वाबद्दल प्रसिद्ध असेल, जर मुंबई सार्वजनिक वृत्तीकरता विख्यात असेल तर ती पारशी जमातीमुळे होय. जर पारशी नसते तर मुंबई, हिंदुस्थानातील एखाद्या शहरासारखे झाले असते. याकरिता साऱ्या हिंदुस्थानने पारशांचे आभार मानले पाहिजेत ! जर हिंदी लोकांना राजकारणात मार्गदर्शन कोणी केले असेल तर ते पारशांनी. पारश्यांना कोणत्याही प्रकारे दोष देऊ नका, असे मी हिंदू व मुसलमान मित्रांना सांगतो. जर साऱ्या जमाती आपसात एक झाल्या तर आताच स्वराज्य मिळेल. दुसऱ्या देशात जाण्याऐवजी पारशी या देशात आले याचा मला अभिमान वाटतो. गुजरातने त्यांना आश्रय दिला याबद्दल मला तसाच आनंद होतो. त्या गुजरातची त्यांनी अमोल सेवा केली आहे.

दक्षिण आफ्रिकेत गोऱ्या लोकांनी माझ्या घराला वेढा घातला व मला ठार मारावयाचे योजले असता पारशी रुस्तुमजीने आपला जीव धोक्यात घालून माझे रक्षण केले. स्वतःवरील आणि आपल्या लोकांचा धोका पत्करूनही माझ्यामागे ते उभे राहिले. मी जिवंत असेपर्यंत रुस्तुमजींनी जे काय केले ते विसरणार नाही. पारशी हे पूर्ण सद्गुणी, सत्यनिष्ठ आणि प्रामाणिक आहेत. आणि त्यांच्या वर्णाबद्दल मला अभिमान वाटतो. जरी पारशांनी ३०,००० रुपये जमविले नसते आणि पाचच रुपये दिले तरीही मला त्यांच्याबद्दल समाधान वाटले असते. गोदरेजनी मला तीन लाख रुपये दिलेच आहेत आणि त्यांनी पारशी काय करू शकतात हे सर्व हिंदुस्थानला दाखविले आहे. पारशांनी मला अनेक प्रकारे उदारपणे देणग्या दिल्या आहेत आणि हिंदुस्थानात येऊन त्यांनी देशाची सेवा केली नाही ही गोष्ट सत्य नाही. माझ्या मताने त्यांनी देशाचे सारे ऋण फेडले आहे. ते व्यापारी लोक आहेत आणि त्यांनी अलीकडे सरकारी नोकऱ्या पत्करल्या आहेत ही केविलवाणी गोष्ट आहे. त्यामुळेच साऱ्या हिंदुस्थानचा तोटा झाला आहे व तो तोटा फक्त पारशांचाच नाही. पण त्यांना जे शिक्षण मिळाले आहे त्यामुळे ते सरकारी नोकऱ्यांच्या मागे लागले आणि त्याचेच मोठे दुःख आहे. व्यापाराने त्यांना प्रामाणिकपणा शिकविला. पैसा जमा-करण्यास सांगितले आणि या देशातील दुसऱ्या जातींचे कल्याण करा असे सांगितले. सध्याच्या स्थितीचा आढावा घ्यावा आणि पुढचा विचार करावा असे मी त्यांना सांगतो. दादाभाई नौरोजी, फेरोजशहा मेहता आणि जमशेटजी टाटा अशी माणसे निर्माण करून त्यांनी देशाचे ऋण पूर्णपणे

फेडले आहे. सध्या चालू असलेल्या स्वराज्याच्या चळवळीत पारशांनी भाग घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो. जीवनाच्या प्रत्येक शाखेत इतर जमातींबरोबर पारशी हे चढाओढ करू शकतात. जर त्यांनी पूर्वी देशात इतके काम केले आहे तर ते आता ह्या चळवळीपासून दूर का राहतात ? त्यांची जमात श्रीमंत आहे. कोटयवधी रुपये त्यांच्याजवळ आहेत. असे असता ते निधीला अधिक पैसा का देत नाहीत ? दादाभाई हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा याकरिता राजकीय संन्यासी म्हणून राहिले आणि त्यांनी साऱ्या देशाची सेवा केली. त्यांनी तसे केवळ पारशां-करिता केले नाही, पण सर्व जाती जमातींकरता केले. मी तुमचा मोठा चाहता आहे आणि पुष्कळ काळ तुमच्या निकट सहवासात आहे म्हणून मित्रत्वाच्या नात्याने बोलणार आहे.

जर पारशांनी मनात आणले तर वाटेल ती गोष्ट ते साध्य करतील. कारण ती ऐंशी हजारांची लहान व एकजीव असलेली जमात आहे. पण हिंदू-मुसलमानांचे तसे नाही. जर इंग्लिश येण्यापूर्वी पारशी हे स्वतंत्र राहू शकले तर ते स्वराज्य मिळाल्यानंतर तसे का राहू शकणार नाहीत हे मला समजत नाही. या देशातील लहान लहान जमातींचे रक्षण करणे हे हिंदू मुसलमानांचे आद्य कर्तव्य आहे. जर हिंदू आणि मुसलमान हे स्वतःशी सत्यनिष्ठ राहिले तर आपल्या पोटात घास घालण्यापूर्वी कोणताही पारशी उपाशी राहिलेला नाही हे पाहतील. जर हिंदू किंवा मुसलमानांना दुसरे काही करावयाचे असेल तर ते काम धर्मराज्याचे नाही. मला हिंदुस्थान सैतानी बनवावयाचा नाही. पण धर्मराज्य स्थापावयाचे आहे. मला पारशांना निर्भय करावयाचे आहे आणि त्यांचे संशय काढून टाकावयाचे आहेत. त्यांनी आपली शक्ती देशाच्या कल्याणाकरिता लावावी अशी माझी इच्छा आहे. जर त्यांनी तसे केले तर यंदाच आपल्याला स्वराज्य मिळेल आणि खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर होतील. जर ब्रिटि-शांच्याप्रमाणे त्यांना जगावर राज्य करावयाचे असेल तर मी म्हणेन हिंदी लोकांच्यात ती लायकी नाही. मी परमेश्वराला प्रार्थना करीन की, त्याकरिता त्यांना लायक करू नकोस. हिंदी लोकांना, निग्रोंना गुलाम करण्याची इच्छा आहे काय, किंवा त्यांना कैदी करावयाचे आहे काय, किंवा आपल्याकरिता राबवून भिकारी ठेवावयाचे आहे काय ? स्वतः शुद्ध होऊन आपण स्वतंत्र झाले पाहिजे आणि नंतर जगातील सारी पापे नष्ट केली पाहिजेत.

याच क्षणी पारशांनी स्वराज्यवादी व्हावे अशी माझी त्यांना प्रार्थना आहे. ते स्वराज्यवादी होते पण त्यांच्या मनात काही शंका होत्या.

तुम्ही खरे स्वराज्यवादी व्हा अशी मी याचना करतो. या प्रश्नाचा तुम्ही नीट विचार करा आणि या गोष्टी बोलणारा गांधी हा मूर्ख होता की काय असे स्वतःला विचारा. हिंदुस्थानला हवे असलेले स्वराज्य हे धर्मराज्य आहे. असत्यावर आधारलेले स्वराज्य हिंदुस्थानला नको असून सत्यावर आधारलेले पाहिजे. जे जे असत्य असेल ते ते आम्हांला दूर सारावयाचे आहे. पारशी धर्मानेच मला सैतानाबरोबर असहकार करण्यास शिकविले आहे. सैतानापासून, सर्व पापापासून दूर राहा हीच त्याची शिकवण आहे. मी इंग्लिशांचा द्वेष करीत नाही व त्यांना या देशाबाहेर घालवू इच्छित नाही पण आम्ही इंग्लिशांची प्रजा आहोत असे जे लॉर्ड रीडिंग म्हणतात ते मला आवडत नाही. या गोष्टींचा विचार करताना माझ्या अंतःकरणाचा थरकाप होतो. कोणत्याही पापाचा प्रतिकार करण्यास आपल्यात भरपूर प्रतिकारशक्ती असली पाहिजे. स्वराज्य मिळविण्याकरिता पिस्तुलांची जरूरी नाही किंवा वकील, बॅरिस्टर होण्याची जरूरी नाही. जर कोणत्या गोष्टीची जरूरी असेल तर आत्मविश्वासाची. पारशांच्यात इतक्या शंका आहेत याचे मला दुःख होते. या साऱ्या शंका काढून टाका. तुम्ही स्वराज्यवादी व्हा आणि स्वातंत्र्याकरिता इतर जमातींबरोबर एक व्हा.

नंतर गांधींनी दारूदुकानांचा उल्लेख केला. ते म्हणाले, मुंबईतील पारशांच्या शिरावर फार मोठी जबाबदारी आहे. मुंबईत सुमारे ९०० देशी दारूचे गुत्ते आहेत आणि त्यातील बहुतेक पारशांचे आहेत. पुष्कळसे पारशी माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, वर्षाच्या खरेदीची किंमत आम्ही सरकारला देऊन टाकली आहे. जर आमच्या दुकानांवर निरोधन होईल तर आमचा नाश होईल व आमचे सारे पैसे बुडतील. मी या गोष्टीचा विचार केला व गुत्तेवाल्यांबद्दल मला फार वाईट वाटले. पारशी जर सरकारशी सहकारिता करीत असतील किंवा त्यांनी आपल्या पदव्या सोडल्या नसतील तर मला दुःख नाही; पण दारू-गुत्ते ही एक फार गंभीर बाब आहे. हिंदू व मुसलमान हेच फक्त निरोधन करतात याचे मला वाईट वाटते. पारशी बंधु-भगिनींनीही निरोधन करावे. मला कोणतीही बळजबरी नको आहे. कारण जे पवित्र कार्य आहे, ते साध्य करण्याकरिता आक्षेपार्ह मार्ग उपयोगात आणू नयेत. जेव्हा पारशी स्त्रिया या गुत्त्यांत जाणाऱ्या पारशांच्या वाटेत उभ्या राहतील तेव्हा त्यांना दुकानात जाण्याची लाज वाटेल. ते शिव्याही देणार नाहीत व त्यांना मारणारही नाहीत. पारशांनी दारू टाकून द्यावी आणि ज्यांना निरोधनामुळे दुकाने बंद करावी लागतात अशा आपल्या लोकांनाच मदत

करावी. सरकारकडे मक्त्याचे पैसे ज्या गुत्तेवाल्यांनी भरले असतील त्यांना ते परत मिळवून देण्यास मदत करावी आणि इतरही मार्गांनी मदत करावी. अहमदाबादमध्ये एक पारशी मक्तेदार मला निरोधकांनी मारले अशी तक्रार घेऊन आला. पण चौकशी केल्यावर त्याचे म्हणणे खोटे ठरले. उलटपक्षी मार जो बसला तो स्वयंसेवकांना. ते डोक्याला पट्ट्या बांधून आता निरोधन करीत आहेत; पण परतफेडीकरिता त्यांनी हात उचलला नाही.

इतर जमाती दारूबंदीचे जे प्रयत्न करीत आहेत, त्यांना पारशी बंधुभगिनींनी मदत करावी अशी माझी कळकळीची विनंती आहे. जे लक्षाधीश पारशी या सभेला आले नाहीत ते या चळवळीविरुद्ध आहेत असे मी मानीत नाही. त्यांनी या पारशी दारू मक्तेदारांना सर्व प्रकारे मदत करावी. तूर्त मी त्यांना स्वराज्याच्या कार्याला मदत करण्यास सांगत आहे. स्वराज्य मिळविण्याकरिता सध्या जो लढा चालू आहे, त्यात पारशी जमातीने आपला योग्य वाटा उचलावा म्हणून त्यांना परमेश्वराने शक्ती द्यावी अशी माझी प्रार्थना आहे. आणि त्यांना या कठीण प्रसंगी आपले कर्तव्य काय आहे हे पटवावे.

मुंबई क्रॉनिकल ', १-७-१९२१

१४३. मुंबईच्या व्यापाऱ्यांना उद्देशून भाषण[1]

जून ३०, १९२१

महात्मा गांधीजी म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्याकरिता तुम्ही दिलेल्या रकमेचा मी स्वीकार करतो. मला संध्याकाळी आणखी दोन सभांना हजर राहावयाचे असल्यामुळे तुम्ही माझ्याकडून मोठ्या

१. कॉटन असोसिएशनच्या मार्फत भरलेल्या सभेत गांधींना कापूसव्यापाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी टिळक स्वराज्य फंडाकरिता २,५०,००० रुपयांची थैली दिली त्या वेळचे भाषण. असोसिएशनचे अध्यक्ष मथुरादास वसनजी खिमजी यांनी गांधींचे स्वागत केले.

भाषणाची अपेक्षा बाळगणार नाही असे वाटते. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, कुलाब्याच्या कापूस व्यापाऱ्यांप्रमाणे इतरांनी देशाची राजकीय परिस्थिती समजावून घेतली तर पंजाब व खिलाफतीचे अन्याय दूर करवून घेणे कठीण जाणार नाही. देशातील व्यापारी वर्गाने आतापासून राजकारणात प्रमुख भाग घ्यावा अशी माझी इच्छा आहे. देशातील कारभारात व्यापारीवर्ग जोपर्यंत अधिक लक्ष घालीत नाही, तोपर्यंत यशाची आशा नाही. पण आता या वर्गात जागृतीचे सुचिन्ह दिसत आहे. जर तुम्ही याच गतीने पुढे जाल तर चालू वर्षी स्वराज्य खात्रीने मिळेल. आपल्या देशाच्या राजकीय परिस्थितीत प्रमुख भाग घेणे हे व्यापारी वर्गाचे पहिले कर्तव्य आहे. स्वराज्य फंडाला तुमची देणगी जितकी असावयास पाहिजे तितकी नाहीं हे मथुरादास यांचे म्हणणे मला मान्य आहे. कारण तुम्ही दर वर्षी कोट्यवधी रुपयांचा कापूस बाहेर देशी पाठवीत आहात आणि त्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून एक कोटी रुपयांत पडणारी तूट तुम्ही भरून काढली पाहिजे. आजच्या रात्रीमध्ये एक कोटी रुपये पुरे झाले पाहिजेत. हिंदी लोकांवर माझा विश्वास आहे आणि ते काँग्रेसची आज्ञा अमान्य करणार नाहीत. इतर प्रांतांतून ४० लाखांची अपेक्षा आम्ही बाळगतो; पण मुंबईने उरलेले ६० लाख दिले पाहिजेत. ही रक्कम जमविण्याकरिता तुम्ही प्रयत्नांची शिकस्त कराल अशी मला कळकळीने आशा वाटते आणि तसे करून तुम्ही राष्ट्राची प्रतिष्ठा राखाल. बेझवाड्याला केलेल्या प्रतिज्ञेचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि दिवस संपण्यापूर्वी ही रक्कम जमा झाली नाही तर हिंदुस्थानची अब्रू जाईल. सध्या राष्ट्राचा मान व्यापाऱ्यांच्या हाती आहे. पैशाच्या बाबतीत तुम्हीच मदत करू शकाल. माझ्यासारखा भिकारी पैशाची काय मदत करणार ? जरूर ती रक्कम जमा करून राष्ट्राची प्रतिष्ठा राखण्याकरिता तुम्हांला परमेश्वराने शक्ती द्यावी अशी माझी त्याला प्रार्थना आहे.

'मुंबई क्रॉनिकल', १-७-१९२१

१४४. मुंबईच्या सभेत भाषण[1]

जून ३०, १९२१

महात्माजी म्हणाले, मुंबईच्या स्त्रीपुरुषांत जो मला विलक्षण उत्साह दिसतो आहे त्यावरून भविष्याबद्दल आशा वाटते. आणि जी प्रतिज्ञा आपण एकदा कलकत्त्याला व दुसऱ्यांदा नागपूरला केली, ती पुरी होईल अशी आशा दिसते. देशात ह्या घटकेपर्यंत किती पैसा जमला आहे याची मला कल्पना नाही. पण काही ' मिनिटांपूर्वी काठेवाडने दोन लाखांहून अधिक रक्कम जमा केल्याचे कळले आणि सकाळी एका गृहस्था-कडून २५,००० रुपयांचा चेक मिळाला. काठेवाडहून ५०,००० रुपयां-पेक्षा अधिक रकमेची आशा नव्हती. पण मला जे दिसत आहे त्यावरून एक कोटी जमतील असे वाटते पण मला त्याची खात्री हवी आहे आणि त्याकरिता मला मुंबईच्या काही गिरणीवाल्याकडून असे आश्वासन पाहिजे आहे की, जर अपेक्षित रक्कम जमली नाही तर कमी पडणारी रक्कम आपण देऊ असे आश्वासन मला मिळेल अशी मला खात्री आहे. मी या प्रसंगी चार शब्द देशाच्या श्रद्धेविषयी आणि प्रतिष्ठेविषयी स्त्रियांना उद्देशून सांगणार आहे. प्रत्येकजण जाणतो की, स्त्रियांच्या हाती आपला मान आहे व त्याच राष्ट्रनिर्मात्या आहेत. जर स्त्रिया पूर्णपणे धार्मिक व देशभक्त असतील तरच बलाढ्य किंवा आदर्श राष्ट्र घडविता येणे शक्य आहे. सध्या हिंदी स्त्रियांचे पावित्र्य व धर्म हा खादीमध्ये अंतर्भूत झाला आहे. म्हणून मी तुम्हांला या क्षणापासून परदेशी कपडे टाकून द्या आणि स्वतःला व तुमच्या मुलांना शुद्ध खादीने सुशोभित करा अशी विनंती करतो.

' मुंबई क्रॉनिकल ', २-७-१९२१

१. ही सभा मांडवी वॉर्ड काँग्रेस कमिटीच्या विद्यमाने न्यू चिंचबंदर येथे टिळक स्वराज्य फंडाला आणखी देणग्या मिळविण्याकरिता भरली होती.

१४५. एका स्त्री देणगीदाराला लिहिलेल्या पत्रातील भाग

आगगाडीत, जून ३०, १९२१

तुमच्या जडजवाहिराबद्दल वर्तमान पत्रात जो परिच्छेद आला आहे त्यामुळे तुमच्या देणगीचे सौंदर्य नष्ट झाले आहे. मला वाटले होते की, तुम्ही गुपचूप केलेल्या त्यागाचे ते कृत्य होते. तुमच्यापेक्षा पुष्कळ मुलींनी अधिक दिले आहे हे मी सांग इच्छितो. त्यांनी स्वतःची जाहिरात करण्याची आशा बाळगली नव्हती. एका भगिनीने दोनच दिवसांपूर्वी मोत्यांचे कंठे, माणकाची काकणे, कर्णभूषणे अशी सारी मौल्यवान रत्ने देऊन टाकली. तिच्या दानात किती तरी नम्रता व सौजन्य होते. तिला आपले नावही नको आहे. तिने हे देवाकरिता देऊन टाकले. मला तुमच्याबद्दल दुःख होते. या कटू सत्याबद्दल क्षमा करा.

महादेव देसाईंच्या डायरीतील हस्तलिखितावरून, नारायण देसाईंच्या सौजन्याने.

१४६. वांद्रयाच्या सभेत भाषण[1]

जुलै १, १९२१

महात्मा गांधी म्हणाले, आम्हांला काल रात्री झोप आली नाही. आम्ही पहाटे २ वाजेपर्यंत नाट्यगृहात होतो आम्ही तेथे नाटक पाहायला गेलो नव्हतो पण टिळक फंडाला पैसे जमविण्याकरिता गेलो होतो. जेव्हा माझे मित्र महंमद अली यांनी दागिन्यांशिवाय २५,००० रुपये पिशवीतून आणले, तेव्हा तीस वर्षांनंतर त्या नाट्यगृहात पुन्हा गेल्याबद्दल मला आनंद झाला. त्यामुळेच अलीबंधू सभेला येऊ शकले नाहीत. ते अगदी दमून गेले आहेत. पटेलांना वचन दिले नसते तर मीही आलो

१. उत्तर मुंबईच्या उपनगरात सकाळी एका सभेत झालेले गांधींचे भाषण. तेथे त्यांना १५,००० रुपये टिळक स्वराज्य फंडाकरिता चेकने देण्यात आले.

नसतो. आम्हांला ही रक्कम गरिबांच्याकडून लहान सहान रकमा गोळा करून जमवावयाची होती हे पटेलांचे म्हणणे मला मान्य आहे. जर गरिबांनी लहान रकमा देऊन एक कोटी रुपये मला दिले असते तर मला आनंद झाला असता. आम्ही जवळ जवळ एक कोटी रुपये जमा करू शकलो आहोत. ४४ लाख रुपये बाकीच्या हिंदुस्थानातून जमविले आहेत आणि उरलेले पैसे ह्या प्रांताने जमविले आहेत. आम्ही एक कोटी रुपये जमवू शकलो आणि हिंदुस्थानचा मान राखला, असे मला प्रसिद्ध करावयाचे आहे. काल मध्यरात्रीपर्यंत ८१ ते ८२ लाख रुपये जमा झाले आहेत. इतक्या थोड्या दिवसांत इतकी मोठी रक्कम आम्ही जमवू शकलो त्या अर्थी उरलेली रक्कम सहज जमा होईल. तथापि मी चार पाच श्रीमंत लोकांना कमी पडणाऱ्या रकमेबद्दल बोललो आहे आणि त्यांनी भरपाई करण्याचे कबूल केले आहे. मला त्यांच्याकडून आश्वासन मिळाले आहे, ही गोष्ट जाहीर करावयाची नाही. कारण ते मित्र म्हणाले, आमची नावे प्रसिद्ध झाली म्हणजे ती आमची जाहिरात होईल आणि लोक देणग्या देणार नाहीत; म्हणून मी त्यांना आनंदाने सांगू इच्छितो की एक कोटी रुपये जमा होतील. जर ही रक्कम लहान सहान देणग्यांनी जमा झाली असेल तर मी म्हणेन, वांद्र्याचे लोक स्वराज्याला लायक आहेत. वांद्र्याच्या श्रीमंत लोकांनी काहीही दिले नसले तरीही मला त्याचे काही वाटणार नाही. ते ह्यानंतर देतील. जेव्हा पटेल म्हणाले की, वांद्रा दहा हजारच जमवू शकेल तेव्हा मला दुःख झाले नाही. जरी मी तुमचे पैसे जमविल्याबद्दल अभिनंदन करतो तरी एकूण काँग्रेस सभासद नोंदणीबद्दल किंवा चरख्यांच्या संख्येबद्दल मी तुमचे अभिनंदन करू शकत नाही. मला काँग्रेसचे एक कोटी सभासद व्हावेत अशी जितकी चिंता वाटत होती, तितकी एक कोटी रुपयांबद्दल नव्हती. जेव्हा मी एका मित्राला जरूर असलेल्या पैशाबद्दल बोललो आणि एक कोटी रुपयांनी माझे समाधान होणार नाही असे सांगितले आणि कित्येक कोटी रुपये मला लागतील असे म्हणालो, तेव्हा त्या मित्राने मला सांगितले की, व्हिक्टोरिया मेमोरियल फंड हा देखील ५२ लाख रुपये जमला होता, आणि तो फंड अधिकाऱ्यांच्या वजनामुळे व दाब आणि मनधरणी यांच्या साहाय्याने जमविला होता. टिळक फंड हा दडपणाशिवाय मिळविला आहे आणि ऐच्छिक देणग्याच फक्त घेतल्या आहेत. ती रक्कम जमविण्याकरिता किती अधिक प्रयत्न करावे लागले ?

आम्ही बेझवाड्याचा कार्यक्रम पुरा पाडला ! आता आपल्याला सभासद नोंदवावयाचे आहेत आणि प्रत्येक घरात आवश्यक तितके चरखे

सुरू करावयाचे आहेत. या देशात ६ कोटी कुटुंबे आहेत आणि प्रत्येक घरात चरखा असला पाहिजे. पण फक्त चरख्यांच्या संख्येवर किंवा चरख्यावर निघालेल्या सुतावर माझे समाधान होणार नाही. मला काही तरी अधिक पाहिजे आहे. तुमच्या शरीरावर चरख्याची खूण पाहिजे, म्हणजेच तुम्ही खादी वापरली पाहिजे. जर तुम्ही खादी वापरली तर तुम्ही चरखे चालवीत आहात हे साक्षात सिद्ध होईल. इतकी वर्षे आपण भ्रमात वावरत होतो आणि परदेशी कापड वापरत होतो. स्वराज्य हवे असेल तर खादीच वापरा. हिंदी लोकांनी स्वदेशी कापड वापरले पाहिजे. आणि जीवनातील प्रत्येक गोष्टीकरिता खादीचा उपयोग केला पाहिजे. लोकमान्य टिळकांनी एकदा आपल्या मित्राला सांगितले की, देशात चोहोकडे रोगराई आणि हिवताप सुरू झाला तरी आम्ही हिंदुस्थानबाहेर इंग्लंडला जाणार नाही आणि तेथून स्वराज्याकरिता खटपट करणार नाही. हिंदुस्थान आपली मातृभूमी आहे आणि हिंदुस्थानची हवा किती वाईट असली तरी आपल्याला येथेच जगावयाचे आहे व मरावयाचे आहे. तसे केल्याशिवाय आपण कधीही सुखी होणार नाही. जर तुमचे हिंदुस्थानवर प्रेम असेल आणि जर 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे म्हणणाऱ्या टिळकांबद्दल आदर असेल तर तुम्ही परदेशी कपडे टाकले पाहिजेत. परवाच एका पारशी स्त्रीने एक हजार रुपये किंमतीचे आपले परदेशी दागिने माझ्याकडे पाठविले. मी तिला पाहिले नाही व तिचे नावही मला माहीत नाही. हिंदी लोकांनी परदेशात केलेले दागिने का वापरावेत? हिंदी सोनार मेले काय? जोपर्यंत पुरेसे काम न मिळणारे हिंदी सोनार येथे आहेत तोपर्यंत परदेशी दागिने का वापरावेत? ज्या भगिनीने मला हे दागिने दिले ती आता खादी वापरीत असेल असे मला वाटते आणि वापरीत नसेल तर तिने लवकर वापरावी. शुद्ध स्वदेशीचा वापर करा अशी माझी विनंती आहे. मी पैसे मागत नाही, कारण पैसे कसे तरी जमा होतील. पण परदेशी कापड वापरण्याचे टाकून द्या, ही पहिली गोष्ट करा. सप्टेंबरनंतर मी याबद्दल बोलणार नाही. सप्टेंबरनंतर मी मुस्लिम मित्रांना असे सांगणार आहे की, तुमच्या इच्छेप्रमाणे खिलाफत प्रश्न सुटावयास पाहिजे असेल तर स्वदेशीच कापड वापरा. त्यांच्यापैकी प्रत्येक स्त्री-पुरुषाने चरखा चालविला पाहिजे आणि स्वदेशी कापड वापरण्याचा निश्चय केला पाहिजे. त्यांच्या चळवळीत नवे युग सुरू झाले आहे आणि त्यांनी स्वदेशी कापड वापरले तर त्यांची शक्ती अनेक पट वाढेल.

'मुंबई क्रॉनिकल', २-७-१९२१

१४७. ‘ नवजीवन ’ला तार

मुंबई

[जुलै १, १९२१]

लोकमान्यांची स्मृती कायम टिकविण्याकरिता आणि स्वराज्य स्थापनेकरिता हिंदुस्थानला जूनअखेर सुमारे ८० लाख रुपये जमविण्यात यश आले आहे. उरलेले २० लाख रुपये लोक लवकरच जमा करतील अशी मला आशा आहे. जरी बेझवाड्याचा कार्यक्रम शब्दशः पुरा झाला असे म्हणता येत नसेल तरी लोकांनी काँग्रेसच्या विनंतीला दिलेले उत्तर अत्यंत चांगले होते असे म्हणता येईल. या वेळीं मुंबईच्या औदार्याने आपला पूर्वीचा विक्रम मागे टाकला आहे. उरलेली रक्कम शक्य तितक्या लवकर जमा करण्याकरिता मुंबईने इतर प्रांतांबरोबर हातमिळवणी करावी. तथापि मुख्य प्रयत्न परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार घडवून आणण्याकरिता व एक कोटी काँग्रेस सभासद नोंदणी पुरी करण्याकरिता करावा.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, ३-७-१९२१

१४८. ‘ नवजीवन ’ला तार

मुंबई

[जुलै १, १९२१]

देशबंधू चित्तरंजन दास यांनी तारेने असे कळविले आहे की, बंगालची टिळक स्वराज्य फंडाला रक्कम २५ लाख रुपये झाली. अशा प्रकारे हिंदुस्थानने आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे एक कोटी रुपये जमविले.

[गुजरातीवरून]
‘ नवजीवन ’, ३-७-१९२१

१४९. परदेशी कापडावरील बहिष्कार

देव मोठा आहे. अनपेक्षित ठिकाणाहून तो मदत पाठवितो. अगदी थोड्या दिवसांपूर्वी मि. दास यांनी तार पाठविली की, बंगालने ३ लाखांपेक्षा अधिक रक्कम गोळा केली नाही. हिंदुस्थानने ठरलेल्या तारखेला पुरे एक कोटी रुपये दिले नाहीत हे जाहीर करणे मला क्षुल्लक गोष्ट वाटली नाही. उरलेली रक्कम पुरी करावी म्हणून मी मित्रांशी झगडलो. ते ती रक्कम द्यावयास तयार होते. पण आपली नावे जाहीर करण्यास तयार नव्हते. कारण त्यांना वाटले, तसे करणे म्हणजे प्रसिद्धीची हाव बाळगणे आहे. त्यांना वाटले की, रक्कम आहे तेथेच राहू देणे अधिक चांगले आणि ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेपूर्वी उरलेली रक्कम जमा करण्याचा प्रयत्न केला जावा. मी शरण गेलो पण ईश्वराने माझी प्रार्थना ऐकली नाही. म्हणून माझे अंतःकरण दुःखी होते. पण देव मला सोडणार नाही हे मला ठाऊक होते. त्याने बंगालला संकटातून मोकळे करण्याकरिता पाठविले आणि राष्ट्राची बेझवाडा येथील हमी पुरी केली. नम्र होऊ या आणि त्याचे स्तवन करू या. पण रस्त्यात नाचण्या-बागडण्यात आपण घुटमळता कामा नये. प्रत्येक प्रांताने एक कोटीतील संख्येचे आपले प्रमाण निदान पुरे करावे. जरी एकूण रक्कम एक कोटी पाच लाख[1] झाली असली तरी हे काम केले पाहिजे; पण यानंतरचे आपले न चुकणारे पाऊल म्हणजे परदेशी कापडावरचा संपूर्ण बहिष्कार. १ ऑगस्टला आपण लोकमान्यांची पुण्यतिथी साजरी करणार आहोत. जर आपण खास प्रयत्न केले तर त्या तारखेपूर्वी परदेशी कापडावरील जवळ जवळ संपूर्ण बहिष्कार आपण अंमलात आणू शकू. फार मोठ्या बहुसंख्याक लोकांची एकमताची त्याला जरूरी लागेल हे मी जाणतो. पण पैसे जमविण्यात जी आपण कळकळ दाखविली त्याच कळकळीने हे काम केले तर हे अशक्य नाही. त्याच वेळी हिंदुस्थानला स्वराज्य स्थापनेच्या शक्तीची प्राप्ती होईल. परदेशी कापडाच्या संपूर्ण बहिष्काराशिवाय लोकमान्यांची पुण्यतिथी अधिक चांगल्या रीतीने साजरी करता येईल असे मला वाटत नाही.

'मुंबई क्रॉनिकल', २-७-१९२१

१. २-७-१९२१ रोजी मुंबई क्रॉनिकलमध्ये या रकमेचा पुढीलप्रमाणे तपशील आला आहे. (रुपये लाखात) : मुंबई शहर ३७½; बंगाल २५; गुजरात व काठियावाड १५; पंजाब ५; मद्रास व आंध्र ४; सी. पी. व वऱ्हाड ३; महाराष्ट्र (मुंबई उपनगर धरून) ३; बिहार ३; सिंध २; यू. पी. २½; कर्नाटक १; दिल्ली २; अजमीर व मेरवाडा ½; ओरिसा व आसाम¼; व ब्रह्मदेश १¼.

१५०. मुंबईमधील जाहीर सभेत भाषण[1]

शनिवार,
जुलै २, १९२१

यापुढे पैशासंबंधी मी बोलताना तुम्हांला ऐकू येणार नाही. पुढे काय करावे याचाच आता आपल्याला विचार करावयाचा आहे. पैसे आले तर ते आपण स्वीकारू. टिळक महाराजांच्याकरिता एक कोटीच काय पण दहा कोटी खर्च केले तरी तो मोठा त्याग होणार नाही. स्वराज्याकरिता जरूर पडली तर आपण तितकीही रक्कम खर्च करू. पण दहा कोटी खासच लागणार नाहीत. जो माणूस जरूरीपेक्षा एक पैदेखील जास्त खर्च करतो त्याला व्यावहारिक शहाणपणा असलेला माणूस म्हणता येत नाही. आता तुम्ही एकाच गोष्टीचा विचार करा. एक ऑगस्टला टिळक महाराजांची पुण्यतिथी येते. त्या प्रसंगाला शोभेल अशी कोणती गोष्ट आपण त्या दिवशी करू ?

टिळक महाराजांनी दिलेल्या मंत्राचे तुम्ही कौतुक करा. त्यांच्या विद्वत्तेने किंवा गोड भाषणाने मोहून जाऊ नका. पण त्यांचे कार्य, त्यांच्या जीवनाचा यज्ञ व त्यांनी केलेले त्याग यांनी तुम्ही मोहित व्हा. ज्या कार्याबद्दल त्यांनी अंतःकरणात आशा बाळगली होती, ते कार्य तुम्ही पुरे करा. ज्या कार्याकरिता त्यांनी आपले जीवन अर्पण केले, ज्या कार्याकरिता त्यांनी हाल भोगले ते कार्य तुम्ही पुरे करा. त्यापेक्षा त्यांचे अधिक चांगले स्मारक करता येणार नाही. फक्त हजार रुपये जमविण्यापेक्षा एक पैही न जमविता स्वराज्य जिंकून आणणे हे अधिक चांगले. माझा पूर्ण विश्वास आहे की, ते तुम्ही कराल. पण स्वराज्याच्या दृष्टीने विचार केल्याशिवाय तुम्हांला काहीही करता येणार नाही. तुम्ही परदेशी कापड टाकलेच पाहिजे. तुम्हांला त्याकरिता कोणी ठार मारणार नाही. पण तुम्हांला थोडीशी स्वतःची समजूत घालावी लागेल. ज्याप्रमाणे मुलांना औषधाचा घोट देतात त्याप्रमाणे स्त्रियांनी हा कडू घोट गिळला पाहिजे. एक ऑगस्टपर्यंत थांबू नका, तुमची कपाटे, तुमचे शरीर आणि तुमचे डोके एकही दिवस न गमावता तपासा. परदेशी कापडात आपली गुलामी आहे. ती तुम्ही टाकून द्या. विशेषतः तुम्ही व्यापाऱ्यांनी ते टाका. जर एखाद्याने टिळक महाराजांच्या स्मारकनिधीकरिता

१. मुंबई कमिशन एजंटस् असोसिएशन आणि लिंगायत कमिशन एजंटस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही सभा भरली. त्यांनी टिळक स्वराज्य फंडाला गांधीजींना ५००१ रुपये दिले.

देणगीही दिली व त्याचबरोबर शिवी दिली तर मी कशी स्वीकारीन? मी स्वीकारली तर महाराष्ट्र त्याकरिता माझे डोके उडवील. जर आपल्याला टिळक महाराजांचे खरे स्मारक करावयाचे असेल तर आपण स्वदेशी बनलो पाहिजे. तसे केल्याशिवाय आपण स्वराज्याला पात्र ठरणार नाही. परदेशी कापड सोडण्याच्या तुमच्या निश्चयाचे द्योतक म्हणून तुम्ही पैसे द्या. स्वराज्य फंडाला रक्कम देताना परदेशी कापडाचा व्यापार करून ती रक्कम भरून काढू अशा आशेने तुम्ही जर देणगी दिलीत तर ते बरोबर ठरणार नाही.

परदेशी कापड हे गोमांस किंवा दारूइतकेच त्याज्य माना. तुमच्या दलालीच्या धंद्यात तुम्ही सध्या परदेशी कापडही पुरविता. म्हणून आता अशी शपथ घ्या की, त्यानंतर आम्ही आमच्या गिऱ्हाइकांना परदेशी कापड पुरविणार नाही. एखादे गिऱ्हाईक दारू मागू लागले म्हणून कोणी हिंदू त्याला दारू देईल काय? आपल्या गिऱ्हाइकांना एखादी वस्तू पुरविणे हे बरोबर नाही, अशा वस्तूंचा व्यापार आपण करू शकू का? त्याच पद्धतीने आपण परदेशी कापडाचा व्यापार करू शकत नाही. इंग्लिश माणसांचा किंवा इंग्लिश कापड तयार करणारांचा द्वेष न करता परदेशी कापडांचा द्वेष करण्यास शिका. जो व्यापार आपल्या देशाला गुलाम करतो त्यातून तुम्ही कसे पैसे कमाविणार? एक पारशी बांधव माझ्याबरोबर दारूसंबंधी वादविवाद करावयास आला. मी त्याला सांगितले की, तू दारूचा व्यापार सोडून दे. मग त्याकरिता भिकारी झालास तरी हरकत नाही. ज्या गोष्टींकडे पाहिले असता हिंदू व मुसलमान या दोघांनाही तिटकारा येतो, अशा गोष्टींच्याद्वारा तुम्ही पैसे कसे मिळवू शकता? परदेशी कापडाचे तसेच आहे.

दारूदुकानावर जसे आपण निरोधन करतो तसे परदेशी कापडाच्या दुकानावर निरोधन का करू नये हे मला समजत नाही. परदेशी कापडावरील बहिष्कार हा अधिक महत्त्वाचा आहे. भगिनींनो, परदेशी कापड विकत घेणे हे तुम्हांला धर्माविरुद्ध आहे. परदेशी कापड विकत घेणे म्हणजे स्वतःचे मूल टाकून देऊन दुसऱ्याचे मूल दत्तक घेण्यासारखे आहे. तुम्हांला वाटते परदेशी कापडात आपण सुंदर दिसतो. पण खरे सौंदर्य कर्तव्यमग्नतेत असते. गर्विष्ठ रावणाने पाठविलेली वस्त्रे धिक्कारून सीतेने आपले शरीर झाडाच्या पानांनी झाकण्यात धन्यता मानली. तुम्ही भगिनी सीता व्हा. परदेशी कापड टाकून न देता, एकाच वेळी तुम्ही स्वराज्य कसे मागता? निदान एक ऑगस्टपूर्वी तुम्ही हे केलेच पाहिजे. तुमच्यातील ज्या कोणा स्त्रीला धैर्य असेल तिने आपला परदेशी कापडाचा गठ्ठा जाळून टाकला पाहिजे. ज्या कोणाला ते कापड गरिबांना द्यावयाचे असेल ते त्यांनी मजकडे द्यावे. कारण खरे गरीब कोण हे तुम्हांला ठाऊक नाही. मलाच ते ठाऊक आहेत. जर तुम्हांला ते ठाऊक असते तर तुम्ही परदेशी कापड घालून मिरविण्यात आनंद मानला नसता आणि चैनीत राहिला नसता. परदेशी वस्तूंचा मोह सोडा.

तसे केले तरच आपले काम होईल. तुम्ही दिलेल्या पैशात जे वचन गृहीत धरलेले आहे ते पाळा. आता आम्हांला हेच पाहिजे आहे.

[गुजरातीवरून]
' गुजराती ', १०-७-१९२१

१५१. वैष्णवांना

तुमच्यापैकी बरेच जण माझे नातेवाईक आहेत. बरेच जण माझ्या जातीचे आहेत आणि बरेच जण लहानपणापासून माझे मित्र आहेत. या सर्वांकडून मला पत्रे येतात. काही पत्रांत पत्रलेखक माझ्या अंत्यजांसंबंधी असलेल्या विचाराला धन्यवाद देतात. काही जणांना माझ्या या विचारात चूक आहे असे वाटून ते माझी हळूच कानउघाडणी करतात. काही जण संतापाच्या भरात माझ्यासंबंधी कठोर शब्द वापरतात, आणि काही जण मला प्रत्यक्ष धमक्या देतात. मी या साऱ्या गोष्टी माझ्यावरील प्रेमाच्या द्योतक मानतो. माझ्याखेरीज अंत्यजांच्या संबंधी तसेच विचार असणारे पुष्कळ जण आहेत आणि ते त्यांच्याशी संबंध ठेवावयाला हरकत घेत नाहीत. पण लोक माझ्यावर रागावलेले आहेत. त्याचे कारण माझ्या समजुतीप्रमाणे असे आहे की, त्यांना वाटते, इतर सर्व बाबतींत धर्माची इतर सर्व बंधने मी कटाक्षाने पाळतो आणि तेवढे सोडले तर मी चांगला माणूस आहे असे ते समजतात. अंत्यजांसंबंधी माझे जे चुकीचे विचार आहेत असे जे त्यांना वाटते त्याबद्दल ते जुळते घेऊ शकत नाहीत. त्यांना वाटते या विचारामुळेच आपली स्वराज्याकडील प्रगती कुंठित झाली आहे. काहींना असे वाटते की, ही पीडा मी निष्कारण ओढून घेतली आहे आणि माझ्या हटवादीपणाने स्वराज्याचे जहाज मी धोक्यात आणले आहे.

याविरुद्ध माझी नम्र समजूत अशी आहे की, अंत्यजांसंबंधी मी जी कळकळ दाखवितो, ती कळकळ वैष्णवांच्या जीवनमार्गावरील भक्तीला भूषणभूत आहे, शुद्ध दयालुत्वाचे ते स्पष्टीकरण आहे आणि धार्मिक जीवनातील यम-नियमांबद्दल माझी जी प्रामाणिक आस्था आहे ती सिद्ध करणारी आहे.

काही वैष्णवांना वाटते की, मी वर्णाश्रमधर्माचा नाश करीत आहे. उलटपक्षी मला वाटते की, त्या धर्मातील अशुद्धी काढून टाकण्याचा मी प्रयत्न करीत आहे आणि

त्याचे सत्य स्वरूप प्रकट करीत आहे. कोणाच्याही बरोबर खावे, प्यावे यासंबंधीची बंधने नष्ट करावीत याचा मी खासच पुरस्कार करीत नाही. किंवा आंतरजातीय विवाहांचाही मी पुरस्कर्ता नाही. एखाद्या माणसाच्या शरीराला स्पर्श झाला म्हणजे पाप लागते ही कल्पना पापी आहे एवढेच मी म्हणतो.

विटाळशीपणाच्या काळात एखाद्या स्त्रीचा संपर्क टाळण्याची तशीच वहिवाट सांगून अस्पृश्यतेच्या चालीचे समर्थन करणे ही गोष्ट माझी खात्री पटवीत नाही. त्या काळात अशा एखाद्या स्त्रीला चुकून स्पर्श झाला तर त्याला पाप समजत नाहीत. आरोग्याच्या नियमांचा भंग असा तो मानीत आणि शुद्ध होण्याकरिता स्नान करीत. भंगीकाम केल्यानंतर स्नान केले नाही किंवा त्या कामानंतर तो स्वच्छ झाला नाही तर अशा अंत्यजाशी एखाद्याने स्पर्श टाळणे किंवा जर एखाद्याचा अशा अंत्यजाशी संपर्क आल्यामुळे त्याने स्नान केले तर मला ती कल्पना समजू शकते. पण अंत्यज म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येकाशी कटाक्षाने संबंध टाळणे हे धर्माला अपेक्षित आहे ही कल्पना माझ्या मनाला कधीही पटणारी नाही.

वैष्णवांची मूळ प्रेरणा दया ही आहे. अंत्यजांना आपण जी वागणूक देतो तीमध्ये मला याचा लेशही आढळत नाही. आपल्यातील पुष्कळ जण तिरस्काराशिवाय दुसऱ्या कोणत्याही शब्दाने अंत्यजांना संबोधीत नाहीत. जर एखादा अंत्यज इतर हिंदूंच्या-बरोबर एकाच जागी बसलेला आढळला तर त्याच्यावर शिव्यांचा वर्षाव केला जातो. आपण आपल्या पानातले उष्टे अन्न गुरांप्रमाणे त्यांना देतो. जर एखाद्या अंत्यजाला ताप आला किंवा साप चावला तर आपले वैद्य व डॉक्टर्स त्यांच्या घरी जाणार नाहीत व त्यांच्यावर उपचार करणार नाहीत. जर एखादा तयार झालाच तर आपण सारी शक्ती खर्च करून त्याला थांबवू. अंत्यजांना राहण्याकरिता अत्यंत गलिच्छ वस्तीत घरे मिळतात. तेथे दिव्याच्या किंवा सार्वजनिक रस्त्यांच्या सोयी नसतात. त्यांना वापरण्या-करिता विहिरींची ही तरतूद केलेली नसते. त्यांना सार्वजनिक विहिरी आणि धर्मशाळा यांचा उपयोग करता येत नाही आणि शाळेत जाता येत नाही. आपण त्यांच्याकडून अत्यंत कठीण सेवेची अपेक्षा करतो आणि त्यांना कमीत कमी पैसे देतो. वरती आकाश आणि खाली जमीन येवढाच त्यांना आसरा असतो. वैष्णवांच्या जीवनधर्माप्रमाणे ही वागवणूक आहे काय ? दयेतून प्रेरणा मिळालेला हा मार्ग आहे का; का निष्ठुरतेतून मिळालेला आहे ? ज्या ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध तुम्ही असहकारितेची मोहीम सुरू केली आहे ते सरकार तुम्हांला अशा तिरस्काराने वागवीत नाही. आपण अंत्यजाविषयी धर्माच्या नावाखाली डायरशाही परिपुष्ट करीत आहोत.

माझ्याबद्दल म्हणावयाचे म्हणजे आपण जसे पेरले तसे उगवीत आहोत. अंत्यजांना तुच्छतेने वागवून आपण साऱ्या जगाच्या तुच्छतेचे विषय झालो आहोत.

अस्पृश्यतेची कल्पना बुद्धीला पटणारी नाही. ती सत्य आणि अहिंसेच्या विरुद्ध आहे म्हणून तिला धर्म म्हणता येत नाही. आपण उच्च आहोत व दुसरे नीच आहेत ही कल्पनाच क्षुद्र आहे. सेवेकरिता तयार असणे हा जो शूद्रांचा गुण आहे तो ज्याच्यात नसेल तो खरा ब्राह्मण नाही. त्यालाच खरा ब्राह्मण म्हणता येईल की, ज्याच्यात क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या तिघांचेही गुण असतील आणि शिवाय ज्याच्यात ज्ञान असेल. शूद्रात ज्ञानाचा संपूर्ण अभाव नसतो. इतर गुणांच्यापेक्षा सेवेची तयारी ही त्याच्यात प्रामुख्याने असते. वर्णाश्रम धर्मात उच्च व नीच असा भेदाभेद करण्यास जागा नाही. भंगी व चांडाळ यांना मोक्ष प्राप्त झाला हे वैष्णव परंपरेला ज्ञात आहे. सारे विश्व विष्णुमय आहे, असे समजून चालणाऱ्या धर्माला अंत्यजात तो नाही असा विश्वास कसा ठेवता येईल ?

तुम्हांला शास्त्रार्थ सांगण्याची माझी इच्छा नाही. मी स्वतःला विद्वान समजत नाही. शास्त्रार्थ सांगण्याकरिता कोणाही शास्त्रज्ञाने यावे व माझा पराभव करावा. पण दयाळुत्वाचा मार्ग कोणता याच्या अर्थासंबंधी मला काही अनुभव आले आहेत हे मी विश्वासपूर्वक सांगू शकतो. या मार्गात अंत्यजासंबंधी तिरस्काराच्या वृत्तीला बिलकुल स्थान नाही.

शिवाय तुम्ही कोणत्या लोकांना अंत्यज म्हणणार ? विणकर हा अंत्यज आहे काय ? चामड्याचे श्रीमंत व्यापारी अंत्यज आहेत काय ? का सोने सर्वच गोष्टी शुद्ध करते ? ज्या चांभाराने आपला वंशपरंपरागत धंदा सोडला असेल, ज्या भंग्याने मोटर हाकण्याचे काम सुरू केले असेल, किंवा जो गिरणीत काम करीत असेल, त्याने दररोज स्नान केले आणि स्वतःला स्वच्छ ठेवले अशाही माणसाला तुम्ही अस्पृश्य मानणार का ?

पण वाद कशाला ? जोपर्यंत तुम्हांला असे वाटते की, अस्पृश्याच्या शरीराला स्पर्श करणे हे पाप आहे, तोपर्यंत तुम्ही वाटल्यास त्या स्पर्शानंतर स्नान करा. पण माझी तुम्हांला अशी विनंती आहे की, ज्याप्रमाणे रजस्वला असलेल्या तुमच्या आईला जसे तुम्ही उपेक्षेने वागवीत नाही, पण उलट तिची सेवा करता, त्याप्रमाणे तुम्ही अंत्यजांचा तिरस्कार न करता त्यांची सेवा करीत जा. त्यांच्याकरिता विहिरी खणा, शाळा बांधा, वैद्यांच्या भेटीची व्यवस्था करा, त्यांची दुःखे आपली दुःखे समजा आणि त्यांचे अंतःकरणापासूनचे आशीर्वाद मिळवा. चांगल्या वस्तीत त्यांना घरे मिळवून द्या. त्यांना पैसे चांगले द्या, मान द्या, शिक्षण द्या. त्यांच्याकडे धाकटे भाऊ म्हणून पाहा आणि त्यांना गोमांसभक्षण व मद्यपान यापासून परावृत्त करा. जे या गोष्टी करतील त्यांना बक्षीस द्या. जर तुम्ही या रीतीने वागलात तर अस्पृश्यतेची कल्पना ही एखाद्या अनवश्यक अवयवाप्रमाणे आहे (कवी म्हणतात तसे) असे तुम्हांला वाटेल. तुमच्या-पैकी काहींनी टिळक स्वराज्य फंडाला पैसे देण्याचे नाकारले. त्याचे कारण माझे

अंत्यजासंबंधीचे विचार. तथापि माझी तुम्हांला अशी विनंती आहे : अस्पृश्यांच्या सुधारणेला पैसे द्या. जरी तुम्ही अस्पृश्यतेची चाल टाकून दिली नाहीत तरी तुम्ही पैसे देऊ शकाल. खरोखरच काही वैष्णवांनी आपले पैसे याच कार्याला खास दिले आहेत. तुम्हांला जरी माझे अंत्यजाबद्दलचे विचार आवडले नाहीत, तरी तुम्ही काही पैसे स्वदेशी चळवळीला, दुष्काळनिवारणाला आणि शाळांना खात्रीने देऊ शकाल. तथापि मला वाटते की, अंत्यजांच्या परिस्थितीत सुधारणा करावी याला तुम्ही खात्रीने विरोध करणार नाही, आणि म्हणून मी तुम्हांला अशी विनंती करतो की, दयालुत्वाच्या तत्त्वाला मान देण्याचा पुरावा म्हणून अस्पृश्यांच्या उद्धाराकरिता करावयाच्या चळवळींना तुम्ही आपला निधी अंकित करून द्यावा.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', ३-७-१९२१

१५२. परदेशी मालावर बहिष्कार कसा घालावा[१]

सध्या तरी हे सांगणे अनवश्यक आहे की, परदेशी कापडावरील नियोजित बहिष्कार ही सूडाची प्रक्रिया नाही. ज्याप्रमाणे जीवनाला श्वास आवश्यक असतो, त्याचप्रमाणे राष्ट्रीय जीवनाला बहिष्कार आवश्यक आहे. म्हणून तो जितक्या लवकर घालता येईल तितके देशाचे अधिक हित होईल. त्याशिवाय स्वराज्य स्थापता येणार नाही, किंवा स्थापल्यानंतर टिकविता येणार नाही. येत्या ऑगस्टच्या एक तारखेपूर्वी तो कसा घालता येईल हे समजून घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्वरेने बहिष्कार घालण्याकरिता पुढील गोष्टी जरूर आहेत. (१) गिरणी मालकांनी आपले फायदे नियमित केले पाहिजेत. आणि हिंदी पेठेकरिता मुख्यत्वे माल तयार केला पाहिजे. (२) आयात व्यापाऱ्यांनी परदेशी माल विकत घेण्याचे थांबविले पाहिजे. तशी सुरुवात मुख्य तीन व्यापाऱ्यांनी केली आहे. (३) ग्राहकांनी कोणतेही परदेशी कापड विकत घेता कामा नये व शक्य तेथे खादी विकत घ्यावी. (४) ग्राहकांनी फक्त खादीचे

१. हा लेख ६-७-१९२१ च्या यंग इंडियात प्रसिद्ध झाला आणि इतर वृत्तपत्रांकडे प्रसिद्धी-साठी दिला होता.

कपडे वापरावेत. ज्यांना स्वदेशी व परदेशीमधील भेद कळत नाही, अशा गरिबांच्या करिता गिरणीचे कापड राखून ठेवावे. (५) ग्राहकांनी स्वराज्य स्थापन होईपर्यंत आणि खादी उत्पादनात वाढ होईपर्यंत शरीर झाकण्यापुरतीच खादी वापरावी. (६) ज्याप्रमाणे मद्यपान न करण्याची प्रतिज्ञा घेतल्यानंतर तुम्ही दारू नष्ट करता त्याप्रमाणे ग्राहकांनी परदेशी कापड नष्ट करावे किंवा बाहेर देशांच्या उपयोगाकरिता विकावे किंवा घाणेरड्या कामात झिजवून टाकावे किंवा खाजगी वेळी वापरावे.

वरील कलमात उल्लेखिलेले सर्व लोक चांगल्या प्रकारे व एकाच वेळी हे काम करतील अशी आशा करू या. पण खरते शेवटी यश जे अवलंबून आहे ते, लोकांच्या चिकाटीच्या निश्चयावर. त्याने आपल्या गुलामगिरीचे चिन्ह वापरण्यास नकार दिला पाहिजे.

'मुंबई क्रॉनिकल', ४-७-१९२१

१५३. एन. सी. केळकर यांना पत्र[१]

मुंबई,
जुलै ४-[१९२१]

प्रिय मि. केळकर,

सर्व अभिनंदनात मी तुमच्या अभिनंदनाला जास्त महत्त्व देतो. जर तुम्ही खात्री पटल्यामुळे मला सहकार्य दिलेत तर मला तुमच्या अंतःकरणपूर्वक सहकार्याची जरूरी आहे. वर्किंग कमिटीसंबंधी तुमचे पत्र पोहोचले. भविष्यकाळात जशी प्रेरणा होईल तसे वागा. मला असे वाटते की, आपण वर्किंग कमिटी ही जलदगतीची, शक्तिमान व एका विचाराची संस्था करावी. तीमध्ये मतभिन्नतेला जागा आहे. पण खात्री पटण्यासंबंधी मतभेदाला जागा नाही. कॉंग्रेस घटना ही जर कार्यक्षमतेने राबविली तर आपण अपेक्षित सर्व गोष्टी साध्य करू असे मला वाटते. पण मी माझी श्रद्धा हिंदुस्थानवर लादू शकत

१. सापडत नाही.

नाही. ह्याच वर्षी स्वातंत्र्य संपादन करणे हे आपल्या दैवात असेल तर ती श्रद्धा निर्माण होइल.

तुमचा स्नेहांकित
एम्. के. गांधी

फोटोस्टॅटवरुन : सी. डब्ल्यू. ३१२२
काशिनाथ केळकर यांच्या सौजन्याने.

१५४. के. राजगोपालाचारियर यांना पत्र

गावदेवी
मुंबई
जुलै ५, १९२१

प्रिय महोदय,

तुमचे मागील २८ तारखेचे पत्र पोहोचले. यंग इंडियामधील तुम्ही लिहिलेल्या पत्रातील गोष्टीचा मी लवकरच परामर्ष घेणार आहे. तुमच्या सूचनेबद्दल आभारी.

तुमचा विश्वासू,
एम. के. गांधी

श्री. के. राजगोपालाचारियर
तिरुपती,
मद्रास राज्य.
फोटोस्टॅटवरून : जी. एन्. ५६६८.

१५५. टिप्पणे

जबाबदारीची सुरुवात

हिंदुस्थानने टिळक स्वराज्य फंडाला जी अपूर्व हाक दिली तीवरून तिचा असहकारितेच्या पुढाऱ्यांवर विश्वास सिद्ध होतो. ते या विश्वासाला लायक ठरतील का ? अनेकांनी औदार्याने पैसे दिले आणि सर्वांनी विचारले, फंडाची व्यवस्था काय होणार ? मी न कचरता उत्तर दिले की, प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अधिकारी जबाबदार व कसलेले लोक आहेत. जर आपल्याकडे आलेल्या पैन् पैचा हिशेब आपण योग्य रीतीने दिला नाही आणि फंडाचा उपयोग विचारपूर्वक केला नाही तर सार्वजनिक जीवनातून पुसून टाकण्यालायक आपण ठरू. अत्यंत गरीब लोकांनीसुद्धा जास्तीत जास्त पैसे दिले आहेत हे आपण लक्षात ठेवू या. अनेकांनी सर्वस्व देऊन टाकले आहे. धोबी, सुतार, लोहार, ख्रिश्चन, ज्यू, पारशी, शीख, जैन, मुसलमान व हिंदू यांनी शक्तीनुसार पैसे दिले आहेत. जेव्हा मुंबईस १६ जूनला पैसे जमविण्यास सुरुवात झाली तेव्हा साऱ्या हिंदुस्थानात ३० लाख रुपयेही जमले होते का नाही हे सांगवत नाही. मुंबई सोडून इतर प्रांत ४० लाख रुपयेहि जमवतील असा माझा पूर्ण विश्वास होता. म्हणून साऱ्या हिंदुस्थानने चौदा दिवसांत शिकस्तीचे प्रयत्न करून दररोज पाच लाखापेक्षा अधिक या हिशेबाने देणग्या दिल्या. मुंबईबाहेरील प्रांतांनी ३० जूनपर्यंत मुंबईइतक्याच मुदतीत ३८ लाख रुपये जमविले. ही कामगिरी वाईट नाही. आपण हा विश्वास कसा टिकवू शकू ? आपण बिनचूक हिशेब ठेवले पाहिजेत व ते लहान मुलालादेखील पाहता व समजता आले पाहिजेत. हे पैसे असहकारितेच्या कार्याबाहेर वापरता कामा नयेत. किंवा पुढील गोष्टींशिवाय अन्य कामाकरिता सर्वसामान्यपणे वापरता कामा नये.

(१) चरखा व खादीचा प्रसार. (२) अस्पृश्यता निवारण आणि दलित वर्गांचा उद्धार. (३) राष्ट्रीय शाळा चालविणे आणि त्या शाळांत कताई व विणाई हे शिक्षणाचे भाग असणे (४) मद्यपानबंदीच्या मोहिमेची वाढ.

या उद्देशात राष्ट्रीय सेवा चालू ठेवणे हे अंतर्भूत आहे. त्या सेवेच्या साधनद्वारावरील उद्देश आपल्याला साध्य करता येतील. वरील उद्देश साध्य करणे याचाच अर्थ स्वराज्य मिळविण्याकरिता आपली लायकी व शक्ती दाखविणे हा होय.

निरनिराळ्या कमिट्यांना मी असा इषारा देतो की, त्यांनी निधीच्या व्याजावर जगू नये. व्याजाने पैसे गुंतविणे आणि फक्त व्याजाचा उपयोग करणे याचा अर्थ राष्ट्रावरील व स्वतःवरील श्रद्धेचा अभाव व्यक्त करणे असा आहे. राष्ट्राचा विश्वास हे आपले भांडवल असले पाहिजे आणि राष्ट्राकडून वेळोवेळी मिळालेला प्रतिसाद आपले भांडवल असले पाहिजे. जर आपण राष्ट्राचे प्रतिनिधी आहोत असे म्हणत असू तर राष्ट्राकरिता स्थापलेल्या आणि चालविलेल्या संस्थांना वार्षिक पैसे मिळण्याकरिता आपण त्याच्यावर अवलंबून राहिले पाहिजे. व्याजावर जगणे म्हणजे बेजबाबदारीकडे आपण झुकत आहोत असा होतो. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत धर्माच्या नावाखाली कुजत पडलेल्या पैशाच्या साठ्यांनी, ज्या ठिकाणी भ्रष्टाचाराचा अतिरेक झाला नसेल अशा ठिकाणी त्यातील पुष्कळ धार्मिक संस्थांना ढोंगी बनविले आहे. म्हणून मागील अनुभवावरून आपल्याला शहाणे व्हावयाचे असेल तर आपण जमविलेला जवळ जवळ सारा पैसा उरलेल्या सहा महिन्यांत खर्चून टाकला पाहिजे. म्हणून जेव्हा बेझवाडयाच्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीपुढे आर्थिक कार्यक्रम मी मांडला तेव्हां त्याचे कारण आपल्याजवळ राष्ट्रीय व प्रांतिक पैशाचा व्यवहार करणारे प्रामाणिक व लायक लोक आहेत हे मला ठाऊक होते. आणि दुसरे कारण म्हणजे त्या वर्षात खर्च करण्याकरिता तेवढी रक्कम आपल्याला हवी होती. आपल्याला जर परदेशी कापडावरील बहिष्कार पुरा करावयाचा असेल तर, आपण मोकळ्या हातांनी चरखे, हातवताईचे सूत आणि खादी खरेदी केली पाहिजे. चरखा हा व्यापारी तत्त्वावर अधिष्ठित होईपर्यंत आणि प्रत्येक घरात त्याला कायमचे स्थान मिळेपर्यंत आपण स्वदेशीचा प्रचार चालू ठेवला पाहिजे. एक कोटी रुपये फार मोठ्या क्षेत्रावर विभागले गेले असल्यामुळे एवढे पैसे वर्षाअखेर खर्च करणे फारसे मोठे ठरणार नाही. माझी अशी सूचना आहे की प्रत्येक प्रांताने महिन्याअखेर स्वतःचे अंदाजपत्रक विचारपूर्वक तयार करावे व त्यात कमी किंवा अधिक खर्च करू नये. मी एक महिन्याची सूचना केली त्याचे कारण महिन्यापूर्वी प्रांतांना आपले हिशेबही पुरे करता येणार नाहीत किंवा आश्वासित रकमा जमा होणार नाहीत. त्याशिवाय पुढील महिन्यात आपण काय करावे या संबंधी निश्चित मार्गदर्शन ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडून मिळण्याकरिता आपण थांबले पाहिजे. जर आपण व्यवस्थितपणे हा कार्यक्रम पुरा करण्यात यशस्वी झालो तर, सप्टेंबरअखेर नसले तरी डिसेंबरअखेर स्वराज्य स्थापण्यात आपण अयशस्वी होणार नाही.

मुंबईचा निर्णय

मुंबईने जमा केलेल्या मोठ्या रकमांची व्यवस्था कशी करावी या प्रश्नाचा निर्णय मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीने अत्यंत चोखरीतीने व व्यापारी पद्धतीने दिला आहे. त्या ठरावातील अंमलबजावणीचा भाग मी स्मरणाने खाली देत आहे.

ज्या अर्थी जून महिन्यात अखिल भारतीय टिळक स्मारक निधीने जमा केलेला पैसा, हा फक्त प्रांतिक गरजा भागविण्याकरिता जमा केला नव्हता, पण बेझवाडा येथे जी जबाबदारी अंगावर घेतली होती ती पुरी करावी आणि मदतीची जरूरी असणाऱ्या प्रांतांच्या गरजा भागवाव्यात याकरिता जो निधी गोळा केला होता, त्या अर्थी कमिटीला असे वाटते की, या निधीची व्यवस्था व नियंत्रण एका खास कमिटीवर सोपविणे इष्ट आहे. मे. राघवजी पुरुषोत्तम, वेलजी लखमसी नपू, रेवाशंकर जगजीवन जव्हेरी, उमर सोभानी, जमनालाल बजाज, आर्देशर बरजोरजी गोदरेज, शंकरलाल बॅन्कर व लक्ष्मीदास तेरसी यांची एक कमिटी नेमली जावी व तिने पुढील अटींना अनुसरून या निधीचे नियंत्रण करावे व व्यवस्था पाहावी :

(१) प्रदेश कॉंग्रेस कमिटीने असहकारितेचा जो खर्च झाला असेल तो या फंडातून प्रथम देऊन टाकावा.

(२) ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सल्ल्यानुसार इतर प्रांतांना जी मदत करावयाची ती पुढील बाबतीत असावी. चरखा व खादीचा प्रसार, दलितवर्गांचा उद्धार, राष्ट्रीय शाळा, दुष्काळ निवारण आणि दारू बंदी.

हे आत्मसमर्पणाचे उदाहरण आहे व त्याकरिता साऱ्या देशाने मुंबई कमिटीचे हार्दिक अभिनंदन केले पाहिजे. या ठरावात जो एकच उद्देश ठळकपणे दिसतो तो म्हणजे अशा मोठ्या निधीचा कारभार शंका येणार नाही, अशा लोकांच्या हाती देणे आणि त्या कारभाराची भक्कम पायावर उभारणी करणे.

मुस्लिम बांधवांकरिता राजीनामा

आत्मसमर्पणाचे दुसरे उदाहरण मुंबईनेच घालून दिले आहे. मतपत्रिका वाटल्यानंतर वर्किंग कमिटीने मुस्लिम प्रतिनिधित्वाकरिता सल्ला दिला. निवडणुकीच्या निकालावरून असे दिसले की, फक्त एकच मुसलमान निवडून आला आणि तो म्हणजे उमर सोभानी. ते मुसलमान हितसंबंधाचे खास प्रतिनिधित्व करतात असे बिलकूल म्हणता येत नाही. ते सार्वजनिक कार्यकर्ते म्हणून चांगले प्रसिद्ध आहेत. त्यांना निव्वळ मुसलमानांचे प्रतिनिधी म्हणून म्हणता येत नाही. शिवाय मुंबईतून ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीवर निदान दोन मुस्लिम सभासद निवडून जाणे आवश्यक होते. मि. विठ्ठलदास जेराजानी यांनी मुसलमान प्रतिनिधीकरिता आपली जागा खाली केली. अशा भ्रातृत्वाच्या आणि सार्वजनिक वृत्तीच्या उदाहरणावरून स्वराज्य जवळ येत आहे असे मला वाटू लागते.

आपण त्यापासून पळून जाऊ की काय एवढाच त्यात धोका आहे. माझ्या मताने हे उदाहरण, वर्किंग कमिटीच्या सल्ल्याचे शहाणपण सिद्ध करते. तो सल्ला ऐनवेळी आला आणि त्याने आपल्याला सावध केले व आपली अब्रू राखली. वर्किंग कमिटीने आपल्याला अशी ताकीद दिली की, आपण खास व नाजूक हितसंबंधाकडे दुर्लक्ष करू नये. जेथे जेथे मुसलमानांच्या थंडपणाविषयी यत्किंचित शंका असेल तेथे तेथे मुसलमानांना थंड राहण्याकरिता, किंवा उदासीन राहण्याकरिता, किंवा साशंक होण्याकरिता हिंदूंनी यत्किंचित सबब देऊ नये हे त्यांचे कर्तव्य आहे. आणि जो न्याय हिंदू व मुसलमानांना लागू आहे तोच न्याय इतर जातींच्या प्रश्नांना जातीजातींमध्ये लागू आहे. हितसंबंधी लोक जितके दुर्बल असतील तितके बालिष्ठ पक्षानी त्यांच्यासंबंधी अधिक आस्थेवाईक असले पाहिजे. तसे झाल्यास जातीजातींतील भेद केव्हाच नाहीसे होतील.

हा भंग आहे काय ?

मी नेमस्तांना मद्यपानाच्या[1] मोहिमेत सहकार्याकरिता विनंती केली आणि त्यांना खास करून मी मद्यपान बंदीचा कायदा करण्यास प्रत्यक्ष सांगितले, याकरिता मी काँग्रेसच्या ठरावाचा भंग केला असा मित्रांनी माझ्याविषयी संशय व्यक्त केला. एका मित्राने मला विचारले, “ ज्या कौन्सिलवर आपण बहिष्कार घातला त्यांची मदत आपण का मागावी ? त्याचा अर्थ तुमच्या पूर्वीच्या वृत्तीत तुम्ही बदल केला आहे असा होत नाही काय ? ” तसे होत नाही असे माझे म्हणणे आहे. आव्हान आणि अर्ज यात फारच अंतर आहे. मी जर असहाय्य होऊन विनंती केली असती तर तो काँग्रेसच्या ठरावाचा भंग झाला असता आणि माझ्या स्वतःच्या वृत्तीतला बदल ठरला असता. जेव्हा मी नेमस्तांना सौम्य भाषेत त्यांचे कर्तव्य करण्यास सांगतो आणि तुम्ही लोकांचे प्रतिनिधी आहात असा जो दावा सांगता तो सिद्ध करा असे सांगतो तेव्हा आम्ही आमची भूमिका अधिक बळकट करतो. आम्ही जे जे काय करीत आहोत त्यांत नेमस्तांना आणि सरकारला सहकारितेकरिता बोलाविणे यात काहीच चूक वाटत नाही. नेमस्तांना किंवा सरकारलादेखील त्यांच्या अधिकृत मार्गाने पुढील गोष्टीत विनंती करण्यात मला काही चूक दिसत नाही. खिलाफत आणि पंजाबच्या बाबतीत आम्हांला मदत करा किंवा सारी दारूची दुकाने बंद करा किंवा त्यांच्या शाळांवर चरख्यांची खूण करा किंवा जनमताची शक्ती ओळखा आणि परदेशी कापडाची आयात कायद्याने बंद करा, ह्या त्या बाबी आहेत. कारण ह्या गोष्टी करण्यात ते यशस्वी झाले तर ज्या संस्थेला ते पूज्य मानतात किंवा जी संस्था ते चालवितात तिच्यासंबंधी वाईट विचार मी मनात आणणार नाही. जनतेचा आदर अंशतः पुन्हा स्थापित करण्याकरिता मी त्यांना

१. पाहा. “ नेमस्तांना ”. ८-६-१९२१.

विनंती करून एक मार्ग दाखविला आहे आणि माझ्याजवळ आणि देशाजवळ माझी विनंती जर निष्फळ ठरली तर असे एक आणखी परिणामकारक साधन मी संपादित केले आहे की, ज्यामुळे या पद्धतीचा निर्जीवपणा मला दाखविता येईल. मी जी विनंती केली आहे ती त्या पद्धतीचा मी एक अवयव आहे या दृष्टीने केली नसून एक परका म्हणून केली आहे.

पिकेटिंगबद्दल

इंडियन सोशल रिफॉर्मरने जोरदार शैलीत निरोधनाच्या उपयुक्ततेबद्दल तक्रार केली आहे. त्यांच्या युक्तिवादाच्या तपासणीत न शिरता मी जर फक्त माझे विचार व अनुभव मांडले तर त्याकरिता कमी जागा अडवू शकेन. निरोधन हे मूलतः तात्पुरतेच असले पाहिजे. पण ते औषधात उत्तेजक जे असते तशासारखे आहे. मद्यपान हा दुर्गुणाऐवजी एक रोगच आहे. मला कित्येक माणसे ठाऊक आहेत की, जी शक्य झाल्यास दारू आनंदाने सोडून देण्यास तयार आहेत. मला काही जण ठाऊक आहेत की, जे आमच्यापासून हा मोह बाजूला ठेवा असे सांगतात. त्यांच्या सांगण्यावरून हा मोह बाजूला ठेवला तरी ते चोरून दारू पितात हे मला ठाऊक आहे. तो मोह काढून टाकला यात काही चुकले असे मला त्यामुळे वाटत नाही. रोगी माणसांना त्यांच्या इच्छे विरुद्ध मदत केली पाहिजे. जर माझा एक मुलगा जुगारीच्या व्यसनात सापडला असला आणि जर जुगार खेळणारे लोक माझ्या मुलाला मोह पाडण्याकरिता त्याच्या बोकांडी बसले तर मला एक तर त्या लोकांना अत्याचाराने खाली पाडावे लागेल किंवा माझ्या मुलाला तिकडे जाण्यात लाज वाटावी म्हणून त्याच्या अड्डयावर पाहारेकरी नेमावे लागतील. माझ्या जागेपासून दूर अंतरावर जुगारीचे दुसरे अड्डे आहेत हे खरे आहे. तथापि मी असे समजतो की, त्या अड्डयांच्या दाराशी पाहारेकरी ठेवण्यात मी बरोबर गोष्ट केली असे समजले जाईल. माझ्या मुलाला जुगार खेळणे मी कठीण केलेच पाहिजे. जर रिफॉर्मला सरकारी मद्यपान बंदीचा सिद्धांत मान्य असेल तर त्याने निरोधनाचा उपसिद्धांत मान्य केलाच पाहिजे. जोपर्यंत जनमताच्याविरुद्ध सरकार हा जुलूम करीत राहील तो पर्यंत तो उपसिद्धांत मानलाच पाहिजे. जर सरकारने उदाहरणार्थ प्रत्येक रस्त्यावर वेश्यांकरीत राजवाडे बांधले आणि त्यांना आपला धंदा चालविण्याकरिता परवाने दिले तर लोकांनी काय करावे ? पापाच्या वस्तीचे हे राजवाडे जर लोकांनी नष्ट केले नाहीत, तर त्या जागा दूषित समजून वेढणे हे त्याचे कर्तव्य ठरणार नाही काय ? तसेच त्याच्यावर लादलेल्या ह्या मोहाला सहजासहजी बळी न पडण्याचा धोक्याचा लोकांना इषारा देणे, हे त्यांचे कर्तव्य नाही काय ? निरोधकं म्हणून चारित्र्य संपन्न स्त्री-पुरुषांचा उपयोग करण्याची आवश्यकता मला पटते. त्याचप्रमाणे लोकमताची पर्वा न करता, जे दारू पिण्याचा आग्रह धरीत असतील त्यांचे अत्याचारापासून रक्षण करणे जरुर आहे हेही मला पटते. जेव्हा सरकारची मदत मिळत नाही तेव्हा नाग-

रिकाला निरोधन कर्तव्य म्हणून केलेच पाहिजे. पोलिसांची फौज ही तरी चोरांच्याविरुद्ध निरोधनच करीत नसते काय ? जेव्हा एखादा चोर दुसऱ्याच्या घरात घुसण्याचा मानस दाखवितो, तेव्हा पोलिस बंदूक सरसावतात. जेव्हा एखादा निरोधक आपल्या दुर्बल बांधवाला मद्यपानाच्या व्यसनातील धोक्याचा इषारा देतो, तेव्हा तो त्याच्यावर शरमेचे म्हणजेच प्रेमाचे दडपण आणतो. रिफॉर्मरने निरोधनाला असे काही गुण चिकटविले आहेत की, जे स्वतःतर्फे निरोधकांनी कधीही मानले नाही.

धारवाडमधील अत्याचार

जर क्रॉनिकलला काँग्रेस कमिटीने पाठविलेली तार विश्वासार्ह मानावयाची असेल तर यात काहीच शंका नाही की, कोणी तरी अनधिकारी पोलिस अधिकारी घाबरला आणि त्याने निःशस्त्र जमावावर गोळीबार करण्याचा हुकूम दिला. दारू दुकाने एक-सारखी उघडी ठेवणे हा जनमताचा उघड व अनैतिक अपमान आहे. जणू काय सरकारने जनतेला दारू पुरविलीच पाहिजे, हा तिचा हक्कच आहे असे त्यात गृहीत धरले आहे. जे मरण पावले त्यांच्या कुटुंबांचे मी फक्त अभिनंदनच करू शकतो. लोकांनी जर कदाचित शक्तीचा क्षुल्लक देखावा केला असेल तर त्याबद्दल मला वाईट वाटते. पण सोपीव खात्याचे जे हिंदी मंत्री आहेत त्यांना मी आदरपूर्वक असा इषारा देतो की, जर त्यांनी देशाला गाठणाऱ्या गंभीर परिस्थितीला धैर्याने तोंड दिले नाही आणि प्रत्येक दारू दुकान ताबडतोब बंद केले नाही व गरीब परवानेवाल्यांनी आगाऊ दिलेले पैसे परत केले नाहीत तर ते ज्या मोठ्या पक्षाचे आपण आहोत असे म्हणवितात त्या पक्षाची परंपरा ते खोटी ठरवतील. या दुहेरी शापित व्यापारापासून अनीतीने मिळविलेला कर बुडाला, म्हणून त्यांना घाबरण्याचे कारण नाही. जागृत व क्षुब्ध जनशक्तीपुढे तो व्यापार टिकूच शकणार नाही. अनैतिक मार्गाने मिळविलेल्या करावर शिक्षण चालविणे हे वाईटच आहे. जेव्हा ते शिक्षण निरपराधी लोकांच्या रक्ताने लांछित होईल तेव्हा त्याची आपल्याला लवकरच घाण येऊ लागेल. फार उशीर होण्यापूर्वी मंत्र्यांनी सावधगिरीच्या इषाऱ्याची दखल घ्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे. काळाची पावले ओळखण्यास केवळ कराच्या उत्पन्नाकरिता ते निष्ठुरपणे उदासीन राहिले, असे त्यांच्याविषयी म्हटले जाऊ नये. त्यांनी तासभरही उशीर लावू नये, मग आठवड्यांची गोष्ट कशाला ? दारूपासून येणारे उत्पन्न सोडण्यापूर्वी, उत्पन्नाचे इतर मार्ग शोधण्याच्या पद्धती आम्ही हुडकून काढीत आहोत व तेवढ्याकरिता थांबत आहोत असे सांगणे चूक आहे. दुसरे घर तयार होईपर्यंत प्लेगाने दूषित झालेले घर मी सोडणार नाही असे म्हणणाऱ्या माणसाप्रमाणेच हे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत बहुतेक लोक पहिल्यांदा घर सोडतील आणि दुसरे बिगरदूषित घर पाहतील.

एक शूर शीख

सरदार शार्दूलसिंग हे मला नेहमीच एक अत्यंत शूर असे असहकारितावादी दिसत आले आहेत. त्यांची संस्कृती श्रेष्ठ आहे व ते अत्यंत अब्रूदार गृहस्थ आहेत. अनत्याचारी असहकारितेवर त्यांची विचारपूर्वक श्रद्धा आहे. ते कट्टर राष्ट्रवादी आहेत. त्यांचे शीखांच्या सिद्धांतावर प्राणाइतकेच प्रेम आहे. पण ते राष्ट्रीयत्वावर तितकेच प्रेम करतात. प्रत्येक बाबतीत अहिंसा हे ती अखेरची मानीत नाहीत. पण हिंदुस्थानच्या मुक्ततेकरिता सध्याचा धर्म अहिंसा हाच आहे असे ते अलीबंधूंप्रमाणे मानतात. ते तो धर्म अलीबंधूच्याप्रमाणे सन्मानाने पाळतात असेही म्हणणे जास्त होईल. त्यांचा पाच वर्षे हद्दपार करण्यापलीकडे दुसरा या सरकारला उपयोग नाही. ते अत्यंत शूर आहेत, अत्यंत प्रामाणिक आहेत आणि म्हणून पंजाब सरकारला न झेपण्याइतके वजनदार आहेत. त्याकरिताच त्यांना बाजूला सारले आहे. माझी खात्री आहे की, त्यांच्या शिक्षेमुळे देशाची फार मोठी सेवा होत आहे. इतके लोक आनंदाने तुरुंगात जातात आणि जनता शांत राहते व शरण न जाता प्रतिष्ठितपणे वावरते हे शौर्याचे व आत्मसंयमनाचे अद्‌भुत दृश्य सर्व देशभर दिसत आहे. सरदार शार्दूलसिंग यांच्या तुरुंगवासामुळे शीखांना व इतर पंजाबी लोकांना असहकारितेकरिता अधिक प्रयत्न करावे म्हणून स्फूर्ती मिळेल असे मला वाटते. सरदार शार्दूलसिंग आणि इतर लोक जे मातृभूमीकरिता क्लेश भोगीत आहेत त्यांना मी धन्यवाद देतो.

युवराजांची नियोजित भेट

युवराजांच्या भेटीची बोलणी पुन्हा सुरू झाली आहेत आणि तात्पुरती तारीख ठरविली आहे, ही खेदाची गोष्ट आहे. हिंदुस्थानला ज्या राज्यपद्धतीचा अत्यंत वीट आला आहे, त्या पद्धतीच्या प्रतिनिधीचे हिंदुस्थान स्वागत करणार नाही. आणि जर नाखूष हिंदुस्थानवर ही भेट लादली तर ड्यूक ह्यांच्या भेटीच्या वेळी जसा परिणामकारक हरताळ पडला तसाच युवराजांच्या भेटीच्या वेळीही पाडला पाहिजे. व्यक्ती या दृष्टीने युवराजांच्याविरुद्ध असहकारितावाद्यांचे काही गाऱ्हाणे नाही. असे असहकारितावादी म्हणून मी पुन्हा एकदा सांगतो. पण ज्या स्थानावर ते आहेत, त्या स्थानापासून त्यांना निराळे करता येत नाही. हे खरे आहे की, राजे व त्यांचे वंशज हे राज्याच्या कारभारात प्रत्यक्ष हस्तक्षेप करीत नाहीत. (राज्याला ते सोयीचे असते). तथापि अत्यंत लुडबूड करणाऱ्या पंतप्रधान किंवा व्हाइसरॉयइतकाच सरकारच्या विद्यमान पद्धतीचा तो प्रभावी प्रतिनिधी आहे. मला असेही वाटते की, या संस्थेचा आधारस्तंभ म्हणून तो अलग राहिल्यामुळेच तो अधिक परिणामकारक आहे. जर युवराज आलेच तर ते असहकारितावाद्यांना किंवा त्यांच्या कार्याला आशीर्वाद देण्याकरिता येणार नाहीत. ते सरकारची स्तुतिस्तोत्रे गाण्याकरिता येतील. हे सरकार पंजाबच्या अपमानाकरिता, मुसलमानांच्या विश्वासघाता-

करिता, दारूचा व्यापार हिंदुस्थानवर लादण्याकरिता, हिंदुस्थानला दरिद्री करण्याकरिता आणि आपण अनंत कालपर्यंत गुलामगिरीत राहिलो पाहिजे असे जवळजवळ वाटण्याइतके त्यांना पौरुषहीन करण्याकरिता जबाबदार आहे. माझ्या नम्र मताने ती नियोजित भेट म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखी आहे. जी राज्यपद्धती कोसळण्याच्या अवस्थेत आहे तिला आधार देण्याकरिता जे जे असे प्रयत्न होतील त्यासंबंधी तीव्र नापसंती व्यक्त करणे हे प्रत्येक असहकारितावाद्यांचे कर्तव्य आहे. ते कर्तव्य त्याने आदराने पण भक्कमपणाने आणि चुकीचा समज होणार नाही अशा पद्धतीने बजाविले पाहिजे.

१५६. सुंदर मुंबई

मुंबई जी सुंदर आहे, त्याचे कारण तेथे मोठाल्या इमारती आहेत हे नाही. बहुतेक इमारती ओंगळ आहेत व त्या दारिद्र्य व घाण झाकून ठेवीत असतात. मुंबईच्या सौंदर्याचे कारण संपत्ती हेही नाही कारण त्यातील बहुतेक संपत्ती लोकांच्या रक्तातून शोषलेली असते पण मुंबईच्या सौंदार्याचे कारण त्यांचे जगप्रसिद्ध औदार्य पारशांनी त्या औदार्याला वळण दिले आणि मुंबईने आपला हा लौकिक सतत टिकविला. मुंबईच्या धर्मादायाने तिची असंख्य पापे दडवून ठेवली आहेत. टिळक स्वराज्य फंडाच्या बाबतीत मुंबईने आपला पूर्वीचा उच्चांक मोडला आहे. सोळा आणि तीस जूनच्या दरम्यान मुंबईने दररोज अडीच लाखांच्या हिशेबाने वर्गण्या दिल्या. मुंबईने हिंदुस्थानला आपले वचन पाळण्यास समर्थ केले. चित्तरंजनदास हे बंगालपर्यंत मुंबईनेही साथ पोहोचविली, हा मुंबईचा मानाचा हक्क कबूल करतील असे मला वाटते आणि मुंबईला संकटातून सोडविणारे होऊ दिले. कारण जर बंगालने ३ लाखांवरून २५ लाखांवर उडी मारली नसती आणि मुंबईच्या निवडक कार्यकर्त्यांच्या श्रमाला यश आले नसते तर हिंदुस्थानला एक कोटी रुपये जमविण्यात यश आले नसते. म्हणून मुंबईचे सौंदर्य धर्मादायामुळे आहे.

सभासदसंख्येचे किंवा चालू असलेल्या चरख्यांचे आकडे अद्याप हाती आले नाहीत. पण जमा झालेली रक्कम हिंदुस्थानच्या निर्धाराचे अत्यंत दृष्टीस पडण्यासारखे लक्षण होते.

कैलासवासी लोकमान्यांना हिंदुस्थानने जो मान दिला, तसा मान त्याने दुसऱ्या कोणत्याही हिंदुस्थानच्या पुत्राला दिला नाही. पण जे एक कोटी रुपये आपण जमविले

ते ज्या दिवंगत पुढाऱ्याचे स्मारक आपण उभारणार आहोत ते एक कोटी रुपये त्या स्मारकाचा पाया आहे. स्वराज्य हा त्याचा मुकुट आहे. स्वराज्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही स्मारकाने इतक्या मोठ्या माणसाच्या स्मृतीला आदर दर्शविता येणार नाही.

तथापि आपण स्वतःची फसवणूक करून घेता कामा नये. स्मारकाच्या ठरावातील वृत्तीला जर आपल्याला प्रामाणिक राहावयाचे असेल तर प्रत्येक प्रांताने आणि प्रत्येक जिल्ह्याने आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात पैसे जमा केले पाहिजेत. प्रत्येक माणसाने दोन पैसे देणे म्हणजे सामान्य स्त्रीपुरुषांच्या शक्तीबाहेरची गोष्ट नाही. प्रत्येक प्रांत शक्य तितक्य लवकर आपला हिस्सा पुरा करण्याकरिता झटेल अशी मला आशा आहे. निधी हा प्रवासातील मैलाचा दगड आहे. एक कोटी रुपये आपल्याला स्वराज्य देऊ शकणार नाही. किंवा साऱ्या जगाची संपत्ती हीही आपल्याला स्वराज्य देऊ शकणार नाही. सर्वतोपरी स्वतंत्र होण्यापूर्वी आपण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले पाहिजे ज्या माणसावर उपाशी राहण्याची सक्ती केली जाते, तो देवाची प्रार्थना करील अशी अपेक्षा करू नये. भुकेलेला माणूस आत्माही विकून टाकील. त्याला राखण्यास आत्माही नसतो. म्हणून हिंदुस्थानला स्वातंत्र्याचा विचार करण्यापूर्वी आपण आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहोत असे वाटलेच पाहिजे आणि जोपर्यंत हिंदुस्थान जवळजवळ पूर्णपणे आपल्या कापडाकरिता परदेशी बाजार पेठावर अवलंबून आहे, तोपर्यंत त्याला तसे वाटणार नाही जो आपल्या प्राणवायूकरिता पंपावर अवलंबून असतो तो मरणोन्मुखच असतो. हिंदुस्थान मरणाच्या अवस्थेत आहे यात काय आश्चर्य! म्हणून जर आपल्याला चालू वर्षात स्वराज्य मिळवावयाचे असेल तर आपल्याला परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार घातला पाहिजे. म्हणून आपल्याजवळ असलेला पैसा शक्य तितक्या खादी उत्पत्तीकरिता खर्च केला पाहिजे. ती खादी हात-सुताची हात-मागावर विणलेली असावी. प्रत्येक प्रान्तात तेंच मुख्य काम असले पाहिजे. आपल्या गिरण्यांत तयार होणारे कापड आपण तपासले पाहिजे आणि गिरणी मालकांना राष्ट्राच्या गरजेनुसार आपले उत्पादन व आपले नफे हे नियमित करण्यास सांगितले पाहिजे. ज्या गरिबातल्या गरीब लोकांपर्यंत तूर्त आपण पोहोचू शकत नाही, त्यांच्याकरिता गिरणीचे कापड राखून ठेवले पाहिजे.

आता जी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक भरणार आहे तिने या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि इच्छित बहिष्कार घडवून आणण्याकरिता कार्यक्रम ठरविला पाहिजे.

पण काही असले तरी मुंबईने ज्याप्रमाणे आर्थिक बोजाचा मोठा भाग उचलला, त्याप्रमाणे तिने मुख्यत्वेकरून बहिष्काराचा बोजा उचलला पाहिजे. मुंबईच्या ताब्यात हिंदुस्थानचा कापड-बाजार आहे. मुंबईच लॅन्केशायर व जपानहून कापड आयात करते. म्हणून जी मुंबई सूत आणि कापड यांची आयात करते तिच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. जर बहिष्कार यशस्वी करावयाचा असेल तर लोकांनी देशाकरिता मोठा त्याग

करावयास तयार असले पाहिजे. गिरणी मालकांनाही काही एक कर्तव्य करावयाचे आहे. त्यांनी सपाटून नफे मिळविले आहेत. त्यांना बहिष्काराच्या चळवळीला परिणामकारक रीतीने मदत करणे अत्यंत सोपे आहे. याचाच अर्थ राष्ट्रीय जीवनावरील त्यांच्या दृष्टिकोणाची फेरतपासणी. गिरणी कामगारांनाही देशाच्याविषयी काही कर्तव्य आहे. आतापर्यंत त्यांचे लक्ष त्यांच्या स्वतःच्या पगाराकडेच होते. आता त्यांनी सार्वजनिक हिताची जाणीव बाळगण्यास शिकले पाहिजे. शेवटी दुर्दैवी जनता येते. तिला किंमती ठरविताना कोणी विचारीत नाही. आणि तिला गिरणी मालक व दलाल सांगतील ती किंमत द्यावी लागते. बहिष्काराचा प्रश्न सोडून दिला तरी ही परिस्थिती अत्यंत असमाधानकारक आहे. देशात दुष्काळ आ वासून उभा आहे. राष्ट्राच्या कल्याणाकडे लक्ष न देता, स्वतःच्या उत्कर्षाकडेच लक्ष देणे या गोष्टीऐवजी आपण सर्वांच्या कल्याणाचा विचार करणे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. सुंदर मुंबईला सुवर्णसंधी मिळाली आहे. तिने एक तर त्या सौंदर्यात भर घालावी किंवा जवळ असलेले सर्व घालवून टाकावे.

'यंग इंडिया', ६-७-१९२१

१५७. गिरणी मालकांना प्रार्थना

जुलै ६, १९२१

गिरणी मालक यांस,

सभ्यगृहस्थहो,

कदाचित तुमचा असहकारितेच्या चळवळीवर विश्वास नसेल. तिचा शेवट अत्याचारातच होईल असे तुमच्यापैकी काहींना वाटते हे मला ठाऊक आहे. पण त्याचा अर्थ जे सरकार सत्ता सोडू इच्छित नाही, ते अत्याचार करील असा असेल तर तुमचे म्हणणे बरोबर आहे. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे धारवाडचे. अर्थातच कॉंग्रेस सेक्रेटरीचा अहवाल विश्वासार्ह मानला तर तुमच्यापैकी काहींना वाटते की, ही चळवळ यशस्वी होवो अथवा न होवो, ती देशाचे नुकसानच करणार आहे. तूर्त तुम्ही आपल्या मनातून अनत्याचार काढून टाका असे मी सांगतो. सध्या परदेशी कापडाच्या बहिष्काराकरिता जी चळवळ तीव्र करण्यात येत आहे तिचा तुम्ही अभ्यास करा असे आग्रहाने

मी सांगतो. जेव्हा मी बंगालला जातो तेव्हा बंगाली लोक नेहमी असे सांगतात की, फाळणीविरुद्ध[1] चळवळ चालू होती तेव्हा गिरणीमालकांनी आम्हांला मदत केली नाही; एवढेच नव्हे तर किंमती चढवून, खोटी मापे देऊन आम्हांला फसविले, एवढेच नव्हे तर स्वदेशीच्या नावाखाली परदेशी कापड आमच्या पदरात बांधून अत्यंत घाणेरडे वर्तन केले. या आरोपात सत्य किती हे मला ठाऊक नाही. पण जर ते खरे असेल तर गिरणी मालकांना ते श्रेयस्कर नाही.

देशावर जे महान संकट आले आहे त्या वेळी तुम्ही कोणता मार्ग स्वीकारला याविषयी मला शंका नसती तर मी या आरोपांची तुम्हांला आठवण करून दिली नसती. राष्ट्राने तुमच्यापासून कसलीच अपेक्षा बाळगू नये असे पुष्कळ मित्र मला सांगतात. एकदोन अपवाद सोडल्यास तुम्ही स्वराज्य फंडाला काही दिले नाही या गोष्टीकडे ते बोट दाखवितात. जेथे सदसद्विवेक बुद्धीची हरकत नसेल तेथे तुमच्या नकाराचे समर्थन मी लाजाळूपणा किंवा भित्रेपणा या कारणाने केलेला आहे. जेव्हा तुमची अत्यंत मदत लागेल त्या वेळीं व्यापारी माणसे म्हणून तुम्ही देशाला मदत करणार नाही असा विचार मला करवत नाही. तथापि जे व्यापारी परदेशी कापडाचा व्यापार करतात आणि ज्यांना मी देशातील भावना ओळखून, परदेशी कापडाचा व्यापार बंद करावा अशी विनंती करीत आहे, ते मला पुढील गोष्ट सांगून भिवतीत आहेत. ते म्हणतात, आम्ही हे म्हणणे ऐकले तर तुम्ही एकदम किंमती चढवाल आणि वाढलेल्या किंमतीच्या समर्थनार्थ राष्ट्राच्या तोंडावर मागणी व पुरवठ्याचा सिद्धांत फेकून द्याल आणि अशा प्रकारे सध्यापेक्षा परिस्थिती अधिक बिकट कराल. ते मला सांगतात की, आम्ही परदेशी कापडाचा व्यापार आनंदाने सोडून देऊ. पण त्याकरिता त्यांना असे आश्वासन पाहिजे की, तुम्ही मागणी आणि पुरवठ्याच्या सिद्धांताकडे दुर्लक्ष कराल आणि किंमती न वाढविणे हे तुमचे कर्तव्य समजाल. तुमच्यापैकी काही लोकांनी मला असे सांगितले की, १९१९ साली जरी तुम्ही किंमती चढविल्या नाहीत तरी ग्राहकांचा फायदा न होता दलालांनीच लोकांना खाऊन टाकले असते. तुम्ही व्यापारी लोक खरोखर मोठे बुद्धिवान आहात व असा युक्तिवाद तुम्हांला शोभत नाही. तयार झालेला माल गिऱ्हाइकाकडे पोहोचेपर्यंत त्याच्या हालचाली कशा ताब्यात ठेवाव्या हे तुम्हांला कळते. तुमच्या धंद्यात थोडीशी राष्ट्रीय वृत्ती तुम्हांला आणली पाहिजे.

तुम्ही मोठे दानशूर व्हा असे माझे म्हणणे नाही. पण जर धंद्याबरोबर दातृत्व तुम्ही एकत्रित केलेत तर काहीही बिघडणार नाही. तुम्ही आपला धंदा निव्वळ स्वार्थाच्या दृष्टीने न करता राष्ट्रीय दृष्टीने करावा अशीच मी तुम्हांला विनंती करतो. एखादा

१. १९०५ च्या सुमारास ही चळवळ चालू होती.

मनुष्य राष्ट्राचा, स्वतःचा आणि भागीदारांचाही विचार करतो एवढ्यावरून तो व्यापारी पेशाचा नाही असे म्हणता येत नाही. म्हणून मी तुम्हांला तुमच्या असहकारितेच्या संबंधी विचारांना बाधा येऊ न देता असे सांगेन की, तुम्ही एक आश्वासन द्या. त्या आश्वासनात असे म्हणा की, परदेशी मालावरील सुचविलेल्या बहिष्कारामुळे जी मागणीत वाढ होणार आहे तेवढ्याकरिता व्यापाऱ्यांनी किंवा ग्राहकांनी तुमच्या कापडाच्या किंमती वाढतील अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. कमीत कमी येवढ्या गोष्टीची तुमच्यापासून अपेक्षा बाळगण्याचा राष्ट्राला हक्क आहे.

तुमचा विश्वासू मित्र
एम्. के. गांधी

'मुंबई क्रॉनिकल', ६-७-१९२१

१५८. सी. राजगोपालाचारी व एस्. श्रीनिवास अय्यंगार यांना तार[१]

[६ जुलै, १९२१ रोजी किंवा नंतर.]

ऑल इंडिया कमिटी बैठक इतर जरूरीच्या गोष्टी समोर आहेत. ऑगस्टपूर्वी दोन आठवडे अशक्य आहे.

फोटोस्टॅटवरून एस. एन्. ७५६२

१. सी. राजगोपालाचारी व एस्. श्रीनिवास अय्यंगार यांनी ६ जुलैला मद्रासहून पुढील तार पाठविली : " मुंबईचे काम सुरू केल्यानंतर लवकरच दोन आठवड्याकरिता दौऱ्यावर आलेच पाहिजे. त्या तारेला हे उत्तर आहे.

१५९. महादेव देसाईला पत्र

बुधवार [६ जुलै १९२१ रोजी किंवा नंतर][1]

चि. महादेव यास,

काल तुझे पत्र मिळाले. तू जे म्हणालास ते निश्चितच मला समजले. पण मी दोहोपैकी कोणत्याही बाबतीत चुकीचा अर्थ लावला नाही. किंवा तसे करण्याचा कलही दाखविला नाही. हे अगदी सत्य आहे की, जेव्हा कोणत्याही विधानाचे दोन अर्थ होऊ शकतात, तेव्हा जो अर्थ आपल्याला प्रतिकूल असेल तो अर्थ स्वीकारणे चांगले. पण त्या दोन उदाहरणांत ही अडचण नव्हती. ती अडचण मी सांगितली ती होती. पंचवीस लाख असे वाचण्यात आपल्याला खास अधिक अनुकूल असे काही नव्हते. कारण या रकमेशिवायदेखील एक कोटीची भरपाई झाली होती. आणि शेवटचे पत्र लिहिल्यानंतर तशी तार खरोखर आली होती. त्याने एक लाख चरख्यांची देणगी दिलेली असो किंवा कमी किंमतीत ते दिलेले असोत आपल्या कार्यात फरक पडणार नाही. सध्यादेखील एक लाख चरख्यांसंबंधीच्या वाक्याचा अर्थ दुसरा काही असेल असा माझा समज नाही. त्या वाक्याचा अर्थ कोणता हे ठरविण्याकरिता अधीरपणा होत आहे हे खरे आहे. पण अधीरपणा हेही आपल्या आसक्तीचे लक्षण आहे. आणि आसक्तीमुळेच चुका निर्माण होतात. जो मनुष्य आसक्तीतून मुक्त आहे त्याला चिंतन करण्यास वेळ सापडतो. आणि तो असा अर्थ लावतो की, ज्यामुळे दुसऱ्या पक्षाचा बचाव होतो. जर तो सत्यनिष्ठ असेल तर मी म्हटल्याप्रमाणे बातमीदाराच्या अर्थाचे अनुमान बिनचूक रीतीने करील.

तुझ्याबद्दल जे काय म्हटले ते मी वाचले. जी घडली ती खेदजनक गोष्ट आपण चुका कशा करतो हे उघड आहे. त्याला योग्य प्रायश्चित्त म्हणजे ती वस्तू पुन्हा केव्हाही न खाणे. पण माझी सूचना अशी आहे की, प्रत्येक एकादशीला ८० तोळ्याचे एक शेर गरम दूध घ्यावे व दुसरे काही घेऊ नये. फळ किंवा साखरसुद्धा वर्ज्य करावी

१. पंचवीस लाखाच्या उल्लेखावरून असे दिसेल की हे पत्र ३० जूननंतर येणाऱ्या बुधवारी किंवा त्यानंतर म्हणजे ता. ६ जुलैला लिहिले असावे. पाहा, "नवजीवनला तार." जुलै १, १९२१.

हे दूध एकदा न घेता दोन तीन वेळा घ्यावे. पुढील एकादशीपासून वर्षभर असे करीत रहा.

श्री. राजचंद्राचे लेख वाच व त्यावर विचार कर. तुळशीदासजींची मणिरत्नमाला वाच आणि तीवर विचार कर. भर्तृहरीचे वैराग्यशतक वाच आणि त्यावर विचार कर. योगवासिष्ठातील वैराग्यावरील अध्याय अत्यंत काळजीपूर्वक वाच.

तासापेक्षा कमी वेळ दररोज सूत कातू नकोस. हा यज्ञ तुझ्यातील अस्वच्छता धुवून टाकील या विचारावर मन केंद्रित कर. प्रवास आणि आजारीपण सोडून हेही वर्षभर करीत राहा.

सकाळचे सर्व काम यानंतर कर. सकाळी उठल्यानंतर दात घासून झाले आणि शौचाला जाऊन आलास म्हणजे जर तुला प्रेरणा झाली तर आश्रमात असल्यास प्रार्थना कर आणि नंतर वर सांगितल्याप्रमाणे अर्धा तास वाचन कर. त्यानंतर तासभर सूत कात. बाकीच्या साऱ्या गोष्टी खोळंबून ठेव.

एक वर्षपर्यंत नऊपूर्वी झोपत जा आणि चारानंतर अंथरुणात पडून राहू नकोस. आजारी पडलास तर हे सर्व बदल. हे सर्व प्रायश्चित्त घेण्यास मी तुला सांगत असताना तुझे स्खलन मी फुगवीत नाही किंवा कमी करीत नाही. यातून कोणतीही बाब बगळावीशी वाटल्यास तू ती बगळ. लाजेमुळे कंताई टाकू नकोस. सार्वजनिक सेवेची अशी कोणतीही भावना किंवा विचार नऊ वाजता झोपण्याच्या आड येऊ देऊ नकोस. तुझ्या वाटेत "इंडिपेंडंट" येऊ देऊ नकोस. दैनिकाकरिता लिहिणारांने रात्री जागले पाहिजे असे नाही. पण काहीही असले तरी ते पत्र चालविण्याची आपली योजना आहे तिला तू अशी गोष्ट करावीस याची जरूरी नाही.

वर जी दीड तासाची आखणी केली आहे तो मौनाचा वेळ आहे हे लक्षात ठेव. देवदासने तुझे हे पत्र वाचण्यास अगदी सहज सुरुवात केली. त्याला त्यात काय असेल याची माहिती नव्हती. आणि नंतर मला त्याला थांबविणे योग्य वाटले नाही.

तू न येण्याची जी कारणे दिली आहेस ती सयुक्तिक आहेत आणि म्हणून तू येऊ नकोस. पंडितजींनी तुला बोलावणे पाठविले किंवा जोसेफने तुला जाण्यास सांगितले आणि तू आलास तर ती गोष्ट वेगळी. तू न आलास तरी चालेल; पण तू आला असतास तर बरे वाटले असते.

जरी मी तुझी चूक पाहिली तरी तीमुळे माझे तुझ्यावरील प्रेम कमी झाले आहे असे वाटून घेऊ नकोस. जर मी परिपूर्ण असतो तर माझ्यात उणिवेला जागाच नसती. मुक्तीकरिता झटणारा मी एक अपूर्ण गृहस्थ असल्यामुळे मी दुसऱ्यांच्या चुका फुगविल्या असल्या तर मी माझीच अपूर्णता वाढविली असती.

मी असे सुचविले आहे की, तू दररोज आपल्या चुकांची उजळणी कर; पण खिन्नतेची भावना राहता कामा नये. मनापासूनचा पश्चात्ताप आणि खिन्नता यांचे साहचर्य नसते. पण ते भयाण स्वरूप धारण करते. अशुद्धतेच्या स्मरणामुळे नम्रता येऊ शकते; पण खिन्नता कधीही येत नाही.

"सुखदुःखे समेकृत्वा" हा विचार याही परिस्थितीला लागू आहे.

बापूचे आशीर्वाद

गुजराती फोटोस्टॅटवरून; एस्. एन्. ११४२९

१६०. कापड व्यापाऱ्यांना प्रकट पत्र

जुलै ७, १९२१

सभ्य गृहस्थहो,

काल मी गिरणीवाल्यांनी परदेशी कापडाच्या बहिष्काराच्या चळवळीला मदत करावी म्हणून आवाहन केले. ते मदत करतील किंवा करणार नाहीत. ते मदत करतील अशी मी आशा बाळगीत राहीन. पण तुम्हांला मात्र दूर राहता येणार नाही. कारण तुमच्यातील बहुसंख्य लोक खात्री पटलेले असहकारितावादीदेखील आहेत. टिळक स्मारक स्वराज्य फंडासंबंधी बेझवाड्याचे आश्वासन तुमच्यामुळेच पुरे करणे शक्य झाले. पण तुम्ही म्हणाल पैसे देणे ही लहान गोष्ट होती. पण आमचा व्यापार हा जीवनमरणाचा प्रश्न आहे. याचं भ्रामक समजुतीमुळे स्वराज्य आपल्यापासून दूर जात आहे. जर तुमचा व्यापार हा तुम्हांला जीवनमरणाचा प्रश्न वाटत असेल तर देशाचे कल्याण कमी महत्त्वाचे आहे काय? स्वराज्याचा अर्थ देशाचा व्यापार आपल्या व्यापारापेक्षा तुम्ही आणि मी अधिक महत्त्वाचा मानला पाहिजे. परदेशी कापडाची आयात तुम्ही करू नका, या विनंतीचा दुसऱ्या शब्दात अर्थ असा की, देशाच्या हितापेक्षा तुम्ही वैयक्तिक हित दुय्यम दर्जाचे माना अशी विनंती.

इंग्लंड, जपान किंवा अमेरिका येथून तुम्ही आणीत असलेल्या प्रत्येक वारामागे तुम्ही आपल्या देशबांधवांच्या तोंडातले त्याला काहीही मोबदला न देता कमीत कमी तीन आणे हिरावून घेता. मी अधिक स्पष्ट खुलासा करतो. हिंदुस्थानात खेडोपाडी

पुष्कळ मजूर बेकार पडले आहेत. पूर्वी या श्रमाचा विनियोग सूत व कापड करण्याकरिता करीत असत. परदेशी आयातीमुळे त्यांना सक्तीने आळशी केले आणि अशी कित्येक वर्षे असंख्य लोकांना दुसरा कोणताही धंदा मिळाला नाही. म्हणून प्रत्येक अवर्षणाच्या वेळी हिंदुस्थानातील प्रत्येक कारुण्यपूर्ण अंतःकरण शहारते. तसे होण्याची जरूरी नाही. अवर्षण हा हिंदुस्थानात असामान्य चमत्कार नाही. आपण त्याचे भयानक परिणाम अनुभवतो. कारण आपण आपल्या उपासमारीच्या काठावर जगत आहोत. दीर्घकालीन आळसामुळे आपली सहनशक्ती नष्ट झाली आहे. अशी कल्पना करू नका की, या झोपडीतले सारे लोक जेथे मजुरांचा तुटवडा आहे अशा दहा बारा शहरांत धावत पळत जातील आणि तेथे उपजीविकेचे साधन मिळवू शकतील. त्यांच्यावर जमिनीचा बोजा आहे व त्यांची इच्छा असली तरी ते ती जमीन सोडण्याला धजणार नाहीत. जरी हिंदुस्थानातील सारी शहरे एकत्र केली तरी ती कोट्यवधी लोकांना पोसू शकणार नाहीत. हातकताई आणि हातविणाई यांचे पुनरुज्जीवन केल्याशिवाय हिंदी लोकांच्या डोळ्यांत तेज चमकणार नाही. हिंदुस्थानच्या खोलवर गेलेल्या आणि दुःखदायक दारिद्र्याला गिरणीमालकांपेक्षा तुम्ही व्यापारी जास्त जबाबदार आहात. हे मी तुम्हांला सांगितले नाही तर मी तुमची व हिंदुस्थानची प्रतारणा केली असे होईल. जेव्हा गिरणी-मालक जबरदस्त किमती आकारतात तेव्हा ते त्या दारिद्र्यात भर टाकतात. पण तुम्ही इतके जबाबदार आहात की, जर तुम्ही परदेशी कापडाची आयात थांबविलीत तर तुम्ही हा जुना व सन्मानाचा सूतकताईचा धर्म पुन्हा जिवंत कराल आणि हातमागाच्या धंद्याला चालना द्याल.

जो धंदा हिंदुस्थानला हानी पोहोचवितो तो टाकून देणे हा तुमच्यापैकी पुष्कळांना जीवनमरणाचा प्रश्न का वाटावा? तुम्हांला आणि देशाला लाभदायक होईल असा दुसरा कोणताही धंदा शोधून काढण्याइतके तुम्ही समयज्ञ आहात. आयात थांबविणे याचा अर्थ दर वर्षी साठ कोटी रुपये वाचविणे, पण त्यामुळे पुष्कळच अधिक भांडवलाची उलाढाल करता येईल. कापसाबरील सर्वच प्रक्रिया हिंदुस्थानातच करता येतील. त्यामुळे तुम्हांला धंदा मिळेल. आज आपल्या आवडत्या देशातून जसा पैशाचा बाहेर जाणारा वाढता ओघ आपल्याला शुष्क करून टाकीत आहे, त्याप्रमाणे न होता पैशाचा प्रवाह आरोग्यदायक रीतीने वाहू लागेल. ह्या गलिच्छ प्रवाहातून तुम्ही आपली विशाल बुद्धिमत्ता दुसरीकडे वळवा, आणि तुमच्यासमोर जे आरोग्यदायक प्रवाह खडे आहेत तिकडे ती बुद्धिमत्ता लावा. तुम्ही हातकताई आणि हातविणाई संघटित करा. त्याच वेळी माझ्यासारखे तुम्ही जाड्याभरड्या खादीवर समाधान मानणार नाही. तुम्ही तुमच्या कातणाऱ्यांना सांगा की, अत्यंत बारीक सूत काता, आणि विणकरांना सांगा की, जगप्रसिद्ध डाक्क्यासारखी मलमल विणा. तुम्ही मला धर्मादाय म्हणून जे काय थोडेसे हजार रुपये दिले आहेत तेवढेच मी भगिनींना देऊन टाकले आहेत. याच्या उलट तुम्ही आपली सारी संपत्ती त्यात ओता. तुम्ही परदेशी कापडाचा अपवित्र धंदा सोडणे

म्हणजे खादीचे उत्पादन व वितरण संघटित करणे आहे. हा धंदा तुमच्या देशभक्तीला साजेसा आहे. तुम्ही पुटपुटता की, अशा संघटनेला काही वर्षे लागतील. पण सध्याचा धंदा तुम्ही क्षणात उभारला नाही. जर तुमची अशी खात्री असेल की, या धंद्याने हिंदुस्थानला दरिद्री आणि गुलाम केले आहे तर तुम्ही त्याच्या नाशाच्या परिणामांचा विचार करीत बसणार नाही. कितीही किंमत पडली तरी तुम्ही तो सोडूनच द्याल.

आणि किंमत तरी काय आहे ? फारशी नाही. परदेशी कापड किंवा सूत याची पुढील मागणी तुम्ही बंद केली पाहिजे. त्याला काहीच किंमत पडत नाही. तुमच्याजवळ परदेशी कापडाचा साठा आहे व तो तुम्हांला काढून टाकावयाचा आहे. तो खपविण्याकरिता जगाचा बाजार तुम्हांला खुला आहे. मॉरिशस, दक्षिण आफ्रिका किंवा पूर्व-आफ्रिकेमध्ये हिंदुस्थानला लागणारा विशिष्ट माल हा सहज खपविता येईल. तुमच्याजवळ असलेला परदेशी कापडाचा आणि सुताचा साठा कोणत्या चांगल्या मार्गाने निकालात काढावा याचा मला विचार तर करू द्या.

गिऱ्हाइकांच्या गरजांबद्दल तुम्हांला चिंता वाटण्याची सवय लागली आहे. तो त्या तुटीत कसे तरी भागवील. त्याला त्याचे काही वाटणार नाही. आणि पुढच्या वर्षी प्रत्येक जातीची रुंद व पातळ सुंदर खादी भरपूर मिळाली म्हणजे त्याला तिची योग्यता चांगली कळून येईल.

तुम्ही गिऱ्हाइकांवर अवास्तव भार टाकू नका. त्याला किंवा तिला झिरझिरीत जपानी धोतरे किंवा साड्या किंवा खळीच्या कॅलिकोचा मोह दाखविणे हे बरोबर नाही. याऐवजी तुम्ही खादीमध्ये कला आहे हे पाहण्याची आवड गिऱ्हाइकात वाढवा असे मी आग्रहाने सांगतो. सारखेपणाच काय पण मऊपणा म्हणजे कला असे हमखास नाही. रेशमापासून सुंदर रीतीने तयार केलेल्या गुलाबांच्या फुलात कला नसते. कारण त्यात जीव नसतो. पण पुष्कळशा पाकळ्या गळलेले बागेतील फूल हे केव्हाही सजविलेल्या खिडकीत ठेवलेल्या कृत्रिम फुलापेक्षा किती तरी पट अधिक चांगले असते. बागेतील फुलात नैसर्गिकपणा व जीव असतो. हिंदुस्थानातले व्यापारी भाडोत्रीपणा टाकून देऊन जुन्या कलेचा अभ्यास करतील का व ती जिवंत करणे हा आपला धंदा मानतील का ? त्यात तुम्हांला व देशालाही पैसा मिळेल. जर सर्वांत मोठी कला पुनरुज्जीवित करावयाची असेल तर ती स्वराज्य. स्वदेशीशिवाय स्वराज्य नाही आणि हिंदुस्थानच्या दृष्टीने स्वदेशी म्हणजे परदेशी कापडावर कायमचा बहिष्कार. मार्गदर्शनाकरिता मी तुम्हांला आवाहन करतो. कारण तुमच्यात ती ताकद आहे. परमेश्वर तुम्हांला दर्शनाकरिता शक्ती व शहाणपण देवो.

तुमचा विश्वासू मित्र
एम्. के. गांधी

'मुंबई क्रॉनिकल', ७-७-१९२१

१६१. गुलाम महबूब यांना तार[1]

[जुलै ७,-१९२१][2]

गुलाम महबूब
मोगा.

जामीन देऊ नका. वकील देऊ नका. सविस्तर माहिती पाठवा.

गांधी

फोटोस्टॅटवरून, एस्. एन्. ७५६४.

१६२. जे. बी. पेटिट यांना पत्र

[जुलै ७, १९२१ नंतर][3]

प्रिय मि. पेटिट,

असोसिएशनने मंजूर केलेल्या दोन हजारांपैकी ५०० रुपये पाठवाल का? मि. अँन्ड्र्यूज यांच्या हाताखाली काम करीत असलेल्या मि. बनारसीदास यांच्याकरिता ही

१. गुलाम महबूब यांच्या तारेला हे उत्तर आहे. ती तार अशी. "१०७ कलमाखाली नोकरशाही व तिच्या हस्तकांनी चिथावल्यामुळे खाजगी व्यक्तींनी आम्हा सात काँग्रेस कार्यकर्त्यांवर फिर्याद दाखल केली आहे. फिर्याद खाजगी दिसते. हजर राहण्याकरिता जामीन द्यावा का? आणि बचाव करावा का? कळवा."

२. मुंबईच्या पोस्टाच्या शिक्क्यावरून.

३. हा मजकूर गांधीजींनी लिहिण्यास सांगितलेला दिसतो. तो मजकूर बोलपूरहून ७ जुलैला जे बनारसीदास यांचे पत्र आले त्याच्या पाठीमागे लिहिला आहे. त्यात ५०० रुपये मागितले आहेत. ही रक्कम गांधींना १९२० च्या डिसेंबरमध्ये एका मारवाडी गृहस्थाने दिली होती. त्या वेळी गांधीजी कलकत्त्याहून कानपूरला गेले होते. गांधींनी ती रक्कम अमृतलाल ठक्कर व बनारसीदास यांच्या हाती दिली.

रक्कम हवी आहे. या कामाकरिता कलकत्त्याच्या मित्राने माझ्या हातात ५०० रुपयांची रक्कम दिल्याचे मी तुम्हांला सांगितले होते. ती रक्कम बनारसीदास यांनी वापरून टाकली. फिजीहून परतलेल्या लोकांच्याकरिता ही खास रक्कम होती. त्यांची व्यवस्था मि. बी. हे मि. ए. च्या देखरेखीखाली करीत आहेत.

तुमचा

पेन्सिलीच्या मसुद्यावरून : एस्. एन्. ७५६५

१६३. वल्लभभाई पटेल यांना पत्र

मुंबई
जुलै ८, १९२१

भाई श्री. वल्लभभाई,

मी सोमवारी अहमदाबादला पोहोचेन व त्याच दिवशी तेथून निघेन. कमिटीने काय उपाय योजावेत यासंबंधी भाई इंदुलाल[1] यांना मी लिहिलेल्या पत्राकडे नजर टाका. मला वाटते, ती असहकारितेचा निर्णय घेईल. कायदेमंडळाचा संपूर्ण बहिष्कार एवढीच आपली मदत.

भाई मावळंकर[2] आणि इतरांना कृपया कळवा.

मोहनदासचे वंदेमातरम्

[गुजरातीवरून]
बापूना पत्रो– सरदार वल्लभभाईने.

१. इंदुलाल याज्ञिक. सेक्रेटरी गुजरात प्रदेश काँग्रेस कमिटी.

२. गणेश वासुदेव मावळंकर. (१८८८–१९५६) वकील, संसदीय चर्चेत वाकबगार, आणि अहमदाबादचे काँग्रेस पुढारी; मुंबई कायदेमंडळाचे निवडलेले अध्यक्ष १९३७ आणि मध्यवर्ती कायदे मंडळाचे निवडलेले अध्यक्ष १९४६; मरेपर्यंत लोकसभेचे सभापती.

१६४. मोतीलाल नेहरूंना तार

मुंबई
[८ जुलै १९२१ रोजी किंवा नंतर][1]

मोतीलाल नेहरू

अध्यक्षांचा आग्रह. कमिटीची तारीख २४ नंतर ठेवावी. बहिष्कार संघटित करण्याचा विचार. मुंबईस २८ ला सभा सुचवितो. पसंतीची तार करा.

गांधी

फोटोस्टॅटवरून : एस्. एन्. ७५६७

१६५. कुंवरजी मेहतांना पत्र

शनिवार
[जुलै ९, १९२१]

भाई श्री. कुंवरजी,

मी आताच तुमचे पत्र वाचू शकलो. भाई मकनजी आणि वराडच्या लोकांचे माझ्यातर्फे अभिनंदन करा. भाई मकनजीने खरे धैर्य दाखवले. पहिल्या उद्रेकात त्यांनी त्या माणसाला जावयास सांगितले असले तरी हरकत नाही. त्यांनी नंतर आपला राग आवरला आणि सहनशीलता दाखविली. आणि गावचे लोकही शांत[2] राहिले ही फार मोठी गोष्ट झाली असे मी समजतो.

मोहनदासचा वंदेमातरम्

मूळ गुजरातीवरून, जी. एन्. २६७१

१. ता. ८ जुलै रोजी कोडाईकॅनॉलहून सी. विजयराघवाचारी यांची जी पुढील तार गांधींना आली. तिला हे तारेचे उत्तर आहे. "आनंदाने पण रविवार २४ नंतर तारीख ठरवा. स्वराज्य फंडाला अद्वितीय यश आल्याबद्दल मला कृतज्ञतापूर्वक व अंतःकरणपूर्वक अभिनंदन करू द्या तारीख तारेने कळवा."

२. उल्लेखिलेली हकीकत पाहा : "टिप्पणे" १७-७-१९२१.

१६६. मंगल घटिका

ज्याप्रमाणे गिरनारचे[1] शिखर गाठण्याची इच्छा बाळगणारा माणूस तेथून वर जाणाऱ्या रस्त्यापर्यंत पोहोचला म्हणून तेवढ्याने तो आपला उद्देश सफल करू शकत नाही, त्याचप्रमाणे जी शिडी आपल्याला वर नेणार आहे तिच्या एखाद्या पायरीवर आपण थांबलो आणि विश्रांती घेत बसलो तर आपण आपले स्वराज्याचे ध्येय गाठू शकणार नाही. आपल्याला विश्रांती न घेता चढत राहिले पाहिजे. पैसे जमा करण्यात आपण यशस्वी झालो ही खरोखर समाधानाची गोष्ट आहे. त्यामुळे आपल्यात काहीसा विश्वास आला. आपल्याबरोबर किती लोक आहेत व ते कोण आहेत याचा काहीसा पुरावा मिळाला आणि ज्या कामाकडे आपल्याला लक्ष दिले पाहिजे त्यावर खर्च करण्यास आता आपल्याजवळ साधनेही आहेत. तथापि ज्या कार्यक्रमामुळे स्वराज्याचे दुरून दर्शन होईल असा कार्यक्रम स्वदेशीच आहे. हजारो रुपये खर्चून स्वराज्याच्या मंदिरात आपल्याला प्रवेश मिळणार नाही. तशा प्रवेशाची शक्ती येण्याकरिता स्वदेशी ही एकच अट आपण पूर्ण केली पाहिजे. मंदिरावरचा पहारेकरी आपल्याजवळ किती पैसा आहे हे विचारणार नाही. तो आपल्या अंगावर खादी आहे की नाही हे पाहील, आणि आपल्या तोंडाला दारूची घाण येते की नाही याची तपासणी करील. जो गृहस्थ स्वदेशीचा धर्म पाळील त्याला स्वतःलाच आपण स्वतंत्र आहोत असे वाटेल. दुसऱ्या माणसांनी तू स्वतंत्र आहेस असा फक्त पुकारा केल्याने ज्या कोणाला आपण स्वतंत्र झालो आहो असे वाटेल तो स्वतंत्र होणार नाही. प्रत्येक व्यक्तीत स्वतःमध्ये स्वातंत्र्याची भावना असली पाहिजे आणि ती भावना ज्याने परदेशी कापड टाकले नाही त्याच्यात कधीही येणार नाही.

जपानी साड्या, फ्रेंच सॅटीन आणि मँचेस्टरची मलमल हे व्यसनाचे निरनिराळे प्रकार आहेत. या व्यसनांच्या आधीन झालेल्या माणसाला स्वातंत्र्याचा विचार सुचणार नाही. कारण त्याने पोषाख करून स्वतःला परकीय बनविले आहे व तो प्रत्येक परकीय गोष्ट चांगली आहे असे मानतो. अशा माणसात स्वदेशी वृत्ती संचरेल अशी अपेक्षा आपण का बाळगावी? अशा माणसाला स्वराज्याची काय माहिती आहे? ज्या माणसाला हिंदुस्थानची हवा आवडत नाही, ज्याला हिंदी पोषाखपद्धती आवडत

१. सौराष्ट्रातील पर्वत.

नाही आणि हिंदी खाद्य पदार्थ आवडत नाहीत असा माणूस कोणत्या अर्थाने हा देश माझा आहे असे म्हणेल ? आपल्यापैकी कोट्यवधी लोकांना अद्याप हिंदुस्थानची हवा नावडणारी झाली नाही आणि हिंदुस्थानच्या हातानी भाजलेल्या गहू, ज्वारीच्या रोटीवर ते खूष आहेत; पण हिंदुस्थानचे कापड त्यांना अद्याप पसंत पडत नाही. परदेशी कापडाने आपल्यावर जादू टाकली आहे. जोपर्यंत हा देश त्या जादुतून सुटत नाही तोपर्यंत तो गुलामगिरीत राहील यात शंका नाही.

जरी एखाद्याने आपल्याला परदेशी कापड फुकट दिले तरी त्यामुळे फायदा न होता तोटाच होईल. कारण देणग्यांवर जगणारा माणूस भिक्षेकरी होतो आणि भिक्षेकरी हा नेहमी गुलामच राहतो. त्याने आपला आत्मा विकून टाकलेला असतो.

स्वराज्याच्या मंदिरात प्रवेश करण्याकरिता जर काही हवे असेल तर स्वदेशी. स्वदेशीचा अर्थ परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार. आपल्या देशाने चरख्याची शक्ती ओळखली आहे. कोणत्याही प्रांताला तो परका वाटत नाही. प्रत्येक प्रांतात काही प्रमाणात खादी विकली जात आहे. लोकांनी ह्या कलेवर प्रभुत्व मिळविले आहे.

तथापि परदेशी कापडाने जी आपल्यावर जादू टाकली आहे, ती नष्ट झालीच पाहिजे. ती नष्ट होईपर्यंत चरख्याचा उपयोग हा खात्रीलायक मानता येत नाही. जोपर्यंत देशाने चरख्याच्या जादूची शक्ती ओळखली नाही तोपर्यंत त्याच्या बाहूंत शक्ती येणार नाही व स्वतःवर विश्वास बसणार नाही. असा बहिष्कार सुरू करण्याची मंगल घटका आली आहे.

जर ऑक्टोबर एकपर्यंत आपण स्वराज्य मिळविले नाही तर माझी अब्रू जाईल व माझी हिंदुस्थानवरील श्रद्धा अस्थानी ठरेल. जर डिसेंबरपर्यंत आपल्याला स्वराज्य मिळाले नाही तर हिंदुस्थानची प्रतिज्ञा खोटी ठरेल, जगाच्या दृष्टीने तिला किंमत उरणार नाही. आणि काँग्रेसला जे प्रतिनिधी हजर राहिले ते नालायक होते असे ठरेल.

परदेशी कापडावर बहिष्कार घातल्याशिवाय आपल्याला स्वराज्य मिळणार नाही. अशा बहिष्कारामुळे आपण आपली शरीरे शुद्ध करू आणि अशी शरीरशुद्धी करीपर्यंत स्वराज्याचा मंत्र जपण्यास आपल्याला अधिकार नाही.

म्हणून जर याच वर्षी आपल्याला स्वराज्य मंदिरात प्रवेश करण्याची इच्छा असेल तर आपण परदेशी कापडावरील बहिष्कार पुरा करण्यास उशीर करू नये. कारण स्वदेशीचा अंगिकार केल्याने आपल्याला अद्वितीय असे शक्तीचे साधन उपलब्ध होणार आहे. ज्यांनी हे मंदिर बळकाविले आहे त्यांना त्या वेळीही जर आपल्या शक्तीची जाणीव झाली नाही व त्यांनी ताबा दिला नाही तर लढण्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय उरणार नाही. यात काही वेळ जाणे अपरिहार्य आहे. तथापि जर आपण

परदेशी कपडावरील बहिष्कार पूर्ण करू तर लढण्याचा प्रसंग आपल्यावर येणार नाही व जे आपले आहे त्याचा ताबा आपल्याला मिळेल या विषयी मला विश्वास आहे.

तथापि आपण लढ्याला काही दिवस जाऊ दिले पाहिजेत. म्हणून जर आपल्याला ऑक्टोबरात स्वराज्य पाहिजे असेल तर ३१ ऑगस्ट[१]पूर्वी बहिष्कार पुरा केला पाहिजे. तसे करण्यास आपल्याला यश येते किंवा नाही हे आपल्याला एक ऑगस्टला कळेल. टिळक महाराजांची पुण्यतिथी त्याच दिवशी आहे. त्या वेळेपर्यंत जर आपण आपले काम पुरे केले तर तो दिवस आपण उत्साहाने साजरा करू आणि जर आपण कर्तव्यात चूक केली तर आपण घरातच शरमेने राहिले पाहिजे. ज्याप्रमाणे जूनच्या-शेवटच्या दिवसांत आपण उत्तम काम केले त्याचप्रमाणे ह्या महिन्याच्या उरलेल्या दिवसांत आपण जोरदारपणे काम केले पाहिजे व परदेशी कापडावरील बहिष्कार पुरा केला पाहिजे. जो स्वतःला असहकारितावादी म्हणवितो त्याने खादीशिवाय दुसरे काही वापरू नये व कमीत कमी कपड्यात भागवावे. हा संक्रमणकाल आहे व तो कठीण आहे. ताबडतोब बहिष्कार घातल्यामुळे आपल्या कपड्यांचा साठा कमी होणार आहे हे पाहून आणि देशात कापडाचा तुटवडा पडणार आहे हे लक्षात घेऊन कमितकमी कपड्यात आपण निर्वाह करावा. याशिवाय प्रत्येकाची परिस्थिती नवे कपडे खरेदी करण्यासारखी असणार नाही आणि म्हणून आपल्याला कमी कपड्यात भागविल्याशिवाय गत्यंतरच नाही.

आपण आपल्याजवळील परदेशी कापडाची एक तर होळी करावी किंवा दुसऱ्या-देशात पाठविण्याकरिता ते देऊन टाकावे किंवा असे कपडे शौचाला जाताना वापरावेत. जर आपण गरीब असू तर आपण तसले कापड वापरावे. पण ते गुलामगिरीचे चिन्ह आहे हे लक्षात ठेवून दुसरा मार्गच नसला तर ते वापरावे.

गरिबांना या गोष्टी सुलभ व्हाव्यात म्हणून आपण खादीच्या मोबदल्यात परदेशी कापड स्वीकारणारी भांडारे काढावीत. अशा प्रकारे आपल्याला पुष्कळ योजना आखता येतील. पण निदान स्वतःच्या पोशाखाच्या बाबतीत तरी एक ऑगस्टपूर्वी परदेशी कापडाचा वापर पूर्णपणे टाकून द्यावा. आपण सर्वांनी यापुढे परदेशी कापड विकत घेणार नाही असा निश्चय करावा; आणि तसाच निश्चय आपल्या घरी दररोज ठराविक वार सूत कातू असा करावा.

तथापि एवढ्याने भागणार नाही. आपण प्रत्येक कापडाच्या दुकानात जावे. आपण परदेशी कापडाच्या व्यापाऱ्यांना परदेशी कापडाची आयात थांबविण्यास विनंती करावी.

१. या ठिकाणी ३१ जुलै असले पाहिजे असे वाटते. –तपासनीस.

आणि ते आपल्याजवळील साठा दुसऱ्या देशात पाठवून संपवितात किंवा नाही हे पाहावे.

ज्याप्रमाणे ग्राहक आणि व्यापारी यांना काही कर्तव्ये आहेत, तशीच कर्तव्ये गिरणीमालकांना आहेत. बहिष्काराच्या परिणामामुळे कापडाच्या किंमती चढवू नयेत अशी विनंती त्यांना करावी. आजसुद्धा कापडाच्या इतक्या भरमसाट किंमती त्यांनी ठेवल्या आहेत की, त्या कमी करण्यास जागा आहे. जर ते आता लोकांच्या गरजेचा फायदा घेणार असतील व किंमती चढविणार असतील तर ते स्वतःच परके म्हणून ठरतील आणि देशाचे शत्रू होतील. मला वाटते इतक्या थरापर्यंत ते जाणार नाहीत.

या स्वराज्याच्या चळवळीकडे आपण आत्मशुद्धीच्या दृष्टीने पाहतो. आपण जसजसे उंच चढू तसतशी आपली अधिक कसोटी लागेल. आपल्यापैकी प्रत्येक जणात देशभक्तीची वृत्ती असेल आणि ती वृत्ती आपल्या घराप्रमाणे निर्मळ ठेवावयाची असेल तर याच वर्षी स्वराज्य मिळणे ही अत्यंत सोपी गोष्ट होईल. ज्याप्रमाणे ३० जूनला देशाने एक चमत्कार दाखविला त्याचप्रमाणे बहिष्काराचा दुसरा चमत्कारदेखील तो दाखवील असे अनुमान काढण्यास पूर्ण जागा आहे. परमेश्वर आमची अब्रू राखो!

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १०-७-१९२१

१६७. पंचमहायज्ञ

यज्ञाचा अर्थ निराळ्या प्रकारे होऊ शकतो. गृहस्थाश्रमी हिंदूला पंचयज्ञ करणे आवश्यक मानले जाते. चूल, मुसळ, जाते, कुंभ, आणि चरखा यांतील जितक्या वस्तू कमी असतील तितके ते घर कमी प्रतीचे मानले जाते. त्यांच्याकडे नजर टाकल्यास पहिले आणि शेवटले महत्त्वाचे असून मधले तीन त्यांतून निर्माण झालेले आहेत. जाते, कुंभ आणि मुसळ यांत चुलीचे अस्तित्व गृहीत धरले आहे. घरात जर जाते किंवा मुसळ नसेल तर चूल चांगले काम देणार नाही; तथापि ती कशीबशी चालेल. पण चरखा थांबला म्हणजे मुख्य साधनच नष्ट होईल. तुम्हांला पक्षाघात होईल. जो मनुष्य अन्नवस्त्रांकरिता यज्ञ करीत नाही त्याचा त्यांपैकी एकावरही हक्क नाही. अशी एक चाल असावी की, जो चुलीशी काम करीत नाही त्याने उपाशी राहावे व जो चरखा चालवीत नाही त्याने

नागवे राहावे. आपण कपडे टाकून न देता चरखा मात्र टाकला. जो अन्न कमविण्याकरिता कष्ट न करता अन्न सेवन करतो, तो जसा चोर आहे, तसाच जो न कातता कपडे घालतो तोही चोरच आहे. यज्ञ याचा अर्थ एक दान, स्वतःचा त्याग असा आहे आणि शारीरिक श्रमाचा तोच अर्थ आहे. जे चुलीवर आणि चरख्यावर काम करतात ते शहाणपणाच्या त्यागात निमग्न असतात. जे अशा लाभदायक शारीरिक श्रमात गुंतलेले नसतात, त्यांनादेखील अन्न पचविण्याकरिता व्यायाम करावा लागतो.

चरखा टाकून देण्यात आपण केवढे पाप केले आहे हे कदाचित आता स्पष्ट होईल. जेव्हा पूर्वीच्या काळी हिंदुस्थानच्या कोट्यावधी स्त्रिया या हलक्या पण फायदेशीर श्रमात गुंतलेल्या असत तेव्हा हिंदुस्थान सुखी, निरोगी व तेजःपुंज देश होता. आज चरखा टाकून देऊन हा देश दरिद्री, रोगी आणि भकास झाला आहे.

चूल, चरखा वगैरे प्रत्येक वस्तू ही घराची शोभा आहे. आज जर हिंदुस्थानातील लक्षावधी घरे मोडकळीस आली असतील तर त्याचे कारण आपण टाकलेला चरखा. ही अतिशयोक्ती आहे असे कोणी समजू नये. कदाचित वाचकाचे घर त्या स्थितीत नसेल. पण पाण्याचा तुटवडा याचा अर्थ कोणालाही पाणी मिळत नाही असा नाही. याचा अर्थ इतकाच की, प्रत्येकाला पूर्वीपेक्षा कमी मिळते, पुष्कळांना थोडे व काहींना बिलकूल मिळत नाही. त्याचप्रमाणे पुष्कळ कुटुंबांचे चरख्याशिवाय चालू शकते, पण निदान काही कुटुंबांचा पूर्ण विध्वंस झाला आहे. ओरिसा व चंपारणाकडे पाहा. तेथील पुष्कळ खेडी नष्ट झाली आहेत. ज्या देशातल्या लोकांना दीडशे वर्षांपूर्वी सबंध वर्षभर काही ना काही काम असे, त्या देशातील ऐंशी टक्के लोक वर्षातून चार महिने बेकार राहिले तर त्या देशाची दुसरी काय स्थिती होणार?

काम हीच खरी संपत्ती. धातू हे फक्त त्या कामाचे लक्षण आहे. जेव्हा ऐंशी टक्के लोक चार महिने बेकार राहतात तेव्हा त्यांची उत्पादनशक्ती एक तृतियांशाने कमी होते. ३ रुपये मिळविण्याची शक्ती आणि तयारी असूनदेखील हिंदी लोक वर्षानुवर्षे २ रुपयांपेक्षा अधिक प्राप्तिकरिता काम करीत नाहीत. त्यापेक्षा अधिक मिळविण्याकरिता त्यांना कामच मिळत नाही. अशा स्थितीत देशाला गरिबीशिवाय दुसरे काय शक्य आहे? अशा परिस्थितीवर एकच उपाय आहे आणि तो म्हणजे आपल्या हातांनी कातलेल्या सुताची खादी वापरण्याची प्रतिज्ञा करणे. ती प्रतिज्ञा घेतल्यावर इच्छेने अगर अनिच्छेने चरखा हाती घेऊ; आणि तो सोडून देण्यात चूक केली असे शेवटी आपल्याला समजून येईल. पण दरम्यानच्या काळात चरखा लोकप्रिय करण्याचा आपण निश्चयपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. सध्या ज्याप्रमाणे आपण परदेशी कापडाचे प्रेमी आहोत त्याप्रमाणेच प्रेमी राहिलो तर तोपर्यंत चरखा सुरू करण्यास आपण कधीही उत्सुक होणार नाही, किंवा तो सुरू केला तरी तो चालविण्याची तळमळ आपल्याला वाटणार

नाही. परदेशी कापड टाकण्याची प्रतिज्ञा हीच आपल्याला चरख्याचा उपयोग करण्यास भाग पाडील. अशा प्रकारे चरखा आणि परदेशी कापडावरील बहिष्कार यांचा परस्पर संबंध निकटचा आहे. जी वस्तू आवश्यक नसते तिची आपण पर्वा करीत नाही. म्हणून चरखा आवश्यक आहे असे वाटावयास लागणे हे पवित्र कर्तव्य आहे. हिंदुस्थानचे दारिद्र्य नष्ट करण्यास दुसरा उपाय नाही. इतकी अमूल्य वस्तू टाकण्याची जी आपण चूक केली तिला पुरेसे घेण्याइतके प्रायश्चित्तच नाही. लहानसा त्याग हा जर स्वेच्छेने केला तर तो पुरतो. जर आपल्याला काही गोष्टी सक्तीने कराव्या लागल्या तर त्या गोष्टी कोणत्या असतील हे कोण सांगू शकेल ?

[गुजरातीवरून]
' नवजीवन, ' १०-७-१९२१

१६८. माझी टिप्पणे

स्वराज्य फंडाकरिता दक्षिण आफ्रिकेतून पुढील रकमा मिळाल्या आहेत :

	रुपये
पाटीदार मंडळ, जे. बी.	८,२७५
काठेवाड आर्यमंडळ, नाताळ.	२,५००
टोंगाट—वेरूलम.	१,०००
टेलर्स असोसिएशन, जेडा.	१,४४५
टेलर्स असोसिएशन, दरबान.	५३०
पाटीदार युनियन, दरबान.	१,००१
उमरशेट मार्फत.	५,४२५
वेरूलम टेंपल.	१,६५८½
दर्जी हरसुखराय मंडळ.	७७०

दक्षिण आफ्रिकेच्या मानाने ही रक्कम लहान नाही. परदेशी राहणाऱ्या इतर हिंदी लोकांनी दक्षिण आफ्रिकेच्या बांधवांचे अनुकरण करावे.

" तुम्हांला लोक तुमच्या बाजूला वळवावयाचे आहेत "

एक गृहस्थ लिहितात की, मी वैष्णवांना उद्देशून जे पत्र लिहिले आहे, त्यात त्यांचा राग प्रेमामुळे निर्माण झाला आहे असे जे वर्णन केले आहे त्यात माझा काही हेतू आहे. अशा सुंदर रीतीने गोष्टी मांडण्यात मी माझ्या विरोधकांना जिंकू इच्छितो असे तो म्हणतो.

पत्रलेखकाच्या म्हणण्यात अर्धसत्य आहे. मी माझ्या विरोधकांना अर्थातच जिंकू इच्छितो. पण ज्यावर माझा विश्वास नाही, अशा गोष्टी सांगून जिंकू इच्छित नाही. हे मित्र लिहितात : "जर क्रोध हे प्रेमाचे लक्षण असेल तर जनरल डायर यांनी जालियनवाला बागेत केलेली कत्तल ही प्रेमामुळे केली असे म्हणावे लागेल." मला तरी या युक्तिवादात फक्त अज्ञान दिसते. बाप मुलावर नेहमी रागावतो. कारण तो त्याच्यावर प्रेम करतो. पण जनरल डायरचा राग हा सर्वस्वी द्वेषाचा परिणाम होता. वैष्णवांचा राग हे प्रेमाचे लक्षण मी का मानतो ते स्पष्ट आहे. व्यक्तिशः माझ्याविरुद्ध त्यांचे काही म्हणणे नाही. माझ्या इतर कृत्यांना त्यांची संमती आहे. तथापि अस्पृश्यतेच्या प्रश्नावर त्यांना वाटते मी चुकत आहे आणि जी ही माझी चूक म्हणून ते समजतात त्याकरिता ते रागावतात. जे ठराविक चालीरीती मोडतात त्यांना ते लिहीत नाहीत किंवा त्यांच्या वर्तनाबद्दल संताप व्यक्त करीत नाहीत. हे सिद्ध करण्याकरिता आम्ही अनेक उदाहरणे देऊ शकू. माझ्या पत्रलेखकाने फेरविचार करावा अशी माझी विनंती आहे.

मला दटाविले

मानवदारचे एक मित्र लिहितात :

> तुम्ही म्हणता की, पंजाबवर आणि खिलाफतीच्या बाबतीत एकदा न्याय दिला म्हणजे स्वराज्याच्या लढयाचे काम तुम्ही दुसऱ्यावर सोपवाल आणि निवृत्त व्हाल.

ते म्हणतात की, अशी गोष्ट मी करता कामा नये, आणि त्यांचे म्हणणे बरोबर आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ त्यांना समजला नाही इतकेच. त्या निवेदनातील माझा गर्भितार्थ असा होता की, या दोन गोष्टींत मिळालेला न्याय म्हणजे स्वराज्याची किल्ली. एकदा आपल्याला तो न्याय मिळाला म्हणजे स्वराज्य मिळविणे कठीण होता कामा नये. मला वाटते की, हे दोन उद्देश साध्य करण्यात जर आपल्याला यश मिळाले तर आवश्यक ती शक्ती आपण कमावली असा त्याचा अर्थ होईल. नाही तर स्वराज्याचा सुरू केलेला लढा सोडून देण्याचा प्रश्नच नाही.

सुंदरलालजींचे पत्र

सुंदरलालजींना जबलपूरला पकडले आणि त्यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली

हे सर्वांना ठाऊक आहे. तुरुंगात जाण्यापूर्वी त्यांनी मला एक पत्र पाठविले होते त्या पत्रातील काही भाग वाचकांना उद्‌बोधक वाटेल म्हणून तो खाली उद्‌धृत करीत आहे.[१]

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १०-७-१९२१

१६९. औषधविक्रेत्याच्या मुंबईच्या सभेत भाषण

जुलै १०, १९२१

तुमच्यातील पुष्कळजण स्वदेशीची प्रतिज्ञा घेतील या आशेने मी येथे ओढला गेलो आहे. बहिष्कार का घालावा याची कारणे मी दिली आहेत. गिरणीमालक किंवा परदेशी कापडाचे व्यापारी आपल्याला मदत करोत किंवा न करोत, हिंदी लोकांनी जर ठरविले तर त्यांना परदेशी कापडावर बहिष्कार घालता येईल. परदेशी कापडावरील बहिष्कार याचा अर्थ परदेशातून आयात केलेल्या कापडाचा वापर देशाने थांबवावा असा आहे. यापुढे आम्ही परदेशी कापड वापरणार नाही, अशी तुम्ही नुसती प्रतिज्ञा घेतलीत तर तेवढ्याने समाधान वाटणार नाही. आपल्याजवळ असलेले परदेशी कापड हे देखील वापरता कामा नये. याकरिता तीन मार्ग मी सुचविले आहेत. त्यातील कोणत्याही एका मार्गाचा अवलंब आपण करावा. आपल्याजवळ असलेले परदेशी कापड जाळून टाकणे ही सर्वांत चांगली गोष्ट. यासंबंधी पुष्कळ लोक मला विचारतात की, आपल्या देशात जे नंगे व भुके लोक भटकत असतात अशा असंख्य गरिबांना हे कापड आपण का देऊ नये ? ते म्हणतात, कापड जाळणे हे द्वेषाचे कृत्य आहे. माझे उत्तर असे की, जर मी परदेशी कापड जाळून टाकण्यास सांगताना द्वेषाने प्रेरित झालो असलो तरच लोकांचा द्वेष हा तीव्र होईल. पण जर परदेशी कापड वापरण्यात आपण भयंकर चूक केली आहे असे आपल्याला समजून येईल तर आपली गुलामगिरी-तून मुक्तता ते कापड जाळण्यातच आहे.

दुसरा मार्ग : असे कापड इतर देशात पाठविणे हा आहे. आपल्या देशात जे गरीबातले गरीब असतील किंवा अत्यंत अभागी असतील त्यांनादेखील ते कापड आपण

१. येथे दिला नाही. त्याचा मजकूर पाहा "टिप्पणे." १३-७-१९२१.

देऊ शकणार नाही. मी दारू आणि परदेशी कापड एकाच वर्गात समाविष्ट करतो. परदेशी कापडाचा तिरस्कार करणे हे तुम्हांला कठीण आहे याची मला जाणीव आहे. हे माझे विचार फार पूर्वीपासूनचे आहेत आणि म्हणून मला त्यात कांही कठीण वाटत नाही. पण तुम्हांला मात्र फार थोड्या वेळात तुमच्या कल्पना बदलण्यास सांगितले जात आहे. जर तुमचे म्हणणे असे असेल की, दुसऱ्या देशांनाच परदेशी कापड पाठवून त्याचा निकाल लावावा तर ते सारे कापड माझ्याकडे पाठवून द्या. तुमच्या इच्छेप्रमाणेच त्याची विल्हेवाट लागेल. जर तुम्हांला असे वाटत असेल की, परदेशी कापडाच्या बहिष्कारामुळे द्वेष न वाढता आपली राष्ट्रवृत्ती बळावेल हिंदुस्थानचा निश्चय अधिक बलिष्ठ होईल तर मला त्या कापडाची होळी केलेलीच आवडेल.

ज्यांना स्वदेशी कापड खरेदी करण्याइतकी शक्ती नसेल त्यांना परदेशी कापडाच्या मोबदल्यात खादी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या आपल्याजवळ दोन जातींचे स्वदेशी कापड आहे.एक गिरणीचे व दुसरे खादीचे. गिरणीचे कापड गरिबांच्या-करिता राखून ठेवले असल्यामुळे आपल्याला खादीशिवाय दुसरे कापड नाही. काही-जण चैन व सुख यांचे गुलाम बनल्यामुळे त्यांना खादी वापरणे आवडत नाही. त्यांना त्याचा तिटकाराच येतो. पण या त्यागाची तयारी झाल्याशिवाय आपली गुलामगिरी संपविणे अशक्य आहे. खादी वापरण्याला तुमची तयारी होत नसेल तर गिरणीचे कापड वापरा. जर तुम्ही शपथच घेणार असाल तर संपूर्ण खादी वापरण्याचीच घ्या. काळबा-देवीच्या खादी भांडारात १०,००० रुपयांची खादी आहे व ती विकली जात आहे. नाराणदास पुरुषोत्तम यांच्याबरोबर या गोष्टीची चर्चा केली आणि थोड्याच दिवसांत ५०,००० रुपयांच्यापेक्षा कमी किंमतीची नसणारी खादी येईल.

जरूरीपेक्षा अधिक खादी वापरू नका. लोकांना पाहिजे तितकी खादी पुरविण्याची परिस्थिती देशात नाही. तूप व सोने हे जसे आपण काटकसरीने वापरतो तशी खादी वापरा. स्वराज्य मिळत नाही तोपर्यंत डामडौल करू नका. प्रत्येक पुरुषाने दोन लांब सदरे आणि धोतर वापरावे आणि स्त्रियांनीही थोडक्या कपड्यांवर भागवावे. एक मित्र म्हणाला, आपण फाशीलाही तयार असले पाहिजे. पण तुम्हांला फासावर चढावे लागणार नाही. जर याला देश तयार असेल तर आजच आपल्याला स्वराज्य मिळेल. पण जर अशी वेळ आली तर मी तुम्हांला परदेशी कापडावर बहिष्कार घाला असे सांगण्याचा प्रसंगच आणणार नाही. सध्या आपल्यात त्राणच उरले नाही. काही भगिनी तक्रार करतात की, जपानी साड्या आणि फ्रेंच रेशमी कपडे सोडणे व खादी वापरण्यास सुरुवात करणे हे जिवावर येते. आपण खरी शक्ती कमाविली आहे किंवा नाही याची परीक्षा ह्यातच होणार आहे. काही जण म्हणतात तुम्ही माझ्याकरिता पैसे दिलेत आणि लोकांनी खरा त्याग केलाच नाही. परदेशी कापड टाकूनच तुम्ही हेही खोटे ठरवू शकाल.

[गुजरातीवरून]

'गुजराती', १७-७-१९२१

१७०. सी. विजयराघवाचारी यांना तार

[जुलै १०, १९२१ रोजी किंवा नंतर[1]]

मुंबईस अठ्ठावीस तारखेच्या सभेची नोटीस पाठविली जात आहे.

फोटोस्टॅटवरून : एस्. एन्. ७५६८

१७१. मणिबेन पटेलला पत्र

सोमवार
जुलै ११, १९२१

चि. मणि,

तुझे पत्र पोहोचले. परदेशी कापड जाळण्याचा उद्देश त्याबद्दल अधिक तिटकारा उत्पन्न करणे हा आहे. असे कापड गरिबांना देऊन टाकणे बरे, ही कल्पना अज्ञानमूलक आहे. थोड्या लाख रुपयांचे कापड गरिबांना मिळाले काय न मिळाले काय, फरक तो काय पडणार? आपण इतकी वर्षे परदेशी कापड आयात करून देशाची मोठी हानी केली आहे. ते कापड गरिबांना देऊन टाकून आपले काही भले होईल असे मला वाटत नाही. परदेशात ते पाठविण्यात काही मुद्दा आहे. तथापि मी प्रत्येकाला त्याची मते विचारीत आहे. सर्वांना पटेल तोच मार्ग अनुसरू. अजूनही काही शंका असेल तर पुनः विचार.

१. १० जुलै रोजी कोडाईकॅनाल येथून विजयराघवाचारी यांनी पुढील तार पाठविली : "धारवाड विनंती करते. केळकर पाठिंबा देतात. मुंबई का धारवाड हे तातडीने कळवा. त्यात तारीख असलीच पाहिजे."

डाह्याभाईची वानरसेना[1] फार चांगले काम करीत आहे असे वाटते. तथापि त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी. त्यांनी लोकांना आदराने विनंती करावी, उपहास करू नये किंवा...[2] दारूबाजांची कीव करावी.

काकासाहेब[3] हे चांगले शिक्षक आहेत यात शंका नाही. तुम्हा सर्वांना ते आवडतात याचा मला आनंद वाटतो.

विठ्ठलभाईबरोबर माझ्या पुष्कळ बैठकी झाल्या. त्यांनी जिल्हा बोर्डात एक चांगला ठराव पास करून घेतला. मला भेटणारे लोक सांगतात की, काकांचा अजून चरख्यावर विश्वास बसत नाही व लहान बैठकीत ते आपली नापसंतीही दाखवितात. असे असूनही त्यांची पुन्हा भेट झाली म्हणजे याची चर्चा करीन. आमच्या गेल्या भेटीत माझ्या मनावर अशी छाप पडली की, चरख्यासंबंधी त्यांच्या शंका कमीअधिक संपल्या आहेत.

बापूचे आशीर्वाद

मणिबेन
द्वारा. श्री. वल्लभभाई झव्हेरभाई पटेल.
भद्र, अहमदाबाद.
[गुजरातीवरून]
बापूना पत्रो— मणिबेन पटेलने

१. शाळेतील मुले निरोधक म्हणून काम करीत होती. रामायणातील वानरसेनेला हे उद्देशून आहे.

२. ह्या मजकुराबद्दल साशंकता आहे.

३. दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर; जन्म १८८५. त्यांना काकासाहेब म्हणत; १९१५ पासून गांधींचे सहकारी.

१७२. देवचंद पारेख यांना पत्र

गावदेवी मुंबई
जुलै ११, १९२१

भाईश्री देवचंदभाई,

तुमची पत्रे मिळाली. खरोखरच काठेवाडने अपेक्षेबाहेर काम केले. आता तुम्ही खादी उत्पत्तीकडे लक्ष लावावे असे मला वाटते.

मी खात्रीनेच कायदेभंग एकदम सुरू करणार नाही. तुमचे गणित बरोबर नाही. आपण काही प्रयत्न न करता ६ कोटी चरखे फिरू लागतील. वीस लाख चरखे सुरू करण्यात आपल्याला फारसा खर्च करावा लागला नाही. पण त्याशिवाय दुसरे काहीच होणार नव्हते. कारण आपण थोडासा खर्च केल्यावर लोक त्यांना जे उपयुक्त वाटते ती गोष्ट आपण होऊनच स्वीकारतात. अधिक सभासद नोंदणीचे काम चालू आहे.

मोहनदास गांधींचा वंदेमातरम्

गुजरातीवरून : जी. एन्. ५७१७

१७३. दारू मक्तेदारांच्या सभेत भाषण, मुंबई[1]

जुलै १२, १९२१

महात्मा गांधी म्हणाले, मी मुंबईला परत आल्यापासून मला दारू मक्तेदारांची परिस्थिती समजून आली आहे. मी प्रांतिक काँग्रेस कमिटीला

१. पारशी राजकीय सभेच्या विद्यमाने ही सभा मंगळवारी मारवाडी विद्यालयाच्या सभागृहात भरली होती. गांधींनी मुंबईच्या दारूव्यापाऱ्यासमोर भाषण केले.

आणि दारूव्यापाऱ्यांना काय सल्ला द्यावा याचा विचार करीत होतो. मी या गोष्टींचा खोलवर विचार करीत आहे. आणि जे दारूव्यापारी लोकांना दारू विकून आपल्या उपजीविकेचे साधन प्राप्त करून घेत होते त्यांच्याबद्दल मला कळवळा येत होता. मि. बी. एफ्. भरूचा यांनी मला खऱ्या गोष्टी आणि आकडे त्यासंबंधी पुरविले आहेत आणि पुष्कळ पारशी बांधवांनी निनावी आणि आपल्या नावानेही मला पत्रे लिहिली आहेत. त्यावरून ह्या व्यापारासंबंधी प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे हेही मला समजून आले आहे. मला तुम्हांला असे सांगावयाचे आहे की, ८०,००० लोकसंख्येच्या लहानशा पारशी जमातीत दहा बारा वाईट माणसे असली तरी ती जमातीवर आघात करतील. पण जर हिंदू व मुसलमानात अशी पाच सात लाख माणसे असतील तरी ती इतकी डोळ्यांवर येणार नाहीत. जगात अशीच परिस्थिती असते. म्हणून जर थोडेसे पारशी दुकानदार हे बदनाम झाले असले तरी इतर लोक विसरले जातात. पारशी दारू विक्रेत्यांचे उदाहरण देशापुढे ढळढळीतपणे आहे. एक्सेलसिएर थिएटरमध्ये मी पारशी मित्रांना सांगितले की, तुमच्या उदार-वर्तनाने तुम्ही देशाला उदाहरण घालून देऊ शकाल. म्हणून पारशातील इतके जण लोकांना दारू विकून आपली उपजीविका करतात हे पाहून मला अत्यंत दुःख झाले व ही त्यांना नामुष्कीची गोष्ट आहे असे मला वाटले. इतक्या विधवांना दारू विकून निर्वाह करावा लागतो याचेही मला दुःख झाले. माझ्या मताने या स्त्रियांनी लोकांना दारू विकण्याऐवजी खडी फोडली किंवा अन्नाकरिता भीक मागितली तरी चांगले होईल.

माझ्याजवळ जर एखाद्या पेटिट किंवा एखाद्या टाटाइतकी संपत्ती असती तर मी ह्या पारशी विधवांच्या पाया पडलो असतो आणि त्यांनी हा व्यापार सोडावा म्हणून त्यांच्याजवळ भीक मागितली असती. त्यांना मी म्हटले असते, वाटेल तेवढा पैसा घ्या. त्यांचा सांभाळ करण्यात मला आनंद वाटला असता. माझ्याजवळ जर काही पैसा असता तर त्या पैशांचा पहिला उपयोग मी माझ्या पारशी बंधू–भगिनींना देण्याकरिता केला असता व त्यांना दारूचा धंदा सोडा असे सांगितले असते. माझ्या काही पारशी मित्रांनी मला सांगितले की, आम्ही दररोजचा दारूचा ग्लास सोडू शकत नाही. काहींनी मला सांगितले की, पारशी धर्माने दारू निषिद्ध मानली आहे. पण दुसऱ्या काही जणींनी मला सांगितले की, पारशी धर्मात मद्यपानाला परवानगी असो वा नसो, माझे अंतःकरण ह्या पारशी भगिनींकडे पाहून दुःखाने भरून जाते. जर हे दारू विकण्याचे विष फार काळ

टिकले तर तेवढा काळ तुमच्या लहान जमातीचा नाश करण्यास पुरेसा होईल.

माझ्या पारशी मित्रांनी श्रीकृष्णाबद्दल ऐकले असेल. त्याने लक्षावधी यादवांच्यासंबंधी जे भविष्य वर्तविले होते, तेही ऐकले असेल. श्रीकृष्णांनी त्यांना सांगितले की, जर तुम्ही सुरापान आणि व्यभिचार केलात तर तुमचा सारा वंश पृथ्वीच्या पाठीवरून नष्ट होईल आणि आता या बलाढ्य यादवांचे काय शिल्लक उरले आहे ? व्यभिचार हा मद्यपानाचा नजीकचा साथी नाही का ? दक्षिण आफ्रिकेतील माझ्या अनुभवावरून हे दारू पिणारे व दारू विकणारे कोण लोक असतात याची मला माहिती आहे. जे दारू विकतात त्यांना दारूबाजांच्या पातळीवर उतरावे लागते आणि त्यांचीही मनोवृत्ती तशीच होते. मला या गोष्टीचा फार अनुभव आहे. आणि सर्व देशभर मी जे प्रत्यक्ष पाहिले आहे तेच मी तुम्हांला सांगत आहे. माझे असेही मत आहे की, जे दारू विकतात ते प्रामाणिक असू शकत नाहीत. मी फक्त पारशी बांधवांना उपदेश करीत नसून भंडाऱ्यांनाही उपदेश करतो. त्यांनी मला असे लिहिले आहे की, आमचा नाश झाला आहे आणि आम्ही वीस किंवा पंचवीस वर्षांत हा धंदा सोडणार आहोत. तोपर्यंत या देशाला वाट पाहणे शक्य आहे काय ? एखादा चोर किंवा एखादा व्यभिचारी असे म्हणाला की, मी थोड्या दिवसांत माझा दुर्गुण सोडून देणार आहे तर त्यापासून देशाचा फायदा काय ? जर पारश्यांनी हा धंदा एकदम सोडून दिला नाही तर ते आपल्या जमातीला आणि देशाला हानी पोहोचवितील. दारूचा धंदा करून त्यांची जी बरवर भरभराट झाली तिचा त्यांनी विचार करता कामा नये. मी माझ्या पारशी मित्रांना अशी विनंती करतो की, त्यांनी आपल्या पारशी विधवांची काळजी घ्यावी. मग त्याकरिता कितीही खर्च लागो किंवा कितीही त्याग करावा लागो. असंख्य लोकांचे वाटोळे करून श्रीमंत होण्याऐवजी कोणताही प्रामाणिक धंदा करणे अधिक चांगले.

निरोधन हे कायमचे बंद होऊ शकेल असे मला कधीच वाटले नाही. रक्तपाताची मला भीती आहे. पण दारूचे पाप थांबविण्याकरिता मी कोणताही धोका पत्करण्यास तयार आहे. जोपर्यंत निरोधक अत्याचार करीत नाहीत तोपर्यंत सरकार काय करील याची मला पर्वा नाही. धारवाडला काय घडले हे मला ठाऊक आहे. मालेगावप्रमाणे लोकांनी चूक केली नाही याची मला खात्री आहे. मि. पेन्टर यांना अहमदाबादला पाठवितात हे ऐकून मला धक्का बसला. या कलेक्टरने निरपराधी लोकांच्या खुनांकडे

उघड उघड डोळे झाकलेल्याचा गुन्हा केला आहे. जर मि. पेन्टर हे अहमदाबादला जाण्याचे धाडस करतील, तर त्यांना तेथे पुष्कळच काम मिळेल. निरोधन थांबविण्याकरिता त्यांना अहमदाबादमधील निरपराधी मुलामुलींचे खून करावे लागतील. पेंटरसारखा अधिकारी गुजरातला पाठविणे हा गुजरातच्या लोकांचा अपमान आहे.

नंतर गांधींनी निरोधनासंबंधी आपले दरबानचे अनुभव सांगितले. तेथे चौदा पंधरा वर्षांची मुले भयंकर प्रतिकूल परिस्थितीत रागलोभाची पर्वा न करता आपले कर्तव्य बजावीत होती. नोंदणी कचेरीत आपले नाव नोंदविण्याकरिता आव्हान न स्वीकारता एकाही माणसाला जाऊ देत नसत. या तरुण माणसांनी अत्याचारांचा कधीही उपयोग केला नाही. साऱ्या देशात एकदम निरोधन झाले पाहिजे असे माझे मत आहे. तथापि आता त्या पद्धतीत असलेले दोष मला माहीत आहेत. वाईट माणसे निरोधन म्हणून घुसली आहेत हे मला ठाऊक आहे. म्हणून मी अशी सूचना केली आहे की, फक्त मुंबईत निरोधन ह्या महिनाअखेर थांबवावे. त्यात उद्देश असा की, तेवढ्या मुदतीत अधिक चांगली संघटना करावी आणि सारे मुंबई शहर व्यापावे. त्याशिवाय एक ऑगस्टपर्यंत परदेशी कापडाचा बहिष्कार संघटित करण्याकरिता सर्वांची जरूरी आहे. पण अखेरचा निर्णय काँग्रेस कमिटीचा. ‘ प्रजामित्र ’ने मला जसा हुकूमशहा बनविला आहे तसा मी नाही. ३२ कोटी लोकांनी काय करावे याचा हुकूम सोडणे मला शक्य नाही. मी फक्त सल्ला देऊ शकतो व मार्गदर्शन करू शकतो. दरम्यान दारू व्यापाऱ्यांनी सभोवार पाहावे आणि आपण काय करावे हे ठरवावे. दारू विक्री सोडून देऊन दुसरा धंदा करता येतो किंवा नाही ते पाहावे. जी दारू ते विकतात, ती निरपराध्यांच्या रक्ताने, धारवाडच्या घटनेने लांछित केली आहे. धारवाडच्या निरोधकांनी काहीही केले नव्हते अशी माझी खात्री आहे. त्यांनी कोणावरही हल्ला केला नाही. त्यांच्यावर लादलेले आरोप निराधार होते. माझी खात्री आहे की, पोलिसांनी दारू-मक्तेदारांच्याकडे कानाडोळा केला, आणि म्हणून ती जबाबदारी जितकी विकणाऱ्यांवर लादतो तितकीच अधिकाऱ्यांवरही लादतो.

पारशी जमातीच्या औदार्यामुळे, ज्ञानामुळे व धैर्यामुळे मी त्यांच्याकडून पुष्कळ गोष्टींची अपेक्षा करीत आहे. एका उर्मट कलेक्टरने धारवाडला काय केले हे त्यांना ठाऊक आहे. माझ्या दृष्टीसमोर असलेले उद्दिष्ट निरोधनाने साध्य होईल याची मला खात्री आहे. पण निरोधनाशिवाय शक्य तर हे व्हावे अशी माझी इच्छा आहे. मक्तेदार मला

सांगतील की, परवान्याचे पैसे आम्ही सरकारला देऊन चुकलो आहोत. जे सरकारला दिले असेल ते सरकारकडून सहज परत घेता येईल. तुम्ही सर्वांनी भरलेल्या रकमा परत घेण्याचा निश्चय केलात, तर तुमचा हेतू साध्य होईल. तुम्ही असहकारितावादी नसल्यामुळे आम्ही भरलेल्या रकमा परत करा असा अर्ज तुम्ही सरकारला करू शकाल, आणि जर तुम्हांला यश आले नाही तर दुसरे मार्ग उपलब्ध आहेत. जर हिंदुस्थानला सप्टेंबरपर्यंत किंवा डिसेंबरपर्यंत स्वराज्य मिळाले नाही, तर पारशी मक्तेदारांनी हे धरून चालावे की, सरकारला दिलेले पैसे हे भविष्यकालीन सरकारच्या खात्यात जमा होतील. तुमचे पैसे कधीही बुडणार नाहीत असे मी आश्वासन देतो.

पण तुम्ही इतके गरीब लोक आहात का की, हे पैसे बुडविण्यास तुम्ही समर्थ नाही ? नुकतेच मला एका पारशी दारू विक्रेत्याचे पत्र आले. त्यांत तो म्हणतो की, आम्ही जितके गरीब आहो असे दाखविले जाते तितके आम्ही गरीब नाही. तो म्हणतो की, विधवा ह्यादेखील गरीब नाहीत. त्यांच्याजवळ पुष्कळ पैसे आहेत, आणि त्यांच्या ह्या सांगण्यावर माझा विश्वास आहे. माझ्या वैयक्तिक अनुभवावरून त्या गरीब नाहीत हे मला ठाऊक आहे. आणि त्यांनी जर दारूविक्री सोडून दिली तर त्या रस्त्यावर येऊन पडणार नाहीत. तुम्ही असे भेकड बनू नका आणि परिणामाला घाबरू नका. तुम्ही शूर स्त्री-पुरुष म्हणून ताठ उभे राहा. पारशांनी समान दर्जा मागण्यात राष्ट्राबरोबर असावे अशी माझी इच्छा आहे. त्यांनी कोणत्याही प्रकारचा दुय्यम दर्जा सहन करता कामा नये. काही जणांनी मला असे सांगितले की, आमच्यातील काही लोक वीस वीस वर्षे ह्या धंद्यात आहेत, आणि तो धंदा सोडणे आता कसे शक्य आहे ? तथापि तुम्ही शांतपणे परिस्थितीचा विचार केलाच पाहिजे, आणि निश्चित निर्णयाला आलेच पाहिजे. मी या प्रश्नाचा थोडासा विचार केला आणि तुम्ही गरीब नसल्यामुळे तुम्हांला दुसरा कोणताही आवडणारा धंदा सहज सुरू करता येईल. तुम्ही एक कमिटी बनवा आणि नंतर यासंबंधी काय करावे याचा विचार करा. पण आशा सोडू नका अशी माझी विनंती आहे. तुम्ही कोणतेही इतर व्यवसाय व धंदे हाती घ्या आणि दारूचा धंदा भरभराटीस येतो तसे हे येतात का नाही ते पाहा. पण पहिल्यांदा ताबडतोब आणि या क्षणी दारूचा धंदा सोडणे हे तुमचे कर्तव्य आहे. पण देशाकरिता काही त्याग करावयाची तयारी असल्याशिवाय तुम्हांला स्वातंत्र्याचे रक्षण करता येणार नाही व स्वराज्य मिळणार नाही. त्यागानेच तुम्ही स्वराज्याला आणि संपूर्ण स्वातंत्र्याला लायक व्हाल.

तुम्ही आपल्या सामर्थ्यावर अवलंबून राहा आणि स्वतःवर विश्वास ठेवा. इंग्लिश राष्ट्र हेदेखील आत्मविश्वासाने पुढे आले. तुम्ही आशा सोडू नका व स्वतःवर विश्वास ठेवा अशी मी तुम्हांला विनंती करतो. तुमच्या-जवळ मागितलेला त्याग करण्याची बुद्धी परमेश्वर तुम्हांला देईल.

नंतर गांधींनी व्यापारी विचारतील त्या प्रश्नांची उत्तरे आपण देऊ असे सांगितले.

'मुंबई क्रॉनिकल', १२-७-१९२१

१७४. टिप्पणे

सरहद्दीवरील मित्र

मी सरहद्दीवरील मित्रांना जी विनंती केली होती, त्यासंबंधी बन्नूच्या महंमद नवेझखान, बी. ए., एलएल. बी., यांनी एक लांबलचक पत्र लिहिले आहे. सारे पत्र देण्याऐवजी मी त्याचा थोडक्यात सारांश देणार आहे. यंग इंडियाच्या स्तंभांत सारे पत्र देणे विषयाला सोडून होईल. त्यांना वाटते, ज्या टोळीवाल्यांना हा संदेश पोहोचेल त्याला ते आनंदाने साद देतील. टोळीवाल्यांचा मुलूख कसा खालसा केला त्याचा इतिहास त्यांनी दिला आहे. आणि त्यावरून असे दाखविले आहे की, हे मुलूख खालसा केले जाण्यापूर्वी तेथे हल्ले होत नसत. याशिवाय सर्वच जण सारखेच सशस्त्र असल्या-मुळे ज्यांच्यावर हल्ले होत, ते स्वतःचे चांगले रक्षण करू शकत. पण मुलूख खालसा झाल्यानंतर ज्या टोळीवाल्यांच्या जमिनी गुमानपणे लुबाडण्यात आल्या ते टोळीवाले खालसा मुलुखात राहणाऱ्या हिंदू व मुसलमानांना आपले शत्रू मानू लागले. त्यांचे अधिक शत्रू मुसलमान होते कारण त्यांनी टोळीवाल्यांना शरण आणण्यास सरकारला मदत केली. हे लेखक आपल्याला ह्या परिस्थितीचा निकटचा परिचय आहे असे सांगून म्हणतात की, टोळीवाल्यांना धर्माबद्दल आदर नाही, आणि त्यांनी आपल्या लुटालुटीत हिंदू व मुसलमानांना सारखेच छळले आहे. हल्लेखोरांच्या विरुद्ध हिंदूंना मुसलमानांनी मदत केल्याचा दाखला कोठेही नाही. निःपक्षपातीपणाचा पुरावा म्हणून लेखकाने सरहद्दीवरील टोळ्यांच्या स्वतंत्र मुलुखात हिंदूंना किती जिव्हाळ्याने वागवितात याचे उदाहरण दिले आहे. ते म्हणतात की, तेथे राहणाऱ्या हिंदूंना ब्रिटिश मुलुखापेक्षाही

पूजास्वातंत्र्य अधिक आहे. ब्रिटिश सरकारमधील दर्जापेक्षा त्यांचा तेथील सामाजिक दर्जा अधिक चांगला आहे. तेथील मालिक[1] हे आपल्या अधिकारक्षेत्रात राहणाऱ्या हिंदू मित्रांचा सर्व शक्तीनिशी बचाव करण्यास नेहमीच तयार असतात. जे रहिवासी दुर्दैवाने तथाकथित ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षक पंखाखाली आले आहेत, त्यांना संरक्षण देण्याचे कर्तव्य सरहद्द प्रांतातील ब्रिटिश सरकारने सोडून देण्याचे पातक केले आहे, असा लेखकाने आपला निर्णय दिला आहे. सरहद्द प्रांतातील कायदेकानू अभ्यसनीय आहेत. तेथील सर्व कारभार जुलमी आहे आणि तेथील लोकांचे जीवित व वित्त लष्करी अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे व त्यांना न्यायनिवाडे करण्याची पात्रता नाही असे म्हणून लेखकाने आपले पत्र संपविले आहे. ते म्हणतात; येथील एक्स्ट्रॉ-असिस्टंट कमिशनर्स आपल्या कामाला लांछन लावतात व ते अन्याय व जुलूम यांचे हस्तक बनतात. या शासकांच्या हाती कोणाचीही अब्रू सुरक्षित नाही. अगदी थोड्याशा संशयावरून कोणाही सभ्य माणसाला कैदेत टाकण्याची त्यांना सत्ता आहे.

एक हिंदी गणराज्य ?

एक आदरणीय लेखक लिहितात :

> जर नाताळापूर्वी आपल्या लढ्यासंबंधी काही तडजोड झाली नाही तर अहमदाबाद येथील काँग्रेस अधिवेशनात हिंदी गणराज्य पुकारले जाईल अशी जी निवेदने मौलाना महंमदअली शौकतअली यांनी काढली आहेत याकडे आपले लक्ष वेधले गेले असेलच. या निवेदनाला विशेष महत्त्व आहे. कारण ते निवेदन कोणाही बेजबाबदार माणसाने केलेले नसून मौलानांसारख्या जबाबदार पुढाऱ्यांनी केले आहे. तथापि हे निवेदन दुर्दैवी व अकाली आहे आणि ते काँग्रेसने जो कार्यक्रम देशापुढे मांडला आहे त्याच्याआड येण्याची शक्यता आहे असे वाटते. एकंदरीत देशाने काँग्रेसच्या आवाहनाला सुंदर रीतीने उत्तर दिले आहे; आणि काही वर्ग वगळले तर देश स्वराज्य मिळविण्याकरिता कार्य करण्यास तयार आहे. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, तुम्ही मौलानांच्या निवेदनाबद्दल आपली मते सांगावीत आणि जनतेला असे आश्वासन द्यावे की, काँग्रेसने स्वीकारलेल्या अनत्याचारी असहकारी धोरणापासून आम्ही परावृत्त होणार नाही.

मौलानांची घोषणा मी पाहिली नाही, हे कबूल करताना मला दुःख होते. पण मी बिनदिक्कत असे आश्वासन देतो की, देशाने विचारपूर्वक जे अनत्याचारी असह-

१. टोळ्याचा नायक.

कारितेचे धोरण स्वीकारले त्यापासून केसभरही देशाने परावृत्त होण्याचे टाळावे म्हणून याकरिता मी प्रयत्नांची शिकस्त केल्याशिवाय राहणार नाही. त्या धोरणापासून अलीबंधू परावृत्त होतील अशी मला यत्किंचितही भीती वाटत नाही. तथापि मौलानांचे मन समजणे मला कठीण नाही. पंजाब आणि खिलाफतीच्या बाबतीत जर हिंदुस्थानला न्याय मिळाला नाही तर काँग्रेसच्या येत्या अधिवेशनात हिंदुस्थान स्वातंत्र्य पुकारील असे म्हणण्यास ते अगदी समर्थ आहेत. साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची शक्यता तेव्हांच असू शकेल की जेव्हा इंग्लंड आपल्या हाताला लागलेला खिलाफतीच्या वचनभंगाचा आणि जालियनवाला कत्तलीचा डाग साफ धुवून काढतील. स्वातंत्र्याची मागणी शक्य व्हावी याकरिताच काँग्रेसचे ध्येय पुरेसे लवचिक ठेवले आहे. मौलानांनी अखेरीस फारसे पुढे न जाता, जर ते पुढे गेले असलेच तर, त्यांनी मि. अँड्र्यूज यांच्या मताची पुनरुक्ती केली आहे. मि. अँड्र्यूज यांना असे वाटते की, स्वाभिमानी व स्वयंशासक हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्यात जागा नाही. पण माझे ते मत नाही. पण मि. अँड्र्यूज यांना अशी आशा आहे की, कोठल्या तरी दिवशी मला ती भूमिका घेणे भाग पडेल. माझी मनोवृत्ती निराळी आहे. कमीत कमी शक्यता असेपर्यंत मी माझी आशा कधी सोडत नाही. ब्रिटिश लोकांवर माझा पुरेसा विश्वास आहे आणि म्हणून मला वाटते की, त्यांनी जरी आमच्या निश्चयाची आणि शक्तीची आटोकाट परीक्षा केली तरी ती परीक्षा संबंध तुटेपर्यंत करणार नाहीत. जो हिंदुस्थान जागृत झाला आहे, व जो बलाढ्य आहे, तो डायरशाही व ओडवायर यांना पाठीशी घालण्याकरिता हातातून सोडावा आणि ग्रीकांच्या मैत्रीच्या संभाव्य फायद्याकरिता हिंदुस्थान हातांतून जाऊ द्यावा असे ब्रिटिशांना कधीही वाटणार नाही, इतके ते आत्महितदक्ष आहेत. परंपरारूढीविरुद्ध असलेली प्रामाणिक बुद्धीही जरी शूर तुर्कांच्या न्याय्य आकांक्षांच्या अज्ञानाने विरोधी असली तरी दररोज वाढत जाणाऱ्या हिंदुस्थानच्या शक्तीच्या ताणापुढे ती शरण आल्याशिवाय राहणार नाही. काँग्रेस बैठकीपूर्वी जर हिंदुस्थान स्वतःशी प्रामाणिक ठरला, तर मला स्वातंत्र्य पुकारण्याऐवजी सन्मान्य तडजोडीची आशा वाटते. ती तडजोड पंजाब व खिलाफतींच्या न्याय्य मागण्या पुऱ्या करणारी ठरेल आणि हिंदुस्थानच्या निवडक प्रतिनिधींच्या इच्छेनुसार ताबडतोब पूर्ण स्वराज्याची ग्वाही देईल. तथापि माझे जे हे भविष्य आहे, ते मला सिमला किंवा व्हाइट हॉलमध्ये चाललेल्या काही माहितीवर आधारलेले आहे असे वाचकांनी समजू नये. पुढील तीन महिन्यात हिंदुस्थान आपले म्हणणे ठामपणे मांडण्याइतका समर्थ होईल या माझ्या दृढ विश्वासावर आधारलेले आहे. याचाच अर्थ पुढील आणि तीन महिन्यात हिंदुस्थान परदेशी कापडावरील बहिष्कार पूर्ण करण्यास समर्थ होईल तो स्वतःवर अधिक नियंत्रण घालून अत्यंत तीव्र प्रकारचा सविनय कायदेभंग स्वीकारण्याइतकी आपली शक्ती दाखवील, असे वाटण्यावर माझे भविष्य आधारलेले आहे.

वाटेतील अडचणी

तथापि आपल्या मार्गात ज्या अडचणी विखुरलेल्या आहेत त्या मला दिसत नाहीत असे नाही. अलिगडची बातमी[१] अस्वस्थ करणारी आहे. मी **इंडिपेंडंट पत्रात** सरकारची व इतर बाजू पाहिली आहे. जर माझे चुकत असेल तर मी अलीगडच्या लोकांची माफी मागेन; पण इंडिपेंडंटच्या बातमीदाराची हकिकत ही टाळाटाळ करणारी आहे व तीमध्ये पुष्कळच सिद्ध करण्याचा प्रयत्न आहे. जमावाने जाळपोळ केली हे त्यात नाकारलेले नाही. आणि जमावाला सर्वस्वी दोषमुक्त ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. अलीगडमधील अधिकारीवर्ग यत्किंचित प्रक्षोभक कारण नसता बेफामपणे आणि दुष्टपणे वागला हे सिद्ध करण्याकरिता मला अत्यंत बळकट पुराव्याची जरूरी लागेल. जमावाचे आक्रमक निदर्शन पोलिसांना टाळावयाचे होते आणि तसे करताना त्यांचा स्वतःवरील ताबा सुटला व त्यांनी फैरी झाडल्या, हे समजून घेण्याची माझी तयारी आहे. तथापि माझे म्हणणे असे की, आपल्या बाजूने आक्रमक वृत्ती नसावयास पाहिजे होती. असहकारितावाद्यांनी दरडाविता किंवा धाकदपटशा दाखविता कामा नये. आपण एक दुर्दमनीय धैर्य आपणात वृद्धिंगत करीत आहोत. ते धैर्य येण्यास ईश्वरावर अवलंबून राहिले पाहिजे. म्हणजेच दुसऱ्या शब्दात ते धैर्य येण्यास आपल्या कार्याच्या न्याय्यपणावर आपली नितांत श्रद्धा असली पाहिजे. जर आपल्याला आपला कार्यक्रम याच वर्षात यशस्वीपणे पुरा करावयाचा असेल तर धमकावण्या दाखविण्यास किंवा शक्तीचे प्रदर्शन करण्यास आपल्याजवळ वेळ नाही. आपण आपल्या प्रतिज्ञेशी कटाक्षाने सत्यनिष्ठ असले पाहिजे. जर आपण विचार, उच्चार आणि आचार यात अनत्याचारी राहिलो तर आपण अपेक्षेबाहेर यशस्वी होऊ. ते आपले शेवटचे तत्त्व नाही. पण आपले ध्येय गाठण्याकरिता सध्या ते तत्त्व असलेच पाहिजे. ज्याप्रमाणे आपण आपल्या शत्रूचे अनहित करण्यापासून स्वतःला सावरणे हे एकूण सोपे आहे असे पाहिले; त्याचप्रमाणे आपल्या शत्रूविषयी वाईट न बोलणे किंवा वाईट विचार न करणे यात अडचण येण्याचे कारण नाही. अत्याचार आणि असत्य नसले तरी अतिशयोक्ती यांच्यावर पांघरूण घालण्याकरिता आपण आपल्या अनत्याचार आणि सत्याच्या प्रतिज्ञेचा उपयोग करू नये, त्याचप्रमाणे आपले जे श्रेष्ठ साथी असतील त्यांच्या तुरुंगात जाण्याची आपण भीती बाळगू नये मी अनेक वेळा व्यक्त केलेला विश्वास कायम आहे की, पंडित सुंदरलाल आणि आता पंडित माखनलाल[२] हे दोघेही आपल्या प्रामाणिकपणाबद्दल तुरुंगात जाऊन लोकांची ते मोकळे राहण्यापेक्षा अधिक सेवा करीत आहेत. माझ्या मताने ज्यांचे विचार यापेक्षा भिन्न असतील त्यांना असहकारितेची शक्ती समजलेलीच

१. तसेच पाहा, "अलिगडच्या लोकांना संदेश. १६-७-१९२१."

२. पंडित माखनलाल चतुर्वेदी; सुप्रसिद्ध हिंदी कवी व देशभक्त; कर्मवीरचे संपादक.

नाही. या महान चळवळीच्या पाठीमागे जी प्रचंड शक्ती आहे, ती तोंडाने प्रचार करण्याची नाही. पण एका पागल सरकारला आपल्या तपश्चर्येने निरपराधी बळी म्हणून जो मूक प्रचार केला जातो त्याच्यात सामावलेली आहे.

एका दुःखिताचे पत्र

पंडित सुंदरलाल यांना अटक होण्यापूर्वी काही दिवस त्यांनी मला एक लांबलचक पत्र लिहिले. त्यातील सुसंगत भागाचे मी खाली मुक्त भाषांतर देत आहे. ते पत्र केवळ माझ्या प्रबोधनाकरिता लिहिले होते हे सांगण्याची जरूरी नाही. ते सारे पत्र मला सरळ व निष्कपटी वाटले.

> मी स्वराज्यप्राप्तीकरिता अनत्याचारावर पक्का विश्वास ठेवणारा झालो आहे. माझ्या बुद्धिमत्तेने ते तत्त्व पूर्णपणे ग्रहण केले आहे. ते शस्त्र केवळ दुर्बलांचे नसून तितकेच सबलांचे आहे असे मी मानू लागलो आहे. तथापि मला हे कबूल करावेसे वाटते की, अनेक वर्षेपर्यंत त्याच्या-विरुद्ध असलेला व खोटा अत्याचाराचा सिद्धांत प्रमाण मानीत असे. म्हणून मी नव्या कल्पनेनुसार माझे जीवन प्रयत्नपूर्वक पुनर्घटित करीत आहे. माझा तुरुंगवास जवळ आला आहे अशा भावनेने जर मी अस्वस्थ होत असेन तर त्याचे कारण मी मध्यप्रांतात सुरू केलेले काम. माझ्या एकाही बेसावध उद्गारामुळे जर त्या कामाची हानी झाली तर मला दुःख होईल. पण सध्या मला जो आनंद आणि समाधान होत आहे, त्याचे कारण ब्रिटिश तुरुंगातील कडक शिस्तीमुळे माझे जीवन कदाचित अधिक चांगले घडविले जाईल हा विचार. तुरुंगात मरणे किंवा मानवाच्या सेवेकरिता जीवनाला ठाकठीक आकार येणे (नव्या पद्धतीप्रमाणे) हे मला तितकेच आनंददायक आहे. म्हणून मी नजीक आलेल्या अटके-बद्दल पूर्णपणे तयार आहे.

जे शेकडो असहकारितावादी तुरुंगवास भोगत आहेत ते पंडित सुंदरलाल यांच्याच वृत्तीने प्रेरित झालेले आहेत अशी माझी खात्री आहे. अलीगडच्या लोकांनी आपल्या साथीदाराला आनंदाने पकडू द्यावयास पाहिजे होते. ते त्याची जागा घेऊ शकले असते व त्याचे काम करू शकले असते. आपल्या सहकाऱ्यांनी जर जागा मोकळ्या सोडल्या असतील तर त्या भरून काढणे एवढेच आपले काम. आपल्यापुढे आखीव कार्यक्रम आहे. तो शेवटास नेणे म्हणजेच आपल्याला हवे आहे ते मिळविणे.

‘ जमीनदारा ’ला धमकी

लाहोरच्या ‘ जमिनदार ’ पत्राचे संपादक जाफर अलिखान हे तुरुंगात जाईपर्यंत ते

पत्र चालवीत होते आणि आता त्यांचा मुलगा ते चालवीत आहे. त्याच्यावर खटल्याची तलवार लटकते आहे असे मला समजते. जर संपादकाला फौजदारी टाळावयाची असेल तर त्याने खोटी माफी लिहून द्यावी असे त्याला सांगण्यात आले आहे. त्यांनी जी काही विधाने केली आहेत व ज्यांवर त्यांचा विश्वास आहे ती त्यांनी परत घ्यावी असे त्याला सांगण्यात आले. त्यांतील एक विधान म्हणजे नाझेफवर केला गेलेला भडिमार. ही बातमी त्याने दुसऱ्या पत्रातून घेतली. हजारो मुसलमानांचा त्या भडिमारावर विश्वास आहे. त्याने सरकारला असे आश्वासन दिले आहे की, जर जबाबदार स्वतंत्र मुसलमान त्या जागी जातील, त्या गोष्टीची चौकशी करतील आणि भडिमाराचे सत्य नाकारतील तर मी माझे विधान परत घेण्यास तयार आहे. हे त्यांचे सांगणे पूर्णपणे सन्माननीय आहे असे कोणीही कबूल करील. त्यांनी एक तेजस्वी कविता प्रसिद्ध केली आहे. त्यांतील काही ओळींचा अर्थ अत्याचाराला उत्तेजनपर लावता येईल. त्या ओळींकरिता असहकारितावादी म्हणून त्यांनी माफी मागण्याची तयारीही दर्शविली आहे. ती माफी खटल्याच्या भयामुळे नव्हे; पण आपल्या अनत्याचाराच्या श्रद्धेविषयी चुकीच्या भूमिकेत त्यांना पदार्पण करावयाचे नाही. जे सरकारने तिसरे विधान आक्षिप्त म्हणून ठरविले आहे ते बंगालमधील एका खटल्याच्या अहवालाबद्दल आणि त्यावरील टीकेबद्दल आहे. त्या खटल्यात एका युरोपियनाने आपल्या खानसाम्याला ठार मारले व कोर्टाने त्याला ३०० रुपये दंड केला अशी बातमी छापली आहे. ब्रिटिश कोर्टे युरोपियन लोकांना ३०० रुपयांच्या दंडावर हिंदी लोकांना ठार मारण्याचा परवाना देतात त्या टीकेला हरकत घेण्यात आली आहे. अर्थातच ही टीका जरा कडक आहे, पण ह्या टीकेत अत्याचाराला उत्तेजन दिलेले नाही. आणि ती टीका असमर्थनीयही नाही. कारण वृत्तपत्रात अलीकडे न्यायाच्या अधिक्षेपाची कित्येक उदाहरणे आलेली आहेत. हिंदी लोकांच्या मनात युरोपियन व हिंदी लोक यांना समान न्याय मिळणे ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे, ही समज किती खोलवर गेलेली आहे याची सरकारला कल्पना नाही. चौथा आरोप जो 'जमीनदार'विरुद्ध आहे, तो त्याने मौलाना महंमद अलींच्या अफगाण बागुलबोवासंबंधी उद्धृत केलेल्या निवेदनासंबंधी आहे. संपादक आणि सार्वजनिक कार्यकर्ते यांना खटल्याचे भय दाखवून त्यांच्याकडून माफी घेण्याची कल्पना ही अलीबंधूंच्या माफीची विनोदी नक्कल आहे. कारण संयुक्त प्रांताचे सरकार 'इंडिपेंडंट' पत्राच्या संपादकावर व इतरांवर हाच प्रयोग करण्याचा प्रयत्न करीत आहे. स्वाभिमानी असहकारितावाद्याकडून माफी लिहून घेण्याच्या सरकारच्या अश्लाघ्य प्रयत्नाचा अलाहाबादला काय परिणाम झाला हे मला ठाऊक नाही. यापेक्षा अधिक सरळ व अधिक सन्माननीय मार्ग म्हणजे सरकारला न आवडणाऱ्या सर्व असहकारितावाद्यांना तुरुंगात घालणे हा आहे. पंजाबमध्ये ज्या प्रकारचे अपमान केले, त्यापेक्षा अधिक अपमानकारक माफ्या मिळविण्याच्या सूक्ष्मतर मार्गाकडे त्यांनी (सरकारने) वळू नये.

सहकारिता व असहकारिता यांची व्याख्या

ज्यांना बडादादा असे प्रेमाने म्हटले जाते, ते द्विजेंद्रनाथ टागोर आपल्या वृद्धापकालात आणि शांतिनिकेतनच्या एकांतात देशात काय चालले आहे याचे सूक्ष्म अवलोकन करतात ही देशाच्या दृष्टीने लहान सहान गोष्ट नाही. मि. अँड्र्यूज यांनी त्यांचे असहकारितेवरील ताजे विचार मुक्त भाषांतर करून प्रसृत केले आहेत. जरी ते सर्व भाषांतर दैनिकात प्रसिद्ध झाले असले तरी त्यांच्या सहकारिता आणि असहकारितेच्या व्याख्या मला उद्‌धृत करण्याचा मोह आवरत नाही. त्या अगदी खऱ्या व परिणामकारक आहेत. सहकारितेबद्दल ते म्हणतात :

> जगाच्या नजरेपासून आपली जुलुमी कृत्ये लपविण्याकरिता आमच्या राज्यकर्त्यांनी कायदेमंडळाच्या रूपाने एक बाहुल्यांचे प्रदर्शन भरविले आहे. त्यात काही मैदानी वक्त्यांना सहकारिता करण्याकरिता आवाहन केले आहे. आमच्या राज्यकर्त्यांना असे वाटते की, त्यामुळे त्यांनी आमच्यावर कृतज्ञतेचे कायमचे ऋण करून ठेवले आहे. पण वास्तविक त्यांनी जखमेवर मीठच चोळले आहे. ह्या कायदेमंडळांनी आता आम्हांला मिठी मारली आहे; आणि ती सिंदबाद खलाशाच्या गोष्टीतील म्हाताऱ्या माणसाला जसा गुदमरून टाकला तशी गुदमरून टाकण्याची भीती आम्हांला दाखवीत आहे. आमच्या इंग्रजी राज्यकर्त्यांच्या कल्पनेप्रमाणे सहकारितेचा हाच अर्थ असेल तर आमच्या दृष्टीने असहकारितेचा अर्थ काय हे समजणे कठीण नाही. ज्यामुळे आमच्या राष्ट्रावर आपत्ती येईल अशी कोणतीही गोष्ट आम्ही केव्हाही स्वीकारणार नाही. मग ती नाकारण्यात आमचे प्राण गेले तरी हरकत नाही. त्यालाच असहकारिता म्हणतात.

अनुकरण करण्यालायक

म्युनिसिपालिटी किंवा कायदेकौन्सिले यात लढताना मि. विठ्ठलभाई पटेल हे जितके खुषीत असतात तितके दुसरे कशात नसतात. त्यांनी ठाणे जिल्हा बोर्डात जेव्हा पुढील ठराव मांडला व पास करून घेतला तेव्हा चालू महिन्याच्या ६ तारखेला त्यांच्या उत्साहाला बहर आला होता.

> १. हे बोर्ड अशाबद्दल दुःख प्रदर्शित करते की, दारूची विक्री वाढत आहे आणि तीमुळे सार्वजनिक नीतिमत्ता, आरोग्य आणि संपत्ती यांचा नाश होत आहे.

२. हे बोर्ड ते पाप नष्ट करण्याकरिता लोकप्रिय चळवळीचे स्वागत करते आणि ज्या संघटकांनी सार्वजनिक सेवेची वृत्ती दाखविली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

३. आपल्या अधिकारक्षेत्रात दारू विक्रीला प्रतिबंध करण्याची सत्ता आपल्याला नाही ही गोष्ट बोर्ड खेदपूर्वक नमूद करते. म्हणून बोर्डाचे असे मत आहे की, त्याने स्वतःच्या जबाबदारीवर निरोधनाचे कार्य हाती घेण्याकरिता आपल्याला जे अधिकार आहेत, त्याचा फायदा घ्यावा, काँग्रेस कमिट्यांना मदत करावी आणि जे दारूविक्रेते आपणहून आपली दुकाने बंद करतील त्यांना नुकसानभरपाई द्यावी.

४. वरील उद्दिष्टांकरिता बोर्ड या ठरावान्वये एक कमिटी नेमीत आहे. त्या कमिटीत अध्यक्ष, उपाध्यक्ष– ठराव मांडणारे आणि मि. आचार्य हे सदस्य असावेत. त्यांना निरोधन चालविण्याची किंवा नियंत्रित करण्याची सत्ता असावी आणि त्यांनी संपूर्ण दारूबंदी घडवून आणावी.

५. हे बोर्ड सदर कमिटीला सुरुवात म्हणून तीन हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च न करण्याचा अधिकार देत आहे. आणि पुढे जरूर पडल्यास अधिक खर्च करण्यास तयार होईल.

ही निखालसपणे धाडसाची गोष्ट आहे. जर बोर्डाने आपले ठराव अंमलात आणण्याचा पिच्छा पुरविला व आपल्या हद्दीतील दारू दुकाने त्वरित बंद केली तर बोर्ड वैभवशाली होईल व देशाची अमोल सेवा करील. मि. पटेल त्यांच्या उपक्रमाचे अनुकरण साऱ्या हिंदुस्थानातील इतर सभासद आणि कौन्सिलर्स करतील अशी मला आशा आहे. साऱ्या हिंदुस्थानातील लोकल बोर्ड व नगरपालिका जर एकदम उठाव करतील तर सुधारकांचे हात बळकट होतील आणि सरकारला ही गोष्ट करण्यास भाग पाडतील. निरोधक पोलिस गुत्तेवाले यांच्यातील तिरंगी लढत, जी हातघाईवर येण्यामुळे अत्याचाराचे संकट आणणार आहे ते सर्व कदाचित यामुळे टळेल.

हत्यारांचा कायदा

कांगडी गुरुकुलाच्या असिस्टंट गव्हर्नरचा हत्यारांचा परवाना पुढे चालू ठेवण्यास बिजनोर जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटने जो नकार दिला तो स्वामी श्रद्धानंदांनी उजेडात आणला. नव्या सुधारणा किती निरुपयोगी आहेत त्याचे ते नागडे उघडे प्रदर्शन होते. स्वामी श्रद्धानंदांचा जो तर्क आहे की, हा नकार मी असहकारितेशी पूर्णपणे एकरूप झाल्यामुळे देण्यात आला आहे, तो तर्क खरा ठरला तर त्यामुळे असे सिद्ध होईल की, लोकांच्या दैनंदिन गोष्टींसंबंधी शासनाच्या पद्धतीत, किंवा अधि-

कार्‍यांच्या वर्तनात बिलकूल बदल झालेला नाही. त्याला अपवाद म्हणजे असहकारितेच्या दाबामुळे करावयास लागलेले बदल. स्वामी श्रद्धानंदांसारख्या प्रसिद्ध नागरिकांच्या बाबतीत बिजनोरच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटने जी कठोरपणाची बेपर्वाई दाखविली त्या गोष्टीला मात्र जनता तयार नव्हती. मी त्या बेपर्वाईला निष्ठुर असे म्हटले, त्याचे कारण बंदुकीचा परवाना शिकारीकरिता नको होता; पण क्रूर श्वापदांनी व्यापलेल्या जंगलामध्ये आत्मरक्षणाकरिता हवा होता.

खोट्या सबबीखाली !

पंडित माखनलाल चतुर्वेदी यांच्या खटल्या व शिक्षेविषयी मी पूर्वीच उल्लेख केला आहे. कोर्टापुढील त्यांच्या निवेदनाची नक्कल आता माझ्या हाती आली आहे. त्यांनी पुरावा देऊन किंवा अन्य मार्गाने स्वतःचा बचाव करण्याचे नाकारले. त्यांनी कोर्टापुढे जबानी दिली आणि अनत्याचाराच्या आपल्या श्रद्धेची पुनरुक्ती केली. जर पंडित माखनलाल यांच्या निवेदनावर विश्वास ठेवावयाचा असेल तर त्यांच्यावर जो खटला झाला तो खरोखर सरकारच्या दृष्टीने प्रत्यक्ष जो गुन्हा होता त्याकरिता झाला नसून एका निरुपद्रवी भाषणाबद्दल झाला. हे समजल्यावर माझ्याप्रमाणे वाचकही आश्चर्यचकित होतील. माझ्या मनात जो निवेदनाचा भाग आहे, तो पुढे दिला आहे. त्यावरून असे दिसेल की, जेव्हा खटला करण्याचे ठरले तेव्हा माखनलालजींचे भाषणच झाले नहते.

> जबलपूरला प्रसिद्ध होणाऱ्या "कर्मवीर"चा मी संपादक आहे. वृत्तपत्रीय कर्तव्य करीत असताना मला लोकांची अनेक गाऱ्हाणी चव्हाट्यावर आणावी लागली, आणि प्रांतातील अनेक शासकीय उपायांबद्दल टीका करावी लागली. नरसिंहपूरच्या जिल्हा कारभाराची छीः थू झाली होती, आणि डेप्युटी कमिशनर मि. जे. सी. बोर्न यांच्या कारभाराशी संलग्न असलेल्या अनेक कलंकित गोष्टींचा माझ्या पत्रात निर्भयपणे स्फोट करणे हे माझे कर्तव्य झाले होते. तेथील स्थानिक अधिकारी पद्धतशीरपणे लोकांच्यावर जुलूम करीत होते. आणि कायदेमंडळात सांगितल्याप्रमाणे 'पोलिस दलाची एक तुकडी एका खेड्यावर चाल करून गेली, तिने लोकांना छळले, त्यांच्या तोंडावर ते थुंकले, त्यांना बुटाने लाथा मारल्या, त्यांना पकडले व त्यांना वाईट वागणूक दिली, कित्येक दिवस त्यांना उपाशी ठेवले आणि शेवटी स्त्रियांचा मानभंगही केला.' या गोष्टी मी उघडकीस आणल्यामुळे मी सरकारच्या क्रोधाचा विषय झालो. आणि १२ मार्च १९२१ रोजी बिलासपूर परिषदेत भाषण केल्यामुळे मध्यप्रांत सरकारने माझ्यावर खटला भरावा यात मला आश्चर्य वाटत नाही. सर-

कारच्या गृहमंत्र्यांनी ४ मार्च रोजी मध्य प्रांताच्या कायदेमंडळात असे जाहिर रीतीने सांगितले की, माझ्यावरील खटला सरकारच्या मंजुरीची वाट पाहात आहे. मी असे म्हणतो की, जर मी नरसिंहपूरच्या बोर्न राजवटीच्या भ्रष्टाचाराचे स्वरूप निर्भयपणे उघडकीस आणले नसते तर हा खटलाच भरला गेला नसता. १२ मार्च रोजी बिलासपूरच्या जिल्हा परिषदेत भाषण केल्याचे मी कबूल करतो. पण जोरदारपणे असे प्रतिपादन करतो की, सरकारी बातमीदारांनी माझ्या भाषणाचा अहवाल जो सादर केला आहे, त्यात माझे विचार आलेले नाहीत, किंवा तो मी सभेत केलेल्या भाषणाचा प्रामाणिक किंवा बरोबर अहवाल नाही. मी हिंदी राष्ट्रीय काँग्रेसच्या अनत्याचारी असहकारितेच्या ध्येयाचा कडक व एकनिष्ठ अनुयायी आहे, आणि नागपूरच्या बैठकीत जो ठराव झाला त्याचे शब्दशः आणि अर्थशः प्रामाणिकपणे आचरण करीत आहे.

अशा प्रकारे सरकारने ४ मार्च रोजी खटला भरण्याचा निर्णय घेतला. पण प्रत्यक्ष खटला जो भरला तो १२ मार्च रोजी केलेल्या भाषणाबद्दल. नरसिंहपूर येथील कारभार उघडकीस आणल्याबद्दल त्यांच्याबर का खटला भरला नाही ? नरसिंहपूरच्या राज्यकारभाराबद्दल जे आरोप आहेत त्यांत काही सत्य आहे की नाही हे मला ठाऊक नाही. पण कोठे तरी काही तरी खात्रीनेच फार चुकत आहे.

देवनिंदा

एक लेखक लिहितात :

मला कळविण्यास अत्यंत दुःख होते की, आम्ही नेहमी अशी चित्रे पाहतो की, तुम्ही व इतर पुढाऱ्यांना अनुक्रमे श्रीकृष्ण व पांडव म्हणून दाखविले आहे. जे आम्ही कित्येक लोक श्रीकृष्णाला मोठाच माणूस समजत नाही तर देवाचा अवतार समजतो अशांच्या धार्मिक भावना ज्या दुखावल्या जातात, त्या दुखावल्या जाऊ नयेत म्हणून तुम्ही हे थांबविण्याकरिता आपले वजन खर्च कराल का ?

लेखकाला माझी पूर्ण सहानुभूती आहे. मी ती चित्रे पाहिली नाहीत. पण मला श्रीकृष्ण आहे असे दाखविणे ही मी देवनिंदा मानतो. मी एक स्वतःला नम्र सेवक समजतो. आणि या मोठ्या कार्यात जे मोठे लोक आहेत त्यापैकीच स्वतःला एक मानतो. त्या कार्यातल्या पुढाऱ्यांचे स्तोम माजविल्याने कार्य वाढण्याच्या ऐवजी त्याला हानीच पोहोचेल. जेव्हा कोणतेही कार्य त्याच्या गुणावगुणावरून तपासले व अनुसरले जाते तेव्हा त्याला यशाची चांगली संधी लाभते. प्रगतिमान समाजात साधनांना माणसापेक्षा श्रेष्ठ समजले पाहिजे. काही असले तरी माणसे ही त्या कार्याच्या सिद्धीकरिता झटणारी

अपुरीच साधने आहेत. म्हणून मी माझ्यात जी शक्ती आहे त्या सर्व शक्तीनिशी उत्साही व धाडसी धंदेवाइकांना काही तरी विवेकाचे तारतम्य पाळा आणि अशी चित्रे ताबडतोब रद्द करा असे सांगू इच्छितो. प्रस्तुत चित्राप्रमाणेच अशी चित्रे खोल धार्मिक भावनांना धक्का देण्यास कारणीभूत होतात.

कराचीच्या शाळा

मि. जगतियानी यांनी आपल्या शाळेसंबंधी जो महत्त्वाचा खुलासा पाठविला तो पूर्वीच न प्रसिद्ध केल्याबद्दल मी त्यांची क्षमा मागतो. खरी गोष्ट अशी आहे की, माझ्या सतत चाललेल्या प्रवासात माझ्या सर्व पत्रव्यवहाराचा समाचार मी घेऊ शकत नाही. मुंबईस विश्रांतीसाठी थोडा वेळ मिळाल्यामुळे मी शिल्लक राहिलेली पत्रे संपविण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि मला नुकतेच हे पत्र सापडले. त्या पत्रातील सुसंगत भाग पुढीलप्रमाणे.

> शाळांच्या संशयास्पद पैशांच्या विषयासंबंधी एक पत्र यंग इंडियात अगोदरच प्रसिद्ध झाले आहे. लेखकाशी मी सहमत आहे. ज्या टिळकालयाबद्दल माझ्या काही विरोधकांनी अफवा उठविल्या असे दिसते त्याचा मी प्राचार्य आहे. मी असहकारिता केल्यानंतर एक महिन्याने गेल्या नोव्हेंबरात ही शाळा काढण्यात आली. खिलाफत कमिटीकडून मदत मिळविणे शक्य न झाल्यामुळे मी वैयक्तिक पाठिंब्यावर अवलंबून राहिलो. नवी शाळा आपल्या पायावर उभी राहण्यास काही काळ लागतो. पण माझ्या शाळेच्या बाबतीत मी सुरुवातीलाच माझ्या लठ्ठ पगाराबद्दल अफवा ऐकू लागलो. वस्तुस्थिती अशी आहे की, मी अद्याप पगार तर घेतलाच नाही; पण ३१ मे १९२१ पर्यंत १२०० रुपयांची तूट आलेली आहे. पैशासंबंधी सांगावयाचे म्हणजे शाळेला एक अर्थमंडळ आहे, व मि. दुर्गादास बी. अडवानी हे त्याचे अध्यक्ष आहेत. त्या मंडळाची सभा झाली आणि कमिटीने नेमलेल्या धंदेवाईक हिशेबनिसाकडून तपासलेले हिशेब पासही झाले. अहवालात हिशेबाचे पत्रक प्रसिद्ध केले जाईल. ही नेहमीची पद्धत आम्हांला अनुसरावी लागली. लोकाश्रयावर चाललेल्या कोठल्याही शाळेने दुसरा कोणताही मार्ग स्वीकारला नाही; आणि त्या शाळांना मधून मधून आपले हिशेब प्रसिद्ध करण्यासही कोणी सांगितले नाही. ज्या बातम्यांमुळे तुम्हांला आपला लेख लिहावा लागला त्यातील अन्याय तुम्हांला कळून येईल. वैयक्तिक हेव्यादाव्यांमुळे असल्या अफवा प्रसृत केल्या जातात. हे उघड आहे.

मी बाकीचे पत्र प्रसिद्ध करीत नाही. कारण त्यात स्थानिक व वैयक्तिक बाबी आहेत. अशा गोष्टींची जाहीर चर्चा करून काही चांगले पदरात पडेल असे मला वाटत नाही. आपण किरकोळ उपद्रव सहन करण्याची शक्ती कमाविली पाहिजे आणि आपल्या विरोधकांशी ताबडतोब जमवून घेतले पाहिजे.

लॉर्ड सिंहांच्या भूमीत

साऱ्या हिंदुस्थानात ओरिसा हा कदाचित अत्यंत गरीब प्रांत असेल. तेथील लोक गोगलगाय आहेत. "समाज" हे उत्कलचे पत्र आहे. केओनझार नावाच्या एका लहान संस्थानात सरकारी बेकायदेशीरपणाचे वर्णन करताना एक पत्रलेखक "समाज"ला लिहितो :

> केओनझारमधील कारभाराविषयी काही माहिती तुम्हांला निःसंशय मिळत असेल. पण आतली परिस्थिती तुम्हांला कदाचित ठाऊक नसेल. ती परिस्थिती दडपण्याचा संस्थानचे अधिकारी जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहेत व लोकांना पूर्णपणे निराधार करीत आहेत. पोस्ट ऑफिसे जवळ जवळ बंदच आहेत. कोणाला एकही वृत्तपत्र वाचण्यास मिळत नाही येथून पत्रे पाठविली जात नाहीत किंवा आलेली वाटली जात नाहीत. प्रथम ती अधिकाऱ्यांकडे वाचण्याकरिता नेली जातात आणि नंतर मजकुराप्रमाणे त्याची विल्हेवाट लावली जाते. परिपत्रकाने **समाजाला बंदी** केली आहे. म्हणून ते येथे दिसत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे येथे कोणालाही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ देत नाहीत. रस्त्यावर खडे पहारे बसविले आहेत. वाटसरूंच्या जवळ काही माहिती असेल या संशयाने त्यांची झडती घेतली जाते आणि ज्याची शंका येईल त्याला पुढे जाऊ देत नाहीत. अशा प्रकारे जे लोक अगदी असाहाय्य आहेत त्यांना छळण्याचा कोणताही प्रयत्न बाकी ठेवला जात नाही. एक निशाकर मिश्र नावाचा गृहस्थ होता. तो बडविलेल्या लोकांपैकी एक होता. त्याने तो मेला असे समजते. ही बातमी दडपून टाकण्यात आली. जगन्बंधू चक्रवर्ती नावाचा दुसरा गृहस्थ मरणोन्मुख आहे, व तो जगण्याची आशा नाही. असे म्हणतात की, त्याला एकांतवासाची शिक्षा दिली आहे; पण तो कोठे आहे हे ठाऊक नाही. मृत्यूच्या बातम्या दाबून टाकण्याचा अधिकारी वर्ग शिकस्तीचा प्रयत्न करीत आहे असे लोकांना ठामपणे वाटते.

यासंबंधी अधिक दुजोरा देणारा पुरावा मजजवळ आहे. वाचकांनी या संस्थानची पश्चिम हिंदुस्थानातील संस्थानांशी गल्लत करू नये. उत्कल संस्थानात इंग्लिश पोलिटिकल एजंट हा सर्वश्रेष्ठ मालक आहे, आणि त्याच्या मर्जीला येईल तसे तो वागतो.

वरील जुलूम चालू आहे. कारण लोकांनी असहकारितावादी कार्यकर्त्यांना उत्तेजन दिले. मी त्यांना एवढेच समाधान देऊ शकतो की, जोपर्यंत हिंदुस्थान शृंखलांनी बांधला आहे तोपर्यंत त्यांनी दुःख भोगले पाहिजे. माझा असहकारितावाद्यांना असा सल्ला आहे की, त्यांनी जेथे जुलूम जबरदस्ती झाल्यास आपण काही साहाय्य देऊ शकणार नाही, अशा जागांना हात लावू नये. जर उत्कलचे लोक बलिष्ठ व संघटित असते तर त्यांना मी बिनदिक्कत संस्थानी हद्दीत जा, प्रत्येक अमानुष नियंत्रण तोडा आणि कायद्याच्या शिक्षा ओढवून घ्या असे सांगितले असते. पण मला वाटते ती वेळ अजून आली नाही. आतापर्यंत जो आत्मसंयम आपण दाखविला त्यापेक्षा अधिक दाखविण्यास शिकले पाहिजे. जे आतापर्यंत आपण मिळविले आहे ते आशादायक आहे. पण अधिकाची निःसंशय जरूरी आहे.

'यंग इंडिया', १३-७-१९२१

१७५. चिघळणारा व्रण

संयुक्त प्रांतातील लिबरल लीगच्या शिष्टमंडळाला उत्तर देताना नामदार व्हाइसरॉय साहेबांनी जे भाषण केले, ते भाषण अहमदिया शिष्टमंडळाला दिलेल्या उत्तरापेक्ष अधिक सावधगिरीचे होते. तथापि त्या भाषणात त्यांनी हिंदुस्थानला अशक्य गोष्ट करण्यास सांगितले आहे याची आठवण त्यांना करून देणे जरूर आहे. पंजाब व खिलाफतीचे अन्याय दूर झाले पाहिजेत असे नेमस्त व राष्ट्रीय, सहकारितावादी व असहकारितावादी, हिंदू, मुसलमान, शीख, जैन, पारशी, ख्रिश्चन्स, ज्यू आणि जे स्वतःला हिंदी म्हणवितात ते आपापल्या पद्धतीने आग्रहपूर्वक सांगत आहेत. नामदारसाहेब अद्याप खिलाफतीचा हक्क जोराने प्रतिपादन करीत आहेत. ही आशादायक गोष्ट आहे. कारण ते हिंदी मुसलमानांना आणि त्यांच्या हिंदू व इतर देशबांधवांना खिलाफतीचा अन्याय विसरण्यास सांगत नाहीत. पण पंजाबचा अन्याय विसरा असे ते स्पष्टपणे सांगत आहेत. ही गोष्ट अशक्य आहे. ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर आपल्या रोग्याला आपला वेदनामय आजार विसरण्यास सांगतो तसे हे आहे. त्या रोग्याला जर डॉक्टरांनी गुंगीचे औषध दिले असेल व त्याच्यावर काही वेळ परिणाम झाला असेल तरची गोष्ट वेगळी. पंजाबचा अन्याय हा एखाद्या चिघळणाऱ्या जखमेसारखा आहे. आणि ज्याप्रमाणे चिघळणारी जखम सारे विष काढून टाकल्याशिवाय भरून येत नाही त्याच-

प्रमाणे पश्चात्तापशून्य आणि अविश्वासू नोकर यांना नोकरीवर ठेवले जाणे आणि त्यांना पेन्शन्स देणे ह्या स्वरूपाचे विष जोपर्यंत काढून टाकले जात नाही, तोपर्यंत पंजाबचा अन्याय विसरला जाणार नाही व त्याची क्षमाही केली जाणार नाही. लॉर्ड रीडिंग-साहेबांना असे वाटते काय की, मि. टॉमसन यांची अधिक उच्चपदावर केलेली बढती ही हिंदुस्थानच्या पचनी पडली आहे? नामदारसाहेब मला व माझ्या सरकारला प्रामाणिक हेतूबद्दल व कळकळीबद्दल श्रेय द्या असे सांगतात. त्यांनी वाटल्यास ते श्रेय घ्यावे. पण ते श्रेय देताच तात्काल असा एक विश्वास निर्माण होतो की, जिव्हाळ्याच्या प्रश्नांच्या बाबतीत सरकारच्या व लोकांच्या दृष्टिकोणात मूलभूत फरक आहे. जोपर्यंत लॉर्ड रीडिंग व त्यांचे सरकार चालू राहील, मग ते कितीही कळकळीने चालू राहो, ते जोपर्यंत हिंदी लोकांना, पेन्शनच्या यादीत किंवा नोकरीच्या यादीत जे लोक त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाला हिंदी लोकांच्या दृष्टीने अपात्र ठरले त्यांची नावे कायम ठेवली जाण्यात समाधान माना असे सांगत राहील तोपर्यंत सरकार व लोक यांच्यात समान भूमिका निर्माण होणार नाही. आपल्याला आभास वाटणारी जबाबदारी जरी दिली असती, तरी ज्यांनी आपल्यावर भयंकर अन्याय केला त्यांना नोकरीतून काढून टाकण्याचा हक्क आपणास खात्रीनेच असावयास पाहिजे. माझ्या दृष्टीने जबाबदारीची हीच खरी परीक्षा आहे. दोन अन्यायांचे निराकरण खिलाफतीचा अन्याय मान्य करण्यात आला आहे; पंजाबमधील भयंकर प्रकार हे रक्ताच्या अक्षरात लिहिले आहेत. अमृतसर, कासूर; जालियनवाला आणि गुजरानवाला येथे आम्ही गुन्हे केले हे कबूल करतो. त्याकरिता आम्हांला जबर शिक्षाही झाली. आमचा पाणउतारा केला व आम्हांला लाथाही मारल्या. अपराधी व निरपराध्याना फांसावर लटकाविले. आम्ही स्वतःहून अनेक सभांतून या गोष्टीची स्पष्ट, मुक्त व उघड अशी कबुलीही दिली. अधिकारी गुन्हेगारांचा अपमान करा अशी आमची मागणी नाही. आमच्यावर ते मालक म्हणून लादू नका एवढेच आमचे म्हणणे आहे. एकदा एका इंग्लिश अधिकाऱ्याने मला स्पष्टपणे सांगितले की, नोकरीत राहून सर मायकेल ओडवायर किंवा जनरल डायर यांची नावे पेन्शनच्या यादीतून काढून टाकण्याला भागीदार होण्याऐवजी मी राजीनामा देईन. मी त्याला म्हटले, अशा प्रकारच्या वृत्तीला सहानुभूती कशी दाखवावी हे मला कळत असले तरी त्यांनी माझ्याकडून सहमत होण्याची अपेक्षा बाळगू नये. त्यांनी बाळगलीही नाही. हजारो नसले तरी शेकडो इंग्लिश स्त्री-पुरुषांना सर मायकेल ओडवायर आणि जनरल डायर साम्राज्याचे व आपल्याच वृत्तीच्या लोकांच्या मानाचे संरक्षक वाटतात. जर मी इंग्लिश गृहस्थ असतो व वाटेल ते करून हिंदुस्थान आपल्या हातात ठेवण्याचा प्रयत्न केला असता तर कदाचित मलाही त्यांच्यासारखे वाटले असते. पण माझे मत असे आहे की, जोपर्यंत ती वृत्ती कायम आहे तोपर्यंत सरकार व जनता यांच्यात सहकार्य होणे अशक्य आहे. देशातील सरकारमध्ये त्यांच्याबरोबर सहकार्य

करणे म्हणजे त्यांच्या वृत्तीचा स्वीकार करणे, ह्याचा अंतर्भाव होतो ही गोष्ट असहकारितेमुळेच इंग्रजांना कळू शकेल. पण मित्र व सहकारी या त्यांच्या भूमिकेशी हे विसंगत आहे. ते आपल्या संगिनीच्या शक्तीवर हिंदुस्थानात कदाचित राहू शकणार नाहीत. त्यांना आमच्या सदिच्छेच्या बळावरच राहिले पाहिजे. तीच एक शक्ती त्यांना व आम्हांला बांधणारी असली पाहिजे. ओठात समानतेची भावना दाखवून त्यांनी आमची चेष्टा करू नये, आणि आपल्या खंदकामागे अजिंक्य श्रेष्ठत्व बाळगू नये. लॉर्ड रीडिंग हे जगात चाणाक्ष गृहस्थ समजले जातात, आणि म्हणून मला आशा आहे की, या दोन विरोधी वृत्तींत तडजोड घडवून आणणे अशक्य आहे हे त्यांना समजून येईल. जर त्यात मधला मार्ग असता तर असहकारितावाद्यांनी मागेच पत्करला असता. असंख्य लोकांच्या द्वेषाचा किंवा दुष्ट भावनेचा प्रश्नच नाही. मी त्यांना खोलवर जाऊन चौकशी करण्यास सांगत आहे. आणि त्या चौकशीत असे आढळेल की, आम्ही जरी दुर्बल असलो तरी गोऱ्या लोकांच्या श्रेष्ठत्वाचा संप्रदाय आम्ही यापुढे सहन करणार नाही. तोंडची वक्तव्ये ही कितीही चांगली व प्रामाणिक असोत त्यांचा उपयोग होणार नाही. आम्ही पुरेसे मूर्तिपूजक आहोत आणि त्यामुळे समानतेच्या प्रत्यक्ष दर्शनाचा पुरावा मागत आहोत. इंग्लिश लोकांच्या संरक्षणाकरिता गोरे शिपाई जरी आवश्यक असले तरी हिंदी सरहद्दीच्या सुरक्षिततेकरिता ते जरूर नाहीत हे त्यांना दिसत नाही का ? ज्या अटीवर पारशी लोक येथे राहतात त्याच अटीवर इंग्लिश लोकांनी येथे राहावयास तयार असले पाहिजे. मूठभर पारशी लोक गेली हजार वर्षे सन्मान्य मित्र व भागीदार म्हणून येथे राहिले आहेत. त्यांना खास संरक्षणाची जरूरी पडली नाही. खवळलेल्या हिंदू किंवा मुसलमानांच्या हातून धोका निर्माण झाला असता त्यांना आश्रयाकरिता किल्ल्याची जरूरी पडली नाही. झोरोॲस्टर यांच्या अनुयायांत जो विश्वास आहे तोच विश्वास मोझेस व जीझस यांच्या अनुयायांत नाही का ? कोट्यवधी हिंदू मुसलमानांच्या कृपेवर इंग्लिश लोक हिंदुस्थानात राहावयास तयार नाहीत ही उघड गोष्ट आहे. मानवी बुद्धिमत्तेने शोधून काढलेल्या विनाशक साधनांवर आपला ताबा आहे या कारणाने ते हिंदी लोकांना फायद्याचे होईल अशी कोणतीही जागा द्यावयास तयार नाहीत. अशा सर्व शस्त्रांचा परिणाम निरुपयोगी करावा म्हणून त्यांना भिण्याचे थांबवावे, याचाच अर्थ अप्रतिकारी वृत्ती असावी याकरिता अत्यंत जोरदार प्रयत्न करण्यावाचून हिंदी लोकांना दुसरे गत्यंतरच नाही हे सर्व उर्मटपणाचे किंवा स्वप्नाळूपणाचे वाटेल. लॉर्ड रीडिंगसाहेबांना निदान मी हिंदुस्थानचे खरे मन सांगितले आहे असे लवकरच आढळून येईल अशी माझी आशा आहे. आणि जितक्या लवकर हे मूलभूत सत्य उमजून येईल, तितक्या लवकर इंग्लिश व हिंदी लोक यांच्यात खरे हार्दिक ऐक्य घडून येईल. मी अशा सहकारितेकरिता इच्छा बाळगत आहे. आणि हीच इच्छा कोणत्याही सहकारितेकरिता क्षमा स्वीकारण्यापासून मला अटकावीत आहे. मग ती कितीही आकर्षक असो. असहकारितेचा जन्म अज्ञान व दुष्ट बुद्धीत झाला नाही, पण तो असहकारिते-

करिता एकच प्रभावी उपाय आहे, आणि म्हणून तिची उत्पत्ती, ज्ञान व प्रेमातून झालेली आहे.

'यंग इंडिया', १३-७-१९२१

१७६. भारतातील प्रत्येक इंग्रजाला

प्रिय मित्र,

मी दुसऱ्यांदा तुम्हांला लिहिण्याचे धाडस[1] करीत आहे. तुमच्यापैकी बहुतेक जण असहकारितेचा तिरस्कार करतात हे मी जाणतो. पण जर तुम्ही मला प्रामाणिकपणाचे श्रय देणार असाल तर दोन चळवळी बाकीच्या चळवळीपासून निराळ्या करा असे मी तुम्हांला सांगतो.

जर तुम्हांला माझा प्रामाणिकपणा पटत नसेल तर तो मी सिद्ध करू शकत नाही. जेव्हा मी असे म्हणतो की, जरी आपण त्यांनी स्थापन केलेल्या पद्धतीचा द्वेष करीत असलो तरी इंग्लिश माणसाचा द्वेष करता कामा नये. तेव्हा माझे काही हिंदी मित्र म्हणतात की, मी फसवणूक करीत आहे. मी त्यांना असे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे की, एखादा माणूस आपल्या भावाचा द्वेष न करता, त्याच्या दुष्टपणाचा तिरस्कार करू शकतो. येशूने लेखकवर्गाच्या आणि शब्दपंडितांच्या दुष्टपणाचा धिक्कार केला. पण व्यक्तिशः त्यांचा द्वेष केला नाही. मानवातील दुष्टपणाचा द्वेष पण मानवाविषयी मात्र प्रमाचा धर्म ख्रिस्ताने केवळ स्वतःकरताच सांगितला नाही तर सर्व जगाकरता हा सिद्धांत शिकवला. जगातील सर्व धर्मग्रंथांत तो सिद्धांत मला खरोखरच पाहा-वयास सापडतो.

मी स्वतःला मानवी स्वभावाचा बराचसा बिनचूक अभ्यासक समजतो आणि माझ्या दोषांची तपासणी करणारा मी स्वतःला मानतो. मला असे आढळले आहे की, मनुष्य ज्या पद्धतीचा पुरस्कार करतो तिच्यापेक्षा तो स्वतः श्रेष्ठ आहे. म्हणून मला

१. ह्या अगोदर गांधींनी इंग्रजांना प्रकट पत्र ता २७-१०-१९२० रोजी लिहिले होते. पाहा. खंड १८.

वाटते की, व्यक्ती या दृष्टीने तुम्ही जी संस्थेची पद्धत विकसित केली आहे तिच्यापेक्षा किती तरी पटींनी तुम्ही अधिक श्रेष्ठ आहात. अमृतसरमधील माझा प्रत्येक देशबांधव हा त्या दुर्दैवी १० एप्रिलच्या जमावापेक्षा तो त्यातलाच असला तरी अधिक चांगला होता. मनुष्य या नात्याने त्याने त्या निरपराधी इंग्लिश बँक मॅनेजर्संना ठार मारण्यास नकार दिला असता. पण त्या गर्दीत पुष्कळशी माणसे स्वतःला विसरली. त्याकरिताच अधिकारा-वरील इंग्लिश मनुष्य हा बाहेरील इंग्लिश माणसापेक्षा निराळा असतो. तसेच हिंदुस्थानातील इंग्लिश माणूस हा इंग्लंडमधील इंग्लिश माणसापेक्षा निराळा आहे. येथे हिंदुस्थानात तुम्ही ज्या पद्धतीचे घटक आहात ती वर्णन करण्यापलीकडे दुष्ट आहे. म्हणून मला अत्यंत कडक शब्दात त्या पद्धतीचा धिक्कार करता येईल. पण तसे करताना तुम्ही वाईट आहात असे मी समजणार नाही. आणि प्रत्येक इंग्लिश माणसा-वर दुष्ट हेतूंचे आरोप करणार नाही. त्या पद्धतीचे आम्ही जितके गुलाम आहोत तितकेच तुम्हीही आहात. म्हणून तुम्हीही तसाच प्रतिसाद द्यावा अशी माझी इच्छा आहे. आणि जे हेतू तुम्हांला लेखी शब्दात सापडत नाहीत ते मला लावता कामा नयेत. मी जेव्हा तुम्हांला असे सांगतो की, ही पद्धत दुरुस्त करण्याला किंवा संपविण्याला उत्सुक झालो आहे तेव्हा मी माझ्या मनातला सारा हेतू तुमच्यापुढे ठेवतो. या पद्धतीने तुमच्यापैकी मूठभर लोकांनी हिंदुस्थानला लाचार केले आहे. आणि ह्या पद्धतीने केवळ केल्ल्यांच्या आश्रयाने किंवा तोफांच्या आधारानेच इंग्लिश लोकांना येथे हिंदुस्थानात सुरक्षितता वाटते. हे दृश्य तुम्हांला व आम्हांलाही अपमानकारक आहे. आपले सामुदायिक जीवन परस्परांच्या भीतीवर व अविश्वासावर आधारलेले आहे. हे पौरुषत्वहीन आहे असे तुम्हीही कबूल कराल. या परिस्थितीला जी पद्धत जबाबदार आहे ती सैतानीच असली पाहिजे. तुम्ही हिंदुस्थानात हिंदी लोकांचा एक अविभाज्य भाग म्हणून राहिले पाहिजे आणि केव्हाहि परके लुबाडणारे म्हणून राहता कामा नये. एका इंग्लिश जीवाच्याविरुद्ध एक हजार हिंदी जीव असणे हा अत्यंत निराशाजनक सिद्धांत आहे. आणि तरीही माझ्यावर विश्वास ठेवा, तो सिद्धांत १९१९ साली तुमच्यातील या देशातल्या सर्वांत मोठ्या माणसाने प्रतिपादन केला.

ज्या पद्धतीने तुम्हांला आणि आम्हांला खाली ओढले, ती पद्धत नष्ट करण्या-करिता तुम्ही मला येऊन मिळा हे सांगण्याचा मोह मला होतो. पण मला वाटते तसे अद्याप मी करू शकणार नाही. त्या पूर्णावस्थेकरिता आम्ही प्रामाणिक, स्वार्थत्यागी आणि आत्मसंयमी आहोत, असे पुरेसे दाखवू शकलो नाही.

पण परदेशी कापडाच्या बहिष्कारात आणि मद्यबंदीच्या मोहिमेत तुम्हांला मी अवश्य मदत करण्यास सांगेन.

इंग्रजी इतिहासकारांनी दाखविल्याप्रमाणे लँकेशायरचा कपडा हिंदुस्थानवर लादला गेला. आणि हिंदुस्थानचे जगप्रसिद्ध कापड उत्पादन, जाणूनबुजून व पद्धतशीर-

पणे नष्ट करण्यात आले. म्हणून हिंदुस्थान नुसत्या लँकेशायरच्या नव्हे, पण जपान, फ्रान्स व अमेरिकेच्या कृपेवर अवलंबून आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीने अर्थ काय होतो ते पाहा. आम्ही दरवर्षी कापडाकरिता जवळ जवळ साठ कोटी रुपये देशाबाहेर पाठवितो. आम्ही आमच्या कापडाकरिता पुरेसा कापूस पिकवितो. हिंदुस्थानबाहेर कापूस पाठविणे, तेथे त्याचे कापड बनविणे आणि ते हिंदुस्थानात आणविणे हा वेडेपणा नाही काय? हिंदुस्थानची अशी दुर्दशा करणे हे बरोबर होते का?

१५० वर्षांपूर्वी आम्ही आमचे सारे कापड तयार करीत होतो. आमच्या बायका आपल्या झोपडीत बसून बारीक सूत कातीत असत व आपल्या नवऱ्याच्या उत्पन्नात भर घालीत असत. खेड्यातील विणकर ते सूत विणत असत. आमच्यासारख्या विशाल शेतकीप्रधान देशात राष्ट्रीय उत्पन्नाचा तो एक आवश्यक भाग होता. आम्ही आमचा फुरसतीचा वेळ अगदी स्वाभाविकरीत्या उपयोगात आणीत होतो. आज आमच्या बायकांच्या हातातली ती कला गेलीच आहे, आणि कोटयवधी लोकांच्यावर लादलेल्या आळशीपणामुळे देश भिकारी झाला आहे. पुष्कळसे विणकर झाडूवाले झाले आहेत. काहींनी भाडोत्री शिपायांचा पेशा घेतला आहे. कुशल विणकरांची अर्धी जात नाहीशी झाली आहे आणि उरलेले अर्धे विणकर हाताने कातलेले बारीक सूत मिळत नाही म्हणून परदेशी आयात केलेले सूत विणत बसले आहेत.

परदेशी कापडावरील बहिष्कार याचा हिंदुस्थानच्या दृष्टीने अर्थ काय हे आत कदाचित तुम्हांला कळेल. शिक्षा म्हणून बहिष्कार नाही. जरी आज सरकारने खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर केले आणि हिंदुस्थानला ताबडतोब स्वराज्य मिळावे ही गोष्ट कबूल केली तरी बहिष्काराची चळवळ चालूच राहील. जे उद्योगधंदे राष्ट्राच्या आर्थिक अस्तित्वाकरिता जिव्हाळ्याचे आहेत असे हिंदी धंदे टिकवून ठेवण्याची सत्ता असणे हा स्वराज्याचा अर्थ आहे. त्याचप्रमाणे अशा अस्तित्वाच्या आड जी आयात येईल तिला बंदी घालणे हाही स्वराज्याचा अर्थ आहे. शेतकी आणि हातकताई ही राष्ट्रीय शरीराची दोन फुप्फुसे आहेत. काही झाले तरी क्षयापासून त्यांचे रक्षण केले गेले पाहिजे.

या गोष्टीला विलंब चालणार नाही. जेव्हा सारे राष्ट्र शेतकीला पूरक असणारा एक मोठा उत्पादक धंदा नसल्यामुळे उपाशी मरत आहे अशा वेळी परदेशी उत्पादकांचे आणि हिंदी आयात करणारांचे हित विचारात घेता येणार नाही.

साऱ्याच परदेशी मालावर बहिष्कार घालण्याची ही चळवळ आहे असा चुकीचा समज करून घेऊ नका. हिंदुस्थानची इच्छा आंतरराष्ट्रीय व्यापारातून बाहेर पडावे अशी नाही. कापडाशिवाय ज्या वस्तू हिंदुस्थानच्या बाहेर अधिक चांगल्या केल्या जातात, त्यांचा हिंदुस्थानने आभारपूर्वक स्वीकार केला पाहिजे. पण त्याकरिता करावयाच्या अटी दोघांनाही फायदेशीर असल्या पाहिजेत. हिंदुस्थानवर काहीही लादता

कामा नये. पण मला भविष्यकाळात डोकवावयाचे नाही. हिंदुस्थानला समान अटींवर इंग्लंडबरोबर सहकार्य करणे लवकरच शक्य होईल अशी मी आशा खासच बाळगीत आहे. त्याच वेळी व्यापारी संबंधांची तपासणी करता येईल. तूर्त मी परदेशी कापडावरील बहिष्कार घडवून आणण्याकरिता तुमची आगाऊ मदत मागत आहे.

तशीच आणि तितकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे मद्यपानाविरुद्ध मोहीम. दारूची-दुकाने म्हणजे समाजावर लादलेला असह्य शाप आहे. या प्रश्नासंबंधी जितकी जागृती आज लोकांत आहे, तितकी पूर्वी कधीही नव्हती. पण या बाबतीत हिंदी मंत्री तुमच्या-पेक्षा अधिक मदत करू शकतील हे मी कबूल करतो. पण या प्रश्नासंबंधी तुमच्या मनात जे असेल ते स्पष्टपणे बोलून टाका. प्रत्येक राज्यपद्धतीत माझ्या समजुतीप्रमाणे राष्ट्र संपूर्ण दारूबंदीचा आग्रह धरील. राष्ट्राच्या बाजूने तुमचे वजन टाकून तुम्ही या एक-सारख्या वाढत्या चळवळीला मदत करू शकाल.

आपला विश्वासू मित्र
एम्. के. गांधी

'यंग इंडिया', १३-७-१९२१

१७७. निष्ठेची कबूली

माझ्याकडे एक चमत्कारिक निनावी पत्र आले आहे. त्यात लोकमान्यांना अत्यंत प्रिय असलेल्या कार्याचा मी स्वीकार केल्याबद्दल माझी स्तुती केली आहे आणि त्यात मला असे सांगितले आहे की, त्यांचा आत्मा माझ्या शरीरात राहात आहे व मी त्यांचा लायक अनुयायी आहे हे सिद्ध केले पाहिजे. त्या पत्रात मला अशी समज देण्यात आली आहे की, स्वराज्याचा कार्यक्रम अंमलात आणण्यात मी धैर्य गमावू नये. गोखल्यांचा मी राजकीय शिष्य आहे असे म्हणविण्यात मी भोंदूगिरी करीत आहे, असा आरोप करून पत्र संपविले आहे. पत्रलेखकांनी निनावी पत्रे लिहिण्याची गुलामगिरी पद्धत टाकली पाहिजे. जे आपण स्वराज्याची वृत्ती वाढवीत आहोत त्यांनी आपल्या मनातले विचार निर्भयपणे बोलण्याचे दाखविले पाहिजे. या पत्रातील विषय सार्वजनिक महत्त्वाचा असल्या-मुळे त्याचे उत्तर दिलेच पाहिजे. मी लोकमान्य टिळकांचा अनुयायी आहे ह्या मानावर हक्क सांगू शकत नाही. त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीबद्दल, त्यांच्या अफाट विद्वत्तेबद्दल

त्यांच्या देशप्रेमाबद्दल आणि या सर्वांपेक्षाही त्यांच्या शुद्ध खाजगी जीवनाबद्दल व महान त्यागाबद्दल जसे कोट्यवधी लोक त्यांची स्तुती करतात तशी मीही करतो. आधुनिक काळातील सर्व लोकांपेक्षा त्यांनी लोकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनीच आपल्यात स्वराज्याचे चैतन्य निर्माण केले. सध्याच्या सरकारी राज्य पद्धतीतील दुष्ट गोष्टी जितक्या टिळकांना समजल्या तितक्या दुसऱ्या कोणाला समजल्या नसतील; आणि त्यांचे चांगल्यातले चांगले शिष्य जितक्या खरेपणाने त्यांचा संदेश देशाला सांगतील तितकाच मी सांगत आहे असे मी नम्रपणे म्हणतो, पण माझी पद्धत ही टिळकांची पद्धत नाही याची मला जाणीव आहे. त्यामुळेच मला महाराष्ट्रातील काही पुढाऱ्यांविषयी अडचणी वाटतात. पण टिळकांचा माझ्या पद्धतीवर अविश्वास होता, असे मला प्रामाणिकपणे वाटत नाही. मी त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यांच्या मृत्यूपूर्वी एक पंधरवडा कित्येक मित्रांच्यादेखत त्यांनी मला उद्देशून शेवटचे शब्द उच्चारले की, लोकांची मने जर माझ्या पद्धतीकडे वळविली गेली, तर माझी पद्धत अत्यंत चांगली आहे. पण ते म्हणाले मला काही शंका आहेत. मला दुसरी पद्धतच माहीत नाही. जेव्हा अखेरच्या परीक्षेची वेळ येईल तेव्हा देशाने अनत्याचारी असहकारितेची पद्धत आत्मसात केली असे तो सिद्ध करील एवढीच मला आशा आहे. मला माझ्या मर्यादा अज्ञात आहेत असे नाही. मी विद्वत्तेवर अधिकार सां शकत नाही. त्यांच्यातली संघटनाशक्ती माझ्यात नाही. माझ्यामागे मजबूत शिस्तशीर पक्ष नाही. आणि मी तेवीस वर्षे देशातून हद्दपार असल्यामुळे जो लोकमान्यांना हिंदुस्थानचा अनुभव होता तो मला आहे असे मी म्हणत नाही. आमच्यात दोन गोष्टी संपूर्ण समान होत्या—देशाची प्रीती, आणि सतत स्वराज्याचा पाठलाग. म्हणून मी निनावी लेखकाला असे आश्वासन देतो की, जरी मी कै. टिळकांच्या स्मृतीच्या आदरात कोणापेक्षाही कमी नसलो तरी स्वराज्याचा पिच्छा पुरविण्यात लोकमान्याचे जे अत्यंत अग्रभागी शिष्य आहेत त्यांच्याबरोबर बाजूबाजूनेच चालत राहीन. हिंदुस्थानने लवकरात लवकर स्वराज्य मिळविणे, त्याशिवाय दुसऱ्या कशानेही त्यांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही.

तथापि शिष्यत्व ही पवित्र वैयक्तिक बाब आहे. मी १८८८ साली[१] दादाभाईंच्या पाया पडलो. पण ते मला फार दूर आहेत असे वाटले. मी त्यांचा मुलगा शोभलो असतो पण शिष्य नव्हे. शिष्य हा मुलापेक्षा अधिक असतो. शिष्यत्व म्हणजे दुसरा जन्म. ते स्वच्छेचे समर्पण. १८९६ मध्ये मी दक्षिण आफ्रिकेच्या माझ्या कामाकरिता बहुतेक सर्व हिंदी प्रसिद्ध पुढाऱ्यांना भेटलो. न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल आदरयुक्त भीती वाटली. त्यांच्यासमोर माझ्या तोंडातून शब्दही निघेना. बद्रुद्दिन तैय्यबजी हे

१. जेव्हा गांधीजी बॅरिस्टरीचा अभ्यास लंडनमध्ये करीत होते तेव्हाची ही गोष्ट; आत्मवृत्त पाहा. भाग १ प्रकरण २५.

पित्यासमान होते. आणि त्यांनी मला रानडे व फेरोजशहा यांचे ऐकत जा असे सांगितले. फेरोजशहा हे माझे आश्रयदाते बनले. त्यांची इच्छा म्हणजे कायदा. "२६ सप्टेंबरला तुम्ही जाहीर सभेत भाषण केले पाहिजे. आणि अगदी वेळेवर आले पाहिजे." मी त्यांची आज्ञा मानली. २५ तारखेला संध्याकाळी मी त्यांना भेटावयाचे होते. मी भेटलो.

"भाषण लिहून आणलेत का ?" त्यांनी विचारले.

"नाही, महाराज."

"तरुण गृहस्था, हे चालणार नाही. रात्री लिहिशील का ? मुनशी, तुम्ही गांधींकडे गेलेच पाहिजे आणि त्यांच्याकडून हस्तलिखित आणलेच पाहिजे. ते रातोरात छापून झालेच पाहिजे आणि मला त्याची प्रत पाठविलीच पाहिजे." माझ्याकडे वळून ते म्हणाले, "गांधी, लांब भाषण लिहू नका. मुंबईच्या श्रोत्यांना लांब भाषणे खपत नाहीत, हे तुम्हांला ठाऊक नाही." मी लवून मुजरा केला.

मुंबईच्या सिंहाने मला हुकूम घेण्यास शिकविले. त्यांनी मला आपला शिष्यही केले नाही. त्यांनी तसा प्रयत्नही केला नाही.

तेथून मी पुण्याला गेलो. मी अगदी नवखा होतो. माझे यजमान प्रथम मला टिळकांच्याकडे घेऊन गेले. त्यांच्याभोवती मित्र जमत असत. मी त्यांना भेटलो माझे म्हणणे ऐकल्यावर ते म्हणाले, "तुमची एक सभा आम्ही ठरविली पाहिजे. पण कदाचित तुम्हांला ठाऊक नसेल की, दुर्दैवाने आमच्यात दोन पक्ष आहेत. तुम्ही आम्हांला बिनपक्षाचा अध्यक्ष दिला पाहिजे. तुम्ही डॉ. भांडारकरांना भेटाल काय ?" मी कबूल केले आणि तेथून निघालो. टिळकांच्याबद्दल माझ्यावर काहीच छाप पडली नाही. पण मला एवढीच आठवण आहे की, त्यांनी आपल्या प्रेमळ परिचयाने माझी भीती काढून टाकली. तेथून मला वाटते मी गोखल्यांच्याकडे गेलो आणि नंतर डॉ. भांडारकरांच्याकडे. जसा शिक्षक विद्यार्थ्याला भेटतो तसे ते मला भेटले.

"तुम्ही मला एक कळकळीचे व उत्साही तरुण गृहस्थ दिसता. ऐन उन्हाच्य वेळी फारसे लोक मला भेटावयास येत नाहीत. मी अलीकडे जाहीर सभांना कधी जात नाही. पण तुम्ही मला इतकी हृदयद्रावक गोष्ट सांगितली आहेत की, तुमच्या बाबतीत मी अपवाद केलाच पाहिजे." त्या ज्ञानसंपन्न माननीय डॉक्टरांची मी पूजा केली. पण माझ्या लहानशा हृदयसिंहासनावर बसविण्यास मला जागा सापडली नाही. ते अद्याप रिकामेच होते. माझ्याजवळ पुष्कळ शूरवीर होते, पण राजा नव्हता.

मला सांगता येत नाही. पण गोखल्यांच्या बाबतीत निराळे वाटले. मी त्यांना फर्ग्युसन कॉलेजवरील त्यांच्या बिऱ्हाडी भेटलो. ती भेट म्हणजे जुन्या मित्राची किंवा

त्याहीपेक्षा अधिक चांगले सांगावयाचे म्हणजे दीर्घ विरहानंतर भेटलेल्या आईसारखी होती. त्यांच्या सौम्य चेहऱ्याने मी एका क्षणात शांत झालो. त्यांनी माझ्याबद्दल आणि दक्षिण आफ्रिकेतील माझ्या कामाबद्दल जी बारीक सारीक चौकशी केली त्यामुळे ते माझ्या हृदयसिंहासनावर जाऊन बसले; आणि जेव्हां मी त्यांना सोडून निघालो तेव्हा मी स्वतःशी म्हटले, "मला योग्य तोच गुरू मिळाला." त्या क्षणापासून गोखल्यांनी माझ्यावरची नजर कधीच सोडली नाही. १९०१ साली जेव्हा मी दक्षिण आफ्रिकेतून दुसऱ्यांदा परत आलो, तेव्हा आम्ही एकमेकांच्या अगदी जवळ आलो.[1] त्यांनी मला हातांशी धरुन शिक्षण देण्याला सुरुवात केली. मी कसा बोलतो, कपडे कसे घालतो, कसा चालतो, व कसे जेवतो याबद्दल ते काळजी घेऊ लागले. गोखल्यांच्यापेक्षा माझी आई माझी अधिक काळजी घेत नसे. माझ्या माहितीप्रमाणे आमच्यात आडपडदा नव्हता. प्रथम दर्शनी प्रेम बसल्याची ती खरोखर गोष्ट होती. आणि १९१३[2] साली ते प्रेम अत्यंत कठीण अशा ताणाला टिकले. राजकीय कार्यकर्ता म्हणून मला जे पाहिजे होते, ते सर्व त्यांच्या ठिकाणी होते. ते स्फटिकासारखे शुद्ध, कोकरासारखे मृदू, सिंहासारखे शूर आणि दोष म्हणता येईल इतके दिलदार होते. ह्यांतील ते काहीही नसले तरी मला त्याची पर्वा नव्हती. त्यांच्यात मला दाखविता येण्यासारखा दोष नव्हता एवढेच मला पुरे होते. राजकीय क्षेत्रात अत्यंत पूर्ण पुरुष असेच ते मला वाटले, आणि वाटत आहेत. म्हणून आमच्यात मतभेद नव्हते असे नाही. सामाजिक चालीरीतींबद्दल, उदाहरणार्थ— विधवा विवाहाबद्दल १९०१ सालीसुद्धा आमची मते भिन्न होती. पाश्चात्य सुधारणांच्या गणनेत आमच्यात मतभेद आढळले अहिंसेविषयीच्या माझ्या अतिरेकी मताबद्दल ते स्पष्टपणे भिन्न मताचे होते. पण या मतभेदांची त्यांना किंवा मला किंमत वाटत नसे. आम्ही कशानेही दुभंगले जात नव्हतो. जर ते आज जिवंत असते तर काय झाले असते याचा तर्क करणे हीसुद्धा ईश्वरनिंदा झाली असती. त्यांच्या हाताखाली मी काम करीत राहिलो असतो हे मला ठाऊक आहे. मी ही कबुली जी देत आहे त्याचे कारण त्या निनावी पत्रलेखकाने माझ्यावर राजकीय शिष्यत्वाच्या भोंदूपणाचा आरोप केला आहे. व त्याने मी दुखावलो आहे. जे आता बोलण्याच्या पलीकडे गेले आहेत त्यांच्या उपकाराची कबूली देण्यात मी बेपर्वाई दाखवली आहे काय ! सध्या गोखल्यांच्या नेमस्त विरोधी पक्षात मी काम करीत असल्याने गोखल्यांच्याविषयीची माझी श्रद्धा मी जाहीर केलीच पाहिजे असे मला वाटते.

'यंग इंडिया', १३-७-१९२१

१. कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळी गांधीजी गोखल्यांच्याबरोबर एक महिना राहिले होते; पाहा, आत्मवृत्त भाग ३, प्रकरण १७-१८-१९.

२. गांधींनी जेव्हा निःशस्त्र प्रतिकार सुरू केला तेव्हाची ही गोष्ट; पाहा, खंड १२.

१७८. पत्रलेखकांना[1]

चहाता (ॲडमायरर) : अलीबंधू खिलाफत फंडावर जगत नाहीत. आर. जे. वर्मा : जेथे तालुका, जिल्हा किंवा प्रांताने आपला पूर्ण हिस्सा दिला नसेल तेथे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेनंतरदेखील निधी गोळा करीत राहिले पाहिजे. पूर्ण हिस्स्याची अन्य रीतीने भरपाई झाली म्हणून कोणाही पूर्वी वर्गणी देऊ केलेल्या व्यक्तीला आपली देणगी सन्माननीय रीत्या देण्याचे नाकारता येणार नाही. ज्या वकिलांनी काँग्रेसच्या ठरावाप्रमाणे वकिली थांबविली होती, त्यांनी जर पुन्हा सुरू केली तर सभ्यपणाच्या दृष्टीने त्याला काँग्रेस कमिटीत अधिकारग्रहण करता येणार नाही.

स्वराज्य : जर एखादे स्वदेशी भांडार जपानी कापड स्वदेशीच्या नावाखाली विकत असेल तर ते उघडकीस आणले पाहिजे; व त्यावर बहिष्कार घातला पाहिजे. अशा फसवेगिरीविरुद्ध खात्रीचा उपाय म्हणजे सुबुद्ध जागृत जनमत. लोकांनी तलम कापड घेऊच नये. हातसुताचे व हातविणीचे कापड ओळखण्यास चूक होत नाही.

'यंग इंडिया', १३-७-१९२१

१७९. धारवाडच्या लोकांना संदेश

[जुलै १४, १९२१ पूर्वी]

धारवाडमधील सरकारची कृत्ये मी अत्यंत लक्षपूर्वक पाहात आहे. सरकारी जुलमाला बळी पडलेल्या नातेवाइकांना मी धन्यवाद देतो. मी सर्वसामान्य लोकांना त्यांच्या सहनशक्तीबद्दल व धैर्याबद्दल धन्यवाद देतो. धारवाडच्या नागरिकांचे धैर्य धरपकडीमुळे खचले नाही हे जाणून मला अत्यंत आनंद झाला. धारवाडमध्ये घडलेल्या

१. बहुधा ही उत्तरे गांधीजींनी दिली असावीत.

कृत्यासारख्या कृत्यांनी आपली स्वराज्याकडील प्रगती वाढेल यात मला शंका वाटत नाही. पण त्याकरिता आपण फक्त धीर धरला पाहिजे, आणि आपली अनत्याचारी वृत्ती टिकविली पाहिजे. बुद्धिपूर्वक आणि सहेतुक अप्रतिकारामुळे लोकांचे धैर्य दुप्पट होते. आणि त्यांनी हाती घेतलेल्या कार्यात अधिक पावित्र्य येते. म्हणून सरकारी दडपशाहीने दबून न जाता आपण आपले ध्येय गाठीत राहिले पाहिजे. स्थानिक भांडणे व वैरे यांमुळे धारवाडचा प्रश्न गुंतागुंतीचा झाला आहे असे मला समजते. सर्वांवर आलेल्या या समान संकटात लोकांनी या गोष्टी विसराव्यात असे मी आग्रहपूर्वक सांगतो. आणि जरी सर्वांनी माझे म्हणणे ऐकले नाही तरी असहकारितावाद्यांनी तसे करावे ही माझी अपेक्षा आहे. आपल्या प्रतिपक्षाला शस्त्रविहीन जर करावयाचे असेल तर जो काय आपला द्वेष केला जाईल तो निमूटपणे सहन करावा. प्रेम आणि औदार्य याशिवाय विरोधावर मात करण्याचा दुसरा अधिक चांगला इलाज नाही.

'मुंबई क्रॉनिकल', १४-७-१९२१

१८०. एका पत्रलेखकाला पत्र

लॅबरनम रोड, मुंबई
१४ जुलै १९२१,

प्रिय महाशय,

तुम्ही विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर असे. विशिष्ट परिस्थितीत सनातनी हिंदूने मुसलमान किंवा दुसऱ्या जातीच्या माणसाबरोबर स्वच्छ रीतीने शिजविलेले शुद्ध शाकाहारी अन्न सेवन करणे, हे मी अधार्मिक मानीत नाही.

मौलाना शौकत अलींनी लोकमान्यांच्या शवाला खांदा दिल्याबद्दल जो खेद व्यक्त केला, त्या संबंधी माझे म्हणणे असे : त्यांनी तो खेद त्या कृत्याबद्दल व्यक्त केला नसून जे मौलाना हजर होते त्यांची माफी मागितली. कारण हिंदूंच्या शवाला खांदा देऊ नये ही मुसलमानांची रूढी त्यांनी अजाणतेपणाने मोडली होती. लोकमान्यांच्या स्मृतीबद्दल यत्किंचित आदर कमी नसता मागितलेली ती माफी अगदी सुसंगत होती.

तुमचा विश्वासू
एम्. के. गांधी

फोटोस्टॅटवरून, एस्. एन्. ७५७१.

१८१. मणिबेन पटेलना पत्र

मुंबई
शुक्रवार, जुलै १५, १९२१.

चि. मणी,

तुझ्या पत्राचे विस्ताराने उत्तर देणे मला हवे आहे. पण मला वेळ नाही. रात्रीचे ११ वाजत आहेत. तथापि मी तुझ्या प्रश्नाचे उत्तर देतो. जे लोक परदेशी कापडाचा साठा विक्रीकरिता करतात, त्यांच्या बाबतीत त्या कापडाची होळी करण्याचा किंवा ते दुसऱ्यांना देऊन टाकण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

मी अद्याप पत्रक[1] वाचूदेखील शकलो नाही. दारू विकणारे जे हल्ले आपल्यावर करतील ते सहन करण्याची ज्या प्रमाणात शक्ती आपल्यात असेल त्या प्रमाणात आपले कार्य वाढेल.

बापूंचे आशीर्वाद

मणिबेन,
द्वारा श्री. वल्लभभाई जव्हेरीभाई पटेल
भद्र, अहमदाबाद.

[गुजरातीवरून]
बापूंना पत्रो,— मणिबेन पटेलने.

१. ते दारूबंदीबद्दल होते.

१८२. वल्लभभाई पटेलना पत्र

शुक्रवार,
[जुलै १५, १९२१ किंवा नंतर][1]

भाई श्री. वल्लभभाई,

गिडवानी यांच्याबरोबर बरेच बोलणे झाले. ते बेचैन दिसतात. काका व आश्रमातील काही लोकांच्या विरुद्ध त्यांच्या काही तक्रारी आहेत. त्या सर्वांना एकत्र आणा आणि मतभेद मिटवा. काकांच्याकडून असे काय घडले की, त्यामुळे ते बेचैन व्हावेत हे मला कळत नाही. काका ह्या खेपेला मला काही बोलले नाहीत. ही सारी जळजळ थांबेल तर मला बरे वाटेल. शाळांच्या अनुदानाचा प्रश्न अनसूयाबेन[2] बरोबर मिटवा. जा, तिला भेटा. आणि ती मागेल त्या रकमेचा चेक तिला देऊन टाका. मणिबेन किंवा डाह्याभाईला सांगा की, मी विठ्ठलभाईबरोबर पुष्कळ बोललो. मला वाटते त्यांना आता चरख्याचे महत्त्व थोडे अधिक पटत आहे. त्यांचे योग्य क्षेत्र म्हणजे कौन्सिले आहेत असे मला वाटते. ते लोकांच्यात जाऊ शकत नाहीत, मिसळू शकत नाहीत, व सेवा करू शकत नाहीत. त्यांना सेवा करायची नाही असे नाही पण त्यांनी स्वतःला तसे वळण लावले नाही. त्यांनी दुसऱ्या कामाचे वळण स्वतःला लाविले आहे. दोन प्रकारच्या कामाला निरनिराळ्या प्रवृत्ती लागतात. विठ्ठलभाईबद्दल वाईट बोलणारा मला मुंबईत कोणीही भेटला नाही.

मोहनदासचे वंदेमातरम्

भाई श्री. वल्लभभाई पटेल, बार-ॲट-लॉ,
भद्र, अहमदाबाद.

[गुजरातीवरून]
बापूना पत्रो— सरदार वल्लभभाईने

१. हे पत्र मणिबेन पटेलना पत्र, "जे ११ जुलै १९२१ नंतर लिहिले" होते त्यानंतर काही दिवसांनी लिहिले आहे. त्या पत्रात गांधीजींनी असे लिहिले होते कीं, विठ्ठलभाईची गाठ पडली म्हणजे मी त्यांच्याबरोबर खादीची चर्चा करीन.

२. अनसूया बेन साराभाई; अंबालाल साराभाईची बहीण - ते अहमदाबादचे गिरणीमालक; पाहा, खंड १४.

१८३. जनता संदेश[1]

[जुलै १६, १९२१ पूर्वी][2]

आजच्या आज घरातून परदेशी कापड हालवा. ते पटणी बिल्डिंगमध्ये काँग्रेस कमिटीला द्या किंवा जवळच्या जागी द्या व पावती घ्या.

'बाँबे सीक्रेट् ॲबस्ट्रॅक्ट्स', १९२१

१८४. स्वदेशी व्रत[3]

[जुलै १६, १९२१ पूर्वी][4]

मी खाली सही करणारा, माझ्या सदसद्विवेकबुद्धीनुसार आणि ईश्वराचे स्मरण करून अशी शपथ घेतो की, मी १ ऑगस्ट १९२१, संवत १९७७, आषाढ वद्य १२ सोमवारपासून पुढील तीन व्रतांपैकी एका एका व्रताचे पालन करीन :

(१) मी शुद्ध स्वदेशी कपडे वापरीन.

(२) गिरणीच्या सुताचे हाताने विणलेले कपडे वापरीन.

(३) हिंदुस्थानातील गिरण्यांत कातलेल्या व विणलेल्या सुताचे कपडे वापरीन.

'बाँबे सीक्रेट् ॲबस्ट्रॅक्ट्स', १९२१

१. भुलेश्वर जिल्हा काँग्रेस कमिटीने गांधींचा हा संदेश पत्रकाद्वारे वाटला.

२. ह्या संदेशाची तारीख सापडत नाही. तथापि तो संदेश पुढील प्रकरणाच्या बरोबर पाठविला असावा.

३. मुंबई सीक्रेट ॲबस्ट्रॅक्ट्सप्रमाणे मुंबई प्रांतातील निरनिराळ्या स्वदेशी सभांना यावर लोकांच्या सह्या घेण्यास सांगितले होते.

४. गांधींनी लिहिलेल्या या पत्रावरील तारीख सापडत नाही. पण ती तारीख पुढील प्रकरणातील तारखेचीच असावी.

१८५. बहिष्काराच्या पद्धती

मुंबई
जुलै १६, १९२१

बहिष्कार शांतपणे सुरू आहे. खादीची मागणी पुष्कळ वाढली आहे. आतापर्यंत सात व्यापाऱ्यांनी जरी परदेशी कापड आयात न करण्याच्या प्रतिज्ञेवर सह्या केल्या असल्या तरी इतर पुष्कळांनी मागण्या करण्याचे थांबविले आहे. पूर्वीच केलेल्या मागण्या रद्द केल्या जात आहेत. ह्या बाबतीत आपले कर्तव्य करण्यात कलकत्त्याने फारच थोडे काम केले आहे हे खेदजनक आहे. संघटित व्यापारी केंद्रांवर बहिष्कार घालण्याकरिता जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. मारवाडी व्यापाऱ्यांना आपली देशभक्ती सिद्ध करण्याची हीच वेळ आहे. देशातील प्रत्येक स्त्री-पुरुषाने ते कोणत्याही पक्षाचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी परदेशी कापड कायमचे टाकून देण्याकरिता प्रयत्नांची शिकस्त करावी.

लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी एक ऑगस्टला आहे. त्या दिवशी हिंदुस्थानात कोठेही हरताळ पाडू नयेत. आपली शक्ती वाढत आहे आणि आपल्या ध्येयाकडे आपण जलद जात आहोत या विश्वासाने आपण आनंदित व्हावे. दिवंगत देशभक्तांच्या स्मरणाकरिता दुःख प्रकट करणे हे अगदीच योग्य नाही......

काँग्रेस कार्यकर्त्यांनी लोकांच्यामध्ये स्वदेशीचे प्रेम निर्माण केले पाहिजे. परदेशी कापडाचा बहिष्कार पूर्णपणे यशस्वी होईपर्यंत त्यांनी लोकांना बहिष्काराकरिता उत्तेजन द्यावे आणि खादी निर्मिती हे आपले पहिले कर्तव्य मानावे. दरम्यानच्या काळात आपल्या गरजेपेक्षा निम्मेच कापड वापरावे. नाही तर कापडाच्या भयंकर वाढलेल्या किंमती आपल्या नशिबी येतील आणि फार मोठा तुटवडा पडेल. जोपर्यंत घरोघर चरखा फिरत नाही आणि सर्व विणकर हातसूत वापरत नाहीत तोपर्यंत एखाद्या कंजूष माणसाप्रमाणे स्वदेशी कापड वापरण्याची आपण काटकसर केली पाहिजे.

[हिंदीवरून]
'आज', १८-७-१९२१

१८६. अलिगडच्या लोकांना संदेश

जुलै १६, १९२१

महात्मा गांधींनी अलिगडच्या हकीकतीमुळे आपल्याला अत्यंत दुःख झाले आहे असा संदेश पाठविला. आपले साध्य आता इतके जवळ आले असता अलिगडचे नागरिक दुर्बलता दाखवून घड्याळाचा काटा मागे सारणार नाहीत अशी आशा होती. दुर्बलता दाखविण्याचे प्रकार म्हणजे धीर सुटणे किंवा अत्याचार करणे, आणि जनतेतील कोणत्याही वर्गाने केलेल्या अत्याचारांबद्दल जबाबदारी नाकारणे. मग ते लोक असहकारितावादी असोत वा नसोत.[1]

'अमृतबझार पत्रिका', १७-७-१९२१

१८७. परळ–मुंबई येथे भाषण[2]

जुलै १६, १९२१

गांधी म्हणाले, जी एक मोठी कामगिरी आपण हाती घेतली होती, ती आता संपली आहे. पण स्वराज्य मिळविण्यापूर्वी आपल्याला अधिक मोठे व अधिक कठीण काम करावयाचे आहे. लोकांना एक कोटी रुपये जमवावयाचे होते, आणि त्यांनी ते कामाने व सतत प्रयत्नाने जमविले. या जगात कोणतीही गोष्ट त्यागाशिवाय होणे शक्य नाही. जे काम आपण आता हाती घेतले आहे ते अत्यंत कठीण आहे. आणि त्याकरिता फक्त पैसे जमविण्यापेक्षा तुमच्याकडून अधिक त्यागाची जरूरी

१. हा संदेश हिंदी व उर्दूमध्ये धाडला होता.
२. परळच्या मुरारजी गोकुळदास हॉलमध्ये भरलेल्या सभेत.

आहे. जर तुम्हांला स्वराज्य हवे असेल, जर खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर व्हावयास हवे असतील तर तुम्हांला देशाकरिता हा त्याग करण्या-वाचून दुसरे गत्यंतर नाही. पंजाब व खिलाफतीचे अन्याय तुम्ही विसरा व क्षमा करा, असे व्हाइसरॉयदेखील सांगत आहेत. आपल्याला शक्य तितक्या लवकर स्वराज्य हवे आहे. गंभीर प्रयत्नावाचून हे शक्य नाही. जर तुमचे कर्तव्य करण्यास आवश्यक ती उद्दिष्टांची शक्ती तुमच्यात नाही अशी माझी खात्री झाली असती तर मी तुमच्याजवळ स्वराज्याकरिता बोललोच नसतो. तुमच्यात सुप्त शक्ती आहे, फक्त ती तुम्हांला कळावयाची आहे. एका भगिनीने उदार अंतःकरणाने माझ्याकडे ९०० रुपये किंमतीची साडी फंडाकरिता पाठविली. त्या साडीचे वजन १२ ते १५ पौंड होते. आणि अशी जाडी वजनदार साडी ती वापरू शकते याचे मला आश्चर्य वाटले. त्या साडीवर अत्यंत भारी किमतीची वेलबुट्टी होती. मोठ्या कष्टानेच तिने ती देऊन टाकली याबद्दल मला शंका नाही. तिने ती जाड साडी मोठ्या आनंदाने अंगावर घातली असेल. येथे असलेल्या भगिनींना मी असे सांगतो की, त्यांनी देशाकरिता त्या साडीच्या निम्म्या वजनाची खादीची साडी वापरावी.

तुम्ही आपले पैसे व दागिने खुशीने दिले आहेत. तुम्हांला तलम वाटणारे कपडे टाकून देणे ही सोपी गोष्ट नाही हे मला ठाऊक आहे. पण जर तुम्हांला आपल्या राष्ट्रीय प्रयत्नात आपला पुरा हिस्सा द्यावयाचा असेल तर तुम्ही हा त्याग करावा अशी माझी अपेक्षा आहे. जी एक कोटी रुपयांची सुंदर देणगी तुम्ही दिलीत ती फक्त स्वराज्य मिळविण्याची विसारच होती. पण तो त्याग नव्हता. परदेशी कापडावर बहिष्कार घालण्यास आपल्या सोयींचा व आपल्या निवडींचाही त्याग करावयास पाहिजे. गांधींनी स्त्रीपुरुषांना हा त्याग करावयास आवाहन केले. त्या दिवशी त्यांना लंडनहून नुकतेच आलेले दोन हिंदी तरुण भेटले. एक बंगाली होता व दुसरा पारशी. दोघेही अत्यंत कळकळीचे होते. गांधींनी त्यांच्या पुष्कळ प्रश्नांची उत्तरे दिली आणि उलट एकच प्रश्न विचारला, तुम्ही परदेशी कपडे टाकावयास तयार आहात का? दोघेही प्रांजल व देशप्रेमी होते. हीच गोष्ट योग्य आहे असे दोघांनी कबूल केले. पण त्यातला एक-जण म्हणाला, परदेशी कपडे टाकण्यास माझे मन तयार होत नाही. जर ते परदेशी कपडे टाकण्यास तयार नसतील तर ते स्वराज्याला लायक नाहीत अशी माझी पूर्ण खात्री आहे.

जेव्हा मी स्वराज्यप्राप्तीला एक वर्षाची मुदत घातली तेव्हा मी काय करतो हे मला ठाऊक होते. मी ज्या स्पष्ट अटी घातल्या त्या

कॉंग्रेसने आपल्या ठरावात अंतर्भूत केल्या. ज्याप्रमाणे एखाद्या वैद्याला आपल्या रुग्णाच्यावर काय करावे हे ठाऊक असते, तसेच मला हिंदुस्थानच्या रोगावर काय इलाज करावे हे ठाऊक होते. जर वैद्याने सांगितलेले उपाय रोग्यांनी केले नाहीत आणि तो बरा झाला नाही तर तो वैद्याचा दोष नाही. मी असा एक उपाय सांगितला होता की, जो माझ्या मताने हिंदुस्थानला फारशा अडचणीशिवाय योजता आला असता व आत्मसात करता आला असता. कॉंग्रेसने ठरविलेला कार्यक्रम हा खरोखरीच परिपूर्ण होता. त्या कार्यक्रमातील एक स्वदेशीची बाब अशी होती की, ती अंशतः स्वीकारून मागणार नव्हते, पण ती संपूर्णपणे स्वीकारावयास पाहिजे होती.

तुम्हांला तुमची तयारी दाखविण्यास फार चांगली संधी आहे. ऑगस्टची पहिली तारीख जवळ आली आहे. लोकमान्यांची स्मृती साजरी करावयास तुम्ही स्वतःला लायक केले आहे काय ? त्यांनी जो मंत्र मागे ठेवला त्याचे पठण करण्यास तुम्ही पात्र आहात काय ? गायत्री मंत्र म्हणण्यापूर्वी हिंदूला स्नान वगैरे करावे लागते, किंवा मुसलमानाला नमाज पढण्यापूर्वी तसेच करावे लागते. जर ह्या दोहोंतील एक परिणामकारक व्हावयाचा असेल तर त्याला जसे ते करावे लागते तसे तुम्ही एक ऑगस्टला खादीचा पोषाख घालणे आवश्यक आहे. तो घातलात तरच तुम्ही टिळकांनी दिलेला स्वराज्याचा मंत्र पठण करण्यास लायक व्हाल. हिंदुस्थानच्या आर्थिक स्वातंत्र्याकरिता आणि त्यातून मिळवावयाच्या स्वराज्याकरिता जर एकच गोष्ट आवश्यक असेल तर माझ्या मताने प्रत्येक हिंदी माणसाने परदेशी कापड टाकले पाहिजे. ही परिपूर्णता हिंदुस्थानच्या शक्तीबाहेर नाही. लोकांची ती इच्छाही आहे असे मला वाटते.

मेसर्स शॉ वॉलेस आणि कंपनीमधील मि. कशाळकरांना एकदम बडतर्फ केले ही गोष्ट मी तुमच्या ध्यानात आणू इच्छितो. त्यांनी टोपी घालण्याचे धैर्य दाखविले हाच त्यांचा गुन्हा. मॅनेजरला हे सहन झाले नाही. आणि तरुण मि. कशाळकर हे या बाबतीत पड खाईनात म्हणून त्यांना बडतर्फ केले. त्यांचे शौर्य अभिनंदनीय आहे. ही घटना हिंदुस्थानच्या गुलामगिरीचा ढळढळीत पुरावा नाही काय ? जर कोणत्याही दुसऱ्या देशात एखादा मॅनेजर आपल्या नोकराच्या पोषाख घालण्याच्या स्वातंत्र्याआड विनाकारण आला असता तर त्यालाच क्षमा मागावी लागली असती, किंवा बडतर्फ व्हावे लागले असते. मला वाटते अद्याप वेळ गेली नाही. जर मे. शॉ वॉलेस कंपनीच्या सर्व नोकरांत भ्रातृभाव आणि स्वाभिमान असेल तर ते स्वतः

केवळ निषेधाकरिता तरी खादी पोषाखात व टोपीत नोकरीवर जातील, आणि कशाळकरांना पुन्हा नोकरीवर घ्या असे सांगतील. या बडतर्फीत मला फार खोल अर्थ दिसतो. मॅनेजरने एका गरीब हिंदी नोकराला बडतर्फ करण्याची साधी गोष्ट करून या प्रकाराला राजकीय स्वरूप दिले आहे. त्याने साऱ्या राष्ट्राचा अपमान केला आहे. कारण त्याने मि. कशाळकर यांनी केलेल्या राष्ट्रीय कृत्याबद्दल संताप व्यक्त केला आहे. तुमच्यापैकी प्रत्येकाचा या बडतर्फीशी संबंध आहे. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकरता नसेल तरी कशाळकरासारख्या तरुण माणसांचे अपमानापासून संरक्षण व्हावे म्हणून तुम्ही खादी पोषाख व खादी टोप्या घातल्याच पाहिजेत. अशाच उदाहरणावरून तुमच्या राष्ट्रीय वृद्धीची ताकद किती आहे याची परीक्षा होईल. कशाळकरांच्यावर जसा अन्याय झाला तसाच ज्या सर्वांवर होईल त्यांना संरक्षण देण्याची शक्ती म्हणजेच स्वराज्य संपादनाची लायकी होय.

'मुंबई क्रॉनिकल', १७-७-१९२१

१८८. असहकारिता कमिटीचा अहवाल[1]

अंगोरा येथील तुर्की सरकारच्या संकटमय परिस्थितीचा विचार करून मध्यवर्ती खिलाफत कमिटीने त्या संकटाला कोणत्या चांगल्या मार्गाने तोंड देता येईल, याचा अहवाल सादर करण्यास आम्हांला सांगितले आहे. ज्या अर्थी ही कमिटी असहकारितेच्याच गोष्टीबद्दल विचार करण्या करता नेमली होती, त्या अर्थी आम्हांला असहकारितेच्या पलीकडे दुसऱ्या साधनांचा विचार करण्यास अधिकार नाही. पण अनत्याचारी असहकारितेच्या चळवळीने जे यश आतापर्यंत मिळविले आहे, त्यावरून दुसऱ्या साधनांचा विचार करणे अनावश्यक आहे असे आमचे मत आहे. जेव्हा या महिनाअखेर बेझवाड कार्यक्रमाच्या कार्याच्या परिणामाचा तक्ता तयार होईल तेव्हा असहकारितेच्या यशाचा अधिक चांगल्या रीतीने अंदाज करता येईल. आणि लखनौ येथे २२ जुलै रोजी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची जी सभा भरणार आहे, तिच्या सल्ल्याने परिस्थितीनुरूप उपाय योजता येतील.

१. या अहवालावर गांधी, शौकत अली, डॉ. किश्लू आणि अहमद हाजी सिद्दीग खत्री यांच्या सह्या आहेत.

सविनय कायदेभंग

असहकारितेच्याबद्दल बोलावयाचे म्हणजे जे जे पुढले पाऊल टाकावे लागेल, ते हिंदी लोकांच्या परिस्थितीचा विचार करूनच ठरवावे लागेल हे उघड आहे. अशी एक सूचना करण्यात आली आहे की, गेल्या तीन महिन्यांत केलेल्या प्रगतीवरून सविनय कायदेभंग सुरू करणे हे समर्थनीय ठरेल. ब्रिटिश सरकारने पुन्हा एकदा हिंदी व मुसलमान मताची उपेक्षा केली आहे. ती उपेक्षा त्यांची जी तुर्कांबद्दल वृत्ती आहे त्या वृत्तीत जशी दिसते तशीच असहकारितेची चळवळ अनत्याचारी राहूनदेखील, ती चळवळ दडपून टाकण्याकरिता त्यांनी हिंदुस्थानात कायद्याचा जो उघड उघड दुरुपयोग केला त्यातही दिसून येते. या दोन्ही गोष्टी आपल्याला सविनय कायदेभंग लवकरच सुरू करण्यास भाग पाडतील. तथापि ज्या अर्थी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी लखनौच्या बैठकीत या प्रश्नाचा विचार करणार आहे त्या अर्थी त्या निकालाची वाट पाहणे इष्ट ठरेल. तथापि आम्ही असे दाखवू इच्छितो की, युरोपमधील परिस्थिती लोकांना उद्दीपित करील आणि विशेषतः मुसलमानांना करील, आणि त्यांना देशापुढे जो कार्यक्रम पूर्वीच ठेवला आहे त्याकरिता अधिक मेहनत घ्यावयास लावील. तो कार्यक्रम पदव्या, कौन्सिले, शाळा व कॉलेजे, न्यायालये आणि लष्करभरती यासंबंधी आहे. आमचे असे मत आहे की, जो लष्करी पेशाचा वर्ग आहे त्याने सैन्यात भरती होण्याला आतापर्यंत जो नकार दिला, त्यापेक्षा अधिक प्रमाणात नकार देण्याची वेळ आली आहे. जर ब्रिटिश सरकारने हिंदी शिपायांना तुर्कांच्या विरुद्ध लढण्यास सांगितले, तर ती मदत नाकारणे हे हिंदी शिपायांचे कर्तव्य आहे. मुस्लिम उलेमांनी आपल्या सर्व प्रयत्नांची शिकस्त करून मुस्लिम शिपायांना त्यांच्यासंबंधीच्या इस्लामी कायद्यातील आज्ञा पटविल्या पाहिजेत आणि सर्व असहकारितावाद्यांनी कॉंग्रेस वर्किंग कमिटीने तुर्कांच्या विरुद्ध पुन्हा युद्ध सुरू झाल्यास हिंदी शिपायांचे कर्तव्य काय यासंबंधी जे मत व्यक्त केले आहे, त्याचे आत खास जोराने प्रतिपादन करावे.

असहकारिता कार्यक्रमाच्या मुख्य बाबी

तुर्क व इस्लाम यांच्यासंबंधी ब्रिटिश सरकारची जी निःसंशय विरोधी वृत्ती दिसते, तिला यशस्वीरीत्या तोंड द्यावयाचे असेल तर बेझवाडा कार्यक्रम अमलात आणण्याकरिता अधिक जास्त प्रयत्न जरूर आहे, ही आमची खात्री नोंदवू इच्छितो. कोणत्याही प्रौढ हिंदी स्त्रीपुरुषाने कॉंग्रेसच्या यादीत आपले नाव नोंदविण्यास किंवा टिळक स्वराज्य फंड देण्यास विलंब लावू नये. प्रत्येक घरात चरखा चालू करणे, सर्वत्र खादी वापरणे आणि परदेशी कापडावर पूर्ण बहिष्कार घालणे, या गोष्टी आमचे ध्येय गाठण्याकरिता अपरिहार्य आहेत असे आम्हांला वाटते. त्याच्याच बरोबर सर्वांनी आणि विशेषतः मुसलमानांनी खिलाफत कमिटीचे सभासद व्हावे आणि त्यांनी स्मर्ना

येथील दुःखितांच्याकरिता औदार्याने देणग्या द्याव्यात. त्या देणग्या न दिल्यास अंगोराचे टर्की सरकार जे आर्थिकदृष्ट्या आताच डबघाईवर आले आहे त्यांच्यावर अधिकच आर्थिक खर्चाचा बोजा पडणार आहे.

म्हणून आम्ही या दिशेने जोराने प्रयत्न करावेत असे आग्रहाने सांगतो. परिस्थितीचे गांभीर्य आणि निकड लक्षात घेऊन प्रयत्नांची तयारी गरजेप्रमाणे होईल व ते आम्हांला साद देतील अशी अपेक्षा आहे. ब्रिटन हा तुर्कांच्या विरुद्ध आणखी शत्रुत्वाचे पाऊल उचलण्याचा विचार करीत आहे, या बातमीने चोहोकडे जी क्रोधाची भावना उसळली आहे तिची आम्ही नोंद घेतली आहे. या भावनांतून जास्तीत जास्त चांगले निर्माण होण्याकरिता, त्या भावनांचा ओघ तिकडे वळविणे जरूर आहे. त्यात उद्देश असा की, खिलाफत व पंजाबचे अन्याय लवकर दूर व्हावेत आणि आपण जे स्वतःपुढे स्वराज्याचे ध्येय ठेवले आहे त्याची प्राप्ती व्हावी; हा त्यात महत्त्वाचा हेतू आहे. ते आपले ध्येय फारसे दूर नाही. तथापि तुर्कस्तान न सावरण्याइतका दुर्बल होण्यापूर्वी ते ध्येय गाठण्याकरिता जास्तीत जास्त प्रयत्न केले पाहिजेत. तुर्कस्तान-संबंधीचे हे भयच प्रत्येक मुसलमानाला असहकारितेचा कार्यक्रम पुरा करण्याकरिता हालवू शकेल.

'मुंबई क्रॉनिकल', १७-७-१९२१

१८९. होळी कशाकरिता ?

खंबायतची एक भगिनी लिहिते, विलायती कपडे गरिबांना द्यावे किंवा परदेशात पाठवून द्यावे. अशीच दुसरी पत्रे आली आहेत. त्यांतील सर्व युक्तिवादांचा विचार करून मला अजूनही वाटते की, परदेशी कापड आगीत टाकून द्यावे. जर आपण परदेशी कापड वापरणे पाप समजत असू जर ते वापरल्याने देश भिकारी झाला आहे असे आपल्याला वाटत असेल आणि त्यामुळेच आपल्या असंख्य भगिनी गृहहीन झाल्या आहेत हे आपले मत असेल तर आपण परदेशी कापड म्हणजे घाण मानली पाहिजे. आणि ज्याप्रमाणे आपल्या शरीरावरील घाण आपण दुसऱ्यांना देऊन टाकीत नाही, त्याप्रमाणे परदेशी कापडाची ही घाण आपण दुसऱ्यांना देता कामा नये. अशा कापडाचा वापर सर्वस्वी थांबवावा हा ठराव आपण केला नसता तर ते कापड संपेपर्यंत आपण वापरीत राहिलो असतो. त्याचा वापर थांबविण्याचे ठरविल्यानंतर आपण ते

प्रत्यक्षात आणू या. दुसऱ्या कोणाला ते कापड वापरण्यास देणे हे ते स्वतःच वापरण्यासारखे आहे. दुसऱ्याला ते देऊन सत्कृत्यापासून लाभणारे पुण्य आपल्याला मिळवावयाचे आहे. असे काही पुण्य आपण मिळविले आहे असे आपण सांगू शकत नाही. आपण सडलेले धान्य फेकून देतो तसेच परदेशी कापड फेकून द्यावे. हिंदू, मुसलमान, पारशी या सर्वांनी परदेशी कापड अपवित्र मानावे. जर आपण ते अपवित्र मानले तर ते खासच आपण वापरणार नाही. ही भावना निर्माण होण्याकरिता आपल्याजवळचे परदेशी कापड आपण त्याज्य मानले पाहिजे व आगीत टाकले पाहिजे. यामुळे जी भावना निर्माण होईल, ती माझ्या दृष्टीने अत्यंत मौल्यवान आहे. परदेशी कापडाविरुद्ध इतकी जोरदार भावना जागृत करणे जरूर आहे की, कोणीही या बाबतीत आपल्याला फसविण्यास धजणार नाही. याकरिता, जर आपण १ ऑगस्टला परदेशी कापडाचे कपडे जाळून टाकले, तर आपण शुद्ध झालो असे मी मानीन.

परदेशी कापडाबद्दल तिटकारा निर्माण होणे आवश्यक आहे. यामुळे परदेशांचा द्वेष करण्यास मी सांगत नाही का?–असे काही जण विचारतात. या चळवळीत आपण दुष्कृत्याचा धिक्कार करण्यास शिकावे, पण त्याच वेळी दुष्कृत्य करणाऱ्यावर प्रेम करावे. मनुष्य हा त्याच्या कृतीइतका पापी नसतो. आपण सर्वजण दोषांनी भरलेले आहोत. असे असता आपण एकमेकांकडे तुच्छतेने कसे पाहू ? सर्व धर्म दुष्ट माणसांची सेवा करा असे सुचवितात. मनुष्य हा खरोखर धार्मिक आहे किंवा नाही याची परीक्षा उत्कट लोभापासून आणि द्वेषापासून तो मुक्त आहे किंवा नाही यावरून होते. विकार हेतू असतानादेखील जो विकारांचा संयम करतो तोच ईश्वराला जाणतो. ईश्वराला ओळखणे हे प्रत्येक मानवी प्राण्याचे कर्तव्य आहे. विकारांचा संयम करणे हा केवळ संन्याशांचा धर्म नाही. संन्याशांना इतर अनेक कठीण व्रते करावी लागतात. म्हणून आपण कापड जाळावे. पण ते उत्पन्न करणाऱ्यांबद्दल दुष्ट बुद्धी ठेवू नये. मँचेस्टर व जपानला उत्पादन करू द्या. जर आपण ते कापड घेतले नाही तर ते काय करतील ? जर आमची दारू पिण्याची इच्छा नसेल तर गुत्तेवाला काय करील ? जर आपण सम्यक विचार केला तर स्वराज्याची किल्ली आपल्याच खिशात सापडेल. आपल्याला जडलेले दारूचे प्रेम आपण जाळू या आणि सुंदर रेशमी कापडाचे प्रेम हेही जाळू या. असंख्य रुचकर पक्वान्नांची लालसा टाकू या. जर आपण सर्व स्त्रियांकडे भगिनी म्हणून पाहण्याचे शिकलो नसलो तर डोळे बांधू या. शास्त्रकारांनी या सर्व गोष्टींच्या अपायकारक परिणामाविरुद्ध तिरस्कार निर्माण करण्याकरिता इतके हुबेहूब वर्णन केले आहे की, जो त्यांचा विचार करील त्याला त्यांचा तिटकाराच येईल. तथापि जे या वस्तू निर्माण करतात त्यांच्याविषयी अप्रीती निर्माण करणे बरोबर आहे का ? आपण दारू करणाऱ्याला, किंवा रेशीम विणणाऱ्या परक्या माणसाला, किंवा जो मिठाई करतो त्याला, किंवा सुंदर स्त्रियांना जाळावे का ? त्याऐवजी आपली लालसा जाळणे आणि ती लालसा उद्दीपित

करणाऱ्या वस्तू जाळणे हे चांगले नाही का? दोघांपैकी कोणाला स्वराज्य मिळविणे शक्य होईल? जो दारू सोडतो किंवा जो दारू गाळणाऱ्या माणसाला जाळतो तो? तथापि जो माणूस परदेशी कापड जाळून त्याचा वापर करण्याचे टाकण्यास शिकणार नाही, पण ते निर्माण करणाऱ्याचा द्वेष करण्यास शिकेल त्याने ते कापड जाळूच नये. ते जाळण्याची त्याची पात्रता नाही. परदेशी कापड जाळण्याऐवजी ते परदेशी पाठविणे ज्यांना पसंत आहे तीही प्रशंसनीय गोष्ट होईल. आपले मुसलमान बांधव स्मर्नाला कापड पाठवीत आहेत आणि त्या कापडाबरोबर हेही कापड पाठविले तर आपले कार्य साधेल. जर आपण परदेशी कापडाचा वापर सोडला तर आपला मुख्य हेतू साध्य होईल. टाकलेल्या कापडाचा योग्य उपयोग कसा करावा याविषयी मतभेद असले तर प्रत्येकाने आपल्या मर्जीप्रमाणे वागावे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १७-७-१९२१.

१९०. व्यापारी काय करतील?

परदेशी मालाचा व्यापार करणारांनी आपल्या मालाचे काय करावे? जर असे व्यापारी दरिद्री झाले तर देशाचे काय होईल? त्यांना काही पूर्वसूचना देऊ नये का?

परदेशी मालाचा व्यापार करणे ही मुळातच बरोबर गोष्ट नव्हती. त्या व्यापाराच्या मोहानेच आपल्यावर सध्याची स्थिती ओढवून आणली आहे. आपल्याला गुलाम केले आहे. आपल्या शेतकऱ्यांना चार महिने आळशी राहणे भाग पाडले आहे आणि दुष्काळाला तोंड देण्याची साधने शिल्लक ठेवली नाहीत. परदेशी मालाच्या व्यापाराने आपल्या देशाचे पुरे वाटोळे केले आहे. अशा व्यापारात गुंतलेल्या लोकांनी काय करावे हा प्रश्नच काढू नये. त्यांनी धैर्यशाली व्हावे. स्वराज्याकरिता शक्ती असणे याचा अर्थ आपण सर्वांनी देशाच्या कल्याणाकडे पाहणे आणि देशाकरिता वैय्यक्तिक हिताचा त्याग करण्यास तयार असणे. आपण इतके दिवस हा व्यापार का केला असे त्यांनी स्वतःलाच विचारावे आणि तो सोडून देण्यात जो तोटा होईल तो तोटा सोसण्यास तयार असावे.

शिवाय परदेशी कापडाची बासलात लावणे कठीण नाही. तो साठा बाहेर देशी विकता येईल. त्यातील काही माल सामान्यतः दुसऱ्या देशांच्या गरजांना सोयीस्कर होणार नाही. तरी देखील त्या कापडाचा काहीना काही उपयोग बाहेरदेशी होईल हे व्यापाऱ्यांना सांगण्याची जरूरी नाही.

व्यापारी भिकारी होणार नाहीत. पैशाची तुलना हातातल्या मळाशी केली आहे. व्यापारी माणूस एका दिवशी पैसा कमावतो व दुसऱ्या दिवशी गमावतो. पैसे मिळविण्याची शक्ती हेच संरक्षण आणि तारण आहे. पैसे येतात आणि जातात. पण पैसे मिळविण्याची माणसाची शक्ती कायम असते. जो माणूस एका धंद्यात बुडतो तो दुसरा धंदा काढतो. "व्यापारी कधीही भिकारी होणार नाही," हे शूरत्वाचे उद्गार मी अनेक व्यापाऱ्यांच्या तोंडून ऐकले आहेत. परदेशी कापडाचा व्यापार सोडून देऊन खादी विक्रीचा व्यापार सुरू करणे हे व्यापाऱ्यांना अशक्य आहे काय? साठ कोटी रुपयांचे नवे कापड आपल्याला निर्माण करावयाचे आहे. या कामात हजारो व्यापाऱ्यांना जगण्याचे साधन उपलब्ध होणार नाही काय? "आम्ही काय करावे?" हे शब्द आळस दाखविणारे आहेत.

परदेशी कापडावरील बहिष्कार म्हणजेच स्वराज्य ही गोष्ट अद्याप आपल्याला समजली नाही. जोपर्यंत स्वदेशीकरिता उत्कट भक्ती सर्व प्रकारच्या लोकांत निर्माण केली गेली नाही, तोपर्यंत बहिष्कार यशस्वी होणार नाही; आणि बहिष्कार यशस्वी झाल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही. म्हणून व्यापारी वर्गात देशाकरिता आपला परदेशी कापडाचा व्यापार टाकून देण्याची शक्ती निर्माण होणे आवश्यक आहे.

व्यापाऱ्यांना पूर्वसूचना नव्हती असे म्हणणे अज्ञानाचे आहे. त्यांना ती गेल्या सप्टेंबरात मिळाली होती. तेव्हापासून या गोष्टीची चर्चा चालू आहे. पण व्यापाऱ्यांनी त्या सूचनेकडे लक्ष दिले नाही. काँग्रेस ठराव पास करते आणि ते लवकर विसरले जातात. स्वाभाविकपणेच त्यांची दखल कोण घेणार? काळ बदलला आहे हे व्यापाऱ्यांना समजले नाही. तो दोष कोणाचा? सप्टेंबरपासून प्रत्येक सभेत मी परदेशी कापडाच्या बहिष्काराबद्दल बोललो आहे. जे न शोभणारे व्यवसाय करतात, जे व्यसनाधीन आहेत. ज्यांचे वर्तन अनैतिक आहे, जे अस्पृश्यांना तुच्छतेने वागवितात,–अशा सर्वांना असहकारितेची आणि आत्मशुद्धीची चळवळ सुरू होताच पूर्वसूचना मिळालेली आहे. ठराविक वेळी या चळवळीच्या एखाद्या किंवा दुसऱ्या स्वरूपाच्या आवश्यकतेवर जोर दिला जाईल. पण पातकांविरुद्ध व लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून संपत्ती मिळवण्याविरुद्ध पूर्वसूचना मिळालेलीच आहे असे गृहीत धरले पाहिजे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १७-७-१९२१

१९१. माझी टिप्पणे

अनुकरण करण्यालायक

वऱ्हाडला जी हकीकत घडली आणि ज्या हकीकतीचा वृत्तांत श्री. कुंवरजी विठ्ठलभाई यांनी वर्तमानपत्रांना पाठविला तो वाचून कोणत्या असहकारितावाद्याला हर्ष होणार नाही? प्रोफेसर माकनजी यांनी जो धीमेपणा आणि सोशिकपणा दाखविला त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. जेव्हा आपण सर्वजण त्याच रीतीने प्रक्षुब्ध न होता प्रहार सोसण्यास शिकू तेव्हा स्वराज्य मिळविणे लांबणीवर पडणार नाही. ज्या माणसाने मूर्खपणाने प्रोफेसर माकनजी यांच्याशी इतके असभ्य वर्तन केले त्या माणसाला वऱ्हाडचे लोक सहज शिक्षा करू शकले असते. पण त्यांनी स्वतःला आवरले आणि तसे करून खऱ्या धैर्याचे उदाहरण घालून दिले आहे. प्रोफेसरांच्या बरोबर जे सहकारी होते, त्यांनी त्यांना सोडून दिले आणि माराच्या भीतीने पलायन केले यासंबंधी टीका करणे आवश्यक आहे. आपल्याला कसलाही धोका असो, आपण पळून जाऊ नये. आणि सोबत्याला एकटा टाकून जाऊ नये, पण उलटपक्षी स्वतःचा जीव धोक्यात घालून त्याला वाचवावे. एखाद्या माणसाला वाचवावयाचे असेल तर त्याला आघात करण्याच्या शक्तीची जरूरी नाही. पण स्वतःचा प्राण देण्याची शक्ती लागते. रणांगणातून पळून न जाणे हा शूरांचा क्षत्रियांचा धर्म आहे. चातुर्वर्ण्यातील प्रत्येक वर्णाच्या माणसात इतर वर्णांच्या माणसातील गुण काही प्रमाणात असलेच पाहिजेत. ब्राह्मणांना किंवा वैश्यांना धैर्य लागत नाही किंवा ते त्यांच्यात असत नाही, असे समजणे अगदी वेडेपणाचे आहे. आपल्यापैकी प्रत्येकात स्वतःचे किंवा दुसऱ्याचे संरक्षण करण्याची शक्ती असली पाहिजे. प्रतिहल्ला केल्यामुळे एखादा माणूस स्वतः मारला जाण्याचे संकट ओढवून घेतो आणि त्यात जितक्या प्रमाणात तुमच्यात धैर्य असेल तितक्या प्रमाणात तो धोका असतो. ही टीका करताना मला प्रोफेसरांच्या मित्रांना दोष द्यावयाचा नाही. हे आपल्याला नवे अनुभव आहेत. जोपर्यंत आपण संकटांना तोंड देण्याइतके धैर्य संपादन केले नाही तोपर्यंत आपण अशा चुका करणारच. जोपर्यंत आपण बलाचा उपयोग करीत नाही आणि शांततापालनाची आपली प्रतिज्ञा मोडत नाही तोपर्यंत आपण आपल्यावर संकट ओढवून घेणार नाही.

अलीबंधूंच्याविरुद्ध आरोप

एक गृहस्थ असे लिहितात की, जून महिन्यात टिळक स्वराज्य फंडाकरिता रकमा गोळा केल्या जात असताना मी अलीबंधूंच्या विरुद्ध असा एक आरोप केल्याचे ऐकले

की, ते खिलाफत कमिटीच्या फंडातून दर महिन्याला स्वतःच्या खर्चाकरिता सहा ते सात हजार रुपये घेतात. दुसरे एक गृहस्थ लिहितात की, त्यांचा दररोजचा जेवणाखाण्याचा खर्च ९० रुपये आहे व तो खर्च ते खिलाफत कमिटीच्या फंडातून घेतात. ही टीका मी वारंवार ऐकली आहे. म्हणून या दोन पत्रांची दखल मी येथे घेत आहे. ही गोष्ट पूर्णपणे निराधार आहे हे मला ठाऊक आहे. अलीबंधू आपले खर्च खिलाफत कमिटीच्या फंडातून भागवितात हे अगदी असत्य आहे. त्या दोघांचे खर्च फार थोडे आहेत व ते त्यांचे मित्र भागवितात. हे दोघेही बंधू देशाकरिता व इस्लामकरिता फकीर झाले आहेत असे म्हणता येईल. चार वर्षांपूर्वीचे त्यांचे खर्च आणि त्यांची राहणी आणि आजचा त्यांचा पोषाख व त्यांचे साधे अन्न यांत केवढी तफावत आहे.

स्वदेशी

जे देशद्रोही किंवा जे स्वतःच्या हिताकडेच पाहणारे लोक होते, तेच आपल्या गुलामगिरीला जबाबदार होते. आणि आपण स्वार्थ सोडू शकत नाही म्हणून गुलाम राहिलो आहोत. सध्या स्वदेशीचे कार्य त्वरित प्रगती करीत असताना देशद्रोही लोक फारच गडबडी करू लागले आहेत. माझ्याकडे तीन तक्रारी आल्या आहेत. मुंबईतील काही लोक परदेशी जाड्याभरड्या कुजक्या लोकरीच्या टोप्या, परदेशी सूत आणि परदेशी सॅटीन विकत आहेत. स्वदेशी चळवळीचा फायदा घेत आहेत व माझे नाव वापरीत आहेत. त्या टोप्या काळ्या आहेत. स्वदेशी टोप्या वापरणारांना माझा सल्ला असा आहे की, त्यांनी फक्त खादीच्या पांढऱ्या टोप्या वापराव्यात. पांढऱ्या टोपीत जी एक प्रतिष्ठा, स्वच्छता व सुख असते, ते रंगीत टोपीत नसते. पांढरी टोपी केव्हाही धुता येते. काळ्या टोप्या घाणेरड्या असतात व त्यांना वास येतो. स्वच्छतेची कल्पना असणारा कोणीही माणूस सतत घाम शोषून घेणाऱ्या टोप्या वापरणार नाही. ज्या टोपीला कातड्याचे अस्तर असते ती मेंदूला चांगली नसते. ज्या टोपीला चामडे लागते ती टोपी घालून हिंदूला सुख कसे वाटेल ? ब्रिटिश लोक अशा टोप्या वापरतात पण फक्त बाहेर जाताना. शिवाय ते त्या वारंवार बदलतात. आपण एकच पगडी किंवा टोपी अनेक वर्षे वापरतो आणि ती नेहमी घालतो. अशांना चामडे असलेली टोपी असह्य होत असते. खादी टोपी स्वच्छ व हलकी असल्यामुळे अगदी निरुपद्रवी आहे. अगदी ओबडधोबड जातीच्या खादीचा टोपीशिवाय आणखी काय चांगला उपयोग करता येईल ? ज्याला नखशिखान्त खादी वापरावयाची असेल त्याने डोक्यापासून सुरुवात करावी. गरीब श्रीमंत या सर्वांना खादी टोपी वापरता येईल. ज्यांना शक्य असेल ते खादी टोपी नेमाने धुतील. शिंपी लोक त्याचे अनेक प्रकारचे नमुने करतील. आणि त्यात अधिक घड्या घालतील. अशा प्रकारचे बदल अवश्य करावेत. पण सर्वांच्या डोक्यावर एकाच प्रकारची टोपी असावी ही कल्पना विचार करण्यासारखी आहे. फक्त खादी टोपी हीच स्वदेशी मानली जावी. हा मात्र निर्णय घेतला गेला पाहिजे. अशा

टोपीला शिक्क्याची जरूरी नाही. स्वदेशी टोपी लहान मुलांनासुद्धा ओळखता आली पाहिजे. ज्याप्रमाणे लुच्चेगिरी आणि ढोंग यापासून मुक्त झालेल्यांना खरे स्वराज्यवादी होता येते, त्याचप्रमाणे टोप्यांच्या बाबतीत आपण त्यापासून अलिप्त असले पाहिजे. जे परदेशी टोप्या स्वदेशी म्हणून विकत असतील त्यांना मी असे म्हणेन की, जरी तुम्हांला आपला धंदा प्रामाणिकपणे करता येत नसला तरी राष्ट्रीय हिताच्या बाबतीत त्यांनी अप्रामाणिकपणा करू नये. चोरांच्यामध्येसुद्धा प्रतिष्ठा असावयास पाहिजे. चोर हे एकमेकांत चोऱ्या करीत नाहीत. काही जण गरिबांना हातही लावीत नाहीत. देशात महान यज्ञ चालू आहे. स्वतःच्या हीन स्वार्थ साधण्याकरिता दुसऱ्यांना लुबाडण्याच्या अश्लाघ्य इच्छेपासून आपण मुक्त होणार नाही का? मी लोकांना बिनदिक्कत सांगेन की, जे तुम्हांला अशा प्रकारे फसवितात त्यांच्या दुकानांवर संपूर्ण बहिष्कार घातला पाहिजे.

स्वदेशी मांजरपाट

जे टोप्यांना लागू आहे तेच मांजरपाटालाही लागू आहे. मला सिमल्यासारख्या दूरच्या ठिकाणाहून एक पत्र आले आहे. तो पत्रलेखक म्हणतो की, काही लोक जपानी मांजरपाट स्वदेशी म्हणून विकतात. ते त्यावरील जपानी छाप पुसून टाकतात. ते कापड धुतात आणि पुन्हा त्यावर मुंबईचे छाप मारतात. यात काही गिरण्याही सामील आहेत. या वेळी तरी निदान गिरणीमालकांनी या देशद्रोहात भागीदार होऊ नये. ही पवित्र चळवळ चालू असताना देश त्यांच्यापासून मदतीची अपेक्षा करीत आहे.

गिऱ्हाइकांनीसुद्धा सावध असणे जरूर आहे. तलम कापडाने मोहित होण्याचे लोक टाकून देतील तर ते फसले जाण्याची संधी कमी होईल. निरनिराळा खळी लावलेला माल लोकांनी वापरण्याचे जर टाकले तर लोक स्वतःच स्वदेशी माल ओळखू शकतील. या साऱ्या अडचणीतून सुटण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे बिन धुवट खादी वापरणे. जर प्रत्येक गावाने आपल्या गरजेइतकी खादी निर्माण केली तर कोणी कोणाला फसविणार नाही.

गिरणीमालक स्वदेशी चळवळीला जितकी मदत करू शकतील तितके दुसरे कोणी करू शकणार नाही. अहमदाबादच्या गिरणीमालकांनी टिळक स्वराज्य फंडाला पैसे देऊन आपली कीर्ती उज्ज्वल केली आहे. श्री. अंबालाल साराभाई यांनी आपण किमती वाढविणार नाही, आपण स्वतःचे असे दुकान उघडू की, प्रत्येक गिऱ्हाइकाला घाऊक भावाने माल मिळेल असे जाहीर करून आणि स्वदेशी चळवळीला मदत करून त्यांचा लौकिक वाढविला आहे. श्री. अंबालाल यांना असहकारितेबद्दल काही शंका असल्यामुळे त्यांचा संपूर्ण पाठिंबा आम्ही मिळवू शकलो नाही. जेव्हा असहकारितावादी आत्मसंयमाने भीतीचे काही कारण नाही अशी खात्री पटवतील तेव्हा ते या चळवळीत पूर्णपणे सामील होतील. तूर्त तरी ज्या पत्रात त्यांनी किमती न वाढविण्याचा निश्चय कळविला

आहे तोही निःसंशय आपल्याला मदत करील. श्री. अंबालाल यांचे उदाहरण गिरवून इतर गिरणीमालक स्वदेशी चळवळीला मदत करतील अशी आशा आहे. मला जे व्यापारी सांगत आहेत ते असे की, गिरणीमालकांनी सध्याच्या किमती वाढवूच नयेत. कारण की, सध्यांच्या किमती जपानी कापडाच्या किमतीपेक्षासुद्धा भरमसाट अधिक आहेत. गिरणीमालकांनी या प्रश्नाची चर्चा केली पाहिजे आणि ठाम निर्णयाला आले पाहिजे.

त्यांनी देशाच्या गरजा अजमाविल्या पाहिजेत व बाहेरून कमी मागण्या स्वीकारल्या पाहिजेत. सूतदेखील फार मोठ्या प्रमाणात निर्यात केले जात आहे, आणि याही धोरणाची फेरतपासणी केली पाहिजे. तथापि या प्रश्नावर अधिक विचार होणे जरूरी आहे. जोपर्यंत बाहेरच्या लोकांना आपल्या मालाची जरूरी आहे तोपर्यंत जेथे जेथे या गरजा आपण भागवीत होतो, तेथे तेथे तोपर्यंत त्या भागवीत राहिले पाहिजे असे आपल्याला वाटेल. पण इंग्लंडपेक्षा आपली स्थिती निराळी आहे. इंग्लंड आपल्याशी जो व्यापार करते त्यात एक प्रकारची सक्ती आहे. पण आपण जो इतर देशांशी व्यापार करतो त्यात ती सक्ती नाही. ही एक निराळी गोष्ट आहे व काहीशी नाजूक आहे. तीन गोष्टी संशयातीत आहेत. अफूचा व्यापार हा पूर्णपणे अनैतिक आहे. ज्या ह्या बाबतीत हिंदुस्थान सरकार गुन्हेगार होते, त्या अनीतिमत्तेत आपणास स्वखुषीने भागीदारी केली. चीनच्या नाशाचे पातक हे सतत आपल्या डोक्यावर राहील. जोपर्यंत आपल्या देशाच्या गरजा पूर्णपणे भागल्या नाहीत तोपर्यंत अन्नधान्य व कापूस निर्यात करता कामा नये, यात तर वादच नाही. त्याऐवजी युद्धकाळात आपल्या देशातून मोठमोठ्या प्रमाणात अन्नधान्य निर्यात केले गेले. कापसाच्या बाबतीत आपल्या गुन्ह्याची भयानकता पुढील काळात स्पष्ट होईल.

ज्या बाबतीत आपण गिरणीमालकांच्याकडून सहकारिता मागतो ती शेवटची आणखी एक गोष्ट खात्रीलायक मालाबद्दल आहे. परदेशी सुतापासून तयार केलेले कापड स्वदेशी म्हणून विकू नये, आणि त्यांनी कापडाला जादा खळही लावू नये. या गोष्टींची चर्चा गिरणीमालक करतील आणि देशाच्या हिताचे ते निर्णय घेतील अशी मला आशा आहे.

फायदा कोणाचा ?

श्रीमंताशिवाय असहकारितेपासून कोणाचा फायदा होतो ? जर असहकारितेमुळे दंगेधोपे झाले तर त्यात कोणत्या वर्गाचा हात असेल ?

एका पत्रलेखकाने हे प्रश्न विचारले आहेत. जर असहकारितेने गरिबांचे फायदे केले नाहीत तर ती कोणाचाही फायदा करू शकणार नाही. ते शस्त्र सर्वांचा फायदा-

करील आणि कोणत्याही सन्मान्य संस्थेला किंवा व्यक्तीला हानी पोहोचविणार नाही. गरिबांतल्या गरीब माणसांचे हक्क संरक्षण करण्यास मदत करणारे ते शस्त्र आहे.

ज्या अर्थी असहकारिता ही कधीही दंगेधोप्याकडे नेणार नाही, त्या अर्थी तीमध्ये कोणाचा हात असेल हा प्रश्न अप्रस्तुत आहे. जर दंगेधोपे उद्भवले तर ती असहकारितेची चळवळ राहणार नाही. ती तशी संपलेलीच असेल. जर देशात दंगे पसरले तर त्याचा अर्थ देशाने असहकारिता टाकली असा होईल. दंगे आणि असहकारिता एकत्र राहूच शकणार नाहीत. जर काही गडबडी झाल्या तर खोडसाळ वृत्तीच्या माणसांना काही काळ असे वाटेल की, आता आपला फायदा होणार आहे. अशाच गोष्टी नेहमी घडल्या आहेत. ज्या लेखकाने वरील दोन प्रश्न विचारले, तो हे विसरला की, हे धर्मयुद्ध आहे, आत्मशुद्धीची चळवळ आहे, देवाला भिण्याला शिकण्याची आणि माणसाची भीती टाकून देण्याची चळवळ आहे.

बिकट परिस्थिती

पारशांच्या सभेच्या शेवटी एका सहानुभूती असलेल्या पारशी गृहस्थाने काही शंका प्रदर्शित केल्या. त्या विचार करण्यालायक असल्यामुळे मी त्यांची येथे दखल घेतो. ते गृहस्थ म्हणतात :

> (१) सारे पुढारी तुमच्या मताचे नाहीत हे तुम्हांला ठाऊक आहे का ? कदाचित ते तुम्हांला ठाऊक नसेल की, मुंबईमध्ये पारशांच्या विरुद्ध जी सर्वसाधारण टीका होते ती अयोग्य आहे व तीमध्ये मत्सर आहे. ती थांबविण्याकरिता तुम्ही काय उपाय योजणार आहात ?
>
> (२) पारशी लोक मोठ्या बिकट परिस्थितीत आहेत. ते आपल्या खऱ्याखुऱ्या स्वदेशी भावनांमुळे राष्ट्रीय कार्य सोडू शकत नाहीत; आणि दुसऱ्या पक्षी जे काय संरक्षण त्यांना मिळते ते धोक्यात आणणे त्यांना कठीण वाटत आहे. जर तुमच्या हातांतले लगाम सुटले किंवा तुमचा देहान्त झाला, तर प्रचंड राष्ट्रीय जागृतीनंतर निरनिराळ्या वर्गांच्या लोकांमध्ये परस्परांविषयी आदर वाढला नाही तर पारशी खासच चिरडले जातील.

या दोन शंका झटकून टाकता येत नाहीत. पारशांच्याविषयी प्रदर्शित केलेली माझी मते, ही दुसऱ्याची न होता माझीच राहणार असतील तर या गृहस्थाने दाखविलेली भीती विचारात घेतली पाहिजे. काही वर्तुळांत पारशांच्याविषयी व्यक्त केलेले उद्गार मत्सरयुक्त असतात हे खरे आहे. पारशांच्यासारख्या लहान जमातीतील दोष हे ढळढळीत दिसतात. पण त्यांचे गुण काळोखात झाकले जातात. म्हणून त्यांचे सद्गुण मनात ठेवणे हे आपल्याला जरूर आहे. लोकांच्याविषयी आपली प्रीती जर वाढावयाची

असेल तर आपण नेहमी त्यांच्या सद्गुणांचाच विचार केला पाहिजे. जर आपण पारशांच्याकडे बंधू व भगिनी म्हणून पाहात असू तर आपल्याला निश्चितपणे त्यांचे औदार्य, त्यांचा सोशिकपणा, त्यांचा विनय, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांची ईश्वरावरील श्रद्धा, त्यांचा जन्मजात साधेपणा हा आपल्याला कळून येईल; आणि आपल्यामध्ये नसणारा कोणताही दोष त्यांच्यामध्ये आढळणार नाही. पारशी लोक येथे राहिल्यामुळे हिंदुस्थानची काही हानी झाली आहे असे मला वाटत नाही. त्यांच्या येण्यामुळे हिंदुस्थानचा फायदा झाला हे उघड आहे. त्यांच्याविरुद्ध मुख्य आरोप असा की, त्यांनी पाश्चात्त्य सुधारणेचे अनुकरण केले आहे व हिंदी संस्कृती ते हळूहळू सोडीत आहेत. अधिक खोल विचार केल्यास हेही खरे नाही असे आपल्याला दिसून येईल. त्यांच्यावर पाश्चात्त्य सुधारणेचा अनिष्ट परिणाम झाला हे मी कबूल करतो. पण हिंदू आणि मुसलमानांच्यापेक्षा सापेक्षतः अधिक झाला नाही. तथापि ते संख्येने लहान असल्यामुळे आणि मुंबईतच केंद्रित झाले असल्यामुळे त्यांनी केलेले बदल अधिक ठळकपणे दिसतात. पण हिंदू आणि मुसलमान हे जरी सर्व बाबतींत इंग्लिश गृहस्थ झाले असले तरी ते सर्व देशभर विखुरले असल्यामुळे आपल्या डोळ्यांसमोर येत नाहीत. इंग्लंडमध्ये जाणाऱ्या कोणत्याही हिंदी माणसाला या विधानातील सत्यता पूर्णपणे पटेल. मला तर पारशी, मुसलमान व हिंदू यांच्यात तेथे फरक दिसलाही नाही. पण सर्वचजण पूर्णपणे इंग्रज बनले होते.

पण आता ?

ज्याप्रमाणे हिंदू व मुसलमानांत बदल दिसत आहे, तसे पारशीही बदलू लागले आहेत. पारशी तरुणांना साधेपणाचे ध्येय पटले आहे. पारशी मुली खादी वापरू लागल्या आहेत. ज्यांना खादी वापरण्याचे धैर्य होत नाही ते हिंदी गिरण्यांतील कापड वापरतात. मला वाटते ज्या क्षणी पारशांतील प्रवाहाची दिशा बदलेल त्या क्षणी साऱ्याच गोष्टी क्षणात बदलून जातील. आपण अराजनिष्ठ होणार नाही अशी पारशी जमातीने माझी समज केली आहे. त्यांची जमात लहान असल्यामुळे हिंदू व मुसलमान जितक्या प्रमाणात पुढे आले तितक्या प्रमाणात ते पुढे आले नसतील. पण माझी खात्री आहे की, ते अंतःकरणाचे हिंदी आहेत आणि त्यांचे हिंदुस्थानवरील प्रेम कधीही ढळणार नाही. ते कोणत्या बाबतीत मागे राहिले हे मला कळतच नाही. म्हणून हिंदू व मुसलमानांनी पारशांच्याबद्दल आदर बाळगावा आणि उठल्या सुटल्या त्यांचे दोष पाहात बसू नये किंवा त्याकडे बोट दाखवू नये.

आमच्या पारशी बांधवांना भिण्याचे काहीच कारण नाही. ज्यांनी कोणाचेही नुकसान केले नसेल त्याला भीती असू नये. धर्मसंस्थापक झोरोॲस्टर यांनी आपल्याला असे शिकविले आहे की, औदार्याला औदार्याचेच नेहमी बक्षीस मिळते. जर लहान जमातीला भिण्याचे काही कारण असेल तर त्या जमातीला न भिण्याचीही

सबब असते. आपण हिंदुस्थानला काही अपाय केला नाही हे पारशांना ठाऊक असल्यामुळे हिंदुस्थानही आपल्याला काही अपाय करणार नाही अशी त्यांची खात्री असली पाहिजे. जो समाज किंवा व्यक्ती देशाचे हित लाथाडून, समाजाचे किंवा स्वतःचे हित साधू इच्छित असेल त्यांनी भीती बाळगावी. निरपराधी माणूस जरी एकाकी असला तरी त्याला भिण्याचे कारण नाही. शेवटी मी अत्यंत नम्रपणे माझ्या पारशी बंधुभगिनींना अशी विनंती करीन की, त्यांनी ही चळवळ आत्मशुद्धीकरिता आहे असे लक्षात घेऊन त्या चळवळीत अंतःकरणपूर्वक सामील व्हावे. या चळवळीत आपण परस्परांवर विश्वास ठेवावा आणि आत्मविश्वास हेच असे एक साधन आहे की, ज्यामुळे दुसऱ्यातही तसा विश्वास निर्माण करता येईल आणि आत्मविश्वास म्हणजेच स्वराज्य.

अपूज्यभाव

माझी कृष्ण म्हणून जी चित्रे काढली आहेत त्यांकडे लक्ष वेधणारे एक पत्र एका गृहस्थाने मला लिहिले आहे. आणि असा अशिष्टपणा थांबविण्यास मला सांगितले आहे. मी तसे एकही चित्र पाहिले नाही व पाहण्याची इच्छाही नाही. या गोष्टी शिष्टाचाराचा भंग करतात असे मला वाटते. आपण श्रीकृष्णाचे वर्णन असीम पूर्णावस्थेतील परमात्मा असे करतो. आपण त्याला देवाचा अवतार मानतो व तो गीतेतील पूर्ण योगी आहे असे समजतो. आपण लक्ष्मीला जगातील इतर स्त्रियांप्रमाणे स्त्री म्हणून मानीत नाही. परमेश्वराच्या मायेतील ती पूर्णावस्था आहे व जगाची धारणा करणारी धात्री आहे असे म्हणतो. माझे श्रीकृष्णासारखे आणि माझ्या बायकोचे लक्ष्मीसारखे चित्रे काढणे म्हणजे दोघांचीही निंदा करणे आहे. असा सारखेपणा पाहून जर आपण स्वतःबद्दल कल्पना करू लागलो तर आपल्याला पाप लागेल. मला माझ्या अपूर्णतेची पूर्ण कल्पना आहे. मोक्षाकरिता धडपडणारा आणि पूर्णावस्थेकरिता धडपडणारा मी एक क्षुद्र जीव आहे. माझी बायकोही एक सामान्य स्त्री आहे. ती आपल्या नवऱ्याच्या पावलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्न करीत आहे आणि त्या प्रयत्नात असंख्य दुःखे भोगीत आहे. मला वाटते, माझे गृहजीवन सुखी आहे. पण सेवेच्या मार्गाने आपले कर्तव्य करीत असताना चिरशांती मिळावी यापलीकडे दुसरी इच्छा नाही. जगाच्या स्तुतीचा मला मोह नाही आणि माझ्या कार्याचा तो उद्देशही नाही. त्या कार्याचा फक्त उद्देश म्हणजे माझे कल्याण हा आहे. माझा आत्मा मला असे आश्वासन देत आहे की, मी जे वर्तन करतो ते धर्म या बुद्धीने करावे आणि जेव्हा एखाद्याच्या धार्मिक गरजेनुसार एखादे कृत्य केले जाते, तेव्हा पारितोषिक म्हणून जगाने त्याची स्तुती करावी अशी अपेक्षा असू शकत नाही. लोकांच्याकडून स्तुती करून घेण्यास एक क्षणही खर्च करण्याचा मला अत्यंत तिटकारा आहे. म्हणून माझी चित्रे विकली जाणे हेही मला आवडत नाही. असे असता माझ्या स्वतःची एका पूर्ण पुरुषासारखी चित्रे काढणे, किंवा माझ्या बायकोची पूर्ण स्त्री म्हणून चित्रे काढणे हे मला अगदीच असह्य होते. जे कोणी अशी चित्रे

विकत असतील त्यांनी ती नष्ट केली तर माझ्यावर उपकार होतील. ज्यांना माझ्याबद्दल आदर दाखवावयाचा असेल त्यांनी मी जनतेपुढे मांडलेली तत्त्वे निष्ठापूर्वक आचरावी म्हणजे झाले. जे कोणी तोंडाने माझी स्तुती करतील, किंवा माझी तत्त्वे उपेक्षून माझ्या चित्रांचा संग्रह करतील ते माझा अपमान करतील. जे लोक पवित्र मूर्तीच्या रूपाने माझे दर्शन घडवितील ते माझ्याविषयी पूज्यभाव दाखविणार नाहीत. एका जुन्या शहाण्या माणसाने असे म्हटले आहे की, कोणाही माणसाला मृत्यूपूर्वी चांगला म्हणू नये. जो माणूस मृत्यू समोर असताना ईश्वराचे स्मरण केल्याशिवाय राहात नाही तोच मोक्ष मिळवितो. जो माणूस मरेपर्यंत चांगुलपणा सोडत नाही त्यालाच चांगले म्हणता येते.

एक शंका

भावनगरच्या दोघा गृहस्थांनी काँग्रेस प्रतिनिधी म्हणून कोणाला हजर राहता येईल असे विचारले आहे :

> जे असहकारितेत सामील झाले नाहीत त्यांना प्रतिनिधी म्हणून हजर राहता येईल का? काहीही असले तरी काँग्रेस ही राष्ट्रीय संघटना आहे.

हे अगदी खरे आहे. जेव्हा मतदार सारेच असहकारितावादी असतात तेव्हा सहकारितावाद्याला प्रतिनिधी म्हणून निवडून येण्याची शक्यता नसते. जर काँग्रेसमध्ये सहकारितेच्या बाजूने मतदार सभासद असतील आणि जर त्यांच्या मतांनी बहुमत होणार असेल किंवा सहकारितेचा पुरस्कार करणारा प्रतिनिधी निवडून देण्याइतकी मते त्यांना गोळा करता येतील तर त्यांना खासच असे करता येईल. आणि निवडणूक पूर्णपणे कायदेशीर होईल.

दुसरी शंका

मुंबईचे एक गृहस्थ विचारतात :

> जर धेड व भंगी शिकू लागले तर त्यांना नोकऱ्या लागतील किंवा ते धंद्यात शिरतील; मग त्यांचे काम कोण करील?

या पत्रात दुसरेही प्रश्न आहेत. पण मला ते प्रश्न द्यावयाचे नाहीत. कारण त्यांचे उत्तर दिलेल्या उत्तरात आले आहे. या प्रश्नात आज अस्पृश्यतेचा भयानकपणा जसा आपण समजतो तसा दाखविण्यात आला आहे. आपल्या दररोजच्या वर्तनात अस्पृश्या-संबंधी जो तिरस्कार आपण दाखवितो त्यापलीकडे दुसरे काहीच नसते. शिक्षणामुळे भंगी लोक आपला व्यवसाय सोडतील ही कल्पना चुकीची आहे. त्याचे कारण आपणच आहोत. आपण भंग्याच्या धंद्याकडे तुच्छतेने पाहतो. पण स्वच्छतेशी त्यांचा संबंध असल्यामुळे खरोखर ते काम पवित्र आहे. आई आपल्या मुलाचा मळ काढून टाकते

म्हणून तिच्याकडे आपण अधिकच पावित्र्याच्या भावनेने पाहतो. आजाऱ्यांची शुश्रूषा करणाऱ्या आणि अत्यंत दुर्गंधी येणाऱ्या अशा वस्तू काढून टाकण्याबद्दल आपण त्रीला मान देतो. जो माणूस आपले शौचकूप साफ करतो आणि त्यायोगे आपल्याला रोगमुक्त ठेवतो त्याची त्याची आपण पूजा करू नये का ? अशा लोकांना हलके मानून आपण स्वतःच हलके झालो आहोत. जो माणूस दुसऱ्याला विहिरीत लोटतो तोही त्याच्याबरोबर विहिरीत पडतो. म्हणून भंगी किंवा त्यांच्यासारखे लोक हे हलक्या जातीचे आहेत असे मानण्याला आपल्याला अधिकार नाही.

भोजा भगत हा जरी मोची होता तरी त्याची भक्तिपर भजने आपण प्रेमाने गातो व त्याला पूज्य मानतो. रामायणाचा असा कोणता वाचक आहे की जो रामाची भक्ती करणाऱ्या पारध्याची पूजा करीत नाही. शिवाय जर भंग्यांनी व इतरांनी आपले धंदे सोडले तर आपण त्यांना विरोध करता कामा नये किंवा त्याला भिता कामा नये. जोपर्यंत लोकांच्यावर सक्तीने एखादे काम आपण लादतो तोपर्यंत स्वराज्याला आपण लायक होणार नाही. आपले शौचकूप स्वच्छ ठेवण्यास शिकले पाहिजे. जेव्हा ते बाणेरडे ठेवण्याची शरम आपल्याला वाटेल तेव्हा ते वाचनालयासारखे स्वच्छ ठेवू. आपल्या शौचकूपातील घाण, दुर्गंधी आणि त्यामुळे निर्माण होणारे वायू हे आपल्या संस्कृतीला कलंक आहेत. आणि आपल्या आरोग्यविषयक अज्ञानाचे द्योतक आहे. आपल्या शौचकूपांची अवस्था ही अंत्यजाविषयी आपली जी त्यांच्यासंबंधी तुच्छ वृत्ती आहे त्यांची साक्ष देतात. आणि तीच अवस्था आपण भोगत असलेल्या अनेक रोगांचे कारण आहे. दुसऱ्या जातीच्या लोकांना स्पर्श केला असता आपली जात बुडेल किंवा आपण अपवित्र होऊ ह्या कल्पनेतच आपली दुर्बलता आहे. जोपर्यंत आपण ह्या जगात आहोत तोपर्यंत स्पर्श अटळ आहे आणि आपल्या धर्माच्या सत्यतेची कसोटी त्याही परिस्थितीत शुद्ध राहण्यात आहे. भंग्यांना व त्यांच्याचसारख्या इतर जातींना स्वच्छ राहण्यास शिकविणे त्यांच्या उद्धाराकरिता प्रयत्न करणे व त्यांना आदराने वागविणे हाच भूतदयेचा मार्ग आहे. हे करण्याकरिता अशा लोकांच्याबरोबर जेवण्यास बसण्याची जरूरी नाही. जर कशाची जरूरी असेल तर अंतःकरणाच्या बदलाची.

म्हातारपण—टीकेला जागा ?

"नवजीवनचा विद्यार्थी" म्हणविणारा एक वाचक लिहितो :—

गुजरातमधील श्रेष्ठ विद्वानांनी उतारवयात देश इतक्या संकटात असताना सरकारी कॉलेजात गुजराती प्रोफेसर्सच्या जागा पत्करल्या. तुम्ही या दुर्दैवी घटनेबद्दल काही टीका कराल अशी माझी खास खात्री होती. पण नवजीवनचे दोन लागोपाठ अंक व्यर्थ चाळल्यानंतर मी निराश झालो आणि तुमच्या मौनाबद्दल मला अत्यंत आश्चर्य वाटले. तुम्ही या गोष्टीचा खासच विचार केला असेल, आणि जाणून बुजून त्यावर टीका करण्याचे

सोडून दिले असेल. जर तुम्ही कारणासह यासंबंधी आम्हांला प्रकाश दाखवाल तर मी आणि माझ्यासारखे इतर लोक हे या गोंधळातून मुक्त होऊ.

विद्यार्थ्यांचा अंदाज बरोबर आहे. मी जाणून बुजून टीका केली नाही. आपल्या दोन श्रेष्ठ विद्वानांनी सरकारी नोकऱ्या पत्करल्यामुळे मला खरोखर दुःख झाले. पण त्यांच्या कृतीवर आपण टीका कशी करणार? वृद्धांनी प्रोफेसर्स होऊ नये आणि म्हाताऱ्यांनी असहकारितावादी असले पाहिजे अशासंबंधी नियम असू शकणार नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, विद्वान लोकांनी सहकारितावादी कधीच असू नये असे आपण म्हणू शकणार नाही. म्हणून जर म्हाताऱ्या आणि विद्वान लोकांना सहकारितेला पाठिंबा देण्याचा हक्क असेल तर कोणत्या कारणाने आपण त्यांच्यावर टीका करू शकू? विद्वान आणि वृद्ध यांना सरकारी नोकऱ्या पत्करण्यात काही चूक वाटत नाही हे पाहून असहकारितावाद्यांना मात्र जबरदस्त धक्का बसेल व ते काही काळ थांबतील व विचार करतील. पण असहकारितावाद्यांत देखील काही वृद्ध व विद्वान आहेत. म्हणून आपण या गोष्टीचा नाद सोडून दिला पाहिजे. या दोघाही विद्वान गृहस्थांनी काळजीपूर्वक विचार करून सरकारी नोकऱ्या पत्करल्या असतील व त्यांना वैय्यक्तिक लाभ मोहित करू शकला नसेल असे मला वाटते. म्हणून "विद्यार्थी" आणि त्याच्याचसारख्या इतरांनी या दोन वृद्ध गृहस्थांना दोष देऊ नये. "विद्यार्थी" यांनी जे आश्चर्य व्यक्त केले आहे ते सहिष्णुतेच्या अभावाचे लक्षण आहे असे मला वाटते. विचार आणि आचाराचे जे स्वातंत्र्य आपण मागतो ते इतरांना, विशेषतः वडील माणसांना आपण दिले पाहिजे.

मित्राच्या वेषातील शत्रू

प्रजामित्राच्या संपादकाला आलेले एक पोस्ट कार्ड मी वाचले. ते अहमदाबाद येथून लिहिलेले आहे. त्यावर सही आहे; पण पत्ता नाही. सही करणारा मुसलमान गृहस्थ आहे. पत्रातील भाषा उद्धृत करण्यासारखी नाही. माझ्या मतावर टीका केल्याबद्दल त्याने संपादकाला शिव्या दिल्या आहेत. या पत्राचा लेखक कोणीही असो व कोणत्याही जातीचा असो, तो हे माझे टिपण वाचील अशी मला आशा आहे. लेखकाने मित्राचा आव आणला असला तरी तो शत्रूसारखा वागला आहे. अशा प्रकारे कोणालाही दम देऊन किंवा शिव्या देऊन आपण खिलाफतीचे किंवा स्वराज्याचे काम पुढे नेऊ शकणार नाही. जर त्यात प्रगती करावयाची असेल तर आपण नम्रता आणि विनय शिकला पाहिजे. जर प्रजा-मित्राच्या संपादकाचा आपल्यापैकी कोणाशी मतभेद झाला तर त्याबद्दल त्याच्यावर टीका कशाला? जर वृत्तपत्रांच्या संपादकांना आपले विचार निर्भयपणे मांडता येत नसतील तर वृत्तपत्रांना किंमतच राहणार नाही. सरकारने वृत्तपत्रांवर घातलेले सर्व निर्बंध काढून टाकावेत असे आपण म्हणतो. अशा स्थितीत जे लोक दहशतीच्या द्वारा असे निर्बंध घालीत असतील ते आपण सहन करावेत काय? लोकांचे विचार व

त्ती प्रेमाने, मनधरणीने व उदाहरणाने बदलण्याचा आपण प्रयत्न करावा. दमदाटी यशस्वी होणार नाही. म्हणून प्रत्येकाने आणि विशेषतः असहकारितावाद्याने आपली भाषा सुधारावी, विचार शुद्ध करावेत व ते सौम्य करावेत. ज्याची वाणी ईश्वराच्या नामोच्चाराने पवित्र झाली असेल, ज्याच्या अंतःकरणात देव वसत असेल त्याच्या वाणीत गलिच्छ शब्द कसे येतील ? आणि त्याच्या अंतःकरणात गलिच्छ विचार क्षणभरही कसे राहतील ? जो कोणी असहकारितेच्या सैन्यात गलिच्छ वाणीने आणि दुष्ट मनाने किंवा अंतःकरणाने सामील होईल, तो जरी मित्र म्हणवीत असला तरी तो शत्रूसारखाच समजला जाईल.

अस्पृश्यतेच्या मर्यादा[1]

या लेखात एका शब्दाचीही भर घालणे जरूर नाही. शास्त्री अस्पृश्यतेचा जो अर्थ लावतात, त्याविरुद्ध माझे हल्ले नाहीत. अस्वच्छ माणसाला शिवल्यानंतर आपण जरूर स्नान करावे. जी अस्पृश्यता प्रचलित आहे आणि जिचा उगम निव्वळ दुष्ट बुद्धीत आहे तीविरुद्ध मी कडक भाषा वापरली आहे. जर सर्व वैष्णव शास्त्रीजींच्या मताचे होतील तर माझे त्यांच्याशी भांडणच उरणार नाही.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १७-७-१९२१

१९२. मुंबईच्या विणकरांच्या सभेत भाषण[2]

जुलै १७, १९२१

महात्मा गांधी म्हणाले, मी प्रथमच मदनपुऱ्यात आलेलो नाही. दोन वर्षांपूर्वी तुमचे काम पाहावयाला आलेलो होतो. ही सभा अगदी निराळ्या कारणाकरिता भरली आहे. मागे मी आलो तेव्हा खिलाफतीच्या प्रश्नाची भीती नव्हती आणि आपल्याला राज्यकर्त्यांच्या हातून न्याय

१. वसंतरामशास्त्री यांनी या विषयावर जो लेख लिहिला त्या लेखाला गांधींची पुढील टीका जोडली होती.

२. ही सभा रविवारी रात्री मदनपुऱ्यात भायखळा कॉंग्रेस कमिटीतर्फे भरली होती.

मिळण्याची खात्री वाटत होती. कारण ग्रेट ब्रिटनच्या पंतप्रधानांनी तुम्हांला न्याय देईन असे वचन दिले होते. पण ब्रिटिश सरकारने मुसलमानांचे फार नुकसान केलेले आहे व तुमची गाऱ्हाणी दूर होईतो-पर्यंत तुमची मने शांत होणार नाहीत. पंजाबमधील सरकारच्या कृत्यामुळे-सुद्धा लोकांची मने फार बिघडली आहेत. जोपर्यंत ब्रिटिशांच्याकरिता लढावे म्हणून एकही शिपाई हिंदी माणसांना बाहेर देशी पाठविणे बंद करता येत नाही, तोपर्यंत आपल्या हातात खरी सत्ता आली असे म्हणता येत नाही. आता आपल्याला एक प्रबळ शस्त्र सापडले आहे. ते असहकारितेचे आहे आणि काँग्रेसने त्यासंबंधी काय करावे याच्या निश्चित अटी घालून दिल्या आहेत; पण लोकांच्याकडून फारसे मोठे उत्तर मिळाले नाही. कारण त्यांनी पदव्या सोडल्या नाहीत, शाळा किंवा कोर्टावर बहिष्कार घातले नाहीत. म्हणूनच लोकांनी आपले कर्तव्य केले नाही असे मी म्हणतो. पण तसे असूनही सरकारची प्रतिष्ठा गेली आहे. कारण लोक पदव्यांना फारशी किंमत देत नाहीत. जे लोक कोर्टात जातात ते ती कोर्टे चांगली आहेत किंवा तेथे न्याय मिळेल या बुद्धीने जात नसून ती आपल्या अधःपाताचे आणि पतनाचे लक्षण आहे म्हणून जातात.

विणकरांचे कर्तव्य अगदी स्पष्ट आहे आणि ते म्हणजे आपल्या जास्तीत जास्त शक्तीनुसार स्वदेशी चळवळीला मदत करणे हे होय. जर विणकर या चळवळीला मदत करतील तर ते पुन्हा राष्ट्राची भरभराट करतील. विणकर परदेशी सूत वापरतात ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. मी तुम्हांला परदेशी सूत टाकून द्या आणि फक्त स्वदेशी हात-सूतच वापरा अशी विनंती करतो. तुम्ही हात-सुताच्या बारीक नंबराचे सूत वापरा असे नाही; पण हलक्याही नंबराचे सूत वापरा. कोणत्याही देशात विणकर गिरण्यांचे सूत वापरीत नाहीत. ते बारीक नंबराचे सूत वापरतात; पण हात-सुताच्या हलक्या नंबराचेही सूत वापरतात. जगात कोणत्याही देशात, जपानमध्येसुद्धा हिंदुस्थानसारखे विणकर नाहीत. मी विणकर म्हणविण्याचा अभिमान बाळगतो. कारण त्यांच्यावरच देशाचा उत्कर्ष अवलंबून आहे. तुमचा धंदा काय असे कोणी मला विचारले तर मी सांगतो, मी एक शेतकरी व विणकर आहे पण बॅरिस्टर नाही. हातांनी कातलेले सूत वापरून विणकर या देशाची भरभराट करू शकतील. ते वापरल्याने आपण स्वतःचा नाश करीत आहोत असे त्यांनी वाटून घेऊ नये; सध्याची वेळ तुमची कला दाखविण्याची किंवा तलम कपडे वापरण्याची नाही. स्वराज्य हाती येईपर्यंत आणि खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर होईपर्यंत तुम्हांला जाडे-भरडे कपडेच वापरले पाहिजेत. जर तुम्ही प्रयत्न

कराल तर तुम्हांला हातसुताचे कापड सहज विणता येईल आणि जोपर्यंत हातसूत मिळत आहे तोपर्यंत ते सूत विणून कमी मजुरी मिळेल असा विचारच मनात आणू नका. तुम्हांला सध्या जितके पैसे मिळतात तितकेच त्यात मिळतील अशी मी खात्री देतो. जर तुमच्याजवळ परदेशी सुताचा साठा असेल तर तो टाकून द्या. ऑगस्टच्या[१] पहिल्या तारखेला मला कोणीही परदेशी कपडे वापरताना दिसू नये. जर तुम्हांला त्या दिवशी चौपाटीवर जावयाचे असेल तर तुमच्या अंगावर परदेशी कपडे घालून जाऊ नका, अशी मी तुम्हांला विनंती करतो. नंतर गांधींनी विणकरांना महंमदअली व मि. खत्री यांना भेटण्यास व त्यांच्याबरोबर आपल्या अडचणींची चर्चा करण्यास सांगितले. जर तुम्ही परदेशी कापडावर बहिष्कार घालू शकाल तर तुम्हांला ऑगस्ट अखेरीपर्यंत सहज स्वराज्य मिळेल.

'मुंबई क्रॉनिकल', १९-७-१९२१

१९३. सी. एफ्. ॲन्ड्रूज यांना पत्र

मुंबई,
[जुलई १८, १९२१]

प्रिय चार्ली,

जर तुम्हांला पत्र न लिहिणे याला कर्तव्य न पाळणे असे म्हटले जाईल तर मी तुमची उपेक्षा करीत आहे. तुम्ही आत्म्याने सतत माझ्या जवळ आहात. मला वाटले तुम्ही सिमल्याला आहात. मी स्टोक्सचे प्रकट पत्र पाहिले नाही, पण या आठवड्याच्या यंग इंडियात तुम्हांला एक अग्रलेख बिगारीवर[२] आणि दुसरा स्त्रियांच्या[३] परिस्थितीवर वाचावयास मिळेल. तुम्ही बंगालला जो संदेश दिला आहे, त्याचा मी मजकुरात समाचार घेतला आहे.

१. त्या दिवशी परदेशी कापडावरील बहिष्काराची चळवळ सुरू करण्याचे ठरविले होते.
२. वेठबिगार. सक्तीचे मोफत काम. पाहा, "सिमल्याची छाया", २१-७-१९२१.
३. पाहा, "स्त्रियांची परिस्थिती" २१-७-१९२१.

कृपेने बरे व्हा. गुरुदेवांना माझा प्रणाम कळवा आणि त्यांच्या प्रकृतीविषयी लिहा.
प्रेमपूर्वक प्रणाम.

तुमचा
मोहन

ताजा कलम; पोलक यांची बहीण सॅली निवर्तली.

फोटो स्टॅटवरून : जी. एन्. १३०९ व जी. एन्. २६३९

१९४. मुस्लिम स्त्रियांच्या सभेत भाषण, मुंबई[1]

जुलै १९, १९२१

महात्मा गांधी सभेत भाषणाकरिता उभे राहिले.......ते म्हणाले, माझा मुसलमानांशी दीर्घकालीन संबंध आहे. आणि ज्या गृहस्थाने मला प्रथम आफ्रिकेला नेले तो मुस्लिम मित्र होता. मी तुम्हा सर्वांना भगिनी मानतो. आम्ही जे स्वराज्याकरिता प्रयत्न करीत आहोत ते आपल्या धर्मरक्षणाकरिता आहेत आणि माझ्या मनात हिंदू व मुसलमान असा भेद नाही.

महात्माजी म्हणाले, माझ्या मताने सर्व धर्म चांगले आहेत. कधी कधी वाट चुकलेल्या अनुयायांच्यामुळे धर्मात चुका शिरतात. पवित्र कुरणात जे लिहिले आहे ते सारे चांगले आहे आणि सर्व धर्मांत सत्य आहे. आम्ही सर्वजण इस्लामकरिता उभे राहिलो आहोत आणि आम्हांला जगात सैतानी राज्य नको आहे.

सैतानी राज्यात मला काहीच चांगले करता येणार नाही. मला आज दुपारी अलिगडहून तार आली आहे व तीमध्ये मि. शेरवानी

१. या सभेला ५०० मुस्लिम स्त्रिया हजर होत्या. ती सभा नेपियन सी रोडवर भरली होती. गांधीजी हिंदुस्तानीत बोलले.

यांना तुरुंगात पाठविल्याचे कळविले आहे. ते जरी शांततेकरिता काम करीत होते तरी त्यांना तुरुंगात पाठविले. अशी एक वेळ येण्याची शक्यता आहे की, जेव्हा सारी चांगली माणसे तुरुंगात टाकली जातील आणि प्रत्येकाने त्या प्रसंगाला तयार असले पाहिजे. आफ्रिकेत लिंगभेदाचा विचार न करता हिंदू व मुसलमान तुरुंगात गेले व त्यांनी देशाची अब्रू राखली. जे चैनीत बुडाले आहेत, त्यांना तुरुंगाचे जीवन सहन करणे कठीण होईल. तुरुंगात त्यांना दिवसा दहा वेळा चहा मिळणार नाही आणि तलम कपडेही मिळणार नाहीत.

तुमच्या धर्माकरिता तुम्ही सर्व चैनी सोडा आणि खादी वापरू लागा. जोपर्यंत हिंदुस्थानला स्वराज्य मिळत नाही आणि खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर होत नाहीत, तोपर्यंत प्रत्येकाने परदेशी कापडाला मनाई आहे असे मानले पाहिजे. आपल्याला स्वराज्य मिळाले म्हणजे आपण सर्व जातींचे स्वदेशी कापड तयार करू शकू आणि म्हणून सहा महिने तुम्ही सर्व चैन सोडली पाहिजे.

मिसेस हाजी युसूफ सोभानी यांच्या सूतकताईचा आवाज ऐकताना मला फार आनंद होतो. ज्याप्रमाणे तुम्ही आपली मुले मांडीवर घेता त्याप्रमाणे चरखा नेहमी जवळ बाळगीत जा. ईश्वराला अंतःकरणात स्मरून तुम्ही दररोज काही तास तरी स्वराज्य व खिलाफतीकरिता चरख्यावर सूत कातीत जा. चरख्यामुळे हिंदी स्त्रियांचा मान राखला जाणार आहे एवढेच नव्हे तर त्या घरात बसून स्वतंत्र उपजीविकेकरिता पैसेसुद्धा कमवू शकतील. तरवारीपेक्षा चरख्याने तुम्ही देशकार्य अधिक करू शकाल. पुष्कळ हिंदी लोक दरमहा ८ ते १५ रुपये कमवितात; पण ते पैसे कुटुंबाच्या पोषणाकरिता मुळीच पुरत नाहीत. विजापूरमध्ये गंगाबेहेन यांनी गरीब हिंदी लोकांच्या घरांत २,००० चरखे सुरू केले. त्यामुळे आम्हांला तेथून चांगले व सुंदर हातकताईचे सूत मिळते आणि ते गरीब हिंदू लोक स्वतंत्रपणे जीवन-कमाई करू शकतात.

महात्माजी म्हणाले की, आपण पूर्वी उत्तम ढाक्याची मलमल तयार करीत होतो. पण सध्याच्या सरकारमुळे आपल्या विणकरांची दुर्दशा उडाली आहे व ते आपला व्यवसाय करू शकत नाहीत. तुम्ही तलम कापडाकरिता मँचेस्टरला जाऊ नका. एका हिंदी स्त्रीने मला बारा शेर वजनाची भरत-काम केलेली साडी दिली आहे आणि जर तुम्ही इतक्या वजनाच्या साड्या वापरू शकता तर खादीच्या साड्या तुम्हांला का वापरता येणार नाहीत? पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक कष्ट व अधिक दुःखे भोगू

शकतात आणि म्हणून खादीचा सर्रास उपयोग करण्यास कशाचाच अडथळा नाही. मिसेस मझर-उल-हक यांनी हिऱ्याच्या चार बांगड्या मला दिल्या. असा त्याग स्वराज्य जवळ येत चालले आहे असे दाखवितो. कारण स्त्रियांना दागिन्यांची फार आवड. ज्या स्त्रीच्या अंतःकरणात देवाची कल्पना असेल तीच स्त्री सुंदर. सौंदर्याचे बाह्य प्रकार तुम्ही सर्व सोडा. तुम्ही तलम कापडाकरिता जपान, फ्रान्स किंवा चीनकडे पाहू नका. तुम्ही सर्वजण हिंदू व मुसलमान यांच्या विजयाकरिता प्रार्थना करा. पण तुमच्या प्रार्थना जर परिणामकारक व्हावयाच्या असतील तर तुमची अंतःकरणे शुद्ध व शरीरे स्वदेशी कापडाने झाकली असली पाहिजेत. असा निश्चय करणे कठीण आहे, पण एकदा तो निश्चय करण्याचे ठरविलेत म्हणजे तो अमलात आणणे फार सोपे आहे.

समारोप करताना महात्माजींनी तेथे हजर असलेल्या स्त्रियांना सांगितले की, एक तर त्यांनी परदेशी कापड जाळावे किंवा स्मर्नाला पाठवावे. गांधींनी आमंत्रणाबद्दल व शांतपणे भाषण ऐकल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

'मुंबई क्रॉनिकल', २०-७-१९२१

१९५. दारू मक्तेदारांच्या सभेत भाषण, मुंबई[1]

जुलै १९, १९२१

गांधी म्हणाले, मी गेल्या खेपेस तुम्हांला सांगितले होते की, निरोधन करणे हे काँग्रेस कमिटीच्या हाती आहे आणि तुम्ही काय करावे याबद्दल मी फक्त सल्लाच देऊ शकेन. तथापि माझ्या सल्ल्याचा परिणाम काय झाला हे तुम्हांला ठाऊक आहे. काही मक्तेदारांनी सरकारकडे जो अर्ज पाठवावयाचा होता तो त्यांनी पाहिला आहे. आणि ते असहकारितावादी

१. पारशी राजकीय सभेच्या विद्यमाने ही सभा मारवाडी विद्यालयात भरली होती.

नसल्यामुळे अर्ज पाठविण्यास बिलकूल हरकत नव्हती. जर ते असहकारितावादी असते तर त्यांची दारू-दुकानेच नसती. सरकारकडे अर्ज करण्याचा मक्तेदारांना पूर्ण हक्क आहे. कोणी तरी म्हटले ते नोकर आहेत. पण ते नोकर असले तरी त्यांनी जी फी सरकारात भरली आहे ती परत करा असे सांगण्यात काही चूक नाही. सरकारला बळजबरीने त्यांची दुकाने बंद करणे अशक्य आहे. त्याकरिता सरकारला नवा कायदा करावा लागेल. पण मक्तेदारांना आपल्या फीचे पैसे परत मिळाल्यानंतर आपली दुकाने बंद करता येतील.

तुम्हांला धारवाड व अलिगडच्या दुःखदायक घटनांची माहिती आहे. तेथे जे इतके मृत्यू घडले त्याला हे गुत्ते जबाबदार आहेत असे मी सांगू इच्छितो. अलिगडचे शेरवानी हे अत्यंत प्रसिद्ध आणि तेथील सन्मान्य गृहस्थ आहेत. ते खानदानी मुसलमान आहेत व केंब्रिजचे पदवीधर आहेत. मला अलिगडहून तार आली आहे की, कालच शेरवानींना पकडले. मि. शेरवानी यांनी जमावाला शांत करण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले. त्यांनी शांतता पाळावी म्हणून तसेच प्रयत्न केले. पण त्यांनी नाक घासण्याचे नाकारले. त्यांनी लोकांचा उत्साह टिकविला आणि त्यांना पकडले. या गडबडीला कोण जबाबदार होते ? निरोधनातून त्रासाला सुरुवात झाली. मि. गंगाधरराव देशपांडे यांनी मला बेळगावहून तार केली आहे. तेथे त्यांना व त्यांच्या मित्रांना लष्करी हद्दीत निरोधन करू नका असा हुकूम बजावला आहे. मि. देशपांडे विचारतात, आम्ही हा हुकूम मोडू का ? मी देशपांडे यांना असा सल्ला दिला की, हुकूम जरी बेकायदा असला तरी तो तुम्ही पाळा. कारण संयमामुळेच तुम्ही सविनय कायदेभंगाला पात्र ठराल. दारू विक्रेत्यांनी आपल्या कोल्यवधी बांधवांच्या इच्छेला मान द्यावा. मान देणे हे त्यांचे कर्तव्य आहे असे मला वाटते. आपली दुकाने बंद करून तुम्ही देशाचा फायदा कराल. आणि ज्यात देशाचे हित आहे त्यात तुमचेही हित आहे. काही मक्तेदार पैशाच्या दृष्टीने वाईट स्थितीत आहेत ही गोष्ट मला ठाऊक आहे. त्यांच्याकरिता काय करता येईल, हे जमातीने पाहणे हे तिचे कर्तव्य आहे. पण तुम्ही हे कबूल केले पाहिजे की, आपली दुकाने उघडी ठेवून गुत्तेवाले देशाची हानी करीत आहेत.

गांधींनी मक्तेदारांना असा इषारा दिला की, जर ऑगस्टअखेर काहीच केले नाहीत तर फार मोठी आपत्ती येणार आहे. एकदा निरोधनाला पुन्हा सुरुवात झाली म्हणजे ते जोराने चालू राहील. निरोधक तुरुंगवासाचे स्वागत करतील आणि हाती घेतलेले काम सोडून देण्याऐवजी गोळीबाराला

बळीही पडतील. सरकारच्या हुकुमाने जर निरोधक थांबले नाहीत व रक्ताच्या नद्या वाहिल्या तरीही दुकाने बंदच केली पाहिजेत असे मला वाटते. ऑगस्ट महिन्यात पुन्हा निरोधन सुरू होणार नाही असे वचन मी मक्तेदारांना देऊ शकत नाही. कारण निरोधकांनी जे काम अंगावर घेतले आहे ते त्यांनी यशस्वीरीत्या पुरे केलेच पाहिजे. मग त्याला कितीही किंमत पडो. निरोधन थांबविणे हे मी योग्य केले नाही अशा तक्रारींची पत्रे माझ्याकडे आली आहेत. अलीबंधूंना पुळपुळीत सल्ला दिल्याबद्दल, सत्याग्रहाची चळवळ थांबविल्याबद्दल आणि आता निरोधन थांबविण्याबद्दल मला दोष देण्यात येत आहे. मी जो काय अलीबंधूंना सल्ला दिला तो दुर्बलतेचा नव्हता, पण सबलतेचा होता. आणि तीच गोष्ट सत्याग्रह व निरोधनाबद्दल होती. म्हणून मी दारू विक्रेत्यांना राष्ट्राची आरोळी ऐका, आणि जवळ आलेला त्याग टाळा अशी प्रार्थना करतो. रोगाऐवजी निरोधन करताना आलेल्या मृत्यूचे मी स्वागत करीन. आणि असे करण्यास पुष्कळ जण तयार आहेत यात शंका नाही.

भाषणाच्या शेवटी त्यांनी मक्तेदारांना वाटेल ते प्रश्न विचारण्यास सांगितले. आणि त्या वेळी देशासंबंधीचे कर्तव्य करा अशी त्यांना विनंती केली.

मिस्टर माणेकजी वारिया म्हणाले, प्रत्येक धंद्यात अप्रामाणिकपणा असतो आणि फक्त तो दारू विकणारांच्यात असतो असे नाही. आमच्यापुढे प्रश्न आहे, ही दुकाने कोणी व केव्हा बंद करावी. दारूचा धंदा हजारो वर्षे चालू आहे आणि तो एकदम बंद होणार नाही. आम्ही हळूहळू दुकाने बंद केली पाहिजेत. कोणताही धंदा प्रामाणिकपणे केला तर त्यात लाज किंवा अप्रामाणिकपणा नाही. प्रत्येकाला स्वतःच्या हिताकडे पाहावे लागते. आणि जे गांधी स्वदेशीचा आत्मा आहेत, त्यांना जर कुलाब्याला जावयाचे असेल तर ते गावठी बैलगाडीतून न जाता जोराने धावणाऱ्या परदेशी व्हिक्टोरियातून जातील. तुम्हांला जर दारू पिणे बंद करावयाचे असेल तर लोकांना ते व्यसन सोडावयास सांगा. दुसरे कशानेही ते बंद होणार नाही. आम्ही सरकारकडे आमचे पैसे परत द्या म्हणून अर्ज केलाच आहे. आणि हे पैसे परत मिळताच आम्ही आमची दुकाने बंद करू. सरकार सबंध वर्षात एकूण विक्री किती झाली यावर तोट्याचा हिशेब करील. पण काही महिन्याच्या विक्रीवर तो हिशेब करणार नाही. त्यांनी गांधींना पुढील प्रश्न विचारला : तुम्ही म्हणालात की, सप्टेंबरअखेर तुम्हांला स्वराज्य मिळेल. तसे असेल तर कायदा करून तुम्ही दारू विक्री

का बंद करू नये ? कोणत्या तारखेपासून तुम्हांला दुकाने बंद व्हावयास पाहिजेत ?

गांधी म्हणाले : आजपासून (हशा व टाळ्या).

मि. बारिया म्हणाले, जर आजपासून गांधींना हा धंदा बंद करावयास पाहिजे असेल तर त्यांनी देव झाले पाहिजे.

गांधी म्हणाले, मला ही गोष्ट आजच व्हावयास पाहिजे. पण मला ती करता येईल का ? मला पुष्कळ गोष्टी व्हावयास पाहिजेत. पण त्या करण्याची माझ्यात शक्ती नाही.

आणखीन विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना गांधींनी म्हटले की, आपण या सभेत अधिक प्रगती केली आहे. जर तुमची इच्छा असेल तर या विज्ञापनावर सही करा. सप्टेंबर महिन्यात वाहणाऱ्या रक्ताच्या नद्यांसंबंधी गांधीजी म्हणाले की, मि. शेरवानी, मि. महंमदअली आणि माझ्यासारखे पुष्कळ लोक निरोधनाकरिता पुढे येतील. आणि जर आम्हांला पकडले तर आमची जागा घ्यावयास शेकडो लोक पुढे सरसावतील. आणि जर त्यांनाही पकडले तर आपले प्राण देण्याकरिता तयार असलेले हजारो लोक पुढे येतील. सरकारला त्या परिस्थितीत एकच गोष्ट करता येईल व ती म्हणजे त्यांना ठार मारणे व त्यांचे रक्त सांडणे. धारवाड व अलिगडला काय झाले ? कदाचित धारवाडला लोकांनी दगड मारले असतील. त्याला उत्तर गोळ्या. हिंदुस्थानात हीच चाल आहे. जेव्हा लोक सरकार, मक्तेदार व दारूबाज यांच्या कोंडीत सापडतील जेव्हा भयंकर परिस्थिती निर्माण होणे अपरिहार्य आहे. म्हणून मी म्हणालो जर दुकाने बंद झाली नाहीत तर रक्ताच्या नद्या वाहतील. शेवटी गांधींनी विज्ञापनाच्या बाबतीत भरूचांना भेटा व त्यांचा सल्ला घ्या असे त्यांना सांगितले.

'मुंबई क्रॉनिकल', २०-७-१९२१

१९६. के. पी. जगासिया बंधू यांना पत्र[1]

मुंबई
[जुलै १९, १९२१ नंतर]

प्रिय महाशय,

आपले १९ जुलैचे पत्र पोहोचले. मी तुम्हांला एवढेच म्हणतो की, प्रत्येक व्यापारी जे करतो ते तुम्ही करा. एवढेच माझे सांगणे. लॉटरीची कल्पना मला पसंत नाही.

तुमचा विश्वासू

फोटोस्टॅटवरून; एस्. एन्. ७५८०

१९७. बेळगाव निरोधकांना तार

जुलै २०, १९२१

पिकेटिंगविरुद्ध बेकायदा हुकूम असला तरी पाळा. कारण त्यामुळे पुढे सविनय कायदेभंगाची चळवळ खात्रीने बलिष्ठ होईल. परदेशी कापडावरील बहिष्काराकरिता शिकस्तीचे प्रयत्न करा.

'बॉंबे सीक्रेट ॲबस्ट्रॅक्ट्स्', १९२१

१. कराचीचे सवसाधारण आयात-निर्यात व्यापारी जगासिया बंधू यांनी गांधींना एक पत्र पाठविले.त्यात त्यांनी धंद्यात भयंकर तूट आली अशी तक्रार केली. स्वदेशी चळवळीमुळे परदेशी कापडाचा साठा पडून राहिला आहे असे त्यात म्हटले. हा तोटा कसा भरून काढावा याबद्दल सल्ला विचारला. न विकलेला माल लॉटरीने संपविला तर ते तुम्ही पसंत कराल काय, असे विचारले.

१९८. जाहीर सभेत भाषण, पुणे[१]

जुलै २०, १९२१

लष्करातील प्रचंड सभेत भाषण करताना महात्मा गांधी म्हणाले, परदेशांतून एक इंचही कापड आणता कामा नये. पूर्वीच्या काळी हिंदुस्थान गरजेपेक्षा अधिक कापड तयार करीत असे. ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांनी हिंदी कापूस-उद्योग नष्ट केला. आयात केलेल्या कापडाकरिता आपल्याला साठ कोटी रुपये पडतात. तुम्ही खादी वापरण्याकरिता आणि सूत कातण्याकरिता तयार असले पाहिजे. विणकरांना कापड विणण्याकरिता स्वदेशी सूत वापरा असे उत्तेजन दिले पाहिजे. स्वदेशी हा धर्म आहे. या धर्माचे कटाक्षाने पालन केल्याशिवाय स्वराज्य मिळविणे अशक्य आहे.

निरोधनासंबंधी गांधी म्हणाले, निरोधन ही मोठी व चांगली चळवळ आहे. पण दारूबाजांना बडविता कामा नये. त्यांना शिव्या देऊ नका. स्वयंसेवक हे कट्टे अनत्याचारी असले पाहिजेत. दारू व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद केली पाहिजेत. देशाला दारूतून मुक्त व्हावयाचे आहे. दारूने दारूबाजांना राक्षस बनविले आहे. महात्माजींनी आपले भाषण स्वदेशीचा हिरीरीने पुरस्कार करा अशी विनंती करून संपविले.[२]

सभेत भाषण करताना गांधी म्हणाले, परदेशी कापडात परदेशी सुतापासून विणलेले कापड हेही येते. त्यासंबंधी तुम्ही खबरदारी घ्या व काळजी बाळगा असे त्यांनी सांगितले. त्यांनी लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्यातील हालअपेष्टांची श्रोत्यांना आठवण करून दिली व तुमच्यात ती वृत्ती आणा असे सांगितले. गांधीजी म्हणाले, शाळा व कोर्टावरील बहिष्काराबद्दल मी आता उदासीन आहे. कारण त्याचा उद्देश सफल झाला आहे. पण मी हिंदू–मुस्लिम ऐक्य, अनत्याचार व विशेषतः परदेशी

१. त्यापूर्वी गांधींनी टिळकांचा अर्धपुतळा उघडला आणि त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी स्त्रियांच्या व खिलाफत कार्यकर्त्यांच्या सभेत भाषणे केली.

२. पुढील परिच्छेद शनिवारवाडा मैदानात भरलेल्या दुसऱ्या जाहीर सभेच्या दोन वृत्तांतांवरून घेतले आहेत. त्या सभेत स्वदेशीचा स्वीकार आणि परदेशी कापडाचा बहिष्कार हे ठराव एकमताने पास झाले. पहिला परिच्छेद मुंबई क्रॉनिकलच्या २२-७-१९२१ च्या वृत्तांतावरून घेतला आहे.

कापडावरील बहिष्कार याबद्दल आग्रही आहे. जर तुम्ही ऑगस्टअखेर बहिष्कारात यश मिळविलेत तर स्वराज्य मिळालेच आहे असे समजा. त्यांनी महाराष्ट्राला धन्यवाद दिले व श्रद्धा बाळगण्यास सांगितले.

शनिवारवाडा मैदानावरील प्रचंड सभेत भाषण करताना गांधी म्हणाले की, आजचा दिवस पवित्र आहे. आपण टिळकमहाराजांची पुण्यतिथी साजरी करण्याकरिता जमलो आहोत. स्वराज्याचा महामंत्र देणारे ते गुरू होते. स्वराज्य मिळविण्याचा स्वदेशी हा सर्वांत सोपा मार्ग आहे. स्वदेशी ही नंग्यांना वस्त्र आणि भुकेल्यांना अन्न देते. दोन कोटी हिंदी लोक अर्ध-उपाशी आहेत. महाराष्ट्र शाहाणा आहे. महाराष्ट्रात विद्वत्ता आहे. महाराष्ट्र त्यागाला मागे पडणार नाही; पण महाराष्ट्रात श्रद्धेचा अभाव आहे, असे महात्मा गांधी म्हणाले. जर महाराष्ट्र अविचलित श्रद्धेने स्वदेशीचा पुरस्कार करील तर एका वर्षात खात्रीने स्वराज्य मिळेल. महाराष्ट्र हा टिळक महाराजांच्या कीर्तीला साजेसा ठरेल अशी आशा शेवटी महात्माजींनी व्यक्त केली.

'मुंबई क्रॉनिकल', २४-७-१९२१

१९९. कॉलेज इमारतीच्या उद्घाटनाचे भाषण, पुणे

जुलै २०, १९२१

सेक्रेटरी प्रो. घारपुरे यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर टिळक महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन करताना महात्मा गांधी म्हणाले की, देशात सर्वत्र राष्ट्रीय शाळा व कॉलेजे निघाली आहेत. त्यांनी विशेष धन्यवाद बिहारला दिले; कारण त्या प्रांताने एकदम आळस व झोप टाकून देऊन असहकारितेच्या कार्यक्रमातील जवळ जवळ सर्व बाबी पुऱ्या करण्यात यश मिळविले आहे. मि. सी. आर. दास यांनी बंगालला असहकारिता करणारे विद्यार्थी पुरविले आहेत आणि त्यांच्या बाबतीतल्या त्यागाला तुलनाच नाही. गुजरातला राष्ट्रीय विद्यापीठ आहे. पण महात्माजी पुढे म्हणाले की, विद्यापीठसंस्था शिक्षणाच्या पद्धतीबाबत [मजकूर सुटला

आहे.] टिळक महाविद्यालयात औद्योगिक व व्यापारविषयक शिक्षणाची सोय केलेली पाहून मला आनंद वाटला. या संस्थेचे हे निःसंशय खास वैशिष्ट्य आहे. सरकारी संस्थांची महाविद्यालय नक्कल नाही, ही गोष्ट टाइम्स ऑफ इंडियाचे तोंड बंद करण्यास पुरेशी आहे. शेवटी ते म्हणाले, ज्या व्यक्तीच्या नावाने ही संस्था काढली आहे ते हे विद्यालय त्यांच्या नावाला साजेल असे विद्यार्थी तयार करील अशी आशा आहे.

'मुंबई क्रॉनिकल', २४-७-१९२१

२००. टिप्पणे

काही जर

राष्ट्राकरिता, खिलाफतीकरिता व पंजाबकरिता भावना असणारे तुम्ही जर विणकर असाल : तर–

(१) तुम्ही फक्त हाताने कातलेले सूत विणा आणि जीवनावश्यक दर आकारा. पाजणीच्या आणि जाड्याभरड्या सुताला लागणाऱ्या तुमच्या हातमागातील साऱ्या अडचणी दूर करा.

(२) जर तुम्हांला ताण्याकरिता हातसुताचे जमत नसेल तर तुम्ही हिंदी गिरण्यांचे सूत त्याकरिता वापरा आणि बाणाकरिता हातसूत वापरा.

(३) जेथे दुसराही पर्याय शक्य नसेल तेथे तुम्ही ताणा व बाणा याकरिता गिरणीचे सूत वापरा.

पण तुम्ही यापुढे सुती, किंवा रेशमी परदेशी सूत वापरू नका.

जर तुम्ही काँग्रेसचे अधिकारी किंवा कार्यकर्ते असाल तर तुम्ही तुमच्या दृष्टीतले विणकर गाठा आणि त्यांच्यापुढे वरील सूचना मान्यतेकरिता ठेवा व त्यांना सर्व शक्तीनुसार मदत करा.

जर तुम्ही खरेदीदार असाल तर पहिल्या दर्जाचे कापड मागा. पण जर तुमच्यात ती अक्कल किंवा धैर्य नसेल तर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दर्जाचे कापड घ्या. पण कोणत्याही परिस्थितीत परदेशी कापड विकत घेऊ नका किंवा परदेशी सुताचे पण हिंदुस्थानात विणलेले कापड खरेदी करू नका.

जर तुम्ही गृहस्थाश्रमी असाल तर

(१) यापुढे परदेशी कापड विकत न घेण्याचा दृढनिश्चय करा.

(२) तुमच्या शेजारच्या विणकराला भेटा आणि घरी कातलेल्या सुताची पुरेशी खादी त्याला विणण्यास सांगा. तेही जमले नाही तर हिंदी गिरण्यांतल्या सुताची खादी विणायला सांगा.

(३) तुम्ही काँग्रेस कमिटीकडे तुमचे परदेशी कापड नष्ट करण्याकरिता किंवा स्मर्नाला पाठविण्याकरिता किंवा दुसऱ्या देशाला पाठविण्याकरिता नेऊन द्या.

(४) जर तुम्हांला परदेशी कापड सोडण्याचे धैर्य नसेल तर घरीच ते घाणेरडे काम करताना वापरून टाका, पण बाहेर परदेशी कापड घालून जाऊ नका.

(५) जर तुम्हांला रिकामा वेळ असेल तर तो वेळ देशाकरिता सारखे पीळ दिलेले सूत शिकण्याच्या कलेत खर्च करा.

जर तुम्ही शाळेत जाणारा मुलगा किंवा मुलगी असाल तर देशाकरिता तुम्ही सूत कातल्याशिवाय, पिंजण केल्याशिवाय किंवा विणकाम केल्याशिवाय शिकण्याला सुरुवात करणे हे पाप समजा. हा क्रम तुम्ही स्वराज्य मिळेपर्यंत किमान दररोज चार तास चालू ठेवला पाहिजे.

काँग्रेस कमिट्या

लोक मला विचारतात की, काँग्रेस पटावर एक कोटी सभासद नोंदले का ? मज-जवळ अचूक आकडे नाहीत. पण जर नुसत्या यांत्रिक नोंदणीने तुमचे समाधान होणार असेल तर तितका आकडा गाठला हे मला ठाऊक आहे. तथापि त्याचा अर्थ समजून घेऊ या. त्याचा अर्थ असा की, आपल्याजवळ काँग्रेसच्या ध्येयावर विश्वास ठेवणारे आणि काम करू इच्छिणारे एक कोटी स्त्री-पुरुष आहेत. परदेशी कापडाचा बहिष्कार ही त्यांची खरी कसोटी आहे. जर आपल्या देशात सारखी मने असणारे एक कोटी स्त्री-पुरुष असतील तर आपल्या रस्त्यांत व खेड्यांत ते दृगोचर झाले पाहिजेत. आपण हिंडता फिरताना तीस स्त्री-पुरुषांपैकी एक जण खादी वापरणारा किंवा निदान स्वदेशी कापड वापरणारा पाहतो का ? आपल्या श्रोतृवर्गात बहुसंख्य लोक स्वदेशी वापरणारे दिसतात का ? नाखुषीने पण जोराने त्याचे नकारार्थीच उत्तर आहे. म्हणून मी सर्व काँग्रेस संघटनांना असा सल्ला देईन की, आपण परदेशी कापडावरील बहिष्कार पुरा करीपर्यंत स्वदेशीशिवाय दुसऱ्या गोष्टीकडे तुम्ही लक्ष देऊ नका. हे करण्यास समर्थ होण्याकरिता प्रत्येक काँग्रेस कार्यकर्त्याने स्वतः जाड खादी वापरण्याची वेळ आली आहे. तोच स्वराज्य-शिपायाचा गणवेश असला पाहिजे. मी ऑल इंडिया कमिटीच्या सभेची वाट पाहात आहे आणि ते सभासद त्या शिपाईगिरीची खूण आपल्या अंगावर धारण करतील अशी आशा बाळगीत आहे. समजा, आपल्याला ३१ ऑगस्टपर्यंत संपूर्ण

बहिष्कार पुरा करावयाचा आहे. तर त्याकरिता काँग्रेस संघटना या पिंजण, कताई व विणाई कामाच्या संस्था झाल्या पाहिजेत. काँग्रेस कार्यकर्त्यांनी असाहाय्य होऊन साबरमती आश्रमाला माहिती व मार्गदर्शनाकरिता लिहू नये. प्रत्येक प्रांतात या प्रक्रियांची माहिती आहे ही ईश्वराची कृपा. प्रत्येक प्रांतातल्या कार्यकर्त्यांनी पिंजारी, कातणारे आणि विणकर यांच्याशी मैत्री जोडावी. हा धंदा त्यांच्यापासून शिकावा आणि त्यांच्याशी चढाओढ न करता त्यांना संरक्षण द्यावे. चरखे व चात्यांकरिता त्यांनी अशीच मैत्री सुतार व लोहारांशी करावी. त्यांनी खादीचा भरपूर साठा करावा व खादी मूळ किंमतीत विकावी. मूळ किंमतीत भांडार चालविण्याचा खर्च धरावा. दुसऱ्या शब्दांत प्रत्येक काँग्रेस कचेरी ही तूर्त तरी शांततामय दारूगोळा तयार करण्याचे आणि साठविण्याचे युद्धागार व्हावे. ही अपेक्षा काय हास्यास्पद किंवा अशक्य आहे ? इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनीमधील प्रत्येक उपलब्ध व्यक्ती युद्धहेतू साध्य करण्याकरिता काम करीत नव्हती का ? जर स्वदेशी-शिवाय स्वराज्य मिळणार नाही असे आपल्याला वाटत असेल तर त्याचा अर्थ असा नाही का की, आपण आपले सारे लक्ष सतत व बुद्धिपूर्वक बहिष्कारावर खर्च करावे, आणि दुसरी कोणतीही चळवळ न करता स्वदेशी उत्पादन व वितरण याकडेच लावावे ? साऱ्या सभा आणि त्यातील सारी आवेशयुक्त भाषणे थांबविलीच पाहिजेत. राज्यकर्त्यांचा विचार करण्याऐवजी आपण आपल्या दुर्बलतेचा, उणीवांचा विचार करावा. राज्यकर्त्यांच्या विचार केला तर त्यामुळे द्वेष, दुर्बलता आणि असाहाय्यताच फक्त निर्माण होईल. पण जर आपण आपला विचार केला आणि त्यावर उपाय योजले तर आपल्यात धैर्य, शक्ती व आशा निर्माण होईल. म्हणून जर आपण सभा भरविल्या तर त्या सभा फक्त कामा-करिता भरवाव्यात, व त्या सभांत बहिष्काराची व उत्पादनाची आवश्यकता निदर्शनास आणावी आणि तिकडे जाण्याचा रस्ता दाखवावा.

येती अ. भा. काँग्रेस कमिटी सभा

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सभेवर पुष्कळ अवलंबून आहे. भांडणाला किंवा निष्फळ चर्चेला आपल्याजवळ वेळ नाही. हिंदुस्थान येत्या काही महिन्यांत स्वराज्य स्थापण्याकरिता आणि खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर करण्याकरिता संघटित करता येईल की नाही, हे आपण सांगू शकलो पाहिजे. तसेच यशाच्या मूलभूत तत्त्वांवर आपले एकमत आहे किंवा नाही आणि यशाकरिता आपण अंतःकरणपूर्वक मेहनत करण्यास तयार आहोत किंवा नाही हे सांगू शकलो पाहिजे. आपापल्या प्रांतातील जबाबदार अधिकारी पुढील गोष्टीसंबंधी आकड्यानिशी सुसज्ज होऊन येतील अशी आशा आहे.

(अ) टिळक स्वराज्य फंडाची रक्कम.

(आ) काँग्रेस पटावरील सभासद संख्या.

(इ) चालू असलेल्या चरख्यांची संख्या आणि त्यातून आजतागायत झालेले एकूण उत्पादन.

(ई) पिंजाऱ्यांची संख्या.

(उ) १ हातसुताचे, (२) गिरणीच्या सुताचे, (३) परदेशी सुताचे विणकर किती आहेत त्यांची संख्या.

(ऊ) परदेशी कापड आयात करणाऱ्यांची संख्या.

सविनय कायदेभंग आणि कर देण्याचे थांबविणे याची शक्यता किती आहे यासंबंधी जरूर त्या माहितीनिशी त्यांनी तयारीने यावे.

मला आशा आहे की, कमिटीची सभा ही अगदी आटोपशीर होईल आणि निरर्थक चर्चा करण्यात राष्ट्राच्या वेळातील एक क्षणही दवडण्यास ती नाखूष असेल.

गिरणीतील खादी

एक बातमीदार माझे या गोष्टीकडे लक्ष वळवितात की, सध्या बाजारात आपल्या गिरणीतली आणि जपानचीही खादी आली आहे. माझा त्यावर विश्वास बसत नाही. अशा पवित्र भूमीवर अतिक्रमण करण्याइतका धंदा अधःपतित झाला आहे काय? आपल्या झोपडीतल्या गरीब कामगारांच्या तोंडातील भाकरीचा तुकडा काढून घेण्याचा प्रयत्न न करताही आपल्या गिरणीतल्या यंत्रांना पुरेसे काम आहे; पण गिऱ्हाइकांनी सावध असावे. खादी ओळखण्यात कधीच चूक होत नाही. विशेषतः ती जेव्हा पांढरी शुभ्र करीत नाहीत किंवा धूत नाहीत तेव्हा चूक होतच नाही. जे कापड गिरणीसारखे दिसते आणि ते खादीचे आहे असे म्हटले जाते तेव्हा त्याची खबरदारी घेतली पाहिजे. खादीला स्वतःचा आपलेपणा आहे व तो असला पाहिजे. तिला वैशिष्ट्यपूर्ण सफाई असली पाहिजे आणि गिरणीच्या कापडाची निर्जीव तकाकी नसली पाहिजे. हाताने कातलेल्या खादीला एक प्रकारचा राकटपणा असतो व तो सुखदायक असतो. हातसुताची खादी शोषक, हलकी, स्पर्श केला असता आनंद देणारी अशी असते आणि ती विणकराचा व कातणाऱ्याचा घाम निथळल्याशिवाय चार आणे वाराने विकता येणार नाही. पण जर ती वाया गेलेल्या कापसापासून बनविली असेल तरची गोष्ट वेगळी. तसली खादी विरविरीत व काही धुण्यांनंतर झिजून जाते. आपल्या माहितीच्या भांडारातून खादी विकत घेणे नेहमीच चांगले. मुंबई व अहमदाबादच्या कॉंग्रेस कमिट्यांनी अशा भांडारांना प्रमाणित केले आहे की, जेथे योग्य दरात शुद्ध खादी विकत मिळेल. तिलाच खादी म्हणतात की, जिचा बाणा आणि ताणा हा हातसुताचा असेल व जी हातांनी विणलेली असेल.

कृपाण

शीखांना जंबिया म्हणजे कृपाण हा "ज्याप्रमाणे ब्राह्मणांना जानवे" त्याप्रमाणे शीखांना असतो, असे शीख यंगमेन्स असोसिएशनचे सेक्रेटरी म्हणतात.

आणि आता पंजाब सरकार त्याची लांबी रुंदी नियंत्रित करून शीखांचे ते जानवे हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. जरी मी शस्त्रे जवळ बाळगणे अगर त्याचा वापर करणे याचा तिटकारा करीत असलो, तरी त्यांची सक्तीने केलेली बंदी ही मला पटत नाही. तीन वर्षांपूर्वी मी असे म्हणालो होतो की, लोकांचे हे सक्तीचे निःशस्त्रीकरण ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानविरुद्ध केलेले एक काळेकुट्ट पातक आहे असे इतिहास मानील. जर लोकांना शस्त्रे जवळ बाळगण्यास हवी असतील, तर त्यांना विशेष खटपटीशिवाय बाळगू द्या. पण ज्या शीखांनी अनेक वर्षे परवानगी किंवा अडथळ्याशिवाय कृपाणे बाळगली त्यांच्याविषयीचा गुन्हा अत्यंत वाईट आहे. सेक्रेटरींनी ही गोष्ट सहज दाखविली आहे की, कृपाणाविरुद्ध जे युद्ध सुरू झाले आहे, ते ह्या शूर जमातीच्याविरुद्ध योजलेल्या दडपशाही उपायांच्या बरोबरच सुरू झाले आहे. त्याचे कारण उघड आहे. शीखांच्यात राजकीय जाणीव निर्माण झाली आहे. अधिकाऱ्यांच्या हुकुमानुसार फक्त ठार मारण्यास ते संतुष्ट नाहीत. जेव्हा त्यांना लढण्याकरिता बोलावितात तेव्हा त्या लढ्याच्या कारणाची ते साधक बाधक चर्चा करतात. आपण यात कोठे येतो हे जाणून घेण्याची त्यांना इतर गोष्टींपेक्षा अधिक इच्छा असते. त्यांना समान भागीदार व्हावयास पाहिजे आहे. हे असह्य आहे, म्हणून त्यांना (शीखांना) दडपलेच पाहिजे, असे सरकारला वाटते. सरकारच्या कल्पनेप्रमाणे त्यांच्यातील जे अत्यंत शूर लोक होते त्यांची तोंडे त्यांनी बंद केली आहेत. आपले पवित्र शस्त्र हातातून सोडून देण्याऐवजी शीख तुरुंगवास ओढवून घेतील अशी मला आशा आहे. सक्तीने आपण शिस्त शिकू शकत नाही. शस्त्र जवळ ठेवण्याचा हक्क असो वा नसो आपण शस्त्रांचा उपयोग न करण्यास शिकले पाहिजे; किंवा जबाबदारीने आणि आत्मसंयमनाने त्याचा वापर केला पाहिजे.

त्यातील सौंदर्य

पंडित मोतीलाल नेहरू यांच्या प्रेमळ परवानगीने रामगडला ते आपली प्रकृती सुधारण्याकरिता नुकतेच गेले असता, ते आपली कालक्रमणा करीत होते, त्याचे शब्दशः उद्बोधक व मनोरंजक वर्णन मी करीत आहे.

> ज्या टेकडीच्या शिखरावर मी फक्त एका चाकरानिशी एकटाच राहिलो आहे. तेथील हवा व सभोवतालचा प्रदेश माझ्या प्रकृतीला विलक्षण मानवला आहे. अद्याप थोडासा दमा व खोकला शिल्लक आहे; पण प्रकृती पूर्ववत होताच, नवशक्ती येताच तो नाहीसा झालाच पाहिजे. करुणाजनक गोष्ट इतकीच की, बरा झाल्यानंतर मला विश्रांतीला वेळ मिळत नाही, आणि त्याचे कारण माझ्या धंद्यातील मागील पापे माझा पिच्छा सोडीत नाहीत. जेव्हा मी वकिली थांबविली तेव्हा जी शेकडो वकीलपत्रे माझ्या हाती होती, त्यातील दोन मी सोडू शकत नाही.

त्यातील एक खटला माझ्याकडे सरूपच्या[1] लग्नापूर्वी अगदी अगोदर आला आणि तोच खटला माझी प्रकृती ढासळविण्यास काही अंशी कारणीभूत झाला आणि दुसरा खटला आता माझी प्रकृती सुधारल्यानंतर विश्रांती घेण्याच्या आड येत आहे. तो खटला मोठा व मूळ चौकशी कोर्टात चालावयाचा आहे व तो ५ जुलैला सुरू होणार आहे. त्याची तीन चार दिवस अगोदर तयारी करावी लागणार आहे. ऑल इंडियाची लखनौची बैठक झाल्यानंतर तो लांबणीवर टाकावा असा माझा प्रयत्न आहे. पण मी रामगड सोडण्याची ३० जून ही तारीख तूर्त ठरविली आहे. जर मला दोन चार आठवडे अधिक मिळाले तर मी बैलाइतका दणगट होईन असे मी वचन तुम्हांला देतो. पण कदाचित अनत्याचारी असहकारितावाद्याने शरीराने इतके बळकट असणे सुरक्षितपणाचे नसेल.

मी येथे ज्या प्रकारचे जीवन घालवीत आहे त्याची कल्पना येणे तुम्हांला मनोरंजक वाटेल. पूर्वीच्या चांगल्या दिवसांत एक इंग्रजी पद्धतीचे व दुसरे हिंदी पद्धतीचे अशी दोन पाकगृहे मी टेकड्यांवर माझ्याबरोबर नेत असे. मुक्कामाच्या जागी आमची छोटी हजेरी झाल्या-नंतर आम्ही जंगलाकडे निघत असू. आमच्याबरोबर रायफल्स, छोट्या बंदुका व दारुगोळा यांचा पूर्ण सरंजाम असे. कधी कधी आमच्याबरोबर शिकाऱ्यांचे लहानसे सैन्य असे व त्यांच्या मदतीने अगदी तीन प्रहर होईपर्यंत आम्ही वाटेतले निरुपद्रवी प्राणी मारीत असू. जंगलामध्ये घराइतक्याच शिष्टाचाराने आम्हांला चहा व जेवण वाढले जात असे. मुक्कामावर चमचमीत रात्रीचे जेवण घरी आमची वाट पाहात असे, आणि त्याचा पूर्ण समाचार घेतल्यानंतर आम्ही ताबडतोब झोपी जात असू. या आमच्या प्रशांत जीवनामध्ये व्यत्यय आणणारे काहीही नव्हते. फक्त कधी कधी मूर्खपणाच्या चुकलेल्या टोल्याचा त्रास होई व त्यामुळे एखाद्या गरीब प्राण्याचा जीव वाचे आणि आता पितळी कुकरने दोन पाकगृहांची जागा घेतली आहे. (तो कुकर आम्ही दिल्लीला सर्व जण टिब्बिया कॉलेजच्या उद्घाटनाला गेलो होतो तेव्हा खरेदी केला होता.) फारसा शहाणा नसलेला जुन्या परिवाराऐवजी एकुलता एक नोकर माझ्याजवळ आहे. तीन लहान पोती आहेत. त्यात तांदूळ, डाळ व मसाला आहे. पूर्वी खेचरावर लादता येईल इतके ओझे आमच्याजवळ असे. (कमलाने[2] या पिशव्या खादीऐवजी विदेशी कापडाच्या केल्या

१. विजयालक्ष्मी पंडित.
२. जवाहरलाल यांच्या पत्नी.

आहेत. त्याकरिता मी तिला कधी क्षमा करणार नाही.) पूर्वी आम्ही न्याहारी, दुपारचे जेवण व इंग्रजी पद्धतीचे जेवण घेत असू. त्याच्या-ऐवजी आम्ही डाळभात, भाज्या यांचे जेवण घेतो. आणि कधी कधी दुपारी तांदुळाची खीर खातो. सकाळच्या व दुपारच्या चहाबरोबर पुष्कळ फळे खातो व मिळेल तेव्हा एखाद दुसरे अंडे घेतो. शिकारीऐवजी आता आम्ही लांब लांब फिरावयास जातो आणि रायफल्स व बंदुकांची जागा पुस्तके, वृत्तपत्रे व मासिके यांनी घेतली आहे. (एडविन अरनॉल्डचे ' साँग सिलेश्चल ' हे माझे आवडते पुस्तक असून त्याचे मी तिसऱ्यांदा वाचन करीत आहे.) जेव्हा आतासारखा जोरदार पाऊस पडतो तेव्हा मी अशी वेडगळ पत्रे लिहितो. " देशबांधवहो ! केवढा हा अधःपात ! " पण मी यापेक्षा अधिक चांगल्या जीवनाचा खरोखर कधी उपभोग घेतला नव्हता. फक्त तांदूळ संपलेले आहेत आणि एखाद्या ब्राह्मणाप्रमाणे मी शिध्याकरिता आमच्या शेजारी योगायोगाने असणाऱ्या जगतनारायणाच्या[1] सरकारी भांडाराला अर्ज केला आहे.

' यंग इंडिया ', २१-७-१९२१.

२०१. सिमल्याच्या छायेत

असहकारितेची चळवळ ही ब्रिटिश किंवा खिश्चन यांच्याविरुद्ध नाही, याचा जर पुरावा पाहिजे असेल तर आपल्याजवळ मि. स्टोक्स यांचे उदाहरण आहे. ते राष्ट्रीय झालेले ब्रिटिश प्रजाजन व कट्टर खिश्चन आहेत. ते वेठबिगारीचे पाप नष्ट करण्याकरिता आपले सर्वस्व खर्ची घालीत आहेत. स्टोक्स हे खात्री पटलेले असह-कारितावादी व काँग्रेसजन आहेत. ते हळूहळू तसे बनत गेले, हे माझे म्हणणे बरोबर आहे असे मला वाटते. मि. स्टोक्स हे जसे सरकारशी लढत आहेत तसा कोणीही हिंदी मनुष्य लढत नाही. ते पहाडी लोकांचे खरोखरच मार्गदर्शक, तत्त्वदर्शक व मित्र झाले आहेत. वाचकांनी हे लक्षात ठेवावे की, वेठबिगारीची पद्धत सिमल्याच्या छायेत व्हाइसरॉयच्या डोळ्यांदेखत चालली आहे आणि तरीही लॉर्ड रीडिंग हे ती आपत्ती दूर

१. प्रसिद्ध वकील व हंटर कमिटीचे सभासद; पाहा, खंड, १६.

करण्यास असमर्थ आहेत. त्यांची त्याकरिता पुरेशी तयारी आहे याबद्दल मला शंका नाही, पण जिल्हा अधिकारी व इतरांना ते आपल्याबरोबर नेऊ शकत नाहीत; आणि काही अधिकारी इतक्या उलट्या काळजाचे आहेत की, जर त्यांना प्रत्यक्ष अनुशासिलेल्या प्रदेशात आपल्या मर्जीप्रमाणे वागता येत नसेल तर देशी संस्थानांच्या मार्फत ते आपले बेत तडीस नेतात. सिमल्याजवळील टेकड्यांत लहान देशी संस्थाने आहेत व तेथे ब्रिटिश अधिकारी सर्वसत्ताधीश असतो. व्हाइसरॉयपेक्षाही तो त्याच्या क्षेत्रात अधिक बलिष्ठ असतो. तो संस्थानांना आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास भाग पाडतो आणि वर म्हणतो की, माझा त्यांच्याशी काही संबंध नाही. असे एक संस्थान कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या ताब्यात आहे आणि याच ठिकाणी सिमल्याच्या डेप्युटी कमिशनरच्या वजनाने वेठबिगार चळवळ दडपून टाकण्याकरिता दडपशाही चालली आहे. एका पारशी मित्राने माझी चूक दुरुस्त केली, त्याप्रमाणे तो ठरलेला मार्ग म्हणजे उंच शेंडे (टॉल पॉपीज) उडविणे हा होय. तो मार्ग ब्रिटिश राजवटीपासून सुरू नसून सृष्टीच्या प्रारंभापासून सुरू आहे. कुऱ्हाडीचा घाव मुळावरच घातला पाहिजे आणि त्याकरिता गरीब पहाडी लोकांच्यापैकी अत्यंत हुषार व सुसंस्कृत अशा कपूरसिंगाला कडीकुलुपात टाकले आहे. पुरावा कोणत्या रीतीने गोळा केला याचे हे हुबेहूब वर्णन आहे :

> लोकांच्यावर जुलूम जबरदस्तीचा अतिरेक केला. सिमला पोलिसांना आणले. मशिनगन व काळ्या पाण्याच्या धमक्यांनी भ्यालेल्या सर्व लोकांना पकडण्यात आले......अशा वातावरणात सरकारतर्फेचा पुरावा गोळा करण्यात आला.

पंजाबमधील लष्करी कायद्याच्या दिवसांची या प्रकरणामुळे आठवण कोणालाही होईल.

स्वाभाविकपणेच आपल्या विश्वासू पुढाऱ्याच्या छळामुळे पहाडी लोकांना अत्यंत दुःख वाटत आहे. मि. स्टोक्स यांच्या प्रेरणेने हे लोक आपला पुढारी सुटेपर्यंत वेठ-बिगारीचे पुरे पैसे मिळाले तरी वेठबिगार करण्याचे निश्चयपूर्वक नाकारतील अशी मला आशा आहे. त्यांनी कच न खाता आपल्या डोक्यावर अधिकाऱ्यांचा क्रोध ओढवून घेतला पाहिजे आणि त्यांच्या पुढाऱ्यांच्याप्रमाणे तुरुंगवासाला तोंड दिले पाहिजे.

ह्या सक्तीच्या बिगारीचा आग्रह का ? त्याचे कारण अधिकारी आणि अधिकारी वर्ग यांची सत्ता, वजन व सुखसोयी वेठबिगार चालू राहण्यावर अवलंबून आहेत. तिच्या-शिवाय हिमालयाच्या अरण्यात त्यांना रानटी प्राण्यांची शिकार करता येणार नाही व त्यांना ठार मारता येणार नाही. जर बिगारीची पद्धत रद्द झाली असती तर ड्यूकसाहेबांना डोंगरी किल्ल्यावर शिकारीकरिता नेता आले नसते. वाघांना व निरुपद्रवी प्राण्यांना ठार

१. प्रथितयश वकील व हंटर कमिटीचा सभासद, खंड १६ पाहा.

मारण्याच्या शंकित सुखाकरिता एक रस्ता तयार करावा लागला व त्याकरिता हजारो नाराज खेड्यांतील लोकांचे सक्तीचे श्रम घ्यावे लागले. जर पशूंना शहाणपणाची वाचा असती तर त्यांनी माणसांविरुद्ध आपली बाजू अशी मांडली असती की, ज्यामुळे माणुसकीला धक्काच बसला असता. आपल्याला उपद्रव देणाऱ्या रानटी पशूंना ठार मारणे मला समजते. पण माणसांची रक्ताची तहान भागविण्याकरिता निरनिराळे गट संघटित करण्याकरिता संपत्ती का उधळली जाते, याचे सयुक्तिक कारण दिलेले मला आढळले नाही. आणि तथापि जर वेठबिगार नसेल तर अधिकाऱ्यांना किंवा पृथ्वीभ्रमण करणाऱ्यांना क्रीडा करावयास मिळणार नाही. हिंदी राजेराजवाड्यात चालू असलेले प्रघात किंवा महाभारतातील उदाहरणे माझ्या तोंडावर फेकण्याची जरूरी नाही. ज्या उदाहरणांची किंवा प्रघातांची मला समजूत पटत नाही, किंवा नैतिक आधारावर मला ज्यांचे समर्थन करता येत नाही त्यांचा गुलाम होण्याचे मी साफ नाकारतो.

'यंग इंडिया', २१-७-१९२१

२०२. स्त्रियांची अवस्था

कटकच्या श्रीमती सरलादेवी लिहितात :

> अस्पृश्यतेच्याइतकीच स्त्रियांना दिली जाणारी वागणूक हा वाईट रोग आहे, असे तुम्ही कबूल करीत नाही का? ज्या तरुण राष्ट्रीय लोकांशी माझा संबंध आला त्यांची वृत्ती शेकडा नव्वद बाबतीत पाशवी आहे. हिंदुस्थानातील किती असहकारितावादी स्त्रियांना उपभोग्य वस्तू मानीत नाहीत? आवश्यक असणारी अट स्त्रियांच्या बाबतीत वृत्ती बदलल्याशिवाय शक्य होईल काय? स्त्रियांच्याबद्दल वृत्तीत बदल झाल्याशिवाय ही यशाची आवश्यक आत्मशुद्धीची अट पुरी करणे शक्य आहे काय?

स्त्रियांना मिळणारी वागणूक हा अस्पृश्यतेइतका वाईट रोग आहे, हे म्हणणे मला पटत नाही. श्रीमती सरलादेवी यांनी त्या वाईट गोष्टीची भयंकर अतिशयोक्ती केली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी जो असहकारितावाद्यांवर कामवासनेच्या फक्त तृप्तीचा आरोप केला आहे, तोही टिकणारा नाही. कोणतेही कार्य अतिशयोक्तीमुळेच नाश पावते. तथापि त्याच वेळी मला हा सिद्धांत मान्य करण्यास अडचण वाटत नाही की, खऱ्या स्वराज्याला आपण लायक होण्याकरिता पुरुषांनी सध्या स्त्रियांच्याबद्दल व त्यांच्या

पावित्र्याबद्दल जो पुरुषांना आदर आहे, त्यापेक्षा पुष्कळच अधिक आदर त्यांनी वाढविला पाहिजे. ह्या महिलेपेक्षा मि. अँन्ड्र्यूज यांनी फारच खणखणीत आवाज काढला आहे. ते जळजळीत भाषेत सांगतात की, ज्या आपल्या भगिनी पतित आहेत, त्यांच्या अब्रूबद्दल आपण आनंदित होण्याचे धाडस करू नये. यातील काही वाट चुकलेल्या भगिनींनी स्वतःला असहकारितावाद्यांच्याकरिता राखून ठेवले आहे. असे जेव्हा रसभरित शब्दांत वर्णन करणारे असहकारितावादी आढळतात तेव्हा ती कल्पनाच अधःपाताची निदर्शक आहे. आपल्या नैतिक कल्याणाकरिता अशा या अत्यंत महत्त्वाच्या बाबतीत सहकारितावादी आणि असहकारितावादी असा भेदाभेद करणे शक्यच नाही. जोपर्यंत आपण एकाही स्त्रीचा आपल्या कामवासनेला बळी घेतो तोपर्यंत आपण सर्व पुरुषांनी लाजेने माना खाली घातल्या पाहिजेत. ईश्वरी सृष्टीतील अत्यंत उदात्त अशा निर्मितीला आपल्या कामवासनेचा विषय करून आपण पशूपेक्षाही अधिक नीच होतो, त्याऐवजी सारी मनुष्यजात मला नष्ट झालेली चालेल. पण हा फक्त हिंदुस्थानपुरताच प्रश्न नाही. तो जागतिक प्रश्न आहे. विषयोपभोगाच्या आधुनिक कृत्रिम जीवनाविरुद्ध मी जर प्रचार करू लागलो आणि चरख्यामध्ये सारांशाने असलेल्या साध्या जीवनाकडे जा म्हणून सांगत असलो तर त्याचे कारण, साधेपणाकडे आपण शहाणपणाने वळल्याशिवाय पाशवी जीवनापेक्षा अधिक अधःपतित जीवनापासून सुटका होण्यास दुसरा मार्ग नाही हे मी जाणतो. आपल्या स्त्रियांना जास्तीतजास्त स्वातंत्र्य असावे अशी माझी उत्कट इच्छा आहे. मी बालविवाहांचा तिरस्कार करतो. बाल विधवा पाहताना माझ्या अंगावर शहारे येतात. जेव्हा नुकताच विधुर झालेला नवरा पाशवी उदासीनतेने दुसरे लग्न करतो तेव्हा मला संतापाने कापरे भरते. जे आईबाप आपल्या मुलींना पूर्ण अज्ञानात व पूर्ण निरक्षरतेत ठेवतात, आणि त्यांना एखाद्या चांगल्या श्रीमंत तरुण माणसाबरोबर लग्न लावून देण्याकरिता वाढवितात तेव्हा मला अशा आई-बापांच्या गुन्हेगारी अनास्थेबद्दल दुःख होते. पण हे दुःख व संताप होऊनही मला त्या प्रश्नातल्या अडचणी समजतात. स्त्रियांना मतदानाचा हक्क असलाच पाहिजे आणि समान कायदेशीर दर्जा मिळालाच पाहिजे. पण हा प्रश्न येथे संपत नाही. जेथील स्त्रिया राष्ट्राच्या राजकीय विचारविनिमयावर परिणाम घडवून आणतात, त्या ठिकाणाहूनच हा प्रश्न सुरू होतो.

माझ्या म्हणण्याचे उदाहरण म्हणून मी एक माझ्या एका महत्त्वाच्या मुसलमान मित्रांनी त्याचे लंडनमधील एका प्रसिद्ध स्त्री-हक्काच्या पुरस्कर्तीबरोबर झालेल्या भाषणाचा जो चित्तवेधक वृत्तांत सांगितला, तो मला निवेदन करू द्या. तो एका स्त्री-हक्कपुरस्कर्त्यांच्या सभेला हजर होता. अशा या सभेला एक मुसलमान आलेला पाहून एका त्याच्या स्त्री-मैत्रिणीला आश्चर्य वाटले. तिने विचारले, तुम्ही येथे कसे आलात ? मित्राने उत्तर दिले, त्याला दोन मोठी व दोन लहान कारणे आहेत. मी अगदी लहान बालक असताना माझा बाप वारला. मी आयुष्यात जो कोणी आहे त्याचे श्रेय माझ्या

आईला आहे. नंतर माझे लग्न अशा स्त्रीशी झाले की जी माझ्या आयुष्यातील खरी भागीदारीण झाली. मला मुलगा नाही पण चार मुली आहेत. त्या सार्‍या अल्पवयीन आहेत आणि बाप म्हणून त्यांच्या हिताकडे माझे अत्यंत लक्ष आहे. मी स्त्रीहक्काचा पुरस्कर्ता असलो तर त्यात नवल आहे काय ? मुसलमानांवर असा आरोप आहे की, ते स्त्रियांच्याबद्दल बेपर्वा असतात. यापेक्षा अधिक अब्रूनुकसान करणारे शब्द कोणी उच्चारले नसतील. इस्लामधर्माने स्त्रियांना समान हक्क दिले आहेत. ते म्हणाले की, पुरुषांनी कामवासनेने स्त्रियांचा अधःपात केला आहे. शरीरातील आत्म्याची पूजा करण्याऐवजी तो तिच्या शरीराची पूजा करू लागला आहे. पुरुषाने आपल्या कावेबाजीत इतके यश मिळविले आहे की, स्त्रियांना आपल्या शारीरिक भूषणांना आपण मिठ्या मारीत आहोत हे कळतच नाही. ती शारीरिक भूषणे तिच्या गुलामगिरीची चिन्हे आहेत. गहिवरलेल्या स्वरात ते म्हणाले, जर हे तसे नसते तर पतित भगिनींनी आपले शरीर सजविण्यात इतका आनंद का मानला असता ? आम्ही पुरुषांनी त्यांच्यातील आत्माच चिरडून टाकला नाही का ? ते सावध होऊन म्हणाले, मला स्त्रियांचे फक्त यांत्रिक स्वातंत्र्य नको असून ज्या बेड्या तिने स्वतःच्या इच्छेने स्वतःभोवती घातल्या आहेत त्या बेड्या तुटावयास पाहिजे आहेत. म्हणून त्या मित्राला आपल्या मुली स्वतंत्र उद्योग करण्यास लायक कराव्यात असे वाटत होते.

हे उदात्त संभाषण मला लांबवावयाचे नाही. माझ्या स्त्री-पत्रलेखिकेने माझ्या मुसल्मान मित्राच्या संभाषणातील मध्यवर्ती कल्पनेचा विचार करावा आणि हा प्रश्न सोडवावा. आपण पुरुषाच्या कामवासनेचे विषय आहोत हा विचार स्त्रियांनी सोडून दिलाच पाहिजे. त्याचा इलाज पुरुषांच्यापेक्षा स्त्रियांच्याच हातात अधिक आहे. जर तिला पुरुषांच्याबरोबर समान भागीदारी हवी असेल तर तिने आपल्या नवर्‍याच्याकरितादेखील शृंगार करण्यास नकार दिला पाहिजे. शारीरिक आकर्षणांनी रामाला संतुष्ट करण्याकरिता सीतेने एकही क्षण कधी वाया घालविला असेल असे मला वाटत नाही.

'यंग इंडिया', २१-७ १९२१

२०३. पत्रलेखकांना

पी. शिष्टा : वकिलासंबंधीच्या काँग्रेस ठरावाचा हेतू ज्या कायदे कोर्टाच्याद्वारा सरकार आपली सत्ता संघटित करते, त्यांची प्रतिष्ठा नष्ट करावी असा होता.

एन्. एच्. मोदी : घटनेचा विचार न करता जे लोक रसद व वेठबिगार यांचा पुरस्कार करतात, त्यांना काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी खासच होता येणार नाही. माझ्या मताप्रमाणे काँग्रेसच्या ठरावानुसार नियुक्त सभासदांना पदाधिकारी होता येत नाही. ऑननरी मॅजिस्ट्रेटस् यांनाही पदाधिकारी होता येत नाही. एकवीस वर्षांखालील व्यक्ती कितीही शिकलेल्या असोत, त्या सभासदत्वाला अपात्र आहेत. जे सहकारितावादी आहेत ते असहकारितेचे काम यशस्वीरीत्या करतील असे मला वाटत नाही. म्हणून मी जेथे कार्याची संघटना करण्यास असहकारितावादी मिळणार नाहीत तेथे कामच सोडून देईन. असहकारितावादी मुसलमान हा परदेशी तुर्की टोपी खासच वापरू शकणार नाही. जे कोणी काँग्रेस कमिटिवरील जागा मिळविण्याकरिता पगारी लोक मते मिळविण्याकरिता नेमतील अशा उमेदवारांना मी नालायक समजेन. ह्या पत्रलेखकांना व इतरांना मी असे सांगू इच्छितो की, निवड करणे हे शेवटी मतदारांच्या हाती असते. जर असहकारितावादी मतदार सहकारितावाद्यांना निवडतील किंवा संशयित चारित्र्याच्या माणसांना निवडून देतील तर कुठलीही घटना अशा माणसांच्या सार्वजनिक जीवनातल्या प्रवेशाला बंदी करू शकणार नाहीत. आणि जर सहकारितावादी त्यांना असलेल्या हक्कानुसार काँग्रेसमध्ये येतील तर ते खात्रीने आपल्या पसंतीचे उमेदवार निवडतील. काँग्रेस घटनेत पक्षांना आदर दाखविलेला नाही. काँग्रेसने असहकारितेचा जो ठराव जवळजवळ बिनविरोध पास केला, त्यामुळे त्या ठरावाची नीट अंमलबजावणी करणे अवश्य झाले आहे. आणि म्हणून काँग्रेस कार्यक्रमाचे जे कट्टर अभिमानी असतील त्यांनाच असहकारितावाद्यांनी निवडून दिले पाहिजे.

के. बी. लालगुप्ता : चरख्यामुळे कुटुंबाचे पोषण होईल, असा दावा मी कधीच केला नव्हता. चरखा गरीब माणसाला अन्न देईल एवढेच आमचे सांगणे. तथापि चरख्याचा सर्वांत मोठा दावा असा आहे की, राष्ट्रीय उत्कर्षाकरिता तो आवश्यक आहे.

बी. एस्. एम्. : खोटया फौजदारी किंवा दिवाणी खटल्यात साक्षी देण्याबद्दल मी तुम्हांला वर्किंग कमिटीच्या प्रतिपादनाकडे पाहावयास सांगतो. ज्या ठिकाणी नगरपालिका शाळांचे राष्ट्रीयीकरण करतात, त्याही ठिकाणी अशा शाळा काँग्रेसचे तज्ज्ञ उपलब्ध असतील त्यांच्या ताब्यात व त्यांच्या नियंत्रणाखाली त्या दिल्या जाणे अधिक चांगले. खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर झाले तरी स्वराज्य मिळेपर्यंत असहकारिता थांबविता येणार नाही. सिमला मुलाखतीतील तपशील लोकांना मिळू न देण्यात गुप्ततेचे पातक घडते असे मला वाटत नाही. मित्राने दिलेले आश्वासन उघड करण्यास नकार देणे यात पाप नाही. गुप्तता टाळणे हे आश्वासनाबद्दल आदर दाखविण्याशी अगदी सुसंगत आहे. शिक्षेच्या भयाने किंवा दुसऱ्या एखाद्या कोसळणाऱ्या संकटाच्या भयाने आपण काहीही गुप्त ठेवू नये.

तेजसिंह वर्मा : फीजी व आसाममधील माणसांना नेण्याची जी आपण सदय सूचना

केलीत ती मि. अॅन्ड्रूजकडे पाठविली आहे. त्यांचा पत्ता शांतिनिकेतन, बोलपूर, इ. आय. रेल्वे.

' यंग इंडिया ', २१-७-१९२१

२०४. सुधारणेचा उपहास

मला जरी वाङ्मय वाचनाची हौस असली तरी मला वाचनाची क्वचितच संधी मिळते. **नेशनचा** एक अंक गेल्या नाताळात प्रसिद्ध झाला होता व पुष्कळ दिवस तो माझ्याजवळ पडून राहिला आहे. त्यात " लॉ अॅन्ड गॉस्पेल " [1] हा एक विचारप्रवर्तक लेख आहे. सध्याच्या चळवळीशी त्याचा इतका संबंध आहे की, ज्या ' यंग इंडिया 'च्या वाचकांना तो पाहावयाला मिळाला नसेल, त्यांच्याकरिता तो पूर्णपणे उद्धृत करण्यास मला संकोच वाटत नाही. त्या निबंधाचे तज्ज्ञ लेखक जागतिक क्रांतीचे कारण मूलभूत धार्मिक चळवळ आहे असे म्हणतात. जगातील निरनिराळ्या भागांत जिला खोट्या अर्थाने सुधारणापद्धत म्हणतात तिच्या जोखडापासून मनुष्यमात्राला सोडविण्याकरिता अहिंसेचा स्पष्टपणे बुद्धिपुरस्सर स्वीकार केलेली हिंदुस्थानातील असहकारितेची चळवळ, (तिच्या वापरामध्ये आपण कितीही अयशस्वी झालो असलो तरी) सर्व चळवळींत अत्यंत धार्मिक चळवळ आहे किंवा नाही याचा वाचकांनी विचार केला पाहिजे.

' यंग इंडिया ', २१-७-१९२१

२०५. जुन्याचा त्याग व नव्याची निर्मिती

असहकारितेला दोन बाजू आहेत. जुन्याचा त्याग व नव्याची निर्मिती, विध्वंस आणि पुनर्रचना. आपल्याला दोहोंशिवाय पुढे जाताच येणार नाही. ज्या स्थळी आज

१. पाहा, परिशिष्ट ५.

आपण उभे आहोत त्या शिखरावर चढण्याकरिता जे उपाय आपण आजवर योजले आहेत त्यांत यांचा पूर्णपणे विचार केला आहे आणि माझ्या मताने त्याच पद्धतीने पुढे गेल्याशिवाय आपण आणखी प्रगती करू शकणार नाही. शांततामय असहकारिता मला कोणत्याही दुसऱ्या मार्गाने अशक्य वाटते.

माझी ठाम समजूत आहे की, स्वदेशीचा स्वीकार केल्याशिवाय आपण एक पायरीही चढू शकणार नाही. फक्त त्यातूनच आपल्या साऱ्या शक्ती विकसित होणार आहेत. सहेतुक विध्वंस आणि सहेतुक निर्मिती या दोन्ही गोष्टी स्वदेशीत विद्यमान आहेत. स्वदेशीमुळेच राष्ट्रीय शरीराच्या सर्व अवयवांना व्यायाम मिळतो व त्यांच्या शक्तीची पारख होते. आजपर्यंत तरी लोकांनी कोणत्याही कामात सर्वस्व ओतलेले नाही. स्वदेशीच्या प्रयोगात यशस्वी व्हावयाचे असेल तर त्या कामी आपली अविचलित निष्ठा पाहिजे. त्याशिवाय यश अशक्य आहे. जे राष्ट्र या निष्ठेने काम करावयास शिकते तेच राष्ट्र आपल्या तळहातात स्वराज्य आणू शकते, स्वदेशीशिवाय स्वराज्य मिळविणे हे आकाशातील पुष्पाइतकेच अशक्य आहे.

स्वदेशीत यश मिळविण्याकरिता परदेशी कापडाचा पूर्ण त्याग केला पाहिजे आणि देशात अधिक कापड निर्माण केले पाहिजे. इतके दिवस आपण नाशाला भीत होतो, पण आता आपल्याला चरखारूपी रत्नचिंतामणीचा शोध लागला आहे म्हणून निर्मितीचे महान साधन आपल्या हाती आले आहे. पण आपल्याला टाकून देण्याच्या स्वरूपाकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. एका विशिष्ट टोकापर्यंत निर्मितीची गती वाढविता येते. नंतर ती आपल्या गतीने पुढे जाते. नाश काय एका क्षणात करता येतो. नाश करण्याकरिता प्रबळ इच्छाशक्ती लागते. जेव्हा आपल्या कल्पना बदलतील तेव्हा आपण नाश करण्याला तयार होऊ.

अनुभवाच्या आधारावर असे म्हटले आहे की, वासना-विषयाबद्दल तिरस्कार वाटला नाही, तर त्याग हा सतत चालू ठेवता येत नाही. एखाद्या गलिच्छ गोष्टीबद्दल जसा तिटकारा किंवा अप्रीती वाटते तसेच आपल्याला परदेशी कापडाबद्दल वाटले पाहिजे. असा तिटकारा येईपर्यंत आपण जपानी साड्या आणि मँचेस्टरची मलमल यांच्याकडे पुनःपुन्हा ओढले जाऊ. तशा प्रकारच्या मालाची मागणी करू, आणि जे व्यापारी हा माल आम्ही देतो असे म्हणतील ते आपल्याला त्याऐवजी मूळचा माल विकून फसवितील. म्हणुन तूर्त ज्या वस्तू परदेशी मालासारख्या दिसतील त्यांनां स्पर्शसुद्धा करण्याचे नाकारले पाहिजे. फसवणुकीपासून आपण सावध राहिले पाहिजे. जर आपल्याला परदेशी कापडाविरुद्ध असा तिटकारा वाटावयास पाहिजे असेल तर हीही गोष्ट आपल्या मनात स्वच्छ पाहिजे की, परदेशी कापड हे आमच्या गुलामगिरीच्या मुळाशी आहे. इतर सर्व

आलो आणि मला येथे त्यांच्या प्रेमाने आणले. मी येथे कधी कधी मातृभूमीकरता पैसे मागण्यास येतो. तुम्ही परदेशी कापड सोडून द्यावे म्हणून तुमचे मन वळविण्याकरिता आणि ज्या स्वदेशीमध्ये स्वराज्याची किल्ली आहे तिला उत्तेजन द्या याकरिता मला तुमच्याकरिता तुमच्याकडे आले पाहिजे. आपल्या राष्ट्रीय कामगिरीत मोठ्या बँका चालविण्याची व कोट्यवधी रुपयांची कार्यक्षमतेने व्यवस्था ठेवण्याची पात्रता आपल्यांत असली पाहिजे. जरी आपल्यांत पुष्कळ बँका नसल्या तरी त्याचा अर्थ असा नाही की, आपल्याला कोट्यवधी व अब्जावधी रुपयांची व्यवस्था कार्यक्षमतेने करण्याची पात्रता नाही. आपल्या देशात पेढ्यांचा धंदा गेली कित्येक शतके चालू आहे. आपले मारवाडी हे जात्याच पेढीवाले आहेत आणि जर ते हिंदुस्थानशिवाय दुसऱ्या कोणत्याही देशात जन्मले असते तर त्यांनी कोटीच काय पण अब्जावधी रुपयांची व्यवस्था चांगली ठेवली असती. पण ज्या अर्थी ते या दरिद्री देशात जन्मले आहेत त्या अर्थी त्यांच्या शक्तीची योग्यताही कमीच समजली जाते. एका लेखकाने असे म्हटले आहे की, आधुनिक काळातील बहुतेक युद्धे आर्थिक कारणाकरिताच होतात. त्याच वेळी असेही म्हणता येईल की श्रीमंत माणसेही दुःख भोगणाऱ्या मानवतेचे अत्यंत कल्याण करणारे साधन आहेत. ही बँक उच्च नैतिक तत्त्वावर चालविली जाईल अशी मला आशा आहे. तिचा उत्कर्ष होवो. मी उद्घाटन झाल्याचे जाहीर करतो.

'मुंबई क्रॉनिकल', २३-७-१९२१

२०७. जनतेला संदेश

जुलै २१, १९२१

एक ऑगस्टला परदेशी कापड टाकून आणि खादी वापरून लोकमान्यांच्या पवित्र नावाची आठवण करा. स्वराज्य प्राप्तीकरिता व पंजाब आणि खिलाफतचे अन्याय दूर करण्याकरिता बहिष्कार ही आवश्यक अट आहे.

हिंदू, मुसलमान, पारशी, खिश्चन व ज्यू या सर्व धर्मांतील लक्षावधी बंधुभगिनींनी एक ऑगस्टला अभिनंदन करण्याकरिता यावे.

जे खादी वापरणार नाहीत, निदान गिरणीचे कापड वापरणार नाहीत, त्यांनी येऊ नये. परदेशी कापडाचा पोषाख करून येणे हा कैलासवासी लोकमान्यांच्या स्मृतीचा

अपमान आहे. परदेशी कापड स्वयंसेवकांना देऊन टाका किंवा मुंबईस प्रिन्सेस स्ट्रीट-वरील अशोक बिल्डिंगमध्ये उघडलेल्या भांडारात पाठवून द्या. त्यांची होळी करणे हा सर्वांत उत्तम मार्ग. पण तुमची इच्छा असेल, तर ते कपडे स्मर्ना किंवा दुसऱ्या कोणत्या देशाला पाठविले जातील.

'बॉंबे सीक्रेट ॲबस्ट्रॅक्टस्', १९२१

२०८. स्वदेशीवर भाषण, मुंबई[1]

जुलै २१, १९२१

महात्मा गांधी बोलावयास उठताच टाळ्यांचा कडकडाट झाला. ते म्हणाले, अगदी थोड्या दिवसांपूर्वी येथे आपण जमलो होतो आणि पुन्हा आज रात्री येथे जमत आहोत. गेल्या खेपेला आपण टिळक स्वराज्य फंडाला पैसे गोळा करण्याकरिता येथे जमलो होतो. त्या वेळी पुष्कळ स्त्रिया हजर होत्या. मी आज स्वदेशीवर बोलणार आहे. या वर्षाअखेर आपण परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार घालू शकू किंवा नाही हे मला बरोबर सांगता येणार नाही. पण तुम्ही सर्वांनी ह्या कार्याला मदत केली तर कदाचित आपले उद्दिष्ट लवकर सिद्धीस जाईल. मी गेल्या सप्टेंबरपासून लोकांना असे सांगत आहे की, तुम्ही जर ह्या राष्ट्रीय कार्याला मदत केलीत तर पुढच्या सप्टेंबरमध्ये तुम्हांला स्वराज्य मिळू शकेल. स्वदेशी ही अशी चळवळ आहे की, जी गरीब व श्रीमंत या दोघांनाही अत्यंत खुषीने स्वीकारता येईल. सरकारी नोकरांना बिनदिक्कत शुद्ध स्वदेशी कपडे वापरता येतील. देशाच्या हाकेला ओ देण्यात आपण यशस्वी होऊ असे जर मला वाटले तर माझा उद्देश चांगला सफल झाला असे मी मानीन. मी हे स्पष्टपणे सांगतो की ३१ जुलैनंतर मी तुम्हांला स्वदेशी-विषयी काही सांगणार नाही. कारण त्या मुदतीपूर्वी प्रत्येक परदेशी वस्तूवर बहिष्कार पडलेला असेल.

१. ही सभा मांडवी जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्यातर्फे रात्री ९ वाजता मांडवीला भरली. त्या सभेत श्री. सरोजिनी नायडू यांही बोलल्या.

...जेव्हा असत्य बोलणे वाईट आहे असे माणसाला वाटते तेव्हाच त्याला आपण काय करतो हे समजून येते. म्हणून तुमच्या ध्यानात ही गोष्ट आणून देऊ इच्छितो की, सर्व धर्मांच्या शास्त्राप्रमाणे काही स्वदेशी कपडे आणि काही विदेशी कपडे वापरून तुम्ही स्वतःची फसवणूक करून घेऊ नका. मी ६ एप्रिलपासून असे सांगत आलो आहे की, हिंदूंनी मुसलमानांशी हातमिळवणी केली तरच खिलाफतीचे अन्याय दूर होतील, आणि मुसलमानांना हे समजले पाहिजे की, हिंदूंशी हातमिळवणी करूनच त्यांचा उद्देश सफल होईल, आणि असे झाल्याशिवाय स्वराज्याचे ध्येय गाठता येणार नाही. काल मी भाई मौलाना आणि बहेन नायडू यांच्यासह पुण्यामध्ये ठिकठिकाणी गेलो आणि लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी कण्यास मदत केली. मला सकाळपासून रात्रीपर्यंत लोकमान्यांच्या-करिता काम करणे भाग पडले आणि ज्या लोकांच्यापुढे भाषणे केली त्यांची परदेशी कापडावरील बहिष्कारासंबंधी खात्री पटवावी लागली.

गिरणीत तयार झालेले कापड वापरताना तुम्ही फार दक्षता बाळगली पाहिजे. राष्ट्रीय दृष्टीने यांत्रिक कापड वापरणे इष्ट नाही. तो पुरुष अगर ती स्त्री सुंदर आहे की, जो किंवा जी आपले काम स्वतःच्या आणि देशाच्या समाधानाकरिता करील. म्हणून मी माझ्यासमोर बसलेल्या स्त्रियांना निःशंकपणे खादी वापरा अशी विनंती करतो. कारण आपण परदेशी कापडावर बहिष्कार घातल्याशिवाय स्वराज्यावर हक्क सांगू शकणार नाही.

शेवटी महात्माजी म्हणाले, परदेशी कपड्यावर जे बहिष्कार घालण्यास तयार असतील त्यांनी आपले कपडे गरिबांच्या दुःखनिवारणा-करिता स्मर्नाला पाठवावेत किंवा हिंदुस्थानबाहेर कोठेही पाठवावेत किंवा एक ऑगस्टला त्याची होळी करावी. पण कसेही करून तुम्ही परदेशी कपडे पूर्णपणे नष्ट करा. अर्थातच प्रेमाचे द्योतक म्हणून तुमच्या प्रिय मित्रांनी किंवा नातेवाइकांनी बक्षीस दिलेले जुने परदेशी कपडे जतन करून ठेवावेत असे प्रत्येकाला वाटेल. पण असेही कपडे राष्ट्राच्या हाकेला मान देऊन एक नष्ट तरी करावेत किंवा बाहेर तरी पाठवून द्यावेत.

'मुंबई क्रॉनिकल', २२-७-१९२१

२०९. स्वदेशीवर भाषण, मुंबई[१]

जुलै २२, १९२१

महात्मा गांधी बोलावयास उठताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. ते म्हणाले की, मी शहरात ठिकठिकाणी स्त्री-पुरुषांच्या पुढे भाषणे करीत आहे आणि स्वदेशीसंबंधी मी काही नवे सांगेन असे मला वाटत नाही. लखनौहून एक गृहस्थ माझ्याकडे आले व म्हणाले की, संयुक्त प्रांतात काही तरी बिघडले आहे. सरकारने एका माणसाला अगदी क्षुल्लक अपराधाबद्दल ३ दिवस अंधारकोठडीची शिक्षा दिली व तो अद्याप तुरुंगातच आहे. लखनौच्या या गृहस्थाने मला विचारले, अशा स्थितीत माणसाने काय करावे? मी त्याला सांगितले की, त्याने सर्व दुःखे निमूटपणे सोसावीत. सोशिकपणाचा गुण सर्वांनी आपल्या अंतःकरणात निर्माण करावा. त्या गृहस्थाने सांगितलेली गोष्ट खरी का खोटी हे मला सांगता येत नाही. कारण अंधारकोठडीत ३ दिवसपर्यंत कोंडून राहणे फार कठीण आहे. अर्थातच मला अशा एका प्रसंगाचा अनुभव आहे. कारण आम्ही अद्याप पंजाबमध्ये परक्या लोकांनी हिंदी लोकांवर लादलेली क्रूर कृत्ये विसरलो नाही म्हणून त्यांनी सांगितलेली गोष्ट खरी असू शकेल.

मी तुम्हांला पुन्हा सांगतो की, देशाविषयीचे कर्तव्य जर तुम्हांला समजले नाही, तर तुम्ही स्वातंत्र्य मागणे बरोबर नाही. मी आज रात्री तुमच्यासमोर स्वदेशीवर बोलणार आहे. कोणी तरी मला दुसऱ्या अशा गोष्टी सांगितल्या की, सरकारने ३ जणांना पकडले आहे. त्यातील एक काँग्रेस सेक्रेटरी होता. त्याला पकडताच त्याने माफी मागितली आणि दुसऱ्या दोघांनाही माफी मागितली. ह्या तिघांनीही आता राष्ट्रीय कार्य सोडून दिले आहे आणि ते तिघेही ह्या चळवळीपासून दूर राहिले आहेत. अशा कृत्यांबद्दल त्यांना लाज वाटली पाहिजे. तुम्ही शक्य तोवर निर्भय राहा असे मी तुम्हांला सांगेन, कारण आपला उद्देश स्तुत्य असल्यावर सरकारची पर्वा कशाला? जर तुम्ही दुःख व कष्ट भोगण्यास तयार नसाल तर

१. ही सभा ओ वॉर्ड काँग्रेस कमिटीच्या विद्यमाने रात्री ९ वाजता मुरारजी गोकुळदास हॉलमध्ये भरली होती.

आताच चळवळ सोडून दिलेली बरी, म्हणून मी येथे हजर असलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला अशी विनंती करीन की, तुम्ही कोणत्याही वेळी देशाकरिता दुःख भोगण्यास तयार असले पाहिजे.

आम्ही एक परदेशी कपड्यांचा डेपो उघडला आहे. तेथे तुम्ही निःशंकपणे तुमचे कपडे पाठवा. जर आपण ३१ जुलैपूर्वी परदेशी कापडावर बहिष्कार घालण्यात यशस्वी झालो नाही, तर देशबांधवांच्या दृष्टीने आणि जगाच्या दृष्टीने आपली अब्रू जाईल.

महात्माजींनी विचारले की, तुम्ही एक ऑगस्टची काही तयारी केली आहे काय ? त्या परदेशी कापडाकरिता उघडलेल्या डेपोत कपडे पाठविण्यात काही लाज नाही. जेव्हा काही भगिनींनी विचारले की, तुम्ही परदेशी साड्यांवर बहिष्कार घालाल काय? तेव्हा त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. खादीचा पोषाख घालण्यास नेहमीच तयार असलेल्या इतर भगिनी आहेत, यात तर शंकाच नाही. स्त्रियांच्याजवळ सध्या जे परदेशी कपडे असतील ते त्यांनी राष्ट्राच्या आज्ञेनुसार टाकून दिले पाहिजेत. जर ह्या सभेत हजर असलेले स्त्रीपुरुष परदेशी कापडावर बहिष्कार घालण्यास तयार नसतील तर स्वराज्यावर त्यांना हक्क व अधिकार सांगता येणार नाही.

मला आज रात्री जे येथे सांगावे लागले ते मी पूर्वी अनेक वेळा सांगितले आहे, आणि आता जे माझ्या इच्छेनुरूप वागण्यास तयार असतील त्यांनी आपले हात वर करावेत असे मी सांगतो; पण हात वर करण्यापूर्वी मला हे सांगितलेच पाहिजे की, ज्याला गिरण्यांत तयार झालेले स्वदेशी कापड म्हणतात, ते कधीच वापरता कामा नये. माझा सल्ला असा आहे की, तुम्ही यंत्रावर तयार झालेले कापड टाकले पाहिजे. खादीचा सर्वश्रेष्ठ गुण असा आहे की, ती हातसुताची व हातविणीची असते.

गांधीजी म्हणाले, बेझवाड्याच्या खादी साड्या मोठ्या प्रमाणात आता मिळत नाहीत, पण त्याऐवजी तुम्हाला खादीच्या साड्या सहज वापरता येतील, आणि एक ऑगस्टला पुष्कळ स्त्रिया खादीच्या साड्या वापरताना दिसतील. मी पुन्हा सांगतो की, तो पोषाख करण्यास लाजण्याचे कारण नाही, कारण तो राष्ट्रीय पोषाख आहे. मनात निराशा बाळगू नका, पण हिंदी राष्ट्रीयत्वाची लढाई लढण्याकरिता तुम्ही धैर्यशाली बना.

नंतर गांधींनी जे स्त्रीपुरुष एक ऑगस्टला आणि त्यानंतर खादी वापरण्यास तयार असतील त्यांनी आपले हात वर करावेत असे सांगितले.

हॉलमध्ये हजर असलेल्या जवळ जवळ सर्वांनी हात वर केले. काही स्त्रिया हात वर करण्यास नाराज दिसल्या.

महात्माजींनी पुन्हा एकदा परदेशी कापडावर बहिष्कार घालण्यास व रागा-लोभाची पर्वा न करता खादी वापरण्यास विनंती केली. कोणाच्याही धमकावणीस तुम्ही भीक घालू नका असे गांधीजींनी त्यांना सांगितले.

शेवटी महात्माजी म्हणाले की, मला आता स्वदेशी चळवळीवर आणखी काही सांगावयाचे नाही. कारण मी गेले कित्येक दिवस याच विषयावर सारखा बोलत आहे. माझा माझ्या देशबांधवांवर मोठा विश्वास आहे. आणि म्हणून मी देवाला अशी प्रार्थना करतो की, मी सुरू केलेल्या या महान चळवळीला शेवटी चांगली फळे मिळावीत. (टाळ्यांचा सारखा गजर).

'मुंबई क्रॉनिकल', २३-७-१९२१

२१०. मुंबई सभेतील भाषण[1]

[जुलै २३, १९२१ नंतर]

सभेला सुरुवात करण्यापूर्वी महात्मा गांधी म्हणाले, मी जयकरांचे[2] पत्र वाचून दाखवितो. त्यांना ताप आला आहे, म्हणून ते सभेला येऊ शकणार नाहीत; आणि लोकमान्यांच्या स्मृतीला श्रद्धांजली अर्पण करू शकणार नाहीत. त्यानंतर त्यांनी मि. ललित यांना टिळकांच्यासंबंधीचे पद म्हणावयास सांगितले.

१. पारशी राजकीय सभेच्या विद्यमाने एंपायर थिएटरात ही सभा भरली. मार्माड्यूक पिकथॉल, महंमद अली, सरोजिनी नायडू वगैरे हजर होते. सभेतील पुष्कळ स्त्रिया खादी पोषाखात आल्या होत्या. त्यांत दादाभाई नौरोजी यांची नात पेरिन कॅप्टन होती. सभेत प्रवेशाकरिता जमविलेला पैसा टिळकांचे उत्तम चरित्र लिहिण्याकरिता मदत म्हणून निराळा ठेवला होता.

२. एम. आर. जयकर (१८७३-१९५९); मुंबईचे वकील व नेमस्त पुढारी, राजकीय तडजोड करणारे आणि शांतिदूत.

सभेत भाषण करताना महात्माजी म्हणाले आपण ज्या कार्या-करिता येथे जमलो आहोत ते कार्य पवित्र आहे. आमचा दुपारचा कार्यक्रम फार मोठा होता. मी तुमचा फार वेळ घेणार नाही.

टिळक हे लांब भाषणे करण्याकरिता प्रसिद्ध नव्हते. शूर कृत्याकरिता ते प्रसिद्ध होते. देश त्यांच्यावर वक्तृत्वाकरिता प्रेम करीत नव्हता. जे अलंकारिक दृष्टीने अधिक चांगले वक्तृत्व करीत होते अशा काही त्यांच्या समकालीन लोकांची नावे सांगता येतील. म्हणून मी तुम्हांला लांबलचक भाषण करून येथे जास्त वेळ थांबवून ठेवणार नाही. ज्या विशिष्ट गुणांमुळे ते लोकांचे दैवत बनले अशा काही गुणांकडे मी तुमचे लक्ष वेधणार आहे. जेव्हा राष्ट्र युद्धकाळात आपल्या मुक्ततेकरिता शिकस्तीचे प्रयत्न करीत होते त्या वेळी त्या गुणांची अत्यंत आवश्यकता होती. टिळकांना खरी श्रद्धांजली वाहावयाची असेल तर त्यांच्या गुणांचे अनुकरण करणे व ते गुण आपल्या जीवनांत उतरविणे. देशाने ज्या एका मोठ्या गुणाकरिता लोकमान्यांना धन्यवाद दिले तो गुण निर्भयता हा होता. तो गुण इतका उठून दिसत असे की, काहींनी ते उद्धट आहेत असा दोषारोप केला. त्यांनी नोकरशाहीला कधीच दयामाया दाखविली नाही हे आपल्याला ठाऊक आहे. त्यांनी नोकरशाहीवरील राग चेतविला, आणि त्यांनी इंग्लिश माणसाविरुद्ध द्वेष उठविला, असा त्यांच्यावर आरोप लादण्यात आला. नोकरशाहीवर टीका करताना टिळक जरी हातचे राखून ठेवीत नसत तरी मला हे ठाऊक आहे की, नोकरशाहीतील काही लोक जर स्तुतीला पात्र असले तर ते त्यांची स्तुतीही करीत. मला आठवते की, कलकत्त्याच्या अधिवेशनाच्या वेळी टिळक हिंदी संमेलनाचे अध्यक्ष होते. ते काँग्रेस बैठकीत जोरदार चर्चा करून आले होते. पण संमेलनात त्यांनी आपल्या वेळी विद्वत्तापूर्ण भाषण केले. इंग्लिश विद्वानांनी देशी भाषांची जी सेवा केली त्याबद्दल त्यांनी त्यांची विमुक्त कंठाने स्तुती केली. ते म्हणाले, पुढचे इतिहासकार त्यांची सेवा मंजूर करतील. याचा अर्थ असा नाही की, ते हिंदुस्थानात देशी भाषांवर उपकार करण्याकरिता आले होते; पण टिळक म्हणाले, ज्या अनेक इंग्लिश लोकांनी आपल्या स्वतःच्या भाषा समजण्यास मदत केली त्यांचे ऋण मान्य न करणे हे अन्यायाचे होईल.

ज्या दुसऱ्या मोठ्या गुणाची देशाला आवश्यकता आहे तो म्हणजे टिळकांचा स्वार्थत्याग. देशाच्या सेवेकरिता त्यांनी कधीही अंगचोरपणा केला नाही. त्यांनी सौदेही केले नाहीत. त्यांना स्वार्थत्याग म्हणजे आनंद

वाटे. गांधीजी म्हणाले, मी त्याची उदाहरणे देण्याची जरूरी नाही. कारण माझ्यापेक्षा तुम्हा श्रोत्यांना त्यांच्या त्यागाची अधिक माहिती आहे. त्यांचा तिसरा गुण म्हणजे अत्यंत साधेपणा. टिळकांनी स्वदेशी व्रत सतत पाळले होते. त्यांच्यावेळी जर खादी निघाली असती तर ती त्यांनी आनंदाने वापरली असती. आत्मशृंगाराच्या मागे लागण्याची त्यांना बिलकूल आवड नव्हती. टिळकांच्या स्वदेशी वृत्तीचे अनुकरण तुम्ही करा अशी मी विनंती करतो. पण ते अनुकरण कृपणणाने करू नका. मी असे ऐकतो की ज्या स्त्रियांनी जूनमध्ये अत्यंत आश्चर्यकारक काम केले, त्या आता परदेशी साड्या टाकून द्यावयास का कू करीत आहेत. एका पारशी सभेत एका पारशी भगिनीने पाठविलेले जडजवाहर मी विसरणार नाही. स्वदेशीबद्दल हीच वृत्ती बाळगीत जा, असे मला स्त्रियांना सांगावयाचे आहे. जर ही गोष्ट तुम्हांला कठीण वाटत असेल तर तुम्ही टिळकांचे उदाहरण आठवा. तुमच्या कपड्यांच्या कपाटावर अश्रू गाळण्याची ही वेळ नाही. मला आशा आहे की, मुंबईचे नागरिक ऑगस्टची १ ली तारीख आपले परदेशी कापड टाकून व खादी वापरून संस्मरणीय करतील. नंतर त्यांनी श्रीमती सरोजिनी नायडूंना बोलावयास सांगितले.

'मुंबई क्रॉनिकल', २४-७-१९२१

२११. माझी टिप्पणे

चोर लुटारूंचे भय

खेडा जिल्ह्यात चोर-लुटारूंचे नेहमीच भय असते. हे भय इतर ठिकाणीही कमी-अधिक प्रमाणात असते. स्वतःचे संरक्षण करण्यास समर्थ असणे हाही स्वराज्याचा अर्थ आहे. दुसऱ्यांनी आमचे रक्षण करावे आणि आम्ही स्वराज्य उपभोगावे असे होणे शक्य नाही. स्वतःचे संरक्षण करण्याची शक्ती लोकांत असली पाहिजे. अशी शक्ती दोनपैकी एका मार्गाने येईल. पहिला मार्ग म्हणजे चोर-लुटारूंना त्यांचे काम करू देणे, म्हणजेच संपत्तीची मालकी न ठेवणे. आणि दुसरा त्यांच्याविरुद्ध शक्तीचा वापर करणे. आपले सर्वस्व गमाविण्यास किंवा काहीही मालकीचे न ठेवण्यास सर्वजण तयार नसतात आणि म्हणून लोक चोर लुटारूंना बळजबरीने दहशत घालण्याचे उपाय

शोधीत असतात. काही जण पहारेकरी ठेवतात आणि काही स्वतःच लढतात. राजाचे एक मुख्य कर्तव्य म्हणजे, चोर–लुटारूंपासून आपल्या प्रजेचे रक्षण करणे. जर लोक आपणहून ही कामगिरी स्वतःवर घेतील तरच आपल्याला स्वराज्य उपभोगता येईल. म्हणून ही शक्ती आपण कमावलीच पाहिजे. ते काम कठीण नाही. खेड्यांतील व शहरांतील लोकांनी स्वतःच्या स्वयंसेवकांना शिक्षण द्यावे आणि पहाऱ्याची व्यवस्था करावी. प्रत्येक खेड्यात दिवे असले पाहिजेत. जरी एवढीच गोष्ट केली तरी चोरांपासूनचे भय बरेचसे नाहीसे होईल.

पण याचबरोबर आम्ही अधिक जोमाने सुधारणेचे काम चालू ठेवले पाहिजे. चोरापासून स्वतःचे रक्षण करणे जर महत्त्वाचे असेल, तर त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे काम म्हणजे त्याला त्या धंद्यातून सोडविणे हे होय. चोरी व लुटारूपणा हा एक प्रकारचा नैतिक रोग आहे. रोगाकरिता आपल्याजवळ उपाय असलेच पाहिजेत. चोरांनाही आपण समाजाचे भाग मानले पाहिजे आणि त्यांना सुधारण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. जर आपण चोरांना भेटलो, त्यांना सर्व समजावून सांगितले आणि त्यांना शिकविण्याचा प्रयत्न केला तर त्यांची समजूत पटणार नाही असे समजण्याचे कारण नाही. आपण त्यांच्या बाबतीत सहनशील असले पाहिजे आणि त्यांच्यावर प्रेम केले पाहिजे. ही दोन कामे अंगावर घेणे अत्यंत आवश्यक आहे.

रेल्वेतील चोऱ्या[1]

रेल्वेतील चोऱ्या व लाचलुचपत यासंबंधीच्या तक्रारींना अंतच नाही. जेव्हा सारा देश शुद्धीकरणाच्या आगीतून तावून सुलाखून निघत आहे, अशा वेळी विशेषेकरून या गोष्टी जर खऱ्या असतील तर त्या राष्ट्राला अत्यंत लाजिरवाण्या आहेत. या दुष्कृत्यांशी सरकारचा काहीही संबंध नाही. ती सर्वस्वी आपली जबाबदारी आहे. दुष्काळाच्या वेळी मालगाडीचे डबे जेव्हा गवत पाठविण्यास लागतात, तेव्हाही लाच द्यावीच लागते असेही मी ऐकले आहे. आपल्याला कोणतीही वस्तू रेल्वे पार्सलने पाठविता येते; पण जर ते पार्सल फोडण्यासारखे असेल तर आतील वस्तू निश्चितच पळविल्या जातील. नुकतेच एका मुंबईच्या व्यापाऱ्याला रेल्वेतून एक खादीचे पार्सल आले व त्यातील काही भाग चोरीला गेल्याचे आढळले. जर रेल्वे नोकरांच्या पाहण्यात हे आले तर त्यांनी कृपा करून जनतेकरिता काही आदर बाळगावा. या माझ्या विनंतीचा विचार करावा आणि आपल्या उत्पन्नात भर घालण्याकरिता दुसरे व प्रामाणिक मार्ग शोधावे. रेल्वे नोकरांच्या संघांना माझा असा सल्ला आहे की, त्यांनी आपल्या हक्कांच्या बजावणीवर जितका भर द्यावा, त्यापेक्षा कमी भर आपल्या सभासदांच्या कर्तव्य-बजावणीवर देऊ नये. जर या तक्रारी स्वराज्यातसुद्धा राहणार असतील तर राज्य-

१. हे भाषांतर गांधींच्या सहीने 'यंग इंडिया 'त २८-७-१९२१ रोजी प्रसिद्ध झाले.

कारभाराचा खर्च हा आजच्याइतकाच भारी राहील. जेथे बहुसंख्य निष्ठावान आणि देशभक्त लोक असतील व ज्यांना इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा स्वतःच्या नफ्यासह राष्ट्राचे हित सर्वश्रेष्ठ वाटेल तेथेच स्वराज्य टिकू शकेल. पुष्कळांकडून चालविलेले राज्य म्हणजे स्वराज्य. जेथे हे पुष्कळ अनीतिमान आणि स्वार्थी असतील तेव्हा त्यांच्या राज्यात अराजकच माजेल. दुसरे काहीही होणार नाही. मी या चळवळीत जो आहे तो एवढ्याचकरिता की, हे पुष्कळ लोक मुळात चांगले आणि सच्चे आहेत असे मानतो म्हणून. पण मी असेही मानतो की, ते लोक भित्रे व बेपर्वा असल्यामुळे त्यांना स्वतःच्या उपजत गुणांबद्दल अज्ञान आहे आणि मी असेही मानतो की, जेव्हा एकदा त्यांना चांगुलपणाचे सामर्थ्य पटेल तेव्हा ते चांगुलपणाने वागतील आणि आपल्या प्रयत्नांत यशस्वी होतील.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', २४-७-१९२१

२१२. सांताक्रूज, मुंबई येथे भाषण

जुलै २४, १९२१

बंधुभगिनींनो,

मी आज येथे मोठी आशा बाळगून आलो आहे. काल मला विठ्ठलदासभाईंनी सांगितले की, मुंबईत पैसा जितका जलद गोळा केला तितके जलद परदेशी कापड गोळा केले जात नाही आणि म्हणून जर एखाद्या ठिकाणी चांगली सुरुवात केली तर काम जोराने चालेल आणि लोकही चांगला प्रतिसाद देतील. पैशाच्या बाबतीत माटुंग्याला सुरुवात केली पण परदेशी कापडाच्या बाबतीत आम्ही सांताक्रूजला पुढाकार घेण्याची विनंती करीत आहोत. मी स्वतः हे आमंत्रण मागितले.

आम्ही हाती घेतलेले काम काही तरी नवे आहे असे लोकांना का वाटते ? काँग्रेसने गेल्या सप्टेंबरमध्ये स्वदेशीचा ठराव पास केला. खिलाफत कमिटीने त्याच्याही अगोदर तो मान्य केला. तेव्हापासून मौलाना महमंद अलींच्याबरोबर आम्ही स्वदेशीचा प्रचार करीत आहोत. जेथे जेथे आम्ही गेलो तेथे तेथे आम्ही त्याविषयी बोललो. खिलाफतीचा प्रश्न सोडविण्यात जर आम्हांला यश मिळाले तर आम्हांला स्वराज्य

मिळविण्याकरिता जरूर ती शक्ती प्राप्त होईल. पण ती शक्ती स्वदेशीचा पूर्ण स्वीकार केल्याशिवाय मिळणार नाही.

स्वदेशीला दोन अंगे आहेत : (१) परदेशी कापडावरील बहिष्कार. (२) त्याच्या जागी दुसऱ्या कापडाचे उत्पादन. माझी खात्री आहे की, जर गिरण्यांनीच हे सारे कापड काढले तर हिंदुस्थान स्वराज्य मिळवू शकणार नाही किंवा मिळविल्यावर टिकवू शकणार नाही. हिंदुस्थानात जोपर्यंत घरोघर चरखा फिरत नाही तोपर्यंत आपल्याला स्वराज्य मिळणार नाही.

स्वदेशी, हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि शांतता हे तीन आपल्या चळवळीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. या स्वदेशीचा हिंदू-मुस्लिम व पारशी या सर्वांशी संबंध आहे.

जेव्हा ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थानात व्यापाराकरिता आली, तेव्हा जर आपण स्वदेशी कापड सोडले नसते आणि इंग्लंडमधील चिटांना भुललो नसतो तर आपला पुढील इतिहास निराळा झाला असता. आपण जर स्वदेशीचा पुन्हा स्वीकार केला तरच आपल्याला आता स्वराज्य मिळेल. त्याचप्रमाणे जर आपण हिंदु-मुस्लिम ऐक्य किंवा शांतता टाकून दिली तर आपण तसेच स्वराज्यही गमावू. आपला पिंडच असा आहे की, आपण नेहमी शांततेकडे झुकलेले असतो स्वराज्यानंतर कोणी कोणाला इजा करणार नाही असे नाही, तथापि असे असले तरी स्वराज्य मिळविण्याकरिता व राखण्याकरिता आवश्यक अटी आहेत.

जर दुसरी राष्ट्रे तलवारीच्या जोरावर हिंदुस्थानला जिंकू इच्छित असतील तर ती अगदी माझ्या दृष्टीने निराळी गोष्ट होईल. काही असले तरी हिंदू-मुसलमानांतील कटुत दिवसेंदिवस कमी होत आहे हे नाकबूल करता येत नाही. याचा अर्थ असा की, हे ऐक्य घडविण्याचे काम चालू आहे व त्याकरिता विशेष परिश्रम करण्याची जरूरी नाही. शांततेकरितादेखील नवा प्रयत्न आवश्यक नाही. या दोन्ही गोष्टींत त्यागाची जरूरी नाही. पण स्वदेशीत खासच त्याग लागतो. असंख्य जमातींकडे सारखीच काळजी घेऊन आपल्याला पाहावे लागते. चांभार, सुतार किंवा लोहार यांच्याशिवाय आपले चालणार नाही. प्रत्येक जमातीत असलेली प्रतिनिधिक शक्ती जर आपण वाढविली नाही तर आपल्याला स्वराज्य मिळण्यात यश मिळणार नाही फक्त एका माणसाच्या प्रयत्नाने स्वदेशी आणता येणार नाही. एका माणसाला पैसे देता येतील, पण काँग्रेसचे एक कोटी स्त्री पुरुष सभासद करावयाचे असतील तर त्याकरिता तितकेच स्त्रीपुरुष लागतील. त्याचप्रमाणे सारा देश स्वदेशीमय करावयाचा असेल तर प्रत्येक हिंदी माणसाने स्वतःला स्वदेशीमय केले पाहिजे. या कामाकरिता तीस कोटी लोकांना त्याग करावे लागतील. आपला उद्देश स्पष्टपणे लक्षात घेऊन प्रत्येकाने परदेशी कापडावर बहिष्कार घातला पाहिजे. वर्षापूर्वी ही गोष्ट अशक्य होती, पण आता जर आपण मनात

आणले तर ऑगस्टपर्यंत संपूर्ण बहिष्कार खात्रीने घालू शकू. मी असे म्हटले होते की, परदेशी कापडावरील बहिष्काराची निश्चिती झाल्यावर आपण महिनाभरात स्वराज्य मिळवू शकू. हे म्हणताना माझा उद्देश असा होता की, एवढे काम संपविल्यावर आपण सरकारला निर्वाणीचे पत्र पाठवू शकू. वस्त्र निर्मितीची आपल्यात शक्ती आहे पण श्रद्धा नाही. अन्नासंबंधी जी आपली अवस्था आहे तीच याही बाबतीत आहे. घरात चूल असल्यामुळे अन्नाचा प्रश्न आपल्यापुढे नसतो. त्याचप्रमाणे जर घरात चरखा असेल तर आपण खात्रीने त्यावर काम करू आणि हळूहळू त्या कामाची आपल्याला सवय होईल. चरखा तयार करणे ही गोष्ट इतकी आश्चर्यकारक सोपी गोष्ट आहे की, अगदी सहज तो तयार करता येईल. परदेशी कापडावर बहिष्कार घालण्यासारखी स्थिती आहे, असा माझा विश्वास आहे. चरख्यात जादूची शक्ती आहे, पण ही शक्ती उपयोगात आणण्याकरिता हिंदुस्थानला श्रद्धा हवी आहे. तथापि मला वाटते की, हिंदुस्थानने आता ती श्रद्धा प्राप्त करून घेतली आहे.

हिंदुस्थानला एक रोग जडला आहे. तलम कापडाच्या प्रेमाने लोकांना अद्याप सोडले नाही. ज्या स्त्रिया कठीण व्रते करतात त्या हिंदी स्त्रियांना खादीची साडी जड वाटावी ना! आम्ही तलम कापड टाकू शकत नाही असे जेव्हा स्त्रीपुरुष बोलताना ऐकतो तेव्हा मला त्यांची कीव येते. जर लोक मला असे सांगतील तर मी म्हणेन की, आपल्याला स्वराज्य कधीही मिळणार नाही. असे असतानाही जर कोणी आम्हांला स्वराज्य देऊ केले तर मी त्याचा स्वीकार करणार नाही. मी त्याला विचारीन की, ज्यांना तू स्वराज्य देतो आहेस ते लोक कशा प्रकारचे आहेत हे तुला ठाऊक आहे का? मी म्हणेन की, त्या लोकांना अपचन झाले आहे. आपल्याला क्षय रोग झाला आहे आणि आपल्या गालावर कृत्रिम लाली आली आहे. आपल्या देशातल्या वस्तू आपल्याला आवडत नाहीत आणि बाहेरच्या आवडतात हे किती चमत्कारिक आहे. तुम्ही आज जे मला दिले आहे त्याची किती किंमत आहे! जे तुम्ही सुरक्षित राखून ठेवले आहे ते मला पाहिजे आहे. तुमचा धर्म ओळखा आणि साऱ्या परदेशी कापडावर बहिष्कार घाला. या जगात तुम्हांला काय सुख मिळाले आहे? प्रत्येक गोष्टीत अन्यायाच्या पद्धतीवर आधारलेल्या ह्या सरकारात तुम्ही कसे जगू शकता? आपण स्वदेशी मनोवृत्तीचे झाले पाहिजे. स्वदेशी हे साध्य व साधन दोन्ही आहे. जर तुम्हांला परदेशी वस्तू वापरण्यास पूर्णपणे अयोग्य वाटत असतील तर त्या टाकून द्या. हा अशा प्रकारचा बहिष्कार नाही की जो परिस्थितीत बदल होताच आपल्याला परदेशी वस्तू वापरण्यास सांगेल. कारण जोपर्यंत आपण बहिष्कार चालू ठेवू तोपर्यंत स्वराज्य टिकेल. स्वराज्य मिळाल्यावर आपण कोर्टात जाऊ, कौन्सिलात जाऊ, पण परदेशी कापड वापरण्यास पुन्हा सुरुवात करणार नाही. यापेक्षा निराळा विचार करणे म्हणजे आत्मवंचना आहे. संपूर्ण स्वदेशीच्या या कार्यात देशातील झाडून सर्व कोट्यवधी लोकांनी आचरण केले पाहिजे अशी त्या कामाची मागणी आहे.

संपूर्ण स्वदेशीचा अंगिकार करा. तुमच्या जवळील सर्व परदेशी माल टाकून द्या.

[गुजरातीवरून].
'गुजराती', ३१-७-१९२१

२१३. जाहीर सभेत भाषण, मुंबई[1]

जुलै २६, १९२१

महात्मा गांधी म्हणाले, एक ऑगस्ट जवळ येत आहे व तुम्हांला देशाविषयीचे कर्तव्य त्या तारखेपूर्वी केले पाहिजे. तुमच्या कर्तव्याची साक्ष तुमची शरीरेच देतील. तुमचे कर्तव्य व त्याग यांची चिन्हे तुमच्या शरीरावरच आहेत. तू तुझे कर्तव्य केले आहेस किंवा नाही हे विचारण्याची जरूरीच पडणार नाही. कारण त्याची चिन्हे कोणालाही दिसू शकतील. काही जणांना वाटते की, जो एक कोटीचा निधी जमविला आहे त्यात पैसे देऊन आम्ही आमचे कर्तव्य केले आहे. त्यांनी तसा विचार करू नये. तो पैसा टिळक स्वराज्यफंडाकरिता होता आणि जोपर्यंत तुम्ही स्वराज्य मिळविले नाही तोपर्यंत तुम्ही त्या महान पुरुषासंबंधी आपले कर्तव्य केले आहे असे म्हणता येणार नाही. पैसे जमविणे हे कार्य पुरेसे नव्हते; आपल्याला स्वराज्य मिळवावयाचे आहे. जेव्हा हा देश स्वदेशीमय होईल तेव्हा आपल्याला स्वराज्य मिळाले असे म्हणता येईल. माझे म्हणणे असे नाही की, ज्या दिवशी आपण स्वदेशीमय होऊ त्याच दिवशी आपल्याला स्वराज्य मिळेल. आपण संपूर्ण स्वदेशीमय झाल्यानंतर स्वराज्य मिळण्याकरिता मी एक महिन्याची मुदत मागितली आहे. स्वदेशीचा स्वीकार केल्यावर आपण स्वराज्याच्या पायाचा दगड बसवू, आणि एक महिन्याने आपल्याला स्वराज्य मिळेल.

साऱ्या हिंदुस्थानात वीस लाख चरखे पाहिजे आहेत हे खरे, पण लाला लजपतराय यांनी मला असे खात्रीपूर्वक सांगितले आहे की, एकटया

१. ही सभा गिरगाव कॉंग्रेस कमिटीतर्फे मारवाडी विद्यालयात भरली होती. सरोजिनी नायडू व महंमद अली हेही बोलले.

पंजाबात चाळीस लाख चरखे आहेत. प्रत्येक घरात जितक्या स्त्रिया तितके चरखे तेथे आहेत आणि पंजाबी स्त्रीला विचारले, तुला कातता येते का, तर ती तो आपला अपमान समजते. स्त्रियांना कातणे आवडते; पण पुरुषांनी मँचेस्टरची धोतरे वापरून ह्या देशात कताई थांबविली आहे. आता आपण स्वदेशीचा स्वीकार करीत असल्यामुळे साऱ्या देशात चरखा लोकप्रिय झाला आहे. ह्या देशात भरपूर कापूस व कातणारी माणसेही भरपूर आहेत. जर कोणत्या गोष्टीची उणीव असेल तर ह्या सर्व गोष्टींचा उपयोग करण्याची त्यांची अनिच्छा. ज्याप्रमाणे स्वराज्य मिळविण्याकरिता हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन किंवा ज्यू यांनी एक राष्ट्रबनण्याकरिता ऐक्याची इच्छा प्रकट केली त्याचप्रमाणे स्वराज्य जिंकण्याकरिता संपूर्ण स्वदेशीचा स्वीकार करणे आवश्यक आहे. हिंदुस्थानात कातलेल्या सुताचेच फक्त स्वदेशी कापड बनविता येईल. त्या कापडात परदेशी सुताचा मागमूसही असता कामा नये. परदेशी सुताच्या साड्या टाकून दिल्या पाहिजेत. काही स्त्री पुरुषांना आपले सारे कपडे एकदम टाकून देणे आवडत नाही. त्यांना काही शिल्लक ठेवावयाचे आहे. पण अशामुळे ते स्वराज्याला लायक होणार नाहीत. परदेशी कापड विकत घेऊन तुम्ही आपला पैसा वाया दवडला आहे. तुम्ही आपल्या असंख्य देशबांधवांची उपासमार केली आहे. असे डागाळलेले कपडे तुम्ही एकदम फेकून दिले पाहिजेत. पांढरी शुभ्रखादी एक ऑगस्टलाच अंगावर घेऊन भागणार नाही, ती वापरली पाहिजे.

'मुंबई क्रॉनिकल', २७-७-१९२१

२१४. स्वदेशीवर भाषण, मुंबई[1]

जुलै २६, १९२१

महात्माजी स्वदेशीवर आणि ताबडतोब खादी वापरण्याच्या गरजेवर बोलले. ते म्हणाले, नजीकच्या भविष्यकाळात स्वराज्य प्राप्तीकरिता जो

१. ही सभा भायखळा जिल्हा काँग्रेस कमिटीमार्फत भायखळ्याला भरली होती.

कार्यक्रम आपल्याला करावयाचा आहे तो खादीच्यामार्फत. ही वेळ शांत बसण्याची नाही. ह्या वेळी आपण सर्वजण जागे असलो पाहिजे आणि परक्या लोकांच्या हातात गेलेला हा देश वाचविला पाहिजे. दर वर्षी सुमारे साठ कोटी रुपये आपल्या देशातून नेले जातात.

आपल्या देशबांधवांच्या हिताकरिता त्यातील किती पैसा खर्च होतो ? जर आपण दोन आण्यांचे कापड विकत घेतले तर त्यातील सात पैसे परक्या व्यापाऱ्यांच्या खिशांत जातात आणि जर आपण दोन आण्यांची खादी विकत घेतली तर पैसा दोन पैसे हिंदी व्यापाऱ्यांच्या खिशात जातात आणि उरलेले पैसे आपल्या कामगारांना मिळतात. अशा स्थितीत तुम्ही सर्वांनी एक ऑगस्टला सर्व परदेशी कपडे जाळून टाकण्यास तयार असले पाहिजे. ते कपडे पापांनी भरले आहेत, असे मी पुन्हा एकदा सांगतो. ज्या ठिकाणी आपल्या महान नेत्याचे, लोकमान्य टिळकांचे दहन झाले, त्या पवित्र जागी ते परदेशी कपडे जाळून टाकून आपण पापमुक्त होऊ या. जर कोणाची ते कपडे जाळण्याची तयारी नसेल तर त्यांनी ते स्मर्नाला पाठवून द्यावेत. जर तुम्ही हे काम यशस्वी केले नाहीत तर तुम्ही आपल्या परलोकवासी पुढाऱ्यासंबंधी कर्तव्य बजावले नाहीत, असा त्याचा अर्थ होईल. या देशासंबंधी आपले पवित्र कर्तव्य करण्यास एक ऑगस्टला चौपाटीवर तुम्हांला पाहण्याची माझी इच्छा आहे.

ह्यासंबंधी भायखळ्याच्या सुतारबंधूंना थोडासा सल्ला देण्यास मी विसरणार नाही. मी तुमची फक्त थैली घेण्यासच येथे आलो नाही, पण तुमच्या तोंडावर हे सांगण्यास आलो आहे की, तुमच्या कर्तव्यातील स्वदेशीचे यश हा एक भाग आहे. प्रत्येक हिंदी घर सुशोभित करण्याकरिता शक्य तितके पुष्कळ सुंदर व स्वस्त चरखे बनविणे हे तुमचे काम आहे. माझे सुतार बंधू मोहक कपाटे व इतर लाकडी वस्तू बनविण्यात कुशल आहेत हे मला ठाऊक आहे. पण अशा वस्तू बनविण्यात त्यांनी आपला वेळ व्यर्थ घालवू नये. तुम्ही हजारो चरखे बनवा. तेच चरखे स्वराज्याच्या पायऱ्या आहेत. तुम्हीं एकजूट करा आणि उद्यापासून चरखे बनविण्यास सुरुवात करा. माझा सल्ला तुम्ही ऐकाल अशी आशा आहे.

'मुंबई क्रॉनिकल', २८-७-१९२१

२१५. हकीम अजमलखान यांना तार

[जुलै २८, १९२१ पूर्वी[1]]

हकीम अजमलखान,
दिल्ली.

अत्यंत दुःख झाले. ऑल इंडिया कमिटी २८ तारखेला मुंबईला आहे. एक ऑगस्टनंतर अलिगडला येऊ शकेन. परदेशी कापडाचा बहिष्कार संघटित करीत आहे. जर तुम्हांला मी या महिन्यात अलिगडला पाहिजे असेल तर बहिष्काराला पायबंद पडेल. उत्तर पाठवा.

फोटोस्टॅटवरून एस्. एन्. ७५७३

२१६. टिप्पणे

पांढरी टोपी

ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या एका नोकराने खादी टोपी वापरण्याचा उद्धटपणा केला म्हणून त्याला नोकरीवरून काढून टाकले. मेसर्स शॉ वॉलेस आणि कंपनीने या मोहिमेला सुरुवात केली आहे. तो एक अपमान आहे आणि त्याच्या भयंकर परिणामाची कल्पना त्याना अद्याप आकलन झाली नाही. आपण इतके खाली नमलो आहोत की, आपल्याला वळणच दिसत नाही. तथापि असले अपमान जाणून बुजून किंवा रागाच्या भरात लगावलेल्या ठोशापेक्षा अधिक अपमानकारक आहेत. सरपटणे

१: ही तार २८-७-१९२१ रोजी मुंबईस भरलेल्या अ. भा. काँ. क. पूर्वी पाठविली होती, हे उघड आहे.

आणि नाक घासणे हे फटके[१] मारण्यापेक्षा शरीरदृष्ट्या कमी दुःखदायक होते आणि तरी सरपटण्याने आणि नाक घासण्याने फटक्यापेक्षा हिंदुस्थानचा अधिक अपमान केला आहे यात दुमत नाही. सलाम करण्यात काय आहे ? आणि तरीही एक राजा बरोबर कोन करून सलाम करण्याचे विसरला आणि विशिष्ट शिष्टाचाराप्रमाणे व्हाइसरॉयच्या समोरून मागे गेला नाही, म्हणून त्याची गादी[२] जवळ जवळ जात होती. आपले राज्य टिकविण्याकरिता उर्मटपणाने त्यांना हा सलाम जुलमाने हवा होता. त्याचप्रमाणे या दोन कंपन्यांनी आपल्या गरीब नोकरांना बडतर्फ केले आहे. आपला राष्ट्रीय पोषाख किंवा त्यांच्या निष्ठेची निशाणी धारण करण्याचे धैर्य त्यांनी दाखविले, म्हणून त्यांना ही शिक्षा झाली. आपल्या नोकरांनी असे धैर्य दाखविणे त्या गर्विष्ठ कंपन्यांना सहन झाले नाही. ज्या क्षणी हिंदुस्थानातील पुरुषांना आपल्या पौरुषाची आणि स्त्रियांना आपल्या स्त्रीत्वाची जाणीव होईल त्याच क्षणी हिंदुस्थान स्वतंत्र होईल. जगातील कोणतीही सत्ता त्यांच्यापासून त्यांचे स्वातंत्र्य दूर ठेवू शकणार नाही. म्हणून या दोन बडतर्फीत फार खोल अर्थ भरलेला आहे हे आपल्याला समजले पाहिजे. या दोन कंपन्यांतील नोकरांनी दाखविलेल्या बुळेपणाबद्दल माझी दुःखद निराशा झाली, हे मला कबूल केले पाहिजे. त्यांनी निदान सामान्य मजुराइतके तरी धैर्य दाखवावयास पाहिजे होते. एखाद्या दुखापत झालेल्या सहकाऱ्याबद्दल सर्वत्र संप झाल्याची उदाहरणे हिंदुस्थान दाखवू शकेल. या कंपन्यांतील नोकरांना आपल्या सहकाऱ्यांबद्दल काहीच वाटत नाही का ? साऱ्या हिंदुस्थानशी आपले नाते आहे असे ते म्हणू शकतील का ? ह्या दोन शूर तरुण माणसांना जशी वागणूक मिळाली तशी वागणूक त्यांच्या जर सख्ख्या भावांना मिळाली असती तर त्यांनी काय केले असते ! आपल्या चुकांची भरपाई करण्यास अजूनही फारसा उशीर झालेला नाही. त्यांचा निषेध म्हणून अद्यापही पांढऱ्या खादी टोप्या वापरता येतील आणि कारकून बंधूंना पुन्हा त्यांच्या कचेऱ्यांत नोकरीवर ठेवा अशी मागणी करता येईल.

ह्या दोन मोठ्या कंपन्यांच्या व्यवस्थापकांना मी इषाराही देऊ इच्छितो. असहकारितावादी वर्णभेदाच्या पलीकडे गेले आहेत. ते एका दुष्ट पद्धतीविरुद्ध सर्व शक्तीनिशी लढत आहेत. इंग्लिश व्यक्तीशी त्यांचे भांडण नाही. पण जर इंग्लिश लोक ह्या दोन कंपन्यांच्या मॅनेजर्सप्रमाणे बाजू घेऊ लागले तर वर्णीय उद्रेक टाळणे कठीण होईल. जर युरोपियन व्यापारी हा प्रश्न अत्यंत तातडीचा आहे असे मानणार नाहीत आणि सदर

१. एप्रिल १९१९ मध्ये पंजाबात लष्करी कायद्याच्या दिवसात सरकारी अत्याचारांना उद्देशून हे आहे.

२. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी १९११ साली बादशाहांच्या दरबारात जे वर्तन केले, त्याचा हा संबंध आहे.

कंपन्यांनी केलेली भयंकर चूक दुरुस्त करण्यास त्यांना भाग पाडणार नाहीत तर युरोपियन कंपन्यांवर बहिष्कार पडण्याचा धोका आहे.

माफीकरिता धडपड

जवाहरलाल नेहरू, जोसेफ आणि रंगा अय्यर यांच्यात व संयुक्त प्रांत सरकार यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहार जो इंडिपेंडंट या पत्राने प्रसिद्ध केला आहे त्यावरून असे सिद्ध होते की, व्हाइसरॉयची मी घेतलेली भेट आणि अलीबंधूंना त्यांच्या काही भाषणांबद्दल माफी मागण्याबद्दलचा माझा सल्ला ही गोष्ट राजकीय दृष्ट्या घोडचूक होती. मौलाना अबदुल बारी यांनी म्हटल्याप्रमाणे माझी भेट आणि माफी यामुळे झालेला अपाय हा उघड दिसत असला तरी त्यामुळे होऊ शकणारा फायदा हा इतका सूक्ष्म आहे की, तो लोकांच्या नजरेस येत नाही; ही गोष्ट अधिकाधिक स्वच्छ होत चालली आहे. सुदैवाने मी राजकारणी नाही. संयुक्तप्रांताच्या सरकारने अलीबंधूंच्या माफीचा अश्रेयस्कर वापर जवाहरलाल नेहरू आणि त्यांचे मित्र यांना सापळ्यात पकडण्याकरिता जो चालविला आहे त्याच्यामागे काही चांगले दडलेले आहे असे मला दिसत आहे. सरकारने बंधूंच्या माफीतील शब्दप्रयोगसुद्धा जसेच्या तसे उचलले आहेत. चुकीच्या जागी एखादी वस्तू ठेवणे ह्याला सर्वत्र व योग्य रीतीने घाण असे म्हणतात. त्याच नेमक्या पद्धतीने मी अलीबंधूंची माफी हा योग्य जागी झालेला सन्मान्य व्यवहार असा मानीत असलो तरी संयुक्त प्रांताच्या सरकारला ‘ जी ’ माफी हवी होती, ती अयोग्य जागी झाली असती म्हणून तो मानहानिकारक व्यवहार झाला असता, पण त्या सरकारची गाठ चांगल्या कणखर माणसाशी पडली. ते खोट्या उदाहरणांनी फसणार नव्हते, किंवा तुरुंगवासाच्या धमकावण्यांनी भिणारे नव्हते. म्हणून सरकारपुढे आपली नालायकी व असहिष्णुता आणखी दाखविण्याचा एक मार्ग होता. तो म्हणजे या ‘ तीन ’ सार्वजनिक कार्यकर्त्यांच्यावर खटले भरणे. ते खटले त्यांच्या अशा भाषणाकरिता व लेखाकरिता भरले की, ज्यांची विस्मृती स्वतः त्यांना व जनतेला पूर्वीच झाली होती. जर त्यांनी “ गुन्हेगारां ”वर खटले भरले तर ते स्वतः अशांततेचे मूळ कारण काय आहे याचा परामर्श घेण्यास असमर्थ आहेत असे ठरेल आणि ते सरकार सद्धेतूने केलेली विरोधी टीका सहन करू शकत नाही असे सिद्ध होईल. गाढवाला गाढव म्हणणे हे गाढवाला कठोर वाटेल; पण हे साधे सत्यच इतर नामाभिधानापेक्षा मर्मस्थळी जाऊन पोहोचू शकेल. जे सरकार कठोर कृत्ये करते त्याचे गोड शब्दांनी सत्य वर्णन करता येणे शक्य नाही, म्हणून पत्रव्यवहाराचे प्रसिद्धीकरण हे स्वराज्याच्या कार्याला अत्यंत उपयुक्त ठरले आहे. त्या प्रकाशाने हवा स्वच्छ झाली आहे आणि ते प्रकाशन हे तीन मित्र ज्या परिस्थितीत सापडले तर त्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. खटल्यातून स्वतंत्रता विकत घेण्याकरिता असहकारितावादी क्षमा मागणार नाहीत किंवा हमी देणार नाहीत. त्याचबरोबर जेव्हा त्याचे लक्ष त्यांनी म्हटलेल्या एखाद्या अशा गोष्टींकडे

वळविले जाईल की, ज्यामुळे अत्याचाराला प्रोत्साहन मिळू शकेल, अशा वेळी त्याने आपली चूक दुरुस्त केली पाहिजे व आपल्या निष्ठेला प्रामाणिक राहिले पाहिजे. जर सरकारला असहकारितावाद्यांशी प्रामाणिकपणे वागावयाचे असेल आणि असहकारिता जरी अनत्याचारी आहे व राहिली तरी सरकारला ती आवडत नसल्यामुळे त्यांना जर तुरुंगात टाकावयाचे असेल तर त्यांच्यावर १२४ अ कलमाप्रमाणे खटला भरला पाहिजे. आपणही गुन्हा कबूल केला पाहिजे. कारण राज्यपद्धतीविरुद्ध अप्रीती वाढविणे व बाळगणे हा आपला धर्म आहे. आपण ही पद्धत नष्ट करण्याकरिता बाहेर पडलो आहोत आणि तो त्या कलमाप्रमाणे राजद्रोह होतो असे मला सांगण्यात आले आहे. जर विद्यमान पद्धतीचा नाश घडवून आणण्याला कायद्यांत अनुज्ञा असेल तर प्रत्येक असहकारितावादी हा 'प्रतिज्ञाबद्ध' राजनिष्ठ आहे.

वृत्तपत्रव्यवसायाचा दुरुपयोग

डिचर याने काही अभिप्राय व्यक्त केले व त्यांत ज्याचा उल्लेख केला त्याबद्दल **कॅपिटल** पत्राने गणेश दामोदर सावरकर यांची माफी मागितली. डिचर याच्या अभिप्रायांत जे आरोप अंतर्भूत होते, ते इतके भयंकर होते की, त्यामुळे ते बंधू एका भयंकर संकटात सापडले. एखाद्या जबाबदार वृत्तपत्राच्या संपादकाला जेव्हा आव्हान दिले जाते तेव्हा तो एखाद्या अफवेला मी फक्त वाचा फोडली अशा गोष्टीखाली स्वतःला दडवून आपली सुटका करून घेऊ शकेल का ? एखाद्या अफवेच्या आधारावर ते विस्तृत युक्तिवाद करू शकतील का ? त्या अफवेच्या वर्णनात इतका विपुल तपशील दिला आहे की, ते सत्यकथनच वाटते. उदाहरणार्थ, मी राजाच्या विरुद्ध वाटेल ते आरोप, त्या आरोपांच्या सुरुवातीला ते सर्व अफवेवर आधारलेले आहेत असे म्हणून लादू शकेन का ? अशा प्रकारचे आरोप केल्यानंतर मी बादशहांची अब्रू-नुकसान करणारे अघळपघळ निष्कर्ष काढू शकेन का ? मी हे प्रकरण इतक्या ढळ-ढळीतपणे मांडले आहे की, त्यामुळे मी असभ्य वर्तन केल्याचा गुन्हा केला असे निदर्शनास आणावे. साम्राज्यातील पहिल्या सद्गृहस्थाची अब्रू लांछित करण्याचा हा भेकडपणे प्रयत्न केल्यामुळे मला त्या वर्तनाबद्दल सभ्य समाजातून ताबडतोब हाकलून लावण्यात येईल. जेव्हा अशा घातुक हल्ल्याच्या विषयभूत व्यक्ती दोन सुसंस्कृत व शूर हिंदी असतात, आणि ते आरोप लादणारा गृहस्थ एक युरोपियन पत्रकार आहे म्हणून हे प्रकरण निराळे होऊ शकेल काय ? श्रीयुत गणेश सावरकर यांनी आपल्या अब्रूवर उडविलेल्या घाणेरड्या आरोपाविरुद्ध खटला भरण्याचा आपला हक्क अत्यंत औदार्याने सोडला म्हणून त्यांची योग्यता त्यांच्या देशबांधवांच्या दृष्टीने फार उंचावली आहे. नुसती माफी मागून आणि तीही अर्धवटपणे मागून वृत्तपत्रीय प्रतिष्ठा राखली गेली आहे काय ? सावरकरांच्या सॉलिसिटर्सना जे उत्तर पाठविले आहे त्याची सुरुवात वर्तनाबद्दल क्षमायाचनेने केली आहे. पण ते वर्तन सर्वस्वी क्षमा करण्यालायक नाही.

ज्या वृत्तपत्राला न्यायाची यत्किंचित चाड असेल ते वृत्तपत्र अफवांचा प्रचार करणार नाही. तसा प्रचार करण्यापूर्वी संपादक त्या अफवांना चाळणी लावील व त्या सत्यावर आधारलेल्या आहेत की नाहीत याची खात्री करून घेईल. इंग्लिश व हिंदी वृत्तपत्रांनी ह्या गोष्टीची गंभीर दखल घ्यावी आणि कॅपिटलच्या संपादकाने हे पुरे समजावे की, त्याने सन्मान्य वृत्तपत्रकार होण्याला स्वतःला अपात्र ठरविण्याचा गुन्हा आपल्या वर्तनाने केला आहे.

होळी का ?

परदेशी कापड जाळण्याविषयी माझ्यावर टीकाकारांनी धमक्यांचा भडिमार केला आहे. त्याविरुद्ध केलेल्या प्रत्येक युक्तिवादाचा विचार केल्यानंतर मला असे म्हटल्याशिवाय राहवत नाही की, परदेशी कापडाच्या बाबतीत नाश हाच सर्वोत्तम उपाय आहे. प्रांतिक काँग्रेस कमिटीने हे कपडे आणून देणाऱ्यांना विकल्प सुचविला आहे. त्यांनी नाश आणि स्मर्ना किंवा अन्यत्र रवाना करणे यांपैकी काही पसंत करावे. जर नाश हाच एक मार्ग परदेशी कापडाच्या बाबतीत सांगितला असता तर त्याला जे महत्त्व आले असते ते आता या प्रश्नाच्या चर्चेत उरलेले नाही. परदेशी कापड टाकून देण्याच्या आवश्यकतेबद्दल तुमची जितकी तीव्र भावना असेल त्यावर नाशाची योग्यायोग्यता अवलंबून आहे. ज्याप्रमाणे दारूमुक्त मनुष्य आपल्या दारूच्या बाटल्या गरजू शेजाऱ्याला देणार नाही त्याचप्रमाणे स्वदेशीभक्ताच्या भावना जर त्याच दारूमुक्ताइतक्या तीव्र असतील तर तो आपल्या कपाटातील परदेशी कपडे गरीबाला देण्याचे नाकारील. मद्यपान हे जितके वाईट आहे जवळजवळ तितकेच परदेशी कापड वापरणे वाईट आहे असे मी मानतो. काही बाबतींत मद्यपानापेक्षाही वाईट आहे की काय याबद्दल माझी खात्री नाही. गेली १५० वर्षे हिंदुस्थान आपला मोठा जो झोपडीतील उद्योग सूतकताई त्याला मारून परदेशी कापड आयात करीत आहे. रमेशचंद्र दत्त[1] यांनी हिंदुस्थानातील कताई व विणाईचा धंदा बुद्धिपुरस्सर व योजनापूर्वक कसा नष्ट केला हे आपल्या इतिहासाच्या अभ्यासात दाखविले आहे. जो बिहार हिंदुस्थानात एक अत्यंत श्रीमंत प्रांत होता, त्या बिहारचा कताई व विणाईचा भरभराटीस आलेला धंदा पद्धतशीर व निष्ठुरपणे नष्ट करून त्याला दरिद्री करण्यात आले. जर आपल्याला ईस्ट इंडिया कंपनीने आपली किती प्रचंड हानी केली हे पटले आणि कंपनीच्या गुमास्त्यांनी केलेल्या छळामुळे आपण शरणागतीचे जे पाप केले हे कळून चुकले, किंवा आपल्याला मोहाच्या जाळ्यात पाडले याची जाणीव झाली तर आपण शरमेने माना खाली घालू. जर आपण स्वदेशीचे रक्षण करू शकलो असतो

१. १८४८-१९०९; आय् सी. एस्. दि इकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया 'सिन्स दि ॲडव्हेंट ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' या पुस्तकाचे लेखक; १८९९ साली लखनौ काँग्रेसचे अध्यक्ष.

तर आपला प्रचंड राष्ट्रीय धंदा नष्ट झाला नसता, आपल्या बायकांना सार्वजनिक रस्त्यांवर मजुरी करणे भाग पडले नसते आणि आपल्यातील कोट्यवधी लोकांना वर्षातील काही दिवस सक्तीच्या आळसात घालवावे लागले नसते. माझ्या नम्र मताने जे कापड अशा काळ्याकुट्ट स्मृती जागृत करते आणि जे आपल्या शरमेचे व अधःपाताचे चिन्ह आहे ते जाळून टाकण्यालायकच आहे. ते गरिबांना खासच देता येणार नाही. जे आपल्याला गुलामगिरीचे लक्षण म्हणून वाटते, ते त्यांना देऊन आपण त्यांची सेवा करीत आहोत असे वाटण्यापेक्षा त्यांच्या भावना आणि त्यांची राष्ट्रीय संस्कृती याबद्दल आपल्याला अधिक आदर वाटला पाहिजे. हिंदुस्थानातील गरीब लोकांना स्वदेशाभिमानाची जाणीव नसावी काय ? ज्याप्रमाणे आपल्याला प्रतिष्ठा आणि स्वाभिमान यांच्या भावना आहेत, त्याप्रमाणे त्या त्यांनाही नसाव्यात काय ? जसे आपण त्यांना नासके अन्न किंवा जे अन्न आपण खाणार नाही ते देताना आपण विव्हल होऊ किंवा झाले पाहिजे त्याचप्रमाणे त्यांना परदेशी कापड देताना आपल्याला वाटले पाहिजे. क्षणभर विचार केला तर असे दिसेल की, जे सुंदर कापड आपण टाकून देणार आहोत ते गरिबाला अगदी निरुपयोगी आहे. घाणेरड्या हॅटस आणि घामाची घाण येणाऱ्या टोप्या यांचा त्यांना काय उपयोग आहे ? किंवा भारी किंमतीच्या रेशमी साड्या आणि अत्यंत तलम मलमल जी आपण टाकून देणार आहोत त्यांचा त्यांना काय उपयोग ? ज्या विणकरांचे या वस्तूंवर प्रेम होते त्यांच्याशिवाय त्यांना किंमत नाही. दुष्काळग्रस्तांना ते कपडे अंगावर घालता येणार नाहीत. त्यांना ज्या खरोखर उपयुक्त वस्तू असतील अशा वस्तू फारच थोड्या. टाकून दिलेल्या कपड्यांच्या उपयुक्ततेवर मला माझ्या विध्वंसनाचे विचार मांडावयाचे नाहीत. आपल्यात जे उदात्त आहे आणि ज्याची आपल्याला वाढ करता येईल अशाच भावनेवर माझे म्हणणे आधारलेले असल्यामुळे ते माझे म्हणणे अधिक खोलवर जाते. इंग्लिश माणसाला फाटक्या निशाणाचा केलेला अपमान क्रुद्ध का करतो ? पण तो रागावतो आणि त्याला आपण रागावले पाहिजे असे योग्य रीतीने वाटते. माझी श्रद्धा क्षणभर लपवून ठेवून लक्षावधी रुपये मिळविण्यास काय हरकत आहे ? पण मी जगाच्या राज्याकरताही असे कदाचित करणार नाही. नेमक्या तशाच कारणाकरिता आपण हिंदुस्थानातील गरिबांना परदेशी कापड देऊ नये. अशा प्रकारे टाकून दिलेले कापड स्मर्ना किंवा बाहेरील अन्य देशांत पाठविणे हेसुद्धा त्यागाच्या कृतीची सोय करण्यासारखे आहे. पण बाहेर देशी पाठविण्याला जी नैतिक हरकत आहे ती ते कापड वापरण्याइतकी खास बलवत्तर नाही.

परदेशी सूत

स्वदेशीच्या व्याख्येतून परदेशी सूत वगळल्याबद्दल इंडियन सोशल रिफॉर्मरने हरकत घेतली आहे. कोठे तरी काही तरी अपाय केल्याशिवाय आणि नाश केल्याशिवाय मागे पाऊल घेणे, सुधारणा करणे किंवा शुद्धीकरण करणे हे अशक्य आहे. जर

आपण परदेशी सूत विणले नाही तर आपण आळसात बसू असे विणकरांना वाटत नाही. त्यांना प्रयासाशिवाय गिरणीचे सूत विणता येईल व त्यावर आपले कलाकौशल्य दाखविता येईल. मात्र त्याकरिता आपण काही काळ कमी सुबकपणावर संतुष्ट असले पाहिजे. जेव्हा हिंदी बाजारपेठेत परदेशी कापड आणि परदेशी सूत मिळणार नाही तेव्हा हिंदुस्थानला पूर्वीच्यासारखी सुबक वस्त्रे तयार करण्याकरता आपली शक्ती कमी पडेल असे मला वाटत नाही. खरी कला मेली आहे आणि कलेच्या नावाखाली बनावट वस्तू श्रीमंतांच्या घरात जाऊन बसल्या आहेत. कारण खऱ्या कलेला आश्रय-दाताच उरला नाही. मी अशा एका वेळेची वाट पाहात आहे की, जेव्हा नेहमीची परिस्थिती निर्माण होताच आपल्यातील श्रीमंत लोक खास कातणाऱ्या आणि विणकरांच्या-करिता आपल्या कारखान्यांना लागून घरे बांधतील. त्या कातणाऱ्यांचा आणि विणकरांचा एकच उद्योग असेल,—आणि तो म्हणजे आपल्या मालकाकरिता कलापूर्ण कापड निर्माण करणे.

निरोधक म्हणून स्त्रिया

एक पारशी भगिनी लिहिते की, जेव्हा मुंबईत निरोधन करण्यास सांगितले जाईल तेव्हा जे मंडळ उभारले जाईल त्यात सामील होण्यास मी तयार आहे. आणि पुष्कळ भगिनी त्याकरिता पुढे येतील असे तिला वाटते. जर स्त्रिया फार मोठ्या संख्येने पुढे आल्या तर त्यांची उपस्थिती अत्याचाराला परिणामकारक पायबंद घालील असे तिला वाटते. मी ह्या म्हणण्याशी पूर्णपणे सहमत आहे. मला आशा आहे की, आणखी पुष्कळ भगिनी आपली नावे उमेदवार म्हणून मुंबईच्या कमिटीकडे पाठवितील.

थडगी भ्रष्ट करणे

आग्र्याचे माझे एक मित्र, मि. डेव्हिड हे वृत्तपत्रांना पाठविलेल्या पत्राकडे माझे लक्ष वेधतात. त्या पत्रात त्यांनी अजमीरच्या हिंदी प्रेस्बिटीरीयन दफनभूमीत जी खिश्चन थडगी भ्रष्ट केली जात आहेत त्यासंबंधी लिहिले आहे. माझ्या नजरेतून हे पत्र सुटले याबद्दल मला खेद होतो. धर्मवेडेपणा आणि धर्मांधता यामुळे हिंदी राष्ट्राच्या सुसंबद्ध वाढीस अडथळा येईल आणि त्या गोष्टी ऐक्याच्या वृद्धीला मारक आहेत हे मि. डेव्हिड यांचे म्हणणे बरोबर आहे. मी नेहमी म्हणत आलो आहे की, हिंदू-मुस्लिम ऐक्य याचा अर्थ जात, धर्म किंवा वर्ण यांचा विचार न करता जे हिंदुस्थानला आपला मायदेश समजतात त्या सर्वांचे ऐक्य. थडग्यांचा उच्छेद करणे हा एक भ्याडपणाचा गुन्हा आहे. युद्धाच्या नियमांतसुद्धा थडग्यांचे पावित्र्य राखले जाते. थडगी दुष्टपणे भ्रष्ट करण्यात जो आनंद मानतो तो पापी वृत्तीचा असला पाहिजे. सध्याच्या वेळी राष्ट्र सर्व विसंवादी वृत्तीच्या लोकांत सुसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असताना सदर गुन्हा हा अधिकच दुष्टपणाचा ठरतो. आमच्या या लढ्यात सहानु-

भूती दाखविणारे पुष्कळ ख्रिश्चन लोक आहेत. मि. अँन्ड्र्यूज हे कट्टर ख्रिश्चन आहेत, आणि हिंदुस्थानात त्यांच्यासारखा अधिक सच्चा कार्यकर्ता नाही. म्हणूनच त्यांना यथार्थतेने दीनबंधू म्हणतात. अजमीरची काँग्रेस कमिटी या बाबतीत लक्ष घालील आणि आपल्या ख्रिस्ती बांधवांना सर्व प्रकारे मदत करील अशी मी आशा बाळगतो.

'यंग इंडिया', २८-७-१९२१

२१७. उदात्त पश्चात्ताप व त्यापासून धडा

> मला आताच मि. याकूब हसन यांचे पुढील कारुण्यपूर्ण पत्र आले आहे : दुर्बलावस्थेत मी एक भयंकर अविचार केला असे मला आता कळून आले. माझ्या मूर्खपणाचा अर्थ मला समजल्यापासून माझ्या अंतःकरणात तीव्र वेदना होत आहेत आणि मला वेड लागण्याची पाळी आली आहे. ह्या चळवळीचे प्रमुख म्हणून मी तुमची क्षमा मागितली पाहिजे आणि ती क्षमा मी अत्यंत नम्रतापूर्वक मागतो. माझे वाटाडे आणि पुढारी म्हणून मला वाटेल तेवढे रागे भरा व शिक्षा करा, पण कृपा करून माझ्या पातकाबद्दल क्षमा करा. ईश्वराने मला क्षमा करावी म्हणून मी वाटेल ती तपश्चर्या करावयास तयार आहे. ह्यापूर्वी माझ्या शक्तीप्रमाणे ज्या पवित्र कार्याकरिता मी प्रामाणिकपणे व कळकळीने झटलो, त्या कार्याची माझ्या कृतीमुळे हानी झाली असेल तर ती दूर करण्याकरिता मी प्रायश्चित्त घेईन.

ह्या पत्राभोवती प्रामाणिकपणाचे जे वलय आहे, त्यामुळे सारी टीका व्यर्थ ठरणार आहे. मी याकूब हसनला कळविले आहे की, क्षमा करण्याची शक्ती माझ्यात नाही. संकट आले असता याकूब हसनइतका मी दुर्बल ठरेन की नाही हे कोणाला ठाऊक ! ईश्वरच क्षमा करू शकतो; कारण तोच आपल्याला पुरेपूर ओळखतो. निरनिराळ्या देशांत आणि निरनिराळ्या लोकांना प्रकट झालेल्या ईश्वराच्या शब्दद्वारा त्याचे आपल्याला असे अभिवचन आहे की, जेव्हा मनुष्य ईश्वरापुढे आपली दुर्बलता शुद्ध आणि नम्र अंतःकरणाने कबूल करतो तेव्हा तो त्याला क्षमा करतो. आपण स्वतः दुर्बल असता ज्या आपल्या बांधवाने आपली दुर्बलता कबूल केली त्याच्यावर आपण दगड मारता कामा नये.

पण मि. याकूब हसन यांचे संकट आपण सर्वांनी धोक्याचा इशारा म्हणून समजला पाहिजे. कारण जरी यश दृष्टीच्या टप्प्यात असले तरी जेव्हा ते येते आणि आणि ते आलेच पाहिजे त्या वेळी शेवटची प्रचंड उग्रता जी लागते तिच्यापुढे टिकाव धरण्याची शक्ती आपणात नसण्याचा धोका आहे. हे सरकार लोकांच्या इच्छेपुढे खरोखर वाकण्यापूर्वी आपली पुरेपूर कसोटी पाहील; याकरिता आपली मने तयार करू या. हिंदुस्थानातील तुरुंग आपण हजारोंनी भरण्यास तयार असले पाहिजे. आपल्या हद्दीत कॉलरा उद्भवला तरी त्याची पर्वा न बाळगण्यास आपण तयार असले पाहिजे. ज्या गुलामगिरीच्या नैतिक जुनाट कॉलऱ्याची दुःखे आपण भोगत आहेत, त्यापेक्षा तो कॉलरा अधिक सुसह्य आहे. जर खटल्याच्या फार्सची हकीकत खरी असेल तर शूर शेरवानी निर्दोषपणे तुरुंगात गेले आहेत. संयुक्त प्रांतात दररोज कोणी ना कोणी तरी तुरुंगात जात आहे. आताच आंध्र प्रांतातून तार आली आहे की, गुंतूरला दोन महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली आहे. त्यातील एक बॅरिस्टर आहे. ही तार पाठविणारे मि. व्यंकटप्पय्या म्हणतात, अधिक दडपशाही होईल असे वाटते. पण ती आज ना उद्यां येणारच होती. जर ह्या आगीत आपण न डगमगता उभे राहिलो तर यंदाच स्वराज्य मिळेल.

पण दुर्बलता एवढेच संकट नाही. प्रक्षुब्ध परिस्थितीत लोकांची डोकी भडकणे हेही संकट आहे. क्लेश भोगण्याची अपात्रता किंवा नाराजी यापेक्षाही लोक वेडे होण्याचे संकट अधिक गंभीर आहे. म्हणून साऱ्या हिंदुस्थानातल्या प्रत्येक कार्यकर्त्याने अत्याचार टाळला पाहिजे व त्या प्रयत्नात आपला जीव जाण्याचा धोकाही पत्करला पाहिजे.

सार्वत्रिक दडपशाही जी आपल्यावर कोसळू पाहात आहे तिला जर हिंदुस्थानने सर्वांत चांगले उत्तर द्यावयाचे असेल तर हिंदुस्थानने सर्व परदेशी कपड्यांचा त्याग केला पाहिजे. तो त्याग करीत असताना शहाण्या अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या तोंडावर फेकलेले आकडे बाजूला सारले पाहिजेत. जर आपल्यात इच्छाशक्ती असेल तर आपण तीन महिन्यांत आपल्याला लागणारे सारे कापड हातकताईने व हातविणाईने निर्माण करू शकू. स्वराज्य मिळेपर्यंत खादीवर संतुष्ट राहण्याची आपली तयारी आहे काय ?

'यंग इंडिया', २८-७-१९२१

२१८. हिंदू-मुस्लिम ऐक्य

हिंदू व मुसलमान यांच्या ऐक्याशिवाय राष्ट्राला खात्रीची प्रगती करता येणार नाही, हे प्रत्येक जण जाणतो. दोघांना एकत्र बांधणारे सिमिट अद्याप भुसभुशीत व ओले आहे. अद्याप परस्परांत अविश्वास आहे. दोघांच्यातही विश्वासाच्या आणि समान कृतीच्या आवश्यकतेच्या भावनेशिवाय हिंदुस्थानला पुढे जाता येणार नाही हे पुढाऱ्यांना समजून चुकले आहे. पण जरी आम जनतेत प्रचंड बदल झाला असला तरी तो कायम टिकेल असे अद्याप वाटत नाही. मुसलमान जनतेला अद्याप हिंदूइतकी स्वराज्याची जरूरी पटलेली नाही. जाहीर सभांना जितकी हिंदूंची गर्दी होते तितकी मुसलमानांची होत नाही. ही गोष्ट सक्तीने घडून येणार नाही. मुसलमानांच्यात राष्ट्रीय हिताची जागृती होण्यास अद्याप पुरेसा काळ लोटला नाही. तथापि ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे की, जेथे वर्षापूर्वी मुसलमान समाज काँग्रेसच्या कारभारात काहीच लक्ष घालीत नव्हता तेथे साऱ्या हिंदुस्थानात हजारो मुसलमानांनी काँग्रेस सभासद म्हणून आपली नावे नोंदविली आहेत. हा मोठाच लाभ आहे.

तथापि अजून पुष्कळच करायचे शिल्लक राहिले आहे. ते काम मुख्यत्वे हिंदूंचे आहे. ज्या ज्या ठिकाणी अद्याप मुसलमान उदासीन असतील त्या त्या ठिकाणी त्यांना आपण आत येण्यास बोलाविले पाहिजे. आपण हिंदूंच्याकडून नेहमी अशी तक्रार ऐकतो की, मुसलमान काँग्रेसमध्ये येत नाहीत व स्वराज्य फंडाला पैसे देत नाहीत. स्वाभाविक प्रश्न असा आहे की, त्यांना तुम्ही कधी बोलाविले होते का? प्रत्येक जिल्ह्यात हिंदूंनी खास प्रयत्न करून आपल्या शेजाऱ्यांना बाहेर आणले पाहिजे. जोपर्यंत एक जण दुसऱ्यापेक्षा स्वतःला कमी प्रतीचा किंवा उच्च प्रतीचा समजतो, तोपर्यंत खरी समानता येणार नाही. समान लोकांत आश्रय देण्याचा प्रश्नच नसतो. ज्या ठिकाणी मुसलमान अल्पसंख्य असतील त्या ठिकाणी त्यांना आपण शिकलेलो नाही किंवा आपली संख्या कमी आहे असे वाटता कामा नये. शिक्षणातली कमतरता शिक्षण घेऊन भरून काढली पाहिजे. अल्पसंख्य असणे ही नेहमी चांगलीच गोष्ट असते. संख्याश्रेष्ठत्व हा अनेक वेळा अडथळाच ठरला आहे. शेवटी किंमत कशाला असेल तर चारित्र्याला, पण मी हा लेख पूर्णावस्थेचा उपदेश करण्याकरिता किंवा दुसऱ्या भविष्य-काळात वर्तनक्रम निर्दिष्ट करण्याकरिता केला नाही.

माझा मुख्य उद्देश आपल्यापुढे असलेल्या तातडीच्या कामाचा विचार करणे हा आहे. बकर-इ-ईद लवकरच येत आहे, त्या वेळी आपल्यामध्ये म्हणजे हिंदू-मुसल-

मानांच्यामध्ये भांडणे लावण्याचे जे प्रयत्न होतील, ते निष्कळ करण्याकरिता आपण काय करावे ? जरी बिहारमधील परिस्थिती पुष्कळच सुधारली आहे तरी निर्धास्तपणा अद्याप वाटत नाही. अधिक उत्साही व अधीर हिंदू परिस्थिती अधिक बिघडवीत आहेत. सरकारकडून जरी नेहमीच चालना मिळत नसलीतरी खोडसाळपणा करणाऱ्यांच्या युक्त्याप्रयुक्त्यांना सहज बळी पडतात. गायींचे रक्षण हे हिंदूंना अत्यंत प्रिय वाटते. त्यावर आपली डोकी बिथरणे सहज शक्य आहे आणि ती बिथरली तर ज्या कार्याचा आपण पुरस्कार करीत आहोत त्याच कार्याची अजाणतेपणाने हानी करण्यास आपण कारणीभूत होऊ. मुसलमान बांधवांनी आपल्या हिंदू बांधवांच्याकरिता गायीला वाचविण्याचे अत्यंत परिश्रम घेतले आहेत ही गोष्ट आपण कबूल करू या. त्यांची योग्यता कमी ठरविणे ही फार चूक होईल. पण ज्या क्षणी आपण हटवादी बनतो, त्या क्षणी त्यांचे सर्व प्रयत्न आपण निष्फळ करतो. गेल्या कित्येक वर्षांत आपण कुरकूर न करता किंवा निरुपयोगी आणि अत्याचारी निषेध करून गोहत्या सहन केली आहे. मुसलमानांच्या बरोबर मैत्रीचे संबंध वाढविण्याकरिता आपण आपल्या मार्गाच्या बाहेर जाऊन मुसलमान बांधवांनी स्वतःवर नियंत्रण घालून घ्यावे, असा प्रयत्न आपण कधीही केला नाही. आपण जवळ जवळ तो प्रयत्न कधीच यशस्वी होणार नाही असे निष्कारण धरून चाललो.

पण आता आपण बुद्धिपुरस्सर आणि समजून उमजून एक प्रयत्न करीत आहोत. त्यांच्या गरजेच्या वेळी आपण त्यांच्या पाठीशी उभे आहोत. आपण जी स्वयंस्फूर्तीने मदत देत आहोत तिचे चांगले परिणाम ती सौद्याची बाब करून आपण बिघडविता कामा नये. मैत्री हा कधीही करार असू शकत नाही. तो एक दर्जा आहे व त्या दर्जात दुसरा कोणताही विचार नसतो. सेवा हे कर्तव्य आहे आणि कर्तव्य हे ऋण आहे, व ते न फेडणे हे पाप आहे. जर आपल्याला आपली मैत्री सिद्ध करावयाची असेल तर ते गाय वाचवोत अगर न वाचवोत, आपण आपल्या बांधवांना मदत केलीच पाहिजे. त्यांच्यावर आपल्यासंबंधीच्या वर्तनाची जी जबाबदारी आहे ती आपण त्यांच्याच खांद्यावर टाकू या. आपल्या मदतीचा विचार म्हणून आपण ती त्यांच्यावर लादता कामा नये. अशी मदत ही भाडोत्री सेवा होईल व ती सेवा मुसलमानांनी ताबडतोब नाकारली तर त्यांना दोष देता येणार नाही. बकरीदच्या दिवशी मुसलमान काय करतील याचा विचार न करता बिहारमधल्या आणि खरोखर साऱ्या हिंदुस्थानातील हिंदूंनी कमालीचा सोशिकपणा बाळगण्याचे महत्त्व पटवून घेतले पाहिजे. त्यांना वाटेल त्या मार्गाने जाऊ द्या. हकीम अजमल खान यांनी अमृतसरला एका तासात जे केले, ते हिंदूंना अनेक वर्षांच्या प्रयत्नाने करता आले नसते. मेसर्स छोटानी आणि खत्री यांनी गेल्या बकरीदला जितक्या गाई वाचविल्या तितक्या गाई मुंबईच्या हिंदू लक्षाधीशांनी जरी आपली सारी संपत्ती खर्च केली असती तरी त्यांना तितक्या गाई वाचविता आल्या नसत्या. आपण मुसलमानांवर जितके अधिक दडपण आणू तितकी गायींची कत्तल अधिक

होईल. आपण त्यांच्या सन्मानाच्या आणि कर्तव्याच्या जाणिवेवर हा प्रश्न सोपविला पाहिजे. आणि तसे केले तरच गायीची आपण जास्तीत जास्त सेवा करू.

गाय वाचवावयाची असेल तर मुसलमानाला ठार मारणे किंवा त्याच्याबरोबर भांडणे हा मार्ग नाही. गायीला वाचवावयाचे असेल तर गायींचा निर्देश न करता खिलाफत वाचविण्याच्या कृत्यात आपण मेले पाहिजे. गोरक्षण ही एक शुद्धीकरणाची क्रिया आहे. ती एक तपस्या म्हणजे आत्मक्लेश आहे. जेव्हा आपण स्वेच्छेने दुःख भोगतो आणि फळाची अपेक्षा बाळगीत नाही तेव्हा आपल्या दुःखाचा आक्रोश हा शब्दशः स्वर्गापर्यंत पोहोचतो आणि तेथील देव तो आक्रोश ऐकून दुःखनिवारण करतो. हा धर्ममार्ग आहे. आणि जर एकाही माणसाने तो संपूर्णपणे अनुसरला तरी त्याचे फळ मिळते. माझे म्हणणे खोटे ठरविण्याची भीती न बाळगता मी असे धाडसाने म्हणतो की, गायीला वाचविण्याकरितादेखील आपल्या बांधवाला ठार मारले पाहिजे हा हिंदू धर्म नाही. हिंदू धर्म आपल्या अनुयायांना असे सांगतो की, धर्माकरिता म्हणजे गायीला वाचविण्याकरिता तुम्ही आत्मबलिदान करा. मुसलमानांच्याबरोबर सौदा न करता त्यांच्याकरिता आणि धर्माकरिता मरण्यास किती हिंदू तयार आहेत हा प्रश्न आहे. जर हिंदूंनी धार्मिक वृत्तीने याचे उत्तर दिले, तर ते शाश्वत कालपर्यंत मुसलमानांची मैत्री संपादन करतील; एवढेच नव्हे तर मुसलमानांच्यापासून गायींना कायमचे वाचवितील. त्यांच्यातील अत्यंत मोठ्या माणसाला शपथेवर साक्षीला बोलावून हे आपण करू नये. ते फक्त आपल्याला मदत करतील. त्यांना कोट्यवधी अंतःकरणे बदलण्याची हमी घेता येणार नाही. त्यांनी आतापर्यंत गोहत्या करताना हिंदू शेजाऱ्यांच्या भावनांचा विचारच केला नव्हता. सर्वशक्तिमान परमेश्वर एका क्षणात त्यांना बदलवील आणि त्यांना पाझर फोडील. पुरेशा दुःखासह केलेली प्रार्थना हीच अंतःकरणाची प्रार्थना आहे. तशीच प्रार्थना देवाच्या दरबारी रुजू होते. मुसलमान मित्रांना मी एकच शब्द सांगतो. बेजबाबदार किंवा अज्ञानी पण माथेफिरू हिंदूंच्या कृत्यांनी त्यांनी संतप्त होऊ नये. प्रक्षोभ झाला असताही जो संयम पाळतो, तोच लढाई जिंकतो. जे जबाबदार हिंदू, मुसलमानांच्या कठीण प्रसंगी त्यांच्या बाजूला आहेत, ते सौद्याच्या वृत्तीने नाहीत हे त्यांना कळू द्या व तशी त्यांची खात्री पटू द्या. ते त्यांना मदत करतात, कारण त्यांना ठाऊक आहे की खिलाफतीचे गाऱ्हाणे हे न्याय्य आहे. आणि मुसलमानांना चांगल्या कार्यात मदत करणे म्हणजे हिंदुस्थानची सेवा करणे आहे. मुसलमान हे हिंदूंचे सख्खे बंधू आहेत. एकाच आईच्या म्हणजे भारतमातेच्या पोटी जन्माला आलेले आहेत, याकरिताही ते त्यांना मदत करीत आहेत.

'यंग इंडिया', २८-७-१९२१

२१९. अनत्याचार

आपण इष्ट स्थळाच्या दृष्टिपथात आहोत अशी माझी खात्री आहे. पण जेव्हा जय अगदी जवळ आला असे वाटते त्याच वेळेला जास्तीत जास्त धोका असतो. आतापर्यंत कोणताही नाव घेण्यासारखा विजय अखेरचा प्रयत्न केल्याशिवाय मिळालेला नाही. तो अखेरचा प्रयत्न पूर्वीच्या प्रयत्नापेक्षा अधिक गंभीर असतो. परमेश्वर जी शेवटची कसोटी घेतो, ती सर्वांत अत्यंत कठीण असते. सैतानाचे शेवटचे आकर्षण हे नेहमी अत्यंत मोहक असते. जर आपल्याला स्वतंत्र व्हावयाचे असेल तर आपण देवाच्या शेवटच्या कसोटीला उतरले पाहिजे, आणि सैतानाची शेवटची कसोटी धिक्कारली पाहिजे.

असहकारितेचा जर कोणता जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा भाग असेल तर अनत्याचार हा आहे. जर आपण अनत्याचारी राहिलो तर आपण इतर बाबतींत पराभूत होऊनसुद्धा आपली लढाई चालूच ठेवू. पण जर आपण अनत्याचाराला चिकटून राहिलो नाही तर अत्यंत हीनपणे सरकारला शरण जाऊ. सरकारी इमारतीच्या कमानीचा मुख्य दगड अत्याचार आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ज्या अर्थी अत्याचार हा त्यांचा आधारस्तंभ आणि शेवटचा आसरा आहे, त्या अर्थी त्यांनी लोकांकडून होणारे अत्याचाराचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरविण्याची तयारी करून आपल्याकडून होणाऱ्या अत्याचारापासून ते संपूर्णपणे भयमुक्त झाले आहेत. म्हणून जेव्हा आपण अत्याचाराचा आश्रय घेतो, तेव्हा आपण अत्यंत तत्परतेने सरकारशी सहकारिता करीत असतो. आपल्याकडून केला जाणारा अत्याचार हा मूर्खपणा, अज्ञान आणि दुर्बलांचा जळफळाट यांचा निदर्शक असतो. अत्यंत प्रक्षुब्ध परिस्थितीत संयम राखणे हे शिपाईगिरीचे खरे लक्षण आहे. युद्धकलेत अगदी नवशिका असलेल्यालाही कळते की, आपण दबा धरून बसलेल्या शत्रूला टाळले पाहिजे. आणि प्रत्येक प्रक्षोभक गोष्ट म्हणजे एक धोक्याचा दबावच असतो. त्यात आपण शिरण्याचे निश्चयाने टाळले पाहिजे.

अलिगडची हकीकत हे एक लागू उदाहरण आहे. पोलिसांनी भरपूर प्रक्षोभ निर्माण केला होता, हे तर स्पष्टच आहे. तो तर त्यांचा धंदाच आहे; हे तर आपण पूर्वीच ओळखले आहे. अलिगडचे लोक हे त्यांच्याकरिता ठेवलेल्या पिंजऱ्यात आपणहून चालत गेले. त्यांनी स्वतःला प्रक्षुब्ध होऊ दिले आणि जाळपोळीला सुरुवात केली. साध्या पोशाखातील पोलिसाला कोणी ठार केले हे अद्याप उघडकीस आले नाही. आम्ही त्याला मारले नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी लोकांच्यावर आहे.

स्वतःशी आपण कठोर होऊ या. जर आपल्याला सरळ व अरुंद वाटेने (ती वाट अगदी जवळची असते.) चालावयाचे असेल तर आपण स्वैराचारी होता कामा नये. कोणत्याही दुष्कृत्याचा दोष आपण बदमाषांच्यावर टाकू नये. त्यांच्या कृत्यांबद्दल आपण जबाबदार असले पाहिजे. किंवा आपण स्वराज्याला नालायक आहोत असे जाहीर केले पाहिजे. त्यांच्यावरदेखील आपण ताबा मिळविला पाहिजे. ज्या राष्ट्रीय आणि धार्मिक कार्यात आम्ही गुंतलो आहोत त्या कार्यात त्यांनी अडथळा आणता कामा नये हे त्यांनाही समजले पाहिजे. शुद्धीकरणाच्या चळवळीत दुष्ट व पतितांच्यासह सारा देश उद्धरला जातो. यात काही चूक होणार नाही. पण हा आमचा विचारपूर्वक दावा आहे. पण जर हा नुसता तोंडचा दावा असेल तर आपण ज्या सैतानी पद्धतीचा धिक्कार करतो, तिच्यापेक्षाही अधिक सैतानी पद्धत आपण स्थापित केली अशाबद्दल आपण गुन्हेगार ठरू.

म्हणून जोपर्यंत आपण अनत्याचारी असहकारितेचा मार्ग पत्करला आहे तोपर्यंत विचार, उच्चार आणि आचार यात त्या मार्गाला धरून राहणे हे आपले कर्तव्य आहे. त्या पंथाला धरून चालण्यास जर आपण अत्यंत दुर्बल असू किंवा अत्यंत अश्रद्धेय असू तर तसे स्पष्ट कबूल करू या.

तुम्ही या कसोटीला उतरत नाही असे मला वाटते. या कल्पनेने वाचकांनी भांबावून जाऊ नये. उलटपक्षी मला असे वाटते की, आपण जनतेवर विलक्षण ताबा मिळविला आहे आणि जनतेला पूर्वी कधीही पटली नव्हती इतकी अनत्याचाराची आवश्यकता पटली आहे.

पण जो मार्ग आपण बुद्धिपुरस्सर पत्करला आहे, त्यापासून जर आपण यत्किंचित विचलित झालो तर त्यापासून योग्य इषारा न घेणे हे चुकीचे ठरेल.

मला सावधगिरीचा इषारा देणे जरूरही वाटते. कारण सरकारकडून होणारा प्रक्षोभ हा वाढू लागला आहे. संयुक्त प्रांतात तो सर्वात अधिक आहे. पहाटे पाच वाजता मि. शेरवानी यांना पकडणे, त्यांचा खटला घाईघाईने उरकणे, त्यांना दोषी ठरविणे, शिक्षा देणे व त्याच दिवशी त्यांना हालविणे, या सर्व गोष्टी शांत स्वभावाच्या माणसाला देखील संताप आणतील. खटल्याचा तपशील असे दाखवितो की, मॅजिस्ट्रेटला कायद्याची फार थोडी माहिती होती; आणि त्याही पेक्षा त्याला त्याची कमी पर्वा होती. त्याच्यापुढे आलेला पुरावा हा जर सर्व वृत्तपत्रांत दिला गेला तर तो पुरावा गुन्हा शाबीत करण्यास अपुरा ठरला असता. जवळजवळ असे दिसते की, त्यांना गुन्हेगार ठरविणे आणि शिक्षा देणे हे अगोदरच ठरले होते. अशा बाबतीत पुरावा हजर करणे हा एक मोठा फार्सच होता. सामान्य कायद्याखाली आपल्याला खटल्याची रंगीत तालीम पाहावयाला मिळत आहे. सरकारी हुकूम आणि न्यायालयीन चौकशी

यांत फरकच कोठे आहे ? न्यायालयीन चौकशी ही फार भयंकर असते. कारण ती उघडकीस आणण्यास अधिक कठीण असते. एखाद्या माणसाची चौकशीच झाली नाही असे म्हणणे म्हणजे अन्यायाविषयीची अधिक खात्री पटणे आहे. पण तो खटला म्हणजे एक फार्स होता असे म्हणण्यात तितकी खात्री पटत नाही. जुलमी कायदे रद्द होतील; पण याचा अर्थ असा नाही की, जुलूम नाहीसा केला जाईल. स्वरूप बदलले तरी अर्थ तोच राहील. आपल्याला मुळात वृत्तीत, आणि अंतःकरणात बदल हवा आहे.

आणि जर आपल्याला तो बदल हवा असेल तर प्रथम आपण स्वतःला बदलले पाहिजे. याचा अर्थ दडपशाहीचा आपल्यावर परिणाम होता कामा नये. ज्याप्रमाणे आपण अत्याचाराने प्रतिकार करता कामा नये, त्याचप्रमाणे दडपशाही कितीही कठोर किंवा परीक्षा पाहणारी असली तरी आपण नमता कामा नये.

एक अधिकृत अफवा संयुक्त प्रांतातून अशी आली आहे की निदान तिथा कमी-अधिक प्रसिद्ध कार्यकर्त्यांना तुरुंगातील जीवन फार कष्टप्रद वाटले. त्यांनी काही गोष्टी आपण करणार नाही अशी हमी दिली व त्यांनी आपली सुटका करून घेतली. हे खरे असेल तर दुःखदायक आहे. आपण खडकासारखे भक्कम असले पाहिजे. आपण मागे सरताच कामा नये. हिंदुस्थानातील तुरुंगात आपल्या नशिबी जी छळणूक येईल ती आपण आनंदाने सहन केली पाहिजे. सरकारकडून मेहेरबानीची अपेक्षा बाळगू नये. कायदेशीरपणे किंवा बेकायदेशीरपणे कसेही असो सरकार आपला जास्तीत जास्त छळ करणार आहे, अशी आपण अपेक्षा बाळगली पाहिजे. ज्या अर्थी सरकार सुधारणार नाही, त्या अर्थी त्यांचा एक उद्देश आपल्याला नमविणे हा आहे. सरकारबद्दल कठोर निर्णय मी देत नाही. सरकारने शिष्टाचार धुडकावून दिला याची ताजी उदाहरणे म्हणजे धारवाड व अलिगड ही आहेत. जर मला दुसऱ्या अफवेवर विश्वास ठेवावयाचा असेल तर मी संयुक्त प्रांतातील पुढील हकीकत सांगेन. तेथील तुरुंगात एका शूर मुसलमान कैद्याला अंधारकोठडीत टाकले आणि तीन दिवसपर्यंत त्याला अत्यंत दुर्गंधीत कोंडून ठेवले. ही बातमी देणारा गृहस्थ मला विचारतो, ज्याला ती दुर्गंधी सहन होणार नाही त्यांनी काय करावे ? मी कठोर पण विचारपूर्वक उत्तर दिले की, त्यांनी त्याही परिस्थितीत माफी मागू नये. जुलमी अधिकाऱ्याच्या इच्छेला शरण जाण्याऐवजी, तुरुंगाच्या भिंतीवर डोके आपटण्यास त्याला मोकळीक होती. माझे हे मतप्रदर्शन काही तरीच नाही. पण दक्षिण आफ्रिकेतील माझ्या अनुभवांपैकी हा छोटासा अनुभव आहे. दक्षिण आफ्रिकेतील तुरुंगाचे जीवन हा गुलाबाचा ताटवा नव्हता. पुष्कळ कैद्यांना एकांतवासाची शिक्षा देत. शेकडो जणांना भंगी काम करावयाला लावीत. अनेकांनी उपवास केले. एक स्त्री जे एकच अन्न खात असे, ते तिला न दिल्यामुळे तिचा सापळा होऊन तिची सुटका झाली. पण ती अभिमानी आणि निश्चयी वृत्तीची होती. ज्या

हजारो लोकांनी दक्षिण अफ्रिकेत तुरुंगवास भोगला, त्यांच्यापैकी सुरुवातीचा एखादा दुसरा अपवाद सोडल्यास, एकाही कैद्याने आपली सुटका करून घेण्याकरिता माफी मागितली किंवा त्याचा धीर खचला असे उदाहरण मला आठवत नाही. पारशी रुस्तुमजी, इमामकादीर बवाझीर, थंबी नायडू आणि अशा कित्येकांची नावे मला सांगता येतील की, जे कधीही कचरले नाहीत; पण ज्यांनी पुनः पुन्हा तुरुंगाच्या वाऱ्या केल्या. स्वातंत्र्याचे मंदिर क्लेश भोगणाऱ्यांच्या रक्ताशिवाय बांधले जात नाही. अनत्याचाराची पद्धत ही अत्यंत शीघ्र, अत्यंत खात्रीची आणि अत्यंत चांगली आहे. काँग्रेस व खिलाफतीच्या बैठकांत ज्या आपण शपथपूर्वक प्रतिज्ञा घेतल्या त्या प्रामाणिकपणे पाळू या. म्हणजे विजय हाताशी आहे.

'यंग इंडिया', २८-७-१९२१

२२०. माझी टिप्पणे

महूमध्ये दंगल

इंदूरजवळ महू हे सरकारचे महत्त्वाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. तेथे हिंदू व मुस्लिम लोकवस्ती आहे. अगदी थोड्या दिवसांपूर्वी बोहोरी व सुनी मुसलमान यांच्यात दंगल झाल्याची बातमी आली होती व ती एका नजरेत न येणाऱ्या कोपऱ्यात छापली होती. या दंगलीमुळे एक बोहोरी ठार मारला गेला व कित्येक जखमी झाले असे म्हणतात. भांडणाची सुरुवात बोहोऱ्यांनी स्वराज्य फंडाला पैसे देण्याचे नाकारल्यामुळे झाली असे म्हणतात. पण कारण काहीही असो बोहोरी व सुनी मुसलमान यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत. गोध्रा येथेसुद्धा असेच झाल्याचे आपण पाहिले. रतलामलासुद्धा तीच गोष्ट झाली. बोहोरी जमातीची साऱ्या देशात एकूण लोकसंख्या तीन लाख आहे. मोठ्या जमातीचे कर्तव्य अशा लहान गटांना निर्धास्त करण्याचे असावे. जरी बोहोऱ्यांनी खिलाफत किंवा स्वराज्य चळवळीत भाग घेतला नाही तरी त्यांचा छळ करू नये. अशा अगदी लहान जमातीचे लोक बावरटपणामुळे किंवा परिणामाच्या भयामुळे अशा चळवळीत सामील होण्यास पुढे येत नसतील हे अगदी शक्य आहे. अशा परिस्थितीत त्यांच्यावर दडपण न टाकणे हे युक्त आहे. मला असेही सांगण्यात आले आहे की, महूला हिंदू हे बोहोऱ्यांच्या विरुद्ध पक्षाला मिळाले. मला वाटते की, जर एकाच धर्माचे लोक आपसात लढू लागले तर इतरांनी तटस्थ राहावे आणि

त्यांच्यात सलोखा व ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. ज्याप्रमाणे हिंदूंच्यात भांडण झाले असता मुसलमानांनी एकाची कड घेणे अयोग्य आहे, त्याचप्रमाणे मुसलमानांच्यात भांडण झाले असता हिंदूंनी एका बाजूची कड घेणे हे कमीपणाचे आहे. जेथे जेथे अशा दंगलींची धास्ती वाटत असेल तेथे तेथे खिलाफत कार्यकर्त्यांनी त्या दंगली थांबविणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', २८-७-१९२१

२२१. हैदराबादच्या एका असहकारितावाद्याला तार

जुलै २९, १९२१

असहकारितावादी पुरावा देऊ शकत नाहीत.

'बॉंबे सीक्रेट ॲबस्ट्रॅक्ट्स्', १९२१

२२२. मुंबईच्या अ. भा. कॉं. क. च्या सभेत बहिष्कारावर चर्चा

[३० जुलै, १९२१ पूर्वी[१]]

गांधीजी : आपण जेव्हा जून महिन्यात एक कोटी रुपये जमविले तेव्हा दाखविलेला उत्साह आणि आशा कुठे गेली? परदेशी कापडावरील बहिष्कार यशस्वी करण्यासंबंधी आपल्याला काही शंका आहेत काय? आपल्या भीतीचे कारण आपली कमजोरी. जर आपण या गोष्टीचा शांतपणे विचार केला, तर बहिष्कार यशस्वी केल्या-

१. ही सभा २८ जुलै ते ३० जुलैपर्यंत भरली होती.

नंतर आपल्याला काहीच करावयाचे शिल्लक उरणार नाही असे कळून येईल. मी या गोष्टीचा जितका अधिक अधिक विचार करतो तितकी तितकी माझी अधिक खात्री पटते की, आपल्याला शिपायांना शस्त्रे खाली ठेवा किंवा कर भरणाऱ्यांना कर भरू नका असे सांगण्याचीही जरुरी उरणार नाही. जर आपण संपूर्ण बहिष्कार घडवून आणला तर अगदी थोड्या लोकांना सविनय कायदेभंग करून तुरुंगात जावे लागेल किंवा इतर त्याग करावे लागतील म्हणून तुम्हांला निराश होण्याची, धीर सोडण्याची किंवा हातपाय गाळण्याची जरुरी नाही.

माझ्यापुढे स्वदेशी आणि बहिष्काराबद्दल बरेच प्रश्न आहेत. त्यांची उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करतो.

प्रश्न : यापुढे जर आम्ही नवे परदेशी कापड विकत न घेण्याची हमी घेतली आमच्याजवळचे कपडे संपेपर्यंत ते वापरीत राहिलो तर काय बिघडते ?

उत्तर : ते कपडे वापरून आपण आपल्या धर्माची पायमल्ली करतो असे पटल्यानंतर ती वस्तू आपण कशी बाळगू शकतो हे मला कळत नाही. परदेशी कापड वापरून जर आपण धर्मबाह्य वर्तन करणार असलो तर ते कापड आपण क्षणभर जवळ कसे बाळगू ? जर मी बळजबरीने एखाद्याच्या घरात शिरलो आणि चूल फोडून टाकली तर मी एक घोर पातक करीन. परदेशी कापडाच्या आयातीने ह्या गोष्टी आपल्या अगदी गरीब वर्गाच्या बाबतीत केल्या आहेत. आपला कापडाचा धंदा साफ बुडविला आहे, आणि आपल्यापैकी पुष्कळांना उपाशी मारले आहे. हा व्यापार करून आपण आपल्या उपजीविकेची साधनेच नष्ट केली आहेत. हेही एक भयंकर पातक आहे. जर कोणी आपल्या पायातल्या साखळ्या तोडल्या तर आपण त्याचे तुकडे जवळ बाळगू का ? ज्याप्रमाणे एखाद्या गुलामाला फार काळ आपल्या पायांत असलेल्या साखळ्यांबद्दल प्रेम वाटते त्याचप्रमाणे परदेशी कापडाबद्दल तसेच प्रेम आपल्याला वाटत आहे आणि म्हणून हे प्रश्न आपण काढीत आहोत असे मला वाटते.

प्रश्न : जरी आपण परदेशी कापडाचे कपडे फेकून दिले, तरी ते कपडे आपण आपल्या गरीब अर्धनग्न बंधूभगिनींना का देऊ नयेत ? ह्या कपड्याचे दान त्यांना देऊन, त्यांच्या अंतःकरणाला आपण संतोष का देऊ नये ? आपण परदेशात ते का पाठवावे ?

उत्तर : जर एखाद्याने आपल्या घरात गोमांस टाकले, तर ते आपण घराबाहेर टाकावे का गरिबांना द्यावे ? काही गरीब लोकांना ते खास घ्यावेसे वाटेल. पण जी गोष्ट स्वतः वापरणे हे आपण पाप मानतो ती गोष्ट आपण दुसऱ्याला का द्यावी ? आपण अर्धवट शिजलेले किंवा शिळे झालेले अन्न दुसऱ्याला खाण्याकरिता देतो किंवा ते टाकून देतो. आपले लोक अशा विपन्नावस्थेत आहेत की, काही जण ते शिळे

खावयाससुद्धा तयार होतील. पण असे अन्न दिल्यामुळे आपल्या औदार्यात किंवा आपल्या मोठेपणात भर पडत नाही हे तुम्ही कबूल कराल. आपण असे ठरविले आहे की, एक ऑगस्टला खादी पोषाखात किंवा निदान स्वदेशी कपड्यांत चौपाटीवर आपण जमणार आहोत. अशा कपड्यांखेरीज कोणीही तेथे येऊ नये अशी आपली इच्छा आहे. तर मग काय तुमची इच्छा गरीबांनी त्या सभेत हजर राहू नये असे तुम्हांला वाटते ? तुम्ही टाकलेले परदेशी कापड घालून ते तेथे कसे येऊ शकतील ? त्यांनी देखील योग्य रीतीने कपडे घालून तेथे का येऊ नये ? अन्नदान केल्याबद्दल आपण अभिमान बाळगतो. पण दया दाखविण्यात आपण सारासार विचार करीत नाही. जे आपण टाकून दिले आहे, त्या वस्तूंनी गरिबानी आपली शरीरे का सुशोभित करावीत ? गरिबांना भीक घालण्याचा प्रसंग आपल्यावर का येतो ? गरिबांना जर कोणते दान आपण देणार असलो तर ते त्यांना स्वावलंबी करण्याचे. आपली चळवळ त्यांना आपल्यासारखे करण्याची आहे. आपल्यासारखे याचा अर्थ श्रीमंत नव्हे. त्यांनी उपाशी राहू नये किंवा कपड्यांच्या अभावी नागवे फिरू नये, एवढाच त्याचा अर्थ. पाप्यातला पापी जो असेल त्यालादेखील जगण्याचा हक्क आहे. गरिबाला खाण्याचा, पिण्याचा किंवा आच्छादनाचा हक्क नाही असे कोणतेही शास्त्र म्हणत नाही. भीक मागण्याचा हक्क कोणाला आहे ? ज्या सत्पुरुषाने ज्ञानाचे मुक्तदान केले आहे आणि जो ते सतत करीत आहे त्यालाच हा हक्क आहे. भिक्षा वाढण्यात आपण विचाराची कमतरता-दाखवितो व पाप करतो. आपली पुष्कळ अन्नछत्रे आळस व पातकांची लक्षणे आहेत असे मला वाटते. आपण देशात अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे की, ज्यामुळे कोणावरही भीक मागण्याचा प्रसंग येऊ नये. जर आपल्याला गरिबांना स्वावलंबी करावयाचे असेल तर त्यांना कोणता ना कोणता धंदा शिकविला पाहिजे. आजच एक इंग्रज गृहस्थ माझ्याशी ह्या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता आला होता. तुझी हॅट किंवा तुझी कोट पाटलोण जर गरिबांना दिलीस तर ते किती चमत्कारिक होईल, हे मी त्याला समजावून सांगत होतो. तुम्ही जे लोक येथे जमला आहात त्यांच्यापैकी कोणाच्याही डोक्यावर असे पागोटे किंवा टोपी नाही की जे गरिबाला उपयोगी पडू शकेल. येथे जमलेल्या भगिनींच्या रंगीबेरंगी तलम साड्यांचा त्यांना काय उपयोग ? ते अशा वस्तू कधीच वापरीत नाहीत. जर आपण विचारी असतो तर आपल्या पोषाखात गरिबांच्या पोषाखांशी काही तरी साम्य असते. मला काठेवाडच्या धनगरणी माहीत आहेत. तुम्ही जर त्यांना तुमच्या साड्या बक्षीस दिल्यात तर त्या धनगरणी तुमच्या साड्या खाली ने फेकून देतील. तुमच्या रेशमी साडीची जरूरी असणारी एखादी तरी गरीब स्त्री आहे का ? उपाशी मरणाऱ्यांना अशा साड्या आपण देऊ शकू का ? त्यांच्या मनांत आपण बुद्धिभेद का निर्माण करावा ? गीतेने त्याला मनाई केली आहे. तुम्ही टाकलेल्या वस्तू जर गरिबांना दिल्यात तर ते आनंदाने वेडे होतील असे तुम्ही का समजता ? आम्ही यांना दिलेल्या वस्तू पापी समजत होतो, हे जेव्हा त्यांना कळेल तेव्हा ते आम्हांला शाप

देतील. उपाशी असलेल्या लोकांच्याबद्दल जर तुम्हांला दया आली तर तुम्ही स्वतः- करिता ठेवलेल्यापैकी त्यांना काही द्या. तुम्ही स्वतःच्या उपयोगाकरिता जी खादी ठेवली असेल त्यातली तुम्ही त्यांना का देऊ नये? सत्कृत्यापासून मिळावयाचे पुण्य स्वस्तात प्राप्त होत नाही.

प्रश्न : परदेशी कापडाचे कपडे आम्ही बाहेर पाठविण्याकरिता का देऊ नयेत? ते जाळून का टाकावेत? ते तयार करण्याकरिता लागलेले मानवी श्रम आम्ही वाया का दवडावेत?

उत्तर : परकीय देशाशीसुद्धा मी सुसंस्कृत माणसासारखा वागेन. आपण गिरणीचे कापड विकत घेऊन ते त्यांना का पाठवू नये? मी हे कबूल करतो की, असे कापड स्मर्नाला पाठविणे हे येथील गरीब लोकांना वाटण्याऐवजी कमी निषेधार्ह आहे. नेहमीच आणि सर्वत्र काही गोष्टी पातकी नसतात. पण त्या विशिष्ट जागी पातकी असतात. परदेशी कापडाचे तसेच आहे. युरोपियन देश हे कापडाच्या बाबतीत बहुतेक दुसऱ्या देशावर अवलंबून असतात, व ते कापूसही पिकवीत नाहीत. त्यामुळे तेथे परदेशी कापड वापरणे हे पाप नाही. युरोपमध्ये तयार झालेले आणि आपल्या देशात आयात केलेले कापड आपण युरोपला परत पाठवू शकू. ह्या बाबतीत मुस्लिम मित्रांच्या- बरोबर वादविवादात शिरणे मला योग्य वाटले नाही म्हणून मी पड खाल्ली, आणि टाकून दिलेले कापड स्मर्नाला पाठविण्याचा विकल्प मान्य केला. पण आपले मुख्य कर्तव्य म्हणजे अशा कापडाची होळी करणे.

ज्या वस्तूकरिता माणसाने श्रम केले आहेत, ती का नष्ट करावी असे विचार- ण्यात येते. पण या जगात असे एखादे काही आहे का की, ज्याकरिता माणसाने श्रम केले आहेत आणि जिचा कधीच नाश होणार नाही? माझ्या पागोट्याचा आकार चांगला आहे आणि माझ्या भावाने पागोटे बांधण्याचा धंदा सुरू केला. पण जर ते पागोटे प्लेगच्या जंतूंनी दूषित होईल तर ते केवळ माझ्या भावाने बांधले होते म्हणून मी नष्ट करू नये का? त्याचा नाश करणे हेच माझे कर्तव्य. आपण मानवी शरीर हा एक तराफा आहे असे मानतो आणि त्याच्या मदतीने हा भवसागर तरून जाऊ इच्छितो. अशा या आवश्यक साधनाचादेखील नाश केला पाहिजे, अशी ईश्वरी आज्ञा आहे. तो पुष्कळ वस्तूंचा नाश करतो. मग काय आपण त्याच्यापेक्षा अधिक शहाणे आहोत? आपण निर्माण केलेल्या वस्तूचा नाश करण्याचा आपल्याला हक्क आहे.

प्रश्न : जे कापड स्वदेशी आहे अशा समजुतीने आपण विकत घेतले व जे स्वदेशी आहे असे आपल्याला सांगण्यात आले त्याचाही नाश करावा अशी अपेक्षा आहे का? आजपर्यंत स्वदेशीचा एक अर्थ होता. आता तिचा दुसराच अर्थ होऊ लागला आहे. काही काळानंतर तिचा आणखी दुसरा अर्थ होणार नाही याची खात्री काय? प्रत्येक वेळी आम्ही कपडे टाकीतच सुटावे का?

उत्तर : जर कोणी मला कोडेचिराइताऐवजी सोमल दिले तर ते मी घशाखाली घालावे का? तसला प्रश्न कोणी विचारणारच नाही. जर कोणी पाऱ्याने मढविलेला एक पैसा मला दिला आणि तो दुकानात नेऊन मी आठ आणे म्हणून देऊ लागलो तर पोलिस मला पकडणार नाही का? ज्या क्षणी आपल्याला आढळून येईल की, एखादी वस्तू जशी आपण समजत होतो तशी ती नाही त्या क्षणी आपण ती टाकून दिली पाहिजे. १९१९ साली मी स्वदेशीची जी व्याख्या केली ती तशीच कायम आहे. पण ती व्याख्या करण्याच्या वेळी माझ्याही अंगावर खादी नव्हती. जी वस्तू अस्तित्वात नव्हती ती मी देशापुढे कशी ठेवणार? आज आपल्यापुढे खादीचे ढीग आहेत. आता जरूरी कशाची असेल तर आत्मविश्वासाची. आपण वेळोवेळी व्यवहार्य वाटेल त्याप्रमाणे स्वदेशीची व्याख्या बदलली आहे. एखादा माणूस गुलामगिरीच्या सर्व प्रकारापासून स्वतःची मुक्तता करून घेईल. पण त्याने तरीदेखील आपल्या सहकाऱ्यांचे गुलाम राहिलेच पाहिजे. श्री. उमर सोबानी आणि श्री. शंकरलाल बँकर यांच्या मतांना मलादेखील मान देणे भाग पडले. आणि त्यांच्याकरिता मी दुसरी प्रतिज्ञा तयार केली. ती प्रतिज्ञा[1] अशी : कोणालाही देशी कापडापासून गिरणीत तयार झालेल्या सुताचे कापड वापरता येईल. पण ही गोष्ट येथेच संपली नाही. श्रीमती रमीबाई कामदार यांना यातही अडचण वाटली. म्हणून मी तिसरी प्रतिज्ञा तयार केली. तथापि स्वदेशीचा खरा एकच प्रकार आहे आणि मी प्रत्येकाला ती प्रतिज्ञा घ्यावयास सांगत आहे.

प्रश्न : कापड जाळून टाकण्यात अहिंसेच्या प्रतिज्ञेचा भंग होत नाही काय?

उत्तर : घाण स्वच्छ करणे म्हणजे हिंसा नव्हे. आत्म्याच्या अधःपाताला जे कारण होते ते पाप. थोडीशी हिंसा अटळ आहे. शास्त्रे सांगतात श्वासोच्छ्वास करण्यातही हिंसा आहे. वनस्पतींनाही जीवन आहे. तरीदेखील आपण भाज्या खातो आणि त्या खाताना हिंसा करतो असे समजत नाही. आपण सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहिले तर आपल्याला पाणी हेसुद्धा जंतूने भरलेले दिसेल. दूध हेसुद्धा जंतूंनी डबडबलेले असते. तरीदेखील पाणी पिण्यात आपण दोष मानीत नाही आणि दुधाला तर आपण पोषक अन्न समजतो. मी आता तुमच्याशी बोलतानादेखील थोडीशी हिंसा करीत आहे. पण ती अटळ आहे आणि तिला आपण पातक मानीत नाही.

एका घासावर भागण्यासारखे असता तुम्ही दोन घास खाल्ले तर ते पातक आहे. गीता म्हणते की, जर आपण खाण्यात मिताहारी नसलो तर आपण चोर आहोत आणि तरीदेखील आपण मेजवान्या झोडतो. पदोपदी आपण गीतेची शिकवणूक मोडत असतो. तर मग हा प्रश्न विचारण्याचा आपल्याला अधिकारच काय? जर श्रद्धेच्या

१. पहा, खंड १५.

अभावामुळे किंवा दुसऱ्यांच्याबद्दलच्या खोट्या आदरामुळे किंवा भयामुळे एखाद्या माणसाने आपले काही परदेशी कपडे आणि तेसुद्धा काहीच, दुसऱ्याच्या स्वाधीन केले, आणि जर नंतर पुन्हा त्याने परदेशी कापड विकत घेतले तर त्यामुळे देशाच्या लाभाऐवजी देशाची हानीच होईल. तर मग आपण असे कापड किंवा कपडे का गोळा करावे? परदेशी कापडातील गुलामगिरी आपण लोकांना समजून का सांगू नये? आणि "विचार करून जसे करावयाचे असेल तसे कर[1]" ह्याला परवानगी का देऊ नये?

उत्तर : आपण कोणाबद्दल शंका किंवा अविश्वास का दाखवावा? दुसरा माणूस दांभिक आहे असे आपण का मानावे? एखाद्या माणसाने कपडे टाकण्यात अप्रामाणिकपणा दाखविला असे आपण का समजावे? चांगली गोष्ट करण्यात जर एखाद्याचा काही हेतू असेल तर त्याचा फायदा होतोच. जर एखादा माणूस भयाने खरे बोलला तरीदेखील त्याच्या खोटे बोलण्यामुळे जी जगाची हानी झाली असती तीपासून जग वाचेल. दुष्टबुद्धीने केलेले सत्कृत्य माणसाची हानी करते आणि सत्कृत्याचे पुण्य त्याला मिळत नाही; तरीदेखील त्याच्या सत्कृत्यापासून जगाचा फायदाच होईल. जो माणूस परदेशी कापड टाकतो व स्वदेशी वापरतो आणि या दोन्ही गोष्टी भयाने करतो, त्याला सत्कृत्याचे पुण्य कदाचित मिळणार नाही. पण तो स्वदेशी कापड वापरू लागल्यामुळे देशातल्या कोणत्या तरी कारागिराला काम मिळेल आणि त्याच्या कृतीचा तितका चांगला परिणाम खात्रीने होईल. तथापि आपण असे धरून चालावे की, लोकांनी जे दिलेले आहे ते सद्भावनेने दिले आहे.

"यथेच्छसि तथा कुरु" या आज्ञेने सुचित केलेला उपयोग हाही चुकीचा आहे. भगवान कृष्णांनी हे शब्द केव्हा उच्चारले? जेव्हा त्याने अर्जुनाला आपल्या मुठीत बद्ध पकडले तेव्हा भगवंतांनी अर्जुनाला त्याचे कर्तव्य समजावून सांगितले. निरनिराळ्या प्रकारे त्याचे आर्जव केले आणि त्याला सांगितले, तुला जे योग्य वाटेल ते कर. आपणसुद्धा लोकांना सर्व गोष्टी समजावून सांगाव्यात. त्यांच्या सन्मानाच्या कल्पनेला आवाहन करावे आणि जर त्यानेही ते वळले नाहीत तर त्यांना योग्य ते करा असे सांगावे.

अर्थातच कोणालाही ठार मारण्याची इच्छा आपण करू नये. तथापि त्याऐवजी आपले प्राण खाली ठेवण्यास जर आपण तयार नसलो तर आपण परदेशी कापडावर बहिष्कार घातलाच पाहिजे. जर आपण काही न करता हातपाय जोडून स्वस्थ बसलो तर धर्माचरण करणार नाही. मी १ ऑगस्टपर्यंत अशा सभांना हजर राहीन आणि

१. भगवद्गीता, अध्याय १८ श्लोक ६३. 'यथेच्छासि तथा कुरु".

नंतर तेही करण्याचे थांबवीन. ३१ ऑगस्टपर्यंतच मी स्वदेशीची बाजू मांडीत राहीन. नंतर तीही सोडून देईन. मी व्यवहारी धंदेवाईक माणूस आहे. जोपर्यंत तेलाच्या बिया रगडून त्यांतून तेल निघेल असे मला वाटेल तोपर्यंत मी वाटेल तितक्या बिया रगडीन आणि नंतर थांबेन. मला लक्ष द्यावयास पुष्कळ कामे आहेत.

प्रश्न : जे लोक आठ ते दहा आणे मिळवितात त्यांना परदेशी कापडावरचा बहिष्कार कसा शक्य आहे? ज्या माणसाची मासिक प्राप्ती १०० ते १५० रुपये आहे, त्याला परदेशी कपडे कसे टाकता येतील? आणि स्वदेशी किंवा खादीच्या कापडापासून नवे कपडे कसे करता येतील? त्यांनी काय कर्ज काढावे? त्यांनी काय भीक मागावी? आपण यापुढे परदेशी कापड विकत घेणार नाही ह्या प्रतिज्ञेवर त्यांनी संतुष्ट राहणे अधिक बरे नाही का?

उत्तर : अशाही गरीब माणसाने परदेशी कापडाच्या घाणीपासून स्वतःला स्वच्छ करून घ्यावे. वाइटातला वाईट प्रसंग आला तर त्यांनी नंतर खादीकरता भीक मागावी. त्यांनी मित्रापासून पैसे उसने घ्यावेत किंवा सक्त मेहनत करून पैसे मिळवावेत. पण दरम्यान लंगोटीशिवाय त्यांनी काही वापरू नये. कठोर निश्चय केला तरच अनेक अडचणी दूर होतील. असा निश्चय म्हणजेच प्रार्थनेचा एक प्रकार आहे, व ती सफल होतेच.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', ११-९-१९२१

२२३. स्वदेशीवर व्याख्यान मुंबई

जुलै ३०, १९२१

गांधी म्हणाले, ३० जून रोजी हिंदी लोकांनी देशाविषयीचे आपले कर्तव्य केले, त्याबद्दल अभिमान वाटला पाहिजे. कारण आपल्या असे प्रत्ययास आले की, एखादी गोष्ट सरकारच्या पाठिंब्याशिवाय किंवा

१. गांधीजी पारश्यांच्या एका मोठ्या सभेत बोलले. ती सभा एक्सेलशियर थिएटरमध्ये पारशी राजकीय सभेतर्फे भरली होती.

आश्रयाशिवाय आपण करू शकतो. पैशाच्या अभावाची आपली भीती आता दूर झाली आहे. आणि माझ्याकडे न मागता पारशी, मुसलमान व हिंदू मित्रांकडून टिळक स्वराज्य फंडाला पैसे येत आहेत. याचाच अर्थ हिंदी लोकांना मातृभूमीसंबंधीच्या कर्तव्याची जाणीव होऊ लागली आहे हा होय. माझी आता अशी खात्री आहे की, जर जमा झालेला पैसा योग्य रीतीने खर्च केला, तर एक कोटीच काय पण चार कोटीसुद्धा आपण जमवू शकू. पण मला हे वर्ष संपण्याच्या आत स्वराज्य हवे आहे. याचा अर्थ यापुढे आपल्याला आणखी पैसा जमा करावा लागणार नाही. पण माणसाची योजना एक असते आणि देवाची दुसरीच आणि कदाचित माणसाची इच्छा पुरीही होणार नाही. जर हिंदुस्थानातील स्त्री-पुरुषांनी आपले देशाविषयीचे कर्तव्य केले तर यश खात्रीने मिळेल. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने आता असे ठरविले आहे की, आपण शक्य तितकी जास्त खादी निर्माण करण्यात आपली शक्ती खर्च करावी. स्वदेशीशिवाय तुम्हांला स्वराज्य मिळणार नाही. हिंदी लोकांना देशात तयार झालेल्या कापडाचे कपडे नको होते पण इंग्लंड, फ्रान्स, जपानहून आलेले कपडे आवडत होते. कारण त्यांना वाटले की, देशातील कापड आपल्या गरजाकरिता सुंदर किंवा कलापूर्ण नाही. असेच जर तुम्हांला वाटत असेल तर स्वराज्य कसे मिळणार? अन्न व वस्त्र ही दोन हिंदुस्थानची फुप्फुसे आहेत. आणि जर त्यांना रोग झाला तर हिंदुस्थान फार दिवस जगणार नाही. उपासमारीच्या काठावर उभे असलेले किती कोटी लोक या देशात आहेत? जर तुम्ही त्यांचा विचार केलात तर त्या लोकांना अन्न देणे हे तुमचे कर्तव्य आहे असे तुम्हांला दिसून येईल. जर तुम्ही आपल्या देशाचा इतिहास वाचलात तर तुम्हांला असे आढळून येईल की, जेव्हापासून हिंदुस्थानने सूतकताई आणि विणकाम सोडले आणि परदेशी कापड वापरणे सुरू केले, तेव्हापासून हिंदुस्थान दारिद्र्यात सापडला आणि जोपर्यंत ह्या गोष्टी सुधारत नाहीत तोपर्यंत आपले हाल असेच होत राहणार. जर पारशी कोट्यधीशांनी आपला सारा पैसा ह्या देशातल्या गरिबांना दिला तरी त्याचे हाल संपणार नाहीत. तुम्हांला ह्या देशातील कोट्यवधी लोकांना सदावर्तावर अवलंबून ठेवावयाचे आहे काय? का तुम्हांला गरिबांना स्वावलंबी करावयाचे आहे? आपल्या श्रमाने, आपल्या कामाने हे लोक आपले अन्न मिळवितील, आपले कपडे मिळवितील, आणि या जरूरीच्या वस्तूकरिता त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहण्याचे शिकविता कामा नये. या देशातील गरिबांना काम देण्याचा एकच मार्ग आहे. आणि तो म्हणजे हिंदी लोकांनी खादी वापरणे. काहीजण असे मला विचारतील की, ज्या

अहमदाबाद आणि मुंबईसारख्या शहरांत मजुरांचा भयंकर तुटवडा आहे अशा ठिकाणी हे गरीब लोक का येत नाहीत? हिंदुस्थानातील गरीब लोक आपली घरेदारे सोडतील आणि गिरण्यात मजुरीकरिता जातील असे मला वाटत नाही. ते गेले असे समजू या, तर परिणाम काय होईल? हिंदी लोकांना उपाशी मरावे लागेल. कारण जमीन कोण नांगरणार? व गहू व इतर धान्ये त्यांच्याकरिता कोण पिकविणार? हिंदुस्थान त्या परिस्थितीत एक जंगल होईल आणि लोकांना उपाशी मरावे लागेल. म्हणून सारे लोक शहरात जाणे अशक्य आहे. जोपर्यंत या देशात एकही मनुष्य उपाशी राहात असेल तोपर्यंत हिंदी लोकांनी काटकसरीने वागणे हे त्याचे कर्तव्य आहे. त्यांनी निरुपयोगी चैनीत दंग होऊ नये. म्हणून मी माझ्या मित्रांना असे सांगत आहे की, आपल्याला कोणत्याही सुधारणा मिळोत, कौन्सिलात कोणतेही ठराव पास होवोत, जोपर्यंत तुम्ही या देशातून दारिद्र्य घालवीत नाही तोपर्यंत तुमचे सारे प्रयत्न व्यर्थ आहेत. म्हणून मी माझ्या पारशी मित्रांना अशी विनंती करतो की, त्यांनी हिंदुस्थानची खरी परिस्थिती समजून घ्यावी. देशाला कोणता रोग जडला आहे याचे निदान करावे आणि नंतर स्वदेशीचे पालन करून तो रोग दूर करण्याचा प्रयत्न करावा. पारशी बांधव हे चैनीत कितीही दंग झालेले असोत त्यांना भारी किंमतीच्या वस्तू आणि कपडे वापरणे कितीही आवडो, पण त्यांना देशाची गंभीर परिस्थिती एकदा समजली म्हणजे त्यांनी आम्ही मातृभूमीबद्दल कर्तव्य करावयास तयार आहोत असे साऱ्या देशाला दाखवावे; त्यांनी दुसऱ्या जमातींच्या पावलावर पाऊल न टाकता इतर मागासलेल्या जमातींना स्वराज्याच्या ध्येयाकडे घेऊन जावे. माझा असा पूर्ण विश्वास आहे की जी जमात या देशातील अनेक प्रश्नांत आघाडीवर आहे ती जमात याही वेळी देशाला पुढे नेईल आणि मागे पडणार नाही. निरनिराळ्या जमातींना आपल्याबरोबर घेतल्याशिवाय पुढे जाणे अशक्य आहे. आणि हिंदुस्थानला एकही जमात मागे टाकून चालणार नाही. जे पारशी लोक अनेक प्रश्नांत प्रमुख भाग घेत आहेत ते याही बाबतीत घेतील यात मला शंका नाही. पारशांनी असे म्हणू नये की, आमच्यापुढे दोन महिने असल्यामुळे आम्ही ३० सप्टेंबरपर्यंत काही करणार नाही आणि शेवटच्या दिवशी साऱ्या गोष्टी सोडून देऊ. पारशी जमातीची येत्या सोमवारी[१] परीक्षा होणार आहे. आणि मी पारशी मित्रांना पूर्णपणे

१. ऑगस्ट १; त्या दिवशी बहिष्काराची मोहीम सुरू होणार होती.

ओळखत असल्यामुळे ते त्या परीक्षेत कमी पडणार नाहीत हे मला ठाऊक आहे. ज्या जमातीबरोबर मी इतकी वर्षे राहिलो तिची ओळख मला कशी असणार नाही? ज्या स्त्री-पुरुषांनी टिळक स्वराज्य फंडाला इतका पैसा दिला, ज्यांनी आपले दागदागिने दिले, त्यांनी १ ऑगस्टला आपले कर्तव्य करण्यास चुकू नये. तुम्ही सर्वांनी त्या दिवशी आपले सगळे परदेशी कपडे टाकून द्यावे. जे कपडे वापरणे पाप आहे असे तुम्हांला वाटते ते क्षणभरही जवळ ठेवू नका. तुम्ही हे लक्षात ठेवा की, हे परदेशी कपडे वापरून तुम्ही आपल्या लक्षावधी देशबांधवांना उपाशी मारीत आहात. ते कपडे दूषित असल्यामुळे नष्ट केले पाहिजेत आणि जवळ बाळगता कामा नयेत. जे कपडे वापरणे तुम्हांला पाप वाटते ते कपडे गरिबांनी वापरणे हेदेखील पापच आहे. आणि म्हणून मी तुमचे कपडे गरिबांना देऊन टाकण्याच्याही विरुद्ध आहे. तुमची इच्छा असेल तर ते हिंदुस्थानबाहेर स्मर्नाला पाठवून द्या. मी तुम्हांला खादी वापरण्यास सांगतो, आणि गरिबांना गिरणीचे कापड वापरू द्या असेही सांगतो. जे यंत्रावर केले जाते त्यापेक्षा हातांनी केलेले अधिक कलापूर्ण असते, अधिक सुंदर असते. आणि एकंदरीने अधिक चांगले असते. जे यंत्रावर केले जाते ते सर्व गरिबांच्याकरिता असते. श्रीमंतांनी स्वतःला लागणारे सूत काढावे आणि आपल्याला आवडेल तशा प्रकारचे कापड विणण्याकरिता स्वतःच्या विणकराकडे पाठवून द्यावे. परदेशी कापडाचा वापर सुरू करण्यापूर्वी हीच पद्धत चालू होती. या देशात असणारे सर्व कलापूर्ण हस्तव्यवसाय आपण पूर्ण विसरलो आणि गिरण्यांत तयार झालेल्या परदेशी वस्तू घेऊ लागलो. त्याचे कारण त्या वस्तू फ्रान्स किंवा इंग्लंडमधून येतात म्हणून. आपल्यात मूळची कलकता नाही असे वाटून तुम्ही प्रत्येक वस्तूकरिता परदेशाच्या तोंडाकडे पाहावे काय? तुम्ही आपले सर्व व्यवसाय विसरलात काय? आणि आपल्या गरजांकरिता परदेशांवर तुम्ही इतके अवलंबून आहात काय? मी तुम्हांला सर्व परदेशी वस्तू टाकून द्यावयास व देशाकरिता थोडासा त्याग करण्यास विनंती करतो. वास्तविक तो त्याग नाही. ती देशसेवाच आहे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे जवळजवळ ३०० सभासद मुंबईला शुद्ध पांढरी खादी घालून आले आहेत हे पाहून मला आनंद होतो. याबद्दल मि. पिकथॉल काय बोलले होते याचे मला वारंवार स्मरण होते. ते म्हणाले की, जर तुम्हांला एखादा नवा रंग हवा असेल तर प्रथम सारी घाण धुवून टाकून पांढरे स्वच्छ व्हा. याचा अर्थ रंगीत कापड वापरण्यापूर्वी तुम्ही शुद्ध पांढरी खादी वापरली पाहिजे. खादीमध्ये शुचिता, पावित्र्य आणि सौंदर्य

आहे, आणि जे ती वापरतात त्यांची गैरसोय होत नाही. आपल्या हिंदी राष्ट्रीयत्वाची ती निशाणी आहे आणि आता आपण ती वापरलीच पाहिजे. नंतर गांधी म्हणाले, जो प्रतिज्ञेचा कागद तुमच्यामध्ये फिरविला जात आहे त्यावर योग्य विचार करून तुमच्या नावाच्या सह्या करा. सह्या केल्यानंतर तुम्हांला खाली पाहण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून पूर्ण विचार करून सह्या करा. त्या सह्या अगदी स्वेच्छेच्या असाव्यात. त्यात कोणतीही सक्ती असू नये.

'मुंबई क्रॉनिकल', ३१-७-१९२१

२२४. माझी टिप्पणे

पांढऱ्या शुभ्र कपड्यांत हिंदुस्थान

टिळकांच्या जन्मदिवशी क्रॉनिकलचे संपादक मि. पिकथॉल हे खादी पोषाख व खादी टोपी घालून आलेले पाहताच मला नवल वाटले. आणि त्याहीपेक्षा त्यांचे त्रोटक पण अत्यंत शुद्ध भावनांनी भरलेले भाषण ऐकून मला अधिक आनंद झाला. ते म्हणाले : "ही आत्मशुद्धीची चळवळ आहे. पुढील काही काळ फक्त पांढरे कपडे वापरण्याने हिंदुस्थानचे काहीही नुकसान होणार नाही. पांढरे कपडे घालून आपले ध्येय गाठल्यानंतर तुम्ही हवे तर त्यात रंग भरा." आपण पांढरी खादी वापरतो कारण ती रंगवून घेण्यास आपल्याला वेळ नाही. शिवाय पुष्कळांना रंग आवडत नाहीत, कारण ते परदेशी असतात. मि. पिकथॉल यांना खादीच्या शुभ्रपणात आपल्या चळवळीची शुद्धता दिसावी ही एक सुंदर कल्पना आहे असे मला वाटले. आज आपण सर्व रंग सुंदर आहेत असे मानतो, मग ते कोठूनही येवोत. तथापि खरोखरच ते ओंगळ डाग आहेत. जे रंग योग्य वस्तू रंगविण्याकरिता काळाचा नीट विचार करून व ते कोठून आले हे लक्षात घेऊन वापरले जातात, त्याच रंगात सौंदर्य आणि कला असते. एखाद्या मुलाने कागदाच्या चिठोऱ्यावर केलेले कुंचल्याचे काम आणि ज्यात आत्मा ओतला आहे अशी कलाकाराची कृती यात किती अंतर आहे! सध्या आपली जी रंगाबद्दल आवड आहे ती एखाद्या मुलाने कुंचल्याने रंगविलेल्या रंगाच्या ठिपक्यासारखी आहे. जोपर्यंत बहुसंख्य लोक पांढरे कपडे वापरण्याला सुरुवात करीत नाहीत तोपर्यंत या देशात

कलाकार निर्माण होणार नाहीत आणि देशातील दुकानांतून आपल्याला रंगीत चित्रे दिसणार नाहीत. दर्जेदार सामग्री असल्याशिवाय सुंदर आकृती दिसू शकत नाही असे म्हणतात. त्याचप्रमाणे डोळ्यांना आणि मनाला आल्हाद देणाऱ्या विविध आकृती जोपर्यंत पांढऱ्या शुद्ध खादीपासून आपण सुरुवात करीत नाही तोपर्यंत दिसणार नाहीत. आज जे आपण रंग पाहतो ते थडग्याला फासलेल्या पांढऱ्या चुन्याच्या रंगासारखे आहेत. ज्याला हिंदी कलाकृती विकसित झालेली पहावयाची असेल त्यांनी परदेशी कापडाची घाण टाकून दिली पाहिजे आणि सफेत पार्श्वभूमी तयार केली पाहिजे. ज्याप्रमाणे रांगोळ्या काढण्यापूर्वी आपण आपले अंगण सारवतो, त्याप्रमाणे देशाच्या दारात पडलेली परदेशी कापडाची घाण ताबडतोब काढून टाकून ते स्वच्छ केले पाहिजे.

एक पारशी भगिनी

आपल्या पारशी बंधुभगिनींनी राष्ट्रीय चळवळीत जोराने भाग घ्यावयास सुरुवात केली आहे. श्रीयुत गोदरेज यांनी आपल्या तिजोऱ्यात बनविण्याचा सारा धंदा देशाकरिता चालविण्याचे ठरविले आहे असे दिसते. दारू गुत्त्यांवर निरोधन करण्याकरिता पारशी तरुण पुढे येत आहेत. पारशी गृहस्थ खादी वापरू लागले आहेत. देशाच्य पितामहांची नात पेरिनबेन हिने डोक्यापासून पायापर्यंत जाड खादी वापरण्यास सुरुवात केली आहे. पारशी भगिनींनी टिळक स्वराज्य फंडाला आपले जवाहीर देऊन टाकले. पारशी राजकीय सभेने टिळकांची जन्मतिथी एंपायर थिएटरमध्ये साजरी केली. आताच एका मुंबईच्या पारशी भगिनीने दारू गुत्त्यांवर पिकेटिंग करण्याची इच्छा व्यक्त केली. आणि तिने इतर भगिनींनाही त्याकरिता बोलाविले. ही भगिनी असे म्हणते की, जर इतर स्त्रिया निरोधनात सामील होतील तर निरोधनामुळे अत्याचार होईल ही वाटत असलेली भीती नाहीशी होईल आणि निरोधकांमध्ये मवाली लोक असतात असा जो आरोप करण्यात येतो त्यातूनही आपण सुटू. ह्या महिलेला माझे धन्यवाद.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ३१-७-१९२१

२२५. निवडणुकीसंबंधी कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा ठराव[१]

[मुंबई, जुलै ३१, १९२१]

महात्मा गांधींनी पुढील ठराव मांडला

१७. गेल्या महिन्यात बंगाल व मद्रासमध्ये झालेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या निवडणुकीसंबंधी घटनात्मक प्रश्नांना बाध येऊ न देता आणि त्यातील गुणावगुणामध्ये न शिरता, पुढील नोव्हेंबरात किंवा त्यापूर्वी साऱ्या हिंदुस्थानात नव्या निवडणुका झाल्याच पाहिजेत ही गोष्ट लक्षात घेऊन आणि सर्व कॉंग्रेस संघटनांपुढे सध्या जोरदार व फार मोठा कार्यक्रम ठेवला आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन ह्या कमिटीला देशाच्या हिताच्या दृष्टीने वरील निवडणुकांत बिघाड करणे हे अनिष्ट वाटते. आणि ज्या बंगाल व मद्रासमधील लोकांना आपल्यावर अन्याय झाला असे वाटत असेल त्यांना असा सल्ला देते की, हा कार्यक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने त्यांनी दोनही प्रांतांतील प्रांतिक संघटनांबरोबर सहकार्य करावे-

' बॉम्बे सीक्रेट ॲबस्ट्रॅक्ट्स् ', १९२१

२२६. खादी प्रदर्शनाच्या उद्घाटनाचे भाषण, मुंबई[१]

जुलै ३१, १९२१

महात्मा गांधींनी प्रदर्शन उघडण्यात आले असे जाहीर करताना असे म्हटले की, मी, अध्यक्ष आणि मिसेस अटिया बेगम यांनी याबाबतीत

१. कॉंग्रेस वर्किंग कमिटीची सभा मणिभवन लॅबरनम रोड येथे सकाळी ८॥ वाजता भरली. त्या ठरावाला महंमद अलींनी दुजोरा दिला व ठराव बहुमताने पास झाला.

१. हे प्रदर्शन राष्ट्रीय स्त्री-सभेने भरविले होते.

घेतलेल्या महान कष्टांबद्दल त्यांचे आभार मानतो; अटिया बेगम यांनी प्रदर्शन यशस्वी करण्याकरिता रात्रंदिवस मेहनत घेतली. त्यांच्याबरोबर इतर कार्यकर्ते आहेत हे मला ठाऊक आहे. आणि त्यांनाही मी धन्यवाद देतो. पण या प्रदर्शनामागे अटिया बेगम ही प्रेरक शक्ती आहे. अशी संघटना-शक्ती असणाऱ्या अशा स्त्रिया या देशात आहेत हे पाहून मला आनंद होतो. मी, अध्यक्ष व त्यांच्या भगिनी यांनी या बाबतीत केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे आभार मानतो. याची सूत्रचालक एक मुस्लिम भगिनी आहे याचा मला विशेष आनंद होतो.

खादीच्या पुष्कळ वस्तू करता येतात हे सध्या लोकांना सांगण्याचा प्रसंग यावा हे दुर्दैव आहे. लोक प्रदर्शनाचा फायदा घेतील अशी मला आशा आहे. गांधीजी म्हणाले, तिला खादी म्हणतात की जी हाताने विणलेली व ह्या देशात तयार झालेली असते. आपल्या देशात अत्यंत तलम कापड निघू शकते ही आनंदाची गोष्ट आहे. विशेषतः बेझवाडा व गंजम जिल्ह्यात ती निघते. त्या इलाख्यातील ह्या भागात तयार केलेल्या साड्या सभेत हजर असलेल्या पुष्कळ भगिनी नेसल्या असतील. आणि अशा तलम साड्या ह्या देशात होऊ शकतात ह्याचा त्यांना अभिमान वाटला पाहिजे. पण जो गृहस्थ ह्या मोहिमेत असे सुंदर कापड निर्माण होण्यास मुख्यतः जबाबदार आहे तोही येथे आहे. त्याचे पातक इतकेच की, त्यांनी खादी आपल्या प्रांतात लोकप्रिय केली आणि तेथे तिच्या उत्पत्तीला उत्तेजन दिले.

या गृहस्थांनी खादी लोकप्रिय केली म्हणूनच त्यांना तुरुंगात टाकले असे गांधी म्हणाले नाहीत. परंतु लोकांत खादीचा वापर लोकप्रिय करण्याच्या गुन्ह्याशिवाय दुसरे काही त्या गृहस्थाने केले नाही. सरकारला आता अशासारख्या लोकांची भीती वाटू लागली आहे व ते कोणत्या ना कोणत्या कारणाने अशा लोकांना तुरुंगात टाकण्याच्या प्रयत्नात आहेत.

म्हणून आपले कर्तव्य शुद्ध शुभ्र खादी घालून तुरुंगात जाण्याचे आहे. आंध्र प्रांताचे सिंह वेंकटपय्या हे काँग्रेस व स्वदेशीकरता काम करणारे एक कट्टे कार्यकर्ते आहेत. ते शुद्ध शुभ्र खादी घालून तुरुंगात गेले, तसेच आपण गेले पाहिजे. सरकारने असा छळ सुरू केला आहे, कारण त्यांना वाटते की, लोक जे बोलतात, ते ३० सप्टेंबरपूर्वी अमलात आणण्याचा त्यांनी कृतनिश्चय केला आहे. जेव्हा लोकांनी कामाला सुरुवात केली, तेव्हाच त्यांनी सरकारला निर्वाणीचा निश्चय कळविला होता. मि. शेरवाणी व मि. वेंकटपय्या यांनी देशविषयक कर्तव्य पार पाडीत असता तुरुंगात जाण्याचे जे विलक्षण धैर्य दाखविले, त्याबद्दल मी त्या दोघांचे अभिनंदन करतो. पण

लोकांनी अशा छळांना भिता कामा नये, कारण जोपर्यंत आपण आपले कर्तव्य करित असतो, तोपर्यंत जगात कोणालाही भिण्याचे कारण नाही. आपल्या वैयक्तिक सोयी व चैनी यांचा त्याग करून व खादी वापरून लोकांनी देशाबद्दल जे काय करता येईल ते करावे अशी माझी विनंती आहे. मी पुरीला गेलो असता, लोक भुकेने उपाशी मरत असताना पाहिले आणि असे ३ कोटी लोक या देशात आहेत. जेव्हा आपले शेतकरी रिकाम्या वेळात चरखे चालवीत होते तेव्हा ते आपल्या उत्पन्नात भर घालीत असत, आणि त्या प्रकाराने भुकेचा राक्षस घराबाहेर ठेवीत असत; पण आता लोक मँचेस्टरचे कापड वापरू लागल्यामुळे शेतकऱ्यांचा धंदा बुडाला आणि ते उपाशी मरू लागले. खुद्द जगन्नाथाच्या देवळात देवाच्या मूर्तीला विलायती कपडे नेसवले होते. मी पुजाऱ्याला विचारले, तू या प्रकाराने देवाला लाजवीत नाहीस का? लोक अशी तक्रार करतात की, माझे मित्र विठ्ठलदास जेराजानी व नारायणदास पुरुषोत्तम यांनी खादीच्या किमती वाढविल्या आहेत. मी तुम्हांला सांगू इच्छितो की, हे मित्र हा जो धंदा करीत आहेत तो चालू खर्च भागवावा म्हणून. त्यांचा या धंद्यातून कसलाही फायदा मिळवण्याचा हेतू नाही. काही जण अशी तक्रार करतात की, विणकर आमच्या खादीकरता अधिक पैसे मागतात. तसे असेल तर त्यांचा दोष काय? डॉक्टर्स व वकील जेव्हा आपले फीचे दर वाढवितात, तेव्हा कोणी तक्रार करतो का? त्यातील काही जण दररोज १००० रु. कमवतात; आणि जर गरीब विणकरांनी चारदोन आणे जास्त मागितले तर बिघडते कुठे? त्यांना काय त्यांच्या कुटुंबांना पोसावयाचे नाही? आणि चार पैसे त्यांना अधिक मिळाले तर त्यांच्या कुटुंबांना आजपर्यंत जे मिळत नव्हते, ते आपल्या कुटुंबांना ते देणार नाहीत का? पण लोकांनी त्याबद्दल का तक्रार करावी? विणकरांनी आतापेक्षा दरा अधिक वाढ केली तरी लोकांनी तक्रार करू नये.

या देशाच्या पुनरुत्थानाकरता मला प्रत्येक घर कताई-गिरणी व प्रत्येक बोळ विणाई-गिरणी व्हावयास पाहिजे आहे. जर आपल्या स्त्रिया सिनेमा वगैरेला जाण्याकरता जो वेळ वाया दवडतात, तो वेळ जर त्यांनी विणकामात घालविला, तर हिंदुस्थान कापडाच्या बाबतीत आपले रक्षण करू शकेल.

'मुंबई क्रॉनिकल', १-८-१९२१

२२७. स्वदेशीवर भाषण, मुंबई[1]

जुलै ३१, १९२१

मी आजचा दिवस मुंबईला शुभ दिवस आहे असे मानतो. आज आपण आपल्या शरीराला लागलेली घाण दूर करीत आहोत. आपल्या गुलामगिरीची परदेशी कापड ही जी निशाणी आहे ते कापड टाकून देऊन आपण आत्मशुद्धी करीत आहो. आज आपण स्वातंत्र्यमंदिरात प्रवेश करण्यास स्वतःला लायक करीत आहोत.

काही जण म्हणतात की, टाकून दिलेल्या कापडाचा नाश करणे हे क्रोधाचे व दुष्ट वृत्तीचे लक्षण आहे. ते तसे लक्षण आहे किंवा नाही, हे ज्या वृत्तीने आपण ते कापड जाळू त्यावर अवलंबून राहील.

इंग्लिश, अमेरिकन्स, जपानी किंवा फ्रेंच लोकांविरुद्ध आपला दुरावा का असावा? जोपर्यंत आपण त्यांचे कापड विकत घेत राहू तोपर्यंत ते आपल्या कापडाचे ढीगच्या ढीग येथे पाठवीत राहतील. म्हणून जर आपण रागावलो असलो, तर स्वतःवरच रागवावे. परदेशी सुंदर वस्तूंनी भुलून जाण्याचे जेव्हा आपण थांबवू तेव्हाच परक्या देशांचे वाईट आपण चिंतणार नाही.

तुर्कस्थानमध्ये घडणाऱ्या गोष्टीमुळे आपले मुसलमान बांधव बेचैन झाल्याचे मला दिसतात. खिलाफतीच्या अन्यायामुळे त्यांचा आता धीर सुटला आहे. माझी त्यांना अशी सूचना आहे की, खिलाफतीची सेवा करण्याचा अगदी नजिकचा व अगदी सरळ मार्ग जर कोणता असेल तर स्वदेशी. कारण स्वदेशीचा अंगीकार करून आपण हिंदुस्थान बलशाली करू आणि हिंदुस्थानची शक्ती वाढणे याचा अर्थ खिलाफतीच्या रक्षणाकरता आपली शक्ती वाढणे असा आहे.

पण आपल्या मनात आज उसळणारा कोणता विचार असेल, तर उद्या लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी करण्याकरता आत्मशुद्धी करणे हा होय. आपण जोवर स्वदेशीची प्रतिज्ञा घेतली नाही तोवर स्वतःला शुद्ध करणार नाही. म्हणून ज्यांनी आपले कपडे वाटण्याकरता किंवा बाहेरदेशी पाठविण्याकरता दिले असतील, त्यांनी

१. परदेशी कापडाची होळी करून स्वदेशी चळवळीच्या मोहिमेची ही ऐतिहासिक सभा एल्फिन्स्टन मिल्स, परळ, येथे भरली. गांधींच्या भाषणाच्या छापील प्रती सभेत पूर्वीच वाटल्या होत्या. हे भाषांतर वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते.

पुन्हा परदेशी कपडे न वापरण्याचा निश्चय केला पाहिजे. माझ्या दृष्टीने लोकमान्यांचे पुण्यस्मरण करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे स्वराज्यप्राप्ती. आणि स्वदेशीशिवाय स्वराज्य अशक्य आहे. आणि स्वदेशीची सुरुवात, परदेशी कापडाचा संपूर्ण व कायमचा त्याग करूनच सूचित करता येईल. म्हणून हा होळी-समारंभ मी एक धार्मिक संस्कार मानतो. हा पवित्र समारंभ माझ्या हातून होत आहे हे मी भाग्य समजतो. परमेश्वर आपली सारी, आतील व बाहेरील घाण दूर करो! येत्या ३० सप्टेंबरपर्यंत परदेशी कापडाचा संपूर्ण बहिष्कार घडवून आणण्याचा– पवित्र निश्चय अमलात आणण्याची शक्ती परमेश्वर आपणास देवो!

'मुंबई क्रॉनिकल', १-८-१९२१

२२८. स्वदेशीवर भाषण, मुंबई[1]

जुलै ३१, १९२१

म. गांधी आपल्या भाषणात म्हणाले, चरखा आपली तरवार आहे; त्या तरवारीने आपण स्वराज्याची लढाई केली पाहिजे व देशाला स्वराज्य मिळवून दिले पाहिजे. चरखा हाच आपल्याला धर्म-रक्षणाकरता समर्थ करील. देशात सर्वत्र खादीचा वापर केला जाणे हे पाहणे आपले कर्तव्य आहे. स्वदेशीवर आपली मुक्ती अवलंबून आहे, आणि आपण परदेशी कापडाचा वापर कायमचा सोडून देणे हे आपले कर्तव्य आहे. जे परदेशी कपडे आपण सध्या वापरत आहोत ते पाश आहेत. त्या पाशांनी आपण परदेशीयांशी हातापायांनी बांधले गेले आहोत. जर तुम्हांला हा देश कायमचा स्वतंत्र झालेला पाहावयाचा असेल तर तुम्ही परदेशी कपडे टाकून द्या. जे उपासमारीच्या काठावर उभे आहेत अशा गरीब हिंदी बांधवांचा विचार करणे हे प्रत्येक हिंदी माणसाचे आवश्यक कर्तव्य आहे. कारण तुम्हीच स्वदेशी कापड टाकून दिलेत व परदेशी वस्तू वापरण्यास सुरुवात केलीत.

आता ज्या अर्थी तुम्हांला तुमच्या गरीब बांधवांच्या दैवाची जाणीव झाली, त्या अर्थी तुम्ही त्यांना कायमचे त्याच स्थितीत ठेवणारे

१. हे भाषण परळच्या मोतिशांच्या देवळाच्या पटांगणात झालेल्या सभेत झाले.

आहा काय ? मला तसे वाटत नाही. ज्यांनी अजूनपर्यंत हे कपडे टाकले नसतील ते तत्काळ त्यांचा त्याग करतील याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. मी येथे हजर असलेल्या माझ्या भगिनींनाही विनंती करतो की, त्यांनी परदेशी सुबक वस्तू टाकून द्याव्यात व देशाकरता खादी वापरावी. संपूर्ण स्वदेशीचा अंगीकार करूनच तुम्हांला ज्या गुलामगिरीच्या पाशात आपण सध्या आहोत, त्यापासून कायमची सुटका करून घेता येईल. कारण खरी स्वदेशी म्हणजे खरे स्वराज्य, आणि आपल्या देशाला स्वराज्य मिळालेच पाहिजे. ह्या कठीण प्रसंगी तुम्ही देशाविषयीचे कर्तव्य करा व कायम टिकणारे स्वराज्य मिळवा, अशी माझी तुम्हांला कळकळीची विनंती आहे.

'मुंबई क्रॉनिकल', १-८-१९२१

२२९. जे. बी. पेटिट यांना पत्र

[जुलै १९२१ चा अखेर]

प्रिय मि. पेटिट,

चालू महिन्याच्या १८ तारखेला पाठविलेल्या नोटबद्दल आभारी आहे. मला वाटले नोट २,००० रु. ची असेल. मी स्मरणाने लिहीत आहे. २,००० रु. च्या नोटपैकी ५०० रु. अवश्य पाठवा.

तुमचा स्नेहांकित

फोटोस्टॅटवरून; जी. एम्. ८२३१

२३०. खेडा जिल्ह्यातील लोकांना संदेश

[१३ ऑगस्ट १९२१ पूर्वी]

खेडाच्या बंधुभगिनींनो, मी नेहमी तुमच्याबद्दल पुष्कळच अपेक्षा बाळगल्या होत्या. पण आता तुमच्या अंतःकरणात भाई अब्बास तैय्यबजी यांना स्थान दिल्याबद्दल माझ्या आशा वाढल्या आहेत. टिळक स्वराज्य फंडाला तुम्ही अपेक्षेपेक्षा अधिक पैसे दिले. दुसरी एक राष्ट्राची प्रतिज्ञा पुरी व्हावयाची आहे. ती अधिक कठीण असली तरी तुम्हांला अधिक कठीण नाही. शेतकऱ्याला परदेशी कापडाबद्दल प्रेम असू शकणार नाही. तलम कापडाचे कपडे वापरण्यास त्याला लाजच वाटेल. इतर कोणत्याही गोष्टी-पेक्षा जी एकच गोष्ट खेडा जिल्ह्यातील भीती घालवून देईल, ती म्हणजे चरखा आहे. चरख्याच्या विलक्षण शक्तीची आपल्याला जाणीव झाली आहे. यानंतर आपण त्यावरच अवलंबून राहिले पाहिजे. तसे करण्याकरिता आपण ताबडतोब परदेशी कापड टाकले पाहिजे. त्याकरिता टिळकमहाराजांच्या पुण्यतिथीसारखा दुसरा पवित्र दिवस नाही. त्या दिवशी तुमच्या परदेशी कापडाची होळी करा आणि स्वतः शुद्ध व्हा. तसे केल्यावर असा निश्चय करा की, यापुढे कोणत्याही जातीच्या असणाऱ्या कमीत कमी कपड्यावर आम्ही भागवू, आणि खुद्द खेडामध्ये आम्ही आम्हांला लागणारी सर्व खादी उत्पन्न करू. ह्यात परमेश्वर तुम्हांला साह्य करो.

मोहनदास करमचंद गांधी

[गुजरातीवरून]
' गुजराती ', ७-८-१९२१

२३१. स्वदेशीवर भाषण, मुंबई

ऑगस्ट १, १९२१

महात्मा गांधी म्हणाले, हा प्रचंड समुदाय येथे व्याख्याने ऐकण्या-करिता आला नाही. तुम्ही सर्वजण येथे लोकमान्य टिळकांची पूजा

करण्याकरिता आला आहात. तुम्ही टिळकमहाराजांना श्रद्धांजली अर्पण करणार आहात. माझा संदेश वृत्तपत्रांत प्रसिद्ध होईल आणि लोक तो तेथे वाचतील. याच वर्षाच्या आत स्वराज्य मिळविण्याच्या निश्चयाने इतके लोक येथे आलेले पाहून माझ्या अंतःकरणाला आनंद होत आहे. ह्याच वर्षात स्वातंत्र्य मिळविण्याकरिता आपल्याला शिकस्तीचे प्रयत्न करावयास पाहिजेत. त्या उद्दिष्टाकरिता आपण ३० सप्टेंबरपूर्वी सर्व परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याची शपथ घेतली आहे. ती शपथ धार्मिकपणे पाळणे हे आपले कर्तव्य आहे. मला जास्त काही बोलावयाचे नाही. कारण येणारी लाट फार वेगाने येत आहे. तुम्ही ज्या अर्थी येथे शांतपणे बसला आहात, त्या अर्थी तुम्ही सर्वजण अनत्याचारी असहकारितावादी आहात असे सिद्ध होते. हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन व ज्यू घेतलेली शपथ पाळतील अशी मला आशा आहे. टिळकांनी आपल्याला स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे शिकविले; आणि स्वातंत्र्य मिळवूनच आपण देशाविषयीचे कर्तव्य केले असे होईल. तुम्ही शांतपणे घरी निघून जा आणि स्वदेशी व्रत आताच नव्हे पण चिरकाल पाळा अशी माझी विनंती आहे. स्वराज्य मिळविल्या-नंतरही स्वदेशी टाकू नका असे मी बजावतो.

'मुंबई क्रॉनिकल', २-८-१९२१

२३२. जाहीर सभेत भाषण, मुंबई[1]

ऑगस्ट १, १९२१

लोकमान्य टिळकांच्या नावातील जादूमुळे काल मि. सोबानी यांच्या मैदानावर दोन लाख स्त्री-पुरुष एकत्रित झाले होते. मला तो हृदय उचंबळून टाकणारा देखावा वाटला. सुंदर मुंबईने काल जो अग्नी प्रज्वलित केला, तो पारश्यांच्या अग्यारीतील अग्नीप्रमाणे सतत जळत राहिला पाहिजे. आणि ज्या अर्थी आपण काल आपल्या परदेशी कापडाच्या सर्वांत मोठ्या घाणीचे दहन केले, त्या अर्थी त्या अग्नीने आपली

१. ही सभा चौपाटीवर भरली होती. ह्या भाषणाच्या प्रती छापून लोकांना वाटल्या होत्या.

सारी घाण सतत जाळली पाहिजे. आपण परदेशी कापडाला कधीही स्पर्श करणार नाही, या निश्चयाचे ते द्योतक असावे. ज्या हिंदू, मुसलमान, जैन, शीख, पारशी, ख्रिश्चन, ज्यू आणि इतर जमातींनी हिंदुस्थानला आपले घर मानले आहे, त्यांनी परदेशी कापडाला स्पर्श न करणे हे आपले कर्तव्य समजले पाहिजे. सर्व धर्मांना तो एक आवश्यक समान घटक असला पाहिजे. ज्याप्रमाणे प्रत्येक धर्मनिष्ठ हिंदूने दलित वर्गाची अस्पृश्यता हे पातक समजले पाहिजे, त्याप्रमाणे आपण सर्वांनी परदेशी कापडाला स्पर्श न करणे हे पुण्य मानले पाहिजे. म्हणून काल आपण अत्यंत उदात्त असा त्याग केला. लोकमान्यांची पुण्यतिथी साजरी करण्यास मुंबईने आपली लायकी सिद्ध केली. लोकमान्यांचा महान स्वार्थत्याग, त्यांचे दुर्दमनीय धैर्य आणि त्यांचा कडक साधेपणा यांचे स्मरण जतन करू या. त्यांनी देशसेवेला धर्म मानले होते. त्यांचे स्वराज्याचे स्वप्न साकार करण्याकरिता आपण स्वतःचे समर्पण करू या. स्वराज्यापेक्षा कमी असलेले कोणतेही स्मारक त्यांची स्मृती योग्य रीतीने कायम टिकवू शकणार नाही.

काल मी म्हटल्याप्रमाणे खऱ्या स्वदेशीशिवाय हिंदुस्थानची मुक्ती नाही. काल जो अग्नी पेटविला तो खरा आणि आवश्यक होमाचा अग्नी होता.

जसे बाहेरचे तसेच आतले. कालचा बाहेरचा अग्नी हा आतमध्ये पेटलेल्या अग्नीचे लक्षण होते असे मला वाटते. आणि त्या अग्नीने आपले अंतःकरणाचे व बुद्धीचे जे दौर्बल्य आहे ते भस्मसात केले पाहिजे. आपल्या शुद्ध झालेल्या बुद्धीने आपल्याला स्वदेशीचा खरा अर्थवाद शिकविला पाहिजे. आपल्या शुद्ध झालेल्या अंतःकरणाने आपल्या परदेशी कापडाच्या मोहाला बळी न पडण्याइतकी शक्ती दिली पाहिजे. ते कापड हिंदुस्थानच्या बाहेर कितीही चांगले असले तरी हिंदुस्थानला चांगले नाही.

काल पेटविलेला अग्नी खरा असेल आणि आज आपण लोकमान्यांच्या स्मृतीला जर खरी आदरांजली अर्पण करणार असू तर आपण स्वतःला किंवा देशाला फसविता कामा नये. खादी ही राष्ट्रीय पोषाख होण्याचा मार्ग चांगलाच आक्रमण करीत आहे. मंगल प्रसंगी परदेशी मलमल यापुढे आपली शरीरे सुशोभित करणार नाहीत. पवित्र खादी ही घाम गाळणाऱ्या श्रमांची किंवा सक्तीच्या आळसाची आणि कोट्यवधी हिंदी लोकांच्या दारिद्र्याची निदर्शक राहणार नसून गृहजीवनातील चैतन्ययुक्त काव्याची आणि गरीबातल्या गरीब श्रमिकाच्या जीवनात येणाऱ्या वैभवाची सूचक होणार आहे. आणि जर कालच्या धार्मिक विधीचे हे महत्त्व असेल आणि आजच्या ह्याच जागेवर बारा महिन्यांपूर्वी आपल्या मृत देशबांधवांच्या पवित्र अवशेषांचे जेथे दहन केले, तेथे होत असलेल्या निदर्शनाचेही हे महत्त्व असेल, तर आपण आपल्या निश्चयापासून परावृत्त होता कामा नये. ढोंगीपणा करता कामा नये, आणि नुसता देखावा करता कामा

नये. आपण परदेशी कापडाचा वापर कायमचाच सोडला पाहिजे. आपल्याजवळील परदेशी कापडाला किंमत नाही हे आपल्याला समजले पाहिजे. ज्याप्रमाणे अत्यंत कसदार दूध हे दूषित झाल्याचे आढळल्यावर आपण टाकून देतो, त्याचप्रमाणे आपल्याजवळ असलेल्या परदेशी कापडाला किंमत नाही हे आपणाला समजले पाहिजे. जर आपण यापुढे परदेशी कापड वापरणार नसलो, तर तो ट्रंकेत बंद करून ठेवलेला बोजाच नाही काय ? युरोपमध्ये एखादी वस्तू फॅशनमधून गेली म्हणजे ती मौल्यवान असली तरी ते टाकून देत नाहीत काय ? मी हा सावधगिरीचा इषारा प्राथमिक अवस्थेत देत आहे. त्याचे कारण असे की, ज्या पुष्कळ लोकांनी आपल्याजवळील परदेशी कापडाचा काही भाग टाकून दिला आहे त्यांना असे वाटते की, केव्हा ना केव्हा तरी जे आपण जवळ बाळगले आहे ते आपल्याला वापरता येईल. परदेशी कापड गोळा करणे म्हणजे पुष्कळांनी आपल्याजवळील पैसे किंवा दागदागिन्यांचा भाग देण्यासारखा नाही. परदेशी कापड गोळा करणे हे कचरा गोळा करण्यासारखे आहे. त्या कचऱ्यातील प्रत्येक कण उद्योगी व दक्ष गृहस्वामिनी कचऱ्याच्या पेटीत टाकीत असते. बेगडी देखाव्यासंबंधी आपली जी आवड आहे त्यात क्रांती करणे हे आपल्या कुवतीवर अवलंबून आहे. पण त्याकरिता परदेशी कापडाची विक्री करणारी दुकाने बाजारात अपवाद ठरली पाहिजेत. आपण नकलेच्या मागे लागता कामा नये. जर आपण त्यांच्या मागे लागलो तर आपल्याला परदेशी बाजारातून फसवी, बनावट, खोटी खादी मिळेल. तूर्त आणि संक्रमण कालात जाडीभरडी आणि बिनधुवट खादी ही सर्वांत चांगली.

मी स्वदेशीने प्रतिज्ञाबद्ध झालो आहे. कारण त्यामुळे आपल्यास सर्व शक्ती वापरण्यास भरपूर संधी मिळते, आणि स्वदेशीमुळे कोट्यवधी तरुण-वृद्ध स्त्री-पुरुषांची परीक्षा होते. जर हिंदुस्थान एका मताने वागला तरच स्वदेशी यशस्वी होईल; आणि जर हिंदुस्थान स्वदेशीच्या बाबतीत हे करू शकला तर तो स्वराज्याचे रहस्य शिकला असे होईल. त्या परिस्थितीत हिंदुस्थान शास्त्रीय पद्धतीने विध्वंस आणि निर्माण या कलांवर प्रभुत्व मिळवू शकला असे होईल.

काल ज्या जागी आपण आपल्या पातकांचा काही भाग जाळला ती जागा पवित्र झाली आहे. आपण अशी आशा बाळगू या की, ज्या मि. सोबानी यांनी चळवळीला औदार्याने देणगी दिली आणि ज्यांनी आपला मुलगाही या चळवळीत दिला, ते ज्या जागी तो होमाग्नी पेटविण्यात आला तो तुकडा आम्हांला देऊन टाकतील, आणि राष्ट्राला ती पवित्र घटना चिर-स्मृतीत राहावी म्हणून साजेसे एक स्मारक उभारण्याला समर्थ करतील. आणि जेथे लोकमान्यांच्या अवशेषांचे दहन केले ती ही जागा आपण संपादन केली पाहिजे. याच ठिकाणी त्यांच्या रक्षेतून असहकारितेची शक्ती उदय पावली. गेल्या एक ऑगस्टलाच असहकारितेला सुरुवात झाली आणि परवा सोबानींच्या मैदानावर काल राष्ट्राने स्वराज्याकडील आपल्या दौडीचा मला वाटणाऱ्या शेवटच्या टप्प्याला

सुरुवात केली. परमेश्वर कृपा करो, आणि येत्या ३० सप्टेंबरला हिंदुस्थान कमी न पडो.

स्वयंसेवकांबद्दल एक शब्द सांगून मी माझे भाषण संपवितो. आपल्यात संघटना-शक्ती नाही असा एक नेहमी आरोप केला जातो. असे असूनही काल पोलिस लागले नाहीत आणि गैरप्रकार झाला नाही. कपडे जमविण्यापासून त्यांची होळी करीपर्यंत सर्व व्यवस्था स्वयंवसेवकांनी केली. त्यांना व इतर साहाय्यकांना धन्यवाद. अशाच धिम्म्या, बिनबोलक्या आणि शांततामय प्रयत्नानेच आपण स्वातंत्र्याची लढाई जिंकू इच्छित आहोत.

'यंग इंडिया', ४-८-१९२१

२३३. टिप्पणे

आंध्रभूषण

सरतेशेवटी कोंडा वेंकट अपय्या आणि त्यांचे बॅरिस्टर आणि वकील मित्र पकडले गेले. जेव्हा प्रथम सुप्रसिद्ध बॅरिस्टर आणि वकील या दोघांच्या अटकेची बातमी आली तेव्हा मी वेंकटअपय्या यांना ठार मारले असेल ही बातमी ऐकावयास तयार होतो. कमिटीची मान्यता मिळेल या अपेक्षेने त्यांनी या अटकेकरिता आठव-ड्याचा हरताळ जाहीर केला होता. मला वाटले की, तो हरताळ ही एक वाईट गोष्ट होती; आणि अजूनही मला तसेच वाटते. हरताळ शांतपणे चालू आहे अशी त्यांची दुसरी तार आली. नंतरच्या तारेत त्यांच्या चौघा सहकाऱ्यांच्या आणि त्यांच्या स्वतःच्या अटकेची बातमी आली. मला वाटते की, कोंडा वेंकटअपया हे आंध्रचे भूषण आहेत. जेव्हा प्रत्येक जण झोपलेला होता, तेव्हा ते त्या देशात जागे झाले. त्यांची चारित्र्य-शक्ती महान आहे. त्यांनी अहिंसा धर्म म्हणून स्वीकारली आहे व त्याला अनुसरून ते पूर्णपणे वागत आहेत. इतरांच्याबरोबर त्यांनी गेली कित्येक वर्षे देशसेवेला वाहून घेतले आहे; आणि त्यांना जेव्हा पकडले तेव्हा मला सरकार पूर्णपणे वेडे बनल्याचे ते खात्रीचे लक्षण आहे असे वाटले. विजय दौडत आपल्याकडे येत असल्याचेही ते मला लक्षण वाटले. फक्त आंध्र मित्रांनी शांत व न गडबडून जाता राहिले पाहिजे. ते शूर व आध्यात्मिक वृत्तीचे लोक आहेत. त्यांच्यात आग्रही, हट्टीपणा आहे. तेथे कार्यकर्त्यांचा सुंदर संच आहे. ह्या काही महिन्यांच्या कष्टाच्या कामात ते आपली लायकी सिद्ध

करतील यात शंका नाही. तुरुंगातल्या पुढाऱ्यांना जर मोठा मान द्यावयाचा असेल तर त्यांनी स्वतःच पुढारी झाले पाहिजे, आणि स्वदेशीची संघटना केली पाहिजे. परदेशी कापड त्यांनी टाकलेच पाहिजे. आपला देश असा आहे की, जेथे नग्नावस्था झाकण्याकरिता थोडेसे कापडही पुरते. हिंदुस्थानात हातांनी कातलेले जे सर्वांत बारीक सूत मिळते ते काढण्याची कला अद्याप आंध्र प्रांतात आहे. आंध्रातील प्रत्येक स्त्री-पुरुषाने पुढील दोन महिन्यांत कोणाचे काहीही होवो याचा विचार न करता या महान कार्याला लागावे. आपल्यातील सर्वश्रेष्ठ माणसे ही तुरुंगात पडली तरी, आपल्या कामाची प्रगती कुंठित होता कामा नये; उलटपक्षी कामाची गती वाढलीच पाहिजे.

हिंदी सैनिक आणि मुलकी अधिकारी

नोकरशाहीचा अर्थ फक्त इंग्लिश लोक नव्हेत. त्यांनी शिकविलेले हजारो हिंदी लोकही त्यात येतात. ती एक दुष्ट पद्धत आहे व ती नोकरशाहीत असणाऱ्या सर्वांना भ्रष्ट करते. आणि आता अशा थरावर गोष्टी आल्या आहेत की, ती पद्धत व्यापक करण्याकरिता हिंदी शिपाई आणि हिंदी मुलकी लोक यांचा अधिकाअधिक उपयोग करण्यात येत आहे. गुंतूरच्या धरपकडीमागे कोण लोक होते ? हिंदी. मतिआरीला गोळीबाराचा हुकूम कोणी सोडला ? एका हिंदी माणसाने. आसामच्या गरीब मजुरांवर कोणी हल्ला केला ? हिंदी लोकांनी. मौलाना शेरवानी यांचा लुटूपुटीचा खटला कोणी चालविला ? एका हिंदी माणसाने. ज्या गुरख्यांनी हल्ला केला त्यांना निरपराधी स्त्री-पुरुषांच्यावर चालून जाण्याचे हुकूम मोडण्यास धैर्य नव्हते. निरनिराळ्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांना आणि मॅजिस्ट्रेट्सना निरपराधी लोकांना शिक्षा देण्यास किंवा ठार मारण्यास नकार देण्याचे धैर्य नाही. जेव्हा आपण जुलमी अधिकाऱ्यांच्या हातांतील बाहुली स्वेच्छेने बनतो, तेव्हा आपली नीतिभ्रष्टता कळसाला पोहोचते. जर पुढील जालियनवाला हा हिंदी माणसाच्या नेतृत्वाखाली संघटित केला आणि प्रत्यक्षात आणला तर मला बिलकूल आश्चर्य वाटणार नाही. आणि ती गोष्ट पुढील पिढ्यांना स्वराज्याचे शिक्षण म्हणून सांगितली जाईल. ज्या राज्यपद्धतीचा हेतू कोट्यवधी लोक शक्य तितका दीर्घकालपर्यंत गुलामगिरीत ठेवण्याचा असतो त्या पद्धतीत शिपायाचा किंवा न्यायधीशाचा व्यवसाय हा मानाचा व्यवसाय आहे असे म्हणता येत नाही. पण ज्याप्रमाणे आपण परक्यांचा जुलूम सहन करतो, त्याप्रमाणे आपण आपल्या रक्तामांसाच्याही लोकांचा जुलूम सहन केला पाहिजे. त्यांना आपले काम सोडून द्यावयास भिववू शकू अशी भाबडी कल्पना आपण करू नये. जेव्हा त्यांना त्या गोष्टीचा कंटाळा येईल तेव्हाच ते ती सोडतील. आपण त्यांचे जीवन असह्य केले तर ते आपली नोकरी कधीही सोडणार नाहीत. ज्याप्रमाणे आपण इंग्रजी अधिकारीवर्गाला किंवा अधिकाऱ्याला आव्हान देतो, त्याचप्रमाणे त्यांनाही तुम्ही वाइटात वाईट करा असे आव्हान दिले पाहिजे. वास्तविकपणे त्यांची कीवच करावयास पाहिजे; आणि ते बेजबाबदार असल्यामुळे इंग्रजी अधिकाऱ्यां-

पेक्षा त्यांच्या हातून अधिक भयंकर चुका होण्याची शक्यता आहे. इंग्रजी अधिकारी स्वतःवर काही संयम लादतो. आपण राज्यकर्त्यांच्या जातीचे आहोत, ही जाणीव असल्यामुळे त्याला तो संयम करावा लागतो. पण हिंदी माणसाला आपली नोकरी जाण्याचा जास्तीत जास्त धोका वाटत असतो. सध्या आपल्या देशात दडपशाहीला जे निश्चत स्वरूप येत आहे ते आजपर्यंतच्या दडपशाहीपेक्षा अधिक भयंकर स्वरूपाचे आहे. पण त्याला आपण धीमेपणाने आणि निर्भयतेने तोंड दिले पाहिजे.

शीखांचा रंग

नियोजित राष्ट्रीय झेंड्याच्या रंगाविषयी शीख मित्र निष्कारण गडबडले आहेत. आपल्या लष्करी महत्त्वाच्या भूमिकेवरून त्यांना काळा रंगही त्यात घातला जावयास पाहिजे आहे. त्याच्या सयुक्तिकतेचा प्रश्न बाजूला ठेवला तरी त्यांच्या चळवळीला अर्थ नाही. कारण अजूनपर्यंत निशाणाचा प्रश्न अ. भा. काँ. कमिटीपुढे चर्चेला किंवा निर्णयाला आलेला नाही. आणि त्यांची हरकत लक्षात घेता जोपर्यंत मी त्यांच्या मागणीचा गैरवाजवीपणा त्यांना पटवू शकलो नाही, तोपर्यंत मी हा प्रश्न कमिटीपुढे आणणारच नाही. सयुक्ततेच्या दृष्टीने त्यांनी आपली हरकत मागे घ्यावी असे सांगण्यास मला तिळमात्र शंका वाटत नाही. पांढऱ्या रंगात इतर सर्व रंग येतात. आपल्याला खास प्राधान्य पाहिजे याचा अर्थ ज्या दोन संख्यांच्या दृष्टीने मोठ्या जाती आहेत, त्यांत विलीन होण्यास नकार देणे असा आहे. जर हिंदू व मुसलमानांत भांडण नसते तर मी एकच रंग असावा असे म्हटले असते. शीखांचा हिंदूंबरोबर कधीही निराळेपणा नव्हता; आणि त्यांचे जे मुसलमानांच्याबरोबर भांडण आहे, ते हिंदूंच्याचसारखे होते. आपल्या निराळेपणावर किंवा वैशिष्ट्यावर जोर देणे ही भयंकर गोष्ट आहे. आपण एकत्र येण्याच्या मुद्द्याकरिता प्रयत्न केला पाहिजे. शीखांची मागणी ऐकताच विख्यात मुसलमान मित्रांनी मला सल्ला दिला की, एकच रंग तुम्ही स्वीकारा, मग तो पांढरा असो वा तांबडा. पण तेही अदूरदर्शीपणाचे होईल. तांबडा आणि हिरवा हे दोन रंग वाढते ऐक्य कायम टिकविण्याकरिता तेथे असले पाहिजेत. शीख राष्ट्रवाद्यांची अडचण मला माहीत आहे. शीखांच्या विभागातील सरकारी हस्तक भांडणे निर्माण करण्याकरिता अनेक प्रकारच्या खोडसाळ सूचना करीत आहेत आणि स्वाभाविकपणेच ते भितात. कशाची चिंताच न करणे ही सर्वांत चांगली गोष्ट. हिंदू किंवा मुसलमानांच्या किंवा सर्वसामान्यपणे असहकारितेच्या चळवळीविरुद्ध उठविलेले प्रत्येक गाऱ्हाणे दूर करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना उभे राहण्यास जागा मिळणार नाही. शीख राष्ट्रवादी थोडे असोत किंवा पुष्कळ असोत, त्यांना स्वतःच्या मनाची परीक्षा झाली पाहिजे आणि त्यांच्या निंदकांनी काहीही म्हटले तरी त्यांनी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.

शीख प्रतिनिधित्व

म्हणून जरी मला राष्ट्रीय झेंड्यासंबंधीची तक्रार पोकळ वाटत असली तरी मला सध्याच्या अवस्थेत प्रतिनिधित्वाबद्दल वाटणारी शीखांची भीती साधार वाटते. जर मुसलमानांनी लखनौ कराराचा आग्रह धरला, तर जातीय प्रतिनिधित्वाचे आश्वासन काँग्रेसने दिलेले आहे. मुसलमानांची विभागणी करण्याचे प्रयत्न होत असल्यामुळे वर्किंग कमिटीने फक्त सल्लयाच्या स्वरूपाच्या सूचना दिल्या. म्हणून शीखांना तशीच आश्वासने मिळण्याचा हक्क आहे. त्या सूचना देण्यास अडचण नसावी. पंजाबमधील तीन जमातींनी आपसात सोडविण्याचा मुख्यत्वे हा प्रश्न आहे. कमिटीला फक्त साहाय्यकारक सूचना देता येतील.

संमत निवेदन

व्हाइसरॉयसाहेबांनी आता एक निवेदन[1] प्रसिद्ध केले आहे. ते निवेदन त्यांच्या व माझ्या ज्या मुलाखती झाल्या त्यांत उभयतांना संमत झालेले आहे. लोकांना जे कळावयास हवे होते त्याचा सर्व तपशील त्या निवेदनात दिला आहे. मला त्याची चर्चा करावयाची नाही. माझ्या दृष्टीने हे स्पष्ट होते की, ज्याला माफी म्हणतात व ज्याला मी पश्चात्तापाचे निवेदन म्हणतो त्याची सुरुवात मी केली. मला जी भाषणे दाखविण्यात आली त्यांसंबंधी खटला होणार आहे, हे मला बिलकूल ठाऊक नसता मला ती निवेदनाची कल्पना सुचली. ते निवेदन अलीबंधूंच्या खटल्याच्या भीतीने केले किंवा तसे सुचविले गेले असे बिलकूल नाही. तुरुंगवास टाळण्याकरिता तर ते खासच नव्हते. अलीबंधूंनी हे निवेदन करून कार्याची फार मोठी सेवा केली आहे असा माझा ठाम विश्वास आहे. तो सल्ला दिल्याबद्दल मला खेद वाटत नाही. हे उभयसंमत निवेदन प्रसिद्ध करण्याची माझी विनंती लॉर्ड रीडिंग यांनी खुषीने मान्य केली याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्या निवेदनाचे स्वरूप आणि भाषा ठरविण्याकरिता जो लांबलचक पत्रव्यवहार झाला त्यांत मला कोणताही सुसंगत तपशील निर्दिष्ट करण्याचे टाळावे असा कल व्हाइसरॉयांच्या बाजूला दिसला नाही. माझ्याकडून मी त्यांना कळविले की, कोणतीही गोष्ट दडवून ठेवण्याचा माझा हेतू नाही. म्हणून लोकांच्यापुढे दोन्ही बाजूंचे पूर्ण निवेदन आहे.

कराचीला दूषण

स्वामी कृष्णानंद यांच्या तुरुंगवासामुळे खवळलेल्या जमावाकडून कराचीच्या युरोपियन लोकांवर जे दगड मारले गेले, त्यासंबंधी मी वृत्तपत्रे वाचली नसली तरी, सिंधच्या मित्राकडून जे ऐकले त्यावरून ज्यांनी दगड मारले त्यांनी आपल्या अंतःकरणात

१. पाहा, परिशिष्ट ३.

असलेल्या पवित्र कार्याची हानी केली आहे हे मला कबूल केले पाहिजे. अनत्याचाराची प्रतिज्ञा मोडून त्यांनी स्वामींची मानहानीच केली आहे. स्वामी हे खरोखरच लोकप्रिय आणि निर्भय कार्यकर्ते आहेत. संघटित निरोधनाच्या द्वारा ते दारू व्यापाऱ्यांच्या प्राप्ती-वर ठसठसीत छाप पाडीत होते. मी असेही ऐकले आहे की, त्यांनी कोणावर तरी हल्ला केला असा खोटा आरोप त्यांच्यावर लादला. हे सर्व गृहीत धरूनही पूर्णपणे आत्मसंयम करणे हे लोकांचे स्पष्ट कर्तव्य होते. पोलिसांनी चुकीने खटला भरला आणि मॅजिस्ट्रेटने शिक्षा दिली म्हणून निरपराधी युरोपियन्सवर हल्ला करणे ही अत्यंत अविचाराची गोष्ट झाली. अशाच गोष्टींमुळे सविनय कायदेभंग अशक्य नसला तरी कठीण होतो. ज्या जमावाने कराचीमध्ये असे गैरवर्तन केले, त्याने परदेशी कापडावर बहिष्कार घालून आणि सूत कातून किंवा विणून स्वामींचा सन्मान करावा.

काळाची लक्षणे

मुंबईच्या अ. भा. कॉंग्रेस कमिटीच्या सभेत एक अत्यंत सुखदायक अनुभव आला. एका तेलगू सभासदाने ज्या वक्त्यांना हिंदुस्थानी येत असेल त्यांनी हिंदुस्थानीत बोलावे असे सांगितले. आणि तामीळ अध्यक्षांनी ती विनंती मान्य करून पुढील वक्त्याला हिंदुस्थानीत बोलण्याची सरळ सरळ विनंती केली. ती कल्पना लोकप्रिय झाली आणि पुष्कळ वक्त्यांनी तिचा स्वीकार केला. आता द्रविड देशात हिंदुस्थानी शिक-विणाऱ्या पुष्कळ शाळा आहेत. पण अद्याप लांबचा पल्ला गाठावयाचा आहे. जेव्हा कमिटीची पुढील सभा भरेल तेव्हा द्रविड सभासदांनी हिंदुस्थानीत पुष्कळ प्रगती केलेली असेल अशी मला आशा आहे. जे कॉंग्रेसचे भावी प्रतिनिधी होऊ इच्छित असतील त्यांनीही याची दखल घ्यावी.

'यंग इंडिया', ४-८-१९२१

२३४. सविनय कायदेभंग

ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या प्रत्येक सभासदाच्या तोंडी सविनय कायदेभंग होता. त्याचा प्रत्यक्ष प्रयोग कधीही न केल्यामुळे, सध्याच्या आपत्तीवर तो एक रामबाण इलाज आहे, अशा चुकीच्या कल्पनेने प्रत्येक जण मोहित झाला होता असे वाटते. त्याकरिता जर आपण योग्य वातावरण तयार केले तर तो खरोखरच रामबाण उपाय

होऊ शकेल. व्यक्तींना ते वातावरण नेहमीच उपलब्ध असते. फक्त जेव्हा त्यांचा सविनय कायदेभंग हा हमखास रक्तपात घडवून आणतो तेवढाच अपवाद असतो. हा अपवाद मला सत्याग्रहाच्या दिवसांत आढळला. असे असले तरी उपेक्षा करता येणार नाही अशी हाक येईल आणि त्याकरिता वाटेल ती किंमत द्यावी लागेल. मी एखादी अशी वेळ येत असलेली स्पष्टपणे पाहू शकत आहे. त्या वेळी मला प्रत्येक सरकारी कायद्याचे पालन करता येणार नाही; आणि जरी त्यात रक्तपाताची खात्री असली तरी ते मी मानता कामा नये. जेव्हा आलेल्या हाकेची उपेक्षा करणे म्हणजे ईश्वराला नाकारणे असते तेव्हा सविनय कायदेभंग हे अत्यावश्यक कर्तव्य ठरते. सामुदायिक सविनय कायदेभंगाची गोष्ट अगदी निराळी आहे. त्याचा प्रयोग फक्त शांत वातावरणात करता येतो. ती शांतता सबलतेची असावी, दुर्बलतेची नसावी. ती शांतता ज्ञानाची असावी, अज्ञानाची नसावी. वैयक्तिक सत्याग्रह हा नेहमी दुसऱ्यांच्याकरिता असतो, व असावा. सामुदायिक सविनय कायदेभंग हा नेहमी स्वार्थी असू शकतो व असतो. याचा अर्थ असा की, व्यक्ती त्या कायदेभंगातून वैय्यक्तिक स्वार्थ साधू इच्छितात. उदाहरणार्थ, व दक्षिण आफ्रिकेत कालनबाक आणि पोलक यांनी दुसऱ्यांच्याकरिता सविनय कायदेभंग केला. त्यांना स्वतःला काही मिळवावयाचे नव्हते. हजारो लोकांनी वैय्यक्तिक लाभाच्या आशेनेसुद्धा तो कायदेभंग केला. त्याचे स्वरूप उदाहरणार्थ–जे पूर्वी मुदतबंदी लोक होते, त्यांच्या बायकांवर व मोठ्या मुलांवर जो दरडोई कर वर्षाला वसूल करीत तो काढून टाकावा असा होता. सामुदायिक सविनय कायदेभंगात जर प्रतिकार करणाऱ्यांना त्या सिद्धांताची कार्यपद्धती समजली तरी पुरेसे आहे.

जेव्हा मला दक्षिण आफ्रिकेत पकडले, तेव्हा मी ज्या मनाई केलेल्या भागातून दोन किंवा तीन हजार पुरुषांच्यासह आणि काही स्त्रियांच्यासह कूच करीत होतो, तेव्हा तो जवळ जवळ निर्मनुष्य भाग होता.[1] त्या मंडळीत कित्येक पठाण व इतर धष्टपुष्ट लोक होते. दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने ह्या चळवळीला जो दाखला दिला तो लायकीचा अत्यंत मोठा पुरावा होता. त्यांना हे ठाऊक होते की, आम्ही जितके निश्चयी आहोत तितकेच निरुपद्रवी आहोत. ज्यांनी मला पकडले त्यांचे तुकडे तुकडे करणे हे त्यांना अत्यंत सोपे होते. पण तसे करणे अत्यंत भ्याडपणाचे झाले असते, एवढेच नव्हे तर त्यांनी घेतलेल्या प्रतिज्ञेचा तो विश्वासभंग झाला असता, आणि त्याचा परिणाम एवढाच झाला असता की, स्वतंत्रतेचा तो लढा नाश पावला असता, आणि दक्षिण अफ्रिकेतून प्रत्येक हिंदी माणसाला सक्तीने हद्दपार केले असते. पण ते लोक बाजारबुणगे नव्हते. ते शिस्तीचे सैनिक होते, आणि ते निःशस्त्र असल्यामुळे त्यांची योग्यता अधिक होती. जरी मला त्यांच्यातून हिसकावून दूर नेले होते तरी ते तेथून

१. ता. ६ नोव्हेंबर १९१३ रोजी गांधींना पामफोर्ड येथे पकडले. तेव्हा ते पुरुष, स्त्रिया व मुले घेऊन ट्रान्सवालमध्ये आपल्या मोठ्या स्वारीवर निघाले होते. पाहा, खंड १२.

हालले नाहीत किंवा त्यांनी आपली पाठ फिरविली नाही. ते पकडून तुरुंगात टाकले जाईपर्यंत त्यातील प्रत्येक जण आपल्या इष्ट स्थळी जाण्याकरिता कूच करीतच राहिला. माझ्या दृष्टीने हे एक शिस्तीचे आणि अहिंसेचे असे उदाहरण आहे की, ज्याला मझ्या माहितीप्रमाणे इतिहासात तोड नाही. अशा संयमाशिवाय येथे सामुदायिक सविनय कायदेभंग यशस्वी होईल अशी मला आशा वाटत नाही.

प्रत्येक वेळी कोणाला ना कोणाला पकडले म्हणजे प्रचंड निदर्शने करून सरकारला भिवविण्याची कल्पना आपण टाकून दिली पाहिजे. उलटपक्षी असहकारितावाद्याच्या जीवनातील अटक ही मामुली गोष्ट आहे असे आपण मानले पाहिजे. ज्याप्रमाणे लढाईवर जाणारा शिपाई मृत्यूला सामोरा जातो, त्याचप्रमाणे आपण अटक आणि कैद यांना सामोरे गेले पाहिजे. तुरुंगवासाला आवाहन करून पण तो न टाळून आपण सरकारचा विरोध बोथट करून टाकू इच्छितो. मग त्याकरिता सामुदायिकरीत्या धरपकड किंवा तुरुंगवास याची आपण तयारी दाखविली तरी पुरे आहे. त्या परिस्थितीत सविनय कायदेभंगाचा असा निग्रहाचा अर्थ होतो की, आपण एकही निःशस्त्र पोलिस असला तरी त्याला शरण जाण्यास तयार आहो. ज्याप्रमाणे बकरी कत्तलखान्यात नेली जातात त्याप्रमाणे आपल्यातले हजारो लोक तुरुंगात नेले गेले तर तो आपला विजय आहे. जर जगातील सारी बकरी स्वखुषीने कत्तलखान्यात नेली गेली असती तर त्या बकऱ्यांनी फार पूर्वीच स्वतःला खाटकाच्या सुऱ्यापासून वाचविले असते. काहीही अपराध न करता तुरुंगात टाकले जाणे यातच आपला विजय आहे. आपले निरपराधित्व जितके जास्त तितकी शक्ती अधिक आणि यश लवकर.

सध्याची स्थिती अशी आहे की, हे सरकार भ्याड आहे. आणि आपण तुरुंगाला भीत आहोत. सरकार आपल्या ह्या तुरुंगाच्या भयाचा फायदा घेते. जर आपल्यातील स्त्री-पुरुष तुरुंगाचे आरोग्यालयाप्रमाणे स्वागत करतील तर आपले जे जिवलग नातेवाईक आहेत त्यांच्याबद्दल चिंता करण्याचे आपण सोडून देऊ. दक्षिण आफ्रिकेतील आपले देशबांधव या तुरुंगांना बादशाहाची हॉटेल्स असे संबोधित असत.

आपण दीर्घकालपर्यंत सरकारी कायदे मनाने पाळत नव्हतो. आणि कित्येक वेळा गुपचुपपणे आपण ते मोडले आहेत. आणि म्हणून एकाएकी सविनय कायदेभंगाला आपण लायकी संपादन केलेली नाही. जर कायदेभंग सविनय असावयास पाहिजे असेल तर तो उघड व अनत्याचारी असला पाहिजे. संपूर्ण सविनय कायदेभंग ही शांततामय बंडाची एक अवस्था आहे. त्या अवस्थेत आपण प्रत्येक सरकारी कायदा अमान्य करीत असतो. सशस्त्र बंडापेक्षादेखील हे बंड अधिक भयंकर असते. जर सविनय प्रतिकारक आत्यंतिक हालअपेष्टा भोगण्यास तयार असतील तर ते बंड कधीही मोडता येणार नाही. निरपराध्यांच्या हालअपेष्टांच्या संपूर्ण प्रभावावर अढळ श्रद्धा असणारे असे ते बंड आहे. तोंडावाटे शब्द न काढता तुरुंगात जाणारा

सविनय प्रतिकारक आपल्याभोवती एक शांत वातावरण निर्माण करतो. प्रतिकाराच्या अभावी अन्याय करणारा अन्याय करण्याला कंटाळतो. ज्याचा बळी घ्यावयाचा असेल त्यांनी जर प्रतिकार केला नाही तर सारी मौज नष्ट होते. आपण एवढ्या मोठ्या प्रमाणावर सविनय कायदेभंग सुरू करण्यापूर्वी निदान जे लोकांचे प्रतिनिधी आहेत, त्यांना सविनय कायदेभंग यशस्वी करण्याकरिता कोणती परिस्थिती लागते याचे पूर्ण आकलन होणे जरूर आहे. तात्काळ गुण येणाऱ्या उपायांत भयंकर संकटे भरलेली असतात. आणि ते हाताळताना अत्यंत कौशल्य लागते. माझी अशी ठाम समजूत आहे की, जर आपण परदेशी कापडावर यशस्वी बहिष्कार घातला तर आपण असे वातावरण निर्माण करू की, ज्या वातावरणात आपल्याला एवढ्या मोठ्या प्रमाणावर सविनय कायदेभंग सुरू करता येईल की, ज्याला कोणतेही सरकार प्रतिकार करू शकणार नाही. म्हणून जे सामुदायिक सविनय कायदेभंग सुरू करण्यास उतावीळ झाले असतील अशांना माझे असे आग्रहाने सांगणे आहे की, त्यांनी धिम्मेपणाने व निश्चयाने स्वदेशीवर आपली शक्ती केंद्रित करावी,

'यंग इंडिया,' ४-८-१९२१

२३५. महादेव देसाईंना पत्र

अलीगड
ऑगस्ट ५, १९२१

भाई श्री. महादेव,

तुझे पत्र पोहोचले. मला भेटू शकला नाहीस याची काही चिंता नाही. माझ्या सदिच्छा व आशीर्वाद तुला आहेत. तेथे तुझ्यावर काही आपत्ती येणार नाही किंवा तुला काही अडचणही सोसावी लागणार नाही. मला मथुरादास, दुर्गा आणि इतरांची परिस्थिती चांगली समजते. मला तेथे जाण्याची व दोघांनाही भेटण्याची फार इच्छा होती. पण मी मुंबईत बसून हे कसे जमवू शकलो असतो? मुंबईबद्दल बोलावयाचे म्हणजे तिने जे केले त्यापेक्षा ती अधिक करू शकली असती का?

१० तारखेला आपण भेटणार आहोत आणि म्हणून मी अधिक लिहीत नाही.

बापूचे आशीर्वाद

[ताजा कलम] प्रभुदास[1] आला आहे. स्टोक्सही त्याच्याबरोबर आले आहेत.

गुजरातीच्या फोटोस्टॅटवरून; एस्. एन्. ११४१६

१. छगनलाल गांधींचा मुलगा, गांधीजींचा पुतण्या.

२३६. जाहीर सभेत भाषण, मोरादाबाद[1]

ऑगस्ट ६, १९२१

सभ्य गृहस्थहो,

संयुक्त प्रांताचे सरकार चोहोकडे जी शांतता मंडळे स्थापीत आहे त्याचा मला उद्देश समजत नाही. जर त्यांना खरोखरच शांततेचा पुरस्कार करावयाचा असेल तर त्यांनी आपल्या कामात आमचे साहाय्य का मागू नये? स्वराज्य संपादण्याकरिता आम्ही प्रयत्न करीत असता, आमच्या असहकारितेच्या चळवळीचा उद्देश शांतता राखणे हाच आहे. जेव्हा दोघांच्याही दृष्टीसमोर एकच उद्देश आहे तेव्हा या शांतता-मंडळांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जरूरीच काय? तुम्हीच या गोष्टीचा विचार केला पाहिजे. जर ही मंडळे शांततेच्या नावाखाली शांतताभंग करावयास लावतील, जर ती लोकांच्यात अनावश्यक प्रक्षोभ निर्माण करतील, जर ती गुंडगिरीचा आश्रय घेण्यास तयार असतील आणि आपल्या नावाचा दुरुपयोग करतील तर तुम्ही त्यांना दूर अंतरावर ठेवा असा सल्ला मला दिलाच पाहिजे. मागाहून पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून मृगजळामागे धावू नका. तुम्हांला सल्ला देणे हे माझे कर्तव्य आहे. पण जर काही जणांनी तो सल्ला मानला नाही तर त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास मोकळीक आहे.

नंतर गांधीजींनी परदेशी कापडावरील बहिष्काराची व स्वदेशीच्या स्वीकाराची आवश्यकता विस्ताराने सांगितली. ते म्हणाले :

जरी खादीची किंमत सध्या काही दिवस जास्त असली तरी मलमलीशी तुलना करता ती अधिक स्वस्त पडणार आहे. कारण एका वर्षाला तुम्हांला आठ शर्टस लागले तर खादीचे जास्तीच जास्त चारच लागतील.

मी माझ्या खादीच्या दीर्घकालीन अनुभवावरून हे सांगतो. जर तुम्ही माझा सल्ला ऐकलात आणि अंतःकरणपूर्वक खादीचा स्वीकार केलात, सूत कातू लागलात आणि जशी तुम्ही तिरडी टाकून देता तसे परदेशी कापड टाकून दिलेत, तर दयामय परमेश्वर स्वस्थ

१. गांधीजी अलीगढहून सकाळी १० वाजता मोरादाबादला पोहोचले. दिवसा त्यांनी टाउन हॉलमध्ये स्त्रियांच्या सभेत भाषण केले. त्यांना स्वदेशी कापड वापरण्यास आणि सूत कातण्यास सांगितले. तीन प्रहरी त्यांनी महाराजा थिएटरमध्ये जाहीर भाषण केले.

बसणार नाही. त्याच्या सिंहासनावरून त्याला दयेचा पाझर फुटेल आणि आपल्या स्वराज्य संपादनाच्या सर्व प्रयत्नांत तो आपल्याला मदत करील.

[हिंदीवरून]
'आज', १५-८-१९२१

२३७. श्रद्धांजली अर्पण करण्यास पात्रता

लायक नसलेल्या एखाद्या माणसाने जर एखादे काम केले तर फळ मिळत नाही. धोबी जर हजामत करू लागला तर तो फक्त रक्त काढील; वकिलाने जर औषध देण्याचे सुरू केले तर परिणाम भयंकर होतील. जर अट्टल चोर देवळात गेला तर देवतेची कृपा त्याच्यावर होणार नाही. स्वतःला स्वच्छ केल्याशिवाय जर प्रार्थना केली तर देव तिचा स्वीकार करणार नाही.

त्याचप्रमाणे आपण टिळक महाराजांना स्वतःला पात्र झाल्याशिवाय श्रद्धांजली वाहिली तर ती स्वीकारली जाणार नाही. ज्या माणसाला हिंदुस्थानचा अगदी तिटकारा आहे, ज्याचा येथील हवेने प्राण कासावीस होतो, जो हिंदुस्थानच्या चालीरीती रानटी समजतो, जो हिंदी अन्न दिसताच तोंड फिरवितो, आणि जो हिंदी पोषाख पाहून नाक मुरडतो असा माणूस टिळक महाराजांना कसली श्रद्धांजली अर्पण करू शकेल? टिळकांचा आत्मा असली श्रद्धांजली स्वीकारू शकेल काय? जो श्रद्धेने पत्र, पुष्प, फल किंवा तोय परमेश्वराला अर्पण करतो त्याने देव संतुष्ट होतो. आणि भक्ती याचा अर्थ अंतःकरणपूर्वक अनुकरण.

जे विभूतिपूजक म्हणवितात त्यांच्या परीक्षेची वेळ आता आली आहे. आज आपण लोकमान्यांची पुण्यतिथी कशी साजरी करणार आहोत? या वर्षात स्वराज्य मिळविण्याचा निश्चय आपण करू या का? ज्या परदेशी कापडाने आपण आपली शरीरे भूषवितो, ते आपण टाकून देऊ या का?

जो आपले कर्तव्य करीत नाही, त्याला हक्क मिळविता येत नाहीत. ज्याने आपले कर्ज फेडले नाही, त्याला कर्जमुक्तीचे पत्र कसे मागता येईल? स्वराज्य ज्याप्रमाणे आपला जन्मसिद्ध हक्क आहे त्याचप्रमाणे स्वदेशी हे आपले कर्तव्य आहे. आपण ह्या देशात जन्माला आलो त्यामुळेच हे बंधन आपल्यावर लादण्यात आले. स्वदेशीशिवाय

स्वराज्य नाही. " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. "–टिळक गीतेचा हा पहिला भाग आहे; दुसरा भाग असा " स्वदेशी हे जन्मजात कर्तव्य आहे." म्हणून जर लोकमान्यांची पुण्यतिथी योग्य प्रकारे साजरी करावयाची असेल किंवा पाळावयाची असेल तर ती आपण स्वदेशीची शपथ घेऊनच पाळू शकू. आपण परदेशी कापडाचा वापर पूर्णपणे सोडून दिल्याशिवाय स्वदेशीचा मंत्र आपल्याला जपता येणार नाही. ते कापड घाणीसारखे आहे. ते टाकून दिल्याशिवाय आपण शुचिर्भूत होऊ शकणार नाही. आणि शुचिर्भूत झाल्याशिवाय आपल्याला स्वराज्याच्या मंदिरात प्रवेश करता येणार नाही. मौलाना महंमद अलींनी म्हटल्याप्रमाणे शांततेच्या मार्गाने स्वराज्य मिळविण्याच्या आपल्या इच्छेचा अर्थ असा नाही की, आपण वाटेल तसे वागावे. जर आपण कशाचा त्याग केला नाही आणि अहिंसेची घोषणा करीत राहिलो तर ती आपल्या फक्त उदासीनतेची किंवा आळसाची द्योतक ठरेल. अनत्याचार हा त्यागपूर्ण आणि सक्रिय नसला तर ती मृतावस्था आहे. प्रेताची शांतता कोणाला उपभोगता येईल ? अशा शांततेचे आपण काय करणार ? भित्रा माणूस संकट दिसताच घरात जाऊन दडतो. ज्या अर्थाने 'शांततामय' हा शब्द त्याला समजतो, त्या अर्थाने तो शांततामय राहणे म्हणजे आपल्या घराचा विध्वंस करणे आहे. ज्या शांततामयतेला आपण प्रतिज्ञाबद्ध झालो आहोत ती शक्तीची द्योतक आहे. जर आपल्यात परदेशी कापड वापरण्याचे टाकून देण्याची शक्ती, धैर्य किंवा इच्छा नसेल तर आपली शांतता म्हणजे एक ढोंग आहे. ढोंगीपणा म्हणजे नाटकी प्रकार आहे. नाटक करताना गाळलेले अश्रू माणसाची मने कधी उच्च करतील का ?

म्हणून ज्याला ज्याला टिळक महाराजांना श्रद्धांजली अर्पण करावयाची असेल त्याने त्याने स्वदेशीची शपथ घेतलीच पाहिजे. आपल्या पोषाखात स्वदेशीचा स्वीकार न करता एखादा माणूस लोकमान्यांचे नाव सतत तोंडाने उच्चारीत राहील. पण ज्याप्रमाणे एखादा पोपट भागवत गात राहिला तर त्याला जसे फळ मिळणार नाही, तसेच ह्यालाही मिळणार नाही.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ७-८-१९२१

२३८. नवी प्रतिज्ञा

बेझवाड्याला केलेली प्रतिज्ञा पूर्ण झाली असे म्हणावयास हरकत नाही. ती प्रतिज्ञा पूर्ण करण्याकरिता एक कोटी रुपये जमवावयास पाहिजे होते. परमेश्वराने ह्यात देशाला यश दिले आणि अशा प्रकारे देशाचे चांगले नाव होऊन मान सार्थ झाला. दुसरी प्रतिज्ञा जी आपण घेतली ती पुरी करणे अधिक कठीण आहे. आणि हे स्वाभाविक आहे. ३० सप्टेंबरपूर्वी आपण परदेशी कापड पूर्णपणे टाकून दिले पाहिजे.

ह्या बाबतीत आपला हिस्सा किती हे गुजरातला अजमाविण्याची जरूरी नाही. सर्वांनीच परदेशी कापडावर संपूर्ण बहिष्कार घातला पाहिजे. म्हणून यात कोणी दुसऱ्यापेक्षा अधिक केले अगर कमी केले हा प्रश्नच नाही. परदेशी कापडाची आयात थांबविण्याकरिता सर्वांनीच ते कापड टाकून दिले पाहिजे. सर्व गुजरात्यांनी तसे करणे हाच त्यांचा वाटा.

याकरिता आपण गुजराती बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आणि गुजरातमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाला भेटले पाहिजे आणि त्याची खात्री केली पाहिजे. या गोष्टीची जाणीव झाली म्हणजे आपल्या कामाचे कठीण स्वरूप उघड होईल. पण काम कठीण म्हणून आपण पराभव पत्करणार आहोत का? परदेशी कापडांचा वापर थांबविणे हे आपल्याला कठीण आहे का? आपले रेशमी आणि तलम कपडे आपल्या देशापेक्षा आपल्याला अधिक प्रिय आहेत का? स्वदेशीत स्वराज्य आणण्याच्या शक्तीविषयी आपल्याला शंका असली तरी फक्त स्वदेशी वस्तू वापरण्याच्या आवश्यकतेबद्दल शंका असण्याचे कारण नाही.

या दृष्टीने विचार करता आपले काम अगदी सोपे दिसते. पैसे देताना आपल्याला बरे वाटत नव्हते; वकिली सोडताना जीवनाचा प्रश्न अंतर्भूत झाला होता. सरकारी शाळा सोडताना शिक्षणाशिवाय राहण्याची भीती होती. पण परदेशी कापड टाकताना भीती कशाची? निदान त्यात हानी काही नाही. ज्याचा उपयोग नाही त्याचा संग्रह कशाला? औषधाच्या बाटलीला कितीही किंमत पडली असली तरी रोग बरा होताच आपण ती टाकून देतो. एकदा जादू नाहीशी झाली म्हणजे अत्यंत भपकेबाज दागिनेसुद्धा आपण क्षणाचाही विलंब न लावता टाकून देतो. आपण परदेशी कापडाच्या मोहात इतके सापडलो आहोत का की, आपण त्याचा वापर सोडून देऊ नये? अशा कापडाकरिता खर्च केलेल्या पैशाचा विचार कोणीही करणार नाही असे मला वाटते. जर आपण

तो विचार केला तर चिक्कूपणाच्या पातकाचे गुन्हेगार होऊ. एखादी कृपण आई आपल्या मुलाला ताटातील उष्टे खावयास लावून आपल्या मुलाला आजारी पाडते. खरी काटकसर अन्न फेकून देण्यात आहे. त्याचप्रमाणे खरी काटकसर कशात असेल तर आपला परदेशी कापडाचा गठ्ठा टाकून देण्यात.

परदेशी कापड टाकून देण्याचा अर्थ साध्या जीवनाला सुरुवात आणि भपकेबाज जीवनाचा अंत. शिवाय खादीचे कपडे अधिक टिकाऊ असल्यामुळे लवकर फाटत नाहीत. ज्याचा मासिक खर्च शंभर रुपये असतो त्याला सबंध वर्षात आपला खर्च कमी झालेला आढळेल. अशा माणताला हजारो रुपयांच्या किमतीचे परदेशी कपडे टाकून देणे कठीण जाणार नाही. ताबडतोब परदेशी कापड टाकले तर देशाचे कोट्यवधी रुपये आपण वाचवू. अशी परिस्थिती असल्यामुळे लक्षावधी किंवा कोट्यवधी रुपयांचे परदेशी कापड टाकून देणे हे दूरदर्शीपणाचे लक्षण आहे.

स्वदेशी हा आपल्या प्रवासातील शेवटचा टप्पा आहे. त्यात जर आपण फसलो तर यंदाच्या वर्षी स्वराज्य मिळविण्याची आशा टाकून देण्याशिवाय आपल्या नशिबी दुसरे काहीही उरलेले नाही. म्हणून गुजरातने हे काम विलंब न लावता हाती घ्यावे व आपले कर्तव्य करावे.

परदेशी कापडाचा त्याग करण्याच्या बाबतीत जरी प्रत्येकाचे समान कर्तव्य असले तरी गुजरातला कापड निर्मिती मध्ये अग्रेसर होता येईल. जर प्रत्येक शाळेत आणि प्रत्येक घरात कताई व विणाई सुरू झाली तर आपल्याला कापडाचा तुटवडा पडणार नाही. जर गुजरात खादी कार्यात अंतःकरणपूर्वक पडला नाही तर हातात आलेले यश आपण गमावून बसू.

स्वदेशीचा अर्थ आपण समजावून घेऊ या. स्वदेशीमुळे दुसऱ्या देशात पाठवा-वायाचे साठ कोटी रुपये आपल्याला येथेच ठेवावयाचे आहेत. एवढेच नव्हे तर आपली इच्छा तितक्याच किमतीचे कापड कोट्यवधी स्त्रीपुरुषांना उत्पन्न करावयास लावून ही रक्कम त्यांच्या घरोघर वाटावयाची आहे. त्यामुळे आपण या देशातून भुकेला हद्दपार करणार आहोत. म्हणून मी परदेशी कापडाला हद्दपार करणे म्हणजे भुकेला हद्दपार करणे आहे असे समजतो. त्याखेरीज गरिबांना अन्न वाटणाऱ्या धर्मादाय संस्था या वाढू लागल्या आहेत. शेकडो हजारो लोक काम करीत नाहीत आणि आपल्या भगव्या वस्त्रांना लज्जित करतात. जर धष्टपुष्ट मनुष्य काम करीत नसेल तर त्याला काहीही खावयाला देऊ नये. आज कोठल्याही भिकाऱ्याला देता येईल असे आपल्याजवळ कामच नाही. जेव्हा चरखा आणि माग हे सन्माननीय काम आहे असे समजण्यात येईल तेव्हा लोकांच्यात ज्ञानप्रसार करणाऱ्या ब्राह्मणांच्या व फकिरांच्याशिवाय कोणीही भिकेवर जगणार नाही. जे पंगू व दुर्बल असतात त्यांना अन्न देणे लोकांना आवडेल. साधूच्या

वेषात चोरांना इतस्ततः भटकता येणार नाही व भीक मागता येणार नाही. अशा प्रकारे स्वदेशी ढोंगीपणाचा शेवट आणि चांगुलपणाचे राज्य असे समजले जाईल. इतकी समज पटल्यावर गुजरात तावडतोब तुणाई, कताई व विणाई घरोघर जोराने सुरू करील आणि त्यामुळे आत्मसेवा व देशसेवा करील अशी मला आशा आहे.

[गुजरातीवरून]
' नवजीवन ', ७-८-१९२१

२३९. माझी टिप्पणे

मुंबईने स्वतःला मागे टाकले

मुंबईने स्वतःला साजेल अशा रीतीने महाराजांना श्रद्धांजली वाहिली. रविवारी ३१ जुलै रोजी सुमारे दोन लाख लोकांनी एक यज्ञ केला आणि शेठ हाजी युसूफ सोबानी यांच्या मालकीच्या जागेवर आपल्या घाणीला अग्नी दिला. ज्या असंख्य लोकांना या दहनाच्या प्रयोजकतेबद्दल शंका होती त्यांना शंका उरली नाही. दीड लाखापेक्षा कमी वस्तू जाळल्या गेल्या नाहीत. ज्यांच्या डोक्यावर तोपर्यंत काळ्या परदेशी टोप्या होत्या त्यांना जेव्हा हा यज्ञाचा अग्नी पेटला तेव्हा त्यांना लाज वाटली आणि टोप्यांचा पाऊस अग्नीत पडू लागला.

त्या दिवसाच्या लोकांच्या उत्साहाचे वर्णनच करता येत नाही. ते सारे मैदान सुंदर खादीच्या पांढऱ्या टोप्या घातलेल्या आणि खादी परिधान केलेल्या पुरुष व स्त्रियांच्या जमावाने काटोकाठ भरून वाहात होते आणि कोणालाही असे वाटले असते की, मुंबईची सारी वस्ती तेथे जमा झाली आहे. त्या दिवशी जी ज्योत पेटली ती आज देशाच्या अंतःकरणात जळत असलेल्या ज्योतीची द्योतक होती. जोपर्यंत आपल्या घरात तसूभर परदेशी कापड शिल्लक आहे तोपर्यंत ती ज्योत विझणार नाही अशी मला आशा आहे आणि तशीच ज्योत प्रत्येक आठवड्याला त्याच पवित्र जागेवर नव्हे हिंदुस्थानच्या प्रत्येक गावी आणि प्रत्येक रस्त्यात पेटत राहावी आणि त्या आगीत हिंदुस्थानमधील परदेशी कापडाची घाण जळून जावी. या त्यागाच्या कृतीने शुद्ध झालेले मुंबईचे पुरुष, स्त्रिया व मुले शुद्ध खादी घालून ज्या ठिकाणी टिळक महाराजांचे दहन झाले त्या चौपाटीच्या मैदानावर गेले आणि त्या उदात्त आत्म्याला श्रद्धांजली वाहिली.

एखाद्या बादशहाच्या पुण्यतिथीला देखील इतके लोक इतक्या अंतःकरणातील भक्ति-भावाने कधीही जमले नसतील.

जून महिन्यात मुंबईने देशाला आपली प्रतिज्ञा पाळता यावी म्हणून फार उदार देणग्या दिल्या. आणि मुंबई शहर सुंदर आहे ही आपली कीर्ती सार्थ केली आणि पुढील महिन्यात पुढचे पाऊल टाकण्याकरिता जमीन तयार करून आपण त्याहीपेक्षा अधिक सुंदर आहो हे दाखविले.

तथापि अजून पुष्कळ करावयाचे उरले आहे. मुंबईने अद्याप परदेशी कापडाची घाण पूर्णपणे झाडून टाकली नाही. ज्या स्त्रीपुरुषांनी आपले परदेशी कपडे टाकून दिले ते त्यांनी ते अर्धवट खुषीने टाकले. जोपर्यंत ही घाण पूर्णपणे काढली जात नाही तोपर्यंत आपण पूर्णपणे शुद्ध होणार नाही. आणि ज्याप्रमाणे थोडीशी घाण जर उरली तर तीतून विषारी वायू निघतात त्याप्रमाणे जर थोडेसे परदेशी कापड उरले असेल तर ते भयंकर हानी करील. म्हणून परदेशी कापडाची घाण प्रत्येक कानाकोपऱ्यातून झाडून टाकली पाहिजे. मग ती घाण मुंबईत असो किंवा इतरत्र. जोपर्यंत ही घाण आपल्या घरातून पूर्णपणे बाहेर फेकून दिली नाही तोपर्यंत परदेशी कापडाचा प्लेग पुन्हा येण्याचे भय सतत राहील. जर आपण स्वराज्य मिळविण्याचा निश्चय केला असेल तर परदेशी कापड हे कायमचे आपल्याला असह्य झाले पाहिजे आणि ते तसे असह्य होण्यास त्याला बुद्धि-पुरस्सर आग लावली पाहिजे.

जय किंवा पराजय

फार पूर्वी एका पत्रलेखकाने मला विचारले की, येथील जय हा दक्षिण आफ्रिकेतल्यापेक्षा अधिक चांगला होईल का ? या प्रश्नात मला कटुतेइतकेच अज्ञान प्रकट झालेले दिसते. दक्षिण आफ्रिकेतला प्रश्न काय होता हे त्या पत्रलेखकाला ठाऊकच नव्हते त्यांनी असे सूचित केले की, दक्षिण आफ्रिकेतील हालअपेष्टा कायमच राहिल्या. तेथील चळवळ एका विशिष्ट कायद्याविरुद्ध उभारली होती. तीमध्ये आम्हांला पूर्ण यश मिळाले. एशियाटिक कायदा रद्द करणे, इमिग्रेशन कायद्यातून वर्णबंदी काढून टाकणे, हिंदू लग्नांना आणि मुसलमानांच्या लग्नात कायदेशीर मान्यता देणे आणि ३ पौंडाचा कर रद्द करणे, आमच्या एकामागूनच्या एक मागण्या होत्या आणि तेथील सरकारला त्या सर्व मान्य करणे भाग पडले[1].

मी याला संपूर्ण विजय समजतो, पण सर्वात मोठा विजय जर कोणता असेल तर सत्याग्रहामुळे हिंदी लोकांना दक्षिण आफ्रिकेत आपले पाऊल रोवता आले यामुळेच हिंदी लोकांच्या विरुद्ध इतर वसाहतीत लढे सुरू झाले व त्यामध्ये वसाहतींचा आवेश

१. पाहा : खंड १२.

थोडासा ओसरला. या गोष्टीमुळेच साऱ्या जगाने दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांची दखल घेतली. हिंदी लोकांचे संपूर्ण उच्चाटन करावे या उद्देशाने आखलेल्या धोरणात एशियाटिक कायदा हे पहिले पाऊल होते. ते पाऊल उचलताच त्यांना ते मागे घ्यावयास भाग पाडणे चळवळीमुळे शक्य झाले. तीच गोष्ट आपल्या येथील लढ्याबद्दल समजली पाहिजे. खिलाफतीसंबंधी आपली मागणी मान्य करणे याचा अर्थ पुढच्या कोणत्याही काळात खिलाफतीच्या अस्तित्वावर गदा येण्याची शक्यता नाही असे नाही. आपण स्वराज्य मिळविले म्हणजे पुढच्या कोणत्याही काळात ते आपण गमावणार नाही असा त्याचा बिलकूल अर्थ करता येणार नाही. एखादी गोष्ट मिळविण्याकरिता जे शस्त्र आपण वापरले असेल तेच शस्त्र वापरण्याची शक्ती आपल्यात जोपर्यंत असते तोपर्यंत ते मिळविलेले आपल्याला राखता येईल. आत्मबल नष्ट झाले तर त्या आत्मबलाने जे आपण मिळविले असेल ते आपण खात्रीने गमावू. जे आपण संयमाने संपादन केले असेल ते जर आपण आरोग्याचे नियम मोडून जे आपल्याला मोहक वाटेल ते आपण खाऊ व पिऊ तर ते एका क्षणात नष्ट होईल

सत्याग्रह व त्यातून निर्माण झालेली असहकारिता ही अशी शस्त्रे आहेत की, जी कधीही पराभूत होणार नाहीत. जो मरेपर्यंत लढण्याचा निश्चय करतो त्याचा पराभव कसा होणार ? एखाद्या माणसाचा पराभव करणे याचा अर्थ तो जिवंत असेपर्यंत त्याला पराभव कबूल करण्यास भाग पाडणे हा आहे. जो शिपाई रणांगणावर मरून पडतो तो पराभूत झाला असे कोण म्हणेल ? जो आपल्या मागण्यात तडजोड करीत नाही, अशा सत्याग्रहीचा जगात कोण पराभव करील ? आत्मैव आत्मनो बंधुः । आत्मैव रिपुरात्मनः ।

कराचीत शांतताभंग

स्वामी कृष्णानंदांना कराचीत पकडले आणि तुरुंगात टाकले. ती लोकप्रिय व्यक्ती होती. मद्यबंदीच्या लढाईत त्यांनी फार चांगले काम केले. मला असे समजले की, त्यांच्याविरुद्धचा आरोप निराधार होता. या सर्व गोष्टी लोकांना दुखविण्यास व राग आणण्यास पुरेशा होत्या हे कोणी नाकारणार नाही; पण असहकारितेने आपल्याला आपला राग फायदेशी रीत्या व्यक्त करण्यास शिकविले आहे. जर लोकांचे स्वामी कृष्णानंदांवर खरे प्रेम असेल तर त्यांनी दारू सोडावी, शांततेने दारूदुकानावर निरोधन करावे, आपले परदेशी कापड आगीत टाकावे, चरखा चालवावा, हातमाग चालवावेत. आणि खादी निर्माण करावी. अशा प्रकारे काम करून स्वराज्य मिळवा, स्वामींना सोडवा किंवा स्वामींचे काम चालवून तुरुंगात जा. हे करण्याऐवजी काही लोकांनी अत्याचार केले आणि जे इंग्लिश लोक रस्त्याने जात होते त्यांच्यावर दगड मारले. यामुळे स्वामींची खासच सुटका झाली नाही आणि स्वराज्य थोडेसे मागे हटले. स्वराज्य आजच्या आजच मिळवता येईल; पण ते आपल्याला मिळत नाही. कारण आपण आपला राग आवरू शकत नाही. स्वराज्य मिळविण्याकरिता जी मुख्य अट पुरी करावयाची आहे तीच जर आपण

मोडली तर आपण स्वराज्याची आशा का बाळगावी ? कराचीतील कॉंग्रेस व खिलाफत कमिट्यांच्या कार्यकर्त्यांना माझा असा सल्ला आहे की, त्यांनी गुन्हेगार शोधून काढावेत, त्यांच्याबरोबर वादविवाद करावा आणि त्यांना पश्चात्ताप वाटेल असे पाहावे. शांतता-भंगाची अशी कृत्ये सविनय कायदेभंग सुरू करण्यास दिरंगाई लावीत आहत. एक तर आपण असे अत्याचाराचे उद्रेक टाळण्यास समर्थ असले पाहिजे किंवा सरकारची शक्ती ते टाळील. एखाद्या अननुभवी माणसाला सुद्धा हे कळेल की, जोपर्यंत आपण अत्याचार टाळण्याकरिता सरकारवर अवलंबून आहोत, तोपर्यंत समाजातील शांतताप्रिय वर्ग स्वराज्याची इच्छाही करणार नाही आणि जोपर्यंत जनतेत स्वराज्याकरिता दुर्दमनीय इच्छा नाही तोपर्यंत स्वराज्य मिळणार नाही.

हिंदू व मुसलमान

अटरसुंबाचे वाणी व मुसलमान एका क्षुल्लक गोष्टीवरून एकमेकांवर उठले. तेथे एका मुस्लिम स्त्रीचे घर हिंदू देवळाला लागून होते. ही गरीब स्त्री तेथे शांततेने काल-क्रमणा करीत होती. त्या देवळाचे जे वाणी लोक पंच होते, ते हळू हळू तिच्या जमिनी-वर आक्रमण करू लागले. त्या गरीब स्त्रीला थोडेसे चिडवले. ती काही तरी बोलली असेल आणि त्यामुळे वाणी लोकांना राग आला. त्यांनी तिला शिव्या दिल्या व तिचा अपमान केला. तिने तेथील मुसलमानांच्याकडे तक्रार केली. मुसलमान उठले आणि एकेक वाण्याला गाठून त्यांनी त्यांना चांगला चोप दिला. श्री. अब्बास तैय्यबजी यांना हे कळले. त्यांनी मोहनलाल पंड्या यांना शांतता स्थापन करण्याकरिता पाठविले. दोन्ही पक्षांनी ऐकले व भांडण मिटले. जेव्हा मुसलमानांनी वाण्यांच्यावर हल्ला केला तेव्हा वाणी लोकांच्यात आत्मसंरक्षणाची शक्ती नसल्यामुळे ते आपापल्या घरात जाऊन दडले. मला जशी हकीकत सांगण्यात आली तशी मी येथे वर्णन केली आहे. नेमक्या याच रीतीने दोन जातीत संघर्ष निर्माण झाले आहेत किंवा वाढले आहेत. त्या स्त्रीला सताविण्यात आणि तिच्या जमिनीवर आक्रमण करण्यात वाण्यांनी अन्याय केला आहे. जरी त्या स्त्रीला कशाहीकरिता दोष लावला तरी वाण्यांनी त्याकडे दुर्लक्ष करावयास पाहिजे होते. त्या ऐवजी त्यांनी मुंगीला चिरडण्यास सैन्य आणले. मुसल-मानांनी जी चूक केली, ती कोणत्या प्रक्षोभामुळे केली हे मला समजू शकते. तथापि ती मोठी चूकच होती. त्यांनी जे वाणी गुन्हेगार होते त्यांचा शोध करावयास पाहिजे होता. आणि त्यांच्याविरुद्ध पंचांकडे तक्रार करावयास पाहिजे होती. जर कोणी पंच नसला तर त्यांनी जवळच्या कॉंग्रेस खिलाफत कमिटीकडे जाऊन दाद लावून घ्यावयास पाहिजे होती. हे करण्याऐवजी त्यांनी साऱ्या वाणी जमातीला शिक्षा करण्याचा अन्याय्य मार्ग स्वीकारला आणि ज्या प्रमाणे वाण्यांनी त्या स्त्रीविरुद्ध गुन्हा केला तसाच गुन्हा त्यांनीही वाण्याविरुद्ध केला. सुदैवाने श्री. पंड्या तेथे आले आणि त्यांनी भांडण मिटविले. उभयपक्षी जे काय घडले, त्यात जे अपराधी होते त्यांनी दुर्बलांना चिरडण्याचे

धोरण स्वीकारले. जोपर्यंत एकही पक्ष अशा रीतीने वागत राहील तोपर्यंत दंग्याचे मूळ उपटले जाणार नाही. स्वराज्याचा जो अत्यंत महत्त्वाचा अर्थ आहे तो हा की, आपण दुर्बलांना संरक्षण द्यावे आणि सबलांना कधीही भिऊ नये. वाण्यांनी आपली चूक कबूल करावयास पाहिजे होती आणि तसे करूनही त्यांच्यावर हल्ला झाला असता तर त्यांनी मुकाट्याने ठोसे सहन करावयास पाहिजे होते. आपल्या घरांचा आश्रय घेऊन त्यांनी आपण भ्याड व स्वराज्याला नालायक आहोत असे सिद्ध केले. केव्हाना केव्हा तरी आपल्याला ठोशाला तोंड देण्यास शिकावे लागेल यात शंका नाही. संकटाच्या दहशतीने घराचा आश्रय घेणे हा स्वराज्यात आमच्या अंगी आमचा कारभार करण्याची शक्ती आहे ह्याचा पुरावा नाही. शांततामय असहकारिता हा रामबाण उपाय आहे. वाण्यांनी मुसलमानांच्याबरोबर शांतपणे युक्तिवाद करावयाचे धोरण स्वीकारावयास पाहिजे होते. शांततामय वृत्ती ही भ्याडपणाची निदर्शक नाही. ठोशाला ठोसा न लगावता निर्भयपणे ठोसे सहन करण्याच्या शक्तीची ती निदर्शक आहे. जो कोणी याचा विचार करील त्याला हे सत्य आढळेल की, अनत्याचारात असलेली शक्ती ही तलवारीत सापडणार नाही.

भोजा भगत हा मोची होता का ?

भोजाजी नावाचे एक शिक्षक आणि दुसरे एक गृहस्थ मला कळवितात की, भोजा भगत हा लेवा कुणबी असला पाहिजे. एक गृहस्थ खात्रीपूर्वक सांगतात की, तो कुणबी होता. तो मोची होता असा जो माझा समज आहे त्याला काहीही आधार नाही; पण एवढे मात्र खरे की, जेव्हा मी बालवयात शिकत होतो तेव्हा मला हे समजले आणि याच्या एका नातेवाईकाला मला भेटण्यास कोणी तरी घेऊन आले. मी त्या नातेवाई-काला असेही विचारले की, तू अजूनही चांभाराचा धंदा करतोस का ? माझ्या आठवणी-प्रमाणे त्याने नकारार्थी उत्तर दिले होते. तथापि तो असे म्हणाला नाही की, भोज भगत हा मोची नव्हता. मी चुकीचे विधान केले असल्यास वाचक मला क्षमा करतील. भोजा भगतला मोची म्हटल्याबद्दल त्याच्या आत्म्याला दुःख होणार नाही अशी माझी खात्री आहे. ही चूक झाली असली तरी माझ्या म्हणण्याचा मुद्दा कायमच आहे.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', ७-८-१९२१

२४०. महादेव देसाईंना पत्र

लखनौच्या वाटेवर
रविवार [ऑगस्ट ७, १९२१][1]

भाईश्री महादेव,

लखनौजवळ येत असता मी हे पत्र लिहीत आहे. आम्ही तेथे[2] बुधवारी सकाळी पोहोचण्याचे योजिले आहे व त्याच संध्याकाळी आराला जाण्यासाठी निघणार आहोत.

जोसेफला पकडले असेल ही बातमी ऐकण्यास मी उत्सुक आहे. रंगा अय्यरला सोबतीशिवाय ठेवू नये असे मला वाटते.

लोकांच्या आरोळया मला वेड लावीत आहेत. शक्य असेल तर माझ्याकरिता थोडेसे पेढे, सोडा घातलेल्या कणकीच्या पुऱ्या आणि गुळपापडी तयार करून घ्या. या प्रवासात माझ्याजवळ फक्त पेढेच आहेत आणि तेही लवकरच संपतील. प्रवासही लांबचा आहे. कदाचित तुम्हांला तेथे बकऱ्याच्या दुधाचे तूप सहज मिळणार नाही. पण नुसते पेढे तयार केले तरी चालतील. आम्हांला प्रत्येक जागी टोप्यांचा ढीगच्या ढीग मिळतो.

मी वालजींना लिहिले आहे की, त्यांनी यंग इंडियाची कच्ची मुद्रिते तुझ्याकडे पाठवावीत.

बापूचे आशीर्वाद

गुजराती फोटोस्टॅटवरून. एस. एन्. ११,४२१

१. या तारखेला गांधीजी अलीगढहून लखनौला आले. तो रविवार होता.
२. अलाहाबाद.

२४१. जाहीर सभेत भाषण, लखनौ[1]

ऑगस्ट ७, १९२१

... मी तुम्हांला बजावितो की, जर कोणत्याही प्रकारचा अस्वस्थपणा किंवा बेशिस्तपणाचे वर्तन झाले तर त्याने आपले उद्दिष्ट गाठण्याच्या मार्गात अडथळाच येईल. खिलाफतीकरिता, वाईट गोष्टी दूर सारण्याकरिता आणि अंगोराला मदत करण्याकरिता परदेशी कापडावरील बहिष्कार हाच एक उपाय आहे. संयुक्त प्रांताचे सरकार जे जुलूम करीत आहे ते पाहा. दडपशाहीच्या आपल्या धोरणात या प्रांताने इतर प्रांतांवर मात केली आहे. तथापि तुम्ही शांत राहा असे मी सांगतो. स्वातंत्र्याच्या द्वाराचे रक्षण करण्याकरिता जर तुम्ही ५०,००० कार्यकर्त्यांची सेना उभारलीत, तर मी तुम्हांला वचन देतो की, जगातील कोणतीही सत्ता या सैन्याचा पराभव करू शकणार नाही आणि ते सैन्य अगदी तीन महिन्यांत एक तर हे सरकार सुधारील किंवा नष्ट करील. हिंदू मुसलमान ऐक्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची जरूरी आहे, हे मी पुन्हा सांगतो. या दोन जमातींपैकी प्रत्येक जमातीला मी असे सांगतो की, त्यांनी परस्परांबद्दल सहानुभूती दाखवावी. येत्या बकरीदमध्ये दंगे होता कामा नयेत. मी हिंदूंना असे सांगतो की, जर त्यांना गोरक्षणाची तळमळ असेल तर त्यांनी मुसलमानांना खिलाफतीच्या प्रश्नात निःस्वार्थपणाने आणि न कुरकुरता मदत करणे हाच एक मार्ग आहे.

[हिंदीवरून]
‘आज’, १०-८-१९२१

१. सभा अमीनुद्दौला पार्कमध्ये भरली होती. मुळापमागे एक लाख लोक जमले होते. महंमद अली हजर होते.

२४२. काठेवाडच्या संस्थानिकांना उघड पत्र

लखनौ,
सोमवार, श्रावण [ऑगस्ट ८, १९२१]

महाशय,

पुष्कळ वेळा माझ्या मनात विचार आला की, तुम्हांला काही लिहावे, पण तो विचार मी सोडून दिला. तथापि काही गोष्टी माझ्या कानावर आल्या आहेत व समजल्या आहेत की, ज्यामुळे काही विचार तुमच्यासमोर मांडणे हे मला कर्तव्य वाटते.

काठेवाडशी माझा दाट संबंध आहे हे तुम्हांला सांगणे आवश्यक आहे का ? मी काठेवाडात जन्माला आलो ह्याच एका बंधनाने मी काठेवाडशी निगडित झालेलो नाही. माझ्या वडिलांनी तीन संस्थानात मुख्यमंत्री म्हणून काम केले होते. माझ्या चुलत्यांनी एका संस्थानची सेवा केली आणि माझ्या आजोबांनी अशीच सेवा केलेली आहे. काठेवाड संस्थानात नोकऱ्या करून गांधी कुटुंबातील पुष्कळ जणांनी आपली उपजीविका केली आहे. म्हणून तुमच्याशी माझे संबंध सामान्य संबंधापेक्षा अधिक आहेत. तुमच्यासंबंधी विशेष कर्तव्य करण्याचे ऋण माझ्यावर आहे.

म्हणून जेव्हा जेव्हा काठेवाडातील संस्थानातील कोठल्याही संस्थानात मी गैरशिस्त कारभाराच्या गोष्टी ऐकतो तेव्हा मला दुःख होते. काठेवाड ही शूरांची भूमी आहे असे मी समजतो आणि मी अशी आशा बाळगून आहे की, स्वराज्याच्या ह्या यज्ञात काठेवाड आपला पूर्ण हिस्सा समर्पण करील आणि भारताचे नाव उज्ज्वल करील.

“ स्वराज्य ” शब्दाने कृपा करून बिचकू नका. “ स्वराज्य आणि असहकरिता ” या शब्दांनी तुम्ही घाबरून जाऊ नये असे मला वाटते. लोकांना हवे असेल तर म्हणू द्या की, ही एक अराजक चळवळ आहे, तिचा उद्देश अराजकनिष्ठा फैलावण्याचा आहे आणि तिच्यामुळे देशाचा नाश होणार आहे. या गोष्टी अज्ञानाने म्हटल्या जातात अशी खात्री करून घ्या आणि तुमच्या मित्रापुढे माझे समर्थनही करा.

आपल्या शास्त्रात असे सांगितले आहे की, आपण जीव धोक्यात घालूनही अन्यायाचा प्रतिकार करावा. माझ्या वडिलांनी हीच गोष्ट मला आपल्या उदाहरणाने शिकविली. जर लोक धैर्यशाली होण्याचे शिकतील तर देशाचे काही नुकसान होणार नाही.

तथापि मी हे पत्र स्वराज्याबद्दल लिहिण्याच्या उद्देशाने सुरू केले नाही. मी वरील जे विचार प्रदर्शित केले ते एवढ्या करिता की, माझ्या स्वराज्याच्या कल्पनेने तुम्ही बिचकून जाऊ नये.

तुमच्या राज्यकारभाराविषयी माझ्याकडे पुष्कळ लेख आले आहेत आणि माझ्या समक्ष केलेल्या अनेक तक्रारीही मी ऐकल्या आहेत; पण या घटकेपर्यंत त्यापैकी कोणतीही तक्रार प्रसिद्ध करणे मला योग्य वाटले नाही. मला नेहमी असे वाटत आले आहे की, शेवटी सर्व ठाकठीक होईल आणि अजूनही तो विश्वास कायम आहे. बलाढ्य साम्राज्याचा गैरकारभार हा जर संपू शकतो तर लहान संस्थानांचा कारभार हा सहजच संपेल. आत्मशुद्धी ही अशी एक प्रक्रिया आहे की, जी आत्मविश्वासाने सुरू करण्याला वेळ लागतो; पण ती एकदा सुरू झाली म्हणजे लवकर विस्तार पावते.

पण मी आता असे ऐकतो की, काही संस्थानांतील अधिकारी चरख्याची चेष्टा करतात, काही संस्थानांत तो रोग मानतात आणि तो नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. इतर काही संस्थानांत स्वदेशीसारखी कायमची महत्त्वाची चळवळ दाबून टाकण्या करिता लोकांवर गैरवाजवी दडपण आणतात आणि काही संस्थानांत अधिकारी खादी वापरण्याला नाके मुरडतात आणि खादी टोपी वापरणे हा गुन्हा मानतात. यावर माझा विश्वास बसत नाही; पण माझ्यासमोर इतका पुरावा आहे की, तो खोटा असणे शक्य नाही. काठेवाडच्या भूमीत इतकी साधनसामग्री आहे की, तेथील कोणत्याही नागरिकाला दुसऱ्या विभागात जाणे आवश्यक वाटू नये. फार मोठ्या प्रमाणावर एखादा धंदा सुरू करणे हे स्तुत्य आहे; पण शेकडोच काय; पण हजारो काठेवाडी उपजीविकेकरिता आपली भूमी सोडून जातात हे मला ठाऊक आहे. मला त्याचे दुःख होते आणि तुम्हांलाही दुःख व्हावे अशी माझी इच्छा आहे. काठेवाडच्या दणकट व बांधेसूद शेतकऱ्याच्या बरात पूर्वी जो लखलखाट होता तो मला पाहावयास सापडला नाही.

३५ च्या[1] दुष्काळापूर्वी मी दुधाने आणि लोण्याने भरून वाहणारी खेडी पाहिली आहेत. चमचाने तूप वाढणे हे आदरातिथ्य न दाखविणे असे समजले जात असे. डोंगरासारख्या मोठ्या दिसणाऱ्या काठेवाडच्या उंच व धिप्पाड स्त्रियांनी आपल्या चकचकीत कटोऱ्यातून दिलेले सकस ताक मी स्वतः घेतले आहे.

पण आज मी ताक पाहात नसून पांढऱ्या रंगाचे पाणी पाहतो. किटलीच्या आकाराची तुपाकरिता भांडी तर सोडाच पण साधे चमचेसुद्धा आज दृष्टीला पडत नाहीत. ही विपुलता गेल्यामुळे लोकांना कोंडल्यासारखे वाटते आणि ते पळत सुटतात.

जर राजांनी मदत केली तर चरखा व माग हा काठेवाडला जीवन व उत्साहाने भारून टाकील अशी खात्री तुम्ही बाळगा. काठेवाडची लोकसंख्या २६ लाख धरली

१. विक्रम सवंत. म्हणजे १८७९-१८८०.

जाते. एवढी लोकसंख्या ५ लाख चरखे सहज चालवू शकेल. याचा अर्थ दरमहा पंचाहत्तर लाखांपेक्षा कमी उत्पन्न त्यापासून येणार नाही. जर काठेवाडच्या स्त्रिया वर्षातून आठ महिने भक्तिपर गाणी गाता गाता कातू लागतील तर त्या आपल्या घरात वर्षाला साठ लाख रुपये आणू शकतील. याकरिता एक पैही खर्च करण्याची जरूरी नाही. अशा प्रकारे जर काठेवाडचे लोक पैसे मिळवू लागले तर तुम्ही खरेच का त्यांचा हेवा कराल ? तुम्ही त्यांची चेष्टा कराल का ?

काठेवाडमधील मेघवालांच्या[1] पैकी फक्त एक लाख लोक जाड खादीची जाकिटे घालून आणि मोठी-मोठी पागोटी घालून मागावर काम करू लागले तर ते महिन्याकाठी वीस लाखांपेक्षा कमी कमाई करणार नाहीत. त्याचप्रमाणे जर त्यांनी आठ महिने विणकाम केले तर ते वर्षाला एक कोटी साठ लाख रुपये खिशात घालू शकतील. तुम्ही दूरदर्शीपणा दाखवू नये का ? आणि अशा किफायतशीर कामाला अंतःकरणपूर्वक उत्तेजन देऊ नये का ?

तुमच्या दरबारात देखील गरिबांनी विणलेल्या खादीला तुम्ही मानाचे स्थान द्यावे, दरबारात घालावयाचा पोषाख खादीचा असावा आणि तुमच्या प्रजेने विणलेल्या खादीशिवाय तुम्ही स्वतः अंगावर काही दुसरे घालू नये आणि अशा प्रकारे तुम्ही अधिक राजशाही दिसावे अशी माझी अपेक्षा आहे.

काठेवाडचे लोक उपाशी राहात असता मँचेस्टरच्या किंवा जपानच्या लोकांनी तुमच्या पैशावर चैनी कराव्यात हे राज्यशासनाचे तत्त्व योग्य नाही, असे तुमचे शास्त्री तुम्हांला खात्रीपूर्वक पटवितील याबद्दल मला शंका नाही. जर तुम्हांला मलमल पाहिजे असेल तर चांगल्या जातीचा कापूस पिकवा आणि तज्ज्ञ कातणाऱ्यांना व विणणाऱ्यांना उत्तेजन द्या. काठेवाडच्या पहाडी मुलुखात राहाण्याची सवय झालेल्या राजांना सुखसोयींशी आणि चैनींशी काय करावयाचे आहे ? कुत्र्यांची सारी टोळी पाळण्याचा ते विचारच कसा करू शकतात ? उलटपक्षी त्यांनी आपल्या प्रजेकरिता प्राण द्यावयास तयार असले पाहिजे, प्रजेच्या दुःखात सामील झाले पाहिजे आणि प्रजेला जेवू घातल्यानंतरच आपण जेवले पाहिजे. राजा जर व्यापारी बनला आणि ब्राह्मण जर नट झाला तर धर्म कोण सांगणार व राखणार ?

काठेवाडच्या लोकांनी तुमच्या राज्यात राहून ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध चळवळ करावी आणि त्यामुळे तुमच्यापुढे चमत्कारिक परिस्थिती निर्माण केली जावी असे व्हावयास मला नको आहे. मला तुमची नाजूक परिस्थिती समजते. मला तुमच्याबद्दल सहानुभूती वाटते. तुम्ही वाटल्यास असहकारितेत सामील होऊ नका; पण मी तुम्हांला नम्रपणे अशी प्रार्थना करतो की, तुम्ही स्वदेशीकडे निराळ्या दृष्टीने पाहा आणि इतर

१. विणकरांची जात.

कार्यक्रमांचा विचार न करता स्वदेशीच्या प्रगतीकरिता काम करण्यास तुमच्या प्रजेला मदत करा.

आणखी एक गोष्ट मी सांगू का ? काठेवाडमध्ये दारूगुत्ते कसे सहन केले जातात ? दारूपासून जे उत्पन्न मिळते त्याची तुम्हांला खरोखर जरूर आहे यावर कोणाचा विश्वास बसेल ? जेव्हा लोक दारू सोडण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि इतरांचे मन त्याकरिता वळवीत आहेत अशा वेळी तुमच्या दरबारातून देखील दारूच्या बाटल्यांची हकालपट्टी झाली पाहिजे. धोब्याची कुजबूज कानी येताच जर रामाने आपल्या पतिव्रता व निष्ठा-वान सीतेचा त्याग केला तर तुम्ही लोकांना जे पाहिजे आहे ते जाणत असूनही काठे-वाडमधून दारू घालविणार नाही का ?

तुमच्या आगगाड्यात अंत्यजांच्याकरिता निराळे डबे राखून ठेवणे हे आता कसे सहन केले जाईल ? त्यांना तिकिटे मिळण्यात फार त्रास सोसावा लागतो आणि ते तिकिटे काढावयाला गेले म्हणजे त्यांना ढकलून दिले जाते याही गोष्टी कशा सहन व्हाव्यात ? तुम्ही तुमच्या प्रजाजनांना बोलवा, त्यांच्याबरोबर युक्तिवाद करा आणि त्यांना हे समजावून सांगा की, धेडांना व इतरांना जी वाईट वागणूक देता त्यात दयेचा अंशही नाही, एवढेच नव्हे तर तो त्यांचा छळ आहे. अशा प्रकारे या दुर्दैवी लोकांच्या जीवनात तुम्ही सुख आणा आणि त्यांचा अंतःकरणापासूनचा दुवा घ्या.

मी आणखीही पुष्कळ ऐकले आहे. मला येथे त्यात शिरावयाचे नाही. त्या जुन्या गोष्टी आहेत. सध्या जो प्राणवायू संचरत आहे, त्या शुद्ध करणाऱ्या प्राणवायूचा प्रवाह तुम्ही अटकावू नये एवढीच विनंती करण्याकरिता मी हे पत्रक लिहिले आहे. हे पत्र लिहिण्यात ज्या प्रेमाने मी उद्युक्त झालो ते प्रेम तुम्ही समजून घ्या अशी माझी विनंती आहे. माझे पत्रक प्रेमाने वाचा आणि माझ्या नम्र सूचनेप्रमाणे वागा. परमे-श्वराने तुम्हांला न्यायबुद्धी द्यावी आणि काठेवाडचे राजे व प्रजा यांना न्याय्य मार्गाने जात असता सुख द्यावे अशी माझी देवाजवळ प्रार्थना आहे.

तुमचा राजनिष्ठ सेवक
मोहनदास करमचंद गांधी

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १४-८-१९२१

२४३. संपादकाच्या प्रश्नांना उत्तरे

ऑगस्ट ८, १९२१

इंडियन डेली टेलिग्राफचे संपादक मि. मॅकेन्झी यांनी गांधींना पत्र लिहून पुढील प्रश्नांची उत्तरे देण्यास सांगितले.

(१) तुमच्यात व लॉर्ड रीडिंग यांच्यामध्ये जे मतभेद आहेत ते वाढणार आहेत का कमी होणार आहेत?

(२) स्वराज्य स्थापण्याची अपेक्षा तुम्हांला केव्हा आहे?

(३) तुमच्या मताप्रमाणे पंतप्रधान हे अधिक सैतानी का कमी सैतानी झाले आहेत?

(४) तुमच्या विशाल देशातून निर्माण झालेले हे जे नवे मंत्री आहेत आणि जी कौन्सिले आहेत व ज्यांचे स्वराज्य हे अंतिम ध्येय आहे त्यांच्याबद्दल एकही उत्तेजनपर शब्द तुमच्याजवळ नाही का?

(५) दैनिक जीवनातील चिंतांना माधुरी आणण्याकरिता विनोद-बुद्धी हवी असे तुम्हांला वाटते का?

मि. गांधींनी पुढील उत्तरे दिली

(१) ते मतभेद वाढण्याची जितकी शक्यता आहे तितकीच कमी होण्याचीही आहे.

(२) मी माझ्या स्वतःवर ताबा मिळविण्यापलीकडे दुसरे काही करीत नाही; पण हिंदुस्थानने ह्याच वर्षात स्वराज्य स्थापावे अशी मी अपेक्षा बाळगतो.

(३) पंतप्रधान हे मला एक कोडेच वाटते. त्यांनी हिंदुस्थानचे ऋण खासच फेडले नाही.

(४) माझ्याकडून उत्तेजन मिळावे म्हणून मंत्र्यांनी काहीही केलेले नाही. जी राज्यपद्धत माझ्या नम्र मताप्रमाणे हिंदुस्थानचा अधःपात वाढविण्याकरिता त्यांचा बाहुल्यासारखा उपयोग करीत आहे त्या राज्यपद्धतीतून त्यांचे हात जेव्हा स्वच्छ होतील तेव्हाच त्यांना माझ्याकडून उत्तेजन मिळेल. (संयुक्त प्रांतात काय घडत आहे ते पाहा).

(५) जर माझ्यात विनोदबुद्धी नसती तर मी फारच पूर्वी आत्महत्या केली असती.

'दि लीडर', १०-८-१९२१

२४४. जाहीर सभेत भाषण, कानपूर[1]

ऑगस्ट ९,१९२१.

तुम्ही दिलेल्या मानपत्रात एक गोष्ट वगळली आहे. त्यात मौलाना शौकत अलींचा उल्लेख नाही. हिंदू-मुस्लिम ऐक्याला ते बाधक आहे. असे ऐक्य आज अत्यंत महत्त्वाचे आहे. त्या ऐक्यावर खिलाफत प्रश्नाची सोडवणूक, पंजाबचे अन्याय दूर करणे आणि अखेरीस स्वराज्य मिळविणे अवलंबून आहे. खिलाफतीवर गोरक्षणही अवलंबून आहे. खिलाफतीपासून उलट काहीही मिळण्याची अपेक्षा न बाळगता हिंदूंनी त्यागाची तयारी केली पाहिजे. प्रत्येक दिवशी सकाळी मी गायींच्याकरिता प्रार्थना करतो. हिंदूंनी केलेल्या पापांचा परिणाम गोहत्या हा आहे. याच पापामुळे आपल्याला आपल्या बांधवांची सहानुभूती मिळत नाही. त्या पातकाकरिता आपल्याला पश्चात्ताप झाला पाहिजे. खिलाफतीचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटण्याकरिता हिंदू-मुस्लिम ऐक्य अत्यंत महत्त्वाचे आहे. खिलाफतच या दोन जमातींना एकत्र आणील.

त्याचबरोबर शांतता व अनत्याचार राखण्याची जरूरी आहे. आपण क्रोध जिंकला पाहिजे आणि देवाला अशी प्रार्थना केली पाहिजे की, आमच्या अंतःकरणातून क्रोध घालवून लाव.

स्वदेशीशिवाय स्वराज्य नाही. खादी वापरणे आपले कर्तव्य आहे असे स्त्रियांनी समजले पाहिजे. त्यांनी तलम कापड टाकले पाहिजे. एक जानेवारीच्या सुमाराला आपल्याला स्वराज्य मिळेल अशी मला पूर्ण आशा आहे. त्या तारखेला आपल्याला स्वराज्य मिळाले नाही तर जीवन कठीण होईल. स्वावलंबी होण्याचे मूल्य आपण

१. अगोदर दिवशी गांधीजींची मिरवणूक काढली होती. आणि त्यांनी मारवाडी विद्यालयात कापड व्यापाऱ्यांच्या सभेत भाषण केले. त्यांनी परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याचा सल्ला दिला. ते स्त्रियांच्या सभेतही स्वदेशीवर बोलले, संध्याकाळच्या सभेत गांधींना कानपूरच्या नागरिकांनी मानपत्र दिले. त्याचा हा वृत्तांत आहे.

विसरलो आहोत. कसे मरावे हे आपण शिकले पाहिजे. जर आपल्यावर गोळी झाडली तर ती आपण छातीवर झेलावी पाठीवर झेलू नये. जर इंग्लिशांना आपल्या देशात राहण्याची इच्छा असेल तर त्यांनी भावाप्रमाणे किंवा चाकराप्रमाणे देखील राहण्यास शिकले पाहिजे. आता ते मालक म्हणून येथे राहू शकणार नाहीत. स्त्रियांनी कर्तव्य म्हणून परदेशी मालावर बहिष्कार घातला पाहिजे आणि चरखा चालविला पाहिजे आणि त्यामुळे जरी मला तुरुंगात टाकले किंवा फाशी दिले तरी स्वराज्य हस्तगत होईल

[हिंदीवरून]
'आज', ११-८-१९२१

२४५. " आज "ला मुलाखत

ऑगस्ट ९,१९२१

प्रश्न : जर स्वदेशी कापडाच्या किंमती वाढत गेल्या आणि परदेशी कापडाच्या किंमती घटत गेल्या तर आपण काय करावे ?

उत्तर : स्वदेशीच्या प्रतिज्ञेचा असा अर्थ आहे की, फुकट मिळाले तरी आपण परदेशी कापड घेता कामा नये. ज्याप्रमाणे भाकरी अतिशय महाग झाली तरी हिंदू माणूस गोमांस खाणार नाही तसे हे आहे.

प्रश्न : परदेशी सुताचे कापड जर हिंदुस्थानात विणले तर ते तुम्ही स्वदेशी का परदेशी मानाल ?

उत्तर : ते परदेशी कापड होईल.

प्रश्न : जर एखाद्या गिरणीत गुंतविलेले भांडवल हिंदी लोकांचे असेल पण त्याची व्यवस्था युरोपियनांच्या हाती असेल तर तुम्ही तिला स्वदेशी का परदेशी म्हणाल ?

उत्तर : ती परदेशी गिरणी होईल. ज्या गिरणीचे भांडवल व व्यवस्था हिंदी असेल तर तिला स्वदेशी गिरणी म्हणता येईल. स्वदेशी गिरण्यात तयार झालेले कापड गरिबांच्याकरिता राखून ठेवावे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी फक्त शुद्ध खादी वापरावी.

एक ऑगस्टला बनारसच्या सभेत पोलिसांनी केलेल्या अत्याचाराबद्दल बोलताना गांधीजी म्हणाले, तुम्ही पोलिसांना क्षमा केली पाहिजे, नाही तर तुम्ही स्वराज्याला लायक होणार नाही.

[हिंदीवरून]
' आज ', १०-८-१९२१

२४६. मणिलाल कोठारी व फुलचंद शहा यांना पत्र

कानपूर.
[ऑगस्ट ९, १९२१][1]

भाईश्री मणिलाल आणि फुलचंद,

काठेवाड राजकीय परिषदेचे खास अधिवेशन वढवाणला भरविण्याबद्दल आणि त्या परिषदेच्या सुचित केलेल्या अध्यक्षपदाबद्दल मला आताच काही मत देता येणार नाही. सप्टेंबरमध्ये माझा दौरा संपल्यावर जर तुम्ही विचारलेत तर मी निश्चित उत्तर देऊ शकेन. जर मी अध्यक्षपद स्वीकारण्याचे ठरविले तर मी अर्धवट गोष्टी करणार नाही. सविनय कायदेभंगाबद्दल नुसते मत प्रदर्शित करून मला स्वस्थ बसता येणार नाही. मी अध्यक्षपद स्वीकारावे किंवा नाही त्याचा निर्णय या घटकेला देऊ शकत नाही.

मोहनदास गांधीचे
वंदेमातरम्

[गुजरातीवरून]
' गुजराती', १४-८-१९२१

१. मुळातली ही तारीख आहे.

२४७. जाहीर सभेत भाषण, अलाहाबाद[1]

ऑगस्ट १०, १९२१

सुरुवातीला गांधी म्हणाले, माझी इच्छा संयुक्त प्रांतात जी दडपशाही चालली आहे तिच्यासंबंधी बोलावे अशी होती; पण मी तो बेत सोडून दिला आहे. मी आता जे सहकारी तुरुंगात गेले आहेत त्यांचे फक्त अभिनंदन करणार आहे. त्यांच्यापैकी कोणीही तुरुंगात गेले तरी स्वराज्याचे काम शिथिल होता कामा नये हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. जोपर्यंत तुम्ही हे समजून घेतले नाही तोपर्यंत तुम्ही स्वराज्य किंवा स्वातंत्र्याला लायक होणार नाही. ह्या वर्षाच्या आत जर तुम्हांला स्वराज्य मिळवावयाचे असेल तर तुरुंगाचीच काय, पण मृत्यूचीही भीती सोडली पाहिजे. उलटपक्षी प्रत्येक निरपराधी माणसाचा तुरुंगवास किंवा मृत्यू हा स्वराज्य जवळ आणीत असतो असे तुम्हांला वाटले पाहिजे. जोपर्यंत तुम्हांला तसे वाटत नाही तोपर्यंत मी म्हणेन की, तुम्हांला अनत्याचारी असहकारितेचा अर्थ कळला नाही. असहकारिता म्हणजे आळसात बसणे नव्हे. तुम्ही तुमचे बळ संघटित केले पाहिजे. कारण असहकारितेला मोठी शक्ती लागते. मी आपले डोके, सरकारला जोपर्यंत पश्चात्ताप झाला नाही आणि त्यांनी मागील कृत्यांबद्दल माफी मागितली नाही, तोपर्यंत युनियन जॅकपुढे नमविणार नाही. याच निशाणापुढे लष्करी कायद्याच्या दिवसात पंजाबी मुलांना आपली डोकी नमवावी लागली होती. नकाराला फार मोठी शक्ती लागते.

गांधीजी पुढे संयुक्त प्रांतातील परिस्थितीबद्दल बोलले. लहान मुले तुरुंगात पाठविली जातात आणि तरीही असे सांगण्यात आले की, येथे दडपशाही नाही. संयुक्त प्रांताचे सरकार पंजाब सरकारपेक्षा अधिक हुषार आहे. त्या सरकारने मोठ्या पुढाऱ्यांना हात लावला नाही. कारण त्यांना अशी भीती वाटली की, त्यांच्या अटकेमुळे प्रांतात अस्वस्थता माजेल; पण ते सरकार लहान मुलांना एकांतवासाच्या शिक्षा देत आहे. ही भयंकर दडपशाही आहे. या गोष्टी लोकांना दडशत घालण्याकरिता व

१. स्वराज्य-सभेच्या मैदानावर संध्याकाळी ही सभा भरली होती. १०,००० लोक हजर होते. मोतीलाल नेहरू हे अध्यक्ष होते. महंमद अली आणि स्टोक्स हेही बोलले.

त्यांचे धैर्य खचबिण्याकरिता केल्या जातात. किसानांच्यावर देखील असाच जुलूम होत आहे. त्यांना अमान सभेचे सभासद होण्यास आणि असहकारितेच्या चळवळीपासून अलिप्त राहण्यास भाग पाडले जात आहे. ह्याकरिता मी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दोष देण्यास तयार नाही. कारण गव्हर्नर व त्यांचे सहकारी यांना ह्या गोष्टी ठाऊक आहेत किंवा नाहीत याची मला खात्री नाही. मला अद्याप महमुदाबादचे राजे आणि चिंतामणी[1] व इतर यांच्याबद्दल आदर आहे. त्यांचे हात आता विटाळले आहेत; पण ती पापे त्यांनी खुषीने किंवा स्वेच्छेने केली नाहीत. ते आता सरकारी सभासद झाले आहेत आणि म्हणून त्यांची डोकी फिरली आहेत. ते आता म्हणतात की, असहकारितावादीच विरोधकांच्या विरुद्ध जुलूम-जबरदस्ती करीत आहेत. मी हा आरोप सर्वस्वी अमान्य करीत नाही. अलीगड आणि मालेगाव येथे ज्या घटना घडल्या त्यासंबंधी मी पश्चात्ताप व्यक्त केला आणि अत्याचारी कृत्यांचा निषेधही केला. तथापि माझे असे म्हणणे आहे की, एकंदरीत असहकारितेचे काम शांततेने चालले आहे.

गांधी पुढे म्हणाले की, ही शांततेची वृत्ती वाढावी अशी माझी इच्छा आहे. जरी सरकारने तुम्हांला तुरुंगात पाठविले किंवा ठार मारले, तरी देखील तुम्ही सरकारी अधिकाऱ्यांना शाप देऊ नका किंवा त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालू नका. जेव्हा तुम्ही स्वतःवर इतके स्वामित्व मिळवाल तेव्हा स्वराज्य तुमचेच आहे आणि तुमच्यात पंजाब व खिलाफतींच्या बाबतीतला न्याय मिळविण्याची शक्ती येईल; पण जोपर्यंत हिंदू व मुसलमान एक होत नाहीत तोपर्यंत हे शक्य होणार नाही. बकरीद जवळ येत आहे. जर हिंदूंना गाय वाचवावयाची असेल तर त्यांनी खिलाफतीच्या पवित्र अग्नीत आपली डोकी समर्पण केली पाहिजेत. पण हे त्यांनी सौद्याच्या वृत्तीने करू नये किंवा त्यांनी मुसलमान बांधवांना गाईचे प्राण वाचविण्यास भाग पाडू नये.

स्वदेशीच्या प्रश्नाकडे वळून गांधीजी म्हणाले, स्वदेशीच्या कार्याचा पुरस्कार म्हणजे वर्षाला साठ कोटी रुपये वाचविणे, उपाशी मरणाऱ्या देशबांधवांना अन्न देणे आणि आपल्या स्त्रियांचे पावित्र्य राखणे; पण

१. सर. सी. वाय्. चिंतामणी. (१८८०-१९४१.) वृत्तपत्रकार, ग्रंथकार व राजकारणी; व्हाइसरॉय कौन्सिलचे कायदा खात्याचे सभासद, १९२० ते १९२२. लिबरल फेडरेशनचे अध्यक्ष १९२३ व १९२७.

या सर्वांपेक्षा स्वदेशी म्हणजे सविनय कायदेभंगाची तयारी. जर तुम्ही सप्टेंबरपर्यंत स्वदेशी यशस्वी केलीत तर मी असे म्हणेन की, तुम्ही सरकारला अंतिमोत्तर देण्याइतके बलिष्ठ झाला आहात. याखेरीज आणखी त्याचा अर्थ असा की, तुम्ही साऱ्या जगाला हिंदुस्थानने आपली शक्ती संघटित केली आहे असे घोषित करून सांगणार आहात. तुम्ही आपले परदेशी कपडे जाळावेत असे माझे मत आहे. जर तुम्हांला स्मर्नाला मदत करावयाची असेल तर तुम्ही रोख पैसे किंवा नवे कपडे पाठवा; पण टाकून दिलेले कपडे पाठवू नका. पण तुम्हांला आवडतच असेल तर ते कपडे तेथे पाठविले तर मला काही वाटणार नाही. पण काही असले तरी तुमच्याजवळ परदेशी कपडे ठेवू नका. तुम्ही ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या निर्णयाप्रमाणे वागा आणि हातमाग व चरखे चालू करा. नंतर आपल्या जिल्ह्यात जे कापड तयार होऊ शकेल त्यावर निर्वाह करा आणि अर्धनग्न राहण्याची पाळी आली तरी दुसऱ्या ठिकाणाहून कापड आणू नका. त्यामुळे तुमच्यावरील स्वदेशी म्हणून परदेशी कापड लादण्याचे संकट टळेल.

भाषण संपविताना गांधीजी म्हणाले, येथे जमविलेल्या परदेशी कापडाची मी आता होळी करणार आहे. कोणाबद्दलही शत्रुत्वाची भावना न बाळगता मी हे पवित्र काम करणार आहे. प्रेम, अहिंसा आणि शांती हा माझा धर्म आहे. पुरुषांपेक्षा स्त्रियांच्याकडून याबाबतीत माझी अपेक्षा अधिक आहे आणि म्हणून या कामात त्यांनी भाग घ्यावा अशी मी विनंती त्यांना करतो.[१]

'दि लीडर', १२-८-१९२१

२४८. टिप्पणे

मुंबईत होळी

परदेशी कपडे जाळण्याच्या आवश्यकतेबद्दल किंवा उपयुक्ततेबद्दल जर कोणाला काही शंका असल्या तर ज्यांनी परळ येथे सोबानी यांच्या मैदानात जी पेटलेली होळी

१. सभेच्या शेवटी गांधींनी परदेशी कापडाची मोठी होळी पेटविली.

पाहिली असेल तीमुळे त्यांच्या साऱ्या शंका दूर झाल्या असतील. हजारो प्रेक्षकांनी पाहिलेला तो अत्यंत उत्साहजनक देखावा होता आणि जसजशा त्या ज्वाला वरवर जाऊ लागल्या आणि त्यांनी तिकोनी स्तंभाला आलिंगन दिले तेव्हा अस्मानामध्ये आनंदाच्या आरोळ्या दुमदुमल्या. जणू काय आपल्या पारतंत्र्याच्या शृंखला तुटून पडल्या आहेत असे वाटले. त्या प्रचंड समुदायात स्वातंत्र्याचा झगझगीत प्रकाश जणू काय पसरला. उदात्ततेने केलेले ते उदात्त कृत्य होते. स्वदेशीपुरतेच म्हणावयाचे म्हणजे दुसऱ्या कोणत्याही गोष्टीने तोपर्यंत केला नव्हता इतका लोकांच्या मनावर त्याचा प्रचंड परिणाम झाला आणि हेही ठीक होते की, नुसत्याच चिंध्या तेथे जाळल्या नव्हत्या तर उंची साड्या, शर्टस् आणि जाकिटेही अग्नीला अर्पण केली. मला हेही ठाऊक आहे की, मातांनी आपल्या मुलींच्या लग्नाकरिता ठेवलेले निवडक रेशमी कपडे जाळण्याकरिता देऊन टाकले. अशा भारी वस्तू नष्ट करण्यालाच खरे महत्त्व आहे. दीड लाखापेक्षा कमी कपडे जाळले गेले नसतील. त्यात अशाही वस्तू होत्या की, ज्यांची प्रत्येकी किंमत शेकडो रुपये असेल. हे सर्व देशाच्या कल्याणाकरिता होते याची मला खात्री आहे अशा वस्तू गरिबांना देणे गुन्हा झाले असते. अत्यंत भारी रेशमी कपडे वापरणारे गरीब लोक डोळ्यांसमोर आणा. त्यासंबंधी अगदी कमीत कमी बोलावयाचे म्हणजे तो देखावा अत्यंत कलाहीन व अत्यंत बेढब दिसला असता. खरी गोष्ट अशी आहे की, जाळलेल्या वस्तूंपैकी बहुसंख्य वस्तूंचे गरिबांच्या जीवनाशी काहीही साहृश्य नव्हते. मध्यमवर्गीय लोकांच्या पोषाखात इतका बदल झाला आहे की, ते कपडे गरिबांना देणे योग्य झाले नसते. केस साफसूफ करण्याचे भारी किंमतीचे, टाकून दिलेले ब्रश त्यांना दिल्यासारखे ते झाले असते. म्हणून ही दहनक्रिया चालू राहील आणि हिंदुस्थानाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पसरेल व ती प्रत्येक परदेशी वस्तूची राख होईपर्यंत किंवा ती हिंदुस्थानबाहेर घालवीपर्यंत थांबणार नाही अशी मला आशा आहे.

तामीळ स्त्रियांबद्दल

तिरुपतीहून एक मित्र लिहितात :

आपल्या चळवळीच्या यशाच्या मार्गात मद्रासमध्ये जर सर्वांत मोठा अडथळा असेल तर आमच्या बायका. त्यातील काही फार प्रतिगामी आहेत आणि पुष्कळ उच्चवर्णीय ब्राह्मण स्त्रिया या पाश्चात्य दुर्गुणांच्या आहारी गेल्या आहेत. त्या दिवसाला कमीत कमी तिनदा कॉफी पितात आणि अधिक वेळा कॉफी पिणे ही फॅशन समजतात. पोषाखात त्या अधिक चांगल्या नाहीत. त्यांनी घरगुती स्वस्त कापड टाकून दिले आहे आणि भारी परदेशी कापडाच्या मागे लागल्या आहेत. दागदागिन्यांच्या बाबतीत ब्राह्मणांच्या स्त्रिया सर्वांत वरचढ आहेत. ब्राह्मणांच्यात श्रीवैष्ण-

वांच्या बायका कपडे वापरण्याच्या बाबतीत जास्तीत जास्त पापी आहेत. पुरुष शुद्ध जीवनाकडे वळण्याचा प्रयत्न करीत असताना आमच्या स्त्रिया उधळ्या होत आहेत. देवळात देवाची पूजा करावयाला जात असताना त्यांना साध्यासुध्या पोषाखाचा विचारच सुचत नाही. जास्तीत जास्त भारी किंमतीचे दागदागिने आपण घातलेच पाहिजेत असे त्यांना वाटते आणि त्याहीपेक्षा भारी किंमतीच्या फिती त्यांना लागतात. आपल्याजवळ श्रीमंती कपडे नाहीत आणि मौल्यवान दागिने नाहीत म्हणून पुष्कळ प्रामाणिक स्त्रिया देवळातच जात नाहीत हे मला ठाऊक आहे.

जे हे असहकारिता करणारे वैष्णव वकील म्हणतात ते सारे खरे आहे, असे मानण्यास माझी तयारी नाही. भपकेबाजपणाच्या आवडीबाबत इतर भगिनींपेक्षा तामीळ भगिनी अधिक वाईट आहेत या विधानावर विश्वास ठेवू नये असे मला वाटते. तथापि या पत्राचा उपयोग तामीळ भगिनींनी इशाऱ्यादाखल करुन घ्यावा. त्यांनी पूर्वीच्या साधेपणाकडे वळलेच पाहिजे. ज्या भपकेबाज पोषाख करतात, त्यांच्यापेक्षा ज्या अंतःशुद्धीचे लक्षण म्हणून स्वच्छ, शुभ्र खादीच्या साड्या वापरतात, त्यांच्यावर देव खात्रीनेच अधिक प्रसन्न होईल. आमची देवालये ही देखाव्याकरिता नाहीत; पण भक्तियुक्त त्तीचा नमुना म्हणून ती देवळे नम्रता आणि साधेपणा हे प्रकट करण्याकरिता आहेत. ज्या दोषांबद्दल तक्रार केली गेली आहे त्यासंबंधी मद्रास इलाख्यात सतत प्रचार केला गेला पाहिजे.

मध्यप्रांतात पांढरी टोपी

मध्यप्रांतात सरकारी नोकरांनी पांढऱ्या टोप्या वापरणे हा अधिकृतरीत्या गुन्हा ठरविण्यात आला आहे. त्या निर्णयाला मध्यप्रदेशाच्या कौन्सिलात जाहीर मान्यता मिळाली आहे. त्या सरकारने जो सिद्धांत मांडला तो अत्यंत क्षुद्र आणि भयानक आहे. जर पांढरी टोपी ही असहकारिता पक्षाची निशाणी असेल तर खादीचा वापर हा तसाच मानला पाहिजे. त्याला शिक्षा झाली पाहिजे आणि अशा प्रकारे सरकारी शब्दकोशात स्वदेशी हे पातक होईल. दोनशे वर्षांपूर्वी परदेशी कापड हिंदुस्थानवर लादले गेले. हिंदुस्थानने स्वदेशीकडे परत वळू नये म्हणून त्याला बळजबरीने बंदी करण्याचा आता प्रयत्न सुरू झाला आहे. लोकमताबद्दल जागरूक असणाऱ्या कोणत्याही सत्प्रवृत्त सरकारने आपल्या नोकरांनी खादी वापरावी म्हणून उत्तेजन दिले असते. पांढरी टोपी वापरणे असहकारितेचे लक्षण आहे हे मी नाकबूल करतो. मला असहकारितेचा तिटकारा करणारे असे पुष्कळ लोक माहीत आहेत की, ज्यांनी पांढरी खादी टोपी सोयीकरिता व स्वदेशीच्या निशाणीकरिता वापरण्यास सुरुवात केली आहे. कॉंग्रेसने अजूनपर्यंत सरकारी नोकरांना आपल्या नोकऱ्या सोडण्यास सांगितले नाही.

पण माझी त्यांच्याबद्दल अशी अपेक्षा आहे की, त्यांनी आवडेल तो पोषाख घालण्याचे धैर्य दाखवावे आणि कृति-स्वातंत्र्य रक्षण करावे. मग त्याकरिता नोकरी जाण्याचा धोका असला तरी तो पत्करावा. जर सरकारी नोकर एकजुटीने पाऊल टाकण्यास पुढे येतील तर सरकार त्यांना शिक्षा करण्यास असमर्थ आहे हे त्यांना आढळून येईल; पण हे शक्य असो वा नसो त्यांच्या स्वतःकरिता तरी सरकारी नोकरात अशा व्यक्ती आढळाव्यात की, जे पांढरी टोपी घालण्यास कचरणार नाहीत अशी मला आशा आहे.

ग्वाल्हेरमध्ये अंधार

ग्वाल्हेरवरून जात असता स्टेशनवर जमलेले लोक आमच्या डब्याकडे येण्यास घाबरत होते हे पाहून मला आश्चर्य वाटले. प्लॅटफॉर्मवर स्वदेशीचे नाव-निशाणही नव्हते. इतर प्रत्येक स्टेशनाप्रमाणे येथे कोणी आम्हांस परदेशी टोप्या दिल्या नाहीत. मला त्याचे कारण लवकरच कळले. या संस्थानात असहकारितेला जवळजवळ बंदी आहे. खादी टोपी घालणे आणि चरखा जवळ बाळगणे हे जरी गुन्हे नसले तरी त्याबद्दल नापसंतीच आहे. महाराजांचे स्वतःचे विचार इतके प्रतिगामी असतील ही कल्पनाच करवत नाही. महाराजांच्याबद्दल मला सहानुभूती वाटते. हिंदी संस्थानात सरकारचे विषारी प्रभाव इतर ठिकाणच्यापेक्षा अधिक उघड दिसतात. ही संस्थाने भरीव सुधारणा करण्यास असमर्थ असतात, एवढेच नव्हे तर आपल्या प्रजाजनांचे स्वातंत्र्य खची करण्याकरिता नाखुषीने त्यांना ब्रिटिशसरकार आपले हस्तक बनविते. त्यापेक्षाही आणखी विशेष गोष्ट अशी आहे की, सार्वभौम सत्तेच्या संरक्षक छत्राने इतर हिंदुस्थानप्रमाणे त्यांनाही पौरुषहीन व बेजबाबदार बनविले आहे. म्हणून जेव्हा एखादा संस्थानिक स्वैर वृत्तीचा असतो आणि लोकांचा छळ करू इच्छितो, त्या वेळी व्हॉइसरॉयपेक्षाही त्याला आपल्या संस्थानात वाईट गोष्टी करण्याची निश्चितच अमर्याद सत्ता असते. सध्याच्या सरकारी पद्धतीत असलेली ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. तथापि मला ग्वाल्हेरच्या स्टेशनवर मिळालेली माहिती अतिरंजित ठरावी, अशी माझी आशा आहे आणि त्या संस्थानात दडपशाहीने जे उग्र स्वरूप धारण केले आहे ते तेथे नसावे अशीही माझी आशा आहे.

लाहोरचे अनुकरण करा

लाहोरच्या नगरपालिकेत बहुसंख्य असहकारितावादी आहेत. त्यांनी असा ठराव केला की, भाडयाच्या गाडीवाल्यांनी आणि इतर नोकरांनी खादीच्या टोप्या वापराव्यात तसेच नगरपालिकेच्या सर्व खात्यांनी शक्य तितकी खादी वापरावी. असे सांगतात की, अमृतसरच्या वकिलांनी खादीचे कपडे वापरण्यास सुरुवात केली आहे. लाहोरने जे चांगले उदाहरण घालून दिले आहे त्याचे अनुकरण इतर नगरपालिका करतील आणि हिंदुस्थानातील सर्व वकील अमृतसरच्या वकिलांचे उदाहरण गिरवतील अशी मला

आशा आहे. देशाकरिता आणि स्वदेशीकरिता कमीतकमी एवढी गोष्ट ते करू शकतील.

मजुरांची शक्ती

टिळक स्वराज्य फंडाकरिता पैसे देण्यात मजुरांनी काय कामगिरी केली याची जनतेला कल्पना नाही. अहमदाबादच्या एकवीस हजार गिरणी मजुरांनी जवळजवळ ५४,००० रुपये दिले आणि तेसुद्धा ठरविलेल्या हिशेबाने म्हणजे महिन्याच्या पगाराच्या एक दशांश. सात हजार काँग्रेस सभासद झाले. त्याचप्रमाणे अहमदाबादच्या मजुराइतके शास्त्रोक्त पद्धतीने किंवा मोठ्या प्रमाणावर मुंबईच्या मजुरांनी पैसे दिले नसले तरी त्यांनी आपल्या थैल्या न मागता पाठविल्या. काळाचे हे सुचिन्ह आहे. जसजसे कामगार अधिक सुसंघटित होतील आणि स्वतःप्रमाणे देशाचा विचार करू लागतील तसतसे ते आपल्या तयार मालाच्या किंमती योग्य रीतीने ठरवाव्यात म्हणून लढे करू लागतील. कारण हा माल तयार करण्याकरिता ते अतोनात मेहनत करीत असतात. आणि त्यानंतर गिरण्या, कामगार किंवा ग्राहक यांच्या हिताकडे न पाहता भागीदारांचा नफा फुगविण्याकरिता जबर किंमती आकारतात हा प्रश्नच उरणार नाही. एक वेळ अशी आली पाहिजे आणि ती शक्य तितक्या लवकर आली पाहिजे की, जेव्हा नफे, मजूरी आणि किंमती यांच्यात योग्य प्रमाण दिसू शकेल.

बेशिस्त

माझ्या पुन्हा सुरू केलेल्या दौऱ्याचा अनुभव हा मागील दौऱ्यांपेक्षा अधिक सुखदायक नाही. माझी अशी अपेक्षा होती की, मी इतके लिहिल्यानंतर आणि बोलल्यानंतर व ज्या शिस्तीतून आपण गेलो त्यानंतर वाटेत शिस्तबद्ध आणि विचार-पूर्वक निदर्शने झाल्याची मला पाहावयाला सापडतील. तथापि स्टेशनांवर प्रचंड आरडा-ओरड करणारे आणि रेटारेटी करणारे जमाव पाहून मला आश्चर्य वाटले. आग्रा आणि तुंडला येथे हा जमाव दाट आणि हट्टी होता. तुंडल्याला गर्दीतून जाणेच कठीण झाले. स्वाभाविकपणेच त्यांना जे सांगितले ते त्यांना ऐकू आले नाही. जेव्हा त्यांना कोणी शांत राहाण्यास सांगे तेव्हा ते अधिकच जोराने ओरडत आणि जेव्हा मला जेवणाच्या खोलीत ढकलले तेव्हा जमाव त्या खोलीभोवती घिरट्या घालू लागला आणि आत डोकावण्याच्या उत्सुकतेने त्याने जेवणाच्या खोलीच्या दाराची तावदाने फोडली. स्टेशन-बाहेरील पडवीत मी लोकांना घेऊन जाईपर्यंत ते स्वस्थच बसेनात. माझ्या भाषणानंतर जो प्रकार दिसला तो अगदी उलटा होता. जमावाने साऱ्या सूचना पाळल्या, पूर्वीपेक्षा कमी गोंगाट केला, माझ्या डब्याकडे त्यांनी धडक मारली नाही आणि आम्हांला जाण्यास त्यांनी वाट करून दिली. मी तुंडल्यावरून अनेक वेळा गेलो आहे पण तेथे बिलकुल गर्दी पाहिली नव्हती. चौकशी करता असे समजले की, या वेळी शेजारच्या

खेड्यातले लोक दर्शनाकरिता आले होते. हे दर्शन म्हणजे एक अत्यंत अडचणीची गोष्ट झाली आहे व ते मौल्यवान वेळ घेते. माझ्या डोक्याला त्यामुळे अत्यंत शीण होतो आणि माझ्या प्रवासांत जी काय थोडीशी फुरसत मिळते, त्या फुरसतीत लिहिण्याकरिता जी शांतता मला लागते ती मिळत नाही. ही सारी अडचण मुख्यत्वे दूरदर्शीपणा आणि संघटना यांच्या अभावामुळे उद्भवते. कार्यकर्त्यांनी ह्या निदर्शनांची आखणी पद्धतशीरपणे करावी किंवा ती करूच नये. सुदैवाने ती निदर्शने मित्रत्वाची असतात आणि ती कधीही उपद्रव देत नाहीत. पण जर विरोधी निदर्शने आपण केली तर किती गोंधळ माजेल याची कल्पना करा. गोळीबारात किंवा क्रुद्ध प्रक्षोभात जर आपल्याला हा जमाव आवरावयाचा असेल तर काय होईल ? तुंडल्याला जो जमाव मी पाहिला त्यावरून सामुदायिक कायदेभंग अशक्य आहे असे मला दिसून आले. आपण जमावाला सूचना दिल्याशिवाय आणि त्यांच्याकडून त्या कडक रीतीने पाळल्या जातील अशी अपेक्षा बाळगल्याशिवाय परिणामकारक कार्यच होणार नाही. म्हणून स्वयंसेवकांनी जमावाला हाताळण्याचे शिक्षण घेतले पाहिजे. हिंदुस्थानातील जमाव हा साऱ्या जगात हाताळण्याला अत्यंत सोपा व सालस आहे. पण त्याकरिता पूर्वतयारी हवी आणि जेव्हा अशी तयारी नसते तेव्हा जमावाला एकत्र न आणणे हेच अत्यंत शहाणपणाचे असते.

निदर्शने

मालेगावला आणि अलिगडलादेखील जाळपोळ कशी झाली हे समजणे आता सोपे आहे. बेशिस्त जमाव एकत्र झाला होता. अशा गर्दीत अनुकूल संधीची वाट पाहाणारे खोडसाळ लोक असतात आणि जेव्हा जमाव प्रक्षुब्ध केला जातो तेव्हा तो अप्रत्यक्षपणे आज्ञा पालन करतो. म्हणजे क्षणिक भावनेने तो भडकतो. म्हणून जेव्हा आपण न आवरता येणारी खटल्याच्या वेळची निदर्शने घडवून आणतो तेव्हा आपण ‘ शत्रूच्या ’ हातातील खेळणी बनतो. आजचा आपला उद्देश शांत, अनत्याचारी तथापि निर्धाराचे वातावरण निर्माण करण्याचा आहे. शिस्तबद्ध सैनिकांनी अनपेक्षित गोळीबार सुरू केला म्हणजे आपला सारा निश्चय ढासळून पडतो. म्हणून तुरुंगवासाच्या बाबतीतली सारी निदर्शने आपण कटाक्षाने टाळली पाहिजेत. सरकारला जे कोणी पाहिजे असतील त्यांच्याकडे न पाहाता त्यांना जाऊ दिले पाहिजे. जेव्हा आपण पुरेसा आत्मसंयम संपादन करू तेव्हा आपण सविनय कायदेभंगाला आणि स्वराज्याला तयार होऊ. हा आत्मसंयम फक्त संपूर्ण स्वदेशीनेच प्राप्त होईल. परदेशी कापडावरील बहिष्कार आणि आवश्यक प्रमाणात लागणारी खादी तयार करण्याकरिता करावे लागणारे प्रयत्न यामुळेच आपल्यामध्ये आत्मविश्वास येईल. तो दुसऱ्या कशानेही येणार नाही.

मुक्ततेमुळे दुःख

मि. व्यंकट अप्पय्या यांनी अशी तार पाठविली आहे की, माझे सहकारी तुरुंगात असता मी तुरुंगातून सुटलो याचे मला अत्यंत दुःख होते. मी त्यांच्या दुःखात भागीदार

आहे. लवकरच स्वाभिमानी हिंदी माणसाला तुरुंग हीच एक योग्य जागा होणार आहे. अलिगडमधील प्रत्येकाला मौलाना शेरवानींच्या भाग्याबद्दल हेवा वाटतो. मिसेस ख्वाजा मला कळवितात की, माझा नवरा मोकळा सुटला; पण त्यांचे सहकारी अद्याप तुरुंगात आहेत हे पाहून माझे हृदय विदीर्ण होते. हीच खरी वृत्ती आहे. जर आपले स्त्री-पुरुष स्वातंत्र्याकरिता झगडत असताना तुरुंगात असणे हे भाग्याचे आहे असे समजतील तर याच वर्षी स्वराज्य शक्य आहे. गंटूरच्या लोकांमध्ये योग्य वृत्ती संचरली आहे हे उघडच दिसते. कारण मि. प्रकाशम् यांनी अटकेची बातमी ऐकताच गंटूरला धूम ठोकली आणि तेथून तार केली की, कित्येक वकिलांनी वकिली थांबविली आहे आणि लोक काँग्रेसचा असहकारितेचा कार्यक्रम पुरा करण्याकरिता पूर्वीपेक्षा अधिक जोमाची तयारी करीत आहेत. जेव्हा आपण तुरुंगाच्या बाहेर जबाबदारीच्या मुक्त जाणिवेने काम करू तेव्हा आपण फार काळ न लागता तुरुंगात जाऊ आणि जोपर्यंत आपण तुरुंगात गेलो नाही तोपर्यंत आपण राष्ट्राचा काल व्यर्थ दवडीत नाही असा आपल्याला विश्वास असतो.

एक ऑगस्टची सक्ती

एक्स, वाय, झेड हे मला रागावून विचारतात की, पहिल्या ऑगस्टचा मला काय अनुभव आला? पहिल्या ऑगस्टचा माझा अनुभव असा आहे की, मी त्यापूर्वी अधिक चांगल्या रीतीने वागणारा जमाव कधीही पाहिला नव्हता. काही लोकांवर आपल्या परदेशी टोप्या टाकून देण्याची सक्ती केली या त्यांच्या सांगण्यावर माझा विश्वास आहे; पण अशी उदाहरणे अपवादात्मकच आहेत. स्वदेशी प्रचारात बळजबरीचा वापर हा अस्थानी आहे. आणि त्यामुळे आपला उद्देश सफल होणार नाही यात मला शंका वाटत नाही. आपण सक्तीने हिंदुस्थानला खादी वापरण्यास भाग पाडू शकणार नाही. ते स्वातंत्र्याचे आणि स्वाभिमानाचे लक्षण असले पाहिजे; पण त्याच्या प्रचाराकरिता सक्ती केली तर ते तसे होणार नाही.

बंगाल व मद्रासच्या निवडणुका

बंगाल आणि मद्रासच्या निवडणुकांसंबंधी वर्किंग कमिटीने जो निर्णय दिला, त्यामुळे अंतःकरणात जळजळ होईल याविषयी मला शंका नाही. त्याला आणखी कारण असे आहे की, चेअरमनने निवडणुका घटनाविरोधी आहेत असा निर्णय दिला असता, तो निकाल देण्यात आला. दुखावलेल्या पक्षाबद्दल मला सहानुभूती वाटते; पण त्यांनी कमिटीने निकालाबद्दलची जी कारणे दिली आहेत त्याला योग्य मान द्यावा असे मला वाटते. माझ्या मताप्रमाणे कमिटीला गुणावगुणावरून संबंधित पक्षांचा पुरावा घेतल्याशिवाय निकाल देणे शक्य झाले नसते; पण ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने जो कार्यक्रम आखून दिला होता, तो जर पार पाडावयाचा असता तर कमिटीला ही गोष्ट

करण्यास वेळ नव्हता. चौकशी होईपर्यंत सभासद आहेत तसेच राहिले असते. म्हणून नोव्हेंबरपर्यंत वाट पाहण्यास दुखावलेल्या पक्षांचे काहीच नुकसान झालेले नाही. शिवाय अशी गाऱ्हाणी दूर करण्याकरता शक्य तो सर्व प्रयत्न केल्याशिवाय ऑल इंडिया काँग्रेस कमिटीपुढे अशी प्रकरणे आणणे हे धोरण चुकीचे आहे. आपल्याला स्थानिक लोकमताच्या बळावर असे गैरप्रकार थांबविण्याची व ते सुधारण्याची शक्ती स्वतःमध्ये वाढवावयाची आहे. सुबुद्ध जनमतापुढे बंगाल किंवा मद्रासच्या कमिटीला आपल्या न टिकणाऱ्या भूमिकेचे समर्थन करता येणार नाही. आणि जर सध्याच्या पुढाऱ्यांच्या मागे आंधळे लोकमत असेल तर ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचा कोणताही निर्णय दुखावलेल्या पक्षाचा काहीच परिहार करू शकणार नाही. काँग्रेसला लोकशाही घटना आहे; पण ती घटना राबविण्याकरिता लोकशाही वृत्तीचे लोक नसले आणि त्यांनी आपल्या मार्गदर्शनाकरिता लोकमताचा उष्णतामापक यंत्राप्रमाणे उपयोग केला नाही तर ती घटना हुकूमशाही उद्दिष्टाकरिता राबविली जाईल यात शंका नाही. मध्यवर्ती संस्थेने गर्दीगर्दीने हस्तक्षेप केल्यास त्यामुळे कडवटपणा आणि फाटाफूट वाढेल. म्हणून वर्किंग कमिटीने कायद्याचा मुद्दा जाणूनबुजून टाळला आहे. गुणावगुणात शिरण्याचे नाकारले आहे. दोन्ही पक्षांना सन्मानाने वागण्यास सांगितले आहे व स्थानिक प्रयत्नाने साऱ्या गोष्टी ठाकठीक करा अशी विनवणी केली आहे. सिद्धांतिक चर्चा किंवा कायद्याचे कीस काढण्यास आपल्याला वेळ नाही. आपण अधिकारपदाचा कमी विचार करावा आणि सेवेचा जास्त.

एका इंग्लिश मित्राचा इशारा

मी खाली एका इंग्लिश मैत्रिणीच्या पत्रातील आवश्यक भाग देत आहे. तिला मी अनेक वर्षे ओळखतो व ती मोठी सत्याची शोधक आहे. ती म्हणते :

> तुमचे काही शब्द फार सुंदर दिसतात; पण काही तुम्हांला न साजेसे असतात आणि त्यामुळे मला त्रास होतो. मी तरी टीका का करू ? मला गुंतागुंतीच्या परिस्थितीची माहिती नाही म्हणून तुम्ही जो आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहात त्याला मी पुरेसे कारण आहे किंवा नाही हे कसे ठरवू ? मी जेव्हा मागे बघते आणि जेव्हा तुमच्याकडे पूज्य भावाने पाहात होते आणि ज्या आदर्शाकरिता तुम्ही झटत होता तो माझा आदर्श होता, याची मला आठवण होते. तेव्हा मला अशी इच्छा होते की, साऱ्या गोष्टी होत्या तेथेच स्थिरपणे राहावयास पाहिजे होत्या; आणि असे काहीच घडावयास नको होते की, मी चुकले होते किंवा काय असे मला वाटावयास लागावे. अर्थातच हा फार दुबळा विचार आहे आणि आजच्या प्रत्यक्ष गोष्टींना तोंड देण्याकरिता मी तयार

असले पाहिजे. जोपर्यंत तुम्ही बरोबर आहात तोपर्यंत माझी अजूनही तुमच्याबद्दल पूज्य भावना राहील; फक्त तुम्ही किती बरोबर आहात हे मला सांगता येणार नाही. एका गोष्टीबद्दल मात्र माझी बालंबाल खात्री आहे की, जर तुमची चूक होत असेल तर तुम्ही यशस्वी होण्याची इच्छा बाळगणार नाही. तुमच्या स्वतःच्या प्रयत्नाकरिता तो जो भव्य न्याय आहे तो तुम्हांला अधिक प्रिय आहे. पण न्याय काय आहे हे आपल्याला ठाऊक नसणे किती चमत्कारिक आहे आणि तरीही आपल्या योजना यशस्वी होण्याच्या ऐवजी न्यायाचा प्रसार व्हावा याबद्दल आपण किती तरी चिंता बाळगत असतो.

या मित्राप्रमाणेच इतर अनेक मित्रांना तसेच वाटते याची मला खात्री आहे. दुसऱ्या इंग्लिश पत्रलेखकाने हाच विचार अधिक स्पष्टपणे मांडला आहे. तो म्हणतो की, मी सद्गुणांचा अवतार होण्याकरिता दुर्गुणांशी झगडत असलेला त्याला दिसतो. मी या दोघा पत्रलेखकांना आणि त्यांच्याच विचारसरणीच्या इतरांना असे आश्वासन देतो की, न्यायाचा जय व्हावा यापलीकडे मला दुसरी इच्छा नाही. साध्यावरून साधन समर्थनीय ठरते, या सिद्धांतावर माझा कधीही विश्वास नव्हता व आजही नाही. उलटपक्षी माझी अशी ठाम समजूत आहे की, साध्य व साधनात इतका निकटचा संबंध असतो की, चांगले साध्य वाईट साधनांनी तुम्हांला प्राप्त करून घेता येणार नाही. मला जी कठोर सत्य आणि न्यायाची जाणीव आहे त्यापासून मी केसभरसुद्धा मागे हटलो, असे मला ठाऊक नाही. मी जर क्षणभर सत्याच्या बाबतीत तडजोड केली असती तर माझी पूर्वीच अप्रतिष्ठा झाली असती याची मला खात्री आहे. मी एक अत्यंत भयंकर प्रयोग करीत आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. मी हजारो मुसलमानांनाच काय पण हिंदूंनादेखील कडक अनत्याचारी होण्यास व राहण्यास सांगत आहे. जरी त्यांचा अखेरचा धर्म, विशिष्ट परिस्थितीत अत्याचार करण्यास परवानगी देत असला तरी मी त्यांना असे सांगत आहे. जेव्हा जेव्हा एखादे नवे गाऱ्हाणे मी हाती घेतो तेव्हा तेव्हा माझ्याविषयी गैरसमज होतो असे माझे दुर्भाग्य आहे. एखाद्या जुन्या सत्याचा नवा आणि अनपेक्षित प्रयोग मी करू लागलो म्हणजे माझे मित्र व शत्रू हे दोघेही कावरेबावरे होतात. दक्षिण आफ्रिकेत उपद्रव वाढविण्याचा आरोप माझ्यावर इतका लादला की, माझे चांगले चांगले मित्र गमावण्याचा धोका निर्माण होई. माझे पुष्कळसे मित्र आणि प्रतिपक्षीदेखील मागाहून माझेच बरोबर होते असे कबूल करीत आणि म्हणत की, जो सिद्धांत मी प्रत्यक्ष जीवनामध्ये दाखवू इच्छित होतो त्याचा अर्थ त्यांना समजला नव्हता आणि असहकारितेबद्दल मला तेच वाटते. नैतिक आचाराचा तो एक अत्यंत सौम्य प्रकार आहे असे मला वाटते. इंग्लिश लोक आणि हिंदी लोक यांच्यांत खराखुरा सलोखा व्हावयाचा असला तर तो आणि त्याचा तोच एक मार्ग आहे. जर कशाने

पौर्वात्य आणि पाश्चात्यांच्यात खरी मैत्री वाढावयाची असेल तर ती त्यानेच वाढेल. आपल्या अपूर्व संस्कृतीची पूर्ण उंची गाठावयास हिंदुस्थान त्यानेच समर्थ होईल. जरी अनेक विरोधी लक्षणे दिसत असली तरी मला तो दिवस येताना दिसत आहे की जेव्हा इंग्लिश व हिंदी लोक एकमेकांना मित्र व सहकारी म्हणून मानू लागतील.

' यंग इंडिया ', ११-८-१९२१.

२४९. यशाकरिता आवश्यक गोष्टी

येत्या ३० सप्टेंबरपूर्वी परदेशी कापडाच्या बहिष्काराचा कार्यक्रम पुरा करण्याकरिता आपण आपल्या आवडीनिवडी सुधारल्या पाहिजेत, साधेपणाकडे वळले पाहिजे आणि आपल्या गरजा कमीतकमी केल्या पाहिजेत. कोणत्याही असहकारितावाद्याला पोषाखात तीनपेक्षा अधिक वस्तू वापरणे शक्य होणार नाही. आपण बेझवाड्याच्या तलम खादीमागे न लागता अत्यंत ओबडधोबड खादीवर समाधान मानले पाहिजे; पण ही नुसती सुरुवात आहे. जर आपण धंदेवाईक दृष्टी ठेवली नाही तर स्वदेशी फसेल. आतापर्यंत आपण विद्यार्थ्यांवर परिणाम करण्याचे प्रयत्न केले, आणि त्यांनी त्यांच्या शक्तिबुद्धीप्रमाणे हाक दिली. पुष्कळसे असहकारिता करणारे विद्यार्थी निरोधक किंवा प्रचारक म्हणून धैर्याची कामे करीत आहेत. असहकारिता करणारी शाळा सर्व सार्वजनिक चळवळी आपल्याकडे खेचून घेते; पण शाळेतल्या मुलांच्यामार्फत आपल्याला स्वदेशीत पूर्ण यश मिळणार नाही. आपण हिंदुस्थानातील विणकरांच्या अंतःकरणाला स्पर्श केला पाहिजे. त्यांना संघटित केले पाहिजे. जे विणकर आपल्या कलेला वाव नाही म्हणून आपला धंदा सोडून गेले असतील त्यांना आपण परत येण्याकरिता गळ घातली पाहिजे. आपण त्यांच्या सभा भरविल्या पाहिजेत आणि त्यांना हाताने कातलेले सूत जरी एकसारखे नसले तरी ते त्यांनी का विणले पाहिजे आणि परदेशी सुताला स्पर्श करणे हे पाप आहे हे त्यांनी का मानले पाहिजे हे त्यांना समजावून दिले पाहिजे. त्याचप्रमाणे सूत कातण्याकरिता पेळू तयार करावे म्हणून पिंजाऱ्यांचे मन वळविले पाहिजे. तसेच आपण कापड विकणाऱ्यांना धंद्यात देशभक्ती आणा असे सांगितले पाहिजे आणि हातसुताची खादी विकावी आणि परदेशी कापड विकण्याचे सोडून द्यावे म्हणून त्यांचे मत वळविले पाहिजे. स्वदेशी आणि परदेशी कापड यांमधील फरक जाणणारे आणि हातसुताची व यंत्राची खादी यांमधील फरक जाणणारे तज्ज्ञ तपासनीस

आपल्याला स्वदेशी दुकानाकरिता लागतीलच. पण हे मोठे काम फार मोठ्या प्रमाणावर आपण स्वतःच संघटित झाल्याशिवाय होणार नाही. अशी संघटना प्रत्येक कॉंग्रेस संस्था स्वदेशीवर लक्ष केंद्रित केल्याशिवाय बिलकूल होऊ शकणार नाही. स्वदेशी म्हणजे बहिष्कार आणि दुसरी कोणतीही चळवळ न करता उत्पादन करणे.

ज्याप्रमाणे बहुतेक खेडी स्वतःला लागणारे धान्य पिकवितात त्याचप्रमाणे प्रत्येक खेड्याने आपल्यापुरते कातले व विणले पाहिजे हा आदर्श. स्वतःला लागणारे धान्य पिकविण्यापेक्षा प्रत्येक खेड्याला स्वतःला लागणारे सूत कातणे व ते विणणे हे अधिक सोपे आहे. प्रत्येक खेड्याला गहू किंवा तांदूळ पिकविता येत नाही. पण प्रत्येक खेड्याला पुरेसा कापूस साठविता येईल व अडचणीशिवाय कातता व विणता येईल; पण त्या सुखप्रद अवस्थेला पोहोचण्याला काही काळ लागेल. दरम्यान जे प्रांत या कामाकरिता संघटित झाले असतील, उदाहरणार्थ, पंजाब, तर त्याने आपल्या बाजारातून परदेशी कापड उठविले पाहिजे, एवढेच नव्हे; पण त्या प्रांताने आपला जो खादीचा जादा साठा असेल तो हिंदुस्थानातल्या गरजू भागाला पाठविला पाहिजे. खादी उत्पत्तीच्या दृष्टीने पंजाब, आंध्र, बिहार व गुजरात हे चांगले संघटित प्रांत दिसतात. त्या प्रांतांनी खादीचा दुष्काळ पडणार आहे, हे लक्षात ठेवून आपल्या उद्योगात मग्न असले पाहिजे.

आणि जर आपण हे मोठे व वैभवशाली काम करणार असलो तर आपण बोलणे बंद केले पाहिजे किंवा बोलणार असलोच तर धंद्याविषयी बोलले पाहिजे. आपण कोणत्याही मुद्द्याबद्दल वाद घालण्याचे आणि बारीक कीस काढण्याचे थांबविले पाहिजे. तसेच जर कोणी या गोष्टीत रस घेण्याचा हट्ट धरू लागला तर आपण तिकडे लक्ष देऊ नये. जे आपली वकिली सोडणार नाहीत अशा बुद्धिवान वकिलांची कॉंग्रेस ही वादविवाद करणारी संस्था होण्याचे थांबले पाहिजे. कॉंग्रेसमध्ये निर्माते, उत्पादक, त्यांतील जाणते, त्याची वाढ करणारे आणि आपल्या भावना व्यक्त करणारे असे लोक असले पाहिजेत. वकिली करणाऱ्या वकिलांनी निमूटपणे काम करून व पैसे देऊन मदत करावी. प्रसिद्धीला येण्याच्या इच्छेबद्दल मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. पण त्यांनी आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. जेव्हा राष्ट्र पुन्हा कोर्टात न्यायाकरिता किंवा कायदेमंडळात कायदे करण्याच्या कामाकरिता, जाण्याच्या अवस्थेला पोहोचेल तेव्हाच त्यांचे दिवस येतील. आज राष्ट्राचा दोहोंपैकी एकावरही विश्वास नाही. कारण त्या संस्था इतक्या भ्रष्ट झाल्या आहेत की, त्याचे वर्णनही करवत नाही. जेव्हा सरकार आणि लोक यांच्यातला लढा असतो तेव्हा कायदा आणि कायद्याची कोर्टे ही न्याय देऊ शकत नाहीत. त्यांच्या उपयुक्ततेची परीक्षा कशात असेल तर दोन पक्षांत समान न्याय देण्याच्या त्यांच्या शक्तीत. लोकांच्या निरनिराळ्या विभागांमध्ये न्याय्य कायदे करणे याला त्यांची शक्ती उपयोगी पडणारी नाही. ज्याप्रमाणे कोकरांनी

परस्परांना खाऊ नये म्हणून किंवा त्यांनी रोगाने मरू नये म्हणून सिंहाने मध्ये जाऊन बसावे व अशा रीतीने त्याला सर्व कोकरे खाता यावीत, तशा प्रकारचा हा दुसरा न्याय आहे.

'यंग इंडिया,' ११-८-१९२१.

२५०. हिंदुस्थानच्या स्त्रियांना

प्रिय भगिनींनो,

लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ मुंबईस ३१ जुलै रोजी परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याकरिता जो पवित्र अग्नी पेटविला गेला त्याची परिसमाप्ती येत्या ३० सप्टेंबरला संपूर्ण बहिष्काराने करावी असा महत्त्वाचा निर्णय ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने घेतला आहे. तुम्ही ज्या भारी साड्यांना व इतर पोषाखांना सुरेख व सुंदर समजत होता, त्याच्या प्रचंड ढिगाला अग्नी देण्याचा मान मला देण्यात आला होता. ज्या भगिनींनी आपले भारी कपडे देऊन टाकले त्यांचे ते करणे योग्य व शहाणपणाचे होते. ज्याप्रमाणे प्लेगाने दूषित झालेल्या वस्तू नष्ट करणे, हाच त्या वस्तूंचा काटकसरीचा व अत्यंत चांगला उपयोग मानला जातो. त्याचप्रमाणे त्या भारी वस्तूंचा नाश हाच त्यांचा अत्यंत काटकसरीचा तुम्ही केलेला उपयोग होता. राजकीय शरीरामध्ये अधिक गंभीर उद्भवणाऱ्या तक्रारी टाळण्याकरिता ती शस्त्रक्रिया करणे जरूर होते.

गेल्या बारा महिन्यांत हिंदुस्थानातील स्त्रियांनी मातृभूमीकरिता अत्यंत आश्चर्यकारक कामे केली आहेत. कृपाळू देवता म्हणून तुम्ही न बोलता काम केले आहे. तुम्ही तुमची रोकड आणि सुंदर जवाहर देऊन टाकले आहेत. पैशाकरिता तुम्ही घरोघर हिंडला आहात. काहींनी निरोधनलाही मदत केली आहे. तुमच्यापैकी काहींना निरनिराळ्या सुंदर पोषाखांची सवय होती आणि ज्या दिवसातून अनेक वेळा कपडे बदलत असत त्यांनी आता पांढरी शुभ्र पण जाड खादी वापरण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे कोणालाही स्त्रीच्या जन्मजात शुद्धतेची आठवण होते. तुम्ही हे सर्व हिंदुस्थान खिलाफत व पंजाबकरिता केले आहे. तुमच्या शब्दात किंवा कामात कोठेही कपट नाही. राग किंवा द्वेषरहित असा हा तुमचा शुद्ध त्याग आहे. साऱ्या हिंदुस्थानात तुम्ही ही स्वयंस्फूर्तीने आणि प्रेमाने हाक दिलीत. तीमुळे परमेश्वर आपल्याबरोबर आहे अशी पटलेली माझी खात्री तुमच्याजवळ मला कबूल करू द्या. हिंदुस्थानातील लक्षावधी

स्त्रिया लढ्याला प्रत्यक्ष मदत करीत आहेत हाच एक पुरावा आपला लढा आत्मशुद्धीचा आहे हे सिद्ध करण्यास पुरेसा आहे.

तुम्ही पुष्कळ दिलेत पण आता तुमच्याकडून अधिकाची अपेक्षा आहे. टिळक-स्वराज्य फंडाच्या देणग्यांचा पुरुषांनी मुख्य वाटा उचलला, पण जर तुम्ही सर्वांत मोठा वाटा उचलाल, तर स्वदेशीचा कार्यक्रम पुरा होऊ शकेल. तुम्ही आपले सर्व परदेशी कापड देऊन टाकल्याशिवाय बहिष्कार अशक्य आहे. जोपर्यंत परदेशी कापडाची आवड तुम्हांला सुटत नाही तोपर्यंत संपूर्ण त्याग अशक्य आहे आणि बहिष्कार म्हणजे संपूर्ण त्याग. परमेश्वर जी मुले आपल्याला देतो त्यावर जसे आपण त्याचे आभार मानून संतुष्ट असतो तसेच आपण हिंदुस्थान जसे कापड निर्माण करू शकेल त्यावर समाधान मानण्यास तयार असले पाहिजे. बाहेरच्या माणसाला, आपले मूल कुरूप वाटत असले तरी, ते टाकणारी कोणतीही आई मी पाहिली नाही. हिंदुस्थानात तयार झालेल्या वस्तूंबद्दल हिंदुस्थानातील देशाभिमानी स्त्रियांची तीच वृत्ती असली पाहिजे. तुमच्या-पुरते बोलावयाचे म्हणजे हातसुताच्या व हातविणीच्या वस्तूलाच हिंदी वस्तू म्हणता येईल. संक्रमणकाळात तुम्हांला वाटेल तेवढी जाडीभरडी खादी मिळू शकेल. तुमच्या आवडीनिवडीप्रमाणे तुम्ही ती खादी कलापूर्ण करू शकाल आणि जर तुम्ही काही महिने जाडया-भरडया खादीवर समाधान मानाल तर हिंदुस्थानला पुरातन कालातील रंगीत व भारी सुरेख कपडे पुन्हा मिळण्याबद्दल निराश होण्याचे कारण नाही. त्या भूतकालीन कपडयाबद्दल एकदा जगाला हेवा वाटे व त्याची बरोबरी करता येत नाही म्हणून ते निराश होत. सहा महिने जर तुम्ही आत्मत्यागाच्या वृत्तीने वागलात तर मी तुम्हांला खात्रीने सांगतो की, ज्याला तुम्ही आज कलाकृती म्हणता ती बनावट आहे असे तुम्हांला दिसून येईल. खरी कला फक्त बाह्यस्वरूपाकडे न पाहता त्याच्यामागे काय आहे याचीही दखल घेत असते. जी ठार मारते त्यातही कला असते आणि जी जीवदान देते त्यातही कला असते. जे सुंदर कपडे आपण पाश्चात्य किंवा अतिपूर्व देशांतून आणतो त्यांनी शब्दशः आपल्या लक्षावधी बंधु-भगिनींना ठार मारले आहे आणि आपल्या हजारो प्रिय भगिनींना बेअब्रूने जीवन कंठावयास लाविले आहे. कला-काराच्या सौख्याचे,संतोषाचे व शुद्धतेचे पुरावे खऱ्या कलेत दिसले पाहिजेत आणि जर तुम्हांला अशा कलेचे पुनरुज्जीवन आपल्यात व्हावयास पाहिजे असेल तर सध्याच्या काळी तुमच्यातील ज्या श्रेष्ठ स्त्रिया असतील त्यांच्यावर खादी वापरणे हे बंधनकारक आहे.

स्वदेशी कार्यक्रमाच्या यशाकरिता खादीचा वापर आवश्यक आहे. एवढेच नव्हे पण तुमच्या फुरसतीच्या वेळी तुम्ही प्रत्येकीने सूत कातणे आवश्यक आहे. मी मुलांना व मोठ्या माणसांनाही सूत कातण्यास सांगितले आहे. त्यातले हजारो लोक दररोज सूत कातातात; पण सूत कातण्याचा मुख्य बोजा पूर्वकाळाप्रमाणे तुमच्या खांद्यावर असला पाहिजे. दोनशे वर्षांपूर्वी हिंदुस्थानातील स्त्रिया घरच्याकरिता कातीत. एवढेच नव्हे तर

बाहेरच्या देशाकरिताही कातीत. त्या फक्त जाड सूतच काढीत नव्हत्या पण जगात कधी निघाले नसेल असे बारीक सूत काढीत. आपल्या पूर्वजांनी कातलेल्या बारीक सुताची बरोबरी कोणत्याही यंत्राला अद्याप करता आलेली नाही. म्हणून जर पुढील दोन महिन्यांत आणि नंतर जी खादीची मागणी वाढणार आहे ती पुरविण्याकरिता कताई मंडळे काढा, कताईच्या स्पर्धा ठेवा आणि हिंदी बाजारात हातसुताचा पूर लोटू द्या. याकरिता तुमच्यातील काही जणींना कातण, पिंजण व चरखा–दुरुस्ती यात तज्ज्ञ बनले पाहिजे. याचा अर्थ अविश्रांत श्रम. उपजीविकेचे साधन म्हणून कताईकडे पाहू नका. मध्यम वर्गाला कताईमुळे कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालता येईल आणि फार गरीब स्त्रियांना ते उपजीविकेचे खासच साधन होईल. चरखा हा विधवा स्त्रियांना प्रेमळ मैत्रिणीप्रमाणे वाटावा; पण हे विनंतीपत्र ज्या कोणी वाचतील, त्यांना ते कर्तव्य म्हणून किंवा धर्म म्हणून सादर केले आहे. जर हिंदुस्थानातील सर्व सुखवस्तू स्त्रिया दररोज ठराविक सूत काढतील, तर त्या सूत स्वस्त करतील आणि जो सुबकपणा हवा आहे तो इतर कोणत्याही मार्गाने येणार नाही तो या मार्गाने फार लवकर त्या आणतील.

अशा प्रकारे हिंदुस्थानची आर्थिक आणि नैतिक मुक्ती ही मुख्यतः तुमच्यावरच अवलंबून आहे. तुम्ही भावी पिढ्यांची जोपासना करणार असल्यामुळे हिंदुस्थानचा भविष्यकाळ तुमच्या गुडघ्यावर पहुडला आहे. तुम्ही हिंदुस्थानची प्रजा साधी, ईश्वराला भिणारी आणि शूर स्त्रीपुरुषांची बनवू शकाल किंवा त्या पिढीचे लाड करून त्यांना दुबळी करू शकाल. ती प्रजा जीवनातील वादळांना तोंड देण्यास असमर्थ होईल आणि त्या पिढीला परदेशी सुंदर वस्तूंची सवय होऊन उत्तर आयुष्यात त्या सवयीचा त्याग करणे त्यांना कठीण जाईल. पुढील काही आठवड्यात हिंदुस्थानातील स्त्रिया कोणत्या वृत्तीच्या आहेत हे दिसून येईल; पण तुम्ही काय कराल याविषयी मला यत्किंचित शंका नाही. ज्या सरकारने हिंदुस्थानच्या सामग्रीची इतकी लूट केली आहे की, जीमुळे हिंदुस्थानचा स्वतःवरील विश्वास उडाला आहे त्यांच्या हातात हिंदुस्थानचे भाग्य असण्याऐवजी, तुमच्या हातांत ते अधिक सुरक्षित आहे. मी प्रत्येक स्त्रियांच्या सभेत राष्ट्रीय प्रयत्नाकरिता तुमचे आशीर्वाद मागत आलो आहे. ते आशीर्वाद मी या विश्वासाने मागितले की, तुम्ही शुद्ध आहात, साध्या आहात आणि ते प्रभावी व्हावेत म्हणून देण्याकरिता देवतारूप आहात. तुमचे आशीर्वाद हे फलदायी व्हावेत म्हणून ते प्रभावी करण्याकरिता तुम्ही परदेशी कापड टाकून द्या आणि फुरसतीच्या वेळी राष्ट्राकरिता सतत कातत राहा.

मी तुमचा निष्ठावंत भाऊ
एम्. के. गांधी

'यंग इंडिया', ११-८-१९२१

२५१. जाहीर सभेत भाषण, गया[1]

ऑगस्ट १२, १९२१

नंतर महात्मा गांधींनी लोकांच्यासमोर भाषण केले आणि त्यांनी म्हटले की, अलाहाबादहून येथे येऊन गोरक्षणाच्या विषयावर बोलण्यास मला शरम वाटते. याविषयी दोघा मौलानांनी[2] त्यांच्या धर्माला काय सांगावयाचे आहे, हे तुम्हांला सांगितले आहे. एखादा माणूस संध्या न करता किंवा गायत्री मंत्र न म्हणता गाईचे रक्षण करील व त्याला हिंदू म्हणता येईल. पण त्याच वेळी हिंदू धर्माने मुसलमानांना किंवा इंग्रजांना ठार मारा असे सांगितले नाही. गाईच्या बलिदानामुळे होणारे क्लेश सहन करण्यास त्यांनी तयार असले पाहिजे. हिंदूंचे मुसलमानांशी जे वैर आहे त्यामुळेच गोहत्या होते, ही गोष्ट मी फार दिवस लोकांच्या मनावर बिंबवीत आहे. जर समजा, गयेची ६५,००० वस्ती १०,००० मुसलमानांना न जुमानता सक्तीने गोहत्या बंद पाडील तर मुसलमानातील एखादा माणूस पुढे येऊन असे खात्रीने म्हणेल की, "मी तुमच्या देखत गोहत्या करतो."

मुसलमानांच्या हातून गाई हिसकावणे हे हिंदू धर्मा प्रमाणे नाही. गीतेत असे म्हटले आहे की, बलाचा उपयोग करणे हे धार्मिक नाही आणि धर्म हा बलोपयोगात समाविष्ट झालेला नाही. रामायण आणि गीता या दोहोतही हाच निष्कर्ष काढलेला आहे. धर्माचे मूल तत्त्व शांतता-पालनात आहे. दुसऱ्यांना शिव्या देण्यात नाही. तुम्ही विनंती करा पण बळजबरी करू नका. जर एखादा हिंदू ह्या धार्मिक शिकवणुकीविरुद्ध वर्तन करू लागला, तर त्याने महाभारत किंवा मनुस्मृती कधीही वाचली नाही असे म्हणता येईल. हिंदूंनी खिलाफत वाचविली पाहिजे. जर तुम्ही शांततेने आणि सलोख्याने काम कराल तर तुम्ही हिंदी लोकांबद्दल प्रेम

१. गांधींनी रात्री साडे नऊ वाजता २०,००० लोकांच्या सभेत भाषण केले. त्यांच्याबरोबर महंमद अली व आझाद सुभानी होते.

२. महंमद अली आणि आझाद सुभानी हे अगोदर बोलले होते.

उत्पन्न कराल. जर तुम्ही खिलाफतीला पाठिंबा द्याल तर गाईच्या बलिदानाची जरूरी आपोआपच नाहीशी होईल. मुसलमान आपले शत्रू होतील असे हिंदूंनी मनात आणू नये. मुंबईमध्ये श्री. छोटानी आणि खेत्री यांनी शेकडो गाई वाचविल्या. जर या गोष्टी तुम्ही त्यांच्या इच्छेवर सोपवाल तर गायींचे प्राण वाचतील.

जर सरकारी नोकरांनी तुमची बाजू घेतली नाही तर त्यांच्यावर हल्ला करू नका किंवा शिव्या देऊ नका. त्यांच्यावर प्रेम करणे हे तुमचे कर्तव्य आहे.

जो तिसरा मुद्दा गांधीजींनी त्यांच्यावर ठसविला तो स्वदेशीचा. ते म्हणाले, बिहार ही एक सुंदर व पवित्र भूमी आहे. एकदा तेथे व्यापाराची भरभराट होती. तेथील पुष्कळ लोकांनी ईस्ट इंडिया कंपनीत नोकऱ्या धरल्या. प्रथम तेथे स्वदेशीला सुरुवात करणे मला कठीण गेले. चंपारण्यात स्वदेशी वापरणारांना लोक हसत. ईश्वराच्या कृपेमुळेच स्वदेशीची जरुरी हळूहळू पटत गेली. मी एक पंडा मुलगा नखशिखांत विदेशी कपड्यांत पाहिला. त्याने मला फार दुःख झाले. पंडे लोक इतके अविवेकी झाल्याचे समजल्याने माझे अंतःकरण व्यथित झाले. पंडे हे धर्म आणि संन्याशी यांचे प्रतिपालक होते. शेवटी गांधी म्हणाले, तुम्ही वेश्यागमन आणि जुगार टाकून द्या, नाही तर तुम्हांला स्वराज्य मिळणार नाही.

'दि सर्चलाइट', २१-८-१९२१

२५२. सी. एफ्. अॅन्ड्र्यूज यांना पत्र

बिहारशरीफ
ऑगस्ट १३, [१९२१][1]

प्रिय चार्ली यास,

तुमची दोन पत्रे पोहोचली. सारी चळवळ गरिबांच्या करता सेवावृत्तीने सुरू केली असल्यामुळे विलायती कापडाचे दहन करण्याबद्दल मी चूक करणे संभवनीय

१. १९२१ साली ह्या वेळी गांधीजी बिहारशरीफमध्ये होते.

नाही. ज्या कापडाने हिंदुस्थानात दारिद्र्य आणले आणि हजारो स्त्रियांना बेअब्रूचे जीवन घालविण्यास भाग पाडले अशा परदेशी कापडाचा आपल्याला उपयोग नाही. म्हणून ते गरिबांच्या तोंडावर टाकणे हे मला अत्यंत अप्रतिष्ठेचे वाटते. रेशमी हातरुमाल, झिरझिरीत साड्या आणि त्याहीपेक्षा अधिक झिरझिरीत शर्टस् यांच्या रूपाने गरिबांच्याबद्दल एकदम निर्माण झालेला कळवळा हा गरिबांना देखील समजू शकणार नाही. साड्या वगैरेंच्या बरोबर दुर्गंधी येणाऱ्या हजारो टोप्याही येतात. होळी करण्यातील मध्यवर्ती मुद्दा जो आहे तो आपल्या स्वतःविषयी अत्यंत तिटकारा निर्माण करणे हा आहे. हा तिटकारा अशाकरिता की, गरीबवर्गाला आपण भिकेला लावून आपली शरीरे अविचाराने भूषविली. ज्या कापडांचा उद्देश हिंदुस्थानचा अधःपात आणि गुलामगिरी हा आहे, असे कापड वापरणे हे पातक आहे असे सांगण्यात मी काहीही चुकत नाही. मी जे आता करण्याचा प्रयत्न करीत आहे ती न थरथरणाऱ्या हातांनी केली जाणारी वैद्यकीय शस्त्रक्रिया. युरोपमधील एका भगिनीने अपार प्रेम ओतून जे कापड तयार केले त्या प्रेमाबद्दल मला आदर आहे; पण एखाद्या मातेने अडाणी प्रेमाने न पचणारे अन्न जर आपल्याला दिले, तर ते जसे आपण घेऊ नये, त्याचप्रमाणे बहिष्कृत कापड वापरण्याला माझ्या मनाची तयारी होत नाही. लेडी रॉबर्टस यांनी माझ्याकडे एक पदार्थ पाठविला. त्यात त्यांना वाटले दुधाचे गुणधर्म आहेत; पण तो गाईच्या दुधापासून तयार केलेला पदार्थ नव्हता असे सांगण्यात आले. जेव्हा मला समजले की, तो दुधापासून केला आहे तेव्हा मी त्यांना पत्र लिहिले व तो मला खाता येणार नाही म्हणून माफी मागितली. त्यांना तो मुद्दा कळला. एवढेच नव्हे पण चुकीबद्दल त्यांनी क्षमा मागितली. खरी गोष्ट अशी आहे की, मी जीवनाकडे तपश्चर्या आणि संयम या दृष्टीने पाहतो. ज्याप्रमाणे योगी म्हणविणारे यातना भोगतात त्याचप्रमाणे या गोष्टींची थट्टा केली जाते. पण जर आपण मुळात गेलो तर त्या गोष्टी अत्यंत कठीण कसोटीलादेखील उतरतील. पातक्यांचा द्वेष न करता पातकाचा द्वेष करावा, याकडे लोक निमूटपणे आणि न समजून कसे वळत आहेत याची तुम्हांला पुरेशी कल्पना येणार नाही. एक ऑगस्टला मुंबईतील इंग्लिश स्त्रियांना आगाऊ इषारा दिला होता आणि व्यासपीठावर स्टोक्स होते व एक इंग्लिश नर्स होती आणि त्यांच्याभोवती तीन लाखांपेक्षा कमी नसणाऱ्या स्त्री-पुरुषांचा वेढा होता. या साऱ्या गोष्टीला अखेरीस कोणते स्वरूप येणार आहे हे परमेश्वरालाच ठाऊक. मला एवढेच ठाऊक आहे की, आज असे पुष्कळ लोक आहेत की, जे हे सर्व मानवतेच्या प्रेमाकरिता करीत आहेत.

होय, पेटिटच्या हातातील पैसा माझा आहे; पण माझा त्यावर ताबा नाही. तुम्ही जर त्यांचा नकार अगोदर कळविला असतात तर बरे झाले असते. मी प्रयत्न करणार आहे. मालवीयजी काय म्हणाले ते कृपाकरून कळवा. जर तुम्हांला काही अडचण असली तर तुम्ही जरूर माझ्याकडे या. तुमच्या जाण्याची शेवटची तारीख कोणती? माझा स्टोक्सबरोबर वेळ चांगला गेला. उत्तर प्रदेशातील माझ्या दौऱ्यात सुमारे सहा

दिवस आम्ही बरोबर होतो. आपण दारूविरुद्ध जितकी खटपट करतो, तितकीच अफू-विरुद्ध केली पाहिजे हे तुमचे म्हणणे मला मान्य आहे. मला असे वाटते की, जर स्वदेशीचा कार्यक्रम योग्यरीतीने आणि शांतपणे पार पडला आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य टिकले तर ह्याच वर्षी आम्हांला स्वराज्य मिळाले पाहिजे. नवीन जीवनाच्या अगदी सुरुवातीलाच अफू आणि तशाच निषिद्ध गोष्टी त्या वेळी नाहीशा झाल्या पाहिजेत. प्रेमपूर्वक प्रणाम.

तुमचा
मोहन

फोटोस्टॅटवरून. जी. एन्. ९६२

२५३. महादेव देसाईला पत्र

गया,
शनिवार, [ऑगस्ट १३, १९२१][1]

भाईश्री महादेव,

तुझे पत्र पोहोचले. आत्मविसर्जन याचा अर्थ माणसाची मूळ प्रकृती हिरावून घेतली जात्री असा नाही व असा असता कामा नये. त्याचा अर्थ इतकाच की, माणसाला आपला लहानपणा समजला आहे आणि म्हणून तो ज्याच्यावर त्याचा विश्वास आहे त्याच्यावर अवलंबून राहतो. संशयावस्थेत असा माणूस स्वतःच्या मताचा आग्रह धरीत नाही, पण मित्राचे म्हणणे ऐकतो. अर्जुनाने कृष्णाला अनेक प्रश्न विचारून सताविले. कूर्म हा देवभक्त होता. त्याची बायको देवाला अखेरपर्यंत गळ घालीत होती. जरी त्याने आपल्या मंत्र्यांचा तिरस्कार केला व त्यांना घालवून लावले तरी ती देवाजवळ सारखी तक्रार करीत होती. आत्मसमर्पण याचा अर्थ स्वतःची निर्णयशक्ती सोडून देणे असा नव्हे. प्रामाणिकपणाने केलेले आत्मसमर्पण म्हणजे निष्क्रियता नव्हे; पण काम करण्याचा

१. या पत्रात बंगाली माणूस गांधीजींच्या बरोबर असावा ही जे. बी. कृपलानींची सूचना या तारखेला केली आणि त्याप्रमाणे लवकरच कृष्णदास त्यांना जाऊन मिळाले.

उत्साह असा आहे. आपल्या पाठीशी कोणी तरी अखेरीस उभा आहे हे जाणून तो मनुष्य आपल्या मर्यादा ओळखून एकामागून एक हजारो प्रयोग करतो; पण ते सर्व प्रयोग नम्रपणाने, ज्ञानाने आणि विवेचकबुद्धीने केले जातात. मी मगनलालचे आत्मसमर्पण हे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे मानतो. पण त्यांनी कधीही निर्णयशक्ती समर्पित केली नाही असे मला वाटते. तुझा मार्ग अगदी निराळा आहे. तुझ्यात फारच कमी उपक्रमशीलता आहे आणि म्हणून जेव्हा जेव्हा कोणी तरी ज्याच्याकडे तू आदराने पाहू शकशील असा तुला भेटतो, तेव्हा जे काय थोडेसे तुझ्याजवळ आहे ते तुला सोडून जाते. पुष्कळशा वाचनामुळे तुझे नाविन्य मंदावले आहे; आणि म्हणून तुला साहाय्यक व्हावेसे वाटते. एखादा माणूस स्वतंत्रपणे काम करण्याची इच्छा करील आणि तरीही तो अत्यंत नम्र असेल.

माझ्याबरोबर राहण्याच्या तुझ्या इच्छेतील हेतू हा प्रामाणिक आहे; पण तो चुकीचा आहे. तुला फक्त पाश्चात्यांचे अनुकरण करण्याची इच्छा आहे. माझ्या कार्याचे दप्तर ठेवले जावे ह्याकरिताच जर मी कोणाला सतत माझ्याजवळ ठेवून घेतले तर मी स्वतः कृत्रिमरीतीने वागू लागेन. मामुली पद्धतीने माझ्याजवळ एखादा माणूस राहणे आणि त्याने लुडबूड न करता टिपणे करणे ही एक स्वतंत्र गोष्ट आहे. पण प्रत्येक ठराविक गोष्टीची टिपणे ठेवणे ही अगदी भिन्न गोष्ट आहे. प्रभू रामचंद्रांच्या हालचालीची कोणी टिपणे घेतली होती का ? कोणीही घेतली नाहीत म्हणून जगाचे काहीही नुकसान झाले नाही. जॉन्सनच्या संभाषणाचा विस्ताराने टिपणे घेतल्यामुळे जगाचा फार मोठा फायदा झाल्याचे मला ठाऊक नाही. आपण या गोष्टीकडे साहित्याच्या दृष्टीने बिलकूल पाहात नाही. तथापि तू सतत माझ्याबरोबर असावास असे मला आवश्य पाहिजे आहे. ज्या अर्थी तुझी ग्रहणशक्ती चांगली आहे आणि तू इतका चांगला तयार आहेस त्याअर्थी माझ्या जीवनाविषयी व कार्याविषयी प्रत्येक गोष्ट तू समजून घेतलेली मला आवडेल. माझ्याजवळ अनेक कल्पना आहेत. पण प्रसंगानुरूपच त्या व्यक्त होतात. त्यात कधी कधी सूक्ष्मता असते व ती कोणाला आकलन करता येत नाही. वसंतराम शास्त्र्यांच्या पत्रावर[1] अपवाद घेता येणार नाही अशी टीका मी केली ती काकांनाही कळली नाही किंवा स्वामीनींही कळली नाही. त्यांच्यापेक्षा तुला ती जरा अधिक चांगली कळली त्या टीकेतील माझ्या समंजसपणाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. माझ्याजवळ तुझ्यासारखा माणूस असेल तर तो कालांतराने माझे काम घेईल हा मोह पाडणारा विचार मला सोडून जात नाही. कोणत्या तरी विशिष्ट कामावर तुला नेमावे अशी माझी इच्छा नाही; पण त्याऐवजी तू अनुभव मिळवायास असे मला वाटते. शिवाय ज्या प्रत्येकाला मी ओळखतो त्यांच्याशी तुझा परिचय झाला तर आपले पुढील काम सोपे होईल.

१. पाहा, "माझी टिप्पणे." १७–७–१९२१

वालजी आणि स्वामींची तार आली आहे की, पुढील अंकात चूक राहणार नाही, असे आम्ही वचन देतो. शिवाय प्रोफेसरना[1] माझ्याबरोबर एखादा बंगाली असावा असे वाटते. म्हणून तेथून तू सुटलास म्हणजे मला येऊन मिळणे सोयीचे होईल. यंग इंडिया हाती घ्यावा व तो स्वतंत्रपणे चालवावा व त्याची वाढ करावी असे तुला वाटत असेल तरी माझी हरकत नाही. तरी पण मला व्यक्तिशः असे वाटते की, माझ्या मागे वृत्तपत्राची जरूरी उरणार नाही. कदाचित तुमच्यापैकी काहींना असे वाटत असेल की, जर तुम्ही माझा संदेश पसरवीत राहिलात तर तुम्ही पत्र चालवू शकाल. याकरितादेखील तुला त्या पत्राकरिता येण्याची जरूरी नाही. उलटपक्षी मला असे वाटते की, अनुभवाने तू परिपक्व झालास म्हणजे तू यंग इंडिया चालविण्यास स्वतः अधिक सुसज्ज होशील. इंडिपेंडंटबद्दल जवाहरलाल नेहरूंशी बोल. त्यांनी कोणी तरी संयुक्त प्रांतातलाच माणूस गाठला पाहिजे. ह्या विशाल हिंदी भाषी लोकांच्यात त्यांना एकही माणूस का मिळू नये ? कपिलदेव[2] मालवीयाबद्दल काय ? काहीही असले तरी साऱ्या गोष्टी जवाहरलालजींच्या पुढे मांड आणि या गोष्टींची चर्चा कर.

पंचवीस हजार रुपयाच्या प्रश्नाबाबत तू मला आठवण केलीस हे ठीक झाले. मी आवश्यक ती व्यवस्था करण्याच्या मार्गाला लागलो आहे. छपाई सुधारलीच पाहिजे.

बापूचे आशीर्वाद

[ता. क.]

मी देवदासला तूर्त तेथे राहण्यास सांगत आहे. हे पत्र तपासण्यास मला फुरसत नाही.

मूळ गुजरातीच्या फोटोस्टॅटवरून ; एस्. एन्. १४४१७

१. जे. बी. कृपलानी.
२. संयुक्त प्रांतातील राजकीय कार्यकर्ता.

२५४. मथुरादास त्रिकमजीला पत्र

शनिवार [ऑगस्ट १३, १९२१][1]

ज्या आजारातून तू उठलास तो इतका भयंकर होता हे मला कळले नाही. तरीही शेवटपर्यंत तुझ्याकडे जावे आणि तुला भेटावे असे मनात होते. पण मी ते कसे करणार? मी बोरीबंदरवर वेळेच्यापूर्वी फक्त पाच मिनिटे पोहोचलो. एका मागून एक भानगडी निघाल्या आणि मी त्यांत गुंतून पडलो. तुझी इच्छा मला समजते. पण अत्यंत प्रिय माणसांचाच त्याग करण्याचे माझ्या नशिबी आले आहे. मला असे अनेक वेळा करावे लागले आणि मी जो मार्ग पत्करला तोच बरोबर ठरला. म्हणून तुझी इच्छा वाजवी आहे, हे कबूल करून देखील ती पुरी झाली नाही तर निराश होऊ नकोस असे मी तुला सांगतो. यानंतर जेव्हा तुला अधीरता वाटेल तेव्हा मी तुला येऊन भेटावे हे मला कोणामार्फत कळवीत जा. जर तुम्ही सर्वजण या रीतीने वागलात तर मी निर्धास्त होईन. स्टेशन जवळ आले म्हणून येथेच संपवितो.

[गुजरातीवरून]
बापूनी प्रसादी

२५५. जाहीर सभेत भाषण, बिहार शरीफ[2]

ऑगस्ट १३, १९२१

आपल्याला व आपले बंधू मौलाना महंमद अली यांना दिलेल्या मानपत्राबद्दल म्युनिसिपल सभासदांचे आभार मानताना गांधी म्हणाले,

१. ही तारीख मुळात आहे.

२. ही सभा संध्याकाळी ६ वाजता देवी सराई मैदानावर भरली. गांधीजींना नगरपालिके-तर्फे मानपत्र देण्यात आले व गांधीजी महंमद अलींनंतर बोलले.

देशात पसरलेल्या निरनिराळ्या दुर्गुणांचे उच्चाटन करण्याकरिता सध्या जी चळवळ चालू आहे तीत योग्य भाग घ्या. गोहत्येबद्दल बोलताना गांधी म्हणाले, हिंदूंनी मुसलमानांना खिलाफतीच्या प्रश्नात मदत करावी. आणि जर गोरक्षणाचा प्रश्न तुम्हांला योग्य रीतीने सुटावा असे वाटत असेल तर दररोज सकाळी गोरक्षणाकरिता प्रार्थना करीत जा. शेवटी त्यांनी प्रत्येकाने चरखा चालवावा आणि ३० सप्टेंबरपूर्वी परदेशी कापडाचा बहिष्कार पुरा करावा, अशी विनंती केली. सारी भाषणे श्रोत्यांनी शांतपणे ऐकून घेतली. सभा सुमारे आठ वाजता रात्री संपली. त्यानंतर गांधीजी पडद्यातील स्त्रियांच्या सभेला गेले. तेथे त्यांना रोख पैसे व दागिने देण्यात आले.

'सर्च लाइट', २१-८-१९२१

२५६. मृत्यूची भीती

[ऑगस्ट १४, १९२१][1]

मी स्वराज्याची वर्णने जमवीत आहे. त्यांतील एक असे : स्वराज्य म्हणजे मृत्यूच्या भीतीचा त्याग. ज्या राष्ट्रावर मृत्यूच्या भीतीचा परिणाम होतो, त्याला स्वराज्य मिळणार नाही. आणि कसे तरी मिळविलेले स्वराज्य टिकविता येणार नाही.

इंग्लिश लोक आपले प्राण खिशात बाळगतात. अरब व पठाण मृत्यूला साध्या दुखण्यापेक्षा अधिक समजत नाहीत. नातलग मेला तर ते कधीही रडत नाहीत. बोअर-स्त्रियांना ह्या भीतीची बिलकूल जाणीव नाही. बोअर युद्धात हजारो तरुण बोअर स्त्रिया विधवा झाल्या. त्यांनी त्याची कधीही चिंता केली नाही. नवरा किंवा मुलगा मेला तरी त्यांना त्याची बिलकूल पर्वा नसे. देशाचा मान सुरक्षित असला म्हणजे त्यांना पुरेसे वाटे. देश गुलाम झाला तर नवरा असून उपयोग काय? मुलाला गुलाम म्हणून वाढविण्याऐवजी त्याचे प्रेत पुरून टाकणे आणि त्याची अमर स्मृती जतन करून ठेवणे, हे त्यांना किती तरी पटींनी अधिक बरे वाटे. अशा प्रकारे बोअर-स्त्रियांनी आपली अंतःकरणे मजबूत केली होती आणि आपली लाडकी माणसे मृत्यूच्या दूताच्या हवाली आनंदाने केली होती.

१. मूळ गुजरातीतील नवजीवनमध्ये प्रसिद्ध झाला, १४-८-१९२१.

मी ज्या लोकांचा उल्लेख केला ते दुसऱ्यांना ठार मारतात व स्वतःला ठार मारून घेतात. पण जे दुसऱ्यांना ठार मारीत नाहीत व जे स्वतः मरण्याला तयार असतात त्यांचे काय? अशीच माणसे जगाचे भूषण होतात. तीच माणसे पृथ्वीवरील सच्ची रत्ने होत.

इंग्रज व जर्मन एकमेकांबरोबर लढले. त्यांनी मारले व ते मेले. त्यामुळे वैमनस्ये वाढली. अशांततेला अंतच नाही. आणि युरोपची सध्याची स्थिती केविलवाणी आहे. तेथे लबाडी अधिक आहे. आणि प्रत्येकजण दुसऱ्याला युक्तीने हरविण्याचा प्रयत्न करीत आहे.

पण जी निर्भयता आपण वाढवीत आहोत ती अधिक उदात्त व अधिक पवित्र आहे. आणि म्हणून आपण अगदी अल्प काळात अद्वितीय यश मिळविण्याची आशा बाळगीत आहोत.

जेव्हा आपण स्वराज्य मिळवू तेव्हा आपल्यातील पुष्कळांनी मरण्याची भीती सोडली असेल. तसे न झाल्यास आपण स्वराज्य मिळविले असे होणार नाही. आतापर्यंत बहुतकरून तरुण मुलेच स्वराज्याकरिता मेली आहेत. जे अलिगडला मेले ते सर्वजण २१ वर्षांच्या खालचे होते. ते कोण होते कोणाला ठाऊक. जर सरकारने आता गोळीबार सुरू केला तर मला अशी आशा आहे की, पहिल्या दर्जातील काही लोकांना या अलौलिक त्यागाकरिता बलिदान करण्याची संधी मिळेल.

जेव्हा मुले किंवा तरुण माणसे किंवा वृद्ध माणसे मरतात तेव्हा आपण गडबडून जाण्याचे कारण काय? असा क्षणही येत नाही की, जगात कोणी जन्माला येत नाही किंवा मरत नाही. जन्माच्या वेळी आनंदित होणे आणि मृत्यूच्या वेळी दुःखित होणे यातील मूर्खपणा आपल्याला पटला पाहिजे. ज्यांचा आत्म्यावर विश्वास आहे त्यांना आत्मा कधीही मरत नाही हे ठाऊक आहे. आणि कोणता हिंदू, मुसलमान व पारशी असा आहे की ज्याला हे ठाऊक नाही? जिवंत माणसांचे व मृतांचे आत्मे एकच असतात. उत्पत्ती आणि लय या शाश्वत क्रिया सतत चालूच आहेत. त्यात असे काय आहे की, ज्यामुळे आपण आनंदी किंवा दुःखी व्हावे. जरी आपण नात्याची कल्पना आपल्या देशबांधवापुरतीच व्यापक केली आणि देशात झालेले जन्म हे आपल्याच कुटुंबात झाले असे मानले तर किती जन्मोत्सव आपण साजरे करणार? जर आपण देशातल्या साऱ्या मृत्यूंबद्दल रडू लागलो तर आपल्या डोळ्यांतील अश्रू कधीच सुकणार नाहीत. या रीतीने जर आपण विचार करू लागलो तर मृत्यूच्या भीतीतून सुटका होण्यास त्याची मदत होईल.

लोक म्हणतात की, हिंदुस्थान हे तत्त्वज्ञांचे राष्ट्र आहे आणि आपण ती स्तुती स्वीकारण्यास कधीही नाराजी दाखविली नाही. तथापि मृत्यूसमोर असहाय्य होणारे आपल्याइतके दुसरे कोणतेही राष्ट्र नसेल आणि पुन्हा त्याच हिंदुस्थानात हिंदूंच्या

इतकी असहाय्यता प्रकट करणारी दुसरी जात नसेल. एक जीव जन्माला आला म्हणजे आपण आनंदाने वेडावून जातो. एका मृत्यूने आपण मोठमोठ्याने रडू लागतो, किंचाळ्या फोडू लागतो आणि शेजाऱ्यांची झोपमोड करतो. जर आपल्याला स्वराज्य मिळवावयाचे असेल आणि ते मिळाल्यानंतर जर अभिमान बाळगावयाचा असेल तर ही न शोभणारी भीती आपण पूर्णपणे टाकून दिली पाहिजे.

जो मनुष्य प्रत्यक्ष मृत्यूला भीत नाही, त्याला तुरुंगत्रास म्हणजे काय ? जर वाचक ह्या गोष्टीचा थोडासा विचार करील तर त्याला असे आढळेल की, स्वराज्याला जो उशीर होत आहे तो उशीर आपण शांतपणे मृत्यूला कवटाळण्यास तयार नाही आणि मृत्यूपेक्षाही कमी असलेल्या गैरसोयी सोसण्यास तयार नाही म्हणून होत आहे.

जसजसे निरपराधी लोक मृत्यूच्या स्वागताला जास्त जास्त पुढे येतील तसतसा त्यांचा त्याग हा इतरांच्या मुक्ततेकरिता प्रभावी शस्त्र होईल; आणि कमीतकमी क्लेश सोसावे लागतील. आनंदाने भोगलेले क्लेश हे क्लेश म्हणून शिल्लक राहात नाहीत. त्याचे परिवर्तन अवर्णनीय आनंदात होते. जो माणूस क्लेशाला भिऊन दूर पळतो तो ते क्लेश त्याला होण्यापूर्वी अनंत यातनांना बळी पडतो आणि जेव्हा प्रत्यक्ष क्लेश भोगण्याची पाळी येते तेव्हा तो अर्धमेला झालेला असतो; पण जो माणूस जे जे काय आपल्या नशिबाला येईल ते ते भोगण्यास तयार असतो, तो दुःखातून बचावतो. आनंदी वृत्ती ही संमोहनाप्रमाणे त्याच्यावर क्रिया करीत असते.

या विषयावर मला ह्याकरिता लिहिणे भाग पडले की, जर येत्याच वर्षांत आपल्याला स्वराज्य हवे असेल तर आपण मृत्यूला देखील दृष्टीसमोर ठेवले पाहिजे. जो आधीच तयारीत असतो तो नेहमी अपघातातून बचावतो; आणि ही पाळी आपल्यावर कदाचित येणार आहे. माझी पूर्ण खात्री आहे की, ही तयारी म्हणजेच स्वदेशी. जेव्हा एकदा स्वदेशी यशस्वी होईल तेव्हा ह्या सरकारला किंवा दुसऱ्या कोणालाही आपली अधिक कसोटी पाहण्याची जरूरी भासणार नाही.

तथापि कोणत्याही संभाव्य गोष्टीकडे दुर्लक्ष न करणे हे चांगले. हाती आलेली सत्ता माणसाला आंधळे व बहिरे करते. त्यांच्या नजरेसमोर घडणाऱ्या गोष्टीही त्यांना दिसत नाहीत आणि कानावर ऐकू आदळणाऱ्या गोष्टी त्यांना ऐकू येत नाहीत. म्हणून हे सत्तेने मदांध झालेले सरकार काय करणार नाही हे सांगवत नाही. म्हणून मला वाटले की, देशभक्तांनी मृत्यूला, तुरुंगाला आणि अशाच संकटांना तयार असलेच पाहिजे.

जे शूर असतात ते मृत्यूला हसत हसत सामोरे जातात; पण तेही तशाच सावधगिरीने वागतात. अनत्याचारी युद्धात मूर्खपणाला स्थान नाही. अनैतिक कृत्य करून

आपल्याला तुरुंगात जावयाचे किंवा मरावयाचे नाही. या सरकारच्या जुलमी कृत्यांना विरोध करून आपल्याला फासावर चढावयाचे आहे.

'यंग इंडिया', १३-८-१९२१.

२५७. स्वराज्याच्या व्याख्या

मी मनातल्या मनात ज्या स्वराज्याच्या व्याख्या बनवीत आहे, त्या निरनिराळ्या व्याख्या वाचकांच्या पुढे ठेवण्याची मी परवानगी घेत आहे.

(१) स्वराज्य म्हणजे आपल्या स्वतःवरील नियंत्रण. ज्याने हे प्राप्त केले आहे त्याने वैयक्तिक प्रतिज्ञा पार पाडली आहे.

(२) तथापि आपण जो स्वराज्याचा विचार करतो, तो कोणत्या तरी लक्षणाच्या किंवा प्रतिमेच्या दृष्टीने करतो. म्हणून स्वराज्य याचा अर्थ लोकांचा देशाच्या आयात-निर्यातीवर, सैन्यावर आणि कायदेकोर्टांवर संपूर्ण ताबा असणे हा आहे. डिसेंबरमध्ये जी आपण प्रतिज्ञा केली तिचा हा अर्थ आहे. अशा स्वराज्यात ब्रिटिश संबंधाला जागा असेल किंवा नसेल. जर पंजाब आणि खिलाफतीच्या प्रश्नांची सोडवणूक झाली नाही तर अशा संबंधाला जागा राहणार नाही.

(३) पण अशी शक्यता आहे की, वैयक्तिकदृष्ट्या साधू हे आताही स्वराज्य उपभोगत आहेत आणि जेव्हा आपल्याला स्वतःचे पार्लमेंट मिळेल, तेव्हा देखील लोकांना आपण स्वतंत्र आहोत असे वाटणार नाही. म्हणून स्वराज्याचा अर्थ अन्न व वस्त्र सुलभतेने मिळणे हा आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या अभावी कोणीही उपाशी किंवा नग्न राहता कामा नये.

(४) अशा परिस्थितीत देखील एकजात किंवा एक वर्ग दुसऱ्यांना दडपण्याचा प्रयत्न करणे संभाव्य आहे. म्हणून स्वराज्याचा अर्थ अशी परिस्थिती निर्माण व्हावी की, ज्या परिस्थितीत एखाद्या तरुण मुलीला भर रात्रीसुद्धा एकटीला संकटाशिवाय हिंडता फिरता यावे.

(५) या चार व्याख्यात आणखी पुष्कळ व्याख्या अंतर्भूत होतात. असे असले तरी ज्या वर्गांचे मिळून राष्ट्र होते अशा प्रत्येक वर्गात जर स्वराज्याने नवे तेज ओतले

असेल व ते ओतावयासच पाहिजे तर त्याचा अर्थ अत्यंजांना अस्पृश्य म्हणून वागविण्याची चाल पूर्णपणे नष्ट झाली पाहिजे.

(६) ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद संपला पाहिजे.

(७) हिंदू व मुसलमानांच्या अंतःकरणातील पापी विकार पूर्णपणे नाहीसे झाले पाहिजेत. याचा अर्थ हिंदूंनी मुसलमानांच्या भावनांबद्दल आदर दाखविला पाहिजे आणि त्याच्याकरिता प्राण देण्यास तयार असले पाहिजे. तशीच वृत्ती मुसलमानांच्यातही पाहिजे. मुसलमानांनी हिंदूंच्या भावना दुखविण्याकरिता गोहत्या करता कामा नये. उलटपक्षी त्यांनी आपण होऊन हिंदूंच्या भावना राखण्याकरता गोहत्या करू नये. त्याचप्रमाणे कोणत्याही गोष्टीची उलट मागणी न करता मुसलमानांच्या भावना दुखविण्याकरिता हिंदूंनी मशिदीपुढे वाद्ये वाजवू नयेत. एवढेच नव्हे तर मशिदीवरून जात असता वाद्ये न वाजविण्यात त्यांना अभिमान वाटला पाहिजे.

(८) स्वराज्य याचा अर्थ हिंदू, मुसलमान, शीख, पारशी, ख्रिश्चन व ज्यू यांना आपल्या धर्माप्रमाणे वागता आले पाहिजे आणि त्यांनी दुसऱ्यांच्या धर्माबद्दल आदर दाखविला पाहिजे.

(९) स्वराज्य याचा अर्थ चोर आणि दरोडेखोरांच्यापासून स्वतःच्या गावाचे किंवा खेड्याचे रक्षण करण्यास ते गाव किंवा खेडे बलिष्ठ असले पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या गरजेपुरते अन्नवस्त्र निर्माण केले पाहिजे.

(१०) स्वराज्य याचा अर्थ एका बाजूला राजे व जमीनदार व दुसऱ्या बाजूला त्यांची प्रजा यांच्यामध्ये परस्परांबद्दल आदर असला पाहिजे. राजांनी व जमीनदारांनी प्रजेला छळू नये आणि प्रजेने राजांना व जमीनदारांना त्रास देऊ नये.

(११) स्वराज्य याचा अर्थ श्रीमंत आणि कामगारवर्ग यांच्यात परस्परांबद्दल आदर असणे. याचा अर्थ कामगारवर्गाने श्रीमंत वर्गाकरिता पुरेशा वेतनावर संतोषाने काम केले पाहिजे.

(१२) स्वराज्य याचा अर्थ प्रत्येक स्त्रीकडे माता किंवा भगिनी या दृष्टीने पाहिले पाहिजे व तिला अत्यंत मान दिला पाहिजे. याचा अर्थ उच्चनीच, भेदाभेद नाहीसे केले पाहिजेत आणि सर्वांशी स्वतःच्या भावाप्रमाणे किंवा बहिणीप्रमाणे आदराने वागले पाहिजे.

या व्याख्यांवरून असे निष्पन्न होते की, स्वराज्यात (१) सरकार दारू, अफू आणि तशाच इतर पदार्थांचा व्यापार करणार नाही; (२) अन्नधान्य आणि कापूस यांत सट्टेबाजी करता येणार नाही; (३) कोणताही माणूस कायदा मोडणार नाही; (४) लहरीप्रमाणे वागावयास बिलकूल जागा असणार नाही. याचा अर्थ असा की,

जेव्हा एखाद्या माणसावर कोणता तरी आरोप लादला असेल तेव्हा त्याला न्यायाधीश म्हणून काम करता येणार नाही; पण तो त्या आरोपांची चौकशी देशात योग्य रीतीने संस्थापित झालेल्या कोर्टाकडून करवून घेईल.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १४-८-१९२१

२५८. अस्पृश्यता आणि राष्ट्रीयत्व

अंकलेश्वरच्या एका सद्‌गृहस्थाने मला एक लांबलचक पत्र लिहिले आहे. त्यात ते म्हणतात की, राष्ट्रीय चळवळीत अस्पृश्तेचा प्रश्न आणल्यामुळे मी देशाची मोठी हानी केली आहे, त्या प्रश्नाची चर्चा करताना मी अतिशयोक्ती केली आहे आणि आपल्यामध्ये फूट पाडण्यास निष्कारण एक कारण निर्माण केले आहे. त्या गृहस्थांच्या पत्रात अनंत आरोप आहेत. त्यांना येथे उत्तर न दिल्याबद्दल ते मला क्षमा करतील.

काही सामाजिक प्रश्न इतक्या महत्त्वाचे असतात की, त्यांना राजकीय प्रश्न करण्यावाचून गत्यंतरच नसते. जर आपण हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रश्न हा सामाजिक आहे म्हणून फेटाळून लावला, तर आपली गाडी प्रवासाच्या पहिल्याच टप्प्याला रुतून पडेल. दक्षिणेत ब्राह्मण-ब्राह्मणेतर प्रश्न हा इतका तीव्र झाला आहे की, जो कोणताही राजकीय पक्ष त्याला वळसा घालण्याचा प्रयत्न करील तो आत्महत्याच करील. एखादा विशिष्ट प्रश्न राष्ट्रीय लढ्यात घ्यावा का घेऊ नये हे ठरविणे सोपे आहे. पण जर एखादा प्रश्न न सोडविता टाकून दिला तर तो आपल्या प्रगतीच्या आड येणार असल्यास तो सोडविण्यावाचून गत्यंतरच नसते. माझे स्पष्ट मत आहे की, जर मी अस्पृश्यतेचा प्रश्न घेतला नसता तर आपला लढा पुढे सरकू शकलाच नसता. आपण ज्या सहा कोटी लोकांना प्रगाढ अज्ञानामुळे अस्पृश्य म्हणून मानतो व त्यांची शक्य तितकी नागवणूक करतो त्यांना मागे टाकून स्वर्गाकडे निघालेले आपण चढूच शकलो नसतो. ते विमानाला चिकटले असते आणि जमिनीत पुरले गेले असल्यामुळे ते विमान उडूच शकले नसते. ते विमानाला लटकले असताना आपण कसे तरी पार पडलो असतो असे जर मला वाटले असते तर मी हा प्रश्नच हाती घेतला नसता. पत्रलेखकाच्या पत्रावरून मला असे वाटले की, त्याला सरकारच्या सध्याच्या पद्धतीची बिलकूल कल्पना नाही.

सरकारची इमारत ही सर्वस्वी आपल्या दौर्बल्याच्या पायावर उभी आहे. आज हिंदू-मुसलमानांचा प्रश्न असेल, उद्या ब्राह्मण ब्राह्मणेतरांचा प्रश्न असेल, नंतर अस्पृश्यतेचा प्रश्न असेल, पुन्हा केव्हा तरी संस्थानिक आणि प्रजेचा प्रश्न असेल, भांडवलवाले आणि मजुरांचा प्रश्न असेल, दारूची मजा लुटण्याचा प्रश्न असेल किंवा असेच प्रश्न असतील. या सरकारने आपल्या या सर्व दुर्बलतेचा फायदा घेतला आहे. ह्यामुळेच मी ह्या चळवळीला आत्मशुद्धीची चळवळ म्हणतो. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावर मोठा डाग आहे असे मी वर्णन केले आहे. कारण हिंदू समाजाने ज्यांना अस्पृश्य म्हणतात अशा जातींना जी वागवणूक दिली तीमुळे त्या समाजाने डायरशाहीसारखा गुन्हा केला आहे.

मी शास्त्राच्या सापळ्यात शिरणार नाही आणि स्वतःला मूर्ख बनविणार नाही. माझ्या डोळ्याला दिसणारा पुरावा मी दूर लोटू शकत नाही. जेथे जेथे मी नजर टाकतो तेथे तेथे मला अस्पृश्यांबद्दल तिरस्कारच दिसतो. एक पत्रलेखक मोठ्या गर्वाने म्हणतात की, जर हिंदू समाजाने अंत्यजांचा तिरस्कार खरोखरच केला असता तर अंत्यज मागेच नष्ट झाले असते. उलटपक्षी मला असे वाटते की, आपल्याला त्यांची सफाई-कामाकरिता जरूरी असल्यामुळे आपण त्यांना नष्ट केले नाही. गुलामांना कोण नष्ट करतो ? आपले ओझे वाहावे अशी ज्यांची इच्छा असते ते आपली जनावरे मारून टाकीत नाहीत. आपण अस्पृश्यांना जे जड ओझे वाहण्यास लावले आणि गुलामांच्या अवस्थेप्रत आपण जे त्यांना नेऊन ठेवले याचा विचार जेव्हा मी करतो तेव्हा मला जीवनच असह्य होते. तथापि ज्या अर्थी मला असे वाटते की, आपले अत्याचार हे बुद्धिपुरस्सर नसून अज्ञानामुळे आहेत, त्या अर्थी मी कठोर शब्दांनी हिंदू समाजाला जागे करण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्या शब्दात फार प्रेम आणि नम्रता असते. सध्या अंत्यजांना जी वागणूक आपण देतो तिला नैतिक समर्थन नाही.

कोणत्याही घाणेरड्या वस्तूला शिवल्यानंतर स्नान करावे ही कल्पना मला आवडते. मी तसे स्नान करतो व इतरांना करावयास सांगतो; पण जर एखादा माणूस बाहेरून माझ्याइतकाच स्वच्छ असला आणि त्याची जात विचारली असता तो अंत्यज आहे असे कळल्यानंतर त्याला टाळणे हे मला असह्य होते.

स्वराज्यात दुर्बलांचे रक्षण करणे हे अत्यंत महत्त्वाचे होईल. जर आपण त्या रक्षणाची खात्री देण्यास तयार नसलो, जर आपण त्यांना विहिरीतून पाणी काढून देणार नसलो, अत्यंत गलिच्छ वस्तीत राहण्यास भाग पाडणार असलो, जर त्यांना आपण आपल्या शाळेत येऊ देणार नसलो किंवा येऊ दिले तर निराळ्या बाकावर बसविणार असलो आणि जरी ते आपल्यापेक्षा अधिक स्वच्छ दिसून हजर झाले आणि त्यांच्या स्पर्शामुळे आपण विटाळलो असे आपण मानू लागलो तर ते खात्रीने हिंदू शास्त्र नाही. तो हिंदू शास्त्रांतील अतिरेकाचा भाग आहे आणि ती शुद्ध डायरशाही आहे.

अंत्यज पक्षातले एक गृहस्थ मला पत्रात लिहितात की, लॉर्ड क्लाइव्हने अंत्यजांच्या मदतीने इतरांना पराभूत केले. मी त्या विषयात शिरलो नाही; पण ते तसे असेल याबद्दल मला शंका नाही. आज सुद्धा जर अंत्यजांनी भोळसटपणा दाखविला तर असे पुष्कळ क्लाईव्हज आहेत की, जे अशा माणसाकडून किंवा वर्गाकडून आपला फायदा करून घेण्यास तयार आहेत आणि जे कोणी आपली डोकी वर काढतील त्यांनाही दडपण्यास तयार आहेत. गुरख्यांच्या नसांत जे रक्त आहे तेच आपल्यातही आहे. असे असूनही त्यांचा उपयोग चांदपूरच्या निरपराधी कामगाराविरुद्ध कोणी केला? शीखांचे डोळे आता उघडले आहेत; पण या शूर जमातीचा उपयोग सध्याच्या राजकीय पद्धतीने आपल्याला दडपण्याकरिता पुरेपूर केला नाही काय?

आपण आपली दुर्बलता झाकून टाकून आपल्याच गळ्याभोवती फास अडकवून घेतो आणि दुर्बलतेला शक्तीचे स्वरूप देतो व ती सुधारण्याचे कालावधीवर टाकतो.

जर एखाद्या धर्माचे अनुयायी आपल्या धर्मात जेवावयाला बसण्यापूर्वी काही भाग गरिबांच्याकरिता बाजूला काढून ठेवावा अशी चाल आहे म्हणून अंत्यजांच्या पदरात दूर अंतरावरून पानातले उष्टे टाकू लागले किंवा कुजके धान्य किंवा अशाच गोष्टी टाकू लागले, तर अशा दुष्ट वर्तनाला डायरशाही म्हणू नये तर काय म्हणावे?

हेच पत्रलेखक म्हणतात की, भडोचच्या परिषदेत हजर राहण्याकरिता जेव्हा अंत्यजांना आणण्यात आले, तेव्हा लोक माझ्याबद्दलच्या आदरामुळे आपल्या जागांवर बसून राहिले; पण त्यांना खरोखरच अंतःकरणात दुःख झाले. हे खरे असेल तर मला दुःख होते. जर आपल्याला स्वराज्य पाहिजे असेल तर आपण आपले विचार मांडण्यास शिकले पाहिजे आणि आपण एकटेदुकटे असलो तरी त्याप्रमाणे वर्तन केले पाहिजे.

माझ्या अस्पृश्यतेवरील लेखांनी आणि भाषणांनी मी पुष्कळ धर्मनिष्ठ हिंदूंना दुखावले आहे याची मला जाणीव आहे; पण मला हेही ठाऊक आहे की, मी जे वर्तन केले, त्यात मी कोठेही मत्सरबुद्धीने प्रेरित झालो नव्हतो. जेव्हा वैद्य काडेचिराइत देतो तेव्हा रोगी कडू तोंड करीत असला तरी त्याला हे आपल्या बऱ्याकरिता आहे हे ठाऊक असते.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १४-८-१९२१

२५९. तडजोड

मला जे पत्र आले आहे तशा प्रकारचे हे एकच[1] नाही. वसंतराम शास्त्री यांच्या लेखाचे मी स्वागत केल्याबद्दल काही मित्रांनीही माझी तोंडी कानउघाडणीही केली आहे. तथापि ती माझी मतेच कायम आहेत. मी वरील प्रकारच्या कोणत्याही लेखाचे आणि टीकेचे सारख्याच वृत्तीने स्वागत करीन. ही गोष्ट संतोषाची आहे की, इतके लोक आता अस्पृश्यतेची चाल हे एक पातक आहे असे समजू लागले आहेत आणि या प्रश्नात तडजोडीला बिलकूल जागा नाही असे सुचवीत आहेत. शास्त्री यांच्या लेखावरील टीकाकार स्वतःच्या दृष्टिकोणातून त्याकडे पाहात आहेत. मी शास्त्री यांच्या लेखाचा विचार त्यांच्या दृष्टिकोणातून केला आणि ते अस्पृश्यतेची चाल हा एक आरोग्याचा विषय आहे असे मानतात हे पाहून मला समाधान वाटले. ज्या प्रमाणे आपण मासिक पाळीच्या स्त्रीचा स्पर्श टाळतो त्याचप्रमाणे अंत्याजाच्या स्पर्शाची कल्पना मला समजू शकते. चांडाळाचा स्पर्श टाळण्याची चाल कशी उद्भवली असेल हे मला समजणे कठीण नाही.

जो खरा सुधारक असतो तो आपली भूमिका न सोडता, जे त्याच्याकडे अधिक जवळ येतात त्यांचे स्वागत करतो. कारण त्याचा विश्वास असतो की, काळाच्या ओघात त्यांना सुधारणेचा अर्थ समजेल. शास्त्राच्या नावाखाली जी अस्पृश्यता चालू आहे तिचा मी धिक्कार केलेला आहे आणि या बाबतीत माझ्या या वृत्तीला मुरड घालण्याचा माझा बिलकूल हेतू नाही; पण मी अशा माणसाला वंदन करीन की, जो अंत्यजाला शिवल्यानंतर आंघोळही करील, जो अंत्यजावर प्रेम करील, त्यांच्याकरिता पाण्याचे हौद बांधून देईल. त्यांनी शिकावे म्हणून त्यांना मदत करील, त्यांची दुःखे आपली मानील, त्यांना खाऊ घातल्याशिवाय जेवणार नाही, रेल्वेच्या डब्यात अंत्यजाला आदराने जागा देईल आणि तो आजारी पडला असता त्याची शुश्रूषा करील. असा माणूस जर अंत्यज्याच्या स्पर्शामुळे आपला आत्मा विटाळला असे समजत असेल तर परमेश्वराने त्याला क्षमा करावी, अशी मी प्रार्थना करीन. माझा विचार, किंवा आचार किंवा पद्धत मी यामध्ये यत्किंचित बदल करणार नाही. मी अस्पृश्यतेच्या बाबतीत तडजोड करणार

१. हे पत्र येथे उद्धृत केले नाही. ते एका सनातनी हिंदूकडून आले असून त्यात शास्त्री वसंतराम यांच्या लेखावर जे गांधींनी अभिप्राय व्यक्त केले आहेत त्यात त्यांनी लेखक समजतो, त्याप्रमाणे जी तडजोडीची वृत्ती दाखविली त्याबद्दल तक्रार केली; पाहा. 'माझी टिप्पणे १७-७-१९२१.

नाही; पण जर काहीजण या ध्येयाकडे जात असतील तर मी त्यांना तेवढ्यापुरता मान देईन.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १४-८-१९२१

२६०. माझी टिप्पणे

टोप्यांची होळी

मुंबईस जोमाने सुरू झालेले काम अत्यंत जोरदारपणे चालले आहे. आमच्या प्रवासातील प्रत्येक जागी मखमलीच्या, फेल्ट वगैरे टोप्यांचा ढीग पडत असे. मुसलमान आपल्या तुर्की किंवा ॲस्ट्राखानी टोप्या फेकीत असत. काहीजण आपली पागोटीही टाकीत. एका मित्राने असे म्हटले की, देशामध्ये जे हे आंतरिक समभावनेचे दळणवळण सुरू झाले आहे, त्याच्यापुढे टेलिफोन व तारा यांचे दळणवळण फिके पडते. परदेशी कापड वापरणे किंवा घरात ठेवणे, ही कल्पना वायुवेगाने लोकात फैलावली. म्हणून प्रत्येक जागी आम्हांला काही ना काही तरी मिळते. आपले कपडे होळीकरिता आमच्या स्वाधीन करण्यास मागे पाऊल घेणारा माणूस क्वचितच आढळला, याचे मला आश्चर्य वाटते.

आमचा गट

आमच्या या दौऱ्यात आमच्या गटात अलीबंधूंपैकी एकजण आणि मी आहे, एवढेच नव्हे तर त्यांत कानपूरचे मौलाना आझाद सुभानी आणि सिमल्याजवळ कोटगड येथे राहणारे मि. स्टोक्स हेही आहेत. स्टोक्स हे काँग्रेसचे सभासद आहेत. पहाडी मुलुखात जी वेठबिगारीची चाल आहे, ती नष्ट करण्याकरिता त्यांनी आपला वेळ समर्पित केला आहे. मि. स्टोक्स यांचा विवाह एका हिंदी ख्रिश्चन स्त्रीशी झाला आहे आणि आणि त्यांना सहा मुले आहेत. त्यांनी आजच्या दिवसापर्यंत आपल्या मुलांना इंग्रजीचा एक शब्दही शिकविला नाही. त्यांना दोनच भाषा येतात. पहाडी व हिंदी. त्यांनीही ३१ जुलैला आपले कपडे पवित्र अग्नीत टाकले आणि ते आता खादीचे धोतर, सदरा आणि टोपी घालतात. त्यांना थोडीशी फुरसत असल्यामुळे ते थोडासा अनुभव मिळविण्याकरिता प्रवासात आमच्याबरोबर असतात. आज कित्येक वर्षे ते

शुद्ध हिंदी पद्धतीने राहात आहेत. त्यांच्या पोषाखातील बदल हा मात्र ताजा आहे.

जयजयकाराच्या आरोळ्या आणि पूज्यभावाने पदस्पर्श

जयजयकाराच्या आरोळ्या ठोकण्याचे आणि माझ्या पायांना स्पर्श करण्याचे वेड हे पूर्वीइतकेच जोरात आहे. मला वाटले होते की, मी याविषयी इतके लिहिल्यानंतर परिस्थिती बदलली असेल; पण आम्ही संयुक्त प्रांतात शिरल्यापासून माझ्यावर त्यांचा इतका वर्षाव झाला आहे की, मला त्याचा तिटकारा आला आहे. लोकांच्या उत्साहाला पारच उरला नाही. पण हा सारा उत्साह ओरडण्यात आणि पायांना स्पर्श करण्यात व्यर्थ दवडला जात आहे. माझे कान देखील हा मोठा आवाज सहन करण्यास आता बळकट राहिले नाहीत. हजारो लोकांच्या जमावात माझ्या पायांना स्पर्श करण्याचा लोकांचा प्रयत्न हा इतका तापदायक झाला आहे की, प्रत्येक क्षणी मला खाली पडण्याची भीती वाटते.

स्वयंसेवक

स्वयंसेवकांची संख्या फार मोठी आहे; पण त्यांना आपल्या जबाबदारीची पूर्ण कल्पना नाही. त्यांच्यात शिक्षणाचा अभाव आहे. जर आपल्याला सविनय कायदेभंग सुरू करावयाचा असेल तर स्वयंसेवक हे पूर्णपणे कार्यक्षम झाले पाहिजेत. त्यांना लोकांच्या आरोळ्या थांबविता आल्या पाहिजेत. माझ्या पायांना स्पर्श करण्याला लोकांना त्यांनी अडविले पाहिजे, आणि लोकांनी त्यांचे ऐकले पाहिजे. जर स्वयंसेवकांना हे आवरता आले नाही तर कठीण प्रसंगी त्यांची मदत होणार नाही. म्हणून स्वयंसेवकांना शिक्षण देणे हा आपल्या लढ्यातील आवश्यक भाग आहे, असे मानले पाहिजे.

शाबित करणे

आम्ही स्वदेशी आचरतो किंवा नाही हे कसे शाबित करणार, हे प्रत्येकजण मला विचारतो. त्याच्या दोन पद्धती आहेत. आज बाजारात स्त्री-पुरुषांच्या अंगावर परदेशी कपड्यांशिवाय दुसरे कपडे क्वचितच अंगावर दिसतात. आपण जे कापड दारावर सजावटीकरिता वापरतो ते फक्त मदारशी[1] आणि मँचेस्टरमध्ये बनविलेल्या कापडाचे असते. आपल्या पताका, बॅन्ड वगैरे परदेशी वस्तूंच्या केलेल्या असतात. आपल्या देवळात व मशिदीत हीच गोष्ट दिसते. जेव्हा आपण त्याऐवजी तेथे खादी पाहू, तेव्हा परदेशी वस्तूंचे युग संपले, असे आपल्याला समजेल. पण त्याहीपेक्षा अधिक खात्रीलायक पुरावा आपल्या कापडांच्या दुकानांत आणि विणकरांच्या घरात पाहावयास सापडेल. जेव्हा

१. एक प्रकारचे कापड

आपल्या दुकानात परदेशी कापड सहजासहजी मिळणार नाही आणि डोळ्यांला चोहोकडेच खादी दिसेल व विणकरांच्या मागावर परदेशी सूत दिसणार नाही, तेव्हा स्वदेशीचे युग अखेरीस सुरू झाले आहे, असे आपल्याला कळून चुकेल. जर परदेशी कापडाला गिऱ्हाइकेच नसतील तर ते कापड विकणारी दुकानेच कशी असतील ? ही पूर्णावस्था यावयास हिंदू व मुसलमानांना योग्य मार्ग दिसला पाहिजे. जर कोट्यवधी हिंदूंची तलम मलमलीबद्दलची आवड सुटली नाही, तर एकटे मुसलमान काय करणार ? आणि जर मुसलमानांची सुटली नाही तर एकटे हिंदू काय करणार ?

आपल्या चुकीबद्दल दंड

समाजातील काही वर्गांकडे आपण दुर्लक्ष केल्यामुळे आपल्यासमोर काही अडचणी उभ्या राहिल्या आहेत. मी जेथे जेथे जातो तेथे तेथे मला व्यापारी व विणकर यांच्यात सहकारितेचा अभाव दिसतो. या चळवळीत काही प्रमाणात व्यापारी आले आहेत; पण विणकरांशी संबंध जोडण्याचा आपण प्रयत्नच केला नाही. म्हणून आपण त्यांना शिकविलेच पाहिजे. जोपर्यंत आपण त्यांना शिकविले नाही तोपर्यंत आपल्या अडचणी वाढतच जातील. कारण परदेशी माल जर व्यापारी आयात करीत राहिले आणि विणकर परदेशी सूत वापरीत राहिले व हातसुताला स्पर्शही करणार नसले तर आपण कोठे असू ? प्रत्येक काँग्रेस कमिटीच्या अधिकाऱ्यांनी आता व्यापारी आणि विणकर यांच्याशी संबंध जोडले पाहिजेत. त्यांना सभासद म्हणून नोंदविले पाहिजे. आणि त्यांनी त्यांच्या कामात किंवा धंद्यात आवश्यक ते बदल करावेत म्हणून त्यांचे मन वळविले पाहिजे. असा प्रयत्न मोरादाबाद येथे केला गेला व तो यशस्वी ठरला. तेथील कमिटीने व्यापाऱ्यांची व कार्यकर्त्यांची एक सभा बोलाविली. त्यांची खात्री पटल्यानंतर आणि त्यांच्या अडचणी सुटल्यानंतर त्यांनी परदेशी कापड विकत घेणार नाही, अशी स्वखुषीने प्रतिज्ञा घेतली. मी जेथे जेथे जातो तेथे तेथे गुजराती लोक मोठ्या संख्येने आढळतात. शे-दोनशे वर्षांपासून पुष्कळशी कुटुंबे विशिष्ट प्रांतात स्थायिक झाली आहेत. आज प्रत्येक ठिकाणी ते सुखाने कामधंदा करीत आहेत आणि स्थानिक लोकांच्या बरोबर ते जेथे जेथे आहेत तेथे तेथे मिळून मिसळून वागत आहेत. काही ठिकाणी त्यांच्याच प्रयत्नामुळे काँग्रेसचे काम भक्कम चालले आहे. शिवाय ते जरी कामात येऊन सामील झाले तरी ते नम्र असतात. गुजराती लोक आपले गुण अन्य ठिकाणी प्रकट करीत असलेले पाहून मला अत्यंत संतोष वाटतो. जर आपण प्रत्येक प्रकारच्या भीतीतून मुक्त झालो तर देशाची सेवा याहीपेक्षा अधिक करू.

अहिंसेची शक्ती

मला सर्वत्र आलेल्या अनुभवांवरून असे दिसते की, जेथे जेथे लोकांना अहिंसेचा धडा चांगला समजला आहे तेथे तेथे ते फार उच्च जागी चढले आहेत. भयातून किंवा

दुर्बलतेतून निर्माण होणारी अहिंसा, ही खरी अहिंसा नाही. तिलाच खरी अहिंसा म्हणता येईल की, जिच्यामध्ये शक्ती आणि सामर्थ्य एकत्रित झालेले असते. ज्याप्रमाणे आपण आपल्या ब्रिटिशांशी येणाऱ्या संबंधात शांतता उल्लंघन करू इच्छित नाही, त्याचप्रमाणे आपले स्वतःचे जे लोक, अधिकारी, शिपाई किंवा पोलीस म्हणून काम करीत असतील, त्यांच्याशी वागताना आपण अहिंसा बाजूला ठेवता कामा नये. एका गृहस्थाने मला असा प्रश्न विचारला आहे की, आपण आपसातच अहिंसा पाळावी किंवा ब्रिटिशांच्या संबंधातच ती पाळावी. असा प्रश्न उद्भवताच कामा नये. जर आपण आपल्या लोकांशी शांततेने वागलो नाही, तर आपला पराभव होईल. जो असहकारितावादी असतो त्याने सर्वांशी आदराने, शांततेने आणि नम्रतेने वागले पाहिजे. मनुष्य जितका अधिक शूर असतो, तितका तो अधिक शांतताप्रिय असला पाहिजे आणि तो अधिक नम्र असेल तितका तो अधिक मोठा असेल. जो उथळ माणूस क्षुल्लक कारणावरून मारामारी आणि शिविगाळ करू लागतो, तितकी त्याची शक्ती लुप्त होते. शांततामय वृत्ती ही शुक्रासारखी असते. तो एक ओजाचा अदृश्य प्रकार आहे. जो त्याचा स्वतःमध्ये संचय करतो, तो बलशाली ब्रह्मचारी होतो. ब्रह्मचर्याची व्याख्या केवळ शारीरिक दृष्ट्या करण्यामध्ये आपण जे क्षणोक्षणी आपला तोल गमावतात, त्यांना गुन्हेगार मानण्याचे आपण सोडून दिले आहे. शारीरिक दृष्ट्या ब्रह्मचर्याचे पालन हे जसे शरीरस्वास्थाकरिता आवश्यक आहे त्याचप्रमाणे आध्यात्मिक ब्रह्मचर्य हेही आवश्यक आहे. जे सरकारशी सहकार्य करतात त्यांच्यावर रागावण्यामुळे आणि पोलिसांना शिव्या दिल्यामुळे आपण आपली चळवळ लांबविण्यात फक्त यशस्वी झालो आहोत, अशी माझी खात्री आहे. जर आपण आपल्या सर्व विरोधकांशी विचाराने, उच्चाराने आणि कृतीने शांततापूर्ण, आदरशील आणि नम्र राहिलो असतो तर आजच आपल्या हातांत सारी सत्ता आली असती.

पारशी स्त्रियांना

पारशी भगिनी बऱ्याच मोठ्या संख्येने नवजीवन वाचतात, हे मला ठाऊक आहे. त्याची भाषा समजण्यात त्यांना काही अडचण येत असेल. मी माझी भाषा शक्य तितकी सोपी करण्याचा प्रयत्न करतो आणि जोडाक्षरे टाळतो. पण कोणालाही व्याकरणाचे नियम पूर्णपणे टाळता येणार नाहीत. पारशांनी गुजरातीला इतकी विद्रूप केली आहे की, त्यांच्याशी त्याबाबतीत स्पर्धा करणे म्हणजे भाषेचा खून करणे आहे. म्हणून या स्त्रीवाचकांना मी अशी विनंती करतो की, त्यांना जे शब्द कठीण वाटतील ते त्यांनी समजून घेण्याचे थोडेसे कष्ट करावेत किंवा कोणाला तरी ते समजावून सांगण्यास सांगावे. अशा प्रकारे काही अंक त्यांनी श्रम घेऊन वाचले म्हणजे त्यांना काहीच कठीण जाणार नाही. आपल्या पारशी बंधू भगिनींनी प्रयत्न करून आपली भाषा सुधारणे आवश्यक आहे. सध्या गुजरातीचे तीन प्रकार दिसतात. पारशी गुजराती, मुसलमानी

गुजराती आणि हिंदू-गुजराती. पण आपले मुसलमान बांधव पारशांच्याइतकी गुजराती बिघडवीत नाहीत. आणि त्यांना नवजीवनची गुजराती समजण्यास काहीच अडचण वाटत नाही. खबरदार, मलबारी आणि इतर लेखकांनी असे दाखवून दिले आहे की, पारशांनी मनात आणले तर ते चांगले गुजराती लिहू शकतात. पारशांच्याकडून येणाऱ्या काही पत्रांत मला शुद्ध गुजराती आढळते. स्वतःच्या भाषेबद्दल थोडासा अभिमान असला म्हणजे झाले. हा अभिमान असेल तर पारशांचे गुजराती लवकर सुधारेल आणि सर्वसामान्य दर्जाचे होईल.

[गुजरातीवरून]
'नवजीवन', १४-८-१९२१

२६१. ओंकारनाथ पुरोहित यांना पत्र

पाटण्याच्या रस्त्यावर,
ऑगस्ट १५, १९२१

प्रिय ओंकारनाथ,

तुमचे पत्र पोहचले. मी छापील पत्र पाठवीत आहे. मला त्या पत्रात असे काही अन्यायाचे वाटत नाही की, तो अन्याय चव्हाट्यावर मांडण्याकरीता तुम्ही पत्र प्रसिद्ध करावे. पत्र प्रसिद्ध न करण्याचा शब्द तुम्ही पाळला पाहिजे. त्या पत्रातील सल्ल्या-प्रमाणे तुम्ही चालावे का नाही, हे तुमच्या अंतःकरणानेच ठरवावे.

मोहनदास गांधी

ओंकारनाथ पुरोहित.
लाला चंदूलाल–द्वारा
राजा का बझार.
आग्रा.

गांधींच्या हस्ताक्षरातील मूळ हिंदीच्या फोटोस्टॅटवरून :
जी. एन्. ६०८८

२६२. सिमल्याच्या पहाडी संस्थानातील रहिवाशांना आवाहन[1]

पहाडी बंधूंनो!

मुनशी कपूरसिंग आणि त्याचे सहकारी हे जे फार काळापासून तुमच्यावर अन्याय होत आहेत, त्यातून तुमची मुक्तता व्हावी याकरता त्रास भोगत आहेत. ते अन्याय तुम्ही काहीही प्रयत्न न करता सोडून देणार आहात काय? माझी खात्री आहे की, या बाबतीत साऱ्या देशाची नाराजी तुम्ही ओढवून घेणार नाही. जोपर्यंत तुमचे मित्र आणि मदतनीस तुरुंगात आहेत, तोपर्यंत मि. स्टोक्स यांच्या सल्ल्याप्रमाणे ब्रिटिश सरकारची आणि संस्थानची वेठबिगार करण्यास नकार द्याल, अशी मला आशा आहे. तुम्ही तुमच्या बाजूने अतिप्रसंग करू नका. तुमचे बंधू बंधनात आहेत तोपर्यंत मनातून राग काढून टाका. तुम्ही कोणत्याही अधिकाऱ्याची बिगारीची कामे करण्यापेक्षा आपल्या धर्माकरिता तुरुंग भरण्यास तयार होणे आणि कष्ट सहन करणे अधिक चांगले. हे लक्षात ठेवा की, जर या प्रसंगी तुम्ही नालायक ठरलात तर तुम्ही आपली गुलामगिरी कायम टिकवाल आणि पुढच्याही काळात तुम्हांला गुलाम म्हणूनच वागविण्यात येईल. तुमच्या या प्रयत्नात मी अंतःकरणापासून तुमच्याबरोबर आहे.

'दि लीडर', १८-८-१९२१

२६३. महादेव देसाईला पत्र

कलकत्त्याच्या वाटेवर
[ऑगस्ट १७, १९२१ पूर्वी][2]

भाईश्री महादेव,

तुझे पत्र पोहोचले. मोतीलालजींना तू तेथेच राहावेस, असे खरोखर वाटते. पण ज्या मुख्य गोष्टीचा विचार तू केला पाहिजेस, ती म्हणजे तुला स्वतःला काय

१. ही मूळ हिंदीत केली होती व ती सिमल्याच्या पहाडी संस्थानातील रहिवाशांत चोहोकडे वाटली होती.

२. १७ ऑगस्टला गांधी कलकत्त्यात होते.

आवडते, ही होय. जर तुला तेथील काम फार कष्टाचे वाटत असेल किंवा ती जागा प्रकृतीला मानवत नसेल तर अवश्य निघून ये. कोणाही माणसाचा उजवा हात होण्यापेक्षा कोणालाही अधिक महत्त्वाचे होता येईल काय ? " मी जर फक्त उजवा हात असतो ", हे शब्द एक तर दुःखाने किंवा माहितीने लिहिले गेले असतील. जर ते दुःखाचे शब्द असतील तर तू मला समजला नाहीस, असे मी म्हणेन. पण जर जाणिवेने लिहिले असशील तर ठीक आहे. दोन मेंदू एकमेकांपासून निरनिराळे वाहात जाऊ शकतील. पण कोठलीही गोष्ट करण्याकरीता मेंदूपासून हात निराळा होऊ शकेल काय ? मी तुला मेंदूप्रमाणे काम करण्यास शिकवित आहे. संतराम हा कायमचा उपमंत्री असल्यामुळे येथून निघून जाऊ शकत नाही. तुला तुझा दर्जा नीट समजावा, अशी माझी इच्छा आहे.

प्यारेलालला[1] येथे ठेवण्याचे माझे रहस्य तुला समजणार नाही. माझ्या जीवनातील तो भाग तुला ठाऊक नाही. बा आणि मी यांचा स्वभाव सारखाच नाही. बा मला समजू शकत नाही. मला पाहिजे त्या प्रकारची एकही स्त्री मला अद्याप आश्रमात आढळली नाही. स्वयंपाकघराची व्यवस्था ठेवणे हे कठीण काम आहे. फारच थोड्यांना ते करता येते. ते काम तुझ्या शक्तीबाहेर आहे. आतापर्यंत मगनलाल, विनोबा, छोटेलाल[2] मी स्वतः आणि काही प्रमाणात भुवरजी[3] यांनी हे काम यशस्वी केले. आपल्या स्वयंपाकात शास्त्र आहे. गोकी बेहेन[4]मुळे असंख्य अडचणी होत्या. आम्हांला स्वयंपाक घरात एक जबाबदार माणूस पाहिजेच आहे. मला वाटते, मी प्यारेलालचा अत्यंत चांगला उपयोग करीत आहे. जेव्हा योग्य वेळ येईल, तेव्हा मी त्याला तेथून हलवून दुसरीकडे नेऊन ठेवीन. जोसेफ हा बाहेर असताना देवदास किंवा प्यारेलाल यांनी तुला येऊन मिळावे ही तुझी मागणी जबरदस्त वाटते. या दोघांपेक्षा कमी प्रतीचा माणूस तू शोधून काढ. तुला तुझ्याबरोबर प्रभुदासला घेता येईल.

दुर्गाची प्रकृती सुधारल्यावर जोसेफबरोबर राहाणे तुला जमेल का ? पण ती दूरची गोष्ट आहे. तुझी स्वतःची इच्छा काय आहे हे पहिल्यांदा मला समजले पाहिजे. ' यंग इंडिया ' हाती घेण्याकरिता मी तुला आता पाठविणार नाही. माझे शेवटचे पत्र तुला मिळाले का ? एक तर तू तेथेच राहिले पाहिजेस किंवा माझ्याबरोबर राहिले पाहिजेस असेच मला आता वाटते.

१. प्यारेलाल नय्यर, १९२० पासून गांधींचा सेक्रेटरी, गांधींचा चरित्र लेखक,
२. छोटेलाल जैन, एके काळचा क्रांतिकारक. नंतर सत्याग्रहाश्रमातला रहिवासी.
३. सत्याग्रहाश्रमातला रहिवासी.
४. रलियात बेहेन गांधींची बहीण.

मी तुझे लेख वाचतो. ते सर्व चांगले असतात. याचा अर्थ त्याच्यावर अभिप्रायांची जरूरी नाही. तू बिपिनचंद्रांना[1] चांगले उत्तर दिले आहेस.

गौहाट्टीला मला पत्र लिही. मी २५ तारखेपर्यंत तिच्याच आसपास असेन.

'यंग इंडिया'च्या कामाकरिता मला जो येऊन मिळणार होता तो क्रिस्टोदास[2] आला आहे. तो माझ्याबरोबर आहे.

बापूंचे आशीर्वाद

मूळ गुजरातीच्या फोटोस्टॅटवरून; एस्. एन्. ११४१३

२६४. मिर्झापूर पार्क, कलकत्ता येथे भाषण[3]

ऑगस्ट १७, १९२१

सुरुवातीला महात्मा गांधी म्हणाले की, मी पाच मिनिटांपेक्षा अधिक बोलणार नाही. कारण मला सायंकाळी दार्जिलिंग मेलने आसामला जावयाचे आहे. आपले भाषण लोकांनी शांतपणे ऐकावे अशी आशा त्यांनी प्रकट केली.

ते म्हणाले की, मला वाटते तुम्ही सर्वांनी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे ठराव वाचले आहेत. त्या ठरावांत येत्या ३० सप्टेंबरपूर्वी परदेशी कपड्यांवर पूर्ण बहिष्कार घालावा असे म्हटले आहे. तो ठराव अमलात आणण्यास मी तुम्हांला आग्रहपूर्वक सांगतो. गांधीजींनी त्यांना स्वदेशी कपडे वापरण्यास विनंती केली आणि त्यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, जे परदेशी कपडे तुम्ही अजून वापरता आहात ते जाळून टाका किंवा स्मर्नाला पाठवून द्या. त्यांनी आपल्या पोषाखाकडे बोट दाखविले. तो पोषाख खादीच्या कापडाचा होता आणि 'स्वराज्य' टोपीचा होता. ते म्हणाले खादी थोडी जाडीभरडी असली तरी तुम्ही नाउमेद होऊ नका. त्यांनी श्रोत्यांना अशी आठवण करून दिली की, जर ते हे ठराव पूर्णपणे अमलात आणण्याचा निश्चय करणार

१. बिपिनचंद्र पाल.

२. कृष्णदास शब्दाचे अपभ्रष्ट रूप.

३. गांधीजींनी संध्याकाळी ४॥ वाजता १५,००० हिंदू-मुसलमानांच्या सभेत भाषण केले. अबुल कलाम आझाद आणि महंमद अली हजर होते.

असतील तर मी तुम्हांला येत्या ऑक्टोबरमध्ये स्वराज्याचे खिलाफत व पंजाबचे अन्याय दूर करण्याचे वचन देतो. त्यांनी हिंदू व मुसलमानांना असा उपदेश केला की, एकाच आईच्या दोन मुलांप्रमाणे, दोघांनीही प्रयत्नात एकजूट करावी आणि आपली लढाई त्यांनी शांतपणे लढण्यास तयार व्हावे. आपल्या ह्या स्वातंत्र्याच्या लढ्यात तुम्ही संपूर्ण अनत्याचारी मार्गाने एक निधडी आघाडी निर्माण करा असे त्यांनी त्यांना सांगितले.

शेवटी महात्मा गांधींनी पुन्हा श्रोत्यांना विनंती केली की, तुम्ही आपले सर्व परदेशी कपडे जाळून टाका. जर जरूर पडली तर मी तुमच्यापुढे भाषण करण्यास पुन्हा येईन आणि आसामच्या दौऱ्यावरून कलकत्त्याला थोड्या दिवसांत परत आल्यानंतर अधिक वेळ तुमच्यापुढे बोलेन.

'अमृतबझार पत्रिका', १८-८-१९२१

२६५. ख्वाजा यांना पत्र

[ऑगस्ट १७, १९२१ नंतर][1]

प्रिय ख्वाजासाहेब[2]

गोहत्येसंबंधी तुमच्या तारेला अगोदर उत्तर पाठविता आले नाही याबद्दल क्षमा करा. हिंदुस्थानच्या पुष्कळ भागात केले गेलेले काम हे खरोखरच आश्चर्य करण्याइतके चांगले झालेले आहे याची मला माहिती आहे. अन्नधान्याच्या तुटवड्याबद्दल तुम्ही माझ्याकडून तारेची अपेक्षा करीत होता; पण आता माझ्या तारेचा काही उपयोग नाही.

१. हे पत्र ख्वाजा यांची १६ ऑगस्टची, मौंवीरला १७ ऑगस्टला पोचलेल्या तारेला, उत्तर आहे. त्या तारेत पुढील मजकूर होता : "काल दोनच गायी कापल्या. गेल्या वर्षी ६ आणि पूर्वीच्या वर्षांत २०० वर कत्तली होत. स्वदेशीला अत्यंत आशादायक उत्तर. गहू रुपयाला ४ शेर. आणखी किंमती कमी होण्याच्या अफवांमुळे शहरात मोठी गडबड होत आहे. भयंकर घडामोडींची भीती. तारेने सल्ला कळवा.

२. ख्वाजा अब्दुल मजीद, अलिगढच्या राष्ट्रीय मुस्लिम विद्यापीठाचे कुलगुरु. पुढे तिचेच जमिया-मिलिया इस्लामिया-दिल्लि या संस्थेत रूपांतर झाले.

४ तारखेला[1] तुम्ही मला भेटाल अशी आशा आहे. त्या वेळची परिस्थिती जर विचार करण्यास आवश्यक असेल तर ती मला कळवा.

तुमचा स्नेहांकित

फोटोस्टॅटवरून एस्. एन्. ७५९९

२६६. संयुक्तप्रांतात दडपशाही

दोन महिन्यांपेक्षा अधिक काळापूर्वी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी माझ्याकरिता पुढील टिपण तयार केले होते. त्यात ३० मेपर्यंत संयुक्तप्रांतातील दडपशाही उपायांची पाहाणी केली होती. दुसऱ्या गोष्टीकडे माझे लक्ष वेधल्यामुळे जवाहरलाल नेहरूंच्या टिपणासंबंधी मी विचार केला नव्हता. पण ती टिपणे जूनइतकीच आजही ताजी वाटतात. सरकारवर जो दडपशाहीचा आरोप केला आहे व त्यांनी नाकारला आहे, त्याला या टिपणात पूर्ण उत्तर दिले आहे.[2]

'यंग इंडिया', १८-८-१९२१

२६७. टिप्पणे

हिंदी नवजीवन

नवजीवनची हिंदी आवृत्ती मी काढावी याकरिता कित्येक हिंदी भाषी, मित्र उतावळे झाले आहेत. मलाही तशीच उतावीळ झालेली आहे. पण आतापर्यंत हे शक्य

१. ६ तारखेला कलकत्त्याला वर्किंग कमिटीची सभा भरणार होती. तिला हजर राहाण्याकरिता गांधीजी तेथे ४ तारखेला पोहोचणार होते.

२. पाहा. परिशिष्ट ६.

झाले नाही. 'नवजीवन' आणि 'यंग इंडिया' यांचे संपादन करणे झेपावयाला फार कठीण आहे; पण माझ्या कल्पना आणि सिद्धांत यांबद्दल मला प्रेम वाटते यात काही नवल नाही. माझे पक्के असे मत आहे की, ते हिंदुस्थानला हितावह आहेत आणि मी नम्रपणे म्हणतो की, ते सर्वांनाच हितकारक आहेत. म्हणून मी मित्रांच्या आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहाला मान देत आहे. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात कित्येक हिंदी भाषांतरे प्रसिद्ध होतात हे मला ठाऊक आहे, पण इच्छा अशी आहे की, एकाच ठिकाणी 'नवजीवन' आणि 'यंग इंडिया' यातील लेखांचे अधिकृत स्वैर भाषांतर प्रसिद्ध व्हावे. हे आता केले जात आहे. या 'आवृत्तीतील हिंदी हे वास्तविक हिंदुस्थानी आहे हिंदुस्थानी हे हिंदी व उर्दूच्या संयोगातून निर्माण झाले आहे. हिंदू व मुसलमानांना समजेल अशा सोप्या शब्दात हिंदी दिले जाईल. अलंकारिक भाषा टाळण्याचा प्रयत्न केला जाईल. उर्दू लिपीतून एकाच वेळी ते देणे मला फार पसंत पडेल; पण ते अद्याप होऊ शकले नाही माझी मारवाड्यांच्याबद्दल जी आस्था आहे विशेषतः जमनालालजींच्या-बद्दल असणाऱ्या आस्थेमुळे हा हिंदी नवजीवनचा अंक लवकर निघाला हे गुपित मी वाचकांच्यापासून लपवून ठेवू इच्छित नाही. जमनालालजी यांनी मुद्रक म्हणून आणि शंकरलाल बॅन्कर यांनी प्रकाशक म्हणून आपली नावे सरकारकडे नोंदविली आहेत. गुजराती व इंग्रजी आवृत्त्यांप्रमाणे हिंदी नवजीवनात जाहिराती असणार नाहीत. दुसऱ्या दोन पत्रांप्रमाणे हेही पत्र स्वावलंबी झाले पाहिजे आणि म्हणून त्याचे अस्तित्व लोका-श्रयावर अवलंबून राहील. हिंदी आवृत्तीची वार्षिक वर्गणी ४ रुपये व निम्म्या वर्षाची २ रुपये राहील. ज्यांना वर्गणीदार व्हावयाचे असेल त्यांनी ६ महिन्यांचीच वर्गणी पाठवावी असा माझा सल्ला आहे. हिंदी नवजीवन हा एक फक्त प्रयोग आहे. माझा सेवक वर्ग मर्यादित आहे. जर स्वामी आनंदानंदांचा अपार उत्साह आणि योजकता नसती तर मी ही जबाबदारी घेण्याचे नाकारले असते. ऐच्छिक काम हे फार कार्यक्षम असते अशा आमचा अनुभव आहे. आणि अशा प्रकारचे शारीरिक किंवा मानसिक काम करणारा वर्ग हुडकून काढणे सोपे नाही. म्हणून ज्या हिंदी प्रेमी लोकांनी असह-कारिता हा जीवनसिद्धांत मानला आहे त्यांनी आपला आश्रय सहा महिन्यांपुरताच प्रयोगा-दाखल द्यावा. ह्या प्रकाशनांचा उद्देश फायदा मिळविणे हा नाही हे सांगण्याची जरूरी नाही. म्हणून जर थोडा फार फायदा राहिला तर तो या तीन पत्रांच्या वाढीकरिता खर्च केला जाईल. मौलाना महंमद अली यानी कॉम्रेड पत्राची यंत्रसामग्री, टाइप व इतर वस्तू या मोफत आम्हांला दिल्या आहेत हे वाचून वाचकांना आनंद होईल. अशा प्रकारे असहकारितेचा दुष्ट शक्तीबरोबर होणारा लढा (सरकार दुष्ट शक्तीचे प्रतिनिधी आहे असे मी मानतो) हा सुष्ट शक्तींच्या घनिष्ट सहकार्यावर अवलंबून आहे. असह-कारितेत कितीही दोष असले व मर्यादा असल्या तरीदेखील, ती सुष्ट शक्तींची प्रतिनिधी आहे असे मी समजतो.

फसव्या नकला

मद्रासहून एक मित्र लिहितात :

> शुद्ध खादीच्या म्हणजे हात सुताच्या आणि हात विणीच्या नावाखाली बाँबे स्वदेशी स्टोअर्स १० ते १५ आणे वारापर्यंत कसले कापड विकीत आहेत, त्या कापड्याच्या तुकड्याचा नमुना मी सोबत पाठवीत आहे. अशा लबाडीपासून माणसाचे रक्षण कसे व्हावे ? हा नमुना परदेशी कापडाचा आहे याबद्दल मला बिलकूल शंका नाही.

मी तो नमुना पाहिला आहे आणि तो हात सुताचा किंवा हात विणीचा नाही याबद्दल काहीच शंका नाही. जरी त्यात हिंदी सफाईऐवजी जपानी सफाई असली तरी तो हिंदी गिरण्यांत तयार झाला असण्याची शक्यता आहे. स्वदेशी भांडारात असला माल विकला जात आहे हे दुर्दैव आहे. पण अशा फसवेगिरीला आपण तयार असले पाहिजे. स्वदेशी वृत्ती वाढत आहे त्याचा हा बोलका पुरावा आहे. पण ह्या लबाड्या कशा हुडकाव्यात व थांबवाव्यात हा प्रश्न आहे. सोन्यासारखा नियम अर्थातच असा की, आपण आपले सूत कातावे आणि ते विणण्याकरिता आपल्या देखरेखीखाली एक विणकर ठेवावा. ती वेळ निसंःशय येत आहे. जेव्हा आपण स्वतःकरिता कातू शकत नसू, तेव्हा ते कताईचे काम साऱ्या देशात निर्माण होणाऱ्या कातणाऱ्यांच्याकडून करून घ्यावे. जेथे हे आपल्याला जमत नसेल तेथे आपली निवड करताना जे कापड गिरणीच्या कापडासारखे दिसत असेल ते टाकून दिले पाहिजे. जाड सुताच्या कापडाच्या बाबतीत आयात कापड आणि आपल्या गिरण्यांत तयार झालेले कापड यांच्यात भेदाभेद करणे अत्यंत कठीण आहे. हाताने कातलेल्या खादीत गिरण्यांची निर्जीव तुकतुकी नसते, ती दिसावयाला अधिक ओबडधोबड असते. तिला छिद्रे असतात, हाताला हलकी लागते व तिचा स्पर्श सुखदायक असतो. ती कधीही तुकतुकीत असत नाही. दुसरी खबरदारी मी सुचवितो, ती म्हणजे कापड बिनघुमट असावे. तिसरा पर्याय जो आहे तो धोक्यापासून मुक्त नाही, पण तो असा : प्रत्येक जिल्हा काँग्रेसमध्ये काँग्रेसने प्रमाणित केलेली स्वदेशी दुकाने असावीत आणि या प्रमाणित दुकानातील माल नेहमी तपासणारे तज्ज्ञ तपासणीस असावेत. शक्य तर प्रत्येक वस्तूवर शिक्का असावा. अशा प्रकारचे काम चोहोकडे हाती घेण्याइतके आम्ही संघटित आणि शिक्षित नाही, हे मला ठाऊक आहे. पण प्रत्येक जिल्हा स्वतःला लागणारी खादी तयार करीपर्यंत अशा प्रकारच्या तपासणीची निःसंशय जरुरी आहे आणि ज्याची प्रामाणिकपणे तरतूद केली जाईल, ते केले जावे.

लखनौची दूषित स्थळे

लखनौचे एक इंग्लिश मित्र लिहितात.

> लखनौमधील कुंटणखान्यांबद्दल तुमच्या पाठीराख्यांच्यापैकी जे कोणी अधिकारी असतील, त्यांच्याकडे जाण्यापूर्वी तुम्ही काही तरी लिहावे,

या उद्देशाने मी लिहीत आहे. अमिनाबादमधील एका लष्करी पोलिसाशी मी आज सकाळी बोलत होतो आणि त्यावरून असे दिसते की, त्या वस्तीत अशी ५० वेश्यागृहे आहेत की, ज्या गृहात युरोपियन व अँग्लो-इंडियन लष्करी शिपाई जात असतात. (ती वस्ती लष्करी हद्दीच्या बाहेर असल्यामुळे काही जणांवर लष्करी कोर्टापुढे खटले झाले.) तो हिंदी शिपायांबद्दल काही बोलला नाही; पण मी नुक्तेच ऐकले आहे की, हिंदी शिपाईसुद्धा ह्या वेश्यांकडे जातात. हे दुष्कृत्य थांबविण्याकरिता तुमच्या शब्दाचा इतर कशापेक्षाही जास्त उपयोग होईल. माणुसकीला हीन करणाऱ्या आणि आत्मसंयमाचा अभाव असणाऱ्या ह्या गोष्टीचा बंदोबस्त व्हावा. या गोष्टीत मला जी काय मदत देता येईल ती देण्याचे मी वचन देतो.

माझ्या शब्दात त्यांनी जी शक्ती आहे असे म्हटले आहे त्या इंग्लिश माणसाच्या विश्वासात मलाही सहभागी होता यावे अशी माझी इच्छा आहे. मी हा परिच्छेद लिहीत असताना कोकोनाडा येथे ज्या प्रिय भगिनी मला येऊन भेटल्या त्यांचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. मी त्यांच्या बेअब्रूची हकीकत ऐकल्यानंतर त्या मला अधिकच प्रिय वाटल्या. आपले जीवन काय आहे, ते त्या फक्त सूचक शब्दाने सांगू शकल्या. त्यांच्यातील मुख्य स्त्री माझ्याशी बोलत असताना तिच्या डोळ्यांत शरम आणि दुःख लिहिलेले दिसत होते. त्यांना गुन्हेगार म्हणण्याला माझी तयारी होईना. ह्या भेटीनंतर वैयक्तिक शुद्धतेच्या जरूरीवर मी माझ्या भाषणात भर दिला. म्हणून माझे अंतःकरण लखनौच्या पतित भगिनींकडे जाते. हे निर्लज्जपणाचे जीवन घालविणे त्यांना भाग पडले आहे. आवड म्हणून त्या त्या जीवनाकडे वळल्या नाहीत याचे मला समाधान वाटते. माणसात जो पशू आहे, त्याने ह्या तिरस्करणीय गुन्ह्याला किफायतशीर धंदा बनविले आहे. ऐषारामाच्या आवडीबद्दल लखनौ प्रसिद्ध आहे; पण लखनौ ही मुसलमान सत्पुरुषांचीही भूमी आहे. इस्लाममध्ये जे उदात्त आहे त्या सर्वांचा पुरावा लखनौला मिळाला आहे. ज्या प्रांतात निष्कलंक सीता आणि राम हे भ्रमण करीत होते आणि राज्य करीत होते त्या प्रांताची राजधानी लखनौ आहे असे हिंदूंना ठाऊक आहे. हिंदू शुचिता, भव्यता, शौर्य आणि सत्याबद्दल निश्चलता याच्या उत्तम काळाची लखनौ आठवण देते. असहकारिता म्हणजे आत्मशुद्धी आहे आणि जे असहकार करणारे आणि इतर जन आहेत त्यांना मी लखनौचा हा नैतिक प्लेग नाहीसा करा असे आग्रहाने सांगतो. लखनौच्या सत्कीर्तीचे जे रक्षक आहेत ते मला हिंदुस्थानातील इतर शहरांपेक्षा लखनौ अधिक वाईट नाही याची आठवण करून देणार नाहीत अशी आशा आहे. लखनौ ओघात उदाहरणादाखल आले. साऱ्या हिंदुस्थानात

स्त्रियांच्या शुद्धतेबद्दल आणि रक्षणाबद्दल आपण जबाबदार आहोत. मग लखनौनेच पुढाकार का घेऊ नये ?

'यंग इंडिया', १८-८-१९२१

२६८. खिलाफत

लखनौला मुसलमानांच्यामध्ये मला खिलाफतीसंबंधी स्वाभाविक अधिरता आढळली. मौलवी सलामत उल्ला हे जेव्हा म्हणाले की, ब्रिटिशांची वृत्ती असह्य होत आहे तेव्हा त्यांनी अंगोरा सरकारच्या स्थितीबद्दल लोकांच्या भावना सौम्य शब्दात व्यक्त केल्या. ब्रिटिशांनी तुर्कांच्या मित्रत्वाबद्दल ज्या घोषणा केल्या त्याबद्दल अविश्वास वाढत आहे यात शंका नाही. ब्रिटिशांच्या घोषणा ह्या खऱ्या आहेत किंवा ब्रिटिश सरकार मदत करण्यास शक्तिहीन आहे यावर कोणाचाही विश्वास बसत नाही. कॉंग्रेस व खिलाफत संघटनांनी अधिक जोमदार आणि अधिक ताबडतोबीचे उपाय योजावेत असे मुसलमान राग अनावर होऊन म्हणतात. खिलाफतीच्या प्रश्नासंबंधी हिंदुस्थानची परिणामकारक शक्ती असणे एवढाच मुसलमानांना स्वराज्याचा अर्थ समजतो आणि तो योग्य आहे. स्वराज्य मिळविण्याचा अर्थ जर बेसुमार उशीर असा असेल किंवा ज्या कार्यक्रमात हिंदी मुसलमानांना युरोपच्या समुद्रातून तुर्कस्थानचा निःपात होत असताना दुर्बलतेने पाहावे लागणार असेल तर मुसलमान वाट पाहण्यास तयार नाहीत.

ह्या प्रवृत्तीबद्दल सहानुभूती न वाटणे अशक्य आहे. जर मला एखादा परिणामकारक मार्ग सुचला असता तर मी ताबडतोब कृती करावी, अशी आनंदाने शिफारस केली असती. जर स्वराज्याची चळवळ लांबणीवर टाकून खिलाफतीचे हीत वृद्धिंगत करता आले असते तर मी ती चळवळ तहकूब करा असे आनंदाने सांगितले असते. लक्षावधी मुसलमानांना ज्या वेदना होत आहेत त्या शमविण्याकरिता असहकारितेच्या व्यतिरिक्त जर काही अन्य उपाय असते तर ते मी आनंदाने योजले असते.

पण माझ्या नम्र मताप्रमाणे खिलाफतीचा अन्याय दूर करण्याचा सर्वांत जलदीचा मार्ग कोणता असला तर स्वराज्य प्राप्त करून घेणे. म्हणून मला खिलाफतीचा प्रश्न सोडविणे म्हणजे स्वराज्य मिळविणे असे वाटते. आणि स्वराज्य मिळविणे म्हणजेच खिलाफतीचा प्रश्न सोडविणे. दुःखग्रस्त तुर्कांना मदत करण्याचा एकच मार्ग आहे आणि

तो म्हणजे हिंदुस्थानने आपले म्हणणे प्रभावी होण्याकरिता जरूर ती शक्ती निर्माण करणे हा होय. जर ही शक्ती योग्य काळात वाढविली नाही तर हिंदुस्थानला बाहेर पडण्याला दुसरा मार्ग नाही. आणि म्हणून त्याला दैवावर हवाला टाकावा लागेल. अर्धांगवायू झालेला माणूस शेजाऱ्याला मदत करण्याकरिता आपला हात कसा पुढे करू शकेल ? त्याने स्वतःच त्या रोगातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ अडाणीपणाने, अविचाराने आणि रागाने अत्याचाराचा स्फोट झाला तर कोंडून राहिलेला संताप बाहेर पडेल. पण त्याने तुर्कस्तानला मदत होणार नाही. त्याचप्रमाणे हिंदुस्थानची जोराने प्रतिपादन करण्याची शक्ती त्यामुळे वाढणार नाही आणि अत्याचार दडपून टाकण्याकरिता जे उपाय योजले जातील ते आपण ज्या वेगाने आपल्या ध्येयाकडे जात आहोत, तो वेग कमी करतील.

पण निराश होण्याचे काही कारण नाही. खिलाफतीच्या संकटाला तोंड देण्याकरिता सारा काँग्रेसचा कार्यक्रम आखण्यात आला आहे व त्याकरिताच उपाय योजले जात आहेत. जो दोन महिन्यांचा काळ स्वदेशीचे कार्य पुरे करण्याकरिता ठरविला आहे तेच कार्य राष्ट्रात सर्वोत्कृष्ट जे आहे ते प्रकट करण्यास अत्यंत प्रभावी असे साधन आहे. आणि जर हिंदुस्थान सप्टेंबर पर्यंत तो कार्यक्रम पुरा करू शकला आणि ऑक्टोबरात स्वावलंबी झाला तर अत्यंत आशावादी अत्यंत अधीर आणि कळकळीच्या खिलाफतवाल्यांचेसुद्धा त्याने समाधान झाल्याशिवाय राहणार नाही. मी स्वतःला तसा खिलाफतवादी समजतो.

वस्तुस्थिती अशी आहे की, ठरविलेल्या कालमर्यादेत स्वदेशीचा कार्यक्रम पुरा होऊ शकेल, अशी कार्यकर्त्यांची खात्री नाही आणि स्वदेशीचा परिणाम जो होईल असे जे म्हटले जाते, त्या शक्तीबद्दल त्यांना खात्री नाही. अशा संशयी लोकांनी बाहेर पडावे पण जर त्यांना अधिक चांगला आणि अधिक जलद उपाय सुचविता आला आणि देशाकडून तो स्वीकारून घेता आला तरचा प्रश्न वेगळा. त्यांना शंका असली तरी प्रामाणिकपणे त्यांनी स्वदेशीच्या कार्यात पडावे आणि या प्रयोगाला योग्य संधी द्यावी. हिंदुस्थानचा स्वदेशीचा कार्यक्रम पार पाडण्याच्या शक्तीविषयी जो संशय व्यक्त केला जात आहे तो जर संशय समर्थनीय असेल तर त्याने असे सिद्ध होत नाही का की, हिंदुस्थानला खिलाफतीच्या बाबतीत खरोखरच रस नाही किंवा खिलाफतीकरिता कसलाही त्याग करण्याची त्याला इच्छा नाही ? प्रत्येक हिंदू आणि मुसलमानाने सारे परदेशी कापड टाकून द्यावे आणि फक्त खादी वापरावी हा काय मोठा त्याग आहे ? आणि जर हिंदुस्थानात एवढीही पात्रता नसेल तर त्याने असे सिद्ध होणार नाही का की, हिंदुस्थान अधिक त्यागाला अपात्र आहे आणि म्हणून तुर्कस्तानला मदत करण्यास नालायक आहे ? आपण सर्वजण परदेशी कापडाच्या संपूर्ण बहिष्काराकरिता आणि आवश्यक ती खादी उत्पन्न करण्याकरिता झटू या आणि त्याने आपण स्वर्गाच्या दृष्टिपथात येऊ या.

लखनौला अशी एक सूचना गंभीरपणे करण्यात आली की, आपण रॅली ब्रदर्स ह्या ग्रीक कंपनीवर बहिष्कार घालावा आणि ग्रीकांच्यावर सूड उगवावा. त्याचप्रमाणे निर्यात होणाऱ्या मालावर काम करण्याचे नाकारावे म्हणून मजुरांना आवाहन करावे. मला वाटते या सूचना मूर्खपणाच्या आहेत, तितक्याच त्या अमलात आणणे अशक्य आहे. क्षणभर असे समजा की रॅली ब्रदर्सचा धंदा आपण एका क्षणात नष्ट करून टाकला तर त्याने ग्रीकांवर परिणाम काय होणार ? रॅली ब्रदर्स आपली सारी किंवा पुष्कळशी कणिक ग्रीसला पाठवीत नाही. त्यांचा जगभर व्यापार चालतो. त्यांच्या व्यापाराचा समाचार घेणे हे स्वदेशीपेक्षा अधिक कठीण आहे. अशा प्रयत्नात मूलभूत चूक आहे हे बाजूला ठेवले तरी त्यामुळे आपली खाशी थट्टा होईल. निर्यात माल भरण्याच्या कामावर असलेल्या मजुरांच्या कामात जर आपण हस्तक्षेप केला तर तो तितकाच विचित्र होईल. जर आपला आम जनतेवर पूर्ण ताबा असता तर आपण आपली लढाई मागेच जिंकली असती. मालाची निर्यात थांबविणे याकरिता सध्याच्या मजुरांनी कायमचे किंवा अनिश्चित कालपर्यंत काम थांबविले पाहिजे, एवढेच नव्हे तर जो मजूर काढून घेतला जाईल त्याच्या जागी दुसरा कोणीही येणार नाही, हेही थांबविण्याची शक्ती आमच्यात आहे असे गृहित धरले आहे. या कामाकरिता आपण पुरेसे संघटित झालेलो नाही. अशा कोणत्याही प्रयत्नाचा शेवट अपयशात होईल. त्यापेक्षा अधिक वाईट झाले नाही तर नशीब!

जर कोणती शक्य कोटीतील सूचना असेल तर ताबडतोब सविनय कायदेभंग हाती घेण्याची तो व्यापक प्रमाणावर सुरू करण्याची देशाची शक्ती नाही ही माझी खात्री आहे. तो कायदेभंग निर्भयपणे आणि यशस्वीरीतीने सुरू करावयाचा असेल तर देशाने पुरेशी संघटित शक्ती, चातुर्य आणि शिस्त ज्यांची जरूरी प्रामुख्याने व्यवहार्य असलेले स्वदेशीचे प्रयत्न यशस्वी करण्याकरिता लागतात ते दाखविले पाहिजेत. अशी आशा करू या आणि प्रार्थना करू या की देशात ते गुण येतील.

'यंग इंडिया', १८-८-१९२१

२६९. जहरी फौजदारी खटला

संयुक्त प्रांतातील माझ्या दौऱ्यात मला दडपशाहीच्या विलक्षण गोष्टी ऐकावयास सापडल्या. तूर्त मी दोनच अशा खटल्यांचा समाचार घेणार आहे. ते विषारी आहेत असे म्हणण्यास मला दिक्कत वाटत नाही. श्री. मोहनसिंह दरमाल आणि सितापूरचे जमीनदार आणि माजी तहशीलदार श्री. शंभुनाथ यांना समन्समध्ये दाखविलेल्या गुन्ह्यांबद्दल जामीन देण्यास का लावू नये, याची कारणे दाखविण्यास सांगितले :

> रामगडच्या पटवाऱ्याच्या रिपोर्टावरून ज्याअर्थी असे दिसते की, (१) रामगडचे मोहनसिंग. (२) बी. शंभूनाथ, माजी नायब तहसिलदार-सध्या वास्तव्य भोवाली आणि भुनयाद्यार हे सरकारविरोधी चळवळीत भाग घेत आहेत आणि टिळक स्वराज्य फंडाकरिता नोटा विकत आहेत आणि ज्याअर्थी कायद्याने प्रस्थापित झालेल्या सरकारविरुद्ध केलेल्या अशा चळवळीमुळे शांततेचा भंग होण्याची आणि सार्वजनिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता आहे त्याअर्थी वरील इसमांकडून वर्षभर शांतता आम्ही राखू अशांबद्दल १००० रुपयांचे जातमुचलके आणि प्रत्येकाकडून ५०० रुपयांचे जामीन का घेण्यात येऊ नयेत याची कारणे दाखविण्यास सांगण्यात येत आहेत.

समन्समध्ये गुन्हा काय हे दाखविले नाही, हे उघड दिसते. पण त्या परिस्थितीतला दुःखदायक विनोद हा पटवाऱ्याचा जबाब वाचल्यानंतर अधिकच वाढतो. त्या जबाबात असे म्हटले आहे की, आरोपींनी पंडित मोतीलाल नेहरू यांच्याजवळ जमविलेले पैसे दिले आणि ते आरोपी पंडित नेहरूंसारख्या कट्टर असहकारितावाद्याच्या संगतीत रामगडसारख्या हवा खाण्याच्या ठिकाणी सांपडले. हे खरे आहे की, मॅजिस्ट्रेटला ही सुसंगत गोष्ट नमूद करण्याचे धैर्य झाले नाही. पण दुसऱ्या आरोपीने आपल्या निवेदनात हे पुरेपूर दाखविले आहे की, मी पंडितजींच्या बरोबर होतो व त्यांची सेवा केली, हाच माझा मुख्य गुन्हा होता. आरोपी हा त्याच्या जिल्ह्यात सुप्रसिद्ध गृहस्थ आहे. त्याचप्रमाणे तो शेवटच्या अवस्थेतील क्षयरोगी आहे, हेही प्रसिद्ध आहे. त्याचे उजवे फुप्फुस हे जवळजवळ गेले आहे. दुसरे फुप्फुस आणि त्याची आतडी हीही अतिशय बिघडली आहेत. कित्येक महिन्यांत त्याने कोठल्याही राजकीय कामात भाग घेतला नव्हता. त्याने भाषणेही केली नव्हती. तो रामगडला पंडितजींप्रमाणे स्वतःची

प्रकृती सुधारण्याकरिता गेला होता. म्हणून आरोपीला पकडण्याकरिता मॅजिस्ट्रेटला काही एक कारण नव्हते. किंवा पकडल्यानंतर खटला चालविण्यालाही कारण नव्हते. खरी गोष्ट अशी आहे की, मॅजिस्ट्रेटला उबड उबड असे वाटत होते की, ज्यांचा वर्गणी गोळा करण्याइतका किंवा खेड्यांत असहकारितेला मदत करण्याइतका, असहकारितेशी कसलाही संबंध असेल त्यांना दहशत घालावी. असेही सांगितले जाईल की, अशा गोष्टी या खरोखरच अपवाद असतात व त्यांना फाजील महत्त्व देऊ नये. असला सिद्धांत मला मान्य करणे शक्य नाही. वर दिलेल्या उदाहरणावरून मॅजिस्ट्रेटसाहेबांनी वागण्याची एखादी नवीन पद्धत शोधून काढली असेल, पण मी जे संयुक्त प्रांताचे निरीक्षण केले आहे, त्यावरून मला असा निष्कर्ष काढणे भाग पडते की, संयुक्त प्रांतात एक सूक्ष्म प्रकारचा दहशतवाद चालू आहे. असला दहशतवाद सिंधखेरीज इतर कोठेही चालू नाही. त्या दहशतीचा उद्देश असहकारितेच्या चळवळी माराव्यात, मग त्या चळवळी कितीही अनत्याचारी असोत किंवा अन्यप्रकारे निरुपद्रवी असोत. अलीबंधूंनी जे पश्चात्तापाचे निवेदन केले, त्याचाही निर्लज्जपणे उपयोग करण्यात येत आहे. त्याचा उपयोग करणाऱ्यांना बंधूंच्या माफीची पद्धत व प्रकार माहीत आहे. पण त्यांच्यादृष्टीने असहकारितावाद्यांना वाकविण्याकरिता आणि इतरांना त्यांच्या मार्गापासून परावृत्त करण्याकरिता शौर्याच्या कृत्याचा विपर्यास करणे, ही गोष्ट ज्या दुष्टपणाचा आश्रय ते घेत असतात, त्यातील कमीत कमी दुष्टपणाची आहे. माझी पुरी खात्री झाली आहे की, जे फार गरीब लोक असहकारितेची पताका घेण्यास धजतात त्यांचा छळ केला जातो. त्यात उद्देश असा असतो की, त्यांनी काँग्रेस कमिटीत जाऊ नये. अशा लोकांना तितक्याच अप्रस्तुत मार्गाने तथाकथित शांतता संवर्धक संघटनांत सामील होण्यास भाग पाडले जाते. त्या संघटना खरोखर बेबंदशाही प्रकारच्या असतात. याचा अर्थ असा की, त्या संघटनांची वाढ होण्याकरिता ज्या पद्धतींचा वापर केला जातो, त्या बेकायदा व अनैतिक असतात. सर मायकेल ओडवायरच्या सरकारने जे प्रामाणिकपणे व बिनदिक्कतपणे केले, तेच संयुक्त प्रांताचे सरकार अधिक हुषारीने व भेकडपणाने करीत आहे. ओडवायर यांनी आपल्या धोरणाशी सयुक्तिकपणे वर्तन केले व सर्व पुढाऱ्यांना पकडण्याचे धैर्य दाखविले व त्यांना अशाप्रकारे जालियनवाला बागेकरिता वातावरण निर्माण करावयाचे होते.

मी दुसऱ्या एका ठिकाणी लोकांचे लक्ष याकडे वेधविले की, लष्करभरतीच्या काळात पंजाबमध्ये जालियनवाला बागेपेक्षाही अधिक भयंकर दुःखदायक गोष्टी करण्यात आल्या होत्या. पण पुढाऱ्यांना पकडले नसल्यामुळे त्या गोष्टी नजरेतून निसटल्या. शेरवानीसारखी तुरळक उदाहरणे सोडली तर संयुक्त प्रांताचे सरकार पहिल्या दर्जाच्या पुढाऱ्यांना पकडणार नाही. त्यांनी रंगा अय्यर यांना पकडले आहे. त्यांनी अद्याप पंडित जवाहरलाल नेहरू किंवा मि. जोसेफ यांना हात लावला नाही. त्या तिघांनीही एकाच वेळी आव्हान दिले होते. तरी पण सरकारने त्यांना काही केले नाही. संयुक्त प्रांतात मी पाहिलेल्या

गोष्टींचा निष्कर्ष लेखबद्ध करण्याचे परिश्रम मी एवढ्याचकरिता घेतले की, मी मि. चिंतामणी यांचे आपल्या सरकारचा जोरदारपणे बचाव करणारे भाषण पाहिले. दुसरे कारण असे की, जे मंत्री जवळजवळ संपूर्ण जबाबदारीचे सरकार असणाऱ्या सुधारणा राबवीत आहेत, त्यांना मी उत्तेजन द्यावे, असा मला आग्रह करण्यात आला होता. माझ्या नम्र मताप्रमाणे या सुधारणा आणि सुधारणा-मंत्री यांचा उपयोग शक्य तेथे हुषार पण उलट्या काळजाच्या नोकरशाहीला टिकविण्यासाठी केला जात आहे. मंत्र्यांना या गोष्टीची जाणीव नाही किंवा अनिच्छेने ते साधने बनतात. यामुळे धोरणातील दुष्टपणा कमी होत नाही. पण अर्थातच ही मंत्र्यांच्या बाजूची एक दुष्टपणा सौम्य करणारी परिस्थिती आहे. महमुदाबादचे राजेसाहेब आणि मि. चिंतामणी यांना आपण काय करीत आहोत, हे ठाऊक आहे या गोष्टीवर माझा विश्वास बसत नाही. मला असे वाटते की, ते बळजबरीने नोकरशाहीच्या जाळ्यात खेचले जात आहेत. आणि ज्या दिखाऊ गोष्टी त्यांच्यापुढे मांडल्या जातात त्या गोष्टींचा अन्य परिस्थितीत त्यांनी बिन-दिक्कत धिक्कार केला असता तरी त्या गोष्टी ते क्षम्य मानीत आहेत. पूर्वं बदाऊनच्या हंगामी मुनसरीमने ज्या आपल्या मुलावर १४४ कलमाखाली नोटीस बजावली गेली होती, त्याच्याकडून राजनिष्ठेची लेखी घोषणा हजर करण्यात चूक केल्यामुळे, जिल्हा न्यायाधिशाने त्याला नोकरीवरून तात्पुरते काढले, या गोष्टीचा बचाव महमुदाबादच्या राजेसाहेबांनी केल्याचे इंडिपेंडंटने म्हटले आहे. १० मे रोजी त्याला नोकरीवरून तात्पुरते कमी केले. व आवश्यक ती घोषणा हजर करीपर्यंत त्याला तसे करण्यात आल्याचे कळविले. मुलगा बापाजवळ राहात होता, हे उघडच आहे. त्याचा परिणाम असा झाला की, बापाने ६ जून रोजी अमानसभेत सामील होण्याचा मुलाचा अर्ज हजर केला आणि आपल्या मुलाचे कृतिस्वातंत्र्य विकून स्वतःची नोकरी पुन्हा मिळविली. जर आपण या देखाव्याच्या मागे डोकावू शकलो असतो तर आपल्याला बहुतकरून त्या गरीब मुनासरीमच्या तात्पुरत्या बडतर्फीचे समर्थन करणारे गुप्त कागदपत्र सापडले असते. पण ते कसे का असेना, आपल्यापुढे ही विषण्ण करणारी गोष्ट आहे की, सरकारी नोकरांनी आपली मुले असहकारितेच्या चळवळीतून काढून घेण्याकरिता त्यांच्यावर सक्ती करावी म्हणून सरकारी दडपण आणले जात आहे. ३ वर्षांपूर्वी ह्याच राजेसाहेबांनी अधि-काऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या ह्या दुष्टपणे केलेल्या नीतिभ्रष्टतेविरुद्ध माझ्या-पेक्षाही अधिक जोरदारपणे लिहिले असते व भाषण केले असते, याबद्दल मला शंका नाही. मंत्र्यांच्या उलट्या काळजाच्या लोकांकडून हस्तक म्हणून जो उपयोग करून घेतला जात आहे, त्याकडे लक्ष वेधण्याऐवजी अधिक महत्त्वाची गोष्ट जर कोणती असेल तर ती ही की, येथे ज्या बेकायदेशीरपणाचा व अनीतिमत्तेचा उल्लेख करण्यात आला आहे, त्यामुळे असहकारितावाद्यांनी आपले धैर्य खचू देऊ नये. त्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, असलीच काय पण याहीपेक्षा अधिक दडपशाहीची अपेक्षा आपण केली पाहिजे. आणि साऱ्या जगातल्या सुधारकांच्या नशिबाला हे येत असते, असे

मानून दडपशाहीचा आनंदाने स्वीकार केला पाहिजे. जे छळ करणारे असतात, त्यांना असे वाटत असते की, आम्ही चुकत आहोत, आम्ही देशाचा घात करीत आहोत आणि जोपर्यंत आम्ही हाती घेतलेली चळवळ चिरडून टाकली जात नाही, तोपर्यंत साधनांचा प्रश्नच नाही. याकरिता आपण दडपशाही हे विजयाचे पूर्वचिन्ह आहे, असे मानले पाहिजे. तिचे स्वागत केले पाहिजे आणि आपला निश्चय दृढ करण्याकरिता तिचा उपयोग केला पाहिजे.

'यंग इंडिया', १८-८-१९२१

२७०. चुकीची कबुली

मी किती वेळा चुका केल्या असतील हे देवालाच ठाऊक. मी चूक करणार नाही असा जे माझ्यावर आरोप करतात, त्यांना मी कळतच नाही. माझ्या स्वतःच्या अनुभवाने जीवन हा प्रमादांविरुद्ध झगडा आहे, ही गोष्ट समजून घेण्यास आणि जाणण्यास नम्र असले पाहिजे एवढेच मला शिकविले आहे. १९१९ साली मी जेव्हा उल्हासित वृत्तीने सविनय कायदेभंग सुरू केला तेव्हा मी भयंकर चूक केली असे मला दिसून आले. नडियादला जेव्हा दूरदर्शीपणाचा अभाव मला दिसला तेव्हा मी त्याला हिमालयाएवढी चूक म्हटले. ती अतिशयोक्ती नव्हती. त्यामुळे हिंदुस्थानची नैतिक उंची कमी झाली नसली तर त्याला कारण स्वच्छ आणि पूर्ण कबुली देण्यातला माझा शहाणपणा. ह्या काही आठवड्यांत जे आपण स्वदेशीचे काम एकतानतेने करीत आहोत, त्यासंबंधी मला आणखी एक अशीच कबुली द्यावयाची आहे.

विद्यार्थ्यांशी आणि प्राध्यापकांशी झालेल्या संभाषणात मी ही कबुली आधीच दिली आहे. पण माझ्या मानसिक शांतीकरिता व सध्याच्या प्रचाराकरिता अधिक स्पष्ट आणि अधिक जाहीर कबुली देणे तितकेच जरूरीचे आहे. सरकारी शिक्षणसंस्थांवरील बहिष्कार हा बरोबर होता, असे निश्चितपणे ९ महिन्यांच्या अनुभवावरून प्रत्ययास आले आहे. पण जो पर्याय सुचविला गेला त्यात मी दुर्बळ ठरलो. आणि मी दुर्बळ ठरलो याचे कारण लोकांची खात्री पटविण्याची शक्ती आपल्यात नाही. हा स्वतःवरील अविश्वास मी फळाची अपेक्षा देवावर सोपविण्याऐवजी त्याची चिंता करीत बसलो. आणि म्हणून मी माझ्या दुर्बलतेत मुलांना म्हणालो की, तुम्ही स्वराज्य स्थापन होईपर्यंत रस्त्यांतून हिंडा, तोच अभ्यास करा किंवा सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे सूत कातीत बसा. नागपूर-कॉंग्रेस

ठरावानंतर लौकरच मला असे दिसले की, निरनिराळे पर्याय सांगण्याची मी चूक केली आहे. पण चूक अगोदरच होऊन गेली होती. गेल्या सप्टेंबरात ती सुरू झाली. जानेवारीत मी मागे पाऊल घेऊ लागलो. पण दुरुस्ती म्हणजे ठिगळ लावणे असते. आणि म्हणून बहुतेक असहकारितेच्या शाळांतून चरखा म्हणजे एक कमी अधिक प्रमाणात बांडगूळ किंवा रिकामपणाचा खेळ झाला आहे. मी सारे सत्य निर्भयपणे सांगावयास पाहिजे होते. आणि हातकताई व हातविणाई हा शिक्षणसंस्थांवरील बहिष्काराच्या सिद्धांताचा एक अविभाज्य भाग असे सुचवावयास पाहिजे होते. हे खरे आहे की, कदाचित फार कमी विद्यार्थी बाहेर आले असते. पण ज्या हजारो विद्यार्थ्यांनी पर्यायाच्या स्पष्ट कल्पनेच्या आभावी शाळा-कॉलेजे सोडली त्यांच्यापेक्षा या कमी प्रमाणातल्या विद्यार्थ्यांनी फार मोठे काम केले असते. ते आतापर्यंत हातकताईत आणि हातविणाईत चांगले तज्ज्ञ झाले असते आणि आपले स्वदेशीचे काम फार सोपे झाले असते.

मला हे ठाऊक आहे की, असहकारी शाळांतील विद्यार्थी व प्राध्यापक हे उत्तम काम करीत आहेत. पण हे कबूल केले पाहिजे की, ते मोठ्या अडचणींशी झगडत आहेत; पण त्यांची सर्वसामान्यपणे हातकताईच्या स्वदेशीबद्दल खात्री पटून ते बाहेर पडले नव्हते. त्यांनी या प्रश्नांचा विचार स्वतःच्या हक्कानुसार शैक्षणिक दृष्टि-कोणातून केला. सरकारी शिक्षणसंस्थांतुन बाहेर पडून त्यांनी सरकारची प्रतिष्ठा कमी केली एवढे त्यांना पुरेसे होते; पण त्यांचा बहिष्कार पूर्ण होण्याकरिता सूत व खादीची उत्पत्तीही त्यात येते, हे त्यांना सांगणे आणि शिक्षणाच्या नव्या पद्धतीचे स्वराज्यप्रकारचे प्राथमिक प्रशिक्षण घेणे याचा अर्थ युद्धकालात हातकताई आणि कापड तयार करण्याच्या इतर प्रक्रिया शिकणे व प्रत्यक्ष उत्पादन करणे असे त्यांना आता सांगणे म्हणजे त्यांच्यावर निष्ठुरपणा करणे आहे; पण आता चूक होऊन गेल्यानंतर निदान मी तरी दंड दिला पाहिजे. तो दंड म्हणजे शंकित लोक आहेत त्यांची मी सावकाशपणे खात्री पटविण्याचा प्रयत्न करणे. ती खात्री अशाकरिता की, असहकारितेत शिक्षणाच्या बाबती-तला हातकताई हा आवश्यक भाग आहे; यावर मी भर दिला असता तर अधिक बरे झाले असते. जे माझ्या या विचारांशी सहमत आहेत त्यांनी ती चूक ताबडतोब दुरुस्त करावी आणि ज्या राष्ट्रीय संस्थांवर त्यांचे वजन आहे त्या संस्थांत सूत व खादी-उत्पा-दनाचे काम त्यांनी कळकळीने हाती घ्यावे. माझ्याकडे शिक्षक पुरविण्याची मागणी त्यांनी करू नये. माझ्याकडे अगदी थोडे शिक्षक आहेत; पण त्यांच्याकरिता जो गाठीचा कापूस आपल्याला सध्या मिळतो त्याच्या निरनिराळ्या क्रिया कोणत्या असतात हे मी येथे लिहून ठेवतो. प्रथम तो पिंजला पाहिजे. हिंदुस्थानात असा जिल्हा नाही की, जेथे पिंजारी किंवा धुनिया नाहीत. त्यांना पिंजता येईल आणि एक दोन दिवस त्यांचे पिंजण-काम पाहून कोणालाही हे काम समजू शकेल. दररोज ६ तासांप्रमाणे सवय केल्यास कोणालाही बऱ्यापैकी पिंजणकाम करता येईल.

पिंजलेल्या कापसाचे पेळू करणे हे अतिशय सोपे आणि सहज करता येण्यासारखे आहे.

आता कापूस कताई करण्याकरिता तयार झाला. ती कताई कोणाही कातणाऱ्याकडून शिकता येईल. सूत हे खरे सूत असावयास पाहिजे असेल तर त्यात केरकचरा असता कामा नये. ते सारखे व चांगल्या पिळाचे असले पाहिजे. जर चांगला पीळ नसेल किंवा सूत सारखे नसेल तर ते विणता येणार नाही.

याची पुढील क्रिया पांजण. त्याची सवय होणे जरा कठीण आहे. त्याकरिता लागणारा माल किती प्रमाणात असावा याचा शास्त्रीय पाठ मजजवळ नाही. ती क्रिया अनुभवी कोष्टयाकडूनच शिकली पाहिजे.

सूत जोडणे हीहि क्रिया स्वतंत्रपणे शिकली पाहिजे. सायकल चालविण्याप्रमाणे तिला थोडीशी खुबी लागते व ती सहज अंगवळणी पडते.

शेवटी विणकाम येते. तो केवळ सवयीचा प्रश्न आहे. त्यांतील तत्त्व एका दिवसात शिकता येते. मी या ज्या निरनिराळ्या क्रिया सांगितल्या त्या सुलभतेने शिकता येतात याबद्दल वाचकांनी आश्चर्यचकित होऊ नये. सर्व स्वाभाविक व आवश्यक काम सोपे असते. त्यात निष्णात होण्यास सवय लागते व कष्टाची जरूरी असते. कष्ट करण्याची पात्रता म्हणजेच स्वराज्य. तोच योग आहे. त्यात कंटाळवाणेपणा आहे याला वाचकाने घाबरू नये. कंटाळवाणेपणा सृष्टीचा नियम आहे. सूर्य नेहमी तसाच उगवतो तिकडे पाहा. जर सूर्य हा लहरी बनला आणि निरनिराळे खेळ खेळू लागला तर सृष्टीवर काय आपत्ती कोसळेल याची कल्पना करा. कंटाळवाणेपणा हा मारकही असतो आणि तारकही असतो. आवश्यक व्यवसायातील कंटाळवाणेपणा हा उल्हसित करतो व नवजीवन देतो. कलाकाराला आपल्या कलेचा कधीही कंटाळा येत नाही. ज्या कातणाऱ्याने आपल्या कलेवर प्रभुत्व मिळविले आहे तो न थकता हे सातत्याचे काम खात्रीने करू शकेल. चातीभोवती एक संगीत निर्माण होते व ते कसलेल्या कातणाऱ्याचे लक्ष न चुकता आकर्षित करते आणि जेव्हा हिंदुस्थान एकसारखे काम करून स्वराज्य निर्माण करील, त्या वेळी तो एका सौंदर्याच्या वस्तूची उत्पत्ती करील व ती सतत आनंददायक होईल; पण ती गोष्ट चरख्याशिवाय होणार नाही. म्हणून हिंदुस्थानला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय शिक्षण जर कोणते हवे असेल तर बुद्धिकौशल्याने चरखा चालविणे हे होय.

‘ यंग इंडिया ’, १८-८-१९२१

२७१. देवदास गांधीला पत्र

आसाम,
गुरुवार [ऑगस्ट १८, १९२१][1]

चि. देवदास,

माझी इच्छा तू तेथेच राहात जावे अशी आहे. तेथे तुला कित्येक गोष्टी अनुभवावरून शिकावयाच्या आहेत–यंग इंडिया, हिंदी आणि गुजराती नवजीवन. तुला हिंदी विभागात पुष्कळ काम करता येईल. शिवाय तू बाला मानसिक शांती देऊ शकशील. त्याशिवाय जर तुला रस घेता आला तर पिंजण आणि कताई आहेच. लहानसहान मधून मधून उठणाऱ्या कटकटीमुळे ज्या जखमा होतात त्याही तू एक वैद्य म्हणून बऱ्या करू शकशील. म्हणून मला वाटते की, निदान हा महिना तू तेथे काढावास व फायदा करून घ्यावास. आता आमची ब्रह्मपुत्रा ओलांडण्याची वेळ आली आहे. त्यापूर्वी पत्रे पोस्टात टाकण्याकरिता तयार झाली पाहिजेत. म्हणून मी अधिक लिहीत नाही. हरिलाल बरोबर मी पुष्कळ बोललो. त्यांनी मला सांगितले की या महिन्याच्या सुरुवातीपासून तोही खादी टोपी वापरू लागला आहे.

बापूचे आशीर्वाद

मूळ गुजराती फोटोस्टॅटवरून; एस्. एन्. ७६३१

२७२. "हिंदी नवजीवन"

हिंदी भाषेत नवजीवन काढण्याच्या अडचणींची जरी मला कल्पना असली तरी मित्रांचा आग्रह आणि सहकाऱ्यांचा उत्साह यामुळे हिंदी नवजीवन काढण्यास मी

१. ऑगस्ट १७ ला गांधीजी कलकत्त्याला होते आणि १९ ला गौहत्तीला होते. त्यांनी ता. १८ गुरुवार रोजी ब्रह्मपुत्रा पार केली.

प्रवृत्त झालो. माझ्या विचारांविषयी मला प्रेम आहे. त्या विचारांचे अनुकरण करून लोकांचा पुष्कळ फायदा होईल ही माझी खात्री आहे. म्हणून ते विचार हिंदीमध्ये मांडण्याची इच्छा दीर्घकाल मी मनात बाळगली होती. पण ती इच्छा पुरी व्हावी अशी आतापर्यंत ईश्वरी इच्छा नव्हती. हिंदुस्थानी ही भारताची राष्ट्रीय भाषा व्हावी म्हणून मी सतत प्रयत्न करीत आलो आहे. हिंदुस्थानीशिवाय कोठलीही भाषा राष्ट्रभाषा होऊ शकणार नाही यात शंकाच नाही. जी भाषा कोट्यवधी हिंदू व मुसलमान बोलतात तीच भाषा साऱ्या देशाकरिता समान भाषा होऊ शकेल आणि ह्या भाषेत जोपर्यंत नवजीवन निघत नव्हते तोपर्यंत मी दुःखी होतो.

हिंदुस्थानीचे प्रेम असणाऱ्या लोकांना मी असा इषारा देतो की, त्यांनी हिंदी नवजीवनमध्ये भाषा सौंदर्याची अपेक्षा करू नये. या पत्रात ' नवजीवन ' आणि ' यंग इंडिया ' यांतील भाषांतरेच देणे शक्य होईल. हिंदुस्थानीत लेख वगैरे लिहिण्याला मला वेळ नाही व माझ्यात पात्रताही नाही.

हिंदुस्थानीचा प्रचार करणे हा ह्या प्रयत्नामागील मुख्य उद्देश नाही. त्याचा उद्देश मुख्यतः अनत्याचारी असहकारितेचा प्रचार करणे हा आहे. जोपर्यंत हिंदुस्थानी बोलणाऱ्या लोकांनी अनत्याचार आणि असहकारिता यांचा सिद्धांत पूर्णपणे ग्रहण केला नाही तोपर्यंत अनत्याचारी असहकारिता यशस्वी होणे जवळजवळ अशक्य आहे. म्हणूनच हिंदी नवजीवन हे जरूरीचे आहे. ज्यांना फक्त हिंदुस्थानी समजते त्यांना हिंदी ' नवजीवन ' साहाय्यकारक होवो अशी माझी परमेश्वराला प्रार्थना आहे.

[हिंदीवरून]
' हिंदी नवजीवन ', १९-८-१९२१

२७३. मारवाड्यांना पत्र

प्रिय बंधुभगिनींनो,

तुमचे जे माझ्यावर प्रेम आहे त्याने प्रेरित होऊन मी ' हिंदी नवजीवन ' काढण्याचे धाडस करीत आहे. मी हिंदुस्थानात परत आल्यापासून तुमच्या अधिक अधिक जवळ येत आहे. तुम्ही माझ्या चळवळींचे लाड पुरविलेत आणि तुम्ही मला पुष्कळच मदत केलीत. हिंदी प्रचाराच्या चळवळीला तुम्ही परिणामकारक पाठिंबा दिलात. तुम्ही दिलेल्या

मदतीमुळेच मुख्यत्वे हिंदी प्रसाराचे काम द्राविड प्रांतात इतके चांगले चालले आहे. तुम्ही बंधुभगिनी असहकारितेचे उपासक आहात. राष्ट्रीय जीवनात तुम्ही रस घेता. धनिक स्त्री-पुरुष राष्ट्रीय जीवनापासून अलग राहू शकत नाहीत हे तुम्हांला पटले आहे.

तुम्हांला धर्माविषयी प्रेम आहे. धर्माकरिता तुम्ही लक्षावधी रुपये दान करता. तुमच्यात धैर्यही आहे. संपत्तीसंग्रहात तुमचा क्रमांक पहिला आहे. सध्या हिंदुस्थानात जी पुण्यकारक लढाई चालू आहे, त्या लढाईत जर श्रीमंत लोक बाजूला राहिले तर यश मिळण्याची शक्यता फार कमी आहे.

स्वराज्यप्राप्तिकरिता अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीने जे पाऊल उचलले आहे, त्यात संपूर्ण यश मिळणे हे तुमच्याकडून येणाऱ्या मदतीवर अवलंबून राहील. कॉंग्रेसने असे ठरविले आहे की, ३० सप्टेंबरपर्यंत परदेशी कापडाचा बहिष्कार पुरा झाला पाहिजे. मी जेव्हा ३० सप्टेंबर ही तारीख सुचविली तेव्हा मी तुमच्यावर अवलंबून होतो. ही राष्ट्रीय मोहीम तीव्र करण्याकरिता ‘ हिंदी नवजीवन ’ प्रसिद्ध करणे हे अगदी योग्य आहे.

आज आपण जे राष्ट्रीय जीवनात पाहातो, ते म्हणजे व्यापारी दृष्टी आणि गुलामी मनोवृत्ती. शहाणपणा आणि पराक्रमाची तेथे उणीव दिसते. आपल्या व्यापारी समाजाकरिता आणि गुलाम समाजाकरिता शहाणपणा आणि पराक्रम संपादन करण्याची आता आवश्यकता आहे. आपला देश जो चिरडला गेला आहे, तो परदेशी कापडाच्या व्यापारामुळे हे आपण समजून घेतले पाहिजे. तो व्यापार सोडून देण्याचे धैर्य आपल्यात असले पाहिजे. हा व्यापार सोडून देण्याला आवश्यक असणारे हे थोडेसे धैर्य देखील आपल्यात नसेल तर आपण आपल्या धर्माप्रमाणे आचरण करू शकणार नाही. आपल्या बंधुभगिनींचे नुकसान करून कोट्यवधी रुपयांच्या राशी जमविल्या व धर्मादायाकरिता थोडे लाख रुपये दिले तर त्यात पुण्य नाही. म्हणून माझी तुम्हा बंधुभगिनींना अशी प्रार्थना आहे की, तुम्ही परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याचे आता थोडेसे धैर्य दाखवून आणि खादी निर्माण करून पूर्वीच्या तुमच्या सेवेत भर घाला.

तुमचा
मोहनदास करमचंद गांधी

[हिंदीवरून]
‘ हिंदी नवजीवन ’, १९-८-१९२१

परिशिष्टे

परिशिष्ट १

अहमद हुसेन यांचे " यंग इंडिया "ला पत्र

बरेली,
एप्रिल १५, १९२१

संपादक यंग इंडिया यांस,

महाशय,

मौलाना महमद अली यांनी मद्रास प्रांतात जाहीर सभेत असे सांगितले की, जर अफगाणिस्तानचा अमीर हिंदुस्थानवर ज्या लोकांनी इस्लामला नामर्द बनविले आणि ज्यांनी आमची पवित्र स्थाने अन्यायाने बळकावली त्यांच्याविरुद्ध चाल करून आला तर ते त्याला मदत करतील असे म्हटल्याचे तुम्हांला ठाऊक आहे. मला असे वाटते या प्रश्नासंबंधी हिंदुस्थानात मतभिन्नता आहे. अशी कोणतीही चळवळ चिरडण्याचा नेमस्तांचा निश्चय आहे. लाला लजपतराय, सी. आर. दास आणि मालवीय अशा राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनी देखील आपल्या मनातले सांगितले नाही. एवढेच काय, तुम्ही या महत्त्वाच्या भाषणाकडे लक्ष दिले नाही. बादशहांच्या शत्रूबद्दल सहानुभूती दाखविणे आणि उघड मदत करणे, हा भयंकर राजद्रोह असू शकेल. पण सध्याच्या स्पष्टपणाच्या आणि मनमोकळ्या भाषण करण्याच्या दिवसात कोणालाही पुढाऱ्यांचा निर्णय ऐकण्याची उत्कंठा असते. हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. माझ्यासारख्या जाहीरपणे लिहिणाऱ्या लेखकाला मत बनविणारे गोंधळाचे वाटते.

जो दुसरा मुद्दा तुमच्यापुढे मांडावयाचा आहे तो असा : तुमची अशी कल्पना आहे का, जे कोणी ईश्वराला भिणारे असतील किंवा एकाच देवावर विश्वास ठेवणारे असतील त्यांनीच असहकारितावादी व्हावे. माझा एक मित्र बुद्धीवादी आहे व तो पक्का राष्ट्रवादी आहे. पण देवाच्या

कृपेने मी कट्टर मुसलमान आहे. तो मित्र मातृभूमीच्या वेदीवर सर्वस्व समर्पण करायला, आणि दुर्बल राष्ट्रांना न्याय मिळवून देण्याला तयार आहे. पण तो देवाचेच अस्तित्व अमान्य करीत असल्यामुळे त्याच्याजवळ देवाला समर्पण करायला काहीही नाही. माझा मित्र खादी वापरण्याला तयार आहे व तशी सुरुवातही त्याने केली आहे. तो टिळक महाराजांचा चाहता आहे. आणि त्या फंडात तो नेहमी मुक्तहस्ताने भर घालीत असतो. पण तो असहकारितावादी आहे का ? तुमच्या यादीत त्याला स्थान आहे का ? जर तो इतर आवश्यक बाबतीत कमी पडत नसला तर त्याला तुमच्या आश्रमात स्थान मिळेल का ? तिसरी अडचण अशी आहे की, तुम्ही ह्या सैतानी सरकारचे सभासद असणे पापी मानता. पण असे असूनही त्या नोकरीत आणि त्या संस्थात काम करीत असलेल्या तुमच्या अनेक देशबांधवांचे अस्तित्व तुम्ही सहन करीत असता. तुम्ही तुमच्या गोटात त्यांना आताच बोलावीत नाही हे समर्थनीय आहे काय ? जर सध्याच्या सरकारात नोकरी न करणे, हा सामाजिक किंवा धार्मिक गुन्हा असेल व तो आहे असे मला वाटते तर तुम्ही त्यांना तेथे का राहू देता ? धर्माच्या, आत्मशुद्धीच्या आणि स्वावलंबनाच्या तात्कालीक फायद्यांना काही स्थान आहे का ?

आणि शेवटी " एका वर्षात स्वराज्य ", ह्या तुमच्या म्हणण्याला अर्थ काय ? त्याचा अर्थ असा आहे का की, येत्या काँग्रेस अधिवेशनात हे राष्ट्र आम्ही स्वतंत्र झालो आहोत आणि ब्रिटिश साम्राज्यातून बाहेर पडणार आहोत असे जाहीर करणार आहे ? किंवा त्याचा अर्थ फक्त स्वातंत्र्याची जाणीव, स्वदेशीचा स्वीकार आणि शाळा व कोर्टे यांच्यावरील अंशतः बहिष्कार म्हणजे हिंदचे अंतर्गत स्वराज्य असा आहे ? जर आपली बहिष्काराची चळवळ फसली, परमेश्वर तसे न करो, तर त्याचा अर्थ असा करावयाचा का की, ज्यांना आपला अभ्यास किंवा वकिली वर्षभर सोडावयास सांगितले होते त्यांनी या निषिद्ध संस्थांत पुन्हा जावे ?

तुमचा इत्यादी
अहमद हुसेन

' यंग इंडिया ', ४-५-१९२१

परिशिष्ट २

दुष्काळ निवारण्याकरिता कताई

१९२० च्या ऑगस्ट महिन्यात दुष्काळाची तीव्रता जाणवू लागल्यावर मध्यमवर्गीय प्रतिष्ठित कुटुंबात दुष्काळ निवारण्याकरिता चरखा सुरू करावा अशी कल्पना निघाली. आणि मिस् लॅथम यांनी कामाला सुरुवात म्हणून एक चरखा मेहेरबानीदाखल दिला. धनगरांना लोकर कातता येते म्हणून विशेषतः त्यांच्यात हे काम सुरू करण्याचे प्रयत्न झाले. पण ते निष्फळ ठरले. ज्या खेड्याला कताईची कल्पना नव्हती, तेथे कापसाचा बारीक धागा काढणे, ही गोष्ट अशक्यच वाटली. त्याचप्रमाणे जर हे काम हाती घेतले तर ते लाभदायक किंवा निदान साहाय्यकारक होईल का, अशाविषयी शंका व्यक्त केल्या गेल्या. अशा निरनिराळ्या अडचणींत आणि हरकतीत तीन महिने चरखा रिकामा पडून राहिला. आणि जोरदार प्रयत्न करूनही कोणीही ते काम हाती घेण्यास तयार होईना. १९२० च्या डिसेंबरात मिस. लॅथम यांनी मिसेस जे. पेटिट यांच्या कृपेने आणखी चार चारखे व कापूस पाठविला. निरनिराळ्या लोकांना ते प्रयोगादाखल दिले गेले. थोडीशी आशादायक चिन्हे दिसू लागली आणि शेवटी एका रामोशी स्त्रीचे हे काम मनापासून हाती घेण्याकरिता मन वळविले गेले. २० जानेवारी १९२१ ची ही गोष्ट आहे आणि तेव्हापासून ह्या कामाला निराळे स्वरूप आले. ह्या स्त्रीचा कित्ता आणखी दोन स्त्रियांनी गिरविला व त्यांनी ते काम हाती घेतले. ह्या तिघी कातणारांनी दीर्घोद्योग करून ४ पौंडांचे सूत काढले. आणि ते विक्रीकरिता पाठविले. दरम्यान पुष्कळ स्त्रिया चौकशी करू लागल्या व आपल्याला थोडी फार आर्थिक मदत केली तर आपण ते काम करू, अशी त्यांनी इच्छा दर्शविली. ६ आणे पौंड हा कताईचा दर ठरविण्यात आला आणि इतर कातणाऱ्यांना हे काम करण्यास त्यामुळे मदत झाली.

आता नवीन एक अडचण म्हणजे पैशाची वाटेत आली. पाचही चरखे सुरू होते आणि त्या ठिकाणी तयार केलेले आणखी पाच चरखे हेही सुरू झाले. कापसाचा साठाही संपला. पैशाच्या अभावी चरखे तयार

करणे, कापूस खरेदी करणे आणि कामगारांना पैसे देणे, या साऱ्या गोष्टी अडून राहातील असे वाटले. रावबहाद्दूर चितळे यांनी स्वतः ही अडचण पाहिली आणि कामाला १०० रुपये देणगी दिली. मिस् लॅथम यांना जेव्हा ही अडचण कळून आली तेव्हा त्यांनीही १०० रुपये पाठवून दिले. या दोन देणग्या अगदी वेळेवर आल्या आणि त्यामुळे कामाला चालना मिळाली. स्थानिक लोकांनीही आपला कापूस देऊन मदत केली.

दिवसेदिवस चरख्यांची मागणी वाढू लागली. चरख्याचे पैसे देण्याची ऐपत लोक फार गरीब असल्यामुळे त्यांच्यात नव्हती. आणि म्हणून चरखे जागोजाग तयार करून घेणे व ते कार्यकर्त्यांना उसनवारीने देणे आवश्यक झाले. आणखी २७ चरखे तयार करण्यात आले. आणि ज्या स्थानिक सुतारांना दुष्काळामुळे काम नव्हते, त्यांना काम मिळाले. एका सुताराने चरख्यात सुधारणा करून तो बारीक सूत कातण्यास उपयुक्त केला. प्रत्येक चरख्याची किंमत रुपये ३, रु. ३–८–०, आणि रुपये ४ अशी त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणे ठरविण्यात आली. त्यांतील ३ चरखे रु. ९–८–० ला विकण्यात आले. ह्या चरख्यांवर एकूण रक्कम रु. १०३–८–०इतकी खर्च झाली. त्यात मिसेस पेटिट यांनी पाठविलेल्या चरख्यांचीही रक्कम धरली आहे.

जरी ह्या कामाकरिता स्थानिक कापूस मिळविला तरी नवशिक्यांना तो अगदी निरुपयोगी ठरला. म्हणून स्थानिक कापूस ठरविण्याची एक नवीन पद्धत सुरू केली. त्या पद्धतीमुळे कामाला मदत झाली एवढेच नव्हे; पण काही जणांना आणखी काम मिळाले. कच्चा कापूस मिळविला जाई आणि त्यातली काडी, कचरा, पाने वगैरे काळजीपूर्वक काढून टाकून नंतर तो पिंजला जाई. ह्या कामाचा दर पौंडामागे एक पैसा ठरविला. कोणाही हे काम करणाऱ्या म्हाताऱ्याला ४ पौंड कच्चा कापूस स्वच्छ करून दिवसाला १ आणा मिळविता येई. अशारीतीने तो कापूस स्वच्छ केल्यावर हात पिंजणीने तो पिंजला जाई आणि त्यामुळे १० पौंडाला १ आणा या दराने काही पिंजारी स्त्रियांना काम मिळे. अशा रीतीने एक स्त्री दररोज २ आणे ६ पै मिळवू शके. हा पिंजलेला कापूस नंतर पिंजारी स्वच्छ करीत असे. त्याला पौंडामागे १ आणा दिला जाई व त्याची दररोज प्राप्ती ८ आणे असे. जर गिरण्यांतून कापूस विकत घेतला असता तर ते अधिक चांगले व सोपेही झाले असते. पण ज्या अर्थी हा स्थानिक कापूस स्वच्छ करण्याच्या प्रक्रियेत आणखी काही लोकांना काम मिळे, त्या अर्थी ही पद्धत इष्ट वाटली. ह्या स्वच्छ करण्याच्या दराचे पुष्कळसे

पैसे कापूस पिंजल्यानंतर जी सरकी उरे तीपासून मिळत असत. खालील तक्त्यात या कामाकरिता झालेला खर्च आणि प्रत्येक ६० पौंड कच्च्या कापसाची किंमत दिली आहे :

	रु. आणे पै
६० पौंड कच्च्या कापसाची किंमत २४० पौंडाला रुपये २० या दराने	५ – ० – ०
केरकचरा, सुकलेली पाने काढून टाकणे दर, प्रत्येक पौंडाला १ पैसा.	० – १५ – ०
कच्चा स्वच्छ केलेला कापूस ५२ पौंड पिंजणे दर १० पौंडाला १ आणा.	० – ५ – ३
पिंजाऱ्याकडून तो कापूस (१७ पौंड) स्वच्छ करणे दर प्रत्येक पौंडाला १ आणा.	१ – १ – ०
एकूण	७ – ५ – ३
त्यातून वजा ३५ पौंड सरकीची किंमत दर २० पौंडाला १ रुपाया. वजा जाता	१ – १२ – ०
ह्यातून स्वच्छ केलेल्या १७ पौंड कापसाची नक्त किंमत.	५ – ९ – ३

अशा प्रकारे १ पौंड कापसाची किंमत ५ आणे ३ पै होते. वाया जाणाऱ्या कच्च्या कापसातील प्रमाण जे ६० पौंडामागे ८ पौंड आहे ते फार भारी आहे. ते टाळण्याचा मार्ग म्हणजे अधिक चांगला व अधिक स्वच्छ कापूस मिळविणे.

सध्या २९ चरखे चालू आहेत व चरख्यांची मागणी सारखी वाढत आहे. पण पैसे मर्यादित असल्यामुळे अधिक चरखे तयार करता येत नाहीत व देता येत नाहीत. ज्यांना पूर्वी कताईची बिलकूल माहिती नव्हती ते कताई करतात. म्हणून सूत अद्याप हलके निघते. त्यात दिवसें-दिवस सुधारणा होत आहे. पण तज्ज्ञ शिक्षक मिळाला तर झपाट्याने सुधारणा होईल. कातणाऱ्यांत काही पूर्ण वेळ देणारे व काही फावला वेळ देणारे आहेत.

सध्या दररोज सुमारे २ पौंड सूत निघते व कातणाऱ्यांना जशी सवय होईल तशी त्यात वाढ होईल. कताईचा दर पौंडाला ६ आणे हा ठरविला आहे व पुष्कळ कामगार त्याबद्दल तक्रार करीत आहेत. विक्री-

करिता पाठविलेल्या सुताला १२ आणे पौंड ही किंमत आली म्हणून तोटा सोसल्याशिवाय कताईचे दर वाढविता येणार नाहीत. एक पौंड सुताला ११ आणे ३ पै खर्च येतो. त्यातील रु ०–५–३ कापसाचे व ६ आणे कताईचे असतात. अशा प्रकारे पौंडामागे फक्त ९ पै नफा राहतो. यात व्यवस्था व इतर खर्च धरले नाहीत. सध्याच्या एका पौंडाला ६ आणे दराच्या कताईप्रमाणे, एका कातणाऱ्याला दररोज २० ते २४ तोळे कातून ३ आणे मिळू शकतात. पुष्कळजण १५ तोळे कातून २ आणे मिळवतात व बाकीचे १० तोळे कातून दीड आणा मिळवितात. त्यांत नवशिके धरले नाहीत. कातणाऱ्याचा जसा कामावर हात बसेल तसे तो अधिक पैसे मिळवील.

या सुताचे कापड विणण्याचा प्रयत्न करण्यात आला. आणि एका विणकराला ३॥ पौंड सूत देण्यात आले. तथापि त्याने विणाईचे भयंकर दर लावले. त्याने ९॥ वार कापड तयार केले. व त्याचा ३ रु. ९ आणे आकार केला. म्हणजे पौंडाला १ रुपया पडला. कापडाची घरात किंमत रु. ६–०–६ पडली व ते कापड रु. ६–३–० ला विकण्यात आले. त्यात फायदा २ आणे ६ पै फक्त मिळाला. ही विणण्याची अडचण काढून टाकण्याकरिता एक स्वतंत्र माग पाहिजे आणि स्थानिक लोकांना विणकाम शिकविण्याकरिता एक शिक्षक ताबडतोब पाहिजे. पुष्कळ स्थानिक लोक ही कला शिकू इच्छितात. जर स्वतंत्र माग ठेवला तर त्यामुळे त्याच्यावर तयार केलेल्या कापडाची किंमत बाजारातील चालू दरापेक्षा कमी होईल. अचूक मजुरीचा अंदाज घेण्याकरिता निरनिराळ्या विणकरांना सुमारे ६ पौंड सूत दिले आहे. पण ही सारी अडचण स्वतंत्र मागानेच दूर होईल.

जेव्हा कापसाचा तुटवडा होता आणि कामगारांना काम नव्हते तेव्हा कापूस तयार होईपर्यंत त्यांना कातण्याकरिता लोकर दिली. धनगरांनी हे काम खुषीने घेतले. पण त्यांनी नेहमीपेक्षा अधिक बारीक सूत काढावे असे त्यांना सांगण्यात आले. ह्या कामाचा सराव होण्यास त्यांना काही काळ लागला. आणि आता १० जण लोकरीचे बारीक सूत कातीत आहेत. त्यांनाही एका पौंडाला ६ आणे कताईकरिता देण्यात येतात. एका रुपयाला २ पौंड या दराने ३१ रुपयांची लोकर खरेदी करण्यात आली. आणि जरी कापूस तयार झाला होता तरी निराळे खाते काढून लोकर कताई सुरू ठेवली. कारण धनगरांनी ते काम ताबडतोब पत्करले. लोकर स्वच्छ करण्याचे सर्व काम धनगरांच्या बायका करतात. त्यांना त्याकरिता पौंडामागे १ आणा जादा मिळतो. लोकर निरनिराळी करण्याचे काम

काळजीपूर्वक केले जाते. लोकर कातणारे बहुसंख्य लोक स्वतःचेच चरखे वापरतात. पण आता काहीजण बारीक सूत कातण्याकरिता सुधारलेले चरखे मागू लागले आहेत.

धनगर जातीचे विणकर हे ठिकठिकाणी मिळतात. म्हणून बारीक सुतापासून पंढरपूर व दावणगिरी पद्धतीची घोंगडी तयार करण्यात येत आहेत व त्यांना निरनिराळे नमुने सुचविले जात आहेत. धनगराची जात मोठी हट्टी आहे व ती जात नव्या सुधारणा सहजासहजी स्वीकारीत नाही; पण ह्या कामाने त्यांना नमुन्याच्या घोंगड्या तयार करण्यास लावले आहे. व त्याचा त्यांना आपल्या धंद्यात कायमचा उपयोग होईल. त्यांना आता अधिक रुंद व अधिक सुधारलेला भाग पाहिजे आहे आणि लोकर रंगविण्याच्या सूचना हव्या आहेत. जो कोणी विणण्याची अधिक चांगली पद्धत सुरू करील असा पूर्ण वेळ देणारा हुशार विणकर मिळविण्याचे प्रयत्न चालले आहेत. दोन घोंगड्या तयार झाल्या व त्या मूळ किंमतीला विकल्या. एक रु. ५–१३–६ व दुसरी रु. ६–६–० अधिक घोंगड्यांची मागणी आता येऊ लागली आहे. पण काम चालू ठेवण्यास काही पैसे लागतील.

दुष्काळ निवारण्याकरिता इतक्या लोकांना काम देणे हा एक आदर्श आहे, एवढेच नव्हे तर ग्रामोद्योग वाढविण्याचा आणि सतत पडणाऱ्या दुष्काळांचे अनैतिक परिणाम बालविणारे एक साधन आहे. असे हे सुमारे एक महिन्याचे काम आहे. त्या कामाला आता सुधारलेला हातमाग, चांगला शिक्षक, लोकरीकरिता निराळा भाग, अधिक चरखे, (जे शेजारच्या खेड्यातले लोकही मागत आहेत) आणि इतर गोष्टींची जरूरी आहे. हे काम जोराने चालले आहे. आणि पैशाच्या अभावामुळे त्याच्यावर परिणाम होणार नाही अशी आशा आहे.

'यंग इंडिया', ११-५-१९२१.

परिशिष्ट ३

मुलाखत–सह–माफी

नामदार व्हाइसरॉयसाहेब आणि मि. गांधी यांच्यामध्ये शौकत अली व महंमद अलीसंबंधी जी संभाषणे झाली, त्याविषयी जी निरनिराळी पत्रके प्रसिद्ध झाली व वर्तमानपत्रांत जे निष्कर्ष काढले गेले. त्याकडे नामदार व्हाइसरॉयसाहेबांचे लक्ष विशेषतः गांधींच्याकडून वेधण्यात आले. ते निष्कर्ष काही बाबतींत त्या पत्रव्यवहारांचा उद्देश बिनचूकपणे व्यक्त करीत नाहीत.

व्हाइसरॉय आणि पंडित मालवीय यांच्यामध्ये हिंदुस्थानात प्रचलित असलेल्या परिस्थितीविषयी काही बोलणी झाली आणि त्यामुळे गांधी व व्हाइसरॉय यांच्या मुलाखती झाल्या. व्हाइसरॉयसाहेबांनी पंडित मालवीय यांना शौकत अलींनी अत्याचाराला उत्तेजन देणारी जी भाषणे केली, त्यासंबंधी सरकारने फौजदारी खटला भरण्याचे ठरविले आहे, असे कळविले आणि ती चर्चा त्यांतून ज्या दंगली उद्भवणे शक्य आहे तिच्याकडे वळली. पंडित मालवीयांनी असे मत व्यक्त केले की, व्हाइस-रॉयनी गांधींना भेटणे हे फायदेशीर होईल. व्हाइसरॉयनी उत्तर दिले की, जर गांधी मुलाखत मागतील तर मी त्यांना आनंदाने भेटेन व त्यांचे विचार ऐकून घेईन. दुसऱ्या दिवशी अॅन्ड्र्यूज व्हाइसरॉयना भेटले व त्यांना सुचविले की, त्यांनी गांधींना भेटावे. या संभाषणात निरनिराळ्या महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा झाली, हे लक्षात ठेवले पाहिजे. आणि जी गांधी व व्हाइसरॉय यांची नियोजित मुलाखत होती, तिचा उद्देश सर्वसामान्य परिस्थितीविषयी बोलणी करावी असा होता. पण व्हाइसरॉयना हे ठाऊक होते की, पंडित मालवीयांनी गांधींना सिमल्याला बोलाविले असता, शौकत-अली व महंमद अलीविरुद्ध जी कारवाई करण्याचा सरकार विचार करीत होते, त्या संबंधी गांधींना कळविले नव्हते.

पंडित मालवीय आणि मि. अॅन्ड्र्यूज ह्यांच्या विनंतीवरून मि. गांधी योग्य कालाने सिमल्याला आले व त्यांनी व्हाइसरॉयांची मुलाखत

मागितली. ती मुलाखत ताबडतोब दिली गेली. पहिल्या भेटीत नियोजित खटल्यांचा उल्लेख नव्हता. हिंदुस्थानातील असंतोषाच्या कारणासंबंधी बोलणी झाली. दुसऱ्या वेळी व्हाइसरॉयनी सांगितले की, सरकारी अहवालाप्रमाणे जबाबदार असहकारितावादी गांधीपुरस्कृत सिद्धांताविरुद्ध अत्याचाराला उत्तेजन देणारी भाषणे करीत आहेत. गांधींनी जबाबदार असहकारितावादी अत्याचाराला प्रोत्साहन देत असतो, या विधानाचा इन्कार केला आणि ते म्हणाले, जर कोणी अत्याचाराला प्रोत्साहन दिले आहे, अशी माझी खात्री पटली तर मी त्याचा व त्याच्या शिकवणुकीचा जाहीररीत्या संबंध तोडून टाकीन. पण जर त्याने अत्याचाराला प्रोत्साहन देणारी विधाने परत घेतली तर मी तसे करणार नाही. व्हाइसरॉयसाहेबांनी अलीबंधूंची नावे घेतली आणि जी भाषणे अत्याचाराला प्रोत्साहन देणारी त्यांच्या मताने होती, त्यांतील उतारे गांधींना दाखविण्याचे वचन दिले. जेव्हा हे उतारे प्रत्यक्ष गांधींना वाचून दाखविले तेव्हा गांधीजी म्हणाले, त्यांचा जो अर्थ व्हाइसरॉय लावतात तसा लावणे शक्य आहे. पण शौकत अली आणि महंमद अली यांचा उद्देश श्रोत्यांना अत्याचाराला प्रवृत्त करावे असा नव्हता असे गांधींनी जोराने प्रतिपादन केले. गांधी आणखी म्हणाले की, मी सिमला सोडताच त्यांना भेटेन व त्यांना असा सल्ला देईन की, त्या उताऱ्यात जे उत्तेजन हेतूरहित आहे, त्याबद्दल जाहीररीत्या त्यांनी खेद व्यक्त करावा. त्यावर व्हाइसरॉयनी विचारले ते कागदपत्र महत्त्वाचे असल्यामुळे गांधी हे जे निवेदन शौकत अली आणि महंमद अली यांना प्रसिद्ध करण्यास सांगणार आहेत त्याचा मसुदा मला दाखवितील काय ?

याच वेळी व्हाइसरॉय म्हणाले की, ह्या उताऱ्यासंबंधी शौकत अली व महंमद अली यांच्यावर खटले भरावेत अशी योजना आहे. आणि जर गांधी हे मला ते निवेदन दाखवितील आणि ते जर माझ्या सरकारच्या दृष्टीने समाधानकारक वाटेल तर मी माझे वजन खर्च करून खटला भरू देणार नाही. कारण ते म्हणाले, जर भविष्यकाळी अत्याचारी स्वरूपाची भाषणे टाळता आली तर सरकारचा उद्देश साध्य होईल. गांधींनी निवेदन दाखविण्यास ताबडतोब कबुली दिली. निवेदनाचा मसुदा योग्य वेळी गांधींनी व्हाइसरॉयना दाखविला. त्यावर व्हाइसरॉय म्हणाले, काही परिच्छेदांच्या सुरुवातीवरून ह्या निवेदनाला जाहीरनाम्याचे स्वरूप आले आहे व त्यांत शौकत अली व महंमद अली यांच्या धार्मिक श्रद्धेचाही त्यांत उल्लेख आहे. व्हाइसरॉय आणखी म्हणाले की, हे निवेदन अपुरे

आहे. कारण त्यात आपण पुढील काळात अत्याचाराला उत्तेजन देणारी भाषणे करणार नाही, असे वचन नाही. व्हाइसरॉय आणखीही म्हणाले की, हे निवेदन प्रसिद्ध झाल्यानंतर शौकत अली व महंमद अली यांनी कायदा न मोडता भाषणांच्या द्वारा वाटेल ती स्पष्टीकरणे द्यावीत. गांधींनी प्रस्तुत परिच्छेद गाळण्याचे कबूल केले आणि पुढील वर्तणुकीबद्दल वचनबद्ध होणारा असा मजकूर घालण्याचे कबूल केले. त्यावर व्हाइसरॉयनी गांधींना सांगितले की, गांधींनी बदल केल्याप्रमाणे आणि पुढील वर्तनासंबंधी वचनाची पुस्ती जोडल्यानंतर जर शौकत अली व महंमद अली यांनी निवेदनावर सह्या केल्या तर खटले भरणे स्थगित करण्यात येईल. आणि जोपर्यंत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात दिलेली वचने पाळली जातील, तोपर्यंत खटला भरला जाणार नाही. सरकारला मागील भाषणाबद्दल केव्हाही खटला भरता येईल. व्हाइसरॉय आणखी म्हणाले की, जर शौकत अली आणि महंमद अली यांचे निवेदन प्रसिद्ध झाले आणि त्यामुळे सरकारने खटला भरला नाही तर सरकारच्या वृत्तीचे स्पष्टीकरण करण्याकरिता एक सरकारी पत्रक काढावे लागेल. पण सौदा करण्याची आमची इच्छा नाही. गांधी असेही म्हणाले की, खटले भरले जावोत किंवा न जावोत, माझ्या मित्रांना ते उतारे दाखविल्यानंतर त्यांच्या मानाकरिता व कार्याकरिता त्यांनी जाहीररीत्या खेद व्यक्त करावा, या गोष्टीला मी बांधला गेलो आहे.

साऱ्या चर्चेत व्हाइसरॉय आणि गांधी ह्या दोघांची इच्छा खटल्यातून निर्माण होणाऱ्या अनिष्ट गोष्टी टाळाव्या अशी होती. त्याचप्रमाणे अत्याचाराला प्रोत्साहन देण्याची भाषणे हीही टाळावी अशी होती. व्हाइसरॉयनी गांधींना कळविले की, शक्य तितक्या लवकर हे निवेदन प्रसिद्ध झाले नाही तर खटल्याची सुरुवात मला टाळता येणार नाही. या संभाषणांची पुष्कळ चर्चा हिंदुस्थानात काय पण इंग्लंडमध्येही झाली होती. निवेदन उशीर न लावता प्रसिद्ध व्हावे, हे गांधींनी मान्य केले. नंतर गांधी सिमल्याहून निघाले आणि काही दिवसांनी त्यांनी व्हाइसरॉयना तार पाठविली की, शौकत अली व महमंद अली यांनी किरकोळ बदल करून निवेदनावर सह्या केल्या आहेत व ते वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीला पाठविले आहे. त्यात केलेला बदल पुढीलप्रमाणे होता : गांधींच्या निवेदनाच्या मसुद्यात पुढील वाक्य होते. "आम्ही असे सांगू इच्छितो की, अत्याचाराला प्रोत्साहन द्यावे, असा आमचा केव्हाही हेतू नव्हता. पण हे आम्हांला मान्य आहे की, आमच्या भाषणातील काही उताऱ्यांचा जो अर्थ लावण्यात आला आहे, तसा अर्थ लावणे शक्य आहे." मि.

शौकत अली आणि महंमद अली यांनी त्या ऐवजी पुढील वाक्य लिहिले. “ आम्ही असे सांगू इच्छितो की, अत्याचाराला प्रोत्साहन देण्याचा आमचा केव्हाही हेतू नव्हता आणि आम्ही अशी केव्हाही कल्पना केली नव्हती की, आमच्या भाषणातील उताऱ्यांचा जो अर्थ लावला जात आहे, तो अर्थ लावणे शक्य आहे. पण आम्ही आमच्या मित्रांच्या युक्तिवादांतील आणि अर्थप्रतिपादनातील जोरदारपणा मान्य करतो. ” हे निवेदन प्रसिद्ध झाल्यावर सरकारने अधिकृत पत्रक काढले. त्या पत्रकातील अटी, पत्रक प्रसिद्ध होण्यापूर्वी प्रत्यक्ष ठरल्या नव्हत्या आणि गांधींनी ते पत्रक पाहिलेही नव्हते. अर्थात पूर्वीच निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्याचा आशय त्यांना कळविण्यात आला नव्हता. व्हाइसरॉय आणि गांधी यांच्या मुलाखतीतील मुख्य भाग संभाषणाचाच होता. त्याची व्याप्ती हिंदुस्थानातील असंतोषाच्या निरनिराळ्या कारणांपर्यंत विस्तारलेली होती. त्यांत पंजाबच्या दंगली, खिलाफत आंदोलन, सेव्हियर्सचा तह आणि लोकांची सर्वसाधारण स्थिती हे विषय होते. गांधींनी स्वराज्याची कोणतीही योजना व्हाइसरॉयपुढे मांडली नाही व मुलाखतीत त्याची चर्चाही झाली नाही.

‘ यंग इंडिया ’, ४-८-१९२१

परिशिष्ट ४

(१)

टागोरांची असहकारितेवरील टीका

मार्च २, १९२१

शारीरिकदृष्ट्या कृश असलेल्या आणि भौतिक साधनसामुग्रीपासून वंचित झालेल्या महात्मा गांधीसारख्याने हिंदुस्थानच्या अपमानीत व कंगाल अशा मानवतेच्या अंतःकरणात दबा धरून बसलेल्या लीन झालेल्यांच्या अपार शक्तीला आवाहन करावे हे परिस्थितीला साजेसे आहे. हिंदुस्थानच्या नियतीने नारायणाला आपला सखा म्हणून निवडला आहे, पण नारायण सेनेला निवडलेले नाही.......त्यांना क्षात्रबळ नको असून आत्मबल पाहिजे आहे. आणि हिंदुस्थानला मानवतेचा इतिहास ह्या शारीरिक संघर्षाच्या चिखलातून उच्च अशा नैतिक उंचीवर न्यावयाचा आहे. स्वराज्य म्हणजे काय ? ती माया आहे. ती धुक्याप्रमाणे असून नाहीशी होणार आहे. आणि शाश्वत तत्त्वाच्या तेजावर कोणताही डाग ठेवणार नाही. आपण पाश्चात्यापासून शिकलेल्या शब्दप्रयोगांनी स्वतःची कितीही फसवणूक करून घेतली तरी स्वराज्य हे आपले ध्येय नाही. आपला लढा आध्यात्मिक आहे..........तो मनुष्य जातीकरिता आहे. माणसाने स्वतःभोवती जी जाळी विणली आहेत त्यापासून आपल्याला त्याला सोडवावयाचे आहे............ती जाळी म्हणजे राष्ट्रीय अहंकाराच्या संस्था. कोशाच्या आश्रयापेक्षा आकाशातील स्वातंत्र्य हे अधिक मोलाचे आहे. ही गोष्ट आपल्याला पाकोळीला पटवावयाची आहे. जर आपण बलिष्ठ, सशक्त आणि संपत्तिवान लोकांना तुच्छ लेखू शकलो आणि जगाला अमर अशा आत्म्याची शक्ती दाखवू शकलो तर ह्या देहाचा सारा किल्ला शून्यात विलीन होईल. नंतर मनुष्यमात्राला आपले स्वराज्य गवसेल. आपण पूर्वेकडील जे उपाशी व दीन लोक आहोत त्यांना साऱ्या मानवजातीकरिता स्वातंत्र्य मिळवावयाचे आहे. आपल्या भाषेत ‘ नेशन ’ याला शब्द नाही. जेव्हा हा शब्द आपण दुसऱ्या लोकांपासून

उसना घेतो, तेव्हा तो आपल्यात कधीच ठाकठीक बसत नाही. कारण आपल्याला नारायणाशी सख्य जोडावयाचे आहे. आपला जय हा आपल्याला फक्त जयच देईल. म्हणजे ईश्वराच्या विश्वाचा जय. मी पाश्चात्य जग पाहिले आहे. त्यांच्या अपवित्र मेजवान्यांची मला अभिलाषा नाही. त्या मेजवान्यांत पाश्चात्य जग क्षणोक्षणी मौज करते. अधिकाधिक ते फुगतात, लाल होतात आणि भयंकर बेभान होतात. मध्यरात्रीचा– हा मशाली पेटवून दारू पिऊन केलेला नंगा नाच–आम्हांला नको आहे. पण प्रातःकालच्या प्रशांत प्रकाशातील जागृती आम्हांला हवी आहे.

(२)

मार्च ५, १९२१

असहकारितेची कल्पना ही राजकीय संन्यासाची कल्पना आहे. आपले विद्यार्थी जी त्यागाची उपायने आणीत आहेत ती कोणाकरिता ? अधिक संपूर्ण शिक्षणाकरता ती नसून शिक्षणशून्यतेला. त्याच्या मागे एक संपूर्ण विध्वंसाचा ऊग्र आनंद आहे. त्याचा चांगला अर्थ म्हणजे संन्यास व वाईट अर्थ म्हणजे विनाशाचा भयानक प्रहर्ष. ह्या भयानक प्रहर्षात, मानवी स्वभाव, नित्याच्या जीवनात जी मूलभूत वास्तवता आहे, तिच्यावरील विश्वास उडाल्यामुळे, निरर्थक विध्वंसात निर्भमत्याचा आल्हाद घेऊ लागतो. आपल्याला ती गोष्ट गेल्या युद्धात व इतर आपल्याला भिडलेल्या दुसऱ्या प्रसंगी दिसून आली. निष्क्रिय नैतिक स्वरूपांच्या नकाराचा अर्थ संन्यास व सक्रिय नैतिक स्वरूपाच्या नकाराचा अर्थ हिंसा असा आहे. वादळातील खवळलेला सागर हा जितका हिंसात्मक असतो, तितकेच वाळवंट हेही हिंसात्मक असते; ते दोन्हीही जीवनाचे शत्रूच.

बंगालमध्ये जी स्वदेशीची चळवळ चालली होती त्या वेळचा मला एक दिवस आठवतो. त्या दिवशी आमच्या " विचित्र " घराच्या दिवाणखान्यात पहिल्या मजल्यावर तरुण विद्यार्थ्यांचा एक जमाव मला भेटावयास आला. ते मला म्हणाले की, मी जर त्यांना शाळा–कॉलेजे सोडा असे सांगितले, तर ते ताबडतोब माझी आज्ञा पालन करतील. माझा तसे सांगण्यास जोराचा विरोध होता. ते रागावून निघून गेले. त्यांच्या मनाला माझ्या मातृभूमीच्या कळकळीबद्दल शंका वाटली. पण याच्या अगोदर फार पूर्वी जेव्हा लोकांच्या प्रक्षोभाचा उद्रेक झाला नव्हता तेव्हा मजजवळ माझे असे म्हणता येण्यासारखे पाच रुपये नसताना, मी स्वदेशी भांडाराकरता एक हजार रुपये दिले होते व लोकांच्या थट्टेचा विषय झालो होतो

व दिवाळखोर बनलो होतो. मी त्या विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याला नकाराचा सल्ला देण्यास कारण होतो. तात्पुरते का असेना, पण मला अराजकतेची पोकळी निर्माण होणे कधीच आकृष्ट करीत नाही. जी मनस्कता सजिव वास्तवतेची उपेक्षा करण्यास तयार असते, तिची मला भीतीच वाटते...... ज्याप्रमाणे माणसातील सर्वोच्च सत्य म्हणजे रक्तामांसाचे शरीर यावर माझा विश्वास नाही, त्याप्रमाणे पाश्चात्यांच्या भौतिक सुधारणेवर माझा विश्वास नाही हे तुम्ही जाणता. असे असले तरी त्याहीपेक्षा माझा कमी विश्वास रक्तामांसाच्या शरीराच्या नाशावर व जीवनातील भौतिक गरजांच्या उपेक्षेवर आहे. माणसाच्या प्रकृतीतल्या भौतिक व आध्यात्मिक गुणांमध्ये एकतानता निर्माण करण्याचीच जरूरी आहे; आणि असे करताना पाया व वरील इमारत यांत समतोल राखला पाहिजे. मी पौर्वात्य व पाश्चात्यांच्या खऱ्या मीलनावर विश्वास ठेवणारा आहे. आत्म्याचे अंतीम सत्य म्हणजे प्रेम. त्या सत्यावर आघात होऊ न देण्यास आपण प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे. व त्या सत्याची पताका सर्व विरोधांत हाती धरली पाहिजे. असहकारितेची कल्पना त्या सत्याला निष्कारण इजा पोहोचवीत आहे. तो आपल्या चुलीतला अग्नी नाही; तो अग्नी आपल्या चुली व आपली घरे जाळून टाकणारा आहे.

(३)

मार्च १३, १९२१

जागतिक इतिहासाच्या आजच्या आणीबाणीच्या प्रसंगी, हिंदुस्थान आपल्या मर्यादांचे उल्लंघन करून जगाला एक मोठे ध्येय देऊ शकणार नाही का की, जे ध्येय पृथ्वीवरील निरनिराळ्या लोकांना परस्परात सहकारिता करून सलोख्याने काम करावयास लावील ? श्रद्धावान माणसे असे म्हणतील की, हिंदुस्थानने साऱ्या जगाला आवाहन करण्यापूर्वी, तो स्वतः बलिष्ठ व संपत्तिवान झाला पाहिजे. पण मी त्यावर विश्वास ठेवण्यास संपूर्ण नकार देतो. माणसाचा मोठेपणा मोजण्याचे साधन त्याची भौतिक साधनसामुग्री आहे, हा एक प्रचंड भ्रम आहे व त्या भ्रमाने आज साऱ्या जगावर सावली टाकली आहे. तो माणसाचा एक उपमर्द आहे. ह्या भ्रमातून जगाला सोडविण्याची शक्ती जे भौतिक दृष्ट्या कमकुवत आहेत त्यांच्यात असते. आणि हिंदुस्थान हा कितीही दारिद्री व अपमानीत असला, तरी तो मानवतेच्या मुक्ततेकरता पुढे येऊ शकेल-......

......स्वतःची जनता ही इतरांपासून भिन्न आहे ही जी पृथकत्वाची तीव्र भावना विद्यमान आहे, त्या भावनेला विरोधी असणारे हिंदुस्थानचे

ध्येय आहे. त्या पृथक्त्वाच्या भावनेमुळेच सतत संघर्ष घडून येत असतात. म्हणून माझी एकच प्रार्थना आहे की, हिंदुस्थानने जगातील साऱ्या राष्ट्रांच्या सहकार्याचा पुरस्कार करावा. नकाराच्या वृत्तीमुळे पृथक्त्वाच्या जाणीवेला आधार मिळतो व स्वीकाराच्या वृत्तीमुळे ऐक्याच्या जाणीवेला आधार मिळतो. हिंदुस्थान अनादिकालापासून एकता हे सत्य व भिन्नता ही माया आहे, असे घोषित करीत आला आहे. हे ऐक्य म्हणजे शून्य नव्हे ते सर्वसमावेशक आहे म्हणून ते नकाराच्या मार्गाने साध्य होणार नाही. आपले अंतःकरण व मन हे पाश्चात्यापासून अलग करण्याकरता जी सध्या आपली चळवळ चालली आहे ती म्हणजे आध्यात्मिक आत्महत्येचा प्रयत्न आहे. जर आपण राष्ट्रीय बढाईच्या भावनेने, आपल्या घरांच्या गच्चीवरून असे ओरडत सुटलो की माणसाला अत्यंत मोलाचे वाटेल असे पाश्चात्यांनी काहीही निर्माण केले नाही, तर पौर्वात्य-मनाने निर्माण केलेल्या एखाद्या निर्मितीला काही किंमत आहे किंवा नाही, याबद्दल शंका घेण्यास आपण कारण उपलब्ध करून देऊ. कारण पौर्वात्य व पाश्चात्य मन हे सत्याची निरनिराळी स्वरुपे निरनिराळ्या दृष्टिकोणांतून शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत; आणि जर हे खरे असेल की, पाश्चात्यांच्या बळाने त्याला अगदीच चुकीच्या मार्गावर नेऊन सोडले, तर पौर्वात्याच्या दृष्टिकोणाबद्दलही आम्ही खात्री बाळगू शकणार नाही. तर मग सारा वृथाभिमान सोडू या आणि जगात कोठल्याही कोपऱ्यात दिवा लागला तर आनंद मानू या. आणि असे समजू या की, आपल्या घराकरताच हा एका भागातला समान असा तो प्रकाश आहे...

पाश्चात्य राष्ट्रे पौर्वात्यांना समजू शकली नाहीत, हेच त्यांच्यातील तेढीचे मूळ आहे. पण जर पौर्वात्य लोक आपल्याकडून पाश्चात्यासंबंधी गैरसमज करून घेऊ लागले, तर परिस्थिती सुधारेल का? सध्याच्या युगावर पाश्चात्यांचा प्रचंड पगडा बसलेला आहे. ते शक्य झाले, त्याला कारण पाश्चात्यांवर मानवतेची मोठी कामगिरी सोपविली गेली हे होय. आपण पूर्वेकडील लोक जे पश्चिमेकडे आलो, ते त्यांना जे शिकवावयाचे असेल ते शिकण्याकरता. कारण तसे केल्यानेच आपण या युगाची त्वरेने परिपूर्ती करणार आहो. पूर्वेलाही काही धडे शिकवावयाचे आहेत, हे आपण जाणतो. आणि पूर्वेवरही दिवा विझू न देण्याची जबाबदारी आहे आणि अशी एक वेळ येईल की, जेव्हा पाश्चात्यांना फुरसत सापडेल व कळून चुकेल की, आपले निवासस्थान पूर्वेकडेच आहे व जेथे आपले अन्न व विश्रांती हीही आहे.

लेटर्स टू ए फ्रेंड

परिशिष्ट ५

कायदा व शुभवर्तमान

" सुधारणा–खरी सुधारणा–अस्तित्वात आहे.... ' एकामेकांवर प्रेम करा ' किंवा ' अपकाराची फेड उपकाराने करा. ' हे त्याच माणसाने म्हटले होते. पण दोन हजार वर्षे हीच वाक्ये फक्त पुनः पुन्हा घोकली जात आहेत. "—ड्यूहापेल्सच्या **सिव्हिलिझेशन** वरून.

आम्ही जे नावाचे खिश्चन लोक आहो, त्यांना शरमेच्या किंवा ढोंगीपणाच्या भावनेशिवाय येशू खिस्ताचा जन्मदिवस साजरा करणे अशक्य आहे असे वाटते. आपल्याला त्याच्याशी किंवा त्याला आपल्याशी काय करावयाचे आहे ? याचा आपण विचार केला पाहिजे. आपल्या समाजात जर तो पुन्हा अवतीर्ण झाला तर आपण वास्तविक काय केले पाहिजे ? त्याला आपण मानू नये हे तर स्पष्टच आहे आणि त्याच्या धर्ममंडळाच्या सत्तेला तीन वर्षे पुरी होण्याच्या आतच राज्य मंत्रिमंडळ व धार्मिक संस्था ह्या पूर्वीच्या जुडासपद्धतीप्रमाणे त्याच्याविरुद्ध एक होऊन त्याला दरडावतील, त्याला दगा देतील व त्याला ठार मारतील. खरे म्हणजे पुन्हा दुसऱ्यांदा एकदा प्रयत्न करण्याचे कष्ट घेण्याची येशूला जरुरी नाही. फलावरून आपली परीक्षा होते. गेल्या सहा वर्षात कोणत्याही खिश्चन राष्ट्राने एकही खिश्चन-कृत्य केले नाही किंवा त्यांच्यातर्फे एकही खिश्चन शब्द उच्चारला गेला नाही. जे काय उच्चारण्यात आले ते माणसाच्या निराशेची हेटाळणी करण्याकरता किंवा त्याच्या राज्यकर्त्यांच्या नैतिक भावनांना निष्फळ आवाहन करण्याकरता, उच्चारले गेले. असेही म्हणता येईल की, आपला खिश्चन धर्म हा फक्त तोंडाने सांगितला जातो, पण त्याचा आचार केला जात नाही; तो चांगले करण्याऐवजी हानीच जास्त करतो. कारण आपण त्या धर्माचा उपयोग युद्धाला पावित्र्य आणण्याकरता आणि आपल्या अधाशीपणाला व राज्यकारभाराला वेश चढवून त्यांना धर्म म्हणविण्याकरता करीत आहोत. आपण आपल्या आत्म्यावर नव्या व खोलवर गेलेल्या खोटेपणाचे मुखवटे चढवित आहोत. खिस्ती जग हे साध्या निवासाचे व विनम्र मनाच्या लोकांकरता बांधण्यात आले आहे.

आम्ही आमची अभिमानास्पद देवालये आत्मप्रीतीवर येण्याऱ्यांचा अपकर्ष दूर करण्याकरिता उभारतो. हे शक्तीच्या व संपत्तीच्या, सत्तेच्या व साम्राज्यांच्या उपासकानो, हे आपण पत्करणे व कबूल करणे योग्य नाही का की, ज्या देवाची आम्ही पूजा करतो, तो देव येशूच्या अर्थाने देव नाही ! आणि तसे कबूल करून खोट्या ख्रिश्चन धर्माचे अनुयायी म्हणवून घेण्याऐवजी, उघड उघड आसुरी पंथाचे अनुयायी म्हणवून घेणे अधिक चांगले नाही का !

अर्थातच हा आपल्या राज्यकर्त्यांना प्रामाणिकपणाचा सल्ला दिल्यासारखे होईल. पण तो सल्ला निराशेचा व जगाच्या अखेरच्या विनाशाचा आहे. खरोखर आजचा समाज म्हणजे एक दुःख भोगण्याची व असंतोषाची भूमी झाली आहे. पण जे काय घडले आहे त्यावरून ती दुसरी काही बनू शकेल काय ? पण जर व्हर्सायच्या तहानंतर सुख अवतरले असते किंवा त्याच्या उलट, जर्मनीचा जय होऊन तिने जी शांतता केली असती तिच्या मागोमाग जर सुख आले असते, तर भविष्यवेत्ते असे म्हणाले असते की, येशूच्या धर्मतत्त्वांचा पराभव व आक्रमकांचा विजय झाला आहे. बिगर ख्रिस्ती जगाने या घटनेचे समारंभ साजरे केले असते आणि आपण घेतलेल्या बळींना आत्मसात करण्याच्या धंद्यात ते स्थिरावले असते. पण त्यांना ख्रिश्चनधर्मियांना आत्मसात् करता आले नसते, कारण त्यांना त्यांच्या धर्माने इतरांना आपल्या हृदयांत प्रेमाने वागवा अशी अनुज्ञा दिली आहे. त्यांच्यावर जी आपत्ती येऊन कोसळली आहे, त्या आपत्तीत ते पूर्वइषारा न मिळता जाऊन पडले. पण आता त्यांचे डोळे उघडले असल्यामुळे त्यांनी ह्याचा विचार केला पाहिजे की, आपल्या राज्यकर्त्यांनी जे शत्रूंच्या करता पेरले होते, त्याचे पीक आपल्याच पदरी पडले आहे आणि त्यांनी ह्याही गोष्टीचा विचार केला पाहिजे की, कोणतेही राष्ट्र युद्धाच्या तत्त्वावर व धोरणावर जिवंत राहू शकत नाही. एकदा हा शोध लागला व त्याचा वापर केला गेला म्हणजे निराश होण्याला काहीच कारण नाही. उलटपक्षी सुधारणेच्या दुरुस्तीकरता दृढ आशा बाळगता येईल आणि तसे केले जात आहे. एका मागून एक १९१४ च्या स्मृतीच्या खुणा अदृश्य होत चालल्या आहेत. युद्धाने जे चहूकडे दारिद्र्य आणले आहे त्याचा परिणाम म्हणून फाजील खाजगी संपत्ती नाहीशी होण्याचा संभव आहे. उत्तम. ज्या ज्या मुत्सद्याने व सरकारने हे युद्ध केले (बहुतेक सर्व गेलेच आहेत) ते सर्व नष्ट होतील किंवा त्यांची किंमत जाईल. ही ब्याद टळली हे चांगलेच झाले. या राज्य-

कर्त्यांनी जर पुनः नवे हिंसेचे प्रयोग केले तर त्याचे परिणाम कमी कमी होत जातील आणि शेवटी कोठल्या ना कोठल्या साधनांनी, पैशाच्या किंवा पतीच्या घसरगुंडीमुळे, कामगारांच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कृतीमुळे किंवा साऱ्या समाजाच्या निःशस्त्र प्रतिकारामुळे युद्ध हे एक तर बंद होईल किंवा ते निरुपद्रवी होईल.

उद्योगधंद्यांत नवे प्रयोग केले जाण्याची शक्यता आहे, त्यामुळे एक तर भांडवलदारी पद्धत सुधारेल किंवा ती नष्ट केली जाईल. अशा प्रकारे सुधारणेत जे चांगले व वाईट घटक आहेत त्यांच्यात न टळणारा झगडा सुरू झाला आहे आणि जिनिव्हा व इतर ठिकाणी ज्या पुनः लष्करी सामर्थ्याने सुसज्ज सत्ता झाल्या आहेत, त्यांच्यापुढे, खुद्द त्यांच्या देशांतसुद्धा, आंतरराष्ट्रीय न्यायाचा प्रमाणदंड व मानवता यांची मागणी केली जात आहे. म्हणून चहूकडेच ज्या विमार्गगामी समाजाने गेले युद्ध सुरू केले व ज्या समाजाची स्थापना पुनः तह्याने केली, तो समाज कोसळून पडत आहे. म्हणून जे शास्त्र पुनः घडी बसवत असते, ते शास्त्र संशयी मुद्रेने, या नव्या मृत्यूच्या यादीत नावे दाखल केलेल्यांच्याकडे, पाहात आहे. जी छोटी छोटी राष्ट्रे युद्धापासून अलिप्त राहिल्यामुळे शक्ति संपन्न झाली ती मोठ्या राष्ट्रांच्या छळाला जुमानीशी झाली आहेत आणि जर पुन्हा त्यांना आक्रमणाचा धाक दाखविला गेला, तर ती राष्ट्रे स्वतःचा असा संरक्षक संघ बनवतील. त्यांच्यासमोर युद्ध उभे राहिले तर ते समानता स्थापन करणाऱ्या शास्त्राची मदत घेतील किंवा ज्या आध्यात्मिक शक्तीत त्यांनी श्रेष्ठत्व मिळविले आहे, त्या शक्तीने ते साम्राज्यांना प्रतिकार करतील. अशा प्रकारे आयर्लंडला इंग्लंडवर मात करण्याची आणि पूर्वेकडील देशांना पाश्चात्त्यांकडून आपले स्वातंत्र्य पुनः संपादन करण्याची संधी मिळेल.

ज्याला या जागतिक क्रांतीत, मुळातली धार्मिक चळवळ दिसत नसेल तो आंधळा असला पाहिजे. या धार्मिक चळवळी व ओबडधोबड भौतिकवादाला, सहानुभूतिपर समजूतदारपणाला व प्रेमाला केलेल्या आवाहनाला तोंड द्यावे लागेल व आपली वाताहत करून घ्यावी लागेल. जे खिश्चन धर्मोपदेशक अगदी थोड्या लोकांना आकलन होणारा खिश्चन-धर्म गूढवाद म्हणून शिकवण्याचा धंदा करतात, पण तो धर्म जीवनधर्म म्हणून आचरला जावा असे सांगत नाहीत त्यांच्या भाग्यात असेच लिहिले होते की, त्यांनी स्वर्गात ज्या चिन्हांकडे दुर्लक्ष करावे किंवा ती चिन्हे सर्व मानवजातीवर दया दाखविणारी व दिलासा देणारी चिन्हे

आहेत, असे न मानता त्यांचे जे खास शत्रू होते त्यांच्यावरील न्याय-दानाचे ते दर्शनपर आहे असे मानावे. तथापि त्यांत दुःखनिवारण खासच आहे. कारण आधुनिक राज्यात आचारविचारात जी पातके रुजवली आहेत, ती पातके त्या राज्यांचा अंत करून संपलीच पाहिजेत. श्वेत व लाल रशियात, पोलंड व आयर्लंडमध्ये जे राष्ट्रीय लष्करांनी क्रूरता व स्वैरता याचे गुन्हे केले आहेत, ते गुन्हे समाजाचे गुन्हे आहेत, ते व्यक्तीचे नाहीत. आणि ज्या व्यक्तींना या गुन्ह्यांचा जाब देण्याकरता ईश्वरी न्यायासनासमोर उभे राहावे लागेल, त्या व्यक्ती धर्म व शिक्षण संस्थांच्या, राजकीय व वृत्तपत्रीय संस्थांच्या चालक आहेत. जर युद्ध झाले नसते, तर ज्या जवानांनी हे गुन्हे केले, त्यांतील बहुतेकांनी नांगर हाती घेतले असते, किंवा माग चालविले असते, आणि जे आपल्या प्राथमिक अवस्थेतील संस्कृतीने व नैतिक वाढीने त्यांना जितकी मोकळीक दिली असती, तितक्या मोकळिकीत ते सुखाने व निरपराधी वृत्तीने राहिले असते. पण ज्या जगाने, या निर्बुद्ध कलहात आपल्या तरुणांना लोटले व त्यांना नीतिभ्रष्ट केले किंवा त्यांनी शांततेला मध्ययुरोपमधील बालकत्वांचा विध्वंस करू दिला, ते जग शुद्धीवर नाही व ती संघटना सामाजिक असू शकत नाही. सहा वर्षेपर्यंत माणसाने प्रत्येक विधायक व पुढे उपयोगी पडणारी साधने टाकून दिली व जो माणूस कडक हिवाळ्यात लांडग्यांच्या टोळीसारखा राहिला पण त्या सहा वर्षांत त्याचे पाट ताट मांडले जात होते व कोणालाही आपल्या शेजाऱ्यांवर झडप घालावी लागली नाही. तर मग आपण अधिक दुःखे का भोगावीत ? आपण जसे आपल्या पातकात मरत आहोत, तसे आपण का मरावे ? आपल्याला कायदा ठाऊक आहे व तो कायदा आपल्या भ्रष्ट सुधारणेच्या आघाताविरुद्ध किती भयंकर प्रभावी झाला हेही आपण जाणतो. पण येशूने सांगितलेले शुभ वर्तमान देखील आपल्याला ठाऊक आहे. खिश्चन धर्माची अलौकिक प्रेरणा माणसाच्या आत्म्यातूनच उद्भवली व ती तेथेच अद्याप राहात आहे. ती प्रेरणा म्हणजे व्यावहारिक शहाणपणाचा न आटणारा व न मोजता येणारा असा खजिना आहे. ती माणसाला असे वचन देत आहे की, जवळजवळ विसरलेल्या जीवनकलेवर तू परिणामतः स्वामित्व मिळवशील.

'यंग इंडिया', २१-७-१९२१

परिशिष्ट ६

संयुक्त प्रांतातील दडपशाहीबद्दल जवाहरलाल नेहरू यांचे टिपण

संयुक्त प्रांतातील दडपशाही ही एकंदरीत भडक स्वरूपाची नव्हती. म्हणजे प्रमुख पुढाऱ्यांच्या अटका वगैरे. पण ती दडपशाही अगदी परिपूर्ण होती आणि ज्यांना तिचा तडाखा जाणवला नाही असे फारच थोडे लोक होते. त्या दडपशाहीचा विचार तीन शीर्षकांखाली करता येईल.

१. किसान चळवळीसंबंधी.
२. तरुण कार्यकर्त्यांचे खटले व शिक्षा.
३. जामिनकीच्या कलमांचा उपयोग आणि कलम १४४.

१ किसान चळवळ

ही चळवळ ठार मारण्याकरिता सरकारने अटीतटीचा आणि चिकाटीचा प्रयत्न केला. फेब्रुवारीच्या प्रारंभी रामचंद्र, केदारनाथ आणि देवनारायण यांना पकडले. कोठेही गडबड नव्हती. पण सरकारला किसानांना चिरडण्याकरिता एकदम उठाव करावा म्हणून धैर्य झाले. मुख्य जिल्ह्यांतून घोडदळ, तोफखाना आणि पायदळ यांचे संचलन केले आणि लोकांवर सैन्याला रसद पुरविण्याची सक्ती केली. एके ठिकाणी शाळेतल्या मुलांना युरोपियन सैनिकांना सलाम करावयास भाग पाडले.

रायबरेली आणि फैजाबादमध्ये फार मोठ्या संख्येने किसानांना पकडले. बाह्यतः त्याचे कारण त्यांनी जानेवारीच्या लुटालुटीत भाग घेतला हे होते. यातील बहुतेक किसान निरपराधी होते. आणि त्यांचा एकच गुन्हा म्हणजे ते पंच होते हा होय. शेकडो जणांना तुरुंगात ठेवले आणि खटला न भरता सोडून दिले. शेकडो जण अद्याप तुरुंगात खटल्याची वाट पाहात आहेत. काही आठवड्यांपूर्वी फैजाबाद तुरुंगात जवळ जवळ ७०० किसान होते. खटला न चालविता ३ महिने त्यांना तेथे ठेवले. जे कैदी सुटले ते असे सांगतात की, तुरुंगातल्या लोकांना इतके वाईट अन्न देतात की, तेथे कॉलरा सुरू झाला आणि लोक मोठ्या संख्येने मरत आहेत.

सुलतानपूर आणि प्रतापगड जिल्ह्यांत कसलीही गडबड नव्हती. तथापि तेथेही शेकडो पंच आणि सरपंच तुरुंगात आहेत किंवा त्यांच्यावर जामीन देण्याची सक्ती केली जात आहे. त्यांच्यावर जो गुन्ह्याचा आरोप नेहमी लादला जातो तो असा, " तुम्ही सभेचे पुढारी आहात आणि तुम्ही सभेत सामील होण्याची लोकांवर सक्ती करता." कधी कधी आणखीही असे म्हटले जाते की, " तुम्ही न्हावी, धोबी बंद केले आहेत." गेल्या डिसेंबरात आणि जानेवारीत ह्या आरोपात काही सत्य होते. पण त्यानंतर ह्या जिल्ह्यांत सामाजिक बहिष्काराचे एकही प्रकरण झालेले नाही. अशा आरोपावरून खोटे खटले भरले जातात आणि न चुकता शिक्षा दिल्या जातात. स्थानिक पोलिस किंवा जमीनदारांच्या चिथावणीने खाजगी व्यक्तीं-कडून बहुतेक हे खटले भरले जातात.

राजद्रोही सभांचा कायदा फैजाबाद, प्रतापगड, सुलतानपूर व राय-बरेली येथे जारी आहे. हा कायदा लावण्यापूर्वी ह्यातील काही जिल्ह्यांत १४४ कलमाखाली सभाबंदी केली होती. हा कायदा पाळला गेला आणि सभा भरल्या नाहीत. असे असूनही राजद्रोही सभांचा कायदा जारी करण्यात आला.

ह्या जिल्ह्यांतील आमच्या कार्यकर्त्यांना निरनिराळ्या प्रकारे छळतात. त्यांच्या मागे आणि पुढे सी. आय्. डी. आणि गणवेशातल्या पोलिसांचा जथा हिंडत असतो. खेड्यातील लोकांना काँग्रेसमध्ये जाण्यास किंवा अन्य प्रकारे आम्हांला मदत करण्यास धाकदपटशा दाखविला जातो. तोंडी त्यांना असे सांगण्यात आले आहे की, चरखा वापरणे हे कायद्याविरुद्ध आहे. " महात्मा गांधी की जय " ओरडणे हा भयंकर गुन्हा आहे. काँग्रेसच्या फॉर्मवर सही करणे हे बेकायदा आहे. इत्यादी. इत्यादी. ज्यांनी सह्या केल्या आहेत त्यांना कायदेशीर इलाज करण्याचा धाक घातला जात आहे आणि प्रकरणे दडपून टाकण्याकरिता लाच उकळण्यात येत आहे.

प्रतापगडमधील सहा तरुण कार्यकर्त्यांना पत्रके वाटण्याबद्दल तुरुंगात पाठविण्यात आले. त्यांच्याजवळ जामीन मागितला पण तो त्यांनी दिला नाही. सुलतानपूर येथे दुसऱ्या सहा जणांवर असाच खटला सुरू केला पण तो काढून घेण्यात आला. राजद्रोही सभांच्या कायद्यातील कलमे मोडल्याच्या खोट्या आरोपाखाली दोन कार्यकर्त्यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. त्यातील एकाला पोलिसाने बडविले आणि लाथ मारली.

किसानांना चिरडण्याकरिता सरकारने जे शेकडो उपाय योजले आहेत त्यांची योग्य कल्पना देणे कठीण आहे. स्वतःला नेमस्त म्हणविणारे जमीनदार आणि काही स्थानिक लोक हे सरकारला जाऊन मिळाले आहेत. आणि त्यांनी सर्वसामान्य किसानांचे जीवन असह्य केले आहे.

किसान चळवळ मारून टाकण्याकरिता संयुक्त प्रांतातील इतर जिल्ह्यांत तसाच प्रयत्न पण अल्प प्रमाणात करण्यात आला आहे.

२. कार्यकर्त्यांना शिक्षा

अनेक काँग्रेस व खिलाफत कार्यकर्त्यांच्यावर खटले भरले व त्यांना शिक्षा दिल्या. आतापर्यंत ह्या चळवळीच्या कोणत्याही पुढाऱ्याला हात लावला नाही. पण त्यांचे कर्तबगार साहाय्यक हे तुरुंगात गेले. ज्या अधिक प्रमुख पुढाऱ्यांवर राजद्रोहाचे खटले सुरू केले, त्यांत डेहराडूनच्या पंडित देवरतनशर्माचा उल्लेख केला पाहिजे.

अलाहाबादचा हमीद अहंमद हा एक खिलाफत कार्यकर्ता आहे. त्यास नुकतीच १२१ अ कलमाखाली जन्मठेपेची व मालमत्ता जप्तीची शिक्षा झाली. त्याचा अपराध असा की, त्याने एक भाषण केले. त्या भाषणात त्याने सध्या अनत्याचार पाळला पाहिजे असे सांगितल्यानंतर तो म्हणाला की, जर असहकारिता अयशस्वी झाली तर मुसलमान तलवारीला हात घालतील. जिल्ह्यातील अनेक काँग्रेस पदाधिकाऱ्यांना १०८ किंवा १२४ अ कलमाखाली शिक्षा झाल्या आहेत.

मद्यपानबंदीच्या चळवळीत काही स्वयंसेवकांना तुरुंगात पाठविण्यात आले आहे.

३. जामिनकीची कलमे व कलम १४४

वरील कलमांचा अत्यंत व्यापक प्रमाणावर उपयोग केला जात आहे. आणि असा एकही कार्यकर्ता नसेल की, ज्याच्यावर १४४ कलमाखाली नोटीस बजावली नसेल. मौलाना महंमद अली यांनाही नोटीस मिळाली आहे. माझ्याजवळ शंभरावर नावांची यादी आहे व ती यादी अपुरी आहे.

१४४ कलमाचा उपयोग साऱ्या जिल्ह्यांना लागू करण्यात व तेथे सभा बंदीकरिता करण्यात येत आहे. राजद्रोही सभांचा उद्देश रुफल व्हावा म्हणून हे केले जात आहे. निदान एका जिल्ह्यात १४४ कलमाखाली

अशी नोटीस काढण्यात आली की, खिलाफतीच्या पावत्या विकू नयेत आणि संबंधित व्यक्ती अशा संघटनेची सभासद असता कामा नये.

जामिनकीची कलमे प्रेस ॲक्टची जागा घेत आहेत. प्रताप पत्रात काही लेख प्रसिद्ध झाल्याबद्दल त्याच्या संपादक व मुद्रकाकडून ३०,००० रुपयांची जामिनकी मागितली. जामिनकीची रक्कम भरली.

४. इतर गोष्टी

पुष्कळ बंदुकींचे परवाने जप्त करण्यात आले. सरकारी नोकरांचे नातेवाईक असहकारितावादी असल्यामुळे त्यांना बडतर्फीचा दम भरण्यात आला आहे. गांधी टोपी वापरण्यास मनाई करणारे हुकूम निघाले आहेत. जे स्वराज्य फंडाकरिता रकमा गोळा करतात किंवा रकमा देतात त्यांनाही धाक दाखविणाऱ्या नोटिसा काढल्या आहेत.

काँग्रेस व किसान सभांच्या कचेऱ्यांवर पोलिसांनी धाडी घातल्या आहेत.

बनारसमध्ये काही विद्यार्थी व अनेक लोकांना तुरुंगवासाच्या शिक्षा देण्यात आल्या आहेत.

'यंग इंडिया', १८-८-१९२१

आधार

आज : वाराणशीला प्रसिद्ध होणारे हिंदी दैनिक.

अमृतबझार पत्रिका : कलकत्त्याचे इंग्रजी वृत्तपत्र. १८६८ मध्ये बंगाली साप्ताहिक म्हणून प्रकाशित; १८९१ पासून दैनिक.

बापुना पत्रो – सरदार वल्लभभाईने (गुजराती) : संपादिका मणिबेन पटेल, नवजीवन प्रकाशन संस्था, अहमदाबाद १९५७.

बापुना पत्रो–मणिबेन पटेलने (गुजराती) संपादिका मणिबेन पटेल, नवजीवन प्रकाशन संस्था, अहमदाबाद १९५७.

बापुनी प्रसादी (गुजराती) : मथुरादास त्रिकमजी; नवजीवन प्रकाशन संस्था, अहमदाबाद १९४८.

दि बॉंबे क्रॉनिकल : मुंबईचे इंग्रजी दैनिक.
बॉंबे सिक्रेट ॲब्स्ट्रॅक्ट्स १९२१.

गांधी स्मारक संग्रहालय नवी दिल्ली : गांधी साहित्य व कागदपत्रे यांचे मध्यवर्ती ग्रंथालय व संग्रहालय; पाहा. खंड १, पान ३०३.

गुजराती : मुंबईस प्रसिद्ध होणारे गुजराती साप्ताहिक.

दि हिंदू : मद्रासचे इंग्रजी दैनिक; १८७८ मध्ये साप्ताहिक म्हणून प्रकाशित. १८८३ मध्ये त्रिसाप्ताहिक व १८८९ पासून दैनिक.

दि लीडर : अलाहाबादचे इंग्रजी दैनिक.

लेटर टू ए फ्रेंड : संपादक सी. एफ् अँड्र्यूज; जॉर्ज ॲलन अँड अनविन लि. लंडन १९२८.

महादेव देसाईच्या रोजनिशीचे हस्तलिखित : स्वराज्य आश्रम बारडोली येथे ठेवलेले.

नरसिंहरावनी रोजनिशी (गुजराती) : नरसिंहराव भोलानाथ दिवेटिया, गुजरात विद्यापीठ अहमदाबाद.

नवजीवन : (१९१९–१९३१) गुजराती साप्ताहिक (मधून मधून द्विसाप्ताहिक) संपादक गांधी; अहमदाबादहून प्रकाशित; पहिला अंक ७ सप्टेंबर १९१९. 'नवजीवन अने सत्य' या गुजराती मासिकाचे (१९१५–१९१९) परिवर्तन. ऑगस्ट १९, १९२१ पासून हिंदीतही प्रकाशन.

साबरमती संग्रहालय : गांधींच्या द. आफ्रिकेतील कालाचे दप्तर असलेले ग्रंथालय व संग्रहालय आणि भारतीय काल १९३३ पर्यंतचा. पाहा. खंड १. पान ३०३.

दी सर्च लाईट : १९१८ पासून पाटण्यात प्रसिद्ध होणारे इंग्रजी दैनिक.

यंग इंडिया (१९१८–३१) : जमनादास द्वारकादास यांनी मुंबईस स्थापन केलेले इंग्रजी साप्ताहिक. ७ मे १९१९ पासून गांधींच्या देखरेखीखाली द्विसाप्ताहिक; ऑक्टोबर १९१९ पासून गांधींच्या संपादकत्वाखाली अहमदाबाद येथे साप्ताहिक.

कालानुक्रम

(एप्रिल १५-ऑगस्ट १९, १९२१)

एप्रिल १५ : गांधीजींची रास व बोरसदला जाहीर सभेत भाषणे. दुपारी गोध्रा येथे आगमन.

एप्रिल १६ : हलोल तालुका परिषदेत अध्यक्ष; त्यांना थैली देण्यात आली. संध्याकाळी शेतकऱ्यांच्या पुढे भाषण.

एप्रिल १७ : कलोल येथे हरिजनांच्या सभेत भाषण. गोध्रा येथे जाण्याकरिता प्रयाण.

एप्रिल १८ : सकाळी सुरतेला पोहोचले. सुरत नगरपालिकेने दिलेल्या मानपत्राला उत्तर. त्यात चरखे सुरू करण्याच्या गरजेवर आणि अस्पृश्यता नष्ट करण्यावर भर. पाटीदार विद्यार्थी आश्रमाच्या विद्यार्थ्यांपुढे भाषण. तिसऱ्या प्रहरी स्त्रियांच्यापुढे भाषण आणि टिळक स्वराज्य फंडाकरिता त्यांनी दिलेल्या देणग्यांचा स्वीकार. ओलपाड या तालुक्याच्या गावी जाण्याकरिता प्रयाण.

एप्रिल २० : संध्याकाळी सुरतेला जाहीर सभेत भाषण. बलसाडला भाषण.

एप्रिल २१ : वल्लभभाई पटेल व इतरांच्या बरोबर सकाळी चिखलीला आगमन. सिसोद्रा येथे सभांतून भाषणे.

एप्रिल २२ : सिंधच्या दौऱ्याकरिता प्रयाण.

एप्रिल २४ : सिंधला हैद्राबाद येथे आगमन.

एप्रिल २६ : सकाळी कराचीला पोहोचले. गर्दीच्या जाहीर सभेत भाषण. रुपये २५,००० ची थैली मिळाली. कराचीच्या नगरपालिका सभासदांना सांगितले की, सरकारी मदतीशिवाय जर हिंदी शिकवून, चरख्याचे वर्ग काढून आणि नगरपालिकेच्या निधीतून खर्च भागत नसतील व जर शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करता येत नसेल तर राजीनामे द्या. कराची वकील वर्गाला मुलाखत देताना त्यांना सांगितले की, कोणत्या वकिलांनी वकिली थांबवावी, हेही चिठ्ठ्या टाकून ठरवा. ज्यांच्या नावाची चिठ्ठी निघेल त्यांनी असहकारिता करावी आणि बाकीच्यांनी असहकारितावाद्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाकरिता वर्गणी द्यावी.

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे दंगा.

मे १ : रात्री अहमदाबादला पोहोचले.

मे ४ : सकाळी कपडवंजला पोहोचले व जाहीर सभेत भाषण केले. कठलाल येथे स्त्रियांच्या सभेत भाषण.

रात्री मोटरीने नडियादला जाण्याकरिता निघाले.

मे ७ : सकाळी मुंबईला पोहोचले; महाराष्ट्र प्रांतिक परिषदेपुढे भाषण.

मे ९ : सरुप कुमारी नेहरू (विजयालक्ष्मी) ह्यांचे आर्. एस्. पंडित यांच्याबरोबर झालेल्या लग्नाला उपस्थित.

मे १० : अलाहाबाद जिल्हा परिषदेमध्ये नागरिकांतर्फे मोतीलाल नेहरू यांनी दिलेल्या मानपत्राचा स्वीकार. तेथे भाषण.

मे ११ : अलाहाबादहून प्रयाण.

मे १२ : सिमल्याला तीन प्रहरी पोहोचले.

मे १३ : तीन प्रहरी व्हाइसरॉयशी मुलाखत.

मे १४ : सकाळी व्हाइसरॉयशी आणखी मुलाखत. मिरवणूक काढली व स्वागत केले. जाहीर सभेत भाषण.

स्त्रियांच्या सभेत भाषण करून त्यांना स्वदेशी वापरण्यास आणि त्यांना टिळक स्वराज्य फंडाला मुक्तहस्ताने मदत करण्यास सांगितले. रोख रकम व सोन्याचे दागिने गोळा केले.

मे १५ : सिमल्याला इदगा मैदानावर भाषण.

मे २१ : भुसावळच्या वाटेत एका मधल्या रेल्वेस्टेशनवर सभेत भाषण.
भुसावळला पोहोचले; जाहीर सभेत भाषण.

मे २२ : संगमनेरला सभेत भाषण

मे २३ : रात्री येवल्याला पोहोचले.

मे २४ : बार्शीच्या सभेत लोकांना टिळक स्वराज्य फंडास भरपूर पैसे देण्यास व स्वदेशी वापरण्यास सांगितले.

मे २६ : अगदी सकाळी मोटरीने सोलापूरला पोहोचले. रिपन हॉलमध्ये नगरपालिकेने दिलेल्या मानपत्राला उत्तर.

मे २७ : बागलकोटहून विजापूरला संध्याकाळी पोहोचले.

स्त्रियांच्या सभेत आणि नंतर मोठ्या जाहीर सभेत भाषण. नगरपालिका आणि स्थानिक व्यापारी मंडळाने मानपत्रे दिली.

मे २८ : विजापूरहून प्रयाण.

मे २९ : मुंबईतील आमसभेत लोकांना टिळक स्वराज्य फंडाकरिता मुक्त हस्ताने पैसे देण्यास सांगितले.

मे ३० : भडोचला जाण्याकरिता मुंबई सोडली.

जून १ : भडोचच्या गुजरात राजकीय परिषदेत भाषण.

वेजालपूर येथे अंत्यज परिषदेने दिलेल्या मानपत्राला उत्तर.

जून २ : भडोचच्या खिलाफत परिषदेत भाषण.

जून ५ : गुजरात राजकीय परिषदेपुढे भाषण.

जून ८ : सारखेज, मामोद येथील सभेत भाषणे. टिळक स्वराज्यफंडाकरिता देणग्या जमविल्या. अहमदाबादच्या वकिलांबरोबर चर्चा.

जून ९ : अहमदाबादहून वढवाणला मोटरीने गेले.

लिमडीच्या महाराजांच्या निवासस्थानी जाहीर सभेत भाषण.

जून १२ : अहमदाबाद येथे जाहीर सभेत अध्यक्षस्थान स्वीकारले व भाषण केले

जून १५ : मुंबई, घाटकोपरच्या नागरिकांनी हार्दिक स्वागत केले. त्यांच्यापुढे भाषण; व्यापारी वर्गातर्फे टिळक स्वराज्य फंडाला ४०,००० रुपयांची थैली.

जून १८ : पारशी सेंट्रल असोसिएशनच्या मंडळापुढे असहकारितेवर भाषण.
मिलिटरी रिक्वायरमेंट कमिटीपुढे हजर होण्यास नकार.

जून १९ : विलेपार्ले, मुंबई येथे जाहीर सभेत भाषण; टिळक स्वराज्य फंडाला थैली मिळाली.

जून २२ : लोकमान्य राष्ट्रीय कन्याशाळेचे उद्घाटन केले. ती मुंबईची पहिली मुलींची राष्ट्रीय शाळा होती.

जून २५ : प्राथमिक शाळांतील शिक्षक व विद्यार्थ्यांपुढे भाषण, मांडवी मुंबई; टिळक स्वराज्य फंडाला थैली मिळाली.

जून २६ : सांताक्रूज येथे जाहीर सभेत भाषण; टिळक स्वराज्य फंडाला रुपये ३०,००० ची थैली मिळली,

जून ३० : निरनिराळ्या संस्थांच्या सभांत भाषणे; टिळक स्वराज्य फंडाला देणग्या मिळाल्या. कॉटन असोसिएशन व पारशी असोसिएशन यांच्याकडून थैल्या मिळाल्या. बेझवाडा काँग्रेसने टिळक स्वराज्य फंडाकरिता जे १ कोटी रुपयांचे लक्ष्य ठरविले होते ते साध्य झाले.

जुलै १ : वांद्रा, मुंबई येथील सभेत भाषण.

जुलै २ : बॉंबे कमिशन एजन्टस् असोसिएशन आणि लिंगायत कमिशन एजन्टस असोसिएशन यांच्यातर्फे भरविलेल्या सभांत भाषणे.

जुलै ६ : अलिगडला जातीय दंगल उद्भवली. गांधींनी गिरणीमालकांना विनंती-पत्र काढले की, त्यांनी स्वार्थाच्या दृष्टीने धंदा न करता राष्ट्रीय दृष्टीने करावा आणि कापडाची किंमत वाढवू नये.

जुलै ७ : परदेशी कापडाची आयात थांबवावी म्हणून कापड व्यापाऱ्यांना विनंती.

जुलै १० : औषध विक्रेत्यांच्या सभेत स्वदेशीवर भाषण.

जुलै १२ : मुंबई पारशी राजकीय सभेने भरविलेल्या सभेत दारू व्यापाऱ्यां-समोर दारूबंदीवर भाषण.

जुलै १६ : परळ, मुंबई येथील सभेत स्वदेशीवर भाषण.

जुलै १७ : मध्यवर्ती खिलाफत कमिटीच्या असहकार कमिटीने तयार केलेला अहवाल प्रसिद्ध झाला.

मुंबईत विणकरांच्या सभेत गांधींचे भाषण.

जुलै १९ : मुंबईत तीन प्रहरी मुस्लिम स्त्रियांच्या सभे भषण.

पारशी राजकीय सभेच्या सभेत दारू मक्तेदारांच्या पुढे भाषण.

जुलै २० : पुणे नगरपालिकेचे मानपत्र स्वीकारले. टिळक महाविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी भाषण. टिळकांच्या पुतळ्याचे अनावरण. नंतर जाहीर सभेत भाषण. त्या सभेने एकमताने परदेशी कापडावरील बहिष्काराचा व स्वदेशी वापरण्याचा ठराव पास केला.

जुलै २२ : मुंबईत स्वदेशीवर दोन जाहीर सभांत भाषणे.

जुलै २३ : पारशी राजकीय सभा, मुंबई यांच्या विद्यमाने भरविलेल्या जाहीर सभेत भाषण.

जुलै २४ : सांताक्रूजच्या सभेत स्वदेशीवर भाषण.

जुलै २६ : मुंबईत मारवाडी विद्यालय आणि भायखळा येथील सभेत परदेशी कापडावरील बहिष्काराबद्दल भाषण.

जुलै २८ : मुंबईस अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक.

जुलै ३० : पारशी राजकीय सभेने भरविलेल्या पारशांच्या गर्दीच्या सभेत स्वदेशीवर भाषण.

जुलै ३१ : ए. आय्. सी. सी. च्या निवडणुकीसंबंधीचा ठराव वर्किंग कमिटीत मांडला.

परळ,मुंबई येथे एल्फिन्स्टन गिरणीजवळ परदेशी कापडाच्या होळीने स्वदेशीची मोहीम सुरू करण्याकरिता ऐतिहासिक महत्त्वाच्या सभेत भाषण. मुंबईच्या राष्ट्रीय स्त्रीसभेतर्फे भरविलेल्या खादी-प्रदर्शनाच्या उद्घाटनाचे भाषण. मुंबई कोर्टात आरोपीतर्फे साक्षीदार म्हणून हजर.

ऑगस्ट १ टिळकांच्या पुण्यतिथीला मुंबईत चौपाटी येथे जाहीर सभेत भाषण.

ऑगस्ट ३ : मुंबईत खिलाफत भांडाराचा उद्घाटन समारंभ केला.

ऑगस्ट ५ : अलिगडला पोहोचले.

ऑगस्ट ६ : मोरादाबादला पोहोचले; स्त्रियांची सभा व जाहीर सभेत भाषण.

ऑगस्ट ७ : लखनौच्या अमीनुद्दौला पार्कमध्ये प्रचंड जाहीर सभेत भाषण.

ऑगस्ट ८ : गांधीजी व मध्यवर्ती खिलाफत कमिटीने मुसलमानांना विनंती केली की, येणाऱ्या बकरीदचे वेळी गोहत्या करू नये.

ऑगस्ट ९ : गांधीजी कानपूरला पोहोचले; व्यापारी आणि स्त्रियांच्या सभांत भाषणे; मानपत्राचा स्वीकार. जाहीर सभेत भाषण; **आजला** मुलाखत दिली.

ऑगस्ट १० : सकाळी अलाहाबादला पोहोचले आणि स्त्रियांपुढे स्वदेशीवर भाषण केले. संध्याकाळी जाहीर सभेत भाषण, मोतीलाल नेहरू अध्यक्ष.

ऑगस्ट ११ : सहसराम येथील सभेत भाषण.

ऑगस्ट १२ : गयेला पोहोचले. रात्री जाहीर सभेत भाषण.

ऑगस्ट १३ : बिहारशरीफच्या विणकाऱ्यांनी स्वागत केले. जाहीर सभेत भाषण तेथे नगरपालिकेचे मानपत्र देण्यात आले.

रात्री स्त्रियांच्या सभेत हजर राहिले.

ऑगस्ट १५ : सिमलाहिल्च्या लोकांना ब्रिटिश सरकारची वेठबिगार करू नका म्हणून विनंती केली.

ऑगस्ट १६ : पाटण्यात.

ऑगस्ट १७ : कलकत्त्यात मिर्झापूर पार्क येथे संध्याकाळी जाहीर सभेत भाषण. सिआल्डा स्टेशनवर सेवासमितीकडून मानपत्र स्वीकारले. आसामला प्रयाण.

ऑगस्ट १९ : गोपिनाथ बार्डोलाय सेक्रेटरी, आसाम प्रांतिक कॉंग्रेस कमिटी, यांच्या घरी संध्याकाळी कॉंग्रेस कार्यकर्त्यांना भेटले.

सूची

ख

ग

प

य

र

ल

व

श

स

शिर्षकांची सूची

महात्मा गांधी वाङ्मय प्रकाशन समिती